UNIVERSAL
LIBRARY

OU_192126

UNIVERSAL
LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M909 N39N Accession No. M868

Author નેહરુ, પં. જવાહર લાલ

Title જાગતીક ઇતિહાસની ઝોકો

This book should be returned on or before the date last marked below.

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प ५९ वें

जा ग ति क

# इतिहासाचें ओझरतें दर्शन

( खंड २ रा )

लेखक

पं. जवाहरलाल नेहरू

अनुवादक

शिवराम गोविंद भावे

[सन १९५२ ]

[ मूल्य ।०॥ रुपये

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| ७३. जलमार्गांचा शोध - - | ३६९ |
| ७४. मंगोलियन लोकांच्या साम्राज्याचा विध्वंस - - | ३७७ |
| ७५. हिंदुस्थानांत एक बिकट प्रश्न सोडविण्याची धडपड सुरू होते - | ३८४ |
| ७६. दक्षिण हिंदुस्थानांतील राज्ये - - - | ३९२ |
| ७७. विजयानगर - - - - - | ३९७ |
| ७८. मज्झपहित आणि मलाक्का यांचीं मॅलेशियांतील साम्राज्ये - | ४०१ |
| ७९. यूरप खंड पूर्व आशियांत आपली तुंबडी भरूं लागतें - | ४०८ |
| ८०. चीनमधील शांततेचा आणि भरभराटीचा काळ - - | ४१२ |
| ८१. जपान देश स्वतःला कोंडून घेतो - - - - | ४१९ |
| ८२. धुमाकुळांत सांपडलेलें यूरप खंड - - - | ४२५ |
| ८३. रेनेसान्स अथवा ज्ञानयुग - - - - | ४३० |
| ८४. प्रॉटेस्टंट लोकांचें बंड आणि शेतकऱ्यांचीं युद्धें - - | ४३६ |
| ८५. सोळाव्या व सतराव्या शतकांतील यूरपमधील अनियंत्रित राजसत्ता | ४४३ |
| ८६. नेदरलंडचें स्वातंत्र्यासाठीं युद्ध - - - | ४५० |
| ८७. इंग्लंड देश आपल्या राजाचें डोकें उडवितो - - | ४५८ |
| ८८. बाबर - - - - - | ४६७ |
| ८९. अकबर - - - - | ४७४ |
| ९०. हिंदुस्थानांतील मोंगल साम्राज्याचा ऱ्हास व नाश - - | ४८५ |
| ९१. शीख आणि मराठे - - - - - | ४९३ |
| ९२. इंग्रजांची हिंदुस्थानांतील आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात - | ४९९ |
| ९३. चीनच्या मांचू घराण्यांतील एक श्रेष्ठ राजा - - | ५०८ |
| ९४. चीनचा बादशहा इंग्लंडच्या राजास पत्र लिहितो - - | ५१५ |
| ९५. यूरपमधील अठराव्या शतकांतील भिन्न भिन्न कल्पनांमधील झगडा | ५२० |
| ९६. अत्यंत मोठ्या उलाढालींच्या दाराशीं उभें असलेलें यूरप खंड - | ५२८ |
| ९७. मोठ्या यंत्रांचा उदय - - - - | ५३७ |
| ९८. इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रांतीला सुरुवात होते - - | ५४५ |
| ९९. अमेरिका इंग्लंडपासून फुटून निघते - - - | ५५४ |
| १००. बॅस्टीलचा पाडाव - - - - | ५६३ |
| १०१. फ्रेंच राज्यक्रांति - - - - | ५७३ |
| १०२. क्रांति आणि प्रतिक्रांति - - - - | ५८२ |
| १०३. राज्यकर्त्यांच्या वागण्याच्या पद्धती - - - | ५९२ |
| १०४. नेपोलियन - - - - | ५९८ |
| १०५. पुन्हां एकवार नेपोलियन - | ६०९ |

१०६. एकवार सर्व जगाची संकलित पाहणी - - - ६२०
१०७. महायुद्धापूर्वीचीं जगाचीं शंभर वर्षें - - - ६२६
१०८. एकोणिसावें शतक पुढें चालू - - - ६३४
१०९. हिंदुस्थानांतील युद्धें आणि बंडें - - - ६४५
११०. हिंदी कारागिरांची गळचेपी - - - - ६५६
१११. हिंदुस्थानांतील खेडीं, शेतकरी आणि जमीनदार - - ६६४
११२. ब्रिटननें हिंदुस्थानचा कारभार कसा केला? - - ६७६
११३. हिंदुस्थानची पुनर्जागृति - - - - ६८७
११४. ब्रिटन चीनच्या गळ्यांत अफू बांधतें - - - ७००
११५. अडचणींत सांपडलेला चीन देश - - - ७१०
११६. जपानची घोडदौड - - - - ७१६
११७. जपान रशियाचा पराभव करतो - - - ७२६
११८. चीनमध्यें प्रजासत्ताक राज्य स्थापन होतें - - ७३४
११९. बृहद् भारत आणि ईस्ट इंडीज - - - ७४१
१२०. आणखी एक वर्षारंभदिन - - - - ७५१
१२१. फिलिपाइन्स आणि अमेरिका - - - ७५६
१२२. तीन खंडांच्या संगमाच्या ठिकाणीं - - - ७६२
१२३. सिंहावलोकन - - - - ७६९
१२४. इराणची प्राचीन चिवट संस्कृति - - - ७७६
१२५. इराणमधील साम्राज्यशाही आणि राष्ट्रवाद - - ७८५

## नकाशे

१६. नवीन भूमीचा शोध - - - - ३७२
१७. रोमन साम्राज्याविरुद्ध बंड - - - - ४३८
१८. अकबराचें साम्राज्य - - - - ४७७
१९. इंग्रज आणि फ्रेंच हिंदुस्थानसाठीं लढतात - - ५०२
२०. बादशहा चीन लुंगचें साम्राज्य - - - ५१८
२१. अमेरिका फुटून वेगळी होते - - - ५५६
२२. नेपोलियनचें यूरपमधील वर्चस्व - - - ६०२
२३. १८५७ च्या महान् बंडाच्या वेळचा हिंदुस्थान - - ६५३
२४. ब्रिटन आणि चीन - - - - ७०३
२५. जपानची वाढ - - - - ७२२
२६. बृहद् भारत आणि पूर्वेकडील हिंदी बेटें - - - ७४४
२७. सोळाव्या व सतराव्या शतकांतील उस्मानी साम्राज्य - - ७६६
२८. रशिया व इराण - - - - ७८८

## ७३

# जलमार्गांचा शोध

३ जुलै, १९३२

यूरप खंडांत मध्ययुगाचा अंत होण्याला सुरुवात झालेली आहे आणि नवीन जागतिक अवस्था त्या जागीं येऊं पाहत आहे, अशा काळाशीं आपण येऊन पोंचलों आहों. प्रचलित परिस्थितीबद्दल समाजांत असंतोष आणि विरोध निर्माण झालेला आहे; ही अशी असंतोषाची भावना म्हणजे फेरफार आणि प्रगति यांची जननीच होय. सरंजामदारशाहीमुळें आणि धर्मव्यवस्थेमुळें ज्या ज्या वर्गांची पिळणूक होत होती ते सारे असंतोषानें धुमसत होते. आतां शेतकऱ्यांचीं बंडें (यांनाच फ्रेंच भाषेंत शेतकऱ्यांमधील जॅक्विस या एका नांवावरून जॅक्वेरीज असें म्हणतात) होऊं लागलीं होतीं हें आपण पाहिलें आहे. परंतु हे शेतकरी अजून फार मागासलेले आणि दुर्बल होते; आणि हीं एवढीं बंडें करूनही त्यांना फारसा फायदा झाला नाहीं. त्यांच्या यशाचा दिवस अजून दूर होता. या क्षणाला खरा झगडा जो होता तो एका बाजूला जुना सरंजामदारवर्ग आणि दुसऱ्या बाजूला शक्तिमान् होऊं लागलेला आणि जगाविषयीं नवीन संपूर्ण ज्ञान झाल्यामुळें पूर्ण जागृत झालेला मध्यमवर्ग यांच्यामध्यें होता. सरंजामशाहीचा अर्थ हा होता, कीं संपत्ति ही जमिनीवर आधारलेली आहे; किंबहुना, जमीन म्हणजेच संपत्ति आहे. पण आतां नवीनच एक प्रकारची संपत्ति जमा होऊं लागली होती. तिचा उगम जमिनीपासून नव्हता. तिचा उगम उद्योगधंदे आणि व्यापार यांपासून होत होता आणि नवीन उत्पन्न झालेला जो मध्यमवर्ग अथवा धनिकवर्ग हा त्यापासून पुष्ट होत जाऊन त्यामुळें त्याची सत्ताही वाढत होती. आतां ज्या काळाशीं आपण आलों आहों, त्या काळीं हा झगडा सुरू होऊन पुष्कळ काळ लोटलेला होता. आतां विशेष हें झालें, कीं या दोन बाजूंच्या परस्पर भूमिकांमध्यें बदल पडला. सरंजामशाही जरी अद्याप चालू असली, तरी तिचें धोरण बचावाचें झालें. धनिकवर्गाला आपल्या नव्या वाढत्या सामर्थ्याचा विश्वास येऊन त्यानें चढाईचें धोरण स्वीकारलें. असा हा झगडा पुष्कळ शतकें चालू राहिला; परंतु त्यांत धनिकवर्गालाच अधिकाधिक यश येत राहिलें. यूरपमधील निरनिराळ्या देशांत या झगड्याचें मान वेगवेगळ्या प्रमाणांत राहिलें. यूरपच्या पूर्व भागांत हा झगडा जवळजवळ नव्हताच म्हणतां येईल. धनिकवर्गाला प्रथम यूरपच्या पश्चिम भागांतच महत्त्व प्राप्त झालें.

प्राचीन बंधनांची आडकाठी नाहींशी झाली याचा अर्थ शास्त्रें, कला, वाङ्मय, वास्तुशास्त्र, शिल्पशास्त्र आणि नवीन संशोधन, अशा अनेक दिशांनीं प्रगति होण्यास वाव मिळाला. मनुष्यांची अंतर्गत शक्ति–स्वत्व–शृंखला तोडून बाहेर पडते, तेव्हां नेहमीं हें असेंच घडत असतें. आमच्या देशाला स्वातंत्र्य प्राप्त होईल तेव्हांही अगदीं असेंच घडेल; आपल्या सामान्य जनतेची आणि प्रतिभावंतांची शक्ति फांकून तिचा सर्व दिशांना संचार होऊं लागेल.

धर्मपीठाच्या वर्चस्वांतील दम नाहींसा होऊन तें जसजसें कमी होऊं लागलें, तसतसे लोक मंदिरांवर (कॅथीड्रल) किंवा चर्चे बांधण्यावर कमी खर्च करूं लागले. ठिकाठिकाणीं नवीन सुंदर सुंदर इमारती बांधल्या जातच होत्या; पण त्या आतां नगरमंदिरें किंवा अशाच नव्या धर्तीच्या इमारती होत्या. गॉथिक वास्तुपद्धति (शिल्पपद्धति) ही पण मागें पडून तिच्या जागीं नवीनच प्रथा निर्माण होऊं लागली होती.

अगदीं याच वेळेला, पश्चिम यूरप खंडांत नवीन उत्साहाचें भरतें आलें होतें अशा क्षणाला, पूर्वेकडील सोन्याच्या लोभाचें आकर्षण निर्माण झालें. हिंदुस्थानांत आणि चीनमध्यें जाऊन आलेल्या मार्को पोलोनें आणि इतर प्रवाशांनीं सांगितलेल्या हकीकती ऐकून लोकांच्या मनांत कर्तृत्वाच्या, धाडसाच्या कल्पनांची खळबळ माजली होती; त्यांतच तिकडील अगणित सोन्याच्या मोहाची भर पडून पुष्कळशा लोकांची वृत्ति दर्यावर्दीपणाकडे वळली. याच सुमाराला कॉन्स्टान्टिनोपलचा पाडाव झाला. त्यामुळें पूर्वेकडे जाण्याचे सर्वच जमिनीवरील मार्ग आणि त्या काळचे जलमार्गही तुर्क लोकांच्या ताब्यांत गेले; आणि तुर्कांनीं कांहीं व्यापाराला फारसें प्रोत्साहन दिलें नाहीं. मोठेमोठे धंदेवाले आणि व्यापारी जे होते, ते या अडचणीमुळें आंतल्या आंत चिडून गेलेले होते. दुसरा जो नवाच साहसाचीं अचाट कृत्यें करूं इच्छिणारा आणि अशा रीतीनें पूर्वेकडील सोनें मिळवूं चाहणारा वर्ग निर्माण झाला होता, त्यालाही तुर्कांच्या या मार्ग-नियंत्रणामुळें अडकल्यासारखें होऊन अस्वस्थता वाटत होती. म्हणून सुवर्णमय पूर्वेकडे जाऊन पोंचण्यासाठीं नवीन मार्ग शोधून काढण्याकरितां या सर्वांचीच धडपड सुरू झाली.

आज शाळेंत जाणाऱ्या छोट्या मुलीलासुद्धां माहीत असतें, कीं पृथ्वी वाटोळी आहे आणि ती सूर्याभोंवतीं फिरते. आज आपल्याला सगळ्यांनाच ही अगदीं साधी स्पष्ट गोष्ट वाटते. पण प्राचीन काळच्या लोकांना ही गोष्ट इतकी साधी व स्पष्ट वाटत नव्हती; आणि असा विचार पटून जर कोणीं तो बोलून दाखविला तर धर्मपीठाचा त्यावर राग होत असे. अशा रीतीनें या बाबतींत धर्मपीठाची भीति असून सुद्धां जास्त जास्त लोकांना पृथ्वी वाटोळी आहे ही गोष्ट पटत चालली. बरें, पृथ्वी जर वाटोळी आहे, तर पश्चिमेकडे प्रवास करीत राहिलें म्हणजे चीन आणि हिंदुस्थान येथपर्यंत पोंचतां आलेंच पाहिजे, असा कांहींनीं विचार केला. कांहींना असें वाटलें, कीं

आफ्रिकेला वळसा घालून गेल्यास हिंदुस्थानांत जातां येईल. या वेळीं सुएझचा कालवा नव्हता आणि भूमध्य समुद्रांतून तांबड्या समुद्रांत जातां येत नव्हतें, हें या ठिकाणीं तुला लक्षांत घेतलें पाहिजे. त्यामुळें चीजवस्त आणि व्यापारी माल भूमध्य समुद्राच्या कांठापासून तांबड्या समुद्राच्या कांठापर्यंत जमिनीवरूनच, बहुशः उंटांच्या पाठीवर लादून नेण्यांत येत असे आणि तेथून मग जहाजांतून तो पलीकडच्या बाजूला नेण्यांत येई. खरें पाहिलें असतां कोणत्याच काळीं ही व्यवस्था तितकीशी सोयीची नव्हती. ईजिप्त आणि सीरिआ हे देश तुर्कांच्या ताब्यांत गेल्यापासून तर हा मार्ग अधिकच अडचणीचा झाला.

तथापि, हिंदुस्थानांतील सोन्याचा लोभ लोकांच्या अंतःकरणांत उसळतच होता आणि तिकडे जाण्याला लोकांना प्रवृत्त करीतच होता. तेव्हां या देशाच्या मार्गासाठीं जें संशोधन सुरू झालें, त्यांत स्पेन आणि पोर्तुगाल या देशांनीं पुढाकार घेतला. या सुमारास मूर किंवा सारासन लोकांपैकीं राहिल्यासाहिल्या अखेरच्या लोकांना स्पेनमधून कादून टाकण्याचें काम त्या देशांत सुरू होतें. ॲरॅगॉनचा फार्डिनांड आणि कॅस्टीलची इसाबेला यांच्या लग्नामुळें स्पेनमधील सर्व ख्रिस्ती लोकांचें ऐक्य निर्माण झालेलें होतें; आणि कॉन्स्टान्टिनोपल पडल्यानंतर पन्नास वर्षांनीं इ. स. १४९२ मध्यें यूरपच्या टोंकाला आरबांचें ग्रॅनडा येथील राज्य संपुष्टांत आलें. त्यासरशीं स्पेनला यूरपांतील श्रेष्ठ दर्जाच्या ख्रिस्ती सत्तेचें स्थान प्राप्त झालें.

पोर्तुगीज लोकांनीं पूर्वेच्या बाजूनें पुढें जाण्याचा प्रयत्न केला, तर स्पॉनिश लोकांनीं पश्चिमेच्या बाजूनें. पोर्तुगीज लोकांनीं १४४५ मध्यें व्हर्डेचें भूशिर शोधून काढलें हा या प्रयत्नांतील प्रगतीचा पहिला मोठा टप्पा होय. आफ्रिकेच्या नकाशांत पाहा. हें भूशिर म्हणजे आफ्रिकेचा पश्चिमेकडील अगदीं टोंकाचा भाग. या व्हर्डेच्या भूशिराकडे यूरपमधून जायचें म्हणजे नैर्ऋत्य दिशेकडे जावें लागतें हें तुला दिसून येईल. पुढें या भूशिराला वळसा घातला म्हणजे मात्र आपल्याला आग्नेयीकडे वळावें लागतें. या भूशिराचा शोध हें एक मोठें आशेचें लक्षण होतें; कारण त्यामुळें लोकांच्या मनांत अशी श्रद्धा निर्माण झाली, कीं आतां आफ्रिकेला वळसा घालून हिंदुस्थानला जातां येईल.

परंतु आफ्रिकेला वळसा घालून जाण्याला यापुढें आणखी चाळीस वर्षें जावीं लागलीं. इ. स. १४८६ मध्यें बार्थोलो डायझ नांवाच्या एका पोर्तुगीज माणसानेंच आफ्रिकेच्या अगदीं दक्षिणेच्या टोंकाला वळसा घातला. यालाच आतां केप ऑफ गुड होप असें नांव दिलेलें आहे. यानंतर थोड्याच वर्षांनीं वास्को डी गामा नांवाच्या आणखी एका पोर्तुगीझ माणसानेंच या शोधाचा फायदा घेऊन केप ऑफ गुड होपच्या मार्गानें हिंदुस्थान देश गांठला. वास्को डी गामा हा मलबारच्या किनाऱ्यावरील कालिकत बंदरांत इ. स. १४९८ त आला.

अशा रीतीनें हिंदुस्थानला पोंचण्याची शर्यत पोर्तुगीजांनीं जिंकली. परंतु दरम्यान जगाच्या दुसऱ्या बाजूला फार मोठ्या घडामोडी होत होत्या. आणि त्यांचा


नवीन भूमीचा शोध
मॅगलन
कोलंबस
केबो
केबो
केबो
वास्को द गामा
कॅबट
कॅबट
फ्रोबिशर
फ्रोबिशर
हडसन
हडसन
बॅफिन
बॅफिन
हडसन सामुद्रधुनी
हडसन सामुद्रधुनी
फ्रोबिशर सामुद्रधुनी
फ्रोबिशर सामुद्रधुनी
फ्रोबिशर

सारा फायदा स्पेनला मिळत होता व पुढेही मिळावयाचा होता. इकडे क्रिस्तोफर कोलंबस हा १४९२ मध्यें अमेरिकन जगांत जाऊन पोंचला होता. कोलंबस हा जिनोआ येथील एक गरीब मनुष्य होता. पृथ्वी वाटोळी आहे हें लक्षांत घेऊन पाश्चिमेच्या दिशेला आपण प्रवास करीत राहिलों, तर आपण जपानला आणि हिंदुस्थानला पोंचूं अशी त्याची कल्पना होती. पुढें त्याच्या प्रवासाला प्रत्यक्ष जितका दीर्घ काळ लागला, तितका या प्रवासाला लागेल असें प्रथम त्याला वाटलें नव्हतें. या आपल्या देश-संशोधनाच्या जलप्रवासाला मदत मिळवावी या हेतूनें निरनिराळ्या राजांच्या दरबारीं जाऊन त्यानें त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. शेवटीं स्पेनचे फर्डिनांड आणि इसाबेला यांनीं त्याला मदत देण्याचें कबूल केलें आणि कोलंबस तीन लहान लहान जहाजांवर अठ्ठ्यायशीं लोक बरोबर घेऊन निघाला. अज्ञात अशा प्रदेशांत करूं घातलेला हा प्रवास मोठा साहसी आणि शौर्याचा होता. कारण, आपण कोठें जाणार आणि पुढें काय दिसणार किंवा होणार याची त्या वेळीं कोणाला कांहींच कल्पना नव्हती. परंतु कोलंबसाची श्रद्धा दृढ होती आणि शेवटीं त्याच्या श्रद्धेला फळही मिळालें. एकूणसत्तर दिवस पाण्यावर काढल्यानंतर त्या लोकांचे पाय जमिनीला लागले. कोलंबसाला वाटलें, आपण हिंदुस्थानांतच आलों. खरोखर पाहिलें, तर वेस्ट इंडीज बेटांमधील हें एक बेट होतें. प्रत्यक्ष अमेरिका खंडामध्यें कोलंबस कधींच पोंचला नाहीं; आणि शेवटपर्यंत त्याची स्वतःची समजूत आपण आशिया खंडांत पोंचलों अशीच होती. ही चमत्कारिक चुकीची समजूत अजूनही एका स्वरूपांत शिल्लक राहिली आहे. या बेटांना अजूनही वेस्ट इंडीज (म्हणजे हिंदुस्थानच्या पश्चिम बाजूचीं बेटें) असें म्हणतात, आणि अमेरिकेच्या मूळच्या रहिवाशांनाही अद्यापि इंडियन किंवा रेड इंडियन असें म्हणतात.

कोलंबस यूरप खंडांत परत आला आणि पुढच्या वर्षीं आणखी पुष्कळ जहाजें घेऊन तो पुन्हां प्रवासाला निघाला. हिंदुस्थानला जाण्यासाठीं नवा मार्ग शोधून काढण्याकरितां ही खटपट आहे अशी सर्वांची कल्पना होती; आणि त्यामुळें लोकांचीं मनें नुसतीं भारून गेल्यासारखीं झालीं होतीं. यानंतर लौकरच वास्को डी गामानें आपला पूर्वेकडील प्रवास झपाट्यानें पुरा केला आणि कालिकत बंदर गांठलें. पश्चिमेकडे आणि पूर्वेकडे नवीन देशांचा शोध लागल्याच्या बातम्या जसजशा येऊं लागल्या, तसतशी साऱ्या यूरप खंडांत उत्साहाची खळबळ वाढतच गेली. या नवीन सांपडलेल्या प्रदेशावरील वर्चस्वाबद्दल स्पर्धा पोर्तुगाल आणि स्पेन याच दोन देशांमध्यें होती. यानंतर पोपमहाराज रंगभूमीवर आले आणि स्पॅनिश व पोर्तुगीज लोक यांच्यामध्यें कसल्याही प्रकारचा झगडा होऊं नये म्हणून त्यांनीं हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवून औदार्य गाजविण्याचें ठरविलें. इ.स. १४९३ मध्यें पोपनें एक बुल काढला. (पोपच्या जाहीरनाम्यांना आणि आज्ञापत्रांना, कां कोण जाणे, बुल म्हणण्याची रीत आहे) त्याला सरहद्दी निश्चित करणारा बुल असें म्हणतात. अझोर्सच्या

समुद्राच्या पश्चिमेला शंभर लीगवर (१ लीग = ३ मैल) उत्तरेकडून दक्षिणेकडे त्यानें काल्पनिक रेषा आंखली आणि असें जाहीर केलें, कीं या रेषेच्या पूर्वेकडील सर्व बिनख्रिस्ती प्रदेश पोर्तुगालच्या मालकीचा आणि रेषेच्या पश्चिमेकडील असा मुलूख स्पेनच्या मालकीचा. एक यूरप खंड तेवढें वगळून बाकीच्या जवळजवळ सगळ्या जगाचें हें प्रचंड बक्षीसच पोपनें त्यांना दिलें आणि त्यासाठीं पोपच्या पदरचें कांहींच खर्च झालें नाहीं! अझोर्स बेटें हीं ॲटलांटिक समुद्रांत असून त्यांच्यापासून पश्चिमेकडे शंभर लीग, म्हणजे तीनशें मैलांवर दक्षिणोत्तर रेषा काढली म्हणजे उत्तर अमेरिका संबंधच्या संबंध आणि दक्षिण अमेरिकेचा बहुतेक सर्व भाग हा प्रदेश त्या रेषेच्या पश्चिमेला पडतो. अशा रीतीनें पोपनें जवळजवळ दोन्ही अमेरिका खंडें स्पेनला बक्षीस दिलीं आणि हिंदुस्थान, चीन, जपान, इतर सर्व पूर्वेकडील देश, त्याचप्रमाणें आफ्रिका खंड सबंधच्या सबंध, एवढें मोठें बक्षीस पोर्तुगालला देऊन टाकलें!

या एवढ्या प्रचंड प्रदेशाचा ताबा घेण्याच्या खटपटीला पोर्तुगीझ लोकांनीं सुरुवात केली. ही कांहीं इतकी सोपी गोष्ट नव्हती. परंतु त्यांनीं थोडीफार प्रगति केली आणि पूर्वेकडे पुढें आक्रमण चालू ठेवलें. इ. स. १५१० मध्यें ते गोव्यापर्यंत पोंचलें; १५११ मध्यें मलाक्का आणि मॅलेचें द्विपकल्प त्यांनीं गांठलें; त्याच्या पाठोपाठच जावाही त्यांनीं गांठलें; आणि १५७६ मध्यें ते चीनमध्यें जाऊन पोंचले. याचा अर्थ या सर्व प्रदेशांचा त्यांनीं प्रत्यक्ष ताबा मिळविला असा नव्हे. त्या प्रदेशांत कांहीं कांहीं ठिकाणीं त्यांना आपला पाय रोवायला जागा मिळाली इतकेंच. पूर्वेमध्यें यानंतर त्यांचें जें कांहीं कार्य घडलें त्याचा विचार आपल्याला पुढें एखाद्या पत्रांत केला पाहिजे.

पूर्वेकडे गेलेल्या पोर्तुगीझ लोकांत फर्डिनांड मॅगेलन नांवाचा एक मनुष्य होता. पण तिकडील जे प्रमुख लोक होते त्यांच्याशीं त्याचा तंटा झाला, त्यामुळें तिकडून परत येऊन तो स्पेनचाच प्रजाजन झाला. हिंदुस्थान आणि पूर्वेकडचीं बेटें इकडे तो पूर्वेच्या मार्गानें म्हणजे केप ऑफ गुड होपला वळसा घालून जाऊन आलेला होता. आतां पुन्हां तिकडेच पश्चिमेच्या बाजूनें म्हणजे अमेरिकेकडून जावें असें त्याच्या मनानें घेतलें. कोलंबसानें शोधून काढलेला प्रदेश आशिया खंडांतील मुळींच नव्हता हें त्याला बहुधा माहीत असावें. खरें म्हटलें म्हणजे बॅल्बोआ नांवाच्या एका स्पॅनिश इसमानें मध्य अमेरिकेंतील पनामाचे डोंगर ओलांडून पॅसिफिक समुद्र इ. स. १५१३ मध्यें गांठला होता. कशामुळेंही असो, पण या समुद्राला त्यानें दक्षिण समुद्र असें नांव दिलें आणि त्याच्या किनाऱ्यावरून तो सर्व समुद्र आणि त्याच्या किनाऱ्याची सर्व भूमीही आपला धनी स्पेनचा राजा याच्या मालकीची आहे असें त्यानें घोषितही केलें.

इ. स. १५१९ मध्यें मॅगेलन आपल्या पश्चिम दिशेकडील जलप्रवासाला निघाला. आजपर्यंत झालेल्या अशा सर्व प्रवासांत हा सर्वश्रेष्ठ प्रतीचा प्रवास ठरणार होता. त्याच्याजवळ पांच जहाजें होतीं आणि २५० माणसें होतीं. ॲटलांटिक समुद्र ओलांडून तो दक्षिण अमेरिकेकडे गेला आणि तसाच दक्षिणेला जात जात तो त्या खंडाच्या

अगदीं दक्षिण टोंकाला पोंचला. एवढ्या अवधींत त्याचें एक जहाज बुडून नाहींसें झालें होतें; आणि एक जहाज त्याला सोडून निघून गेलें होतें. म्हणून तीनच जहाजें शिल्लक राहिलीं होतीं. या तीन जहाजांनिशीं दक्षिण अमेरिका खंड आणि त्याच्या दक्षिणेकडील एक छोटेंसें बेट यांमधील अरुंद सामुद्रधुनी त्यानें ओलांडिली आणि तेथून तो त्या खंडाच्या पलीकडच्या बाजूच्या मोकळ्या समुद्रांत आला. या समुद्राला मॅगेलन यानें पॅसिफिक समुद्र म्हणजे प्रशांत समुद्र असें नांव दिलें; कारण ॲटलांटिक समुद्राच्या मानानें त्याला हा समुद्र फार शांत वाटला. पॅसिफिक समुद्रांत पोंचण्यास त्याला चौदा महिने लागले. तो जी सामुद्रधुनी ओलांडून गेला तिला त्याचेंच नांव, म्हणजे मॅगेलनची सामुद्रधुनी असें नांव देण्यांत आलें.

मॅगेलननें त्यानंतरही मोठ्या धैर्यानें उत्तरेकडे प्रवास चालू ठेवला; नंतर तो वायव्येकडे वळला. कोणालाही त्या समुद्राची कांहीं सुद्धां माहिती नव्हती. त्याच्या सर्व प्रवासांतील अत्यंत भयंकर असा हा प्रवास होता. तो प्रवासही इतका प्रचंड लांबीचा होईल, अशीही कोणाला कल्पना नव्हती. जवळजवळ चार महिने, किंवा अगदीं बरोबर म्हटलें म्हणजे १०८ दिवस हे लोक त्या अफाट समुद्राच्या मध्यभागीं होते; जवळ नाहीं कांहीं खायला कीं पाणी सुद्धां प्यायला, अशी त्यांची अवस्था होती. असे अनंत हाल व यातना सोसून शेवटीं एकदांचे ते लोक फिलिपाइन्स बेटांत पोंचले. त्या ठिकाणीं त्यांना जे लोक आढळले ते त्यांच्याशीं चांगल्या गोडीगुलाबीनें वागले; त्यांना त्यांनीं खायला दिलें. भेटीदाखल निरनिराळ्या वस्तूही दिल्या. पण स्पॅनिश लोकांचें वर्तन मात्र आगळिकीचें आणि उर्मटपणाचें झालें. तेथल्या दोन प्रांत-नायकांमध्यें कसलीशी एक लहानशी लढाई होती तिच्यांत मॅगेलननें भाग घेतला आणि तिच्यांत तो मारला गेला. आणखीही पुष्कळ स्पॅनिश लोकांना त्यांच्या उर्मट वर्तनामुळें तेथील स्थानिक लोकांनीं ठार केलें.

स्पॅनिश लोकांचा उद्देश मसाल्याच्या बेटांचा, जेथून त्यांच्याकडे येणारे मौल्यवान् मसाले येत असत त्या बेटांचा, शोध लावण्याचा होता. म्हणून त्यांच्या शोधार्थ राहिलेल्या लोकांनीं पुढें प्रवास सुरू केला. आणखी एक जहाज त्यांना जाळून टाकून द्यावें लागलें. आतां फक्त दोनच जहाजें शिल्लक राहिलीं. त्यांनीं असें ठरविलें, कीं एका जहाजानें पॅसिफिक समुद्राच्या मार्गानें स्पेनला परत जावें आणि दुसऱ्या जहाजानें केप ऑफ गुड होपवरून स्पेनला जावें. पहिल्या जहाजाला कांहीं फार दूरपर्यंत प्रवास करण्यास मिळाला नाहीं. कारण वाटेंत पोर्तुगीझांनीं तें जहाज पकडलें. परंतु दुसरें, व्हिक्टोरिया नांवाचें जहाज मात्र आफ्रिकेला वळसा घालून इ. स. १५२२ मध्यें म्हणजे मूळ निघाल्यापासून तीन वर्षांनीं अठरा माणसांनिशीं स्पेनमध्यें सेव्हिल बंदरांत जाऊन पोंचलें; त्याचा साऱ्या पृथ्वीभोंवतीं प्रवास पुरा झाला होता. असा प्रवास पुरा करणारें हें सगळ्यांत पहिलें जहाज.

व्हिक्टोरिया जहाजाचा हा प्रवास खरोखर अत्यंत अद्भुत असल्यामुळें त्याच्या-

बद्दल मीं हें इतकें लांबलचक लिहिलें आहे. आतां आपण सर्व प्रकारच्या सुखसोयींनिशीं समुद्र ओलांडतों आणि आगबोटींतून वाटेल तेवढे लांब लांब प्रवास करतों. पण त्या जुन्या काळच्या जलपर्यटनाचा थोडा विचार करून पाहा. त्यांना किती नाना प्रकारच्या संकटांना आणि धोक्यांना तोंड द्यावें लागलें; अज्ञात अशा प्रदेशांत उड्या घ्याव्या लागल्या; आणि अशा रीतीनें आपल्या पाठीमागून येणारांसाठीं नवे नवे जलमार्ग त्यांनीं प्रथम शोधून काढले. त्या काळचे स्पॅनिश आणि पोर्तुगीझ लोक हे अहंमन्य, उर्मट आणि क्रूर लोक होते हें खरें; परंतु त्यांच्या ठिकाणीं असामान्य धैर्य होतें आणि प्रचंड साहसाची प्रवृत्ति होती.

इकडे मॅगेलन पृथ्वीपर्यटन करीत होता, त्याच सुमारास कोर्टेझ मेक्सिको शहरांत प्रवेश करून स्पॅनिश राजाच्या वतीनें ॲझटेकांचें साम्राज्य जिंकून घेत होता. त्याबद्दल आणि अमेरिकेंतील मय संस्कृतीबद्दल थोडेसें यापूर्वी मीं तुला सांगितलें आहे. कोर्टेझ मेक्सिकोमध्यें इ. स. १५१९ मध्यें पोंचला. पिझारो दक्षिण अमेरिकेंतील इन्कांच्या साम्राज्यांत (आजचा पेरू देश) १५३० मध्यें पोंचला. धैर्य आणि अचाट साहसीपणा, विश्वासघात आणि क्रूरपणा यांच्या बळावर आणि स्थानिक लोकांमधील आपसांतील विरोधांचा उपयोग करून कोर्टेझ आणि पिझारो यांनीं हीं दोन्ही प्राचीन साम्राज्यें यशस्वीपणें नष्ट केलीं. अर्थात् हीं दोन्ही साम्राज्यें आतां फार जुनाट झालीं होतीं; आणि पुष्कळ दृष्टींनीं सुधारणेच्या अगदीं प्राथमिक अवस्थेंत तीं होतीं. तेव्हां पहिला धक्का मिळतांक्षणींच तीं दोन्ही पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणें कोलमडून पडलीं.

हे पहिले श्रेष्ठ संशोधक आणि धाडसी पुरुष अशा रीतीनें जेथें जाऊन पोंचले, तेथें त्यांच्यामागून लुटालुटीसाठीं लोकांचे थवेच्या थवे जाऊं लागले. अशी गर्दी करून गेलेल्या लोकांमुळें अमेरिकेंतील स्पॅनिश राज्याला विशेष धोका पोंचला; आणि प्रत्यक्ष कोलंबसाला सुद्धां या लोकांनीं फार वाईट रीतीनें वागविलें. तरी पण पेरू आणि मेक्सिको या देशांतून स्पेनमध्यें सोन्याचा व चांदीचा एकसारखा वाहता झरा मात्र चालू झाला. साऱ्या यूरप खंडाचे डोळे फाटून गेले इतका प्रचंड सांठा या दोन्ही मौल्यवान् धातूंचा स्पेनमध्यें झाला आणि त्यामुळें सर्व यूरप खंडभर स्पेनचें वर्चस्व सुरू झालें. हें सोनें अर्थातच यूरपच्या इतरही देशांतून पसरलें आणि त्यामुळें पूर्वेकडील तयार माल घेण्यासाठीं यूरपमधील लोकांपाशीं भरपूर पैसा झाला.

पोर्तुगाल व स्पेन यांच्या यशामुळें इतर देशांतल्या लोकाच्या मनांत वारें संचरलें; फ्रान्स, इंग्लंड, हॉलंड, आणि जर्मनीच्या उत्तरेकडील शहरें यांमधील लोकांच्या मनांत ही खळबळ फार माजली. त्यांनीं आशिया व अमेरिका यांच्याकडे उत्तरेच्या मार्गानें म्हणजे नॉर्वेच्या उत्तरेकडून पूर्वेकडे जाण्याचा आणि ग्रीनलंडवरून पश्चिमेकडे जाण्याचा मार्ग शोधून काढण्याची खटपट प्रथम केली. पण त्यांत जेव्हां त्यांना यश आलें नाहीं, तेव्हां त्यांनीं आतां सर्वांच्या परिचयाच्या झालेल्या मार्गांचा अवलंब केला.

जगाचे नवीन नवीन भाग मनुष्याच्या दृष्टिपथांत येत होते, आणि तेथील

किंवा इतरही ठिकाणची पृथ्वीवरील संपत्ति आणि अद्‌भुत गोष्टी मनुष्याला समजून येऊं लागल्या होत्या; तेव्हांचा तो काळ किती अलौकिक असला पाहिजे! नवे नवे महासागर आणि देश यांचे शोध एकामागून एक लागत होते; 'तिळा उघड' म्हणून म्हटल्याबरोबर ती जादूची गुहा जशी उघडावी, अशा प्रकारें मोजतां येणार नाहीं इतकी प्रमाणाबाहेर संपत्ति पैदा होत होती. या साहसी कृत्यांमधील जादूगिरीच्या प्रभावानें या वेळच्या जगांतील वातावरण नुसतें भारून गेलेलें असलें पाहिजे.

आजकाल जग अगदींच एवढेंसें होऊन गेलें आहे आणि त्यावर नवीन शोधण्याजोगेंही फारसें राहिलें नाहीं, असें एक प्रकारें आपल्याला वाटतें खरें; पण खरी गोष्ट मात्र तशी नाहीं. शास्त्रांनींच आपल्या दृष्टीसमोर एवढाले मोठे प्रदेश निर्माण करून ठेवले आहेत, कीं ज्यांचें अजून संशोधन व्हायचेंच आहे; त्या ठिकाणीं साहसाच्या अचाट कामांना मुळींच वाण नाहीं! निदान आजच्या आपल्या हिंदुस्थानांत तरी नाहीं

## ७४

# मंगोलियन लोकांच्या साम्राज्याचा विध्वंस

९ जुलै, १९३२

यूरपमधील मध्ययुगाचा अंत कसा झाला, यूरपमध्यें एक अगदीं नवीन प्रवृत्ति कशी निर्माण झाली, तेथें नवीनच उत्साह निर्माण होऊन त्याचा आविष्कार कसा झाला, हें मीं तुला सांगितलें. कर्तृत्व आणि नवनिर्मितीचा प्रयत्न यांनीं सारें यूरप खंड नुसतें ओसंडून चाललें आहे असें त्या काळीं दिसतें. कित्येक शतकें या खंडांतील लोक आपापल्या छोट्या छोट्या देशांत नुसते कोंडून राहिले होते; ते आतां आपल्या भोंवतालच्या भिंती फोडून बाहेर पडले आणि प्रचंड महासागर ओलांडून जगाच्या अगदीं वाटेल त्या टोंकाच्या देशाला जाऊन भिडण्यास उद्युक्त झाले. ते बाहेर पडले ते जगज्जेत्यांच्या आवेशानें; इतका त्यांना स्वतःच्या सामर्थ्यांबद्दल विश्वास वाटूं लागला होता; या विश्वासामुळेंच त्यांच्या ठिकाणीं धैर्य उत्पन्न झालें आणि त्यांच्या हातून अचाट कार्यें पार पडलीं.

पण या लोकांमध्यें एकाएकीं एवढा मोठा फरक घडून आला तरी कसा, असा तुला प्रश्न पडला असेल. तेराव्या शतकाच्या मध्याला मंगोलियन लोकांचें वर्चस्व यूरप आणि आशिया खंडांमध्यें होतें. पूर्व यूरप खंड त्यांच्या ताब्यांतच होतें; आणि पश्चिम यूरप खंड त्या श्रेष्ठ आणि अजिंक्यशा वाटणाऱ्या योद्धयांपुढें भयभीत होऊन थरथर कांपत होतें. यूरप खंडांतील मोठे राजे आणि महाराजे झाले, तरी कागानच्या, बडेखांच्या सामान्य सेनापतींच्या मानानें पाहतां त्या बिचाऱ्यांची काय किंमत होती?

यानंतर दोनशें वर्षांनीं उस्मानी तुर्कांच्या ताब्यांत बादशाही कॉन्स्टान्टिनोपल शहरही आलें आणि यूरपच्या आग्नेयीकडील बराचसा भागही ताब्यांत आला. अशा रीतीनें मुसलमान आणि ख्रिस्ती यांच्यामधील आठशें वर्षांच्या लढ्यानंतर ज्याच्या मोहानें आरबी लोक आणि सेल्जुक तुर्क या खंडाकडे ओढले गेले तें मोठें थोरलें घबाड, तो त्यांच्या आशेचा किल्ला, उस्मानी तुर्कांच्या हातीं पडला. पण एवढ्यानें उस्मानी तुर्कांचें समाधान झालें नाहीं. लोभानें त्यांची नजर आणखी पश्चिमेकडे, प्रत्यक्ष रोमकडे सुद्धां वळली. जर्मन (पवित्र रोमन) साम्राज्य आणि इटली देश दोहोंवर त्यांनीं रोख धरला. हंगेरी देश काबीज करून ते व्हिएन्ना शहराच्या तटाशीं आणि इटलीच्या सरहद्दीवर जाऊन पोंचले. पूर्वेस त्यांनीं बगदाद शहर आणि बगदादचें राज्य आपल्या साम्राज्याला जोडलें! आणि दक्षिणेला ईजिप्त देश. सोळाव्या शतकाच्या मध्याला वैभवशाली (शानदार) या पदवीनें प्रसिद्ध असलेला सुलतान सुलेमान हा या प्रचंड तुर्की साम्राज्यावर राज्य करीत होता. समुद्रावर सुद्धां त्याच्याच आरमाराचें सर्वत्र अप्रतिहत प्रभुत्व होतें.

असें असून यूरप खंडामध्यें एवढा हा फरक कसा घडून आला? या मंगोलियन संकटाचें निवारण यूरप खंडानें कसें केलें? एवढ्या या तुर्की संकटांतून यूरप खंड कसें वांचलें? आणि नुसतें वांचलें एवढेंच नव्हे, तर स्वतःच चढाईचें धोरण स्वीकारून इतरांनाच ग्रासण्यास कसें समर्थ झालें?

मंगोलियन लोकांचें दडपण यूरपला फार दीर्घ काळपर्यंत सोसावें लागलें नाहीं. नवीन खानाची निवडणूक करण्यासाठीं ते आपण होऊन परत गेले आणि पुन्हां यूरपकडे ते परतले नाहींत. मंगोलियांतील त्यांच्या घरादारांपासून पश्चिम यूरप खंड हें फारच दूर पडलें. शिवाय, त्या लोकांना संवय पडली मोकळ्या मैदानाची आणि माळरानाची, आणि पश्चिम यूरप खंडाचा प्रदेश तर सगळा अरण्यमय, त्यामुळेंही त्यांचें मन तिकडे वेधलें नसेल. तें कांहीं असलें तरी मंगोलियन लोकांच्या कचाट्यांतून पश्चिम यूरप खंड वांचलें तें कांहीं स्वतःच्या मर्दुमकीनें नव्हे, तर मोंगल लोकांनीं तिकडे दुर्लक्ष केल्यामुळें आणि ते दुसरीकडे गुंतल्यामुळें. पूर्व यूरपांत मात्र मंगोलियन लोक आणखी कांहीं काळपर्यंत राहिले. पण अखेरीस त्यांची सत्ता संपुष्टांत आली.

इ. स. १४५२ मध्यें तुर्कांनीं कॉन्स्टान्टिनोपल शहर जिंकून घेतलें. त्या वेळेपासून सर्व यूरपियन इतिहासाला अगदीं निराळें वळण लागलें हें मीं तुला सांगितलेंच आहे. मध्ययुगाचा अंत आणि पुढें ज्याचा अनेक अंगांनीं बहरलेला आविष्कार घडून आला त्या नवीन चेतना-युगाची, ज्ञान व कला यांच्या पुनरुज्जीवनाच्या युगाची, सुरुवात यांच्यामधील एक खुणेचा दगड म्हणून हा कॉन्स्टान्टिनोपलच्या पाडावाचा प्रसंग सोयीसाठीं मानला जातो. म्हणजे चमत्कार असा, कीं ज्या क्षणाला, सारा यूरप तुर्क लोक गिळंकृत करणार, त्या कामीं त्यांना यशही येण्याचा पुष्कळसा संभव अशी खरोखर स्थिति प्राप्त झाली होती, त्याच क्षणाला यूरप खंड स्वतःच्या पायावर उठून उभें राहिलें आणि त्याच्या ठिकाणीं सामर्थ्यही वाढत गेलें. यानंतरही कांहीं काळपर्यंत तुर्क लोक पश्चिम

यूरपमध्यें पुढें पुढें सरकतच होते ; परंतु असे ते पुढें सरकत होते त्याच वेळेला इकडे यूरपीय संशोधक नवे नवे देश, नवे नवे समुद्र शोधून काढीत होते आणि पृथ्वीला वळसा घालीत होते. इ. स. १५२० पासून १५६६ पर्यंतच्या सुलतान वैभवशाली सुलेमानच्या कारकीर्दीमध्यें तुर्कांचें साम्राज्य इकडे व्हिएन्नापासून तों बगदाद आणि कैरोपर्यंत पसरलें होतें. पण त्यापुढें मात्र त्याची प्रगति झाली नाहीं. ग्रीक लोकांच्या ( कॉन्स्टान्टिनोपल येथील ) जुन्या जीवनांत कमजोरी आणि सडकेपणा उत्पन्न करणाऱ्या चालीरीतींना तुर्क लोक बळी पडत गेले. इकडे यूरपचें सामर्थ्य वाढत चाललें, तर त्याच वेळीं तुर्कांची मूळची शक्ति नाहींशी होऊन ते दुर्बळ होत गेले.

प्राचीन युगामधून भटकतां भटकतां आपण पाहिलें, कीं आशिया खंडांतील लोकांनीं यूरप खंडावर पुष्कळच स्वाऱ्या केल्या. यूरप खंडांतील लोकांनींही आशिया खंडावर केव्हां केव्हां स्वाऱ्या केल्या ; परंतु त्या तशा म्हणण्यासारख्या महत्त्वाच्या नाहींत. सर्व आशिया खंड ओलांडून अॅलेक्झांडर थेट हिंदुस्थानपर्यंत गेला ; परंतु त्याच्याही स्वारीचा तसा कांहीं मोठा परिणाम झाला नाहीं. रोमन लोक तर मेसापोटेमियाच्या पलीकडे केव्हांच गेले नाहींत. उलटपक्षीं, आशियांतील टोळ्यांनीं मात्र यूरपवर अगदीं प्राचीन काळापासून वारंवार हल्ले केलेले आढळतात. अशा या आशियांतील लोकांच्या स्वाऱ्यांमध्यें उस्मानी तुर्कांची यूरपवरील स्वारी ही अखेरची. त्यानंतर हळूहळू या भूमिका बदललेल्या दिसतात ; आतां यूरप खंड चढाई करूं लागतें. सोळाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास हा बदल घडून आला असें म्हणतां येईल. नवीनच सांपडलेलें अमेरिका खंड यूरपच्या फारच जलदी आहारीं गेलें. आशियाचा प्रश्न अधिक बिकट होता. आशिया खंडांत कोठें तरी चांगला पाय रोंवायला सांपडावा म्हणून यूरपीय लोकांना दोनशें वर्षें खटपट करावी लागली आणि अठराव्या शतकाच्या मध्याला आशिया खंडांत त्यांचें वर्चस्व बसण्यास सुरुवात झाली, ही गोष्ट आपण मुद्दाम लक्षांत ठेवली पाहिजे. कारण अज्ञानामुळें पुष्कळ लोकांची अशी समजूत झालेली असते, कीं यूरप खंड सदा सर्वकाळ आशिया खंडावर वरचष्मा गाजवीत आलें आहे. आपल्याला आतां दिसून येईलच, कीं यूरपची वरचष्म्याची ही भूमिका अगदीं अलीकडची आहे आणि एवढ्यांतच पुन्हां एकदां प्रवेश बदलण्याची वेळ आलेली असून ही वरचष्म्याची भूमिकाही आतां निकामी होऊन पडद्याआड जाण्याच्या बेतांत आली आहे. पूर्वेकडील सर्व देशांत नवीन कल्पना उसळत आहेत आणि स्वातंत्र्याच्या प्रचळ चळवळी त्या देशांत उत्पन्न होऊन यूरपच्या वर्चस्वाला मान्यता नाकारून त्याला खो देण्याचा उद्योग सुरू झाला आहे. या राष्ट्रीय विचारापेक्षांही सर्वच प्रकारच्या साम्राज्यशाहीचा पिळणुकीचा शेवट करावा या बुद्धीनें निर्माण झालेले सामाजिक समतेचे नवीन विचार हे अधिक खोलवर गेले असून अधिक दूरवर पसरलेले आहेत. यापुढें यूरपनें आशियावर वर्चस्व गाजवावें किंवा आशियानें यूरपवर वर्चस्व गाजवावें किंवा कोणाही एका देशानें दुसऱ्या देशा-

वर वर्चस्व गाजवावें किंवा त्याची पिळणूक करावी, असा प्रश्नच उद्भवता कामा नये अशी या विचारांची दिशा आहे.

ही प्रस्तावना फार लांबली. आतां आपण मंगोलियन लोकांकडे परत येऊं या. त्यांच्या यशापयशाची हकीकत थोडीशी पाहूं या; कसा काय झाला त्यांचा या पुढचा वृत्तांत? कुब्लाईखान हा शेवटचा बडे खां–कागान–झाला हें तुला आठवतच असेल. इ. स. १२२९ मध्यें तो मरण पावल्यानंतर आशिया खंडांत कोरियापासून तों थेट यूरप खंडांत पोलंड आणि हंगेरीपर्यंत पसरलेल्या त्याच्या साम्राज्याची फुटाफूट होऊन पांच वेगवेगळीं साम्राज्यें झालीं. तसें पाहिलें तर यांतील एकेक साम्राज्यही चांगलें भलें मोठें होतें. मागें एका पत्रांत (६८ वें) या पांची साम्राज्यांचीं नावें मीं तुला सांगितलीं आहेत.

त्यांतलें मुख्य साम्राज्य चीनचें; यांतच मँचुरिया, मंगोलिया, तिबेट, कोरिया, अनाम (म्हणजे वैतनाम), टांगानिका आणि ब्रह्मदेशाचा कांहीं भाग यांचाही समावेश होत असे. कुब्लाईखानाचे युआन राजघराण्यांतील वंशज या साम्राज्याचे मालक झाले; परंतु फारच थोड्या काळपर्यंत. लौकरच या साम्राज्यांतून दक्षिणेकडील कांहीं कांहीं तुकडे फुटून बाहेर पडूं लागले आणि कुब्लाईखानाच्या मृत्यूनंतर ७६ च वर्षांनीं इ. स. १३६८ मध्यें याच्या वंशाचा पाडाव झाला आणि मंगोलियन लोकांना हांकून देण्यांत आलें हें मीं तुला सांगितलेंच आहे.

अगदीं पाश्चिमेच्या टोंकाला सोनेरी टोळीचें सुवर्ण-संघीयांचें (सुनहरे कबीले) साम्राज्य होतें. किती मजेदार नांव आहे नव्हे या लोकांचें! कुब्लाईखानाच्या मृत्यूनंतर दोनशें वर्षें रशियांतील उमराव–सरदार–लोक या लोकांना खंडणी देत होते. त्यानंतर मात्र इ. स. १४८० च्या सुमारास इकडच्या मंगोलियन साम्राज्याचें सामर्थ्य थोडें कमी झालें; मॉस्कोचा ग्रँड ड्यूक हा या सुमारास प्रमुख रशियन उमराव झाला होता; त्यानें मंगोलियन साम्राज्याला खंडणी देण्याचें नाकारलें. या ग्रँड ड्यूकला इव्हान दि ग्रेट (श्रेष्ठ इव्हान) असें म्हणतात. रशियाच्या उत्तर भागांत नोव्होगोरोडचें प्राचीन लोकसत्ताक राज्य असून तें व्यापारी व हुन्नरी लोकांच्या ताब्यांत होतें. इव्हाननें या लोकसत्ताक राज्याचा पराभव केला व तें आपल्या संस्थानाला जोडून टाकलें. दरम्यान इकडे तुर्कांनीं कॉन्स्टान्टिनोपलचा पाडाव केल्यामुळें तेथील प्राचीन बादशहाचें घराणें देशोधडीला लागलें होतें. इव्हाननें या प्राचीन बादशाही घराण्यांतील एका मुलीशीं लग्न केलें. आणि अशा रीतीनें आपण बादशहाच्या परंपरेंतीलच एक झालों असून प्राचीन बायझांटियमच्या साम्राज्याचे वारस आहोंत असा हक्क तो सांगूं लागला. त्याच्या नातवानें स्वतःला झार ही पदवी घेतली; झार म्हणजेच सीझर किंवा बादशहा. हा नातू फारच क्रूर असल्यामुळें त्याला इव्हान दि टेरिबल–भयंकर इव्हान–असें म्हणत असत.

अशा रीतीनें मंगोलियन लोकांचा यूरप खंडाशीं अखेरचा संबंध सुटला.

यानंतर आतां या सोनेरी टोळीच्या किंवा मध्य आशियांतील बाकीच्या मंगोलियन साम्राज्यांचा आपण फारसा विचार केला नाहीं तरी चालेल. शिवाय, मला स्वतःला त्याच्याबद्दल फारशी माहिती नाहीं. पण त्यांपैकीं एका मनुष्याकडे मात्र आपण लक्ष पुरविणें जरूर आहे.

हा मनुष्य म्हणजे टिमूर-तैमूरलंग-हा होय. त्याला दुसरा चेंगीजखान व्हावें अशी इच्छा होती. स्वतः तो आपण चेंगीजखानच्या वंशांतील आहों असें म्हणे ; पण खरोखर तो होता तुर्क. तो लंगडा होता. त्यामुळें त्याला तैमूर-इ-लंग म्हणजे लंगडा तिमूर किंवा तामरलेन असें म्हणतात. आपल्या बापाच्या पाठीमागें तो १३६९ मध्यें समरकंदचा राजा झाला. त्यानंतर लौकरच त्यानें आपल्या मुलूखगिरीच्या आणि क्रूरपणाच्या कारकीर्दीला सुरुवात केली. तो सेनापति फार मोठा होता, पण अगदींच रानटी मनुष्य होता तो. दरम्यानच्या काळांत मध्य आशियांतील मंगोलियन लोकांनीं मुसलमानधर्माचा स्वीकार केलेला असल्यामुळें तैमूरलंग हाही मुसलमान होता. परंतु त्याचा प्रत्यक्ष लढण्याचा संबंध जरी मुसलमानांशींच आला, तरी तेवढ्यामुळें कांहीं त्याचें अंतःकरण एवढें सुद्धां द्रवलें नाहीं. जेथें जेथें तो जाई, तेथें तेथें तो सारा प्रदेश उध्वस्त करी; तेथें नानाविध घाणेरडे सांथीचे रोग उद्भवत आणि जिकडे तिकडे अन्नान्नदशा आणि घोर दैन्यावस्था निर्माण होई. मनुष्यांच्या मस्तकांचे मोठमोठे पिरामिड रचावयाचे यांत त्याला सगळ्यांत आनंद वाटत असे. पूर्वेला दिल्लीपासून पश्चिमेला आशिया मायनरपर्यंत त्यानें लोक ठार करविले आणि त्यांचीं मस्तकें पिरामिडच्या आकारामध्यें रचविलीं.

चेंगीझखान आणि त्याचे मंगोलियन लोक हेही क्रूरच होते आणि तेही खूप नासधूस करीत असत; पण ते आपल्या काळच्या इतर ठिकाणच्या लोकांहून विशेष निराळे नव्हते. तैमूरलंग हा याहून फारच वाईट प्रकारचा मनुष्य होता. सैतानी आणि निष्कारण क्रूरपणाच्या बाबतींत त्याच्यासारखा साऱ्या इतिहासांत तोच एकटा एक आढळतो; त्याच्याशीं तुलनेला कोणी नाहीं. एका ठिकाणीं असें लिहिलें आहे, कीं त्यानें दोन हजार जिवंत माणसांचा एक मनोरा उभा केला आणि त्याच्यावर विटांचें आणि चुन्याचें बांधकाम बांधून काढलें !

या रानटी माणसाचें चित्त हिंदुस्थानच्या संपत्तीनें वेधलें आहे. हिंदुस्थानवर स्वारी करावी या त्याच्या बेताला आपल्या सेनापतींची व सरदारांची मान्यता मिळविण्याला त्याला थोडें कठिण पडलें असें दिसतें. या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं समरकंद येथें मोठा दरबार भरला होता. आणि हिंदुस्थानांत फारच उन्हाळा असतो या कारणास्तव तिकडे जाण्याला सरदार लोकांनीं विरोध केला. अखेरीस आपण हिंदुस्थानांत कायमचें वास्तव्य करणार नाहीं, फक्त लूटमार करून आणि नासधूस करून परतूं, असें तैमूरलंगानें वचन दिलें; त्यानें हा आपला शब्द पाळला.

या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचें राज्य होतें हें तुझ्या लक्षांत असेल.

दिल्लीस या वेळीं एक सुलतानच राज्य करीत होता. परंतु मुसलमानाचें हें राज्य बलिष्ठ राहिलेलें नव्हतें; सरहद्दीवर मंगोलियन लोकांशीं एकसारखें लढावें लागल्यामुळें त्याचा कणाच मोडल्यासारखा झाला होता. त्यामुळें तैमूरलंगाची जेव्हां स्वारी आली, तेव्हां त्याला हिंदी सरहद्दीवर व पुढेंही फारसा विरोध होऊं शकला नाहीं आणि तो मोठ्या मौजेंत कत्तली करीत आणि मानवी मस्तकांचें पिरामिड बांधीत पुढें चालला. कत्तल हिंदू आणि मुसलमान दोघांची झाली. त्यामध्यें कसलाही भेदाभेद केला गेल्याचें आढळत नाहीं. कैद झालेल्या लोकांचें त्याला मोठेंच ओझें वाटूं लागून त्या सर्वांना मारून टाकण्याचा त्यानें हुकूम केला आणि अशा रीतीनें एक लक्ष लोकांची कत्तल करण्यांत आली. एका ठिकाणीं तर असें सांगतात, कीं हिंदू आणि मुसलमान दोन्ही धर्मांच्या लोकांनीं एकत्र रजपूत लोकांचा जोहाराचा मार्ग अंगीकारला. पण उगीच तीच ती क्रूरपणाची कहाणी पुढें मी उगीच कशाला सांगत बसूं ? जेथें जेथें तो गेला तेथें तेथें त्यानें तोच प्रकार केला. तैमूरलंगाच्या सैन्याच्या धाडीपाठोपाठ दुष्काळ आणि रोगराई यांचें संकट उभें राहिलें. पंधरा दिवस तो दिल्लींत राहिला आणि त्या श्रेष्ठ शहराचा त्यानें खाटिकखाना किंवा कसाईखाना बनवून टाकला. नंतर परत जातांना वाटेंत काश्मीरचा प्रदेश लुटून तो समरकंदला परत गेला.

तैमूरलंग इतका जरी रानटी होता, तरी समरकंद येथें व मध्य आशियांत इतर ठिकाणीं सुंदर इमारती बांधविण्याचा मात्र त्याला नाद होता. त्यासाठीं त्याच्यापूर्वी पुष्कळ काळ गझनीच्या महमुदानें केलें होतें त्याप्रमाणें त्यानेंही हिंदुस्थानांतील पुष्कळ कारागीर, कसबी, यंत्रशास्त्रज्ञ आणि शिल्पकार व वास्तुशास्त्रप्रवीण जमा केले आणि त्यांना आपल्याबरोबर नेलें. त्यांतले जे उत्कृष्ट शिल्प व वास्तुशास्त्रज्ञ आणि कारागीर होते, ते त्यानें आपल्या स्वतःच्या खास दिमतीस ठेवले. आणि बाकीच्यांना पश्चिम आशियांतील प्रमुख शहरांमध्यें विभागून टाकलें. अशा रीतीनें एका नवीन वास्तुशास्त्राचा व शिल्पशास्त्राचा उदय झाला.

तैमूर गेल्यानंतर दिल्ली शहर म्हणजे यमाचा दरबार झाला होता. दुष्काळ आणि रोगराई यांचें तेथें अनिर्बंध थैमान चालू होतें. दोन महिनेपर्यंत तेथें कोणी राजा नव्हता की कसली व्यवस्था किंवा कारभार नव्हता. लोकवस्तीही फारच थोडी होती. तैमूरनें दिल्ली येथें आपला जो प्रतिनिधि नेमला होता तो सुद्धां खुद्द दिल्ली सोडून मुलतान येथें जाऊन राहिला होता.

यानंतर तैमूर इराण आणि मेसापेटोमिया या प्रदेशांत सगळीकडे उध्वस्तता करीत गेला. इ. स. १४०२ मध्यें अंगोरा येथें उस्मानी तुर्कांच्या एका मोठ्या सैन्याशीं त्याची गांठ पडली. अत्यंत कुशल अशा रीतीनें आपल्या सैन्याचें नेतृत्व करून त्यानें तुर्कांचा पराभव केला. परंतु समुद्रापुढें त्याचा कांहीं उपाय चालेना; आणि बास्फरसची सामुद्रधुनी कांहीं त्याला ओलांडतां येईना. यामुळें यूरप खंड त्याच्या तडाक्यांतून बचावलें.

त्यानंतर तीन वर्षांनीं चीनवर चालून जात असतांना इ. स. १४०५ मध्यें तैमूरलंग मरण पावला. त्याच्याबरोबरच, साऱ्या पश्चिम आशिया खंडभर पसरलेलें त्याचें साम्राज्यही कोलमडून पडलें. उस्मानी तुर्क त्याला खंडणी देत असत; तसाच ईजिप्त देश; त्याचप्रमाणे सोनेरी टोळीचे मंगोलियन लोक पण त्याला खंडणी देत असत. परंतु त्याचा सगळा खरा गुण काय तो सेनानायकाचा; तो मात्र विशेष प्रकारचा होता. सायबेरियाच्या बर्फमय प्रदेशांत त्यानें केलेल्या कांहीं स्वाऱ्या खरोखरच अलौकिक होत्या. परंतु अंतःकरणानें तो खरा भटक्या जातीचा अगदींच बिनसुधारलेला मनुष्य होता. त्यामुळें कसलीही राज्यकारभाराची व्यवस्था त्यानें आंखली नाहीं किंवा चेंगीजखानाप्रमाणें आपल्यामागें आपलें साम्राज्य चालविण्यासाठीं कर्तबगार लोकही निर्माण करून ठेवले नाहींत. त्यामुळें तैमूरचें साम्राज्य त्याच्याबरोबरच नष्ट झालें आणि पाठीमागें कत्तली आणि नासधूस यांची आठवण तेवढी शिल्लक राहिली. मध्य आशियांतून जेवढ्या सगळ्या लूटमार करणारांच्या किंवा मुलूखगिरी करणारांच्या धाडी येऊन पुढें गेल्या, त्या सर्वांपैकीं चार माणसांची स्मृति मध्य आशियांत अद्यापिही टिकून आहे. हे लोक म्हणजे शिकंदर किंवा ॲलेक्झांडर, सुलतान महमूद, चेंगीजखान आणि तैमूरलंग हे होत.

तैमूरलंगानें उस्मानी तुर्कांचा पराभव करून त्यांना मोठाच धक्का दिला. पण त्यांतूनही ते लौकरच सांवरले आणि अवघ्या पन्नास वर्षांनंतरच (१४५३) त्यांनीं कॉन्स्टान्टिनोपल जिंकून घेतलें.

आतां मध्य अशियाची आपण रजाच घेतली पाहिजे. या काळापासून हा प्रदेश सुधारणेच्या वरवर चढणाऱ्या मार्गांत मागें पडतो आणि कोठें तरी एकीकडे अडगळींत पडल्यासारखा होऊन जातो. आपलें लक्ष जावें असें तेथें मग कांहीं घडत नाहीं. मनुष्याच्याच हातून नष्ट झालेल्या तेथल्या संस्कृतीच्या आठवणीशिवाय पाहण्यासारखें त्यांत कांहीं शिल्लक राहत नाहीं. निसर्गाची सुद्धां या प्रदेशावर फारच गैरमर्जी झाली. तेथील हवा अधिकाअधिक रुक्ष झाली आणि मनुष्यवस्तीला गैरसोयीची झाली.

मंगोलियन लोकांची एक शाखा पुढच्या काळांत हिंदुस्थानांत आली आणि तेथें तिनें मोठें साम्राज्य स्थापन केलें. तेवढी शाखा वगळून बाकी सर्व मंगोलियन लोकांना पण आतां आपण रामराम ठोकला पाहिजे. कारण त्या शाखेखेरीज यानंतर चेंगीजखान आणि त्याचे वंशज यांच्या साम्राज्याची इतिश्री झाली. मंगोलियन लोकांत पुन्हां छोट्या छोट्या प्रदेशनायकांची पद्धति सुरू झाली आणि पुन्हां टोळ्याटोळ्यांची राहणीही सुरू झाली.

## ७५

# हिंदुस्थानांत एक बिकट प्रश्न सोडविण्याची धडपड सुरू होते

१२ जुलै, १९३२

तैमूरलंग, त्याच्या त्या कत्तली, व मस्तकांचे पिरामिड यांबद्दल मीं तुला लिहिलें आहे. किती भयंकर आणि रानटी क्रूरपणाच्या वाटतात नाहीं या गोष्टी! तुला वाटेल आमच्या सुधारलेल्या जगांत कांहीं असल्या गोष्टी घडणार नाहींत. तरीपण इतकी कांहीं अगदीं खात्री बाळगूं नको. आपल्या या चालू काळांत सुद्धां काय घडणें शक्य आहे तें नुकतेंच आपण ऐकलें आणि वाचलें आहे. चेंगीजखानानें माणसांचा आणि मालमत्तेचा केलेला नाश पुष्कळच मोठा होता खरा. परंतु १९१४ ते १९१८ च्या महायुद्धांत जो असा नाश झाला, त्याच्यापुढें तो अगदींच फिका पडतो. अशा रीतीनें मंगोलियन लोकांच्या क्रूरपणाच्या प्रत्येक कृत्याला तोडीस तोड अशी आधुनिक भयंकर कृत्यें वाटेल तेवढीं दाखवितां येतील.

तरीपण चेंगीजखान किंवा तैमूरलंग यांच्या काळापेक्षां शेंकडों प्रकारांनीं आपली प्रगति झालेली आहे यांत मुळींच संशय नाहीं. आपली राहणी अनेक रीतींनीं अधिक विविधतायुक्त झाली आहे; एवढेंच नव्हे, तर ती अधिक सुसंपन्नही झाली आहे. निसर्गांतील पुष्कळच शक्ती शोधून काढून, त्यांचे सर्व नियम समजावून घेऊन, त्यांना मनुष्याच्या कामाला लावण्यांत आलें आहे. तेव्हां आजचें जग खरोखरच अधिक सुधारलेलें आहे, अधिक सुसंस्कृत आहे. असें जर आहे, तर लढाईच्या काळांत तेच आपण लोक परत रानटीपणा कां स्वीकारतों? कारण युद्ध म्हणजे सगळी सुधारणा आणि संस्कृति यांची गळचेपीच होय; त्यांचा संपूर्ण धिक्कार व त्यागच होय; मनुष्याच्या मेंदूंत जी अधिक ज्ञानवान् शक्ति निर्माण झाली आहे तिचा उपयोग अधिकाधिक सामर्थ्यवान् आणि विनाशकारक यंत्रें तयार करण्यासाठीं करावयाचा एवढ्या एका गोष्टीशिवाय, युद्ध म्हटलें कीं मनुष्य बाकी साऱ्या सुधारणेला रामराम ठोकीत असतो. एकदां युद्ध सुरू झालें, म्हणजे त्यामध्यें गुंतलेल्या सर्व लोकांचीं डोकीं भयंकर भडकून जातात; आजपर्यंतच्या जीवनांतील सुधारणेंत ते जें जें कांहीं शिकले तें तें सर्व हे लोक विसरून जातात, संसारांतील सत्य आणि सौंदर्य पार विसरतात; आणि चार-दोन हजार वर्षांपूर्वीचे आपले जे क्रूर, रानटी पूर्वज त्यांच्यांत आणि यांच्यांत कांहीं फरक राहत नाहीं. तेव्हां युद्ध, मग तें कोणत्याही काळांतलें असो, तें अत्यंत भयंकरच असावयाचें यांत काय आश्चर्य!

या जगाशीं अपरिचित असा कोणी मनुष्य युद्धाच्या काळांत जर आपल्यामध्यें

आला, तर तो काय म्हणेल? शांततेच्या काळांत त्यानें आपल्याला कधींच पाहिलेलें नसून युद्धाच्या काळांतही त्याची-आपली पहिलीच गांठभेट आहे असें समज. मग युद्धावरूनच काय ती आपल्या मनाची कल्पना तो बांधील; आणि असें ठरवील, कीं हे लोक म्हणजे अत्यंत क्रूर आणि निर्दय आहेत; रानटी पशू आहेत नुसते; अधूनमधून त्यांच्या ठिकाणीं शौर्य आणि त्याग या गुणांचें दर्शन होतें; परंतु एकंदरींत, क्वचित् कांहीं अपवादात्मक चांगल्या गोष्टी सोडल्या, तर या लोकांना एकाच गोष्टीनें सर्वस्वीं वेड लावलेलें आहे; ती म्हणजे एकमेकांना ठार करावयाचें व एकमेकांचा नाश करावयाचा. अशा तऱ्हेनें तो आपल्याबद्दल चुकीचा निर्णय बांधील आणि आपल्या जगाबद्दल अगदींच विकृत कल्पना करून घेईल; कारण काय, तर त्याला आपली माहिती फक्त एका विशिष्ट काळापुरतीच, आणि तीही प्रतिकूल अशा काळापुरतीच झालेली असणार.

अशाच रीतीनें भूतकाळाचा विचार आपण त्या काळचीं युद्धें आणि कत्तली यांच्या चष्म्यांतूनच फक्त जर करूं गेलों, तर आपला निर्णय चुकीचा होईल. मोठी खेदाची गोष्ट ही आहे, कीं युद्धें आणि कत्तली यांच्या ठिकाणीं माणसाचें चित्त वेधून घेण्याचा फार विलक्षण गुण आहे. लोकांची दैनंदिन राहणी ही इतकी आकर्षक असत नाहीं. तिच्यांत सांगण्यासारखें असें इतिहासकाराला काय सांपडणार? त्यामुळें इतिहासकार युद्ध किंवा लढाई दिसतांच त्यांच्यावर झडप घालतो आणि त्यांचीच टिमकी वाजवीत सुटतो. हीं सगळीं युद्धें विसरून किंवा त्यांकडे दुर्लक्ष करून आपलें चालणार नाहीं हें अर्थातच खरें; परंतु त्यांच्याकडे आपण वाजवीहून जास्त लक्ष देतां कामा नये. वर्तमानकाळाकडे जशा दृष्टीनें पाहतों, तशाच दृष्टीनें आपण भूतकाळाकडे पाहिलें पाहिजे; आणि त्या काळच्या लोकांचा विचारही आपण आपल्या स्वतःच्या-बद्दल करतों तशा आपुलकीच्या दृष्टीनें केला पाहिजे. असें केलें म्हणजे मगच आपल्याला त्यांच्यामधील मानवी गुणांचें अधिक चांगलें आकलन होईल; आणि मग त्या लोकांची दैनंदिन राहणी आणि तत्संबंधीं त्यांचे विचार या गोष्टींचें आपल्याला खरें महत्त्व असून अधूनमधून होणाऱ्या युद्धांचें नव्हे, ही गोष्ट आपल्याला चांगली कळून येईल. हा मुद्दा नीट लक्षांत ठेवणें जरूर आहे. कारण तुझ्या हातीं येणाऱ्या पुष्कळशा इतिहास-ग्रंथांमध्यें या युद्धांच्या वर्णनांचाच महापूर असतो. फार कशाला? माझ्या या पत्रांतसुद्धां पुष्कळदां त्याच दिशेकडे ओघ वळतो. त्याचें खरें कारण असें आहे, कीं भूतकाळांतील दैनंदिन राहणीबद्दल लिहिणें ही गोष्ट अवघड आहे. मला स्वतःला त्याबद्दल पुरेशी माहितीच नाहीं.

हिंदुस्थानच्या कपाळीं आलेल्या सर्व भयंकर अनर्थांपैकीं तैमूरची स्वारी हा एक फारच तीव्रतम अनर्थ होता हें आपण पाहिलें आहे. जेथें जेथें तो येऊन जाई, तेथें तेथें त्याच्या पाठीमागें केवढें दैन्य आणि यातना पसरून जात याचा नुसता विचार मनांत

आला तरी अंगावर शहारे उभे राहतात. तरीपण त्यांतल्या त्यांत बरी गोष्ट म्हणजे दक्षिण हिंदुस्थान सबंधच्या सबंध त्याच्या कचाट्यांतून निसटला; त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या पूर्व, पश्चिम आणि मध्य भागांनाही त्याची झळ लागली नाहीं. एवढेंच नव्हे, तर सध्यांचा जो संयुक्त प्रांत तो सुद्धां, उत्तरेकडील दिल्ली किंवा मीरत यांच्या आसपासचा थोडासा तुकडा सोडला तर त्याच्या हातून बचावला. तैमूरलंगाच्या स्वारीनें सर्वांत अधिक आघात केला पंजाबवर आणि तसाच दिल्ली शहरावर. पंजाबमध्यें सुद्धां तैमूरलंग हा ज्या मार्गानें आला आणि गेला, त्या मार्गाच्या आजूबाजूच्या लोकांना सर्वांत अधिक हाल सोसावे लागले. बाकी पंजाबमधील बहुतेक सर्व लोक आपापले रोजचे व्यवहार कसलीही आडकाठी न येतां करीत होते. असें असल्यामुळें या असल्या युद्धांच्या आणि स्वाऱ्यांच्या महत्त्वाबद्दल कांहीं तरी अतिशयोक्तीच्या कल्पना न करण्याबद्दल आपण सावधगिरी बाळगली पाहिजे.

चौदाव्या व पंधराव्या शतकांतील हिंदुस्थानाकडे आतां आपण जरा नजर टाकूं या. या काळांत दिल्लीच्या सुलतानांचा अम्मल कमी कमी होत होत तैमूरच्या येण्याच्या सुमारास जवळजवळ तो संपुष्टांत आलेला असतो. तैमूर आल्यावर तो पारच संपून जातो. हिंदुस्थानभर सगळीकडे स्वतंत्र राज्यें स्थापन होतात. त्यांतलीं बहुतेक सारीं मुसलमानीच होतीं; एकच नांव घेण्याजोगें मोठें हिंदुराज्य असतें; तें म्हणजे दाक्षिणेकडील विजयनगरचें राज्य. इस्लामधर्म आतां कांहीं हिंदुस्थानांत पाहुणा किंवा अपरिचित राहिलेला नाहीं. तो या काळांत तेथें चांगला दृढ रीतीनें प्रस्थापित झालेला आढळून येतो. पहिले पहिले स्वारी करून आलेले अफगाण लोक आणि त्यानंतरचे गुलाम सुलतान यांच्या क्रूरपणाचें आणि भयंकरपणाचें मान कमी होत जाऊन मुसलमान लोक हे क्रमाक्रमानें हिंदूंच्याइतकेच या देशचे रहिवासी होऊन जातात. आतां त्यांचे बाहेरच्या जगाशीं कांहीं संबंध राहत नाहींत. निरनिराळ्या राज्यांमध्यें लढाया होतात. पण त्या सर्व राजकीय लढाया; धार्मिक नव्हेत. कधीं कधीं तर मुसलमान राजे हिंदू शिपायांना नोकरीस ठेवतांना आढळतात आणि हिंदू राजे मुसलमान शिपायांना. मुसलमान राजे पुष्कळदां हिंदू स्त्रियांशीं विवाह करतात आणि मुसलमान राजांकडून मंत्रिपदावर किंवा इतर मोठ्या अमलदारीच्या स्थानावर हिंदूंच्या नेमणुकाही होतात. जित आणि जेते, राज्यकर्ते आणि परतंत्र प्रजा अशा प्रकारची भावना जवळजवळ कोठेंच राहत नाहीं. खरी गोष्ट म्हणजे हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व मुसलमान लोक आणि कित्येक मुसलमान राजेसुद्धां, धर्मांतरित हिंदूच होते. यांपैकीं पुष्कळांनीं धर्मांतर केलें होतें तें दरबारची मर्जी संपादन करावी किंवा इतर कांहीं आर्थिक लाभ करून घ्यावा यासाठीं; आणि धर्मांतर करून-सवरूनसुद्धां हे लोक आपल्या पुष्कळशा प्राचीन परंपरांना चिकटून राहिलेले होते. कांहीं कांहीं मुसलमान राज्यकर्ते हे धर्मांतर करण्यासाठीं जुलमी मार्गांचा अवलंब करतांना आढळतात; परंतु त्यांतही त्यांचा हेतु पुष्कळशा अंशीं राजकीय स्वरूपाचाच होता;

कारण धर्मांतर केलेले लोक हे अधिक राजनिष्ठ प्रजाजन होतील अशी कल्पना असे. परंतु अशा जुलुमानें धर्मांतराचें कार्य कांहीं तितकेंसें झालेलें दिसत नाहीं. आर्थिक कारण हेंच अधिक प्रभावी होतें. मुसलमान नसणारांवर जिझिया नांवाची डोईपट्टी बसविण्यांत येत असे आणि या पट्टींतून बचावण्यासाठीं पुष्कळसे लोक मुसलमान-धर्म स्वीकारीत.

परंतु ही सर्व घडामोड शहरांतूनच काय ती चालू होती. खेडेगांवच्या लोकांवर या सर्व प्रकरणाचा क्वचितच कोठें परिणाम झालेला आढळतो. खेडेगांवच्या कोट्यवधि लोकांची राहणी जशी पूर्वी होती, तशीच पुढेंही चालू होती. हें खरें, कीं सरकारी अम्मलदार खेडेगांवच्या जीवनांत पुष्कळ ढवळाढवळ करूं लागलेले होते; ग्राम-पंचायतीचे अधिकार पूर्वीपेक्षां आतां कमी झालेले होते; तथापि ग्रामपंचायती अद्यापि शिल्लक होत्या. एवढेंच नव्हे, तर त्याच सर्व ग्रामीण जीवनाचा आधार आणि केंद्र होत्या. सामाजिक दृष्टीनें, तसेंच धार्मिक आणि रूढीच्या बाबतींत खेडेगांवांत जवळ-जवळ कांहींही बदल झालेला आढळत नाहीं. आजसुद्धां तुला माहीत आहे, कीं हिंदुस्थान देश हा लाखों खेडेगांवांचा देश आहे. मोठमोठीं व्यापारी नगरें आणि लहान लहान शहरें हीं निव्वळ वरचें पाणीच आहेत; खरोखरचा हिंदुस्थान म्हणजे ह्या खेडेगांवांचा बनलेला हिंदुस्थान असें म्हटलें पाहिजे. या खेडेगांवांच्या हिंदुस्थाना-मध्यें इस्लामधर्मानें कांहीं म्हणण्यासारखा बदल केला नाहीं.

मुसलमानधर्माच्या आगमनामुळें हिंदुधर्मामध्यें दोन प्रकारची खळबळ होऊन गेली. आणि मोठी विचित्र गोष्ट अशी, कीं हे दोन्ही प्रकार परस्परांशीं अगदीं विरुद्ध होते. एका बाजूनें हिंदुधर्म हा अगदींच प्रगतिविरोधी बनला. आपल्यावर होणाऱ्या हल्ल्यां-पासून आपलें संरक्षण करण्याच्या प्रयत्नांत त्याच्यांतील लवचिकपणा आणि चैतन्यच नाहींसें झालें आणि चार भिंतींच्या आंत जाऊन दडून बसल्यासारखा तो झाला. जातिबंधनें फारच कडक झालीं आणि एका जातींतून दुसऱ्या जातींत जाणें अतिशय कठिण होऊन गेलें. पडदा आणि स्त्रियांना बाह्य जीवनापासून दूर कोंडून ठेवणें या गोष्टी नित्याच्या होऊन बसल्या. उलटपक्षीं, दुसऱ्या बाजूनें जातिधर्म, पूजाअर्चेचें बंड आणि कर्मठपणा यांविरुद्ध आंतूनच बंड सुरू झालें. या सर्व कर्मकांडांत आणि धर्म-बंधनांत सुधारणा करण्याचे पुष्कळ प्रयत्न होऊं लागले.

अर्थातच हें खरें आहे, कीं अगदीं प्राचीन काळापासूनच्या हिंदुधर्माच्या इतिहासा-मध्यें त्या धर्मांतील अयोग्य गोष्टी किंवा दुराचार सुधारावे यासाठीं झटणारे सुधारक धर्म वेळोवेळीं निर्माण होत आलेले आहेत. बुद्ध हा अशा धर्मसुधारकांपैकीं सर्वश्रेष्ठ होय. आठव्या शतकामध्यें होऊन गेलेल्या शंकराचार्यांबद्दलही मीं तुला सांगितलेंच आहे. त्यांच्यानंतर तीनशें वर्षांनीं, अकराव्या शतकामध्यें दक्षिण हिंदुस्थानांत चोलांच्या साम्राज्यांत आणखी एक श्रेष्ठ धर्मसुधारक होऊन गेला. शंकराचार्यांच्या धर्मविचार-पद्धतीशीं विरोधी असा त्याचा संप्रदाय होता. याचें नांव रामानुज. शंकराचार्य शैव होते

आणि बुद्धिशाली गृहस्थ होते. रामानुज हे वैष्णव होते आणि श्रद्धेवर आधार ठेवणारे गृहस्थ होते. हिंदुस्थानमध्यें राजकीय दृष्ट्या पुष्कळ विभाग व स्वतंत्र राज्यें पडलेलीं असलीं व त्यांच्यामध्यें परस्पर युद्धेंही होत असलीं, तरी सांस्कृतिक दृष्टीनें, तत्त्वविचाराच्या दृष्टीनें सर्व हिंदुस्थान अगदीं प्राचीन काळापासून नेहमीं एक आणि अखंड कसा राहत आलेला आहे हें मीं तुला सांगितलें आहे. या देशांत केव्हांही एखादा श्रेष्ठ मनुष्य उदयास येवो किंवा एखादी श्रेष्ठ चळवळ निर्माण होवो, त्या माणसाच्या कर्तृत्वाचा किंवा विचाराचा आणि अशा चळवळीचा प्रसार, सगळ्या राजकीय सरहद्दी ओलांडून अखिल भारतांत व्हावयाचाच असा नियम चालत आलेला आहे.

इस्लामधर्माचा पाय हिंदुस्थानांत पक्का रोवला गेल्यानंतर हिंदुधर्मीयांमध्यें आणि मुसलमानधर्मीयांमध्येंही धर्मसुधारकांचा एक नवीनच प्रकार निर्माण झाला. या सुधारकांचा प्रयत्न असा होता, कीं या दोन्ही धर्मांतील समान गोष्टींवर अधिक भर द्यावयाचा, त्यांच्यामधील कर्मकांडावर आणि तंत्रावर हल्ला करावयाचा आणि अशा रीतीनें या दोन्ही धर्मांमधील अंतर कमी करावयाचें. अशा रीतीनें या दोन्ही धर्मांचा एक प्रकारचा समन्वय करण्याचा म्हणजे दोहोंचें मिळून मिश्रण बनविण्याचा एक प्रयत्न सुरू झाला. दोन्ही बाजूंच्या लोकांमध्यें एकमेकांबद्दल पुष्कळच दूषित पूर्वग्रह आणि द्वेषभाव असल्यामुळें हें काम फार अवघड होतें. परंतु आपल्याला आढळून येईल, कीं शतकानुशतकें हा प्रयत्न होतच राहिला. कितीएक मुसलमान राज्यकर्त्यांनींसुद्धां, विशेषतः अकबरानें असा समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

चौदाव्या शतकांत दक्षिणेमध्यें होऊन गेलेला रामानंद हा या समन्वयाच्या कल्पनेचा प्रचार करणारा पहिला प्रख्यात धर्मोपदेशक होय. तो जातिधर्माविरुद्ध प्रचार करी आणि स्वतः जात मानीत नसे. त्याच्या शिष्यांमध्येंच कबीर हा मुसलमान विणकर होता. पुढें तो रामानंदापेक्षांही अधिक प्रसिद्धीस आला. कबीर हा सामान्य जनतेमध्यें फार प्रिय आहे. उत्तर हिंदुस्थानांत आज अगदीं कोनाकोपऱ्यांतल्या खेड्यांतसुद्धां त्याचीं हिंदी पदें सगळ्यांना चांगल्या परिचयाचीं आहेत, हें तुलाही ठाऊक आहे. तो स्वतः निव्वळ हिंदुधर्माभिमानी नव्हता किंवा निव्वळ मुसलमान-धर्माभिमानी नव्हता; त्याच्या ठिकाणीं या दोन्ही धर्मांवरील निष्ठा होती किंवा या दोन धर्मांच्या मध्यावर कोठें तरी तो उभा होता. त्याचे अनुयायी या दोन्ही धर्मांमधील आणि सर्व जातींमधील होते. गोष्ट अशी सांगतात, कीं तो जेव्हां मरण पावला तेव्हां त्याच्या शरीरावर एका वस्त्राचें आच्छादन घालण्यांत आलेलें होतें. त्याचे हिंदू शिष्य होते त्यांच्या मनांतून त्याच्या प्रेताला अग्नि द्यावयाचा होता; मुसलमान होते त्यांच्या मनांतून तें पुरावयाचें होतें. त्यामुळें त्यांच्यामध्यें मोठा वाद माजला आणि अखेर प्रकरण भांडणावर गेलें. परंतु शेवटीं त्यानीं जेव्हां तें आच्छादनाचें वस्त्र उचलून पाहिलें, तेव्हां ज्याच्या ताब्यासाठीं आपण एवढे भांडलों तो देह तेथून

नाहींसा झाला असून त्याच्या जागीं ताजीं फुलें आहेत असें त्यांना आढळून आलें. ही कथा अर्थात् काल्पनिकच असणार; तरीपण ती फारच मधुर आहे.

कबिराच्या नंतर हिंदुस्थानांत आणखी एक महान् सुधारक आणि धर्मगुरु उदयास आला. हा म्हणजे शीखपंथाची स्थापना करणारा गुरु नानक हा होय. त्याच्या पाठीमागें एकामागून एक अशी शिखांच्या दहा गुरूंची परंपरा होऊन गेली. गुरु गोविंदसिंग हा त्या परंपरेतील शेवटचा म्हणजे दहावा गुरु.

हिंदुस्थानांतील धार्मिक व सांस्कृतिक इतिहासामधील आणखी एका प्रख्यात मनुष्याचें नांव मला येथें तुला सांगावेंसें वाटतें. याचें नांव चैतन्य. हा बंगालमध्यें सोळाव्या शतकाच्या सुरुवातीस होऊन गेला. मूळचा हा मोठा विद्वान् पंडित होता. परंतु एकाएकीं त्याच्या मनाचा असा निश्चय झाला, कीं आपली सारी विद्वत्ता आणि पांडित्य हीं निरर्थक होत. म्हणून त्यानें त्यांचा त्याग केला आणि भक्तीच्या मार्गाचा त्यानें अवलंब केला. पुढें तो फार मोठा भक्त म्हणून प्रसिद्धीस आला आणि आपल्या शिष्यगणासह भजनें गात तो साऱ्या बंगाल देशभर संचार करीत असे. त्यानें एक वैष्णवपंथही स्थापन केला आणि अद्यापिसुद्धां बंगालमध्यें त्याचा प्रभाव फार मोठा आहे.

ही झाली धार्मिक सुधारणा आणि समन्वय यांची हकीकत. जीवनाच्या इतर शाखांमध्येंसुद्धां अशाच तऱ्हेचा समन्वय, कधीं कधीं समजूनउमजून, तर पुष्कळ अंशीं अजाणतांच सुरू होता. एक नवीनच संस्कृति, नवीनच स्थापत्य, नवीनच भाषा उदयाला येऊं लागली. पण हें लक्षांत ठेव, कीं हें सारें खेड्यांत नव्हे, तर मुख्यतः शहरांमध्यें घडून येत होतें; शहरामध्येंसुद्धां मोंगल साम्राज्याची राजधानी जें दिल्ली शहर त्यामध्यें आणि इतर मोठमोठ्या राज्यांच्या किंवा प्रांतांच्या राजधान्यांमध्यें हा समन्वय घडून येत होता. वरच्या टोंकाला आतां राजा हा पूर्वीपेक्षांही अधिक एकतंत्री होऊन गेला. प्राचीन हिंदी राज्यकर्त्यांच्या एकतंत्री कारभारावर नियंत्रण म्हणून रूढि आणि परंपरा यांचें बंधन तरी होतें. नवीन मुसलमान राजांवर हेंही बंधन राहिलें नाहीं. तत्त्वतः पाहिलें, तर इस्लामधर्मांत समतेचें धोरण अधिक आहे; त्यांच्यामध्यें गुलामालासुद्धां सुलतान होणें शक्य होतें हेंही आपण पाहिलें आहे; तरीपण त्यांच्या राजांचा अधिकार आणि अनियंत्रित सत्ता यांमध्यें वाढच झाली, हें मात्र खरें आहे. वेड्या तुघलकानें दिल्लींतून राजधानी उठवून ती दौलताबादला नेली, याहून अधिक मति गुंग करून टाकणारें दुसरें कोणतें उदाहरण या अनियंत्रित सत्तेचें असूं शकणार आहे?

याचबरोबर गुलाम बाळगण्याची पद्धति, विशेषतः सुलतानांच्या पदरीं ते बाळगण्याची पद्धति पण वाढीस लागली. लढाईमध्यें असे गुलाम पकडण्याचा खास प्रयत्न होऊं लागला. या गुलामांमध्यें कारागीर लोकांना विशेष किंमत असे. बाकीच्यांना सुलतानाच्या खास फौजेंत दाखल करण्यांत येत असे.

नालंदा आणि तक्षशिला येथील त्या महान् विद्यापीठांची या काळांत काय

अवस्था होती? हीं विद्यापीठें नष्ट होऊन एव्हांना पुष्कळ काळ लोटला होता. परंतु नवीनच पद्धतीचीं पुष्कळ नवीं विद्यापीठें अस्तित्वांत आलेलीं होतीं. त्यांना तोल असें म्हणत असत व त्या ठिकाणीं प्राचीन संस्कृत विद्यांचें अध्ययन होत असे. त्यांच्यामध्यें अद्ययावत्पणा नव्हता. त्यांचें सगळें लक्ष प्राचीन काळांत गुंतलेलें होतें आणि त्यामुळें हीं विद्यापीठें बहुतेककरून प्रगतिविरोधी असावीं. अशा विद्यापीठांच्या केंद्रांपैकीं बनारस हें फार काळापासून नेहमींच सर्वश्रेष्ठ केंद्र म्हणून नांदत आलें आहे.

वरती मीं तुला कबिराच्या हिंदी पदांबद्दल सांगितलें. त्यावरून पंधराव्या शतकाच्या सुमारालाच हिंदी ही नुसती लोकभाषा राहिली नसून ती ग्रंथभाषेच्या साहित्याच्या पदवीला चढली होती असें दिसतें. संस्कृत ही जिवंत, रोजच्या व्यवहारांतील भाषा म्हणून नाहींशी होऊन आतां फार काळ लोटला होता. कालिदासाच्या आणि गुप्त राजांच्या काळींसुद्धां संस्कृत ही फक्त विद्वानांची भाषा झालेली होती. सामान्य लोक संस्कृतमध्यें च थोडेफार फरक होऊन बनलेली प्राकृत भाषा त्या वेळींही बोलूं लागले होते. हळूहळू हिंदी, बंगाली, मराठी आणि गुजराथी या संस्कृत भाषेच्याच मुली वाढत गेल्या. मुसलमानी ग्रंथकार व कवी हिंदी भाषेंत लिहूं लागले. पंधराव्या शतकांत जौनपूर येथील एका राजानें महाभारत आणि भागवत या ग्रंथांचें मूळ संस्कृतमधून बंगाली भाषेंत भाषांतर करविलें. दक्षिणेंतील विजापूर येथील मुसलमान राज्यकर्त्यांचे हिशेब मराठी भाषेंत ठेवले जात असत. अशा रीतीनें संस्कृत भाषेंतून निघालेल्या तीन भाषा, संस्कृताच्या तीन कन्या, पंधराव्या शतकाच्या सुमारासच चांगल्या झाल्या होत्या असें आपणांस आढळतें. अर्थात् दक्षिणेमध्यें द्रविड लोकांच्या भाषा तामीळ, तेलगू, मल्याळी आणि कानडी या पुष्कळच प्राचीन होत्या.

मुसलमानांची दरबारी भाषा फारशी होती. ज्या कोणाला दरबारशीं किंवा सरकारी कचेऱ्यांशीं संबंध ठेवावयाचा असे, त्यांपैकीं बहुतेक सुशिक्षित लोक फारशीचा अभ्यास करीत असत. अशा रीतीनें पुष्कळच हिंदू लोकांना फारशीचें ज्ञान असे. हळूहळू लष्करी तळामध्यें, बाजारामध्यें नवीनच एक उर्दू नांवाची भाषा उत्पन्न झाली. उर्दू या शब्दाचा अर्थच तळ असा आहे. खरें म्हणजे ती कांहीं एखादी निराळी नवी भाषा नव्हती; तर थोडासा निराळा पेहेराव चढविलेली हिंदीच ती होती. तिच्यामध्यें थोडेसे फारशी शब्द जास्त होते; बाकी ती सर्व हिंदीच होती. या हिंदी-उर्दूमिश्रित भाषेलाच कधीं कधीं हिंदुस्थानी भाषा म्हणतात. हिचा प्रसार उत्तर हिंदुस्थानांत आणि मध्य हिंदुस्थानांत सर्वत्र झाला. आज थोड्या थोड्या स्थानिक फरकांनिशीं ही भाषा सुमारें १५ कोटी लोक बोलतात. आणि याहून पुष्कळच अधिक लोकांना ती समजूं शकते. अशा रीतीनें बोलणाऱ्यांच्या संख्येच्या दृष्टीनें पाहतां हिंदी ही जगांतल्या प्रमुख भाषांपैकीं एक भाषा आहे.

स्थापत्यामध्येंही नवीन परंपरा, नव्या धर्ती, सुरू झाल्या आणि पुष्कळ भव्य

आणि सुंदर इमारती बाधल्या गेल्या; दक्षिणेंत विजापूर आणि विजयनगर येथें; तसेंच गोवळकोंड्यास; अहमदाबाद या त्या काळच्या मोठ्या आणि सुंदर शहरामध्ये; तसेंच अलाहबादजवळ जौनपूर या शहरात. हैद्राबादजवळ गोवळकोंड्यास प्राचीन अवशेष पाहायला आपण गेलों होतों आणि तेथील या प्रचंड किल्ल्यावर जाऊन तेथून खालीं पसरलेल्या त्या प्राचीन शहराचे, तेथील राजवाड्यांचे, बाजार-पेठांचे मोडके-तोडके अवशेष आपण बघितले, ते आठवतात का तुला ?

तात्पर्य, हिंदुस्थानमध्यें एकीकडे राजे लोक एकमेकांशीं लढत होते आणि एकमेकांचा नाश करीत होते, तरीपण अशा या अदृश्य शक्ती एक प्रकारचा समन्वय, एकीकरण करून आणण्यासाठीं अखंड धडपड-खटपट करीत होत्या. उद्देश हा, कीं हिंदुस्थानांतील लोकांनीं एकमेकांसह गुण्यागोविंदानें, एकभावनेनें नांदावें, आपल्या एकत्रित शक्तीचा उपयोग प्रगतीसाठीं आणि सुधारणेसाठीं करावा. पुढील कांहीं शतकांत या अदृश्य शक्तींना प्रचंड यश प्राप्त झालें. परंतु त्यांचें कार्य पुरें होण्यापूर्वीच आणखी एक धक्का बसून सर्व इमारतच कोसळली आणि जेथून आम्ही लोक निघालों तेथें आम्ही परत जाऊन पडलों. आज पुन्हां आपल्याला तोच सगळा मार्ग पुन्हां आक्रमण करून जें जें म्हणून चांगलें आहे त्या सगळ्यांचा समन्वय – एकीकरण – करावयाचा आहे. पण या वेळीं हें एकीकरण चांगल्या दृढ पायावर उभारलें पाहिजे. स्वातंत्र्य आणि समता यांच्या पायावर तें आधारलें पाहिजे आणि आहे त्याहून चांगल्या प्रकारच्या जागतिक रचनेशीं तें जुळतें असलें पाहिजे, तरच तें चिरकाल टिकण्यास समर्थ होईल.

धर्म आणि संस्कृति यांचा समन्वय करण्याच्या या प्रश्नावर कित्येक शतकेंपर्यंत हिंदुस्थानांतील सर्वच श्रेष्ठ लोकांचें चित्त खिळून राहिलेलें होतें. त्यांचें लक्ष या विषयांत इतकें कांहीं पार गुंगून गेलें होतें, कीं राजकीय आणि सामाजिक स्वातंत्र्याची त्यांना आठवणच राहिली नाहीं. आणि तिकडे यूरप खंड दहावीस दिशांनीं पुढें पुढें सरकत असतांना आमचा हिंदुस्थान देश कांहींच प्रगति न करतां कसाबसा जगून मागेंच राहिला.

मीं सांगितलें आहे तुला, कीं हिंदुस्थान देश, आपल्या रसायनशास्त्रांतील प्रगतीच्या जोरावर रंग तयार करणें, पोलादाला पाणी देणें, या आणि इतर अनेक कलांमधील कौशल्याच्या बळावर सर्व जगांतील बाजारपेठा आपल्या कबजांत ठेवीत होता, असा एक काळ होता. या देशाचीं जहाजें येथील माल दूरदूरच्या परकी देशांमध्यें घेऊन जात असत. आतां आपण ज्या काळाचा विचार करतों आहों, त्या वेळीं हिंदुस्थानचें जगाच्या बाजारावरील हें वर्चस्व नष्ट होऊन पुष्कळच काळ लोटला होता. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला तर हा व्यापाराचा ओघ उलट पूर्वेच्या दिशेनें वाहूं लागला. सुरुवातीला उगीच कोठें एकदां येंच येंब पोंचल्यासारखें वाटत होतें; परंतु लौकरच हा ओघ वाढून चांगला प्रचंड भरदार प्रवाह होणार होता.

## ७६

# दक्षिण हिंदुस्थानांतलि राज्यें

१४ जुलै, १९३२

आतां पुन्हां एकदां आपण हिंदुस्थानाकडे नजर वळवूं या आणि येथील राज्यें आणि साम्राज्यें यांच्यामध्यें ज्या अलाटापालटी झाल्या त्यांचा विशाल चित्रपट पाहूं या. हा एक जणुं कांहीं प्रचंड मोठा आणि कधीं न संपणारा चलच्चित्रपट असून त्याच्यावरचीं हीं मूक चित्रेंच जणुं एकापाठोपाठ एक आपल्यापुढें येऊन जातांना आढळतात.

आपला तो वेडा सुलतान महमद तुघलक आणि त्यानें दिल्लीचें साम्राज्य मोडून टाकण्याची बहादरी कशी केली हें तुझ्या लक्षांत असेलच बहुधा. त्या वेळीं दक्षिणेंतील मोठमोठे प्रांत साम्राज्यांतून फुटून निघाले आणि त्या ठिकाणीं स्वतंत्र राज्यें प्रस्थापित झालीं. त्यामध्यें हिंदूंचें विजयानगर व मुसलमानांचें गुलबर्गा हीं प्रमुख राज्यें होतीं. पूर्वेकडे बंगाल आणि बिहार यांचा मिळून झालेला गौड देश हाही स्वतंत्र झाला. येथील राजा मुसलमान होता.

महमदाच्या मागून त्याचा पुतण्या फिरोजशहा हा गादीवर आला. हा आपल्या चुलत्यासारखा माथेफिरू नव्हता आणि त्याच्या मानानें अधिक दयाळू होता. परंतु त्याच्याही ठिकाणीं धार्मिक कडवेपणा होताच. फिरोजशहा हा कर्तबगार राज्यकर्ता असून त्यानें राज्यकारभारांत पुष्कळ सुधारणा केल्या. दक्षिणेंतील किंवा पूर्वेकडील गेलेले प्रांत कांहीं त्याला परत मिळवितां आले नाहींत ; परंतु यापुढें आणखी साम्राज्याची फुटाफूट होऊं नये एवढी व्यवस्था मात्र त्याला करतां आली. नवीन शहरें, प्रासाद, मशिदी वगैरे बांधण्याची आणि बागबगीचे तयार करण्याची त्याला विशेष आवड होती. दिल्लीजवळचें फिरोजाबाद शहर आणि अलाहाबादपासून थोडेसें पलीकडे असलेलें जौनपूर हीं शहरें त्यानें प्रस्थापित केलीं. त्याचप्रमाणें त्यानें यमुना नदीचा एक मोठा कालवा बांधला आणि मोडकळीला आलेल्या कित्येक इमारती दुरुस्त केल्या. या सर्व बांधकामांबद्दल त्याला मोठा अभिमान वाटत असे. आपण बांधलेल्या नव्या इमारती आणि दुरुस्त केलेल्या जुन्या इमारती यांची त्यानें एक भली मोठी लांब यादी तयार केलेली आहे.

फिरोजशहाची आई बिबी नैला ही रजपूत असून एका मोठ्या मांडलिक राजाची मुलगी होती. तिच्यासंबंधीं गोष्ट अशी सांगतात, प्रथम ही मुलगी फिरोजच्या बापाला देण्याचें नाकारण्यांत आलें होतें. त्यामुळें युद्ध उद्भवलें आणि नैलाच्या देशावर हल्ला होऊन तो उध्वस्त केला गेला. आपल्यासाठीं आपल्या लोकांचे होत असलेले हाल पाहून बिबी नैलाचें मन फार अवस्थ झालें आणि स्वतःच फिरोजशहाच्या बापाच्या हवालीं होऊन आपल्या लोकांचें रक्षण करण्याचा तिनें

निश्चय केला. अशा रीतीनें फिरोजशहाच्या अंगांत रजपूत रक्त होतें. पुढें अशीं हीं मुसलमान राज्यकर्ते आणि रजपूत स्त्रिया यांच्यामधील पुष्कळ लग्नें वारंवार होत गेलेलीं तुला आढळतील आणि त्यामुळें एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होण्याला मदत झाली असली पाहिजे.

आपली सदतीस वर्षांची भली लांब कारकीर्द संपवून फिरोजशहा इ. स. १३८८ मध्यें मरण पावला. त्यानंतर ताबडतोब आतांपर्यंत कसाबसा त्यानें सांवरून धरलेला दिल्लीच्या साम्राज्याचा डोलारा पार मोडून कोलमडून पडला. मध्यवर्ती अशी सत्ताच शिल्लक राहिली नाहीं. जिकडे तिकडे छोट्या-छोट्या राज्यकर्त्यांचें वर्चस्व माजलें. याच अंदाधुंदीच्या काळांत फिरोजशहाच्या मृत्यूनंतर दहा वर्षांनीं तैमूरलंग उत्तरेकडून हिंदुस्थानवर धाड घेऊन आला होता. दिल्ली शहराचा जवळजवळ त्यानें प्राणच घेतला म्हणावयाचा; परंतु त्यांतूनही हळूहळू दिल्ली शहर सांवरलें आणि पुन्हां पन्नास वर्षांनंतर तें शहर आणखी एका मध्यवर्ती सत्तेची राजधानी होऊन तेथें एका सुलतानाचा अम्मल चालू झाला. तथापि, त्या वेळीं त्याची ही सत्ता फक्त एका छोट्याशा राज्यावर होती. दक्षिणेंतील किंवा पूर्वेकडील मोठमोठ्या राज्यांशीं त्याची तुलना करतां येण्यासारखी नव्हती. हे नवे सुलतान अफगाण वंशाचे होते. पण हे अगदींच नादान लोक होते. इतके, कीं अखेरीस त्यांचे अफगाण सरदारच त्यांना कंटाळले आणि कशी तरी ही ब्याद एकदां जावो अशा तिरस्कारवृत्तीनें त्यांनीं एका परकी राज्यकर्त्याला आपल्या येथें येऊन आपल्यावर राज्य करण्याची विनंति केली. हा परकी राजा म्हणजे बाबर. हा मंगोलियन होता. हे लोक हिंदुस्थानांत स्थिरस्थावर झाल्यापासून त्यांना लोक मोंगल म्हणूं लागले. तसेंच आपणपण यापुढें म्हणूं या. बाबर थेट तैमूरलंगाच्या वंशांतच जन्मलेला असून त्याची आई चेंगीजखानाच्या वंशामधील होती. या वेळीं बाबर हा काबूल येथील राजा होता. हिंदुस्थानांत येण्याबद्दलचें हें आमंत्रण त्यानें मोठ्या आनंदानें पत्करलें; बाकी बोलावणें गेलें नसतें, म्हणजे कांहीं तो येण्याचा थोडाच थांबणार होता! दिल्लीजवळ पानिपतच्या मैदानांत इ. स. १५२६ मध्यें झालेल्या लढाईंत बाबरनें हिंदुस्थानचें साम्राज्य जिंकलें. पुन्हां एक नवीन साम्राज्य – मोंगलांचें हिंदी साम्राज्य – उदयाला आलें आणि दिल्ली शहराला साम्राज्याच्या राजधानीपदाचा मान पुन्हां एकदां प्राप्त झाला. परंतु या प्रकरणाचा विचार करण्यापूर्वी बाकीच्या हिंदुस्थानकडे एकदां आपल्याला नजर टाकली पाहिजे आणि दिल्लीच्या या नव्या साम्राज्याच्या पूर्वीच्या दीडशें वर्षांच्या अवनतीच्या काळांत तिकडे काय काय घडामोडी होत होत्या, हें पाहिलें पाहिजे.

या काळांत हिंदुस्थानांत लहानमोठ्या स्वतंत्र राज्यांची खूपच संख्या माजलेली होती. नवीनच जौनपूर येथें एक लहानसें राज्य स्थापन झालें होतें. शरकी घराण्यांतील मुसलमान राजांचें तेथें राज्य होतें. हें राज्य मोठें नव्हतें किंवा

सामर्थ्यवानही नव्हतें; आणि राजकीय दृष्टीनें त्याला कांहीं महत्त्वही नव्हतें. तरीपण शंभर वर्षेपर्यंत हें राज्य संस्कृतीचें, विद्यांचें एक मोठें केंद्र होतें आणि धार्मिक उदारतेचें तें माहेरघर होतें. जौनपूरमध्यें जीं मुसलमानी विद्यालयें होतीं, त्यांमधून या धार्मिक उदारतेच्या भावनेचा फैलाव करण्यांत आला आणि हिंदु व मुसलमान धर्मांच्या समन्वयाबद्दल, एकीकरणाबद्दल गेल्या पत्रांत मीं लिहिला तसा समन्वय करण्याचा प्रयत्नही तेथील एका राजानें केला. कलांना आणि सुंदर इमारतींच्या बांधकामांना त्या राज्यांत चांगलें प्रोत्साहन मिळालें; त्याचप्रमाणें या काळीं वाढीस लागलेल्या हिंदी आणि बंगाली या भाषांनाही त्या राज्यांत चांगली मदत मिळाली. सगळीकडे धार्मिक अनुदारतेनें धुमाकूळ घातलेला होता. अशा परिस्थितींत विद्या, कला, संस्कृति आणि धार्मिक उदारपणा यांचें माहेरघर अतें हें राज्य निराळेंच उठून दिसतें.

पूर्वेला बंगाल आणि बिहार या प्रदेशांचें मिळून झालेलें गौड राज्य थेट जवळजवळ अलाहाबादपर्यंत येऊन भिडलेलें होतें. गौड हें शहर समुद्रकांठचें एक बंदर असून जलमार्गानें त्याचा समुद्रकांठच्या शहरांशीं संबंध होता. इकडे मध्य हिंदुस्थानांत अलाहाबादच्या पश्चिमेपासून तों जवळजवळ थेट गुजराथपर्यंत माळव्याचें राज्य होतें. याची राजधानी मांडव येथें (धार विभागांत) असून हें एक मोठें शहर होतें व तेथें चांगला गडही होता. या मांडव शहरांत फार वैभवशाली आणि सुंदर इमारती बांधण्यांत आलेल्या होत्या. त्यांच्या अवशेषांकडे आजही प्रवाशांचें चित्त वेधून राहतें.

माळव्याच्या वायव्येला राजपुताना. येथें पुष्कळ रजपूत राज्यें होतीं. चितोड हें त्यांत विशेष महत्त्वाचें. चितोडचें राज्य व माळवा आणि गुजराथचीं राज्यें यांच्यामध्यें वारंवार लढाया होत असत. त्या दोन बलिष्ठ राज्यांच्या मानानें चितोडचें राज्य लहान होतें. परंतु रजपूत लोक हे पहिल्यापासून नेहमींच मोठे शूर, लढवय्ये म्हणून नामांकित आहेत. त्यामुळें संख्येनें कमी असून सुद्धां केव्हां केव्हां त्यांचा जय होई. अशा एका विजयाचें स्मारक म्हणूनच चितोडच्या राजानें एक सुंदर जयस्तंभ चितोड येथें बांधविला. मांडवच्या सुलतानानें त्याच्यावर ताण करण्यासाठीं म्हणून मांडव येथें एक उंच मनोरा बांधला. चितोडचा स्तंभ अजून अस्तित्वांत आहे; मांडवचा नष्ट होऊन गेला आहे.

माळव्याच्या पश्चिमेला गुजराथ. या प्रांतांत एक बलिष्ठ राज्य स्थापन झालेलें होतें. त्याची राजधानी अहमदाबाद या शहरीं होती. सुलतान अहमदशहानें स्थापन केलेलें हें शहर चांगलें वाढून त्याची लोकसंख्या जवळजवळ दहा लाख झाली होती. त्या ठिकाणीं अनेक सुंदर इमारती बांधल्या गेल्या आणि पंधराव्या शतकापासून तों अठराव्या शतकापर्यंत तीनशें वर्षें, अहमदाबाद हें शहर जगांतील सर्वोत्कृष्ट शहरांपैकीं एक असें गणलें जात होतें असें म्हणतात. या शहरांतील ती महान् जामी मशीद ही राणपूर येथें चितोडच्या राजानें त्याच सुमारास बांधलेल्या जैन मंदिरासारखीच आहे हें पाहून मोठा चमत्कार वाटतो. यावरून प्राचीन हिंदी स्थापत्यांत

आणि शिल्पकलेंत नवीन कल्पनांचा संचार कसा होत होता आणि त्यांतून एक नवीन स्थापत्यपरंपरा कशी निर्माण होत होती हें चांगलें दिसून येतें. त्याचप्रमाणें मीं ज्या कलेच्या प्रांतांतील समन्वयाबद्दल तुला लिहिलें, तो समन्वयही या ठिकाणीं दिसून येतो. आजही अहमदाबाद शहरांत या प्राचीन इमारतींपैकीं पुष्कळच सुंदर दगडी कोरकामानें युक्त अशा इमारती अस्तित्वांत आहेत; परंतु त्यांच्याभोंवतीं आतां जें नवें औद्योगिक शहर निर्माण झालेलें आहे, त्यांत मात्र कांहींच सौंदर्य नाहीं.

याच सुमारास हिंदुस्थान देशांत पोर्तुगीझ लोक पोंचले. केप ऑफ गुडहोपला वळसा घालून त्यांच्यापैकीं वास्को डि गामा हा प्रथम इकडे आला, हें तुझ्या ध्यानांत असेल. दक्षिण हिंदुस्थानांत कालिकत येथें तो इ. स. १४९८ मध्यें पोंचला. अर्थात् त्यापूर्वी पुष्कळ यूरपीय लोक हिंदुस्थानांत येऊन गेलेले होते; परंतु ते व्यापारी म्हणून किंवा नुसते देश पाहण्यासाठीं म्हणून आलेले होते. आतां जे पोर्तुगीझ आले त्यांच्या मनांत मात्र कांहीं निराळ्या कल्पना होत्या. हे मोठे गर्विष्ठ लोक होते; त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास होता; पोपनें त्यांना पूर्वेकडील जग बहाल केलेलें होतें; हें जग जिंकण्याच्या उद्देशानेंच ते आलेले होते. सुरुवातीला त्यांची संख्या थोडी होती; परंतु जहाजांमागून जहाजें येत गेलीं आणि त्या लोकांनीं किनाऱ्यालगतचीं कांहीं गांवें काबीज केलीं; त्यांत गोवा हें शहर विशेष उल्लेख करण्यासारखें. पोर्तुगीझांचा हिंदुस्थानांत तसा म्हणण्याजोगा व्याप मात्र केव्हांच वाढला नाहीं. किनारा सोडून आतवर ते कधींच गेले नाहींत; परंतु समुद्रमार्गें येऊन हिंदुस्थानावर स्वारी करणारे हे पहिले यूरपीय लोक होत. त्यांच्यामागून पुष्कळ वर्षांनीं फ्रेंच आणि इंग्रज हे आले. मात्र याप्रमाणें जलमार्ग खुला झाल्यानंतर समुद्राच्या बाजूनें हिंदुस्थान दुर्बल आहे ही गोष्ट समजून आली. दक्षिण हिंदुस्थानांतील प्राचीन मोठीं राज्यें या सुमारास मोडकळीस आलेलीं असून त्यांचें लक्ष समुद्रकिनाऱ्यापेक्षां अंतर्गत संकटांकडेच अधिक गुंतलेलें होतें.

गुजराथच्या सुलतानांनीं मात्र पोर्तुगीझांना समुद्रावरसुद्धां तोंड दिलें. उस्मानी तुर्कांशीं मैत्री करून त्यांनीं एका पोर्तुगीझ काफिल्याचा पराभव केला; परंतु पुढें पोर्तुगीझांचा जय होऊन समुद्रावर त्यांचें वर्चस्व चालू झालें. त्याच वेळीं उत्तरेकडून दिल्लीच्या मोंगल सुलतानांचें भय उत्पन्न झाल्यामुळें गुजराथच्या सुलतानांनीं पोर्तुगीझांशीं तह केला; परंतु पोर्तुगीझांनीं मात्र त्यांना पुढें फसविलें.

चौदाव्या शतकाच्या सुरुवातीला दक्षिण हिंदुस्थानमध्यें दोन मोठीं राज्यें उदयास आलीं. एक गुलबर्गा येथें; त्यालाच बहामनी राज्य म्हणत आणि दुसरें त्याच्या दक्षिणेला विजयानगर येथें. बहामनी राज्य सबंध महाराष्ट्र देश आणि कर्नाटकाचा कांहीं भाग या प्रदेशांवर पसरलेलें होतें. हें राज्य दीडशें वर्षें चाललें; परंतु त्याचा इतिहास अगदींच क्षुद्र आहे. त्यामध्यें धार्मिक अनुदारता, छळ, जुलूम, खून, सुलतान आणि त्याचे सरदार यांची चैनबाजी, आणि यांच्या जोडीला सामान्य जनतेला सोसावें लागणारें अतिशय तीव्र दैन्य हाच सगळा प्रकार

आढळून येतो. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला हें बहामनी राज्य निव्वळ आपल्या ठिकाणच्या नालायकीमुळें कोलमडून पडलें आणि त्यांतून विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडा, बिदर आणि वऱ्हाड अशा पांच छोट्या सुलतानशाह्या निर्माण झाल्या. दरम्यान विजयानगरच्या राज्याला स्थापन होऊन आतां दोनशें वर्षें झालीं होतीं आणि अजूनही तें चांगलें भरभराटींत होतें. या सहा राज्यांमध्यें नेहमींच युद्ध चालू असून साऱ्या दक्षिण प्रांतावर वर्चस्व मिळविण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न चालू होता. त्यांच्यामध्यें नित्य निरनिराळे गट बनत आणि ते मोडून पुन्हां नवे गट होत. केव्हां एका बाजूला एक मुसलमान राज्य, तर विरुद्ध हिंदु राज्य अशी लढाई होई; तर केव्हां मुसलमान व हिंदुराज्य मिळून दुसऱ्या एखाद्या मुसलमान राज्याशीं युद्ध होई. हे सर्व झगडे निव्वळ राजकीय स्वरूपाचेच असत. कोणतेंही एक राष्ट्र विशेष प्रबळ झालेंसें वाटलें, कीं बाकीचीं राज्यें त्याच्याविरुद्ध एकत्र होत. अखेरीस विजयानगरचें वाढतें सामर्थ्य आणि संपन्नता पाहून सर्व मुसलमानराज्यें त्याच्या विरुद्ध एकत्र झालीं आणि त्यांनीं इ. स. १५६५ मध्यें तालिकोटच्या लढाईत विजयानगरच्या राज्याचा पक्का चक्काचूर करून टाकला. अशा रीतीनें अडीचशें वर्षांच्या कारकीर्दीनंतर हें राज्य नष्ट झालें आणि विजयानगर हें अत्यंत मोठें, सुंदर व वैभवशाली शहरही पार नष्ट करून टाकण्यांत आलें.

परंतु लौकरच या विजयी मित्रसंघांत तंटे उत्पन्न होऊन आपापसात युद्धें सुरू झालीं आणि पाठोपाठ दिल्ली येथील मोंगल साम्राज्याची कृष्णछाया त्या सगळ्यांवर पसरली. दुसरें त्यांच्यावरील संकट म्हणजे पोर्तुगीझांचें. त्यांनीं इ. स. १५१० मध्येंच गोंवा बंदर काबीज केलें होतें. हें विजापूरच्या राज्यांतलें बंदर. त्यांना तेथून हांकून लावावें म्हणून अनेक वेळां मोठा प्रयत्न करण्यांत आला; परंतु पोर्तुगीझांनीं गोवें सोडलें नाहीं आणि पूर्वेचा राज्यप्रतिनिधि या पदवीनें विभूषित झालेला त्याचा नायक अल्बुकर्क यानें त्या प्रांतीं किळसवाणीं क्रूरपणाचीं कामें केलीं. पोर्तुगीझ लोकांनीं तेथील जनतेची नुसती कत्तल चालविली आणि तिच्यांतून बायका-मुलांनासुद्धां वगळलें नाहीं. त्या वेळेपासून अगदीं आजपर्यंत पोर्तुगीझांचें ठाणें गोव्यामध्यें आहे.

या दक्षिणेंतील राज्यांमध्यें विशेषतः गोवळकोंडा, विजयानगर व विजापूर येथें सुंदर इमारतींचीं बांधकामें करण्यांत आलीं. गोवळकोंडा शहर आज मोडून-तोडून पडलेलें आहे; विजापूरमध्यें जुन्या इमारतींपैकीं बऱ्याच अजून शिल्लक आहेत. विजयानगर तर पार धुळीसच मिळालें; त्याचें आज कांहींच मागें शिल्लक नाहीं. हैदराबाद शहरही याच सुमारास गोवळकोंड्याजवळ प्रस्थापित झालें. दक्षिणेकडील बांधकाम करणारे आणि कारागीर हेच पुढें उत्तरेकडे गेले आणि ताजमहाल बांधण्यास त्यांची मदत झाली असें म्हणतात.

या भागांत निरनिराळ्या देशांत पुष्कळच धर्मविषयक सहिष्णुता होती; तरी पण

तेथेंही अधूनमधून धार्मिक कडवेपणा आणि अनुदारता यांचा स्फोट झाल्याचें आढळतें. या ठिकाणच्या युद्धांत पुष्कळदां भयंकर कत्तली आणि नासधूस करण्यांत आलेली आढळते. असें असूनही हें मोठें लक्षांत ठेवण्यासारखें आहे, कीं विजापूरच्या मुसलमान राजाच्या पदरीं हिंदु रिसाला होता आणि विजयानगरच्या हिंदु राजाच्या पदरीं कांहीं मुसलमानी सैन्य होतें. या प्रांतीं सुधारणा बरीच उच्च प्रतीची होती असें दिसतें. पण हा सगळा श्रीमंत लोकांचा खेळ असून सामान्य शेतकरी लोकांचा त्या क्षेत्रांत मुळींच शिरकाव नव्हता. जगांतल्या नित्याच्या क्रमाप्रमाणें तो बिचारा गरीबच होता आणि श्रीमंतांच्या विलासांचें ओझें आपल्या माथ्यावर वाहात होता!

## ७७

# विजयानगर

१५ जुलै, १९३२

गेल्या पत्रांत दक्षिण हिंदुस्थानांतील ज्या राज्यांचा आपण विचार केला, त्या सर्वांमध्यें विजयानगरच्या इतिहासाचा काळ सर्वांत अधिक लांबीचा आहे. योगायोग असा आहे, कीं या राज्यामध्यें पुष्कळ परदेशचे प्रवासी येऊन गेले आणि हें राज्य व शहर यांबद्दल त्यांनीं पुष्कळ वृत्तांत लिहून ठेवलेले आहेत. इ. स. १४२० मध्यें नायकोलो काँटी या नावाचा एक इटालियन प्रवासी येऊन गेला. मध्य आशियांतील बडेखानाच्या दरबारांतून आलेला हिरातचा अबदुर रझक हा इ. स. १४४३ मध्यें आला होता; आणि पेज नांवाचा एक पोर्तुगीज गृहस्थ विजयानगर शहरांत इ. स. १५५२ मध्यें आला होता. त्याचप्रमाणें या दक्षिणेंतील राज्यासंबंधीं आणि विशेषतः विजापूर दरबारासंबंधीं ज्यांत पुष्कळ हकीकत आहे, असा एक हिंदुस्थानच्या इतिहासाचा ग्रंथही अस्तित्वांत आहे. आपण ज्या काळचा विचार करतों आहों, त्यानंतर लौकरच अकबराच्या कारकीर्दीत फेरिस्ता यानें हा इतिहास फारशी भाषेंत लिहिलेला आहे. समकालीनांनीं लिहिलेल्या इतिहासांत पुष्कळदां पक्षपात आणि अतिशयोक्ति हे दोष असतात; तथापि त्यांचा मोठा उपयोग होत असतो. काश्मीरच्या राज्याविषयींचा **राजतरंगिणी** हा एक ग्रंथ सोडला, तर मुसलमानांच्या काळाचा असा समकालीनांनीं लिहिलेला इतिहासग्रंथ जवळजवळ एकही उपलब्ध नाहीं. तेव्हां फेरिस्ताचा इतिहासग्रंथ ही एक मोठीच नवीन प्रथा होय. इतरांनीं मग त्याचें अनुकरण केलें.

परकी प्रवाशांनीं विजयानगरचें जें वर्णन केलें आहे, त्यांत आपल्याला पक्षपातरहित बुद्धीनें रेखाटलेलें या नगराचें चित्र आढळतें. वारंवार चालू असलेल्या

घातकी लढायांच्या वर्णनापेक्षां या प्रवाशांच्या वर्णनांतून आपल्याला फार अधिक माहिती मिळते. म्हणून या लोकांनीं काय लिहिलें आहे, हें थोडेसें मी तुला सांगणार आहें.

विजयानगरची प्रस्थापना इसवी सन १३३६ च्या सुमारास झाली. दक्षिण हिंदुस्थानांतील कर्नाटक म्हणून ज्या प्रदेशाला म्हणतात, त्या प्रदेशात हें राज्य होतें. हें हिंदुराज्य असल्यामुळें दक्षिणेंतील मुसलमानराज्यांतून निर्वासित झालेल्या–पळून गेलेल्या लोकांचे पाय सहजच या राज्याकडे वळत. पुष्कळच अशा प्रकारचे लोक त्यामध्यें आले व राज्य झपाट्यानें वाढत जाऊन थोडक्याच वर्षांत सर्व दक्षिणेंत या राज्याचा दरारा बसला आणि त्याच्या राजधानीच्या शहरांतील संपन्नता व सौंदर्य यांमुळें लोकांचे डोळे तिकडे वेधूं लागले. विजयानगरची सत्ता दक्षिणेंत सर्वांहून अधिक प्रभावी झाली.

फेरिस्तानें या शहराच्या संपन्नतेची मोठी थोरवी गायिली आहे आणि बहामनी राज्याचा एक मुसलमान राजा विजयानगरच्या एका राजकन्येशीं विवाह करण्याकरितां म्हणून इ. स. १४०६ मध्यें गेला असतां त्या वेळीं त्या शहराची काय अवस्था होती यांचें वर्णन केलें आहे. तो म्हणतो, कीं सहा मैलपर्यंत रस्त्यावर भरजरी कापड, किंवा मखमल, आणि अशाच प्रकारचें किंमतवान् कापड पसरलेलें होतें. किती भयंकर आणि लाजिरवाणा असा हा पैशाचा अपव्यय!

नायकोलो कॉंटी हा इटालियन १४२० मध्यें आला. त्या वेळीं शहराचा परिघ साठ मैल लांब होता असें तो सांगतो. एवढा हा शहराचा विस्तार असण्याचें कारण त्यामध्यें असंख्य बागा होत्या. कॉंटीचें मत असें होतें, कीं विजयानगरचा राजा–त्यालाच राय असें म्हणण्याचा रिवाज होता–हा त्या काळच्या हिंदुस्थानमध्यें सर्वांत अधिक सामर्थ्यवान् राजा होता.

त्याच्यानंतर मध्य आशियांतून अबदुर रझ्झक हा आला. विजयानगराकडे येत असतां वाटेंत त्याला मंगलोरजवळ शुद्ध गाळीव तांब्याचें केलेलें एक अत्यंत मनोहर व आश्चर्यकारक मंदिर आढळलें. तें पंधरा फूट उंच होतें आणि त्याची तळची जागा ३० फूट रुंद आणि ३० फूट लांब अशी औरस चौरस होती. पुढें बेलूर येथें आणखी एक मंदिर पाहून तर त्याला आणखींच अचंबा वाटला. त्या मंदिराचें वर्णन सुद्धां त्यानें केलेलें नाहीं. कारण तो म्हणतो, मीं जर हें वर्णन केलें तर "मजवर लोक अतिशयोक्तीचा आरोप करतील!" त्यानंतर तो विजयानगर शहरांत पोंचतो आणि तेथें त्याच्या आनंदाची परमावाधि होते. तो म्हणतो, "या सर्व पृथ्वीवर डोळ्यांनीं कुणीं पाहिलें नाहीं किंवा कानानें कधीं ऐकलें नाहीं अशा प्रकारचें हें शहर आहे." तेथल्या विपुल बाजारपेठांचें त्यानें वर्णन केलें आहे. "प्रत्येक बाजारपेठेच्या सुरुवातीला एक अत्यंत उंच अशी कमान असते! आणि तिच्यावर एक भव्य आणि सुंदर सज्जा असतो. परंतु राजाचा प्रासाद या सर्वांच्यापेक्षांही अधिक उंच आहे." या बाजारपेठा भल्या लांब-रुंद आहेत. अत्यंत मधुर सुवासांनीं युक्त अशी

अगदीं ताजीं ताजीं फुलें या शहरांत विकत मिळतात; हीं फुलें म्हणजे अत्यंत आवश्यक अशी जीवनोपयोगी वस्तूच मानली जाते; इतकी कीं त्याशिवाय हे लोक जिवंतच राहूं शकणार नाहींत. एकेका स्वतंत्र धंद्याचीं किंवा कारागिरांचीं दुकानें एकमेकांशेजारीं असतात. जवाहिरे लोक आपल्याजवळचे माणिक-मोतीं, हिरे-पांचू, अगदीं उघड्यावर बाजारामध्यें विकतात." पुढें आणखी अबदुर रझक वर्णन करतो, "जेथें राजवाडा आहे त्या या शहराच्या अत्यंत मधुर विभागांत पुष्कळ लहानमोठे पाण्याचे प्रवाह घडीव, गांठीव आणि मोहरेदार दगडांनीं बांधलेल्या पाटातून झुळुझुळु वाहताना आढळतात. हा देश लोकसंख्येनें इतका गजबजलेला आहे, कीं त्यासंबंधींची कल्पना थोडक्यांत करून देणें अवघड आहे." अशा रीतीनें पंधराव्या शतकाच्या मध्याला मध्य आशियांतून आलेला हा पाहुणा विजयानगरच्या वैभवाचें वर्णन आपल्या वक्तृत्वपूर्ण भाषेंत करण्यांत गुंग होऊन किती तरी लिहितो आहे, आणि त्याला जणुं कंटाळा येतच नाहीं.

कुणाची अशी कल्पना होईल, कीं अबदुर रझकनें मोठमोठीं शहरें फारशीं पाहिलेलीं नसावींत, म्हणून विजयानगर पाहिल्यावर त्याचे डोळे फाटून गेले असावेत. पण त्यानंतरचा जो आपला पाहुणा आला त्यानें चांगला भरपूर प्रवास केलेला होता. हा तो पेज नांवाचा पोर्तुगीज गृहस्थ; इटलीमध्यें ज्ञान व कला यांच्या पुनरुज्जीवनाचा काळ नुकताच सुरू झाला होता आणि इटलींतील शहरांमध्यें सुंदर सुंदर इमारती बांधल्या जात होत्या, अशा सुमारास इ. स. १५२२ मध्यें तो इकडे आला होता. पेजनें इटलींतील शहरें पाहिलेलीं होतीं असें दिसतें. त्यामुळें त्याची साक्ष फारच महत्त्वाची आहे. तो म्हणतो, "विजयानगर हें शहर रोमएवढें मोठें असून दिसायला फार सुंदर आहे." नंतर त्या शहरांतल्या अनेक आश्चर्यकारक गोष्टींचें, विशेषतः त्यामधील असंख्य तलावांचें, पाण्याच्या प्रवाहांचें (कालव्यांचें व पाटांचें) आणि उद्यानांचें मोहकत्व, याचें तो वर्णन करतो. तो म्हणतो, "हें शहर जगामध्यें सर्वांत अधिक सुसंपन्न, हरएक प्रकारच्या वस्तूंनीं भरलेलें असें आहे. कारण या शहराची अवस्था जगांतील इतर शहरांसारखी नाहीं. त्या शहरांत पुष्कळदां पुरेशीं खाद्यपेयें किंवा इतर आवश्यक वस्तू मिळत नाहींत; पण या शहरांत त्यांची रेलचल आहे." त्याला "राजवाड्यांतील एक दालन सर्वच हस्तिदंती आढळलें. जिकडे पहावें तिकडे हस्तिदंत! खालची जमीन, तळापासून वरपर्यंत सर्व भिंती हस्तीदंती; त्याचप्रमाणें खाबांवर आणि वरच्या तुळयांवर गुलाब आणि कमलपुष्पें यांचीं सर्वत्र हस्तीदंती चित्रें कोरलेलीं होतीं; तींही इतकीं कौशल्यपूर्ण कीं याहून अधिक चांगलें काम करतांच येणार नाहीं; असें हें दालन इतकें भव्य, मौल्यवान् आणि सुंदर आहे कीं दुसरीकडे कोठेंच त्याला तोड आढळणार नाहीं."

पेज इकडे आला त्या वेळीं विजयानगरचा जो राजा होता त्याचेंही त्यानें वर्णन केलें आहे. दक्षिण हिंदुस्थानच्या इतिहासांतील हा एक श्रेष्ठ राज्यकर्ता होऊन गेला; योद्धा म्हणून शत्रूंशींही अतिशय औदार्यानें वागणारा म्हणून, वाङ्मयाचा आश्रयदाता

म्हणून, लोकप्रिय आणि दानशूर, उदारबुद्धि राजा म्हणून त्याची कीर्ति आजही दक्षिणेंत टिकून आहे. त्याचें नांव कृष्णदेवराय. इ. स. १५०९ पासून १५२९ पर्यंत वीस वर्षें त्याची कारकीर्द झाली. पेजनें त्याची उंची, शरीरयष्टि यांचें आणि वर्णाचें सुद्धां वर्णन केलें आहे. त्याचा वर्ण गोरा होता असें पेजनें लिहिलें आहे.

जास्तींत जास्त सर्वगुणसंपन्न राजा जसा असूं शकेल, तसा तो आहे. अशा राजाला प्रजा जशी आणि जितपत वचकून असेल तसाच त्याचा वचक आहे. त्याचा स्वभाव मोठा आनंदी आणि अत्यंत विनोदी आहे. परकी लोकांबद्दल त्याला आदर वाटतो; त्यांचें तो चांगल्या रीतीनें स्वागत करतो आणि कोणी कशाही परिस्थितींतील तो परकी मनुष्य असला तरी त्याच्याविषयींची सर्व प्रकारची विचारपूस तो करतो. त्या राजाला असलेल्या अनेक पदव्या देऊन मग पेज म्हणतो, "परंतु त्याच्यासारख्या धीरोदात्त आणि सर्वगुणसंपन्न अशा माणसाला ज्या प्रकारच्या पदव्या असाव्यात, त्या मानानें या साऱ्या पदव्या म्हणजे कांहींच नव्हेत!"

केवढी मोठी स्तुति आहे ही खरोखर! या वेळीं विजयानगरचें साम्राज्य हिंदुस्थानच्या सर्व पूर्व किनाऱ्यावर आणि दक्षिण दिशेला विस्तारलेलें होतें. म्हैसूर, त्रावणकोर आणि आजचा सर्व मद्रास इलाखा एवढा प्रदेश यांत समाविष्ट होता.

आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे तुला. इ. स. १४०० च्या सुमारास विजयानगरमध्यें पाणी आणण्यासाठीं मोठें बंधाऱ्याचें बांधकाम तयार करण्यांत आलें होतें. एक सबंध नदीच्या नदी अडवून मोठाथोरला पाण्याचा सांठा करण्यांत आला. येथून पाटामधून पंधरा मैलापर्यंत लांबीवर शहरांत पाणी आणण्यांत आलें; मध्यें मध्यें तर हे पाट कठिण खडकांतून फोडून तयार करण्यांत आले होते.

असें हें विजयानगर शहर व राज्य होतें. तेथील लोकांना आपल्या संपन्नतेबद्दल व सौंदर्याबद्दल अभिमान होता आणि आपल्या सामर्थ्याबद्दल फाजील विश्वास होता. अशा त्या साम्राज्याचा आणि शहराचा अंत इतका जवळ आलेला आहे अशी कोणालाही कल्पनासुद्धां शिवली नव्हती; परंतु पेजच्या भेटीनंतर अवघ्या त्रेचाळीस वर्षांमध्येंच संकटाचे काळे ढग उभे राहिले. विजयानगरचा मत्सर वाटून बाकीच्या सर्व दक्षिणेंतील राज्यांनीं त्याच्याविरुद्ध संघ निर्माण केला आणि त्याचा नाश करण्याचा निश्चय केला; तरी पण विजयानगरचें राज्य वेड्यासारखें निश्चिंत राहिलें. लौकरच अखेरचा क्षण आला आणि विजयानगरचा अगदीं पुरेपूर नाश झाला.

या राज्यांच्या गटानें इ. स. १५६५ मध्यें विजयानगरचा पराभव केला, हें मागें मीं तुला सांगितलेंच. या वेळीं अत्यंत भयंकर कत्तल झाली आणि मागोमाग शहराची लूटही झाली. सगळ्या सुंदर इमारती, मंदिरें, राजवाडे, सर्व कांहीं पार मोडून तोडून नष्ट करून टाकण्यांत आलें. सर्व अत्यंत सुंदर कोरकाम आणि शिल्पकलेचीं ठिकाणें पार चुराडा करून टाकण्यांत आलीं आणि मोठमोठ्या होळ्या पेटवून जाळण्यासारखें होतें तें सर्व त्यांत जाळून टाकण्यांत आलें. असा हा नाश इतके दिवस चालू होता,

कीं अखेरीस शहराच्या जागीं नुसत्या मोडतोडीच्या राशी मात्र उभ्या राहिल्या. एक इंग्रज इतिहासकार लिहितो, "आदल्या दिवशीं हें शहर सुसंपन्न आणि उद्योग-धंद्यांत गुंतलेल्या व भरभराटीच्या काळांतील सुबत्तेनें युक्त अशा प्रजेनें गजबजलेलें होतें आणि त्याचा दुसऱ्याच दिवशीं शत्रूंनीं कबजा केला, लूटमार केली आणि शब्दांनीं वर्णन करण्यास अशक्य अशा अत्यंत क्रूर कत्तली आणि अनन्वित कृत्यें करून त्याची मोडतोड व धूळधाण केली. सर्व जगाच्या इतिहासांत बहुधा कोठेंही आणि कधींही अशा वैभवशाली शहराची इतकी मोठी धूळधाण आणि तीही इतक्या अल्प अवकाशांत केली गेलेली आढळणार नाहीं."

७८

# मज्झपहित आणि मलाक्का यांचीं मॅलेशियांतील साम्राज्यें

१७ जुलै, १९३२

मॅलेशिया आणि पूर्वेकडील बेटें यांच्याकडे थोडेंसें आपलें दुर्लक्षच झालें आहे. अलीकडे किती तरी दिवसांत त्यांच्याबद्दल मीं तुला लिहिलें नाहीं. मागें लिहिलेलें चाळून पाहिलें तों या प्रदेशासंबंधीं अगदीं शेवटचें मीं तुला लिहिलें तें ४६ व्या पत्रांत, असें आढळून आलें. त्यानंतर एकतीस पत्रें होऊन आज आपण ७८ व्या पत्राशीं आलों आहों. सगळ्याच देशांचें सारखें सूत्र सांभाळणें खरोखरच कठिण आहे.

दोन महिन्यांपूर्वीं आजच्या तारखेला मीं तुला जें काय लिहिलें होतें, तें ध्यानांत आहे का तुझ्या? कँबोडिया (काम्बोज), अङ्कोर, सुमात्रा आणि श्रीविजय यांच्या-बद्दल? इंडोचायनामधील त्या अनेक वसाहती वाढत जाऊन पुष्कळ शतकांनंतर त्यांचें एक साम्राज्य – कँबोडियाचें साम्राज्य – कसें झालें आणि मग निसर्गाची अवकृपा होऊन एकाएकीं व अगदींच कटु तऱ्हेनें ती नगरी व तें साम्राज्य यांचा अंत झाला. इ. स. १३०० च्या सुमारास ही गोष्ट घडली. आठवतें तुला हें सगळें?

काम्बोजच्या साम्राज्याच्या अगदीं समकालीन म्हणजे त्याच वेळीं अस्तित्वांत असलेलें असें आणखी एक साम्राज्य समुद्रापलीकडे सुमात्राच्या बेटांत होतें; परंतु श्रीविजयाच्या या साम्राज्यशाही अमलाला सुरुवात कांबोजपेक्षां जरा उशीरानें झाली; पण काम्बोजच्या साम्राज्याच्यानंतरही तें अस्तित्वांत राहिलें. त्याचाही अंत असाच अगदीं एकाएकीं झाला; पण तो घडून आला माणसाच्या हातून; निसर्गाच्या नव्हे. या बुद्धधर्मीय श्रीविजयाच्या साम्राज्याचा अम्मल तीनशें वर्षें चालू होता; पूर्वेकडील सर्व बेटांवर त्याचें अधिराज्य होतें; एवढेंच नव्हे, तर कांहीं काळ त्यानें हिंदुस्थान,

सीलोन आणि चीन यांमध्येंही पाय रोवला होता. पण हें मुख्यतः व्यापारी लोकांचें साम्राज्य होतें. व्यापार करणें हेंच त्या साम्राज्याचें मुख्य काम होतें; परंतु याच सुमारास जावा बेटाच्या पूर्व भागांत आणखी एक व्यापाऱ्यांचेंच राज्य उदयास आलें. हें हिंदु राज्य असून त्यानें श्रीविजयाच्या साम्राज्यापुढें मान वांकविण्याचें नाकारलें.

नवव्या शतकाच्या सुरुवातीपासून चारशें वर्षेपर्यंत पूर्व जावामधील या राज्यावर श्रीविजयाच्या वाढत्या सत्तेच्या दडपणाची एकसारखी छाया पडून राहिलेली होती; परंतु तशांतही आपलें स्वातंत्र्य राखण्यांत त्या राज्याला यश आलें; एवढेंच नव्हे, तर याच काळजीच्या काळांतसुद्धां अचंबा वाटावा इतकी प्रचंड संख्या सुंदर दगडी मंदिरांची तेथें निर्माण झाली. त्यांपैकीं सर्वांत मोठीं बोरोबोदूरची मंदिरें म्हणून प्रख्यात असलेलीं मंदिरें आजही तेथें पाहायला सांपडतात आणि पुष्कळच प्रवासी दर्शनार्थ तेथें जात असतात. श्रीविजयाच्या अधिराज्याच्या संकटांतून तर जावाचें राज्य बचावलेंच; पण पुढें तें स्वतःच आजूबाजूला चढाई करूं लागलें आणि लौकरच त्याचें प्रतिस्पर्धी जें श्रीविजयाचें साम्राज्य त्यालाच या जावाच्या राज्याचें संकट वाटूं लागलें. दोन्ही राज्यें व्यापारी. दोघांचाही समुद्रावरून लांबलांबच्या देशांशीं व्यापार चाले. त्यामुळें दोघांमध्यें झगडे होण्याचे प्रसंग वारंवार निर्माण होत.

जावा आणि सुमात्रा यांच्यामधील या स्पर्धेची आधुनिक जगांतील मोठ्या सत्ताधीश राष्ट्रांमधील स्पर्धेशीं, उदाहरणार्थ, इंग्लंड व जर्मनी यांच्यामधील स्पर्धेशीं तुलना करण्याचा या ठिकाणीं मला मोह होतो.

श्रीविजयाच्या वाढीला किंवा सत्तेला पायबंद घालावयाचा असेल व आपल्या स्वतःचा व्यापार-उदीम वाढवावयाचा असेल, तर आपलें आरमारी सामर्थ्य वाढविणें एवढाच एक त्याला उपाय आहे, अशा समजुतीनें जावानें आपलें दर्यावर्दी सामर्थ्य अफाट वाढविलें. मोठमोठाल्या आरमारी स्वाऱ्याही करण्याचे पुष्कळ प्रयत्न केले जावानें; परंतु कित्येक वर्षेपर्यंत शत्रूशीं त्याला नीटसें भिडण्यासही सांपडलें नाहीं. अशा रीतीनें जावाचें सामर्थ्य वाढत गेलें आणि तें जास्त जास्त चढाईखोर होत गेलें. तेराव्या शतकाच्या अखेरीस त्या राज्यांत एक मोठें शहर स्थापन करण्यांत आलें. त्याचें नांव मज्झपाहित. वाढत्या जावाच्या राज्याची ही राजधानी झाली.

जावाचें हें राज्य इतकें घमेंडखोर आणि उद्दाम बनलें, कीं कुब्लाईखानानें त्याच्याकडे खंडणीकरितां म्हणून पाठविलेल्या वकिलांचा त्यानें प्रत्यक्ष अपमान केला. खंडणी देण्याचें तर दूरच राहिलें; परंतु एका वकिलाच्या कपाळावर अपमानास्पद अशा प्रकारचा निरोप गोंदवून घेऊन त्याला त्यांनीं परत पाठविलें! मोंगलांच्या बडे खांशीं हा जो त्यांनीं खेळ केला तो अगदींच मूर्खपणाचा आणि धोक्याचा होता. मध्य आशियांतील लोकांनीं अशीच प्रकारें वकिलांचा अपमान केला व त्यामुळें चेंगीजखानानें त्यांचा नाश केला. याच कारणासाठीं पुढच्या काळांत हुलगूखानानें बगदादचा नाश केला. असें असूनही एवढ्याशा या जावाच्या राज्यानें वकिलाचा

असा अपमान करण्याचें साहस केलें. त्याचें मोठें सुदैव कीं या सुमारास मंगोलियन राजांची रानटी वृत्ति पुष्कळशी सुधारलेली होती आणि नवीन प्रदेश जिंकण्याची इच्छा त्यांना राहिलेली नव्हती. शिवाय, समुद्रावरील लढाईही त्यांना विशेषशी प्रिय नव्हती. जमिनीवरच त्यांचें सामर्थ्य अधिक प्रत्ययाला येत असे. तरीपण कुब्लाईखानानें जावाच्या या अपराधी राजाला शिक्षा करण्यासाठीं म्हणून स्वारी पाठविलीच. त्याच्या चिनी सैन्यानें जावाच्या सैन्याचा पराभव केला आणि राजाचा वध केला. परंतु जावामध्यें इतर कांहीं म्हणण्यासारखी नासधूस त्यांनीं केली नाहीं. चीनच्या वातावरणाच्या परिणामानें मंगोलियन लोकांमध्यें केवढा हा बदल झाला होता म्हणावयाचा!

परंतु मौज पहा, कीं या चिनी स्वारीमुळें अखेरीस जावाचें राज्य किंवा आतां त्याला आपण मज्झपहित-साम्राज्य म्हणूं या – उलटें अधिकच बलिष्ठ झाल्याचें दिसून येतें. याचें कारण असें कीं या चिनी लोकांच्यापासून मज्झपहितमध्यें – जावामध्यें – दारूगोळ्याच्या हत्यारांचा प्रवेश झाला आणि त्यानंतरच्या काळांत या हत्यारांच्या जोरावरच मज्झपहिताचा विजय झाला.

नंतर मज्झपहित-साम्राज्याची पुष्कळ वाढ झाली. ही वाढ उगीच आपली हवी तशी नाहीं झाली. तर जावाच्या राज्यानें अगदीं योजनापूर्वक ही साम्राज्याची वाढ कशी करावयाची हें ठरविलें व त्याबरहुकूम त्याच्या कर्तबगार सैन्यानें व आरमारानें हें काम पुरें केलें. ही वाढ चालू होती त्या सुमारास कांहीं काळ राणी सुहिता नांवाची स्त्री या साम्राज्याची स्वामिनी होती. तेथील राज्यकारभार संपूर्णपणें एका मध्यवर्ती सत्तेच्या हातीं अत्यंत सुसूत्र आणि व्यवस्थित असा होता असें आढळून येतें. पाश्चात्य इतिहासकारांनीं लिहिलेलें आहे, कीं जकाती, आयात–निर्यातीवरील कर आणि अंतर्गत उत्पन्नावरील व जमिनीवरील वगैरे कर यासंबंधींची येथील करपद्धति अत्युत्कृष्ट होती. राज्यकारभाराचीं स्वतंत्र खातीं असत. त्यांत वसाहतींचें खातें, व्यापाराचें खातें, सार्वजनिक स्वास्थ्य आणि आरोग्य यांचें खातें, अंतर्गत सुव्यवस्थेचें खातें, लष्करी खातें अशीं खातीं असत. तेथें एक वरिष्ठ न्यायासन असे. त्यांत दोन अध्यक्ष आणि सात बाकीचे न्यायाधीश असे नऊ न्याय देणारे असत. ब्राह्मण उपाध्यायवर्गाच्या हातीं बरीच सत्ता असावी असें दिसतें; परंतु त्यांच्यावरही राजाचा अधिकार चालावयाचा अशी योजना होती.

ही खातेविभागणी आणि त्या खात्यांपैकीं कांहींचीं तर नांवेंसुद्धां पाहिलीं म्हणजे त्यावरून आपल्याला थोडीशी 'अर्थशास्त्र' या ग्रंथाची आठवण होते. परंतु वसाहतींचें खातें हें मात्र त्यांतलें नव्हे; तें जावामध्यें अगदीं नवीन होतें. अंतर्गत व्यवस्थेच्या खात्याकडे घरच्या म्हणजे मायदेशाच्या कारभाराची व्यवस्था असे. हें खातें ज्या प्रधानाच्या हातीं असे त्याला मंत्री हें नांव होतें. त्यावरून स्पष्ट दिसतें कीं दक्षिण हिंदुस्थानांतून तेथें जाऊन पल्लवांनीं येथें प्रथम वसाहत केली, तेव्हांपासून

बाराशें वर्षेपर्यंत भारतीय परंपरा आणि संस्कृति ह्या या बेटात चालू राहिल्या होत्या. अर्थात् मूळ भारताशीं संबंध राहिले असले पाहिजेत म्हणूनच अशी ही परंपरा चालू राहणें शक्य झालें. आणि व्यापाराच्या निमित्तानें असे हे संबंध राहत आले होते यांत कांहींच संशय नाहीं.

मज्झपाहिताचें साम्राज्य हें व्यापारी साम्राज्य असल्यामुळें तेथें निर्यात आणि आयात व्यापारांची म्हणजे त्या देशांतून बाहेर जाणाऱ्या मालाच्या व्यापाराची आणि बाहेरच्या देशांतून त्या देशांत येणाऱ्या मालाच्या व्यापाराची स्वाभाविकच चांगली सुसंघटित व्यवस्था केली होती. हा सर्व व्यापार मुख्यतः हिंदुस्थान, चीन आणि वसाहती यांच्याशीं चालत असे. जोंपर्यंत श्रीविजयाच्या साम्राज्याशीं युद्धाचा काळ चालू होता, तोंपर्यंत खुद्द त्या राज्याशीं किंवा त्याच्या वसाहतींशीं व्यापारधंदा होणें शक्यच नव्हतें.

जावाचें हें राज्य एकंदर पुष्कळ शतकें चाललें; परंतु मज्झपाहिताचा अगदीं खरा वैभवाचा श्रेष्ठ काळ म्हणजे इ. स. १३२५ पासून १३८० पर्यंतचा – फक्त अवघा पंचेचाळीस वर्षांचा – काळच म्हटला पाहिजे. याच काळांत इ. स. १३७७ मध्यें श्रीविजयाचा संपूर्ण पाडाव करण्यांत येऊन नाश करण्यांत आला. अनाम (वैतनाम), सयाम आणि काम्बोज येथील राज्यांशीं या काळांत जावाचे मैत्रीचे तह होते.

मज्झपहित हें राजधानीचें शहर मोठें सुंदर आणि भरभराटलेलें शहर होतें; त्याच्या मध्यभागीं एक मोठें शिवमंदिर होतें. शहरांत पुष्कळ भव्य व मोहक इमारती होत्या. त्याशिवाय पुष्कळ आणखी मोठीं शहरें आणि बंदरें जावाच्या राज्यामध्यें होतीं.

आपलें प्राचीन शत्रुराज्य जें श्रीविजयाचें साम्राज्य, त्याच्या नाशानंतर हेंही साम्राज्यशाही राज्य फार काळ जिवंत राहिलें नाहीं. त्याच्यामध्यें अंतर्गत यादवी सुरू झाली आणि चीनशींही कांहीं कटकट सुरू झाली; त्यामुळें चीनचें एक प्रचंड आरमार जावाकडे चालून आलें. वसाहतीही हळूहळू फुटून निघाल्या. इ. स. १४२६ मध्यें राज्यांत फारच मोठा दुष्काळ पडला आणि त्यानंतर दोन वर्षांनीं मज्झपहिताचें बाहेरचें साम्राज्य नष्ट झालें. आणखी पन्नास वर्षें एक स्वतंत्र राज्य म्हणून त्यानें कशींबशीं काढलीं; परंतु अखेरीस मलाक्का येथील मुसलमानी राज्यानें त्याचा पाडाव केला.

मॅलेशियामधील हिंदी लोकांच्या वसाहतीमधून निर्माण झालेलें हें तिसरें साम्राज्य अशा रीतीनें नष्ट झालें. आपलीं हीं पत्रें किती छोटीं आणि त्यांत केवढाल्या मोठ्या कालखंडांबद्दल आपण चर्चा करतों! हिंदुस्थानांतून या ठिकाणीं अगदीं प्रथम वसाहत करण्यासाठीं जे लोक आले, ते जवळजवळ ख्रिस्ती सनाच्या सुरुवातीला. आणि या पत्रांत आपण पंधराव्या शतकांत आलों आहों. म्हणजे या वसाहतींच्या १४०० वर्षांच्या इतिहासाचें निरीक्षण आपण करीत आलों. काम्बोज, श्रीविजय आणि मज्झपहित या तीन स्वतंत्र साम्राज्यांचा आपण विचार केला. त्यांपैकीं प्रत्येक

साम्राज्य कित्येक शतकें अम्मल चालवीत होतें. त्यांच्या त्या अमलांचा काळ किती लांब लांब होता हें नीट लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण त्यावरून हीं राज्यें किती सुदृढ आणि सुव्यवस्थित असलीं पाहिजेत याची कल्पना येते. सुंदर बांधकामें हा या राज्यांच करमणुकीचा मोठा विषय होता आणि व्यापार हा त्यांचा प्रमुख उद्योग होता. भारतीय संस्कृतीची परंपरा त्यांनीं पुढें चालू ठेवली होती आणि चिनी संस्कृतीपैकीं कांहीं गोष्टींचा त्या परंपरेशीं मोठा गोड मिलाफ केला होता.

मीं ज्या तीन विशेष मोठ्या राज्यांचा उल्लेख केला त्याशिवाय आणखीही पुष्कळ भारतीय वसाहती या भागांत होत्या हें तुला लक्षांत ठेवलें पाहिजे; पण त्या प्रत्येक वसाहतीचा स्वतंत्रपणें विचार आपणांस करतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें ब्रह्मदेश आणि सयाम या शेजारच्या दोन देशांबद्दलही फारसा विचार मला करतां येण्यासारखा नाहीं. याही दोन देशांत मोठीं बलिष्ठ राज्यें उदयास आलीं होतीं आणि तेथेंही कलांचा चांगला उत्कर्ष झाला होता. त्या दोन्ही राज्यांत बुद्धधर्माचा प्रसार झाला होता. ब्रह्मदेशावर मंगोलियन लोकांची एकदां स्वारी झाली होती; परंतु सयामवर मात्र चिनी लोकांची केव्हांच स्वारी झाली नाहीं. मात्र ब्रह्मदेश आणि सयाम, दोघांकडूनही चीनला पुष्कळदां खंडणी देण्यांत येत असे. अर्थात् ही खंडणी म्हणजे धाकट्या भावानें मोठ्या भावाला आदरभावानें कांहीं तरी द्यावें अशा प्रकारची दिलेली भेट असे. या भेटीला परतभेट म्हणून चीनकडूनही धाकट्या भावाला चांगल्या भरदार देणग्या येत.

ब्रह्मदेशावर मंगोलियन लोकांची स्वारी होण्यापूर्वी त्या देशाची राजधानी उत्तर ब्रह्मदेशांत पगन या शहरांत होती. येथें सुमारें दोनशें वर्षें राजधानी असून हें शहर मोठें सुंदर शहर होतें व त्याच्या तोडीला तोड देणारें असें अङ्कोरशिवाय दुसरें शहर नव्हतें असें म्हणतात. तेथील सर्वांत सुंदर बांधकाम म्हणजे आनंदमंदिर. बुद्धांच्या शिल्प व स्थापत्य-कलेचा साऱ्या जगांतील हा एक अत्यंत मोहक नमुना आहे. याशिवाय तेथें आणखी पुष्कळ भव्य इमारती होत्या. पगन शहराचे आजचे मोडके अवशेष देखुद्धां खरोखर किती सुंदर आहेत. पगन शहराचा भरभराटीचा काळ अकराव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत होता. त्यानंतर कांहीं काळ ब्रह्मदेशामध्यें थोडीशी अंदाधुंदी आणि गडबड माजली, आणि उत्तर ब्रह्मदेश आणि दक्षिण ब्रह्मदेश एकमेकांपासून वेगळे झाले. सोळाव्या शतकांत दक्षिण ब्रह्मदेशांत एक मोठा राजा उदयास येऊन त्यानें सर्व ब्रह्मदेश पुन्हां एक केला. त्याची राजधानी त्यानें दक्षिणेंत पेगु येथें केली.

एकदम मध्येंच मी ब्रह्मदेश आणि सयाम यांचा त्रोटक उल्लेख घुसडून देतों आहें त्यामुळें तूं गोंधळून गेली नाहींस म्हणजे मिळविली! मॅलेशिया आणि इंडोनेशिया (म्हणजे आशियांतील भारतीय वसाहती) यांच्या इतिहासांतील एका विभागाच्या अखेरीपर्यंत आपण येऊन पोंचलों होतों आणि त्या विभागाचें निरीक्षण मला अपुरें ठेवावयाचें नव्हतें. आतांपर्यंत या प्रदेशावर जे सर्व राजकीय किंवा सांस्कृतिक ठसे उमटत आले, त्यांचें मूळ हिंदुस्थान किंवा चीन यांच्यामध्यें होतें. मीं तुला

सांगितलेंच आहे, कीं आशिया खंडाला सलग चिकटून असलेले जे प्रदेश म्हणजे ब्रह्मदेश, सयाम, इंडोचायना यांच्यावर चीनचा अधिक प्रभाव पडलेला होता; तर खालचीं बेटें आणि मलायाचें द्वीपकल्प यांच्यावर हिंदुस्थानचा अधिक प्रभाव पडलेला होता.

यानंतर आतां या देशांवर नवीनच एक छाप पडण्याचा काळ उदयाला आला. ही छाप पाडण्याचें कार्य आरबी लोकांनीं केलें. ब्रह्मदेश व सयाम यांच्यावर ही छाप मुळींच पडूं शकली नाहीं. परंतु मलायाचें द्वीपकल्प आणि त्या खालचीं बेटें मात्र तिला बळी पडलीं आणि लौकरच तेथें मुसलमानांचें राज्य निर्माण होऊन वाढीस लागलें.

आरबी व्यापारी या बेटापर्यंत आज एक हजार वर्षांपासून प्रवास करीत होते आणि तेथें येऊन राहिलेही होते; परंतु त्यांचें सर्व लक्ष व्यापाराकडे असून या राज्यांच्या कारभाराच्या भानगडींत ते कधीं पडत नसत. चौदाव्या शतकांत अरबस्तानांतून तिकडे कांहीं आरबी धर्मप्रचारक आले आणि तेथें धर्मांतर करविण्यांत त्यांना थोडें-फार यशही आलें; विशेषतः तेथील कांहीं राज्यकर्त्यांकडून त्यांनीं धर्मांतर करविलें.

दरम्यान या प्रदेशांत कांहीं राजकीय फेरफार घडून येत होते. मज्झपहिताचा विस्तार वाढत होता आणि तें श्रीविजयाच्या राज्याचा कोंडमारा करीत होतें. श्रीविजयाचा जेव्हां पाडाव झाला तेव्हां पुष्कळच लोक तें राज्य सोडून मलाया द्वीपकल्पाच्या दक्षिणेस पळून गेले आणि तेथें मलाक्का नांवाचें शहर त्यांनीं वसविलें. हें शहर आणि मलाक्काचें राज्य दोन्ही झपाट्यानें वाढलीं आणि इ. स. १४०० च्या सुमारास मलाक्का हें फार मोठें शहर बनलें. मज्झपहिताच्या साम्राज्यामधील जावाचे लोक त्या साम्राज्याच्या परतंत्र प्रदेशांतील लोकांना अप्रिय झाले होते. कारण सर्व साम्राज्यशाही राज्यकर्त्या वर्गाप्रमाणें हेही लोक जुलमी झाले होते आणि त्यामुळें पुष्कळ लोक मज्झपहिताच्या राज्यांत राहण्यापेक्षां मलाक्काच्या राज्यांत जाऊन राहणें हेंच अधिक पसंत करूं लागले. सयाम हा देशही या सुमारास थोडेसें आजूबाजूला आक्रमण करूं लागला होता. त्यामुळें देशत्याग करून जाणाऱ्या पुष्कळशा लोकांना मलाक्काचें राज्य हें मोठेंच आश्रयस्थान होऊन राहिलें. त्यामध्यें बुद्धधर्मीय लोक असत आणि मुसलमानधर्माचे लोकही असत. मलाक्काचे राजे प्रथम बुद्धधर्मीय होते; परंतु पुढें त्यांनीं इस्लामधर्माचा स्वीकार केला.

मलाक्काच्या या नव्या राज्याच्या एका बाजूला जावाच्या राज्याचें संकट आणि दुसऱ्या बाजूला सयामच्या राज्याचें संकट, अशीं दोन संकटें खडीं होतीं. त्यामुळें खालच्या बेटांमध्यें जीं पुष्कळ लहान लहान मुसलमान राज्यें होतीं, त्यांपैकीं कांहींशीं सख्य जोडण्याचा मलाक्कानें प्रयत्न केला. चीनकडेही त्यानें मदतीकरितां विनंति केली. या सुमारास चीनमध्यें मंगोलियन लोकांची हुकालपट्टी होऊन मिंग घराण्याचा अम्मल चालू होता. मॅलेशियांतील एकूण एक मुसलमानी राज्यें मदतीसाठीं चीनकडे याचना एकाच वेळीं करूं लागलीं होतीं, ही गोष्ट या ठिकाणीं मोठी लक्षांत भरण्या-सारखी आहे. याचा अर्थ, त्या वेळीं त्यांना आपल्या बलिष्ठ अशा शत्रूंचें संकट अगदींच जवळ येऊन खेटलें असलें पाहिजे असा आहे.

मॅलेशियांतील सर्वच राज्यांशीं चीनचें धोरण नेहमीं सख्यत्वाचें असे; परंतु उगीच त्यांच्या खासगी भानगडींत स्वतः पडून धडपड करावयाची नाहीं असेंही धोरण चीन पाळीत असे. चीनला नवीन देश जिंकण्याची हाव नव्हती. त्या देशांपासून शिकण्यासारखें आपल्याला काहीं नाहीं हें चीनला माहीत होतें; तथापि, स्वतःच्या संस्कृतीची शिकवण त्या देशांना देण्याची चीनची तयारी होती. परंतु आजपर्यंतच्या या धोरणांत आतां बदल करण्याचें मिंग बादशहानें ठरविलें आणि या देशांच्या कारभाराकडे तो अधिक लक्ष पुरवूं लागला असें दिसतें. जावा आणि सयामच्या राज्यांकडून जें इतरांवर आक्रमण चाललें होतें, तें त्याला पसंत नव्हतें असें दिसतें. तेव्हां तें आक्रमण थांबविण्यासाठीं आणि चीनच्या प्रभावाची बाकीच्या देशांना ओळख पटवून देण्यासाठीं म्हणून त्यानें दर्यासारंग चेंग हो याच्या हाताखालीं एक प्रचंड आरमार तिकडे पाठविलें. या आरमारापैकीं कांहीं जहाजें ४०० फूट लांबीचीं होतीं.

चेंग होनें या बाजूला पुष्कळ फेऱ्या केल्या आणि फिलिपाइन्स, जावा, सुमात्रा, मलाया द्वीपकल्प वगैरे बहुतेक सर्व बेटांवर तो जाऊन आला. सीलोनपर्यंतसुद्धां तो आला होता व तें बेट जिंकून तेथील राजाला त्यानें आपल्याबरोबर चीनला नेलें होतें. आपल्या शेवटच्या स्वारींत तो थेट इराणच्या आखातापर्यंत जाऊन पोंचला होता. पंधराव्या शतकाच्या अगदीं सुरुवातीच्या काळांत चेंग हो हा जलपर्यटन करून ज्या ज्या देशांत गेला, तेथें तेथें त्याची फार मोठी छाप पडली. त्याला मज्झपहिताचें हिंदु राज्य आणि सयामचें बुद्धधर्मीय राज्य या दोहोंनाही पायबंद घालावयाचा होता. त्यासाठीं त्यानें जाणूनबुजून इस्लामधर्माला प्रोत्साहन दिलें आणि त्याच्या प्रचंड आरमाराच्या आश्रयानें मलाक्काच्या राज्याचें आसन चांगलें बळकट झालें. चेंग होचा सगळा उद्देश अर्थातच पूर्ण राजकीय स्वरूपाचा होता; धर्माचा त्यांत कांहीं संबंध नव्हता. तो स्वतः पाहिलें तर बुद्धधर्मीच होता.

अशा रीतीनें मज्झपहिताच्या विरोधकांत मलाक्काला अग्रस्थान प्राप्त झालें. त्याचें सामर्थ्य वाढलें आणि हळूहळू जावाच्या वसाहती त्यानें जिंकून घेतल्या. इ. स. १४७८ मध्यें मज्झपहित शहराचाही पाडाव करण्यांत आला. या सुमारास इस्लाम हा मलाक्कांतील दरबारचा आणि शहरांचा धर्म झाला होता. परंतु खेडेगांवच्या जीवनांत मात्र, हिंदुस्थानांतल्याप्रमाणेंच येथेंही प्राचीन धर्म, प्राचीन लोकभ्रम आणि प्राचीन परंपराच चालू राहिलेली होती.

मज्झपहित किंवा श्रीविजय यांच्या साम्राज्याप्रमाणें मलाक्काचें राज्यही अत्यंत श्रेष्ठ होऊन दीर्घकाळ टिकावयासारखें होतें; परंतु त्याला तसा अनुकूल काळ लाभला नाहीं. पोर्तुगीझ लोक त्याच्या मार्गांत आडवे आले आणि अगदीं थोड्याच वर्षांत इ. स. १५११ मध्यें मलाक्का त्यांच्या हातीं गेलें. अशा रीतीनें त्या प्रदेशांतील हें चवथें साम्राज्य नाहींसें होऊन त्याच्या ठिकाणीं हें नवें पांचवें साम्राज्य आलें. पण तेंही फार

काळपर्यंत टिकावयाचें नव्हतें. तथापि, या पांचव्या साम्राज्याच्या रूपानें आजपर्यंतच्या साऱ्या इतिहासांत पूर्व समुद्रांत यूरपचें अगदीं पहिल्या प्रथम आक्रमण होऊन त्याचें तेथें प्रभुत्व निर्माण झालें.

## ७९

# यूरप खंड पूर्व आशियांत आपली तुंबडी भरूं लागतें

१९ जुलै, १९३२

गेल्या पत्रांत आपण पोर्तुगीज लोक मॅलेशियात आले येथपर्यंत येऊन थांबलों. त्यापूर्वी नुकतेंच जलमार्गाचें संशोधन कसें झालें आणि पोर्तुगीज व स्पॅनिश लोकांच्यामध्य पूर्वेकडे प्रथम कोण पोंचतो अशाबद्दल स्पर्धा कशी सुरू झाली हें मीं तुला सांगितलेलें आठवत असेलच. पोर्तुगालचे लोक पूर्व दिशेला गेले; स्पेनचे लोक पश्चिम दिशेला गेले; पोर्तुगीज लोक आफ्रिकेला वळसा घालून हिंदुस्थानांत येऊन पोंचले; स्पॅनिश लोक चुकून अमेरिकेला जाऊन धडकले आणि दक्षिण अमेरिकेला वळसा घालून मॅलेशियामध्यें आले. हे सर्व धागे तसेच टाकून दिले होते आपण. त्यांपैकीं कांहीं धागे पुन्हां पकडून यापुढचा मॅलेशियाचा इतिहास आपणांला पाहतां येईल.

मसाल्याचे पदार्थ ( मिरीं वगैरे ) उष्ण हवेच्या ठिकाणीं म्हणजे विषुववृत्ताच्या आसपासच्या देशांत निर्माण होतात हें बहुतेक तुला ठाऊक असेल. यूरपमध्यें हे पदार्थ मुळींच निर्माण होत नाहींत. दक्षिण हिंदुस्थानांत व सीलोनमध्यें हे पदार्थ थोडेसे होतात. पण बहुतेक सर्व मसाल्याचे पदार्थ मॅलेशियातील बेटांमधून, मलाक्कामधून येतात. या बेटांना त्यामुळें नांवसुद्धां मसाल्याचीं बेटें असें पडलेलें आहे. अगदीं प्राचीन कालापासून या पदार्थांना यूरप खंडांतून फार मोठी मागणी असे व ते इकडून पाठविले जात असत. यूरपमध्यें गेल्यावर त्यांना फार मोठी किंमत येत असे. रोमन राज्याच्या काळीं मिऱ्यांचा भाव सोन्याच्या भारंभार असे. मसाल्याच्या पदार्थांना इतकें मोल येत असे आणि त्यांना मागणी जरी इतकी होती, तरी यूरप खंडांतील लोकांनीं आपण स्वतः येऊन ते घेऊन जाण्याचा कधीं प्रयत्न केला नाहीं. किती तरी काळपर्यंत मसाल्याच्या पदार्थांचा हा व्यापार व वाहतूक हिंदी लोकांच्या हातीं होती; पुढें ती आरबी लोकांच्या हातीं गेली. पोर्तुगीज आणि स्पॅनिश लोक शेवटीं एकदांचा मॅलेशियाचा शोध लागेपर्यंत जे एकसारखे साऱ्या जगभर समुद्रावर पुनः पुनः प्रवास करीत राहिले आणि तो नाद म्हणून त्यांनीं सोडला नाहीं, त्या सगळ्याचें कारण त्यांना या मसाल्याच्या पदार्थांच्या लोभानें घेरलेलें होतें. पूर्वेच्या शोधार्थ हिंडतां हिंडतां स्पॅनिश लोकांचा हात अमेरिकेंत गुंतला आणि तेथें त्याना अगणित फायदा

पण होऊं लागला; त्याच वेळीं इकडे हा मसाल्यांच्या बेटांचा शोध लावण्याच्या कामीं पोर्तुगीजांना सर्वांआधीं यश मिळालें.

केप ऑफ गुड होपला वळसा घालून वास्को-डि-गामा हिंदुस्थानांत पोंचल्यानंतर त्याच मार्गानें आणखी पुष्कळ पोर्तुगीज जहाजें येऊं लागलीं आणि तेथून आणखी पूर्वेकडे जाऊं लागलीं. अगदीं याच वेळीं मलाक्काच्या नवीनच उदयास आलेल्या साम्राज्याच्या हातीं त्या मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापाराचीं आणि इतरही व्यापाराचीं सूत्रें आलेलीं होतीं. त्यामुळें या बाजूला जातांच पोर्तुगीजांचा या साम्राज्यांशीं आणि सामान्यतः सर्वच आरबी व्यापाऱ्यांशीं झगडा सुरू झाला. पोर्तुगीजांचा व्हाइसरॉय अल्बुकर्क यानें इ. स. १५११ मध्यें मलाक्काचा पाडाव केला आणि मुसलमानांचा व्यापार नष्ट करून टाकला. यूरपशीं येथून होणाऱ्या सगळ्या व्यापाराचीं सूत्रें आतां पोर्तुगीजांच्या हातीं आलीं आणि त्यांची यूरपांतील राजधानी लिस्बन शहर हें मसाल्याचे पदार्थ आणि पूर्वेकडून जाणारे इतर पदार्थ यांची सर्व यूरप खंडभर पोहोंच करणारें मोठें व्यापारी केंद्र झालें.

अल्बुकर्क हा आरब लोकांशीं अत्यंत शत्रुत्वानें, क्रूरपणानें आणि निर्दयपणानें वागला हें जरी खरें असलें, तरी पूर्वेकडील इतर व्यापारी समाजांशीं मात्र सख्यत्वानें वागण्याचा त्यानें प्रयत्न केला हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. विशेषतः जेथें जेथें त्याचा चिनी लोकांशीं संबंध आला, तेथें तेथें त्यांच्याशीं तो अतिशय खास आदरानें व सभ्यतेनें वागला. त्याचा परिणाम असा झाला, कीं पोर्तुगीजांबद्दल चीनमध्यें जी वार्ता गेली ती त्यांना अत्यंत अनुकूल अशीच गेली. आरब लोकांचेंच पूर्वेकडील व्यापारांत सर्वांत अधिक प्रस्थ होतें, हेंच बहुधा त्यांच्याशीं पोर्तुगीजांचें एवढें वैर उत्पन्न होण्याचें कारण असावें.

दरम्यान मसाल्याच्या बेटांचा शोध अजून चालूच होता आणि पुढें पॅसिफिक ओलांडून ज्यानें पृथ्वीप्रदक्षिणा पुरी केली तो मॅगेलन ज्या काफिल्यावर होता त्या काफिल्यानें मोलक्का बेटांचा शोध लावला. यूरपशीं होणाऱ्या मसाल्याचा पदार्थांच्या व्यापारांत साठांहून अधिक वर्षेपर्यंत पोर्तुगीज लोकांना कोणीही प्रतिस्पर्धी नव्हता. त्यानंतर इ. स. १५६५ मध्यें स्पॅनिश लोकांनीं फिलिपाइन बेटांचा कबजा घेतला आणि अशा रीतीनें पूर्वेकडील समुद्रांत दुसरी एक यूरपीय सत्ता येऊन दाखल झाली. परंतु स्पेनमुळें पोर्तुगीजांच्या व्यापाराला म्हणण्यासारखा कांहींच बाध आला नाहीं. कारण स्पॅनिश लोक हे कांहीं खरोखर स्वभावानें मुख्यतः व्यापारी नव्हते. स्पेनमधून पूर्वेकडे लढाऊ सैनिक आणि धर्मप्रचारकच विशेषेंकरून पाठविण्यांत आले. दरम्यान मसाल्याचा व्यापार सर्वतोंपरी पोर्तुगीजांच्या हातीं गेला. इतका, कीं इराण आणि ईजिप्त यांनासुद्धां स्वतःला लागणारे मसाल्याचे पदार्थ पोर्तुगीजांच्या मार्फतच घ्यावे लागले. मसाल्याच्या बेटांशीं थेट व्यापार करायलासुद्धां पोर्तुगीजांनीं इतर सर्व लोकाना प्रतिबंध सुरू केला. त्यामुळें पोर्तुगाल देश फारच संपन्न झाला. परंतु त्यानें आपल्या वसाहती वाढविण्याचा

मुळींच प्रयत्न केला नाहीं. तुला ठाऊकच आहे, कीं पोर्तुगाल हा फारच लहान देश आहे. बाहेर पाठविण्याला पुरेशीं माणसेंच त्याच्याजवळ नव्हतीं. जवळजवळ शंभर वर्षें, सर्व सोळाव्या शतकभर, पूर्वेकडे या छोट्याशा राष्ट्रानें जो पराक्रम गाजविला, तोच खरोखर मोठा आश्चर्य करण्यासारखा म्हणायला हवा.

इकडे स्पॅनिश लोक फिलिपाइन्समध्येंच पाय रोवून राहिले आणि तेथून जेवढी मिळेल तेवढी संपत्ति पैदा करण्याचा त्यांनीं यत्न चालविला. स्थानिक लोकांकडून जबरदस्तीनें खंडणी आणि लूट वसूल करावयाची यापेक्षां दुसरें त्यांनीं क्वचितच कांहीं केलें. पूर्व समुद्रांत आपला आणि पोर्तुगीजांचा तंटा नको म्हणून या लोकांनीं त्यांच्याशीं तह केला होता. इकडे स्पॅनिश सरकार फिलिपाइन बेटांतील लोकांना अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींशीं व्यापार करूं देत नव्हतें. कारण त्यामुळें मेक्सिको आणि पेरू या देशांतील सोनें आणि चांदी सगळींच पूर्वेकडे जाईल अशी त्यांना भीति वाटे. त्यामुळें फिलिपाइन्सकडून अमेरिकेकडे दरवर्षी एकच जहाज फक्त येत असे आणि परत जात असे. या जहाजाला **मॅनिला गॅलिअन्** असें नांव असे; दरवर्षीं येणाऱ्या या जहाजाची फिलिपाइन्समधील हे स्पॅनिश लोक किती उत्सुकतेनें वाट बघत असतील याची तूंच कल्पना कर. अशा रीतीनें २४० वर्षें हें 'मॅनिला गॅलिअन्' फिलिपाइन्स बेटें आणि अमेरिका यांच्या दरम्यान पॅसिफिक समुद्रांत येरझारा करीत असे.

स्पेन आणि पोर्तुगाल यांच्या या यशामुळें यूरपांतील इतर राष्ट्रांचीं मत्सरानें पोटें दुखूं लागलीं. पुढें आढळेलच आपल्याला, कीं या वेळीं साऱ्या यूरप खंडावर स्पेनचा दरारा चालत होता. इंग्लंडला पहिल्या दर्जाच्या राष्ट्रांत अजून मुळींच स्थान नव्हतें. नेदरलंड्समध्यें, म्हणजे हॉलंड व बेल्जमचा कांहीं भाग यांमध्यें या वेळीं बंड उभें राहिलें होतें. इंग्रजांची सहानुभूति डच लोकांकडे होती आणि स्पेनचा त्यांना हेवा वाटत होता. त्यामुळें त्यांनीं आंतून डच लोकांना मदत चालू ठेवली. इंग्रजांचे कित्येक खलाशी समुद्रावर फेऱ्या करून स्पॅनिश लोकांनीं अमेरिकेंतून सोनें, चांदी वगैरे संपत्तींनीं लादून आणलेलीं जहाजें काबीज करून लुटूं लागले व अशा रीतीनें ज्याला चांचेगिरी म्हणून म्हणतात ती करण्याचा क्रम सुरू झाला. या थोड्याशा धोक्याच्या परंतु अत्यंत फायदेशीर उद्योगाचें नेतृत्व सर फ्रॅन्सिस ड्रेक याच्याकडे असून त्याला तो स्पेनच्या राजाची दाढी होरपळविण्याचा उद्योग असें म्हणे.

इ. स. १५७७ मध्यें ड्रेकनें पांच जहाजें घेऊन स्पॅनिश वसाहतींच्या लुटीसाठीं प्रयाण केलें. या हल्ल्यांत त्याला यश आलें खरें; परंतु त्याचीं चार जहाजें कामास आलीं. फक्त एक जहाज, गोल्डन हिंद ( सुवर्णमय हिंदुस्थान ) हें तेवढें बचावून पॅसिफिक महासागरांत पोंचलें आणि केप ऑफ गुड होपला वळसा घालून इंग्लंडला परत आलें. अशा रीतीनें ड्रेकची ही पृथ्वीप्रदक्षिणाच झाली. मॅगेलनच्या व्हिक्टोरिया जहाजानंतर अशी पृथ्वीप्रदक्षिणा करणारें हें दुसरें जहाज. ही प्रदक्षिणा पुरी करावयाला त्याला तीन वर्षें लागलीं.

स्पेनच्या राजाची दाढी जाळण्याचा हा उद्योग असाच निर्वेधपणें फार काळ चालू शकणें असंभवनीयच होतें. लौकरच त्यांतून अनेक कटकटी निर्माण होऊन इंग्लंड आणि स्पेन यांच्यामध्यें युद्ध उद्भवलें. डच लोक त्याच्या पूर्वीपासूनच स्पेनशीं लढत होते. पोर्तुगाल देशसुद्धां या युद्धांत सामील होता. कारण अलीकडे कांहीं वर्षें स्पेन आणि पोर्तुगाल या दोन्ही देशांवर एकच राजा राज्य करीत होता. निश्चय आणि पुष्कळशा प्रमाणांत बलवत्तर सुदैव यांच्या बळावर इंग्लंड या युद्धामधून यशस्वीपणानें पार पडलें आणि या गोष्टीचें यूरपमध्यें सर्वांनाच आश्चर्य वाटलें. स्पेननें ब्रिटनला जिंकण्यासाठीं म्हणून "अजिंक्य आरमार" पाठविलें होतें, त्याचा नाश झाला हें तुझ्या लक्षांत असेलच. परंतु त्याच्याशीं आपल्याला आतांच कांहीं कर्तव्य नसून आपल्याला पूर्वेकडील इतिहासाकडे लक्ष द्यावयाचें आहे सध्यां.

या युद्धांत इंग्लंड आणि हॉलंड या दोन्ही देशांनीं अतिपूर्वेकडील स्पॅनिश व पोर्तुगीज लोकांवर हल्ला चढविला. स्पॅनिश लोक सगळे जग फिलिपाइन्समध्यें एका ठिकाणीं होते म्हणून त्यांना आपलें संरक्षण चांगल्या रीतीनें करतां आलें. परंतु पोर्तुगीजांची मात्र फारच तारांचळ उडाली. त्यांचें पूर्वेकडील साम्राज्य तांबड्या समुद्रापासून मलाक्कापर्यंत म्हणजे मसाल्याच्या बेटांपर्यंत सहा हजार मैल पसरलेलें होतें. एडनच्या आसपास, इराणच्या आखातांत, सीलोनमध्यें, हिंदी किनाऱ्यांवर पुष्कळशा ठिकाणीं आणि पूर्वेकडील बेटांत आणि मलायांत तर स्वाभाविकच सर्वच ठिकाणीं त्यांच्या वसाहती झालेल्या होत्या. परंतु हळूहळू हें त्यांचें सगळें पूर्वेकडील साम्राज्य त्यांच्या हातून गेलें. गांवामागून गांव, वसाहतीमागून वसाहत इंग्रज आणि डच लोकांच्या ताब्यांत गेली. इ. स. १६४१ मध्यें मलाक्काही गेलें. हिंदुस्थानमध्यें आणि इतर कांहीं ठिकाणीं क्वचित् कोठें कांहीं टोंकांचीं ठाणीं तेवढीं पोर्तुगालच्या हातीं शिल्लक राहिलीं. यांपैकीं हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील गोवा प्रांत त्यामध्यें प्रमुख असून तो अजूनही त्यांच्या ताब्यांत आहे. नुकत्याच स्थापन झालेल्या पोर्तुगीज लोकसत्ताक राज्याचा तो एक भाग आहे. सामर्थ्यवान् अकबर बादशहानें गोवा पोर्तुगीजांकडून घेण्याचा यत्न केला होता, पण त्याला सुद्धां त्यांत यश आलें नाहीं.

अशा रीतीनें पूर्वेकडील जगाच्या इतिहासांतील पोर्तुगीजांचा प्रवेश संपला. या छोट्याशा देशानें हा फारच मोठा घांस घेतला होता. त्याला कांहीं तो गिळतां येईना; आणि त्या प्रयत्नांत त्याची अगदीं दमछाट होऊन गेली. स्पेन मात्र फिलिपाइन्स बेटांना धरून राहिलें; परंतु यापुढच्या पूर्वेकडील घडामोडींत त्यानें कांहीं भाग घेतला नाहीं. पूर्वेकडील मौल्यवान् व्यापारावरील प्रभुत्व आतां हॉलंड आणि इंग्लंड या देशांकडे गेलें. या दोन्ही देशांनीं यासाठीं कंपन्या स्थापन करून आधींपासूनच कंबरा कसलेल्या होत्या. इंग्लंडमध्यें १६०० सालींच इलिझाबेथ राणीनें ईस्ट इंडिया कंपनीला सनद दिली होती. त्यानंतर दोन वर्षांनीं डच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली होती. या दोन्ही कंपन्यांची स्थापना केवळ व्यापार करण्याच्याच उद्देशानें

झालेली होती. या कंपन्या होत्या खासगी; पण त्यांना त्यांच्या राज्यांची वेळोवेळ मदत होत असे. त्यांचें सगळें लक्ष खरें मॅलेशियांतील मसाल्याच्या पदार्थांच्य व्यापाराकडे होतें. त्या वेळीं हिंदुस्थान देश हा मोंगलांच्या अमलाखालीं चांगला प्रबल देश होता. तेव्हां त्याची खोड काढण्याची एवढ्यांतच सोय नव्हती.

या डच आणि इंग्रज लोकांमध्यें वारंवार आपसांतच तंटे होत; म्हणून मग इंग्रजांनीं अखेरीस पूर्वेकडील बेटांतून काढता पाय घेतला आणि हिंदुस्थानकडे अधिक लक्ष वळविलें. कारण मोंगल साम्राज्य या सुमारास दुर्बल होऊं लागलें होतें आणि परकी साहसी गुंडांना ही मोठी नामी संधि होती. पुढें दिसेलच आपणाला, कीं इंग्लंड आणि फ्रान्स यांमधून हे असे साहसी गुंड कसे आले आणि त्यांनीं लबाडीनें कट करून किंवा केव्हां केव्हां लढाई करून त्या विरघळूं लागलेल्या साम्राज्याचे कांहीं भाग कसे गिळंकृत केले तें.

## ८०

# चीनमधील शांततेचा आणि भरभराटीचा काळ

२२ जुलै, १९३२

म्हणजे एकंदरींत तूं आजारी आहेस म्हणायची बाळ; आणि कुणीं सांगावें अजून सुद्धां तूं निजूनच असशील. तुरुंगाच्या आंत कोणतीही बातमी पोंचायला फा उशीर लागत असतो. आजारी असलीस तर तुझें तूंच सगळें कांहीं बघितलें पाहिजेस मी येथून तुझ्यासाठीं काय करूं शकणार? फक्त तुझी आठवण मात्र पुष्कळशी करीत बसणार. पुष्कळसा तुझाच विचार करीत बसणार. काय विचित्र आहे पाहा; कशीं सर्वच जणें आपण निरानिराळ्या ठिकाणीं फेंकलीं गेलों आहों; तूं तिकडे दूर पुण्यास; तुझी आई अलाहाबादला आजारी; आणि बाकीचीं आम्ही निरानिराळ्या तुरुंगांत!

अलीकडे कांहीं दिवस मला हीं पत्रें लिहिणें थोडेंसें जिकिरीचें होऊन गेलें आहे तुझ्याशीं मी गप्पा मारतों आहें, हें सोंग टिकविणें या दिवसांत फार कठिण पडतें. एक सारखी तुझी पुण्यास आजारी पडलेली मूर्ति मनापुढें येते आणि पुन्हां तुझी-माझी कधीं बरें भेट होईल अशी हुरहूर वाटूं लागते; अशी भेट होण्यापूर्वीं किती महिने किंव किती वर्षें आणखी जायचीं आहेत, आणि तेवढ्या अवधींत तूं किती मोठी झालेली असशील कोणाला ठाऊक!

परंतु फाजिल विचार करीत बसणें हे कांहीं ठीक नव्हे; तुरुंगामध्यें तर विशेषच. म्हणून मन जरा घट्ट केलें पाहिजे आणि वर्तमानकाल विसरून जाऊन भागच्या काळांत मन नेलें पाहिजे.

आपण गेल्या पत्रात कोठें, मॅलेशियांत होतों नव्हे का? आणि त्या ठिकाणीं एक विलक्षण घडामोड झालेली आपण पाहिली. यूरपचें आशियावर आक्रमण सुरू झालेलें होतें. आधीं पोर्तुगीज लोक आले; मग स्पॅनिश लोक आले; त्यांच्यानंतर मग इंग्रज आणि डच लोक आले. परंतु सुरुवातीला पुष्कळ काळपर्यंत या यूरपियन राष्ट्राची हालचाल फक्त मॅलेशिया आणि आसपासचीं बेटें यांतच चालू होती. त्यांच्या पश्चिमेला हिंदुस्थानांत मोंगलांचें प्रचळ राज्य होतें. उत्तरेला चीन देश असून तोही आपली काळजी घ्यायला समर्थ होता. त्यामुळें हिंदुस्थान किंवा चीन यांच्या भानगडींत त्या वेळीं हे यूरपियन लोक फारसे पडले नाहींत.

चीन मॅलेशियाला तर फारच जवळ. सरहद्दीवरून एक पाऊल पलीकडे टाकलें कीं चीन. तेव्हां आतां आपण तिकडे जाऊं या. त्या ठिकाणीं आतां मंगोलियन वंशाच्या कुब्लाईखानानें प्रस्थापित केलेलें युआन राजघराणें नाहींसें झालेलें आहे. जनतेचें बंड होऊन मंगोलियन लोकांचें राहिलें साहिलें सगळें सैन्य चीनच्या महान् भिंतीच्या पलीकडे इ. स. १३६८ मध्यें घालवून देण्यांत आलें. या बंडाचा पुढारी हुंग वू हा होता; आयुष्याच्या सुरुवातीला हा एक गरीब मजुराचा मुलगा होता; त्याला फारसें शिक्षणही मिळालेलें नव्हतें. परंतु संसाराच्या या विशाल शाळेमधला तो मोठा हुषार विद्यार्थी होता; म्हणून तो यशस्वी पुढारी झाला आणि पुढें शहाणा राज्यकर्ता झाला. बादशहा झाला म्हणून कांहीं तो गर्वाला किंवा घमेंडीला चढला नाहीं. तर आपण सामान्य जनतेमधीलच एक आहोंत, ही आठवण त्यानें अगदीं अखेरपर्यंत ठेवली. त्याची कारकीर्द तीस वर्षें झाली. ज्या सामान्य जनतेमधून तो वर आला, त्या सामान्य जनतेची स्थिति सुधारण्यासाठीं त्यानें केलेल्या प्रयत्नांकरितां अद्यापिही त्याच्या कारकीर्दीची लोकांमध्यें आठवण आहे. आपली साधेपणाची अभिरुचि त्यानें अखेरपर्यंत सांभाळली होती.

आतां नवीनच स्थापन झालेल्या मिंग राजघराण्यातील पहिला बादशहा म्हणजे हा हुंग वू. त्याचा मुलगा युंग लो, हाही मोठा राज्यकर्ता होऊन गेला. तो इ. स. १४०२ पासून १४२४ पर्यंत बादशहा होता. पण तुझ्या डोक्यावर हीं चिनी नांवें लादून कांहीं उपयोग नाहीं. या राजघराण्यांत नंतर पुष्कळ चांगले राज्यकर्ते झाले आणि मग नेहमीप्रमाणें या घराण्याच्याही अवनतीला सुरुवात झाली. परंतु ह्या बादशहा मंडळींना आपण बाजूला ठेवूं या आणि त्या काळच्या चीन देशाच्याच इतिहासाचा विचार करूं या. या घराण्याच्या काळांतील चीनचा इतिहास फार तेजस्वी, भरभराटीचा असून त्याच्यामध्यें कांहीं एक खास माधुरी आहे. मिंग या शब्दाचाच अर्थ तेजस्वी असा आहे. मिंग घराण्याचा अम्मल इ. स. १३६८ पासून १६४४ पर्यंत एकूण २७६ वर्षें चालला. चीनमधील एकंदर सर्व राजघराण्यांमध्यें हें घराणें अगदीं खास चिनी संस्कृतीचें होतें. आणि त्याच्या काळांत चिनी लोकांना आपल्या अंगच्या गुणांचा विकास करावयाला पूर्ण संधि मिळाली. या काळांत अंतर्गत आणि बाह्य दोन्ही प्रकारें शांतता होती. त्या

वेळीं चीननें बाह्य देशावर आक्रमण करण्याचें, साम्राज्यशाही पराक्रमाचें धोरण ठेवलेलें नव्हतें. शेजारच्या सर्व राष्ट्रांशीं चीनचें सख्य होतें. उत्तरेकडून फक्त भटक्या तार्तारवंशीय टोळ्यांचें तेवढें थोडेसें भय शिल्लक होतें. बाकीच्या पूर्वेकडील जगाच्या परिसरांत चीनची अवस्था पुष्कळशी वडील भावाप्रमाणें होती. हुषार, दैववान् आणि सुसंस्कृत असा वडील भाऊ; स्वतःच्या मोठेपणाची व वरचढपणाची जाणीव असलेला; तरी पण आपल्या धाकट्या भावांचें कल्याण व्हावें अशी ज्याची इच्छा आहे आणि आपल्यापाशीं जें सुधारणा आणि संस्कृति यांचें भांडार आहे त्यांतून त्यांनाही कांहीं भाग द्यावा, त्यांनाही शिकवून शहाणे करावें अशी ज्याची तयारी आहे असा भाऊ; अशी चीनची भूमिका होती. बरें, हीं बाकीचीं राष्ट्रेंही आपल्यापरी अशाच दृष्टीनें चीनकडे पाहत असत. कांहीं काळपर्यंत जपाननें तर चीनचें अधिराज्यसुद्धां मान्य केलें होतें आणि जपानवर अम्मल चालविणारे शोगुन आपल्याला चीनच्या मिंग घराण्यांतील बादशहांचे मांडलिक समजत असत. कोरिआ, इंडोनेशियन् बेटें – म्हणजे जावा, सुमात्रा वगैरे – आणि इंडोचायना यांकडूनही चीनला खंडणी मिळत असे.

युंग लोच्या कारकीर्दीतच दर्यासारंग चेंग हो याच्या आधिपत्याखालीं मॅलेशियावर ती मोठी आरमारी स्वारी करण्यांत आली. सुमारें तीस वर्षें चेंग हो हा पश्चिमेकडील समुद्रांत अप्रतिहत संचार करीत होता आणि थेट इराणच्या आखातापर्यंत जाऊन पोंचला होता. या बाजूच्या सर्व बेटांवरील राज्यांमध्यें आपल्या साम्राज्याचा दरारा बसविण्याचा हा प्रयत्न असावा. परंतु प्रत्यक्ष एखादा प्रदेश कबजांत घेण्याचा किंवा इतर कांहीं फायदा मिळविण्याचा त्यांत उद्देश नसावा असें वाटतें. सयाम आणि मज्झपहित यांच्या राज्यांची सत्ता फार वाढूं लागली होती. यामुळें कदाचित् युंग लोनें ही स्वारी पाठविली असेल. मूळ कारण कांहीं असो, या स्वारीला यश मात्र फार मोठें आलें. मज्झपहित व सयाम यांना तिच्यामुळें पायबंद बसला आणि नवीनच उदयास आलेल्या मलाक्काच्या मुसलमानी राज्याला प्रोत्साहन मिळालें. त्याचप्रमाणें चिनी संस्कृतीचा प्रसार सर्व इंडोनेशियामध्यें व आशियाच्या पूर्व प्रदेशामध्यें झाला.

चीन आणि त्याच्या आजूबाजूचीं राष्ट्रें यांच्यामध्यें सख्य आणि शांतता नांदत असल्यामुळें चीनला अंतर्गत व्यवहाराकडे लक्ष देण्यास सांपडलें. राज्यव्यवस्था चांगल्या प्रकारची राहिली, आणि कर कमी होऊन शेतकऱ्यांच्या डोक्यांवरील बोजा कमी झाला. रस्ते, जलमार्ग, कालवे, तलाव पाण्याचे सांठे यांच्यामध्यें पुष्कळ सुधारणा झाली. दुष्काळ किंवा अशाच कांहीं अडचणीच्या काळामध्यें उपयोगी पडावी म्हणून धान्याचीं सार्वजनिक कोठारें निर्माण करण्यांत आलीं. सरकारतर्फे कागदी नाणें सुरू करण्यांत आलें; त्यामुळें पतीवर चालणारे व्यवहार वाढून व्यापाराला व मालाच्या देवघेवीला फार मदत झाली. कागदी नाण्यांचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर होत असे आणि ७० टक्के करही कागदी नाण्यांत देतां येत असत.

या काळचा संस्कृतिविषयक इतिहास याहूनही विशेष डोळ्यांत भरण्यासारखा आहे. चिनी लोक हे कितीएक युगांपासून सुसंस्कृत आणि कलावंत लोक म्हणून विख्यात आहेत. मिंग घराण्याची सुखकारक राज्यव्यवस्था आणि त्या काळांत त्यांच्याकडून कलेला मिळालेली मदत व प्रोत्साहन यांमुळें लोकांमधील गुण व प्रतिभा यांचा विकास आणि आविष्कार होण्याला फार चांगला अवसर मिळाला. या काळांत मोठमोठ्या वैभवशाली इमारती बांधण्यांत आल्या; चित्रकलेचीं फारच श्रेष्ठ दर्जाचीं कामें झालीं; आणि मिंग घराण्याच्या काळांतील चिनी मातीच्या भांड्यांचें काम तर मोहक आकार आणि सुंदर कारागिरी यांसाठीं सुप्रसिद्धच आहे. इटलींत त्या वेळीं ज्ञानयुगाच्या चेतनेनें जीं मोठमोठीं चित्रांचीं कामें होत होतीं, त्यांच्याच तोडीचीं चीनमधील हीं चित्रें होतीं.

पंधराव्या शतकाच्या अखेरीला चीन देश त्या काळच्या यूरपपेक्षां संपत्ति, उद्योगधंदे आणि विद्या यांमध्यें किती तरी पुढें होता. मिंग घराण्याच्या कारकीर्दीच्या सर्व काळांत जनतेचें सुख आणि जनतेंतील कारागिरीचा व कलेचा बहर या बाबतींत चीनच्या तोडीचा एकही देश यूरप खंडांत किंवा इतरही कोठें नव्हता आणि तरीही यूरप खंडांतील तो अत्यंत महत्त्वाचा ज्ञानपुनरुज्जीवनाचा–रेनेसान्सचा–काळ होता, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

कलेच्या दृष्टीनें मिंग घराण्याची कारकीर्द इतकी प्रसिद्ध असण्याचें एक कारण असें आहे, कीं त्या काळच्या कारागिरीचे असंख्य नमुने आज आपल्याला पाहावयाला उपलब्ध आहेत. त्यांत कित्येक मोठीं समाधिस्थानें व स्मारकस्थानें आहेत; लांकूड, हस्तिदंत किंवा जेद जातीचा दगड यांवरील अत्यंत सुंदर कोरीव चित्रकाम आहे आणि तांब्याचीं आणि मातीचीं भांडीं आहेत. मिंग घराण्याच्या कारकीर्दीच्या अखेरी-अखेरीस मात्र चित्रांच्या नमुन्यांत ताशीवपणा, रेखीवपणा किंवा लहानसहान तपशील यांवर भर अधिक वाढलेला दिसतो आणि त्यामुळें त्या कोरकामाच्या किंवा चित्रांच्या सौंदर्याला थोडासा बाध आलेला आढळतो.

याच काळामध्यें पूर्वी सांगितलेलीं पोर्तुगीजांचीं जहाजें प्रथम चीनमध्यें आलीं. कँटन बंदराला हीं जहाजें इ. स. १५१६ मध्यें पोंचलीं. चिनी लोक जेथें जेथें भेटले तेथें तेथें त्यांच्याशीं अत्यंत चांगली वर्तणूक ठेवण्याचें धोरण अल्बुकर्कनें सांभाळलेलें होतें आणि त्याच्याबद्दलचे अनुकूल वृत्तांतच चीनपर्यंत आलेले होते. त्यामुळें या पोर्तुगीजांच्या जहाजांना लोकांनीं चांगलें वागविलें; परंतु लौकरच या पोर्तुगीज लोकांनीं अनेक रीतींनीं आपले गुण उधळण्याला सुरुवात केली आणि कित्येक ठिकाणीं त्यांनीं गडही उभारले. या त्यांच्या रानगटपणाचें चिनी सरकारला मोठेंच आश्चर्य वाटलें. परंतु त्यानें एकदम कांहीं त्यांच्यावर हत्यार उचललें नाहीं. मात्र अखेरीस हळूहळू त्यांनीं या सर्व लोकांना आपल्या देशांतून हांकून लावलें. तेव्हां पोर्तुगीज लोकांना कळून चुकलें, कीं आपली नित्याची पद्धति चीनमध्यें कांहीं कामाची नाहीं. मग

त्यांनीं शांतपणा आणि नम्रता धारण केली; नंतर इ. स. १५५७ मध्यें त्यांना कँटन शहराजवळ वसाहत करायला परवानगी मिळाली. पुढें मग त्यांनीं मकाओ शहर वसविलें.

या पोर्तुगीजांच्याबरोबर ख्रिस्ती धर्मप्रचारक आले. याच्यापैकीं सेंट फ्रान्सिस् झेविअर हा सर्वांत अत्यंत विख्यात होता. तो हिंदुस्थानमध्यें पुष्कळ काळ राहिला होता आणि त्याच्या नांवाचीं मिशनरी कॉलेजें आपल्या देशांत तुला पुष्कळ आढळतील. सेंट झेव्हिअर जपानमध्येंही गेला होता. नंतर एका चिनी बंदरामध्यें जमिनीवर उतरण्याची परवानगी मिळण्यापूर्वीच तो वारला. चिनी लोक ख्रिस्ती धर्मप्रचारकांना मुळींच थारा देत नसत. परंतु जेसुइट पंथाचे दोन पाद्री मात्र बुद्धधर्मीय विद्यार्थ्यांचा वेष घेऊन तिकडे राहिले आणि कित्येक वर्षेपर्यंत त्यांनीं चिनी भाषेचा अभ्यास केला. कान्फ्यूशियन तत्त्वज्ञानांत ते उत्तम प्रवीण झाले आणि शास्त्रज्ञ म्हणून त्यांनीं चागली कीर्ति मिळविली. त्यांपैकीं एकाचें नांव मॅटिओ रिक्की असें होतें. हा अत्यंत बुद्धिमान् आणि तेजस्वी विद्वान् गृहस्थ होता. आणि बादशहावरही वजन मारण्याइतकें व्यवहारचातुर्य त्याच्या अंगीं होतें. पुढें तर त्यानें आपलें बुद्धधर्माचें सोंगही टाकून दिलें आणि त्याच्या वजनामुळें ख्रिस्ती धर्माला चीनमध्यें पुष्कळ चांगलें स्थान प्राप्त झालें.

डच लोक मकाओ शहरांत सतराव्या शतकाच्या सुरुवातीला आले. तेथें व्यापार करण्याची परवानगी मिळविण्याची त्यांनीं खटपट केली. परंतु त्यांचें आणि पोर्तुगीजांचें मुळींच बरें नव्हतें. त्यामुळें पोर्तुगीजांनीं चिनी लोकांचीं मनें डचांविरुद्ध फार कलुषित केलीं. डच लोकांचें राष्ट्र हें क्रूर चांचे लोकाचें राष्ट्र आहे, असें त्यांनीं चिनी लोकांना सांगितलें. त्यामुळें चिनी लोकांनीं डच लोकांना व्यापार करण्याला परवानगी दिली नाहीं. यानंतर कांहीं वर्षांनीं जावामधील आपल्या बटेव्हिया या शहरांतून डचांनीं एक मोठा आरमारी काफिला मकाओ येथें पाठविला. मकाओ शहर जबरदस्तीनें घेण्याचा त्यांनीं अगदींच मूर्खासारखा प्रयत्न केला; परंतु चिनी आणि पोर्तुगीज लोक हे त्यांच्याहून फार भारी ठरले.

डचांच्यानंतर इंग्रज आले. पण त्यांनाही जवळजवळ कांहींच यश मिळालें नाहीं. मिंग घराण्याची कारकीर्द संपून गेल्यावर मगच इंग्रजांचा हात चिनी व्यापारामध्यें शिरकला.

जगांतल्या सर्वच चांगल्या किंवा वाईट वस्तूंना अंत हा ठरलेलाच आहे त्याचप्रमाणें मिंग घराण्याची कारकीर्दही सतराव्या शतकाच्या मध्याला समाप्त झाली. उत्तरेकडे तार्तार लोकांच्या संकटाचा जो छोटासा ढग उत्पन्न झालेला होता, तो वाढत जाऊन प्रत्यक्ष चीनवर त्याची कृष्ण छाया पसरली. प्राचीन किन किंवा सुवर्ण तार्तार लोकांना तूं विसरली नसशीलच. त्यांनींच सुंग घराण्याला दक्षिण चीनमध्यें लोटलें होतें, आणि पुढें मंगोलियन लोकांनीं त्यांनाही चीनमधून हांकून लावलें होतें. या किन लोकांच्या जवळच्या नात्यांतलीच एक शाखा आतां आज ज्या ठिकाणीं

मांचूरिया देश आहे त्या चीनच्या उत्तर प्रदेशांत या सुमारास बलिष्ठ झालेली होती. ते आपल्याला मांचू लोक म्हणवीत. अखेरीस या मांचू लोकांनींच मिंग घराण्याचें स्थान पटकावलें.

परंतु चीनमध्यें या वेळीं जर फाटाफूट होऊन आपसांत प्रतिस्पर्धी गट निर्माण झालेले नसते, तर मांचू लोकांना चीन जिंकणें फारच कठिण गेलें असतें. चीन, हिंदुस्थान, वगैरे एकूण एक देशांत परकी लोक जे यशस्वी झाले, ते त्या त्या देशाचें सामर्थ्य कमी झालेलें होतें आणि लोकांमध्यें आपसांत यादवी होती म्हणूनच केवळ झाले. चीनमध्येंही या वेळीं अशींच जिकडेतिकडे बंडाळी माजलेली होती. पुढचे पुढचे मिंग बादशहा हे दुराचारी आणि बेवकूब निपजले असावे बहुधा; किंवा सामाजिक क्रांति उत्पन्न व्हावी अशी आर्थिक परिस्थितीच उत्पन्न झाली असेल. मांचू लोकांशीं जें युद्ध झालें तेंही चीनला फार महाग पडलें आणि त्याचा फारच मोठा ताण चीनला जाणवूं लागला. जिकडेतिकडे पुंड टोळ्यांच्या नायकांचें पीक उद्भवलें आणि त्यांच्यांत सगळ्यांत मोठा जो होता, त्यानें बादशहा म्हणूनही कांहीं काळ सत्ता उपभोगली. मांचूच्या विरुद्ध लढणारा मिंग राजांचा सेनापति वू सां कै नांवाचा होता. एका बाजूला हा पुंडांचा नायक बादशहा झालेला, तर दुसऱ्या बाजूला मांचू लोक शत्रु; अशा मोठ्या पेंचामध्यें तो सांपडला. अत्यंत मूर्खासारखी, किंवा कदाचित् विश्वासघातानेंही असेल, त्यानें त्या पुंडांविरुद्ध मांचू लोकांचीच मदत मागितली. मांचू लोकांनीं ही मदत खरोखरच मोठ्या हौसेनें केली, आणि त्यासाठीं ते जे पेकिंगला आले ते अर्थातच तेथेंच राहिले. त्यानंतर मिंग घराण्याच्या पक्षांत कांहींच अर्थ उरलेला नाहीं अशी खात्री होऊन वू सां कैनें त्यांचा त्याग केला आणि परकी स्वारी करणारे जे मांचू लोक त्यांना जाऊन तो मिळाला.

चीनमध्यें या वू सां कैचा अत्यंत तीव्र तिरस्कार आजही करतात आणि त्याला आपल्या इतिहासांतील एक अत्यंत मोठा विश्वासघातकी मनुष्य समजतात, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. साऱ्या देशाच्या संरक्षणाचें काम त्याच्या हातीं विश्वासानें सोंपविलेलें असतांना तो शत्रूला जाऊन मिळाला; एवढेंच नव्हे, तर दक्षिण चीनमधील प्रांतांना शत्रूच्या कबजांत आणण्यासाठींही त्यानें मदत केली. मांचू लोकांनीं त्याच्या या मदतीचें बक्षीस म्हणून त्यांच्यासाठीं त्यानें मिळविलेल्या दक्षिण चीनमधील प्रातावरच आपला व्हाइसरॉय, राजप्रतिनिधि म्हणून त्याला नेमलें.

इ. स. १६५० मध्यें मांचू लोकांनीं कँटन बंदर जिंकून घेतलें आणि त्यांचा चीनवरील विजय संपूर्ण झाला. चिनी लोकांपेक्षां हे लोक अधिक चांगले लढवय्ये असल्यामुळें त्यांचा जय झाला असें असेल. कदाचित् फार दिवस शांततेंत आणि भरभराटींत गेल्यामुळें चिनी लोक लष्करी दृष्ट्या दुर्बळही झाले असतील. परंतु मांचू लोकांना इतका जलद जय मिळाला यांचीं आणखीही कांहीं कारणें होतीं. चिनी प्रजेला

संतुष्ट ठेवण्याचा, त्याची मर्जी राखण्याचा त्यानीं नेहमीं फार प्रयत्न केला हें त्यात एक विशेष उल्लेख करण्यासारखें कारण आहे. पूर्वीच्या काळीं तातार लोकांच्या स्वाऱ्या झाल्या, त्या वेळीं फार जुलूम आणि कत्तली झाल्या होत्या. या वेळीं चिनी अंमलदारांना आपल्याकडे वळविण्याचा मांचू लोकांनीं फार प्रयत्न केला आणि त्याच अंमलदारांना पुन्हां त्यांनीं आपापल्या जागांवर नेमलें. त्यामुळें त्यांच्या राज्यात मोठमोठ्या जागा चिनी अधिकाऱ्यांच्याच हातीं होत्या. जुनी मिंग घराण्याच्या वेळची राज्यपद्धति पण त्यांनीं बदलली नाहीं. पद्धति दिसायला तीच राहिली, फक्त तिचें वरचें सगळें सूत्र तेवढें,पार बदलून गेलें.

परंतु चिनी लोक परकी अमलाखालीं गेले होते हें दाखविणाऱ्या दोन महत्त्वाच्या गोष्टी मात्र घडून आल्या. महत्त्वामहत्त्वाच्या सर्व ठिकाणीं मांचू सैन्याचे तळ ठेवण्यांत आले ही एक गोष्ट; आणि मांचूंची लांब शेंडी ठेवण्याची पद्धति चिनी लोकांवर नव्या राज्याला संमतिदर्शक म्हणून लादण्यांत आली, हें दुसरें. चिनी मनुष्य म्हटला, कीं त्याची ती लांब शेंडी त्याचें वैशिष्ट्य म्हणून आपल्यापैकीं बहुतेकांच्या डोळ्यांपुढें नेहमीं उभी राहते. पण मूळची ही कांहीं चिनी परंपरा मुळींच नव्हती. ही चाल त्यांच्या पारतंत्र्याची दर्शक होती; अगदीं अशाच प्रकारें आम्ही हिंदी लोक-सुद्धां आजही कांहीं लाज किंवा अपमान न वाटतां कितीक गुलामगिरीचीं लक्षणें स्वीकारीत आहोंतच कीं नाहीं! हल्लीं मात्र चिनी लोकांनीं ही लांब शेंडीची पद्धति सोडून दिली आहे.

अशा रीतीनें चीनमध्यें मिंग घराण्याची तेजस्वी कारकीर्द नष्ट झाली. जवळ-जवळ तीनशें वर्षें राज्य चांगल्या प्रकारें करीत असतां एकाएकीं इतक्या लौकर या घराण्याचा पाडाव कां झाला, असा माणसाला मोठा प्रश्न पडतो. आम्ही वर्णनें वाचतों इतकें जर हें राज्य चांगलें होतें, तर मग अंतर्गत बंडाळी आणि अंतर्गत दंगेधोपे कां उद्भवले? मांचूरियांतील परक्या स्वारी करणारांना जागच्या जागीं रोखून त्यांना कां धरतां आलें नाहीं? बहुधा अखेरीअखेरीला हें राज्यही जुलमी झालें असावें. त्याच-प्रमाणें सर्व कांहीं सरकारनें वडिलांप्रमाणें करावयाचें, प्रजेवर कांहींच जबाबदारी नसावयाची, यामुळेंही कदाचित् लोक दुर्बळ झालेले असतील. मुलांना काय किंवा राष्ट्रांना काय, सारखेंच दुसऱ्यांनीं भरवीत राहणें हें हिताचें नसतें.

दुसरा एक प्रश्न असा पडतो, कीं चीन देश या काळीं इतका असा सुसंस्कृत असतांना इतर कांहीं बाबतींत, उदाहरणार्थ, शास्त्रें, संशोधन इत्यादि बाबतींत त्याचें कांहींच पाऊल पुढें कसें पडलें नाहीं? यूरपचे लोक तर त्या काळीं चीनपेक्षां किती तरी मागासलेले होते; असें असूनही ज्ञान व कला यांच्या पुनरुज्जीवनाच्या काळांत त्यांच्या ठिकाणीं उत्साह, साहस आणि शोधप्रवृत्ति यांचा संचार झालेला आपणांस आढळतो. त्या दोहोंची तुलना करावयाची, तर एका बाजूला एक मध्यम वयाचा चांगला विद्या व संस्कृति यांनीं विभूषित गृहस्थ, जरा शांत अशा जीवनाची आवड

असलेला, उगीच नवीन कांहीं भानगड करायला नको आणि आपल्या रोजच्या कार्यक्रमांत कांहीं बदल व्हायला नको अशा बुद्धीचा आणि आपल्या प्राचीन पवित्र ग्रंथांत आणि कलाप्रवृत्तींत गर्क झालेला मनुष्य; तर दुसऱ्या बाजूला एक तरुण पोरगा, अजून जरा असंस्कृत आणि गांवढळच, परंतु उत्साहानें आणि संशोधनबुद्धीनें भरलेला आणि कोठें तरी साहस आणि पराक्रम करायला मिळावा म्हणून धडपडणारा असा एक मनुष्य, अशी त्यांची तुलना करतां येईल. या काळच्या चीन देशांत मोहकता फार मोठ्या प्रमाणावर आहे हें खरें; पण ती मोहकता म्हणजे तिसऱ्या प्रहरच्या किंवा सायंकालीन प्रशांत सौंदर्याची रमणीयता आहे.

## ८१

# जपान देश स्वतःला कोंडून घेतो

२३ जुलै, १९३२

चीनमधून असेंच आपण एकदां जपानमध्यें जाऊं या चला; वाटेंत जातां जातां थोडा वेळ धांवताच मुक्काम कोरियामध्यें करूं या. कोरियाचा ताबा अर्थातच संपूर्णपणें मंगोलियन लोकांनीं घेतलेला होता. त्यांनीं जपानवरही स्वारी करण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. मंगोलियन लोकांना समुद्रावरील लढाईचें तंत्र कांहीं फारसें कधींच जुळलेलें दिसत नाहीं. स्वभावतः ते बेटापेक्षां सलग एका मोठ्या खंडांत जमिनीवर राहणारे लोक दिसतात. जपान पडलें बेटावर. त्यामुळें तें त्यांच्या तडाक्यांतून वांचलें.

चीनमधून मंगोलियन लोकांना हांकलून दिल्यानंतर लौकरच कोरियामध्यें एक क्रांति झाली आणि मंगोलियन लोकांचें अधिराज्य मान्य करून राहिलेले तेथले जे राज्यकर्ते होते, त्यांना काढून टाकण्यांत आलें. या बंडाचा पुढारी यी तै-जो नांवाचा एक कोरियन देशभक्त होता. बंडानंतर तो नवीन राजा झाला; आणि त्याचें जें राजघराणें स्थापन झालें त्याचाच अम्मल कोरियामध्यें सुमारें ५०० वर्षें म्हणजे इ. स. १३९२ पासून अगदीं परवां परवां जपाननें कोरिया देश आपल्या साम्राज्याला जोडून घेतला तेथपर्यंत चालू होता. बंडानंतर सेऊल ही कोरियाची राजधानी करण्यांत आली, ती आजही तशीच कायम आहे. कोरियाला यानंतर पुन्हां चोसेन असें म्हणण्यांत येऊं लागलें; आणि चीनच्या साधारणपणें सांवलीखालींच, आणि चीनला अधून मधून खंडणी देत, पण एकंदरींत जवळजवळ स्वतंत्र देश म्हणून चोसेनचें राज्य चालू राहिलें. जपानशीं कोरियाचीं पुष्कळ युद्धें झालीं व त्यांत त्याला कधीं कधीं जयही मिळाला. पण आज या दोन देशांत तुलना करायचीसुद्धां सोय नाहीं. जपान

आतां एक मोठें आणि बलिष्ठ साम्राज्य झालें असून साम्राज्यशाही सत्तांचे सर्व दुर्गुणही त्याच्या ठिकाणीं आलेले आहेत. गरीब बिचारा कोरिया देश या जपानच्या साम्राज्याचा एक लहानसा तुकडा आहे; जपान त्याच्यावर राज्य चालवीत असून त्याचें सगळें अर्थशोषण करीत आहे; तरी पण कोरिया असहायपणें का होईना, पण धैर्यानें आपल्या स्वातंत्र्यासाठीं धडपडत आहे. तथापि हा सगळा अगदीं आजकालचा इतिहास आहे; आणि आपण तर अजून पुष्कळ प्राचीन काळामध्यें आहों.

बाराव्या शतकाच्या अखेरीस जपानमध्यें राज्यकाभाराचीं सगळीं खरीं सूत्रें शोगूनांच्या हातीं आलीं होतीं हें तुला आठवतच असेल. बादशहा हा आपला नुसता शोभेला होता. कामाकुरा शोगूनशाही म्हणून प्रसिद्ध असलेली पहिली शोगूनशाही सुमारें दीडशें वर्षें चालली. या काळांत त्यांनीं जपानला शांतता आणि सुव्यवस्थित राज्यकारभार यांची जोड करून दिली. अर्थात् नेहमींप्रमाणें या राज्यकर्त्या घराण्याचीही यापुढें अवनति झाली; त्यांच्यामध्यें आणि राज्यामध्यें बेबकूफी आणि चैनबाजी वाढली आणि शेवटीं आपसांत यादवी निर्माण झाली. एका बाजूला आपली स्वतःची खरी सत्ता चालली पाहिजे यासाठीं धडपडणारा बादशहा आणि दुसऱ्या बाजूला शोगून यांच्यामध्यें झगडे सुरू झाले. त्यांत बादशहाचा जसा पाडाव झाला, तसाच जुन्या शोगूनशाहीचाही पण झाला आणि इ. स. १३३८ मध्यें नवीनच एक शोगूनशाही उदयाला आली. ही अशिकागा शोगूनशाही. ही पुढें २३५ वर्षें चालू राहिली. पण हा २३५ वर्षांचा काळ म्हणजे बंडाळी आणि युद्धें यांचा काळ होता. हा काळ आणि चीनमधील मिंग राजवंशाचा काळ जवळजवळ एकच होता. या दुसऱ्या शोगूनशाहीपैकीं एका शोगूनाच्या मनांत मिंग घराण्यांतील बादशहांची अनुकूलता मिळविण्याचें फार होतें; इतकें कीं त्यासाठीं आपण मिंग बादशहांचे मांडलिक आहोंत असें मान्य करण्यापर्यंत त्याची पाळी गेली. जपानचा हा जो अपमान झाला, त्याबद्दल जपानी इतिहासकारांच्या अंगाची नुसती लाही होते आणि या शोगूनाला ते अगदीं कडवट शिव्या देतात.

जपानचे चीनशीं संबंध स्वाभाविकच चांगले सख्यत्वाचे होते; आणि मिंग बादशहांच्या अमलामध्यें चीनमध्यें संस्कृतीला जो नवीन बहर आला होता, तें एक नवेंच कारण जपानला चीनविषयीं आणखीच आकर्षण वाटण्याला झालें होतें. त्यामुळें जपानमध्यें चीनमधील प्रत्येक गोष्टीचा अभ्यास सुरू झाला; चित्रकला, काव्य, स्थापत्य आणि शिल्पकला, तत्त्वज्ञान यांचा; एवढेंच नव्हे, तर युद्धशास्त्राचाही. जपानमधील किंकाकुजी (सुवर्णप्रासाद) आणि जिंकाकुजी (रजतप्रासाद) या सुप्रसिद्ध इमारती याच काळांत बांधण्यांत आल्या.

कला आणि विलास यांच्या या वाढीच्या जोडीलाच देशांत शेतकऱ्यांची मात्र फार दैन्यावस्था झालेली होती. शेतकऱ्यांवरील कर अतिशयच अवजड झाले होते; आणि देशांतील आपसांतील यादवीचा भारही अखेरीस त्यांनाच सोसावा लागत

होता. अशी ही परिस्थिति एकसारखी इतकी चिघळत गेली, कीं राजधानीच्या बाहेर मध्यवर्ती सत्तेचा कारभार मानला जाईना अशी अवस्था प्राप्त झाली.

या यादवीच्या काळातच इ. स. १५४२ मध्यें पोर्तुगीज लोक जपानमध्यें आले मोठी लक्षांत ठेवण्याची गोष्ट ही कीं दारूगोळ्यांचीं हत्यारें जपानमध्यें या पोर्तुगीजांनीं प्रथम आणलीं. हें पाहिलें म्हणजे मोठें नवल वाटतें. कारण चीनला या हत्यारांची किती तरी पूर्वीपासून माहिती होती, आणि खरें म्हणजे यूरप खंडाला त्यांचें ज्ञान चीनपासूनच मंगोलियन लोकांच्याशीं यूरप खंडाचा संबंध आला तेव्हां मिळालेलें होतें.

जपानमध्यें जवळजवळ शंभर वर्षें चाललेल्या या यादवींतून तीन गृहस्थांनीं जपानची सुटका केली. नोरबुनागा या नांवाचा एक दाइम्यो म्हणजे उमराव, हिदेयोशी नांवाचा एक शेतकरी, आणि टोकुगावा इयेयासू नांवाचा वरिष्ठ सरदारांपैकीं एक, हे ते तीन गृहस्थ. सोळाव्या शतकाच्या अखेरीस सर्व जपान देश पुन्हां एकजीव असा झाला. हिदेयोशी हा शेतकरी जपानच्या अत्यंत कर्तबगार मुत्सद्यांपैकीं एक होऊन गेला. परंतु शरीरानें मात्र तो अगदींच कुरूप, ठेंगू, आडमाडू आणि माकडासारख्या चेहऱ्याचा होता म्हणतात.

जपानचें एकीकरण पूर्ण झाल्यानंतर आपल्या मोक्या थोरल्या सैन्याचें काय करावें असा या गृहस्थापुढें प्रश्न पडला. तेव्हां दुसरा कांहीं उद्योग नाहीं म्हणून त्यानीं कोरियावर हल्ला केला. पण लौकरच त्याबद्दल त्यांना पश्चात्ताप करण्याची पाळी आली. कोरियांतील लोकांनीं जपानच्या आरमाराचा पराभव केला आणि कोरिया व चीन यांमधील समुद्रावर त्यांनीं आपलें वर्चस्व बसविलें. एका नवीनच प्रकारच्या जहाजांचा हा पराभव करण्याच्या कामीं त्यांना फार उपयोग झाला. लोखंडी पत्र्यांचें कांसवाच्या पाठीसारखें छप्पर या जहाजांवर असे. या जहाजांना कच्छपनौका "कांसवी जहाजें" असेंच म्हणत. हीं जहाजें मागें किंवा पुढें केव्हांही कशींही हांकारतां येत असत. या जहाजांवरून जपानच्या लढाऊ जहाजाचा कोरियांतील लोकांनीं नाश केला.

वर सांगितलेल्या तीन गृहस्थांपैकीं टोकूगावा इयेयासू यानें या यादवींतून आपली तुंबडी चांगलीच भरून घेतली. इतकी कीं भलताच संपत्तिमान् होऊन जवळजवळ एक-सप्तमांश जपानचा तो मालक झाला. आपल्या मालकीच्या प्रदेशांत त्यानेंच तें येशे हें शहर वसविलें. यालाच पुढें टोकिओ हें नांव प्राप्त झालें. इयेयासू हा इ. स. १६०३ मध्यें शोगून झाला, आणि तेव्हांपासून सुरू झालेली ही तिसरी आणि शेवटचीच टोकूगावा शोगूनशाही पुढें २५० वर्षेपर्यंत चालू राहिली.

दरम्यान पोर्तुगीजांनीं तेथें आपलें थोडेंसें व्यापाराचें बस्तान जमविलें होतें. जवळजवळ पन्नास वर्षें यूरपमधून त्यांच्याशीं स्पर्धा करायला तेथें कोणी आलें नाहीं; कारण स्पॅनिश लोक इकडे प्रथम इ. स. १५९२ मध्यें आले आणि डच आणि इंग्रज तर याहूनही पुढें आले. जपानमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रवेश सेंट फ्रान्सिस झेव्हिअर यानेंच इ. स. १५४९ मध्यें केला असावा असें दिसतें. जेसुईट पंथाच्या लोकांना

जपानांत धर्मोपदेश करावयाला नुसती परवानगी मिळाली; एवढेंच नव्हे, तर त्यांत त्यांना उत्तेजनही मिळालें. असें करण्यांत मुळाशीं हेतु मात्र राजकीय होता. कारण बुद्धधर्मीय विहार किंवा मठ हे गुप्त कारस्थानांचे मोठेच अड्डे आहेत अशी समजूत होऊन गेलेली होती. त्यासाठीं या बुद्ध भिक्षूंना दडपून टाकून ख्रिस्ती मिशनऱ्यांना थोडी अनुकूलता दाखविण्यांत आली. परंतु लौकरच जपान्यांना कळून चुकलें कीं हे मिशनरी लोक म्हणजे मोठे घातक लोक आहेत. म्हणून ताबडतोब जपानी लोकांनीं त्यांच्यासंबंधींचें आपलें धोरण बदललें आणि त्यांना बाहेर हांकलून देण्याचा प्रयत्न सुरू केला. इ. स. १५८७ इतक्या जुन्या काळींच ख्रिस्ती धर्माविरुद्ध एक हुकूम काढण्यांत येऊन सर्व ख्रिस्ती मिशनरी लोकांनीं वीस दिवसांत जपानांतून निघून जावें, नाहीं तर त्यांचा वध करण्यांत येईल, असें त्यांना फर्मावण्यांत आलें. अर्थात् या हुकुमाचा रोख कांहीं व्यापाऱ्यांविरुद्ध नव्हता. हुकुमांतच स्पष्ट असें म्हटलेलें होतें, कीं व्यापाऱ्यांनीं जपानमध्यें राहून व्यापार करण्यास कांहीं हरकत नाहीं. परंतु ते जर आपल्या जहाजांवर मिशनरी आणतील, तर मात्र त्यांचें जहाज आणि त्यावरील माल दोन्ही जप्त केलीं जातील. हा हुकूमही केवळ राजकीय कारणासाठीं जारी करण्यांत आला होता. हिदेयोशीच्या सूक्ष्म बुद्धीनें संकट बरोबर हेरलें होतें. हे ख्रिस्ती मिशनरी आणि त्यांनीं बाटविलेले लोक यांच्यापासून राजकीय दृष्ट्या धोका उत्पन्न होण्याचा संभव आहे अशी त्याची कल्पना झाली, आणि यांत त्याची फारशी चूकही नव्हती.

यानंतर लौकरच एक प्रसंग असा घडून आला, कीं त्यामुळें आपली ही भीति अगदीं खरी होती असें हिदेयोशीला पक्कें समजून चुकलें आणि त्यामुळें त्याला फार संताप आला. फिलिपाइन्स बेटें आणि अमेरिका यांच्यामध्यें तें मॅनिला गॅलिअन् नांवाचें जहाज दर वर्षाला एक फेरी करून जात असे म्हणून तुला मीं सांगितलेलें आठवत असेल; हें जहाज वादळांत सांपडून एकदां जपानच्या किनाऱ्याला लागलें. त्या जहाजावरील कप्तानानें जगाचा नकाशा दाखवून, विशेषतः त्यावरील स्पेनच्या राजाच्या खास मालकीचा म्हणून दाखविलेला विशाल भूप्रदेश तेथील स्थानिक जपानी लोकांना दाखवून त्यांच्या मनांत भीति उत्पन्न करण्याचा मुद्दाम प्रयत्न केला. लोकांनीं कप्तानाला विचारलें, कीं एवढें हें प्रचंड साम्राज्य स्पेनच्या राजाला संपादन तरी कसें करतां आलें? त्यावर कप्तानानें उत्तर दिलें, कीं त्याच्याइतकी तर सोपी गोष्टच कोणती नाहीं. प्रथम मिशनरी लोकांनीं जावयाचें; मग त्यांनीं पुष्कळसे लोक बाटविले म्हणजे त्यांच्या मदतीला शिपाई पाठवावयाचे आणि त्या दोघांनीं मिळून स्थानिक राज्य उलथून टाकावयाचें. हिदेयोशीच्या कानांवर जेव्हां हा वृत्तांत गेला तेव्हां त्याला कांहीं फारसा संतोष होणें शक्य नव्हतें; उलट, त्यामुळें तो मिशनऱ्यांचा अधिकच तीव्र विरोधक बनला. मॅनिला गॅलिअन् जहाजाला त्यानें जाऊं दिलें; परंतु जपानमध्यें मात्र त्यानें कांहीं मिशनरी आणि त्यांनीं बाटविलेले लोक यांचा वध केला.

शोगून झाल्यानंतर मात्र इयेयाशू हा परकी लोकांशीं अधिक मऊपणानें व सरळपणानें वागूं लागला. परकी देशांबरोबरचा व्यापार वाढवावा, विशेषतः आपलें स्वतःचें बंदर जें थेडो याचा परदेशांशीं व्यापार वाढावा याकडे त्याचें विशेष लक्ष लागलेलें होतें; परंतु इयेयाशूच्या मृत्यूनंतर ख्रिस्ती लोकांचा छळ पुन्हां सुरू झाला. मिशनरी लोकांना जबरदस्तीनें जपानमधून हांकलून लावण्यांत आलें आणि बाटलेल्या लोकांवर ख्रिस्तीधर्म सोडण्याची सक्ती करण्यांत आली. व्यापारसंबंधींचें धोरणसुद्धां आतां बदललें; इतकी या परकी लोकांच्या राजकीय डावांची भीति उत्पन्न झालेली होती. काय वाटेल तें करून या परकी लोकांना बाहेर ठेवावयाचें, अशी त्यांची धडपड होती.

जपानी लोकाच्या मनावर हा जो उलटा परिणाम झाला त्याचा अर्थ आपणास समजण्यासारखा आहे. यापुढील काळामध्यें इतर अनेक देशांत या यूरपीय सत्तांनीं धर्माच्या ढोंगाखालीं आपल्या स्वतःच्या पोतड्या भरण्याचा कावा कसा काय साधून घेतला, हें आतां आपल्याला चांगलें परिचित झालें आहे. परंतु आश्चर्य वाटतें तें या गोष्टीचें, कीं जपानी लोकांचा तोंपर्यंत यूरपीय लोकांशीं विशेषसा संबंध आलेला नसतांही धर्मरूपी शेळीचें कातडें पांघरून आलेल्या या साम्राज्यशाहीच्या लांडग्याचें खरें आंतलें स्वरूप नेमकें ओळखण्याइतकी खोल दृष्टि जपान्यानीं त्या वेळीं प्रकट केली.

एव्हांपासून जगांतील एका अलौकिक प्रकाराला सुरुवात झाली. हा प्रकार म्हणजे जपानची नाकेबंदी. सगळ्या जगापासून फुटून दूर अगदीं वेगळें राहण्याचें धोरण तेथें जाणूनबुजून ठरविण्यांत आलें आणि त्याची अम्मलबजावणी पण अचंबा वाटण्याइतकी कसोशीनें करण्यांत आली. इंग्रज लोकांनीं जपानांत जाण्याचा प्रयत्न केला होता; पण तेथें आपली फारशी डाळ शिजत नाहीं असें पाहून त्यांनीं इ. स. १६२३ मध्यें हा प्रयत्न सोडून दिला. दुसऱ्या वर्षी स्पॅनिश लोकांना जपानांतून हद्दपार करण्यांत आलें. त्यांचीच तेथें सगळ्यांत अधिक भीति वाटत असे. बाहेर देशांत व्यापारासाठीं जावयाचें तें फक्त जे ख्रिस्ती नसतील त्यांनींच आणि त्यांनीं सुद्धां फिलिपाइन्स बेटांत जातां उपयोगी नाहीं असा कायदा करण्यांत आला. शेवटीं यानंतर बारा वर्षांनीं इ. स. १६३६ मध्यें जपानची पुरी नाकेबंदी करण्यांत आली. पोर्तुगीज लोकांना हद्दपार करण्यांत आलें; ख्रिस्ती किंवा बिगर ख्रिस्ती कोणीही जपानी माणसानें कोणत्याही कारणासाठीं परदेशीं जावयाचें नाहीं आणि परदेशीं राहणाऱ्या कोणाही जपान्यानें परत जपानला यावयाचें नाहीं, असा कायदा करण्यांत येऊन हा कायदा मोडणारास देहांताची शिक्षा ठरविण्यांत आली. परक्यांपैकीं आतां फक्त मूठभर डच लोक जपानमध्यें राहिलेले होते; परंतु त्यांना बंदर सोडून देशांतल्या आंतल्या भागांत जाण्याला पूर्ण मनाई होती. इ. स. १६४१ मध्यें या डच लोकांनाही नागासाकी बंदराजवळच्या एका बेटावर नेण्यांत येऊन तेथें कैद्यांप्रमाणें ठेवण्यांत आलें. अशा रीतीनें पोर्तुगीजांनीं प्रथम जपानमध्यें पाय ठेवला तेव्हांपासून नव्याण्णव

वर्षांत जपाननें परदेशांशीं आपला संबंध पार तोडून टाकला आणि स्वतःलाच कोंडून घेतलें.

इ. स. १६४० मध्यें पोर्तुगीजांच्या एका जहाजावरून कांहीं वकील व्यापार पुन्हां सुरू करावा अशी मागणी करण्याकरितां आले होते; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. जपान्यांनीं त्या वकिलांना आणि बहुतेक सर्व खलाशांना ठार केलें. फक्त कांहीं खलाशांना परत जाऊन या प्रकाराची वर्दी पोंचविण्यासाठीं तेवढें जिवंत ठेवलें!

अशा रीतीनें सुमारें दोनशें वर्षें जपानचा सर्व जगाशीं, प्रत्यक्ष त्याचे शेजारी चीन आणि कोरिया यांच्याशींसुद्धां, अगदीं काडीचाही संबंध नव्हता. त्या बेटावरचे ते डच लोक आणि अतिशय कडक देखरेखीखालीं येणारा एखादा चिनी मनुष्य एवढाच काय तो बाहेरच्या जगाशीं संबंधाचा दुवा! हा संबंध तोडण्याचा प्रकार फारच लोकविलक्षण आहे. आपल्याला माहीत आहे त्या इतिहासकाळांतील कोणत्याही काळांत किंवा कोठल्याही राष्ट्रांत अशा प्रकारचें दुसरें उदाहरण सांपडत नाहीं. रहस्यमय, अतिगूढ तिबेट देश आणि अरण्यमय मध्य आफ्रिका देश यांचासुद्धां आजूबाजूच्या देशांशीं वारंवार संबंध येत असे. जगापासून स्वतःला अगदीं सर्वस्वीं बाजूला ठेवणें ही गोष्ट घातुक आहे. परंतु या घातुक प्रकारांतही जपान जिवंत राहिलें, त्याच्यामध्यें अंतर्गत शांतता प्रस्थापित राहिली व दीर्घकालीन लढायांतून आलेल्या दुःस्थितींतून त्यानें डोकें वर काढलें. आणि अखेर इ. स. १८५३ मध्यें जपाननें आपलीं दारें आणि खिडक्या जेव्हां उघडल्या, तेव्हां जपाननें आणखी एक अलौकिक चमत्कार करून दाखविला. त्यानें एकदम पुढें धांव घेतली, फुकट गेलेला सर्व वेळ भरून काढला, यूरपियन राष्ट्रांना गांठलें आणि त्यांच्याच तंत्रांत त्यांच्यावर कडी केली.

इतिहासाची अशी ही नुसती बुच्ची बाह्य रेखाकृति किती कंटाळवाणी वाटते! आणि त्यांत डोळ्यांपुढून जाणाऱ्या व्यक्तींचीं चित्रेंही किती निर्जीव आणि पुसट वाटतात! परंतु एखादे वेळीं जुन्या काळींच लिहिलेला एखादा इतिहासग्रंथ जेव्हां वाचण्यांत येतो, तेव्हां मात्र मृत भूतकाळाच्या शरीरांत कोणी तरी प्राण ओतल्यासारखें वाटतें. त्या काळच्या घडामोडींची रंगभूमि अगदीं आपल्यासमोर उभी राहते आणि अगदीं आपल्यासारखींच जिवंत, एकमेकांवर प्रेम करणारीं किंवा एकमेकांचा द्वेवादावा करणारीं माणसेंच त्या रंगभूमीवर वावरत आहेत असा भास होतो. नुकतीच प्राचीन जपानांतील एका मोठ्या गोड स्त्रीची हकीकत माझ्या वाचण्यांत आली. तिचें नांव मुराकासी. शेंकडों वर्षांपूर्वी, त्या यादवीच्या युद्धांबद्दल मीं लिहिलें ना, त्यापूर्वी किती तरी प्राचीन काळीं ही स्त्री होऊन गेली. जपानच्या बादशहाच्या दरबारांत आपलें जें आयुष्य गेलें त्याचा बराच लांबलचक वृत्तांत या स्त्रीनें लिहिलेला आहे. त्यामधील कित्येक उतारे वाचीत असतांना, त्यांतील त्या जागोजागच्या मधुर वर्णनांच्या सूक्ष्म छटा, ते घरगुती

वातावरणांतील प्रेमसंबंध व त्या अगदीं अंतरंगांतल्या हकीकती आणि दरबारांतील ते कित्येक निरर्थक फाजिल चाळे व खटपटी-लटपटी वाचीत असतांना ही मुरासाकी-बाई खरोखरच माझ्यापुढेंच उभी आहे असा मला भास झाला आणि प्राचीन जपानच्या दरबारांतील त्या मर्यादितच परंतु मोठ्या कलाकुसरीनें युक्त अशा जगाचें हुबेहूब चित्र माझ्या डोळ्यांपुढें उभें राहिलें!

## ८२

## धुमाकुळांत सांपडलेलें यूरप खंड

*४ ऑगस्ट, १९३२*

अलीकडे पुष्कळ दिवसपर्यंत हीं पत्रें लिहिण्याचें काम माझ्या हातून झालें नाहीं. मागचें पत्र लिहिलें त्याला आतां दोन आठवडे झाले असतील. तुरुंगांत माणसाचें मन पुष्कळदां उदास आणि मंद, उद्विग्न आणि विषण्ण होत असतें. तुरुंगांतच कां, तसें पाहिलें तर बाहेरच्या जगांत सुद्धां माणसाची अधूनमधून अशी अवस्था होते. त्यामुळें अलीकडे माझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला पाह्यला न मिळणारीं हीं पत्रें लिहिण्याकडे माझें मनच जाईनासें झालें आहे. एक जागीं टांचून केव्हां तुझी दृष्टि त्यांच्यावर पडेल याची वाट पाहत दिलीं आहेत ठेवून बिचारीं बाजूला; मग तो क्षण यायला काय कांहीं महिने लागणार आहेत का कांहीं वर्षें लागणार आहेत, कोणीं सांगावें? शिवाय कांहीं महिन्यांनीं किंवा कांहीं वर्षांनीं तरी काय? जेव्हां केव्हां आपली भेट होईल आणि आपण एकमेकांना डोळे भरून नीटपणें पाहूं, भेटूं त्या वेळीं कोणाला ठाऊक तूं केवढी आजीबाई झालेली असशील आणि किती बदललेली असशील! तसेंच त्या भेटीच्या वेळीं व नंतरही आपल्याला इतकें बोलायचें असेल आणि इतक्या कांहीं गोष्टी करायच्या असतील, कीं या पत्रांकडे लक्ष देण्याला तुला फुरसद सुद्धां नाहीं व्हायची. बरें, तोंपर्यंत पत्रें तरी काय थोडकीं का राहणार आहेत? लहानसा डोंगरच होईल त्यांचा एक तोंपर्यंत आणि माझ्या तुरुंगांतील जीवनाच्या किती तरी तासांचा उद्योग त्यांमध्यें सांठून ठेवलेला असेल.

तरी पण हीं पत्रें पुढेंही लिहीत राह्यचें आणि लिहून झालीं आहेत त्यांत भर टाकीत राह्यचें मीं ठरविलें आहे. कोणीं सांगावें? आवडतील सुद्धां एखादे वेळीं तुला तीं! निदान माझ्या मनाला तरी त्यांची चांगलीच करमणूक होत असते.

अलीकडे कांहीं काळ आपण आशिया खंडांतं वावरत आलों. इकडे हिंदुस्थान, मॅलेशिया, चीन आणि जपान यांमध्यें जाऊन या खंडांचा इतिहास आपण पाहत आलों. तिकडे दुसऱ्या बाजूस यूरप खंड नुकतें कोठें आतां जागें होऊं लागलें होतें

आणि त्याचा इतिहास थोडासा लक्ष देण्याजोगा होऊं लागला होता, तोंच एकाएकीं यूरप खंड सोडून आपण इकडे आलों. यूरपमध्यें या वेळीं रेनेसान्स म्हणजे पुनरुज्जीवन झालें. खरें म्हटलें म्हणजे त्या वेळीं यूरपचा नवाच जन्म झाला असें म्हणणें अधिक बरोबर होईल. कारण सोळाव्या शतकामध्यें यूरप खंडाचें जें स्वरूप निर्माण झालें, तें पूर्वीच्या काळच्या कोणत्याही अवस्थेशीं सारखें किंवा जुळण्याजोगें नव्हतें. हें स्वरूप सर्वतोपरी अगदीं नवीन होतें; आणि जुन्याचा त्यांत कांहीं भाग होता असें म्हटलेंच, तर त्यावर संपूर्ण नवीन आवरण पडून मूळचा भाग पार झांकून टाकण्यांत आला होता एवढें तरी खासच.

यूरप खंडांत या काळांत जिकडे तिकडे धुमाकूळ, अस्वस्थता माजलेली आढळते. जणुं कांहीं एखाद्या कोंडलेल्या जागेच्या सभोंवतालचें आवरण फुटून जाऊन आंतलें सगळें कांहीं उसळून बाहेर पडत आहे, अशी स्थिति तेथें झाली होती. कितीक शतकें सरंजामशाहीच्या पद्धतीवर आधारलेल्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेखालीं यूरप खंड दडपून गेलेलें होतें. इतकी कडक पकड या व्यवस्थेची त्यावर पडलेली होती, कीं वरच्या या कवचाच्या दडपणामुळें कांहीं काळ यूरपची वाढच बंद झाली! परंतु या कवचाला आतां पुष्कळ ठिकाणीं चिरा पडूं लागल्या होत्या. कोलंबस, वास्को-डि-गामा आणि जलमार्ग शोधून काढणारे प्रारंभींचे इतर लोक हे हें कवच फोडून बाहेर पडले. पूर्वेकडून व अमेरिकेंतून स्पेन आणि पोर्तुगाल यांमध्यें जी पाहतां पाहतां अकल्पित प्रचंड संपत्ति जमा झाली, तीमुळें यूरपचे डोळे फिरून गेले आणि पूर्वीच्या समाजव्यवस्थेंत होऊं घातलेला बदल फार लौकर घडून आला. आपल्या आजूबाजूच्या समुद्राच्या पलीकडे आतां यूरपची नजर फाकली आणि त्या ठिकाणीं जागतिक दृष्टिकोण उत्पन्न झाला. जागतिक व्यापार आणि जागतिक सत्ता यांच्या मोठ्या मोठ्या कल्पना यूरपच्या नजरेसमोर नाचूं लागल्या. धनिकवर्ग अधिक बलिष्ठ होत गेला आणि पश्चिम यूरपला सरंजामदारशाहीची अधिकाधिक अडचण वाटूं लागली.

सरंजामशाही ही खरोखर आतां प्रचलित काळाच्या दृष्टीनें निरुपयोगी प्रथा झालेली होती. या पद्धतीचा खरा गाभा म्हणजे शेतकऱ्यांची निर्लज्जपणें पिळणूक करायची हा होता. सक्तीची बिगारवेठ, विनावेतन मजुरी, जमीनमालकाला द्यावे लागणारे नाना तऱ्हेचे खास कर आणि वसूल हे सर्व या पद्धतीचे विशेष असून न्याय करण्याचा सगळा अधिकार हापण खुद्द जमीनमालकाकडेच असे. यामुळें शेतकरीवर्गाचे हाल इतके वाढले, कीं शेतकऱ्यांचीं बंडें आणि युद्धें वारंवार होऊं लागलीं हें आपण पाहिलेंच आहे. शेतकऱ्यांचीं हीं बंडें दिवसेंदिवस वाढत्या प्रदेशांवर आणि पुनः पुनः होऊं लागलीं. यूरपच्या पुष्कळशा भागांत आर्थिक क्रांति होऊन जुन्या सरंजामदारवर्गाच्या ठिकाणीं नवीन मध्यमवर्ग अथवा धनिकवर्ग प्रस्थापित झाला व ही क्रांति या शेतकऱ्यांच्या बंडांनीं आणि जॅक्वेरींनींच घडवून आणली.

पण हे सर्व फेरफार चुटकीसारखे घडून आले अशी मात्र चुकीची समजूत करून

घेऊं नको. हें घडून येण्याला पुष्कळ मोठा कालावधि लागला आणि त्यापूर्वी यूरपमध्यें कित्येक दशकें आपसांत यादवी माजून राहिली. या आपसांतील लढायांमुळें यूरपच्या पुष्कळ मोठ्या भागाचा तर पार नाश झाला. या काळांतील यादवींत शेतकऱ्यांचीं युद्धें हीं तर होतींच; परंतु त्यांच्या जोडीलाच प्रॉटेस्टंट आणि कॅथॉलिक या पंथांमधील धार्मिक युद्धेंही होतीं. नेदरलंड्स्मध्यें झालें त्याप्रमाणें राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं झालेलीं युद्धेंही होतीं आणि धनिकशाहीचें राजाच्या अनियंत्रित सत्तेविरुद्ध चाललेलें बंडही त्यांत होतें असें आपल्याला आतां दिसेलच. हा सगळा नुसता गोंधळ आहे असें वाटतें, नव्हे! खरेंच आहे; या सर्व धुमाकुळाचा इतिहास गुंतागुंतीचा आणि भानगडीचाच आहे. परंतु त्यांतही मोठे मोठे प्रसंग आणि चळवळी यांचें जर आपण निरीक्षण केलें, तर या धुमाकुळीचीही कांहीं थोडीशी स्पष्ट कल्पना आपल्याला येऊं शकेल.

यांत पहिली गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही, कीं शेतकरीवर्गाची फारच खालावलेली आणि दैन्यमय हालाची अवस्था झालेली असून त्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांचीं युद्धें चालू झालेलीं होतीं. दुसरी गोष्ट आपण लक्षांत ठेवावयाची म्हणजे धनिकवर्गाचा उदय होऊन उत्पादनाच्या शक्ती वाढल्या होत्या. निरनिराळ्या वस्तू निर्माण करण्यासाठीं अधिकाधिक मजूर लावले जात होते आणि व्यापारउदीम वाढूं लागला होता. तिसरी गोष्ट लक्षांत ठेवावयाची म्हणजे ख्रिस्ती धर्मपीठ हेंच सगळ्यांत मोठ्यांत मोठें जमीनमालक-सरंजामदार झालेलें होतें. अशा रीतीनें जमिनीमध्यें धर्मपीठाचे प्रचंड हितसंबंध गुंतलेले असल्यामुळें सरंजामशाही अशीच चालू राहावी असें करण्याच्या पक्षालाच धर्मपीठ स्वाभाविकपणें फार मोठ्या प्रमाणावर वळलेलें होतें. ज्यामुळें धर्मपीठाची पुष्कळशी संपत्ति आणि मालमत्ता नाहींशी झाली असती, असा कोणताही आर्थिक फेरबदल घडून आलेला धर्मपीठाला नको होता. त्यामुळें रोममध्यें जेव्हां धार्मिक बंड उभें राहिलें तेव्हां त्याचा यूरपांतील आर्थिक क्रांतीशीं चांगलाच जोड जमला.

या आर्थिक क्रांतीच्या सोबतच किंवा तिच्या पाठीमागें लगोलग सामाजिक, धार्मिक, राजकीय बाबतींत हरएक दिशेनें फेरबदल घडून आले. जरा दूर अंतरावरूनच सोळाव्या आणि सतराव्या शतकांतील यूरप खंडाच्या जास्तींत जास्त भागावर एकदम जर तूं नजर टाकलीस, तर या काळांतील त्या सर्व घडामोडी आणि चळवळी आणि हालचाली या कशा सर्व एकसूत्री आणि परस्परांशीं निगडित होत्या हें तुला दिसून येईल. इतिहासामध्यें सामान्यतः त्या काळच्या तीन मोठ्या चळवळींवर भर देण्यांत येत असतो. ज्ञान व कला यांचें पुनरुज्जीवन (रेनेसान्स); धार्मिक सुधारणा (रेफर्मेशन) आणि क्रांति (रेव्होल्यूशन). परंतु या सर्वांच्या पाठीमागें आर्थिक दैन्यावस्था आणि बंडाळी होती हें तूं नीट लक्षांत ठेव. त्यांतूनच आर्थिक क्रांति घडून आली आणि तीच या सर्व फेरबदलांत सर्वांत अधिक महत्त्वाची होय.

रेनेसान्स म्हणजे ज्ञानाचें पुनरुज्जीवन; यूरपीयन देशांमध्यें कला, शास्त्रें, वाङ्मय

आणि भाषा यांच्यामध्यें झालेली वाढ. रेफर्मेशन म्हणजे रोमन धर्मपीठाविरुद्ध झालेलें बंड; एका दृष्टीनें हें धर्मपीठाच्या अनाचाराविरुद्ध लोकांचें बंड होतें; दुसऱ्या दृष्टीनें हें पोपचा जो सर्व राजामहाराजांवर अधिकार चालविण्याचा प्रयत्न सुरू होता, त्याविरुद्ध राजामहाराजांनीं केलेलें बंड होतें; तर आणखी एका दृष्टीनें धर्मपीठाची सुधारणा करण्यासाठीं हा एक आंतल्या बाजूनेंच झालेला प्रयत्न होता. रेव्होल्यूशन म्हणजे धनिकवर्गाचा राजाची सत्ता नियंत्रित करून त्याच्यावर आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठीं झालेला राजकीय झगडा.

या सर्व चळवळींच्या पाठीमागें आणखी एक कारण होतें; तें म्हणजे छापण्याची कला. कागद तयार करण्याची कला प्रथम आरब लोक चिनी लोकांपासून शिकले व नंतर या आरबांपासून यूरप खंडांत ती कला आली हें तुझ्या लक्षांत असेलच. परंतु कागद भरपूर आणि स्वस्त मिळूं लागण्यास मात्र फार काळ लागला. पंधराव्या शतकाच्या अखेरीला यूरपमध्यें निरनिराळ्या ठिकाणीं, हॉलंड, इटली, इंग्लंड, हंगेरी वगैरे देशांत पुस्तकें छापण्याची सुरुवात झाली. कागद आणि छपाई ही घरोघरची गोष्ट होण्यापूर्वी जगाची काय अवस्था असेल, याचा विचार करून पाहा. पुस्तकें-कागद, छपाई यांची इतकी कांहीं आपल्याला संवय होऊन गेलेली आहे, कीं त्या, शिवायचें जग असेल तरी कसें, याची आपल्याला कल्पना सुद्धां करणें फार कठिण पडतें. छापलेलीं पुस्तकें नसलीं म्हणजे बहुसंख्य लोकांना नुसतें लिहायला आणि वाचायला एवढें शिकविणें हें सुद्धां जवळजवळ अशक्य होतें. अशा काळीं मग ग्रंथांच्या नकला सगळ्या हातानें करण्याचा खटाटोप करावा लागावयाचा; अर्थातच असे ग्रंथ फारच थोड्या लोकांच्या संग्रहाला असावयाचे. शिक्षण स्वाभाविकच तोंडी व्हावयाचें आणि जें शिकावयाचें तें सर्व पाठ करावें लागावयाचें. हा प्रकार अजूनही तुला कांहीं कांहीं जुन्या पद्धतीच्या मक्तबांमध्यें किंवा पाठशाळांमध्यें चालू असलेला आढळेल.

कागद आणि छपाई हीं येतांक्षणींच फार प्रचंड फेरबदल घडून येतो. छापील पुस्तकें – शालेय आणि इतरही – आतां मिळूं लागतात. लौकरच लिहितां-वाचतां येणारांची संख्या पुष्कळ वाढते. लोक जों जों अधिकाधिक वाचूं लागतात, तों तों ते अधिकाधिक विचारसंपन्न होतात. (अर्थातच हें विधान विचारसंपन्न पुस्तकांच्या वाचनाला लागू आहे. आजकाल प्रसिद्ध होणाऱ्या पुष्कळशा भिकार पुस्तकांच्या वाचनाला नव्हे.) मनुष्य जों जों अधिकाधिक विचार करूं लागतो, तों तों प्रचलित परिस्थितीचें तो निरीक्षण करूं लागतो, तिच्या गुणदोषांची चर्चा करूं लागतो आणि पुष्कळदां याचा परिणाम म्हणजे मनुष्य प्रचलित अवस्था अमान्यही करूं लागतो. अज्ञानी मनाला नेहमीं फेरफाराचें भय वाटत असतें. अज्ञाताचें त्याला भय वाटतें आणि चालत आलेली चाकोरी किंतीही दैन्यवाणी असली, तरी तिलाच तें चिकटून राहतें; परंतु चांगल्या वाचनाबरोबर थोड्याफार प्रमाणांत माणसाचें मन ज्ञानयुक्त होतें आणि माणसाचे डोळे अंशतः तरी उघडतात.

कागद आणि छपाई यांच्या योगानें यूरप खंडाचे डोळे अशा रीतीनें उघडले. या गोष्टीचा फार प्रचंड उपयोग आपण वर विचार करीत असलेल्या त्या मोठमोठ्या चळवळींना झाला. अगदीं प्रारंभीं छापलेल्या पुस्तकांत बायबलच्या निरानिराळ्या भाषांतील आवृत्त्या होत्या. त्यामुळें अद्यापपर्यंत जे पुष्कळ लोक बायबलची लॅटिन आवृत्ति कानानें नुसती ऐकत, परंतु जिचा त्यांना कांहींच अर्थ समजत नसे, अशा पुष्कळ लोकांना आपआपल्या भाषेंत बायबल वाचावयाला मिळूं लागलें. या वाचनामुळें त्यांच्यामध्यें कित्येकदां चांगली विवेचक बुद्धि निर्माण झाली आणि पाद्री लोकांची त्यांना गरज लागत नाहींशी झाली. पाद्री लोकांचें त्यांच्या मनावरील वर्चस्व नाहींसें झालें. शालेय पुस्तकांची पण आतां खूप संख्या वाढली. या वेळेपासून यूरपमधील निरनिराळ्या भाषांची फार झपाट्यानें वाढ झाली असें आढळून येतें. आतांपर्यंत लॅटिन भाषेच्या छायेखालीं या सर्व भाषा खुरटलेल्या होत्या.

या काळचा यूरपचा इतिहास श्रेष्ठ पुरुषांच्या नांवानें नुसता भरून गेलेला आहे. त्यांपैकीं कांहीं कांहींशीं आपली यापुढें गांठ पडणार आहे. कोणतेही देश किंवा खंड जेव्हां प्रगतीला प्रतिबंध करणारें कवच फोडून बाहेर पडतात, तेव्हां ते अनेक दिशांनीं पुढें धांव घेत असतात. यूरपांतही आपल्याला हाच प्रकार आढळून येतो. त्या काळच्या आर्थिक आणि इतर फेरबदलांमुळें या काळच्या यूरपचा इतिहास अत्यंत मनोरंजक आणि बोधप्रद झालेला आहे. याच काळांतील हिंदुस्थानच्या इतिहासाशीं किंवा वाटल्यास चीनच्यासुद्धां इतिहासाशीं या इतिहासाची तुलना करून पाहा. सांगितलेंच आहे मीं तुला, कीं हे दोन्ही देश या काळीं पुष्कळ बाबतींत यूरपच्या पुढें होते. परंतु त्या काळच्या यूरपच्या चैतन्ययुक्त अशा इतिहासाशीं ताडून पाहतां या देशांचा इतिहास किती निष्क्रिय किंवा कर्तृत्वशून्य वाटतो! हिंदुस्थानांत व चीनमध्यें या काळींही मोठे राजे आणि श्रेष्ठ पुरुष आढळतात आणि उच्च दर्जाची संस्कृति आढळते; परंतु त्यांच्यामधील, विशेषतः हिंदुस्थानांतील सामान्य जनता अगदींच तेजहीन आणि निष्क्रिय आढळते. त्यांच्यावर एक जाऊन दुसरे कोणीही राज्यकर्ते आले तरी त्यांचें त्यांना कांहींच वाटत नाहीं; कोणापुढेंही ते मान वांकवितांना आढळतात. त्यांचा सर्व दमच उखडल्यासारखा दिसतो आणि हुकूम मानण्याची त्यांना इतकी संवय लागलेली होती, कीं कोणत्याही सत्तेशीं विरोध मांडण्याचें त्यांचें सामर्थ्यच खलास झालें होतें असें दिसतें. त्यामुळें या देशांचा इतिहास, मधूनमधून जरी त्यांत कांहीं मनोरंजक प्रसंग आले, तरी राजेलोक आणि त्यांच्या दरबारी हकीकती यांनींच बहुतेक सारा भरलेला असून त्यांमध्यें जनतेच्या चळवळींचा कांहीं मागमूस नाहीं. चीनच्या बाबतींत हें विधान संवीशानें खरें आहे कीं नाहीं हें मी सांगूं शकत नाहीं; परंतु हिंदुस्थानच्या बाबतींत मात्र गेल्या कितीएक शतकांच्या इतिहासाला हें वर्णन लागू आहे आणि हिंदुस्थानची जी जी कांहीं दुरवस्था या काळांत होत आली किंवा जीं संकटें हिंदुस्थानमध्यें उभीं राहिलीं, त्या सर्वांच्या मुळाशीं आमच्या सामान्य जनतेची ही असमाधानकारक अवस्था आहे.

हिंदुस्थानातील आणखी एक प्रवृत्ति लक्षांत घेतली पाहिजे; ती म्हणजे आमच्या लोकांची नजर सारखी भूतकाळाकडे वळलेली आहे; भविष्यकाळाकडे नव्हे. आम्ही मागें केवढ्या उंचीवर चढलों होतों यांत आमचें लक्ष गुंतलें आहे; यापुढें आपल्याला केवढ्या उंचीवर चढण्याची आशा करावयाची इकडे नव्हे. यामुळें आमचे लोक गतकालच्या आठवणी काढून नुसते हळहळत बसले आणि पुढच्या मार्गावर चालण्याची कांहीं हालचाल करण्याऐवजीं जो कोणी येऊन दमदाटी करील, त्याचे हुकूम पाळीत राहिले! एंकदरींत खोल विचार केला, तर साम्राज्यें जीं टिकतात तीं स्वतःच्या सामर्थ्याच्या बळावर टिकत नसून ज्यांच्यावर तीं सत्ता गाजवीत असतात त्या लोकांच्या गुलामी मनोवृत्तीवरच तीं टिकत असतात.

## ८३

## रेनेसान्स अथवा ज्ञानयुग

५ ऑगस्ट, १९३२

साऱ्या यूरप खंडभर जी ही सगळी धामधूम पसरली आणि लोकांना जे हाल सोसावे लागले त्यांतूनच रेनेसान्सचें, ज्ञानयुगाचें, सुंदर फूल जन्मास आलें. हें फूल उमललें प्रथम इटलीच्या भूमीमध्यें; पण त्याला चैतन्य आणि खतपाणी कितीएक शतकांपूर्वी होऊन गेलेल्या प्राचीन ग्रीक संस्कृतीपासूनच मिळालें होतें. ग्रीसपासूनच या ज्ञानयुगानें सौंदर्याची भक्ति उचलली; परंतु ग्रीकांची सौंदर्यदृष्टि शारीरिक आकृती-विषयीं विशेष होती. तिच्यामध्यें या ज्ञानयुगानें मानवी मन आणि बुद्धि व चैतन्य यांच्या ठिकाणच्या जास्त मनोवेधक आणि परिणामकारक अशा भावरूप सौंदर्याची भर घातली. ज्ञानयुगाची ही वाढ शहरी वातावरणांत झाली; ज्ञानयुगाची जोपासना इटलीच्या उत्तरेकडील शहरांच्या आश्रयानें झाली. विशेषतः फ्लॉरेन्स शहर हें तर ज्ञानयुगाचें प्रारंभींचें माहेरघरच होतें.

फ्लॉरेन्समध्यें यापूर्वीच तेराव्या आणि चौदाव्या शतकांत डांटे आणि पेट्रार्क हे इटालियन भाषेतील महान् कवी निर्माण होऊन गेले होते. मध्य युगांत फ्लॉरेन्स शहर हें सर्व यूरप खंडाचें आर्थिक व्यवहाराचें मुख्य केंद्रस्थान होतें. मोठमोठे सावकार सगळे त्या ठिकाणीं एकत्र आलेले होते. श्रीमंत लोकांचें तें एक प्रजासत्ताक राज्य होतें; मात्र हे लोक आचरणानें कांहीं फारसे भले लोक नव्हते. आपल्यांतीलच श्रेष्ठ लोकांना पुष्कळदां हे लोक वाईट रीतीनें वागवीत असत. 'चंचल फ्लॉरेन्स', 'मायावी फ्लॉरेन्स' असें नांवच फ्लॉरेन्सला मिळालेलें आहे. अशा रीतीनें या शहरामध्यें सावकार व झोंड आणि जुलुमी लोक यांची गर्दी असूनही पंधराव्या

शतकाच्या उत्तरार्धांत त्या ठिकाणीं लिओनार्डो डि व्हिन्सी, मायकेल अँजेलो आणि राफेल हे तीन नामांकित गृहस्थ उदयास आले; हे तिघेही श्रेष्ठ दर्जाचे कलावंत आणि चित्रकार होते. लिओनार्डो आणि मायकेल अँजेलो हे अन्य दृष्टीनेंही श्रेष्ठ होते. मायकेल अँजेलो हा फारच बहादर मूर्तिकार होता; संगमरवरी फत्तरामधून कापून कोरून त्यानें केवढाले प्रचंड पुतळे तयार केले; तसाच तो फार मोठ्या दर्जाचा शिल्पी आणि स्थापत्यशास्त्रज्ञही होता; रोममधील तें भव्य सेंट पीटरचें कॅथेड्रल पुष्कळ अंशीं त्याच्याच योजनेप्रमाणें बांधलेलें आहे. फार म्हातारा होईपर्यंत, जवळजवळ नव्वद वर्षांचा होईपर्यंत, तो जगला आणि अगदीं शेवटीं त्यानें देह टाकला त्या दिवसापर्यंत जवळजवळ तो सेंट पीटरच्या कॅथेड्रलच्या बांधकामावर हजर होता. परंतु मनानें मात्र तो कष्टी, असुखी, होता; सृष्टींत डोळ्यांपुढें दिसणाऱ्या वस्तूंच्या वर-वरच्या स्वरूपामार्गे कांहींतरी असावें असें वाटून त्याच्या शोधासाठीं जन्मभर त्याची धडपड चाललेली होती; सदैव त्याच्या मनांत विचारांची तळमळ चाललेली असे आणि नित्य कांहीं ना काहीं अचाट कार्य करून दाखवावें अशा प्रयत्नांत तो असे. "मनुष्य चित्र काढतो तें डोक्यानें काढीत असतो, हातांनीं नव्हे," असें तो एकदां म्हणाला होता.

लिओनार्डो हा या तिघांत सर्वांत वडील आणि पुष्कळ प्रकारांनीं या सर्वांमध्ये अधिक आश्चर्यकारक मनुष्य होता. आपल्या काळचा तो सर्वांत श्रेष्ठ असा नामांकित गृहस्थ होऊन गेला हें निःसंशय; आणि हें लक्षांत ठेव कीं हा काळ एकंदरच श्रेष्ठ माणसांचा काळ होता; वासरांत लंगडी गाय शहाणी अशांतला कांहीं हा प्रकार नव्हता. लिओनार्डो हा जसा श्रेष्ठ चित्रकार आणि मूर्तिकार होता त्याचप्रमाणें तो एक महान् तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञही होता. प्रत्येक वस्तूचें मूळ स्वरूप, मूळ कारण शोधून काढण्यासाठीं त्याचे नित्य प्रयोग चाललेले असत, नित्य अत्यंत खोल चिंतन चाललेलें असे; अशा रीतीनें आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा पाया घालणाऱ्या महान् शास्त्रज्ञांपैकीं तो अगदीं पहिला शास्त्रज्ञ होऊन गेला. तो म्हणे, "दयाळू निसर्गानें अशी व्यवस्था करून ठेवली आहे कीं जगतांत तुम्ही पाहाल तेथें नवीन कांहीं तरी शिकण्याची तुम्हांला संधि मिळावी." त्याची सगळी विद्या त्यानें केवळ आपल्या स्वतःच्या प्रयत्नानें मिळविलेली होती. तिसाव्या वर्षी त्यानें लॅटिन भाषा आणि गणित यांचा अभ्यास कोणाच्याही मदतीशिवाय स्वतःचा स्वतःच करण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणें यंत्रशास्त्रांतही चांगल्या प्रकारें नैपुण्य मिळवून तो श्रेष्ठ दर्जाचा एंजिनिअरही झाला, आणि शरीरांतील रुधिराभिसरणाचा शोध त्यानें प्रथम लावला. शरीराच्या रचनेवर तो अतिशय मोहून जात असे. तो म्हणे, "अयोग्य आचार करणाऱ्या आणि बुद्धिविहीन अशा रानगट माणसांच्या ताब्यांत मानवी शरीरासारखें इतकें सुंदर यंत्र, इतक्या गुंतागुंतीची शारीरिक साधनसामग्री मुळींच देतां उपयोगी नाहीं. त्यांची तेवढी खरोखर पात्रताच नाहीं. त्यांच्या शरीरांत फक्त अन्न आंत

घेण्याला आणि बाहेर टाकायला एक पिशवी असावी म्हणजे झालें. कारण हीं माणसें म्हणजे केवळ अन्ननलिकाच होत; दुसरी कसलीही त्यांची योग्यताच नाहीं!" लिओनार्डो हा स्वतः शाकाहारी असून प्राण्यांवर त्याचें फार प्रेम होतें. बाजारांत जाऊन पिंजऱ्यांत कोंडलेले पक्षी खरेदी करावयाचे आणि ते ताबडतोब सोडून द्यावयाचे असा त्याचा नित्याचा क्रम होता.

लिओनार्डोंचा सगळ्यांत अचंबा वाटण्याजोगा प्रयत्न म्हणजे तो हवेंत उडण्याचा प्रयत्न. या प्रयत्नांत त्याला यश आलें नाहीं; परंतु यशाच्या मार्गावर त्यानें याही बाबतींत पुष्कळच प्रगति केली होती. परंतु त्याची उपपत्ति आणि प्रयोग यांचा फायदा घेऊन हें काम पुढें चालू ठेवायला कोणीच मिळालें नाहीं. लिओनार्डोंच्या पाठीमागें त्याच्याचसारखे आणखी दोन जरी लिओनार्डो निघते, तरी आधुनिक जगांतील हवाई जहाज – विमान – २००-३०० वर्षांपूर्वीच शोधून काढण्यांत आलें असतें. हा लोकविलक्षण आणि महान् श्रेष्ठ पुरुष इ. स. १४५२ पासून १५१९ पर्यंत होऊन गेला. त्याचें सगळें आयुष्य म्हणजे "निसर्गाशीं संभाषणच होतें" असें म्हटलें जातें. नित्य तो नवे नवे प्रश्न उपस्थित करीत असे आणि प्रयोग करून त्या प्रश्नांचीं उत्तरें शोधून काढण्याचा प्रयत्न करीत असे. एकसारखी त्याची पुढें उडी असे; भविष्यकाळ हातांत पकडण्यासाठीं त्याची धडपड असे.

फ्लॉरेन्सच्या या तीन गृहस्थांविषयीं लिहितांना लिओनार्डोबद्दल मीं विशेष अधिक लिहिलें आहे; कारण तो माझा एक आवडता पुरुष आहे. फ्लॉरेन्सच्या या प्रजासत्ताक राज्याचा इतिहास विशेषसा आनंददायक किंवा अभिमान वाटण्यासारखा नाहीं; कारण त्यांत कपटकारस्थानें, जुलमी अधिकारी आणि लुच्चे राजे यांचेंच सारें भरताड आहे. पण असें असूनही फ्लॉरेन्सनेंच या अनेक श्रेष्ठ पुरुषांना जन्म दिला यासाठीं फ्लॉरेन्सचें पुष्कळसें पाप आपण माफ केलें पाहिजे; त्या शहरांत सावकारांना स्थान मिळालेलें होतें इकडे सुद्धां आपण दुर्लक्ष केलें पाहिजे. फ्लॉरेन्सच्या या श्रेष्ठ सुपुत्रांची सांवली आजही या शहरावर आहे; या सुंदर शहराच्या रस्त्यावरून चालत असतां अथवा शहराच्या बाजूनें आपल्या अनेक मध्ययुगीन पुलांखालून वाहत जाणाऱ्या आर्नो नदीवर नजर टाकली असतां आपण एक प्रकारें जादूनें भारल्यासारखे होऊन जातों आणि भूतकाळच चालताबोलता आणि स्पष्ट असा आपल्यापुढें उभा आहेसें वाटतें. डांटे आपल्या समोरून जातो आहे, तशीच त्याची प्रिया बिआट्रिस हीही आपल्या पाठीमागें आपल्या मधुर सुवासाचा मंदप्रवाह दरवळीत आपल्यापुढून जात आहे असा भास होतो; आणि असें वाटतें, कीं तो पहा तो लिओनार्डोंच विचारांत गढून गेलेला आहे, आणि निसर्ग आणि जीवन यांच्या गूढांबद्दल विवंचना करीत शहराच्या अरुंद रस्त्यावरून झपाझप चाललेला आहे.

अशा रीतीनें पंधराव्या शतकापासून इटलींत ज्ञानयुगाला बहर आला आणि तेथून पश्चिमेकडील इतर देशांकडे हा बहर पुढें पुढें पसरत गेला. मोठे मोठे कलावंत

दगड आणि पडदे यांच्यामध्ये जीव ओतूं लागले, चैतन्य निर्माण करूं लागले, त्यांच्या चित्रांनीं आणि मूर्तींनीं यूरप खंडांतील वस्तुसंग्रहालयें आणि चित्रसंग्रह गच्च भरून गेलेले आहेत. इटलीमध्यें मात्र सोळाव्या शतकाच्या अखेरीस कलांच्या पुनरुज्जीवनाला ओहोटी लागली. सतराव्या शतकांत हॉलंड देशांत महान् चित्रकार उदयास आले; त्यांमध्यें रेम्ब्रांट हा सर्वांत अधिक प्रख्यात आहे. स्पेनमध्येंही याच सुमारास व्हेलास्क्वेझ हा विख्यात चित्रकार होऊन गेला; पण जास्त नांवें मी तुला सांगत बसत नाहीं. कारण अशी ही यादी फारच मोठी होईल. हे श्रेष्ठ चित्रकार व मूर्तिकार कोणकोण होते हें पाहावेंसें तुला वाटलें, तर जरूर निरनिराळ्या संग्रहालयांतून जाऊन तूं त्यांच्या कलाकृती पाहा. त्यांच्या नुसत्या नांवांमध्यें कांहीं अर्थ नाहीं. आपल्या ठिकाणीं जर कांहीं नवीन चैतन्य किंवा नवा विचार किंवा सुखसंवेदना निर्माण व्हावयाची असेल, तर ती त्यांच्या कलेंतून आणि त्यांनीं निर्माण केलेल्या सौंदर्यांतूनच होणारी आहे; नुसत्या नांवांतून नव्हे.

याच काळांत, पंधरा ते सतराव्या शतकांमध्यें, शास्त्रीय ज्ञानानेंही हळूहळू प्रगति केली आणि त्याला एक मानाचें स्थान प्राप्त झालें. शास्त्रीय ज्ञानाचा धर्मपीठाशीं चांगलाच तीव्र झगडा झाला. लोकांनीं विचार करावा, प्रयोग करावे, या गोष्टीवर धर्मपीठाची श्रद्धा नव्हती. धर्मपीठाच्या कल्पनेप्रमाणें ही पृथ्वी हाच सगळ्या विश्वाचा मध्यबिंदु असून सूर्य हा त्याभोंवतीं फिरतो आणि तारे व चांदण्या आकाशामध्यें कायमच्याच एका एका जागीं बसविलेल्या आहेत, असें होतें. याहून निराळें जो कोणी बोलेल तो धर्मभ्रष्ट; इन्क्विझिशनच्या कोर्टाकडूनही त्याची चौकशी होण्याला तो पात्र. असें असूनही पोलंडमधील एक रहिवासी कोपरनिकस यानें धर्मपीठाची ही कल्पना अमान्य केली आणि पृथ्वीच सूर्याभोंवतीं फिरत असते ही गोष्ट सिद्ध केली. अशा रीतीनें विश्वासंबंधींची आधुनिक जगाची जी उपपत्ति आहे, तिचा पाया कोपरनिकसनें घातला. हा इ. स. १४७३ पासून १५४३ पर्यंत होऊन गेला. त्याच्या या क्रांतिकारक आणि अधर्मी विचारामुळें धर्मपीठाचा त्याच्यावर खरें म्हणजे राग व्हावयाचा; परंतु कसा तरी तो त्यापासून बचावला. त्याच्यामागून आलेल्यांचें नशीब मात्र इतकें शिकंदर नव्हतें. ज्योर्डानो ब्रूनो या इटालियन गृहस्थाला, पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते आणि तारे हेही स्वतंत्र सूर्यच आहेत असा आग्रह धरल्याबद्दल इ. स. १६०० मध्यें जिवंत जाळण्यांत आलें. त्याचाच समकालीन, दुर्बिणीचा शोध लावणारा गॅलिलियो याच्यावरही धर्मपीठानें तीच पाळी आणली होती; पण तो ब्रूनोपेक्षां दुर्बळ ठरला. मरण्यापेक्षां आपलें मतच परत घेगें बरें, असें त्यानें ठरविलें. म्हणून त्यानें धर्मपीठापुढें असें कबूल केलें, कीं "आपली चूक झाली; पृथ्वी हीच खरोखर सर्व विश्वाचा मध्यबिंदु असून सूर्य हाच तिच्या भोंवतीं फिरत असतो." इतकें सगळें करूनसवरूनसुद्धां त्याला तुरुंगांत राहून आपल्या पापाचें प्रायश्चित्त भोगावेंच लागलें.

सोळाव्या शतकांतील प्रमुख शास्त्रज्ञांत हार्वे नावाचा एक शास्त्रज्ञ होऊन गेला. त्यानें अखेरीस रुधिराभिसरणाचा सिद्धांत प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविला. सतराव्या शतकामध्यें आपल्यापुढें शास्त्रीय जगतांतील एका अत्यंत श्रेष्ठ गृहस्थाचें नांव येतें; हा गृहस्थ म्हणजे ऐझाक न्यूटन हा होय. हा जसा शास्त्रज्ञ होता, तसाच मोठा गणितीही होता. ज्याला आपण गुरुत्वाकर्षणाचा नियम म्हणतों त्याचा — वस्तु अधांतरींच न राहतां खालीं कां पडतात याचा — त्यानें शोध लावला आणि त्यायोगें सृष्टीच्या उदरांतील एक रहस्य बाहेर काढलें.

ही शास्त्राबद्दलची हकिकत झाली. मग ती थोडी म्हण नाहीं तर पुष्कळ म्हण. या काळात वाङ्मयाची पण जोरानें प्रगति झाली. वातावरणांत जें नवीन चैतन्य निर्माण झालें होतें त्याचा नवीनचपणांत येऊं लागलेल्या यूरपीय भाषांवर फारच मोठ्या प्रमाणांत परिणाम झाला. या भाषा कांहीं अगदींच काल-परवां जन्माला आलेल्या होत्या असें नव्हे. जगांत कांहीं काळ त्या नांदत आलेल्या होत्या एवढेंच नव्हे, तर इटलींत यापूर्वीच महान् कवी त्या देशांतील भाषेंत निर्माण झालेले होते. इकडे इंग्लंडमध्यें चॉसर होऊन गेला होता. परंतु लॅटिन हीच सगळ्या शिक्षित लोकांची आणि धर्मपीठांची भाषा सर्व यूरपभर अजून होती आणि तिच्यापुढें या बाकीच्या सर्व भाषांचें तेज अगदींच फिकें पडत होतें. अजून त्यांचें स्वरूप ग्रामीण भाषांचें होतें; म्हणजे इंग्रजी भाषेंत ज्यांना व्हर्नाक्युलर्स म्हणतात, आणि जें नांव हिंदुस्थानांतील भाषांना आजही देण्याचें चमत्कारिक शहाणपण कांहीं लोक करीत असतात, तशा त्या भाषा होत्या. या भाषांत लिहिणें म्हणजे एक प्रकारें मोठेपणाला न शोभेसें समजलें जाई. परंतु वातावरणांतील तें नवें चैतन्य, तसेंच कागद व छपाई यांनीं या भाषांना जोरानें पुढें लोटलें. इटालियन भाषा प्रथम पुढें आली; तिच्या मागून फ्रेंच, इंग्रजी आणि स्पॅनिश भाषा या पुढें सरसावल्या आणि सगळ्यांच्या शेवटीं जर्मन भाषा. फ्रान्समध्यें तरुण ग्रंथकारांच्या एका गटानें आपल्या स्वतःच्या भाषेंतच लिहावयाचें; लॅटिनमध्यें लिहावयाचें नाहीं आणि आपली ग्रामीण भाषा इतकी सुधारावयाची कीं तिच्यामध्यें उत्तमोत्तम साहित्य लिहिलें जाण्याचें सामर्थ्य आलें पाहिजे, असा निश्चयच केला होता.

अशा रीतीनें यूरपांतील भाषांची प्रगति होत गेली; त्याच्यांतील संपन्नता आणि सामर्थ्य वाढत गेलें आणि आजकाल त्या केवळ्या सुंदर भाषा होऊन राहिल्या आहेत. उगीच खंडीभर प्रख्यात ग्रंथकारांची यादी मीं तुला देत बसत नाहीं. अगदी नमुन्यापुरतीं थोडीं नांवें तुला सांगतों. इंग्लंडमध्यें सुविख्यात शेक्सपिअर या काळांत झाला; त्याचा काळ इ. स. १५६४ ते १६१६. त्याच्या पाठोपाठच तेथें सतराव्या शतकांत **पॅरॅडाइझ लॉस्ट**चा आंधळा कवि मिल्टन हा होऊन गेला. फ्रान्समध्यें डेस्कार्टीस हा तत्त्वज्ञानी आणि मोलिअर हा नाटककार, दोघेही सतराव्या शतकांत होऊन गेले. पॅरिसमधील भव्य सरकारी नाटकगृह **कॉमेडी फ्रँकेज** हें मोलिअरनेंच स्थापन केलें

स्पेनमध्यें शेक्स्पिअरचा समकालीन सरव्हांटीस हा होता; त्यानें डॉन क्विक्झोट ही प्रसिद्ध कथा लिहिलेली आहे.

आणखी एका गृहस्थाचें नांव मी सांगणार आहें तें तो गृहस्थ खरोखर श्रेष्ठ होता म्हणून नव्हे, तर त्याचें नांव फार प्रसिद्धीला आलेलें आहे म्हणून. हा मनुष्य म्हणजे मॅकिव्हॅली. हाही फ्लॉरेन्सचाच राहणारा होता. पंधराव्या-सोळाव्या शतकांतला हा एक केवळ राजकारणी गृहस्थ होता. परंतु त्यानें लिहिलेलें 'दि प्रिन्स' हें पुस्तक फार प्रसिद्धीला आलेलें आहे. त्या काळच्या राजे लोकांच्या आणि राजकारणी पुरुषांच्या मनोभूमिकेचें या पुस्तकावरून आपल्याला थोडेंसें ओझरतें दर्शन होऊं शकतें. मॅकिव्हॅली म्हणतो कीं राज्याला धर्माची गरज आहे; पण लक्षांत ठेव आं नीट, ही गरज लोकांनीं सद्वर्तनी व्हावें यासाठीं त्याला वाटत नाहीं; तर लोकांवर राज्यकारभार चालविण्याला धर्माचा उपयोग होतो आणि लोक त्यामुळें दबून राहतात म्हणून! स्वतःला जरी धर्म असत्य वाटत असला तरी सुद्धां त्याला पाठिंबा देणें हें राजाचें त्याच्या मतें कर्तव्यच ठरतें. मॅकिव्हॅली लिहितो, "राजाला एकाच वेळीं मनुष्य आणि पशु, सिंह आणि कोल्हा अशा दोन्ही भूमिका वठवितां आल्या पाहिजेत. दिलेला शब्द पाळल्यामुळें जर आपल्या हिताविरुद्ध परिणाम होत असेल तर त्यानें तो शब्द पाळण्याचें कारण नाहीं; किंबहुना, तसा तो पाळणें त्याला शक्यच होणार नाहीं. मी तर असेंही म्हणण्याचें धाडस करतों कीं नेहमींच अगदीं प्रामाणिकपणानें राहणें हें मोठें गैरफायद्याचें होणारें आहे. उलट पक्षीं धार्मिक, श्रद्धाळू, दयाळू आणि भक्तिमान्, कर्मठ आपण आहों असा नुसता बाहेरून भास उत्पन्न करणें हें मात्र फार उपयोगाचें आहे. सद्गुणांच्या बाह्य देखाव्याइतकी दुसरी कोणतीही गोष्ट उपयुक्त नाहीं."

किती दुष्ट विचार आहेत नव्हे हे? त्याच्या मतें जितका मनुष्य अधिक पाजी, तितका तो राजा व्हायला अधिक लायक! त्या काळच्या यूरप खंडामध्यें सर्वसामान्यपणें राजे लोकांच्या मनोभूमिकेची जेथें ही अवस्था होती, तेथें त्या खंडांत एकसारखा बेचंदशाही धुमाकूळ माजून राहिला होता यांत कांहींच आश्चर्य नाहीं. पण इतक्या दूरच्या काळांत तरी कशाला जायला हवें? आजचीं साम्राज्यशाही राज्यें सुद्धां पुष्कळशीं या मॅकिव्हॅलीच्या राजाप्रमाणेंच वागतात कीं. त्यांचाही बाहेरचा देखावा सदाचरणाचाच असतो; पण त्याच्या आंत लोभ, क्रूरपणा आणि न्याय-अन्याय याबद्दलची पूर्ण बेफिकिरी याच गोष्टी असतात; वरच्या संस्कृतीच्या हातमोजाच्या आंत हिंस्र पशूच्या रक्तानें माखलेला पंजाच त्यांच्याहि ठिकाणीं आढळतो.

## ८४

# प्रॉटेस्टंट लोकांचें बंड आणि शेतकऱ्यांचीं युद्धें

८ ऑगस्ट, १९३२

पंधरा ते सतराव्या शतकापर्यंतच्या यूरप खंडाबद्दल मीं आतांपर्यंत तुला कित्येक पत्रें लिहिलीं आहेत. मध्ययुगाचा अंत, शेतकरीवर्गाची अत्यंत दैन्यावस्था, धनिक-वर्गाचा उदय, अमेरिका खंड आणि पूर्वेकडे जाण्याचे जलमार्ग यांचा शोध, यूरप खंडांतील कला, शास्त्रें आणि भाषा यांची प्रगति यांबद्दल आतांपर्यंत कांहीं कांहीं मीं तुला सांगितलेलें आहे; परंतु या काळच्या चित्राची संपूर्ण रूपरेखा द्यावयाची म्हटली, तर अजून पुष्कळच सांगावयाला हवें आहे. माझीं या मागचीं दोन पत्रें, तसेंच जल-मार्गांच्या शोधाबद्दलचें माझें पत्र, आज आतां लिहितों आहें तें हें पत्र आणि बहुधा यापुढचीं आणखीं एकदोन पत्रें हीं सगळीं यूरप खंडांतील या काळाबद्दलचींच आहेत हें लक्षांत घे. निरनिराळ्या चळवळी आणि घडामोडींबद्दल मी वेगळेंवेगळें लिहीत आहें; परंतु या सर्व चळवळी आणि घडामोडी सामान्यतः एकाच काळांत झालेल्या असून त्यांचा एकमेकांवर परिणामही घडून आलेला आहे.

ज्ञानयुगाचा आरंभ होण्यापूर्वीपासूनच रोमन धर्मपीठामध्यें आतल्या आंतच कुरघूर सुरू झालेली होती. यूरपांतील राजेलोक आणि सामान्य प्रजा दोघांनाही धर्मपीठाच्या जाचक सत्तेचें ओझें जाणवूं लागून ते तक्रार करूं लागले होते. कां हें ओझें मानावें, असा संशयही त्यांच्या मनांत उत्पन्न होऊं लागला होता. आठवतच असेल तुला, कीं बादशहा दुसरा फ्रेडरिक यानें तर पोपचरोबर चांगलाच वाद घातला होता आणि धार्मिक बहिष्कारालाही त्यानें दाद दिली नाहीं. संशय आणि अवज्ञा यांच्या या लक्षणामुळें राग येऊन या नवीन धर्मभ्रष्टतेचा चक्काचूर करून टाकावयाचा असा रोमन धर्मपीठानें निश्चय केला. याच उद्देशानें तीं इन्क्विझिशनचीं न्यायासनें निर्माण करण्यांत आलीं आणि सगळ्या यूरपभर कितीएक बिचाऱ्या निरपराध पुरुषांना धर्मभ्रष्ट – पाखंडी – ठरवून आणि स्त्रियांवर चेटकी असल्याचा आरोप ठेवून त्यांना जिवंत जाळण्यांत आलें. प्राग येथील हस याला लबाडीनें घेरण्यांत आलें व जाळण्यांत आलें आणि त्यानंतर हसाईट लोकांनीं, म्हणजे हसच्या बोहेमियांतील अनुयायांनीं, बंडाचें निशाण उभारलें. इन्क्विझिशननें वाटेल ते भयभीत करण्यासारखे प्रकार केले, तरीसुद्धां रोमन धर्मपीठाविरुद्ध निर्माण झालेल्या या बंडाच्या प्रवृत्तीचा बीमोड होऊं शकला नाहीं. ही प्रवृत्ति वाढतच गेली आणि धर्मपीठ हें एक मोठाथोरला जमीनदारच असल्यामुळें त्याच्याविरुद्ध शेतकऱ्यांमध्यें जी चीड उत्पन्न झालेली होती, तिचीही त्या प्रवृत्तींत भरच पडली. तसेंच पुष्कळ ठिकाणच्या राजेलोकांनींही स्वार्थी बुद्धीनें या बंडखोरीला प्रोत्साहनच दिलें. त्यांची मत्सरी, लोभी आणि पापी नजर धर्म-

पीठाच्या प्रचंड मालमत्तेकडे लागून राहिलेली होती. याच वेळीं छपाई सुरू होऊन पुष्कळ ग्रंथ आणि बायबलचीं भाषांतरें बाहेर पडलीं. या गोष्टीमुळें या धुमसत्या आगींत तेलच ओतल्यासारखें झालें.

अशा वेळीं सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला जर्मनींत मार्टिन लूथर हा जन्मास आला. हाच पुढें रोमन धर्मपीठाविरुद्ध झालेल्या महान् बंडाचा पुढारी व्हावयाचा होता. मार्टिन लूथर हा स्वतः एक पाद्री होता. त्यानें जेव्हां रोम येथील धर्मपीठांत समक्ष जाऊन तेथील ते अनाचार, लांचलुचपत आणि चैन पाहिली, तेव्हां त्याला अत्यंत तिटकारा आला. याबद्दलचाच तंटा माजून तो इतका वाढला, कीं त्यांतून रोमन धर्मपीठांत फूट होऊन दोन निरानिराळे विभाग झाले आणि पश्चिम यूरप खंडाचे धार्मिक आणि राजकीयही दृष्ट्या दोन परस्पर-विरोधी गट पडले. रशियांतील जुनें सनातन ग्रीक धर्मपीठ आणि यूरपचा पूर्वेकडील भाग हे या वादापासून अलिप्त राहिले होते आणि रोमच्या धर्मपीठाचाच जर विचार केला, तर तें स्वतः खऱ्या ख्रिस्ती धर्मविचारापासून खरोखर किती तरी वेगळें पडलेलें होतें.

अशा रीतीनें प्रॉटेस्टंट लोकांचें बंड उभें राहिलें. या लोकांना प्रॉटेस्टंट म्हणत यांचें कारण या लोकांनीं रोमन धर्मपीठाच्या कित्येक अचल धर्मसिद्धांतांना विरोध केला. या काळापासून पश्चिम यूरप खंडांत ख्रिश्चन धर्माचे दोन मुख्य पंथ होऊन राहिले आहेत. एक रोमन कॅथॉलिक आणि दुसरा प्रॉटेस्टंट; परंतु या प्रॉटेस्टंट लोकांमध्यें अनेक उपपंथ आहेत.

धर्मपीठाविरुद्ध ही जी चळवळ झाली तिलाच रेफर्मेशन किंवा धर्मसुधारणेची चळवळ असें म्हणतात. धर्मपीठाची सर्वाधिकारशाही आणि त्यामधील अनाचार याविरुद्ध हें मुख्यतः सर्वसामान्य प्रजेचें बंड होतें. या बरोबरच कित्येक राजेलोकांच्या मनांतून पोपचे जे आपल्यावरही अधिकार गाजविण्याचे प्रयत्न चाललेले होते, त्यांना खो द्यावा असेंही होतें. पोपनें आपल्या राजकीय कारभारांत ढवळाढवळ करावी या गोष्टीची त्यांना मनस्वी चीड आलेली होती. या धर्मसुधारणेच्या–रेफर्मेशनच्या–चळवळीचें आणखीही एक अंग होतें. तें म्हणजे कांहीं निष्ठावंत धर्मपीठाच्या सेवकांनीं–पाद्र्यांनींच–धर्मपीठांतील दोषांची आंतूनच सुधारणा करण्याचा चालविलेला प्रयत्न हें होय.

ख्रिस्ती धर्मपीठांतर्गत दोन मोठे संघ होते; एक फ्रान्सिस्कन संघ व दुसरा डॉमिनिकन संघ हे तुला आठवतच असतील. सोळाव्या शतकामध्यें मार्टिन लूथरचें सामर्थ्य वाढूं लागलें होतें, त्या सुमारास लोयोला येथील इग्नेशियस नांवाच्या स्पॅनिश गृहस्थानें आणखी एक संघ काढला. त्यानें या संघाचें नांव **सोसायटी ऑफ जीझस** जीझसचा संघ असें ठेवलें. या संघाच्या सभासदांना जेसुईट असें म्हणण्यांत येऊं लागलें. हे जेसुईट लोक चीनमध्यें आणि पूर्वेकडील प्रदेशाकडे आलेले होते हें मीं मागें सांगितलेंच आहे. हा जीझसचा संघ ही एक मोठी विलक्षण संस्था आहे. रोमन धर्मपीठ आणि पोप यांची सेवा करण्यासाठीं सर्वच्या सर्व आयुष्य वेंचणारे लोक


रोमन साम्राज्याविरुद्ध बंड
आजचीं प्रॉटेस्टंट पंथ स्वीकारला असलीं राज्यें
ब्रिटन
जर्मनी
बोहेमिया
पोलंड
हंगेरी
रोमन साम्राज्य
स्कॉटलंड
इंग्लंड
फ्रान्स
स्पेन

तयार करणें हा या संघाचा उद्देश होता. त्यांची शिकवणूक फार कडक असे आणि तींतून अत्यंत कर्तबगार आणि निष्ठावंत असे धर्मपीठाचे सेवक तयार होत असत. त्यांची धर्मपीठावर इतकी कांहीं श्रद्धा – निष्ठा – असे, कीं त्याच्या आज्ञा अगदीं डोळे झांकून निमूटपणें असें कां, तसें कां असा कांहीं विचार न करतां ते पाळीत असत आणि आपलें सर्वस्व धर्मपीठाला देऊन टाकीत असत. धर्मपीठाचा फायदा होईल अशी कोणतीही गोष्ट असली, तर तिच्यासाठीं ते हौसेनें वाटेल तो स्वार्थत्याग करावयाला तयार असत ; एवढेंच नव्हे, तर धर्मपीठाचें कार्य साधण्यासाठीं ते न्याय-अन्यायाचीही फिकीर करीत नसत. वाटेल तें पापकर्म करायलाही मागेंपुढें पाहत नसत अशीही त्यांची कीर्ति आहे. धर्मपीठाचें हित झालें म्हणजे झालें ; मग त्यासाठीं कांहीं केलें तरी तें न्याय्य आणि क्षम्य होय, अशी त्यांची विचारसरणी होती.

या विलक्षण धर्मसंघाचा रोमन धर्मपीठाला सर्वांत अधिक उपयोग झाला. या धर्मपीठाचें नांव आणि धर्मविचार त्यांनीं लांबलाबच्या देशांत तर पसरविलेच ; पण त्याशिवाय त्यांनीं खुद्द यूरप खंडामध्येंही या धर्मपीठाचा दर्जा वाढविला. कांहीं अंशीं आंतल्या बाजूनेंच सुधारणेचा प्रयत्न सुरू होता म्हणून आणि पुष्कळ अंशीं प्रॉटेस्टंट लोकांच्या बंडाचें संकट डोळ्यांपुढें होतें म्हणून रोमन धर्मपीठांतील अनाचार पुष्कळच कमी होत गेला. अशा रीतीनें रेफर्मेशननें – धर्मसुधारणेच्या चळवळीमुळें – ख्रिस्ती धर्मामध्यें बाह्यतः जसे दोन पंथ पडले, त्याचप्रमाणें कांहीं अंशीं त्यामध्यें अंतर्गत सुधारणाही त्यामुळें झाली.

प्रॉटेस्टंट लोकांचें बंड जसें वाढत गेलें, तसे यूरप खंडांतील राजेरजवाडे, कांहीं या पक्षाला तर कांहीं त्या पक्षाला जाऊन मिळाले. त्यामध्यें त्यांचा कांहीं धार्मिक असा उद्देश मुळींच नव्हता. बहुतांशीं राजकारण आणि अर्थलाभ यांचाच प्रश्न त्यांच्या मनांत या कामीं प्रमुख होता. पवित्र रोमन साम्राज्याचा बादशहा त्या वेळीं हॅप्सबर्ग घराण्यांतील पांचवा चार्ल्स हा होता. त्याचा बाप आणि आजा यांच्या लग्नामुळें तो आतां ऑस्ट्रिया, जर्मनी ( नांवापुरतातरी ), स्पेन, नेपल्स व सिसिली, नेदरलंड्स आणि स्पॅनिश-अमेरिका एवढ्या प्रचंड साम्राज्याचा वारस झालेला होता. विवाह करून त्यायोगें आपल्या राज्याच्या प्रदेशांत भर घालावयाची ही एक त्या काळच्या राजांची मोठी आवडती पद्धति होती. अशाच रीतीनें चार्ल्स राजाच्या अंगच्या कांहीं कर्तबगारीमुळें नव्हे, तर या विवाहसंबंधामुळें त्याचा अर्ध्या यूरपवर अम्मल चालू होता आणि कांहीं काळ तो एक मोठा श्रेष्ठ पुरुष म्हणून गणला जात होता. त्यानें प्रॉटेस्टंट लोकांविरुद्ध पोपचा पक्ष घेण्याचें ठरविलें. धर्मसुधारणेची कल्पना ही साम्राज्याच्या कल्पनेशीं जुळणारी नव्हती ; परंतु जर्मनीमधील पुष्कळशा छोट्या छोट्या राजांनीं मात्र प्रॉटेस्टंट लोकांचा पक्ष घेतला आणि त्यामुळें जर्मनींत जिकडे तिकडे रोमन धर्मपीठाचा आणि लूथरचा असे दोन तट पडले. याचा परिणाम स्वाभाविकच जर्मनींत यादवी निर्माण होण्यांत झाला.

इंग्लंडमध्यें एकामागून एक अनेक लग्नें करण्यासाठीं प्रसिद्ध असलेला आठवा हेन्री राजा यानें पोपच्या विरुद्ध जाऊन प्रॉटेस्टंट लोकांचा पक्ष अथवा खरें म्हटलें म्हणजे स्वतःच्या खास हितसंबंधाचा पक्ष त्यानें घेतला. धर्मपीठाच्या मालमत्तेचा त्याला लोभ सुटलेला होता; म्हणून रोमशीं संबंध तोडून टाकल्यानंतर त्यानें इंग्लंडमधील ॲबे, मोनास्टरी आणि चर्चे यांचा, म्हणजे एकूणएक धर्मसंस्थांचा, अत्यंत संपन्न असा जमीनजुमला जप्त करून टाकला. पोपशीं संबंध तोडून टाकण्यांत आणखी एक अगदीं वैयक्तिक कारण त्याला असें होतें, कीं हेन्रीच्या मनांतून आपल्या बायकोशीं काडीमोड करून दुसऱ्या एका स्त्रीशीं लग्न करावयाचें होतें.

फ्रान्समध्यें मात्र मोठीच चमत्कारिक अवस्था झाली. या वेळीं येथील राजांचा मुख्य मंत्री सुप्रसिद्ध कार्डिनल रिचिलियो हा असून खरोखर तोच सगळा राज्यकारभार चालवीत होता. रिचिलियोनें फ्रान्सला रोमन धर्मपीठ आणि पोप यांच्या बाजूस ठेवलें आणि प्रॉटेस्टंट लोकांना या देशांत चुरडून टाकलें; परंतु राजकारणाच्या लटपटी किती विचित्र असतात पाहा! याच रिचिलियोनें जर्मनींत मात्र प्रॉटेस्टंट पक्षाला प्रोत्साहन दिलें; हेतु असा, कीं जर्मनींत त्यामुळें यादवी होऊन तो देश दुर्बळ व्हावा व तेथील एकी नष्ट व्हावी! जर्मनी आणि फ्रान्स यांच्यामधील या वैराचा धागा यूरपखंडाच्या साऱ्या इतिहासपटांत अखंड आणि सतत चालत आलेला आहे.

लूथर हा स्वतः मोठा प्रॉटेस्टंट असून रोमन धर्मपीठाच्या अधिकाराला त्यानें विरोध केला. तरी पण धर्माच्या बाबतींत तो स्वतः उदारमतवादी होता असें मात्र समजूं नकोस. ज्या पोपशीं तो झगडत होता, त्या पोपइतकाच तो धर्माच्या बाबतींत कडवा, अनुदार होता. या कारणानें यूरपमध्यें धार्मिक मताबद्दलचें स्वातंत्र्य कांहीं रेफर्मेशनमुळें निर्माण झालें नाहीं. उलट त्यामुळें प्यूरिटन आणि कॅल्व्हिनिस्ट पंथांच्या लोकासारखे नवेच धर्मवेडे लोक निर्माण झाले. प्रॉटेस्टंट लोकांच्या चळवळीचा कॅल्व्हिन हा एक पुढारी होता. हा चांगला संघटनाकुशल होता आणि कांहीं काळ जिनीव्हा शहरावर याचें प्रभुत्व होतें. जिनीव्हाच्या नगरोद्यानामधील तें रेफर्मेशनचें प्रचंड स्मारक तुला आठवतें का? ती भली मोठी लांब-रुंद भिंत आणि तिच्यावरील ते कॅल्व्हिन आणि इतर मंडळींचे पुतळे? कॅल्व्हिन हा तर स्वतः इतका कडवा होता, कीं कित्येक लोकांना ते स्वतंत्र विचाराचे होते आणि स्वतःच्या विचाराशीं जुळते नव्हते एवढ्याच कारणासाठीं त्यानें जिवंत जाळलें!

लूथरला आणि प्रॉटेस्टंट लोकांना बहुसंख्य सामान्य प्रजेनें मदत केली; कारण प्रजेमध्यें रोमन धर्मपीठाविरुद्ध तीव्र भावना निर्माण झालेली होती. मागें मीं सांगितलेंच आहे तुला, कीं शेतकऱ्यांची अवस्था अतिशयच दैन्यवाणी झालेली होती आणि वारंवार त्यांचीं बंडें होत होतीं. या बंडांतून एक भलें मोठें प्रत्यक्ष शेतकऱ्यांचें युद्धच जर्मनीमध्यें उद्भवलें. ज्या जमीनदारीच्या पद्धतीखालीं ते चिरडून जात होते, त्या पद्धतीविरुद्ध शेतकरी उठले होते. त्यांच्या मागण्या भूदासपद्धति नष्ट व्हावी आणि

मासे धरण्याचा व शिकारीचा शेतकऱ्याला हक्क असावा, अशा प्रकारच्या अतिशयच साध्या आणि न्यायाच्या होत्या; परंतु या त्यांच्या साध्या मागण्यासुद्धां मान्य झाल्या नाहींत आणि जर्मनींतील राजे लोकांनीं हरएक प्रकारच्या रानटी उपायांनीं शेतकऱ्यांना दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. महान् सुधारक लूथर याची या बाबतींतील भूमिका काय होती? त्यानें या गरीब शेतकऱ्यांचा पक्ष घेऊन त्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा दिला का? छे! छे! भलतेंच कांहीं तरी! उलट भूदासपद्धति नाहींशी करावी या शेतकऱ्यांच्या मागणीबद्दल लूथर म्हणाला, "या नियमामुळें सर्व माणसें समान होतील आणि त्यामुळें ख्रिस्ताच्या आध्यात्मिक, पारमार्थिक, दैवी राज्याचें रूपांतर जड, ऐहिक राज्यामध्यें होईल. अशक्य! पृथ्वीवरील कोणतेंही राज्य माणसामाणसांमधील विषमतेशिवाय टिकणें शक्य नाहीं. कांहीं लोक स्वतंत्र असले पाहिजेत, कांहीं लोक भूदास (दास) असले पाहिजेत, कांहीं राज्यकर्ते असले पाहिजेत, तर कांहींनीं प्रजा राहिलें पाहिजे." त्यामुळें लूथरनें शेतकऱ्यांना शिव्याशाप दिले असून त्यांचा नाश व्हावा अशी आशा व्यक्त केली आहे. तो म्हणतो, "म्हणून जे कोणी समर्थ असतील, त्यांनीं या लोकांना उघडपणें किंवा गुप्तपणें कापून काढावें, त्यांची कत्तल करावी व त्यांना भोंसकून ठार करावें. त्यांनीं हें नित्य ध्यानात ठेवावें, कीं बंडखोरांइतकें विषारी, घाणेरडें आणि सर्वतोपरी सैतानी व अमानुष असें जगांत दुसरें कांहीं नाहीं." किती सुंदर भाषा आहे नव्हे ही! विशेषतः एका मोठ्या धार्मिक नेत्याच्या आणि सुधारकाच्या तोंडीं!

तेव्हा यांतून आपल्या हेंच प्रत्ययाला येतें, कीं मतस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य यांची जी सगळी ओरड त्या काळीं चाललेली होती, ती फक्त वरिष्ठवर्गापुरती होती; खालच्या वर्गासाठीं, सामान्य जनसमूहासाठीं, नव्हे. आजपर्यंतच्या एकूण एक युगांमध्यें सामान्य जनतेचें जीवन पशुकोटीच्या जीवनाहून केव्हांच फारसें निराळें नव्हतें. लूथरच्या मताप्रमाणें त्यानीं हें असेंच जीवन उपभोगीत अथवा सोशीत राहिलें पाहिजे; कारण परमेश्वराचीच तशी योजना आहे! प्रॉटेस्टंट लोकाच्या रोमच्या धर्मपीठाविरुद्ध झालेल्या बंडाला मूळ कारण पुष्कळ अंशीं जनतेंतील आर्थिक दैन्य हें होतें. प्रॉटेस्टंट बंडखोरानीं त्यांच्या हालांच्या तक्रारीशीं आपला सूर मिळविला आणि त्यांचा आपल्या कामांत उपयोग करून घेतला; परंतु हे भूदास–शेतकरी–वाजवीपेक्षां जास्त पुढें जाऊन भूदासपणांतूनच आपली मुक्तता करून घेणार अशी जेव्हां भीति उत्पन्न झाली, तेव्हां वस्तुतः ही एक अगदींच लहानशी बाब असूनसुद्धां प्रॉटेस्टंट पुढारी लोकांनीं राजे लोकांशीं शेतकऱ्याना चुरडून टाकण्याच्या कामात सहकार्य केलें. सामान्य जनतेच्या यशाचा काळ या वेळीं अजून फारच दूर होता. आतांचें जें हें नवें युग उदयाला येत होतें, तें मध्यमवर्गीय धनिकांचें युग होतें. यूरपांतील सोळाव्या आणि सतराव्या शतकांमधील एकूण एक झगड्यांतून आणि

युद्धांमधून नेमका हा धनिकवर्गच हळूहळू एकेक पायरी वरवर चढताना पाहणाराला आढळून येईल.

ज्या ज्या ठिकाणीं उदयास येणारा हा धनिकवर्ग बलिष्ठ होता, तेथें तेथें प्रॉटेस्टंट पंथाची वाढ झाली. प्रॉटेस्टंट पंथाचेही पुष्कळ प्रकार आणि उपपंथ होते. इंग्लंडमध्यें राजाच स्वतः धर्मपीठाचा प्रमुख झाला—Defender of the Faith धर्मसंरक्षक झाला; अशा रीतीनें धर्मपीठाचें धर्मपीठ हें स्वरूपच नाहींसें होऊन तें निव्वळ राज्यकारभारांतलें एक खातें झालें. तेव्हांपासून इंग्लंडच्या धर्मपीठाची ही अवस्था कायमची होऊन राहिली आहे.

इतर देशांत, विशेषतः जर्मनी, स्वित्झर्लंड आणि नेदरलंड्स यांमध्यें, निराळेच पंथ प्रमुख पदाला चढले. कॅल्व्हिनचा पंथ हा धनिकवर्गाच्या वाढीला पोषकच होता त्यामुळें तो वाढत गेला. धार्मिक बाबतींत कॅल्व्हिन हा तर फारच भयंकर कडवा होता. पाखंडी लोकांसाठीं त्याच्या पंथांत जिवंत जाळणें किंवा शरिराचे नाना तऱ्हेचे हाल करणें अशा शिक्षा होत्या आणि जे धर्मनिष्ठ होते त्यांनाही फारच भयंकर शिस्तीचें बंधन होतें; परंतु व्यवहाराच्या प्रांतांत त्याची शिकवण, वाढता व्यापार आणि उद्योगधंदे यांच्याशीं रोमन धर्मपीठापेक्षां अधिक जुळती होती. व्यापारांतील नफेबाजीला त्याच्या धर्मपंथाचा अनुकूल आशीर्वाद होता आणि पतीच्या व्यवहारालाही त्याचा पाठिंबा होता. त्यामुळें या नवीन धनिक वर्गानें जुन्या धर्मांची ही नवी आवृत्ति मान्य केली आणि स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला मुळींच टोंचणी न लागतां संपत्ति मिळविण्याचा क्रम त्यांनीं चालू ठेवला. सरंजामदार सरदारांशीं त्यांच्या ज्या लढाया झाल्या त्यांत त्यांनीं सामान्य जनतेचा उपयोग करून घेतला होता. आतां त्या सरदारलोकांवर विजय मिळविल्यानंतर मात्र हे लोक सामान्य जनसमूहाकडे दुर्लक्ष करूं लागले होते किंवा त्यांच्या डोक्यांवर बसूं लागले होते.

परंतु धनिकवर्गापुढें अजून पुष्कळ अडचणी उभ्या होत्या. राजांची मोठी धोंड अजून त्यांच्या मार्गांत उभी होती. सरदारांशीं लढतांना राजे लोकांनीं या शहरी धनिकवर्गाशीं सहकार्य केलेलें होतें. आतां सरदारलोकांची सत्ता जाऊन ते दुर्बळ झाले तेव्हां राजांची सत्ता तर पाहिल्याहून फार मोठ्या प्रमाणांत वाढली. राजा हा सगळीकडेच जणुं एकटा एकच मालक बनून गेला. त्याच्या आणि धनिकवर्गाच्या झगड्याचा काळ अजून पुढें यायचा होता.

## ८५

# सोळाव्या व सतराव्या शतकांतील यूरपमधील अनियंत्रित राजसत्ता

२६ ऑगस्ट, १९३२

अलीकडे पुन्हां माझी टंगळमंगळ सुरू झाली आहे. कितीएक दिवसांत तरी मीं तुला या पत्रांपैकीं एकहि पत्र लिहिलें नाहीं. इथें बोलायला कोणी नाहीं पाठीवर, कीं धारेवर धरून काम करून घ्यायलाही कोणी नाहीं; त्यामुळें मधूनमधून मी आळशीपणा करूं लागतों आणि दुसरींच कांहीं तरी कामें करीत बसतों. आपण दोघें जर एका ठिकाणीं असतों तर असें झालें नसतें, नाहीं का? पण मग आपल्या दोघांना एकमेकांशीं बोलयला मिळत असतांना मी असें लिहीत कशाला बसलों असतों?

माझ्या या मागच्या पत्रांत मी तुला यूरप खंडांतील एका मोठ्या खळबळीच्या आणि फेरफाराच्या काळाबद्दल लिहीत होतों. सोळाव्या व सतराव्या शतकांत तिकडे जे मोठे फेरफार घडून आले त्यांचा विचार त्या पत्रांत केला होता. ज्या आर्थिक क्रांतीमुळें मध्ययुगाचा अंत होऊन धनिकवर्गाचा उदय झाला, त्या आर्थिक क्रांतीच्या बरोबरच किंवा तिच्यामधूनच हे फेरफार घडून आले. गेल्या पत्रांत आपण पश्चिम यूरपमधील ख्रिस्ती धर्माचीं रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट अशीं दोन शकलें झालीं हें पाहिलें. या दोन परस्परविरोधी गटांमध्यें सगळ्यांत तीव्र धार्मिक झगड्याचें खास रणागण जर्मनीमध्यें उघडलें गेलें; कारण तेथें हे दोन्ही गट साधारणपणें सारखेच बलवान् होते. पश्चिम यूरप खंडांतील इतर देशांनाही थोडाफार या झगड्यांत भाग घ्यावा लागला. यूरप खंडांतील या धार्मिक झगड्यांतून इंग्लंड मात्र अलिप्त राहिलें. इंग्लंडचा राजा आठवा हेन्री याच्या अमलाखालीं, इंग्लंडचा रोमच्या धर्मपीठाशीं संबंध, देशांत विशेष अंतर्गत गडबड न माजतांच पार तुटला आणि इंग्लंडमध्यें अर्धवट कॅथॉलिक, अर्धवट प्रॉटेस्टंट असें एक स्वतंत्रच धर्मपीठ स्थापन झालें. हेन्रीला धर्माबद्दल विशेषशी आस्था मुळींच नव्हती. त्याला पाहिजे होत्या धर्मपीठाच्या मालकीच्या जमिनी आणि त्या त्याला मिळाल्या. तसेंच त्याला पुन्हां लग्न करावयाचें होतें, तेंही त्यानें केलें. तात्पर्य, रेफर्मेशनचा – धर्मसुधारणेच्या चळवळीचा – मुख्य परिणाम असा झाला, कीं राजेरजवाडे लोकांची पोपच्या दावणींतून मुक्तता झाली.

अशा रीतीनें रेनेसान्स (ज्ञानयुग) आणि रेफर्मेशन (धर्मसुधारणेची चळवळ) आणि आर्थिक खळबळ या कारणांमुळें यूरप खंडाचें स्वरूप अगदीं पालटून चाललेलें असतांना तेथील राज्यव्यवस्थेचें स्वरूप कशा प्रकारचें होतें? सोळाव्या आणि सतराव्या शतकांत यूरपच्या नकाशाची मांडणी कशी काय होती? या दोनशें वर्षांत ही मांडणी

एकसारखी बदलत होती, हें अर्थातच खरें आहे. तेव्हां सोळाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळांत हा नकाशा कसा दिसतो हें एकदां आपण पाहूं या.

इकडे आग्नेयीला कॉन्स्टान्टिनोपल तुर्कांच्या ताब्यांत असून त्यांच्या साम्राज्याची सरहद्द हंगेरीच्या आंतपर्यंत जाऊन भिडली आहे. नैर्ऋत्येला विजेत्या आरबांचे वंशज, सारासन वंशाचे मुसलमान लोक ग्रॅनाडांतील त्यांच्या राज्यांतून नुकतेच हांकलून देण्यांत आले असून स्पेनमध्यें फर्डिनांड आणि इसाबेला याच्या संयुक्त अमलाखालीं संपूर्ण ख्रिस्तधर्मीयांचें राज्य प्रस्थापित झालेलें आहे. स्पेनमध्यें ख्रिस्ती आणि मुसलमान यांच्यामध्यें जो कितीक शतकांचा दीर्घकालीन धार्मिक झगडा चालू होता, त्यामुळें स्पॅनिश लोकांना कॅथॉलिक पंथाविषयीं अत्यंत तीव्र आणि कडवी अशी भक्ति उत्पन्न झालेली आहे. त्यामुळें स्पेनमध्येंच तें इन्क्विझिशनचें न्यायासन स्थापन करण्यात आलेलें आहे. अमेरिकेचा शोध लावल्याच्या यशाचा मान आणि त्यापासून देशांत वाहूं लागलेला संपत्तीचा ओघ या कारणांनीं यूरपच्या राजकारणामध्यें स्पेनचा हात आतां प्रामुख्यानें चमकूं लागलेला आहे.

पुन्हां एकदां नकाशाकडे नजर टाक. हे इंग्लंड आणि फ्रान्स देश तर त्यामध्यें जवळजवळ आजच्यासारखेच दिसतात. नकाशाच्या मध्यभागीं तें पवित्र रोमन साम्राज्य आहे; परंतु तें अनेक जर्मन राज्यांमध्यें विभागलेलें असून हीं सर्व राज्यें बहुतांशीं अगदीं स्वतंत्र राज्येंच आहेत. कोठें प्रिन्स, कोठें ड्यूक, कोठें बिशप, कोठें राजनियोजक* अशा प्रकारच्या लोकांच्या हातांत ज्यांचा राज्यकारभार आहे, अशा लहान लहान स्वतंत्र राज्यांची ही एक चमत्कारिक खिचडी आहे, तीमध्यें कित्येक मोठीं शहरें अशीं आहेत, कीं त्यांना कांहीं कांहीं खास स्वतंत्र अधिकार आहेत; त्यांपैकीं उत्तरेच्या बाजूच्या व्यापारी शहरांनीं एकत्र होऊन आपला एक संघ स्थापन केला आहे. त्यानंतर पलीकडे स्वित्झर्लंडचें प्रजासत्ताक राज्य आहे, हेंही वस्तुतः स्वतंत्रच आहे; पण तशी अजून त्याला रीतसर मान्यता मिळालेली नाहीं. या बाजूला व्हेनिसचें प्रजासत्ताक राज्य आणि इटलींतील इतरही प्रजासत्ताक नगर-राज्यें आहेत. नंतर हा रोमच्या आसपासचा पोपच्या ताब्यांतील प्रदेश. त्याला पेपल राज्यें म्हणजे पोपचीं राज्यें असें म्हणतात आणि त्यांच्या दक्षिणेला नेपल्स आणि सिसिली यांचें मिळून राज्य. पूर्वेला पवित्र रोमन साम्राज्य आणि रशिया यांच्या दरम्यान पोलंड देश आहे आणि तसेंच हंगेरीचें राज्य असून त्यावर उस्मानी तुर्कांच्या आक्रमणाची काळी छाया पसरलेली

*पवित्र रोमन साम्राज्याचा बादशहा निवडण्याचें काम ज्या राज्यकर्त्यांकडे असे, त्यांना इलेक्टर्स किंवा राजनियोजक असें म्हणत. तीन राजे व तीन मोठे बिशप असे सहा व आणखी एक सातवा असे पहिले मतदार होते. हा सातवा कोण याबद्दल वाद होता. इ. स. १२९० मध्यें ही जागा बोहेमियाच्या राजाला मिळाली. प्रतिस्पर्धी बव्हेरियालाही त्यांत पुढें स्थान मिळालें. पुढें हॅनोव्हरला नववें स्थान मिळालें. पुढें १८०६ मध्यें पवित्र रोमन साम्राज्य आटोपल्यावर ही सत्ता गेली आणि नांव मात्र राहिलें.

आहे. त्याच्याही पलीकडे पूर्वेला रशिया आहे. तेथून मंगोलियन लोकांना आणि सोनेरी टोळीच्या लोकांना हांकलून लावल्यानंतर नुकतेंच एक बलिष्ठ राज्य तेथें स्थापन होऊन वाढीस लागलेलें आहे आणि उत्तरेला आणि पश्चिमेला आणखी कांहीं देश आहेत.

सोळाव्या शतकाच्या प्रारंभाला यूरपचा नकाशा हा असा होता. इ. स. १५२० मध्यें पांचवा चार्ल्स हा बादशहा झाला. हा हॅप्सबर्ग घराण्यांतील असून स्पेन, नेपल्स व सिसिली आणि नेदरलंड्स यांच्याही राज्यांचा वारसा त्याच्याकडे आलेला होता हें आपण पाहिलें आहे. राजघराण्यांतील केवळ कांहीं लग्नांच्यामुळें सबंध देशचे देश आणि समाजचे समाज एक मालक बदलून दुसऱ्या मालकाच्या हातीं जात असत, हें पाहून किती विचित्र वाटतें! लाखों लोक आणि मोठेमोठे प्रदेश हे नुसत्या वारसाहक्कामुळें इकडून तिकडे जात; कधीं कधीं हुंडा म्हणून सुद्धां असे प्रदेश दिले जात. मुंबई बेट हें अशाच रीतीनें इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स याला त्याची बायको पोर्तुगालमधील ब्रॅगांझा येथील कॅथरीन हिच्याबरोबर हुंडा म्हणून मिळालें. तात्पर्य, विवाहसंबंध मोठ्या कुशलपणानें जुळवून आणून हॅप्सबर्ग घराण्यानें भलें मोठें साम्राज्य संपादन केलेलें होतें आणि पांचवा चार्ल्स हा या साम्राज्याचा प्रमुख बनला होता. चार्ल्स हा अगदीं एक साधारण मनुष्य होता. त्याची विशेष प्रसिद्धि म्हटली म्हणजे त्याच्या अचाट खादाडपणाबद्दलची! परंतु त्याच्या साम्राज्याच्या प्रचंड विस्तारामुळें तूर्त तरी चार्ल्स हा यूरप खंडांत एक बडें धेंड होऊन राहिला होता.

चार्ल्स ज्या सालीं बादशहा झाला, त्याच सालीं सुलेमान हा उस्मानी साम्राज्याचा प्रमुख झाला. त्याच्या कारकीर्दीत हें ऑटोमन साम्राज्य चोहों दिशांनीं वाढलें. पूर्व यूरपमध्यें ही वाढ विशेषच झाली. तुर्की लोक हे थेट व्हिएन्नाच्या प्रवेशद्वाराशीं येऊन ठेपले होते; परंतु प्रत्यक्ष व्हिएन्ना शहर तेवढें त्यांच्या कबजांत यायचें राहिलें. तथापि हॅप्सबर्ग घराण्यांतील बादशहाला त्यांनीं एवढी दहशत बसविली, कीं सुलेमानला खंडणी देऊन त्याला गप्प करणें हेंच या बादशहाला अधिक सोयीचें वाटलें. पवित्र रोमन साम्राज्याच्या महान् बादशहावर तुर्कीच्या सुलतानाला खंडणी देण्याचा प्रसंग यावा या गोष्टीचा अर्थ लक्षांत आण. सुलेमानला सुलेमान दि मॅग्निफिसंट – वैभवशाली, प्रतापी सुलेमान – सुलतान अले सलाम – असें नांव मिळालेलें आहे. त्यानें आपल्याला स्वतःला बादशहाही म्हणविण्यास सुरुवात केली; कारण आपण बायझाटाइन साम्राज्याच्या सीझरचेच वारसदार आहों असें तो मानीत असे.

सुलेमानच्या काळीं कॉन्स्टान्टिनोपलमध्यें नवीन बांधकामाला मोठा भर आला होता. कित्येक सुंदर मशिदी त्या वेळीं बांधण्यांत आल्या. इटलीमधील कलेच्या पुनरुज्जीवनासारखेंच पूर्वेकडील भागांतही कलेचें पुनरुज्जीवन झालें होतें असें दिसतें. कलाकौशल्याचा भर फक्त कॉन्स्टान्टिनोपलमध्येंच आला होता असें नव्हे, तर मध्य आशियांत इराण आणि खोरासान या देशांतही या काळांत सुंदर चित्रांचीं कामें झालेलीं आढळतात.

इकडे हिंदुस्थानात मोंगलांपैकीं बाबर हा वायव्येकडून आला आणि त्यानें एक नवीन राजवंश स्थापन केला हें आपण पाहिलेंच आहे. ही गोष्ट इ. स. १५२६ सालची. त्या वेळीं यूरपमध्यें पांचवा चार्ल्स हा बादशहा होता आणि सुलेमान कॉन्स्टान्टिनोपलमध्यें राज्य करीत होता. बाबर आणि त्याच्या मागचे त्याच्या घराण्यांतील राजे यांच्याबद्दल आपल्याला पुष्कळच बोलावें लागणार आहे. या ठिकाणीं एवढीच गोष्ट मुद्दाम नमूद करण्यासारखी आहे, कीं बाबर हाही स्वतः ज्ञानयुगीन धर्तीचाच राजा होता; परंतु तत्कालीन यूरपमधील त्या धर्तीच्या राजांपेक्षां तो अधिक चांगला होता. तो साहसी, उलाढाल्या असला, तरी उदार लढवय्या होता आणि कला व वाङ्मय यांविषयीं त्याला फार मोठी भक्ति होती. इटलीमध्येंही या काळीं असेच कांहीं साहसी राजे असून त्यांच्याही ठिकाणीं कला व वाङ्मय यांबद्दल प्रेम होतें आणि त्यांच्या छोट्या दरबारांमध्यें वरवर विद्या व कला यांचें तेज मोठें चमकल्यासारखें दिसत होतें. फ्लॉरेन्समधील मेडिसी घराणें आणि बोर्जिया घराणें हीं त्या काळीं याविषयीं प्रख्यातीस चढलेलीं होतीं; परंतु हे सर्व इटालियन राजे, त्याचप्रमाणें यूरप खंडांतील या काळचे बहुतेक सर्व राजे हे खरोखर मॅकिव्हॅलीचे अनुयायी असून न्यायान्यायाची बिलकुल क्षिति न बाळणारे, कारस्थानी, अनियंत्रित असे सत्ताधारी होते. आपल्या विरोधकांचा ते विषाचा प्याला आणि खंजीर यांच्या साहाय्यानें खुशाल खून करीत असत. या राजांच्या क्षुद्र दरबारांची तुलना अकबर, शहाजहान यांच्यासारख्या मोंगल बादशहांच्या आग्रा, दिल्ली येथील दरबारांशीं करणें हें जसें रास्त होणार नाहीं, तितकीच उदार लढवय्या अशा बाबराची या साऱ्या टोळक्याबरोबर तुलना करणें हें न्यायाचें नाहीं. मोंगलांचे हे दरबार फारच ऐश्वर्ययुक्त असून इतके सुखसंपन्न आणि इतके ऐश्वर्यशाली दरबार जगांत केव्हांच कोठें दुसरीकडे झालेले नाहींत असें म्हणतात.

यूरप सोडून नकळत आपण हिंदुस्थानकडे वाहवत आलों; परंतु यूरपमधील या ज्ञानयुगाच्या काळामध्यें हिंदुस्थानांत आणि इतरत्र काय काय घडामोडी चालू होत्या, हें तुझ्या लक्षांत यावें असा माझा हेतु होता. या काळीं तुर्कस्तान, इराण, मध्य आशिया आणि हिंदुस्थान यांमध्येंही कलाकौशल्याची प्रवृत्ति बहरली होती. चीनमध्यें हा मिंग बादशहांचा शांततेचा आणि भरभराटीचा काळ असून तेथें उच्च प्रकारची कलाकुसरीच्या पदार्थांची निर्मिती होत होती; परंतु ज्ञानयुगाच्या काळांतील ही सर्व कला – एक चीनचा अपवाद कांहींसा सोडला तर – सगळी दरबारी कला होती. त्या कलाकौशल्याचा सामान्य जनतेशीं कांहीं संबंध नव्हता. इटलीमधील कांहीं श्रेष्ठ कलावंतांचीं नांवें मीं मागें सांगितलीं. ते गेल्यानंतर ज्ञानयुगाच्या पुढच्या कालांतील इटलीमधील कला अगदींच क्षुद्र आणि दुर्लक्षणीय झाली.

असो. यूरप खंडाची विभागणी या काळीं रोमन कॅथॉलिक राजे आणि प्रॉटेस्टंट राजे अशा तऱ्हेनें झालेली होती. अधिकार होता सगळा राजांचा. लोकांना कोणी विचारीतच नव्हते. इटली, ऑस्ट्रिया, फ्रान्स आणि स्पेन हे देश कॅथॉलिक होते; जर्मनी अर्धा

कॅथॉलिक, अर्धा प्रॉटेस्टंट होता; इंग्लंड देश प्रॉटेस्टंट झाला होता. कारण त्या देशाच्या राजाची तशी लहर लागली आणि इंग्लंड देश प्रॉटेस्टंट झाला. एवढेंच कारण आयर्लंड देश रोमन कॅथॉलिक राहण्याला पुरेसें झालें; कारण या देशाला जिंकण्याचा, त्याच्यावर जुलूम करण्याचा इंग्लंडचा सारखा प्रयत्न चालू होता. परंतु लोक कोणत्या धर्मपंथाच्या बाजूला होते या गोष्टीला कोठेंच कांहीं किंमत नव्हती, हें म्हणणेंही अगदीं सर्वस्वीं बरोबर नाहीं. अखेरीस याच गोष्टीला महत्त्व प्राप्त झालें आणि तिच्यामुळेंच कितीक युद्धें आणि क्रांत्या घडून आल्या. राजकीय आणि आर्थिक प्रवृत्तीपासून ही धार्मिक प्रवृत्ति अगदीं वेगळी तोडून काढणें ही मोठी कठिण गोष्ट आहे. मला वाटतें, मीं मागेंच तुला सांगितलेलें आहे, कीं रोमन धर्मपीठाच्या विरुद्ध प्रॉटेस्टंट पंथाचें हें बंड सुद्धां, विशेषतः ज्या ठिकाणीं हा नवीन उदयास आलेला व्यापारीवर्ग बलिष्ठ होऊं लागला होता, त्या ठिकाणीं झालें. अशा तऱ्हेनें धर्म आणि व्यापार यांची सुद्धां सांगड पडलेली आपल्याला आढळून येते. त्याचप्रमाणें पुष्कळशा राजांना या धर्मसुधारणेची जी भीति वाटत होती ती ही, कीं या नांवाखालीं आपल्या प्रदेशांतून राजकीय क्रांति होईल आणि आपली सत्ता उलथून पडेल. त्यांना वाटे, कीं मनुष्य एकदां पोपची धार्मिक सत्ता अमान्य करण्याला तयार आणि समर्थ झाला, कीं तोच मनुष्य उद्यां राजेरजवाड्यांची राजकीय सत्ता सुद्धां झुगारून देण्याला कमी करणार नाहीं. म्हणून राजाच्या दृष्टीनें हा नवा धर्मविचार फार घातक होता. राज्य करण्याच्या आपल्या वर्गाच्या दैवी हक्काला हे राजे लोक अद्यापि पक्के चिकटून होते. फार काय, पण प्रॉटेस्टंट पंथाचे राजे सुद्धां हा आपला दैवी अधिकार सोडायला तयार नव्हते.

राजे लोकांना जरी अशी भीति वाटत होती, तरी पण रेफर्मेशन होऊनही यूरप खंडांत राजे लोकांचा अधिकार सर्वस्वीं अनियंत्रितच राहिला. त्यापूर्वी ते केव्हांही नव्हते इतके आतां ते एकतंत्री झाले. पूर्वी त्यांचे मोठे मोठे सरंजामदार-सरदार त्याच्यावर पायबंद घालूं शकत असत आणि पुष्कळदां त्यांची सत्ता झुगारूनही देत असत. परंतु व्यापाऱ्यांना आणि धनिकवर्गाला हे सरदार लोक नकोसे झालेले होते; राजांनाही ते नकोसेच होते. म्हणून व्यापारीवर्ग आणि त्याचप्रमाणें शेतकरीवर्ग यांच्या मदतीनें राजेलोकांनीं सरदारवर्गाला चुरडून टाकलें आणि ते आपण स्वतः सर्वसत्ताधीश बनले. धनिकवर्गाची सत्ता आणि वजन हीं जरी पुष्कळ वाढलेलीं होतीं, तरी राजांना पायबंद घालण्याचें सामर्थ्य अजून त्यांच्या ठिकाणीं आलेलें नव्हतें. तथापि लौकरच या मध्यमवर्गानें राजांच्या पुष्कळशा व्यवहारांना हरकती मात्र घेण्यास सुरुवात केली. विशेषतः राजेलोक त्यांच्याकडून वारंवार फार अवजड कर वसूल करूं पाहत त्याला त्यांचा विरोध होता आणि राजेलोकांनीं त्यांच्या धर्मविषयक गोष्टींत हात घालतां उपयोगी नाहीं अशी एक त्यांची तक्रार होती. अर्थात् राजेलोकांना हा त्यांचा विरोध मुळींच मानवला नाहीं. आपण केलेल्या कोणत्याही गोष्टीला विरोध करण्याचा उद्धटपणा या लोकांनीं करावा हें पाहून राजेलोक संतप्त झाले. त्यानीं व्यापारीवर्गाच्या

लोकाना कैदेंत टाकण्याचा आणि इतरही रीतीनीं त्यांना शिक्षा करण्याचा क्रम सुरू केला. आज हिंदुस्थानांत आम्ही लोक ब्रिटिश सत्तेपुढें वांकण्याचें नाकारतों, म्हणून ज्याप्रमाणें आम्हां लोकांना विनाचौकशी, सत्ताधिकाऱ्यांच्या लहरीप्रमाणें, तुरुंगात टाकलें जातें, त्याचप्रमाणें तेथेंही लोकांना वाटेल तसें तुरुंगांत डांबण्यांत येऊं लागलें. राजेलोक व्यापारामध्येंही ढवळाढवळ करूं लागले. त्यामुळें प्रकरण अधिकच चिघळलें आणि राजेलोकांना धनिकवर्गाचा वाढता विरोध होऊं लागला. धनिकवर्गाचा राजेलोकांच्या अनियंत्रित सत्तेविरुद्ध स्वतःच्या हातीं सत्ता मिळविण्याचा हा झगडा अगदीं अलीकडच्या काळापर्यंत कित्येक शतकें चालत राहिला आणि त्यामध्यें, राजेलोकांच्या दैवी हक्कांची कल्पना कायमची गाडून टाकली जाऊन राजे लोकांना त्यांच्या त्यांच्या लायकीच्या स्थानीं बसविलें जाण्यापूर्वी कितीएक राजांचीं डोकीं कापलीं जावीं लागलीं. काहीं देशांत धनिकवर्गाला पुष्कळ लौकर जय मिळाला; कांहीं देशात पुष्कळ काळानंतर मिळाला; पण या झगड्यांतील जयपराजयांचें निरीक्षण आपण पुढच्या कांहीं पत्रांत करूं.

परंतु सोळाव्या शतकांत मात्र यूरप खंडांत जवळजवळ सर्वत्र राजेलोकांच्याच हातीं सर्व सत्ता होती. जवळजवळ म्हणण्याचें कारण स्वित्झर्लंडमधील गरीब शेतकऱ्यांनीं एवढ्या मोठ्या प्रचंड हॅप्सबर्ग घराण्यांतील बादशहाविरुद्ध बंड करण्याचें साहस करून स्वतःचें स्वातंत्र्य मिळविलें होतें हें तुझ्या लक्षांत असेलच. अशा रीतीनें यूरप खंडांत सर्वत्र पसरलेल्या त्या अनियंत्रित जुलमी सत्तेच्या समुद्रांत ज्या ठिकाणीं राजाला मुळीं स्थानच नव्हतें असा हा स्वित्झर्लंड देश, प्रचंड महासागरांतील एखाद्याच बेटाप्रमाणें उठून दिसत होता.

लौकरच आणखी एका ठिकाणीं, नेदरलंडस्मध्यें, प्रकरण हातघाईवर आलें व जनतेच्या आणि धार्मिक स्वतंत्रतेसाठीं झगडा होऊन तो यशस्वीही झाला. हा देश अगदींच लहान आहे आणि त्याचा झगडा होता फार तीव्र आणि यूरपमधील त्या काळच्या सगळ्यांत मोठ्या सत्तेशीं म्हणजे स्पेनशीं. अशा रीतीनें नेदरलंड्सनीं यूरपला एक धडा घालून दिला. त्यानंतर इंग्लंडमध्यें जनतेच्या स्वातंत्र्याचें युद्ध होऊन तेथील एका राजाला आपलें डोकें गमवावें लागलें आणि तेथील तत्कालीन पार्लमेंटचा विजय झाला. अशा रीतीनें धनिकवर्गानें अनियंत्रित राजसत्तेविरुद्ध केलेल्या झगड्यांत इंग्लंड आणि नेदरलंड्स यांनीं आघाडी मारली. या देशांत धनिकवर्गाचा जय झाल्यामुळें जगांतील नवीन परिस्थितीचा त्यांना फायदा घेतां आला व त्यामुळें बाकीच्या देशांहून फार मोठी प्रगति त्यांना करतां आली. पुढच्या काळांत या दोन्ही राष्ट्रांनीं मोठीं सामर्थ्यवान् आरमारें उभारलीं. दूरदूरच्या देशांशीं दोघांनीं व्यापारधंदा वाढविला आणि अशा रीतीनें दोघांनींही आशिया खंडांतील साम्राज्याचा पाया घातला.

या पत्रांमध्यें आतांपर्यंत इंग्लंडबद्दल आपण फारसें बोललेलों नाहीं. तसें बोलण्यासारखें कांहीं नव्हतेंच. कारण इंग्लंड देश हा यूरप खंडांत विशेष महत्त्वाचा देश

नव्हताच. आतां मात्र यांत बदल होतो आणि मग इंग्लंड फारच झपाट्यानें पुढें जातें हें लौकरच आपल्याला दिसेल. आतांपर्यंत आपण मॅग्नाचार्टा व पार्लमेंटचा प्रारंभ यांविषयीं आणि शेतकऱ्यांचीं युद्धें आणि निरनिराळ्या घराण्यांतील आपसांतील युद्धें यांबद्दलचा उल्लेख केला आहे. या लढायांमध्यें या राजेलोकांनीं पुष्कळच उघड आणि लपून अशा प्रकारें खून केले. सरदारांपैकीं पुष्कळसे लोक रणांगणांत ठार झाले; अशा रीतीनें सरदार-वर्गाचें सामर्थ्य नष्ट झालें. त्यानंतर नवीनच एक घराणें, ट्यूडर राजांचें, गादीवर आलें आणि त्यांनीं अनियंत्रित राज्याधिकार चांगलाच गाजविला. आठवा हेन्री हा या ट्यूडर घराण्यांतलाच; तशीच त्याची मुलगी इलिझाबेथ राणीही.

पांचव्या चार्ल्स बादशहानंतर त्याच्या साम्राज्याचे तुकडे झाले. स्पेन आणि नेदरलंड्स हे देश त्याचा मुलगा दुसरा फिलिप याच्याकडे गेले. स्पेन देश हा त्या काळीं साऱ्या यूरप खंडांतील अत्यंत बलिष्ठ राजसत्ता म्हणून मोठा गाजत होता. पेरू आणि मेक्सिको हे देश स्पेनच्या मालकीचे असून तेथून स्पेनमध्यें सोन्याचा एकसारखा प्रवाह वाहत होता, हें तुझ्या ध्यानांत असेलच. परंतु स्पेनमध्यें कोलंबस, कोर्टेझ, पिझारो यांच्यासारखे नवयुगाच्या वाऱ्यानें भारलेले लोक निर्माण होऊन सुद्धां स्पेनला जगांतील पालटलेल्या युगाचा फायदा घेतां आला नाहीं. व्यापाराकडे या देशानें मुळींच लक्ष दिलें नाहीं. त्याला फिकीर होती ती फक्त एक धर्माची, आणि तीही क्रूर आणि माथेफिरू अशा धर्माची! साऱ्या स्पेन देशभर इन्क्विझिशनच्या न्यायासनांचा धुमाकूळ माजला होता आणि पाखंडी म्हणून समजले जाणारांवर वाटेल त्या प्रकारचे अत्याचार करण्यांत येत होते. वेळोवेळीं मोठे सार्वजनिक उत्सव करण्यांत येत आणि त्या ठिकाणीं या 'पाखंडी' पुरुष आणि स्त्रियांच्या टोळ्यांच्या टोळ्या राजा आणि राजघराण्यांतील मंडळी, व अमीरउमराव, आणि हजारों लोक यांच्यासमोर मोठ-मोठ्या चितेवर एका वेळीं जिवंत जाळण्यांत येत असत! या सार्वजनिक रीतीनें जिवंत जाळण्याच्या प्रकाराला अग्निसमर्पण, अग्नीला आहुति असें म्हणत असत. यूरप खंडांतला या काळांतील सारा इतिहास अत्याचार, अत्यंत भयंकर रानटी क्रौर्य आणि धार्मिक माथेफिरूपणा यांनीं इतका भरलेला आहे, कीं कधीं कधीं खरोखरच इतका अनाचार घडणें शक्य आहे का, असा सुद्धां मनाला प्रश्न पडतो!

स्पेनचें साम्राज्य फार काळ टिकलें नाहीं. हॉलंडनें स्पेनशीं जी तेजस्वी लढाई केली त्यानें त्या साम्राज्याचे सांधे चांगलेच खिळखिळे झाले. त्यानंतर लौकरच इ. स. १५८८ मध्यें इंग्लंड देश जिंकण्याचा स्पेननें केलेला प्रयत्न अगदींच अंगाशीं आला आणि स्पेनचें सैन्य घेऊन जाणारें "अजिंक्य आरमार" इंग्लंडच्या किनाऱ्यालाही लागूं शकलें नाहीं. भर समुद्रांत त्याचा नाश करून तें बुडविण्यांत आलें. यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. कारण या आरमाराचा मुख्याधिकारी जो होता त्याला जहाजें किंवा समुद्र यांची कांहीं सुद्धां माहिती नव्हती. एवढेंच नव्हे, तर दुसऱ्या फिलिप

राजाकडे जाऊन त्यानें स्वतः विनंति केली होती कीं, " मला समुद्रावरील लढाईच्या तंत्राची व डावपेचांची मुळींच माहिती नाहीं, आणि शिवाय समुद्रप्रवासही मला मानवत नाहीं, यासाठीं मजवर ही कामगिरी सोंपवूं नका. " त्यावर राजानें त्याला उत्तर दिलें कीं, " आरमाराचें आधिपत्य खुद्द परमेश्वर करील. " अशा रीतीनें स्पेनचें साम्राज्य हळूहळू संपुष्टांत आलें. पांचव्या चार्ल्सच्या वेळीं त्याच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाहीं असें म्हणत असत. इतकें एक वेळ तें साम्राज्य विस्तृत होतें. आजही त्याचप्रमाणें दुसऱ्या एका गर्विष्ठ आणि उद्दाम अशा साम्राज्याबद्दल नेहमीं असेंच म्हणण्यांत येतें, कीं या साम्राज्यावर सूर्य मावळत नाहीं.

## ८६

# नेदरलंडचें स्वातंत्र्यासाठीं युद्ध

*२७ ऑगस्ट, १९३२*

सोळाव्या शतकामध्यें जवळजवळ सर्व यूरप खंडभर राजेलोक सर्वसत्ताधीश कसे झाले हें मीं गेल्या पत्रांत तुला सांगितलें. इंग्लंडमध्यें ट्यूडर राजे झाले आणि स्पेन व ऑस्ट्रिया यांमध्यें हॅप्सबर्ग राजे झाले. राशियामध्यें, जर्मनींतील बहुतेक भागांत आणि इटलीमध्यें असेच अनियंत्रित सत्ताधारी राजे होते. फ्रान्सचा राजा हा या अशा राजांचा एक उत्कृष्ट नमुना होता. तेथला तो एकटा एक मालक आणि चालक होता. सगळें राज्य म्हणजे केवळ त्याची अगदीं खासगी मालमत्ता समजली जात होती. तेथील एक अत्यंत कर्तबगार मंत्री रिचिलिओ यानें फ्रान्स आणि फ्रान्सचे राजे यांचें बळ वाढविण्यास फार मदत केली. फ्रान्सची नेहमीं अशी समजूत राहत आलेली आहे, कीं ज्या प्रमाणांत जर्मनीचें सामर्थ्य कमी राहील त्या प्रमाणांत आपली शक्ति आणि सुरक्षितता अधिक. त्यासाठीं रिचिलिओ स्वतः जरी श्रेष्ठ कॅथॉलिक धर्मगुरु होता आणि फ्रान्समध्यें जरी त्यानें निर्दयपणें प्रॉटेस्टंट लोकांना चुरडून टाकलें, तरी जर्मनीमध्यें प्रत्यक्ष त्यानें प्रॉटेस्टंट लोकांना पाठिंबा दिला. या त्याच्या धोरणाला फार मोठें यश आलें. पुढें आतां दिसेलच आपल्याला, कीं जर्मनींत अत्यंत वाईट प्रकारची यादवी माजली आणि त्या आपसांतील युद्धामुळें जर्मनीचा नाश झाला.

फ्रान्समध्येंसुद्धां सतराव्या शतकाच्या मध्याला आपसांतील युद्ध झालें; त्याला फ्रॉन्देचें युद्ध (गोफणीची लढाई) असें म्हणतात; पण तेथें राजानें सरदारलोक आणि व्यापारीवर्ग या दोघांचाही निःपात केला. त्यानंतर सरदारलोकांच्या हातीं सत्ता अशी कांहींच राहिली नाहीं; परंतु त्यांना आपल्या बाजूस ठेवण्यासाठीं म्हणून राजानें त्यांना अगणित प्रकारच्या सवलती दिल्या. त्यांना कर म्हणून जवळजवळ

द्यावाच लागत नसे. सरदारलोक आणि उपाध्यायवर्ग या दोघांनाही करांची माफी होती. करांचें सर्व ओझें गरीब लोकांवर आणि विशेषतः शेतकरीवर्गावर पडे. या गरीब बिचाऱ्या दैन्यांत खितपतणाऱ्या लोकांकडून उकळलेल्या पैशाच्या बळावर फ्रान्समध्यें मोठमोठे वैभवशाली प्रासाद बांधण्यांत आले आणि राजाचा दरबार विलास आणि ऐश्वर्य यांनीं गजबजून गेला. पॅरिसच्या जवळच व्हर्सायला तूं गेली होतीस, तें आठवतें का तुला? तेथले ते भव्य प्रासाद आज आपण पाह्यला जातों ते सर्व सतराव्या शतकामध्यें अशा रीतीनें फ्रेंच शेतकऱ्यांच्या रक्तामधून उभारलेले आहेत. व्हर्साय शहर हें सर्वस्वीं आनियंत्रित आणि बेजबाबदार राजशाहीचें मूर्तिमंत प्रतीकच होतें जणुं. त्यामुळेंच सगळ्या राजशाहीला मूठमाती देणाऱ्या फ्रेंच राज्यक्रांतीचें पहिलें शिंग या व्हर्सायनेंच फुंकलें यांत कांहींच आश्चर्य नाहीं; परंतु आतां ज्या काळासंबंधीं आपण बोलतों आहों त्या काळापासून फ्रेंच राज्यक्रांति अजून फार दूर होती. या काळीं चौदावा लुई हा राजा होता. त्याला महान् बादशहा, राजसूर्य असें म्हणत असत. राजा म्हणजे सूर्य आणि दरबारांतील लोक म्हणजे त्याच्या भोंवतीं फिरणारे ग्रह आणि तारागण अशी त्याची ख्याति होती. इ. स. १६४३ पासून १७१५ पर्यंत त्याची कारकीर्द भली मोठी थोरली ७२ वर्षांची झाली. त्याचा प्रधान दुसरा एक कार्डिनलच होता. त्याचें नांव मॅझरिन. वरच्या वर्गांत विलासोपभोगांना, चैनबाजीला या काळांत खूप ऊत आलेला होता; त्याचप्रमाणें वाङ्मय, शास्त्रें आणि कला यांना राजदरबारीं चांगला आश्रय मिळत होता; परंतु वरच्या या अगदीं झिरझिरीत अशा ऐश्वर्याच्या मुलाम्याखालीं दैन्य आणि यातना यांचा डोंगर उभा होता. वरच्या बाजूला मोठे सुंदर केसांचे टोप, कोटाच्या बाहीच्या टोंकाला भरदार जरीचें भरतकाम आणि एकंदर सगळाच पोशाख मोठा ऐटदार; परंतु त्यांनीं झांकलेलें शरीर मात्र आंत कधींही न धुतलेलें आणि हरएक प्रकारच्या घाणीघुणींनें भरलेलें, अशा स्वरूपाचा हा काळ होता.

आपल्या सगळ्यांच्याच मनावर डामडौल आणि थाटमाट यांचा फार मोठा परिणाम होत असतो. त्यामुळें आपल्या दीर्घ कारकीर्दीत चौदाव्या लुईनें यूरप खंडावर मोठीच छाप पाडलेली होती यांत कांहीं आश्चर्य नाहीं. उत्कृष्ट राजांचा नमुना लुई, त्याचें बाकीच्यांनीं अनुकरण करावयाचें अशी अवस्था झालेली होती; परंतु हा महान् राजा खरोखर काय लायकीचा मनुष्य होता? सुप्रसिद्ध इंग्रज ग्रंथकार कार्लाइल यानें म्हटलें आहे, "तुमच्या या लुई क्वाटॉझच्या (चौदाव्या लुईच्या) अंगावरचीं राजवस्त्रें तेवढीं उतरून टाका म्हणजे तुम्हांला आंतल्या बाजूला खालीं दोन टोंकें फुटलेला एक मुळा आणि वरच्या बाजूला चित्रविचित्र रीतीनें कोरलेलें एक डोकें याशिवाय दुसरें कांहींसुद्धां आढळणार नाहीं!" हें फारच निर्दयपणाचें वर्णन आहे खरें आणि राजांनाचसें काय, सामान्य लोकांनाही, बहुतेक सर्वत्र तें सारखेंच लागू पडेल.

लुई क्वाटॉझ (चौदाव्या) च्याबरोबर आपण इ. स. १७१५ शीं, म्हणजे

अठराव्या शतकाच्या आरंभींच्या काळात येऊन पोंचतों. या दरम्यानच्या काळात यूरप खंडांतील इतर राष्ट्रांत पुष्कळच घडामोडी झालेल्या होत्या. त्यांतल्या कांहीं प्रसंगांकडे आपण थोडेंसें लक्ष पुरविण्यासारखें आहे.

नेदरलंडनें स्पेनविरुद्ध केलेल्या बंडाबद्दल मीं मागें तुला सांगितलेंच आहे. त्यांच्या या बाणेदार युद्धाची हकिकत जरा जास्त तपशीलवार रीतीनें पाहण्यासारखी आहे. जे. एल्. मॉटले नांवाच्या एका अमेरिकन गृहस्थानें या स्वातंत्र्ययुद्धाच्या हकिकतीचा एक प्रसिद्ध असा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत त्यानें ही कथा अत्यंत चित्तवेधक आणि अंतःकरण विरघळून टाकण्यासारख्या रीतीनें रंगविली आहे. यूरपच्या या लहानशा कोपऱ्यामध्यें साडेतीनशें वर्षांपूर्वी ज्या घडामोडी झाल्या त्यांचा हा जो अंतःकरण हालवून सोडणारा वृत्तान्त आहे, त्याच्याइतकी लक्ष खिळवून टाकणारी कादंबरीसुद्धां माझ्या वाचनांत नाहीं. या पुस्तकाचें नांव "डच प्रजासत्ताक राज्याचा उदय" असें असून तें मीं तुरुंगांत वाचलें.*

नेदरलंडमध्यें हॉलंड आणि बेल्जम या दोन्ही देशांचा समावेश होतो. त्यांच्या या नांवांवरूनच आपल्याला दिसून येतें, कीं हे खोलगट, समुद्रसपाटीहूनही खालच्या बाजूचे देश आहेत. हॉलंड हें नांवच **हॉलो लँड** म्हणजे खोलगट जमीन या शब्दांपासून निघालेलें आहे. या देशांतला फार मोठा भाग खरोखरच समुद्रसपाटीपासून खोल असून मोठमोठे बांध व भिंती उभारून त्याचें उत्तर समुद्रापासून संरक्षण करावें लागलेलें आहे. अशा या देशांत लोकांना रोजच समुद्राशीं झगडण्याचा प्रसंग असल्यामुळें हे लोक स्वाभाविकच चागले चिवट दर्यावर्दी बनतात; तसेंच ज्या लोकांना वारंवार समुद्रप्रवास करावा लागतो ते लोक व्यापार करण्याकडे स्वाभाविकपणेंच झुकतात. म्हणून हे नेदरलंडचे लोक व्यापारी झाले. हे लोक स्वतः लोकरीचे आणि इतरही पदार्थ निर्माण करीत आणि पूर्वेकडील प्रदेशांतून मसाल्याचे पदार्थही त्यांच्याच हातीं येत. त्यामुळें या देशांत मोठीं संपन्न आणि उद्योगधंद्यानें गजबजलेलीं शहरें वाढलीं; उदाहरणार्थ, ब्रूजेस, घेंट आणि विशेषतः अँटवर्प. पूर्वेशीं व्यापार जसा वाढत गेला तसतशी या शहरांची संपन्नता वाढत गेली आणि अँटवर्प शहर हें सोळाव्या शतकांत यूरप खंडामध्यें सर्व व्यापारी शहरांत प्रमुख शहर झालें. असें सांगतात, कीं तेथील देवघेवीच्या ठिकाणीं सराफकट्ट्यावर, **नाणे-बाजारांत** रोज एकमेकांशीं व्यवहार करण्याकरितां म्हणून पांच हजार व्यापारी जमा होत असत. रोज तेथें पांचशें जहाजें येत-जात असत आणि या व्यापारीवर्गाच्या हातांत या शहरांमधील राज्यकारभार असे.

रेफर्मेशनमधील ज्या नवीन धार्मिक कल्पना होत्या त्यांचें ज्यांना आकर्षण वाटावें अशाच तऱ्हेचा हा नवीन व्यापारीवर्ग होता. त्यामुळें त्या ठिकाणीं विशेषतः उत्तर

[*हिंदीमध्यें सस्ता-साहित्य-मंडलानें याचें भाषांतर 'नरमेध' या नांवानें प्रसिद्ध केलेलें आहे.]

यूरप खंडांत, प्रॉटेस्टंट पंथाचा प्रसार वाढला. निरानिराळ्या वारशाची संधि मिळाल्यामुळें हॅप्सबर्ग घराण्यांतील पांचवा चार्ल्स आणि त्याचा मुलगा दुसरा फिलिप यांचें राज्य या नेदरलंडवर झालेलें होतें. या दोघानाही राजकीय काय किंवा धार्मिक काय कोणत्याच प्रकारच्या स्वातंत्र्याची कल्पनासुद्धां सहन न होण्यासारखी होती. फिलिपनें शहराना मिळालेले हे निरानिराळे हक्क, त्याचप्रमाणें हा नवीन धर्मपंथ या दोहोंचाही नाश करण्याचा प्रयत्न केला. त्यानें नेदरलंडमध्यें गव्हर्नर जनरल म्हणून डयूक ऑफ आल्व्हा याला पाठविलें होतें. हा गृहस्थ जुलूम आणि जबरदस्ती यांच्याकरितां इतिहासांत चांगलाच प्रसिद्धीला आलेला आहे. त्यानें तेथें इन्क्विझिशनचें न्यायासन स्थापन केलें आणि एक ब्लड कौन्सिल "रक्तमंडळ" निर्माण केलें आणि या दोन्ही संस्थांनीं हजारों लोकांना सुळावर चढविलें किंवा डोकीं मारून ठार केलें.

हा सगळा इतिहास फारच लांबलचक आहे, म्हणून तो सगळा मला येथें सागतां येणार नाहीं. स्पेनचा जुलमीपणा जसजसा वाढत गेला तसतशी लोकांची त्याच्याशीं झगडा करण्याची शक्ति पण वाढत गेली. त्या लोकांमध्यें एक श्रेष्ठ आणि शाहणा, दूरदृष्टीचा पुढारी निर्माण झाला. त्याचें नांव ऑरेंजचा प्रिन्स विल्यम् हें होय. त्याला विल्यम् दि सायलेंट, 'न बोलणारा विल्यम्' असें म्हणत असत. हा डयूक ऑफ आल्व्हाला त्याच्याहून जास्त बलिष्ठ असा प्रतिस्पर्धी भेटला. इ. स. १५८८ मध्यें इन्क्विझिशनच्या कोर्टानें एकाच निवाड्यानें नेदरलंडमधील कांहीं मोजक्या निर्दिष्ट व्यक्ती सोडून, एकूण एक रहिवाशांना पाखंडी म्हणून देहान्ताची शिक्षा एकदम फर्मावितली. केवळ तीनचार ओळींच्या एका वाक्यानें तीस लाख लोकांना दिलेली देहान्ताची ही साऱ्या इतिहासांत अत्यंत अचंबा वाटण्यासारखी शिक्षा सर्वस्वीं अलौकिक आणि जगांत सर्वथा अजोड आहे !

पहिल्या पहिल्यानें हा झगडा म्हणजे नेदरलंडमधील सरदारवर्ग आणि स्पेनचा राजा यांच्यामधलाच फक्त झगडा आहे असें दिसत होतें. इतर देशांत जसे राजे आणि सरदार यांचे झगडे झाले त्यांतलाच हाही एक झगडा आहे असें वाटत होतें. या सरदारलोकांना नष्ट करून टाकण्याच्या प्रयत्नांत आल्व्हानें ब्रुसेल्स येथें कितीएक सरदारलोकांचीं डोकीं कापलीं. अशा रीतीनें वध झालेल्या सरदारांमध्यें एगमांटचा काउंट हा एक लोकप्रिय आणि श्रेष्ठ सरदार होता. त्यानंतर पुढें आल्व्हाला पैशाची तंगी पडल्यामुळें त्यानें नवीन करांचें ओझें लादण्याचा उपक्रम करून पाहिला; पण त्यामुळें व्यापारीवर्गाच्या खिशाला चट्टा बसूं लागला आणि त्यांनीं बंड केलें. याच्या भरीला तेथें कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंट या पंथामधील झगडा चालू होताच.

स्पेनची सत्ता त्या वेळीं फार बलिष्ठ होती. ती सत्ता या वेळीं श्रेष्ठपणाच्या अगदीं ऐन भरांत होती. उलट नेदरलंड्स म्हणजे काय, व्यापारीवर्गाचे आणि बेताल खर्च आणि चैन करणाऱ्या निःसत्त्व सरदारांचे कांहीं लहान सुभे इतकेंच त्याचें स्वरूप होतें. या दोन पक्षांत तुलना सुद्धां करण्याला जागा नव्हती. तरीपण या प्रांतांना

दडपून टाकणें स्पेनला कठिण गेलें. स्पेननें तेथें वारंवार कत्तली केल्या आणि जागोजागचे सर्वच्या सर्व रहिवासी पार नाहींसे केले. माणसें मारण्याच्या बाबतींत आल्व्हा आणि त्याचे सेनापती यांनीं चेंगीजखान व तैमूरलंग यांच्यावर कडी करण्याचा प्रसंग आणला. कित्येक ठिकाणीं त्यांनीं या मंगोलियन लोकांवरही खरोखरच हद्द केली. शहरांमागून शहरांना आल्व्हानें वेढे घातले. शहरांतील युद्धशास्त्राचें ज्ञान नसलेले पुरुष आणि पुष्कळ ठिकाणीं स्त्रियासुद्धां आल्व्हाच्या शिकलेल्या सैन्याशीं जामिनीवर आणि समुद्रांतही तोंड देऊं लागल्या; परंतु उपासमारीनें त्यांना अखेरीस हा लढा चालविणें अशक्य होत गेलें. अशा वेळीं स्पेनच्या गुलामगिरीचें जूं पत्करण्यापेक्षां आपल्याला मौल्यवान् असणाऱ्या आपल्या सर्वस्वाचा नाश झाला तरी बेहेत्तर, असें म्हणून हॉलंडच्या लोकांनीं स्पॅनिश शिपायांना पळवून लावण्याच्या अथवा बुडवून मारण्याच्या उद्देशानें उत्तर समुद्राला घातलेले सर्व बंधारे फोडून टाकले. लढाई जशी जशी पुष्कळ काळपर्यंत लांबत गेली तसतशी ती जास्त जास्त तीव्र आणि नाशकारक होत गेली आणि दोन्ही पक्ष अत्यंत क्रूरपणानें वागूं लागले. त्यांमध्यें सुंदर हार्लेम शहराच्या वेढ्याचा प्रसंग तर सगळ्यांत उठून दिसतो. तेथील लोकांनीं अगदीं शेवटच्या क्षणापर्यंत मोठ्या शौर्यानें शहराचें संरक्षण करण्याची शिकस्त केली; परंतु अखेरीस नित्याप्रमाणें स्पॅनिश सैन्यानें आंत शिरून भयंकर कत्तल आणि लूटमार केलीच. तसाच अल्कमारचा वेढा. बंधारे फोडल्यामुळें हें शहर कत्तलींतून, लूटमारींतून वांचलें एवढेंच. त्याचप्रमाणें लीडनचा वेढा; या ठिकाणीं शत्रूंनीं घेरल्यामुळें हजारों लोक उपासमारीनें आणि रोगराईनें मरण पावले. हेही वेढे असेच विशेष उठून दिसतात. लीडन शहरांत तर झाडावर एक हिरवें पानसुद्धां शिल्लक राहिलें नाहीं. तींसुद्धां सगळीं लोकानीं खाऊन टाकलीं होतीं! उकिरड्यावर एखादें शीत मिळेल म्हणून स्त्रीपुरुषांचे भुकेनें तळमळणाऱ्या कुत्र्यांशीं तेथें झगडे झाले. तरीपण ते शरण गेले नाहींत. शहराच्या तटांवर चढून उपासमारीनें नुसते हाडांचे सांपळे झालेल्या लोकांनीं शत्रूंचा धिक्कार केला आणि आम्ही उंदीर आणि कुत्रीं खाऊन राहूं पण शरण येणार नाहीं, असा निर्धार जाहीर केला. "हेंही सगळें संपलें आणि आम्हीच फक्त शिल्लक राहिलों, तर आम्ही आमचे डावे हात खाऊं आणि राहिलेल्या उजव्या हातांनीं आमच्या स्त्रिया, आमचें स्वातंत्र्य आणि आमचा धर्म यांचें जुलमी परकीयांपासून रक्षण करूं. परमेश्वराची आमच्यावर अवकृपाच झाली आणि आमचा नाशच करावयाचें त्याच्या मनांत आल्यामुळें त्यानें आम्हांला कसलेंच साहाय्य मिळूं दिलें नाहीं, तरीसुद्धां आम्ही तुमच्या या शहराच्या प्रवेशाला सारखा अडथळा करीत उभे राहूं. अगदीं शेवटचा क्षण जेव्हां आलासें दिसेल तेव्हां आम्ही आमच्या हातांनीं शहराला आग लावून देऊं आणि त्या आगींत बायका, मुलें, माणसें, आम्ही सगळीं, भस्म होऊन जाऊं; परंतु परकीयांकडून आमचीं घरें आम्ही भ्रष्ट होऊं देणार नाहीं आणि आमचें स्वातंत्र्यही पायांखालीं तुडवूं देणार नाहीं!"

अशी तेजस्वी वृत्ति लीडनच्या लोकांची होती; परंतु बाहेरून जेव्हां मदत येत

नाहीं अशा स्थितींत दिवसामागून दिवस जाऊं लागले तेव्हां तेथेंही निराशेचें साम्राज्य पसरलें. म्हणून बाहेर त्यानीं हॉलंडमधील शेत-जमिनी असणाऱ्या जमीनदारी भागांतील आपल्या इष्टमित्रांना संदेश पोंचविला. त्यावर या जमीनदारींतील लोकांनीं पाणी फोडून आपली प्रिय जमीन बुडवून टाकावयाची, पण लीडन शहर शत्रूच्या हातीं लागूं द्यावयाचें नाहीं असा महान् निश्चय केला. "जमीन दुसऱ्याच्या हातीं जाण्यापेक्षां बुडून गेलेली पुरवली" ही त्यांची भूमिका. म्हणून आपल्या लीडनमधील संकटांत सांपडलेल्या बांधवांच्या संदेशाला त्यांनीं पुढीलप्रमाणें उत्तर पाठविलें : "आम्ही आमची सर्व जमीन आणि आमचें सर्वस्व — धन व संपत्ति — पाण्यांत बुडवून टाकूं; परंतु आमच्या प्रिय लीडन शहराला आम्ही अंतर देणार नाहीं!"

शेवटीं बंधाऱ्यांमागून बंधारे फोडून टाकण्यांत आले आणि वाऱ्याची अनुकूलता मिळाल्यामुळें समुद्राचें पाणी आंतवर घुसलें आणि डच जहाजेंही आंतवर येऊन त्यांतून अन्नपाणी आणि इतर मदतही येऊन पोंचली. स्पॅनिश लोकांना या नव्या शत्रूचें, समुद्राचें, भय वाटून ते झपाट्यानें तेथून निघून गेले. अशा रीतीनें लीडन शहर बचावलें आणि तेथील रहिवाशांच्या शौर्याच्या स्मरणार्थ तेथें इ. स. १५७५ मध्यें लीडनची युनिव्हर्सिटी स्थापन करण्यांत आली. हें विश्वविद्यालय आजही यूरपमध्यें विख्यात आहे.

अशा या शौर्याच्या त्याचप्रमाणें खाटिकगिरीच्या अनेक कथा आहेत. सुंदर अशा अँटवर्प शहरांत तर भयंकर कत्तल आणि लूटमार झाली. ८००० लोकांना तेथें असें ठार करण्यांत आलें. या प्रकाराला इतिहासांत "स्पेनचा वणवा" असें नांव मिळालेलें आहे.

परंतु या महान् झगड्याचा खरा मोठा भाग नेदरलंडमधील दक्षिणेकडील भागाऐवजीं हॉलंडनेंच आपल्या अंगावर घेतला होता. स्पॅनिश लोकांनीं लांचलुचपतीनें आणि धाकदपटशानें पुष्कळसे सरदारलोक आपल्या बाजूला वळवून घेतले होते. त्यांच्या हातून त्यांनीं आपल्याच देशबांधवांचा नाश करविला. दक्षिण विभागांत प्रॉटेस्टंट लोकांपेक्षां कॅथॉलिक लोकांची संख्या फार मोठी होती. ह्या गोष्टींचें त्या कामीं स्पॅनिश लोकांना फार मोठें साहाय्य झालें. या कॅथॉलिक लोकांना आपल्याकडे वळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला व त्यांत त्यांना थोडेफार यशही आलें आणि सरदारांचें तर कांहीं विचारूंच नका! स्पॅनिश राजाची आपल्यावर कृपा व्हावी व त्याच्याकडून आपल्याला संपत्ति मिळावी, मग त्यासाठीं आपल्या देशाचा सर्वनाश झाला तरी बेहेत्तर, अशा बुद्धीनें या लोकांनीं केवढीं बेशरमपणाचीं, विश्वासघाताचीं आणि लुच्चेगिरीचीं कामें केलीं!

नेदरलंडमधील लोकसभेपुढें भाषण करतांना ऑरेंजचा विल्यम् एकदां म्हणाला, "नेदरलंडचा पाडाव होत असला, तर तो केवळ नेदरलंडकडूनच होत आहे. ड्यूक ऑफ आल्व्हा ज्या शक्तीची घमेंड करतो ती त्याच्या ठिकाणीं कोठून आली? तुमच्या-

आमच्यापासून–नेदरलंडमधील शहरांच्यापासून नव्हे काय! त्याला मिळालेलीं जहाजें, सामानसुमान, पैसा, हत्यारें, शिपाई हें सारें कोठून मिळालें? नेदरलंडच्या लोकांकडून!"

तात्पर्य, अखेरीस सामान्यतः आज ज्या देशाला बेल्जम म्हणतात तो सारा नेदरलंडचा भाग स्पॅनिश लोकांनीं आपल्या कबजात आणला; परंतु कितीही खटपट केली तरी हॉलंडला त्याला नमवितां आलें नाहीं. ह्या सर्व लढायांमध्यें पहिल्यापासून जवळजवळ थेट अखेरपर्यंत स्पेनच्या दुसऱ्या फिलिपचा राज्याधिकार मात्र हॉलंडनें केव्हांच अमान्य केला नाहीं, हें पाहून मात्र विलक्षण वाटतें. त्यांचे स्थानिक स्वतंत्रतेचे हक्क जर फिलिपनें मान्य केले असते, तर त्याला राजा म्हणून ठेवायला त्यांची हरकत नव्हती. शेवटीं फिलिपशीं आपले संबंध तोडून टाकणें त्यांना भाग पडलें. त्यांनीं आपला पुढारी ऑरेंजचा विल्यम् यास तें राजपद देऊं केलें; परंतु त्याला तें मुळींच नको होतें. अशा रीतीनें त्यांच्या जवळजवळ मनाविरुद्धच केवळ परिस्थितीच्या दडपणामुळें हॉलंडच्या लोकांना प्रजासत्ताक राज्य पत्करावें लागलें; इतका त्या वेळीं राजेशाहीच्या परंपरेचा जोर होता.

हॉलंडमधला हा झगडा पुष्कळ वर्षें चालू राहिला. इ. स. १६०९ च्या आधीं कांहीं हॉलंड देश स्वतंत्र होऊं शकला नाहीं. परंतु नेदरलंडमधील लढाईचा खरा भर इ. स. १५६७ पासून १५८४ पर्यंत चालू होता. स्पेनच्या दुसऱ्या फिलिपला ऑरेंजच्या विल्यमचा उघड लढाईत पराभव करतां येईना, तेव्हां त्यानें विल्यमचा एका खुनी इसमाकडून खून करविला. असा कोणी खून करील त्याला त्यानें बक्षीस जाहीर केलें होतें! यूरपमधील नैतिक परंपरा त्या काळीं या असल्या अवस्थेंत होती. विल्यमला मारण्याचे असे पुष्कळ प्रयत्न फसले. इ. स. १५५४ मध्यें सहावा प्रयत्न यशस्वी होऊन हा श्रेष्ठ पुरुष—साऱ्या हॉलंडमध्यें त्याला "विल्यम् बाबा" असें मोठ्या प्रेमादरपूर्वक म्हणत असत—मरण पावला. त्याला जें साधावयाचें तें तोंपर्यंत त्यानें साधलेलें होतें. लोकांच्या स्वार्थत्यागाच्या आणि दैन्यदुःखाच्या–हालअपेष्टांच्या आगींतून डच प्रजासत्ताक राज्य आतां स्थापन झालेलें होतें. जुलमी आणि अनियंत्रित राज्यकर्त्यांविरुद्ध झगडा केल्यामुळें कोणत्याही देशाचें किंवा समाजाचें हितच होत असतें. त्यामुळें एक प्रकारचें शिक्षण मिळतें आणि सामर्थ्य वाढतें. हॉलंडही अशा रीतीनें बलवान् आणि स्वावलंबी होऊन थोड्याच काळांत तें एक मोठें आरमारी सत्ताधीश राज्य बनलें आणि अतिपूर्वेकडे त्याचें साम्राज्य वाढूं लागलें. बेल्जम देश मात्र हॉलंडपासून वेगळा पडून स्पेनच्या अमलाखालींच राहिला.

यूरप खंडाचें हें आपलें चित्र संपूर्ण करण्यासाठीं आपण जरा जर्मनीकडे नजर टाकूं या. येथेंही इ. स. १६१८ पासून १६४८ पर्यंत आपसांतील यादवी भयंकर माजली होती. तिला "तीस वर्षांचें युद्ध" असें म्हणतात. हें युद्ध कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंट या दोन धर्मपंथांमधील होतें; त्यांत एका बाजूला जर्मनींतील राजनियोजक आणि दुसऱ्या बाजूला जर्मनींतील छोटे छोटे राजे यांच्यामध्यें लढाई चालू होती;

तसेंच या सर्वांचें मिळून बादशहाशींही युद्ध सुरू होतें. या गोंधळांत आणखी भर घालण्यासाठींच कीं काय फ्रान्सच्या कॅथॉलिक राजांची कृपादृष्टि येथील प्रॉटेस्टंटांच्या पक्षाकडे वळलेली होती. अखेरीस स्वीडनचा राजा "उत्तरेचा सिंह" या नांवानें प्रसिद्ध असलेला गस्टेव्हस ॲडाल्फस् यानें येऊन बादशहाचा पराभव केला आणि अशा रीतीनें प्रॉटेस्टंट लोकांचें रक्षण केलें; परंतु या सर्व भानगडींत जर्मन देशाचा मात्र सत्यानाश झाला. तेथील शिपाई लोक केवळ पैशासाठींच लढणारे आणि पेंढाऱ्यांसारखे होते. ते जिकडेतिकडे लूटमार करीत, दंगा माजवीत हिंडूं लागले. मोठमोठ्या सेनापतींनीं सुद्धां शिपायांचा पगार भागविण्यासाठीं किंवा त्याना अन्नपाणी देण्यासाठीं-सुद्धां जवळ पैसा नसल्यामुळें स्वतःच लूटमारींत भाग घेण्यास सुरुवात केली. आणि विचार कर, हा सगळा बेबंद कारभार सतत तीस वर्षें चाललेला होता! वर्षानुवर्ष जिकडे तिकडे नुसती कत्तल, नासधूस आणि लूटमार यांचा मारे धुमाकूळ माजून राहिलेला होता. व्यापार जवळजवळ कोठें मुळीं नव्हताच म्हटलें तरी चालेल. त्याच-प्रमाणें शेतीची लागवडही होणें दुरापास्तच होतें. त्यामुळें अन्नाचा पुरवठा कमी कमी होत गेला आणि उपासमार वाढूं लागली आणि त्याचा परिणामही अर्थातच पेंढारी आणि लूटमार यांची वाढ होण्यांतच झाला. जर्मनी देश म्हणजे धंदेवाईक पगारदार शिपायाचा एक प्रकारचा मळाच बनला.

अखेरीस बहुधा आतां लुटालूट करायला काहीं शिल्लकच उरलें नाहीं, या कारणामुळें या युद्धाचा शेवट झाला. परंतु या धक्क्यांतून वांचून पुन्हां वर येण्याला आणि स्थिरस्थावर व्हायला जर्मनीला फार फार दीर्घकाळ लागला. इ. स. १६४८ मध्यें वेस्टफालिया येथें तह होऊन जर्मनींतील आपसांतील युद्धाचा शेवट करण्यांत आला. या सुमारास पवित्र रोमन साम्राज्याच्या बादशहाची सत्ताही नाहींशी होऊन बादशहा नुसता सोंगापुरता आणि बुजगावण्यापुरता बादशहा म्हणून शिल्लक राहिला होता. त्या साम्राज्याचा एक भला मोठा लचका, आल्सेस प्रांत, फ्रान्सनें बळकावला; २०० वर्षें हा प्रदेश फ्रान्सच्या ताब्यांत राहिल्यानंतर मग जर्मनीच्या नवीन राजसत्तेला तो परत देणें फ्रान्सला भाग पडलें. परंतु १९१४ ते १९१८ च्या लढाईमध्यें तो फ्रान्सनें पुन्हां आपल्या कबजात घेतला. वेस्टफालियाच्या तहामुळें फ्रन्सचा अशा रीतीनें फायदा झाला. परंतु त्यानंतर जर्मनीमध्यें आणखी एक राजसत्ता निर्माण झाली आणि फ्रान्सच्या पाठीशीं तें एक कायमचें संकट उभें होऊन बसलें. ही सत्ता म्हणजे होएनझोलर्न घराण्यांतील राजांची प्रशियांतील राजसत्ता होय.

वेस्टफालियाच्या तहानें अखेरीस हॉलंड व स्वित्झर्लंड यांच्या प्रजासत्ताक राज्यांना मान्यता देण्यांत आली.

कसली ही लढाया, कत्तली, लुटालूट आणि धर्मवेडेपणा यांची कथा मी तुला सांगतों आहें! परंतु ज्ञानयुगाच्या प्रारंभानंतर ज्या वेळीं यूरप खंडामध्यें कलाकौशल्य आणि वाङ्मयनिर्मिति यांच्या उत्कर्षाचा नुसता बहर उसळला होता, त्या वेळीं यूरप

खंडाची राजकीय आणि सामाजिक व धार्मिक अवस्था ही अशी होती. यूरप खंडाची आशियांतील देशांशीं तुलना करून मीं तुला दाखविलेंच आहे, कीं यूरप खंडांत एक प्रकारचें नवजीवन संचरत होतें. या नवजीवनाची सर्व अडचणींतून वर येण्याची जी ही धडपड चालू होती त्यावरूनही हेंच आपल्याला दिसून येतें. बालकाचा जन्म आणि नवीन समाजपद्धतीचा जन्म हीं दोन्ही व्हावयाचीं म्हणजे त्याबरोबर कष्ट आणि सायास हे सोसावे लागावयाचेच. खालीं तळाशीं आर्थिक स्थिरता नसली कीं वरती पृष्ठभागावर समाज आणि राजकारण यांना हादरा बसावयाचाच. यूरपमध्यें नवजीवनाचा संचार होत होता हें अगदीं उघडच आहे ; परंतु त्याच्या सभोंवार केवढा हा सगळा रानटी व्यवहार आढळतो ! त्या काळची एक म्हणच होती कीं, "राज्यकारभाराचें शास्त्र म्हणजे खोटें बोलण्याचें शास्त्र." त्या काळचें सगळें वातावरण खोटें बोलणें, कारस्थानें, लांड्यालबाड्या, अत्याचार, क्रूरपणा यांच्या घाणीनें नुसतें सडून गेलेलें दिसतें आणि लोक एवढी ही घाण सहन तरी कशी करीत असत, याचाच मोठा चमत्कार वाटतो !

## ८७

# इंग्लंड देश आपल्या राजाचें डोकें उडावितो

२९ *ऑगस्ट, १९३२*

आतां आपण इंग्लंडच्या इतिहासावर थोडा वेळ खर्च करूं या. आतांपर्यंत आपण तिकडे बहुतेक दुर्लक्षच करीत आलों आहों. कारण मध्ययुगाच्या काळांत या देशाच्या इतिहासांत लक्ष देण्यासारखें विशेष कांहीं नव्हतेंच. फान्स किंवा इटली यांच्यापेक्षां हा देश मागासलेला होता. तेथील ऑक्स्फर्डचें विद्यापीठ मात्र फार पूर्वीपासून प्रख्यातीस चढलेलें होतें आणि लौकरच पुढें केंब्रिजचें विद्यापीठही तसेंच प्रख्यात झालें. ऑक्स्फर्ड विद्यापीठांतूनच विक्लिफ हा निघाला. त्याच्याबद्दल मी तुला मागें थोडेंसें बोललोंच आहें.

इंग्लंडच्या पहिल्या पहिल्या काळांतील इतिहासामध्यें जर विशेष कशावर लक्ष वेधत असेल, तर तेथील पार्लमेंटच्या विकासावर. या देशांत अगदीं पहिल्यापासून सरदारवर्गानें राजाच्या सत्तेवर नियंत्रण घालण्याचा प्रयत्न केला. त्यांतूनच इ. स. १२१५ सालीं मॅग्ना चार्टा निर्माण झाला. त्यानंतर थोड्या काळानें पार्लमेंटची सुरुवात झालेली दिसते. अर्थात् पार्लमेंटचें सुरुवातीचें हें स्वरूप अगदींच ठिसूळ आणि अर्धकच्चें होतें. तेथील मोठे सरदार व बिशप यांची मिळून प्रथम एक लॉर्डांची सभा स्थापन झाली. पण अखेरीस जी सभा अधिक महत्त्वाची ठरली ती

म्हणजे नाइट लोक,* छोटे छोटे जमीन-मालक आणि शहरातील व्यापारीवर्गाकडून निवडून आलेले प्रतिनिधी यांची मिळून झालेली सल्लागार सभा ही होय. याच लोक-नियुक्त सभेंतून पुढें कॉमन्स सभा निर्माण झाली. या दोन्ही सभांमध्यें किंवा गृहांमध्यें जमीन-मालक आणि धनिक लोक यांचाच भरणा असे. प्रत्यक्ष कॉमन्स सभेंत सुद्धां कांहीं थोडे श्रीमंत जमीनदार आणि व्यापारी लोक यांचेच फक्त प्रतिनिधी असत.

या कॉमन्स सभेच्या हातीं सत्ता फारच थोडी होती. पहिल्या प्रथम या सभेचें कार्य म्हणजे राजाकडे अर्ज करावयाचे आणि त्याच्यापुढें तक्रारी मांडावयाच्या एवढेंच होतें; पुढें पुढें हळूहळू त्यांनीं कर बसविण्याच्या बाबतींत हात घालावयाला सुरुवात केली. त्यांची संमति असल्याशिवाय नवीन कर बसविणें किंवा वसूलही करणें कठिण पडूं लागल्यामुळें राजानें कर बसविण्याच्या बाबतींत कॉमन्स सभेची संमति मागण्याची पद्धति सुरू केली. पैशाच्या पिशवीचें सामर्थ्य फार मोठें आहे; त्यामुळें पार्लमेंटला कराची ही सत्ता जसजशी मिळत गेली तसतसें पार्लमेंटचें, विशेषतः कॉमन्स सभेचें सामर्थ्य वाढत गेलें. राजा आणि कॉमन्स सभा यांमध्यें वारंवार खटके उडत असत; परंतु पुष्कळ काळपर्यंत पार्लमेंट ही एक दुबळीच संस्था होती आणि ट्यूडर घराण्यांतील राजे बहुतेक अंशीं अनियंत्रित सत्ताधारीच होते हें मीं तुला सांगितलेंच आहे; परंतु ट्यूडर राजे जात्याच चतुर असल्यामुळें पार्लमेंटशीं झगडा होण्याचा प्रसंग मात्र त्यांनीं येऊं दिला नाहीं.

यूरप खंडांतील तीव्र धार्मिक झगड्यांतून मात्र इंग्लंड बचावलें. तेथेंसुद्धां धर्माच्या नांवाखालीं कटकटी, बंडाळी, धर्मवेडेपणा व माथेफिरूपणा या गोष्टी कांहीं कमी झाल्या असें नव्हे. तसेंच अंगावर शहारे येतील अशा प्रकारें पुष्कळ स्त्रिया चेटक्या म्हणून येथेंही जिवंत जाळण्यांत आल्या! परंतु यूरप खंडाशीं तुलना केली तर इंग्लंड देशांत शांतताच होती असें म्हटलें पाहिजे. आठवा हेन्री राजा स्वतः प्रॉटेस्टंट झाला तसा इंग्लंड देशही प्रॉटेस्टंटच झाला असें गृहीत धरण्यांत आलें. अर्थात् देशांत कॅथॉलिक पंथाचे लोक कांहीं थोडे नव्हते. त्याचप्रमाणें अगदीं कडवे प्रॉटेस्टंटही पुष्कळच होते. इंग्लंडचें अधिकृत असें जें नवें धर्मपीठ होतें, तें मात्र या दोहोंच्या मध्यें कुठें तरी होतें. त्याचें नांव होतें प्रॉटेस्टंट धर्मपीठ; परंतु त्याचा व्यवहार प्रॉटेस्टंट पंथापेक्षां कॅथॉलिक पंथाशीं अधिक जुळता होता; आणि अगदीं खरें पाहिलें तर तें राजाच्या अधिकारांतलें एक सरकारी खातें मात्र बनून गेलेलें होतें. रोम आणि पोप यांच्याशीं मात्र त्याचा संबंध पार तोडून टाकण्यांत आला होता. आणि देशांत

*सरंजामशाही समाजव्यवस्थेंतील लष्करी कामगिरीच्या शर्तीवर राजाकडून जमीन मिळालेले लढवय्ये जमीनदार. इंग्लंडमध्यें विजेता विल्यम याच्या काळापासून असे जमीनदार उत्पन्न झाले. पुढें धर्मपीठानेंही असे लढाऊ जमीनदार निर्माण केले. नाइट या शब्दानें पुढें पुढें शौर्यधैर्ययुक्त, गरिबांचे संरक्षक, स्त्रीदाक्षिण्ययुक्त, रंगेल, खिलाडू अशा वीरांचाही बोध होऊं लागला. परंतु मुख्यतः ते वर सांगितल्याप्रमाणें राजाचे लष्करी साहाय्यक होते.

"पोपविरुद्ध" अशी पुष्कळशी बंडाळी पण माजली होती. इलिझाबेथ राणीच्या (ही आठव्या हेन्रीची मुलगी) कारकीर्दीत पूर्वेकडील देशांकडे आणि अमेरिकेकडे जाणारे जलमार्ग उघडले गेले होते आणि व्यापाराला नवीन क्षेत्र व संधि निर्माण झाली होती. त्यामुळें इंग्लंडच्या लोकांच्याही मनांत या बाजूचा मोह उत्पन्न झाला. स्पॅनिश व पोर्तुगीज लोकांना प्राप्त झालेल्या यशानें भारले जाऊन आणि त्यांच्याचप्रमाणें आपणही संपत्ति मिळवावी अशा लोभानें इंग्लिश लोकांनीं दर्यावर्दीपणा करण्यास सुरुवात केली. सर फ्रान्सिस ड्रेक व त्याच्यासारखेच आणखीही इतर लोक यांनीं प्रथम समुद्रांत चांचेगिरी करण्यास सुरुवात केली आणि ते अमेरिकेहून येणाऱ्या स्पॅनिश जहाजांची लुटालूट करूं लागले. त्यानंतर ड्रेकनें पृथ्वीपर्यटनाचा प्रचंड प्रयत्न सुरू केला. सर वाल्टर रॅले ॲटलांटिक समुद्र ओलांडून गेला व आज जो युनायटेड स्टेट्स किंवा अमेरिका देश म्हणून आपण म्हणतों, त्याच्या पूर्व किनाऱ्यावर वसाहत स्थापण्याचा त्यानें प्रयत्न केला. या वसाहतीला त्यानें इंग्लंडची कुमारिका राणी इलिझाबेथ इच्या गौरवार्थ व्हर्जिनिया (व्हर्जिन = कुमारी) हें नांव दिलें. या रॅलेनेंच अमेरिकेंतून यूरपमध्यें तंबाखूचें व्यसन प्रथम आणलें. यानंतर ती स्पॅनिश आरमाराची इंग्लंडवर स्वारी आली; परंतु त्या प्रचंड प्रयत्नाचा सगळाच फजिता झाल्यामुळें इंग्लंडचा उत्साह फारच मोठ्या प्रमाणावर वाढला. अर्थात् या सगळ्या घडामोडींचा राजा आणि पार्लमेंट यांमधील झगड्यांशीं कांहीं तसा साक्षात् संबंध नव्हता; मात्र त्यामुळें लोकांचीं मनें अन्य विषयांत गुंतलीं आणि घरच्या व्यवहारापेक्षां परदेशीय व्यवहाराकडे त्यांचें लक्ष लागलें; व त्यामुळें राजा व पार्लमेंट यांच्यामधील झगडा तात्पुरता दृष्टीआड झाला. तथापि ट्यूडर राजाच्या आमदानीतही आंतल्या बाजूला आग धुमसत होतीच.

इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीचा काळ हा इंग्लंडच्या इतिहासांतील सर्वांत अधिक भरभराटीचा तेजस्वी काळ आहे. इलिझाबेथ स्वतः फार श्रेष्ठ राणी होऊन गेली आणि तिच्या काळीं दुसरीं पुष्कळच कर्तबगार माणसें इंग्लंडमध्यें उदयास आलीं; परंतु राणी आणि तिचे साहसी कर्तबगार लढवय्ये वीर यांच्यापेक्षांही त्या काळचे कवी आणि नाटककार हे अधिकच श्रेष्ठ होते. त्यांच्यापैकीं विल्यम् शेक्स्पिअर हा तर अत्यंत सर्वश्रेष्ठ असून तो आज जागतिक इतिहासांत अमर होऊन राहिला आहे. त्याचीं नाटकें आज साऱ्या जगाच्या ओळखीचीं झालेलीं आहेत; परंतु खुद्द व्यक्तिशः त्याच्याबद्दल मात्र आपल्याला फारच थोडी माहिती आहे. तो आणि त्याचेच समकालीन दुसरे कित्येक श्रेष्ठ ग्रंथकार इंग्लंडमध्यें एकाच वेळीं चमकले आणि त्यांच्या प्रयत्नानें इंग्रजी भाषेंत आजही आपलें अंतःकरण हर्षनिर्भर करणाऱ्या अशा अनेक अत्यंत मौल्यवान् रत्नांची भर पडली. इलिझाबेथच्या काळांतील छोट्या छोट्या भावगीतांमध्येंसुद्धां जें एक विलक्षण माधुर्य आहे, तसें दुसऱ्या कोणत्याही भावगीतांत सांपडणार नाहीं. अत्यंत साध्या परंतु अत्यंत मधुर अशा भाषेंत, आनंदानें जणुं नाचत नाचत, हीं काव्यें अनुपम अशा कांहीं रीतीनें रोजच्याच साध्यासुध्या गोष्टींचें वर्णन करीत असतात. एक इंग्रजी

टीकाकार लिटन स्ट्राची यानें या काळाबद्दल लिहितांना म्हटलें आहे, "इलिझाबेथ राणीच्या काळांतील या अत्यंत उदात्त अशा वाङ्मयवीराच्या पथकानें आपल्या सामर्थ्यवान् आणि तेजस्वी प्रतिभेच्या बळावर, ज्याला चमत्कारयुग म्हटलें पाहिजे अशा केवळ एका पिढीच्या काळांत, आजपर्यंत जगांत दुसरीकडे कोणीं कोठेंही पाहिला नाहीं असा नाट्यवाङ्मयाचा अत्यंत गौरवशाली असा ठेवा इंग्लंड देशाला प्राप्त करून दिला आहे."

इलिझाबेथ राणी ही इ. स. १६०३ मध्यें म्हणजे इकडे हिंदुस्थानात अकबर बादशहा मरण पावला त्याच्या आधीं दोनच वर्षें मरण पावली. त्या वेळीं स्कॉटलंडमध्यें जो राजा होता, तो पहिला जेम्स् या नांवानें तिच्यामागून इंग्लंडच्या गादीवर आला; कारण तो कायद्यानें सगळ्यांत जवळचा वारस होता. अशा रीतीनें इंग्लंड आणि स्कॉटलंड हे देश एका राजाच्या अमलाखालीं आले. आतांपर्यंत जुलूमजबरदस्तीनें जी गोष्ट इंग्लंडला करता आली नव्हती, ती ही अशा रीतीनें अगदीं शांततेनें घडून आली. या जेम्स् राजाचा राजेलोकांच्या दैवी अधिकारावर विश्वास होता आणि पार्लमेंट संस्था त्याला पसंत नव्हती. तसेंच तो इलिझाबेथ राणीप्रमाणें चतुरही नव्हता. त्यामुळें लौकरच त्याच्यामध्यें आणि पार्लमेंटमध्यें कटकट उत्पन्न झाली. जेम्सच्याच राजवटींतून कितीएक त्याच्यापुढें मान वांकविण्यास तयार नसलेले ताठर प्रॉटेस्टंट लोक आपला मायदेश कायमचा सोडून मेफ्लॉवर जहाजांतून अमेरिकेंत वसाहत करण्यासाठीं निघून गेले. पहिल्या जेम्सच्या अनियंत्रित कारभाराला त्यांचा विरोध होता; तसेंच इंग्लंडचें नवें धर्मपीठही त्यांना आवडत नव्हतें; कारण तें प्रॉटेस्टंट पंथाला पुरेसें जुळतें नाहीं, कट्टर प्रॉटेस्टंट पंथाचें नाहीं, असें त्यांना वाटे. तेवढ्यासाठीं आपलीं घरेंदारें आणि देशही सोडून या लोकांनीं ॲटलांटिक समुद्राच्या पलीकडील नवीन अरण्यमय प्रदेशाकडे आपलीं जहाजें हांकारलीं. उत्तरेकडील किनाऱ्यावरील एका जागीं ते लागले. त्या ठिकाणाला त्यांनीं न्यू (नवीन) प्लिमथ असें नांव दिलें. त्यांच्यामागून आणखी पुष्कळ वसाहतवाले आले. त्याच्या वसाहती हळूहळू वाढत गेल्या आणि अखेरीस पूर्व किनाऱ्यावर त्यांच्या तेरा वसाहती प्रस्थापित झाल्या. याच वसाहतींतून पुढें संयुक्त अमेरिकन राज्यसंघ (अमेरिकेंतील संयुक्त राज्यें, यू. एस्. ए.) निर्माण झाला; पण ती हकिकत अजून फार दूरची आहे.

पहिल्या जेम्सचा मुलगा पहिला चार्ल्स हा इ. स. १६२५ मध्यें गादीवर आल्यानंतर मात्र इंग्लंडमध्यें लौकरच भांडण चांगलें रंगाला आलें. त्यामुळें पार्लमेंटनें इ. स. १६२८ मध्यें त्याच्याकडे "**पिटिशन ऑफ राइट**" म्हणजे "हक्कांचा खलिता" सादर केला. हा खलिता इंग्रजी इतिहसांत फार प्रख्यात आहे. पार्लमेंटनें या खलित्यामध्यें इंग्लंडचा राजा हा कांहीं अनियंत्रित सत्ताधीश – राज्यकर्ता – नाहीं आणि पुष्कळशा गोष्टी करण्याचा त्याला मुळींच अधिकार नाहीं असें राजाला बजावलें. उदाहरणार्थ, कायदेशीर चौकशीशिवाय राजाला कोणालाही कैदेंत टाकतां येणार नाहीं,

ही एक गोष्ट या अर्जात सांगितली होती. ऑर्डिनन्स काढावयाचे आणि त्याखालीं लोकांना तुरुंगांत टाकावयाचें हें जें आज विसाव्या शतकांत हिंदुस्थानांत इंग्रजांच्याच राजप्रतिनिधीला करतां येतें, तें इंग्लंडमध्यें सतराव्या शतकांतसुद्धां आणि खुद्द राजालाही करतां येत नव्हतें.

तुम्हांला अमुकच करतां येईल आणि अमुक करतां येणार नाहीं, असें लोक सांगूं लागलेले पाहून पहिला चार्ल्स संतप्त झाला आणि त्यानें पार्लमेंट बरखास्त करून त्याच्याशिवाय कारभार करण्यास सुरुवात केली; परंतु थोड्याच वर्षांत त्याला पैशाचा इतका तुटवडा पडला, कीं त्याला नवीन पार्लमेंट भरविणें भाग पडलें. पार्लमेंटशिवायच चार्ल्स जें जें कांहीं करीत होता त्याबद्दल फारच असंतोष माजलेला होता आणि राजाशीं दोन हात करण्यासाठीं नवीन पार्लमेंटचे हात नुसते वळवळत होते. म्हणून दोन वर्षांच्या आंतच इ. स. १६४२ मध्यें इंग्लंडमध्यें यादवी सुरू झाली. एका बाजूला राजा आणि त्याच्या मदतीला पुष्कळसे सरदार आणि बहुतेक सारें सैन्य; तर दुसऱ्या बाजूला पार्लमेंट आणि त्याला पाठिंबा देणारे मोठमोठे संपन्न व्यापारी आणि लंडन शहर यांचा असा सामना सुरू झाला. हें युद्ध अखेरीस पार्लमेंटच्या बाजूला ऑलिव्हर क्रॉम्वेल हा श्रेष्ठ पुढारी येईपर्यंत पुष्कळ दिवसपर्यंत असेंच रेंगाळत चालू होतें. क्रॉम्वेल हा फार मोठा संघटनाकुशल होता, कडक शिस्तीचा भोक्ता होता आणि पार्लमेंटच्या कार्याबद्दल एक प्रकारच्या धार्मिक निष्ठेनें त्याचें अंतःकरण भारलेलें होतें. कार्लाइलनें क्रॉम्वेलबद्दल लिहिलें आहे, "लढाईच्या संकटाच्या अत्यंत अंधकारमय प्रसंगीं, रणांगणावरील मोठ्या हातघाईच्या ठिकाणीं, इतर सर्व लोकांच्या अंतःकरणांतून आशा अजीबात मावळली असतांना क्रॉम्वेलच्या अंतःकरणांत आशेचा जणुं अग्निस्तंभच धगधगीतपणें उभा होता." क्रॉम्वेलनें नवीन सैन्य तयार केलें; त्यांना **आयर्नसाइड्स** (पोलादी फळी) असें नांव मिळालेलें आहे; त्या सैन्यांत त्यानें आपल्या ठिकाणचा उत्साह आणि शिस्तशीरपणा निर्माण केला. पार्लमेंटच्या सैन्याला प्यूरिटन म्हणत; चार्ल्सच्या सैन्याला कॅव्हॅलिअर्स म्हणत. या प्यूरिटन व कॅव्हॅलिअर लोकांमध्यें युद्ध चालू होतें. अखेरीस क्रॉम्वेलचा जय झाला आणि चार्ल्स, इंग्लंडचा खुद्द राजा, हा पार्लमेंटचा कैदी झाला.

पार्लमेंटच्या पुष्कळशा सभासदांचा विचार अद्यापिही राजाशीं तडजोड करावी असाच होता; परंतु क्रॉम्वेलच्या नवीन दमाच्या सैन्याला ही गोष्ट मुळींच पसंत नव्हती; म्हणून या सैन्याचा एक अधिकारी कर्नल प्राइड यानें सरळ धट्टपणें पार्लमेंटच्या सभागृहांत प्रवेश केला आणि अशा वृत्तीच्या सभासदांस तेथून बाहेर हांकलून दिलें. यालाच प्राइड्स पर्ज–प्राइडची खडसणी–असें म्हणतात. हा उपाय अगदींच आडदांडपणाचा आणि जहाल होता आणि त्यांत पार्लमेंटचाही अनादरच होता. पार्लमेंट मारे एका प्रकारच्या अनियंत्रित सत्तेला विरोध करीत होतें; तर इकडे दुसरी एक सत्ता, त्याचें स्वतःचेंच सैन्य, कायद्याचा मुळींच मान ठेवीत नव्हतें. क्रांतीचा मार्ग हा असा असतो.

बाकीचे जे कॉमन्स सभेचे सभासद राहिले–त्यांना रम्प पार्लमेंट म्हणत–त्यांनीं, लॉर्डांच्या सभेची हरकत न जुमानतांच चार्ल्सवर खटला चालविण्याचें ठरविलें आणि त्यांनीं त्याला "जुलमी, विश्वासघातकी, देशद्रोही, खुनी आणि देशाचा शत्रु" ठरवून देहान्ताची शिक्षा फर्मांविली. आणि इ. स. १६४९ मध्यें राज्य करण्याचा आपल्याला दैवी अधिकार आहे असा दावा सांगणारा त्यांचा हा जो राजा म्हणून नांदला होता, त्या माणसाचें डोकें लंडन येथें व्हाइट हॉलमध्यें उडविण्यांत आलें.

राजेलोकांचा मृत्यु आणि सामान्य माणसाचा मृत्यु यांत वस्तुतः कांहींच फरक नाहीं. इतिहासांत किती तरी राजांना अशा रीतीनें घातपातानें मरण आल्याचें आढळतें. अनियंत्रित सत्ता आणि राजशाही यांच्या पोटीं खून आणि वध यांचा जन्म होत असतो; इंग्लिश राजघराण्यामध्यें यापूर्वी कांहीं थोडेथोडके वध झालेले नव्हते. परंतु लोकनियुक्त अशा सभेनें स्वतःच न्यायासनावर चढण्याचें धाडस करावें, आपल्या राजाची चौकशी करावी, त्याला देहाताची शिक्षा फर्मावावी आणि तदनुसार पुढें त्याचें डोकें उडवावें, हा प्रकार अगदींच नवीन आणि अचंबा वाटण्यासारखा होता! इंग्रजलोक हे नेहमींच जात्या सुधारणाविन्मुख, पुराणप्रिय व कोणताही जलदी फेरफार करण्याला अत्यंत नाखुष असे असतांना त्यांनींच जुलमी आणि देशद्रोही राजाशीं लोकांनीं कसें वागावें याचा हा असा धडा घालून द्यावा, ही मात्र मोठीच विलक्षण गोष्ट आहे! परंतु हें खरें, कीं ही गोष्ट तसेंच म्हटलें तर सर्वसाधारण इंग्रज जनतेनें केलेली नव्हती; तर क्रॉम्वेलच्या हाताखालच्या नव्या दमाच्या आयर्नसाइड्सनीं ती केलेली होती.

यूरपमधील सर्व राजे, महाराजे, संस्थानिक आणि अमीरउमराव यांना त्यामुळें फार जोराचा धक्का बसला. आपल्या राज्यांतील सामान्य जनता जर अशी उर्मटपणानें वागूं लागली, तिनें जर असा ताळतंत्र सोडला व इंग्लंडमधील लोकांचा धडा गिरविला तर आपलें कसें होणार हा त्यांना प्रश्न पडला. त्यांच्यापैकीं पुष्कळांना असें वाटत होतें, कीं थेट इंग्लंडवरच स्वारी करावी आणि इंग्लंडलाच नामोहरम करावें; परंतु इंग्लंड कांहीं आतां एखाद्या लेच्यापेच्या नालायक राजाच्या हातांत नव्हतें. इंग्लंड हें आतां अगदीं पहिल्या प्रथमच एक प्रजासत्ताक राज्य झालेलें होतें आणि त्याचें रक्षण करायला क्रॉम्वेल व त्याचें सैन्य खडें होतें. क्रॉम्वेल हा इंग्लंडचा जवळजवळ डिक्टेटर–सर्वसत्ताधीशच–होता. त्याला "लॉर्ड प्रोटेक्टर" अशी पदवी होती. त्याच्या कडक आणि कर्तबगार अमलाखालीं इंग्लंडचें सामर्थ्य वाढलें व इंग्लंडच्या आरमारानें डच, फ्रेंच आणि स्पॅनिश आरमारांना हुसकून लावलें. आपल्या आतांपर्यंतच्या इतिहासांत इंग्लंड आतां प्रथमच यूरप खंडांतील प्रमुख आरमारी सत्ताधारी राष्ट्र बनलें.

पण हें इंग्लंडचें प्रजासत्ताक राज्य फारच थोडा काळ टिकलें; चार्ल्सच्या फांशीनंतर धड अकरा वर्षें सुद्धां तें टिकलें नाहीं. क्रॉम्वेल इ. स. १६५८ मध्यें मरण

पावला आणि त्यानंतर दोनच वर्षांनीं या प्रजासत्ताक राज्याचा अंत झाला. चार्ल्सच्या (पहिल्या) मुलानें पळून जाऊन फ्रान्समध्यें आश्रय घेतला होता. तो इंग्लंडला परत आला. लोकानीं त्याचें स्वागत केलें आणि दुसरा चार्ल्स म्हणून त्याला राज्याभिषेक केला. हा दुसरा चार्ल्स अगदींच हीन दर्जाचा व दुराचारी मनुष्य होता. त्याची राजाबद्दलची कल्पना म्हणजे मिळेल तेवढी चैन करावयाची एवढीच होती; पण पार्लमेंटच्या विरुद्ध फारसें अधिक जावयाचें नाहीं एवढा शहाणपणा त्याच्या अंगीं होता. तथापि इकडे त्याला फ्रान्सच्या राजाकडून प्रत्यक्ष तनखा मिळतच होता. त्यामुळें क्रॉम्वेलच्या वेळीं इंग्लंडला जें स्थान प्राप्त झालें होतें, तें नाहींसें झालें आणि डच लोकांनीं प्रत्यक्ष थेट टेम्स नदीपर्यंत येऊन इंग्रजांचें आरमार जाळून टाकलें.

चार्ल्सचा भाऊ दुसरा जेम्स् हा त्याच्यामागून गादीवर आला आणि ताबडतोब त्याची पार्लमेंटशीं कटकट सुरू झाली. जेम्स् हा मोठा श्रद्धाळू कॅथॉलिक होता आणि त्याच्या मनांतून इंग्लंडमध्यें पोपचें वर्चस्व प्रस्थापित करावें अशी कल्पना होती; परंतु इंग्लंडच्या लोकांचीं धर्मविषयक मतें जरी कशाही प्रकारचीं असलीं – आणि तशीं निश्चित अशीं मतें त्या देशांत नव्हतींच – तरी बहुतेक सारे इंग्रजलोक पोप आणि पोपचा पंथ – पोपशाही – यांच्या मात्र फार तीव्रपणें विरुद्ध होते. सर्व देशभर पसरलेल्या या भावनेपुढें दुसऱ्या जेम्सचें कांहीं चाललें नाहीं. पार्लमेंटचा राग मात्र त्यानें आपल्यावर ओढवून घेतला आणि जीव वांचविण्यासाठीं त्याला फ्रान्सचा आश्रय घ्यावा लागला.

अशा रीतीनें पार्लमेंटला राजावर हा आणखी एक जय मिळाला व तोही अगदीं शांततेनें, आपसातील यादवीचा प्रसंग न येतांच. जेम्स् गेला तेव्हां देशांत राजा कोणीच नव्हता; पण इंग्लंड देशाची कांहीं पुन्हां प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्याची तयारी नव्हती. असें म्हणतात, कीं इंग्लंड देशाला कोणी तरी एक धनी असावा लागतो आणि त्याहीपेक्षां डामडौल आणि राजवैभव यांची त्या लोकांना अधिकच आवड आहे. म्हणून पार्लमेंटनें राजासाठीं शोध चालविला आणि अखेरीस ऑरेंजच्या राजवंशांत त्यांना एक राजा सांपडला. याच घराण्यांत शंभर वर्षांपूर्वी विल्यम् दि सायलेंट हा झाला होता व त्याच्या नेतृत्वाखालीं नेदरलंडचें स्पेनविरुद्ध स्वातंत्र्यासाठीं महान् युद्ध झालें होतें. आतांही तेथें विल्यम् नांवाचाच संस्थानिक त्या घराण्यापैकीं होता आणि त्यानें इंग्लिश राजघराण्यांतील मेरी नांवाच्या राजकुमारीशीं लग्न केलें होतें. तेव्हां विल्यम् आणि मेरी या दोघांना मिळून इ. स. १६८८ मध्यें इंग्लंडच्या गादीवर बसविण्यांत आलें. पार्लमेंट हेंच आतां सर्वसत्ताधीश झालें होतें आणि अशा रीतीनें लोकांचें प्रतिनिधिभूत असें जें पार्लमेंट त्याच्या हातीं राजसत्ता येण्याची ही राज्यक्रांति आतां पूर्ण झाली. या वेळेपासून कोणाही राजाचें किंवा राणीचें इंग्लंडमध्यें पार्लमेंटच्या अधिकाराला विरोध करण्याचें धाडस झालें नाहीं. परंतु

असें जरी असलें तरी प्रत्यक्ष अधिकार अमान्य न करतां किंवा उघड विरोध न करतांही आंतून पुष्कळ कारस्थानें करून पार्लमेंटवर वजन आणण्याचे मार्ग कांहीं कमी नसतात आणि पुष्कळ ब्रिटिश राजांनीं या मार्गाचा अवलंब केलेला आहे.

पार्लमेंटच्या हातांत सर्व सत्ता आली खरी; परंतु या पार्लमेंटचें स्वरूप कशा प्रकारचें होतें? इंग्लंडच्या सामान्य जनतेच्या तर्फेचे प्रतिनिधी त्यांत होते अशी समजूत करून घेऊं नको. इंग्लंडमधल्या अगदींच अल्पसंख्याक लोकांचे प्रतिनिधी या पार्लमेंटमध्यें असत. हाउस ऑफ लॉर्ड्सच्या नांवावरूनच ही गोष्ट उघड होते, कीं ही सभा सरदार, मोठे सरंजामदार, जमीनदार आणि धर्माधिकारी बिशप यांच्या प्रतिनिधींची होती; परंतु कॉमन्स सभेमध्येंसुद्धां श्रीमंत लोक, मोठमोठे जमीनमालक किंवा मोठे व्यापारी यांचाच भरणा बहुतेक असे. मतदानाचा हक्क फारच थोड्या लोकांना होता. नुकतें शंभर वर्षांपूर्वीपर्यंत इंग्लंडमध्यें ज्यांना 'खिशांतले मतदार-संघ' (Pocket Burroughs) असें नांव होतें, असे किती तरी मतदारसंघ होते. याचा अर्थ असा, कीं हे मतदारसंघ खरें पाहिलें असतां कोणा तरी एखाद्या व्यक्तीच्या मुठीमध्यें असत. कित्येकदां तर अशा मतदारसंघांतील मतदारांची संख्या एक किंवा दोन मतदार इतकी भली मोठी असे! असें म्हणतात, कीं इ. स. १७९३ मध्यें कॉमन्स सभेच्या ३०६ सभासदांची निवडणूक एकूण १६० मतदारांकडून झालेली होती! ओल्ड सारम नांवाच्या एका मतदारसंघांत होतें फक्त एकच झोंपडें; पण त्या मतदारसंघातर्फे दोन सभासद पार्लमेंटमध्यें निवडले होते! अशा रीतीनें फार मोठ्या बहुसंख्य लोकांना मतदानाचा हक्क नव्हता आणि त्यांचे प्रतिनिधी पार्लमेंटांत मुळींच नव्हते ही गोष्ट आतां तुझ्या लक्षांत येईल. त्यामुळें कॉमन्स सभा ही लोकांची प्रातिनिधिक सभा मुळींच नव्हती. शहरांमधून जे मध्यमवर्गाचे लोक नवीनच उदयास येत होते, त्यांचेंसुद्धां प्रतिनिधित्व कॉमन्स सभेकडे नव्हतें. ती फक्त जमीनमालक आणि बडे व्यापारी यांची प्रतिनिधि-सभा होती. पार्लमेंटच्या सभासदांच्या जागेची खरेदी-विक्री होऊं शकत असे. यामुळें लांचलुचपतीला नुसता ऊत आला होता. हा प्रकार अगदीं अलीकडे येट इ. स. १८३२ पर्यंत म्हणजे अवघ्या शंभर वर्षांपूर्वीपर्यंत चालू होता. पुष्कळ चळवळ झाल्यानंतर या वर्षीं पार्लमेंटच्या सुधारणेचा पहिला कायदा पास झाला आणि त्यानें पुष्कळशा लोकांना मतदानाचा हक्क मिळाला.

अशा रीतीनें काय दिसून येतें, तर पार्लमेंटला राजावर जय मिळाला याचा खरा अर्थ म्हणजे मूठभर श्रीमंत लोकांचा जय झाला. इंग्लंडचा राज्यकारभार खरोखर या मूठभर जमीनमालकांच्या हातामध्यें आला; त्यांच्यांत उगीच मधून मधून नांवापुरते श्रीमंत व्यापारी होते. बाकीच्या सगळ्या वर्गांना, म्हणजे बहुतेक सबंध राष्ट्राला त्यांत कांहींसुद्धां बोलण्याचा अधिकार नव्हता.

स्पेनशीं पुष्कळ काळ युद्ध केल्यानंतर जें डच प्रजासत्ताक राज्य अस्तित्वांत आलें तेंही याचप्रमाणें केवळ श्रीमंत लोकांचें राज्य होतें हें तुझ्या लक्षांत असेलच.

विल्यम् आणि मेरी याच्यानंतर मेरीची बहीण ॲन ही इंग्लंडची राणी झाली. इ. स. १७१४ मध्यें तिचा मृत्यु झाल्यानंतर पुन्हां एकदां पुढें राजा कोण ही अडचण उपस्थित झाली. शेवटीं पार्लमेंटनें राजाच्या शोधार्थ जर्मनी देश गांठला. तेथें हॅनोव्हरच्या राजघराण्यांतील एक राजनियोजक असलेला जर्मन गृहस्थ पार्लमेंटला पसंत पडला आणि त्याला त्यांनीं इंग्लंडचा पहिला जॉर्ज राजा म्हणून प्रस्थापित केलें. हा हुषार तर नव्हताच, परंतु अगदींच मंदबुद्धि होता आणि म्हणूनच पार्लमेंटनें त्याला पसंत केलें असावें. कारण पार्लमेंटच्या कामांत ढवळाढवळ करूं पाहणाऱ्या हुषार राजापेक्षां मूर्ख राजा फार चांगला. पहिल्या जॉर्ज राजाला इंग्रजी भाषा बोलतांसुद्धां येत नसे. राजा म्हणायचा इंग्लंडचा आणि तरीसुद्धां बिचाऱ्याला त्या देशाची भाषासुद्धां अवगत नसायची! त्याचा मुलगा दुसरा जॉर्ज यालासुद्धां इंग्रजी भाषा फारशी येत नव्हती. अशा रीतीनें इंग्लंडमध्यें हॅनोव्हर किंवा हॅनोव्हेरियन घराणें प्रस्थापित झालें आणि आजही हेंच घराणें तेथें अस्तित्वांत आहे. हें घराणें राज्यकारभार करीत आहे अशी शब्दयोजना करणें कांहीं बरोबर होणार नाहीं; कारण राज्याचा सगळा कारभार पार्लमेंटच्या हातीं आहे.

सोळाव्या आणि सतराव्या शतकामध्यें इंग्लंड आणि आयर्लंड या देशांत पुष्कळच झगडे आणि कटकटी चालू होत्या. इलिझाबेथ राणी आणि पहिला जेम्स् राजा या दोघांच्याही कारकीर्दीत पहिल्यापासून अखेरपर्यंत आयर्लंड जिंकण्याचे अनेक प्रयत्न इंग्लंडकडून चालू होते; तेथें पुष्कळ बंडें होत होतीं आणि इंग्लंडकडून तेथें अनेक कत्तलीही झाल्या. जेम्स् राजानें आयर्लंडच्या उत्तर किनाऱ्याला अल्स्टर प्रांतांतील पुष्कळसा भाग खालसा करून आपल्या ताब्यांत घेतला आणि स्कॉटलंड-मधील प्रॉटेस्टंट लोकांना तेथें वसाहत करण्यासाठीं पाठविलें. तेव्हांपासून हे प्रॉटेस्टंट वसाहतवाले तेथें राहत आलेले आहेत आणि अशा रीतीनें आयर्लंडचे दोन तुकडे पडलेले आहेत. एक स्थानिक आयरिश लोकांचा आणि दुसरा वसाहतवाल्या स्कॉच लोकांचा; एक रोमन कॅथॉलिक लोकांचा आणि दुसरा प्रॉटेस्टंट लोकांचा. या दोन तटांमध्यें अत्यंत तीव्र द्वेष नांदत आलेला असून इंग्रजांनीं या फुटीचा चांगला फायदा घेतलेला आहे. राज्यकर्त्या लोकांचा नेहमींच "फोडा आणि झोडा" या नीतीवर विश्वास असतो. आजसुद्धां आयर्लंडमधला सगळ्यांत मोठा झगड्याचा प्रश्न म्हणजे हा अल्स्टरचाच प्रश्न आहे.

इंग्लंडमधील आपसांतील युद्धाच्या वेळीं आयर्लंडमध्यें इंग्लिश लोकांची कत्तल करण्यांत आली होती. क्रॉम्वेलनें निर्दयपणें आयरिश लोकांची कत्तल करून या गोष्टीचा सूड घेतला; त्यामुळें अगदीं या घटकेपर्यंत क्रॉम्वेलबद्दल आयरिश लोकांच्या मनांत तीव्र संतापाची भावना आहे. त्यानंतर तेथें पुष्कळच लढाया झाल्या,

पुष्कळदां तडजोडी आणि तह झाले आणि इंग्लिश लोकांनीं ते मोडले–असा हा आयर्लंडच्या यातनांचा इतिहास फारच लांब आणि अतिशय दुःखकारक अशा प्रकारचा आहे.

तुझ्या आवडत्या **गलिव्हर्स ट्रॅव्हल्स**चा कर्ता जोनाथन स्विफ्ट हा याच काळांत इ. स. १६६७ पासून १७४५ पर्यंत होऊन गेला, हें एक तुला सांगण्यासारखें आहे. हें पुस्तक लहान मुलांचें प्रिय पुस्तक म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु खरोखर, त्या पुस्तकांत तत्कालीन इंग्लंडवर अत्यंत उपरोधिक टीका आहे. **रॉबिन्सन क्रूसो**चा कर्ता डॅनियल डीफो हाही स्विफ्टचा समकालीनच होता.

## ८८

## बाबर

३ सप्टेंबर, १९३२

आतां आपण हिंदुस्थानकडे परत येऊं या. अलीकडे आपण यूरप खंडावर पुष्कळच वेळ घालविला; पुष्कळशा पत्रांमध्यें आपण युद्धें आणि बंडाळ्या यांच्या अशा धुमाकुळाच्या वरच्या आवरणाच्या आंत जाऊन सोळाव्या आणि सतराव्या शतकांत यूरपमध्यें आंतल्या बाजूला खरोखर काय काय घडामोडी चालल्या होत्या, हें पाहण्याचा प्रयत्न केला. त्या काळच्या यूरपबद्दल तुझ्या मनावर कोणत्या प्रकारचे परिणाम घडलेले असतील, कशा प्रकारचीं चित्रें उमटलीं असतील कोणीं सांगावें? जे कोणते ठसे तुझ्या मनावर उमटलेले असतील ते अगदीं संमिश्र असणार हें निश्चित. आणि तसें झालें तर कांहीं आश्चर्य नाहीं. कारण त्या काळच्या यूरप खंडाचें स्वरूपच संमिश्र आणि विलक्षण आहे. अखंड आणि रानटी पद्धतीचीं युद्धें, धार्मिक माथेफिरूपणा आणि निर्दयपणा–ज्याला इतिहासांत दुसरीकडे कोठें दाखला नाहीं अशा प्रकारचा–आणि सामान्य जनतेची निर्लज्जपणें चाललेली पिळणूक, हे त्या काळच्या यूरपचे विशेष होत. या सगळ्याच्या मानानें चीन देश किती तरी युगें पुढारलेला वाटत होता; तो देश सुसंस्कृत होता, कलाकौशल्ययुक्त होता, दुसऱ्यांच्या मतांविषयीं उदार होता आणि बहुतांशीं शांततापिय होता. हिंदुस्थानमध्यें पुष्कळ फाटाफूट आणि अवनत अवस्था झालेली होती. तरीसुद्धां यूरपशीं तुलना करतां हिंदुस्थानसुद्धां पुष्कळ श्रेष्ठच ठरे.

परंतु या स्वरूपाहून वेगळें आणि आल्हादकारक असेंही एक स्वरूप यूरप खंडाचें त्या काळीं होतें. तेथें आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचे अंकुर नुकतेच वर येऊं लागलेले होते आणि सामान्य जनतेच्या स्वातंत्र्याची कल्पना वाढूं लागून राजेलोकांचीं सिंहासनें हादरून टाकीत होती. या सगळ्याच्या बुडाशीं, त्यांचें आणि दुसऱ्याही

पुष्कळच घडामोडींचें मूळ कारण म्हणून त्या काळच्या पश्चिम आणि वायव्य यूरपमध्यें घडून आलेली व्यापारी आणि औद्योगिक वाढ ही नजरेस येते. दूरदूरच्या देशांशीं व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनीं भरलेलीं आणि कारागीर लोकांच्या औद्योगिक कार्यानें गजबजून गेलेलीं मोठमोठीं शहरें त्या काळीं तेथें उदयास आलेलीं आढळतात. सबंध पश्चिम यूरप खंडभर कारागिरांचे आणि उद्योगधंदेवाल्यांचे संघ स्थापन होतात. या व्यापाऱ्यांचा आणि कारखानदारांचा मिळून एक नवाच धनिकवर्ग–नवीन मध्यमवर्ग–यूरपमध्यें निर्माण होतो. हा वर्ग वाढत असतां त्याच्या मार्गांत राजकीय, सामाजिक, धार्मिक अशा पुष्कळच अडचणी उभ्या राहतात. राजकीय आणि सामाजिक कारभारांत अद्यापि सरंजामदारशाहीचे अवशेष पुष्कळच होते. सरंजामदारशाही ही जुन्या काळाला अनुरूप अशी समाजव्यवस्था होती; बदलल्या काळाशीं ती जुळती नव्हती. व्यापार आणि उद्योगधंदे यांना तिचा अडथळा होत होता. हे सरंजामदार सरदार नाना तऱ्हांचे कर आणि देणीं वसूल करीत; त्यामुळें व्यापारीवर्गाला फार त्रास होई. त्यामुळें या धनिकवर्गानें या सरंजामदारशाहीच्या हातून सत्ताच काढून घेण्याचा उपक्रम सुरू केला. राजालाही हे सरदार लोक नकोच होते; कारण ते त्याच्या सत्तेवर आक्रमण करण्याची धडपड करीत असत. म्हणून राजा आणि धनिकवर्ग हे या सरंजामदारवर्गाच्या विरुद्ध एकत्र झाले आणि त्यांचें खरें वर्चस्व त्यांनीं पार हिरावून घेतलें. याचा परिणाम म्हणजे राजेलोकच अधिक सामर्थ्यवान् आणि अनियंत्रित झाले.

त्याचप्रमाणें पश्चिम यूरप खंडांतील त्या काळच्या धार्मिक संघटना, प्रचलित धार्मिक समजुती आणि व्यवहारधंदा करण्याच्या त्या काळच्या रीतीभाती यांचीही व्यापार आणि उद्योगधंदे यांच्या वाढीच्या मार्गांत अडचण होत होती, असा अनुभव येऊं लागला. धर्माचा तर सरंजामदारशाहीशीं अनेक प्रकारांनीं संबंध होता आणि धर्मपीठ हें तर स्वतःच एक मोठें जमीनदार होतें, हें मीं तुला सांगितलेंच आहे. या काळच्या पूर्वीच कांहीं वर्षांपासून कांहीं कांहीं व्यक्ती आणि गट रोमन धर्मपीठावर टीका करण्यासाठीं आणि त्याचा अधिकार उडवून लावण्यासाठीं उभे राहूं लागले होते; तथापि त्यांना रोमन धर्मपीठाचें फारसें कांहींच वांकडें करतां आलें नाहीं. पण आतां नवीन उदयास येणाऱ्या या धनिकवर्गालाच या बाबतींत पुष्कळ फेरबदल व्हावयास हवा होता; म्हणून ही धर्मसुधारणेची चळवळ मग फारच जोरानें फोफावली.

आतांपर्यंत हे किंवा अशा प्रकारचे इतरही कितीएक फेरबदल एकाच वेळीं यूरप खंडांत घडून आलेले आपण जे पाहत आलों, ते सर्व म्हणजे ज्या एका क्रांतीमुळें धनिकवर्ग समाजाच्या अग्रस्थानीं आला त्या क्रांतीचींच निरनिराळीं स्वरूपें होतीं. पश्चिम यूरप खंडांतील सर्व देशांत या क्रांतीची घडामोड सामान्यपणें सारख्याच पद्धतीची आढळून येते; मात्र निरनिराळ्या देशांत हे फेरबदल निरनिराळ्या वेळीं घडून आले एवढेंच. पूर्व यूरप खंड मात्र या काळांत आणि पुढेंही पुष्कळ काळपर्यंत उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें फारच मागासलेलें होतें आणि त्यामुळें तेथें फारसे फेरबदल घडून आले नाहींत.

चीनमध्यें आणि हिंदुस्थानमध्येंही कारागिरांचे संघ होते आणि कारागीर व धंदेवाईक लोक यांची या देशात फारच प्रचंड संख्या होती. उद्योगधंद्यांचीही प्रगति या दोन्ही देशांत चांगली झालेली होती. इतकी, कीं पुष्कळ बाबतींत पश्चिम यूरपांतल्यापेक्षांसुद्धां त्यांचें पाऊल पुढें होतें. परंतु त्या अवस्थेतही यूरपांतल्याप्रमाणें या देशांत शास्त्रीय ज्ञानाची वाढ झालेली दिसत नाहीं; त्याचप्रमाणें सामान्य जनतेच्या स्वातंत्र्याबद्दलची ओढही उत्पन्न झालेली आढळत नाहीं. या दोन्ही देशांत फार पूर्वीच्या काळापासून धार्मिक स्वातंत्र्याची आणि शहरें, खेडीं आणि कारागीरसंघ यांच्यामधील स्थानिक स्वातंत्र्याची फार मोठी परंपरा अस्तित्वांत होती. या दोन्ही देशांत उभारण्यांत आलेली समाजपद्धति फार काळपर्यंत टिकून राहिलेली होती आणि यूरप खंडांतील कोणत्याही समाजपद्धतीपेक्षां ती अधिक सुदृढ व भक्कम पायावर आधारलेली होती. परंतु या समाजपद्धतीचा हा भक्कमपणा आणि लवचिकपणाचा अभाव यांमुळेंच तिची पुढें प्रगति, वाढ होण्याला प्रतिबंध होत होता. याचा परिणाम म्हणून हिंदुस्थानांत फाटाफूट आणि अवनति होऊं लागली व अखेरीस मोंगल वंशाचा बाबर यानें उत्तरेकडून हा देश जिंकला हें आपण पाहिलेंच आहे. या काळीं या देशांतील लोक आपल्या प्राचीन आर्यांच्या स्वातंत्र्याच्या सर्व कल्पना पार विसरून गेले होते आणि गुलामी मनोवृत्तीचे बनून वाटेल त्या राज्यकर्त्यांचा अम्मल चालवून घेण्याला तयार झालेले होते असें दिसतें. वास्तविक मुसलमान लोक हे या देशांत एक प्रकारच्या नवीन जीवनाची खळबळ घेऊन आले होते; तरी ते सुद्धां स्वतःच या देशांतील बाकीच्या लोकांप्रमाणें अवनत, सत्त्वहीन आणि गुलामी मनोवृत्तीचे होऊन गेले.

त्यामुळें पूर्वेकडील प्राचीन सुधारणांच्या अंगीं न दिसून येणारें असें नवचैतन्य आणि उत्साह यांनीं संपन्न झालेलें यूरप खंड हळूहळू या पूर्वेकडील देशाच्या पुढें सटकलेलें दिसतें. यूरपचे सुपुत्र जगांतल्या चारी कोपऱ्यांपर्यंत प्रवास करूं लागतात; व्यापार आणि संपत्ति यांच्या लोभानें तेथील दर्यावर्दी लोक अमेरिका व आशिया खंडांकडे वळले व इकडे आशिया खंडाच्या आग्नेय दिशेला आतां पोर्तुगीज लोक मलाक्कांतील आरब लोकांचें साम्राज्य नाहींसें करतांना आपणांस दिसतात. हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरही ते कांहीं ठाणीं प्रस्थापित करतात; परंतु लौकरच मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापारांत त्यांनीं जी मिराशी मिळविली होती, तिच्यावर हॉलंड व इंग्लंड या दोन नवीन दर्यावर्दी राज्यांकडून गदा येते. त्यांच्याकडून पोर्तुगालची पूर्वेकडून हकालपट्टी होते आणि पोर्तुगालचें पूर्वेकडील साम्राज्य आणि व्यापार दोन्ही नष्ट होतात. आतां कांहीं ठिकाणची पोर्तुगालची जागा डच लोक घेतात आणि पूर्वेकडील बेटें त्यांच्या कबजांत जातात. इ. स. १६०० सालीं इलिझाबेथ राणी ईस्ट इंडिया कंपनीला सनद देते. हिंदुस्थानशीं व्यापार करण्याच्या उद्देशानें स्थापन झालेली लंडनच्या व्यापारी लोकांची ही कंपनी होती. यानंतर दोन वर्षांनीं डच ईस्ट इंडीज

कंपनी स्थापन होते. अशा रीतीनें यूरप खंडानें आशियाची लूट करून आपली तुंबडी भरण्याचा काळ सुरू होतो. पुष्कळ काळपर्यंत ही लूटमार मलाया आणि पूर्वेकडील बेटें यांच्या पलीकडे पोंचलेली नव्हती. चीनमध्यें या वेळीं प्रथम मिंग राजांचा अम्मल होता; पुढें सतराव्या शतकाच्या मध्याला मांचू घराण्याचा प्रारंभ झाला. या दोन्ही घराण्यांच्या कारकीर्दीत चीन इतका बलिष्ठ होता, कीं त्यावर स्वारी करणें यूरपला शक्य नव्हतें. जपाननें तर कोणाही परदेशी मनुष्याला आपल्या देशांत पाऊल ठेवूं द्यावयाचें नाहीं येथपर्यंत पल्ला गांठलेला होता आणि इ. स. १६४१ मध्यें त्यानें स्वतःला पूर्णपणें कोंडून घेतलें होतें. आणि हिंदुस्थान? हिंदुस्थानची हकीगत अजून आपण या काळापर्यंत आणलेली नाहीं; ती गोष्ट जरा मागेंच रेंगाळली आहे. म्हणून आतां मधला काळ संपवून बाकीच्या देशाच्या बरोबरीला ती गोष्ट आपण आणली पाहिजे. लौकरच आपल्याला आढळून येईल, कीं हिंदुस्थान देशांतही नवीन मोंगल राजवंशाच्या अमदानींत एक चांगलें सामर्थ्यवान् राज्य प्रस्थापित होऊन यूरपीयन देशाच्या स्वारीचें संकट तेथें उद्भवणें जवळजवळ अशक्य झालें. परंतु समुद्रावर मात्र यूरप खंडाला तोडीस तोड देणारें दुसरें कोणींच या सुमारास उरलेलें नव्हतें.

म्हणून आता आपण हिंदुस्थानकडे परत येऊं. यूरप खंड, चीन, जपान आणि मॅलेशिया इकडे आपण सतरावें शतक संपवून अठराव्या शतकाच्या तोंडाशीं आलेलों आहों. परंतु हिंदुस्थानांत मात्र अद्यापि आपण बाबर इकडे आला त्या काळापाशीं म्हणजे सोळाव्या शतकाच्या सुरुवातीलाच आहों.

दिल्ली येथील दुर्बळ आणि नादान अशा अफगाण सुलतानावर इ. स. १५२६ मध्यें बाबराला जय मिळाला आणि तेव्हापासून हिंदुस्थानांत एका नव्या युगाला, मोंगलांच्या साम्राज्याला सुरुवात झाली. मधला एक थोडासा काळ सोडला, तर हें साम्राज्य १५२६ पासून १७०७ पर्यंत म्हणजे १८१ वर्षें चालू राहिलें. हा काळ या साम्राज्याच्या सत्तेचा आणि वैभवाचा काळ होय. त्या अवधींत हिंदुस्थानच्या महान् मोंगल वंशाची कीर्ति साऱ्या आशिया खंडांत व यूरप खंडांत पसरली. या घराण्याचे एकामागून एक सहा मोठे राजे झाले. नंतर मात्र हें साम्राज्य मोडकळीस आलें, फुटलें आणि मराठे, शीख व इतरही लोक यांनीं त्याचे निरनिराळे भाग काबीज करून तेथें आपापलीं राज्यें स्थापन केलीं. त्यांच्या पाठीमागून मग ब्रिटिश लोक आले. मध्यवर्ती सत्ता मोडून पडलेली आणि देशांत बरीच अंदाधुंदी माजलेली; या गोष्टींचा त्यांनीं फायदा घेतला आणि हळूहळू या देशांत आपलें राज्य स्थापित केलें.

बाबरनी कांहीं हकीगत मीं तुला मागेंच सांगितली आहे. चेंगीजखान आणि तैमूरलंग यांच्या घराण्यांतला तो असून त्याच्या ठिकाणीं त्या दोघांच्याही ठिकाणचा मोठेपणा आणि युद्धकौशल्य थोड्याफार प्रमाणांत होतें; परंतु चेंगीजखानाच्या वेळेपेक्षां आता मोंगल लोकांमध्यें पुष्कळच सुधारणा झालेली होती असें दिसतें. बाबर तर

स्वतः, आपल्याला त्या काळात क्वचितच पाहायला सापडेल इतका, अत्यंत सुसंस्कृत आणि मधुर स्वभावाचा मनुष्य होता. त्याच्यामध्यें कोणत्याही विशिष्ट पंथाचें वेड नव्हतें, पक्षाभिमान नव्हता, धार्मिक माथेफिरूपणा नव्हता आणि आपल्या पूर्वजांप्रमाणें नासधूस करण्याची खोडही त्याला नव्हती. कला आणि वाङ्मय यांवर त्याची भक्ति होती आणि पार्शियन भाषेंत तो स्वतः काव्यरचना करीत असे. फुलें आणि उद्यानें यांची त्याला फार आवड होती आणि हिंदुस्थानांतील उष्ण हवेंत मध्य आशियांतील आपल्या मायभूमीची वारंवार आठवण त्याला होत असे. आपल्या आठवणींच्या ग्रंथांत तो म्हणतो, " फरघणांतील व्हायलेट फुलें फारच मधुर असतात ; फरघणा म्हणजे टयूलिप आणि गुलाबाच्या फुलांचा ताटवाच आहे जणुं ! "

बाप मेला तेव्हां बाबर केवळ अकरा वर्षांचा लहान मुलगा होता. या वयांत तो समरकंदच्या गादीवर आला. समरकंदचें राज्य करावयाचें म्हणजे कांहीं सोपें काम नव्हतें. त्याच्या सभोंवार सगळीकडे शत्रूंची दाटी उभी होती. त्यामुळें ज्या वयांत लहान मुलगे आणि मुली शाळेंत शिकत असतात, अशा वयांत हातांत तलवार घेऊन त्याला लढाईवर जावें लागलें. त्यांत एकदां त्याची गादी हातून गेली ; ती त्यानें पुन्हां परत मिळविली. त्याच्या तुफानी कारकीर्दीत असे अनेक संकटांचे व पराक्रमांचे प्रसंग घडून आले. या सगळ्या धकाधकींत असूनही वाङ्मय, काव्य आणि कला यांची जोपासना करण्याचें आपलें व्रत त्यानें सोडलें नाहीं. महत्त्वाकांक्षेमुळें तो एकसारखा पुढेंपुढेंच आक्रमण करीत चालला होता. प्रथम काबूल जिंकून घेतल्यावर सिंधु नदी ओलांडून तो हिंदुस्थानांत उतरला. त्याच्याबरोबर सैन्य फार थोडें होतें. परंतु यूरप खंडात आणि पश्चिम आशियांत आतां लोक वापरूं लागले होते तसला नवीन प्रकारचा तोफखाना त्याच्याबरोबर होता. त्याचें छोटेंसेंच परंतु चांगलें शिकून शिस्तशीर बनलेलें सैन्य आणि त्याचा तोफखाना यांच्यापुढें लढाईला आलेल्या अफाट अफगाण सैन्याच्या चिंधड्या उडाल्या आणि बाबरचा जय झाला ; परंतु एवढ्यानें त्याच्या अडचणी संपल्या असें मात्र नव्हे. त्यानंतरही पुष्कळदां त्याच्यावर आणीबाणीचे प्रसंग येऊन जगणार कीं मरणार इतकी अवस्था उत्पन्न झाली. एकदां असाच एक अत्यंत भयंकर संकटाचा प्रसंग आला असतांना त्याच्या हाताखालच्या सेनापतींनीं त्याला उत्तरेकडे माघार घेण्याचा सल्ला दिला; परंतु बाबर असा उगीच लेचापेचा लढवय्या नव्हता ; तो मोठा दमदार माणूस होता ; म्हणून मेलों तरी पुरवलें, परंतु मागें फिरावयाचें नाहीं असें त्यानें ठरविलें. त्याला दारू पिण्याची चांगलीच खोड होती; परंतु आपल्या आयुष्यांतील या आणीबाणीच्या प्रसंगीं त्यानें दारू न पिण्याचा निश्चय करून आपले दारूचे सर्व प्याले फोडून टाकले. त्या प्रसंगांत त्याचा शेवटीं जय झाला आणि आपली दारू न पिण्याची प्रतिज्ञा त्यानें अखेरपर्यंत पाळली.

बाबर हिंदुस्थानात येऊन नुकतीं चार वर्षें झालीं होतीं नव्हतीं, तोंच तो

मरण पावला. या चारी वर्षांत तो एकसारखा लढतच होता. विश्रांति कशी ती त्याला ठाऊकच नव्हती. त्यामुळें हिंदुस्थानची किंवा त्याच्या इतिहासाचीही खरी ओळख त्याला केव्हांच झाली नाहीं. आग्रा येथें त्यानें आपलें राजधानीचें शहर वसविण्यासाठीं एक भव्य योजना आंखली आणि कॉन्स्टान्टिनोपलहून एक विख्यात बांधकामांतील तज्ज्ञ त्यानें मागवून घेतला. सुप्रसिद्ध वैभवशाली सुलेमान कॉन्स्टान्टिनोपल शहरांत नवीन बांधकाम करीत होता तोच हा काळ. तेथें उस्मानी तुर्कांचा सिनान हा अत्यंत प्रख्यात असा बांधकामांतील तज्ज्ञ होता; त्यानें आपला आवडता शिष्य युसुफ याला हिंदुस्थानांत बाबरकडे पाठवून दिलें.

बाबर आपल्या आठवणी लिहून ठेवीत असे. या त्याच्या ग्रंथावरून या गृहस्थाच्या अंतरंगाचें अत्यंत मधुर दर्शन आपल्याला होऊं शकतें. त्यांत त्यानें पाहिलेल्या हिंदुस्थानचें पुष्कळ वर्णन केलें आहे. तेथील फुलें, फळें, झाडें यांचें वर्णन तर त्यानें केलेंच आहे, पण बेडकांना सुद्धां तो विसरलेला नाहीं. आपल्या मायभूमींतील कलिंगडें, द्राक्षें आणि फुलें यांची आठवण होऊन त्याला दुःख झालेलें दिसतें. या देशांतील लोकांबद्दल मात्र त्याची अत्यंत तीव्र निराशा झाल्याचें तो स्पष्ट लिहितो. त्याच्या मताप्रमाणें येथील लोकांविषयीं चांगली म्हणून सांगावी, अशी एकही गोष्ट नाहीं. कदाचित् चारच वर्षें तो येथें राहिला आणि तोही सतत लढाईत गुंतलेला, यामुळें त्याचा येथें फारसा कोणाशीं परिचयच झाला नसेल; त्याचप्रमाणें आपला देश जिंकायला आलेल्या या नव्या शत्रूपासून वरच्या वरच्या वर्गांचे लोक दूरदूरच राहिले असतील. कदाचित् नवीनच आलेल्या माणसाला परकी अशा लोकांच्या जीवनांत आणि संस्कृतीमध्यें तितका सहज प्रवेश करून घेतां येत नसेल, हेंही एक कारण असेल. तें कसेंही असलें तरी तेथें कांहीं काळापासून राज्य करीत असलेल्या अफगाण लोकांमध्यें किंवा इतर बहुसंख्य लोकांमध्यें प्रशंसनीय असें त्याला कांहींही आढळलें नाहीं ही गोष्ट खरी. तसें पाहिलें तर त्याचें निरीक्षण चांगलें सूक्ष्म आहे आणि दुसरीकडून आलेल्या मनुष्याची दृष्टि बरीचशी पूर्वग्रहदूषित असते ही गोष्ट मान्य करून सुद्धां त्याच्या या वृत्तांतावरून असें दिसून येतें, कीं त्या वेळची उत्तर हिंदुस्थानची स्थिति कांहीं फारशी अभिमान बाळगण्याजोगी नव्हती. दक्षिण हिंदुस्थानांत मात्र त्यानें पाय सुद्धां ठेवलेला नव्हता.

"हिंदुस्थानचें साम्राज्य" बाबर लिहितो, "चांगलें विशाल आहे, लोकसंख्येनें गजबजलेलें आहे आणि संपन्न आहे. पूर्वेला, दक्षिणेला आणि पुष्कळसा पश्चिमेला सुद्धां–तिन्ही बाजूंना महान् सागर आहे. उत्तरेला काबूल-कंदाहार आणि गझनी हीं शहरें असून हिंदुस्थानची राजधानी दिल्ली हें शहर आहे." एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे; बाबर या देशांत आला त्या वेळीं त्याचे अनेक तुकडे पडलेले असून तेथें स्वतंत्र राज्यें जरी अस्तित्वांत होतीं, तरीही आजच्या सगळ्या हिंदुस्थान प्रदेशाचें एक सलग स्वतंत्र राज्य अशीच बाबरची पाहण्याची दृष्टि होती.

हिंदुस्थानच्या या एकराष्ट्रीयत्वाची भूमिका साऱ्या इतिहासांत अशा रीतीनें कायमची टिकून राहिलेली आहे.

पुढें हिंदुस्थानचें वर्णन करतांना बाबरनें लिहिलें आहे : "हा खरोखरच नमुनेदार सुंदर देश आहे. आमच्या देशांच्या मानानें पाहतां हें एक अगदीं निराळेंच जग आहे. येथील पर्वत आणि नद्या, अरण्यें आणि मैदानें हीं सर्व अगदीं निराळ्या प्रकारचीं आहेत. सिंधु नदी ओलांडून जायची खोटी कीं सगळा प्रदेश, झाडें, दगड-धोंडे, भटकणाऱ्या टोळ्या, लोकांच्या चालीरीती आणि व्यवहार, सर्व सर्व कांहीं इतर जगाहून वेगळें आणि एकटें एक खास या हिंदुस्थानातच तेवढें आढळणारें आहे, असें आढळून येऊं लागतें. येथील साप सुद्धां इतर ठिकाणाहून निराळ्या प्रकारचे आहेत. हिंदुस्थानांतील बेडूक सुद्धां मोठे पहाण्याजोगे आहेत. हे बेडूक आहेत आपल्या इकडच्या बेडकांच्याच जातीचे ; तरीपण हे बेडूक पाण्यावर सहा सहा सात सात गज पोहून जातांना आढळतात."

यापुढें मग त्यानें हिंदुस्थानांतील प्राणी, फुलें, झाडें, फळें यांची मोठी यादीच दिली आहे. नंतर मग आपण त्याच्या येथील माणसांच्या वर्णनाशीं येतों. तो म्हणतो :

"हिंदुस्थान देशाची शिफारस करावी अशा प्रकारच्या सुखोपभोगाच्या आणि आरामाच्या गोष्टी येथें जवळजवळ नाहींतच. येथील लोक सुरेख नाहींत, मित्रा-मित्रांच्या सहवासाच्या आनंदाची किंवा एकमेकांमध्यें मोकळेपणानें मिसळण्याची अथवा एकमेकांशीं घरोब्यानें वागण्याची त्यांच्यांत कल्पनाच नाहीं. त्यांच्यामध्यें प्रतिभा नाहीं, त्यांच्या बुद्धीच्या ठिकाणीं ग्रहणशक्ति नाहीं ; वागणुकींत सौज्यन्य नाहीं ; दयाळूपणा किंवा बंधुभावना नाहीं ; आपलीं कारागिरीचीं कामें करण्यांत अथवा त्यांच्यासंबंधींच्या नवनव्या योजना आंखण्यांत कसलीही चतुराई, सफाईदारपणा किंवा यांत्रिक संशोधनवृत्ति नाहीं ; शिल्पशास्त्र, इमारतींचें बांधकाम किंवा नवीन इमारतींची रचना यांबद्दलचें कसलेंही कौशल्य किंवा ज्ञान त्यांच्यांत नाहीं ; त्यांच्यापाशीं चांगले घोडे नाहींत, चांगलें मांस नाहीं, द्राक्षें नाहींत, खरबुजें किंवा कलिंगडें नाहींत, चांगलीं फळें नाहींत, बर्फ नाहीं, गार पाणी नाहीं, चांगलें अन्न नाहीं अथवा चांगली भाकरीही नाहीं ; त्यांच्याकडे हमामखाने नाहींत, विद्यालयें नाहींत, मेणबत्त्या नाहींत, मशाली नाहींत, एवढेंच नव्हे, तर शामदानेंही नाहींत."

"मग आहे तरी काय या लोकांजवळ ?" असा प्रश्न हें वाचून तात्काळ लेखकाला विचारावासा वाटतो. हें सगळें लिहीत असतांना बाबरलासुद्धां खरोखर नकोसें होऊन गेलें असेल ! तो पुढें लिहितो :

"हिंदुस्थानांतील सगळ्यांत मोठा गुण म्हणजे हा देश फारच मोठा आहे आणि त्यामध्यें विपुल सोनें आणि चांदी आहे. हिंदुस्थानांत दुसरी एक सोयीची गोष्ट अशी आहे, कीं येथें प्रत्येक धंद्यांतील आणि व्यापारांतील कारागीर व कामगार अगदीं असंख्य, मागाल तितके आहेत. तुम्ही कसलेंही काम काढा, कोठलाही उद्योग

उभारा, त्यासाठीं कामगारांचा संच अगदीं हाताशीं तयार आहे; अशा लोकांचा, कीं ज्यांना त्या कामाचें किंवा उद्योगाचें शिक्षण बापापासून मुलाला अशा परंपरेनें युगानुयुगापासून मिळत आलेलें आहे."

बाबरच्या स्मृतिग्रंथामधून मीं जरा लांबलचक उतारे दिले आहेत. दुसऱ्या कोणीं लिहिलेल्या कसल्याही वर्णनापेक्षां अशा प्रकारच्या ग्रंथावरून माणसाची पुष्कळदां अधिक चांगली कल्पना येऊं शकते.

बाबर आपल्या वयाच्या एकूणपन्नासाव्या वर्षीं म्हणजे इ. स. १५३० मध्यें मरण पावला. त्याच्या मृत्यूसंबंधींची कथा चांगली प्रख्यात आहे. त्याचा मुलगा हुमायून हा आजारी होता. त्याच्यावरील प्रेमामुळें बाबरनें आपला स्वतःचा प्राण देऊं केला आणि त्यामुळें त्याचा मुलगा बरा झाला असें सांगतात. असें म्हणतात, कीं हुमायून बरा झाला आणि या प्रसंगानंतर थोडक्याच दिवसांत बाबर मरण पावला.

बाबरच्या लोकानीं त्याचें प्रेत काबूल येथें नेलें आणि तेथें त्याच्या आवडत्या बागेंत त्याचें त्यांनीं दफन केलें. ज्या फुलांकरितां त्याच्या मनाला एकसारखी तळमळ लागलेली होती, त्या फुलांमध्येंच अखेरीस तो जाऊन पडला.

## ८९

## अकबर

४ सप्टेंबर, १९३२

कुशल सेनानायकत्व आणि शिस्तवान् सैन्य व युद्धसामग्री यांच्या बळावर बाबरनें उत्तर हिंदुस्थानचा पुष्कळसा भाग जिंकून घेतला होता. प्रथम त्यानें दिल्लीच्या अफगाण सुलतानाचा पराभव केला, आणि नंतर रजपूत लोकांचा पराभव केला. ही दुसरी लढाई त्याला बिकट गेली; कारण रजपुतांच्या इतिहासांतील प्रसिद्ध वीरपुरुष चितोडचा राणा संग याच्या नेतृत्वाखालीं सगळ्या रजपुतानीं त्याला सामना दिला होता. हे जय जरी बाबरला मिळाले होते, तरी आपल्या पाठीमागें आपला मुलगा हुमायून याला त्यानें कठिणच काम उत्पन्न करून ठेवलेलें होतें. हुमायून चांगला सुसंस्कृत आणि विद्वान् मनुष्य असला, तरी बापाप्रमाणें तो मोठा योद्धा नव्हता. त्याच्या नव्या साम्राज्यांत त्याच्या कारकीर्दीमध्यें ठिकठिकाणीं भानगडी उपस्थित झाल्या. अखेरीस इ. स. १५४० मध्यें, बाबरच्या मृत्यूनंतर दहाच वर्षांनीं, बिहारमधील एक अफगाण सरदार शेरखान यानें हुमायूनचा पराभव करून त्याला हिंदुस्थानांतून हांकलून लावलें. त्यामुळें महान् मोंगल घराण्यांतील या दुसऱ्या राजपुरुषावर रानोमाळ भटकण्याची पाळी आली, लपून

राहावें लागूं लागलें आणि हरएक प्रकारचे हाल सोसावे लागले. अशा रीतीनें भटकत असतानांच राजपुतान्यांतील निर्जन मैदानांत त्याची बायको इ. स. १५४२ च्या नोव्हेंबर महिन्यांत प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. निर्जन मैदानांत अशा रीतीनें जन्मलेला हा त्याचा मुलगा अकबर बादशहा व्हावयाचा होता.

येथून निसटून हुमायून इराणमध्यें गेला. तेथें तेथील राजा शहा तमास्प यानें त्याला आश्रय दिला. दरम्यान शेरखानाचा अम्मल साऱ्या उत्तर हिंदुस्थानावर चालू लागला. शेरशहा असें नांव घेऊन त्यानें पांच वर्षें राज्य केलें. एवढ्या छोट्याशा अवधींत सुद्धां आपण मोठे कर्तबगार पुरुष आहों याची साक्ष त्यानें पटविली. तो फारच बुद्धिमान् व संघटनाचतुर होता, आणि त्याचा राज्यकारभार सुव्यवस्थित आणि जिवंत होता. एकीकडे युद्धामध्यें गुंतलेला असूनसुद्धां शेतकऱ्यांवर जमिनीचा कर बसविण्याची व तो वसूल करण्याची एक नवी आणि चांगली महसूलपद्धति प्रस्थापित करण्याला त्याला सवड मिळूं शकली. तो मोठा कठोर आणि कडक मनुष्य होता. परंतु हिंदुस्थानांतील सर्व अफगाण राज्यकर्त्यांच्या मानानें आणि इतरही पुष्कळशा राज्यकर्त्यांच्या मानानें तो निःसंशय सर्वांत अधिक कर्तबगार व सज्जन राज्यकर्ता होता. परंतु कर्तबगार एकतंत्री अशा राज्यकर्त्यांच्या बाबतींत बहुतेक प्रसंगीं जें घडतें, तेंच नेमकें शेरशहाच्या बाबतींत घडून आलें. तो मरण पावतांच त्याच्याबरोबर त्यानें उभारलेली सर्व घडीही पार कोलमडून जमीनदोस्त झाली.

या अंदाधुंदीचा फायदा घेऊन हुमायून इ. स. १५५६ मध्यें बरोबर सैन्य घेऊन इराणमधून हिंदुस्थानात परत आला. या वेळीं त्याला जय मिळाला आणि सोळा वर्षांनंतर पुन्हां तो दिल्लीच्या गादीवर बसला; पण तें वैभव त्याला फार वेळ लाभलें नाहीं; सहाच महिन्यांनंतर तो जिन्यावरून पडून मरण पावला.

शेरशहा आणि हुमायून यांच्या थडग्यांची अथवा कबरींची तुलना करून पाहणें मनोरंजक आहे. त्या अफगाण वीराची कबर बिहारमध्यें सहाश्रम (सहस्राम) येथें असून त्याच्याप्रमाणें कठोर, मजबूत आणि मोठा दरारा वाढविणारी अशीच ती इमारत आहे. हुमायूनची कबर दिल्ली येथें आहे. ही इमारत मोठी नाजुक, सुंदर, चमकदार व मोहक आहे. या दगडी बांधकामावरून सोळाव्या शतकामधील या साम्राज्यप्राप्तीसाठीं झगडणाऱ्या दोघां प्रतिस्पर्ध्यांविषयीं फार चांगली कल्पना करतां येण्यासारखी आहे; त्यांत जणुं त्यांचेच स्वभावविशेष प्रतिबिंबित झालेले आहेत.

या वेळीं अकबर अवघा तेरा वर्षांचा होता. आपल्या आज्ञाप्रमाणें तोही फारच लहान वयांत गादीवर आला. बहिरामखान नांवाचा एक मनुष्य त्याचा पालक आणि पाठिराखा होता. त्याला खानबाबा असें म्हणत असत; परंतु चार वर्षांतच अकबर या पालकाच्या नियंत्रणाला आणि इतर लोकांनीं सांगून त्याप्रमाणें वागण्याला कंटाळला आणि त्यानें राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें आपल्या हातांत घेतलीं.

इ. स. १५५६ च्या सुरुवातीपासून तों १६०५ च्या अखेरीपर्यंत जवळजवळ

पन्नास वर्षें अकबरानें हिंदुस्थानवर राज्य केलें. यूरप खंडांत नेदरलंडच्या स्वातंत्र्य-युद्धाचा आणि इंग्लंडांत शेक्स्पिअरचा हा काळ. हिंदुस्थानच्या इतिहासांत अकबराची कीर्ति व कामगिरी फारच मोठ्या दर्जाची व सहज उठून दिसणारी आहे. कधीं कधीं त्याच्या कांहीं कांहीं गोष्टींवरून आपल्याला राजा अशोकाचें स्मरण होतें. ख्रिस्तापूर्वी तिसऱ्या शतकांतील हिंदुस्थानचा बुद्धधर्मीय बादशहा आणि ख्रिस्तानंतर सोळाव्या शतकांतील मुसलमानधर्मीय बादशहा या दोघांची भाषा व विचारपद्धति एकच असावी, नव्हे, त्यांचे शब्द आणि आवाजसुद्धां जणुं एकाच प्रकारचे असावेत ही खरोखर मोठी विलक्षण गोष्ट आहे. त्यामुळें कित्येकदां असें वाटतें, कीं प्रत्यक्ष भरतभूमीच आपल्या या दोन महान् सुपुत्रांच्या रूपानें आपल्याशीं बोलत नसेल ना? असेलही कदाचित्. अशोकाबद्दल आपल्याला त्यानें दगडावर कोरून ठेवलेलीं जीं स्वतःचीं आज्ञापत्रें आहेत त्यांहून अधिक कांहींच माहिती नाहीं. अकबराबद्दल मात्र आपल्याला पुष्कळच माहिती उपलब्ध आहे. त्याच्या दरबारांतील दोन समकालीन इतिहासकारांनीं दोन भले मोठे वृत्तांत लिहिलेले आहेत आणि त्याला भेटावयास आलेल्या परकी लोकांनीं, विशेषतः त्याला ख्रिस्ती धर्माकडे वळविण्याची जिवापाड मेहनत ज्यांनीं केली त्या जेसुइट लोकांनीं, त्याच्याबद्दल पुष्कळ लांबलचक वर्णनें लिहिलेलीं आहेत.

बाबरपासून या घराण्यांतील हा तिसरा राजा. परंतु त्याच्या काळींसुद्धां मोंगल लोक हे हिंदुस्थानांत अजून नवीनच होते. लोक त्यांना परकीच समजत होते आणि त्यांचें येथील वर्चस्व लष्करी सामर्थ्यामुळें मात्र होतें. तेव्हां खरें म्हणजे मोंगल घराण्याचें राज्य हिंदुस्थानांत चांगल्या रीतीनें प्रस्थापित झालें तें अकबराच्याच कारकीर्दीत प्रथम झालें; त्याच वेळीं त्याचीं पाळेंमुळें येथील भूमींत रुजून एकजीव झालीं आणि त्याच्याच कारकीर्दीत त्या घराण्याच्या ठिकाणीं आपण सर्वथा हिंदीच आहोंत अशी भावना निर्माण झाली. त्याच्याच कारकीर्दीत मोंगल राजांचें यूरप खंडांत महान् मोंगल हें नांव प्रचारांत आलें. अकबर हा अगदीं हम करें सो कायदा अशा प्रवृत्तीचा राज्यकर्ता होता आणि त्याच्या हातीं सत्ताही अगदींच अनियंत्रित अशा प्रकारची होती. राज्यकर्त्याच्या अधिकारावर नियंत्रण ठेवण्याची गोष्ट त्या काळच्या हिंदुस्थानांत कोठेंही कानाच्या कोपऱ्याला सुद्धां माहीत नव्हती. योगायोग मात्र असा होता, कीं अनियंत्रित सत्ताधारी असला तरी अकबर हा फार शहाणा राजा होता आणि हिंदी लोकांचें कल्याण व्हावें म्हणून त्यानें जिवापाड मेहनत घेतली. एका दृष्टीनें हिंदी एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा तो जनक होऊन गेला असें म्हणतां येईल. त्या काळीं एकदेशीय किंवा एकराष्ट्रीय अशी भूमिका जवळजवळ नव्हतीच; धर्मावरूनच निरनिराळे पक्ष किंवा गट अद्यापि पडत होते; अशा त्या काळीं भिन्न धर्मांमुळें पडणारे तट बाजूला सारून त्यांच्याऐवजीं, किंबहुना त्यांच्याविरुद्ध अकबरानें जाणून-बुजून धर्मजातिनिरपेक्ष अशा रीतीनें सर्व देशाबद्दलचें एकराष्ट्रीयत्वाचें ध्येय उचलून धरलें. या प्रयत्नांत त्याला संपूर्ण यश आलें नाहीं हें खरें; परंतु त्यानें ही एवढी लांब




मजल मारली आणि त्याच्या प्रयत्नांत त्याला पुष्कळ मोठ्या प्रमाणांत यशही मिळालें, हीच गोष्ट त्या काळच्या मानानें अत्यंत अचंबा करण्यासारखी वाटते.

परंतु अकबराला या प्रयत्नांत जें कांहीं थोडेफार यश मिळालें तें कांहीं अगदीं कोणाच्याही मदतीशिवाय केवळ स्वतःच्या एकट्याच्याच प्रयत्नानें मिळालें असें मात्र नव्हे. योग्य काळ आणि संधि प्राप्त झाल्याशिवाय आणि आजुबाजूची परिस्थिति व वातावरणाची अनुकूलता उत्पन्न झाल्याशिवाय कोणालाही महत्कार्यांत यश मिळूं शकत नाहीं. श्रेष्ठ पुरुष काळाची गति जरा अधिक वेगाची करूं शकतो आणि आपल्याला जरूर तें वातावरणही तो निर्माण करूं शकतो हें खरें; तथापि श्रेष्ठ पुरुष झाला, तरी बदलता काळ आणि प्रचलित वातावरण किंवा परिस्थिति यांच्यांतूनच तो जन्माला येत असतो. म्हणून अकबर हा सुद्धां हिंदुस्थानांतील त्या काळानेंच निर्माण केलेला महापुरुष होता असें म्हटलें पाहिजे.

या देशांत सहजीं एकत्र आलेल्या या दोन धर्मांमध्यें आणि संस्कृतींमध्यें एक

प्रकारचा समन्वय साधावा म्हणून कित्येक प्रयत्न व प्रवाह गाजावाजा न करतां– कोणाला न कळतच – कशा प्रकारें चालू होते, हें मागच्या एका पत्रांत मीं तुला सांगितलें आहे. इमारतींच्या बांधकामामध्यें नवीन शिल्पपद्धति कशी अस्तित्वांत येत होती आणि हिंदुस्थानच्या भाषांमध्यें, विशेषतः हिंदुस्थानी आणि उर्दू यांची, वाढ कशा रीतीनें होत होती हें मीं तुला सांगितलें. तसेंच रामानंद, कबीर, गुरु नानक यांच्यासारखे धर्मसुधारक किंवा धार्मिक नेते इस्लामधर्म आणि हिंदुधर्म यांमधील समान अशा गोष्टींवर भर देऊन व त्यांमधील कर्मकांडावर व मंत्रतंत्रावर हल्ला करून या दोन्ही धर्मांमधील अंतर कमी करण्याचा प्रयत्न कसा करीत होते, हेंही मीं तुला सांगितलें. अशा रीतीनें समन्वयाची ही प्रवृत्तीच जणुं त्या काळीं सुरू झालेली होती. आणि अकबराची ग्रहणशक्ति अत्यंत कुशाग्र व तरल असल्यामुळें त्यानें ही प्रवृत्ति ओळखून आत्मसात् केली असली पाहिजे आणि त्या प्रवृत्तीचा बदल त्याच्या मनोभूमिकेचें स्वरूप निश्चित होण्यात झाला असला पाहिजे. एवढेंच नव्हे, तर तो स्वतः या प्रवृत्तीचा प्रमुख प्रचारकर्ताच झाला.

आपल्या स्वतःच्या राज्याला आणि हिंदुस्थान देशालाही या समन्वयामुळें सामर्थ्य प्राप्त होईल हें एक राजकारणी पुरुष या नात्यानें सुद्धां त्याला समजून चुकलें असलें पाहिजे. अकबर हा चांगला शूर लढवय्या होता आणि कर्तबगार सेनापति पण होता. या बाबतींत त्याचें अशोकाशीं साम्य नव्हतें. लढाईचा त्याला कधींच कंटाळा नव्हता. परंतु तलवारीच्या जोरावर मिळालेल्या लाभापेक्षां प्रेमाच्या बळावर झालेले लाभ हेच त्यालाही अधिक आवडत असत आणि तेच अधिक चिरस्थायी होऊं शकतात हेंही तो जाणणारा होता. त्यामुळें हिंदू सरदार-दरकदार व सामान्य हिंदु जनता यांच्या मनांत आपल्याविषयीं सद्भाव जागृत करण्याचा उपक्रम त्यानें जाणूनबुजून चालू केला. बिगर मुसलमानांवरचा जिझियाकर आणि हिंदू यात्रेकरूंवरील कर हे कर त्यानें माफ केले. त्यानें स्वतः रजपूत राजघराण्यांतील एका स्त्रीशीं लग्न केलें; पुढें आपल्या मुलाचेंही त्यानें एका रजपूत मुलीशीं लग्न केलें. अशा तऱ्हेच्या मिश्र विवाहाला तो प्रोत्साहन देऊं लागला. रजपूत सरदारांना त्यानें साम्राज्याच्या कारभारातील मोठ्या मोठ्या जागांवर अधिकारी नेमलें. त्याचे कित्येक अत्यंत शूर सेनापती, अत्यंत कर्तबगार मंत्री आणि प्रांताधिप हे हिंदू होते. राजा मानसिंगाला तर त्यानें कांहीं काळपर्यंत प्रत्यक्ष काबूल येथें गव्हर्नर – प्रांताधिप – म्हणून पाठविलेलें होतें. एवढेंच नव्हे, तर रजपूत सरदार आणि हिंदु जनसमाज यांना संतुष्ट ठेवण्याच्या या प्रयत्नांत केव्हां केव्हां तो येथपर्यंत मजल गांठी, कीं त्यामुळें त्याच्या मुसलमान प्रजेवर त्याच्या हातून अन्याय होई. एवढें मात्र खरें, कीं हिंदू लोकांची अनुकूलता मिळविण्याच्या या प्रयत्नांत त्याला चांगलेंच यश आलें आणि रजपूत लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्याची नोकरी करण्यासाठीं आणि त्याचा सन्मान करण्यासाठीं त्याच्याकडे येऊं लागल्या. मेवाडचा राणा प्रतापसिंग हा एकटा एकच रजपूत तेवढा त्याच्यापुढें मान न वांकवितां

ताठरपणें त्याच्यापासून दूर राहिला. बाकी सर्व रजपूत अकबराकडे ओढले गेले. राणा प्रतापानें नुसता नांवापुरतासुद्धां अकबराचा वरिष्ठत्वाचा अधिकार मान्य केला नाहीं. युद्धांत त्याचा पराभव झाला; परंतु अकबराचा मांडलिक म्हणून खातपीत सुखानें दिवस काढण्यापेक्षां रानावनांत वध्य सावजाप्रमाणें भटकणें त्यानें अधिक पसंत केलें! साऱ्या जन्मभर या स्वाभिमानी रजपूत वीरानें दिल्लीच्या महान् बादशहाशीं लढाई दिली आणि त्याच्यापुढें तो केव्हांही वांकला नाहीं. आयुष्याच्या अखेरीअखेरीला तर त्याला थोडेंफार यशही मिळालें. राजपुतान्यामध्यें या रजपूत वीराची स्मृति सर्वांच्या हृदयांत अत्यंत मौल्यवान् ठेवा म्हणून सांठविलेली असून त्याच्यासंबंधीं तेथें कितीएक मधुर लोककथा आणि दंतकथा निर्माण झालेल्या आहेत.

तात्पर्य, अकबरानें रजपुतांना आपल्या बाजूला वळविलें आणि सामान्य जनतेंतही तो लोकप्रिय झाला. पारशी लोकांना त्यानें पुष्कळ सवलती दिल्या; त्याचप्रमाणें त्याच्या दरबारीं आलेल्या जेसुइट मिशनरी लोकांनासुद्धां त्यानें सवलतीनेंच वागविलें. परंतु हें त्याचें सवलतीचें धोरण आणि कांहीं मुसलमानी रीतीरिवाजांकडे त्यानें केलेलें दुर्लक्ष यामुळें मुसलमान सरदार मात्र त्याच्यावर नाखूष झाले आणि त्यांनीं त्याच्याविरुद्ध कितीएक बंडें उभारण्याचे प्रयत्न केले.

अकबराचें अशोकाशीं साम्य वाटतें असें मीं म्हटलें; परंतु या तुलनेवरून भलतीच समजूत मात्र करून घेऊं नकोस. पुष्कळ बाबतींत तो अशोकाहून अगदीं निराळ्या प्रकारचा होता. एक तर तो फारच महत्त्वाकांक्षी होता आणि अगदीं अखेरच्या क्षणापर्यंत आपलें साम्राज्य वाढविण्याच्या अत्यंत तीव्र इच्छेनें नवे नवे प्रांत जिंकून घेण्याचें त्याचें काम सारखें चालूच होतें. जेसुइट लोकानीं त्याचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—

"त्याची बुद्धि चपल आणि विवेचक होती. त्याच्या अंगीं अचूक निर्णय करण्याची मोठी शक्ति होती. व्यवहारामध्यें तो मोठा दूरदृष्टीनें वागणारा होता. विशेष म्हणजे तो दयाळू, बोलण्याचालण्यांत मोठा गोड, आणि उदार होता. या गुणांच्या जोडीला त्याच्या अंगीं मोठमोठीं पराक्रमाचीं कामें अंगावर घेऊन तीं पार पाडणाऱ्यांच्या ठिकाणीं ज्या प्रकारचें धैर्य व हिंमत असतें, तसें धैर्य व हिंमतही होती. नानाविध गोष्टी पाहाव्या अशी त्याला हौस होती. पुष्कळशा गोष्टी शिकाव्या अशी त्याला जिज्ञासा होती. युद्ध आणि राज्यकारभार यांच्याविषयींच फक्त त्याला खोल ज्ञान होतें असें नव्हे, तर यांत्रिक व हस्तकौशल्याच्या कारागिरीचेंही त्याला चांगलें खोल ज्ञान होतें. ..... व्यक्तिशः खुद्द त्याचा अपमान करणारावरसुद्धां या राजाच्या नेत्रांमधून दया आणि मृदुता यांच्याच प्रकाशाचे मधुर किरण पडत असत. त्याला फारच क्वचित् राग येत असे. जेव्हां राग येई तेव्हां त्याचें डोकें पार भडकून गेल्यासारखें होई; पण हा त्याचा राग केव्हांही फार काळ टिकत नसे." हें वर्णन कोणीं एखाद्या दरबारी सेवकानें केलेलें नाहीं; तर अकबराचें सर्व बाजूंनीं

निरीक्षण करण्याला ज्याला पुष्कळ अवसर मिळाला होता अशा दुसऱ्याच एका देशांतील परकी माणसानें तें केलेलें आहे, हें विशेष लक्षांत घे यामधें तूं.

शरीराच्या दृष्टीनें पाहतां अकबर अलौकिक शक्तिमान् आणि चपळ होता. रानटी धोकेबाज प्राण्यांची शिकार करण्याची त्याला इतर कशाहीपेक्षां फार मोठी आवड होती. लढवय्या या नात्यानें तो फारच शूर होता. प्राणांचीसुद्धां पर्वा न करतां वाटेल तें अविवेकी साहस करण्यापर्यंतसुद्धां त्याची मजल जात असे. आग्ऱ्याहून अहमदाबादपर्यंत त्यानें नऊ दिवसांत कूच केल्याची प्रसिद्ध हकीगत आहे. तिच्यावरून त्याच्या ठिकाणीं केवढी अचंबा वाटण्याइतकी शक्ति व उत्साह होता हें दिसून येण्यासारखें आहे. गुजरातमध्यें एक बंड उभें राहिलें होतें. त्यासाठीं एक छोटेसें सैन्य बरोबर घेऊन एवढ्या थोड्या अवधींत ४५० मैलांचें अंतर राजपुतान्याच्या निर्जन रखरखीत मैदानांतून कूच करून अकबरानें तोडलें व बंडाच्या ठिकाणीं तीरासारखा तो आला. खरोखरच ही एक अलौकिक पराक्रमाची गोष्ट होती. त्या वेळीं प्रवासासाठीं कांहीं आगगाड्या किंवा मोटारगाड्या नव्हत्या, हें कांहीं मीं तुला सांगायला नको.

परंतु श्रेष्ठ मनुष्यांच्या ठिकाणीं या सर्व गुणांपेक्षां निराळें असें आणखी कांहीं तरी असतें. असें म्हणतात, कीं त्यांच्या ठिकाणीं एक प्रकारची विशेष आकर्षक शक्ति असते आणि तिच्यामुळें लोक त्यांच्याकडे ओढले जातात. अकबराच्या ठिकाणीं ही वैयक्तिक आकर्षकता आणि मोहकता फारच मोठ्या प्रमाणांत होती. लोकांचें चित्त आपल्याकडे खेंचून घेणारे त्याचे डोळे "सूर्यप्रकाशामध्यें समुद्रपृष्ठावर चमकत व नाचत असणाऱ्या तरंगांप्रमाणें दिसत" असें जेसुइट लोकांनीं अकबराचें जें मधुर वर्णन केलेलें आहे, त्यांत म्हटलें आहे. अशा या माणसाकडे आजही आपलें लक्ष वेधावें आणि त्याची श्रेष्ठतम राजवैभवानें परिपूर्ण आणि पौरुषयुक्त मूर्ति, नुसते नांवाला जे असंख्य राजे होऊन गेले त्यांच्या गर्दीत एखाद्या ताऱ्याप्रमाणें चमकून दिसावी, यांत आश्चर्य वाटण्यासारखें काय आहे?

राज्य जिंकण्याच्या बाबतींत सर्व उत्तर हिंदुस्थानांत आणि दाक्षिण हिंदुस्थानांतसुद्धां अकबराला यश मिळालें. गुजरात, बंगाल, ओरिसा, काश्मीर आणि सिंध हे प्रांत त्यानें आपल्या साम्राज्यांत सामील केले. मध्य हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान यांमध्येंही तो विजयी झाला व तेथून तो खंडणी वसूल करूं लागला. मध्य हिंदुस्थानांतील राणी दुर्गावतीचा त्यानें पराभव केला. यांत मात्र त्यानें कसलें शौर्यही गाजविलें नाहीं किंवा कांहीं विशेष चांगुलपणाचें कृत्य केलें असेंही नाहीं. ही राणी मोठी शूर आणि चांगल्या रीतीनें राज्य करणारी होती. तिच्यापासून अकबराला कसलाही त्रास पोंचत नव्हता; पण महत्त्वाकांक्षा आणि साम्राज्यवर्धनाचा लोभ यांच्यापुढें असल्या छोट्या बाबींचा कोण विचार करतो? दक्षिण हिंदुस्थानांतही त्याच्या सैन्याला आणखी एका राज्यकर्त्या स्त्रीशीं लढण्याचा प्रसंग आला. ती स्त्री म्हणजे अहमदनगरच्या राज्याची

कारभारीण प्रख्यात चांदबिब्बी ही होय. ही बाई मोठ्या धैर्याची आणि कर्तबगार होती. तिनें मोंगल सैन्याशीं अशी मोठ्या दमानें लढाई दिली, कीं तिच्याशीं अधिक लढण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें उमजून मोंगलांनीं तिच्याशीं सोयिस्कर अशा अटींवर तह केला. दुर्दैवानें तिच्याच कोणा असंतुष्ट शिपायाच्या हातून तिचा वध झाला!

अकबराच्या सैन्यानें चितोडलाही वेढा दिलेला होता. पण ही राणा प्रतापच्या आधींची गोष्ट. त्या वेळीं तेथील जयमल राजानें चितोडचा फार शौर्यानें बचाव करण्याचा प्रयत्न केला. तो मरण पावल्यावर चितोड येथें पुन्हां एकवार जोहारचा भयंकर प्रकार करण्यांत आला आणि मग चितोडचा पाडाव झाला.

अकबरानें आपल्यापाशीं पुष्कळच स्वतःवर निष्ठा असलेले असे कर्तबगार मदतनीस गोळा केलेले होते. त्यांच्यामध्यें फैझी आणि अबुल फजल हे दोन भाऊ आणि बिरबलच्या गोष्टी म्हणून आजकालही ज्याच्या गोष्टी सांगितल्या जातात तो बिरबल, हे तिघे विशेष प्रमुख होते. तोडरमल हा त्याचा अर्थमंत्रि होता. त्यानेंच सगळी महसूल-पद्धति सुधारून नव्या पद्धतीची केली. त्या काळीं आपल्याकडे जमीनदारी नव्हती आणि जमीनदार आणि तालुकदारही कोणी नव्हते हें ऐकून तुला मोठेंच आश्चर्य वाटेल. प्रत्यक्ष राज्यामार्फतच व्यक्तिशः शेतकऱ्यांकडून किंवा रयतांकडून कर वसूल केला जात असे. याच पद्धतीला हल्लीं रयतवारी पद्धति म्हणतात. हल्लींचे जे जमीनदार लोक आहेत ते ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं निर्माण केलेले आहेत.

जयपूरचा राजा मानसिंग हा अकबराचा एक फार श्रेष्ठ सेनापति होता. अकबराच्या दरबारांतील आणखी एक प्रख्यात व्यक्ति म्हणजे तानसेन नांवाचा श्रेष्ठ गवय्या. आज तो हिंदुस्थानांतील सर्व गवय्यांचा जणुं प्रतिपरमेश्वरच झालेला आहे!

सुरुवातीला अकबराची राजधानी आग्रा येथें होती. तेथील किल्ला त्यानेंच बांधला. त्यानंतर त्यानें आग्र्यापासून पंधरा मैलांवर फत्तेपूर शिक्री येथें एक नवीन शहर वसविलें. या ठिकाणीं शेख सलीम खिस्ती नांवाचा एक साधुपुरुष राहत असे. म्हणून ही जागा त्यानें पसंत केली. येथें त्यानें वसविलेलें तें भव्य व वैभवसंपन्न शहर "लंडनपेक्षां किती तरी मोठें" होतें असें एका तत्कालीन इंग्रज प्रवाशानें लिहिलेलें आहे. पंधरा वर्षेपर्यंत मोंगल साम्राज्याची राजधानी या ठिकाणीं होती. त्यानंतर अकबरानें लाहोर येथें आपली राजधानी केली. अकबराचा मित्र आणि मंत्री अबुल फझल यानें लिहिलें आहे: "बादशहा सलामत अलीशान हे भव्य व मोहक इमारतींच्या योजना व नकाशे आंखित असतात आणि अशा रीतीनें आपलें अंतःकरण व बुद्धि यांच्या ठिकाणचें कर्तृत्व आणि सामर्थ्य दगड आणि माती यांच्या बांधकामांच्या रूपानें व्यक्त करीत असतात." फत्तेपूर शिक्री हें शहर, त्यामधील ती सुंदर मशीद, तो मोठा बुलंद दरवाजा आणि इतर अनेक सुंदर इमारती यांसह आजही उभें आहे. आज त्यामध्यें लोकवस्ती म्हणण्यासारखी नाहीं आणि त्याच्यांत

जिवंतपणाही उरलेला नाहीं; परंतु त्याच्या रस्त्यावरून आणि विशाल चौकांमधून आणि प्रांगणांमधून त्या मृत साम्राज्याचें पिशाच अजूनही वावरतें आहे, असा मनाला भास होतो!

आपलें आताचें अलाहाबाद शहर हेंही अकबरानेंच वसविलें; अर्थात् त्या शहराचें स्थान हें फारच प्राचीन काळचें आहे आणि प्रयाग शहर हें त्या ठिकाणीं थेट रामायणाच्या काळापासून वसलेलें आहे. अलाहाबादचा किल्ला हा अकबरानेंच बांधलेला आहे.

नवीन राज्यें जिंकून घ्यावयाचीं, जिंकलेल्या राज्यांचें स्थिरस्थावर करून राज्यकारभाराची नवीन व्यवस्था लावावयाची, अशा प्रकारें हा सर्व काळ अकबराला मोठाच धामधुमीचा गेला असेल. पण त्यांतही मुळाशीं पाहणाराला अकबराच्या ठिकाणची आणखी एक विशेष प्रवृत्ति आढळून येते; ती म्हणजे त्याच्या ठिकाणची अमर्याद जिज्ञासाबुद्धि आणि तज्जन्य सत्यसंशोधनासाठीं त्याचे प्रयत्न. ज्या कोणाला कोणत्या एखाद्या विषयांत कांहीं सांगण्याची शक्ति आहे म्हणून कळेल, त्याला अकबर बोलावून घेई आणि त्याला तऱ्हतऱ्हेचे प्रश्न विचारून त्याच्याकडून माहिती मिळवी. निरनिराळ्या धर्मांचे लोक त्याच्याभोंवतीं त्याच्या इबादतखान्यामध्यें जमा झालेले होते. या महान् शक्तिमान् बादशहाला आपण आपल्या धर्माकडे वळवून घेऊं अशी त्यांपैकीं प्रत्येकाला मोठी आशा वाटत होती. त्यांच्यामध्यें आपसांत पुष्कळदां वाद आणि तंटेही होत असत आणि अकबर बसून त्यांचीं उत्तरें-प्रत्युत्तरें ऐकत असे आणि अधूनमधून आपण स्वतःही त्यांना पुष्कळ प्रश्न करीत असे. सत्य हें कांहीं कोणत्याही एका विशिष्ट धर्माची किंवा पंथाची मिरास नव्हे, अशी त्याची खात्री पटलेली असावी असें दिसतें; आणि धर्माच्या बाबतींत विश्वांतील एकूण एक मनुष्याला पूर्ण उदारपणें वागविण्याचें आपलें निश्चित धोरण आहे, असें त्यानें जाहीरही केलें होतें.

त्याच्या काळचा एक इतिहासकार (मुल्ला अबदुल कादीर) बदौनी यानें अकबराच्या या प्रवृत्तीबद्दल एक मोठा मनोरंजक वृत्तांत लिहिलेला आहे. तो मी यापुढें खालीं देणार आहें. वरच्यासारख्या वादविवादाच्या सभांतून या बदौनीनेंही स्वतः पुष्कळदां भाग घेतलेला असला पाहिजे. तो स्वतः जुन्या वळणाचा कट्टर मुसलमान होता आणि अकबराचा हा सगळा व्यवहार त्याला पूर्णपणें नापसंत होता. तो लिहितो,

"जहांपनाह एकूण एक माणसांचीं मतें गोळा करीत असत; जे मुसलमान नसतील त्यांचीं तर विशेषच; त्यांपैकीं जीं त्यांना आवडत त्यांचा ते आपल्यापाशीं संग्रह करीत आणि जीं त्यांच्या स्वभावाला रुचत नसत किंवा जीं त्यांच्या इच्छेविरुद्ध असत तीं ते टाकून देत. अगदीं बाळपणापासून तों तारुण्यापर्यंत आणि तारुण्यापासून वृद्धापकाळापर्यंत जहांपनाहांनीं असंख्य निरानिराळ्या प्रवृत्तींचा अनुभव घेतलेला आहे. निरानिराळे धार्मिक आचार आणि निरनिराळ्या पंथांचीं मतें या सर्वांची त्यांनीं चांगली ओळख करून घेतलेली आहे आणि लोकांना अनेक

ग्रंथांचा अभ्यास करून जें जें ज्ञान मिळेल त्या सर्व ज्ञानाचा त्यांनीं संग्रह केलेला आहे; परंतु त्या बाबतींत निवडानिवड करून आपल्या दृष्टीनें जरूर तेवढेंच संग्रहीं ठेवण्याची कांहीं विशेष प्रकारची बुद्धि त्यांच्या ठिकाणीं आहे आणि आपला हा सर्व ज्ञानसंग्रह त्यानीं ज्या विशिष्ट प्रकारच्या संशोधनबुद्धीनें केला आहे, ती संशोधनाची प्रवृत्ति आणि पद्धति इस्लामधर्माच्या तत्त्वाशीं, शरियतशीं अगदींच विरुद्ध आहे. त्यामुळें कांहीं मूलभूत तत्त्वांवर आधारलेली अशा प्रकारची धर्मभावना त्यांच्या हृदयाच्या आरशावर स्वतंत्रच कोरली गेली आहे आणि जहांपनाहाच्या मनावर जे हरएक तऱ्हेच्या विचारांचे परिणाम घडून आले, त्या सर्वांचा परिणाम म्हणून टाकीचे घण पडतां पडतां दगडांतून जशी एक स्पष्ट आकृति निर्माण व्हावी त्याप्रमाणें त्यांच्या हृदयांत अशी दृढ श्रद्धा निर्माण झालेली आहे, कीं शहाणे लोक सर्व धर्मांमध्यें असतात, तसेंच प्रमाणबद्ध विचारसरणी असणारे आणि ज्यांच्या ठिकाणीं चमत्कार वाटण्याजोगें अद्‌भुत सामर्थ्य आहे अशीं माणसें सर्व राष्ट्रांमध्यें असतात. तेव्हां कांहीं ना कांहीं खरें ज्ञान प्रत्येक ठिकाणीं सांपडतें अशी वस्तुस्थिति असतांना सत्य फक्त एकाच धर्मांत समाविष्ट झालेलें आहे, असा वृथा आग्रह कां धरावा?"

तुला आठवतच असेल, कीं याच काळांत यूरप खंडामध्यें धर्माच्या बाबतींत अनुदारपणाला, माथेफिरूपणाला असामान्य ऊत आलेला होता. स्पेनमध्यें आणि नेदरलंडमध्यें व इतरत्रही इन्क्विझिशनचा धुमाकूळ चालू होता आणि कॅथॉलिक पंथाच्या माणसानें कॅल्व्हिनिस्ट पंथीयाला किंवा त्यानें पहिल्याला थारा द्यावयाचा किंवा थोडें बरेपणानें वागवावयाचें म्हणजे मोठें घातक महत्पाप समजलें जात होतें.

निरानिराळ्या धर्माच्या पंडितांशीं अकबराचीं हीं संभाषणें आणि ही चर्चा वर्षानुवर्षें नित्य चालूच होती. शेवटीं हे पंडित लोक या सर्व प्रकाराला कंटाळले आणि त्याला आपापल्या धर्माकडे वळविण्याची त्याची आशा नाहींशी झाली. प्रत्येक धर्मांत जर कांहीं ना कांहीं सत्य हें होतेंच, तर मग त्यांतल्या एकालाच विशेष चिकटून आपण कां राहावें असा त्याचा प्रश्न होता. या बाबतींत एकदां त्यानें पुढीलप्रमाणें विधान केल्याचें जेसुइट लोकांनीं लिहून ठेवलेलें आहे: "जंटाईल* लोक समजतात, कीं आपला कायदा (धर्मशास्त्र) खरा; सारासन लोक असेंच मानतात आणि त्याचप्रमाणें ख्रिस्तीही. अशा स्थितींत कोणत्या धर्माचा आपण स्वीकार करावा?" अकबराचा हा प्रश्न खरोखर अगदीं न्याय्य व समर्पक होता; परंतु त्यामुळें त्या जेसुइट मंडळींचें पित्त खवळलेलें दिसतें; कारण त्यांनीं आपल्या ग्रंथांत पुढें लिहिलें आहे, "अशा रीतीनें या राजामध्येंही आपल्याला नास्तिकांच्या ठिकाणचा नेहमींचा दोष दिसून येतो. नास्तिक मनुष्य बुद्धीवर श्रद्धेचें नियंत्रण मान्य करीत नाहीं. त्याच्या दुर्बल मनाला, बुद्धीला ज्या गोष्टी खोलवर

*जंटाईल म्हणजे जेसुइट लोकांच्या मताप्रमाणें हिंदु; सारासन लोक म्हणजे अर्थातच मुसलमान. जेसुइट पाद्री हे पोर्तुगालमधील असल्यामुळें त्यांना स्पेनमधील सारासन लोक ठाऊक होते; त्यामुळें हिंदुस्थानांतील मुसलमान लोकांना मुद्दां ते त्याच नांवानें संबोधतात.

जाऊन पाहतां येणें शक्यच नसतें ती गोष्ट सत्य म्हणून मानण्यास तो तयार नसतो आणि मनुष्याच्या ग्रहणशक्तीची धांव जेथपर्यंत जास्तींत जास्त जाऊन पोंचणें शक्य आहे अशाही टप्प्याच्या पलीकडच्या, त्या ग्रहणशक्तीला आकलन न होणाऱ्या, गोष्टींच्या निर्णयाच्या बाबतींतही ते आपल्या अपूर्ण अशा बुद्धीवरच विसंबतात." हीच जर नास्तिकाची खरी व्याख्या असेल, तर असे नास्तिक जितके अधिक निर्माण होतील तितकें जगाचें अधिक कल्याण होईल.

अकबराचा हेतु तरी काय होता याचा स्पष्ट थांग लागत नाहीं. या गोष्टीकडे केवळ तो राजकारणी दृष्टीनेंच बघत होता काय? या देशांत एकराष्ट्रीयत्व प्रस्थापित करण्याची त्याची इच्छा असल्यामुळें येथील सर्व धर्मांना एकाच ओळींत कसें तरी करून आणावें, असा त्याचा हेतु होता काय? का त्याच्या मनांतील ही प्रेरणा आणि सत्यसंशोधनाची धडपड या गोष्टींच्या मागें खरोखरच धार्मिक प्रवृत्ति होती? मला कांहीं हें नीटसें सांगतां येणार नाहीं. परंतु त्याच्या अंगीं धर्मसुधारकापेक्षा राजकारणी पुरुषाच्या प्रवृत्तीचें प्रमाण अधिक होतें असेंच मला तरी म्हणावेंसें वाटतें. त्याचा उद्देश कांहीं असो, त्यानें एक नवाच धर्म प्रस्थापित केल्याचें जाहीर केलें ही गोष्ट खरी. या धर्माचें नांव दीने इलाही असून त्या धर्माचा प्रमुख स्वतः अकबर हाच होता. इतर बाबतींप्रमाणें धर्माच्या बाबतींत आपल्या एकतंत्री सत्तेला तो कसलाही पायबंद घालून घेण्याला तयार नव्हता आणि त्याच्याही धर्मामध्यें पायांवर लोटांगण घालणें आणि पायांचें चुंबन घेणें वगैरे प्रकारचीं किळसवाणीं तंत्रें होतींच! या नव्या धर्मानें मूळ मात्र धरलें नाहीं. त्याचा कांहीं परिणाम झाला असला तर एवढाच, कीं मुसलमान लोक मात्र चिडून गेले.

अकबर म्हणजे सर्वाधिकारशाहीचा अगदीं अर्कच होता. तरीपण त्याच्यापुढें जर राजकीय उदारमतवादित्वाच्या कल्पना आल्या असत्या तर तो कसा वागला असता, याचा तर्क करून पाहणें मोठें गमतीचें आहे. व्यक्तीला धर्माच्या बाबतींत मतस्वातंत्र्य असणें जरूर आहे असें एकदां मान्य केलें, म्हणजे मग लोकांना अधिकाधिक राजकीय स्वातंत्र्यही असावें असें कां म्हणूं नये? शास्त्रीय ज्ञानाची त्याला जर कोणी ओळख करून देता, तर त्याचें मन त्याकडे फारच वेधलें गेलें असतें हें खास. दुर्दैवाची गोष्ट या ज्या कांहीं नव्या कल्पनांची खळबळ यूरप खंडांत कांहीं लोकांच्या मनामध्यें नुकतीच माजूं लागलेली होती, त्या कल्पनांचा प्रवेश या काळीं अजून हिंदुस्थानांत झालेला नव्हता. त्याचप्रमाणें येथें छापखान्याचाही उपयोग होऊं लागल्याचें दिसून येत नाहीं; त्यामुळें शिक्षणाचा प्रसारही फारच मर्यादित प्रमाणावर झालेला होता. फार कशाला? अकबराला स्वतःला लिहितां वाचतां येत नव्हतें हें ऐकून तर आश्चर्यानें तूं थक्क होऊन जाशील. असें असूनही तो फार मोठा विद्वान् मनुष्य होता आणि वाचून दाखविलेले ग्रंथ ऐकण्याची त्याला फार मोठी आवड होती. त्याच्या आज्ञेवरून किती तरी संस्कृत ग्रंथांचीं फारशी भाषेंत भाषांतरें करण्यांत आलीं होतीं.

अकबरानें हिंदूंमधील सती बंद करण्याबद्दल आणि लढाईंत पडलेल्या कैद्यांना गुलाम करण्याची पद्धति बंद करण्याबद्दल हुकूम काढलेले होते, ही गोष्ट मुद्दाम नमूद करण्यासारखी आहे.

जवळजवळ पन्नास वर्षांच्या कारकीर्दीनंतर वयाच्या ६४ व्या वर्षी अकबर इ. स. १६०५ च्या ऑक्टोबर महिन्यांत मरण पावला. आग्र्याजवळ शिकंदरा येथें एका सुंदर कबरीमध्यें त्याच्या शवाचें दफन करण्यांत आलेलें आहे.

अकबराच्या काळांत उत्तर हिंदुस्थानमध्यें, बहुतेक करून काशी येथेंच, असा एक मनुष्य होऊन गेला, कीं ज्याचें नांव आज आपल्या संयुक्त प्रांतांत एकूण एक खेड्यांमध्यें सुप्रसिद्ध आहे. अकबर किंवा दुसऱ्या कोणत्याही राजापेक्षां हा गृहस्थ या खेड्यापाड्यांत अधिक माहितीचा आहे. हिंदीमध्यें रामचरितमानस म्हणजेच रामायण लिहिणारा कवि तुलसीदास याला उद्देशून हें मी म्हणतों आहें.

## ९०

# हिंदुस्थानांतील मोंगल साम्राज्याचा ऱ्हास व नाश

९ सप्टेंबर, १९३२

अकबराबद्दल आणखी मुद्दां काहीं कांहीं तुला सांगावें असा माझ्या मनाला मोह पडतो आहे; पण मनाला आवर घातला पाहिजे मला. तरी पण पोर्तुगीज मिशनऱ्यांनीं लिहिलेल्या वृत्तांतांतून थोडेसे उतारे दिल्यावांचून मात्र माझ्याच्यानें राहवतच नाहीं. दरबारी सेवकांच्या अभिप्रायापेक्षां या स्वतंत्र लोकांच्या अभिप्रायाला फार जास्त किंमत आहे; आणखी अकबर ख्रिस्ती झाला नाहीं म्हणून त्याच्यावर ते फार असंतुष्ट झालेले होते हें एक त्यांत विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे. असें असूनही त्यांनीं लिहिलें आहे, "तो खरोखरच एक श्रेष्ठ राजा होता. कारण ज्याला प्रजेच्या ठिकाणीं आपल्याविषयीं एकाच वेळीं आज्ञाधारकता, आदर, प्रेम आणि भीति या सर्व भावना निर्माण करतां येतात त्यालाच चांगला राज्यकर्ता म्हणतां येईल, ही गोष्ट तो चांगली जाणत होता. हा सर्वांचा आवडता राजा होता; मोठ्या लोकांशीं तो ताठपणानें वागत असे, गरीबगुरिबांशीं तो दयाळूपणानें वागत असे आणि उंच-नीच, शेजारी किंवा परकी, ख्रिस्ती, सारासन किंवा जेंटाईल (हिंदु) कोणीही कसाही असो, सर्वांशीं सारख्या न्याय्य बुद्धीनें तो वागत असे. त्यामुळें प्रत्येक मनुष्याला असें वाटे, कीं "राजा आपल्या बाजूचा आहे." पुढें एका ठिकाणीं या जेसुइट लोकांनीं लिहिलें आहे, "आतां या क्षणीं तो राज्यकारभाराच्या कामांत किंवा प्रजेचीं गाऱ्हाणीं ऐकण्यांत अगदीं दंग झालेला असेल, तर दुसऱ्याच क्षणीं तो उंटांची भादरणी करीत असतांना

आढळेल; नाहीं तर दगड घडवितांना, लांकूड फोडतांना, किंवा लोखंडावर घण मारतांना दिसेल; आणि त्यांतली प्रत्येक गोष्ट जणुं कांहीं आपला अगदीं रोजचा धंदाच आहे इतक्या तन्मयतेनें आणि कसोशीनें करतांना तो आढळेल." एवढा मोठा बलिष्ठ आणि एकतंत्री राज्यकर्ता जरी तो होता, तरी आज कितीएक लोक समजतात त्याप्रमाणें हातकाम करणें हें कमीपणाचें आहे असें तो मुळींच समजत नसे.

पुढें एके ठिकाणीं आणखी असें सांगतात हे लोक: "त्याचा आहार बेतशीर होता; मांस तो वर्षांतून तीनचार महिनेच फक्त खात असे... रात्रीचे जेमतेम तीन तास त्याला झोंप घ्यावयाला मिळे... त्याची स्मरणशक्ति अलौकिक होती. त्याच्याजवळ हजारों हत्ती असत तरी त्या सर्वांचीं नांवें त्याच्या लक्षांत असत; त्याचप्रमाणें आपले घोडे, हरिणें यांचीं आणि कबूतरांचीं नांवें सुद्धां त्याच्या ध्यानांत राहत असत." माणसाच्या ठिकाणीं इतकी थक्क करून टाकण्यासारखी स्मरणशक्ति असेल, या गोष्टीवर आपला सहसा विश्वास बसत नाहीं; आणि या हकिकतींत थोडीफार अतिशयोक्तीही असेल. परंतु त्याची बुद्धि असामान्य होती याबद्दल मुळींच संशय नाहीं. "त्याला जरी लिहितां-वाचतां येत नव्हतें, तरी आपल्या राज्यांत कोठें काय चाललें आहे याची त्याला खडान्‌खडा माहिती असे." आणि त्याची "ज्ञानाविषयींची तळमळ" इतकी मोठी होती कीं "भुकेलेला मनुष्य ज्याप्रमाणें आपल्या पुढचें अन्न एकाच घासांत खाऊन टाकावें असें म्हणतो, त्याप्रमाणें तो सगळें कांहीं एकदम शिकण्याची धडपड करीत असे."

अकबर हा अशा प्रकारचा होता. परंतु तो संपूर्णपणें एकतंत्री राज्य करण्याची आवड असणारा राजा होता. लोकाच्या जीवनांत त्यानें पुष्कळशी निश्चितता निर्माण केली आणि शेतकऱ्यांवरील करांचें ओझें कमी केलें हें जरी खरें, तरी पण शिक्षण आणि संस्कार यांच्या योगानें लोकांच्या सुधारणेची उंचीच सामान्यपणें वाढवावी याकडे कांहीं त्याच्या मनाचा कल नव्हता. चीनमध्यें कुब्लईखानाच्या वंशाची गोष्ट घडली, त्याप्रमाणें अकबरापासून पुढें मोंगल राजघराणें हेंही एक हिंदी राजघराणें होऊन गेलें. आणि आपलें साम्राज्य एकसूत्री आणि सुदृढ करण्याचा अकबरानें जो महान् प्रयत्न यशस्वीपणें केला होता, त्यामुळें त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वंशाची कारकीर्द शंभर वर्षांहून अधिक काळपर्यंत चालू राहिली.

अकबराच्यानंतरचे तीन राजे चांगले कर्तबगार निघाले. परंतु अलौकिक असें मात्र त्याच्या ठिकाणीं कांहीं नव्हतें. बादशहा मेला रे मेला कीं आतां त्याच्या मुलांत राज-सिंहासनासाठीं ओंगळवाणी झटापट सुरू होऊं लागली. अंतर्गत कारस्थानें, वारसासाठीं लढाया, मुलांचीं बापाविरुद्ध बंडें, भावांविरुद्ध बंडें, खून, डोळे काढणें—अनियंत्रित आणि बेजबाबदार अशा राजशाहीच्याबरोबर येणारे हे सर्व प्रकार या राजवटींतही घडून येऊं लागले. ज्याला कोठेंही तोड सांपडणार नाहीं इतकें मोठें ऐश्वर्य, वैभव आणि दिमाख या राज्यामध्यें आढळून येत होता. तुला आठवतच असेल, कीं फ्रान्समध्यें

राजसूर्य म्हटला जाणारा चौदावा लुई मोठ्या वैभवानें तळपत होता, ~~व्हर्साय शहर~~ वसवीत होता आणि मोठा थाटाचा दरबार नांदवीत होता तोच हा काळ. परंतु या महान् राजाचें वैभव मोंगल बादशहाच्या वैभवापुढें अगदींच फिकें होतें. मोंगल बादशहा हे आपल्या काळीं सर्व पृथ्वीमध्यें अधिकांत अधिक संपन्न राजे होते असें दिसतें. तरी पण अधूनमधून त्यांच्या राज्यांत दुष्काळ पडतच असत; निरनिराळे सांथीचे रोगही उत्पन्न होत आणि त्यामुळें हजारों-लाखों लोक मृत्युमुखीं पडत; इकडे दरबारामध्यें मात्र विलास व ऐश्वर्य यांची चंगळ चाललेली असे.

सर्व धर्मांना उदारपणें वागविण्याचें अकबराच्या काळचें धोरण पुढें त्याचा मुलगा जहांगीर याच्या कारकीर्दींत चालू राहिलें. पण त्यापुढें तें मागें पडूं लागून ख्रिस्ती व हिंदू लोकांवर थोडा थोडा जुलूम होऊं लागला. नंतर औरंगजेबाच्या कारकीर्दींत तर देवळें फोडून टाकून आणि जिझियाची डोईपट्टी पुन्हा लादून हिंदूंचा छळ करण्याचा जाणूनबुजून कसून प्रयत्न करण्यांत आला. अशा रीतीनें अकबरानें ज्या गोष्टींचा अत्यंत सुदृढ पाया मोठ्या दीर्घ परिश्रमानें आपल्या साम्राज्याच्या तळाशीं रचला होता, त्या गोष्टी एकामागून एक नाहींशा करण्यात आल्या आणि त्यामुळें मोंगलांचें साम्राज्य एकदम हादरा बसून कोलमडून पडलें.

अकबराच्या पाठीमागून रजपूत पत्नीपासून झालेला त्याचा मुलगा जहांगीर हा गादीवर आला. आपल्या बापाची परंपरा त्यानें थोड्याफार प्रमाणात चालू ठेवली. परंतु एकंदरीनें राज्यकारभारापेक्षां बहुतेक कलाकौशल्य, चित्रकला, उद्यानें आणि फुलें यांकडेच त्याचें लक्ष अधिक होतें. त्याच्यापाशीं फार सुंदर चित्रसंग्रह त्यानें जमा केला होता. दरवर्षी तो काश्मीरमध्यें जात असे; आणि मला वाटतें, श्रीनगरजवळच्या त्या सुप्रसिद्ध शालिमार आणि निशात या बागा त्यानेंच उभारल्या. जहांगीरची पत्नी, अथवा खरें म्हटलें म्हणजे त्याच्या पुष्कळशा बायकांपैकीं एक, सौंदर्यशाली नूरजहान ही होती. राज्यकारभाराची खरी सत्ता या स्त्रीच्या हातामध्यें होती. एत्मादुद्दौला याचें थडगें ज्यात आहे ती इमारत जहांगीरच्याच कारकीर्दींत बांधली गेली. मी केव्हांही जरी आग्रा येथें गेलों तरी शिल्पकलेंतील या रत्नाचें अवश्य दर्शन घेतों आणि त्याच्या अपूर्व सौंदर्यानें माझ्या सौंदर्यासक्त डोळ्यांचें पारणें फेडून घेतों.

जहांगीरनंतर त्याचा मुलगा शहाजहान गादीवर आला. त्यानें तीस वर्षें राज्य केलें (१६२८ ते १६५८). हा फ्रान्सच्या चौदाव्या लुईशीं समकालीन होता. त्याच्या कारकीर्दींत मोंगलांचें ऐश्वर्य कळसास पोंचलें आणि त्याच्याच कारकीर्दींत पुढच्या ऱ्हासाचीं बीजेंही वर डोकावूं लागलीं. याच्या कारकीर्दींत तें अत्यंत मौल्यवान् रत्नांनीं खचलेलें असें विख्यात मयूरसिंहासन बादशहासाठीं म्हणून तयार करण्यांत आलें. आग्रा येथील यमुना नदीच्या तीरावरील स्वर्गीय सौंदर्यानें विनटलेला, सौंदर्याचा साक्षात्कार, रमणीयतेचें स्वप्नरंजनच जणुं, असा तो ताजमहाल हाही याच काळांत तयार झाला. ताजमहाल म्हणजे शहाजहानची प्रेमळ पत्नी मुमताजमहाल हिचें कबरस्तान आहे हें बहुतेक तुला

ठाऊक असेल. परंतु शहाजहाननें स्वतःच्या मान्यतेला किंवा चांगुलपणाला बट्टा लावणाऱ्याही कित्येक गोष्टी केल्या. धर्माच्या बाबतींत तो अनुदारपणें वागला; त्याचप्रमाणें दक्षिण हिंदुस्थान आणि गुजरात यांच्यामध्यें एकदां भयंकर दुष्काळानें कहर गुदरविलेला असतांना त्या प्रांतांना मदत देण्यासाठीं त्यानें जवळजवळ कांहीं सुद्धां केलें नाहीं. त्याच्या प्रजेचें दारिद्र्य आणि दैन्य याच्याशीं जोडून पाहिलें असतां त्याची संपत्ति आणि वैभव यांची खरोखर अत्यंत किळस वाटूं लागते. इतकें असूनही साध्या आणि संगमरवरी दगडाचीं जीं अजब सौंदर्यशाली बांधकामें त्यानें आपल्यामागें आमच्यासाठीं ठेवलीं आहेत, त्यामुळें त्याचीं पुष्कळशीं पापें माफ करावींशीं वाटतात. मोंगलांची शिल्पकला आणि वास्तुशास्त्रही पण त्याच्याच काळीं अगदीं कळसास पोंचलीं. ताजमहाल-खेरीज आग्रा येथील मोती मशीद शहाजहाननेंच बांधविली. त्याचप्रमाणें दिल्ली येथील ती प्रचंड जामी मशीद, आणि दिल्लीच्या राजवाड्यामधील दिवाण-ई-आम व दिवाण-ई-खास हे दिवाणखाने पण. या इमारतींमध्यें एक प्रकारचें उदात्त व रमणीय साधेपण आहे; त्यांतील कांहीं विस्तारानें फारच प्रचंड आहेत; तथापि त्यांच्यामध्यें नाजुकपणा आहे, सफाईदारपणा आहे, डौलदारपणा आहे आणि अप्सरांचें स्वर्गीय सौंदर्य व लालित्य आहे.

पण पुढच्या या सगळ्या नंदनवनासारख्या सौंदर्याच्या पाठीमागें काय उभें होतें? तर दारिद्र्यानें गांजलेले लोक; ज्यांनीं करभार देऊन या इमारती उठविण्यासाठीं राजाजवळ संपत्ति उभी केली, परंतु ज्यांना स्वतःला मातीच्या झोंपड्यासुद्धां पुरेशा राहण्यासाठीं नव्हत्या असे लोक. सर्व राज्यकारभार सर्वस्वीं केवळ बादशहाच्या मर्जीनुसार चालत असे आणि राजाची अथवा त्याच्या मोठ्या प्रांताधिपांची अगर गव्हर्नरांची ज्यांवर गैरमर्जी होईल, त्यांना भयंकर शिक्षा देण्यांत येत असत. दरबारांतील कारस्थानांमध्यें मॅकिव्हॅलीच्या तत्त्वांचाच सर्व जण अवलंब करीत. अकबराचा दयाळूपणा, धार्मिक उदारपणा, सहनशीलता आणि हितकर राज्यकारभार या गोष्टी आतां फार जुन्या होऊन गेल्या होत्या, व त्यामुळें गडबड आणि दंगल माजण्याचा काळ जवळजवळ येत चालला होता.

यानंतर महान् मोंगल बादशहांपैकीं शेवटचा औरंगजेब हा गादीवर आला. बापाला कैदेंत टाकून यानें आपल्या राज्याचा व कारकीर्दीचा श्रीगणेशा केला. त्याची कारकीर्द इ. स. १६५९ पासून १७०७ पर्यंत अठेचाळीस वर्षें झाली. त्याचा आजा जहागीर याच्या ठिकाणचें कला व साहित्य यांविषयींचें प्रेम त्याच्या अंगीं नव्हतें किंवा त्याचा बाप शहाजहान याच्या ठिकाणचें शिल्पकाम, वास्तुशास्त्र यांविषयींचें प्रेमही त्याच्या अंगीं नव्हतें. तो मोठा कडक नियम पाळणारा, अत्यंत साध्या राहणीचा, धर्मवेडा मनुष्य असून एक आपल्या स्वतःच्या धर्माहून इतर कोणत्याही धर्माला थारा देण्यास तो तयार नव्हता. त्याच्या दरबारांत छानछोकी, डामडौल हीं चालूच राहिलीं; परंतु त्याचें खासगी जीवन जवळजवळ एखाद्या बैराग्यासारखें आणि अतिशयच साधें

होतें. हिंदुधर्माच्या लोकाचा छळ करण्याचें धोरण त्यानें अगदीं मुद्दाम जाणूनबुजून अंगीकारलें. अकबराचें गोडीगुलाबीचें आणि समन्वयाचें धोरण त्यानें जाणूनबुजून पार उलटेंपालटें केलें आणि अशा रीतीनें ज्या पायावर मोंगलांचें साम्राज्य स्थिर झालें होतें, तो पायाच त्यानें नाहींसा केला. हिंदूंवर त्यानें जिझियाची डोईपट्टी पुन्हां बसविली; शक्य तों हिंदूंना तो अम्मलदारीवर नेमण्याचें टाळूं लागला; ज्या रजपूत सरदारांनीं अकबराच्या वेळेपासून मोंगल घराण्याला पाठिंबा देण्यास सुरुवात केलेली होती, त्याच रजपुतांमध्यें त्यानें असंतोष निर्माण केला आणि रजपुतांशीं युद्ध ओढवून घेतलें. हिंदूंचीं हजारों देवळें त्यानें उध्वस्त केलीं आणि अशा रीतीनें कित्येक प्राचीन सुंदर सुंदर बांधकामें धुळीस मिळालीं. इकडे एकीकडे त्याच्या साम्राज्याचा विस्तार दक्षिणेंत वाढत होता; विजापूर व गोवळकोंडा हीं राज्यें त्यानें काबीज केलीं होतीं; त्याच्याही खालचीं दक्षिणेंतील राज्यें त्याला खंडणी देऊं लागलीं होतीं; तर दुसरीकडे त्याच्या साम्राज्याचा पायाच निःसत्त्व होऊन तें साम्राज्य दिवसेंदिवस दुर्बळ होत चाललें होतें आणि त्याच्या चोहों बाजूंनीं शत्रू उभे राहूं लागले होते. हिंदू लोकांतर्फे जिझिया डोईपट्टीविरुद्ध त्याच्याकडे एक अर्ज करण्यांत आला होता. त्यामध्यें लिहिलें होतें कीं, "हा कर न्यायाला काळिमा आणणारा आहे. राज्याला कल्याणकारक अशा धोरणाला तो सोडून आहे आणि त्यामुळें देशांत दारिद्र्य खात्रीनें वाढेल; शिवाय, हा अगदींच नवीन प्रकारचा कर असून हिंदुस्थानांतील धर्मशास्त्राच्या नियमांचा त्यामुळें भंग होत आहे." पुढें साम्राज्यांतील प्रचलित परिस्थितीसंबंधीं या अर्जांत लिहिलें आहे, "जहांपनाहांच्या चालू कारकीर्दींत पुष्कळच लोक साम्राज्याशीं विरोधी झाले आहेत; आणि सर्वत्र धनधान्यादिकांचा नाश आणि लुटालूट हीं माजून राहिलेलीं असल्यामुळें साम्राज्याला आणखीही प्रदेशाला मुकावें लागणें हें अपरिहार्य आहे. आपली प्रजा पायाखालीं तुडविली जात आहे, आपल्या साम्राज्यांतील एकूण एक प्रांत दरिद्री झाला आहे, लोकसंख्या रोडावत आहे आणि संकटें रोज वाढतच आहेत."

यापुढील पन्नास एक वर्षांमध्यें हिंदुस्थानांत ज्या मोठमोठ्या घडामोडी आणि फेरबदल घडून यावयाचे होते त्यांची, देशांत सार्वत्रिक पसरलेलें हें दैन्य म्हणजे एक प्रकारची नांदीच होती म्हणावयाची. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोंगलांचें महान् साम्राज्य सर्वतोपरि कोलमडून रसातळाला गेलें ही पुढच्या पन्नास वर्षांमधली अशीच एक महत्त्वाची घडामोड होय. अशा ज्या मोठमोठ्या घडामोडी होतात आणि फेरबदल घडून येतात त्यांच्या बुडाशीं नेहमीं आर्थिक कारणेंच असतात. चीनमध्यें आणि यूरपमध्यें मोठमोठीं साम्राज्यें नष्ट झालीं. त्यांच्या नाशाच्या मुळाशीं आर्थिक दुरवस्था हीच होती; पुढच्या होऊं घातलेल्या क्रांतीची ती जणुं हांकच होती. त्या साम्राज्यांच्या पडत्या काळांतही आर्थिक दैन्यावस्था त्यांच्या कायमचीच पाठीस लागून क्रांतीला कारण झाली. त्या देशांत हा जो प्रकार झालेला आपण पाहिला, तोच प्रकार आतां इकडे हिंदुस्थानांत झाला.

इतर बहुतेक सर्व साम्राज्यांप्रमाणें मोंगलाचें साम्राज्यही अंतर्गत दुर्बळतेमुळेंच नष्ट झालें. त्याचे अक्षरशः तुकडे तुकडे झाले. परंतु औरंगजेबाच्या धोरणामुळें हिंदूंच्या ठिकाणीं जी बंडखोरीची प्रवृत्ति निर्माण झालेली होती, तिचाही मोंगल साम्राज्याचे तुकडे तुकडे होण्याच्या कामीं फार मोठ्या प्रमाणांत उपयोग झाला. हिंदूंमधील या एक प्रकारच्या धार्मिक राष्ट्रवादाचें मूळ औरंगजेबाच्या कारकीर्दीच्याही आधींच्या काळामध्यें रुजलेलें होतें; आणि अंशतः यामुळेंच औरंगजेबाच्या ठिकाणीं धार्मिक बाबतींत इतका कडवटपणा आणि माथेफिरूपणा निर्माण झाला असावा. मराठे, शीख आणि असेच दुसरेही लोक हे म्हणजे हिंदूंमधील या जागृतीच्या व पुनरुज्जीवनाच्य भाल्याचीं जणुं टोंकेंच होतीं; याच लोकांनीं अखेरीस मोंगल साम्राज्य उलथून पाडलें हें आपल्याला पुढच्याच पत्रामध्यें दिसून येईल. परंतु संपन्न अशा या मोंगल साम्राज्याच्य वारशाचा लाभ मात्र त्यांच्या पदरांत पडला नाहीं. बाकीचे सर्व लोक एकमेकांशीं या वारशाच्या वांटणीसाठीं लढत असतां ब्रिटिश लोकांनीं मोठ्या चतुराईनें आणि हळूच कोणाला नकळत आंत प्रवेश केला आणि सगळीच लूट स्वतःच्या खिशांत टाकली; पण ती अजून पुष्कळ पुढची हकीगत आहे.

मोंगल बादशहा सैन्य घेऊन लढाईला निघाले म्हणजे त्याचा लष्करी तळ कशा प्रकारचा असे यांचें वर्णन तुला थोडेंसें मनोरंजक वाटेल. हा तळ म्हणजे भला मोठा पसाराच असे एक; जवळजवळ तीस मैलांचा त्याचा घेर असे आणि त्यांत पांच लाख माणसांची वसाहत असे! या पांच लाखांत बादशहाच्या बरोबरचें लढाऊ सैन्य तर असेच; पण त्या खेरीजही इतर असंख्य लोक असत. लढाईसाठीं कूच करीत चाललेलें तें एक भलें मोठें शहर असे जणुं; आणि त्यांत शेंकडों बाजार उघडलेले असत. या अशा तळामध्येंच उर्दू-लष्करी तळाची भाषा-निर्माण होऊन वाढत गेली.

मोंगलांच्या काळचीं स्त्रीपुरुषांचीं पुष्कळ चित्रें उपलब्ध आहेत. त्यांतील चित्रकाम आणि रंगकाम मोठें रेखीव, सफाईदार आणि नाजुक आहे. सगळ्या बादशहांच्या चित्रांचा मिळून तर एक चांगला मोठा संग्रहच आहे. त्यामध्यें बाबरापासून औरंगजेबापर्यंतच्या या बादशहांचें स्वरूप आणि वैशिष्ट्य फारच चांगल्या रीतीनें प्रत्ययाला येतें.

मोंगल बादशहांची नेहमींची एक पद्धति अशी होती, कीं खिडकीच्या सज्जांतून रोज दोन वेळ प्रजेला दर्शन द्यावयाचें व त्यांचे अर्ज स्वीकारावयाचे. इंग्लंडचा राजा पांचवा जॉर्ज दिल्ली येथें इ. स. १९११ मध्यें राज्यारोहणाच्या दरबारासाठीं आला असतां त्यालाही अशाच पद्धतीनें लोकांना दर्शन देण्यासाठीं उभें करण्यात आलें होतें. हिंदुस्थानांतिल मोंगलांच्या राज्याचे आपण वारसदार आहों असें ब्रिटिश लोक समजतात आणि डामडौल आणि रिकामा थाटमाट या बाबतींत ते मोंगल दरबाराची नक्कल करूं पाहतात. इंग्रज राजाला या लोकांनीं मोंगल बादशहांची पदवी, कैसर-इ-हिंद, हीसुद्धां दिली आहे हें मीं सांगितलेंच आहे तुला. आजच्या घटकेला

सुद्धा हिंदुस्थानांतील इंग्रज राजप्रतिनिधीच्या सभोंवार जितका थाटमाट आणि राजवैभवाचें प्रदर्शन आढळून येतें, तितकें जगात बहुधा दुसरीकडे कोठेंही आढळून येणार नाहीं.

यापुढच्या मोंगल बादशहांचे परदेशीय लोकांशीं कशा प्रकारचे संबंध होते हें मीं अद्यापि तुला सांगितलेलें नाहीं. अकबराच्या दरबारांत पोर्तुगीज मिशनरी लोकांना फारच सवलतीनें वागविण्यात येत असे आणि अकबराचा यूरपीय जगताशीं संबंध या पोर्तुगीज लोकांच्या मार्फतच मुख्यतः येत असे. पोर्तुगाल हें त्याला सर्वांत अधिक बलिष्ठ राष्ट्र असें वाटे आणि त्या वेळीं पोर्तुगीज लोकांचा समुद्रावर दराराही चांगलाच होता. इंग्रज लोकांचें दर्शनसुद्धां त्या वेळीं या बाजूला फारसें होत नव्हतें. गोव्याचें राज्य जिंकून घ्यावें अशी अकबराला फार मोठी हाव होती. त्यानें त्याच्यावर हल्लाही केला; परंतु त्याला त्यांत यश आलें नाहीं. मोंगल लोकांना दर्यावर्दीपणा नीटसा कधींच अंगवळणी पडला नाहीं, त्यामुळें दर्यावर्दी सत्तेपुढें ते अगदीं दुबळे पडत. या काळीं पूर्व बंगालमध्यें जहाजें बांधण्याचे कारखाने तर मोठ्या जोरांत चालत असत; त्यामुळें मोंगलांचें हें समुद्रावरील दौर्बल्य मोठें विलक्षण वाटतें; परंतु हीं सर्व जहाजें मुख्यतः मालवाहतुकीच्या कामासाठीं तयार होत असत. मोंगल साम्राज्याच्या नाशाचें एक कारण समुद्रावरील त्याचें हें दुर्बलत्व असेंही म्हटलें जातें. आतां या काळीं दर्यावर्दी बलिष्ठ राष्ट्रांचे दिवस येऊं घातले होते.

इंग्रज लोक जेव्हां मोंगलांच्या दरबारांत प्रवेश करून घेण्याचा प्रयत्न करूं लागले, तेव्हां पोर्तुगीज लोकांना त्यांचा मत्सर वाटून त्याच्याविरुद्ध जहांगीर बादशहाचें मन कलुषित करण्यासाठीं त्यांनीं जंगजंग पछाडले. तरी पण इंग्लंडचा राजा पहिला जेम्स् याचा वकील सर टॉमस मनरो हा इ. स. १६१५ मध्यें जहांगीरच्या दरबारांत येऊन शिरकलाच. त्यानें व्यापाराबाबत बादशहाकडून कांहीं सवलती मिळविल्या आणि अशा रीतीनें ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाराचा पाया घातला. दरम्यान इकडे हिंदुस्थानच्या बाजूच्या समुद्रामध्यें इंग्रजांच्या आरमारी काफिल्यानें पोर्तुगीजांच्या जहाजांचा पाडावही केला होता. इंग्लंडचा तारा हळूहळू पूर्व क्षितिजावर वरवर चढूं लागला होता; तर पोर्तुगालचा तारा पश्चिमेकडे मावळूं लागला होता. डच आणि इंग्रज लोकांनीं क्रमाक्रमानें पोर्तुगीज लोकांना पूर्व समुद्रांतून हांकलून लावलें. इ. स. १६४१ मध्यें तर मलाक्का हें मोठें बंदरही डच लोकांच्या हातीं लागलें हें तुला आठवत असेल. इ. स. १६२९ मध्यें शहाजहान आणि पोर्तुगीज लोक यांच्यामध्यें हुगळी येथें एक युद्ध झालें. या ठिकाणीं पोर्तुगीज लोकांनीं उघड उघड गुलामांचा व्यापार सुरू केला होता आणि लोकांना जबरदस्तीनें बाटवून ख्रिस्ती करण्याचा सपाटा चालविला होता. पोर्तुगीज लोकांनीं हुगळीचा बचाव करण्याचा मोठ्या शौर्यानें प्रयत्न केला; परंतु अखेरीस मोंगलांनीं त्यांचा पाडाव केला. एकसारख्या पाठीस लागलेल्या या युद्धामध्यें चिमुकलें पोर्तुगाल राष्ट्र अगदीं थकून गेलें. म्हणून साम्राज्यसंपादनाच्या या शर्यतींतून

त्यानें आपलें आंगच काढून घेतलें; परंतु गोवा आणि इतर चारदोन ठिकाणें यांचा मात्र ताबा अगदीं आजच्या घटकेपर्यंत त्यांनीं केव्हांही सोडला नाहीं.

दरम्यान इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर मद्रास व सुरत येथें आपल्या वखारी उघडल्या. मद्रास शहर तर त्यांनींच इ. स. १६३९ मध्यें वसविलें. इ. स. १६६२ मध्यें दुसऱ्या चार्ल्स राजानें पोर्तुगालमधील ब्रॅगान्झा परगण्यांतील कॅथरीन नांवाच्या राजकन्येशीं लग्न केलें. त्या वेळीं आंदण—हुंडा—म्हणून त्याला मुंबई बेट मिळालें. लौकरच त्यानें नांवाला थोडीशी किंमत घेऊन तें बेट ईस्ट इंडिया कंपनीला विकून टाकलें. हा प्रकार औरंगजेबाची कारकीर्द चालू असतांना घडला. पोर्तुगीज लोकांना हांकून लावल्यामुळें ईस्ट इंडिया कंपनीला स्वतःच्या सामर्थ्याचा अभिमान वाटूं लागला होता; त्यांतच मोंगल साम्राज्याचें सामर्थ्य कमी होत आहे अशी कंपनीची समजूत होऊन कंपनीनें १६८५ मध्यें हिंदुस्थानांत जबरदस्तीनें आपले हातपाय पसरण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु त्यांत कंपनीच्या अंगलटीसच सर्व प्रकार आला. खास इंग्लंडहून मारे लढाऊ जहाजें इकडे लांबवर आलीं आणि कंपनीनें औरंगजेबाच्या राज्यावर पूर्वेस बंगालमध्यें आणि पश्चिमेस सुरत येथें असा दोहोंकडून हल्ला केला; परंतु मोंगल लोक अजून चांगले खंबीर असल्यामुळें त्यांनीं दोन्ही ठिकाणीं कंपनीचा चांगली आठवण राहीलसा पराभव केला. त्यापासून इंग्रज लोकांनीं धडा घेतला आणि यापुढें ते फार सावधपणानें वागत गेले. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर तर मोंगलांच्या साम्राज्याचे तुकडे तुकडे होत चालले होते हें कोणालाही दिसण्यासारखें होतें; तरीसुद्धां पुन्हां राज्य मिळविण्याच्या खटपटीला लागण्याचें धाडस त्यानंतर पुष्कळ वर्षेपर्यंत इंग्रजांच्या हातून झालें नाहीं. इ. स. १६९० मध्यें जॉब चारनाक नांवाच्या इंग्रज गृहस्थानेंच कलकत्ता शहराची प्रस्थापना केली. अशा रीतीनें मद्रास, मुंबई आणि कलकत्ता हीं तिन्ही शहरें इंग्लिश लोकांनीं वसविलेलीं असून ब्रिटिश लोकांच्या कर्तबगारीमुळें व पराक्रमामुळेंच प्रारंभींच्या काळांत त्यांना महत्त्व प्राप्त होऊन त्याची वाढ झाली.

आतां या सुमारास हिंदुस्थानमध्यें फ्रान्सचा प्रवेश होतो. एक फ्रेंच व्यापारी कंपनी स्थापन होऊन इ. स. १६६८ मध्यें ही कंपनी सुरतेस आणि इतरही कांहीं ठिकाणीं आपल्या वखारी उघडते. त्यानंतर कांहीं वर्षांनीं हे लोक पाँदिचेरी शहर विकत घेतात आणि हें शहर पूर्व किनाऱ्यावरील सर्वांत महत्त्वाचें व्यापारी बंदर होऊन जातें.

इ. स. १७०७ मध्यें औरंगजेब बादशहा वयाच्या जवळजवळ नव्वदाव्या वर्षीं मरण पावतो आणि मग त्यानें आपल्या मागें ठेवलेलें हें भलें मोठें मौल्यवान् घबाड—हिंदुस्थान देशाचें राज्य—कोणाच्या हातीं जावयाचें यासाठीं व्हावयाच्या झगड्याच्या रंगभूमीची सिद्धता होते. झगडणारांत प्रथम त्याचे स्वतःचे नादान वंशज आणि त्याचेच कांहीं प्रांताधिप हे तर होतेच; याखेरीज मराठे आणि शीख हेही होते; त्याच-

प्रमाणें सरहद्दीपलीकडूनही लोभानें कांहीं लोकांची नजर इकडे वळलेलीच होती. याशिवाय सातां समुद्रापलीकडील हे दोन परकी देशांचे लोक, इंग्रज आणि फ्रेंच, हेही येथें दंड थोपटून हें घबाड गिळंकृत करायला टपलेलेच होते. या सर्व कचाट्यांत गरीब बिचाऱ्या हिंदी जनतेची व्यवस्था काय!

## ९१

## शीख आणि मराठे

१२ सप्टेंबर, १९३२

औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच्या शंभर वर्षांमधील हिंदुस्थान देश म्हणजे नाना तऱ्हेच्या तुकड्यातुकड्यांची एक प्रकारची वाकळच होती म्हणेनास. नाहीं तर एकसारख्या बदलत राहणाऱ्या चित्रांची रांगच जणुं म्हण; परंतु कांहींही म्हटलें तरी दिसायला मात्र बेंगरूळच. असा हा काळ उलाढाल्या, साहसी आणि पराक्रमी लोकांना आणि न्याय-अन्यायाचा विचार न करतां, मार्ग चांगला कीं वाईट याची पण फिकीर न करतां, मिळेल ती संधि स्वीकारून आपला फायदा करून घ्यावयाचा असला बेडर घट्टपणा ज्यांच्या अंगीं आहे अशा लोकांना फार सोयिस्कर. त्यामुळें या काळांत असे पुष्कळ धामधूम उडविणारे साहसी किंवा पराक्रमी लोक निघाले; कांहीं खुद्द या देशांतले, कांहीं वायव्य सरहद्दीपलीकडून आले, तर इंग्रज व फ्रेंच यांच्यासारखे कांहीं साता समुद्रांपलीकडून आले. प्रत्येक व्यक्तीची अथवा गटाची धडपड चालेल तितका आपला हात चालवावयाचा आणि बाकीच्या सगळ्यांना खड्ड्यांत लोटून द्यावयाचें अशा प्रकारची चाललेली होती. कधीं कधीं दोन अथवा अधिक गट एकत्र होऊन तिसऱ्याला किंवा उरलेल्याला चुरडून टाकण्यासाठीं खटपट करीत; आणि पुढें स्वतःच आपसांमध्यें झगडा करूं लागत. लहानमोठीं राज्यें संपादण्यासाठीं, झटपट श्रीमंत होण्यासाठीं आणि लुटालूट करण्यासाठीं अनेकांची मोठी जिवापाड धडपड या काळांत चालू होती. कांहींनीं हें काम कसलाही आडपडदा न ठेवतां आणि कुणाची लाजलज्जा न बाळगतां चालविलेलें होतें; तर कांहीं लोकांनीं तेंच काम पण व्यापार वाढविण्याच्या झिरझिरीत बुरख्याआडून चालविलेलें होतें. या सगळ्या धामधुमीच्या दडपणाखालीं बिचारें मोंगल साम्राज्य मात्र हळूहळू नाहींसें होत गेलें. तुझ्या गोष्टींतल्या त्या चेशायर मांजराप्रमाणें; अखेरीस त्या मांजराचें निदान हास्य तरी मागें राहिलें होतें, तसें सुद्धां त्या साम्राज्याचें कांहीं राहिलें नाहीं आणि नांवाला बादशहा म्हणून जो कोणी असे, तो बिचारा कोणाचा तरी दुर्दैवी कैदी तरी असे अथवा कुणाकडून तरी तनखा खात दिवस कंठीत असे.

पण वरती ही सगळी धांदल आणि धुमाकूळ, एकमेकांनीं एकमेकांवर उलटणें किंवा एकमेकांचे पाय ओढणें हे जे सगळे प्रकार चालले होते, ते सर्व म्हणजे पृष्ठभागाच्या खालीं आंतल्या आंगाला जी एक क्रांति चालू होती तिचें बाह्य लक्षण होतें. त्याचा अर्थ जुनी आर्थिक रचना आतां मोडून पडत होती; सरंजामदारशाहीची सद्दी संपली असून तिला शेवटची घरघर लागलेली होती. देशांतील बदलत्या परिस्थितीशीं या सरंजामदारशाहीचा जमाव जमत नव्हता. यूरप खंडांतही आपण हा प्रकार घडून आलेला पाहिला आहे. तेथें नवीनच व्यापाऱ्यांचा वर्ग उत्पन्न होऊन त्यांच्या डोक्यावर फक्त अनियंत्रित अशा राजसत्तेचें बंधन तेवढें शिल्लक राहिलें होतें. इंग्लंड देशांत आणि कांहीं अंशीं हॉलंड देशांत मात्र राजांना पायबंद घालण्यांत आला होता. औरंगजेब जेव्हां गादीवर आला, तेव्हा इंग्लंडमध्यें पहिल्या चार्ल्स राजाचा वध केल्यानंतर स्थापन झालेलें तें अल्पजीवी प्रजासत्ताक राज्य चालू होतें. पुढें औरंगजेबाची कारकीर्द चालू असतांनाच दुसरा जेम्स् राजा पळून गेला व अशा रीतीनें ब्रिटिशांच्या पार्लमेंटचा इ. स. १६८८ मध्यें जय होऊन तेथील राज्यक्रांति पूर्ण झाली. इंग्लंडमध्यें पार्लमेंटसारखें एक प्रकारचें अर्धवट लोकप्रतिनिधींचें सल्लागारमंडळ राजदरबारीं अस्तित्वात होतें या गोष्टीचा राज्यक्रांतीच्या झगड्यांत फार उपयोग झाला. प्रथम सरंजामदार-सरदारांच्या विरुद्ध आणि नंतर राजांच्याही विरुद्ध लोकांतर्फे सत्तेचें कांहीं-तरी एक ठिकाण त्यामुळें उभें करतां आलें.

यूरप खंडांत बाकीच्या सर्व देशांमध्यें परिस्थिति अगदीं वेगळ्या प्रकारची होती. फ्रान्समध्यें अद्याप महान् बादशहा राजसूर्य चौदावा लुई याचीच सत्ता चालू होती; त्याची कारकीर्द औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या थेट अखेरपर्यंत आणि त्यानंतरही आठ वर्षें चालू होती. फ्रान्समध्यें अनियंत्रित राजसत्ता जवळजवळ अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत चालू राहिली; शेवटीं मग तेथें तो फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रचंड धूमधडाका उडाला. जर्मनींत तर आपण पाहिलेंच, कीं सतराव्या शतकाचा काळ म्हणजे फारच भयंकर काळ गेला. याच शतकांत त्या देशांत तें तीस वर्षांचें युद्ध झालें आणि त्यामुळें त्या देशाचे तुकडे होऊन त्याचा नाश झाला.

हिंदुस्थानची अठराव्या शतकामधील अवस्था कांहींशी जर्मनीमधील या तीस वर्षांच्या काळांतील परिस्थितीसारखी होती. पण ही तुलना किंवा सारखेपणा उगीच फार लांबवूं मात्र नको. दोन्ही देशांत प्रचलित आर्थिक व्यवस्था कोलमडून पडलेली होती आणि जुना सरंजामदारांचा वर्ग निरुपयोगी होऊन गेलेला होता. हिंदुस्थानांत या सरंजामशाहीला जरी शेवटची घरघर लागलीच होती; तरी पण पुढें पुष्कळ काळ-पर्यंत ती नाहींशी झाली नाहीं. आणि शेवटीं जरी बहुतेक तिचा नाश झाला, तरी तिची बाह्य चौकट मात्र चालूच राहिली. फार कशाला, आजच्या घटकेलासुद्धां हिंदुस्थानांत आणि यूरपच्या कांहीं भागांत या सरंजामदारशाहीचे पुष्कळसे अवशेष पाहायला सांपडतात.

अशा रीतीनें आर्थिक व्यवहारांत जे फेरफार घडून येत होते, त्यामुळें मोंगलांचें साम्राज्य मोडून पडलें; परंतु त्याच्या मोडकळीच्या व फाटाफुटीचा फायदा घेऊन सत्ता आपल्या हातीं काबीज करायला तेथें भांडवलदार-कारखानदारांचा धनिक मध्यमवर्ग तयार नव्हता. या धनिकवर्गाचें प्रातिनिधिभूत असें एखादें राजाचें सल्लागार-मंडळ किंवा दुसरी एखादी संघटित संस्था, इंग्लंडांत होती त्याप्रमाणें या देशांत नव्हती आणि अगदीं अमर्याद अशा एकतंत्री कारभाराखालीं फार काळ दडपून राहिल्यामुळें लोक सामान्यतः गुलामी मनोवृत्तीचे झाले होते, आणि त्यांच्या समाजांमधील प्राचीन काळच्या ज्या कांहीं स्वातंत्र्याच्या कल्पना होत्या, त्या ते पार विसरून गेले होते. असें असूनही या पत्रांतच पुढें आपल्याला दिसून येईल, कीं सत्ता काबीज करण्याचे प्रयत्न कधीं सरंजामदारांच्या वतीनें, कधीं धनिक वर्गाच्या बाजूनें, तर कधीं शेतकऱ्याच्या मधून, असे येथेंही झालेच; आणि त्यांपैकीं कांहींना तर यश मिळणार इतकी अवस्था आली होती. परंतु एक गोष्ट लक्षांत घ्यायची ती ही, कीं या देशांत ज्या वेळीं सरंजामदारशाहीचा पाडाव झाला, त्याच क्षणीं सत्ता काबीज करण्याला पुरेसा समर्थ असा धनिक मध्यमवर्ग या ठिकाणीं उदयास येऊन उभा नव्हता; या दोन्ही गोष्टी एकाच समयाला घडून आल्या नाहींत; त्यांच्यामध्यें थोडा मोकळा काळ गेला. असा मोकळा काळ असला, कीं जर्मनींत घडून आलें त्याप्रमाणें दंगल आणि धामधूम माजावयाची हें ठरलेलें आहे. हिंदुस्थानांतही तेंच घडलें. या देशामध्येंही छोटेछोटे राजे आणि सरदार देशावर प्रभुत्व मिळविण्यासाठीं आपसांमध्यें लढत होते. परंतु मरूं घातलेल्या आर्थिक समाजरचनेचे हे प्रतिनिधी होते. लौकरच त्यांना नवीनच प्रकारच्या मनुष्यवर्गाशीं, आपल्या स्वतःच्या देशांत पूर्ण विजयी झालेल्या ब्रिटिश धनिकवर्गाच्या प्रतिनिधींशीं, सामना द्यावा लागला. सरंजामदारशाहीपेक्षां या ब्रिटिश मध्यमवर्गाची समाजपद्धति अधिक उच्च प्रतीची होती; जगांत प्रचलित होऊं लागलेल्या परिस्थितीशीं ती अधिक जुळती होती; त्यांची समाजव्यवस्था जास्त सुसंघटित आणि जास्त कर्तबगार होती; त्यांच्याजवळ हत्यारेंपात्यारें आणि शस्त्रें चांगल्या प्रकारचीं होतीं; त्यामुळें त्यांना लढाई जास्त परिणामकारकपणें देतां येत होती आणि शिवाय समुद्रावर या लोकांचें वर्चस्व होतें. हिंदुस्थानांतल्या सरंजामदार-राजेरजवाड्यांना या नवीन सत्तेशीं स्पर्धा करणें सर्वतोपरि अशक्य होतें. त्यामुळें ते एकामागोमाग एक पराभव पावून नष्ट झाले.

या पत्राची ही प्रस्तावना फारच लाबली. म्हणून आता थोडेंसें आपल्याला मागच्या काळांत परत गेलें पाहिजे. माझ्या मागच्या पत्रांत औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या शेवटच्या भागांत सामान्य जनतेचीं जीं बंडें झालीं आणि हिंदूंच्यामध्यें एक प्रकारचा धार्मिक राष्ट्रवाद उत्पन्न होऊन त्यायोगें त्यांच्यामध्यें जो नवीन जोम निर्माण झाला, त्या गोष्टीचा नुसता उल्लेख केला आहे. आतां त्याबद्दल आपण थोडें अधिक विस्तारानें बोललें पाहिजे. मोंगल साम्राज्याच्या पुष्कळच भागांमध्यें कितीतरी अर्धवट धार्मिक

अशा प्रकारच्या सामान्य जनतेच्या चळवळी उत्पन्न झालेल्या आपल्याला आढळून येतात. देशांतील प्राकृत अथवा लोकभाषांमध्यें, हिंदी, मराठी, पंजाबी इत्यादि भाषांमध्यें पदें आणि धार्मिक भजनें लिहिण्यांत येऊन तीं फार लोकप्रिय होऊं लागलीं. त्या पदांनीं आणि भजनांनीं लोकांच्या ठिकाणीं स्वसामर्थ्याबद्दल जागृति झाली. लोकप्रिय अशा धर्मोपदेशकांचे निरनिराळे धर्मपंथ स्थापन झाले. बदलत्या आर्थिक परिस्थितीच्या दडपणामुळें या धर्मपंथांचें लक्ष हळूहळू राजकीय प्रश्नांकडे वळूं लागलें; त्यामुळें राजसत्तेशीं–मोंगल साम्राज्याशीं–त्यांची घासाघीस होण्याचे प्रसंग येऊं लागले आणि अशा धर्मपंथांवर राजसत्तेकडून दडपशाही होऊं लागली. या दडपशाहीमुळें मुळांत शांत आणि धर्मनिष्ठ असा जो धर्मपंथ असावयाचा तो स्वाभाविक मग लष्करी बाण्याचा संघ व्हावयाचा असें घडूं लागलें. शीख आणि इतर धर्मपंथ यांची वाढ ही अशा प्रकारें झाली. मराठ्यांचा इतिहास इतका साधा नाहीं; त्यांत दुसरीही पुष्कळ गुंतागुंत आहे; परंतु त्याच्यामध्येंही धर्म आणि मोंगलांच्या विरुद्ध हत्यार उपसून लढ्यास तयार झालेला राष्ट्रवाद यांचें मिश्रण होतेंच. मोंगल साम्राज्याचा पाडाव हा कांहीं खरोखर ब्रिटिश लोकांनीं मुळींच केलेला नाहीं. त्याचा पाडाव या धर्मनिष्ठ राष्ट्रवादी चळवळी करणारांनीं आणि त्याहूनही विशेष म्हणजे मराठ्यांनीं केलेला आहे. औरंगजेबाच्या धार्मिक कडवेपणाच्या धोरणामुळें तर या चळवळींना साहजिक अधिक जोर चढला. त्याचप्रमाणें आपल्या राज्याच्या विरुद्ध ही जी धर्मभावना, धर्मजागृति वाढत चाललेली होती तिच्यामुळें औरंगजेब अधिकाधिक चिडला असला पाहिजे व अधिकाधिक कडवा होत गेला असला पाहिजे, हीही गोष्ट संभवनीय आहे.

उत्तर हिंदुस्थानांत इ. स. १६६९ मध्येंच मथुरा येथें जाट शेतकऱ्यांनीं औरंगजेबाविरुद्ध बंड केलें होतें. औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत त्यांचा पुनःपुनः पराभव केला जाई तरी पुनःपुनः ते बंड करून उठतच; असा तीस वर्षें सारखा क्रम चालला होता. मथुरा हें गांव आग्र्यापासून जवळच आहे हें यामध्यें विशेष लक्षांत घे. याचा अर्थ प्रत्यक्ष राजधानीच्या आसपासच हीं बंडें चालू झालेलीं होतीं. दुसरें बंड सतनामी नांवाच्या हिंदुधर्मामधील पंथाचें झालें. हा पंथ मुख्यतः खालच्या वर्गांच्या लोकांचा होता. अशा रीतीनें हेंही बंड सामान्य जनतेचेंच होतें. राजेरजवाडे, नबाब या किंवा अशा लोकांनीं केलेल्या उठावाहून हें बंड अगदीं निराळें होतें. त्या काळच्या एका मोंगल उमरावानें तर अगदीं तिरस्कारानें त्याचें वर्णन "सोनार, सुतार, भंगी, ढोर या आणि इतर क्षुद्र लोकांमधील पाजी आणि हलकट बंडखोरांची टोळी" अशा रीतीनें केलेलें आहे. त्याच्या मतानें पाहतां अशा "क्षुद्र प्राण्यांनीं" आपल्या वरिष्ठांविरुद्ध अशा रीतीनें बंड करून उठणें, हा केवढा भयंकर अमानुष अपराध होता!

त्यानंतर आपण शिखांच्या काळाशीं येऊन पोंचतों. शिखांचा इतिहास आपल्याला याही पूर्वीच्या काळापासून तपासला पाहिजे. गुरु नानकाबद्दल मी एकदां

थोडेंसें बोललों आहें तें तुझ्या ध्यानांत असेल. बाबर हिंदुस्थानांत आल्यानंतर थोडक्याच काळांत गुरु नानक मरण पावला. हिंदुधर्म आणि इस्लामधर्म यांच्यामध्यें एक समान भूमिका निर्माण करावी अशासाठीं धडपड करणारांपैकीं नानक हा एक होता. त्याच्यानंतर त्याच्या पंथाचे जे तीन गुरू झाले, ते त्याच्याचप्रमाणें सर्वस्वीं शांततापिय असून त्यांचें सर्व लक्ष धार्मिक गोष्टींकडेच लागलेलें असे. शिखांच्या चवथ्या गुरूला अमृतसर येथील सुवर्णमंदिरासाठीं व तलावासाठीं अकबरानें जागा दिली, तेव्हांपासून अमृतसर हें शिखांच्या पंथांच्या आदिपीठाचें स्थान झालेलें आहे.

त्यानंतर पांचवा गुरु अर्जुनसिंग या नांवाचा झाला. त्यानें शिखांचा **ग्रंथसाहेब** नांवाचा धर्मग्रंथ संपादित केला. या शिखांच्या पवित्र ग्रंथामध्यें निरनिराळ्या वचनांचा, म्हणींचा आणि अभंगांचा संग्रह आहे. कांहीं राजकीय अपराधावरून जहांगिरानें अर्जुनसिंगाला हालहाल करून ठार मारविलें. शिखांच्या इतिहासाला येथपासून अगदीं निराळें वळण लागलें. या आपल्या गुरूचा असा अन्याय्य आणि क्रूरपणानें छळ झालेला पाहून त्यांच्या ठिकाणीं असंतोष भडकला आणि त्यांचें लक्ष सशस्त्र होऊन लढण्याकडे वळलें. त्यांचा सहावा गुरु हरगोविंदसिंग याच्या नेतृत्वाखालीं शिखांची एक प्रकारें बंधुभावनेनें भारलेली अशी लष्करी एकजूट झाली आणि तेव्हांपासून पुढें त्यांचे राजसत्तेशीं वारंवार झगडे होऊं लागले. गुरु हरगोविंदसिंगाला तर जहांगीर बादशहानें दहा वर्षेपर्यंत कैदेंत ठेवलें होतें. शिखांचा नववा गुरु तेजबहादूर हा औरंगजेबाच्या काळांत होऊन गेला. औरंगजेबानें त्याला इस्लामधर्म स्वीकारण्याचा हुकूम केला आणि तो त्यानें न मानल्यामुळें त्याचा वध करण्यांत आला. शिखांचा दहावा आणि शेवटचा गुरु गोविंदसिंग हा होय. मुख्यतः दिल्लीच्या बादशहाशीं टक्कर देण्यासाठीं म्हणून गुरु गोविंदसिंगानें सबंध शीख जमातीला लष्करी बाण्याची बनवून ती बलिष्ठ केली. औरंगजेबानंतर एक वर्षानें तो मरण पावला. तेव्हांपासून पुढें शिखांचा कोणी गुरु झाला नाहीं. गुरूचा अधिकार आतां सर्व शीखसमाजाच्या ठिकाणीं सामावलेला आहे असें मानलें जातें. शीखसमाजाला खालसा म्हणजे "मान्य झालेले" (परमेश्वरमान्य) असें नांव आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर लगेच शीख लोकांनीं बंड केलें; तें जरी मोडून टाकण्यांत आलें तरीही शिखांची शक्ति वाढतच गेली आणि पंजाबमध्यें त्यांचें खूड जड होऊन तेथें त्यांचा चांगलाच जम बसला. पुढें पंजाबमध्यें रणजितसिंगाच्या नेतृत्वाखालीं शिखांचें एक स्वतंत्र राज्य स्थापन व्हावयाचें होतें; पण तें अठराव्या शतकाच्या अखेरीला.

हीं सगळीं बंडें जरी कांहीं खरोखर कमी त्रासदायक नव्हतीं तरी मोंगल साम्राज्यावर खरें संकट आलें, तें हिंदुस्थानच्या आग्नेय कोपऱ्यामध्यें उदयास येणाऱ्या मराठ्यांच्या सत्तेकडून आलें. प्रत्यक्ष शहाजहानच्या कारकीर्दीत एक मराठा सरदार शहाजी

राजा यानें पुष्कळच त्रास मोंगल साम्राज्याला दिला होता. हा प्रथम अहमदनगरच्या राज्यांतील एक अम्मलदार होता व नंतर विजापूरच्या राज्यामधील; परंतु इ. स. १६२७ मध्यें जन्माला आलेला शहाजीचा मुलगा शिवाजी हा खरा मराठ्यांचें वैभव वाढाविणारा आणि मोंगल साम्राज्याचा कर्दनकाळ होऊन गेला. एकोणीस वर्षांचा असतांनाच त्यानें आपल्या मुलूखगिरीच्या कार्यक्रमाला सुरुवात केली आणि पुण्याजवळ प्रथम एक किल्ला जिंकून घेतला. तो मोठा शूर सेनानायक होता; गनिमी काव्याच्या लढाईचा नमुनेदार पुढारी होता आणि चांगला साहसी व पराक्रमी पुरुष होता. त्यानें आपल्याभोंवतीं शूर आणि काटक अशा डोंगरी लोकांचा अत्यंत एकनिष्ठ असा जमाव जमा केला होता. त्याच्या साहाय्यानें त्यानें पुष्कळसे किल्ले काबीज केले आणि औरंगजेबाच्या सेनापतींना सळो कीं पळो करून सोडलें. इ. स. १६६५ मध्यें एकाएकीं तो सुरतेवर चालून गेला व तें शहर त्यानें लुटलें. याच ठिकाणीं इंग्रजांनीं आपली वखार घातलेली होती. पुढें औरंगजेबानें त्याचें मन वळवून त्याला आपल्या दरबारात आग्रा येथें आणाविलें होतें; परंतु तेथें त्याला औरंगजेबानें एक स्वतंत्र राजा या नात्यानें वागविलें नाहीं, म्हणून आपला अपमान झाला व अनादर झाला असें शिवाजीला वाटलें. पुढें त्याला तेथें कैद करून ठेवण्यांत आलें; पण कैदेंतून तो निसटला. त्यानंतरसुद्धां पुढें त्याला राजा ही पदवी देऊन गौरवून आपल्याकडे वळवून घेण्याचा औरंगजेबानें पुष्कळ प्रयत्न केला.

परंतु लौकरच शिवाजीनें लढाईचा मार्ग सुरू केला आणि मोंगलांचे दाक्षिणेंतील अम्मलदार त्याच्यापुढें इतके भयभीत झाले, कीं त्यांनीं शिवाजीनें आपलें कांहीं वांकडें करूं नये म्हणून त्याला नजराणे देण्यास सुरुवात केली. या नजराण्यांसाठींच मराठे जेथें जात तेथें त्यांची ती सुप्रसिद्ध चौथाई किंवा सरकार-देण्याचा चौथा भाग वसूल करीत असत. इ. स. १६७४ मध्यें शिवाजीनें रायगड येथें मोठ्या समारंभानें स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. पुढें तो इ. स. १६८० मध्यें मरण पावला. तोंपर्यंत त्याचा सतत विजयच होत राहिला.

अलीकडे तूं तर कित्येक दिवस मराठ्यांच्या देशाच्या अगदीं ऐन अंतरंगांत, पुणें शहरांत, राहते आहेस. त्यामुळें शिवाजीविषयीं त्याच्या देशाच्या लोकांत केवढा आदर, केवढी भक्ति आहे हें तुला समजून चुकलें असलेंच पाहिजे. वर मीं तुला धर्मनिष्ठ राष्ट्रवादाच्या प्रवृत्तीबद्दल सांगितलें ना, तशा प्रवृत्तीचा शिवाजी हा होता. आर्थिक घडीची विस्काळितता आणि सामान्य लोकांच्या हालअपेष्टा यांच्यामुळें मूळ भूमि तयार झालेली होतीच; रामदास व तुकाराम या दोन श्रेष्ठ मराठी कवींनीं आपल्या काव्यांनीं आणि अभंगांनीं या भूमीची चांगलीच मशागत केली; त्यामुळें मराठे लोकांत स्वसामर्थ्याबद्दल जागृति उत्पन्न झाली, ऐक्यभावना निर्माण झाली आणि अगदीं अशा ऐन मोक्याला त्यांना विजयमार्गावर नेणारा हा तेजस्वी नायक मिळाला.

शिवाजीचा मुलगा संभाजी याला मोंगलानीं हालहाल करून ठार मारलें; तरीपण आणि मध्यंतरीं तात्पुरती माघार घ्यावी लागली तरीही हिंमत खचूं न देतां मराठे लोकांनीं आपली सत्ता वाढविलीच. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर तर त्यांचें सगळें साम्राज्य वाऱ्याबरोबर उडून गेल्यासारखें नाहींसें होऊं लागलें. त्याच्या पुष्कळशा प्रांताधिपांनीं मध्यवर्ती सत्तेशीं काडीमोड केली. बंगाल प्रांत साम्राज्यांतून फुटून बाहेर पडला. त्याचप्रमाणें अयोध्या आणि रोहिलखंड हे प्रांतही. दक्षिणेंत वजीर असफजहा यानें स्वतंत्र राज्य स्थापलें. हेंच आजकालचें हैद्राबाद संस्थान. हल्लींचा निजाम हा या असफजहाचाच वंशज होय. औरंगजेब मेल्यापासून सतरा वर्षांच्या आंत मोंगलांचें साम्राज्य होतें का नव्हतें असें होऊन गेलें. परंतु दिल्ली येथें किंवा आग्रा येथें साम्राज्य नव्हतें, तरी साम्राज्याचा अधिपति म्हणून कोणी तरी मोंगल बादशहाचा वंशज मात्र बादशहा म्हणून तेथें नांदत होता.

जसजसें मोंगलांच्या साम्राज्याचें सामर्थ्य कमी झालें, तसतशी मराठ्यांची सत्ता वाढली. पुढें त्यांचे मुख्य प्रधान पेशवे यांच्या हातीं सगळी खरी सत्ता आली; मराठ्यांचा राजा खुद्द त्यांच्यापुढें फिका पडला. पेशव्यांचें पद पुढें वंशपरंपरेनें एकाच घराण्याकडे राहत गेलें; जपानमध्यें शोगुनशाही झाली ना त्याप्रमाणें आणि राजा बिचारा कोठें कोपऱ्यामध्यें पडून गेला. दिल्लीचा बादशहा तर अगदींच दुर्बळ झालेला. त्यानें बिचाऱ्यानें मराठ्यांचा दक्षिणेंत सर्वत्र चौथाई वसूल करण्याचा हक्क मान्य केला. एवढ्यानें समाधान न होऊन पेशव्यांनीं हे प्रांत काबीज केले. इ. स. १७३७ मध्यें तर पेशव्यांचें सैन्य थेट दिल्लीच्या दरवाजाशीं येऊन ठेपलें होतें. हिंदुस्थानची सर्व राज्यसत्ता या मराठ्यांच्याच हातीं जाणार असा रंग वाटूं लागलेला होता. इतक्यात एकाएकीं इ. स. १७३९त वायव्य सरहद्दीकडून एक नवीनच ओघ आंत घुसला आणि त्यामुळें हिंदुस्थानांतील सत्तेचें पारडें फिरलें आणि उत्तर हिंदुस्थानचें सगळें स्वरूपच पालटून गेलें.

## ९२

# इंग्रजांची हिंदुस्थानांतील आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात

१३ सप्टेंबर, १९३२

दिल्लीच्या साम्राज्याची अवस्था कांहीं ठीक नव्हती; त्याला फार वाईट दिवस आलेले होते हें गेल्या पत्रांत आपण पाहिलें. खरें म्हणजे साम्राज्य या दृष्टीनें त्याला आतां तसें कांहीं अस्तित्वच राहिलें नव्हतें. तथापि दिल्ली आणि उत्तर हिंदुस्थान यांचें पारडें अजूनही पुष्कळ खालीं जावयाचें होतें; कारण या सुमारास साऱ्या जगांत मुलूख-

गिरीसाठीं साहसें करणाऱ्या लोकांचा जणुं मेरुमणि असा एक गृहस्थ हिंदुस्थानवर वायव्येकडून विजेसारखा चालून आला आणि पुष्कळ कत्तली आणि लुटी करून प्रचंड संपत्ति गोळा करून ती आपल्याबरोबर घेऊन गेला. हा गृहस्थ म्हणजे नादिरशहा. अलीकडे इराणची गादी त्यानें बळकावलेली होती. शहाजहाननें तयार करविलेलें मयूर-सिंहासनही नादिरशहानें आपल्याबरोबर नेलें. नादिरशहाचें हें भयंकर संकट इ. स. १७३९ मध्यें आलें आणि सारा उत्तर हिंदुस्थान त्या वेळीं जणुं धुळीस मिळाला. नादिरशहानें आपल्या राज्याची सरहद्द उत्तरेकडून सिंधु नदीच्या तीरापर्यंत आणून भिडविली. अशा रीतीनें अफगाणिस्तान देश हिंदुस्थानापासून तोडला गेला. हिंदुस्थानच्या इतिहासाच्या अगदीं पहिल्या काळापासून, महाभारताच्या आणि गांधार राज्याच्या वेळेपासून, अफगाणिस्तान देश हा हिंदुस्थानशीं अगदीं निकट जोडलेला असा होता. तो या वेळीं तुटून निराळा पडला.

यानंतर सतरा वर्षांतच दिल्लीवर आणखी एका लुटारू गृहस्थाची स्वारी झाली. नादिरशहाच्या पाठीमागून अफगाणिस्तानच्या गादीवर आलेला अहमदशहा दुराणी यानें ही स्वारी केली. अशा या स्वाऱ्या होत होत्या तरीही मराठ्यांची सत्ता वाढतच गेली आणि इ. स. १७५८ मध्यें पंजाब प्रांतावर मराठ्यांचें प्रभुत्व प्रस्थापित झालें. अर्थात् या सगळ्या प्रदेशावर आपलें पद्धतशीर राज्य स्थापण्याचा कांहीं त्यांनीं प्रयत्न केला नाहीं. आपल्या पूर्वापार पद्धतीला अनुसरून त्यांनीं आपली सुप्रसिद्ध चौथाई तेथें वसूल करून प्रांताचा कारभार तेथील स्थानिक लोकांच्याच हातीं राहूं दिला. अशा रीतीनें दिल्लीच्या साम्राज्याचा जवळजवळ सगळा अधिकार व वारसा मराठ्यांनीं हस्तगत केल्यासारखेंच झालें. इतक्यात त्यांना एक फार मोठा पायबंद बसला. अहमदशहा दुराणी वायव्येकडून पुन्हां इकडे चालून आला आणि तेथील कांहीं लोकांशीं संगनमत करून त्यांच्या साहाय्यानें त्यानें पानिपतच्या प्राचीन रणभूमीवर इ. स. १७६१ मध्यें मराठ्यांच्या प्रचंड सैन्याचा पूर्ण पराभव करून धुव्वा उडविला. दुराणी आता सगळ्या उत्तर हिंदुस्थानचा मालकच झाला; त्याला नाहीं म्हणण्याचें सामर्थ्य तेथें आतां कोणाच्याही अंगीं नव्हतें; परंतु विजयाच्या अगदीं ऐन क्षणाला त्याच्या स्वतःच्याच लोकांमधील बंडाळीला आणि मानगडीला तोंड देण्याचा प्रसंग त्याच्यावर येऊन तो आपल्या मायदेशाला परत गेला.

कांहीं काळपर्यंत मराठ्यांच्या सद्दीचे दिवस संपले असें वाटूं लागलें; त्यांचा कोठेंच कांहीं फारसा प्रभाव शिल्लक राहिला नाहीं. हिंदुस्थानच्या साम्राज्याचें जें मोठें घबाड मिळविण्याच्या नादामध्यें ते होते, तें त्यांच्या हातून निसटलें होतें; परंतु अशाही अवस्थेंत हळूहळू त्यांनीं आपली स्थिति चांगलीच सांवरली आणि पुन्हां एकदां त्यांची सत्ता ही हिंदुस्थानांतील सर्वांत प्रचंड अशी सत्ता होऊन राहिली. दरम्यानच्या या काळांत दुसऱ्या आणखी अधिक खोल परिणाम करणाऱ्या, हिंदुस्थानच्या कांहीं पिढ्यांच्या भवितव्याला अगदीं निराळेंच वळण लावणाऱ्या कांहीं नवीन घटना व

शक्ती निर्माण झाल्या होत्या हें आतां लौकरच आपल्याला दिसून येईल. या नवीन शक्ती निर्माण होण्याच्या काळच्या सुमारासच मराठ्यांच्यामध्यें पुष्कळ सरदार अशा प्रकारचे निर्माण झाले, कीं ज्याना पेशव्यांची सत्ता नको होती आणि जे स्वतः स्वतंत्र राजे अशा थाटानें वागूं लागले होते. अशा सरदारांमध्यें सर्वांत प्रमुख म्हणजे ग्वाल्हेरचे शिंदे होत. बडोद्याचे गायकवाड आणि इंदूरचे होळकर हेही त्याच पंथाचे.

आतां वर ज्या नवीन घटना घडून येत होत्या म्हणून मीं म्हटलें त्यांचा थोडा विचार करूं या. दक्षिण हिंदुस्थानच्या इतिहासावर या काळच्या ज्या एका घटनेचा फारच प्रचंड परिणाम झाला व इतिहासाचा सारा ओघच बदलण्याला जी कारणीभूत झाली अशी गोष्ट म्हणजे या भागातील इंग्रज आणि फ्रेंच लोकांचें युद्ध ही होय. अठराव्या शतकांत तिकडे यूरपमध्यें इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यामध्यें वारंवार युद्धाचे प्रसंग उद्भवत होते. तिकडे या दोन देशांमध्यें युद्ध जुंपलें, कीं हिंदुस्थानातही त्यांच्या प्रतिनिधींमध्यें युद्ध सुरू होई; परंतु कित्येकदां तर तिकडे या दोन राष्ट्रांमध्यें अधिकृत रीतीनें शांततेचा तहनामा असूनसुद्धां हिंदुस्थानांत मात्र त्या दोघांचें युद्ध चालू राही. दोन्ही बाजूंकडे कांहीं कांहीं बेडर आणि न्यायान्यायाची फिकीर न बाळगणारे असे लुटारू प्रवृत्तीचे साहसी लोक होते; संपत्ति आणि सत्ता यांच्या अतिलोभानें ते भारून गेलेले होते; त्यामुळें स्वाभाविकच त्या दोन्ही बाजूंच्या लोकांमध्यें अत्यंत तीव्र स्पर्धा उत्पन्न झालेली होती. फ्रेंचांच्या बाजूचा या काळचा सर्वांत प्रमुख मनुष्य म्हणजे डुप्ले आणि इंग्रजांच्या बाजूचा क्लाइव्ह. डुप्लेनें या देशांत एक मोठा फायदेशीर खेळ खेळण्यास सुरुवात केली. येथें दोन राज्यांमध्यें स्थानिक कांहीं तंटा सुरू झाला म्हणजे त्यांपैकीं कोणत्या तरी एका पक्षाला आपण मिळावयाचें; आपलें सैन्य भाड्यानें त्या पक्षाच्या मदतीला द्यावयाचें आणि अखेरीस त्या दोघांच्या भांडणांत आपला खिसा चांगला गरम करून घ्यावयाचा. यामुळें फ्रेंचांचें वर्चस्व वाढत चाललें होतें; परंतु इंग्रजांनीं त्यांचा हा धडा लौकरच गिरविला; एवढेंच नव्हे, तर त्यांत त्यांनीं थोडीशी सुधारणा करून फ्रेंचांच्याही वर ताण केली. फ्रेंच आणि इंग्रज दोघेही कोठें कांहीं भानगड उत्पन्न होते का, याकडे गिधाडासारखे डोळे लावून बसलेले असत आणि या देशांत अशा भानगडींना कांहीं कमी नव्हतें. दक्षिण हिंदुस्थानमध्यें गादीच्या वारसाबद्दल तंटा उत्पन्न झाला रे झाला, कीं एका बाजूला इंग्रज आणि एका बाजूला फ्रेंच हे पाठीराखे म्हणून उभे राहिलेले आपल्याला आढळावयाचेच बहुधा. अशा रीतीनें झगडे चालतां चालतां इ. स. १७४६ ते १७६१ या पंधरा वर्षांच्या काळांत फ्रान्सचा पराभव होऊन इंग्रज लोक येथें यशस्वी झाले. हिंदुस्थानांतील या उचापती करणाऱ्या इंग्रज पुंडांना त्यांच्या मायदेशांतून भरपूर मदत मिळत होती. डुप्ले आणि त्याचे सहकारी यांना मात्र फ्रान्सकडून अशी मदत मिळाली नाहीं. यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं. हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या पाठीशीं ईस्ट इंडिया कंपनीचे भागीदार असलेले ब्रिटिश व्यापारी आणि इतर लोक उभे होते; या मंडळींचें पार्लमेंटवर आणि




म्हणून राज्यकारभारावर चांगलें वजन होतें. फ्रेंच लोकांच्या पाठीशीं कोण, तर लुई राजा. (हा महान् बादशहा चौदावा लुई याचा नातू असून त्याच्या मागून फ्रान्सच्या गादीवर आलेला होता.) तो स्वतःच ऐषआरामांत दंग होऊन अखेरच्या संकटाच्या खाईकडे धांव घेत होता. ब्रिटिशांचें समुद्रावर सर्वत्र वर्चस्व चालू झालेलें होतें या गोष्टीचाही ब्रिटिशांना फार मोठा उपयोग झाला. फ्रेंचांनीं आणि ब्रिटिशांनीं, दोघांनींही हिंदी सैनिक शिकवून तयार केले–त्यांना ते शिपाई (मूळ शब्द सिपाही) म्हणत. या सैन्याजवळ स्थानिक राज्याच्या सैनिकांपेक्षां हत्यारें जास्त चांगल्या प्रकारचीं असत आणि त्यांना कवाईत चांगली शिकविलेली असे. त्यामुळें ज्याला-त्याला या सैन्याची मदत हवीशी वाटे.

तात्पर्य, मुद्द्याची गोष्ट काय, तर हिंदुस्थानांत ब्रिटिशांनीं फ्रेंचांचा पराभव केला आणि फ्रेंचांचीं चंद्रनगर आणि पॉंडिचेरी हीं शहरें पार उध्वस्त करून टाकलीं. या शहरांचा त्यांनीं इतका नाश केला म्हणतात, कीं दोन्ही शहरांत एकही छप्पर जाग्यावर शिल्लक राहिलें नाहीं. या वेळेपासून हिंदी रंगभूमीवरून फ्रेंच लोक मागें पडत गेले आणि पुढें जरी त्यांना चंद्रनगर आणि पॉंडिचेरी हीं शहरें परत मिळालीं आणि आजपर्यंत हीं

शहरें त्यांच्याच ताब्यांत असलीं, तरी या देशांत त्यांना यापुढें कांहीं महत्त्वाचें स्थान राहिलें नाहीं.

इंग्रज आणि फ्रेंच लोकांत या काळीं इकडे फक्त हिंदुस्थानांतच युद्ध चालू होतें असें नव्हे; यूरपखेरीज कॅनडामध्यें आणि इतरही ठिकाणीं त्यांचें युद्ध चालू होतें. कॅनडामध्येंही इंग्रजांचाच जय झाला; परंतु त्यानंतर लौकरच अमेरिकेंतील इंग्रजांच्या वसाहती मात्र त्यांच्या हातांतून गेल्या. या प्रसंगीं फ्रेंचांनीं या वसाहतींना मदत करून इंग्रजांवर सूड उगविला.

अशा रीतीनें फ्रेंचांचा कांटा आपल्या मार्गांतून काढून टाकल्यानंतर हिंदुस्थानांत इंग्रजांच्या मार्गांत आतां आणखी कोणाकोणाची अडचण उभी होती? अर्थातच मराठ्यांची अडचण ही पहिली आणि मोठी; त्यांची सत्ता पश्चिम हिंदुस्थान आणि मध्य हिंदुस्थान यांमध्यें व कांहीं अंशीं उत्तर हिंदुस्थानमध्येंसुद्धां होती. त्यानंतर हैद्राबादचा निजाम हा एक होता; पण त्याचें कांहीं एवढें मोठेंसें महत्त्व नव्हतें. आणि त्याशिवाय दक्षिण हिंदुस्थानांत नवीनच निर्माण झालेला एक फार बलिष्ठ शत्रु त्यांना होता, तो म्हणजे हैदरअल्ली. जुन्या विजयनरच्या राहिल्यासाहिल्या भागाचा कबजा घेऊन हैदरअल्लीनें आपलें राज्यासन मांडलें होतें. आजच्या म्हैसूर संस्थानचा प्रांत म्हणजे सामान्यतः या हैदरअल्लीच्या राज्याचा प्रदेश होता. उत्तरेकडे बंगाल प्रांतांत सिराजउद्दौला याचा अम्मल चालू होता; पण हा अगदींच नालायक गृहस्थ होता. दिल्लीचें साम्राज्य असें प्रत्यक्षांत मुळींच अस्तित्वांत नव्हतें; त्यांचें अस्तित्व आतां नुसतें कल्पनेंतच राहिलें होतें हें आपण पाहिलेंच आहे. तरी पण चमत्कार असा, कीं इंग्रज लोक हे इ. स. १७५६ पर्यंत, म्हणजे नादिरशहाची स्वारी होऊन जाऊन मध्यवर्ती सत्तेची राहिलीसाहिली सावलीसुद्धां गाडली गेल्यानंतर कितीएक वर्षेपर्यंत, आपण दिल्लीच्या साम्राज्याचा अधिकार मानतों हें दाखविण्यासाठीं म्हणून मोठ्या नम्रपणानें दिल्लीपतीकडे नजराणे पाठवीत असतच. आठवत असेल तुला, कीं औरंगजेबाच्या काळांत इंग्रजांनीं एकदां बंगालवर चढाई करण्याचें धाडस केलें होतें. त्या वेळीं त्यांचा चांगलाच पराभव झाल्यामुळें त्यांनीं इतकी हाय खाल्ली होती, कीं पुढें परिस्थिति बदलून उत्तर हिंदुस्थानांत हिंमतवान् अशा कोणा माणसाला कोठेंही हात शिरकविण्याला सगळें मोकळें रान अशी अवस्था निर्माण झाली, तरीसुद्धां पुष्कळ काळपर्यंत पुन्हां हल्ला करण्याचें धाडस करण्याची छाती इंग्रजांना झाली नाहीं.

क्लाइव्ह हा मग अशा प्रकारचा हिंमतवान् इंग्रज गृहस्थ निघाला. स्वाभाविकच साम्राज्य संपादन करणारा म्हणून इंग्रज लोक या क्लाइव्हबद्दल फार मोठा पूज्यभाव बाळगतात. त्यानें आपल्या वैयक्तिक गुणावगुणांनीं आणि आपल्या कामगिरीनें साम्राज्यें कशीं उभारलीं जातात याचें एक प्रत्यक्ष उदाहरणच जगापुढें ठेवलेलें आहे. क्लाइव्ह हा बेडर साहसी गृहस्थ होता, असामान्य लोभी होता आणि एकदां एखादी गोष्ट करावयाची म्हणून ठरलें, कीं तीसाठीं मग खोटे कागद तयार करणें, खोटीं वचनें

देणें या गोष्टींना तो डरणारा नव्हता. इंग्रज लोकांनीं त्याच्या राज्यांत ज्या पुष्कळ मानगडी चालविल्या होत्या त्यांमुळें बंगालचा नबाब सिराजउद्दौला हा चिडून जाऊन मुर्शिदाबादेहून कलकत्त्यावर चालून गेला आणि तें शहर त्यानें कबजांत घेतलें. याच हल्ल्याच्या वेळीं "ब्लॅकहोल" या नांवानें ओळखला जाणारा तो शोकजनक प्रसंग घडला असें म्हणतात. गोष्ट अशी सांगितली जाते, कीं नबाबाच्या अधिकाऱ्यांनीं पुष्कळसे इंग्रज लोक एका अगदीं लहानशा आणि कोंदट खोलीमध्यें रात्रभर कोंडून ठेविले आणि त्यांपैकीं बहुतेक सर्वजण गुदमरून तेथें मरण पावले. ही गोष्ट घडली असली, तर ती खरोखरच अत्यंत रानटी आणि आंगावर शहारे आणण्यासारखी किळसवाणी आहे यांत कांहींच शंका नाहीं; परंतु ही सगळी गोष्ट ज्या एका गृहस्थानें लिहून ठेवलेल्या हकिकतींवर आधारलेली आहे, तो मनुष्यच तसा फारसा विश्वासार्ह म्हणून समजला जात नाहीं. त्यामुळें पुष्कळशा लोकांचा समज असा आहे, कीं ही गोष्ट पुष्कळ अंशीं खोटीच आहे आणि जरी कदाचित् तिच्यांत सत्याचा अंश असावा असें मानलें, तरी तिच्यामध्यें अतिशयोक्तीचें प्रमाण फारच मोठें आहे.

नबाबाला कलकत्ता घेण्यांत जें यश आलें, त्याचा क्लाइव्हनें चांगलाच सूड घेतला; पण या बाबतींत या साम्राज्यसंस्थापकानें स्वीकारलेला मार्ग हा खास त्याच्या डोक्यांतून निघालेला असा होता. त्यासाठीं एक खोटा कागद तयार करून नबाबाचा प्रधान मीरजाफर याला त्यानें आंतून विश्वासघात करायला प्रवृत्त कसें केलें, याबद्दलची सगळी हकिगत फार मोठी आहे. मुद्दा असा, कीं अशा रीतीनें खोटा कागद व स्वजन-द्रोह यांच्या साहाय्यानें भूमिका तयार करून क्लाइव्हनें प्लासी येथें इ. स. १७५७ मध्यें नबाबाचा पराभव केला. लढाई म्हणून पाहिली तर ही फारच लहान स्वरूपाची लढाई होती आणि खरें म्हणजे ती लढाई सुरू होण्यापूर्वीच क्लाइव्हनें आपल्या कारस्थानांच्या बळावर जिंकलेली होती. पण या प्लासीच्या छोट्या लढाईचे परिणाम फार मोठे झाले. त्या लढाईंत बंगालचें भवितव्य ठरून गेलें; एवढेंच नव्हे, तर इंग्रजांच्या सर्व हिंदुस्थानावरील प्रभुत्वाचींच सुरुवात प्लासीच्या लढाईनें झाली असेंही म्हणण्यांत येतें. अशा तऱ्हेनें खोटे दस्तऐवज व विश्वासघात यांच्या या किळसवाण्या पायावर ब्रिटिशांचें हिंदुस्थानांतील साम्राज्य स्थापलें गेलें; परंतु जगांतील सगळ्याच साम्राज्यांचा आणि साम्राज्य-संस्थापकांचा थोड्याफार फरकानें हा नेहमींचाच मार्ग आहे.

भाग्यचक्राच्या गतीमध्यें एकाएकीं घडून आलेल्या या बदलामुळें बंगालमधील लुटारू, साहसी आणि लोभी इंग्रजांचीं डोकीं फिरून गेल्यासारखीं झालीं. सगळा बंगाल देश आतां त्यांचा झाला होता आणि त्यांनीं कोठेंही हातपाय पसरले, तरी त्यांना नाहीं म्हणण्याची ताकद कोणामध्येंच नव्हती. म्हणून क्लाइव्हच्या नेतृत्वाखालीं या लोकांनीं बंगाल प्रांताच्या सार्वजनिक खजिन्यावर धाड घातली आणि तो अगदीं पुरा पुरा रिता करून टाकला. त्यांतून क्लाइव्हनें स्वतःलाच आपल्या कामगिरीबद्दल नगद साडेबावीस लक्ष रुपये बक्षीस म्हणून घेतले आणि एवढ्यावर संतुष्ट न होतां त्यानें

स्वतःला कित्येक लाख रुपयांचें सालीना उत्पन्न असलेली मोठी मौल्यवान् जहागीरही घेतली. बाकीच्याही सर्व इंग्रज लोकांनीं अशाच रीतीनें आपापल्या "श्रमांचा मोबदला" घेतला. जो तो निर्लज्जपणें जें हातास लागेल तें आपल्या खिशांत घालीत होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं या वेळीं जो लोभीपणा व न्याय-अन्यायाबद्दल बेफिकिरी दाखविली, तिला जगांत कोठें तोड सांपडावयाची नाहीं. यानंतर बंगालमध्यें नबाब कोणाला करावयाचें हें इंग्रजांच्या मर्जीवर अवलंबून राहिलें; आपल्या लहरी-प्रमाणें कोणालाही ते नबाब करीत, नाहीं तर काढून टाकीत. एक नबाब जाऊन दुसरा नबाब प्रस्थापित व्हायचा, म्हणजे भलेभक्कम नजराणे आणि लांचलुचपत यांना नुसता ऊत यावयाचा. राज्यकारभाराची कांहीं या लोकांना कसलीच फिकीर नव्हती; तें काम रोज नव्या येणाऱ्या बिचाऱ्या नबाबाच्या माथ्यावर; यांचें काम फक्त जलदी गबर होण्याचें!

यानंतर थोड्याच वर्षांनीं इ. स. १७६४ मध्यें ब्रिटिशांनीं बक्सार येथें आणखी एक लढाई जिंकली. तिचा परिणाम म्हणजे दिल्लीच्या बादशहानें इंग्रजांचें प्रभुत्व मान्य केलें. त्यांच्याकडून वार्षिक तनखा घेऊन त्यानें राज्याचे अधिकार त्यांच्या स्वाधीन केले. अशा रीतीनें इंग्रजांचें बंगाल आणि बिहार या प्रांतामध्यें अप्रतिबंध राज्य सुरू झालें; परंतु या प्रदेशांतून आतांपर्यंत त्यांनीं जी लूट चालविली होती तेवढ्यावर त्यांचें समाधान न होऊन संपत्ति मिळविण्याचे आणखी मार्ग शोधून काढावयाला त्यांनीं सुरुवात केली. आतापर्यंत देशांतील अंतर्गत व्यापारांत त्यांचा हात नव्हता. आतां त्यांत त्यांनीं शिरकाव करून घेतला आणि बाकीच्या सर्व व्यापाऱ्यांना घरगुती तयार झालेले जिन्नस इकडून तिकडे नेऊन विकतांना जी जकात द्यावी लागत असे ती न देतांच हा व्यापार करण्याचा त्यांनीं चंग बांधला. हिंदी कारखानदारांवर आणि व्यापारावर ब्रिटिशांनीं घातलेला हा अगदीं पहिला घाव होय.

उत्तर हिंदुस्थानमध्यें आतां ब्रिटिशांची परिस्थिति हातांत सत्ता आणि संपत्ति भरपूर, पण जबाबदारी मात्र कसल्याच प्रकारची नाहीं, अशी होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या या लुटारू व्यापाऱ्यांना खराखुरा प्रामाणिक व्यापारधंदा, खोटेपणाचा अप्रामाणिक व्यापार-व्यवहार आणि उघड उघड निव्वळ लूटमार यांच्यामधला फरक समजून वागण्याची बिलकुल फिकीर नव्हती. तो काळ म्हणजे इंग्रज लोकांनीं पैशांचीं ओझीं घेऊन परत इंग्लंडला जावयाचें आणि तेथें 'नबाब' होऊन राहावयाचें अशा प्रकारचा होता. तूं जर थॅकरेंची 'व्हॅनिटी फेअर' ही कादंबरी वाचली असशील, तर तिच्यामध्यें तुला असा एक तुंद माजलेला माणूस आढळला असेल.

राजकीय असुरक्षितता आणि बंडाळी, पावसाचा अभाव, ब्रिटिशांचें आपले खिसे भरून घेण्याचें धोरण या सर्व कारणांच्या समुच्चयामुळें बंगाल व बिहार या प्रांतांमध्यें इ. स. १७७० मध्यें अत्यंत प्रचंड व भयंकर अशा दुष्काळाचा कहर उसळळा. असें म्हणतात, कीं त्यामध्यें या प्रदेशांतील तिसऱ्या हिश्शाहून अधिक रहिवासी

नष्ट झाले. केवढी प्रचंड, किती भयंकर संख्या असली पाहिजे ही! लाखों लोक दिवसानुदिवस अपुरें अन्न खात राहिल्यामुळें मृत्युमुखीं पडले. मोठमोठे प्रदेशच्या प्रदेश लोकच नाहींसे झाल्यामुळें उजाड झाले. शेतजमीन आणि खेडीं वर उगवलेल्या अरण्याच्या पोटांत गडप होऊन गेलीं. उपासमारीच्या यातना सोसणाऱ्या लोकांना कोणींही कसलीही मदत केली नाहीं. नबाबाला शक्ति नव्हती, सत्ता किंवा अधिकार नव्हता आणि इच्छाही नव्हती. ईस्ट इंडिया कंपनींतील लोकांच्या हातांत सामर्थ्य होतें आणि अधिकारही होता; परंतु त्यांना तशी जबाबदारी किंवा इच्छा वाटत नव्हती. त्यांचें काम फक्त मिळेल तेथून पैसा गोळा करावयाचा, जमीनमहसूल वसूल करावयाचा एवढेंच होतें आणि हें काम त्यांनीं अतिशयच चोख रीतीनें आणि आपले खिसे भरून घेण्याच्या दृष्टीनें अतिशयच समाधानकारकपणें पार पाडलें. इतकें कीं, सभोंवार जरी असा हा दुष्काळाचा कहर उसळला होता आणि लोकसंख्येपैकीं तिसऱ्या हिश्शाहून अधिक हिस्सा नष्ट होत होता, तरीसुद्धां जे जिवंत राहिले होते त्यांच्याकडून त्यांनीं जमीनमहसुलापैकीं पैन् पै वसूल करायला सोडलें नाहीं. एवढेंच नव्हे, तर सरकारी ठरलेल्या महसुलापेक्षांही अधिक वसूल या लोकांनीं केला आणि हा वसूल त्यांनीं जबरदस्तीनें व मारपीट करून केला, असें खुद्द सरकारी रिपोर्टांतच म्हटलेलें आहे. दुष्काळासारख्या भयंकर संकटांतून कसाबसा जीव बचावून राहिलेल्या अर्धपोटी, उपासमारीनें दैन्यावस्थेस पोंचलेल्या या लोकांकडून अशा रीतीनें जबरदस्तीनें आणि जुलूम करून पैसा वसूल करण्याचा हा अमानुषपणा कशा प्रकारचा असूं शकेल, याची पुरेशी कल्पनासुद्धां करणें आपल्यासारख्यांच्या बुद्धीच्या आटोक्याबाहेरचें काम आहे.

बंगालमध्यें आणि फ्रेंचांविरुद्ध इंग्लिश लोकांना अशा तऱ्हेनें जरी जय मिळाले, तरी दक्षिणेंत त्याना फार अडचणींना तोंड द्यावें लागलें. शेवटचा विजय पदरांत पडेपर्यंत तिकडे त्यांना पुष्कळदां पराभूत व्हावें लागलें व पुष्कळदां अपमानही सहन करावे लागले. म्हैसूरचा हैदरअल्ली हा त्यांचा फार मोठा कडवा शत्रु होता. तो मोठा कर्तबगार आणि बेडर सेनानायक असून त्यानें इंग्लिश सैन्याचा पुनःपुनः पराभव केला. इ. स. १७६९ मध्यें तर थेट मद्रासच्या किल्ल्याच्या भिंतीखालीं त्यानें इंग्रजांना स्वतःशीं आपल्याला फायदेशीर असा तह करण्यास भाग पाडलें. दहा वर्षांनंतर पुन्हां एकदां त्याला असाच मोठा जय मिळाला. त्याच्या मागें त्याचा मुलगा टिपू सुलतान हाही असाच ब्रिटिशांच्या मार्गांत चागलाच कांटा होऊन सलत राहिला. टिपूचा अखेरचा पराभव करण्यापूर्वी ब्रिटिशांना आणखी दोन युद्धें म्हैसूरच्या राज्याशीं करावीं लागलीं. टिपूचा पराभव केल्यानंतर इंग्रजांनीं हल्लींच्या महाराजाच्या एका पूर्वजाला ब्रिटिशांच्या संरक्षणाखालीं म्हैसूरच्या गादीवर प्रस्थापित केलें.

मराठ्यानीं पण दक्षिणेंत इ. स. १७८२ मध्यें ब्रिटिशांचा चांगला पराभव केला. तिकडे उत्तरेंत या वेळीं ग्वाल्हेरच्या शिंद्यांचें वर्चस्व प्रस्थापित झालेलें होतें आणि गरीब बिचारा दिल्लीचा बादशहा शिंद्यांच्या हातचें खेळणें होऊन राहिलेला होता.

अशा वेळीं इंग्लंडहून वॉरन हेस्टिंग्ज यास हिंदुस्थानांत पाठविण्यांत आलें व तो हिंदुस्थानचा पहिला गव्हर्नर जनरल झाला. आतां ब्रिटिश पार्लमेंटनें हिंदुस्थानच्या प्रश्नांत लक्ष घालण्यास सुरुवात केली. हेस्टिंग्ज हा इंग्रजांचा हिंदुस्थानांतील सर्वांत श्रेष्ठ प्रतीचा कारभारी म्हणून समजला जातो; परंतु त्याच्या काळचा राज्यकारभार सुद्धां लांचलुचपतीनें बरबटलेला आणि दुसऱ्या अनेक अन्यायांनीं भरलेला होता, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. स्वतः हेस्टिंग्जनें छळ करून मोठमोठ्या रकमा उकळल्याचीं कांहीं उदाहरणें आतां जगजाहीर झालेलीं आहेत. इंग्लंडला परत गेल्यावर हेस्टिंग्जची पार्लमेंटच्या न्यायासनासमोर त्याच्या हिंदी कारभाराबाबत चौकशी झाली होती; दीर्घ काळपर्यंत खटला चालून त्यांत तो निर्दोषी म्हणून सुटला होता. त्याच्या आधीं पार्लमेंटनें क्लाइव्हलाही ठपका दिला होता आणि त्यानें तर त्यामुळें आत्महत्याच केली. अशा रीतीनें कोणावर ठपका ठेवून किंवा कोणाची जाहीर चौकशी करून आपल्या सदसद्विवेक बुद्धीची टोंचणी कमी करण्याचा इंग्लंडनें प्रयत्न केला; परंतु मनांतून खरोखर या लोकांनीं जें केलें तें फार उत्तम केलें, अशी आदराची भावना इंग्लंडला त्या लोकांबद्दल होती आणि त्यांच्या धोरणापासून झालेला फायदाही गिळंकृत करण्याला इंग्लंडची तयारीच होती. क्लाइव्ह आणि हेस्टिंग्ज यांच्यासारख्यांचा कितीही जरी निषेध केला, तरी ते दोघे मोठे नमुनेदार साम्राज्यसंस्थापक होऊन गेले हें खरें आहे आणि जोंपर्यंत जिंकलेल्या लोकांवर साम्राज्यें स्थापून त्या लोकांची पिळणूक करावयाची हा प्रकार जगांत चालू राहणार आहे, तोंपर्यंत असल्या प्रकारचे लोक हे पुढें येणारच आणि लोक त्यांची वाहवाही करणारच. निरनिराळ्या युगांत पिळणूक करण्याच्या पद्धती बदलतील एवढेंच; बाकी मूळ भूमिका तीच कायम राहणार. ब्रिटिश पार्लमेंटनें क्लाइव्हचा म्हणे निषेध केला; परंतु लंडन येथील व्हाइट हॉलमधील इंडिया ऑफिसच्या समोरच खुद्द क्लाइव्हचा पुतळा इंग्रज लोकांनीं बसविलेला असून आंतील आंगाला कचेरीमध्यें त्याच्या ठिकाणची प्रवृत्तीच मूर्तिमंत प्रकट होऊन जणुं हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजवटीचें धोरण ठरवीत आहे.

हेस्टिंग्जनेंच प्रथम ब्रिटिशांच्या संरक्षणाखालील हिंदी राजांची बाहुलीं प्रस्थापित करण्याच्या धोरणाला सुरुवात केली. म्हणून पुष्कळसे सोन्याच्या मुलामा चढवलेले व पोकळ डोक्याचे जे कित्येक महाराज आणि नबाब हिंदी इतिहासाच्या रंगभूमीवर उगीच छाती वर काढून नाचत असतात आणि आपल्या अस्तित्वामुळें नसती घाणघूण करून ठेवीत असतात, अशा या राजेलोकांच्या टोळक्यांच्या निर्मितीचें श्रेय अंशतः हेस्टिंग्जला द्यावयास हवें.

हिंदुस्थानांत इंग्रजांचें साम्राज्य वाढत चाललें, तसतशीं त्यांचीं मराठ्यांशीं आणखीं पुष्कळ युद्धें झालीं. पण या सर्व युद्धांविषयीं एक अलौकिक चमत्काराची गोष्ट अशी आहे, कीं तीं सर्वच युद्धें जरी इंग्लंडच्या फायद्यासाठीं म्हणून चाललेलीं होतीं, तरी त्यांचा खर्च मात्र हिंदुस्थानच्या माथ्यावर पडलेला आहे. इंग्लिश लोकांना

त्यांतला एवढाही भार सोसावा लागलेला नाहीं. त्यांनीं फक्त फायदा तेवढा खिशात घातला.

लक्षांत घेण्यासारखी एक गोष्ट आहे, कीं आतां ईस्ट इंडिया कंपनीचें–एका व्यापारी संस्थेचें–अशा रीतीनें हिंदुस्थानात राज्य झालें. कंपनीवर ब्रिटिश पार्लमेंटची देखरेख आणि नियंत्रण वाढत्या प्रमाणांत होतें हें खरें; परंतु हिंदुस्थान देशाचें भवितव्य आतां मुख्यतः मूठभर व्यापारी लुटारूंच्या टोळक्यांच्या हातीं गेलेलें होतें. त्यांच्या दृष्टीनें राज्यकारभार म्हणजे व्यापार आणि लूट असें समीकरण ठरलेलें होतें. यामधील भेद त्यांच्या दृष्टीपुढें असलाच तर तो फारच क्षुल्लक होता. ईस्ट इंडिया कंपनी आतां आपल्या भागीदारांना शंभर टक्के, दीडशें टक्के, केव्हा केव्हां दोनशें टक्केसुद्धां सालोसाल नफ्याच्या रूपानें वाटूं लागली होती. याशिवाय कंपनीचें हिंदुस्थानांतील कारभारी चांगल्या भल्या मोठ्या रकमा अचूक खिशांत टाकीतच असत, हें क्लाइव्हच्या उदाहरणावरून आपण पाहिलेंच आहे. याखेरीज कंपनीचे अधिकारी निरनिराळ्या व्यापारांच्या बाबतींत ठेकेदारी निर्माण करून झपाट्यानें या मार्गानें प्रचंड संपत्ति मिळवीत तें वेगळेंच. हिंदुस्थानांतील कंपनीचें राज्य हें अशा प्रकारचें होतें.

## ९३

## चीनच्या मांचू घराण्यांतील एक श्रेष्ठ राजा

१५ सप्टेंबर, १९३२

माझ्या अंतःकरणाचें नुसतें पाणी पाणी होऊन गेलेलें आहे! काय करावें हेंच मला सुचत नाहीं. बातमी–भयंकर बातमी–आली आहे, कीं बापूंनीं प्राणांतिक उपोषण सुरू केलें आहे. माझ्या जीवनाच्या छोट्या जगांत बापूंनीं केवढी मोठी जागा व्यापलेली आहे! हें जग आज कांपूं लागलें आहे; धडपडूं लागलें आहे; जिकडे तिकडे डोळ्यापुढें अंधकार उभा राहिला आहे; कशामध्यें कांहीं अर्थच शिल्लक राहिला नाहीं असें झालें आहे. त्यांचें स्वरूप पुनःपुनः माझ्या डोळ्यांपुढें उभें राहतें आहे. त्यांचें अगदीं अलीकडचें दर्शन मला झालें त्याला नुकतेंच एक वर्ष झालें. हिंदुस्थानांतून त्यांना पश्चिमेकडे घेऊन जाणाऱ्या त्या जहाजाच्या वरच्या भागावर त्या दिवशीं उभे असतांना त्यांना मीं पाहिलें. आतां त्यांची माझी पुन्हां भेटच होणार नाहीं काय? आणि मला जेव्हां संशयानें पछाडलेलें असेल, कोणाचा दूरदृष्टीचा सल्ला हवा असेल, किंवा शरीराच्या अथवा मनाच्या कांहीं वेदनाच्या वेळीं मला कोणाचा प्रियकर हात पाठीवरून फिरून तें दुःख हलकें व्हावेंसें वाटेल, अशा वेळीं मग मला कोणाकडे जातां येईल? ज्याच्यापासून आम्हांला स्फूर्ति मिळाली तो आमचा प्रिय

पुढारी गेल्यावर आमची गति कशी होईल! छे! ज्या या देशात अशा श्रेष्ठ पुरुषांना अशा रीतीनें लोक मरूं देतात, तो हा हिंदुस्थान देश किती राक्षसी म्हटला पाहिजे! प्रत्यक्ष स्वातंत्र्याचा विचार सोडून देऊन क्षुद्र गोष्टींसंबंधीं उगीच तंटेबखेडे करीत बसणारे हिंदुस्थानांतले लोक गुलामच असले पाहिजेत; त्यांची मनोभूमिकाच गुलामांची बनलेली असली पाहिजे.

माझ्या मनात लिहिण्याचा उत्साहच राहिलेला नाहीं! एकदां तर ही पत्रमालिका लिहिण्याचें काम संपवूनच टाकावें असें माझ्या मनांत आलें; परंतु मीं विचार केला, कीं असें करणें मूर्खपणाचें आहे. येथें या तुरुंगाच्या खोलींत बसून वाचन, लेखन आणि मनन हें जर मीं केलें नाहीं, तर दुसरें मला काय करतां येणार आहे? तसेंच थकून गेलों असताना किंवा अंतःकरण त्रस्त झालेलें असतांना तुझी स्मृति आणि तुला पत्र लिहिणें याहून माझ्या मनाचें समाधान करायला दुसरें अधिक चांगलें साधन कोठलें असणार आहे? नुसतें दुःख करीत, अश्रू ढाळीत बसण्यानें का मनुष्याचे दिवस हलके होणार आहेत? सर्व महासागरांत पाणी नसेल इतके अश्रू आजवर मनुष्यजातीनें ढाळलेले आहेत, असें बुद्धानें म्हटलें आहे आणि आमच्या या दुर्दैवी पृथ्वीची सर्व व्यवस्था ठाकठीक लागेपर्यंत अजून असे किती तरी अश्रू ढाळावे लागणार आहेत. आमच्यापुढें अजून पुष्कळ काम पडलें आहे. केवढी मोठी कार्य करण्याची जबाबदारी आम्हांला बसूं नका, कामाला लागा, म्हणून बजावते आहे. हें सारें कार्य पुरें होईपर्यंत आम्हांला काय किंवा आमच्या मागून येणारांना काय, विश्रांति घेण्याला सवड मिळणें शक्य नाहीं. म्हणून आपला रोजचा कार्यक्रम चालू ठेवावयाचा असें मीं ठरविलें आहे. तेव्हां आतां हीं पत्रें मी लिहीत जाईन तुला पूर्वीप्रमाणें.

गेल्या कांहीं पत्रांत मी हिंदुस्थानची हकीगत सांगत होतों. मोठासा अभिमान वाटावा असा कांहीं हा वृत्तांत नव्हता. कारण त्या काळांत हिंदुस्थान चीत होऊन पडलेला असून येईल त्या पेंढाऱ्यानें नाहीं तर लुटारूनें त्याच्यावर हल्ला करून त्याला लुबाडावें किंवा नागवावें अशी त्याची अवस्था झालेली होती. हिंदभूमीची पूर्वेकडील श्रेष्ठ भगिनी जी चीनची भूमि, तिची अवस्था मात्र या काळांत पुष्कळच चांगल्या प्रकारची होती; म्हणून आतां थोडा वेळ आपण चीनकडे लक्ष पुरविणें अवश्य आहे.

पूर्वीच्या एका पत्रांत (पत्र ८०) सांगितलेली हकीगत आठवत असेल तुला मिंग घराण्याच्या काळांत चीनची कांहीं काळ फार मोठी भरभराट झाली; पुढें तेथें अनाचार माजला. तंटेबखेडे होऊन फाटाफूट झाली आणि अशा वेळीं चीनचे उत्तरेकडील शेजारी जे मांचू लोक त्यांनीं चीनवर चालून येऊन तेथील राज्य काबीज केलें. इ. स. १६५० पासून पुढें मांचू घराण्याचें राज्य चीनमध्यें चागलेंच भक्कमपणें प्रस्थापित झालें. या अर्धवट परकी घराण्याच्या कारकीर्दीत चीनचें बळ वाढलें; एवढेंच नव्हे, तर चीननें बाहेर प्रदेशांत स्वाऱ्याही करण्यास सुरुवात केली. मांचू घराण्याच्या

ठिकाणीं एक नवीनच प्रकारचा जोम संचारला होता ; परंतु चीनच्या अंतर्गत व्यवहारामध्यें फारशी ढवळाढवळ न करतां त्यांनीं आपली सर्व जादा शक्ति आपलें साम्राज्य उत्तर, पश्चिम आणि दक्षिण या दिशांना वाढविण्यांत खर्च केली.

कोणतेंही नवें राजघराणें म्हटलें म्हणजे सुरुवातीला त्यामध्यें कांहीं कांहीं कर्तबगार राज्यकर्ते निर्माण व्हावयाचे आणि मग नालायकांची मालिका लागून त्याची तेजाची ज्योति मंद आणि बारीक होत होत नाहींशी व्हावयाची, असा एक नियमच दिसतो. त्याप्रमाणें मांचू घराण्यामध्येंही कांहीं असामान्य सामर्थ्यवान् आणि कर्तबगार राज्यकर्ते आणि मुत्सद्दी उदयास आले. मांचू घराण्यांतील दुसरा बादशहा कांग ही या नावाचा होता. गादीवर आला त्या वेळीं तो अवघा आठ वर्षांचा होता. जगांतील कोणत्याही साम्राज्यापेक्षां अधिक विस्तृत आणि अधिक लोकसंख्येच्या साम्राज्याचा तो एकसष्ठ वर्षें स्वामी म्हणून नांदला ; परंतु इतिहासामध्यें त्याला जें विशेष स्थान प्राप्त झालेलें आहे तें या त्याच्या साम्राज्याच्या विस्तारामुळें नव्हे किंवा त्याच्या लष्करी सामर्थ्यामुळेंही नव्हे. तर त्याची स्मृति एवढी टिकून आहे याचीं ध्यानांत ठेवण्यासारखीं कारणें म्हणजे त्याच्या ठिकाणचा मुत्सद्दीपणा आणि त्याचीं साहित्यविषयक कामगिरी हीं होत. त्याची कारकीर्द इ. स. १६६१ पासून १७२२ पर्यंत चालली ; म्हणजे फ्रान्सचा महान् बादशहा चौदावा लुई याचा तो चौपन्न वर्षें समकालीन होता. दोघांच्याही कारकीर्दी भल्या लांबलचक झाल्या ; परंतु बहात्तर वर्षें राज्य करून लुईनें दीर्घ काळ राज्य करण्याच्या उचांकाची शर्यत जिंकली. या दोघांची तुलना करणें मोठें मनोरंजक आहे ; परंतु या तुलनेमध्यें लुईची बाजू सर्वतोपरी लंगडी पडणारी आहे. लुईनें आपल्या देशाचा नाश केला ; पिळून त्याला निःसत्त्व केलें आणि वर आणखी कर्जाच्या डोंगराचा बोजा करून ठेवला. धर्माच्या बाबतींतही तो अनुदार आणि कडवा होता. कांग ही हाही स्वतः कट्टा कॉन्फ्यूशियसच्या पंथाचा अनुयायी होता ; परंतु इतर धर्ममतांना तो आदरानें वागवीत असे. त्याच्या कारकीर्दीत, नव्हे – मांचू घराण्यांतील पहिल्या चारही बादशहांच्या कारकीर्दीत, चीनमधील मिंग घराण्यापासून चालत आलेल्या संस्कृतीला काडीचा धक्का लावण्यांत आला नाहीं. त्या संस्कृतीची उच्च भूमिका याही काळांत कायम राहिली ; एवढेंच नव्हे, तर तिच्यांत थोडीशी कांहीं बाबतींत अधिकच उच्चता निर्माण झाली. उद्योगधंदे, कला, साहित्य आणि शिक्षण यांची मिंग घराण्याच्या काळाप्रमाणेंच याही काळामध्यें भरभराट चालू राहिली. चिनी मातींचीं अलौकिक कलाकौशल्याचीं भांडींही निर्माण होत राहिलीं. रंगीत छपाई करण्याची कला याच काळांत चीनमध्यें शोधून काढण्यांत आली आणि जेसुइट लोकांकडून तांब्यावरील कोरकामाची विद्या पैदा करण्यांत आली.

मांचू घराण्यांतील राज्यकर्त्यांच्या मुत्सद्देगिरीचें आणि यशस्वितेचें रहस्य तें स्वतःच चिनी संस्कृतीशीं संपूर्णपणें एकजीव होऊन गेले यामध्यें आहे. चिनी तत्त्वज्ञान आणि चिनी संस्कृति यांचा जरी त्यांनीं आपल्या जीवनाशीं पूर्ण मिलाफ केला, तरी

ण चिन्यांपेक्षां सुधारणेनें कमी अशा मांचू समाजाच्या ठिकाणीं जो एक विशिष्ट ोमदारपणा आणि उद्योगीपणा होता तो मात्र त्यांनीं सोडला नाहीं. त्यामुळें कांग ीच्या ठिकाणीं आपल्याला दोन भिन्न प्रवृत्तींचें एक प्रकारचें विलक्षण आणि ामान्यतः अनुभवास न येणारें असें मिश्रण आढळून येतें. एका बाजूनें तत्त्वज्ञानाचा ोठा अभ्यासविरत जिज्ञासू आणि सांस्कृतिक कार्यांमध्यें पूर्ण गुंगलेला असा तो आढळतो, तर दुसरीकडे तोच कर्तबगार लष्करी नायक आणि देश किंजण्याचें थोडेंसें ोडच असलेला असाही आढळतो. कला आणि साहित्य यांवरची त्याची भक्ति निव्वळ रवरची, पोशाखी किंवा दिखाऊ नव्हती. त्याच्या साहित्यविषयक कामगिरींत त्याच्या ूचनेवरून, किंबहुना पुष्कळदां प्रत्यक्ष त्याच्या देखरेखीखालीं जीं तीन महत्त्वाचीं ार्यें चीनमध्यें संपूर्ण करण्यांत आलीं त्यांचा समावेश होतो; त्यांवरून त्याचा स्वतःचा अभ्यास किती खोल होता आणि वाङ्मयावरील त्याची भक्ति किती दृढ होती याची तुला थोडीशी कल्पना येईल.

चिनी भाषेंत वेगळे वेगळे शब्द नाहींत, तर चिन्हें आहेत हें तुला ठाऊक आहे. या सगळ्या चिन्हांचा एक कोश कांग हीनें तयार करविला. चाळीस हजार चिन्हें आणि त्यांचा अर्थ व्यक्त करणारीं उदाहरणादाखल असंख्य वाक्यें यांचा संग्रह करण्याचें हें काम खरोखरच फार प्रचंड होतें. आज सुद्धां या कोशाच्या तोडीचा प्रचंड कोश दुसरा नाहीं असें म्हणतात.

कांग हीच्या उत्साहामुळेंच आपल्याला आणखी एक मोठाच ग्रंथ प्राप्त झालेला आहे. तो म्हणजे एक प्रचंड सचित्र ज्ञानकोश होय. या आश्चर्यकारक प्रचंड ग्रंथाचे कित्येक शेंकडों भाग आहेत. हा ज्ञानकोश म्हणजे एक मोठा स्वतंत्र ग्रंथसंग्रहच म्हणावा लागतो. त्यांत सर्व गोष्टींचा, हरएक विषयाचा समावेश करण्यांत आलेला आहे. कांग हीच्या मृत्यूनंतर तांब्याच्या सरकत्या पत्र्यांच्या ठशांवरून हा ग्रंथ छापण्यांत आला.

तिसरें जें कार्य मला या ठिकाणीं नमूद करावयाचें आहे, तें म्हणजे सर्व चिनी वाङ्मयाचा एक प्रकारचा पदवाक्यसंग्रहकोश ( Coneordance ) होय. हा एक प्रकारचा अनेक शब्द आणि उतारे यांचा संग्रहकोश असून त्यामध्यें अशा शब्दांची आणि उताऱ्यांची साम्यभेदात्मक चर्चा करून दाखविलेली आहे. हेंही एक असामान्यच कार्य होतें; कारण त्यामध्यें सर्व वाङ्मयाच्या सूक्ष्म अभ्यासाची आवश्यकता होती. कवी, इतिहासकार आणि निबंधलेखक यांच्या ग्रंथांतून त्यांत संपूर्ण उतारे द्यावयाचें काम होतें.

कांग हीनें साहित्यविषयक आणखीही पुष्कळ काम केलें; परंतु हीं तीन कामें सुद्धां त्याच्या कामगिरीचा भरीवपणा कोणाच्याही ध्यानांत येण्यास पुरेशीं आहेत. या तिन्हींशीं तुलना करावयाला अशा प्रकारचें एकच आधुनिक साहित्यविषयक कार्य माझ्या डोळ्यांपुढें उभें राहतें; दुसरें नाहीं. तें म्हणजे ती महान् ऑक्सफर्ड इंग्लिश

डिक्शनरी. हा कोश तयार करण्याला पन्नास वर्षें लागलीं; अगणित विद्वानांचे परिश्रम त्या कामीं खर्ची पडले आणि इतक्या काळानंतर आणि परिश्रमांनीं नुकता कोठें तो कोश सबंध छापून तयार झाला आहे.

ख्रिस्ती धर्म आणि ख्रिस्ती मिशनरी यांना कांग ही याची चांगलीच अनुकूलता होती. त्यानें परदेशीय व्यापारालाही चांगलें उत्तेजन दिलें व चीनचीं सर्व बंदरें त्यासाठीं खुलीं केलीं; परंतु यूरपियन लोक या सवलतीचा दुरुपयोग करतात व त्यांच्यावर नियंत्रण ठेवणें जरूर आहे असें त्याला आढळून आलें. हे मिशनरी लोकच आपापल्या मायभूमींतील साम्राज्यवाद्यांशीं सहकार्य करून त्यांना नवीन देश जिंकून घेण्याच्या कामीं मदत व्हावी म्हणून कारस्थानें करीत असतात असा त्याला संशय आला, आणि हा संशय कांहीं अगदींच निराधार नव्हता. त्यामुळें प्रथम ख्रिस्ती धर्माशीं तो जसा सवलतीनें वागत असे, तसें वागण्याचें त्यानें त्यापुढें बंद केलें. पुढें कँटन बंदरांतील एका चिनी लष्करी अधिकाऱ्याकडून एक अहवाल कांग हीकडे सादर करण्यांत आला. त्यावरून त्याचा संशय अधिकच दृढ झाला. या अहवालांत फिलिपाइन्समध्यें व जपानमध्यें यूरपीय देशांचीं सरकारें आणि त्या त्या देशचे व्यापारी व मिशनरी यांचा परस्परांच्या किती संपूर्ण संगनमतानें सगळा व्यवहार चालतो हें दाखविण्यांत आलें होतें. म्हणून या अधिकाऱ्याची शिफारस अशी होती, कीं साम्राज्याचें परकी स्वाऱ्या आणि परकी कारस्थानें यांच्यापासून संरक्षण करण्यासाठीं परदेशीय व्यापारावर नियंत्रण घालावें आणि ख्रिस्ती धर्माचा प्रचार व प्रसार अजिबात बंद करावा.

हा अहवाल इ. स. १७१७ मध्यें सादर करण्यांत आला. पूर्वेकडील देशांत परदेशीय लोकांचीं कारस्थानें कशा प्रकारचीं चाललेलीं होतीं आणि त्यापैकीं कितीएक देशांनीं परदेशीय व्यापार आणि ख्रिस्ती धर्माचा प्रसार यांच्यावर जें नियंत्रण घातलें त्यांत त्यांचा उद्देश काय होता, या गोष्टींवर या अहवालानें किती स्वच्छ आणि भरपूर प्रकाश पडतो. तुला आठवत असेल, कीं जपानमध्येंही अशाच प्रकारची कांहीं भानगड घडून आल्यामुळेंच जपाननें आपल्या देशाला कोंडून घेतलें. पुष्कळदां असें म्हणण्यांत येतें, कीं हे चिनी आणि इतर लोक हे मागासलेले आहेत, अडाणी आहेत; परदेशीय लोकांचा हे लोक द्वेष करतात आणि त्यांच्या व्यापाराच्या मार्गांत अडचणी निर्माण करतात. परंतु आपण आतांपर्यंत जें इतिहासाचें निरीक्षण केलें त्यावरून तर खरें पाहतां आपल्याला स्वच्छपणें असें प्रत्ययाला आलेलें आहे, कीं हिंदुस्थान आणि चीन यांचा व जगांतील इतर देशांचा परस्परांशीं अगदीं प्राचीनतम काळापासून आणि फारच मोठ्या प्रमाणावर व्यवहार व संबंध चालू होता. परदेशीय लोकांचा किंवा परदेशीय व्यापाराचा द्वेष करण्याचा प्रश्नसुद्धा या देशामध्यें कधीं उद्भवलेला नव्हता. किती तरी दीर्घ काळपर्यंत सर्व परदेशी बाजारपेठांवर वास्तविक हिंदुस्थानचेंच वर्चस्व चालू होतें परदेशीय व्यापारसंवर्धक मंडळांचा व्यवहार म्हणजे पश्चिम यूरपांतील देशांच

साम्राज्यवर्धनाचा अगदीं राजरोस मार्गच होय असें जेव्हां दिसून आलें, तेव्हांपासूनच प्रथम त्यांच्याविषयीं पूर्वेकडील लोकांमध्यें संशय उत्पन्न झाला.

या लष्करी अधिकाऱ्याच्या अहवालाचा चीनच्या मंत्रिमंडळानें विचार केला व त्याला त्यानें मान्यता दिली. त्यानंतर बादशहा कांग ही यानें त्या रिपोर्टांतील शिफारशींना अनुसरून परदेशीय लोकांचा व्यापार व मिशनरी लोकांचें कार्य यांवर कडक नियंत्रण घालणारे हुकूम जारी केले.

आतां प्रत्यक्ष चीन देशाची सरहद्द थोडा वेळ मी सोडणार आहें आणि तुला आशियाच्या उत्तर टोंकाकडे सायबेरियांत घेऊन जाऊन तेथें काय घडामोडी होत होत्या हें तुला सांगणार आहें. हा प्रचंड सायबेरिया प्रांत म्हणजे अतिपूर्वेकडील चीन देश आणि पश्चिमेकडील रशिया यांना जोडणारा दुवा आहे. चीनमधील मांचू घराण्याच्या साम्राज्याचें धोरण परकी देशांवर आक्रमण करणारें होतें, हें मीं तुला सांगितलेंच आहे. या साम्राज्यांत त्यांचा स्वतःचा देश जो मांचूरिया त्याचा अर्थातच समावेश होत होता; पण त्यापलीकडे मंगोलिया प्रांत पचवून घेऊन त्याच्याही पलीकडे तें साम्राज्य विस्तार पावलेलें होतें. याच सुमारास रशियांतून सोनेरी टोळीच्या मंगोलियन लोकांना हांकलून लावण्यांत आलेलें होतें आणि तेथें एक बलिष्ठ मध्यवर्ती सत्ता आतां प्रस्थापित झालेली होती. ही सत्ताही पूर्वेकडे सायबेरियाच्या मैदानाच्या पलीकडे आपलें राज्य वाढविण्याच्या नादांत होती. अशा रीतीनें या दोन साम्राज्यांची सरहद्द सायबेरियामध्यें एकमेकांशीं भिडली.

आशिया खंडांत या मोंगल लोकांचें सामर्थ्य कमी होऊन त्यांचा अतिशयच झपाट्यानें ऱ्हास झाला ही इतिहासांतील एक अत्यंत आश्चर्यकारक, विश्वास न बसण्याजोगी अशी घटना आहे. या लोकांनीं आशिया आणि यूरप खंडांत एक काळ नुसता अप्रतिहत धुमाकूळ घातला; चेंगीजखान व त्याचे वंशज यांच्या कारकीर्दीत त्या काळीं ज्ञात असलेल्या जगाचा फार मोठा भाग त्यांनीं जिंकून घेतला आणि असा पराक्रम करणारे हे लोक एकाएकीं अंधकारांत गडप झाल्यासारखे झाले. पुढें तैमूरलंगाच्या कारकीर्दीत त्यांनीं पुन्हां थोडें डोकें वर काढलें; परंतु तैमूरलंगाचें साम्राज्य त्याच्याबरोबरच नाहींसें झालें. त्याच्यामागें त्याच्याच वंशजांपैकीं तैमूरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकांचें एक राज्य मध्य आशियामध्यें होतें आणि त्यांच्या दरबारीं चित्रकारांची एक विख्यात परंपरा नांदत होती. पुढें हिंदुस्थानांत आलेला बाबर हा या तैमूरी लोकांपैकींच एक होता. अशा रीतीनें तैमूरी लोकांचें असें हें एक राज्य जर सोडलें, तर एका वेळीं रशियापासून थेट आशिया खंडाच्या पलीकडच्या आपल्या मायभूमीपर्यंत पसरलेल्या मोंगल वंशाचा या काळांत ऱ्हासच झाला आणि त्याचें सर्व महत्त्व नष्ट झालें. हें असें कां व्हावें, याचें कारण कोणालाही सांगतां येत नाहीं असें दिसतें. कोणी म्हणतात, हवेमध्यें जे फेरबदल घडून आले त्यांचा कांहीं

अंशीं हा परिणाम असावा; दुसऱ्यांचीं दुसरींच मतें आहेत. तें कसेंही असलें, तरी आतां आपण ज्या काळचा इतिहास पाहतों आहों, त्या काळांत जुन्या काळीं सारें जग जिंकण्याचा चंग बांधलेल्या या स्वारीबहादूर लोकांवरच डावीकडून आणि उजवीकडून स्वाऱ्या होण्याचा प्रसंग आला.

आशियांतील मोंगलांच्या साम्राज्याचे तुकडे पडल्यापासून आशियामधील इकडून तिकडे जाणारा जमिनीवरचा वाहतुकीचा मार्ग जवळजवळ २०० वर्षें बंद पडून गेला होता. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत रशियानें आपले वकील जमीनमार्गानें चीनमध्यें पाठविल्याचें आढळतें. मिंग घराण्यांतील बादशहांबरोबर राजकीय संबंध प्रस्थापित करण्याचा त्यांचा प्रयत्न होता असें दिसतें. परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं. यानंतर लौकरच यरमाक नांवाच्या एका रशियन पेंढाऱ्यानें कोसाक सैनिकांच्या एका टोळीनिशीं उरल पर्वत ओलांडला आणि सिबिर येथील छोटेखानी राज्य जिंकून घेतलें. याच राज्याच्या नांवावरून सायबेरिया हें या प्रांताचें नांव निघालेलें आहे.

यरमाकचा हा पराक्रम इ. स. १५८१ सालचा. या दिवसापासून रशियन लोक एकसारखे पूर्वेकडे पसरतच गेले आणि सुमारें पन्नास वर्षांत ते पॅसिफिक महासागरापर्यंत जाऊन पोंचले. लौकरच अमूर नदीच्या खोऱ्यांत त्यांचा चीनबरोबर तंटा उद्भवला आणि दोन्ही पक्षांत लढाई जुंपून तीमध्यें रशियन लोकांचा पराभव झाला. इ. स. १६८९ मध्यें या दोन देशांत एक तह झाला. यालाच नरकिंस्कचा तह असें म्हणतात. या तहाप्रमाणें एकमेकांच्या देशांच्या सरहद्दी कायम करण्यांत आल्या आणि व्यापारासंबंधींचे करारमदार झाले. चीन देशाचा यूरपांतील एखाद्या देशाशीं झालेला असा हा पहिला तह. या तहामुळें रशियाचें यापुढील प्रदेशावरील आक्रमण थांबलें; परंतु दोन्ही देशांत उंटांच्या तांड्यांवरून चालणारा व्यापार मात्र पुष्कळ वाढला. त्या वेळीं पीटर दि ग्रेट हा रशियाचा झार होता आणि चीनबरोबर निकट संबंध जोडण्यासाठीं तो फार आतुर होता. कांग ही बादशहाकडे दोन वेळां त्यानें वकील पाठविले आणि पुढें तर चीनच्या दरबारांत त्यानें आपला कायमचाच प्रतिनिधि ठेवला.

फार प्राचीन काळापासून चीन देशांत निरनिराळ्या देशांकडून वकील येण्याची वहिवाट होती. मला वाटतें, मागें एका पत्रांत मीं रोमन बादशहा मार्क्स ऑरेलियस अँटोनियस यानें इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत असे वकील चीनमध्यें पाठविल्याबद्दलचा उल्लेख केला आहे. इ. स. १६५६ मध्यें डच लोकांचे आणि रशियन लोकांचे वकील चीनमध्यें गेले होते आणि त्यांना त्या ठिकाणीं हिंदुस्थानांतल्या महान मोंगलांच्या दरबारचे वकील आलेले आढळले. हा वृत्तांत मोठा लक्षांत घेण्यासारखा आहे. हिंदुस्थानांतले हे वकील शहाजहाननें पाठविलेले असले पाहिजेत.

## ९४

# चीनचा बादशहा इंग्लंडच्या राजास पत्र लिहितो

*१६ सप्टेंबर, १९३२*

मांचू घराण्यांतील राजे मोठे विलक्षण दीर्घायुषी दिसतात. कांग ही बादशहाचा नातू चीन लुंग हा या घराण्यांतील चौथा बादशहा. यानेंही चांगला भलाभक्कम लांब काळ, म्हणजे इ. स. १७३६ ते १७९६ पर्यंत साठ वर्षें राज्य केलें. इतरही बऱ्याच बाबतींत तो आपल्या आजासारखा होता. वाङ्मयविषयक कार्य आणि साम्राज्यवर्धन हीं दोन कामें त्याचीं विशेष आवडतीं होतीं. संग्रह करण्यालायक अशा सर्व वाङ्मय-कृतींसाठीं त्यानें आपल्या कारकीर्दींत फार मोठा शोध करविला. अशा सर्व ग्रंथांचा संग्रह करून त्यांची त्यानें यादी करविली. यादी हें नांव तितकेंसें शोभण्याजोगें नाहीं; कारण तीमध्यें प्रत्येक ग्रंथाविषयीं मिळण्याजोगी सर्व माहिती ग्रथित केलेली असून शिवाय प्रत्येक ग्रंथाविषयीं परिचयपर आणि गुणदोषविवेचनपर टिपणेंही दिलेलीं होतीं. बादशाही ग्रंथालयांतील ग्रंथसंग्रहाच्या अशा या प्रचंड वर्णनात्मक यादीचे चार भाग आहेत; पहिला पवित्र ग्रंथ म्हणजे कॉन्फ्यूशियन पंथासंबंधींचे ग्रंथ, दुसरा इतिहास, तिसरा तत्त्वज्ञान आणि चवथा सामान्य वाङ्मय. असें म्हणतात, कीं या यादीच्या ग्रंथाला साऱ्या जगांत कोठें तोड नाहीं.

याच काळाच्या सुमारास चिनी वाङ्मयांत कादंबरी, लघुकथा आणि नाटक या प्रकारांचा उदय होऊन त्यांची वाढही फार उच्च प्रतीची झाली. इंग्लंडमध्येंही कादंबरीची वाढ याच काळांत होत होती, हीही एक गमतीची गोष्ट आहे. चिनी मातीचीं भांडीं आणि इतरही कलाकौशल्याच्या वस्तू यांनाही या काळीं यूरपमध्यें फार मागणी होती आणि त्यांचा मोठा व्यापार सतत चालू होता. याहूनही सर्वांत लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे या काळांत चहाच्या व्यापाराला सुरुवात झाली ही होय. मांचू घराण्यांतील पहिल्या बादशहाच्या कारकीर्दींतच या व्यापाराला सुरुवात झाली. इंग्लंडमध्यें चहा बहुधा दुसऱ्या चार्ल्सच्या कारकीर्दीच्या वेळीं पोंचला असावा. इंग्रजी भाषेंतील विख्यात रोजनिशीलेखक सेम्युएल पेपिस यानें इ. स. १६६० सालच्या रोज-निशींत पहिल्या प्रथमच "टी" (Tea) नांवाचें "चिनी पेय" प्रथमच प्यायल्याचा उल्लेख केलेला आहे. पुढें हा चहाचा व्यापार प्रचंड वाढत गेला. दोनशें वर्षांनंतर इ. स. १८६० मध्यें फू चौ या चीनच्या फक्त एका बंदरामधून केवळ एका हंगामांत दहा कोटी पौंड चहाची निर्यात झाली आणि आजकाल हिंदुस्थान आणि सिलोन या देशांत चहा फार मोठ्या प्रमाणावर तयार होतो हें तुला ठाऊकच आहे.

मध्य आशियामध्यें तुर्कस्तान जिंकून आणि इकडे तिबेटचा कबजा घेऊन चीन लुंग यानें आपल्या साम्राज्याचा विस्तार वाढाविला. त्यानंतर कांहीं वर्षांनीं इ. स. १७९०

मध्यें नेपाळमधील गुरख्यानीं तिबेटवर हल्ला केला. त्यावर चीन लुंगनें तिबेटमधून तर गुरखे लोकांना पिटाळून लावलेंच; पण पुढें हिमालयांतून त्यांचा पाठलाग करून थेट नेपाळमध्यें जाऊन त्यानें नेपाळच्या राजाला चिनी साम्राज्यामधील एक मांडलिक बनविलें. नेपाळवरील चीनचा हा विजय म्हणजे खरोखरच एक मोठा बहादुरीचा पराक्रम आहे. चीनच्या सैन्यानें तिबेट व हिमालय पर्वत ओलांडून नेपाळमध्यें जावयाचें आणि तेथें गुरख्यांसारख्या लष्करी वृत्तीच्या लोकांचा त्यांच्या खुद्द जन्मभूमीमध्यें पराभव करावयाचा, ही खरोखरच मोठी अचंबा वाटण्यासारखी गोष्ट आहे! कारण योगायोग असा, कीं यापुढें फक्त बावीसच वर्षांनंतर इ. स. १८१४ मध्यें इंग्रजांची या नेपाळच्या राज्याशीं कांहीं कटकट उत्पन्न झाली. इंग्रजांनीं नेपाळवर सैन्य पाठविलें; या सैन्याला तर हिमालय पर्वत ओलांडण्याचीही जरुरी नव्हती; तरी पण या सैन्याला तेथें फार हाल काढावे लागले.

इ. स. १७९६ मध्यें चीन लुंग हा मरण पावला. त्या वेळीं प्रत्यक्ष त्याचें स्वतःचें राज्य ज्या प्रदेशांवर चालू होतें त्यांमध्यें मांचूरिया, मंगोलिया, तिबेट आणि तुर्कस्तान या चीनच्या बाहेरच्या देशांचा समावेश होत होता. याखेरीज कोरिया, अनाम (वैतनाम), सयाम आणि ब्रह्मदेश या देशांनीं त्याचें अधिराज्य कबूल केलें होतें व ते त्याचे मांडलिक बनले होते; परंतु देश जिंकणें आणि लष्करी पराक्रमाच्या कीर्तीच्या पाठीस लागणें हे मोठे खर्चाचे खेळ आहेत. यांच्या पायीं प्रचंड संपत्ति खर्ची पडते आणि लोकांवरील करांचें ओझें वाढतें. हें करांचें ओझें बहुशः नेहमीं गरिबांच्याच डोक्यावर पडतें. चीनमध्यें हाच प्रकार झाला. शिवाय या काळामध्यें एकंदरच आर्थिक व्यवस्थेंत बदल घडून येत होते आणि त्यामुळेंही लोकांमधील असंतोषांत भरच पडत गेली. साऱ्या देशभर गुप्त संस्थांचें जाळें निर्माण झालें. इटली-प्रमाणें चीन देशही गुप्त मंडळांकरितां मोठा सुप्रसिद्ध आहे. या गुप्त मंडळांपैकीं कांहींचीं नांवेंही मोठीं गमतीचीं आहेत. उदारणार्थ, श्वेतकमल मंडळ, दैवी न्याय-मंडळ, श्वेतपक्ष मंडळ, इहपरलोक मंडळ वगैरे.

दरम्यान परदेशी व्यापारावर पुष्कळशीं नियंत्रणें–निर्बंध–घातलेले असूनही परदेशी व्यापार वाढत्या प्रमाणावरच होता. परदेशी व्यापाऱ्यांमध्यें या निर्बंधांबद्दल फारच मोठा असंतोष निर्माण झालेला होता. ईस्ट इंडिया कंपनीचा व्याप आतां चीनच्या कँटन बंदरापर्यंत पोंचलेला होता आणि चीनच्या व्यापारांतील भला मोठा हिस्सा या कंपनीच्याच हातीं होता. त्यामुळें कंपनीला या निर्बंधांची अडचण सगळ्यांत अधिक जाणवत होती. शिवाय पुढच्या पत्रांत आपल्याला ज्याचा विचार करावयाचा आहे असा तो यूरपमधील औद्योगिक क्रांतीचा काळ होता. या क्रांतीमध्यें इंग्लंड देश प्रामुख्यानें सर्वांच्या आघाडीस होता. वाफेच्या इंजिनाचा आतां शोध लागलेला होता; यंत्रांचा शोध आणि काम करण्याच्या नव्या नव्या पद्धती यांमुळें मालनिर्मितीचें काम सोपें होऊन निर्मितीचें प्रमाण वाढत होतें. विशेषतः कापडमाल फारच उत्पन्न होत

होता. खुद्द इंग्लंडच्या गरजेपेक्षां पुष्कळच अधिक असणारा हा माल विकणें तर जरूर होतें. म्हणून त्यासाठीं बाजारपेठा शोधून काढण्याची व मिळविण्याची आवश्यकता होती. इंग्लंडच्या सुदैवानें अगदीं याच वेळीं हिंदुस्थान देशावर इंग्लंडचा ताबा चालू लागला; त्यामुळें आपल्या मालाचा खप या देशांत जबरदस्तीनें करतां येईल अशी व्यवस्था करणें इंग्लंडला शक्य झालें व त्याप्रमाणें इंग्लंडनें केलेंही. तरीपण याखेरीज चीनची बाजारपेठही इंग्लंडला हवीच होती.

त्यासाठीं ब्रिटिश सरकारनें इ. स. १७९२ मध्यें लॉर्ड मॅकार्टने याच्या नेतृत्वाखालीं आपलें एक वकीलमंडळ पेकिंग येथें पाठविलें. त्या वेळीं तिसरा जॉर्ज हा इंग्लंडचा राजा होता. बादशहा चीन लुंग यानें या शिष्टमंडळाला भेट दिली आणि एकमेकांनीं एकमेकांना नजराणे वगैरे दिले; परंतु परदेशी व्यापारावरील जुन्या निर्बंधांत कांहींही बदल करण्याचें बादशहानें नाकारलें. त्या संबंधांत चीन लुंग यानें तिसऱ्या जॉर्जला जें उत्तर पाठविलें तें मोठें मौजेचें आहे. म्हणून त्यांतून मी तुला एक चांगला मोठा उतारा मुद्दाम देतों. त्या पत्रामध्यें लिहिलें होतें:

"हे राजा, तूं अनेक समुद्रांच्या मर्यादांच्या पलीकडे राहत असतोस; तथापि आमच्या सुधारणेमधील हितकर गोष्टींचा आपल्यालाही कांहीं अंश प्राप्त व्हावा, अशा नम्र उद्देशानें प्रेरित होऊन तूं आपलें शिष्टमंडळ तुझा खलिता आदरपूर्ण रीतीनें इकडे पोंचता करण्यासाठीं म्हणून पाठविलें आहेस. आपली निष्ठा दर्शविण्यासाठीं तूं आपल्या देशाचा मालही नजराणा म्हणून पाठविला आहेस. तुझा खलिता मीं वाचला आहे; त्याच्यामध्यें जी तळमळीची शब्दयोजना केलेली आहे, तीवरून तुझ्या ठिकाणचीं दिसून येणारी मजविषयींची आदरयुक्त विनम्रता ही मोठी प्रशंसनीय आहे. .....

"विशाल जगतावर प्रभुत्व गाजवीत असतां माझ्या दृष्टीपुढें फक्त एकच उद्देश आहे; तो म्हणजे सर्व दृष्टींनीं परिपूर्ण अशी राज्यव्यवस्था चालवावयाची आणि राजाचीं एकूणएक कर्तव्यें पार पाडावयाचीं. अजब दिसणाऱ्या महागऱ्या अशा वस्तूंमध्यें माझें चित्त रमत नाहीं. मला.....तुझ्या देशांत निर्माण होणाऱ्या मालाचा कांहींच उपयोग होत नाहीं. तेव्हां हे राजा, माझ्या भावनांचा तूं आदर करावास आणि भविष्यकाळीं माझ्याबद्दल तूं अधिकाधिक भक्ति आणि राजनिष्ठा व्यक्त करीत जावेंस हेंच तुझ्या कल्याणाचें आहे; म्हणजे अशा रीतीनें सदैव आमच्या गादीला नमून राहिल्यानें यापुढें तुला आपल्या देशाची शांतता आणि भरभराट हीं साधतां येतील.

"म्हणून भयकंपित चित्तानें या आदेशाचें पालन कर आणि निष्काळजीपणा करूं नकोस."

तिसरा जॉर्ज राजा आणि त्याचें मंत्रिमंडळ यांना हें उत्तर वाचून थोडासा एक प्रकारचा आश्चर्याचा धक्काच बसला असेल! परंतु या पत्रामध्यें स्वतःच्या ज्या उच्च प्रकारच्या सुधारणेविषयींचा गाढा विश्वास दिसून येतो आणि ज्या सामर्थ्याचा दिव्य आवेश दिसून येतो, ती सुधारणा आणि तें सामर्थ्य यांच्यामध्यें खरोखर आतां दीर्घ


बादशाह
चीन लुंगचें
साम्राज्य
१७९६ इ.स.
मांडलिक राज्ये
मंचूरिआ
कोरिया
जपान
मंगोलिया
चीन
तिबेट
नेपाळ
हिंदुस्थान
ब्रह्मदेश
सयाम
अन्नाम (व्हिएटनाम)

काळपर्यंत टिकून राहण्याची शक्ति राहिलेली नव्हती. मांचू राज्य वरून बलिष्ठ दिसत होतें आणि चीन लुंगच्या कारकीर्दीमध्यें तें प्रत्यक्षांत बलिष्ठ होतेंही;* परंतु आर्थिक व्यवस्थेंत होऊं लागलेल्या बदलामुळें त्या राज्याचा पायाच निर्जीव होत चालला होता. वर ज्या गुप्तमंडळांबद्दल मीं सांगितलें, तीं मंडळें असंतोषाचींच निदर्शक होतीं; परंतु खरी अडचण ही होती, कीं बदलत्या आर्थिक परिस्थितीशीं जुळती अशी देशाची सामाजिक व राजकीय व्यवस्था व्हावी असा कांहींच प्रयत्न चीनमध्यें होत नव्हता. दरम्यान इकडे या नवीन आर्थिक फेरबदलांत पश्चिमेकडील देशांनीं चांगलीच आघाडी मारली होती आणि भरधांव पुढें जाऊन प्रतिक्षणीं ते आपलें सामर्थ्य अधिकाधिक वाढवीत होते. चीन लुंगनें तिसऱ्या जॉर्ज राजाला एवढें हें गर्वभराचें उत्तर पाठविलें ना, तेव्हांपासून सत्तर वर्षांच्या आंतच इंग्लंड आणि फ्रान्स यांनीं चीनला आपल्यापुढें वांकावयास लावलें आणि चीनचा सगळा अभिमान आणि सामर्थ्याचा ताठा धुळीस मिळाला.

परंतु ही सगळी हकीगत माझ्या चीनबद्दच्या पुढच्या पत्रासाठीं मला राखून ठेवली पाहिजे. इ. स. १७९६ मध्यें चीन लुंग मरण पावला त्या वेळीं आपण अठराव्या शतकाची जवळजवळ अखेरच गांठली; परंतु हें शतक संपण्यापूर्वी तिकडे अमेरिकेंत आणि यूरपमध्यें पुष्कळच विलक्षण घटना घडून आलेल्या होत्या. यूरपमध्यें पुष्कळच भानगडी उत्पन्न झाल्या होत्या आणि युद्धेंही उद्भवलीं होतीं. या काळांत त्यामुळें तर चीनवरील पश्चिमेकडील दडपण पाव शतकपर्यंत थोडें कमी झालें होतें. म्हणून पुढच्या पत्रांत आपण आतां यूरपमध्यें जाऊं आणि तेथल्या इतिहासाचें सूत्र अठराव्या शतकाच्या सुरुवातीपासून हातीं घेऊन हिंदुस्थान आणि चीन या देशांतील या शतकांतल्या घडामोडींशीं त्याचा धागा जुळवून देऊं.

परंतु हें पत्र पुरें करण्यापूर्वी मला इकडे पूर्वेकडे रशियाची जी प्रगति झाली, तिच्याबद्दल तुला सांगावयाचें आहे. इ. स. १६८९ मध्यें चीन व रशिया यांचा नरकिन्स्क येथें तह झाला, तेव्हांपासून पूर्वेकडील रशियाचें वर्चस्व दीडशें वर्षेंपर्यंत सतत वाढतच गेलें. इ. स. १७२८ मध्यें रशियाच्या नोकरींत असणाऱ्या व्हायटस बेरिंग नावाच्या एका डॅनिश कप्तानानें अमेरिका खंड व आशिया खंड यांच्यामधील सामुद्रधुनीचा शोध लावला. त्याच्या नांवावरून या सामुद्रधुनीला आजही बेरिंगची सामुद्रधुनी म्हणतात हें कदाचित् तुला ठाऊक असेल. ही सामुद्रधुनी ओलांडून बेरिंग अलास्कामध्यें गेला आणि तो प्रदेश रशियाचा आहे असें त्यानें जाहीर केलें. अलास्का हें फर* जातीच्या लोकरीच्या चामड्याच्या उत्पत्तीचें फारच मोठें ठिकाण होतें आणि अशा चामड्याला चीनमध्यें फार मोठी मागणी होती. त्यामुळें रशिया आणि चीन

* अलास्का भागांत ( उत्तर अमेरिकेंत ) एका विशिष्ट जातीची मेंढी असून तिचे केंस अत्यंत मृदु असतात. या केंसांसह तिचें कांतडें पांघरण्यासाठीं तयार करतात. त्याची किंमत फार असते. हिंदीमध्यें या केंसांना समूर म्हणतात, तर इंग्रजींत फर म्हणतात.

यांच्या दरम्यान हा चामड्याचा खास व्यापार निर्माण झाला. चीनमध्यें हें चामडें व तज्जन्य पदार्थ यांना खरोखर अठराव्या शतकाच्या अखेरीला एवढी मोठी मागणी होती, कीं रशिया कॅनडामधील हडसन आखातांतून या मालाची आयात इंग्लंडमार्गे आपल्या देशांत करी आणि तो माल मग सायबेरियामधील बैकल सरोवराजवळील कियाख्ताच्या मोठ्या कातड्याच्या बाजारांत पाठवीत असे. केवढा प्रचंड प्रवास या चामड्याला करावा लागत असे पाहा!

रोजच्या क्रमांत थोडा बदल म्हणून हें पत्र या पत्रमालिकेंतील आतांपर्यंतच्या माझ्या बहुतेक पत्रांहून लहान आहे. हा फेरफार तुला पसंत पडेल अशी आशा आहे.

## ९५

# यूरपमधील अठराव्या शतकांतील भिन्न भिन्न कल्पनांमधील झगडा

१९ सप्टेंबर, १९३२

आतां आपण यूरपमध्यें परत जाऊं आणि त्या खंडाच्या भवितव्याच्या बदलणाऱ्या रंगांचें निरीक्षण करूं. फार मोठाले फेरबदल होऊं घातलेले आहेत, अशा काळाच्या अगदीं दाराशीं या वेळीं यूरप खंड पोंचलेलें आहे. या फेरबदलांनीं एकंदर सर्वच इतिहासावर फार मोठा परिणाम केलेला आहे. या फेरबदलांचा अर्थ नीट समजावून घ्यावयाचा, तर वरवर दिसणाऱ्या गोष्टींच्या जरा आंत डोकावून तत्कालीन माणसांच्या मनांत काय काय घडामोडी चाललेल्या होत्या, हें आपल्याला पाहिलें पाहिजे. कारण कोणतेंही बाह्य कार्य झालेलें जें आपण पाहतों, तें विचार आणि विकार, पूर्वग्रह, दुर्ग्रह आणि अंधश्रद्धा, आशा आणि भीति यांच्या संकलित परिणामांचें बाह्य रूप असतें आणि या त्याच्या मूळ कारणाचें स्वरूप जर आपल्याला नीट समजलेलें नसलें, तर त्या कार्याचाही खरा अर्थ आपल्या ध्यानांत येणार नाहीं. परंतु अशीं हीं मूळ कारणें समजून घेणें किंवा सांगणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं आणि इतिहासांतील विशेष महत्त्वाच्या ठळक ठळक अशा प्रसंगांची घडण ज्यांमुळें घडलीं अशीं हीं कारणें आणि हेतू यांचें यथायोग्य स्वरूप लिहून अगदीं वेंचकपणें आणि हुबेहूब चित्रित करण्याचें सामर्थ्य माझ्या ठिकाणीं आहे असें जरी गृहीत धरलें, तरीसुद्धां आधींच अवजड आणि कंटाळवाणीं होत आलेलीं हीं पत्रें त्यामुळें आणखीच कंटाळवाणीं करावीं असें मला वाटत नाहीं. एखाद्या विषयाच्या किंवा विशिष्ट दृष्टिकोणाच्या भरांत केव्हां केव्हां मला वाटतें, मी वाजवीहून अधिक खोल पाण्यांत शिरत असतों; पण काय

करणार? हा प्रकार तुला चालवून घेतला पाहिजे. तेव्हां आजचा मुद्दा काय, तर हीं जीं आंतलीं कारणें आहेत त्यांच्याविषयीं फार खोलांत कांहीं आपणांला जातां येणार नाहीं; परंतु त्यांच्याकडे दुर्लक्ष करणें हेंही अगदींच वेडेपणाचें होईल. कारण, असा वेडेपणा करायचाच असें आपण म्हटलें, तर इतिहासाचें खरें रहस्य आणि सौंदर्य यांना आपण पारखे होऊं.

सोळाव्या शतकांत आणि सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत यूरप खंडांत जी बंडाळी आणि अंदाधुंदी माजली होती, ती आपण पाहिली आहे. सतराव्या शतकाच्या मध्याला (१६४८) वेस्ट फालियाचा तह होऊन तें भयंकर तीस वर्षांचें युद्ध एकदांचें संपलें. त्यानंतर एक वर्षानें इंग्लंडमधील आपसांतील यादवी संपली आणि पहिल्या चार्ल्स राजाचें डोकें उडविण्यांत आलें. यानंतर थोडासा त्या मानानें शांततेचा काळ आला. यूरप खंडांतील देश त्या वेळीं पार थकून गेल्यासारखे झालेले होते. अमेरिकेशीं आणि इतर देशांशीं व्यापार सुरू झालेला होता त्यामुळें यूरप खंडांत पैसा येऊं लागला होता. त्यामुळें परिस्थितीचा जाच थोडा हलका झाला होता आणि वर्गावर्गांतील चीड आणि ताण हीं थोडीं कमी झालीं होतीं.

इंग्लंडमध्यें या काळांत एक निःशस्त्र क्रांति झाली आणि तीमुळें दुसरा जेम्स् राजा हांकलला जाऊन पार्लमेंटचा विजय संपूर्ण झाला (१६८८). पार्लमेंटनें लढाई खरी जिंकली होती पहिल्या चार्ल्सच्याविरुद्ध झालेल्या यादवीमध्येंच. आतां जी ही शांततामय क्रांति झाली, तिनें चाळीस वर्षांपूर्वीं शस्त्रबळावर झालेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब केलें एवढेंच.

अशा रीतीनें इंग्लंडमध्यें राजाला मागच्या जागेवर जाऊन बसावें लागलें; परंतु यूरप खंडांत स्वित्झर्लंड किंवा हॉलंड यांच्यासारखे कांहीं छोटे प्रदेश सोडले, तर बाकीच्या ठिकाणीं मात्र निराळी परिस्थिति अद्यापि चालू होती. त्या ठिकाणीं अनियंत्रित राजसत्तेचीच परंपरा अद्यापि चालू होती आणि महान् बादशहा फ्रान्सचा चौदावा लुई हा अजून या देशांत राजेपणाचा अगदीं उत्कृष्ट नमुना आणि कित्ता समजला जात होता. सतरावें शतक हें यूरप खंडांत जवळजवळ चौदाव्या लुईच्या कारकीर्दीचें आणि वर्चस्वाचें शतक असें म्हणतां येईल. आपल्यापुढें कशाचें ताट वाढून ठेवलेलें आहे याची बिलकुल पर्वा न करतां, पहिल्या चार्ल्सची जी गति त्यांच्या डोळ्यांसमोर झाली तिच्यावरूनही कांहीं धडा न घेतां, या राजेलोकांनीं आपलें अनियंत्रित राजेशाहीचें सोंग पहिल्याइतक्याच डामडौलानें, इतमामानें आणि पोकळ बडेजावीनें चालू ठेवलेलें होतें. देशांतील सगळी सत्ता आणि संपत्ति केवळ आपली; देश म्हणजे जणुं कांहीं आपली एखादी खासगी मालमत्ताच, अशी त्यांची भूमिका होती. ४०० वर्षांपूर्वीच इरास्मस् नांवाच्या एका प्रसिद्ध विद्वान् डच गृहस्थानें लिहिलें आहे :

"वास्तविक गरुड पक्षी सुंदर नाहीं, गाणारा नाहीं, खाण्यालाही उपयोगी नाहीं;

परंतु उलट तो मांसभक्षक आहे, अधाशी आहे, सगळ्या पक्ष्यांना तो अगदीं नकोसा वाटतो, सगळ्यांना त्याचें संकट वाटतें, त्याच्या ठिकाणीं इतरांना दुःख देण्याचें फार मोठें सामर्थ्य आहे आणि इतर कोणाही पक्ष्याहून अधिक प्रमाणांत इतरांना दुःख देण्याची इच्छाही याच्या ठिकाणीं आहे. तरीपण बाकीचे एकूण एक पक्षी सोडून अशा या एकट्या फक्त गरुडाच्या ठिकाणींच काय तीं राजपदाचीं सर्व लक्षणें आहेत, अशी जगांतील शहाण्या लोकांची समजूत चालत आलेली आहे....."

आजकाल हे राजे लोक बहुतेक नाहींसे झालेले आहेत. जे कांहीं थोडे आहेत ते भूतकालीन प्रेक्षणीय वस्तू म्हणून मात्र उरलेले आहेत. त्यांच्या ठिकाणीं सत्ता जवळ-जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. त्यांच्याकडे जरी आतां आपण लक्ष दिलें नाहीं तरी चालू शकेल; परंतु त्यांची जागा आतां दुसऱ्या आणि त्यांच्याहून अधिक घातक अशा लोकांनीं बळकावलेली आहे, असे जे आधुनिक काळचे साम्राज्यवादी आणि लोखंड, तेल, चांदी आणि सोनें यांचे राजे आहेत, त्यांच्या निशाणांवरसुद्धां वरच्यासारख्या गरुडाचेंच चिन्ह असणाऱ्या पूर्ण लायकीचे ते लोक आहेत.

यूरपमधील या राजशाह्यांमुळें प्रबळ मध्यवर्ती सत्ता असलेले असे देश निर्माण झाले. जुन्या सरंजामशाहीच्या काळांतील भूस्वामी आणि भूदास या कल्पना आतां नाहींशा झाल्या होत्या किंवा नाहींशा होण्याच्या बेताला आल्या होत्या. राजा किंवा स्वामी जाऊन त्या जागीं देश हाच एक स्वतंत्र अधिकारमूर्ति समजण्याची कल्पना रूढ झाली. व्यक्तीला जें सत्ताकेंद्र म्हणून स्थान होतें, तें आतां देशाच्या ठिकाणीं कल्पिण्यांत येऊं लागलें. रिचिलियो व मॅझेरीन या दोन कर्तबगार मंत्र्यांच्या कारकीर्दीत फ्रान्स देशानें या कल्पनेच्या बाबतींत पहिलें पाऊल टाकून इतरांना मार्ग दाखविला. अशा रीतीनें राष्ट्रभावना व राष्ट्रनिष्ठा लोकांत निर्माण झाली. कांहीं अंशीं देशभक्तीच्या भावनेचाही उदय झाला. आतांपर्यंत लोकांच्या जीवनांत धर्माला सगळ्यांत महत्त्वाचें स्थान होतें; परंतु धर्म यापुढें मागें पडला आणि नव्याच कल्पना त्याच्या जागीं उभ्या राहिल्या. या कल्पनांबद्दलच पुढें या पत्रांत तुला सांगायचा माझा विचार आहे.

सतराव्या शतकाचें याहूनही आणखी एक महत्त्व आहे; कारण या शतकांतच आधुनिक शास्त्रसंशोधनाचा पाया घालण्यांत आला आणि जागतिक बाजारपेठ उघडली गेली. एवढी ही प्रचंड नवी बाजारपेठ उघडली गेल्यामुळें यूरपमधील जुनी आर्थिक घडी पार कोलमडून पडली; म्हणून यानंतर यूरप खंडांत आणि आशिया खंडांत ज्या पुष्कळशा घडामोडी घडून आल्या त्यांचें खरें स्वरूप लक्षांत घ्यावयाचें, तर ही नवीन जागतिक व्यापारपेठेची गोष्ट नेहमीं डोळ्यांपुढें बाळगली पाहिजे. प्रथम बाजारपेठ निर्माण झाली; शास्त्रीय संशोधनाची सुरुवात त्यामागून झाली; परंतु जागतिक बाजारपेठेच्या गरजा भागविण्याचीं साधनें या शास्त्रीय संशोधनांतूनच निर्माण झालीं.

अठराव्या शतकांत वसाहती व साम्राज्य यांच्यासाठीं चढाओढ, विशेषतः

फ्रान्स व इंग्लंड याच्यामध्यें उत्पन्न झाली. तिचा परिणाम म्हणून या दोन देशांमध्यें यूरप खंडांत आणि कॅनडांत, एवढेंच नव्हे, तर हिंदुस्थानमध्येंही युद्ध उद्भवलें हें आपण मागें पाहिलेंच आहे. या लढाया संपल्यानंतर अठराव्या शतकाच्या मध्याला पुन्हां एकदां सामान्यतः पाहतां शांततेचा काळ आला. वरवर पाहतां यूरप खंडांत जिकडे तिकडे शांतता आहे, कसलीही खळबळ नाहीं, असें दिसून येऊं लागलें. यूरप खंडातील अनेक राजदरबारीं शिष्टाचारसंपन्न व सुसंस्कृत अशा थोर आणि सुंदर सभ्य स्त्रीपुरुषांची नुसती गर्दी उसळून गेली; परंतु ही सगळी वरवरची शांतता होती. खालच्या बाजूला पुष्कळच खळबळ चाललेली होती; लोकांच्या मनांत नवीन विचार आणि नवीन सिद्धांत यांची दंगल माजलेली होती. त्याचप्रमाणें दरबारांतील वातावरणाच्या जादूनें भारलेले लोक आणि वरिष्ठ वर्गांपैकीं कांहीं थर सोडले, तर बाकीच्या बहुतेक समाजांना वाढत्या दारिद्र्यामुळें अधिकाधिक हाल व यातना सोसाव्या लागत होत्या. म्हणून यूरप खंडांत अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत दिसून येणारी शांतता ही अगदीं फसवी शांतता होती; ती वादळापूर्वीची शांतता होती. इ. स. १७८९ च्या १४ जुलै रोजीं हें वादळ यूरपमधील सर्वश्रेष्ठ राजशाहीच्या राजधानींत—पॅरिस येथें—उठलें. त्यामध्यें ही राजधानी पार उधळून गेली आणि तिच्याबरोबर शेंकडों जुनाट, निरुपयोगी, शेवाळ माजलेल्या चालीरीती आणि हक्कसंबंधही नष्ट झाले.

हें वादळ आणि त्यापासून घडून आलेले फेरबदल यांची ही पूर्वतयारी नवीन कल्पनांच्या रूपानें फ्रान्समध्यें आणि यूरप खंडांतील इतरही देशांत बऱ्याच आधींपासून चालू होती. मध्ययुगाच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत यूरप खंडामध्यें धर्माचें फार मोठें वर्चस्व होतें. त्यानंतर रेफर्मेशनच्या काळींसुद्धां त्याचें हें वर्चस्व कांहीं कमी झालें नाहीं. कोणत्याही गोष्टीचा विचार, ती गोष्ट राजकीय किंवा आर्थिक स्वरूपाची असली तरीही धर्माच्या चष्म्यामधून होत असे. धर्म हा यूरप खंडांत एका सुसंघटित संस्थेच्या हातीं असून धर्ममत म्हणजे पोपचें किंवा धर्मपीठाच्या श्रेष्ठ अधिकाऱ्यांचें मत, असाच तेथें अर्थ होता. समाजाची रचना कांहींशी हिंदुस्थानांतील जातिसंस्थेच्या रचनेच्या धर्तीवर होती. जातिसंस्थेच्या मुळांतील पहिली कल्पना पाहिली, तर उद्योगधंदे किंवा कामधंदे यांच्या धोरणानें समाजांतील निरनिराळे गट पडावयाचे अशीच होती. यूरप खंडांतही मध्ययुगांत समाजरचनाविषयक ज्या कल्पना होत्या, त्याच्याही मुळाशीं ही कामधंद्यांनुसार सामाजिक वर्ग पाडावे हीच कल्पना होती. अशा एका वर्गांतील सर्व व्यक्ती, हिंदुस्थानांतील एका जातींतील सर्व व्यक्तींप्रमाणें एकमेकींशीं पूर्ण समान असत; परंतु दोन किंवा अधिक वर्गांमध्यें मात्र अशी परस्पर-समता नसे. निरनिराळ्या वर्गांमध्यें असणारी ही विषमता ही जणुं तत्कालीन सर्व समाजरचनेचा एकमेव पायाच होती; कोणीही या विषमतेला विरोध करीत नव्हता. या समाजव्यवस्थेखालीं ज्यांना कमीपणा किंवा हाल सोसण्याचा प्रसंग असे त्यांना "तुमच्या कष्टाचें फळ तुम्हांला स्वर्गांत मिळेल" असें सांगण्याचा परिपाठ होता. अशा रीतीनें परलोकाचीं पुराणें

सागून धर्मसंस्था विषमतेच्या अन्याय्य पायावर आधारलेली समाजरचना उचलून धरण्याचा आणि त्या अन्यायापासून लोकांचे विचार दुसरीकडे वळावेत अशा प्रकारचा प्रयत्न करीत असे. त्याचप्रमाणें धर्मसंस्था ज्याला विश्वस्तभावाचें–ट्रस्टीचें–तत्त्व म्हणतात त्याचाही उपदेश – पुरस्कार–करीत असे. या तत्त्वाचा अर्थ असा : संपत्तिमान् मनुष्य हा संपत्तीचा मालक नसून त्याच्याजवळची संपत्ति ही गरिबांची त्याच्याजवळ असलेली "ठेवच" आहे; त्याचप्रमाणें जमीनदाराच्या कबजांत असलेली सगळी जमीन ही पण कुळाची एक प्रकारची त्याच्याकडे सांभाळण्यासाठीं दिलेली वस्तूच होय. विषमतेमुळें उत्पन्न होणाऱ्या अडचणींच्या परिस्थितीचा परिहार करण्याची धर्मपीठाची ही एक शक्कल होती. या तत्त्वामुळें संपन्न लोकांच्या प्रत्यक्ष परिस्थितींत कांहींच फरक होत नव्हता किंवा गरिबांनाही त्यामुळें कांहीं वाढतें सुखसमाधान लाधत नव्हतें. कितीही चतुराईच्या खुलाशाचें पुराण तुम्हीं भुकेनें कळवळलेल्या मनुष्यापुढें वाचलें, तरी त्यामुळें त्याची भुकेची तळमळ का शमणार आहे?

प्रॉटेस्टंट आणि कॅथॉलिक यांच्यामधील घोर युद्धें, कॅथॉलिक आणि कॅल्व्हिनिस्ट-पंथांची परस्परांबद्दलची अत्यंत तीव्र असहिष्णुता आणि इन्क्विझिशनचें न्यायासन, या सर्वांचा उगम या धार्मिक आणि वर्गविशिष्ट–जातीय–मनोवृत्तींमधूनच झाला. या सर्व प्रकरणाचा तूं स्वतःच्या मनाशीं नीट विचार करून पाहा! असें म्हणतात, कीं प्यूरिटन लोकांनीं लाखों स्त्रियांना त्या चेटक्या आहेत या आरोपावरून जिवंत जाळून टाकलें. या काळांत शास्त्रीय संशोधनांतील नव्या कल्पनाही सगळ्या दडपून टाकण्याचे प्रयत्न झाले. कारण धर्मपीठाचा जगताबद्दलचा, जीवनाबद्दलचा जो दृष्टिकोन होता, त्याला या शास्त्रीय कल्पना म्हणे विरोधी होत्या. अशा रीतीनें ही जीवनविषयक जुनी भूमिका सर्वस्वीं स्थिर, न बदलणारी होती. तिच्याप्रमाणें प्रगतीचा प्रश्नच उद्भवण्याचें कारण नव्हतें.

परंतु जीवनविषयक या सर्व जुन्या कल्पना सोळाव्या शतकापासूनच पुढें हळू-हळू बदलत गेल्या असें दिसतें. या सुमारास शास्त्रीय संशोधनाचा उदय झाला आणि धर्माची ही सर्वगामी पकड ढिली होऊं लागली. राजकारण आणि अर्थशास्त्र यांचा धर्माहून अलगपणें विचार होऊं लागला. सतराव्या आणि अठराव्या शतकांत बुद्धिवादाची वाढ झाली असें म्हटलें जातें. हा बुद्धिवाद म्हणजे काय, तर अंधश्रद्धेऐवजीं बुद्धीला प्रामाण्य देण्याची पद्धति. त्याचप्रमाणें अठराव्या शतकांतच धार्मिक सहिष्णुतेचा, मतस्वातंत्र्याचा पूर्ण विजय झाला असेंही समजलें जातें. कांहीं अंशीं हें म्हणणें खरेंही आहे; परंतु हा जय झाला याचा खरा अर्थ असा होता, कीं पूर्वीपेक्षां लोक धर्माचें आतां कमी महत्त्व मानूं लागले होते. सहिष्णुता, धर्ममतस्वातंत्र्य याचा अर्थ जवळजवळ धर्माविषयीं अनास्था, उदासीनता असा केला तरी चालेल. कोणत्याही एखाद्या गोष्टीबद्दल लोकांची भावना विशेष तीव्र असते त्या वेळीं त्यांच्या ठिकाणीं तद्विरोधी गोष्टींना सवलतीनें वागविण्याची, सहिष्णुतेची भावना असूंच शकत नाहीं; त्यांच्या

भावनेची ही तीव्रता जेव्हां थोडीशी कमी होते तेव्हां मग आम्ही मोठे सहिष्णु आहोंत, उदार आहोंत, असें मोठ्या प्रौढीनें लोक पुकारूं लागतात. औद्योगीकरणाची जशी वाढ झाली, मोठमोठ्या यंत्रांचा जसा शोध लागला, तसतशी लोकांची धर्माविषयींची अनास्था वाढतच गेली. शास्त्राच्या उदयानें यूरप खंडांतील जुनी श्रद्धावृत्ति पार उखडून काढली. नवे उद्योगधंदे आणि नवीन आर्थिक व्यवहार यांमुळें लोकांपुढें नवेच प्रश्न उपस्थित होऊन त्यांतच त्यांचीं मनें गढून जाऊं लागलीं. त्यामुळें यूरपांतील लोकांनीं धर्मश्रद्धा किंवा धर्ममतें या प्रश्नावर एकमेकांचीं डोकीं फोडण्याची आपली संवय सर्वस्वीं जरी नाहीं, तरी बहुतेक टाकून दिली; त्याऐवजीं ते आर्थिक आणि सामाजिक वादासाठीं आतां एकमेकांचीं डोकीं फोडूं लागले.

यूरपांतील या धार्मिक वर्चस्वाच्या काळाची आजच्या हिंदुस्थानशीं तुलना करणें मोठें बोधपर आहे. हिंदुस्थान देश हा मोठा धर्मप्रवण आणि अध्यात्मप्रवण देश आहे असें पुष्कळदां स्तुति करण्याच्या हेतूनें आणि हेटाळणीही करण्याच्या हेतूनें—दोन्ही हेतूंनीं—म्हटलें जात असतें. याच्या उलट, यूरप खंड हें धर्मविरहित आहे व त्याला या जगतांतील सगळ्या सुखसोयींच्या साधनांची प्रमाणाबाहेर आवड आहे असें म्हणतां येईल असें दाखवून हिंदुस्थान व यूरप खंड यांमध्यें भेद दाखविला जात असतो; परंतु हिंदुस्थानांतील लोकांच्या जीवनविषयक भूमिकेमधील धार्मिक प्रवृत्तीच्या प्रमाणापुरतेंच बोलावयाचें, तर खरोखर या धार्मिक हिंदुस्थान देशांत आणि सोळाव्या व सतराव्या शतकांमधील यूरप खंडांत फारच विलक्षण सारखेपणा आहे. अर्थात् हा सारखेपणा असाच इतरही क्षेत्रांमध्यें दाखवितां येणार नाहीं; परंतु आमच्या जीवनक्रमांत धर्मश्रद्धा आणि धार्मिक दुराग्रह यांचें आम्ही माजवीत असलेलें फाजील स्तोम, आमच्या राजकीय व आर्थिक प्रश्नांमध्यें आमच्या धार्मिक गटांच्या हितसंबंधांची आम्ही करीत असलेली गल्लत, आमचीं जातीय भांडणें, या किंवा इतर अशाच प्रकारच्या प्रश्नांच्या बाबतींत जी अवस्था आमच्या देशांत आहे ती, आणि यूरप खंडांतील वर सांगितलेली धर्मविषयक प्रवृत्ति यांच्यामध्यें कांहीं सुद्धां फरक नाहीं; दोहोंचें स्वरूप अगदीं एक आहे. एका बाजूला व्यवहारनिष्ठ आणि जडवादी पश्चिम आणि दुसऱ्या बाजूला अध्यात्मवादी आणि परलोकनिष्ठ पूर्व असा यांत कांहींसुद्धां प्रश्न नाहीं. मग दोहोंत फरक कुठेसा आहे? तर पश्चिमेंत उद्योगधंद्यांची फार मोठी वाढ झालेली असून ज्या त्या कामासाठीं मोठ्या प्रमाणावर यंत्रांचा उपयोग वाढलेला आहे. याचे जे चांगले आणि वाईट परिणाम व्हावयाचे, ते आज पश्चिमेकडील लोकांच्या ठिकाणीं झालेले आहेत; उलट, पूर्व अजून बहुतांशीं औद्योगिक युगाच्या आधींच्या शेतकी युगांतच आहे; हाच काय तो फरक आहे.

धार्मिक मतस्वातंत्र्य आणि बुद्धिवाद यांची ही वाढ यूरप खंडांतही कांहीं हूं म्हणून चुटकीसरशीं झाली नाहीं. ती हळूहळू आणि क्रमाक्रमानेंच घडून आली. प्रथम प्रथम या प्रवृत्तीची वाढ होण्याला पुस्तकांची कांहींच मदत मिळाली नव्हती. कारण

ख्रिस्ती धर्मावर जाहीरपणें टीका करावयाची म्हणजे कैदेची किंवा दुसरी कसली तरी शिक्षा भोगावी लागावयाची असा अर्थ होता. जर्मनीमध्यें एका तत्त्वज्ञानें एकदां चीनचा कॉन्फ्यूशियस याची फारच स्तुति केली ; त्याबद्दल त्याला देशांतून हांकलून देण्यांत आलें. कारण काय, तर अशी ही फाजील स्तुति करणें म्हणजे ख्रिस्ती धर्माचा कमीपणा करण्यासारखें आहे असा अर्थ निघाला. परंतु अठराव्या शतकांत नवीन तत्त्व-कल्पना अधिकाधिक स्पष्ट होत गेल्या आणि त्यांचा प्रसारही पुष्कळ वाढला. तेव्हां मात्र या विषयासंबंधींचे ग्रंथ लिहिण्यांत येऊं लागले. बुद्धिवाद आणि अशाच प्रकारचे इतर विषय यांसंबंधीं लिहिणारा तत्कालीन सर्वांत अधिक प्रख्यात असा ग्रंथकार म्हणजे व्हाल्टेअर हा फ्रेंच गृहस्थ होय. त्याला त्याच्या लिखाणावरून कैद भोगावी लागली व हद्दपारीही भोगावी लागली. अखेरीस तो जिनीव्हाजवळ फर्नें येथें जाऊन राहिला. तुरुंगांत असतांना त्याला कागद किंवा शाई देत नसत, म्हणून तो शिशाच्या तुकड्यानें छापील पुस्तकांत दोन ओळींच्यामध्यें जी कोरी जागा असते त्या जागेंत कवितेच्या ओळी रचून लिहीत असे. अगदीं लहान वयाचा असतांनाच त्याची ख्याति सर्वत्र पसरली होती. तो केवळ दहा वर्षांचा असतांना आपल्या ठिकाणच्या बुद्धिमत्तेनें त्यानें लोकांचें लक्ष वेधून घेतलें होतें, अशी मोठी नवलाची गोष्ट सांगतात. अन्याय आणि धर्मवेडेपणा, दुराग्रही श्रद्धा यांचा व्हाल्टेअरला तिटकारा असून त्यांच्या विरुद्ध त्यानें झगडा चालविलेला होता. Ecrasez L'infame या सैतानाला, दुर्बुद्धीला, लज्जास्पद गोष्टीला, या अंधश्रद्धेला चिरडून टाका, ही त्याची प्रसिद्ध घोषणा होती. फार वृद्ध होईपर्यंत तो जगला ( १६९४ ते १७८८ ) आणि त्यानें लिहिलेल्या ग्रंथांची संख्या फारच प्रचंड आहे. ख्रिस्ती धर्मावर तो टीका करीत असे. यामुळें जुन्या सनातन ख्रिस्ती लोकांच्या मनांत त्याच्याबद्दल फार तिटकारा होता. एका ग्रंथांत त्यानें लिहिलें आहे, "जो मनुष्य कांहींही चांगल्यावाइटाची चौकशी न करतांच धर्माला मान्यता देतो तो मनुष्य आणि स्वतःच्या मानेवर जोखड ठेवूं देणारा बैल, हे दोन्ही सारखेच होत." व्हाल्टेअरच्या लिखाणाचा परिणाम फार मोठा होऊन पुष्कळ लोकांचा कल बुद्धिवादाला आणि नव्या कल्पनांना अनुकूल असा झाला. फर्नें येथील त्याचें तें जुनाट घर आजही कितीएक लोकांना एक पवित्र यात्रेचें ठिकाण वाटतें.

दुसरा एक असाच श्रेष्ठ ग्रंथकार म्हणजे जीन जॅक्स रूसो हा होय. हा व्हाल्टेअरचा समकालीनच, परंतु व्हाल्टेअरपेक्षां वयानें लहान होता. त्याचा जन्म जिनीव्हा येथें झाला. अजूनही जिनीव्हाच्या लोकांना या गोष्टीचा मोठाच अभिमान वाटत असतो. तेथील त्याचा तो पुतळा तुला आठवतो का ? रूसोच्या राजकीय आणि धर्मविषयक लिखाणानें फारच विरोधी हाकाटी निर्माण झाली. तरीपण त्याच्या कादंबऱ्या आणि जरासे धाडसी असे नवीन सामाजिक आणि राजकीय सिद्धांत यांच्यामुळें लोकांचीं मनें नवीन कल्पनांनीं आणि नवीन कार्याविषयींच्या निश्चयांनीं भारलीं गेलीं हें निःसंशय. याचे ते राजकीय सिद्धांत आज अगदींच जुनाट आणि

निरुपयोगी वाटतात; परंतु फ्रान्समधील लोकाना तेथील त्या महान् क्रांतीसाठीं तयार करण्याच्या कामीं त्या सिद्धांतांचा केवढा तरी मोठा उपयोग झाला. रूसोनें स्वतः क्रांतीची शिकवण केव्हांच दिली नाहीं, किंबहुना अशी क्रांति होईल अशी त्याची अपेक्षा सुद्धां नसावी; परंतु त्याच्या पुस्तकांनीं आणि सिद्धांतांनीं मात्र निश्चितपर्णे लोकांच्या मनांत अशीं बीजें रुजाविलीं, कीं त्यांचेंच फळ म्हणजे फ्रेंच राज्यक्रांति. त्याचा सर्वांत जास्त प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे Social Contract (Du Contrat Social) 'सामाजिक करार' हा होय. त्याची सुरुवात, "मनुष्य जन्माला येतो स्वतंत्र म्हणून; पण जिकडे पाहावें तिकडे तो शृंखलांनीं जखडलेलाच आढळतो" या प्रसिद्ध वाक्यानें झालेली आहे. (अर्थात् निव्वळ स्मरणावर विसंबून हें वाक्य मी सांगतों आहें.)

याखेरीज रूसो मोठा शिक्षणशास्त्रज्ञही होता आणि त्यानें सुचविलेल्या कितीएक शिक्षणपद्धती आजकाल शाळांमधून अमलांत आलेल्या आहेत.

व्हाल्टेअर आणि रूसो यांच्याखेरीज आणखीही पुष्कळ नामांकित विचारवंत आणि ग्रंथकार फ्रान्समध्यें अठराव्या शतकांत होऊन गेले; पण आणखी एकाचेंच नांव मी तुला येथें सांगणार आहें. तें म्हणजे मॉंटेस्क्यू याचें. यानें इतर बऱ्याचशा ग्रंथांबरोबरच ॲस्प्रॉय डी लॉइ (कायद्याचें तत्त्व या विषयावरील ३१ खंडांचा) हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिलेला आहे. याच काळांत फ्रान्समध्यें एक ज्ञानकोश निर्माण झाला. त्यांमध्यें डिडेरॉट याचे आणि दुसऱ्या पुष्कळ विद्वान् ग्रंथकारांचे राजकीय आणि सामाजिक विषयांवरचे पुष्कळसे लेख होते. खरोखरच त्या काळीं फ्रान्स देश म्हणजे तत्त्वज्ञानी आणि विचारप्रवर्तक लोकांचें जणुं माहेरघरच होऊन गेला आणि विशेष म्हणजे त्यांच्या ग्रंथांचें वाचनही फार मोठ्या प्रमाणावर झालें. इतकें, कीं सर्वसामान्य लोकांच्या सर्व विचारसरणीवर त्यांच्याच विचारांची छाप पडली आणि जे ते लोक त्यांच्याच सिद्धांतांबद्दल आपसांत वाद करूं लागले. अशा रीतीनें फ्रान्समध्यें धार्मिक माथेफिरूपणाच्या किंवा दुराग्रहाच्या विरुद्ध आणि राजकीय किंवा सामाजिक हक्कदारीविरुद्ध अशा मतांचा एक चांगला भक्कम प्रवाह व एक मोठा वर्ग निर्माण झाला. तरीपण आश्चर्याची गोष्ट ही, कीं सामान्य लोक काय किंवा हे तत्त्वज्ञ काय, कोणालाही 'राजालाच उडवून टाकावें' अशी कांहीं कल्पना आली नाहीं. प्रजासत्ताक राज्याची कल्पना ही त्या काळीं लोकमान्य झाली नव्हती. प्लेटोच्या तत्त्वज्ञ राजासारखा एखादा आदर्श राजा अजूनही निर्माण होऊं शकेल आणि तो आपल्यावरील अवजड ओझीं कमी करून आपल्याला न्याय देईल आणि कांहीं अंशीं स्वातंत्र्य देईल अशीच अजून लोकांना आशा वाटत होती! निदान त्या वेळच्या तत्त्वज्ञांच्या लिहिण्याचा सूर तरी हा असा आहे; परंतु ज्यांना हाल व यातना सोसाव्या लागत होत्या, त्या सामान्य लोकांना राजा कितपत आवडत होता याची मात्र शंकाच आहे.

फ्रान्समध्यें झाली तशा प्रकारची राजकीय विचारांची वाढ इंग्लंडमध्यें झाली नाहीं.

म्हणच पडली आहे, कीं इंग्रज मनुष्य हा राजकीय प्राणीच नाहीं; फ्रेंच मनुष्य मात्र तसा आहे. तें कसेंही असलें तरी एक गोष्ट अशी, कीं १६८८ मधील राज्यक्रांतीमुळें इंग्लंड-मधील आणीबाणीची परिस्थिति तितकी तीव्र राहिली नव्हती. अर्थात् तेथेंही अद्यापि कांहीं वर्गांना पुष्कळच खास हक्क आणि अधिकार उपभोगावयास मिळतच होते; परंतु पुढें एका पत्रांत मी तुला सांगणार आहें त्या नवीन आर्थिक घडामोडी आणि अमेरिका व हिंदुस्थान यांमधील व्यापार व इतर भानगडी यांकडेच इंग्रजांचें सर्व लक्ष गुंतून गेलेलें होतें. शिवाय, सामाजिक विषमतेचा ताण जेव्हां थोडासा जाणवण्याइतका वाढला, तेव्हां तेथें एक तेवढ्यापुरती तडजोड होऊन सगळीच समाजव्यवस्था मोडून-तोडून टाकण्याचें संकट टाळण्यांत आलें. फ्रान्समध्यें अशा प्रकारची तडजोड होण्याला सवड किंवा अनुकूलता नव्हती. यामुळें तेथें तसा तो भडका उडाला.

अशा स्थितींत आधुनिक कादंबरीलेखनाचें तंत्र इंग्लंडमध्यें या अठराव्या शतकाच्या मध्यालाच निर्माण होऊन वाढलें ही मात्र मोठी लक्षांत ठेवण्यासारखी व कौतुकाची गोष्ट आहे. 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स्' आणि 'रॉबिन्सन् क्रूसो' हे ग्रंथ अठराव्या शतकाच्या प्रारंभालाच बाहेर पडले हें मीं तुला सांगितलेंच आहे मागें. त्यांच्यामागून इंग्लंडमध्यें खरोखर उत्तम प्रतीच्या कादंबऱ्या बाहेर पडल्या. या सुमारास इंग्लंडमध्यें एक नव्याच प्रकारचा वाचकवर्ग अस्तित्वांत आला असें आढळून येतें.

या अठराव्या शतकांतच प्रसिद्ध इंग्रज इतिहासकार गिबन् यानें आपला सुप्रसिद्ध The Decline and fall of the Roman Empire (रोमन साम्राज्याचा ऱ्हास व नाश) हा ग्रंथ लिहिला. मागें रोमन साम्राज्याबद्दल लिहितांना एका पत्रामध्यें त्याच्या या ग्रंथाचा उल्लेख मीं केला आहे.

## ९६

## अत्यंत मोठ्या उलाढालींच्या दाराशीं उभें असलेलें यूरप खंड

२४ सप्टेंबर, १९३२

यूरप खंडामधील, विशेषतः फ्रान्समधील अठराव्या शतकांतील स्त्री-पुरुषांच्या मनांत थोडें आंत शिरून खोलवर बघण्याचा प्रयत्न आपण करून पाहिला. ही आपली पाहणी अगदींच ओझरती झाली; तिच्यामध्यें जुन्या कल्पनांशीं ज्यांचा झगडा सुरू झालेला होता, अशा कांहीं नव्या कल्पना आपल्या दृष्टीसमोर आल्या. अशा रीतीनें थोडा वेळ पडद्याआड जाऊन तेथें काय चाललेलें होतें तें आपण पाहिलें; आतां थोडा वेळ यूरप खंडाच्या सार्वजनिक रंगभूमीवरील नट कोणता कोणता अभिनय करीत होते, हें थोडेसें पाहूं या.

फ्रान्समध्यें म्हातारा चौदावा लुई अखेर इ. स. १७१५ मध्यें एकदांचा मरण पावला. त्याच्या पाठीमागून गादीवर आलेल्या राजाची कारकीर्दही भली मोठी म्हणजे एकूणसाठ वर्षांची झाली. म्हणजे अशा रीतीनें फ्रान्समध्यें चौदावा लुई आणि पंधरावा लुई या दोघांनीं मिळूनच एका पाठोपाठ एकशें-एकतीस वर्षे राज्य केलें! माझी खात्री आहे कीं जगांत याला दुसरीकडे कोठें तोड नसेल. चीनमधील मांचू घराण्यांतील दोघां बादशहांची, कांग ही व चीन लुंग यांची, कारकीर्द प्रत्येकीं साठ वर्षांची झाली खरी; पण या कारकीर्दी एका पाठीमागून एक नाहीं झाल्या. त्यांच्या दरम्यान तिसऱ्या एका राजाची कारकीर्द झालेली होती.

पंधराव्या लुईची कारकीर्द बऱ्याच दीर्घ मुदतीची झाली; त्यापेक्षांही तिच्यामध्यें दुराचार आणि कारस्थानें यांना जो किळसवाणा ऊत आला, त्यासाठीं इतिहासांत ती विशेष उल्लेखनीय होऊन राहिलेली आहे. त्याच्या कारकीर्दींत राज्याच्या एकूण एक उत्पन्नाच्या बाबींचा उपयोग केवळ राजाच्या विलासोपभोगांच्या खर्चासाठीं होऊं लागला. कलमाच्या खांदीनें ज्याप्रमाणें मूळ झाडाचा रस शोषून घ्यावा, त्याप्रमाणें प्रजेचा रस शोषून घेऊन दरबारची चैनीसाठीं उधळपट्टी चाललेली होती. दरबारांत राजाची मर्जी संपादन करणाऱ्या स्त्रीपुरुषांना राजाकडून जमिनीच्या किंवा सनदी नोकरीच्या देगण्या मिळत. या नोकरींत काम कांहीं नाहीं, पण पगार मात्र मिळावयाचा. अशा रीतीनें कांहीं न करता या लोकांना उत्पन्न मिळावयाची व्यवस्था झाली. स्वाभाविक या सगळ्याचा बोजा सामान्य जनतेवरच अधिकाधिक पडत गेला; परंतु अनियंत्रित राज्यसत्ता, नालायक कारभार आणि लांचलुचपत व दुराचार यांचें गाडें मात्र बिनघोरपणें, मोठ्या मजेंत, चालूच राहिलें. अशा स्थितींत अठरावें शतक पुरें होण्यापूर्वीच त्याचा पुढचा मार्ग खुंटला आणि त्याला पुढचें पाऊल खोल दरींत टाकून गडप व्हावें लागलें यांत आश्चर्य तें काय आहे? खरें आश्चर्य यांचें वाटतें, कीं या गाड्याला इतका लांचवर प्रवास करतां आला आणि त्याला खड्डयात पडण्याला एवढा दीर्घ कालावधि लागला! पंधरावा लुई स्वतः तर जनतेच्या न्यायासनाच्या निकालापासून आणि सूडापासून वांचलाच; या सगळ्याला तोंड त्याच्या मागून गादीवर आलेला सोळावा लुई याला द्यावें लागलें.

पंधरावा लुई हा इतका नादान आणि दुराचारी होता, तरी सुद्धां राज्यामध्यें आपल्याला संपूर्ण अनियंत्रित सत्ता असणें हा आपला अधिकार आहे, त्याबद्दल मात्र त्याला तिळमात्र शंका नव्हती. राज्यामध्यें त्याचाच अधिकार एकूण एक बाबतींत चालावयाचा; त्याला काय जें मनास येईल तें करण्याचा अधिकार; त्या बाबतींत कोणी काहींही ब्र काढता कामा नये. इ. स. १७६६ मध्यें पॅरिस येथें लोकसभेपुढें त्यानें जें भाषण केलें त्यांत तो काय म्हणतो ऐक:

" राज्यसत्ता ही अगदीं सर्वस्वीं केवळ माझ्या एकट्या व्यक्तीच्या ठिकाणीं निवास

करीत आहे. दुसऱ्या कोणाचाही आश्रय किंवा मदत घेतल्याशिवाय केवळ एकट्या मलाच कायदे करण्याचा पुरेपूर हक्क आहे. प्रजेला शांततेच्या प्रवाहाचा लाभ केवळ एक माझ्यापासूनच व्हावयाचा; प्रजेचा सर्वांत मोठा संरक्षक एक फक्त मीच आहें. माझ्या प्रजेला माझ्यावांचून दुसरें कोणतेंही सत्तेचें केंद्र नाहीं. कांहीं लोकांच्या मतानें बादशहाच्यापेक्षां वेगळें असें राष्ट्र म्हणून कांहीं तरी आहे, आणि त्याचा कांहीं स्वतंत्र अधिकार व हित आहे; परंतु वस्तुतः राष्ट्राचा अधिकार म्हणजे माझाच अधिकार आणि राष्ट्राचें हित म्हणजेच माझें हित अशीच सर्वस्वीं खरी गोष्ट असून हा अधिकार व हें हित सर्वथा माझ्याच मुठीमध्यें आहे."

अठराव्या शतकाच्या बहुतेक सर्व काळपर्यंत ज्यानें फ्रान्सवर राज्य केलें, तो राजा हा अशा प्रकारचा होता. कांहीं काळ तर साऱ्या यूरपवर त्याचें प्रभुत्व माजल्यासारखें झालें; परंतु नंतर दुसऱ्या महत्त्वाकांक्षी राजांशीं व लोकांशीं त्याचे झगडे झाले आणि त्यांत त्याला पराभव खाऊन माघार घ्यावी लागली; फ्रान्सचे पूर्वीचे जे कोणी प्रतिस्पर्धी होते त्यांचें कांहीं आतां यूरप खंडाच्या राजकारणाच्या रंगभूमीवर फारसें वजन उरलेलें नव्हतें; परंतु त्याच्या जागीं आतां नवीनच दुसरे प्रतिस्पर्धी निर्माण होऊन ते फ्रेंच राज्यसत्तेला खो देण्याची खटपट करूं लागलेले होते. ज्याचा एवढा मोठा गाजावाजा झाला होता, त्या स्पेन देशाचें बादशाही वैभव फारच थोडा काळ टिकलें. आतां यूरपमध्यें स्पेन देश मागें पडून गेला होता. तरापण अद्यापिही स्पेनच्या ताब्यांत अमेरिकेमध्यें आणि फिलिपाइन बेटांत फार मोठमोठ्या वसाहती होत्या. त्याचप्रमाणें आजपर्यंत ऑस्ट्रियाच्या हॅप्सबर्ग घराण्यानें पवित्र रोमन साम्राज्याचें प्रमुखत्व आणि त्या मार्गानें सर्व यूरप खंडाचें प्रमुखत्व आपल्या हातीं एक प्रकारें बळकावून ठेवलेलें होतें; परंतु या घराण्याचेंही मोठेंपण आतां पूर्वीसारखें शिल्लक राहिलेलें नव्हतें. पवित्र रोमन साम्राज्यामध्यें ऑस्ट्रियाचें राज्य कांहीं आतां एकटेंच श्रेष्ठ पदावर राहिलेलें नव्हतें. दुसऱ्या एका राज्याचा – प्रशियाचा – अलीकडे उदय होऊन तेंही ऑस्ट्रियाच्या राज्याइतकेंच महत्त्वाचें होऊन राहिलें होतें. त्याचप्रमाणें ऑस्ट्रियाच्या गादीवर कोणीं बसावें याबद्दल युद्धें सुरू होतीं आणि पुष्कळ दीर्घ काळपर्यंत मराया थेरसा नांवाची एक स्त्रीच तेथें गादीवर होती.

इ. स. १६४८ मधील वेस्टफालिया येथील तहानें प्रशियाच्या राज्याला यूरपमधील सत्ताधीश राज्यांत महत्त्वाचें स्थान मिळालें हें तुला आठवत असेल. त्या ठिकाणीं होहेनझोलर्न राजघराण्याचें राज्य असून या घराण्यानें, दुसरें जें ऑस्ट्रियावर राज्य करणारें हॅप्सबर्ग हें जर्मन राजघराणें होतें, त्याच्या वर्चस्वाला खो देण्याचा प्रयत्न चालविलेला होता. प्रशियामध्यें इ. स. १७४० पासून १७८६ पर्यंत शेहेचाळीस वर्षें फ्रेडरिक दि ग्रेट याचें राज्य चालू होतें. याला दि ग्रेट–महान्–म्हणण्याचें कारण म्हणजे त्याला मिळालेले अनेक लष्करी विजय. यूरपांतील इतर राजेलोकांप्रमाणें हाही एक सर्वस्वीं अनियंत्रित राजाच होता; परंतु त्यानें आपण मोठे तत्त्वज्ञानी आहोंत असा

आव आणलेला होता आणि व्हाल्टेअरशीं मैत्री संपादन करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानें फार बलिष्ठ असें लष्कर उभारलेलें होतें आणि तो मोठा यशस्वी सेनापति होता. तो स्वतःला बुद्धिवादी म्हणवीत असे आणि "प्रत्येकाला आपापल्या मार्गानें स्वर्गामध्यें जाण्यास मोकळीक असावी" असेंही तो म्हणत असे, असें म्हणतात.

सतराव्या शतकापासून पुढें साऱ्या यूरप खंडांत फ्रेंच संस्कृतीची छाप पडलेली होती. अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमाराला तर ही छाप दृढ झाली आणि व्हाल्टेअरची कीर्ति साऱ्या यूरपवर प्रचंड पसरली. इतकी, कीं कित्येक लोक तर या शतकाला "व्हाल्टेअरचें शतक" असें नांव देतात. फ्रेंच वाङ्मयाचें वाचन यूरप खंडांतील सर्व राजदरबारांमधून होऊं लागलें. अगदीं त्या मागासलेल्या सेंट पीटर्सबर्गच्या दरबारांतसुद्धां आणि सुसंस्कृत व विद्वान् लोक सर्वच देशांत, फ्रेंच भाषेंत लिहिणें आणि बोलणें यांत मोठेपणा मानूं लागले. उदाहरणार्थ, स्वतः फ्रेडरिक दि ग्रेट राजा हा सुद्धां नेहमीं फ्रेंच भाषेंत बोले आणि लिही. त्यानें तर फ्रेंच काव्य लिहिण्याचासुद्धां प्रयत्न करून पाहिला; तें आपलें काव्य व्हॉल्टेअरनें तपासून साफसूफ करून त्याच्यावर उजळा द्यावा असें त्याच्या मनांत होतें.

प्राशियाच्या पूर्वेला रशिया देश हाही पुढच्या काळांत त्याला जें प्रचंड राक्षसी स्वरूप प्राप्त झालें त्या स्वरूपाला पोंचण्याचा मार्ग आक्रमण करीत वाढत होता. रशिया, सायबेरियाचा सगळा प्रदेश ओलांडून पॅसिफिकमध्यें पोंचला होता व पुढें सामुद्रधुनी ओलांडून त्यानें अलास्कांतही प्रवेश केलेला होता, हें चीनच्या इतिहासाच्या वेळीं आपण पूर्वीच पाहिलें आहे. सतराव्या शतकाच्या रशियामध्यें पीटर दि ग्रेट या अत्यंत बलिष्ठ राजाचें राज्य होतें. रशियामध्यें पूर्वीपासून जे कितीएक मंगोलियन आचार-विचार आणि परंपरेचे संबंध निर्माण झालेले होते, ते सर्व नाहींसे करून टाकावे असें पीटरच्या मनांत फार होतें. कित्येक लोक म्हणतात त्याप्रमाणें त्याला रशियाचें पाश्चिमीकरण करावयाचें होतें. म्हणून त्यानें आपली राजधानी मॉस्को येथून उठविली; कारण मॉस्कोमध्यें या प्राचीन परंपरेचा फार मोठा भर होता. त्यानें स्वतःचें राजधानीचें शहर नवेंच वसविलें. फिनलंडच्या आखाताच्या तोंडाशीं नेवा नदीच्या तीरावर वसलेलें तेंच तें सेंट-पीटर्स-बर्ग शहर. सोनेरी डेरे आणि सोनेरी कळस-घुमट यांनीं युक्त अशा त्या मॉस्को शहरांत आणि या नव्या शहरांत एवढेंसुद्धां साम्य नव्हतें. त्याचें स्वरूप पुष्कळसें यूरपमधील पश्चिमेकडील शहरांसारखें होतें. पीटर्सबर्ग शहर म्हणजे पश्चिमीकरणाचें एक मूर्तिमंत लक्षणच होऊन राहिलें आणि तेव्हांपासून रशिया यूरपीयन राजकारणांत अधिकाधिक भाग घेऊं लागला. आतां या शहराचें पीटर्सबर्ग हें नांव शिल्लक राहिलें नाहीं, हें बहुधा तुला माहीत असेलच. पहिल्यांदा बदलून हें नांव पेट्रोग्राड असें करण्यांत आलें होतें; नंतर दुसऱ्यांदा बदलून तें लेनिनग्राड असें झालें. हेंच नांव हल्लीं चालू आहे.

पीटर दि ग्रेटनें रशियांत पुष्कळ फेरबदल घडवून आणले. त्यांतला एक मी तुला सांगतों; कारण तो तुला लक्षांत घेण्यासारखा वाटेल. त्याच्या काळीं रशियांत

बायकांना समाजापासून दूर एकाकी पडद्याआड ठेवण्याची पद्धति चालू होती. या पद्धतीला तेथें टेरेम हें नांव होतें. ही टेरेमची पद्धत पीटरनें बंद केली. पीटरचें लक्ष हिंदुस्थानवर होतें; आंतरराष्ट्रीय राजकारणांत हिंदुस्थानचें महत्त्व तो ओळखून होता. त्यानें आपल्या मृत्युपत्रांत लिहिलेलें आहे, "लक्षात ठेवा, कीं हिंदुस्थानचा व्यापार म्हणजे अखिल जगताचा व्यापार आहे आणि ज्या कोणाच्या सर्वस्वी एकट्याच्या हातीं या व्यापाराचीं सूत्रें येऊं शकतील तो साऱ्या यूरप खंडाचा सर्वाधिकारी होऊं शकेल!" हिंदुस्थानात राज्य प्राप्त झाल्यानंतर इंग्लंड देशाची सत्ता जी अत्यंत झपाट्यानें वाढली, तिच्यावरून पीटरचे हे अखेरचे शब्द किती खरे होते हें सिद्ध झालें. हिंदुस्थानच्या संपत्तीची लूट करावयाला मिळाल्यानें इंग्लंडची पत वाढली, संपन्नताही वाढली आणि पुढें कित्येक पिढ्यांपर्यंत इंग्लंडचें राज्य हें साऱ्या जगांतील प्रमुख सत्ताधीश राज्य होऊन राहिलें.

एका बाजूला प्रशिया आणि ऑस्ट्रिया व दुसऱ्या बाजूला रशिया यांच्या दरम्यान पोलंडचें राज्य होतें. पोलंड हा एक मागासलेला देश असून तेथें दरिद्री शेतकऱ्यांची सगळी वसति होती. उद्योगधंदे किंवा व्यापार यांचा तेथें जवळजवळ मागमूसही नव्हता; मोठीं शहरें मुळींच नव्हतीं; परंतु या देशाची राज्यघटना मात्र मोठी विलक्षण होती. तेथील राजा हा लोकनियुक्त असून सत्ता ही सरंजामदार, जमीनदार वरिष्ठ वर्गीयांच्या हातांमध्यें होती. पोलंडच्या सभोंवारचे देश जसजसे बलिष्ठ होत चालले, तसतशी पोलंडची दशा अधिकच दुर्बलतेची होत गेली. प्रशिया, रशिया, ऑस्ट्रिया यांची बोक्यासारखी त्याच्यावर नजर लागलेली होती.

परंतु याच पोलंडच्या राजाचें सामर्थ्य थोड्याच काळापूर्वी इतकें मोठें होतें, कीं त्यानेंच इ. स. १६८३ मध्यें तुर्कांचा हल्ला परतवून लावून त्यांचा पराभव केला होता. उस्मानी तुर्कांनीं पुन्हां कांहीं मग कोठेंही स्वारी करण्याचें धाडस केलें नाहीं. त्याची शक्ति आतां क्षीण झाली होती आणि त्यांच्या विजयाची भरती हळूहळू ओसरूं लागली होती. यापुढें त्यांनीं संरक्षक धोरणाचा अवलंब केला; तरीपण तुर्कांचें यूरपांतील साम्राज्य यापुढें हळूहळू संपुष्टांतच येत राहिलें; परंतु आपण ज्या अठराव्या शतकाच्या पूर्वार्धाच्या काळचा विचार करतों आहों, त्या काळीं मात्र तुर्कस्तान हा यूरप खंडाच्या आग्नेय भागांतील एक सामर्थ्यवान् देश असून त्याचें साम्राज्य बाल्कन राष्ट्रांच्या सगळ्या प्रदेशावर झालें होतें व हंगेरी देश ओलांडून थेट पोलंडच्या सरहद्दीला जाऊन तें भिडलेलें होतें.

दक्षिणेकडे इटली देशाचे मात्र पुष्कळसे लहान लहान तुकडे होऊन तेथें निरनिराळ्या स्वतंत्र राजांचीं राज्यें चालू होतीं; त्यामुळें यूरपच्या राजकारणांत इटलीला कांहींच विशेष किंमत नव्हती. पोपचा सर्वाधिकार कांहीं आतां यूरप खंडांत पूर्वीप्रमाणें चालत नव्हता. राजेरजवाडे अजूनही त्याचा आदर, सन्मान राखीत होते; परंतु राजकीय बाबतींत मात्र त्याच्या बोलण्याकडे कोणी फारसें पाहत नसत. यूरपमध्यें

हळूहळू एक नवीन प्रकारची राजकीय परंपरा निर्माण होत होती. ती म्हणजे महान् सत्ताधीश राष्ट्रांची. ज्यांच्या एकट्याच्या हातीं देशाची सगळी सत्ता केंद्रीभूत झाली अशा बलिष्ठ राजघराण्यांचे अम्मल चालू झाल्यामुळें स्वतंत्र राष्ट्रभावना कशी निर्माण झाली हें मीं तुला सांगितलेंच आहे. लोकांच्या मनांत आपल्या देशाविषयीं एक नवीनच विलक्षण दृष्टिकोन उत्पन्न झाला; आज हा दृष्टिकोन जिकडे तिकडे नित्य परिचयाचा झालेला आहे; परंतु त्यापूर्वीच्या काळीं तो इतका परिचित आणि सर्वसामान्य नव्हता. फ्रान्स, इंग्लंड किंवा ब्रिटानिया, इटालिया या किंवा अशाच आणखी निरनिराळ्या देशांच्या मूर्तीच जणुं आतां स्पष्ट आकारांत येऊं लागल्या. हीं नांवें म्हणजे त्या त्या राष्ट्राचीं प्रतीकें किंवा बोधचिन्हेंच झालीं. सारें राष्ट्र त्यामध्यें मूर्तिमंत सामावल्यासारखें झालें. पुढें एकोणिसाव्या शतकांत तर त्या त्या देशाच्या स्त्रीपुरुषांच्या अंतःकरणावर आपापल्या देशाच्या या कल्पना-मूर्ती स्पष्ट स्वरूपांत कोरल्या गेल्यासारख्या होऊन त्यामुळें त्यांच्या हृदयांतील भावना विलक्षण रीतीनें उचंबळूं लागल्या. त्यांच्या चित्तांत त्यांना दैवतांचें रूप प्राप्त झालें. या देवतांच्या पायांपाशीं प्रत्येक राष्ट्रभक्तानें आपली पूजा अर्पण करावयाची अशी भूमिका निर्माण होऊन त्या देवतांच्या नांवानें आणि त्यांच्यासाठीं म्हणून मग एकमेकांशीं युद्धें करून एकमेकांचे प्राण घेण्याची प्रथा सुरू झाली. आज आपल्याही अंतःकरणामध्यें भारतमातेच्या कल्पनेनें केवढी चेतना निर्माण होत असते आणि या गूढशक्तिसंपन्न आणि काल्पनिक मूर्तीसाठीं लोक किती हाल सोसावयाला आणि प्राणही देण्याला तयार असतात हें तुला ठाऊकच आहे. त्याचप्रमाणें इतर देशांतील लोकांच्याही भावना आपल्या मातृभूमीच्या कल्पनामूर्तीनें उचंबळूं लागल्या; परंतु ही सर्व पुढच्या काळातील घडामोड आहे. सध्यां तुला फक्त एवढेंच सांगावयाचें आहे मला, कीं अठराव्या शतकामध्यें या राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उदय होऊन तिनें मूळ धरलें असें आपणांस आढळतें. हें घडून येण्याच्या कार्यांत फ्रेंच तत्त्वज्ञांनीं फार मदत केली आणि फ्रान्समधील महान् क्रांतीनें तर त्या भावनेवर मान्यतेचें शिक्कामोर्तबच केलें.

यापुढें हीं राष्ट्रें म्हणजे शासनकर्ती (Powers) राज्यें, राज्यसत्ता समजण्यांत येऊं लागलीं. राजे येत आणि जात; पण त्यामुळें राष्ट्राच्या सत्तेंत कांहींच बदल होत नसे. राष्ट्राचें शासन अविच्छिन्न चालूच राही. या राज्यांमध्यें हळूहळू कांहीं राज्यें बाकीच्याहून अधिक महत्त्वाला चढलीं. उदाहरणार्थ, अठराव्या शतकाच्या सुरुवातीला फ्रान्स, इंग्लंड, ऑस्ट्रिया, प्रशिया आणि रशिया यांचीं राज्यें खास "महान् राज्यें" म्हणून समजलीं जाऊं लागलीं. बाकीचीं कांहीं स्पेनसारखीं राष्ट्रें नांवाला मोठीं म्हटलीं जात होतीं; परंतु प्रत्यक्षांत त्यांचा ऱ्हास होऊं लागला होता.

इंग्लंडचें महत्त्व आणि संपत्ति दोन्ही झपाट्यानें वाढत होतीं. इंग्लंड देश इलिझाबेथ राणीच्या काळापर्यंत यूरप खंडांतील कल्पनेप्रमाणें कांहीं महत्त्वाचा देश झालेला नव्हता. एक तर त्या देशाची लोकसंख्या थोडी होती; सगळी मिळून

इंग्लंडची लोकसंख्या त्या वेळीं साठ लक्षांहून अधिक नव्हती; म्हणजे ही लोकसंख्या आजच्या लंडन शहराच्या लोकसंख्येहूनही कमी होती; परंतु प्यूरिटन पंथाची धर्मक्रांति व समाजक्रांति आणि पार्लमेंटचा राजावरील विजय या दोन घटनांमुळें इंग्लंडची गाडी नवीन बदलत्या परिस्थितीच्या मार्गावर दाखल झाली आणि जोरानें पुढचा मार्ग आक्रमण करूं लागली. हॉलंडमध्येंही स्पेनचें जूं दूर झुगारून दिल्यानंतर हीच गोष्ट घडून आली.

अठराव्या शतकांत अमेरिका आणि आशिया खंडांत वसाहती करण्यासाठीं सगळ्यांची झटापट चाललेली होती. यूरपांतील पुष्कळशा राज्यांनीं या झटापटींत भाग घेतलेला होता; परंतु अखेरीस खरी झटापट चालू राहिली फक्त दोन देशांमध्यें – इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यामध्यें. फ्रान्समध्यें एक तर पंधराव्या लुईची नादान कारकीर्द चालू होती; पण त्याशिवाय विशेष म्हणजे यूरपीयन राजकारणामध्यें फ्रान्सचे हात इतके अडकलेले होते, कीं त्याला दुसरीकडे लक्ष द्यायला सवड मिळणें कठिण होतें. इ. स. १७५६ पासून १७६३ पर्यंत या दोन देशांमध्यें आणि इतरही अनेक देशांमध्यें वसाहतींची मालकी कोणाकडे राहावयाची या गोष्टीच्या निर्णयास्तव, यूरप खंडांत कॅनडामध्यें आणि हिंदुस्थानांत युद्ध झालें. याच युद्धाला सात वर्षांचें युद्ध असें म्हणतात. हिंदुस्थानांत हें युद्ध झालें तेव्हां फ्रान्सचा पराभव झाला हें मागें आपण पाहिलें आहे. कॅनडामध्येंही इंग्लंडचाच जय झाला. यूरप खंडांत मात्र आपण नुसता पैसा पुरवावयाचा आणि त्याच्या मोबदल्यांत दुसऱ्या राष्ट्रांना आपल्या वतीनें लढावयास लावावयाचें ही इंग्लंडची आतां लोकांना सुपरिचित झालेली पद्धति इंग्लंडनें अमलांत आणली. या लढाईंत फ्रेडरिक दि ग्रेटला त्यांनीं असा आपला मित्र केलें होतें.

या सात वर्षांच्या युद्धाचा परिणाम इंग्लंडला फारच फायद्याचा झाला. हिंदुस्थान आणि कॅनडा या दोन्ही प्रदेशांत इंग्लंडला आतां कोणीही यूरपीय प्रतिस्पर्धी उरला नाहीं. त्याचप्रमाणें समुद्रमार्गावरही इंग्लंडचें प्रभुत्व प्रस्थापित झालें. अशा रीतीनें साम्राज्य स्थापून तें वाढविण्याची–एक जागतिक राज्य स्थापन करण्याची–इंग्लंडला शक्यता उत्पन्न झाली. प्रशियाचेंही महत्त्व या काळामध्यें पुष्कळच वाढलें.

यूरप खंडाची या युद्धानें पुन्हां एकदां दमछाट झाल्यासारखी झाली आणि पुन्हां सर्व यूरप खंडभर एक प्रकारें शांतता प्रस्थापित झाली; परंतु अशी शांतता होती म्हणून कांहीं प्रशिया, रशिया आणि ऑस्ट्रिया यांना पोलंडचें राज्य गिळंकृत करण्याला मुळींच प्रत्यवाय वाटला नाहीं. या राज्यांशीं लढण्याजोगी पोलंडची मुळींच स्थिति नव्हती; तेव्हा त्या तिन्ही लांडग्यांनीं पोलंडवर स्वारी केली आणि पुनः पुनः पोलंडच्या आपल्यामध्यें वांटण्या करून स्वतंत्र राज्य म्हणून पोलंडचा कांहींही भाग त्यांनीं शिल्लक ठेवला नाहीं. इ. स. १७७२ मध्यें, १७९३ मध्यें आणि १७९५ मध्यें, अशी तीन वेळां ही वांटणी करण्यांत आली. यांपैकीं पहिली वांटणी झाल्यानंतर पोलंडच्या लोकांनीं आपल्या देशाची सुधारणा करून त्याचें बळ वाढविण्याचा फार

भगीरथ प्रयत्न केला. त्यांनीं आपल्या देशांत पार्लमेंट सभा स्थापन केली; कला आणि वाङ्मय यांचें तेथें पुनरुज्जीवन करण्यांत आलें; परंतु पोलंडच्या सभोंवतालच्या एकतंत्री राजांना आतां पोलंडच्या रक्ताची जणुं चटकच लागली होती; त्यामुळें अशानें कांहीं त्या राष्ट्रांच्या आक्रमणांत खंड पडण्यासारखा नव्हता. शिवाय, या राजांना पार्लमेंट सभांबद्दल मुळींच आपलेपणा नव्हता. म्हणून पोलिश लोकांनीं आपल्या राष्ट्रप्रेमाची जरी पुष्कळच शर्थ करून दाखविली आणि आपला महान् वीर पुढारी कोश्यूश्को याच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं अत्यंत शौर्यानें लढाई दिली, तरीपण अखेरीस यूरपच्या नकाशांतून इ. स. १७९५ सालीं पोलंड देश नाहींसा झाला. त्या वेळीं त्यांचा देश अशा रीतीनें नाहींसा झाला, तरीही पोलिश लोकांचा राष्ट्राभिमान मात्र जिवंत राहिला आणि केव्हां तरी आपलें स्वातंत्र्य आपण मिळवूं अशी आशा करीत ते राहिले; अखेरीस १२३ वर्षांनंतर त्यांचें हें सुखस्वप्न खरें ठरलें; त्या वेळीं गेल्या महायुद्धानंतर पोलंड पुन्हां एकदां स्वतंत्र राज्य – राष्ट्र – म्हणून उभें राहिलें.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत यूरप खंडांत त्या मानानें शांतता नांदत होती असें मीं म्हटलें; परंतु ही शांतता फार काळ टिकली नाहीं. ती केवळ वरवरची शांतता ठरली. या शतकांतल्या इतर पुष्कळ घडामोडींबद्दलही मी आतांपर्यंत तुझ्यार्शी बरेंच बोललों; परंतु अठरावें शतक हें मुख्यतः तीन मोठ्या घटनांसाठीं – तीन क्रांत्यांसाठीं– प्रसिद्ध आहे. या तीन घटनांशीं ताडून पाहतां यूरप खंडांत या शंभर वर्षांत घडलेली बाकीची एकूण एक गोष्ट अगदींच क्षुद्र ठरते. या तिन्ही क्रांत्या अगदीं वेगवेगळ्या प्रकारच्या होत्या; एक राजकीय होती, एक औद्योगिक होती आणि एक सामाजिक क्रांति होती. राजकीय क्रांति ही अमेरिकेंत घडून आली. ही क्रांति म्हणजे त्या ठिकाणच्या ब्रिटिश वसाहतींचें बंड व त्यामधून पुढें प्रस्थापित झालेलें अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचें स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य ही होय. हेंच राज्य पुढें आपल्या काळापर्यंत फार मोठ्या दर्जाला चढावयाचें होतें. औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली इंग्लंडमध्यें. तेथून ती पसरत पसरत यूरपांतील पश्चिमेकडील सर्व राष्ट्रांमध्यें पसरली आणि तेथून इतर सर्व देशांमध्यें. ही क्रांति पूर्ण शांततेंत झाली; परंतु तिचे परिणाम फार दूरवर आणि खोलवर झाले आणि जगाच्या इतिहासांतील ज्ञात अशा कोणत्याही घटनेचा झाला नाहीं इतका मोठा परिणाम जागतिक जीवनावर या क्रांतीचा झाला. या क्रांतीचीं लक्षणें म्हणजे वाफेच्या शक्तीचा शोध, मोठ्या यंत्रांचा उदय आणि अखेरीस औद्योगीकरणाचे जे अगणित धुमारे फुटून वाढलेले आपल्या भोंवतीं आपण पाहतों ते, हीं होत. सामाजिक क्रांति म्हणजे महान् फ्रेंच राज्यक्रांति. या क्रांतीमुळें फ्रान्समधील केवळ राजशाहीच नष्ट होऊन काम संपलें नाहीं; तर तिच्यामध्यें असंख्य खास जन्मजात अधिकारही नष्ट झाले आणि समाजांतील नवीन वर्गांना पुढें येण्याला संधि मिळाली. या तिन्ही क्रांत्यांचा आपल्याला स्वतंत्रपणें आणि थोडासा तपशीलवारपणें विचार केला पाहिजे.

अशा तऱ्हेच्या या अत्यंत महत्त्वाच्या घडामोडी होण्याचा समय अगदीं जवळ येऊन ठेपला होता, अशा वेळीं यूरपमध्यें राजे लोकांच्या हातीं सर्व सत्ता केंद्रित झालेली होती. इंग्लंड आणि हॉलंड या देशांत लोकनियुक्त कायदेमंडळें होतीं खरीं; परंतु तीं सर्व वरिष्ठ वर्गीय आणि धनिक अशा लोकांच्याच ताब्यांत होतीं. कायदे हे सर्व श्रीमंतांच्या उपयोगासाठीं, त्यांच्या मालमत्तेचें, हक्कांचें आणि सवलतींचें सरक्षण व्हावें एवढ्यासाठींच फक्त होत असत. शिक्षण हेंसुद्धां अशा श्रीमंत आणि हक्कदार लोकांनाच काय तें मिळत असे. खरें म्हणजे सगळ्या राजसत्तेचें, कारभाराचें अस्तित्वच या वर्गाच्या हितार्थ होतें; परंतु या काळचा सगळ्यांत अतिशय मोठा प्रश्न होता तो म्हणजे गरिबांच्या पोटाचा प्रश्न. वरच्या वर्गाची परिस्थिति जरी थोडीफार सुधारलेली असली तरी गरिबाच्या हालअपेष्टा होत्या तशाच कायम होत्या; नव्हे, वरच्या वर्गाच्या सुखाच्या प्रकाशांत त्या हालअपेष्टा अधिकच उठून दिसूं लागल्या होत्या.

सबंध अठराव्या शतकभर सर्वंच यूरपीय राष्ट्रांनीं गुलामांचा व्यापार अगदीं निर्दयपणानें आणि अंतःकरणशून्य पद्धतीनें चालविलेला होता. प्रत्यक्ष यूरपच्या प्रजेमध्यें आतां कायदेशीर अर्थानें गुलाम म्हणून कोणी शिल्लक राहिलेले नव्हते; परंतु सर्फ किंवा व्हिलन्स म्हणून ज्या शेतकाम करणारांना म्हणत असत, त्या भूदासांची अवस्था मात्र, कायदेशीर रीत्या ते गुलाम नसले तरी, गुलामापेक्षां कोणत्याच प्रकारें सुखाची नसे. तथापि अमेरिकेचा शोध लागल्यानंतर मात्र गुलामांचा पुन्हां अत्यंत क्रूर अशा रीतीचा व्यापार सुरू झाला. या व्यापाराची सुरुवात केली पोर्तुगीज आणि स्पॅनिश लोकांनीं. हे लोक आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील प्रदेशांत नीग्रो लोकांना पकडीत आणि त्यांना अमेरिकेंत आपल्या शेतींचें काम करण्यासाठीं घेऊन जात. या निंद्य–तिरस्करणीय–व्यापारांत इंग्रज लोकांचाही भरपूर भाग होता. जंगलांतील हिंस्र पशूंची शिकार करतात त्याप्रमाणें या आफ्रिकन लोकांना जंगलांतून शोधून पकडण्यांत येई; नंतर त्यांना एका सांखळीला बांधून टाकण्यांत येई, आणि अशा रीतीनें अमेरिकेकडे नेण्यांत येई. अशा त्या नीग्रो लोकांना किती भयंकर यातना भोगाव्या लागत असतील याची तुला काय किंवा आपल्यापैकीं कोणालाही काय कल्पनासुद्धां करणें अशक्य आहे. प्रवासाच्या शेवटच्या टोंकाला पोंचण्यापूर्वीच त्यांपैकीं असंख्य लोक मरून पडत. जगांत आजपर्यंत ज्या लोकांना हालअपेष्टा भोगाव्या लागलेल्या आहेत, त्यांमध्यें या नीग्रो लोकांना सोसाव्या लागलेल्या यातनांची तीव्रता सर्वांत अधिक मोठी आहे. ही गुलामगिरी कागदावर पाहतां एकोणिसाव्या शतकांत नष्ट करण्यांत आली. इंग्लंडनेंच या कामांत पुढाकार घेतलेला होता. परंतु या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठीं अमेरिकेंत यादवीचें युद्ध व्हावें लागलें. आज अमेरिकेंत जे लाखो नीग्रो लोक आहेत, ते याच गुलामांचे वंशज होत.

जर्मनी आणि ऑस्ट्रिया देशांत या शतकामध्यें संगीताची जी मोठी वाढ झाली तिच्यासंबंधीं छोटेंसे टिपण करून या पत्राचा शेवट मी जरा गोड करणार आहें. जर्मन लोक

हे यूरपमध्यें संगीतशास्त्राच्या बाबतींत इतर सर्व देशांपेक्षां आघाडीवर आहेत हें तुला ठाऊक आहे. या देशाच्या नामांकित संगीतकलाविशारदांपैकीं कांहींचीं नांवें सतराव्या शतकाच्या इतिहासांतही आढळून येतात. इतर देशांतल्याप्रमाणें यूरपमध्येंही संगीत हें धार्मिक कर्मकांडाचेंच एक अंग प्रथम होतें. पुढें त्यांमध्यें हळूहळू फारकत झाली आणि संगीत हें स्वतंत्र कला म्हणून नांदूं लागलें. अठराव्या शतकांतील संगीत-विशारदांपैकीं दोघांचीं नांवें विशेषच जगविख्यात आहेत. ते म्हणजे मोझार्ट आणि बीदोव्हन. यांच्या ठिकाणीं अगदीं बालवयातच संगीतकलेचा मोठा प्रकर्ष झाला; दोघेही अत्यंत प्रतिभावान् पद्यकार आणि स्वरलेखक होऊन गेले. बीदोव्हन हा पश्चिमेकडील सर्वश्रेष्ठ संगीत-पद्य-स्वर-लेखक आहे असें म्हणतां येईल; परंतु मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे, कीं तो स्वतः अगदींच बहिरा होता आणि इतरांना त्याचें जें संगीत अलौकिक मधुर वाटे, तें संगीत त्याला स्वतःला कांहीं ऐकतां येत नसे! परंतु ते ते स्वर पकडून त्यांचें लेखन करण्यापूर्वी कानानें नाहीं तरी अंतःकरणामध्यें, हृदयामध्यें त्यांचा नाद त्याला ऐकूं येत असलाच पाहिजे.

## ९७

# मोठ्या यंत्रांचा उदय

२६ सप्टेंबर, १९३२

आतां जिला औद्योगिक क्रांति म्हणतात तिचा आपण विचार करूं या. या क्रांतीची सुरुवात इंग्लंडमध्यें झाली आणि म्हणून इंग्लंडमध्येंच तिचें स्वरूप कसकसें बनत गेलें याचा आपण अभ्यास करूं. अमुक एका तारखेला ही क्रांति झाली अशी नक्की तारीख कांहीं मला सागतां येणार नाहीं. कारण हा जो मोठा फेरबदल झाला तो कांहीं जादूसारखा एखाद्या विशिष्ट दिवशीं एकाएकीं घडून आलेलाच नाहीं. तरी पण त्याची गति होती ती मात्र फारच जलद होती. अठराव्या शतकाच्या मध्यापासून शंभर वर्षांच्या आंत मानवी जीवनाचें सर्व स्वरूपच त्यानें पार बदलून टाकलें. आपल्या या पत्रांमध्यें आपण जगाच्या सर्व इतिहासाच्या ओघाचें अगदीं प्राचीनतम काळापासून तों पुढें हजारों वर्षें होऊन जाईपर्यंत निरीक्षण करीत आलों आहों आणि जगांत घडून आलेले कितीएक फेरबदल आपण पाहिले आहेत. यांपैकीं कितीएक फेरबदल तर फारच मोठाले होते. तरीपण या किंवा आतांपर्यंतच्या कोणत्याच फेरबदलानें लोकाच्या जीवनामध्यें मूलतः फरक घडून आला असें केव्हांच घडलेलें आढळत नाहीं. सॉक्रेटीस किंवा अशोक किंवा ज्यूलिअस सीझर हे एकाएकीं अकबराच्या हिंदुस्थानामधील दरबारांत आले असते, किंवा अठराव्या शतकाच्या प्रारंभींच्या काळांत इंग्लंडमध्यें

किंवा फ्रान्समध्यें गेले असते, तर त्यांना आपल्या काळच्या मानानें पुष्कळच बदल झालेले आढळून आले असते. त्यांतले कांहीं बदल त्यांना पसंत पडले असते; कांहीं नापसंत पडले असते; परंतु सामान्य दृष्टीनें पाहतां, निदान बाह्यतः पाहतां तरी, हें जग त्यांना कांहीं अगदींच अनोळखी वाटलें नसतें. कारण त्यांच्या काळच्या कल्पना आणि या काळच्या कल्पना यांत कांहीं त्यांना अगदीं न कळण्याइतका मोठा फरक आढळून आला नसता. तसेंच निदान बाह्य दृष्टीनें वरवरच्या गोष्टी पाहतांना तरी आपण कांहीं तरी अगदींच भलत्या कोठल्या तरी जगांत येऊन पडलों आहों, असेंही त्यांना झालें नसतें. त्यांच्या मनांत प्रवास करावा असें आलें असतें, तर त्या काळींही त्यांच्या स्वतःच्या वेळीं त्यानीं केला असता त्याचप्रमाणें जवळजवळ त्यांना घोड्यावरून किंवा गाडीमधून प्रवास करावा लागता आणि प्रवासाला लागणाऱ्या वेळामध्येंही आपल्या काळच्या मानानें कांहीं विशेष फरक त्यांना आढळून आला नसता.

परंतु या तिघांपैकीं कोणीही सद्गृहस्थ जर आपल्या आजच्या जगांत आला, तर त्याला फारच मोठें आश्चर्य वाटेल आणि बहुतकरून हा आश्चर्यांचा धक्का त्याच्या मनाला दुःखदायक असाच होण्याचा पुष्कळसा संभव आहे. त्याच्या कल्पनेंतल्या कोणत्याही अत्यंत द्रुतगति घोड्यापेक्षां हल्लीं माणसें किती तरी जास्त जलद गतीनें प्रवास करतात असें त्याला आढळून येईल. त्याच्या कल्पनेंतील बाणाच्या गतीपेक्षांही ही गति अधिक जलद आहे असें त्याला दिसेल. आगगाडीनें, आगबोटीनें, मोटारीनें आणि विमानानें लोक त्याला साऱ्या जगांत वाटेल तिकडे भयंकर प्रचंड वेगानें मारे धांवपळ माजवीत असलेले आढळतील. त्याचप्रमाणें तारायंत्र, टेलिफोन आणि चिनतारी संदेशवाहक, आधुनिक काळच्या छापखान्यातून बाहेर पडणारीं अगणित पुस्तकें, त्याचप्रमाणें वर्तमानपत्रें ही आणि अशाच प्रकारची अठराव्या शतकांत आणि त्यानंतर झालेल्या औद्योगिक क्रांतीपासून निर्माण झालेली उद्योगधंद्याची अपरंपार संतति पाहून त्यांना मोठाच विचार पडेल. सॉक्रेटीस किंवा अशोक किंवा ज्यूलिअस सीझर यांना हे सगळे नवे प्रकार पसंत पडतील किंवा नापसंत होतील हें मी सांगूं शकत नाहीं. परंतु सध्यांच्या काळच्या जीवनांतील राहणीचे हे सर्व मार्ग आपापल्या काळीं प्रचलित असलेल्या मार्गांहून मूलतःच भिन्न आहेत, एवढें त्यांच्या प्रत्ययाला आल्यावांचून राहणार नाहीं हें मात्र निश्चित.

औद्योगिक क्रांतीमुळें जगांत मोठ्या यंत्रांची निर्मिति झाली. या क्रांतीमुळें ज्याला यंत्रयुग किंवा यांत्रिक युग म्हणतात त्याची सुरुवात झाली. याचा अर्थ याच्यापूर्वी जगांत यंत्रें नव्हतीं असा नव्हे; परंतु हीं यंत्रें नवीन निर्माण झालेल्या यंत्रांच्याएवढीं मोठीं नव्हतीं. यंत्र म्हणजे तरी खरोखर काय ? तर मनुष्याला त्याच्या कामांत उपयोगी पडणारें एक मोठें थोरलें हत्यार. मनुष्य हा हत्यार तयार करणारा प्राणी आहे असें म्हटलें जातें. अगदीं प्राचीनतम काळापासून माणूस नवीं नवीं हत्यारें बनवीत आहे किंवा जुन्यांची सुधारणा करीत आला आहे. बाकीच्या प्राण्यांवर, आपल्यापेक्षांही कितीएक

अधिक बलिष्ठ अशा प्राण्यांवर, त्यानें प्रभुत्व संपादन केलें तें या हत्यारांच्याच बळावर. यंत्र म्हणजे त्याचा हात आहे त्याहून मोठा, लांब, बलिष्ठ करण्याचें साधनच होतें. किंवा यंत्र म्हणजे माणसाचा एक तिसरा हात होता असें म्हण. हत्यार म्हणजे जसा अधिक सामर्थ्यवान् झालेला हात, त्याचप्रमाणें यंत्र म्हणजे अधिक सामर्थ्यवान् झालेलें हत्यारच. हीं हत्यारें आणि यंत्रें यांच्या साधनानेंच मनुष्य निव्वळ पशुकोटींतून वरच्या दर्जाला चढत गेला. त्यांच्यामुळेंच माणूस निसर्गाच्या गुलामगिरींतून मोकळा झाला. हत्यारें आणि यंत्रें यांच्या साहाय्यानें माणसांना आपणांला हवे असलेले पदार्थ अधिकाधिक सुलभतेनें बनवितां येऊं लागले. आतां पहिल्यापेक्षां किती तरी अधिक प्रमाणांत वस्तू माणसाला तयार करतां येऊं लागल्या आणि तरी सुद्धां पहिल्यापेक्षां अधिक प्रमाणांत फुरसतीचा किंवा विश्रांतीचा वेळ माणसाला मिळूं लागला. या सगळ्याचा परिणाम कला आणि सुधारणा, ज्ञान आणि शास्त्रें यांची अभिवृद्धि होण्यांत झाला.

परंतु मोठीं यंत्रें आणि त्यांच्या इष्टमित्रांचा परिवार यांमुळें जगाचें अगदीं निखळ कल्याणच झालेलें आहे असें मात्र मुळींच नव्हे. एकीकडे त्यांच्यामुळें मानवी समाजांत पुष्कळ सुधारणा घडून आलेली आहे; तर त्याच वेळीं युद्धाचीं आणि विनाशाचीं भयंकर साधनें निर्माण करून जगांत रानटीपणाची वाढ करण्यालाही त्यांनीं मदत केलेली आहे. त्यांच्यामुळें जगामध्यें निरनिराळ्या वस्तूंची विपुलता आणि संपन्नता पुष्कळच वाढलेली आहे; परंतु ही सारी विपुलता किंवा संपन्नता सर्वसामान्य जनतेच्याच मुख्यतः उपयोगी पडावयाची असें मुळींच घडलेलें नसून त्यांचा उपयोग अगदीं मोजक्या अशा थोड्या लोकांनाच मात्र होतो आहे. अत्यंत धनिक अशा वर्गाचे विलासोपभोग आणि गरीब लोकांची दीनदशा यांमधील फरक – अंतर – पूर्वीच्या काळापेक्षांही फार मोठें यंत्रांमुळें वाढलेलें आहे. मनुष्याच्या हातचें हत्यार, त्याची सेवा करणारें असें होण्याऐवजीं मनुष्याचा मालक होऊन त्याच्याच डोक्यावर नाचण्याचें धारिष्ट त्यानें चालविलेलें आहे. एका बाजूनें पाहिल्यास त्यानें मानवसमाजाला सहकार्य, संघटना, नियमितपणा अशांसारखे कांहीं सद्गुण शिकविले आहेत, तर त्याच वेळीं दुसऱ्या बाजूला लाखों लोकांचें जीवन त्यानें कायम ठशाचें करून टाकलें आहे; त्यापासून आनंद किंवा स्वातंत्र्यसुख प्राप्त होण्याऐवजीं एक कांहीं तरी जड ओझें गळ्यामध्यें बांधलेलें असावें, अशी असंख्य लोकांची अवस्था यंत्रानें करून टाकली आहे.

परंतु यंत्रापासून हे जे दुष्परिणाम घडून आलेले दिसतात, त्याबद्दल आपण बिचाऱ्या यंत्राला दोष देण्यांत काय अर्थ आहे? दोष खरा आहे माणसाचा; कारण त्यानें त्याचा योग्य प्रकारें उपयोग केला नाहीं. त्याचप्रमाणें समाजाचाही दोष आहे; कारण समाजानें यंत्राचा जेवढा संपूर्ण उपयोग करून घ्यावा, तेवढा करून घेतलेला नाहीं. सारें जग किंवा एखादा देश आतां पुन्हां औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीच्या काळच्या अवस्थेमध्यें जाऊं शकेल हा विचारसुद्धां कल्पनेच्या पलीकडचा वाटतो. त्याचप्रमाणें यंत्रांमुळें घडून आलेले कांहीं दुष्परिणाम नाहींसे करण्यासाठीं म्हणून आपण औद्योगी-

करणानें आपल्याला जी अगणित चांगल्या गोष्टींची जोड करून दिलेली आहे त्या साऱ्या गोष्टीही टाकून द्याव्या, हीही गोष्ट खरोखर मला इष्ट वाटत नाहीं आणि शहाणपणाचीही वाटत नाहीं. दुसरें असें, कीं आतां कोणीं कांहीं म्हटलें तरी यंत्र माणसाच्या संसारांत येऊन बसलेलें आहे आणि तेथून तें कांहीं हालणारही नाहीं. तेव्हां आपल्या पुढचा खरा प्रश्न औद्योगीकरणानें आपले जेवढे सगळे फायदे झालेले आहेत ते सर्व राखून ठेवून त्यांच्याबरोबरच आलेल्या वाईट गोष्टी तेवढ्या कशा घालवून टाकावयाच्या हा आहे. यंत्रांमुळें जी संपत्ति निर्माण होते तिचा फायदा आपण घेतलाच पाहिजे; पण ही सर्व संपत्ति ज्यांनीं ती निर्माण केली त्यांच्या वांट्यास जाईल असें मात्र आपण केलें पाहिजे.

इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रांति कशी घडून आली हें सांगण्यासाठीं हें पत्र लिहावयाला मीं घेतलें; परंतु माझ्या रोजच्या संवयीप्रमाणें सरळ रस्ता सोडून मध्येंच फुटलेल्या पोटवाटेवर मी भटकतों आहें आणि औद्योगीकरणाच्या परिणामांची चर्चा करावयाला मीं सुरुवात केली आहे. त्या चर्चेच्या अखेरीस मीं, आज जो प्रश्न पुष्कळ लोकांना सतावून सोडीत आहे तो तुझ्यापुढें मांडला आहे; परंतु त्या आजच्या प्रश्नापर्यंत येऊन पोंचण्यापूर्वीं कालच्या काळात काय घडलें हें आपण आधीं पाहिलें पाहिजे. औद्योगीकरणाचे परिणाम काय झाले हें पाहण्यापूर्वीं ते घडून कसे आले, हें आपण पाहिलें पाहिजे. मग एवढी भली मोठी प्रस्तावना मीं कशासाठीं केली? तर या क्रांतीचें महत्त्व केवढें मोठें आहे हें तुझ्या मनावर ठसावें म्हणून. एक राजा बदलावयाचा किंवा सगळेच राज्यकर्ते बदलावयाचे अशा प्रकारची निव्वळ वरच्या थरांत फेरबदल करणारी ही कांहीं एखादी राजकीय क्रांति नव्हती. या क्रांतीचे परिणाम समाजांतील निरनिराळ्या वर्गांवर, नव्हे हरएक व्यक्तीवर घडून आले. यंत्राचा आणि औद्योगीकरणाचा विजय याचा अर्थ यंत्र ज्यांच्या ताब्यात होतें त्या वर्गांचा विजय असें हें समीकरण होतें. बरेच पूर्वीं मीं तुला एकदां सांगितलेंच आहे, कीं संपत्तीच्या उत्पादनाचीं साधनें ज्या वर्गाच्या ताब्यांत असतात, त्या वर्गाचें राज्य समाजावर चालत असतें. पूर्वीच्या काळीं संपत्तीच्या उत्पादनाचें सगळ्यांत प्रमुख साधन म्हणजे एक जमीनच होती काय तीत्यामुळें जे जमीनदार होते, ज्यांच्याकडे जमिनीची मालकी होती, त्या जमीनदारांच्याच हातीं सर्व सत्ता होती. सरंजामशाहींत हा असा प्रकार होता. पण नंतर मग जमिनींत उत्पन्न होणाऱ्या संपत्तीखेरीज निराळ्या प्रकारची संपत्ति पुढें आली आणि ही नवीन संपत्ति उत्पन्न करणाऱ्या लोकांना जमीनमालक लोकांच्याबरोबर सत्तेमध्यें भागीदारी प्राप्त झाली. त्यानंतर आतां मोठें यंत्र निर्माण झालें. स्वाभाविकच हें यंत्र ज्यांच्या हातांत होतें ते लोक आतां अग्रभागीं आले आणि खरे सत्ताधीश झाले.

शहरांमधून हा धनिकवर्ग हळूहळू महत्त्वाला कसा चढला, सरंजामदारसरदारांशीं त्याला झगडा कसा करावा लागला आणि कांहीं कांहीं ठिकाणीं थोडेफार यशही त्याला कसें मिळालें, हें या माझ्या पत्रांत मी तुला वारंवार सांगत आलों आहें.

सरंजामशाही कोसळून पडली हेंही मीं तुला सांगितलें ; परंतु या सरंजामशाहीची जागा या धनिकवर्गानें, नव्या मध्यम वर्गानें घेतली अशी कदाचित् माझ्या लिहिण्यावरून तुझी समजूत झालेली असण्याचा संभव आहे. तसें असेल तर मला माझ्या लिहिण्यामध्यें दुरुस्ती केली पाहिजे. कारण मध्यम वर्गाच्या हातीं सत्ता येण्याचें हें कार्य फारच हळूहळू होत गेलेलें आहे ; आतां ज्या काळाचा आपण विचार करतों आहों, त्या काळींही हें कार्य पुरें झालेलें नव्हतें. धनिकशाहीच्या हातीं सत्ता येण्यापूर्वी फ्रान्समध्यें एक मोठी राज्यक्रांति व्हावी लागली आणि आपल्याकडेही अशा प्रकारची क्रांति होणार नाहीं ना, अशी भीति इंग्लंडमध्यें त्यामुळें उत्पन्न व्हावी लागली. इंग्लंडमधील १६८८ च्या क्रांतीमुळें पार्लमेंटचा विजय झाला खरा. परंतु हें पार्लमेंटच मुळीं अगदीं थोड्या लोकांच्या – केवळ जमीनमालकांच्या – प्रतिनिधींचें बनलेलें होतें ही गोष्ट तुझ्या लक्षांत असेलच. शहरांतील कांहीं फार मोठ्या व्यापाऱ्यांना त्यामध्यें कदाचित् प्रवेश मिळाला असेल केव्हां केव्हां ; परंतु सामान्यतः पाहतां व्यापारी वर्गाला, म्हणजेच मध्यम वर्गाला त्यामध्यें स्थान नव्हतें.

तात्पर्य काय, तर राजकीय सत्ता ही ज्यांच्याकडे जमिनीची मालकी होती त्यांच्याच हातात होती. इंग्लंडमध्यें प्रत्यक्ष ही अशी परिस्थिति होती ; तेव्हां इतर ठिकाणीं तर याहूनही अधिक प्रमाणांत ही गोष्ट खरी होती. यामुळें राजकीय सत्ता हा सुद्धां एक प्रकारचा जन्मसिद्ध हक्क होऊन गेलेला होता. कारण जमिनीची मालकी ही बापापासून मुलाकडेच जायची. इंग्लंडमध्यें यामुळें खिशांतले मतदार संघ, म्हणजे ज्यामध्यें मतदारांची संख्या अगदींच थोडी असे अशा प्रकारचे पार्लमेंटचे सभासद निवडणारे मतदारसंघ निर्माण झालेले होते हें मीं तुला सांगितलेंच आहे. हे थोडेसे मतदारही पुन्हा आणखी कोणाच्या तरी ताब्यामध्यें असत ; अशा रीतीनें हा मतदार. संघ अशा माणसाच्या खिशांतलाच असे. अशा या मतदारसंघातर्फेच्या निवडणुकी म्हणजे काय नुसते फार्सच! त्यांमध्यें लांचलुचपतीला मोठा ऊत येई आणि मतांची व पार्लमेंटच्या सभासदत्वाची प्रत्यक्ष खरेदी-विक्री होई. अशा रीतीनें नवीनच उदयास येणाऱ्या मध्यमवर्गापैकीं कांहीं धनिक लोकाना पैशाच्या बळावर पार्लमेंटमध्यें जागा खरेदी करून मिळवितां येत असे. परंतु सरळ मार्गानें काय किंवा या अशा आडवाटेनें काय, सामान्य लोकांना पार्लमेंटमध्यें नजर सुद्धां टाकायला वाव नव्हता. वारसाहक्कानें त्यांना कसलेच हक्क किंवा सत्ता प्राप्त होण्यासारखी नव्हती ; त्याचप्रमाणें सत्ता विकत घेण्याचीही त्यांची ताकद नव्हती हें उघडच आहे. अशा स्थितींत श्रीमंत आणि हक्कदार वतनदार लोक त्यांच्या डोक्यावर नाचूं लागले किंवा त्यांची पिळणूक करूं लागले तरी या लोकांना काय करतां येणार होतें ? पार्लमेंटमध्यें जाऊन बोलण्याची संधि त्यांना मिळणें शक्य नव्हतें किंवा पार्लमेंटमध्यें कोणी प्रतिनिधि निवडून पाठविण्याचाही त्यांना अधिकार नव्हता. बरें, बाहेरून आपल्या मताचें प्रदर्शन करण्यासाठीं म्हणून त्यांनीं कांहीं सार्वजनिक हालचाल करावी

तर त्यामुळेंही सत्ताधारी मंडळीची नाराजी होत असे आणि अशी सार्वजनिक चळवळ ते जबरदस्तीनें दडपून टाकीत असत. लोकांच्यामध्यें संघटनाही नव्हती. त्यामुळें ते बिचारे अगदींच दुर्बल आणि असहाय झालेले होते. परंतु त्यांच्या दैन्याचा आणि दुःखाचा पेला जेव्हां भरून ओसंडून वाहूं लागला, तेव्हां मात्र त्यांनीं कायदा आणि सुव्यवस्था यांचें गांठोडें खुंटीला लावून बंड केलें. त्यामुळें अठराव्या शतकामध्यें इंग्लंडमध्यें पुष्कळच बेकायदेशीरपणाच्या चळवळी माजलेल्या होत्या. सर्वसामान्य लोकांची आर्थिक परिस्थिति फारच वाईट प्रकारची झालेली होती. त्यामध्येंच मोठ्या जमीनदारांनीं छोट्या छोट्या जमीनदारांना हुसकून काढून, पिळून काढून त्यांच्या जमिनींची आपल्या मिळकतींत भर टाकण्याचे जे प्रयत्न चालविलेले होते, त्यानेंही आर्थिक परिस्थिति अधिकच वाईट होत गेली. खेडेगांवच्या ज्या सामुदायिक मालकीच्या जमिनी होत्या, त्यासुद्धां बळकावून आपल्या खिशांत टाकण्यास श्रीमंत जमीनदारांनीं कमी केलें नाहीं. या सगळ्या प्रकारानें सामान्य जनतेच्या हालअपेष्टांमध्यें भरच पडली. आपल्याला पार्लमेंटमध्यें कांहींच अधिकार नाहीं, या विचारामुळेंही लोकांमध्यें असंतोष निर्माण झालेला होता आणि राजकीय स्वायत्ततेची कांहींशी अस्पष्ट अशी मागणी लोक यामुळें करूं लागले होते.

फ्रान्समधील परिस्थिति तर याहूनही अधिक वाईट असल्यामुळें तेथें राज्यक्रांतीच घडून आली. इंग्लंडमध्यें राजाला कांहींच महत्त्वाचें स्थान नव्हतें. राज्यसत्ता अनेकांच्या हातांमध्यें विभागलेली होती. त्याशिवाय फ्रान्समध्यें ज्याप्रमाणें राजकीय विचारांची वाढ होत गेली, तशी इंग्लंडमध्यें ती झालेली नव्हती. त्यामुळें इंग्लंडमध्यें एकदम मोठा स्फोट होण्याची आपत्ति टळली आणि तेथें राजकीय फेरबदल आस्ते आस्ते घडून आले. दरम्यान औद्योगीकरणामुळें जे सामाजिक फेरबदल झाले आणि नवीन आर्थिक रचना निर्माण झाली, त्यामुळें मात्र हे राजकीय बदल होण्याचें काम जरा झपाट्यानें झालें.

अठराव्या शतकांत इंग्लंडमधील राजकीय पार्श्वभूमि ही अशा प्रकारची होती. या सुमारास परदेशाहून निर्वासित झालेल्या पुष्कळशा कारागिरांची इंग्लंडमध्यें आयात झाल्यामुळें घरगुती उद्योगधंद्यामध्यें इंग्लंडनें पुष्कळ आघाडी मारलेली होती. यूरप खंडांत जीं धार्मिक युद्धें सुरू होतीं, त्यांमुळें पुष्कळशा प्रॉटेस्टंट लोकांना आपलीं घरेंदारें आणि देश हीं सोडून इंग्लंडमध्यें येऊन आसरा पाहावा लागत होता. तसेंच नेदरलंडमधील बंड मोडून काढण्यासाठीं स्पेननें जेव्हां तिकडे युद्ध चालू केलें, तेव्हांही नेदरलंडमधील किती तरी कारागीर पळून इंग्लंडमध्यें येऊन राहिले. इंग्लंडच्या पूर्व भागांत अशा रीतीनें ३०,००० लोक येऊन राहिले होते असें म्हणतात. त्यांना त्या ठिकाणीं राहण्याची परवानगी देतांना इलिझाबेथ राणीनें त्यांच्यावर अशी अट घातली होती, कीं त्यांच्यापैकीं प्रत्येक घरीं एकेक इंग्रज मनुष्य शिकाऊ उमेदवार म्हणून त्यांनीं ठेवला पाहिजे. अशा रीतीनें इंग्लंडचा कापड विणण्याचा उद्योग संघटित होण्याला हें फार मोठें साधन झालें. स्वतःच्या देशांत जेव्हां कापड विणण्याचा उद्योग चांगला प्रस्थापित

झाला, तेव्हां इंग्लंडनें नेदरलंडमधून आपल्या देशांत कापडाची आयात करण्याला बंदी केली. दरम्यान इकडे नेदरलंडचें अजूनही स्वातंत्र्याचें तें तीव्र युद्ध चालूच होतें. त्यामुळेंही त्यांच्या उद्योगधंद्यांचें फार नुकसान झालें. त्यामुळें असें झालें, कीं ज्या ठिकाणीं नेदरलंडहून कापडानें भरलेलीं असंख्य जहाजें इंग्लंडला नित्य जात होतीं, तेथें हीं जहाजें जाण्याचीं तर थोडक्याच काळांत बंद झालींच; पण उलट, इंग्लंडहूनच नेदरलंडमध्यें कापडाचा प्रवाह सुरू होऊन तो अधिकाधिक मोठाच होत गेला.

अशा रीतीनें बेल्जममधील वालून लोकांनीं ( केल्टिक वंशाचे पण फ्रेंच बोली बोलणारे ) इंग्रजांना कापसाचें कापड विणण्याचा धंदा शिकविला. त्यांच्यामागून ह्यूजेनॉट लोक इंग्लंडमध्यें आले ; हे फ्रान्समधले प्रॉटेस्टंट लोक. तेथून पळून ते इंग्लंडमध्यें आश्रयाला आलेले होते. या लोकांनीं इंग्लंडला रेशमी कापड विणण्याचा धंदा शिकविला. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांमध्यें यूरप खंडामधून इंग्लंडमध्यें अगणित कसबी कारागीर येऊन राहिले आणि त्यांच्यापासून इंग्रज लोक कागद, कांच, यांत्रिक खेळणीं, लहान व मोठीं घड्याळें वगैरे प्रकारचे उद्योगधंदे शिकले.

अशा रीतीनें आतांपर्यंत यूरप खंडांत मागासलेल्या अवस्थेंत असलेलें इंग्लंड यापुढें महत्त्वाला चढूं लागलें आणि त्याची संपत्ति पण वाढत चालली. लंडन शहरही आतां वाढूं लागलें ; लौकरच तें एक साधारणपणें बरेंच महत्त्वाचें बंदर गणलें जाऊं लागलें आणि तेथें व्यापारी आणि धंदेवाले यांची लोकसंख्या अधिकाधिक वाढून भरभराटीस येऊं लागलें. सतराव्या शतकाच्या सुरुवातीलाच लंडन हें एक महत्त्वाचें बंदर आणि व्यापाराचें केंद्र झालेलें होतें, हें दाखविणारी एक मौजेची गोष्ट सांगतात. ज्याचें डोकें मारलें गेलें त्या पहिल्या चार्ल्स राजाचा बाप पहिला जेम्स् राजा याचा राजे लोकांची अनियंत्रित राजसत्ता आणि राजे लोकांचा दैवी अधिकार यांवर फार मोठा भर होता. त्याला पार्लमेंट सभाही मंजूर नव्हती आणि लंडनमधील हे उपटसुंभ व्यापारी पण त्याला आवडत नव्हते. म्हणून एकदां रागाच्या भरांत त्यानें आपण आपला दरबार लंडनहून काढून ऑक्स्फर्ड येथें नेणार अशी तेथील नागरिकांना धमकी दिली ; परंतु लंडनच्या मेयरवर या धमकीचा तिळमात्रसुद्धां परिणाम झाला नाहीं ; आणि उत्तरादाखल उलट तो म्हणाला, "दरबाराबरोबर टेम्स नदीही, महाराज आपल्याबरोबर कृपा करून घेऊन जाणार नाहींत अशी मी आशा करतों !"

या धनिक व्यापारी वर्गानेंच पार्लमेंटला पाठिंबा दिला आणि पार्लमेंटच्या पहिल्या चार्ल्सबरोबरच्या युद्धांत पार्लमेंटला पैशाची फार मोठी मदत केली.

इंग्लंडमध्यें हे सगळे नवे उद्योगधंदे निर्माण झाले त्या सगळ्यांचें स्वरूप घरगुती किंवा खेडेगांवी धंदे, हस्तोद्योग किंवा ग्रामोद्योग म्हणतात तशा प्रकारचें होतें. याचा अर्थ असा, कीं हे कारागीर किंवा धंदेवाले लोक सामान्यतः आपापल्या घरीं बसून काम करीत असत किंवा क्वचित् कोठें थोडे थोडे एकत्र बसून काम करीत असत. प्रत्येक धंद्यामध्यें कारागिरांचे संघ किंवा संस्था असत. हिंदुस्थानांतील जातीं-

मध्यें आणि त्याच्यामध्यें पुष्कळच साम्य असे. परंतु हिंदुस्थानांतल्या जातींमध्यें जें एक धर्माचें अंग आहे तें या संघांमध्यें नव्हतें. त्या त्या धंद्यांतले जे प्रमुख वाकबगार कारागीर असत ते आपल्या हाताखालीं शिकाऊ उमेदवार घेऊन त्यांना शिकवून तयार करीत असत. विणकरांजवळ स्वतःच्या मालकीचे माग असत. सूत कांतणारांजवळ आपापल्या मालकीचे चरखे असत. सूत काढण्याचें काम साऱ्या देशभर होत असे. स्त्रिया आणि मुली यांचा फावल्या वेळचा हा धंदा होता. कोठें कोठें विणकामाचे लहान लहान कारखाने पण असत. अशा ठिकाणीं पुष्कळसे विणकर आपापले माग एकत्र ठेवीत असत आणि तेथें जाऊन विणण्याचें काम करीत असत; परंतु प्रत्येक विणकर आपापल्या मागावर स्वतंत्रपणें काम करीत असे. त्यामुळें स्वतःच्या घरीं बसून त्यानें आपलें विणण्याचें काम केलें काय किंवा अशा चारचौघां विणकरांच्या बरोबर आपआपल्या मागावर प्रत्येकानें काम केलें काय, दोहोंमध्यें खरोखर फरक असा कांहींच नव्हता. आजचे मोठमोठ्या यंत्रांनीं युक्त असे जे कारखाने असतात, त्यांत आणि या असल्या छोट्या कारखान्यात कसल्याही प्रकारचें साम्य नव्हतें.

उद्योगधंद्यांची ही घरगुती पद्धति त्या वेळीं कांहीं एकट्या इंग्लंडमध्यें होती असें नव्हे; तर साऱ्या जगभर जेथें जेथें म्हणून उद्योगधंदे या काळामध्यें होते तेथें तेथें हीच पद्धति होती. उदाहरणार्थ, हिंदुस्थानामध्यें हे घरगुती धंदे फारच पुढारलेल्या स्थितीमध्यें होते. इंग्लंडमध्यें हे घरगुती धंदे आज जवळजवळ बहुतेक पार नाहींसे झाले आहेत; परंतु हिंदुस्थानांत अजूनही असे धंदे पुष्कळच आहेत. हिंदुस्थानांत आज मोठीं यंत्रें आणि छोटे हातमाग दोन्हींची जोडीनें चलती चालू आहे आणि दोघांचेंही फायदे-गैरफायदे एकमेकांशीं एकाच वेळीं ताडून पाहण्याला येथें साधन आहे. आपण जें कापड वापरतों तें खादीचें असतें हें तुला ठाऊकच आहे. हें हातानें कांतलेल्या सुतापासून हातानें विणलेलें असतें. अशा रीतीनें हें कापड म्हणजे सर्वस्वीं हिंदुस्थानांतील मातीच्या झोंपड्यांतून आणि खेडेगांवी घरांतून तयार झालेला असा माल आहे.

परंतु नवीन जे यांत्रिक शोध लागले, त्यांच्यामुळें इंग्लंडमधील घरगुती धंद्यांच्या बाबतींत फार मोठी उलाढाल घडून आली. यंत्रें अधिकाधिक प्रमाणांत माणसांचें काम करूं लागलीं आणि थोड्या श्रमांत पुष्कळ अधिक माल निर्माण करणें शक्य होऊं लागलें. या शोधांची सुरुवात अठराव्या शतकाच्या मध्याला झाली; त्यांच्याबद्दल आतां पुढच्या पत्रामध्यें विचार करूं.

वर मीं खादीच्या चळवळीचा ओझरता उल्लेख केला. त्या संबंधांत येथें मला फारसें सांगावयाचें नाहीं. परंतु एक मात्र मला तुला सांगावेंसें वाटतें, कीं ही चळवळ आणि चरखा या गोष्टी कांहीं मोठ्या यंत्रांशीं स्पर्धा करण्यासाठीं काढलेल्या नाहींत. पुष्कळ लोकांची अशी चुकीची समजूत होते. चरखा मान्य करणें म्हणजे मध्ययुगीन अवस्थेकडे परत जाणें होय आणि मोठमोठीं यंत्रें आणि त्यांच्यापासून आपल्याला प्राप्त झालेलें हें सगळें औद्योगीकरण यांचा त्याग करणें होय, असें

त्यांना वाटतें; पण हें सगळें चूक आहे. आमची चळवळ औद्योगीकरणाला औद्योगीकरण म्हणून किंवा यंत्रें आणि कारखाने यांना यंत्रें आणि कारखाने म्हणूनच केवळ विरोध करणारी चळवळ नाहीं. प्रत्येक गोष्टींतील जें चांगल्यांत चागलें आहे तें सगळें आणि अगदीं जलदींत जलदी आम्हांला हिंदुस्थानासाठीं मिळवावयाचें आहे; परंतु आमच्या देशाची आजची स्थिति लक्षांत घेतली असतां आणि विशेषतः आमच्या शेतकरीवर्गाचें भयंकर दारिद्र्य ध्यानांत घेता त्यांनीं आपल्या फुरसतीच्या वेळाचा उपयोग करावा म्हणून आम्ही त्यांना सूत काढावयास सागत असतों. असें केल्यानें थोडीशी कां होईना, पण त्यांची आर्थिक स्थिति सुधारते आणि त्याचबरोबर ज्या परदेशी कापडानें आमच्या देशाची केवढी तरी संपत्ति देशाबाहेर नेण्याचा सपाटा चालविलेला आहे, त्या परदेशी कापडावरही त्याना कमी कमी अवलंबून राहावें लागतें.

## ९८

# इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रांतीला सुरुवात होते

२७ सप्टेंबर, १९३२

कारागिरीच्या वस्तू निर्माण करण्याच्या पद्धतीमध्यें ज्यामुळें एवढा प्रचंड फेरबदल घडून आला, अशा कांहीं यांत्रिक शोधांबद्दल तुला आतां थोडेंसें सांगितलें पाहिजे मला. या यांत्रिक शोधांचें स्वरूप आज प्रत्यक्ष गिरण्यांमध्यें किंवा कारखान्यांमध्यें पाहिलें, म्हणजे आपल्याला वाटतें यांत काय आहे एवढें मोठें! किती साध्या, सोप्या गोष्टी आहेत या! परंतु त्यांची सुरुवातीला मनामध्यें कल्पना करणें आणि प्रत्यक्ष त्यांची रचना करून त्यांचें कार्य डोळ्यांपुढें निर्माण करून दाखविणें हें पहिल्या प्रथम केवढें तरी कठिण काम असलें पाहिजे. या यांत्रिक शोधांपैकीं पहिला शोध इ. स. १७३८ मध्यें लागला. या सालीं विणण्याच्या मागामध्यें घांवत्या घोट्याचा उपयोग केनावाच्या मनुष्यानें करून दाखविला. हा शोध लागण्यापूर्वी विणकराच्या हातांतील काडीचा धागा ताण्यामधून इकडून तिकडे न्यावयाचा म्हणजे किती हळू आणि कष्टानें न्यावा लागत असे! घांवत्या घोट्यामुळें हें काम पुष्कळ जलद होऊं लागलें. त्यामुळें विणकराची काम-निर्मिति दुप्पट वाढली. याचा अर्थ असा, कीं विणकराला आतां पहिल्यापेक्षां अधिक सूत लागूं लागलें. अर्थातच हातानें सूत काढणाऱ्या लोकांना विणकरांची ही मागणी पुरी करणें पुष्कळ जड पडूं लागलें; त्यामुळें पहिल्यापेक्षां अधिक सूत काढण्याचा कांहीं मार्ग सांपडला तर पाहावा, अशी खटपट ते सहजच करूं लागले. इ. स. १७६४ मध्यें हारग्रीव्हस् नांवाच्या मनुष्यानें स्पिनिंग

जेली नांवाचें छोटेंसें सूत काढण्याचें यंत्र तयार केलें. त्यानें ही अडचण बरीचशी भागल्यासारखी झाली. त्यानंतर याच बाबतींतील रिचर्ड आर्कराइट वगैरेंचे आणखी शोध झाले. प्रथम पाण्याचा उपयोग यंत्रें चालविण्यासाठीं शक्ति निर्माण करण्याकडे करण्यांत येऊं लागला. नंतर वाफेच्या शक्तीचा उपयोग सुरू झाला. या सर्व शोधांचा उपयोग प्रथम कापसाच्या सुतांचें कापड विणण्याच्या धंद्यामध्यें होण्यास सुरुवात झाली. त्यामुळें कापड-कारखाने किंवा कापड-गिरण्या उभ्या राहूं लागल्या. त्यानंतर या शोधांचा उपयोग लोंकरीच्या धंद्यामध्यें होऊं लागला.

याच सुमारास जेम्स् वॅट यानें इ. स. १७६५ मध्यें वाफेचें इंजिन तयार केलें. औद्योगिक इतिहासांतील ही एक मोठी महत्त्वाची घटना होती. तेव्हांपासून कारखान्यांतील वस्तू तयार करण्याच्या कामांत वाफेच्या शक्तीचा उपयोग वाढत्या प्रमाणावर होऊं लागला. या प्रकारच्या नव्या कारखान्यांसाठीं आतां कोळशाची गरज उत्पन्न झाली. त्यामुळें कोळशाचा नवीन धंदा निर्माण झाला. कोळशाचा उपयोग व्हायला लागल्यापासून लोखंड गाळण्याच्या म्हणजे खाणींतील मातीपासून शुद्ध लोखंड तयार करावयाच्या नवीन पद्धतीचा उगम झाला. त्यामुळें लोखंडाचा धंदा फारच झपाट्यानें वाढला. लोखंडी कामाचे नवे कारखाने कोळशाच्या खाणी-जवळच उभारले जाऊं लागले; कारण तेथें कोळसा त्या मानानें स्वस्त पडे.

अशा रीतीनें इंग्लंडमध्यें तीन धंदे मोठ्या जोरानें वाढीला लागले; कापड, लोखंड आणि कोळसा यांचे. हे कारखाने मुख्यतः कोळशाच्या खाणींच्या आसपास आणि इतरही कांहीं सोयीच्या ठिकाणीं उभारण्यांत येऊं लागले. यामुळें इंग्लंडचें सगळें स्वरूपच पालटून गेलें. हिरव्याचार रानांनीं गर्द असलेलीं मधुर खेडेगांवें आतां नाहींशीं होत चाललीं आणि त्यांच्या जागीं हे नवीन मोठेमोठे कारखाने–गिरण्या–उभारले जाऊन त्यांच्या चिमण्यातला काळाकभिन्न धूर जिकडे तिकडे आजूबाजूला अंधकाराची आणि घाणीची छाया पसरवूं लागला. आजूबाजूला कोळशाचे पर्वतासारखे ढीग आणि त्याचप्रमाणें राखेचे वगैरे उकिरड्याचे डोंगर असलेले हे कारखाने, या गिरण्या, दिसायला किती बेंगरूळ आणि भकास वाटत! बरें, या गिरण्यांच्या आणि कारखान्याच्या भोंवतीं जी कारखानदारी शहरें निर्माण झालीं, तीं तरी कांहीं सुरेख असावीं; तर तींही तशीं नव्हतीं. कारखान्याच्या मालक लोकांचा उद्देश फक्त एकच होता. तो म्हणजे अधिकाधिक पैसा मिळविण्याचा मार्ग काढावयाचा. त्यासाठीं जशी वेळ पडली तशीं त्यांनीं शहरें रचीत नेलीं. त्यांत रेखीवपणा, सौंदर्य-विचार यांना कांहीं थारासुद्धां नव्हता. कशीं तरी, जशीं वाढतील तशीं हीं शहरें वाढत गेलीं. त्यामुळें हीं शहरें बेंगरूळ, भकास, भयंकर मोठीं आणि घाणेरडीं अशीं झालीं आणि अर्धपोटी काम करणाऱ्या मजुरांना कारखान्यांतील त्या भयंकर आरोग्यविघातक परिस्थितींत कामाच्या वेळीं राहावें लागून बाकीचा वेळ या असल्या गचाळ शहरांत घालविणें भाग पडूं लागलें.

मोठमोठ्या जमीनदारांनीं छोट्या जमीनदारांना पिळून काढून चोथ्याप्रमाणें दूर फेंकून देण्याचा क्रम सुरू केल्यामुळें इंग्लंडमध्यें बेकारी वाढत गेली व बेकायदेशीर दंगेखोरीला आणि बंडांना इंग्लंडमध्यें भर आला हें मागें मीं तुला सांगितलें तें तुझ्या लक्षांत असेलच. हे नवीन जे उद्योगधंदे निर्माण झाले त्यामुळें तर सुरुवातीला परिस्थिति अधिकच बिघडली. कारखान्यांमुळें शेतीला नुकसान आलें आणि त्यामुळें बेकारी वाढतच चालली. बरोबरच आहे; एखादा नवीन शोध लागला, कीं स्वाभाविकच यंत्रानें जें काम होऊं लागावयाचें तें काम करणाऱ्या माणसांची गरज नाहींशी व्हावयाची. यामुळें पुष्कळदां कामगारांना नोकरीवरून कमी होण्याचे प्रसंग येत व मग सहजच त्यांच्यामध्यें मोठाच असंतोष माजे. त्यांच्यापैकीं पुष्कळांना या नव्या यंत्रांचाच तिटकारा वाटूं लागे आणि कित्येकदां हीं यंत्रें मोडून टाकण्याचाही ते प्रयत्न करीत. या लोकांना 'यंत्रफोडे' असें नांव त्या काळीं मिळालेलें होतें.

या यंत्र फोडण्याच्या प्रकाराचा यूरप खंडांतील इतिहास मोठा लांबपासूनचा आहे. सोळाव्या शतकात जर्मनीमध्यें एक अगदीं साधा यांत्रिक माग शोधून काढण्यांत आला. त्या काळपर्यंत या प्रकाराच्या इतिहासासाठीं आपल्याला मागें जावें लागतें. इ. स. १५६९ मध्यें एका इटालियन पाद्यानें लिहिलेल्या एका जुन्या पुस्तकांत या मागासंबंधीं पुढील मजकूर लिहिलेला आढळतो: "डॅझिंगमधील नगरसभेला अशी भीति पडली, कीं या नवीन शोधामुळें कितीतरी कारागीर बेकार होऊन उघडे पडतील. यासाठीं त्यांनीं या नवीन शोधून काढलेल्या यंत्राचा मोडून तोडून नाश केला आणि तें शोधून काढणाऱ्या मनुष्याला गुप्तपणें गळा दाबून तरी ठार करून टाकण्यांत आलें असावें किंवा पाण्यांत बुडवून नाहींसें करण्यांत आलें असावें!" या संशोधकाचा अशा रीतीनें जरी तडकाफडकी निकाल करून टाकण्यांत आला, तरी हें यंत्र सतराव्या शतकामध्यें पुन्हां उत्पन्न होऊन पुढें आलेंच. या वेळीं त्याच्यामुळें साऱ्या यूरप खंडभर दंगे उसळले. या यंत्राचा उपयोग करण्यांत येऊं नये अशा प्रकारचे कायदे कित्येक ठिकाणीं करण्यांत आले आणि कित्येक ठिकाणीं हीं यंत्रें भर बाजारांमध्यें जाहीर रीतीनें जाळण्यांत आलीं. या यंत्राचा प्रथम शोध लागला तेव्हांपासूनच जर त्याचा उपयोग होऊं लागला असता, तर त्याच्या मागून दुसरे आणखी शोध लागले असते आणि यंत्रयुग पुढें सुरू झालें त्यापेक्षांही आधीं सुरू झालें असतें. परंतु या यंत्राचा उपयोगसुद्धां त्या काळीं होऊं शकला नाहीं ही एकच गोष्ट सुद्धां औद्योगीकरणाला अद्यापि अनुकूल काल आलेला नव्हता, हें दाखविण्याला पुरेशी आहे. हा काल जेव्हां अनुकूल आला त्या वेळीं इंग्लंडमध्यें यंत्रानें आपले पाय रोंवलेच. इंग्लंडमध्येंही याविरुद्ध पुष्कळ दंगे झाले; पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कामगारांच्या मनांत यंत्रामुळें असंतोष निर्माण व्हावा ही अगदीं स्वाभाविक गोष्ट होती; परंतु हळूहळू त्यांनाही कळून आलें, कीं दोष कांहीं यंत्राचा नाहीं; तर थोड्या लोकांच्याच केवळ फायद्यासाठीं यंत्राचा उपयोग करण्यांत येतो या पद्धती-

मध्यें दोष आहे; परंतु तूर्त आपण पुन्हा एकदां इंग्लंडमध्यें यंत्रें आणि कारखाने यांची वाढ कशी होत गेली, या गोष्टींकडे लक्ष देऊं या.

हे जे नवीन कारखाने निर्माण केले गेले त्यांनीं जुन्या पुष्कळशा घरगुती उद्योगांची आणि वैयक्तिक कारागिरी करून राहणाराची इतिश्री केली. घरांत बसून काम करणाऱ्या या लोकांना यंत्राशीं स्पर्धा करून टिकून राहणें अशक्य होतें. म्हणून त्यांना आपली कारागिरी किंवा उद्योगधंदे सोडून देणें भाग होतें. त्यानंतर मग ज्या कारखान्यांचा त्यांना स्वाभाविकच अगदीं तिटकारा वाटत असे त्याच कारखान्यांत जाऊन त्यांनीं रोजमजुरीचें काम तरी पत्करावें, नाहीं तर बेकाराच्या जमावांत सामील व्हावें हे दोनच मार्ग त्यांना मोकळे होते. घरगुती उद्योगधंद्यांचा हा नाश अगदीं एकदम तडकाफडकी घडून आला असें जरी नव्हे, तरी तो पुष्कळच वेगानें घडून आला. या शतकाच्या अखेरीस म्हणजे इ. स. १८०० च्या सुमारास हे मोठे कारखानेच ठिकठिकाणीं दिसून येऊं लागले. यानंतर सुमारें तीस वर्षांनीं स्टीफन्सन्नें संशोधित केलेलें सुप्रसिद्ध रॉकेट नांवाचें वाफेचें इंजिन तयार झालें आणि तें जोडून रुळावरून डब्यांच्या गाड्या धांवूं लागल्या. अशा रीतीनें यंत्रांचा प्रसार आणि व्याप सारखा वाढत गेला आणि लौकरच उद्योगधंदे आणि सामान्य जीवन यांच्या क्षेत्रांत जवळजवळ सगळीकडे यंत्रांचा शिरकाव झाला.

या संशोधकांपैकीं कितिकांचीं तरी नांवें मीं तुला सांगितलेलीं नाहींत; पण त्या सर्वांच्या बाबतींत एक गोष्ट मात्र विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. ते सगळे लोक एकूणएक जण सामान्य हातकाम करणाऱ्या लोकांच्या वर्गांमधून उदयाला आलेले होते. याच वर्गांमधून सुरुवाती-सुरुवातीचे बहुतेक सारे बडे कारखानदार उत्पन्न झाले; परंतु संशोधकांनीं केलेले शोध आणि त्यांपासून उत्पन्न झालेली कारखानदारी पद्धति यांचा परिणाम म्हणजे मालक आणि मजूर यांच्यामधील अंतर पूर्वीहून फारच अधिक झालें. कारखान्यांतील मजूर म्हणजे केवळ तेथील यंत्रांतला एक दांता होऊन गेला; एका विशाल व गुंतागुंतीच्या आर्थिक रचनेच्या चक्रांत सांपडून तो जणुं एक दुबळा गुलाम झाला; ही आर्थिक रचना कशा प्रकारची आहे ही गोष्टसुद्धां त्याच्या समजुतीच्या बाहेरची होती, तेथें त्या संघटनेंत त्याचा कांहीं अधिकार चालणें ही किती अशक्य गोष्ट होती! हे नवीन कारखाने कारागिरांशीं आणि धंदेवाल्यांशीं स्पर्धेला उभे राहिले व त्यांच्यापेक्षां कमी खर्चांत वस्तू तयार करून इतक्या स्वस्त किंमतीला त्या विकूं लागले, कीं स्वतःच्या घरच्या अगदींच साध्या आणि जुन्या काळच्या हत्यारांच्या साहाय्यानें वाटेल तेवढें कसब दाखवून शिकस्त केली तरीही कारागिरांना इतक्या स्वस्त त्या वस्तू देतां येईनाशा झाल्या, हें जेव्हा प्रथम दिसून आलें तेव्हा या सगळ्या पद्धतींत कोठें तरी अन्याय होतो आहे याची थोडीशी अंधुक कल्पना त्या वेळीं कारागिरांना व धंदेवाल्याना प्रथम आली. त्यांचा स्वतःचा धंद्यामधील कोणताही दोष नसतांना त्यांना आपले छोटेखानी उद्योगधंदे बंद करणें

भाग पडत होतें. बरें, एक सोडून दुसरा नवा धंदा करावा म्हटलें, तरी स्वतःच्या हातचा रोजचा कसबाचा धंदा जेथें चालविणें अशक्य झालें, तेथें नवीन धंदा तरी कसा यशस्वी होणार? त्यामुळें हळूहळू या सर्व कारागिरांची बेकारांच्या जमावांत भर पडली आणि त्याची उपासमार होऊं लागली. कोणीं तरी लिहिलेलें आहे, कीं "भूक ही कवाईत शिकविणारा आणि ती कवाईत करून घेणारा कारखानदाराचा अंमलदार आहे" आणि या भुकेपायींच या कारागिरांना या नव्या कारखान्यांत काम मिळविण्याकरिता म्हणून नाइलाज होऊन यावें लागलें. कारखानदारांना त्यांच्याबद्दल थोडीच कांहीं दयामाया होती? त्यांनीं या लोकांना काम दिलें; परंतु वेतन मात्र अगदींच थोडें दिलें आणि तेवढ्यावर त्या बिचाऱ्यांना कारखान्यांमध्यें आपल्या रक्ताचें पाणी करीत राबावें लागलें. स्त्रियांना आणि मुलांनासुद्धां या आरोग्यविघातक अशा ठिकाणीं दिवस-दिवस, किती तरी तास राबावें लागल्यानें त्याच्यापैकीं कितीक थकून, घेऱ्या येऊन पडत आणि मरतसुद्धां. पुरुषांना साऱ्या दिवसभर खोल कोळशाच्या खाणींच्या तळाशीं काम करीत राहावें लागे आणि महिनोमहिनेपर्यंत त्यांना कधीं सूर्याचें दर्शन म्हणून होत नसे.

परंतु हें सारें कारखानदारांच्या मालकांच्या क्रूरपणामुळें घडून येत होतें अशी मात्र समजूत करून घेऊं नकोस. आपण असा काहीं क्रूरपणा करतों आहों अशी त्यांना बहुशः जाणीवसुद्धां नव्हती. दोष होता तो त्या कारखानदारी कामाच्या पद्धतीचा होता. या कारखानदारांचा सगळा उद्देश काय होता, तर आपला उद्योग-धंदा वाढवावयाचा आणि इतर दूरदूरच्या देशांतील बाजारपेठा काबीज करावयाच्या; यासाठीं काय वाटेल तें करावें लागलें तरी तें करण्याला त्यांची तयारी होती. हे सगळे नवे कारखाने बांधावयाचे आणि यंत्रसामग्री खरेदी करावयाची म्हणजे सुरुवातीलाच किती तरी प्रचंड पैसा खर्च करावा लागे. या पैशावरील नफा काय ताबडतोब थोडाच हातांत येणार? कारखाना सुरू होऊन जिन्नस तयार होऊं लागले पाहिजेत, बाजारांत ते विकले गेले पाहिजेत, तेव्हां कोठें गुंतविलेला पैसा थोडा थोडा मोकळा होऊं लागणार. त्यामुळें कारखाने उभारतानाच या मालक लोकांना अत्यंत काटकसर करणें जरूर वाटे. बरें, पुढें माल बराचसा खपून पैसा जरी हातांत आला, तरी हा पैसा ते आणखी नवे कारखाने उभारण्याकडे खर्च करीत. त्यांच्या देशांत इतर देशांतल्यापेक्षां आधीं औद्योगीकरणाला सुरुवात झालेली होती; हा जो इतरांच्यापेक्षां पुढचा टप्पा त्यांना गांठायला मिळालेला होता त्याचा फायदा घेण्याचा त्यांचा उद्देश होता आणि असा हा फायदा त्यांना मिळतही गेला. तेव्हां आणखी उद्योगधंदे वाढवावेत आणि आणखी पैसा मिळवावा, या वेडाच्या भरीं भरून त्यांनीं जे मजूर खरोखर त्यांची सगळी संपत्ति निर्माण करीत होते, त्यांनाच भरडून काढण्याचा क्रम चालू केला.

त्यामुळें या नवीन कारखानदारीच्या पद्धतीची रचना बलिष्ठांनीं दुर्बलांची

पिळणूक करावी या गोष्टीला विशेषच अनुकूल अशा प्रकारची बनत गेली. इतिहासांत सुरुवातीपासूनच 'बळी तो कान पिळी' हा न्याय आपण पाहत आलों आहों. कारखानदारीच्या पद्धतीनें हा प्रकार अधिकच सुलभ झाला. कायद्यानें पाहिलें तर या पद्धतींत गुलामगिरी नव्हती; परंतु वस्तुतः पाहतां अर्धपोटीं राहणारा हा रोजमजुरीचा गुलाम होऊन राहिलेला कामगार जुन्या काळच्या गुलामाहून कांहीं निराळा नव्हता. कायद्याचें सगळें धोरण मालकांच्या हिताचें होतें. धर्मसुद्धां त्यांच्याच बाजूचा होता; तोही मजुराला पुढच्या जन्मांत अथवा स्वर्गांत परमेश्वरी कृपेची प्राप्ति होईल या आशेवर सध्यांची आपली दैन्यावस्था बिनतक्रार सहन करीत राहण्याचाच उपदेश करी. एवढेंच नव्हे, तर राज्यकर्त्या लोकांनीं एक स्वतःच्या सोयीचें तत्त्वज्ञान प्रसृत केलें; तें असें, कीं समाजाच्या धारणेसाठीं त्यामध्यें गरिबांचा वर्ग असणें आवश्यकच आहे आणि म्हणून कमी मजुरी देणें यांत कसलाही दोष नसून समाजधारणेच्या दृष्टीनें तेंही पुण्यकर्मच आहे. कारण जर जास्त मजुरी देण्यास सुरुवात केली तर लोक ऐषआराम करूं लागतील आणि नीट कसून काम करणार नाहींत. ही सगळी विचारसरणी त्या लोकांना मोठी उपयुक्त आणि संतोषजनक अशी झाली; कारण ती कारखानदारांच्या आणि श्रीमंत लोकांच्या हितसंबंधाशीं नेमकी जुळती होती.

या काळचा इतिहास वाचायला मोठा मौजेचा आणि बोधपर आहे. त्यापासून आपल्याला पुष्कळच शिकावयाला सांपडतें. यांत्रिक निर्माणपद्धतीचा अर्थव्यवस्थेवर आणि समाजजीवनावर केवढा प्रचंड परिणाम होतो हें त्यावरून आपणास समजून येतें. या पद्धतीमुळें जुनी सर्व सामाजिक जुळणी पार विस्कटून जाते, नवीन वर्ग पुढें येतात आणि त्यांच्या हातीं सत्ता येते. मूळचा कारागिरांचा वर्ग हा कारखान्यांतील रोजंदारी मजूर होऊन जातो. याच्याच बरोबर या नवीन आर्थिक घडीमुळें लोकांच्या धार्मिक आणि नैतिक आचारविचारांवरही परिणाम होतो. सर्वसामान्य माणसांच्या धार्मिक श्रद्धा किंवा नैतिक विचार यांची घडण त्यांचे त्यांचे वैयक्तिक हितसंबंध किंवा वर्गभावना यांच्याशीं जुळती अशा रीतीनें बनत असते किंवा बदलत असते आणि जमेल तोंपर्यंत आपापल्या हितसंबंधांचें रक्षण करण्यासाठींच उपयुक्त असे धर्म व नीति यांचे नियम घालून ठेवण्याची पुरेशी काळजी सर्व लोक घेत असतात. अर्थात् हें सर्व करतांना आव मात्र असा मोठा सद्बुद्धीचा आणलेला असतो, कीं अशा प्रत्येक नियमाच्या पाठीशीं सर्व मनुष्यजातीच्या कल्याणाचाच मात्र एकमेव हेतु आहे. आपल्या या हिंदुस्थानांत इंग्रज राजप्रतिनिधि (व्हाइसरॉय) किंवा इतर अधिकारी यांच्या तोंडून असल्या मोठ्या पुण्यकल्पना रोज ऐकायला सांपडत असतात. रात्रंदिवस हे लोक आम्हांला सांगत असतात, कीं 'पाहा, हिंदुस्थानच्या हितासाठींच आम्ही आमच्या जिवाचें रान करून किती खटपट करतों आहों!' आणि हें बोलत

आमच्यांत इकडे हे लोक वटहुकमांच्या आणि संगिनींच्या जोरावर राज्य करून

आमच्या लोकांच्या अंगांतील सर्व जोम नष्ट करून टाकीतच असतात. आमचे जमीनदार लोक आपलें आपल्या कुळावर केवढें प्रेम आहे म्हणून सांगत असतात; परंतु आपल्या उपाशी पोटांत घालायला एक काडीसुद्धां बिचाऱ्याजवळ शिल्लक राहूं नये इतका कमाल खंड शेतकऱ्यांकडून वसूल करून त्यांचा पिळून पाचोळा करून टाकावयाला ते तिळभरसुद्धां मागेंपुढें पाहत नाहींत. आमचे भांडवलदार आणि मोठमोठे कारखानदारसुद्धां आपल्या मनांत आपल्या मजुरांबद्दल फार मोठी सद्भावना आहे असेंच सांगत असतात; पण या सद्भावनेचें रूपांतर जास्त समाधानकारक मजुरीचे दर किंवा मजुरांच्यासाठीं कारखान्यांत आणि बाहेर जास्त चांगल्या वातावरणाची व राहणीची सोय यांमध्यें झालेलें कधींच आढळून येत नाहीं. त्यांचा सगळा फायदा नवे नवे प्रासाद बांधण्याकडे खर्ची पडतो; मजुराची मातीची झोंपडी थोडीशीसुद्धां सुधारण्याला कांहीं उपयोगी पडत नाहीं.

आपल्या स्वार्थाच्या दृष्टीनें जरुरीचें असेल तेव्हां तेव्हां मनुष्य आत्मवंचना आणि परवंचना किती आणि कशी करतो हें पाहिलें, म्हणजे मोठाच अचंबा वाटतो. तेव्हां स्वाभाविकच अठराव्या शतकांतील व त्यानंतरचे इंग्रजी मजूरमालक हे मजुरांची परिस्थिति सुधारण्यासाठीं केलेल्या सर्व प्रयत्नांना कसून विरोध करीत आलेले आढळतात. कारखान्यांच्या कारभारासंबंधीं आणि मजुरांच्या घरांची व कारखान्यांच्या इमारतींची सुधारणा करण्यासंबंधीं कायदे करण्यालाच प्रथम मुळांत त्यांनीं विरोध केला. मजुरांच्या हालअपेष्टांचीं कारणें नाहींशीं करण्याची खटपट करण्याची समाजावर जबाबदारी आहे, ही गोष्टच मुळीं त्यांना मान्य नव्हती. ते आपल्या मनाचें असें समाधान करीत, कीं खरोखर समाजांत जे आळशी असतात त्यांनाच फक्त हाल सोसण्याचा प्रसंग येतो. शिवाय, कांहीं झालें तरी मजूर हेही आपल्यासारखेच मनुष्यप्राणी आहेत, अशी खरोखर त्यांची फारशी भावनाच नव्हती. या लोकांनीं त्यामुळें आणखी एक नवीन तत्त्वज्ञान प्रसृत केलें. या तत्त्वज्ञानाचें नांव ( Laissez faire ) लेसे फेअर ( म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य अथवा व्यापारी व्यवहारांत वैयक्तिक कार्यपद्धतीवरील नियंत्रणाचा अभाव ) असें आहे; त्याचा अर्थ असा, कीं आमच्या उद्योगधंद्यांत आम्ही आम्हांला जसें वाटेल तसें वागूं; त्यांत शासनसंस्थेकडून कसलीही ढवळाढवळ होणें न्याय्य नव्हे. इतर देशात कोणींही अजून काढलेले नव्हते अशा वेळीं त्यांनीं कारखाने काढलेले असल्यामुळें त्यांनीं जो इतरांपेक्षां पुढचा पल्ला गांठलेला होता त्यापासून मिळेल तो जास्त पैसा मिळविण्यासाठीं त्यांना सगळें रान मोकळें हवें होतें; कसलाही प्रतिबंध नको होता. म्हणून लेसे फेअरच्या, व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वज्ञानाला या लोकांनीं कांहीं अंशीं परमेश्वरी न्यायाचें स्वरूप प्राप्त करून दिलें. ते म्हणत, यात कोणावर कसलाही अन्याय तर नाहींच; उलट, त्यामुळें प्रत्येकाला मिळेल त्या संधीचा जितका करून घेतां येईल तितका उपयोग करून घेण्याचें समान स्वातंत्र्य मिळत असतें; ज्याची जशी निसर्गसिद्ध ताकद असेल तसा त्याला संधीचा लाभ करून घेतां येईल. या तत्त्वाप्रमाणें प्रत्येक व्यक्तीला बाकीच्या

सर्व जगाशीं झगडा करून पुढें जाण्याला संपूर्ण संधि होती. मग या झगड्यांत पुष्कळशा लोकांचा यशाऐवजीं नाशच होतो असें जरी झालें, तरी त्याला कोण काय करणार?

सर्व जागतिक सुधारणेचा पाया म्हणजे मनुष्यामनुष्यांमध्यें दिवसेंदिवस वाढत गेलेली व जाणारी सहकार्यप्रवृत्ति हीच होय, हें मी या पत्रामध्यें तुला सांगत आलों आहें; परंतु लेसे फेअरच्या, अनियंत्रित व्यक्तिस्वातंत्र्याच्या या तत्त्वज्ञनामुळें आणि नवीन उदयास आलेल्या भांडवलशाहीमुळें मात्र समाजात जंगलचा कायदा उदयास आला. कार्लाइलनें या तत्त्वज्ञानाला "डुकरांचें तत्त्वज्ञान" असें नांव दिलें आहे. हा जीवन आणि उद्योगधंदे यांमधील नवा कायदा-धर्म-नियम कोणीं बरें घालून दिला? मजुरानीं खास नव्हे! त्या बिचाऱ्यांना या बाबतींत कोणी तिळमात्र विचारीत नव्हतें. यशस्वी झालेले जे कारखानदार वर त्यांच्या डोक्यावर नाचत होते त्यांनाच मूर्खासारखें भावनांच्या भरीं भरून कोणीं आपल्या व्यवहारांत लुडबूड करावी ही गोष्ट मंजूर नव्हती. म्हणून खासगी घरामध्येंही सक्तीनें स्वच्छता करण्याला भाग पाडलें जावें आणि खाद्यपेयादि वस्तूंच्या भेसळीच्या बाबतींत अडथळा केला जावा, या प्रयत्नांना सुद्धां व्यक्तिस्वातंत्र्य आणि मालमत्तेचा हक्क यांच्या नांवावर या लोकांनीं हरकत घेतली!

आतां नुकताच भांडवलशाही हा शब्द मीं वापरला. कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारची भांडवलशाही जगाच्या सुरुवातीपासून आज शेंकडों वर्षें जगांत नांदतच आलेली आहे. म्हणजे काय, तर उद्योगधंदे हे सांठवून ठेवलेल्या पैशाच्या आधारावरच चालत आलेले आहेत; परंतु यंत्राचा शोध लागून औद्योगीकरण झाल्यानंतर कारखानदारी पद्धतीच्या निर्मितीला एकदम फारच पैशाची जरुरी लागूं लागली. अशा पैशाला आता "औद्योगिक भांडवल" हें नांव प्राप्त झालें आणि आतां भांडवलशाही हा शब्द औद्योगिक क्रांतीनंतर जी नवीन आर्थिक रचना अस्तित्वांत आली तिला उद्देशून वापरण्यांत येऊं लागला आहे. या आर्थिक रचनेमध्यें भांडवलदार लोकांच्या म्हणजे ज्याच्या मालकीचा पैसा-भांडवल-असे त्याच्या हातांत कारखान्यांचा सर्व कारभार असावयाचा आणि तेच फायद्याचे मालक असावयाचे. औद्योगीकरणाबरोबरच भांडवलशाहीची वाढ साऱ्या जगभर झाली. याला सोव्हियट यूनियन आणि इतर कांहीं एकदोन प्रदेश हेच तेवढे अपवाद आहेत. भांडवलशाहीच्या अगदीं सुरुवातीच्या दिवसापासूनच श्रीमंत आणि गरीब यांमधील भेद स्पष्ट करण्यावर अधिक भर देण्यांत आला. उद्योगधंद्यांचें कार्य यंत्रांच्या साहाय्यानें होऊं लागल्यामुळें उत्पादन पुष्कळ अधिक वाढलें आणि त्यामुळें संपत्तींत खूप वाढ झाली; पण ही सगळी नवी संपत्ति कांहीं थोड्या लोकांच्याच-या कारखान्याच्या मालकांच्या-फक्त खिशामध्यें जमा झाली. कामगार लोक गरीब ते गरीबच राहिले. इंग्लंडमध्यें मात्र हिंदुस्थान आणि इतर प्रदेश यांच्या पिळणुकीच्या बळावर हळूहळू मजुरांच्या राहणीचें मान सुधारत

गेलें; परंतु एकंदर उद्योगधंद्यांमधील फायद्याचा वांटा मात्र फारच थोडा त्यांच्या वांट्यास येई. औद्योगिक क्रांति आणि भांडवलशाही यांनीं मिळून उत्पादनाचा प्रश्न सोडविला; परंतु नवीन उत्पन्न होणाऱ्या संपत्तीची वांटणी करण्याचा प्रश्न त्यांना सोडवितां आला नाहीं; त्यामुळें सधन आणि निर्धन यांमधील प्राचीन काळापासून चालत आलेला झगडा हा नुसता शिल्लक राहिला; एवढेंच नव्हे, तर उलट तो अधिकच तीव्र झाला.

ही औद्योगिक क्राति अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत घडून आली. याच वेळीं नेमकें ब्रिटिश लोकांचें फ्रेंचांशीं कॅनडा व हिंदुस्थान या देशांत युद्ध सुरू होतें. याच वेळीं तें सात वर्षांचें युद्ध झालें. या निरनिराळ्या घटनांचे एकमेकींवर फार मोठे परिणाम झाले. प्लासीच्या लढाईच्या वेळीं आणि त्यानंतरही हिंदुस्थानांतून ईस्ट इंडिया कंपनीनें स्वतः आणि कंपनीच्या नोकरांनीं (क्लाइव्हची आठवण असेलच तुला) ज्या प्रचंड रकमा उकळून नेल्या, त्याचा उपयोग इंग्लंडमध्यें नवे नवे कारखाने उघडण्याच्या कामीं फारच झाला. याच पत्रांत थोड्या वेळांपूर्वीच मीं तुला सांगितलें आहे, कीं औद्योगीकरण करावयाचें म्हणजे सुरुवातीला त्यासाठीं पाण्यासारखा पैसा ओतावा लागत असतो. कांहीं पैसा नुसता गडप होत राहतो. त्यावर नफा कांहींच होत नाहीं. तेव्हां कर्जाच्या रूपानें किंवा इतर कोणत्या रीतीनें भरपूर पैसा मिळविण्याची सोय जर नसेल, तर कारखाना सुरू होऊन त्यांतून नफा मिळूं लागेपर्यंत प्रथम पुष्कळच दारिद्र्याची आणि हालअपेष्टांची अवस्था सहन करणें भाग होतें. आपले उद्योगधंदे आणि कारखाने स्थापन करून वाढीला लावण्यासाठीं ज्या वेळीं इंग्लंडला अशा रीतीनें भरपूर पैशांची गरज होती, त्याच अगदीं ऐन वेळीं इंग्लंडच्या अलौकिक सुदैवानें हिंदुस्थानांतून प्रचंड मोठ्या रकमा इंग्लंडला मिळाल्या.

हे कारखाने जसे स्थापन करून झाले तशा आणखी कांहीं गोष्टींची गरज उत्पन्न झाली. पक्का माल तयार करण्यासाठीं कारखान्यांना कच्च्या मालाची गरज निर्माण झाली. उदाहरणार्थ, कापड बनवावयाचें तर त्यासाठीं कापूस हवा. कच्च्या मालापेक्षांही कारखान्यांतून तयार झालेला हा नवीन माल ज्या ठिकाणीं विकतां येईल अशा बाजारपेठांचीही आवश्यकता उत्पन्न झाली. कारखाने सगळ्यांच्या आधीं काढल्यामुळें बाकीच्या सगळ्या देशांपेक्षां इंग्लंडनें पुष्कळच अधिक आघाडीचा पल्ला गांठलेला होता. असें असूनसुद्धां तयार मालाला बाजारपेठ मिळविण्याच्या कामीं कांहीं कमी अडचणी इंग्लंडला पडल्या असत्या असें नव्हे; परंतु त्या कामींही इंग्लंडला पुन्हा हिंदुस्थानचा फार मोठा उपयोग झाला. अर्थात् हिंदुस्थानच्या संमतीनें नव्हे, तर हिंदुस्थानच्या इच्छेविरुद्धच इंग्लंडनें हा उपयोग करून घेतला. हिंदुस्थानांतल्या इंग्रज लोकांनीं हिंदी उद्योगधंदे नष्ट करून इंग्लंडचें कापड हिंदी लोकांवर लादण्यासाठीं हर तऱ्हेच्या युक्त्या-प्रयुक्त्या केल्या. त्या संबंधात मी पुढें सांगणारच आहें. दरम्यान तूर्त ब्रिटिशांच्या हातात हिंदुस्थान देश असल्यानें आणि त्या देशाला जबरदस्तीनें आपल्या

योजनांबरहुकूम त्यांना खेळवितां आल्यामुळें इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीला कसा उपयोग झाला हें पाहणें आपल्याला महत्त्वाचें आहे.

एकोणिसाव्या शतकांत जगाच्या सर्व भागांमध्यें औद्योगीकरणाचा प्रसार होऊन इतर देशांतही इंग्लंडनें घालून दिलेल्या नमुन्याबरहुकूमच सामान्यपणानें भांडवलशाही कारखानदारीची वाढ झाली. भांडवलशाहींतून अगदीं अपरिहार्यपणें एका नवीन प्रकारच्या साम्राज्यशाहीचा उगम झाला. कारण ज्या त्या देशांत उत्पादनाला उपयोगी असा कच्चा माल व तयार माल विकण्यासाठीं बाजारपेठ यांच्याकरितां मोठी हाकाटी सुरू झाली. बाजारपेठ मिळविण्याचा आणि कच्चा माल पैदा करण्याचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे ज्या देशांत अशी बाजारपेठ किंवा कच्चा माल असेल किंवा दोन्ही असतील, असे देशच आपल्या कबजांत घ्यावयाचे. अशा कारणानें त्यांतल्या त्यांत जे अधिक सामर्थ्यवान् देश होते त्यांच्यामध्यें स्वतःच्या कबजांत नवे नवे प्रदेश आणण्यासाठीं स्पर्धेची मोठी हातघाई सुरू झाली. याही बाबतींत हिंदुस्थान देश कबजांत असल्यामुळें आणि समुद्रावरील वर्चस्वामुळें इंग्लंडला परिस्थिति मोठीच अनुकूलतेची होती; परंतु साम्राज्यशाही आणि तिचीं फळें यांबद्दल मला तुला पुढें बरेंच सांगावें लागणार आहे.

औद्योगिक क्रांतीचा उदय झाल्यापासून इंग्लंडच्या कारभारामध्यें मात्र तेथील मोठे मोठे कापड-कारखानदार, लोखंड-कारखानदार आणि कोळशाच्या खाणींचे मालक यांचें प्रस्थ दिवसेंदिवस अधिकाअधिक वाढत गेलें.

## ९९

## अमेरिका इंग्लंडपासून फुटून निघते

*२ ऑक्टोबर, १९३२*

आतां आपण अठराव्या शतकांतील दुसऱ्या क्रांतीचा विचार करूं. ही क्रांति म्हणजे अमेरिकन वसाहतींनीं इंग्लंडविरुद्ध केलेलें बंड होय. ही क्रांति केवळ राजकीय स्वरूपाची. आतां नुकताच जिचा आपण विचार करीत होतों त्या औद्योगिक क्रांतीमुळें अथवा अमेरिकेच्या बंडानंतर लौकरच घडून आलेल्या ज्या फ्रेंच राज्यक्रांतीनें यूरपमधील सर्व सामाजिक संघटनेचा पाया हादरवून टाकला त्या क्रांतीमुळें जीवनांत जसे मूलभूत फरक झाले, तसे कांहीं या अमेरिकन राज्यक्रांतीमुळें झाले नाहींत. तरी पण हा जो राजकीय फेरबदल झाला, त्याचेसुद्धां पुढच्या काळांत फार मोठे परिणाम व्हावयाचे होते. त्या वेळीं स्वतंत्र झालेल्या अमेरिकन वसाहती आज सगळ्या जगांत

अत्यंत सामर्थ्यवान्, अत्यंत संपन्न आणि औद्योगिक दृष्टीनें अत्यंत पुढारलेल्या अशा झाल्या आहेत.

इ. स. १९२० साली इंग्लंडमधून प्रॉटेस्टंट लोकांची एक लहानशी टोळी घेऊन मेफ्लॉवर नांवाचें जहाज अमेरिकेला गेल्याचें मीं तुला सांगितलें होतें. त्या जहाजाची आठवण आहे का तुला? या लोकांना पहिल्या जेम्सचा अनियंत्रित राज्यकारभार मान्य नव्हता; त्याचप्रमाणें त्यांचीं धार्मिक मतेंही त्यांना मान्य नव्हतीं. म्हणून या लोकांनीं इंग्लंडच्या जमिनीची आपल्या पायाला लागलेली धूळ झटकून टाकून इंग्लंडला रामराम ठोकला आणि अटलांटिक समुद्राच्या पलीकडच्या तीरावर नवीन देशांत जाऊन त्यांनीं आपल्याला जास्त स्वतंत्रतेनें राहतां यावें म्हणून त्या ठिकाणीं आपली वसाहत स्थापन केली. या लोकांना इंग्रजी इतिहासांत पुढें "पिलग्रिम फादर्स" म्हणजे यात्रेकरूंचे मूळपुरुष, असें नांव पडलें. या नव्या प्रदेशाच्या उत्तर बाजूला हे लोक जमिनीला लागले. त्या ठिकाणाला त्यांनीं न्यू प्लिमथ असें नांव दिलें. त्यांच्या आधींही कित्येक वसाहतवाले अमेरिकेच्या उत्तर किनाऱ्यावर येऊन दाखल झालेले होते. त्यांच्या मागूनही पुष्कळ लोक आले आणि अखेरीस अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत छोट्या छोट्या वसाहतींचे ठिपकेच जणुं सगळीकडे पसरले. यांमध्यें कांहीं वसाहती कॅथॉलिकांच्या होत्या; कांहीं इंग्लंडमधील कॅव्हॅलिअर म्हणजे राजपक्षीय सरदारांनीं स्थापन केलेल्या होत्या, तर कांहीं क्वेकर लोकांनीं स्थापन केलेल्याही होत्या. पेन्सिल्व्हानिया वसाहतीचें नांव पेन नांवाच्या क्वेकर पुढाऱ्याच्या नांवावरूनच दिलें गेलेलें आहे. याशिवाय डच, जर्मन, डॅनिश आणि कांहीं कांहीं फ्रेंच लोकही या वसाहतींमधून होते. अशा रीतीनें ही एक यूरपमधील अनेक देशांतील लोकांची मेळच त्या ठिकाणीं झालेली होती; परंतु त्यांच्यामध्यें बहुतेक सारा भरणा इंग्रज वसाहतवाल्यांचाच होता. डच लोकांनीं या भागांत जें एक शहर स्थापन केलें होतें, त्याला त्यांनीं ॲम्स्टरडॅम हें नांव दिलें होतें. पुढें इंग्रज लोकांनीं हें शहर काबीज केलें तेव्हां त्याचें नांव बदलून तें त्यांनीं न्यूयॉर्क असें केलें; आज हें नांव केवढें तरी प्रसिद्धीस आलेलें आहे.

हे इंग्रज वसाहतवाले पुष्कळ दिवसपर्यंत ब्रिटिश राजा आणि ब्रिटिश पार्लमेंट यांचा अधिकार मान्य करून चालले होते. त्यांच्यापैकीं पुष्कळसे लोक आपलीं घरेंदारें सोडून इकडे आले होते याचें कारण त्यांना इंग्लंडमधील आपली परिस्थिति समाधानकारक वाटत नव्हती आणि शिवाय कोणाला तेथें चाललेला राजाचा कारभार पसंत नव्हता, तर कोणाला पार्लमेंटचें राजकारण मान्य नव्हतें. असें असलें तरी आपल्या मायदेशापासून अजिबात फुटून निघावें अशी त्यांच्यापैकीं कोणाचीही इच्छा नव्हती. दक्षिणेतील वसाहतींमध्यें कॅव्हॅलिअर आणि राजाच्या पक्षाला पाठिंबा देणाऱ्या इतर लोकांची वस्ती अधिक होती. त्यांचा तर इंग्लंडकडे अधिकच ओढा होता. या ज्या वेगळ्या वेगळ्या वसाहती होत्या त्यांचे आपापले कारभार अगदीं स्वतंत्र चालत असत;


अमेरिका मुद्दल बंगली होते
मिसिसिपी
नवीन स्पेन
मेक्सिको
कोलिफोर्निया
फ्लोरिडा
जार्जिया
कॅरोलिना
व्हर्जिनिया
पेनसिल्व्हेनिया
न्यूयार्क
न्यू इंग्लंड
कॅनडा

त्यांच्यामध्यें सर्वांमध्यें समानता अशी फारच थोडी होती. अठराव्या शतकामध्यें आतां पूर्व किनाऱ्यावर एकूण तेरा वसाहती झालेल्या होत्या, त्या सर्व ब्रिटिशांच्या अमलाखालीं होत्या. उत्तरेला कॅनडाची वसाहत होती आणि दक्षिणेकडे स्पॅनिश लोकांचा मुलूख होता. या सर्व वसाहतींमध्यें डच लोकांच्या, डॅनिश लोकांच्या किंवा अशाच इतर लोकांच्या वस्तीचे जे भाग होते ते सर्व ब्रिटिश लोकांनीं आतां कवटाळलेले होते आणि त्यांच्याच अमलाखालीं ते नांदूं लागलेले होते ; पण यांत एक लक्षांत ठेव, कीं या सर्व वसाहती केवळ किनाऱ्याला लागून आणि थोड्याशा अंतरावर अशाच फक्त वसलेल्या होत्या. त्यांच्या पश्चिमेला थेट पॅसिफिक महासागरापर्यंत जो प्रचंड प्रदेश पसरलेला होता, तो या सर्व वसाहतींच्यापेक्षां आकारानें दसपट मोठा होता. हा प्रदेश अजून कोणाही यूरपीय वसाहतवाल्यांनीं व्यापलेला नव्हता. अनेक रेड इंडियन् जमातींची किंवा राष्ट्रांची तेथें वसति असून त्यांचींच तेथें राज्यें होतीं. या सर्व राज्यांमध्यें इरोकोइस जमात ही प्रमुख जमात होती.

अठराव्या शतकाच्या मध्याला इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यामध्यें जगांत जेथें जेथें त्यांचीं वसाहत होती, तेथें तेथें सगळीकडे युद्ध झालें हें तुला आठवतच असेल. या युद्धाला सात वर्षांचें युद्ध म्हणत ( १७५६ ते १७६३ ) आणि तें केवळ यूरपमध्येंच होऊन न राहतां कॅनडा आणि हिंदुस्थान या देशामध्येंही झालें. या लढाईंत इंग्लंडचा जय झाला आणि फ्रान्सला कॅनडा देश इंग्लंडच्या स्वाधीन करावा लागला. अशा रीतीनें फ्रान्सची अमेरिकेंतून पूर्ण हकालपट्टी झाली आणि उत्तर अमेरिकेंतील सर्व वसाहती इंग्लंडच्या ताब्यांत आल्या. कॅनडामधील क्वेबेक प्रांतांत मात्र थोडीफार फ्रेंच लोकवस्ती होती. नाहीं तर बाकीच्या सर्व वसाहती प्रामुख्यानें इंग्रजांच्याच झालेल्या होत्या. मोठी चमत्काराची गोष्ट अशी आहे, कीं आजच्या घटकेलासुद्धां चारी बाजूंनीं अँग्लो सॅक्सन् लोकाच्या समुद्रानें वेढलेलें असें, फ्रेंच भाषा आणि फ्रेंच संस्कृति यांचें एक जणुं बेटच अशा स्वरूपांत, क्वेबेक शहर उभें आहे. या प्रांतांतील सर्वांत मोठें शहर जें मॉंट्रील ( हें नांव मॉंट रॉयलवरून दिलेलें आहे ) त्याच्यामध्येंही मला वाटतें फ्रेंच बोलणाऱ्या लोकांची जितकी संख्या आहे, तितकी एक पॅरिस शहर सोडलें तर जगांतल्या दुसऱ्या कोणत्याही शहरामध्यें सांपडणार नाहीं.

मागें एका पत्रामध्यें मीं तुला या यूरपीय देशांनीं आफ्रिकेंतील नीग्रो कामगार अमेरिकेंत आणून गुलामाचा जो व्यापार चालू केला होता त्याबद्दल सांगितलें आहे. हा भयंकर आणि अमानुष राक्षसी व्यापार बहुतांशीं स्पॅनिश, पोर्तुगीज आणि इंग्रज लोकांच्या हातांमध्यें होता. अमेरिकेमध्यें मजुरांची गरज होती ती विशेषतः दक्षिणेकडील वसाहतींत अधिक होती ; त्या बाजूला तंबाखूची लागवड फार मोठ्या प्रमाणांत झालेली होती. प्रत्यक्ष त्या देशचे लोक, ज्यांना रेड इंडियन म्हणून म्हटलें जातें, ते होते भटक्ये ; त्यांची एका ठिकाणीं राहण्याची तयारी नव्हती. त्याचप्रमाणें गुलाम होऊन राबण्याचीही त्यांची तयारी नव्हती. या वसाहतवाल्यांपुढें नमण्यापेक्षां मोडून

जाणें त्यांनीं अधिक पसंत केलें आणि पुढच्या काळांत वसाहतवाल्यांनीं त्यांना मोडून काढलें; पण त्यांनीं त्या लोकांचा जवळजवळ सर्वस्वी उच्छेद केला आणि प्राप्त झालेल्या नवीन परिस्थितीमध्यें ते सारे बहुतेक मरून नाहींसे होऊन गेले. एका काळीं सबंध खंड व्यापून राहिलेल्या या लोकांपैकीं आज आतां फार करून कोणीसुद्धां अमेरिकेंत शिल्लक राहिलेले नाहींत.

तेव्हां हे रेड इंडियन लोक तर मळ्यांमध्यें काम करीनात आणि मजुरांची गरज फारच निकडीची आणि मोठी होती. तेव्हां आफ्रिकेंतील दुर्दैवी बिचाऱ्या लोकांची शिकारी जनावरांप्रमाणें अघोरी शिकार करण्यांत आली आणि त्यांना समुद्रपार इतक्या क्रूर व अमानुष पद्धतीनें पाठविण्यांत आलें, कीं त्यावर आज विश्वास ठेवणेंसुद्धां शक्य होत नाहीं. आफ्रिकेंतील या नीग्रो लोकांना दक्षिणेकडील व्हार्जिनिया, कॅरोलिना आणि जॉर्जिया या वसाहतींत – संस्थानांत – नेण्यांत आलें आणि तेथें त्यांना टोळ्यांटोळ्यांनीं मुख्यतः तंबाखूच्या मोठ्या मोठ्या मळ्यांमधून कामाला जुंपण्यांत आलें.

उत्तरेकडील संस्थानांमधील परिस्थिति याहून वेगळ्या प्रकारची होती. मेफ्लॉवर बोटींतून आलेल्या पिलग्रिम फादर्सनीं आपल्याबरोबर आणलेली प्युरिटन (साध्या व तत्त्वप्रधान) जीवनाची परंपरा अद्यापिही तेथें कायम टिकून होती. शिवाय तेथील मळे अगदीं आटपशीर आकाराचे होते. दक्षिणेंतील संस्थानांप्रमाणें भले मोठे मळे या भागांत नव्हते. या आटपशिर मळ्यांमध्यें गुलामांची किंवा पुष्कळ मजुरांच्या संख्येचीही आवश्यकता नव्हती. बरें, जमिनीलाही कांहीं तुटवडा नव्हता. त्यामुळें आपल्यापुरती जमीन संपादन करून स्वतःच्या मालकीचा आटपशीर मळा करून राहावें अशींच प्रवृत्ति या भागांतील लोकांची झालेली होती. त्याचमुळें सर्व वसाहतवाल्यांमध्यें एक प्रकारची समतेची भावना निर्माण झाली होती.

अशा तऱ्हेनें या वसाहतींमध्यें दोन प्रकारच्या आर्थिक व्यवस्था निर्माण झाल्या होत्या असें आपणांस आढळून येतें. उत्तरेकडील लहान लहान मळे आणि एक प्रकारची समतेची भावना यांच्या पायावर आधारलेली एक आणि दक्षिणेकडील प्रचंड मोठे मळे आणि लागवडी व गुलामगिरी यांवर आधारलेली दुसरी. रेड इंडियन लोकांना या दोन्हीमध्येंही कोठेंच स्थान नव्हतें. उलट, त्या खंडांतील मूळचे रहिवासी असे जे लोक त्यांना हे सगळेच वसाहतवाले हळूहळू पश्चिमेकडे रेटीत चालले होते. रेड इंडियन लोकांमध्यें आपसांत पुष्कळ भांडणें आणि भेद होते. त्यामुळें वसाहतवाल्यांचें हें कार्य आणखीच सोपें झालें.

या वसाहतींमध्यें, विशेषतः दक्षिणेकडील संस्थानांमध्यें, इंग्लंडचा राजा आणि इंग्लंडमधील मोठमोठे जमीनदार यांचे फार मोठे हितसंबंध होते. या वसाहतींतून जितका फायदा पिळून काढतां येईल तितका काढावा, असा त्यांचा प्रयत्न चालू असे. सात वर्षांच्या युद्धानंतर तर या अमेरिकेंतील वसाहतींतून पैसा मिळविण्यासाठीं खास मोठे प्रयत्न करण्यांत आले. इंग्लंडमधील पार्लमेंटांत हुकमत बहुतांशीं होती जमीन-

दारांचीच; त्यामुळें वसाहतींना पिळून काढण्याच्या धोरणाला पार्लमेंटचें मत अनुकूलच होतें. म्हणून वसाहतींतून पैसा उत्पन्न करण्याच्या राजाच्या धोरणाला पार्लमेंटचाही पाठिंबाच मिळाला. म्हणून मग तिकडच्या व्यापारावर कर लादण्यांत आले आणि बंधनें घालण्यांत आलीं. आठवतच असेल तुला, कीं इकडे हिंदुस्थानांतसुद्धां बंगाल प्रांतांत ब्रिटिशांनीं प्रचंड प्रमाणांत लूट आणि पिळणूक सुरू केलेली होती आणि हिंदी लोकांच्या व्यापारामध्यें हरएक प्रकारच्या अडचणी निर्माण करण्यांत येत होत्या.

वसाहतवाल्यांचा या नव्या करांना आणि बंधनांना विरोध होता. त्यांनीं त्याबद्दल हरकत उपस्थित केली; परंतु सात वर्षांचें युद्ध नुकतेंच जिंकलेलें असल्यामुळें इंग्लंडच्या राज्यकर्त्यांना आपल्या सामर्थ्याबद्दल जरा गर्व वाटूं लागला होता. त्याना कुणाची विशेष फिकीर वाटेनाशी झाली होती; त्यामुळें त्यांनीं वसाहतवाल्यांच्या या हरकतीकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं; पण याच सात वर्षांच्या लढाईपासून वसाहतवाल्यांनाही कांहीं कांहीं नवीन धडे मिळालेले होते. या युद्धांत निरनिराळ्या वसाहतींतील लोक एकत्र येऊन त्यांचा एकमेकांशीं चांगला परिचय झाला होता. इंग्लंडच्या पगारी सैन्याच्या बरोबरीनें हेही लोक फ्रेंच सैन्याविरुद्ध लढले होते. त्यामुळें युद्धाचा लढाऊ घातक खेळ हाही आता त्यांना अनोळखी उरला नव्हता. असें असल्यामुळें आपल्यावर जो अन्याय होतो, जुलूम होतो असें या वसाहतवाल्यांना वाटत होतें, तो अन्याय किंवा जुलूम सहन करण्याच्या मनाच्या अवस्थेंत आतां इकडे हे वसाहतवालेही राहिलेले नव्हते.

अशा स्थितींत ब्रिटिश सरकारनें ईस्ट इंडिया कंपनीचा चहा या संस्थानांवर लादण्याचा प्रयत्न जेव्हां केला, तेव्हां प्रकरण तंट्यावर आलें. इंग्लंडमधल्या पुष्कळशा श्रीमंत लोकांचें भांडवल ईस्ट इंडिया कंपनीमध्यें गुंतलेलें होतें. त्यामुळें त्या कंपनींचें बरें चालावें असें स्वाभाविकच त्यांना वाटत होतें. इंग्लंडमधील राज्यव्यवस्थेवरही याच लोकांचें वर्चस्व होतें; एवढेंच नव्हे, प्रत्यक्ष राज्यकारभारावर असणाऱ्या कितीएक मंडळींचेही हितसंबंध या ईस्ट इंडिया कंपनीच्या पूर्वेकडील व्यापाराशीं निगडित झालेले होते. तेव्हां ईस्ट इंडिया कंपनीला आपला चहा अमेरिकेंत नेऊन तेथें सवलतीनें विकण्याची सवड मिळावी आणि अशा रीतीनें कंपनीचा व्यवहार वाढवावा अशी खटपट ब्रिटिश सरकारमार्फत सुरू झाली; परंतु यामुळें स्थानिक चहाच्या व्यापाराला धोका पोंचूं लागल्यामुळें तेथें याबद्दल फारच असंतोष निर्माण झाला. म्हणून या परदेशी चहावर बहिष्कार घालावयाचा असें वसाहतवाल्यांनीं ठरविलें. इ. स. १७७३ च्या डिसेंबर महिन्यांत ईस्ट इंडिया कंपनीचा चहा बोस्टन बंदरांत उतरविण्याचा प्रयत्न करण्यांत आला; परंतु त्याला वसाहतवाल्यांनीं प्रत्यक्ष विरोध केला. कितीएक वसाहतवाल्यांनीं रेड इंडियन लोकांसारखा पोशाख करून चहाच्या मालबोटींवर प्रवेश करून घेतला आणि त्यांवरील चहा समुद्रांत फेंकून दिला! ही गोष्ट अगदीं दिवसाढवळ्या, जाहीर रीतीनें, या कामाबद्दल सहानुभूति असलेल्या अशा

वसाहतवाल्यांच्या मोठ्या जमावासमक्ष करण्यांत आली. अशा रीतीनें हें एक प्रकारें युद्धाला आव्हानच होतें आणि यांतून या बंडखोर वसाहती व इंग्लंड यांच्यामध्यें युद्ध निर्माण झालें.

इतिहासाची अगदीं जशीच्या तशी पुनरावृत्ति कधींच होत नसते ; परंतु केव्हा केव्हां इतिहासामधील निरनिराळे प्रसंग एकमेकांशीं इतके पुष्कळ प्रमाणांत सारखे आढळतात, कीं मोठा चमत्कार वाटतो. बोस्टन बंदरांत इ. स. १७७३ मध्यें हा जो चहा बोटींवरून समुद्रांत फेंकून देण्याचा प्रसंग घडला, त्याचा इतिहासांत फार मोठा गाजावाजा होऊन राहिलेला आहे. त्याला "बोस्टनची चहापार्टी" असें नांव देण्यांत आलेलें आहे. अडीच वर्षांपूर्वी जेव्हां बापूंनीं आपला मिठाचा सत्याग्रह सुरू केला आणि तें महान् 'दांडीचें कूच' करून मिठागरावर हल्ले केले, त्या वेळीं अमेरिकेंतील पुष्कळशा लोकांना आपल्या "बोस्टनच्या चहापार्टी"ची आठवण होऊन तिची त्यांनीं या मीठपार्टीशीं तुलना केली ; तरी पण या दोहोंमध्यें फार मोठें अंतर आहे हें तर खरेंच.

यानंतर दीड वर्षानें, इ. स. १७७५ मध्यें, इंग्लंड आणि इंग्लंडच्या अमेरिकेंतील वसाहती यांच्यामध्यें युद्ध जुंपलें. या वसाहतींचा लढण्याचा खरोखर उद्देश कोणता होता ? स्वातंत्र्य मिळवावें, इंग्लंडपासून फुटून निघावें असा त्यांचा मुळींच विचार नव्हता. दोघांचें युद्ध सुरू झालें, पुष्कळसा रक्तपातही झाला ; तरीसुद्धां अजूनही वसाहतवाल्यांचे पुढारी इंग्लंडच्या तिसऱ्या जॉर्जला उद्देशून "अत्यंत कृपावंत महाराज" असाच शब्दप्रयोग करीत होते आणि स्वतःला त्याची एकनिष्ठ प्रजा समजत होते, ही गोष्ट मोठी लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कारण हा प्रकार वारंवार घडून येतांना दिसतो. उदाहरणार्थ, हॉलंडमध्यें स्पेनच्या दुसऱ्या फिलिपला महाराजा म्हणत होते आणि तरीही तेथें त्याच्या सैन्याशीं लोक अत्यंत कडवटपणानें लढतच होते. अशा रीतीनें पुष्कळ वर्षें लढत राहिल्यानंतरच मग हॉलंडला आपलें स्वातंत्र्य जाहीर करणें भाग पडलें. हिंदुस्थानांतही पुष्कळ वर्षेपर्यंत हें करावें कां तें करावें, काय करावें, अशा संशयग्रस्त आणि काचकुचीच्या अवस्थेंत काढल्यानंतर, कांहीं काळपर्यंत वसाहतींचें स्वराज्य किंवा यासारख्याच आणखी कांहीं कल्पनांच्या नादात राहिल्यानंतर, मगच आपल्या राष्ट्रीय सभेनें १ जानेवारी १९३० रोजीं स्वातंत्र्याच्या बाजूचा आपला निर्णय जाहीर केला. तरीसुद्धां अजून हिंदुस्थानांत असे लोक आहेतच, कीं ज्यांना स्वातंत्र्याच्या कल्पनेचें भय वाटतें आणि अद्याप वसाहतीच्या स्वराज्याच्याच गोष्टी असे लोक करीत असतात ; परंतु अशा प्रकारच्या या झगड्याचा शेवट स्वातंत्र्यांतच व्हावयाचा हीच इतिहासाची आपल्याला शिकवण आहे. हॉलंड आणि अमेरिका यांच्या उदाहरणांवरूनही हीच गोष्ट स्पष्ट दिसून येणारी आहे.

इ. स. १७७४ साली म्हणजे इंग्लंड आणि वसाहती यांच्यामधील हें युद्ध सुरू होण्यापूर्वी थोडा काळ, वॉशिंग्टन स्वतः असें म्हणाला होता, कीं उत्तर अमेरिकेंतील

कोणाही विचारी माणसाची इच्छा अमेरिकेनें स्वतंत्र व्हावें अशी नव्हती आणि हाच वॉशिंग्टन लौकरच अमेरिकन प्रजासत्ताक राज्याचा पहिला अध्यक्ष व्हावयाचा होता. लढाई सुरू झाल्यानंतर १७७५ मध्यें वसाहतींतील काँग्रेसच्या सेहेचाळीस सभासदांनीं तिसऱ्या जॉर्ज राजाकडे त्याचे राजनिष्ठ प्रजाजन या नात्यानें एक अर्ज सादर केला होता आणि शांतता प्रस्थापित करण्याची व हा रक्तपात बंद करण्याची याचना केली होती. इंग्लंड आणि त्याचीं हीं अमेरिकन अपत्यें ( प्रजा ) यांच्यामध्यें गोडी आणि सद्भाव पुन्हां प्रस्थापित व्हावा, अशी त्यांच्या मनांत फार तळमळ होती. त्यांची मागणी अगदीं मोठ्यांत मोठी काय होती, तर आपल्याला कांहींएक प्रकारचे वसाहतीचा कारभार चालविण्याचे अधिकार मिळावे आणि वॉशिंग्टनच्या शब्दांत त्यांनीं जाहीर केलें होतें, कीं आमच्यापैकीं कोणाही विचारी मनुष्याला स्वातंत्र्य नको आहे. या अर्जाला " Olive Branch Petition "–" तडजोडीचा अर्ज ", " समजुतीचा अर्ज " असें नांव दिलेलें आहे इतिहासामध्यें.

परंतु दोनच वर्षांत या अर्जावर सही करणाऱ्या सेहेचाळीस गृहस्थांपैकीं पंचवीस जणांनीं दुसऱ्याच एका कागदावर, अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर, सह्या केल्या.

तेव्हां मुद्दा हा, कीं वसाहतींनीं जें युद्ध सुरू केलें तें कांहीं स्वातंत्र्यासाठीं केलें नव्हतें. त्यांची तक्रार व्यापारावर लादलेल्या करांविरुद्ध आणि निर्बंधांविरुद्ध होती. आपली संमति असल्याशिवाय ब्रिटिश पार्लमेंटला आपल्यावर कर बसविण्याचा हक्क नसावा व नाहीं असें त्यांचें म्हणणें होतें. " मतदानाचा हक्क नाहीं, तर करही नाहीं " अशी त्यांची सुप्रसिद्ध घोषणा होती. कारण ब्रिटिश पार्लमेंटमध्यें प्रतिनिधी पाठविण्याला त्यांना अधिकार नव्हता.

वसाहतवाल्यांजवळ चागलें सैन्य कांहीं नव्हतें ; परंतु त्यांचा प्रदेश फार प्रचंड होता ; तेव्हां त्याचा त्यांना आधार असून त्यामध्यें जरूर पडेल तशी माघार घेत राहण्यालाही त्यांना अवसर होता. हळूहळू त्यांनीं सैन्यही निर्माण केलें आणि अखेरीस वॉशिंग्टन हा त्या सैन्याचा सरसेनापति झाला. या वसाहतवाल्यांना थोडेफार यशही आलें आणि आपला जुना शत्रु इंग्लंड देश याच्यावर प्रहार करायला ही बरी संधि आहे असें वाटून फ्रान्स देश या वसाहतींना मिळाला. स्पेननेंही इंग्लंडच्या विरुद्ध युद्ध जाहीर केलें. अशा रीतीनें इंग्लंडचा पक्ष कमजोर झाला. तरीपण हें युद्ध असेंच पुष्कळ वर्षेंपर्यंत रेंगाळत राहिलें. इ. स. १७७६ मध्यें ( जुलै ४ रोजीं ) वसाहतींचा सुप्रसिद्ध " स्वातंत्र्याचा जाहीरनामा " बाहेर पडला. इ. स. १७८२ मध्यें युद्ध संपलें आणि इ. स. १७८३ मध्यें युद्धांतील निरनिराळ्या पक्षीयांच्या पॅरिसच्या तहावर सह्या झाल्या.

अशा रीतीनें या तेरा अमेरिकन वसाहती स्वतंत्र होऊन त्यांचें एक प्रजासत्ताक

राज्य बनलें. यालाच पुढें युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका म्हणजे अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें हें नांव प्राप्त झालें. सुरुवाती-सुरुवातीला प्रत्येक संस्थानाच्या मनांत बाकीच्या संस्थानांबद्दल हेवादावा असे आणि प्रत्येक संस्थान कमीअधिक प्रमाणांत स्वतःला स्वतंत्र समजत असे. पुढें त्या सर्वांच्या ठिकाणीं एकराष्ट्रीयता अगदीं हळूहळू वाढत गेली. आधींच हा फार मोठा देश होता आणि पश्चिमेकडे त्याची हद्द एकसारखी वाढतच चाललेली होती. आधुनिक जगांतलें हें खरें पहिलें मोठें प्रजासत्ताक राज्य होतें. या काळचें दुसरें प्रजासत्ताक राज्य म्हणजे काय तें छोट्या स्वित्झर्लंडचें. हॉलंडमध्यें दिसायला राज्य प्रजासत्ताक होतें खरें; परंतु तेथें सत्ता खरी वरिष्ठ वर्गाच्याच हातांत होती. इंग्लंडमध्यें तर प्रत्यक्ष राजसत्ता होतीच; परंतु तेथलें तें पार्लमेंटसुद्धां खरोखर मूठभर श्रीमंत जमीनमालकवर्गाच्या हातामध्यें होतें. म्हणून अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचा हा प्रजासत्ताक देश जगांत एक नवीनच प्रकारचा देश होता. यूरप आणि आशिया खंडांतील इतर देशांना जसा एक विशिष्ट भूतकाल होता, तसा या देशाला नव्हता. त्यामध्यें प्राचीन जमीनदारी-सरंजामदारी पद्धतीचे अवशेष नव्हते; अर्थातच याला दक्षिणेकडील संस्थानांमधील लागवडीची पद्धति व गुलामगिरी यांचा अपवाद धरला पाहिजे. त्याचप्रमाणें या देशांत आनुवंशिक सरदारकीचें अस्तित्व नव्हतें. अशा रीतीनें धनिकवर्गाच्या अथवा मध्यमवर्गाच्या वाढीला येथें फारसे अडथळे नव्हते. त्यामुळें या वर्गांची तेथें फारच झपाट्यानें वाढ झाली. स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळीं या राज्याची लोकसंख्या ४० लक्षांहून कमीच होती. दोन वर्षांपूर्वी, १९३० मध्यें हीच लोकसंख्या १२ कोटी, ३० लक्ष इतकी मोठी भरली.

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचा पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन हा झाला. हा व्हार्जिनिया संस्थानांतील एक मोठा जमीनदार होता. या प्रजासत्ताक राज्याच्या संस्थापकांपैकीं आणखी दुसरे श्रेष्ठ पुरुष म्हटले म्हणजे टॉमस पेन्, बेंजामिन् फ्रँकलिन्, पॅट्रिक हेन्री, टॉमन् जेफर्सन्, ॲडॅम्स् आणि जेम्स् मॅडिसन् हे होत. यांपैकीं बेंजामिन् फ्रँकलिन् हा विशेष विद्वान् आणि गुणवान् मनुष्य असून तो मोठा शास्त्रसंशोधक होता. मुलांचे खेळण्याचे पतंग उडवून त्यांच्या साहाय्यानें त्यानें असें सिद्ध केलें, कीं ढगांत चमकणारा प्रकाश म्हणजे विद्युत्प्रकाशच होय.

स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यांत असें जाहीर केलेलें आहे, कीं "जन्मतः सर्व मनुष्यमात्र परस्पर-समान आहे." या विधानाचें तसें खोल पृथक्करण केलें, तर तें तितकेंसें बरोबर नाहीं असें आढळून येईल. कारण कांहीं माणसें अशक्त असतात, तर कांहीं सशक्त असतात; कांहीं माणसें इतरांपेक्षां अधिक बुद्धिमान् आणि अधिक कार्यक्षम असतात; परंतु हें विधान करण्यामधली जी कल्पना आहे ती अर्थात् स्पष्टच आहे आणि ती प्रशंसनीयही आहे. या वसाहतवाल्यांना यूरपमध्यें सरंजामदारशाहीनें जी विषमता निर्माण झालेली होती ती नाहींशी करावयाची होती. असाही संभव आहे, कीं हा स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार करणारांपैकीं पुष्कळांच्या मनावर फ्रान्स-

मधील अठराव्या शतकांतील व्हॉल्टेअर व रूसो यांच्या आणि त्यांच्यापुढच्या तत्त्वज्ञान्यांच्या व विचारवंतांच्या विचारसरणीचा परिणाम झालेला असला पाहिजे.

"जन्मतः मनुष्यमात्र परस्पर-समान आहे" ही घोषणा, आणि तरी या लोकांच्या समाजव्यवस्थेंत नीग्रो गुलामाला जागा होतीच; त्या विचाऱ्याला जवळजवळ कांहींच अधिकार नव्हते! त्या विचाऱ्याचा कांहीं विचार! नव्या होणाऱ्या घटनेंत हा गुलाम कसा काय बसूं शकला? खरें म्हणजे नाहींच तो बसूं शकला आणि अजूनही त्याला त्या घटनेंत नीटसें स्थान मिळालेलें नाहीं. स्वातंत्र्ययुद्धानंतर पुष्कळ वर्षांनीं उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील संस्थानांमध्यें या बाबतींत एक मोठी तीव्र यादवी झाली आणि तिच्या अखेरीस गुलामगिरी नष्ट करून टाकण्यांत आली. तरी पण नीग्रोंचा प्रश्न अजूनही अमेरिकेमध्यें सुटलेला नाहींच.

## १००

# बॅस्टीलचा पाडाव

*७ ऑक्टोबर, १९३२*

आतांपर्यंत अठराव्या शतकांतील दोन क्रांत्यांबद्दल आपण अगदीं थोडक्यामध्यें विचार केला. या पत्रांत मी तुला या शतकांतील तिसऱ्या क्रांतीविषयीं, फ्रेंच राज्यक्रांतीविषयीं, थोडेंसें सांगणार आहें. या तिन्ही क्रांत्यांपैकीं फ्रेंच राज्यक्रांतीचा गाजावाजा जगामध्यें फारच झाला. इंग्लंडमध्यें सुरू झालेली औद्योगिक क्राति ही या तिन्हीमध्यें खरोखरच किती तरी प्रचंड प्रमाणांत जास्त महत्त्वाची; परंतु तिचा प्रवेश अगदीं हळूहळू झाला; इतका कीं अशी कांहीं क्रांति होते आहे, हें सुद्धां प्रथम कोणाच्या लक्षामध्यें आलें नाहीं.

फ्रेंच राज्यक्रांति मात्र एखादी कडकडून वीज पडावी त्याप्रमाणें स्फोट होऊन अवतीर्ण झाली आणि सारें यूरप खंड त्यामुळें भयचकित होऊन गेलें. या सुमारास यूरप खंडामध्यें अजूनही पुष्कळशा राजे-महाराजांचाच अंमल चालू होता. प्राचीन पवित्र रोमन साम्राज्याचें प्रभुत्व खरोखर आतां नष्ट झालेलें होतें; परंतु कागदोपत्रीं अजून तें अस्तित्वांत असून त्याची कृष्ण छाया यूरप खंडाला अजूनही केव्हां केव्हां भेडसावीत असेच.

अशा या राजे-महाराजांच्या आणि दरबार व राजप्रासाद यांच्या जगामध्यें क्रांतीचें हें चमत्कारिक आणि भयंकर प्रकरण—भूत—सामान्य जननेच्या खालच्या थरांतून आणि त्यांच्या ठिकाणीं खोलवर रुजलेल्या आकांक्षा आणि तीव्र भावनांतून उभें राहिलें; ज्यांच्यावर कालांतरानें शेवाळ माजून घाण झालेली होती अशा

बुरसलेल्या चालीरीती किंवा हक्क आणि वतनें यांना या क्रांतीनें अगदींच बाजूला सारलें. एका राजाला सिंहासनावरून उचलून फेंकून दिलें आणि दुसऱ्या कितीक राजांपुढें हेंच संकट उभें केलें.

यूरप खंडांतील रांजेरजवाड्यांनीं आणि वतनदार लोकानीं आजपर्यंत ज्या सामान्य जनतेकडे अजीबात दुर्लक्ष केलें होतें, नव्हे, जिला त्यांनीं पायांखालीं तुडविलें होतें त्याच सामान्य जनतेचें हें बंड उभें राहिलेलें पाहून या लोकांचे पाय भीतीनें लटलट कांपूं लागले असले, तर त्यांत आश्चर्य तें काय?

एखादा ज्वालामुखी स्फोट होऊन बाहेर पडावा तशा तऱ्हेनें फ्रेंच राज्यक्रातीचा स्फोट झाला; परंतु राज्यक्रांत्या काय किंवा ज्वालामुखी काय कारणाशिवाय किंवा आधीं पुष्कळ दिवसपर्यंत त्यांची तयारी होत आलेली असल्याशिवाय असे एकदम अवाचितपणें उसळून बाहेर येत नसतात. आपल्या डोळ्यांपुढें झालेला स्फोट मात्र अगदींच अनपेक्षितपणें झालेला असतो आणि म्हणून आपल्याला अत्यंत आश्चर्य वाटतें; परंतु पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या खालीं पुष्कळ परस्परविरोधी शक्तींचा झगडा किती तरी काळपर्यंत त्यापूर्वी चालू असतो आणि निरानिराळीं स्फोटक द्रव्यें आगीनें फुटायला येत असतात. अखेरीस पृथ्वीच्या वरच्या आवरणाला आंतला हा त्यांचा दाब आवरून धरणें अशक्य होतें. मग आंतल्या त्या आगीचा स्फोट होऊन ती बाहेर येते आणि तिच्यांतून वर आकाशाशीं जाऊन भिडण्यासारख्या ज्वाळा बाहेर पडतात व लालभडक तप्त रस पर्वताच्या पृष्ठभागावरून खालीं उसळत वाहत येतो. राज्यक्रांतीच्या वेळीं ज्या अनेक शक्तींचा स्फोट झालेला दिसून येतो, त्याही अगदीं अशाच रीतीनें समाजाच्या वरच्या थराखालीं आंतल्या बाजूला पुष्कळ काळपर्यंत धुमसत असतात.

पाण्याला तुम्हीं उष्णता लावली कीं त्याला उकळी फुटते; परंतु त्यापूर्वी पुष्कळ वेळ अधिकाधिक गरम होत जाऊन त्याच्यामध्यें बुडबुडे उत्पन्न झाले म्हणजे मग आपण म्हणूं लागतों कीं आतां पाण्याला उकळी फुटली.

क्रांत्या होतात त्या आर्थिक परिस्थिति आणि जीवनविषयक कल्पना यांच्यामुळें होत असतात. मूर्ख सत्ताधारी जे लोक असतात, ज्यांना आपल्या स्वतःच्या डोक्यांतील कल्पनांवांचून जगांतलें दुसरें कांहीं पाहण्याची अक्कलच नसते, त्यांना वाटतें कीं क्रांत्या होतात त्या चळवळ्या लोकांमुळें होतात.

हे चळवळे लोक म्हणजे तरी कोण असतात?

तर प्रचलित परिस्थितीबद्दल ज्यांच्या मनांत असंतोष निर्माण झालेला असतो, ज्यांना ती परिस्थिति बदलून घेण्याची इच्छा असते आणि त्यासाठीं जे खटपट करीत असतात असे लोक.

प्रत्यक्ष क्रांतीच्या वेळीं समाजामध्यें अशा चळवळे लोकांची मुळींच उणीव नसते; समाजांत जें असमाधान, जी असंतोषाची खळबळ असते त्यामधूनच खरोखर

हे लोक स्वतः निर्माण होत असतात ; परंतु हजारों-लाखों लोक जेव्हां कांहीं एखादें कार्य करण्यासाठीं म्हणून पुढें येतात, ते कांहीं कोणी एखादा चळवळ्या त्यांना तसें करावयाला सांगतो म्हणून काहीं नव्हे. जगामध्यें बहुतेक लोकांना तर सुरक्षित आणि सुखासमाधानाच्या संसाराची आवड असते. आपल्याजवळ जें कांहीं आहे तें गमावण्याचा धोका पत्करावयाला सहसा कोणी तयार नसतो ; परंतु आर्थिक परिस्थितीच जेव्हां अशी चमत्कारिक होते कीं रोजच्या रोज लोकांचे हाल वाढतच जातात आणि संसाराचें ओझें खरोखर अगदीं असह्य होऊन जातें अशा वेळीं मग दुर्बल लोकसुद्धां संकटांत उडी घेण्याला, वाटेल तो धोका पत्करावयाला, तयार होतात. असें झालें म्हणजे मगच चळवळे लोकांचे शब्द त्यांच्या कानांत घुसणें शक्य होतें ; आपल्या दैन्य-दुःखांतून बाहेर पडण्याचा मार्ग हे लोक आपल्याला दाखवीत आहेत, असें मग त्यांना वाटूं लागतें.

माझ्या पुष्कळशा पत्रांत मी तुला सामान्य लोकांच्या हालअपेष्टा आणि शेतकऱ्यांचीं बंडें यांच्याबद्दल सांगत आलों आहें. आशिया आणि यूरप खंडांत अशीं हीं शेतकऱ्यांचीं बंडें वारंवार होत आलीं आहेत. त्यांचा परिणाम म्हणजे पुष्कळसा रक्तपात व्हायचा आणि मग जुलूम व्हायचा. अगदीं निर्दय जुलूम ! असल्या हालअपेष्टांनीं चिडून जाऊन शेतकरी लोक बंड करण्याला प्रवृत्त होत खरे ; परंतु आपल्याला घडवून काय आणावयाचें आहे याची नीटशी कल्पना त्यांना मुळींच नसे. अशा तऱ्हेनें त्यांचे विचार अनिश्चित आणि अस्फुट असल्यामुळें, त्यांच्यापाशीं एखादा सुसूत्र कार्यक्रम नसल्यामुळें, बहुतेक वेळीं त्यांच्या बंडाच्या प्रयत्नांना अपयश येई. फ्रेंच राज्यक्रांतीमध्यें मात्र एक नवीनच गोष्ट आढळून आली. निदान इतक्या मोठ्या प्रमाणांत यापूर्वी केव्हां ती आढळून आलेली नव्हती ; ती म्हणजे आर्थिक कारणामुळें स्वाभाविक उत्पन्न होणारी क्रांतीची ओढ आणि जीवनविषयक सुसंघटित कल्पना यांचा संगम ही होय. असा संगम ज्या ठिकाणीं घडून येतो त्याच ठिकाणीं खरी क्रांति घडून येते ; आणि अशी क्रांति जीवन आणि समाज यांचे एकूण धागे-राजकीय, सामाजिक आर्थिक आणि धार्मिक-सर्व प्रांत व्यापून टाकते, त्यांत फेरबदल घडवून आणते.

फ्रेंच राजांचे विलासोपभोग, नादानपणा आणि दुराचारीपणा यांबद्दल आणि याच वेळीं दुसरीकडे सामान्य जनतेला भरडून काढणारी जी आर्थिक दुरवस्था तिच्याबद्दल मी या पूर्वीच तुला सांगत आलों आहें. फ्रेंच लोकांच्या मनांत विचारांची, व्हाल्टेअर आणि रूसो आणि मॉंटेस्क्यू यांच्या आणि इतरांच्याही पुष्कळांच्या नवकल्पनांची खळबळ कशी माजलेली होती, हेंही मी तुला सांगितलेलें आहे. अशा रीतीनें एका बाजूला ही आर्थिक दैन्यावस्था आणि दुसऱ्या बाजूला हा नवीन तत्त्वविचार या दोहोंचें कार्य समाजांत एकाच वेळीं जोडीजोडीनेंच चालू होतें आणि त्यांचा एकमेकांचा एकमेकांवर अर्थातच परिणाम होत होता. कोणत्याही समाजामध्यें नवीन तत्त्वप्रणाली निर्माण होऊन पक्की होण्याला फार दीर्घ कालावधि लागत असतो. कारण हे

नवे विचार लोकांपर्यंत हळूहळू पाझरत खालीं जावे लागत असतात; शिवाय लोक आपले पूर्वग्रह आणि जुने विचार चटकन् टाकून देण्याला तितकेसे तयार नसतात. त्यांनच पुष्कळदां असें होतें, कीं एखादी नवीन तत्त्वप्रणाली थोडीशी नीटपणें प्रस्थापित व्हायला यावी, लोक आपल्या जुन्या कल्पना सोडून या नव्या कल्पनांचें गाडें मान्य करावयाला तयार व्हावे, तोंच काळ इतका बदललेला असतो, कीं ही तत्त्वप्रणालीच थोडीशी जुनी, मागासलेली आणि निरुपयोगी झाल्यासारखी होते. या दृष्टीनें अठराव्या शतकांतील या फ्रेंच तत्त्वज्ञांच्याच कल्पनांची गम्मत थोडीशी पाहण्यासारखी आहे. त्याच्या सर्व कल्पना यूरपमधील औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीच्या काळच्या परिस्थितीवर आधारलेल्या होत्या.

परंतु ज्या वेळीं या कल्पना इकडे फ्रान्समध्यें ते मांडीत होते, जवळजवळ त्याच वेळीं तिकडे इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रांति घडून येत होती आणि तिच्यामुळें उद्योगधंद्यांत आणि समाजजीवनांत इतके मोठे फरक घडून येत होते, कीं त्यामुळें फ्रेंच तत्त्वज्ञान्यांनीं बसविलेल्या पुष्कळशा नव्या सिद्धान्तांची सगळी बैठकच उखडून पडत होती.

हें खरें आहे, कीं औद्योगिक क्रांतीचें हें सगळें स्वरूप पुढच्या काळामध्यें वाढलें. त्यामुळें आपल्या पुढच्या काळांत हें असें काय काय घडून येणार आहे याची आगाऊ कल्पना करणें स्वाभाविकच फ्रेंच तत्त्वज्ञांना शक्य नव्हतें; परंतु ज्या त्यांच्या कल्पनांवर फ्रेंच राज्यक्रांतीचा कार्यक्रम बहुतांशीं आधारलेला होता त्या कल्पना मोठ्या कारखानदारीच्या उदयानंतर कांहीं प्रमाणांत तरी जुनाट आणि निरुपयोगी ठरून गेल्या हें आपल्याला लक्षांत घ्यावयाचें आहे.

परंतु तें कसेंही असलें, तरी फ्रेंचांच्या राज्यक्रांतीवर फ्रेंच तत्त्वज्ञाच्या या कल्पनाचा आणि सिद्धान्तांचा फारच मोठा जोराचा परिणाम झालेला होता हें निःसंशय आहे. यापूर्वी सामान्य जनतेनें उठाव करून दंगे आणि बंडें केल्याचे पुष्कळ प्रकार झालेले होते; परंतु या वेळचें हें या प्रकारचें उदाहरण जरा विशेष तऱ्हेचें होतें; या वेळीं जागृत झालेल्या समाजानें उठाव केलेला होता—अथवा हा उठाव करणाऱ्या समाजाला जागृत अशा पुढाऱ्यांकडून मार्गदर्शन होत होतें असें म्हणा पाहिजे तर—या कारणासाठीं फ्रान्समधील राज्यक्रांतीला हें एवढें महत्त्व चढलेलें आहे.

आपला आजा चौदावा लुई याच्यामागून पंधरावा लुई हा इ. स. १७१५ मध्यें फ्रान्सच्या गादीवर आला आणि त्यानें एकूणसाठ वर्षें राज्य केलें हें मागें मीं तुला सांगितलें आहे. त्यानें एकदां म्हटलें होतें म्हणतात, कीं "माझ्यामागें सगळा प्रळय का होईना" (अप मुवे पीछे डुब गई दुनिया) आणि असें होणार हें गृहीत धरूनच त्याचें वागणें चाललेलें होतें. अगदीं हंसत-खेळत चैन करीत त्यानें आपला देश खुशाल संकटाच्या खाईंत ढकलला.

तिकडे ब्रिटिशांनीं राज्यक्रांति केली आणि आपल्या एका राजाचें डोकें

उडविलें. या गोष्टीपासून त्यानें कांहींही बोध घेतला नाहीं. इ. स. १७७४ मध्यें त्याच्यामागून त्याचा नातू सोळावा लुई हा फ्रान्सच्या गादीवर आला. हा तर अगदींच मूर्ख आणि बुद्धिहीन मनुष्य होता. त्याची बायको मेरी अँटोइनेट ही हॅप्सबर्ग घराण्यांतील ऑस्ट्रियाच्या बादशहाची बहीण होती. तीही मूर्खच होती; परंतु तिच्यामध्यें एक प्रकारचा हटवादीपणा आणि चिवटपणा होता आणि सोळाव्या लुईला तिनें सर्वस्वीं आपल्या मुठींत ठेवलेलें होतें. लुईपेक्षांसुद्धां तिच्या डोक्यामध्यें राजे लोकांच्या दैवी अधिकाराचें वेड अधिक भरलेलें होतें; सामान्य जनतेचा तिला अत्यंत तिटकारा असे. या दोघां नवरा-बायकोंनीं मिळून हरएक प्रकारें राजशाहीची कल्पना लोकांना अगदीं मुळींच डोळ्यांसमोर नकोशी होईल असें होण्याजोगी कोणतीही गोष्ट करण्याचें बाकी ठेवलें नाहीं. क्रांतीची सुरुवात झाल्यानंतरसुद्धां राजशाहीचें काय करावें याबद्दल फ्रेंच लोकांचा कांहीं पक्का निश्चय झालेला नव्हता; परंतु सोळावा लुई आणि मेरी अँटोइनेट यांच्या खटपटींमुळें आणि मूर्खपणामुळें फ्रान्समध्यें प्रजासत्ताक राज्य स्थापन होणें अगदीं अपरिहार्य झालें. बाकी त्यांच्याहून शहाणीं माणसें त्यांच्या जागीं असतीं असें धरलें, तरी त्यांना सुद्धां त्या बाबतींत कांहीं करतां आलें असतें कीं नाहीं कोण जाणे! रशियामध्यें १९१७ सालीं क्रांति झाली त्याच्या आधीं रशियाचा झार आणि झारिना यांचेंही वर्तन या फ्रेंच राजा-राणीच्याइतकेंच अचंबा वाटण्याइतकें मूर्खपणाचें झालें. प्रसंगांतील आणीबाणीचा क्षण जसजसा अधिकाधिक जवळ येत गेला, तसतसे हे लोक अधिकाधिकच मूर्खपणा कसा करीत गेले आणि त्यामुळें आपल्याच हातानें आपला नाश करून घेण्याला त्यांनीं मदतच कशी केली हें पाहिलें म्हणजे मोठा चमत्कार वाटतो! लॅटिनमध्यें जी एक म्हण आहे, कीं "परमेश्वराच्या मनांतून ज्यांचा नाश करावयाचा, त्यांना तो अगोदर वेडें करतो." ('आधीं जाते बुद्धि, मग जातें भांडवल.' 'विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः।' 'बुद्धिनाशात् प्रणश्यति।') ती या लोकांना कशी बरोबर लागू पडते! संस्कृतमध्यें अगदीं याच अर्थाची "विनाशकाले विपरीतबुद्धिः" अशी म्हण आहे.

राजशाहीच्या किंवा सुलतानशाहीच्या आधारस्तंभांमध्यें लष्करी वैभव—लष्करी विजय—हा एक नेहमींचा आधारस्तंभ होऊन राहत आलेला आहे. स्वतःच्या देशांत कांहीं असंतोष किंवा गडबड माजलीसें दिसलें, कीं लोकांचें लक्ष दुसरीकडे वळविण्याच्या उद्देशानें बाहेरच्या देशांत कांहीं तरी लष्करी आक्रमण करण्याचा मोह सरकारी गटांना व्हायचा हें जणुं ठरलेलें. फ्रान्सनेंही अशीं लष्करी आक्रमणें करण्याचे प्रयत्न केलेले होते; पण ते सर्वच फ्रान्सच्या अंगाशीं आलेले होते. सात वर्षांच्या युद्धांत तर फ्रान्सचा प्रत्यक्षच पराभव झाला होता. तेथील राजाच्या अमलाला हा एक मोठाच धक्का होता. त्यामुळें दिवाळखोरीची अवस्था एकसारखी वाढूं लागलेली होती. पुढें फ्रान्सनें अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धामध्यें भाग घेतला. त्यामुळें अधिकच खर्च वाढला. हा एवढा सगळा पैसा आणावयाचा कोठून? सरदार लोक आणि पाद्री

हे पडले वतनदार; सगळ्या करांची जवळजवळ त्यांना माफी. बरें, आपल्या या खास सवलती सोडून देण्याची त्यांची तयारी होती म्हणावी तर तीही नाहीं. परंतु झालेलीं कर्जें फेडण्यासाठीं आणि दरबारची उधळपट्टी भागविण्यासाठींही कांहीं करून पैसा तर उभा करावयालाच हवा होता. अशा वेळीं सामान्य जनतेची, लोकसमाजाची, कशी काय अवस्था होती? कार्लाइल या इंग्रज ग्रंथकारानें फ्रेंच राज्यक्रांतीवर एक ग्रंथ लिहिलेला आहे. त्यामधून तुला एक वर्णन याबद्दलचें मी देतों. त्याची भाषासरणी थोडीशी चमत्कारिक आहे खरी; परंतु त्याचीं शब्दचित्रें नेहमींच फार परिणामकारक असतात. त्यानें लिहिलें आहे :

" बरें, इकडे श्रमजीवी लोकांकडे पाहावें तर त्यांचीही परिस्थिति चांगली नाहीं. दुर्दैवी बिचारे! कारण त्यांची संख्याही कांहीं थोडीथोडकी नाहीं, तर चांगली घसघशीत दोन ते अडीच कोटी आहे. एवढ्या मोठ्या संख्येचा आम्ही लोक एकत्र लोळागोळा करून त्यांच्या ठिकाणीं एक प्रकारच्या अंधुक अशा एकभावनेची कल्पना लादतों आणि आमच्यापासून अगदींच निराळा, ज्याची आपली नीटशी ओळखसुद्धां नाहीं असा तो एक बाजारबुणग्यांचा अमानुष जमाव आहे, असें आपण त्याला नांव देतों. अथवा आमच्यापैकीं ज्यांच्या ठिकाणीं जरा थोडीशी मानवी दयाबुद्धि असते ते या जमावाला मासेस–लोकसमाज–असें नांव देतात. लोकसमाज म्हणे! पण चमत्कार असा आहे, कीं जरा थोडी कल्पनाशक्ति चालवून तुम्ही जर सगळ्या फ्रान्सभर त्यांच्यामध्यें जाऊन मिसळलांत, त्यांच्या मातीच्या छपऱ्यांत, डोक्याला टेकायला आलेल्या अशा छपराच्या ठेंगण्या कोठड्यांत किंवा घुशींच्या सांपळ्यासारख्या त्यांच्या राहत्या जागेंत जर तुम्ही जाल तर तुम्हांला आढळून येईल, कीं लोकसमाज म्हणून कांहीं कुणी कुठली एकच एक अशी अमानुष किंवा अतिमानुष राक्षसी व्यक्ति नसून तोही एकेका स्वतंत्र व्यक्तीचाच बनलेला आहे. त्यांपैकीं प्रत्येक व्यक्तीला स्वतःचें स्वतंत्र हृदय आहे आणि सुखदुःखें आहेत. त्या व्यक्तींच्या अंगावरही आपल्यासारखीच कांतडी आहे आणि त्यांना तुम्हीं कांहीं टोंचलेंत, तर त्यांच्याही अंगांतून तुमच्यासारखेंच रक्त येईल."

हें वर्णन केवळ १७८९ मधल्या फ्रान्सलाच नव्हे, तर १९३२ च्या हिंदुस्थानला सुद्धां किती तंतोतंत लागू पडतें! आमच्यापैकीं पुष्कळशी मंडळीसुद्धां हिंदुस्थानांतील कोट्यवधि शेतकरी कामकऱ्यांना स्वतःचें कांहीं स्वतंत्र जीवन आहे, अशी कल्पना न करतां त्या सर्वांचा मिळून " मासेस " म्हणजे जनता किंवा लोकसमुदाय म्हणून कोणी बेंगरूळ दीनदुबळा मनुष्यभावनाविरहित गोळा–पशु–आहे अशीच कल्पना करीत असतात!

आज किती तरी काळापासून या कोट्यवधि लोकांचें जिणें हें ओझीं वाहणाऱ्या पशूंच्या जिण्यासारखेंच झालेलें आहे आणि आजच्या घटकेलाही तें तसेंच आहे! आम्ही लोक मारे त्यांच्याबद्दल " सहानुभूति " दाखवीत

असतों आणि मोठ्या कनवाळूपणानें त्यांचें कल्याण करण्याचा आव आणीत असतों. परंतु हे लोकही तुमच्याआमच्याहून कांहीं कोणी निराळे नाहींत; तेही मनुष्यप्राणीच आहेत; आपल्याप्रमाणेंच त्यांच्याही ठिकाणीं कांहींएक स्वतंत्र जीव, व्यक्तिमत्त्व आहे, अशी आमची क्वचितच कल्पना असते. त्यांच्या त्या मातीच्या झोंपड्यांमध्यें राहत असतांना त्यांच्यापैकीं प्रत्येकाला स्वतःचा म्हणून कांहीं जीव असतो, सुखदुःख असतें, आपल्याप्रमाणेंच त्यालाही भूक लागत असते, थंडीचा त्रास होत असतो, दुखण्याबाहण्याचा त्रास होत असतो, ही गोष्ट आपण चांगली लक्षांत बाळगणें आवश्यक आहे. आमच्यापैकीं पुष्कळसे कायद्याच्या पांडित्यांत मुरलेले राजकारणी लोक राज्यघटनेची आणि यासारख्याच दुसऱ्या गोष्टींची चर्चा आणि मनन करीत असतात; परंतु ज्या बिचाऱ्या मानवी जीवांकरितां या सगळ्या घटना किंवा हे सगळे कायदे करावयाचे असतात, त्यांचें त्यांना स्मरणसुद्धां नसतें! आमच्या देशांत मातीच्या झोंपडयांत किंवा शहरांतील घाण खुराड्यावजा गर्दीत राहणाऱ्या लोकांच्या दृष्टीनें राजकारण या शब्दाचा एकच अर्थ आहे. तो म्हणजे या भुकेनें मरणाऱ्या लोकांना अन्नपाणी, कपडे आणि राहायला जागा मिळवून देणें हा होय.

सोळाव्या लुईच्या कारकीर्दीमध्यें फ्रान्सची ही अशी अवस्था होती. त्याच्या कारकीर्दीच्या सुरुवातीलाच उपासमारीमुळें लोकांचे दंगे झाले होते. हे दंगे कितीक वर्षे तरी चालूच होते. पुढें मध्यें कांहीं काळ त्यांत खंड पडला आणि त्यानंतर पुन्हां शेतकऱ्यांचे दंगे व बंडें सुरू झालीं. उपासमारीमुळें झालेल्या दंग्यांच्या वेळीं डि जॉन येथें गव्हर्नरानें भुके मरणाऱ्या लोकांना सांगितलें, "शेतांत गवत रुजलें आहे, तिकडे जा आणि चरा जा त्यावर!" यामुळें धंदेवाईक भिकाऱ्यांची संख्या प्रचंड झाली. अधिकृत रीतीनेंच असें जाहीर करण्यांत आलें होतें, कीं इ. स. १७७७ मध्यें फ्रान्समध्यें अकरा लक्ष भिकारी होते. या दारिद्र्याचा आणि दैन्याचा विचार करूं लागतांच हिंदुस्थानचें चित्र मनापुढें उभें राहिल्याशिवाय कसें तें राहतच नाहीं.

शेतकऱ्यांना खायला-प्यायला तर हवेंच होतें; पण तशींच त्यांना कसून खाण्याला जमीनही हवी होती. सरंजामदारशाही-पद्धतीला अनुसरून फ्रान्समध्यें जमिनीची मालकी होती सरदारवर्गाकडे आणि जमिनींतील बहुतेक सारें उत्पन्न याच लोकांच्या खिशांत जात असे. शेतकऱ्यांच्या मनांत विशेष स्पष्ट अशा कांहींच कल्पना नव्हत्या. अमुक एक ध्येय असेंही त्यांच्या डोळ्यांपुढें निश्चितपणें नव्हतें; परंतु जमीन आपल्या मालकीची असावी एवढी मात्र त्यांना कल्पना असावी. आपल्याला भरडून काढणाऱ्या सरंजामशाही-पद्धतीचा त्यांना तिटकारा होता. सरदारवर्ग आणि भिक्षुकवर्ग, पाद्रीलोक यांचाही त्यांना तिटकारा आलेला होता आणि गरीब लोकांना गॅबेल किंवा मिठावरचा कर (पुन्हां हिंदुस्थानची स्थिति लक्षांत आण) हा तर फारच जाचक वाटत होता.

शेतकऱ्यांची स्थिति अशी होती आणि तरी पण राजा आणि राणी पैशांसाठीं हाकाटी करीतच होतीं.

सरकारजवळ खर्चाला पैसा नव्हता, त्यामुळें कर्जाचा डोंगर वाढतच होता. मेरी अँटोइनेटला लोकांनीं 'तुटीची राणी' असें टोपण नांव दिलें होतें. आतां पैसा उत्पन्न करण्याचा मार्ग शिल्लक उरलेला नव्हता. शेवटीं सोळाव्या लुईनें इतर कांहीं मार्ग सुचेनासा होऊन स्टेटस् जरनलची–फ्रेंच लोकसभेची–बैठक मे १७८९ मध्यें बोलाविली. या सभेमध्यें सरदार, पाद्री व सामान्य समाज अशा तीन वर्गांचे प्रतिनिधी असत. म्हणजे त्याची बाह्यरचना ब्रिटिश पार्लमेंटाहून कांहीं फारशी निराळी नव्हती; कारण पार्लमेंटमध्यें लॉर्डांच्या सभेंत सरदार, धर्मगुरू, पाद्री असत आणि कॉमन्स सभा ही बाकीच्या जनतेच्या प्रतिनिधींची सभा होती; परंतु नीट पाहिलें म्हणजे या दोहोंमध्यें पुष्कळसे फरक होते. ब्रिटिश पार्लमेंटच्या बैठका आज कितीक शतकांपासून अगदीं नियमितपणें भरत आल्या होत्या आणि त्यांच्या काम करण्याच्या परंपरा, नियम आणि पद्धती आतां पुष्कळशा चांगल्या मजबूतपणें प्रस्थापित झालेल्या होत्या. फ्रेंच लोकसभेच्या बैठकी क्वचितच होत असत आणि तिच्या बाबतींत कसलीही परंपरा अशी ठरून गेलेली नव्हती. मात्र दोन्ही सभा वरिष्ठ वर्गाच्या प्रातिनिधिभूतच होत्या; फ्रेंच लोकसभेपेक्षांसुद्धां ब्रिटिश कॉमन्स सभेची अशी अवस्था अधिक प्रमाणांत होती. दोन्ही सभांमध्यें शेतकऱ्यांचा कोणीही प्रतिनिधि नसे.

४ मे १७८९ या दिवशीं राजानें व्हर्सायं येथें फ्रेंच लोकसभेचें उद्घाटन केलें; परंतु या तीन वर्गांच्या प्रतिनिधींना कोठून आपण एकत्र बोलाविलें असें म्हणून पश्चात्ताप करण्याची लौकरच राजावर पाळी आली. तिसरा वर्ग म्हणजे सामान्य जनतेचा, मध्यम वर्गीयांचा समाज. त्याचे जे प्रतिनिधी होते ते राजाचा लगाम नीटपणें मुकाट्यानें तोंडांत धरीनात; तो दांतांत घेऊन ते चावूं लागले आणि आमच्या संमतीविना कसल्याही प्रकारचे कर बसविले जातां कामा नयेत असा त्यांनीं आग्रह धरला. इंग्लंडमध्यें कॉमन्स सभेनें अशा तऱ्हेचा हक्क प्रस्थापित केलेला होता हें उदाहरण त्यांच्या डोळ्यांपुढें होतेंच. त्याचप्रमाणें अगदीं ताजें अमेरिकेचें उदाहरणही त्यांच्यापुढें होतें. त्यांची कल्पना अशी होती, कीं इंग्लंड हा स्वतंत्र लोकांचा देश आहे; पण ही त्यांची चूक होती. खरें पाहिलें तर हा त्यांचा भ्रमच होता. कारण इंग्लंडचा राज्यकारभार वरिष्ठ वर्ग आणि जमीनमालक यांच्याच हातांमध्यें होता. पार्लमेंटसभा सुद्धां प्रत्यक्ष त्यांचीच मिरास होती; कारण मतदानाचा हक्क फारच थोड्या लोकांच्या हातीं केंद्रित झालेला होता.

तथापि अशा या तिसऱ्या वर्गाच्या लोकांनीं किंवा कॉमन्स लोकांनीं हा जो विचार केला तो सुद्धां लुईच्या सहनशक्तीच्या पलीकडचा होता. त्यानें त्या सगळ्यांना समारंभानांतून हांकलून दिलें; परंतु हे प्रतिनिधी अशा रीतीनें निमूटपणें निघून जाण्याच्या वृत्तींमध्यें नव्हते. बाहेर पडतांच ताबडतोब ते जवळच्याच एका टेनिस खेळण्याच्या जागीं जमले आणि राज्यघटना प्रस्थापित केल्याशिवाय तेथून हलावयाचें नाहीं, घरोघर जावयाचें नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला. या प्रतिज्ञेला टेनिसकोर्ट-

वरची प्रतिज्ञा असें म्हणतात. त्यानंतर मग राजानें त्याच्यावर जबरदस्ती करण्यासाठीं लष्कराला हुकूम दिला ; परंतु राजाच्या खास शिपायांनींच हा हुकूम पाळण्याचें नाकारलें त्या वेळीं आणीबाणीचा क्षण निर्माण झाला. कोणतीही क्रांति घ्या ; ज्या क्षणीं सरकारचा मुख्य आधारस्तंभ जें सैन्य तेंच लोकांच्या गर्दीमधील आपल्याच बांधवांवर गोळ्या घालण्याचें नाकारतें, त्याच वेळीं खरा निर्णयाचा क्षण प्राप्त होतो. सैन्यानें हुकूम नाकारतांच लुई भयभीत झाला आणि त्यानें माघार घेतली आणि मग पुन्हां आपल्या नेहमींच्या मूर्खपणाला अनुसरून त्यानें आपल्या प्रजेला गोळ्या घालून ठार मारण्यासाठीं परदेशच्या पलटणी आणविण्याचें कारस्थान उभें केलें. ही गोष्ट लोकांच्या सहनशक्तीच्या बाहेरची ठरून १४ जुलै १७८९ या संस्मरणीय दिवशीं लोकांनीं पॅरिस शहरामध्यें बंड केलें, बॅस्टीलचा प्राचीन तुरुंग काबीज केला आणि त्यामधील कैद्यांना सोडून दिलें.

बॅस्टीलचा पाडाव हा इतिहासामधील एक फारच मोठा प्रसंग आहे. या प्रसंगापासून फ्रेंच राज्यक्रांतीची सुरुवात झाली. देशांत सगळीकडे जनतेनें बंडें पुकारावींत असा आदेश देणारें जणुं हें एक रणशिंगच वाजलें. बॅस्टीलचा तुरुंग फुटला याचा अर्थ फ्रान्समधील सरंजामशाही, राजशाही आणि वतनदारी यांची प्राचीन राजवट नष्ट झाली असा होता. यूरपमधील सगळ्या राजे-महाराजांच्यापुढें हें एक भयंकर दुश्चिन्हच उभें राहिलें होतें. वास्तविक राजे-महाराजांच्या ऐश्वर्योपभोगांची आणि अनियंत्रित कारभाराची दीक्षा जो फ्रान्स देश यूरप खंडाला देत आला होता तोच फ्रान्स देश आतां नवीनच दीक्षेचा प्रचार करायला सज्ज होत होता हें पाहून यूरप खंड गांगरून गेलें. कांहीं थोड्या लोकांना तर बॅस्टीलच्या पाडावाच्या या कायान धडकीच भरली व त्यांचे हातपाय लटलट कांपूं लागले ; परंतु बहुसंख्य समाजाला मात्र आतां आपल्याला चांगले दिवस उगवणार अशी त्यामुळें आशा वाटूं लागली. जुलैचा चौदावी तारीख हा दिवस अजूनसुद्धां फ्रान्समध्यें राष्ट्रीय सण म्हणून दरसाल देशभर चोहोंकडे पाळला जात असतो.

जुलैच्या चौदाव्या तारखेच्या दिवशीं बॅस्टीलचा तुरुंग पॅरिसच्या सामान्य जमावानें फोडला व ताब्यांत घेतला हें दृश्य जगाला दिसलें ; परंतु अधिकारारूढ लोक हे किती आंधळे असतात पाहा ; त्याच्या आदल्याच रात्रीं तेरा तारखेला व्हर्साय येथें राजदरबारीं एक मोठाच उत्सव करण्यांत आला होता. त्या ठिकाणीं नाचरंग, गाणेंबजावणें चाललें होतें आणि खुद्द राजाराणी यांच्या समवेत हे लोक बंडखोर पॅरिसवर लौकरच जो विजय मिळविण्याच्या हुरुपांत होते, त्याच्या जणुं अभिनंदनाथ मद्यपान करीत होते ! त्या काळीं यूरप खंडांतील लोकांच्या मनावर राजाच्या सत्तेचा इतका अलौकिक पगडा होता, कीं तो पाहून मोठा चमत्कार वाटतो मनाला ! आधुनिक जगांत राहणारे जे आपण लोक, त्याना आतां प्रजासत्ताक राज्यांचा इतका चांगला परिचय

झाला आहे, कीं राजाची राजवट ही चांगली असूं शकते असें कोणी डोकें ताळ्यावर असलेला मनुष्य आतां म्हणत नाहीं.

जे कांहीं मूठभर राजे जगांत अजून शिल्लक राहिलेले आहेत, तेही आतां अगदीं पूर्ण विचारपूर्वक आणि मर्यादेनेंच वागत असतात; नाहीं तर कोणता बडेंगा वाढून ठेवलेला आहे याची त्यांना चांगली कल्पना आहे. असें असून सुद्धां आजकालही पुष्कळ लोकांचा अशा राजशाहीलाही विरोधच आहे; कारण तिच्यामुळें वर्गाभिन्नता कायम राहते आणि एक प्रकारची एकमेकांपासून तुटून राहण्याची आणि लब्धप्रतिष्ठितपणाची प्रवृत्ति, झन्झूशाही वाढते; परंतु अठराव्या शतकांत यूरप खंडांतील लोकांची प्रवृत्ति अशी राजशाहीविरुद्ध नव्हती. त्या काळच्या लोकांना राजाशिवाय एखादा देश असूं तरी कसा शकेल, याची कल्पनासुद्धां करणें थोडेंसें कठिण पडत होतें! त्यामुळें काय झालें पाहा. लुई जरी इतका मूर्खपणा करीत होता आणि लोकांच्या इच्छेविरुद्ध वारंवार वागत होता, तरीसुद्धां त्याला पदच्युत करावें असें कांहीं कोणी म्हणेना. यानंतर दोन वर्षेपर्यंत लोकांनीं लुई राजाचा मूर्खपणा सहन करून त्याला डोक्यावर वागवून घेतलें; परंतु अखेरीस जेव्हां त्याला देश सोडून पळून जातांना पकडण्यांत आलें, तेव्हां काय तो फ्रान्स देशानें आपल्याला मुळीं राजाच नको असा निश्चय केला.

पण हें सगळें पुढचें पुराण आहे. त्याच्या आधीं स्टेट्स जनरलचें रूपांतर नॅशनल असेंब्ली—राष्ट्रसभा—असें करण्यांत आलें; एव्हांपासून राजाची सत्ता नियंत्रित झाली; म्हणजे आतां राष्ट्रसभा सांगेल तें त्यानें ऐकलें पाहिजे अशी सामान्यतः सगळ्यांची कल्पना ठरली. परंतु राजाला ही गोष्ट नको होती; मेरी अँटोइनेटला तर ती त्याहून मुळींच नको होती. शिवाय पॅरिसच्या लोकांना या दोघांबद्दलही फारसा आपलेपणा नव्हता आणि हीं दोघेंजण काय हवीं तीं कारस्थानें करतील असा त्यांना संशय वाटत होता. त्या वेळीं राजाराणी आपला दरबार घेऊन व्हर्साय येथें राहिलेलीं होतीं. व्हर्साय पॅरिसपासून बरेंच दूर असल्यामुळें पॅरिसमधील लोकांना राजावर नीट नजर ठेवतां येत नव्हती. त्याचप्रमाणें व्हर्साय येथें चाललेल्या मेजवान्या, नाचरंग, विलासोपभोग यांच्या हकिकती कानांवर येऊन पॅरिसमध्यें उपाशीपोटीं मरत असलेल्या लोकांचा जळफळाट होई. म्हणून लोकांनीं जगांत आजपर्यंत कोणीही कोणत्याही ठिकाणीं काढली नसेल अशा अजब पद्धतीची मिरवणूक काढून पॅरिसच्या लोकांनीं राजाराणींना पॅरिस येथील ट्युलेरीज राजवाड्यांत आणून ठेवलें.

फ्रेंच राज्यक्रांतीची ही कथा आतां पुढच्या पत्रांत पुढें चालू करीन मी.

# १०१

# फ्रेंच राज्यक्रांति

*१० ऑक्टोबर, १९३२*

फ्रेंच राज्यक्रांतबिद्दल तुला लिहितांना मला थोडेंसें कठिण वाटतें आहे. त्या-संबंधींचें साहित्य कमी आहे म्हणून नव्हे, तर असें साहित्य फारच आहे म्हणून. जागतिक इतिहासाच्या रंगभूमीवरील फ्रेंच राज्यक्रांतीचा हा प्रयोग नानाविध बदलत्या प्रसंगांनीं भरलेला आणि बुद्धि थक्क करून टाकणारा अशा प्रकारचा झाला; त्यामधील त्या अलौकिक घटनावर चित्त अद्यापिही खिळून राहतें, त्यांच्या स्मरणानें अद्यापिही मन भयभीत होतें, थरकांप पावतें.

राजे लोकांची किंवा मुत्सद्यांचीं राजकारणें हीं नेहमीं चार भिंतींच्या आड अगदीं खासगी बैठकींत बसून चाललेलीं असतात; त्यांच्याभोंवतीं एक प्रकारचें गूढपणाचें वातावरण पसरलेलें असतें. सगळें खोल राजकारण उगीच षट्कर्णी होऊं देता उपयोगी नाहीं, या धोरणाच्या पडद्याखालीं पुष्कळ पापें दडून राहूं शकतात आणि अलंकारिक भाषेच्या फुलोऱ्यांत प्रतिस्पर्धी पक्षांच्या महत्त्वाकांक्षा आणि लोभ हे लपून राहूं शकतात. या महत्त्वाकांक्षांमुळें आणि लोभांमुळें जरी मोठमोठीं युद्धें निर्माण होत असलीं आणि त्या कामीं खूप खूप तरुण माणसें मृत्युमुखीं पडत असलीं, तरीही या युद्धांच्या पाठीमागें असले क्षुद्र हेतू आहेत असें सांगून आपले कान कधींही विटाळले जात नाहींत. उलट पक्षीं, ज्यांसाठीं अगदीं सर्वस्वाचा होम करणें आवश्यक असतें अशा प्रकारच्या अत्यंत उदार आणि महान् मानवी ध्येयांचा घोषच त्या काळीं आमच्यापुढें केला जात असतो.

परंतु क्रांतीचा प्रकार सगळाच निराळा. क्रांतीचें निवासस्थान पडलें शेतांत, रस्त्यांत आणि बाजारपेठेंत; क्रांतीचे मार्ग सगळे राकट आणि धसमुसळेपणाचे. क्रांति घडवून आणणारे जे लोक असतात त्यांना कांहीं राजेरजवाडे आणि मुत्सद्यांसारख्या शिक्षणाचा लाभ झालेला नसतो. असंख्य कपटकारस्थानें आणि दुष्ट डाव कोणाच्याही ध्यानांत येणार नाहींत अशा तऱ्हेची त्यांची भाषा कांहीं दरबारी थाटाची आणि अलंकारिक असूं शकत नाहीं. त्यांच्याभोंवतीं गूढपणाचें कसलेंही वातावरण नाहीं; त्यांच्या मनांत जीं कांहीं विचारचक्रें चालू आहेत तीं लपवून ठेवण्यासारखा मोठेपणाचा, प्रतिष्ठितपणाचा वगैरे कसलाच पडदा त्यांच्यापाशीं नाहीं; मनाचें तर दूरच राहूं द्या म्हणा; प्रत्यक्ष त्यांचें शरीर झांकण्यापुरतें सुद्धां वस्त्र त्यांच्यापाशीं नसतें. क्रांतीच्या वेळचें राजकारण म्हणजे कांहीं राजे लोक किंवा धंदेवाईक मुत्सद्दी यांचा करमणुकीचा खेळ नसतो. त्या राजकारणाचा प्रत्यक्ष रोजच्या व्यवहाराशीं संबंध असतो आणि त्याच्या पाठीमागें साधासुधा मानवी स्वभाव आणि भुकेलेल्या लोकांचीं उपाशी पोटें असतात.

फ्रान्समध्येंही अर्थातच १७८९ ते १७९४ या पांच वर्षांच्या प्रलयकाळांत उपसमार झालेले शेतकरीच कार्याला पुढें सरसावलेले आपण पाहतों. या शेतकऱ्यानींच भेदरट अशा राजकारणी लोकांचे हात धरून जबरदस्तीनें त्यांना राजशाही, सरंजामशाही आणि धर्मपीठाची वतनदारी या सर्व गोष्टींना खो देण्यास भाग पाडलें असें दिसतें. त्यांनींच त्या भयंकर गिलोटीन बाईसाहेबांना—सुरीला—नैवेद्य अर्पण केला आणि ज्या लोकानीं आजपर्यंत त्यांना पायांखालीं तुडविलें आणि भरडलें होतें किंवा आतां नवीनच मिळविलेल्या आपल्या स्वातंत्र्याविरुद्ध जे कारस्थान आणि कट करतात असा त्यांना संशय येत होता, अशा सर्वांचा त्यांनीं सूड घेतला. हेच लक्तरें पांघरणारे आणि अनवाणी चालणारे लोक, मिळालीं तीं किंवा घाईघाईत जसलीं बनवितां आलीं तसलीं, कशातरी तऱ्हेचीं हत्यारें घेऊन आपल्या राज्यक्रांतीचें रक्षण करण्यासाठीं रणांगणावर धावले आणि आपल्या विरुद्ध उभ्या राहिलेल्या यूरप खंडांतील लष्करी शिक्षणांत मुरलेल्या सर्व सैन्यांचा पराभव करून त्यांना त्यांनीं मागें हटविलें. अशा रीतीनें या फ्रान्समधील सामान्य लोकांनीं मोठे चमत्कार करून दाखविले; परंतु कित्येक वर्षांचा ताण आणि झगडा सोसल्यानंतर क्रांतीची शक्ति संपल्यासारखी झाली; तेव्हां मग ही क्रांतीची लाट आपल्याच प्रवर्तकावर उलटली आणि स्वतःच्याच अपत्यांचा—कार्याचा—नाश करूं लागली. त्यानंतर प्रतिक्रांति निर्माण झाली. तिनें क्रांतीचा सगळा पसारा गट्ट केला आणि ज्या सामान्य जनतेनें एवढें शौर्य व धाडस दाखविलें, जिनें एवढे कष्ट सोसले, तिलाच पुन्हां या प्रतिक्रांतीनें "वरिष्ठ वर्गा"च्या राजवटीखालीं खेंचून नेलें. या प्रतिक्रांतीमधूनच नेपोलियन हा प्रथम सर्वाधिकारी आणि नंतर बादशहा म्हणून उदयास आला. परंतु नेपोलियनला काय किंवा प्रतिक्रांतीला काय, कोणालाही सामान्य जनतेला आतां पूर्वीच्या ठिकाणीं नेऊन बसविणें शक्यच नव्हतें. राज्यक्रांतीनें जें खरें मुद्द्याचें यश मिळविलें होतें तें हिरावून घेणें, पुसून नाहींसें करणें कोणालाही शक्य नव्हतें; ज्या या काळामध्यें वरिष्ठ वर्गीयांनीं पायांखालीं तुडविलेल्या गरीब लोकांनीं थोडा काळ का होईना पण आपल्या मानेवरचें जूं फेंकून दिलें, त्या काळची अंतःकरणावर खोदून राहिलेली उज्ज्वल स्मृति फ्रेंच लोकांच्या, एवढेंच नव्हे, तर यूरप खंडांतील इतरही लोकांच्या अंतःकरणांतून काढून टाकणें हेंही कोणाला शक्य नव्हतें.

क्रांतीच्या पहिल्या दिवसांत सत्ता हातीं यावी म्हणून झगडणारे पुष्कळ पक्ष व गट उत्पन्न झालेले होते. त्यांत एक पक्ष राजाच्या बाजूच्या लोकांचा होता. या लोकांच्या मनांत सोळाव्या लुईलाच अनियंत्रित राजा म्हणून कायम ठेवावयाची वेडी आशा घोळत होती; दुसरे कांहीं नेमस्त होते, त्यांना राज्यघटनेचा कायदा हवा होता. नियंत्रित अधिकार हातीं असलेला राजा असला, तरी त्यांची तशी हरकत नव्हती. तिसरा पक्ष नेमस्तमतवादी प्रजासत्ताक राज्यवाल्यांचा होता. त्यांनाच गिरोंदे पक्षाचे लोक म्हणत आणि अखेरचा महत्त्वाचा पक्ष जहाल मताच्या प्रजासत्ताक राज्यवाल्यांचा होता. यांना जॅकोबिन लोक म्हणत असत. कारण त्यांच्या पक्षाच्या

सभांचें स्थान जॅकोबिन कॉन्व्हेंट—धर्ममंदिर—मध्यें होतें. असे हे चार पक्ष प्रमुखतः फ्रान्समध्यें होते. याशिवाय या पक्षांमध्यें आणि पक्षांच्या बाहेरही पुष्कळसे एकांडे शिलेदार लटपटी करणारे होते. या सर्व पुढें पुढें दिसणाऱ्या पक्षाच्या आणि व्यक्तींच्या मागें फ्रान्समधील, विशेषतः पॅरिसमधील आम जनता होती; या जनतेचें काम लोकांमध्यें प्रसिद्धि न पावलेल्या अशा आपल्यामधल्याच किती तरी पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं चालू होतें. आणखी एक पक्ष होता, तो क्रांतीला भिऊन देशत्याग करून परदेशांमध्यें, विशेषतः इंग्लंडमध्यें पळून जाऊन राहिलेल्या सरदार लोकांचा; परदेशांत राहून या लोकांची क्रांतीविरुद्ध सतत कारस्थानें चालू होतीं. यूरपचे एकूण एक देश क्रांतिकारक फ्रान्सच्या विरुद्ध एकत्र झालेले होते. राज्यव्यवस्था लोकप्रतिनिधिसभेच्या नियंत्रणाखालची असली, तरी कारभार जेथें केवळ वरिष्ठ वर्गीयांच्या हातामध्यें होता असा इंग्लंड देश, आणि यूरप खंडांतील राजे आणि महाराजे या सर्वांना सामान्य जनतेच्या या विलक्षण ज्वालामुखीचें एकसारखेंच भय वाटत होतें आणि म्हणून तो दडपून काढण्याचे त्या सर्वांचे प्रयत्न चालू होते.

राजा आणि राजपक्षीय लोक यांनीं कारस्थानें केल्यामुळें त्यांनीं आपला नाश आपल्या हातानें जवळ आणला. पहिल्या-पहिल्यांदां फ्रेंच नॅशनल असेंब्लीमध्यें सर्वांत मोठा महत्त्वाचा पक्ष म्हणजे उदारमतवादी नेमस्तांचा होता; या लोकांना इंग्लंड आणि अमेरिका याच्यासारखी लोकप्रतिनिधिसभांनीं युक्त अशी राज्यघटना पाहिजे होती. या पक्षाचा पुढारी मिराबो हा होता. सुमारें दोन वर्षेपर्यंत असेंब्ली-मधील सत्ता या पक्षाच्या हातीं होती. क्रांतीच्या पहिल्या दिवसात लोकपक्षाचा जो बराचसा विजय झाला त्यानें हुरळून जाऊन या पक्षानें लोकांना मोठीं मोठीं भरदार आश्वासनें दिलीं आणि कांहीं कांहीं सुधारणाही केल्या.

बॅस्टीलच्या पाडावानंतर वीस दिवसांनीं ता. ४ ऑगस्ट १७८९ या दिवशीं असेंब्लीमध्यें एक मोठा नाटकांतल्यासारखा विलक्षण प्रकार घडून आला.

सरंजामदार लोकांचे हक्क आणि वतनें व जादा अधिकार हे सर्व काढून टाकावेत अशा प्रकारचा प्रश्न असेंब्लीपुढें चर्चेसाठीं होता. फ्रान्सचें वातावरणच त्या वेळीं असें कांहीं विलक्षण झालें होतें कीं लोकांच्या डोक्यामध्यें कांहीं तरी विलक्षण वारें भरून गेलें होतें; एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष सरंजामदार-सरदार लोकांनासुद्धां स्वातंत्र्याची निशा थोडीशी चढल्यासारखी झालेली होती. त्यामुळें त्या दिवशीं असेंब्लीमध्यें मोठमोठे सरदार आणि धर्मपीठाचे प्रमुख एकामागून एक मोठ्या अहमहमिकेनें उठले आणि आपले जमिनीवरचे अधिकार आणि खास सवलती व हक्क सोडून देतों असें जाहीर करूं लागले.

त्यांनीं दाखविलेला हा उमाळा व आविर्भाव प्रामाणिकपणाचा आणि उदार बुद्धीचा होता हें निःसंशय; परंतु त्याचा परिणाम मात्र आणखी कांहीं वर्षेपर्यंत मुळींच झाला नाहीं. केव्हां केव्हां, पण अगदींच क्वचित् प्रसंगीं सत्ताधारी, वतनदार लोकांच्या

ठिकाणींसुद्धा असा औदार्याचा उमाळा येतो. अथवा असेंही असूं शकेल, कीं आपल्या खास अधिकारांचा व सवलतींचा विनाशकाल आतां जवळ आला अशी पक्की खात्री झाल्यामुळें औदार्याचा पुण्यमय आविर्भाव करणें हें त्यांना सगळ्यांत अधिक सोयीचें वाटत असावें. थोड्या दिवसांपूर्वी आपल्या देशांतही असाच एक प्रकार घडून आला. अस्पृश्यता-निवारणाच्या कामीं बापूंनीं तो उपास केला आणि जादूगारानें कांडी फिरवावी त्याप्रमाणें साऱ्या देशभर भावनेचा भर उसळून गेला, त्या वेळींही वरिष्ठ जातीच्या हिंदूंनींही अशाच तऱ्हेचा औदार्याचा मोठा आश्चर्यकारक उमाळा दाखविला. त्यामुळें हिंदूंनीं आपल्याच फार मोठ्या बंधुवर्गावर लादलेले कांहीं पाश थोड्याफार प्रमाणांत गळून पडले आणि कित्येक युगांपासून या अस्पृश्य लोकांना बंद असलेल्या दारांपैकीं हजारों दारें त्यांना उघडीं झालीं.

अशाच रीतीनें या क्रांतिकारक फ्रान्सच्या नॅशनल असेंब्लीनें उत्साहाच्या भरांत, निदान ठरावाच्या स्वरूपांत का होईना, पण भूदासागिरी, खास हक्कदारी आणि सरंजामदारांचे न्यायदानाचे अधिकार, सरदार व पाद्री लोक यांना असलेली करांची माफी या गोष्टी, एवढेंच नव्हे, तर या लोकांच्या पदव्यासुद्धां रद्द करून टाकल्या. आश्चर्याची गोष्ट अशी, कीं अजून राजाची 'राजा' ही पदवी शिल्लक राहिली होती; आणि इकडे या सरदारांच्या पदव्या तेवढ्या नाहींशा झाल्या होत्या.

यानंतर असेंब्लीनें मानवी हक्कांचा जाहीरनामा मंजूर करण्याचें काम केलें. या प्रसिद्ध जाहीरनाम्याची कल्पना बहुधा अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावरून घेतलेली असावी. परंतु अमेरिकेचा जाहीरनामा हा अगदीं त्रोटक आणि साधा आहे, तर फ्रेंच जाहीरनामा लांबलचक आणि भानगडीचा आहे. जे हक्क दिल्यानें मनुष्याला समता, स्वातंत्र्य आणि सुख लाभेल ते हक्क म्हणजे मानवी हक्क होत, अशी कल्पना करण्यांत आलेली होती. त्या काळीं मानवी हक्कांचा हा जाहीरनामा लोकांना फारच वीरवृत्तीचा आणि धाडसाचा वाटला आणि पुढें शंभर वर्षेपर्यंत यूरपमधील उदारमतवादी आणि लोकशाहीवाल्या लोकांचा एक ब्रीदलेखच तो होऊन राहिलेला होता; पण आज पाहिलें तर हाच जाहीरनामा अगदींच जुन्या काळचा आणि निरुपयोगी वाटतो. आपल्या काळचे कोणतेही प्रश्न सोडविण्याला त्याचा कांहींच उपयोग होत नाहीं. निव्वळ कायद्यामध्यें नमूद झालेली समता आणि मतदानाचा हक्क यांमुळें माणसाला खरी समता, खरें स्वातंत्र्य किंवा सुख प्राप्त होत नाहीं आणि ज्यांच्या हातीं सत्ता असते त्यांना लोकांची पिळणूक करायला अजूनही पुष्कळच मार्ग शिल्लक राहिलेले असतात, ही गोष्ट लोकांच्या ध्यानांत येण्याला काळ मात्र पुष्कळ जावा लागला. फ्रेंच राज्यक्रांतीपासून आतांपर्यंत राजकीय विचारामध्यें पुष्कळ प्रगति झालेली आहे अथवा फेरबदल झालेला आहे म्हणा; त्यामुळें आजच्या अगदीं पुराणमतवादी समजल्या जाणाऱ्या माणसालासुद्धां या मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यांतील जाडजूड शब्दांमध्यें लिहिलेलें तत्त्वांचें अवडंबर समाधानकारक वाटणार नाहीं, मान्य होणार नाहीं. पण याचा

अर्थ कांहीं असा नव्हे, कीं हे पुराणमतवादी लोक कोणालाही खरें स्वातंत्र्य आणि समता द्यायला तयार आहेत. जरा थोडा प्रयत्न केला, तर ही गोष्ट तेव्हांच उघड दिसून येण्यासारखी आहे. या मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यानें उलट खासगी मालमत्तेचें संरक्षणच केलेलें आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं सरदार लोकांची आणि धर्मपीठाची मालमत्ता जी खालसा करण्यांत आली, ती कांहीं खाजगी मालमत्ता नष्ट करण्याच्या हेतूनें नव्हे, तर सरंजामदारी आणि इतर प्रकारचे हक्क व सवलती यांच्या ठिकाणच्या दुसऱ्या कांहीं दोषांसाठीं. परंतु मालमत्ता धारण करण्याचा हक्क हा मात्र या जाहीरनाम्याप्रमाणें मोठा पवित्र आणि अनुल्लंघ्य असा हक्क ठरविण्यांत आलेला होता. अर्थात् तुला माहीत असेलच, कीं आजच्या पुरोगामी राजकीय विचारवंतांच्या मतें खासगी मालमत्ता हें एक प्रकारचें पाप आहे आणि शक्य तों ती नष्टच केली पाहिजे असें त्यांचें मत आहे.

मानवी हक्कांच्या जाहीरनाम्याचा हा मसुदा आजच्या काळच्या आपणा मंडळींना अगदींच सामान्य वाटण्याचा संभव आहे. काल मोठीं शौर्याचीं वाटणारीं ध्येयें हीं आज पुष्कळदां अगदींच सामान्य वाटत असतात. पण ज्या काळीं या जाहीरनाम्याची घोषणा करण्यांत आली त्या काळीं त्यामुळें साऱ्या यूरप खंडांतील जनतेचीं अंतःकरणें थरारून गेलीं आणि सर्व दलित आणि दीन लोकांना त्यामुळें आपल्याला पुढें चांगला काळ येणार अशी बरीचशी गोड आशा वाटूं लागली. अर्थात् राजाला हा जाहीरनामा बिलकुल पसंत पडला नाहीं; या विद्रोहकारक विचारांमुळें त्याचें मस्तक फिरून गेलें आणि त्या जाहीरनाम्याला मान्यता देण्याचें त्यानें नाकारलें. राजा या सुमारास अजून व्हर्सायं येथेंच राहात होता. याच वेळीं पॅरिसमधील गर्दीचा लोंढा स्त्रियांच्या पुढारीपणाखालीं व्हर्सायं येथें राजवाड्यात गेला; आणि लोकांनीं राजाला हा जाहीरनामा मंजूर करण्याला तर भाग पाडलेंच, परंतु शिवाय राजाला पॅरिस येथें जाण्याला भाग पाडलें. माझ्या गेल्या पत्राच्या अखेरीस एका विलक्षण मिरवणुकीचा उल्लेख मीं केला होता ना, तीच ही मिरवणूक.

असेंब्लीनें आणखी पुष्कळ उपयुक्त सुधारणा घडवून आणल्या. धर्मपीठाची सर्व प्रचंड मालमत्ता तिनें खालसा करून ती सरकारखातीं जमा केली. फ्रान्सची एक प्रकारची नवी वांटणी करून त्यांचीं ऐशीं खातीं म्हणजे जिल्हे पाडण्यांत आले. मला वाटतें, जिल्ह्यांची ही विभागणी आजही जशीच्या तशीच कायम आहे. जुन्या सरंजामदारांच्या घरच्या न्यायासनाऐवजीं दुसरीं चांगलीं न्यायासनें प्रस्थापित कररण्यांत आलीं. हें जें सगळें झालें त्यानें लोकांचें हित झालें हें खासच; परंतु त्यानें जेवढी व्हावी तेवढी कांहीं सुधारणा झाली नाहीं. शेतकरी लोक जमिनीसाठीं हपापले होते आणि शहरांतील सामान्य जनता जी भाकरीसाठीं धडपडत होती, तिला त्यांत विशेष कांहींच लाभ झाला नाहीं. या प्रश्नाच्या बाबतींत क्रांतीला पुढें पाऊल टाकतां येईनासें झालें असें दिसतें.

नॅशनल असेंब्लीमध्यें सामान्य जनतेचे, शेतकऱ्यांचे किंवा सर्वसामान्य लोकांचे कोणीच प्रतिनिधी नव्हते हें मीं मागें तुला सांगितलेंच आहे.

असेंब्लीवर सगळा शह होता मिराबोच्या नेतृत्वाखालील मध्यम वर्गीयांचा. आणि आपल्याला जें हवें होतें तें मिळालें असें दिसतांक्षणींच त्यांनीं क्रांतीचा गाडा पुढें चालविण्याचें बंद केलें.

एवढेंच नव्हे, तर खुद्द लुई राजाशीं संगनमत करून त्यांनीं खेडेगांवांतील शेतकरी लोकांवर गोळ्यासुद्धां घालण्यास सुरुवात केली. मध्यमवर्गीय पक्षाचा पुढारी मिराबो हा तर प्रत्यक्ष राजाचा गुप्त सल्लागार झाला आणि ज्या सामान्य लोकांनीं एवढा बॅस्टीलचा तुरुंग फोडून काचीज केला आणि आतां शृंखला तुटून पडून आपण स्वतंत्र झालों अशी गोड भावना ज्यांची झाली होती त्यांना आतां वाटूं लागलें, कीं हा काय चमत्कार झाला ! ज्या स्वातंत्र्यासाठीं आपण झगडलों, तें स्वातंत्र्य तर आपणांपासून अजून फार दूर पडलें आहे आणि नॅशनल असेंब्ली तर आपल्याला जुन्या काळच्या सरदार-जमीनदारांप्रमाणेंच दडपून टाकीत आहे हें त्यांच्या आतां प्रत्ययाला आलें.

फ्रेंच राज्यक्रांतीची खरी गुरुकिल्ली पॅरिसच्या जनतेच्या हातीं होती; नॅशनल असेंब्लीमध्यें जेव्हां त्यांचे प्रयत्न अशा रीतीनें फसले तेव्हा आपल्या क्रांतीच्या सामर्थ्याला बाहेर पडण्यासाठीं दुसरेंच एक साधन त्यांनीं शोधून काढलें. तें म्हणजे पॅरिस कम्यूनचें, म्हणजे पॅरिसच्या नगरसभेचें. या कम्यूनमध्येंच केवळ नव्हे, तर कम्यूनमध्यें सभासद निवडून पाठविणाऱ्या शहराच्या निरनिराळ्या विभागामध्येंही सामान्य जनतेशीं प्रत्यक्ष संबंध असणारी अशा प्रकारची एक जिवंत संघटना पॅरिसमध्यें या वेळीं अस्तित्वांत होती. या कम्यूननें आणि विशेषतः शहराच्या सर्व पोटविभागांनीं आतां क्रांतीचें निशाण आपल्या हातीं घेतलें आणि मध्यमवर्गीय आणि नेमस्त लोकांनीं भरलेल्या नॅशनल असेंब्लीच्या सत्तेला खो देण्याला ते उभे राहिले.

दरम्यान बॅस्टीलच्या पाडावाचा वर्षदिन आला. या दिवशीं म्हणजे १४ जुलै रोजीं, पॅरिसच्या लोकांनीं फार मोठा उत्सव केला. त्याला त्यांनीं संयुक्त राज्याचा उत्सव असें नांव दिलें. पॅरिसच्या लोकांनीं त्या दिवशीं शहर शृंगारण्यासाठीं विनावेतन काम केलें; कारण हा आपल्या घरचाच उत्सव आहे अशी त्याची भावना होती.

फ्रेंच राज्यक्रांतीची अशी ही अवस्था इ. स. १७९० व १७९१ या सालांच्या सुमारास होती. असेंब्लीचा क्रांतीचा उमाळा सगळा पार जिरून गेलेला होता आणि आतां झाले तेवढे फेरबदल आणि सुधारणा पुरे झाल्या, नवीन कांहीं नको, अशी त्यांची प्रवृत्ति झाली होती. परंतु पॅरिसच्या जनतेच्या अंतःकरणांतील क्रांतीचा उत्साह अजूनही सळसळत होता; शेतकरी समाज अजून आपली जमीन आपल्या कबजांत घेण्यासाठीं आशेनें डोळे लावून बसलेला होता. अशी ही परिस्थिति फार काळ टिकून राहणें शक्य नव्हतें. क्रांतीचें कार्य पुढें वाढून पुरें तरी व्हायला हवें होतें किंवा क्रांति पूर्ण दडपली जायला हवी होती. नेमस्तांचा पुढारी मिराबो हा १७९१ मध्यें मरण

पावला. राजाशीं जरी तो अंतस्थ कारस्थानें करीत होता, तरी लोकांमध्यें तो प्रिय होता आणि म्हणून लोकांना तो आवरून धरूं शकत होता. इ. स. १७९१ मध्यें जून २१ या दिवशीं एक प्रसंग असा घडला, कीं त्यामुळें क्रांतीचें भवितव्य काय हें निश्चित ठरून गेलें. हा प्रसंग म्हणजे लुई राजा आणि मेरी अँटोइनेट यांचा गुप्त वेषानें पळून जाण्याचा प्रयत्न. या प्रयत्नांत तीं दोघें जवळजवळ फ्रान्सच्या सरहद्दीपर्यंत जाऊनसुद्धां पोंचलीं होतीं. परंतु व्हर्ईनजवळ वारेन या गांवामध्यें शेतकऱ्यापैकीं कांहीं लोकांनीं त्यांना ओळखलें; त्यांना पुढें जाण्यास त्यांनीं अटकाव केला आणि त्यांना पॅरिस येथें परत आणण्यांत आलें.

या त्यांच्या कृत्यामुळें राजा व राणी यांच्या भवितव्याबद्दलचा निर्णय पॅरिसच्या जनतेच्या दृष्टीपुरता तरी ठरून गेला. प्रजासत्ताक राज्याची कल्पना आतां जोरानें वाढीस लागली. तरीपण नॅशनल असेंब्ली आणि तत्कालीन राज्यकर्ते हे इतके मवाळ होते आणि लोकांच्या भावनेपासून इतके अलग पडलेले होते, कीं लुई राजाला पदभ्रष्ट केलें पाहिजे अशी मागणी करणाऱ्या लोकांना अजूनही हे लोक गोळ्या घालून ठार करीतच होते. उदाहरणार्थ, मारत (फ्रेंचमध्यें मारा) हा क्रांतीच्या कार्यांतील एक श्रेष्ठ पुरुष होता. त्यानें राजाचा पलायनानंतर देशद्रोही म्हणून निषेध केला होता. त्यासाठीं त्यालाच पकडण्याकरितां या सरकारनें चोहोंकडे शोध चालविला होता. त्यामुळें त्याला पॅरिसच्या घाण सांडपाणी वाहून नेणाऱ्या रस्त्याखालच्या मोऱ्यांमध्यें लपून राहावें लागे; आणि त्यामुळें त्याला एक भयंकर कातडीचा रोगही जडला.

तरी सुद्धां चमत्कार असा, कीं लुई राजाचें राज्य तत्त्वतः तरी यानंतरही अजून एक वर्षभर चालू होतें. सप्टेंबर १७९१ मध्यें नॅशनल असेंब्लीची कारकीर्द आटोपून तिच्या जागीं एक लेजिस्लेटिव्ह असेंब्ली म्हणजे कायदेमंडळ आलें. हें मंडळही आपल्या पूर्वीच्या मंडळासारखें मवाळ होतें; त्यांतही वरिष्ठ वर्गाचेच तेवढे प्रतिनिधी होते. फ्रान्समध्यें संतप्त झालेला जो लोकसमाज होता, ज्याचा संताप अद्याप वाढतच होता, त्या समाजाचा प्रतिनिधि त्यामध्यें कोणीही नव्हता. परंतु क्रांतीचा हा संताप-ज्वर लोकांमध्यें वाढतच होता आणि सामान्य जनतेमधल्या लोकांचाच – अत्यंत तीव्र जहाल मंडळींचा – जो जॅकोबिन पक्ष होता त्याचें बळ वाढत चाललें होतें.

दरम्यान यूरप खंडांतील इतर राज्यसत्ता या सर्व विलक्षण घडामोडीकडे भयचकित वृत्तीनें पहात होत्या. तरीसुद्धां यापुढेही थोडा काळपर्यंत प्राशिया, ऑस्ट्रिया आणि रशिया यांनीं आपलें दुसरीकडे लूटमार करण्याचें कार्य चालूच ठेवलें होतें. हे तीन देश मिळून तिकडे पोलंडच्या प्राचीन राज्याची अखेर करण्याच्या खटपटींत होते; परंतु इकडे फ्रान्समधील परिस्थिति फारच चिघळत गेल्यामुळें त्यांना या बाजूला लक्ष देणें जरूर झालें. इ. स. १७९२ मध्यें फ्रान्सचें ऑस्ट्रिया व प्रशिया यांच्याशीं युद्ध जुंपलें. या ठिकाणीं मला हें सांगितलें पाहिजे तुला, कीं या सुमारास नेदरलंडमधील बेल्जमचा भाग ऑस्ट्रियाच्या ताब्यांत होता आणि बेल्जमची आणि फ्रान्सची सरहद्द एक होती.

परदेशाचीं सैन्यें या बाजूनें फ्रेंच मुलखांत शिरलीं आणि त्यानीं फ्रेंच सैन्याचा पराभव केला. तेव्हां लोकांना असें वाटलें, कीं राजाचें या परकी सैन्याशीं संधान असलें पाहिजे; आणि असें वाटण्यास लोकांना आधार नव्हता असें नव्हे. राजाच्या बाजूच्या सर्व लोकांनीं अशा रीतीनें विश्वासघात चालविला असला पाहिजे, असा आतां संशय माजला. अशीं हीं संकटें जेव्हां फ्रेंच जनतेच्या भोंवतीं वाढूं लागलीं, तसतशीं त्यांचीं डोकीं भडकत गेलीं आणि तोल सुटून जाऊन त्यांचा सगळाच गोंधळ झाला. जिकडे तिकडे त्यांना शत्रूचे हेर आणि विश्वासघातकी लोक डोळ्यांसमोर दिसूं लागले. अशा या आणीबाणीच्या प्रसंगीं पॅरिसच्या क्रांतिकारक प्रवृत्तीच्या कम्यूननें सूत्रें आपल्या हातांत घेतलीं. राजदरबारानें लोकांविरुद्ध उभारलेल्या बंडाचा बीमोड करण्यासाठीं लष्करी राज्य पुकारल्याची ग्वाही म्हणून कम्यूननें तांबडें निशाण फडकावलें आणि ऑगस्ट १०, १७९२ रोजीं राजाच्या राजवाड्यावर चालून जाण्याचा आपल्या सैनिकांना हुकूम केला. राजानें आपल्या स्विस संरक्षक सैन्याकरवीं गोळ्या घालून या हल्ला करणारांना ठार केलें.

परंतु अखेरीस जय कम्यूनचाच झाला आणि राजाला पदच्युत करून कैद करण्यास तिनें कायदेमंडळाला भाग पाडलें.

हें तांबडें निशाण आजकाल जगांतील सर्व कामगारांचें, समाजवादी लोकांचें आणि कम्यूनिस्ट लोकांचें निशाण झालेलें आहे हें आता सर्वांना ठाऊक आहे. पूर्वीच्या काळीं लोकांच्या विरुद्ध लष्करी कायदा पुकारल्याची ग्वाही म्हणून या निशाणाचा उपयोग करीत असत. माझी पक्की खात्री नाहीं, परंतु माझी अशी समजूत आहे, कीं लोकांच्या वतीनें असा या निशाणाचा उपयोग पॅरिसच्या कम्यूननें केला तोच पहिला; यापुढें मात्र हळूहळू हें तांबडें निशाण कामगारांचें निशाण म्हणून कायम होत गेलें.

राजाला पदच्युत करून आणि कैद करूनच लोकांचें समाधान झालें नाहीं. संरक्षक स्विस सैन्यानें लोकांपैकीं पुष्कळांना गोळ्या घालून ठार करण्याचें काम केलें होतें; त्यामुळें भडकून जाऊन, आणि हेरगिरी करणारे व देशद्रोही. विश्वासघातकी असे लोक जे होते त्यांच्याविषयींच्या संतापामुळें आणि भयामुळेंही पॅरिसच्या जनतेनें ज्यांचा ज्यांचा त्यांना संशय आला, त्यांना पकडून तुरुंग भरण्याचा धूमधडाका सुरू केला. पकडलेल्या लोकांपैकीं पुष्कळ लोक खरोखरच दोषी होते यांत कांहीं संशय नाहीं; परंतु कित्येक निरपराधी लोकांनाही पकडून तुरुंगामध्यें टाकण्यांत आलेलें होतें. कांहीं दिवसांनंतर लोकांमध्यें आणखी एक संतापाची आणि त्वेषाची लाट उसळली; तिच्यासरशीं लोकांनीं या कैद केलेल्या लोकांना बाहेर आणून त्यांच्यावर खटले करण्याचा फार्स केला आणि त्यांपैकीं बहुतेकांचा वध करून टाकला. "सप्टेंबर महिन्यांतील कत्तली" म्हणून म्हटल्या जाणाऱ्या या कत्तलींमध्यें एक हजारांहून अधिक माणसें प्राणांस मुकलीं. पॅरिसच्या जनतेला मोठ्या प्रमाणावर रक्तपाताचा हा पहिला

परिचय होता. परंतु त्यांची रक्ताची तहान पूर्ण भागण्यापूर्वी अजून पुष्कळ रक्ताचे पाट वाहावयाचे होते.

या सप्टेंबर महिन्यांतच ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्या फ्रान्सवर स्वारी करून आलेल्या सैन्यावर फ्रेंच सैन्याला पहिला विजय मिळाला. हा विजय वाल्मी येथील छोट्या लढाईत मिळाला.

लढाई म्हणून पाहिली तर ही फारच लहान होती. परंतु तिचे परिणाम फार मोठे झाले. या लढाईतील विजयामुळें फ्रेंच राज्यक्रांतीवरील संकटाचें निवारण झालें.

सप्टेंबर ११, १७९२ रोजीं नॅशनल कन्व्हेन्शनची पहिली बैठक भरली.

कायदेमंडळाच्या जागीं ही आतां एक नवीनच संस्था उदयास आली होती. आपल्या पूर्वीच्या दोन संस्थांच्या मानानें पाहतां या संस्थेनें पुष्कळच पुढचा सुधारणेचा पल्ला गांठला होता. तरी पण कम्यूनच्या मानानें पाहतां ही संस्था अजून मागासलेलीच होती. या कन्व्हेन्शननें पहिली गोष्ट कोणती केली असेल, तर प्रजासत्ताक राज्य जाहीर केलें.

यानंतर लौकरच लुई राजावरचा खटला चालला; त्यामध्यें त्याला देहान्ताची शिक्षा सांगण्यांत आली आणि राजा होण्याच्या पापाबद्दल त्याला २१ जानेवारी, १७९३ या दिवशीं आपल्या डोक्याचें प्रायश्चित्त द्यावें लागलें. त्याला गिलोटिन केलें असें म्हटलें जातें. म्हणजे काय तर गिलोटीन नांवाच्या सुरीखालीं त्याची मान कापण्यांत आली. [आतां या सुरीचा उपयोग छापखान्यांत कागद व पुस्तकाच्या कडा कापण्यासाठीं करतात.] अशा रीतीनें फ्रेंच जनतेनें आपला आणि राजशाहीचा किंवा पूर्वीच्या राजवटीचा संबंध पार धुऊन भाजून काढला. क्रांतीच्या मार्गावरील अखेरचें पाऊल टाकण्याचें धाडस करून यूरपमधील राजे आणि महाराजे यांच्या सत्तेचा त्यांनीं अधिक्षेप केला. आतां परत फिरण्याचा मार्ग त्यांना खुला नव्हता. आणि ज्या सुरीवरचें राजाचें रक्त अद्याप पुसलेलें नव्हतें, त्याच सुरीच्या बैठकीच्या पायरीवर उभा राहून समोर जमलेल्या गर्दीसमोर भाषण करून क्रांतिकालांतील एक महान् पुढारी डांटन यानें यूरपमधील बाकीच्या राजांना स्पष्टच आव्हान दिलें. तो मोठ्या आवेशानें ओरडून म्हणाला, "यूरपच्या राजे लोकांनीं आम्हांला लढाईचें आव्हान देण्याचें धाडस केलेलें आहे; उत्तरादाखल आम्ही त्यांना राजाचें हें मस्तक सादर करतों आहों!"

# १०२

# क्रांति आणि प्रतिक्रांति

*१३ ऑक्टोबर, १९३२*

अशा रीतीनें लुई राजाचा अंत झाला; परंतु त्याचा अंत होण्यापूर्वीच फ्रान्स देशामध्यें फार मोठा आश्चर्यकारक फरक घडून आला. क्रांतीच्या ज्वरानें त्या देशांतील लोकांचें रक्त नुसतें फणफणत होतें. त्यांच्या नसानसांत जोम उसळून राहिला होता आणि प्रज्वलित उत्साहानें त्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेतला होता. फ्रान्सचें प्रजासत्ताक राज्य चोहों बाजूंकडून उभ्या राहिलेल्या शत्रूंच्या विरुद्ध पाय रोवून संरक्षणासाठीं सज्ज होऊन उभें राहिलें होतें; बाकीचें सगळें यूरप खंड आणि तेथील राजशाह्या त्याच्या विरुद्ध उभ्या होत्या. या सर्व निःसत्त्व राजेरजवाड्यांना फ्रान्सचें प्रजासत्ताक राज्य हें स्वातंत्र्याच्या सूर्याच्या उन्हाची ऊब मिळालेले देशभक्त लोक कसे लढतात याचा प्रत्यय आणून देणार होतें. आपल्या स्वतःच्या नवीनच प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थच केवळ लढण्याचा त्यांचा उद्देश नव्हता; तर राजे लोक आणि सरदार-वर्ग यांनीं गांजलेल्या सर्व लोकांना स्वातंत्र्य मिळावें यासाठींही त्यांना लढावयाचें होतें. यूरपांतील सर्व राष्ट्रांना फ्रेंच लोकांनीं संदेश पाठविला, कीं तुम्ही आपापल्या राज्यकर्त्यांविरुद्ध बंड करून उठा; आम्ही सर्व ठिकाणच्या सामान्य जनतेचे मित्र आहोंत आणि सर्व प्रकारच्या राजशाही कारभाराचे शत्रु आहोंत. फ्रेंच लोकाच्या दृष्टीनें फ्रान्स देश–त्यांची पितृभूमि–हा आतां स्वातंत्र्याची जननीच झाला; तिच्या पूजनार्थ वाटेल तो त्याग करण्यांत त्यांना आनंद वाटूं लागला. अशा या त्यांच्या भयंकर उत्साहाच्या क्षणीं त्यांच्यामध्यें एक अत्यंत बहारदार गीत तयार झालें; हें गीत त्यांच्या ठिकाणच्या धगधगीत भावनांशीं संपूर्ण जुळतें असून त्यांमधून हें गीत गात गात आणि नाचत नाचत रणांगणावर जाण्याची, सर्व अडचणी ओलांडून जाण्याची, कसल्याही संकटाची पर्वा न करण्याची स्फूर्ति त्यांना मिळूं लागली. हें गीत म्हणजे **मार्सेलेज** या नांवानें प्रसिद्ध असलेलें, रूगे डी लिलेच्या ऱ्हाइन नदीवरच्या फ्रेंच सैन्यासाठीं लिहिलेलें रणगीत होय. आजही हेंच गीत फ्रान्सचें राष्ट्रगीत आहे.

### फ्रेंच राष्ट्रगीत ( मार्सेलेज )

पितृभूमीच्या बच्चांनो या
वैभवदिन आला जवळी !
विरुद्ध अपुल्या ठाकुनि राहत
रक्तपाति जुलुमाचा झेंडा
क्रूर, हिंस्र, उद्दाम शिपाई
तुम्ही ऐकतां घोंगावति ना
विशाल तुमच्या शेतभूमिवर ?

सरसावुनि समशेरी त्यांच्या
शस्त्रांच्या जबड्यांमधिं अपुल्या
दुष्ट धावती बळी घ्यावया
जिवलग अपुल्या मालकिणींचे
आणि पोटच्या मुलामुलींचे !
नागरिकांनो शस्त्र करीं घ्या
करा संघटित सैन्यदलें
चाल करुनि जा चाल तयांवर,
सारी अपुली जमीन भिजवा
अशुद्ध रक्तें सर्वांच्या या !
पितृभूमीच्या पुण्य प्रेमा !
मार्ग दाखवी बळ दे शस्त्रां
सूड घ्यावया आसावलिं जीं !
स्वतंत्रते प्रिय स्वतंत्रते करि
साथ तुझ्या रक्षणिं लढत्यांना !

अशा रीतीनें हे लोक राजे लोकांना दीर्घ आयुष्य मिळो अशा प्रकारचीं निरर्थक गीतें गात बसले नाहींत. त्याच्याऐवजीं मायभूमीबद्दलच्या पवित्र भक्तीनें भरलेलीं आणि स्वातंत्र्याबद्दलचीं, त्यांना अत्यंत प्रिय असलेल्या स्वातंत्र्याविषयींचीं गाणीं त्यांच्या जिभेवर नाचत होतीं.

क्रांतीच्या काळांत लोकांना भयंकर हाल सोसावे लागले. पुरेसें अन्न नव्हतें, पुरेशीं वस्त्रप्रावर्णें नव्हतीं; बूट, जोडे यांचा तर तुटवडा होताच; पण सैन्याजवळ पुरेशीं हत्यारेंसुद्धां नव्हतीं. कित्येक ठिकाणीं सैन्यासाठीं बूट, जोडे सामान्य नागरिकांकडून मागून घेण्यांत आले. सैन्याला ज्या प्रकारच्या अन्नाची गरज होती, परंतु जें त्यांना मिळूं शकत नव्हतें अशा पुष्कळ प्रकारचें अन्न फ्रेंच देशभक्तांनीं स्वतः होऊन सैन्याला पुरविलें. त्यासाठीं कित्येक लोक स्वतः पुष्कळसे दिवस उपासही करीत. कातडीं, स्वयंपाकाचीं भांडीं, तवे, बादल्या वगैरे नाना तऱ्हेच्या घरगुती वस्तू साऱ्या जमा करण्याचा सपाटा सुरू झाला आणि मग पॅरिसमध्यें रस्तोरस्तीं अनेक भट्ट्या उघडून त्यांत सामान्य लोक घण मारण्याचें काम करूं लागले; नागरिकांपैकीं पुरुषच नव्हे, तर स्त्रियासुद्धां त्या ठिकाणीं हत्यारें तयार करण्याच्या कामीं श्रम घेऊं लागल्या. हो, हाल तर पुष्कळच होत होते खरे; पण प्रत्यक्ष फ्रान्स, पितृभूमि, रकटीं पांघरलेली परंतु डोक्यावर स्वातंत्र्याचा मुकुट विराजत असलेली सुंदर फ्रेंच मायभू संकटांत असतांना, तिच्या दाराशीं शत्रु खडा असतांना, हालांची काय पर्वा? म्हणून फ्रान्समधील सारा तरुणवर्ग आपल्या मायभूच्या रक्षणार्थ धांवला आणि तहान व भूक यांची फिकीर न करतां शत्रूंवर चाल करून त्यांनीं विजय मिळविला. कार्लाइलनें लिहिलें आहे, "सर्वच्या सर्व जनतेच्या ठिकाणीं एकच एक अशी निष्ठा उत्पन्न झाल्याचें आपणांस क्वचितच आढळून येतें आणि जेथें कोठें ती आढळून येते तेथें ती

फक्त खाण्यापिण्याच्या आणि वापरण्यासवरण्याच्या जड वस्तूंवरच अशी निष्ठा सर्व लोकांची असलेली आढळते ; परंतु ज्या काळीं जनतेमध्यें अशा प्रकारची फ्रान्समधल्यासारखी निष्ठा उत्पन्न होते, त्या काळीं त्यांचा इतिहास अंतःकरण खळबळवून टाकणारा आणि प्रशंसनीय होतो." फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळच्या सर्व स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं अशी एका महान् कार्याबद्दलची निष्ठा जागृत झाली होती. त्या संस्मरणीय दिवसांत त्यांनीं जो इतिहास घडविला आणि स्वार्थत्यागपूर्वक ज्या हालअपेष्टा भोगल्या त्याच्या स्मरणानें आजहीं आपल्या अंतःकरणांत खळबळ माजते आणि आपली नाडी जलद चालूं लागते.

क्रांतिकारकांचें हें नव्या उमेदवारांचें सैन्य; त्याला पुरेशी कवाईतसुद्धां शिकायला सवड मिळालेली नव्हती; तरीपण याच सैन्यानें फ्रेंच भूमीवरून सर्व परदेशी सैन्याला हांकून काढलें आणि त्यानंतर नेदरलंडला ( बेल्जम्, हॉलंड वगैरे ) ऑस्ट्रियाच्या गुलामगिरींतून सोडविलें. या वेळीं मात्र हॅप्स्बर्ग घराण्याला नेदरलंडला कायमचा रामराम ठोकावा लागला. पुन्हां त्याचे पाय त्या भूमीला लागले नाहींत. यूरप खंडांतील शिकलेल्या धंदेवाईक सैन्याचासुद्धां या क्रांतिकारकांच्या नव्या उमेदवारांपुढें टिकाव लागेना. तो शिकलेला धंदेवाईक शिपाई केवळ पैशासाठीं आणि म्हणून आपला जीव राखून लढे.

क्रांतिकारकांचा नवा उमेदवार हा ध्येयप्राप्तीसाठीं लढत होता आणि म्हणून जयप्राप्तीसाठीं तो वाटेल तें दिव्य करावयाला तयार होता. धंदेवाईक शिपायांजवळ बाडबिछाइतीचें ओझें फार; त्यामुळें त्यांची हालचाल सावकाश व्हावयाची; तर क्रांतिकारकांच्या शिपायांजवळ सामानच जवळजवळ कांहीं नव्हतें, त्यामुळें तो इकडून तिकडे झपाट्यानें हालचाल करूं शके. अशा रीतीनें क्रांतिकारकांच्या सैन्याची ही एक नवीनच जात निर्माण झालेली असून त्यांनीं लढाईचेंही एक नवीनच तंत्र निर्माण केलेलें होतें. जुन्या लढाईच्या पद्धतींत या सैन्यानें पुष्कळच बदल केला ; यापुढें शंभर वर्षेपर्यंत यूरप खंडांत जीं सैन्यें निर्माण झालीं तीं सर्व कांहीं अंशीं फ्रेंच क्रांतिकारकांच्या या नव्या सैन्याच्या धर्तीवर निर्माण झालीं ; परंतु या त्यांच्या सैन्याचें खरें बल त्यांच्या उत्साहांत आणि साहसी वृत्तींत, बेडरपणांत सांठविलेलें होतें. या सैन्याचें ब्रीदवाक्य म्हणून नव्हे, तर या वेळच्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या सगळ्याच प्रवृत्तीचें प्रतीक म्हणून डांटनचें पुढील सुप्रसिद्ध वाक्य आपणांस सांगतां येईल :

'मातृभूमीच्या शत्रूंचा पराभव करण्यासाठीं आमच्या ठिकाणीं धैर्य–हिंमत–पाहिजे; अधिकाधिक हिंमत पाहिजे ; सदैव टिकणारी हिंमत पाहिजे ; धैर्य, अधिक धैर्य, अखेरपर्यंत टिकणारें धैर्य पाहिजे !.'

लढाई मात्र वाढतच चालली. इंग्लंडजवळ आरमार असल्यामुळें इंग्लंड देश हा फार प्रबळ शत्रु ठरला.

फ्रान्सच्या प्रजासत्ताक राज्यानें जमिनीवर लढणारें फार मोठें आणि बलवान्

सैन्य निर्माण केलेलें होतें; परंतु समुद्रावर अजून त्यांचा दम चालत नव्हता. इकडे इंग्लंडनें सगळ्या फ्रेंच बंदराची कोंडी करण्याच्या प्रयत्नाला सुरुवात केली.

दुसरी गोष्ट म्हणजे पळून गेलेले जे फ्रेंच लोक इंग्लंडमध्यें गर्दी करून राहिलेले होते त्यांनीं इंग्लंडमधूनच लाखों खोट्या असाइना, म्हणजे फ्रान्सच्या प्रजासत्ताक राज्याच्या चलनी नोटा, फ्रान्समध्यें पाठविण्याचा सपाटा सुरू केला. अशा रीतीनें फ्रेंचांची चलनपद्धति आणि सगळीच आर्थिक व्यवस्था नष्ट करून टाकण्याचा उद्योग त्यांनीं आरंभिला.

फ्रेंच लोकांच्यापुढें आतां परदेशांशीं करावी लागणारी लढाई, याशिवाय दुसरा विषय नव्हता. देशाची सगळी शक्ति या एका कामांत खर्ची पडत होती. अशा या लढाया क्रांतीच्या दृष्टीनें हानिकारक – धोक्याच्या – असतात; कारण यामुळें समाज-सुधारणेच्या प्रश्नांवरचें लक्ष निघून जाऊन तें सगळेंच परदेशी सैन्यांशीं लढण्यावरच तेवढें केंद्रित होतें आणि अशा रीतीनें क्रांतीचा जो खरा हेतु तोच फसल्यासारखा होतो. क्रांतीच्या ज्वराची जागा मग युद्धज्वर हा घेतो. फ्रान्समध्यें हाच प्रकार घडला आणि लौकरच आपणांस दिसेल कीं या प्रकारची अखेरची पायरी म्हणजे फ्रान्समध्यें एका महान् लष्करी अमलदाराची सर्वाधिकारशाही स्थापन झाली.

बाहेरच्या युद्धाच्या जोडीला अंतर्गत मानगडीही होत्याच. फ्रान्सच्या पश्चिम भागातील वेंडी प्रांतांत एक मोठें शेतकऱ्यांचें बंड उद्भवलें होतें; त्याचें कारण एक तर येथील शेतकऱ्यांची नवीन सैन्यामध्यें शिरण्याची इच्छा नव्हती आणि शिवाय राजपक्षाचे पुढारी आणि परदेशांत पळून गेलेले लोक यांचेही प्रयत्न या कामांत भरीला होतेच.

क्रांतीचीं सर्व सूत्रें आणि कार्यक्रम हा खरोखर सर्वच पॅरिसमधील फ्रेंच नागरिकांच्या हातांमध्यें होता.

शहरामध्यें हे जे फेरबदल झपाट्यानें घडून येत होते त्यांचा सगळा अर्थ अजून शेतकरी-वर्गाच्या लक्षांत नीटपणें येऊं लागलेला नव्हता; त्या मानानें ते मार्गेच पडत असत. वेंडीमधील हें बंड मोठ्या क्रूरपणानें दडपून टाकण्यांत आलें. युद्धाच्या काळीं विशेषतः आपापसांतील यादवीच्या काळीं मनुष्याच्या ठिकाणच्या वाइटांतल्या वाईट भावना जागृत होऊन प्रभावी झालेल्या असतात; त्याच्या ठिकाणची दयाबुद्धि दूर कोठें तरी रानोमाळ भटक्या मारीत हिंडत असते. तिला कोणीच कोठें थारा देत नाहीं. लिऑन्स बंदरांतही प्रति-क्रांतिकारकांचें एक बंड झालें. हेंही बंड मोडून काढलें गेलें. त्या वेळीं शिक्षा म्हणून लिऑन्ससारखें विशाल शहर नष्ट करून टाकावें असा विचार पुढें मांडण्यांत आला होता. "लिऑन्सनें स्वातंत्र्याच्या विरुद्ध युद्ध केलें; लिऑन्स शहर मरणच पावलें!" अशा घोषणा करण्यात आल्या होत्या. सुदैवानें हा विचार अमलांत आला नाहीं; परंतु पुढें लिऑन्स शहराला फारच हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या.

दरम्यान इकडे पॅरिसमध्यें काय घडामोडी चाललेल्या होत्या ? तेथें सत्ता कोणाच्या हातामध्यें होती ? नवीनच निवडून आलेली कम्यून (नगरसभा) आणि तिचे पोटविभाग यांचेंच वर्चस्व अजून साऱ्या शहरच्या कारभारावर होतें. नॅशनल कन्व्हेन्शनमध्यें निरनिराळ्या पक्षांमध्यें सत्तेसाठीं झटापट चालू होती. गिरोंदे-पक्षाचे म्हणजे प्रजासत्ताक-राज्यवादी मवाळ लोक आणि जॅकोबिन् पक्षाचे प्रजासत्ताकराज्यवादीच पण जहाल लोक यांचे हे पक्ष त्यांमध्यें विशेष प्रमुख होते. यांमध्यें जॅकोबिन् पक्षाचा जय होऊन जून १७९३ च्या सुरुवातीला गिरोंदे-पक्षाच्या बहुतेक सभासदांची कन्व्हेन्शनमधून हकालपट्टी झाली. यानंतर आतां सरंजामदारांचे, जमीनमालकांचे सर्व हक्क व सवलती काढून घेण्याचा अखेरचा टप्पा गांठला गेला आणि जमीनदारांच्या मालकीची सर्व जमीन काढून घेऊन ती स्थानिक कम्यून्सच्या अथवा लोकसभांच्या स्वाधीन करण्यांत आली; म्हणजे काय तर जमीन आतां सामुदायिक मालकीची करण्यांत आली.

जॅकोबिन् पक्षाच्या वर्चस्वाखालीं आलेल्या कन्व्हेन्शननें यानंतर मग दोन समित्या स्थापन केल्या; एक सार्वजनिक हितकारक समिति व दुसरी सार्वजनिक संरक्षक-समिति. या समित्यांच्या हातीं कम्यून्सनें फार मोठी सत्ता दिलेली होती. या दोन्ही समित्या फार बलिष्ठ झाल्या; त्यांमध्येंही सार्वजनिक संरक्षक-समितीचें बळ तर फारच वाढलें आणि सगळ्यांना तिची भीति वाटूं लागली. या समितीनें कन्व्हेन्शनला एकेक पायरी रेटीत रेटीत नेऊन अखेरीस राज्यक्रांतीचें रूपातर अत्यंत भयंकर अशा अत्याचारी वावटळींत केलें.

जनतेच्या मनावरची भीतीची पकड अद्यापिही कमी झालेली नव्हती; सभोंवतीं घेरा घालून बसलेल्या परदेशच्या सैन्याची भीति तर त्यांना होतीच; पण त्याचप्रमाणें हेरांची आणि विश्वासघातकी लोकांचीही भीति होती; यांची संख्याही फारच मोठी होती.

भीतीमुळें मनुष्य आंधळा होतो, बेभान होतो; त्यामुळें कन्व्हेन्शननेंही या एकसारख्या ग्रासून राहिलेल्या भीतीच्या भुताला बळी पडून १७९३ च्या सप्टेंबर महिन्यामध्यें एक अत्यंत भयंकर कायदा केला. हा कायदा म्हणजे संशयित लोकां-संबंधींचा कायदा. या कायद्यामुळें आतां कोणाही संशयित माणसाचें जीवन सुरक्षित राहिलें नाहीं आणि ज्यांच्याविषयीं संशय येणार नाहीं अशा व्यक्ती तरी कोण सांपडणार होत्या ? यानंतर एक महिन्यानेंच गिरोंदे पक्षाच्या बावीस सभासदांचा खटला क्रांतिकारकांच्या न्यायासनापुढें चालला आणि ताबडतोब त्यांना देहांताची सजा देण्यांत आली.

अशा रीतीनें ही अत्याचारी वावटळ सुरू झाली. रोजच्या रोज ज्यांना देहान्ताची शिक्षा झालेली आहे अशा लोकांचा प्रवास गिलोटिनच्या सुरीकडे होऊं लागला. रोजच्या रोज या बळी जाणाऱ्या लोकांनीं भरलेल्या गाड्या—त्यांना टंब्रिल्स म्हणत असत—पॅरिसच्या खडबडीत दगडी रस्त्यावरून ओझ्याखालीं कचकच करीत आणि

धडधडत जाऊं लागल्या. रस्त्यांतील लोक बिचारे या लोकांना वाटेल त्या प्रकारें वांकुल्या दाखवीत असत.

कन्व्हेन्शनमध्यें सत्ताधारी गटाविरुद्ध ब्र काढणें हें सुद्धां आतां धोक्याचें होऊन बसलें; कारण असें केलें कीं बोलणारा मनुष्य झालाच संशयित इसम; संशयांतून पुढें खटला आणि खटल्यांतून पुढें गिलोटिनची सुरी हा क्रम ठरलेलाच.

सार्वजनिक-हित-समिति आणि सार्वजनिक-संरक्षण-समिति यांच्याच हातांत आतां कन्व्हेन्शनचा सगळा कारभार आलेला होता. या समितींच्या हातीं आतां कोणाला जिवंत ठेवावें आणि कोणाचा जीव घ्यावा अशा प्रकारची सगळी सत्ता आलेली असून त्यांत इतर कोणालाही एवढासा सुद्धां हिस्सा देण्याची त्यांची तयारी नव्हती. त्याचा पॅरिसच्या कम्यूनलासुद्धां विरोध सुरू झाला; जो कोणी त्यांच्याशीं सहमत नसेल त्याला विरोध करावयाचा, असाच खरोखर त्यांचा क्रम चालू झाला. सत्तेच्या ठिकाणीं मनुष्याचें मन दुष्ट बनविण्याची फार विलक्षण शक्ति असते. तेव्हां आतां या समित्यांनीं जी पॅरिसची कम्यून आपल्या पोटविभागांसह आजपर्यंत क्रांतीचा कणाच जणुं होती त्या कम्यूनलाच नष्ट करून टाकण्याचा उद्योग आरंभिला. प्रथम त्यांनीं पोटविभाग चुरडून टाकून कम्यूनचे आधारस्तंभ नष्ट केले. आणि अखेरीस कम्यूनवरही तोच प्रसंग आणला. अशा रीतीनें पुष्कळदां क्रांति आपल्या स्वतःलाच खाऊन टाकतांना आढळते. पॅरिसच्या निरनिराळ्या भागांतील कम्यूनचे हे पोटविभाग म्हणजे जनता आणि वरचे सत्ताधारी लोक यांचा संबंध आणून तो टिकवणारे जणुं दुवेच होते. हे पोटविभाग म्हणजे जणुं ज्यांमधून क्रांतीच्या शरीरांत तांबडें रक्त वाहात होतें अशा रक्तवाहिन्याच होत्या; त्यांमधूनच क्रांतीला शक्ति आणि जीवन प्राप्त होत होतें. १७९४ च्या आरंभीं अशा या पोटविभागांचा आणि कम्यूनचाही जो नाश करण्यांत आला त्यामुळें हा जीवनप्रवाहच बंद केल्यासारखें झालें.

यापुढें नॅशनल कन्व्हेन्शन आणि या पोटसमित्या या संस्था वरच्या राज्यकर्त्यांच्या हातांतील यंत्रें होऊन राहिल्या; त्यांचा लोकसमाजाशीं जिवंत संबंध शिल्लक राहिला नाहीं; सत्ता हातांत आलेले सर्वच लोक करतात त्याप्रमाणें या समित्यांनीं लोकांवर आपली इच्छा जबरदस्तीच्या अत्याचारी मार्गानें लादण्याचा क्रम सुरू केला. अशा रीतीनें खऱ्या क्रांतिकाळाचा अंत होण्याच्या कार्याची सुरुवात झाली. आणखी एक सहा महिनेपर्यंत या समित्यांची ही अत्याचारी वावटळ चालू राहायची होती आणि क्रांतीचा गाडा कसा तरी रखडत पुढें चालावयाचा होता; परंतु तिचा अखेरचा क्षण आतां दिसायला लागला होता.

या सगळ्या धामधुमीच्या आणि वावटळीच्या काळांत फ्रान्समध्यें आणि पॅरिसमध्यें पुढारी लोक कोण कोण होते? पुष्कळच नांवें प्रामुख्यानें डोळ्यांपुढें उभीं राहतात. उदाहरणार्थ, कॅमिल डेस्मोलिन (कामील डेमोले) हा गृहस्थ घे. यानेंच पुढें होऊन १७८९ मध्यें बॅस्टीलच्या तुरुंगावर हल्ला चढविला आणि इतरही पुष्कळ

प्रसंगीं फार लक्षांत राहण्यासारखी कामगिरी केली. अत्याचारी वावटळीच्या काळामध्यें सरकारी धोरण दयाळूपणाचें असावें असा त्याचा आग्रह होता; परंतु त्यापुळेंच म्हणा, तो स्वतःच गिलोटीनला बळी पडला आणि थोड्याच दिवसांत त्याची तरुण पत्नी ल्यूसिल हिलाही तोच मार्ग पत्करावा लागला; त्याच्यामागें जिवंत राहण्याऐवजीं तिनें मरणच अधिक पसंत केलें. फेबर डेग्लांटिन नांवाचा कवि आणि ज्याच्यामुळें लोकांच्या अंतःकरणाचा थरकांप उडत असे असा सरकारी वकील फूक्ये टिनव्हील यांचींही नांवें लक्षात ठेवण्यासारखीं आहेत. मॅरट ( मारा झां पाउल ) हा या क्रांतीच्या काळच्या कर्तबगार लोकांमध्यें सर्वांत अधिक कर्तबगार आणि सर्वांत अधिक श्रेष्ठ दर्जाचा मनुष्य होता असें म्हटलें तरी चालेल; शार्लट कॉर्डे नांवाच्या एका तरुण मुलीनें सुरा भोंसकून त्याला ठार केलें. डान्टनचा तर यापूर्वी दोन वेळां मी उल्लेख केला आहे; हा मोठा शूर, सिंहासारखा लढवय्या होता; श्रेष्ठ दर्जाचा आणि लोकप्रिय वक्ता होता; तरीपण शेवटीं गिलोटिनची सुरी त्याच्याही कपाळची चुकली नाहींच. राब्सपियरचें नांव या सर्वांत अधिक लोकप्रसिद्ध आहे. जॅकोबिन पक्षाचा हा पुढारी असून त्या अत्याचारी वावटळीच्या दिवसांत कन्व्हेन्शनचा जणुं तो सर्वाधिकारीच होता. इतिहासांत या अत्याचारी वावटळीचें जणुं तो मूर्तिमंत प्रतीकच होऊन राहिलेला असून त्याचें नांव घेतांच कित्येकांच्या अंगाचा थरकांप होतो, किळस येते; तरीपण या माणसाच्या प्रामाणिकपणाबद्दल आणि देशभक्तीबद्दल बिलकुल वाद नाहीं. त्याची "कसल्याही लांचलुचपतीला किंवा वजनाला, किंवा विलासांना बळी न पडणारा", "अभेद्य" अशी ख्याति होती. त्याचो स्वतःची राहणीही अतिशयच साधी होती; परंतु त्याला स्वतःच्या पलीकडे जवळजवळ दुसरें जगच माहीत नव्हतें; इतका तो सर्वस्वीं आत्मनिष्ठ होता आणि स्वतःहून ज्याचें थोडेसुद्धां मत निराळें असेल तो प्रत्येक मनुष्य फ्रान्सच्या प्रजासत्ताक राज्याचा आणि क्रांतीचा द्रोही होय, अशीच जणुं त्याची भावना होती. क्रातीच्या कार्यांत त्याचे सहकारी असलेले कित्येक श्रेष्ठ पुरुष त्याच्याच आज्ञेवरून गिलोटिनखालीं गेले; शेवटीं या प्रकाराचा इतका कळस झाला, कीं जी कन्व्हेन्शन आतांपर्यंत इतकी मेंढरासारखी त्याच्या पावलावर पाऊल टाकून जायला तयार होती, तीच कन्व्हेन्शन त्याच्यावर उलटली. तिनें त्याला जुलमी आणि अनियंत्रित राज्यकर्ता असें ठरविलें आणि त्याचा व त्याच्याबरोबरच त्याच्या अनियंत्रित कारभाराचा अंत केला.

क्रांतीचे हे सर्व पुढारी अगदीं तरुण वयाचे होते. म्हाताऱ्या लोकांच्या हातून क्रांत्या क्वचितच घडून येत असतात. हे सर्व पुढारी फार महत्त्वाचे लोक होते हें जरी खरें असलें, तरी त्यांपैकीं कोणाही एका व्यक्तीच्या हातांत, प्रत्यक्ष राब्सपियरच्या हातांत सुद्धां, क्रांतीच्या या महान् प्रयोगाचीं सर्व सूत्रें नव्हतीं. फार कशाला, घडून आलेल्या क्रांतीचेंच खरोखर त्याना भय वाटून तिच्या कचाट्यांतून निसटण्यासाठीं जणुं ते आपलें अंग चोरीत होते; क्रांति ही त्यांनीं घडवून तर आणलीच नव्हती,

परंतु क्रांतीच्या पुढील कार्यक्रमाचीं सूत्रें सुद्धां त्यांच्या हातामध्यें नव्हतीं. इतिहासामध्यें पुष्कळदां जे निव्वळ सृष्टिक्रमानुसार मानवी भूकंप किंवा उत्पात घडून येत असतात तसला एक उत्पात म्हणजे ही फ्रेंच राज्यक्रांति होती; अर्थात् असा हा उत्पात घडून येण्यापूर्वी दीर्घकालपर्यंत टिकून राहणारी दैन्यावस्था आणि अनियंत्रित राज्यसत्ता यांच्यामुळें आणि सामाजिक परिस्थितीमुळेंही हळूहळू केव्हां तरी असा हा भडका उडाल्यावांचून सुटका नाहीं अशा प्रकारची पूर्वतयारी व्हावी लागत असते.

कन्व्हेन्शननें आपसांतील तंटे आणि गिलोटिन सुरी चालविणें याहून दुसरें कांहीं केलेंच नाहीं अशी मात्र कल्पना करून घेऊं नको. खऱ्या क्रांतीमधून प्रस्फुरित झालेली शक्ति ही नेहमींच फार मोठी असते. अर्थात् यापैकीं पुष्कळशी शक्ति परकीय देशांशीं लढण्यांत खर्च झाली हें खरें; परंतु तरीही जी शिल्लक राहिली ती कांहीं थोडीथोडकी नव्हती. या शक्तीच्या बळावर पुष्कळच विधायक कार्य करण्यांत आलें. यामध्यें विशेष म्हणजे राष्ट्रांतील शिक्षणाच्या सर्व पद्धतीमध्येंच आमूलाग्र सुधारणा करण्यात आली. आज शाळेंत सर्व मुलें शिकतात तीं मोजमापाची मेट्रिक (दशमान) पद्धति याच वेळीं सुरू करण्यांत आली. या पद्धतीमुळें वजनामापाचें कितीही लहानमोठें काम अगदीं सुलभपणें करण्याची सोय झाली. सुधारलेल्या जगामध्यें आज जवळजवळ सर्वत्र या पद्धतीचा स्वीकार करण्यांत आलेला आहे. पुराणमतवादी इंग्लंड देश मात्र अजूनही आपल्या जुन्यापुराण्या अवजड अशा यार्ड, फर्लांग, पौंड आणि हंड्रेडवेट या व असल्या वजनामापानाच चिकटून राहिलेला आहे. आपल्या हिंदुस्थानमध्येंही या गुंतागुंतीच्या वजनामापाचेंच ओझें वाहावें लागत आहे; आणखी त्यांत भर घालावयाला आमचीं देशी शेर, मण वगैरे मापें आहेतच.

मोजमापांची ही नवी मेट्रिक पद्धति जशी सुरू झाली, त्याच विचारसरणीचा परिणाम म्हणून नवीन कालगणनेसही सुरुवात याच वेळीं झाली. २२ सप्टेंबर १७९२ रोजीं प्रजासत्ताक राज्याची घोषणा करण्यांत आली. आठवडा सात दिवसांचा होता तो आतां दहा दिवसांचा करण्यांत आला; दहावा दिवस हा सुटीचा दिवस ठरला. महिने मात्र अजून बाराच शिल्लक राहिले; परंतु त्यांचीं नांवें मात्र बदलण्यात आलीं. फेबर डेग्लांटिन या कवीनें बदलत्या ऋतुमानाला आणि हंगामाना अनुसरून नवीं मोठीं मधुर नांवें या महिन्यांना दिलीं. वसंत ऋतूंतील तीन महिन्यांना त्यानें **जर्मिनल** (अंकुरक), **फ्लोरिअल** (पुष्पक) व **प्रायेरियल** (शस्यक) अशीं नांवें दिलीं. उन्हाळ्याच्या तीन महिन्यांना मेसिडॉर (कापणीचा महिना), थर्मिडॉर (ग्रीष्म) आणि फ्रुक्टिडॉर (फलमास) हीं नांवें मिळालीं; व्हेंडेमायेर (द्राक्षारसमास), ब्रूमायेर (धुक्याचा महिना) व फ्रीमायेर (हिममास) हे तीन महिने मिळून शारदीय काळ झाला आणि निव्होस (बर्फाचा), फ्लुव्हिओज (वर्षामास) व व्हेटोज (वादळी महिना) हे तीन महिने मिळून हिंवाळा. ही कालगणना प्रजासत्ताक राज्याच्यामागें कांहीं फार दिवस टिकली नाहीं.

क्रांतीच्या या दिवसांत एकदा ख्रिस्ती धर्माविरुद्ध आणि बुद्धिवादाचीच प्रतिष्ठापना करण्यासाठीं म्हणून जोराची चळवळ उद्भवली होती. सत्याचीं मंदिरें बांधण्यांत आलीं. पॅरिस शहरांतून अंतर्गत प्रांतांतही ही चळवळ मोठ्या झपाट्यानें पसरत गेली. १७९३ च्या नवंबर महिन्यांत पॅरिस येथें नॉट्रेडेम कॅथीड्रलमध्यें स्वतंत्रता आणि बुद्धि यांना देवता कल्पून त्यांचा मोठा उत्सव करण्यांत आला. या प्रसंगीं एका सुंदर स्त्रीला बुद्धीची भूमिका देण्यांत आलेली होती; पण या असल्या बाबतींत राब्सपियर हा अगदींच जुन्या मतांचा होता. त्याला ही चळवळ पसंत नव्हती. त्याचप्रमाणें डांटनलाही ती पसंत नव्हती. जॅकोबिन पक्षाच्या हातामधील सार्वजनिक हितसमितीचाही या चळवळीला विरोधच होता. यामुळें या चळवळीचे पुढारी गिलोटिनला बळी देण्यांत आले. स्वतंत्रता व बुद्धि यांच्या या उत्सवाला तोडीस तोड म्हणून राब्सपियरनें दुसरा एक परमेश्वराचा उत्सव म्हणून घडवून आणला. कन्व्हेन्शनमध्यें मतें घेऊन असें ठरविण्यांत आलें, कीं फ्रान्स देशाची परमेश्वरावर श्रद्धा आहे! त्यामुळें रोमन कॅथॉलिक धर्मानें हळूच फिरून एकदां आपला शिरकाव करून घेतला व पुन्हां एकदा त्याची चलती सुरू झाली.

पॅरिसची पोटविभागमंडळें आणि पॅरिसची कम्यून यांचा नाश केल्यानंतर प्रकरण लौकरच हातघाईवर आलें. जॅकोबिन पक्षाला आतां कोणी प्रतिस्पर्धी शिल्लक राहिलेला नव्हता. साऱ्या राज्यव्यवस्थेचा ताबा त्यांच्या हातीं आलेला होता; परंतु लौकरच त्यांच्या पक्षांतच तंटे उद्भवले. स्वतंत्रता आणि बुद्धिवाद यांच्या उत्सवामध्यें भाग घेतल्याबद्दल हेबर्ट आणि त्यांचे पाठिराखे यांचा गिलोटीनखालीं वध करण्यांत आला त्या वेळेपासून जॅकोबिन पार्टीमध्यें पहिली फार मोठी फूट पडली. यानंतर पाठोपाठच फेबर डेग्लांटीन गिलोटीनला बळी पडला आणि १७९४ च्या प्रारंभाला डांटन, कॅमिल डेस्मोलिन यांनीं आणि इतर कांहीं जणांनीं राब्सपियर हा गिलोटीनखालीं वाजवीपेक्षां फार जास्त माणसें पाठवितो अशी तक्रार केली. तेव्हां त्यांचींच डोकीं उडविण्यांत आलीं. लोक कदाचित् कांहीं मध्यैंच अडथळा करतील या भीतीनें एप्रिल १७९४ मध्यें डांटनचा वध जेव्हां अगदींच घाईघाईमध्यें उरकून टाकण्यांत आला, तेव्हांच पॅरिसमधील आणि अंतर्गत भागांतील पण जनता समजली, कीं क्रांतीचें दिवस संपले. त्यांनीं ओळखलें, कीं क्रांतीचा सिंह पडला आणि एका क्षुद्रबुद्धि गटाच्या हातीं सगळी सत्ता आली. या गटाच्या भोंवतीं शत्रूंचें जाळें पसरलेलें होतें; सामान्य जनतेशीं त्याचा संबंध तुटून गेलेला होता; त्यामुळें या गटाला आपल्या डोळ्यांपुढें जिकडे तिकडे देशद्रोहाचें भूत नाचतांना दिसे आणि अत्याचाराची ती वावटळ अधिकच तीव्र करण्याविना स्वसंरक्षणाचा दुसरा कांहींच मार्ग या गटाला राहिला नाहीं.

म्हणून ती अत्याचाराची वावटळ अधिकच भयंकर वाढली आणि गिलोटीनकडे बळी धावयाचीं माणसें घेऊन जाणाऱ्या टंब्रिल गाड्या पूर्वीपेक्षांही अधिक खच्चून

भरून येऊं लागल्या. जून महिन्यांत आणखी एक कायदा करण्यांत आला. त्याच नाव प्राएरिअल महिन्याच्या बाविसाव्या तारखेचा कायदा. लोकांमध्यें फूट पाडण्याच्या हेतूनें किंवा खळबळ माजविण्याच्या हेतूनें, लोकांचा धीर व नीतिमत्ता बिघडविण्याच्या हेतूनें अगर लोकांची सदसद्विवेकबुद्धि खची करण्याच्या हेतूनें खोट्या बातम्या पसरविणें हा या कायद्यान्वयें गुन्हा ठरवून त्याला फांशीची शिक्षा मुकर करण्यांत आली. राब्सपिअर आणि त्याचे खुनी साथीदार यांच्याशीं ज्या कोणाचा मतभेद होईल त्याला सहज पकडण्याजोगें या कायद्याचें हें जाळें मोठें विशाल होतें. या कायद्याखालीं पुष्कळशा लोकांचा खटला एकाच वेळीं चालविण्यांत येई व त्या सगळ्याना शिक्षा देण्यांत येत. एकदां राजपक्षीय व इतर निरनिराळ्या प्रवृत्तींच्या १५० आरोपींना एकाच खटल्यांत गोंवून काम चालविण्यांत आल्याचा दाखला सांपडतो.

ही अत्याचाराची ताजी वावटळ सेहेचाळीस दिवसपर्यंत चालू राहिली. शेवटीं थर्मिडॉर महिन्याच्या नवव्या तारखे दिवशींच्या (२७ जुलै १७९४) स्क्रूचा पेंच उलटा फिरूं लागला, चक्र पालटलें. कन्व्हेन्शन राब्सपिअर व त्याचे साथीदार यांच्यावरच एकाएकीं उलटली आणि "जुलमी राज्यकारभार करणाऱ्यांचा निःपात असो" अशी घोषणा करून त्यांनीं त्या सर्वांना पकडलें. राब्सपिअरला त्यांनीं भाषण करायलासुद्धां परवानगी दिली नाहीं. ज्या गिलोटीनकडे राब्सपिअरनें इतक्या असंख्य लोकांना आतांपर्यंत पाठविलें होतें, त्याच गिलोटीनपाशीं टंब्रिलमधूनच दुसऱ्याच दिवशीं राब्सपिअरला नेण्यांत आलें आणि अशा रीतीनें फ्रेंच राज्यक्रांतीची अखेर झाली!

राब्सपिअरच्या मृत्यूनंतर प्रतिक्रांतीचा झपाटा सुरू झाला. मवाळ लोक आतां पुन्हां पुढें आले; या लोकांनीं आतां आपल्या बाजूनें जॅकोबिन पक्षीयांवर हल्ला चढविला आणि त्यांचा कांटा काढण्याला सुरुवात केली. तांबड्या प्रलयानंतर ज्याला पांढरा प्रलय म्हणतात तो आतां सुरू झाला. यानंतर पंधरा महिन्यानीं १७९५ च्या ऑक्टोबर महिन्यांत कन्व्हेन्शनची इतिश्री होऊन पांच लोकांच्या डायरेक्टोरेटच्या—संचालक मंडळाच्या—हातीं राज्य आलें. हें राज्य म्हणजे अगदीं निखालस धनिक मध्यम वर्गाचें राज्य होतें; या राज्यानें सामान्य जननेला दडपून टाकण्याचा स्वाभाविकपणेंच प्रयत्न केला. या डायरेक्टोरेटचें राज्य फ्रान्सवर सुमारें चार-सव्वाचार वर्षें चाललें. इतक्या या अंतर्गत कटकटी आणि भानगडी चालू होत्या तरी फ्रान्सच्या प्रजासत्ताक राज्याची शक्ति आणि प्रतिष्ठा अजूनही इतकी बलवत्तर होती, कीं परदेशामध्यें या प्रजासत्ताक राज्याची लढाई विजयीच होत होती. या राज्याविरुद्ध प्रत्यक्ष कांहीं बंडेंही उद्भवलीं होतीं, पण तीं सर्व मोडून काढण्यांत आलीं. अशा या बंडांपैकीं एक बंड प्रजासत्ताक राज्याचा एक तरुण लष्करी अम्मलदार नेपोलियन बोनापार्ट यानें मोडून काढलें. त्यानें प्रत्यक्ष पॅरिसच्या जनतेवर गोळ्या घालून पुष्कळांना ठार करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. याच गोळीबाराला कुलुपी गोळ्यांची फैर अथवा झपाटा (Whiff of grapeshot) असें प्रसिद्ध नांव आहे. अशा रीतीनें प्रत्यक्ष कालच्या क्रांतींतून

निर्माण झालेल्या सैन्याचाच उपयोग जेव्हां आज फ्रान्सच्याच जनतेला ठार करण्याच्या कामीं करतां येऊं लागला, तेव्हां आतां फ्रान्समध्यें क्रांतीची छाया सुद्धां शिल्लक राहिली नाहीं हें अगदीं उघड झालें.

अशा रीतीनें क्रांतीचा सगळा ग्रंथ आटोपला आणि त्याचबरोबर ध्येयवादी लोकांचीं कितीएक सुखस्वप्नें आणि गरिबांच्या पुष्कळशा गोड आशाही विलयाला गेल्या. तरी पण जें करण्यासाठीं क्रांतीचें पाऊल पुढें टाकण्यांत आलेलें होतें, त्यांपैकीं पुष्कळशा गोष्टी क्रांतीनें पुऱ्या केल्या होत्या; कारण प्रतिक्रांति कसल्याही प्रकारची झाली तरी तिला पुन्हां भूदासांची गुलामगिरी सुरू करतां आली नाहीं; त्याचप्रमाणें पुढें फ्रेंच राजघराणें–जें बुर्बोन राजघराणें–त्यांतील राजे परत गादीवर आल्यानंतर सुद्धां त्यानाही जी जमीन शेतकरी लोकांत वांटून टाकण्यांत आली होती ती परत घेतां आली नाहीं. पूर्वीच्या कोणत्याही काळापेक्षां सामान्य माणसाची परिस्थिति खास पुष्कळ सुधारेलली होती. मग तो मनुष्य शहरामधील असो किंवा खेडेगांवामधील असो. फार कशाला, पण प्रत्यक्ष त्या अत्याचारी प्रलयाच्या काळीं सुद्धां राज्यक्रांतीच्या पूर्वीच्या काळापेक्षां जनता अधिक सुखी होती. कारण या प्रलयाचा खरा रोख कांहीं त्यांच्याविरुद्ध नव्हता. हा रोख सगळा वरिष्ठ वर्गीयांच्या विरुद्ध होता. तथापि शेवटीं शेवटीं थोडे गरीब लोकही या प्रलयाला बळी पडले हें खरेंच.

क्रांतीचा पाडाव झाला; परंतु प्रजासत्ताक राज्याची कल्पना मात्र साऱ्या यूरप खंडभर पसरली आणि त्या कल्पनेबरोबरच मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यांतील जाहीर केलेल्या तत्त्वांचाही प्रसार आपोआपच होत गेला.

## १०३

## राज्यकर्त्यांच्या वागण्याच्या पद्धती

२७ ऑक्टोबर, १९३२

गेल्या दोन आठवड्यांत मीं कांहींच लिहिलें नाहीं. मला वाटतें आळशी होत चाललों आहें मी. जी गोष्ट सांगायला घेतली होती मीं, ती संपायला आली आहे म्हणून कशाला संपवून टाका सगळीच गोष्ट एकाएकीं, अशा कल्पनेनेंही कदाचित् मी रेंगाळत असेन. अठराव्या शतकाच्या अखेरीस तर आपण केव्हांच येऊन पोंचलों आहों. पुढच्या शंभर वर्षांचें निरीक्षण करायची आपली तयारी झालेली आहे. तीं शंभर वर्षें संपलीं म्हणजे मग थेट आपल्या आजच्या काळापर्यंत पोंचावयाला काय तीं बत्तीसच वर्षें आपल्याला राहतील. परंतु हीं एकशेबत्तीस वर्षें जरी थोडींशीं वाटत असलीं, तरी त्यांच्याबद्दल सांगायला लागणार आहे किती तरी. हा काळ आपल्या

अगदीं जवळचा असल्यामुळें स्वाभाविकच तो आपल्याला मोठा आहेसें भासतें, आपली सारी बुद्धि त्यामध्यें रंगून जाते आणि पूर्वीच्या काळच्या इतिहासापेक्षां हा इतिहास आपल्याला फारच जास्त महत्त्वाचा वाटतो. आज आपण आपल्याभोंवतीं पाहतों त्यांपैकीं पुष्कळशा गोष्टींचें मूळ या काळामध्यें आहे. या गेल्या शतकांत आणि त्यापुढच्या थोड्या काळांत ज्या कांहीं घडामोडी घडून आल्या त्यांच्या त्या गर्द रानांतून मार्ग काढीत सगळ्या प्रदेशाचें तुला दर्शन करवीत जाणें ही गोष्ट खरोखर मला चांगलीच जड जाणार आहे असें दिसतें. त्यामुळेंही कदाचित् माझें मन पुढें जायला थोडेंसें भीत असेल. तसाच मला हाही मोठा विचार पडतो, कीं समजा, मीं ही मानवाची गोष्ट इ. स. १९३२ पर्यंत आणून भिडविली, भूतकाळची सगळी गोष्ट संपून ती वर्तमानकाळांत येऊन थांबली आणि पुढच्या अदृश्य भविष्यकाळच्या छायेकडे कथानकाचा ओघ आतुरतेनें बघूं लागला म्हणजे मग मी काय करणार? पोरी, मग मी तुला काय लिहिणार? हातांत पेन घेऊन बसावयाचें आणि तुझें स्मरण करावयाचें, किंवा तूं जवळ बसून मला पुष्कळसे प्रश्न विचारीत आहेस आणि मी तुला उत्तरें देण्याचा प्रयत्न करीत आहें अशी कल्पना करीत राहावयाचें, हें जें सोंग मी आजपर्यंत चालवीत आलों आहें, तें तसेंच पुढें चालू ठेवावयाला मग सबब कोणती काढावयाची?

फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल मीं तुला तीन पत्रें लिहिलीं आहेत. चांगलीं भलीं लांबलचक तीन पत्रें आणि कशाबद्दल तर फ्रान्सच्या इतिहासामधील फक्त पांच वर्षांच्या एवढ्याशा काळाबद्दल. अनेक युगांच्या इतिहासाचा हा प्रवास करीत असतांना कित्येक शतकें एका पावलासरशीं आपण ओलांडलीं आणि नुसत्या एका दृष्टिपातानें कितीक शतकांचें आपण दर्शन घेतलें; पण येथें फ्रान्समध्यें मात्र या इ. स. १७८९ पासून १७९४ पर्यंतच्या थोड्याशाच कालक्षेत्रांत आपण चांगला भला लाबलचक मुक्काम केला आहे; तरी पण या विषयानें माझें मन इतकें भारून गेलें होतें आणि त्याबद्दल एकसारखें पुष्कळ लिहिण्याला माझा हात इतका उत्सुक होता, कीं संक्षेपानें या काळाबद्दल लिहिण्यासाठीं मला केवढा दीर्घ प्रयत्न करावा लागला हें जर मीं तुला सांगितलें, तर तुला मग मोठाच चमत्कार वाटेल. परंतु इतिहासाच्या दृष्टीनें या फ्रेंच राज्यक्रांतीचें महत्त्वच तसें आहे. या राज्यक्रांतीच्या प्रसंगीं एका युगाचा अंत होऊन दुसरें युग जगांत सुरू झालें. परंतु त्यापेक्षांही तिच्यामध्यें जे अनेक रोमहर्षकारक प्रसंग घडून आले त्यामुळें माझें मन तिच्याकडे अधिक वेधतें आणि शिवाय तिच्यापासून आपल्यापैकीं प्रत्येकाला किती तरी गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. आज पुन्हां जगांत एक प्रकारें काळाला उकळी फुटलेली आहे. सगळीकडे भयंकर खळबळ माजून राहिली आहे, भडका उडालेला आहे. आणि पुन्हां कांहीं तरी महान् फेरबदलांच्या उंबरठ्याशीं आपण येऊन पोंचलों आहों. आपल्या स्वतःच्या देशामध्यें तर

आपण अगदीं सर्वतोपरी शांततायुक्त अशा का होईना, पण एका क्रांतीच्या काळामध्यें वावरतों आहों. यामुळें या फ्रेंच राज्यक्रांतीपासून आणि त्याचप्रमाणें आपल्या जवळ-जवळ प्रत्यक्ष डोळ्यांसमोर आपल्याच या काळामध्यें राशियामध्यें नुकतीच घडून आलेली दुसरी जी महान् क्रांति तिच्यापासून तर आपल्याला पुष्कळच शिकण्यासारखें आहे. या दोन क्रांत्यांप्रमाणें ज्या खऱ्या जनतेच्या प्रयत्नानें होणाऱ्या क्रांत्या असतात त्यांच्या योगानें जीवनाच्या सगळ्या कानाकोपऱ्यांवर आणि सत्य स्वरूपावर फार मोठा भयंकर प्रकाश पडत असतो. विजेच्या झोताप्रमाणें एकाच वेळीं सगळ्या संसारक्षेत्रांचें दर्शन या क्रांत्यांमुळें आपल्याला होतें आणि या प्रदेशांतील अंधारांतील सर्व जागा अशा वेळीं विशेषच उजेडांत येतात. काहीं काळपर्यंत तरी मानवी जीवनाचें ध्येय अगदीं स्पष्टपणानें कळून आलेंसें वाटतें आणि तें अगदीं आतां आपल्या हाताला लागलें इतकें तें विलक्षण जवळ आल्याचाही भास होतो. श्रद्धा आणि शक्ति यांनीं सर्व लोक भरून आणि भारून जातात. तडजोड करावयाची, हें नाहीं मिळालें तर मग त्याच्याऐवजीं हें थोडें दुसरें कमी जें कांहीं आहे तें चालेल, अशा प्रवृत्तीला बिलकुल थारा राहत नाहीं. क्रांति करायला निघालेलीं माणसें आपल्या ध्येयमार्गाचें बाणासारखें सरळ आक्रमण करीत राहतात, दृष्टि इकडे तिकडे रेसभरही ढळूं देत नाहींत आणि त्यांची नजर अशी ज्या प्रमाणांत सरळ थेट आपल्या ध्येयावर अगदीं कडवटपणानें खिळलेली राहते त्या प्रमाणांत क्रांतीच्या कार्याची अधिकाधिक प्रगति होते; परंतु हा सर्व चमत्कार क्रांतीच्या कालाला जेव्हां अगदीं भर आलेला असतो, तेवढ्यापुरताच तेवढा घडून येत असतो. अशा या काळामध्यें क्रांतिकारकांच्या पुढाऱ्यानें पर्वताचें शिखर गांठलेलें असतें आणि जनता पर्वताच्या बाजूनें वर त्याच्यापर्यंत भिडण्यासाठीं कूच करीत असते. परंतु अरेरे! काळ पालटतो आणि पर्वताच्या उंचीवरून खालीं खोल अंधाऱ्या दरींत जाऊन पडण्याचा या लोकांवर प्रसंग येतो आणि त्यांच्यामधील सारी श्रद्धा मंद होऊन जाते, शक्ति क्षीण होऊन जाते.

सारा जन्म जवळजवळ आपल्या देशांतून हद्दपार होऊन ज्याला घालवावा लागला तो व्हॉल्टेअर इ. स. १७७८ मध्यें पॅरिसमध्यें परत आला आणि तेथें मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय चौऱ्यायशीं वर्षांचें होतें. त्या वेळीं फ्रेंच तरुणांना उद्देशून तो म्हणाला, "हे तरुण लोक मोठे भाग्यवान्! त्यांना जीवनांत फार मोठे फेरबदल झालेले पाह्यला मिळणार आहेत." व्हॉल्टेअरनें म्हटल्याप्रमाणें खरोखरीच त्यांना असे फेरबदल झालेले पाहण्यास मिळाले. एवढेंच नव्हे, तर ते घडवून आणण्यांत त्यांनीं स्वतःच पुष्कळ भाग घेतला. कारण व्हॉल्टेअरनें हें विधान केल्यानंतर अकराच वर्षांमध्यें फ्रेंच राज्यक्रांतीचा स्फोट झाला. खरें म्हणजे किती तरी वर्षांपासून ही क्रांति होऊं घातलेली होती. "L'état c'est moi" "राज्य, राज्य म्हणजे काय? राज्य म्हणजे केवळ मी!" असें खुद्द तो महान् बादशहा चौदावा लुई हाच सतराव्या शतकांत म्हणाला होता. त्याच्या मागून गादीवर आलेला पंधरावा लुई हाही अठराव्या शतका-

मध्ये " Aprés moi le dèluge " (माझ्यानंतर भले महाप्रलय होवो) असें म्हणाला होता. त्यानें आवाहन केल्याप्रमाणें हा प्रलय घडून येऊन त्यांत सोळावा लुई आणि त्याचा सारा परिवार वाहून गेला. सुवासिक पावडरी लावलेले टोप आणि पट्ट्याच्या विजारी घातलेल्या सरदारांऐवजीं आतां सान्स्कुलोट म्हणजे पट्ट्याच्या विजारी न घालणारे लोक आघाडीवर आले. फ्रान्समध्ये आतां बाकीच्या पदव्या नाहींशा होऊन नागरिक ( किंवा नागरिका ) एवढ्याच पदव्या सर्वांना एकसारख्या लावण्यांत येऊं लागल्या. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हें आमचें ब्रीद आहे, असें नवीन प्रस्थापित झालेल्या प्रजासत्ताक राज्यानें साऱ्या जगाला मोठ्यानें ओरडून जाहीर केलें.

या क्रांतीच्या काळांत अत्याचाराच्या प्रलयाचा पुष्कळच धुमाकूळ झाला. खास क्रांतिकारकांचें न्यायालय स्थापल्यावेळेपासून तों राब्सपियरचा पाडाव होईपर्यंतच्या सोळा महिन्यांमध्ये जवळजवळ ४००० लोक गिलोटिनखालीं देण्यांत आले. हा आंकडा खरोखरच फार मोठा आहे आणि कितीक निरपराधी लोकसुद्धां सुरीखालीं गेले असतील हा विचार मनांत आला म्हणजे माणसाला केवढा मोठा धक्का बसतो आणि दुःख होतें ! परंतु या फ्रेंच अत्याचारी प्रलयाचें खरें स्वरूप आणि प्रमाण आपल्या ध्यानांत येण्यासाठीं आपल्याला आणखी पुष्कळ गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे फ्रान्सचें प्रजासत्ताक राज्य चोहोंकडून शत्रूंनीं, हेरांनीं आणि देशद्रोही लोकांनीं वेढलेलें होतें, आणि गिलोटीनखालीं गेलेल्या लोकांपैकीं पुष्कळसे लोक प्रजासत्ताक राज्याचे उघड उघड शत्रू असून त्यांच्या नाशासाठीं ते खटपटी करीत होते. या प्रलयाच्या अखेरी-अखेरीसच अपराधी माणसांबरोबरच निरपराधी माणसांवरही गिलोटीनला बळी जाण्याचा प्रसंग येऊं लागला. मनांत भीतीनें ठाणें दिलें म्हणजे आपली दृष्टि विकृत किंवा आंधळी होते आणि मग अपराधी आणि निरपराधी यांच्यामधील फरक ओळखणें हें कठिण होऊन जातें. फ्रेंच प्रजासत्ताक राज्याला तर आपल्या अगदीं आणीबाणीच्या काळांत लाफेयटसारख्या स्वतःच्याच मोठमोठ्या सेनापतींनीं केलेल्या विरोधाला आणि विश्वासघाताला तोंड देण्याचा प्रसंग आलेला होता. अशा वेळीं क्रांतीच्या पुढाऱ्यांचा धीर सुटल्यासारखा होऊन त्यांनीं शत्रु कोण, मित्र कोण, हा विचार न करतां चारी बाजूंना सांपडेल त्याच्यावर प्रहार करावयाला सुरुवात केली असली, तर त्यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं.

त्याचप्रमाणें एच्. जी. वेल्स् यांनीं आपल्या इतिहासग्रंथामध्ये दाखविल्याप्रमाणें याच दिवसांत इंग्लंड आणि अमेरिका या देशांमध्ये किंवा आणखीही इतर देशांमध्ये काय प्रकार घडत होते हेंही आपण नीटपणें ध्यानांत घेतलें पाहिजे. मालमत्तेच्या संरक्षणार्थ म्हणून जो या देशामध्ये फौजदारी कायदा या काळीं अस्तित्वांत होता तो इतका निर्घृण आणि घोर होता, कीं अगदीं क्षुल्लक अपराधासाठींसुद्धां लोक या कायद्याप्रमाणें फांशीं दिले जात. कांहीं ठिकाणीं अगदीं अधिकृतपणें अशा अपराधांबद्दल अनेक प्रकारचा छळ करण्यांत येई. वेल्स् यांनीं लिहिलें आहे, कीं या पांच

वर्षांच्या काळामध्यें फ्रान्स देशांत या अत्याचाराच्या प्रलयाच्या वेळीं जितके लोक गिलोटीनखालीं गेले, त्याच्यापेक्षां किती तरी जास्त लोक इंग्लंडमध्यें आणि अमेरिकेमध्यें याच काळांत या साध्या फौजदारी कायद्याखालीं फांशीं देण्यांत आले!

त्यांतच आणखी त्या काळचे ते गुलाम पकडण्यासाठीं घातले जाणारे छापे, त्यातला तो अघोरी क्रूरपणा आणि अमानुषपणा यांचाही विचार कर. त्याचप्रमाणें युद्धांची, विशेषतः लाखों तरुण लोकांना आयुष्याच्या ऐन भरामध्यें पार नाहींसे करून टाकणाऱ्या आधुनिक युद्धांची गोष्ट लक्षांत आण. तेराच वर्षांपूर्वी अमृतसर येथें एप्रिल महिन्यांत वसंतोत्सवाच्या दिवशीं संध्याकाळीं जालियनवाला बागेमध्यें शेंकडों लोकांना ठार करण्यांत आलें आणि हजारों लोकांना भयंकर स्वरूपाच्या जखमा झाल्या आणि आमच्या देशांतले हे सगळे कटाचे खटले, जादा अधिकाराचीं खास न्यायासनें आणि वटहुकूम या सगळ्या गोष्टी लोकांना भयभीत करून दडपून टाकण्यासाठींच केलेल्या नाहींत तर कशासाठीं? जुलूम आणि अत्याचार यांच्या तीव्रपणावरून सरकारला भीतीनें किती ग्रासलेलें आहे याचें मोजमाप करतां येत असतें. सरकार कोणतेंही असो, पुरोगामी असो, क्रांतिवादी असो, कीं प्रतिगामी असो, परकी असो कीं स्वदेशी असो, एकदां त्याला आपल्या अस्तित्वाविषयींच भय उत्पन्न झालें, कीं त्यानें लोकांवर जुलुमाचें व अत्याचाराचें हत्यार उचललेंच म्हणून समजावें. प्रतिगामी सरकार हा प्रकार कांहीं थोड्या हक्कदार-वतनदार लोकांच्या हितार्थ आणि सामान्य जनतेच्या विरुद्ध करीत असतें; तर क्रांतिकारक सरकार हाच प्रकार अखिल जनतेच्या वतीनें तिच्या हितार्थ मूठभर हक्कदार, वतनदार लोकांच्या विरुद्ध करीत असतें. क्रांतिकारक सरकार या कामांत कसली लपवालपवी करीत नाहीं. त्याचा मार्ग अधिक सीधा आणि उघड असतो; पुष्कळदां त्या सरकारचें वर्तन बरेंच निर्दयपणाचें आणि कठोर होत असेल; पण त्यांत कपटाचा, कारस्थानाचा किंवा लांडीलबाडीचा कांहीं-एक भाग नसतो. प्रतिगामी सरकारच्या भोंवतालचें सर्व वातावरणच लांडीलबाडीनें पुरेपूर भरलेलें असतें; कारण त्या सरकारला माहीत असतें, कीं आपलें स्वरूप उघडें झालें तर आपल्याला कोणी जगूं देणार नाहीं. असें सरकारही स्वातंत्र्याच्या गप्पा मारीत असतें, परंतु त्याच्या स्वातंत्र्याचा अर्थ आपल्या मनास येईल तें करण्याचें स्वातंत्र्य एवढाच असतो. हें सरकार न्यायाच्या गोष्टी करीत असतें; परंतु त्याचाही अर्थ, ज्या प्रचलित समाजपद्धतींतच या सरकारचा उत्कर्ष होऊं शकत असतो, मग इतरांचा त्यात नाश झाला तरी हरकत नाहीं, तीच समाजपद्धति चिरकाल टिकवून धरणें एवढाच असतो. याहीपेक्षां विशेष असा या सरकारचा कटाक्ष असतो, तो कायदा आणि सुव्यवस्था या जोडगोळीवर. या शब्दांच्या आश्रयानें असें सरकार लोकांवर गोळ्या घालून त्यांना ठार करतें, कैदेंत घालतें, त्यांना भाषणबंदी करतें आणि कितीएक तरी बेकायदेशीर आणि गैरशिस्त गोष्टी करतें. या "कायदा आणि सुव्यवस्था" यांच्या नांवानें आमच्या शेंकडों बांधवांचे खटले खास न्यायालयापुढें चालविण्यांत

येऊन त्यांना फांशीं देण्यात आलेलें आहे. यांच्याच नांवाखालीं अडीच वर्षांपूर्वी एप्रिल महिन्यांत एके दिवशीं पेशावर येथें मशीनगन्समधून आपल्या पठाण देशबांधवांवर, ते निःशस्त्र असतांनाही, मारा करून त्यांना ठार करण्यांत आलें. याच "कायदा आणि सुव्यवस्था" यांच्यासाठीं ब्रिटिश विमानदल सरहद्द प्रांतांतील खेड्यांवर आणि इराकमध्यें बाँब टाकीत असतें आणि कितीएक स्त्रीपुरुषांना आणि मुलांनाही, दोषी कोण, निर्दोषी कोण याचा कांहींएक विचार न करतां, सरसकट जन्माचे जायबंदी करून टाकीत असतें. बाँब टाकण्यासाठीं जवळ विमान आलेलें पाहून लोक कदाचित् निसटून जातील, तेव्हां त्यांना तसें करतां येऊं नये म्हणून विशिष्ट कालावधीनंतर ज्यांचा स्फोट होतो असे कालावधीचे बाँब सैतानी बुद्धिकौशल्याच्या जोरावर करण्यांत आलेले आहेत. बाँब पडून फुटला नाहीं म्हणजे गरीब बिचारे खेडेगांवचे लोक आतां संकट टळलें म्हणून घरीं परत येतात आणि लौकरच मग बाँब फुटतो, त्यांना यमसदनाला पाठवितो आणि त्यांच्या घरादारांचें वाटोळें करतो.

याचप्रमाणें कोट्यवधि लोकांना रोजच्या रोज ग्रासून राहिलेली जी उपासमार तिचाही विचार कर. होतें काय कीं आपल्या भोंवतीं दुःख आणि दैन्य यांचा खच जमलेला असूनही संवयीनें त्याचें आपल्याला कांहीं वाटेनासें होतें. आम्ही आपल्या मनाची अशी समजूत करून घेतों, कीं हे कामगार आणि शेतकरी जात्याच जरा आमच्यापेक्षां रांकट असतात आणि हालअपेष्टांचा त्यांना इतका कांहीं मोठा बाऊ वाटत नाहीं. थोड्याशा हालअपेष्टांनीं त्यांना कांहीं एवढा त्रास होत नाहीं. परंतु आमच्या सदसद्विवेकबुद्धीची टोंचणी थांबविण्यासाठीं आम्ही हे किती भ्रामक मुद्दे उपस्थित करतों! मध्यंतरीं मी बिहारमध्यें एकदां कोळशाच्या खाणींत गेल्याचा प्रसंग आतां मला आटवतो आहे. जमिनीच्या पृष्ठभागाच्या आतल्या बाजूला लांबच लांब प्रकाशहीन काळ्याकुट्ट अशा कोळशाच्या बोळकंड्यांमधून काम करताना त्या स्त्रीपुरुष कामगाराना पाहून माझ्या मनाला जो धक्का बसला, तो मी कधींही विसरणार नाहीं. कांहीं लोक खाणींतील मजुरांच्या कामाचा दिवस आठ तासांचाच असावा अशी मागणी करतांना आपण पाहातों आणि कांहीं लोक तर या मागणीलाही विरोध करून त्यांच्याकडून अधिक काम घेतलें पाहिजे असें प्रतिपादन करतात. या लोकांनीं केलेल्या चर्चा जेव्हां मी ऐकतों किंवा पाहातों, तेव्हां लगेच माझें मन त्या कोळशाच्या खाणींना मीं भेट दिली त्या प्रसंगाकडे धांव घेतें; कारण तेथें त्या बोळकंडांत आठ मिनिटें रहाणें म्हणजे मला केवढें संकट होऊन गेलें होतें!

हें खरें, कीं फ्रान्समधील हें हत्याकांड (Terror) फारच भयंकर होतें. परंतु लोकांच्या नशिबीं नित्य लादल्या गेलेल्या दारिद्र्य आणि बेकारी यांच्या जीवघेण्या दुःखाच्या माऱ्यापुढें या हत्याकांडाचें दुःख म्हणजे नुसता एक चिलटाचा चावाच होता असें म्हटलें पाहिजे. सामाजिक क्रांतीसाठीं द्यावी लागणारी किंमत कितीही जरी भली मोठी असली, तरीसुद्धां सध्यांच्या आमच्या प्रचलित समाजपद्धतीमध्यें आणि

राजकीय व्यवस्थेमध्यें वेळोवेळीं उद्भवणाऱ्या युद्धांसाठीं जी किंमत आम्हांला देण्याचा प्रसंग येतो किंवा जे हाल सोसावे लागतात, त्या किंमतीहून समाजक्रांतीसाठीं द्यावी लागणारी किंमत केव्हांही कमीच ठरेल! फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळचें हत्याकांडसुद्धां जें एवढें मोठें थोरलें वाटतें, त्याचें कारण तरी त्यामध्यें वरिष्ठवर्गाचे आणि मोठे मोठे पदवी धारण करणारे लोक हे पुष्कळसे बळी पडले हें आहे. हक्कदार, वतनदार लोकांच्या विषयींची आदरभावना आमच्या हाडींमासीं इतकीं खिळलेली आहे, कीं त्याना जरा कोठें कांहीं झालें तरी आम्हांला त्यांच्याबद्दल सहानुभूति वाटूं लागते! इतरांबद्दल जशी आपल्याला सहानुभूति वाटते तशी त्यांच्याबद्दलही वाटली तर कांहीं हरकत आहे असें नव्हे; परंतु किती झालें तरी हे लोक मूठभर असतात ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. त्यांचेंही अकल्याण होऊं नये अशी आपण भावना ठेवल्यास कांहीं हरकत नाहीं; पण खरा विचार आपण जो केला पाहिजे तो सामान्य जनतेचा. या थोड्या लोकांच्या हितासाठींही सर्व जनतेला कांहीं आपल्याला बळी देतां येणार नाहीं. रूसोनें लिहिलें आहे कीं "मानवसमाज, मानवसमाज म्हणून ज्याला म्हणतात तो सामान्य जनतेचा बनलेला आहे. या सामान्य जनतेंत जे कोणी नाहींत त्यांचें तें प्रकरण इतकें अल्पसंख्य आहे कीं 'दर्यामें खसखस' या न्यायानें त्यांची मोजदादसुद्धां करण्याची यातायात करण्याचें कारण नाहीं!"

या पत्रांत नेपोलियनविषयीं थोडीशी माहिती तुला सांगावी असा माझा विचार होता; पण माझें मन दुसरीकडेच भरकटलें आणि लेखणी दुसऱ्याच विषयावर चालत राहिली त्यामुळें नेपोलियनची परीक्षा करण्याचें—दर्शन घेण्याचें—काम तसेंच राहिलें आहे. त्याला बापडयाला आतां दुसरें पत्र लिहिण्याची आमची लहर लागेपर्यंत वाट पाहत राहिलें पाहिजे!

## १०४
## नेपोलियन

४ नोव्हेंबर, १९३२

फ्रेंच राज्यक्रांतीमधून नेपोलियनचा उदय झाला. फ्रान्स देश, प्रजासत्ताक राज्याचा वाली फ्रान्स देश, ज्या फ्रान्सनें यूरप खंडांतील राजेलोकांच्या सत्तेला आव्हान देऊन त्या सत्तेचें बूड उखडून काढण्याची धडपड केली तो फ्रान्स देश, कॉर्सिका बेटांतील या छोट्याशा माणसाच्या पायाशीं सर्वस्वीं लीन झाला. त्या काळच्या फ्रान्सच्या ठिकाणीं कांहींएक विलक्षण हिंस्र श्वापदासारखें रानगट सौंदर्य, आकर्षकत्व निर्माण झालेलें होतें. बार्बी नांवाच्या एका फ्रेंच कवीनें त्या काळच्या

फ्रान्सची न माणसाळलेल्या रानटी पशूशींच तुलना केलेली आहे. तो म्हणतो, फ्रान्स देश म्हणजे त्या वेळीं उन्मत्त आणि स्वतंत्र अशा घोडीसारखा होता. कातडी कशी तेजस्वी आणि तुळतुळीत, मान ऐटीनें वर उचलून धरलेली, अत्यंत सुंदर परंतु लहरीला येईल त्याप्रमाणें हवी तिकडे धांवणारी, पाठीला खोगिराचा स्पर्शसुद्धां होऊं देण्याला अथवा पट्टा किंवा लगाम चढवूं देण्याला भयंकर नाखुष, पायानें जमीन ठोकरीत असलेली आणि आपल्या खिंकाळण्यानें साऱ्या जगाचा थरकांप उडवणारी अशी जशी एखादी घोडी असावी तशी फ्रान्सची अवस्था होती, असें त्यानें वर्णन केलें. अशा या गर्वानें फुरफुरणाऱ्या घोडीनें कॉर्सिका बेटामधील या तरुण मनुष्याला आपणांवर स्वार होऊं दिलें आणि त्यानें तिच्याकडून खूप विलक्षण काम करून घेतलें. पण त्याच वेळीं त्यानें या घोडीला माणसाळविलीही चांगली आणि तिच्या अंगाचा सगळा रानगटपणा आणि स्वातंत्र्यप्रेमही नाहींसें करून टाकलें. त्यानें तिला इतकें विलक्षण राबविलें आणि इतकें विलक्षण दमविलें, कीं शेवटीं तिनें त्याला खालीं फेंकून दिलें आणि ती स्वतःही धडपडून खालीं पडली!

असा हा नेपोलियन होता तरी कशा प्रकारचा मनुष्य? जगांत जे श्रेष्ठ पुरुष होऊन गेले त्यांतला हा एक होता का? ज्यांना दैवी विभूती, भाग्यविधाते, भाग्यवान् पुरुष म्हणून म्हटलें जातें अशा विभूतींपैकीं हा एक होता का? तो एखादा अत्यंत शूरवीर पुरुष होता का? अथवा मानवजातीचीं पुष्कळशीं दुःखाचीं ओझीं ज्यानें हलकीं केलीं असा कोणी तो होता का? का एच्. जी. वेल्स् आणि अशीच इतर कांहीं मंडळी म्हणतात त्याप्रमाणें तो एक निव्वळ उलाढाल्या आणि नासधूस करणारा मनुष्य असून त्यानें यूरप आणि मानवी संस्कृति यांचें अतिशय मोठें नुकसान केलें, हें खरें आहे? हे दोन्ही दृष्टिकोन बहुधा अतिशयोक्तीनें दूषित झालेले आहेत. बहुधा दोहोंमध्येंही थोडेंफार सत्य आहे. आपल्या सगळ्यांच्यामध्येंच बरे आणि वाईट, उच्च आणि नीच, यांचें चमत्कारिक मिश्रण असतें. त्याच्यामध्येंही अशाच प्रकारचें मिश्रण होतें; पण आपल्यापैकीं बहुतेकांपेक्षां त्याच्या ठिकाणचें हें मिश्रण थोडेंसें वेगळ्या प्रकारचें होतें. त्याच्या ठिकाणचे जे बरेवाईट विशेष होते, ते सर्वच अत्यंत असामान्य होते. त्याच्या ठिकाणीं शौर्य होतें, आत्मविश्वास होता, कल्पनाशक्ति होती, कोणालाही थक्क करून टाकण्यासारखा उत्साह आणि शक्ति होती आणि प्रचंड महत्त्वाकांक्षा होती. तो एक फार मोठ्या प्रतीचा सेनापति होता. युद्धकलेंत अत्यंत श्रेष्ठ दर्जा होता. त्याची तुलना करायचीच म्हटली तर प्राचीन काळांतले आपले अत्युत्कृष्ट सेनानी जे अलेक्झांडर आणि चेंगीजखान, त्यांच्याशीं थोडीशी करतां येईल; पण या गुणांबरोबरच त्याच्या मनाच्या ठिकाणीं अत्यंत क्षुद्रपणा होता, आप्पलपोटेपणा होता, चमत्कारिक आत्मनिष्ठता होती आणि त्याच्या आयुष्यामधील सगळ्यांत बळकट कार्यप्रेरणेची शक्ति म्हणजे उच्च ध्येयाचा मार्ग आक्रमण करण्याची धडपड ही नव्हती, तर आपल्या स्वतःच्या हातीं सत्ता प्राप्त करून घेण्यासाठीं त्याचे सारे प्रयत्न चालू होते. " माझी प्रिया कोण म्हणून

विचारतां ?" एकदां तो म्हणाला, "सत्ता ही माझी प्रिया, ; ही माझी प्रिया प्राप्त करून घेण्यासाठीं मला इतकी मोठी किंमत द्यावी लागलेली आहे, कीं माझ्यापासून ती मी आतां कोणाला हिरावूं देणार नाहीं अथवा ती उपभोगण्याच्या बाबतींत कोणाला भागीदारीही मिळूं देणार नाहीं !" हा मनुष्य उदयास आला क्रांतीच्या काळीं आणि क्रांतीच्या कार्यामध्यें ! तरीसुद्धां त्याचीं सारीं सुखस्वप्नें एखाद्या प्रचंड साम्राज्याचीं होतीं. अलेक्झांडरच्या विजयानें त्याचें सारें डोकें भरून गेलेलें होतें. पूर्वेकडच्या प्रदेशांचा विशेषतः चीन आणि हिंदुस्थान यांचा त्याला फार लोभ वाटत होता. अवघा सत्तावीस वर्षांचा असतांना, आपल्या आयुष्यक्रमाच्या अगदीं सुरुवातीला तो म्हणाला, "खरीं साम्राज्यें कोठें उत्पन्न होऊन गेलीं असतील आणि खऱ्या प्रचंड घडामोडी कोठें झाल्या असतील तर त्या पूर्वेकडील देशांमध्यें. या पूर्वेकडच्या देशांत थोडेथोडके नाहींत तर साठ कोटी लोक राहतात ; त्या मानानें यूरप खंड म्हणजे काय, केवळ एक लहानसें मुंग्यांचें वारूळ आहे."

नेपोलियन बोनापार्ट याचा जन्म इ. स. १७६९ मध्यें कॉर्सिका बेटामध्यें झाला. हें बेट त्या वेळीं फ्रेंच अमलाखालीं होतें. त्याच्या शरीरांत कॉर्सिकन, फ्रेंच आणि इटालियन अशा रक्ताचें मिश्रण होतें. फ्रान्समधील लष्करी शिक्षणाच्या शाळेंत त्यानें शिक्षण घेतलेलें असून जॅकोबिन मंडळाचा तो सभासद होता. आतां हें खरें कीं तो जो जॅकोबिन मंडळाचा सभासद झाला, तो स्वतःचा पुढच्या आयुष्यांत फायदा साधून घ्यावा या स्वार्थबुद्धीनेंच झाला ; त्याची क्रांतीच्या किंवा त्या पक्षाच्या ब्रीदावर निष्ठा होती म्हणून नव्हे, असाच बराचसा संभव आहे. १७९३ मध्यें टूलॉन शहरीं त्याला आपल्या आयुष्यांतील पहिला विजय मिळाला. त्या शहरांतील श्रीमंत लोकांनीं क्रांतिकारकांच्या अमलाखाली आपली सगळी मालमत्ता नाहींशी होईल या भीतीनें इंग्रज लोकांना प्रत्यक्ष आपल्या बंदरांत बोलावून घेऊन तेथील राहिलेलें सर्व आरमार त्यांच्या स्वाधीन केलें होतें. नुकत्याच स्थापन झालेल्या फ्रान्सच्या लोकसत्ताक राज्याला इतर ठिकाणच्या अनेक संकटांच्याबरोबरच या संकटानें मोठाच धक्का बसला होता आणि त्यासाठीं ज्याला म्हणून शक्य असेल त्या प्रत्येक स्त्री-पुरुषानें लढाईच्या कामांत येऊन मिळावें अशी सरकारनें लोकांना विनंति केलेली होती. नेपोलियननें हे टूलॉनमधील बंडखोर व त्यांच्या मदतीला आलेलें इंग्रजांचें सैन्य यांच्यावर मोठ्या कौशल्यानें हल्ला चढवून त्यांचा पराभव केला आणि बंडखोरांची हड्डी चांगलीच नरम केली. येथून त्याचा भाग्यसूर्य चांगलाच चमकूं लागला आणि वयाच्या चोविसाव्या वर्षी तो सेनापति झाला. त्यानंतर थोड्याच महिन्यांनीं राब्सपियर गिलोटीनखालीं गेला. त्या वेळीं तो थोडासा अडचणींत आला होता. कारण तो राब्सपियरच्या पक्षाचा असावा असा संशय होता ; पण नेपोलियन ज्या कोणत्या पक्षाचा अगदीं खराखुरा होता त्या पक्षाच्या सभासदांची संख्या फक्त एक ही होती ! त्या एकाच सभासदाचें नांव म्हणजे नेपोलियन ! त्यानंतर डायरेक्टरीची

कारकीर्द सुरू झाली. त्या वेळीं एका प्रसंगीं नेपोलियननें हें सिद्ध केलें, कीं आपण जॅकोबिन् पक्षाचे असण्याचें दूरच; पण उलट आपण प्रतिक्रांतीचे पुढारी आहों आणि अंगावर एवढासासुद्धां शहारा न येतां आपण जनतेला गोळ्या घालून ठार करूं शकतों. मागें एका पत्रांत इ. स. १७९५ सालीं फ्रान्समध्यें whiff of grapeshot कुलपी गोळ्यांच्या फैरी झाडून माणसें मारण्यांत आलीं म्हणून एक प्रसंग सांगितला ना? तोच हा, नेपोलियन ज्यामध्यें होता असा इतिहासप्रसिद्ध प्रसंग! त्या दिवशीं नेपोलियननें फ्रेंच प्रजातंत्रराज्यावर वार केला. तेव्हांपासून दहा वर्षांच्या आंत प्रजासत्ताक राज्याचा अंत करून तो स्वतःच फ्रेंच लोकांचा बादशहा झाला.

इ. स. १७९६ मध्यें नेपोलियन इटलीमधील सर्व फेंच सैन्याचा अधिपति झाला आणि इटलीच्या उत्तर विभागामध्यें त्यानें जी तेजस्वी मोहीम केली तिच्यामुळें सारें यूरप खंड चकित होऊन गेलें. अजूनसुद्धां फ्रेंच सैन्यामध्यें क्रांतीचें तेज टिकून होतें; परंतु त्या बिचाऱ्यांचे सगळे कपडे फाटलेले होते; पुरेसे कपडे त्यांच्याजवळ नव्हते, बूटही नव्हते, खायला धड अन्न नव्हतें किंवा पैसाही नव्हता. असले हे फाटक्या कपड्यांचें आणि अनवाणी चालण्यामुळें पाय हुळहुळे झालेलें सैन्य नेपोलियननें आल्प्स् पर्वताच्या पलीकडे चालून नेलें. तुम्ही या पर्वताच्या पलीकडे इटलीच्या मैदानांत चला, मग तेथें तुम्हांला खायलाप्यायला भरपूर आणि दुसऱ्या हव्या असतील त्या मजेदार वस्तू देतों असें आश्वासन देऊन त्यानें आपल्या सैनिकांना तिकडे नेलें. उलट, इटालींतील लोकांनाही तुमचें स्वातंत्र्य मी तुम्हांला मिळवून देतों असें त्यानें आश्वासन दिलें. तुमच्यावर जुलूम करणाऱ्या तुमच्या राज्यक्रांतीच्या तावडींतून तुम्हांला सोडविण्यासाठीं मी आलों आहें, असा त्यानें भास उत्पन्न केला. एका बाजूला क्रांतिकारकाला शोभणारी ठोकळेबाज घोषणा आणि दुसऱ्या बाजूला लूटमारीच्या चंगळीचें आमिष यांचें हें किती विचित्र मिश्रण आहे! अशा रीतीनें त्यानें इटालियन आणि फ्रेंच या दोन्ही लोकांच्या भावनेचा हा खेळच केला. त्यांतच जन्मतः तो कांहीं प्रमाणांत इटालियन वंशाचा असल्यामुळें त्याला त्या लोकांच्या मनावर खूप मोठा परिणाम करण्याला तें एक साधन झालें. त्याला जसजसे जय मिळूं लागले तसतशी त्याची प्रतिष्ठा वाढत गेली आणि कीर्ति चोहोंकडे पसरली. स्वतःच्या सैन्यामध्यें सामान्य सैनिकाला जशा प्रकारच्या हालअपेष्टांत राहावें लागेल तसल्या प्रकारच्या हालअपेष्टांत स्वतः तो पुष्कळ अंशीं राहत असे आणि शिपायांवर येणाऱ्या संकटांतही तो भागीदार असे. कारण ज्या ठिकाणीं हल्ल्याचा जोर व धोका सर्वांत अधिक असे त्या ठिकाणीं तो नेमका सांपडावयाचा नेहमीं. खऱ्या गुणाकडे त्याचें नेहमीं फार बारकाईनें लक्ष असे. आणि गुण दिसून आला रे आला कीं त्याचें तो योग्य तें चीज करीत असे आणि तेंही अगदीं ताबडतोब, प्रत्यक्ष रणधुमाळी चालू असतांनासुद्धां. त्याच्या सैनिकांना तो अगदीं बापाप्रमाणें आवडता असे; बाकी केवढा लहान वयाचा हा बाप म्हणा! त्याला ते


नेपोलियनचें यूरपमधील वर्चस्व
मांडलिक राज्यें
ब्रिटन
फ्रेंच साम्राज्य
स्पेन
कार्सिका
इटली
राइन्स्थ
हॉलंड
नीदरलंड्स
प्रशिया
ऑस्ट्रियाचें साम्राज्य
प्रशिया
वारसॉचें संस्थान
रशिया
उस्मानी साम्राज्य
मॉस्को

पुष्कळदां 'पेटि कॉर्पोरल' म्हणजे 'छोटा नाईक' या नांवानें मोठ्या प्रेमानें हांक मारीत असत आणि पुष्कळदां त्याच्याशीं अरे-तुरेची भाषाही बोलत असत. अशा स्थितींत अजून तिशीच्या आंत असलेला हा तरुण सेनापति आपल्या फ्रेंच सैनिकांच्या गळ्यांतला अगदीं ताईत बनून गेला त्यांत आश्चर्य तें काय?

इटलीच्या सर्व उत्तर विभागामध्यें ऑस्ट्रियाचा पूर्ण पराभव करून तेथें सर्वत्र त्यानें विजय संपादन केला; व्हेनिस येथील प्राचीन प्रजासत्ताक राज्य नाहींसें करून टाकलें आणि एक अत्यंत अनिष्ट स्वरूपाचा साम्राज्यशाही धोरणाचा तह त्या लोकांवर लादून नेपोलियन एक महान् विजयी वीर या नात्यानें पॅरिसला परत आला. एव्हांच साऱ्या फ्रान्सभर त्याचा दरारा वाढण्यास सुरुवात झालेली होती; परंतु एवढ्यांतच सगळी सत्ता आपल्या हातीं हिसकावून घेण्याची वेळ आली नाहीं असें वाटल्यामुळेंच म्हणा, त्यानें बरोबर सैन्य घेऊन इजिप्तकडे मोर्चा नेण्याचें ठरविलें. अगदीं कोंवळ्या तरुण वयापासून त्याला हा पूर्वेकडे स्वारी करून जाण्याचा जणुं ध्यासच लागलेला होता. आतां आपला हा ध्यास प्रत्यक्ष पुरा करण्याची ही संधि त्याला मिळाली, त्यामुळें मनामध्यें त्यानें केवढाल्या प्रचंड साम्राज्यांचीं सुखस्वप्नें रचलीं असतील! कसें तरी करून भूमध्य समुद्रांतील इंग्रजांच्या आरमारी काफिल्याला त्यानें झुकांडी दिली व तो ॲलेक्झांड्रिया बंदरामध्यें जाऊन तर ठेपला.

इजिप्त देश हा त्या काळीं उस्मानी तुर्कीच्या साम्राज्याचा एक भाग होता; परंतु या साम्राज्याची पकड सध्यां ढिली झालेली असून मेमलुक लोकच इजिप्तवर राज्य करीत होते. नांवाला मात्र ते सुलतानाचें अधिराज्य मानीत असत. यूरपमध्यें एवढ्या जरी क्रांत्या झाल्या आणि नवे नवे शोध लागले, यूरपमध्यें त्यामुळें मारे मोठी धामधूम उडून राहिली, तरी पण मेमलुकांची राहणी आणि कारभार अद्यापि मध्ययुगीन काळांतलाच चालू होता. असें सांगतात, कीं नेपोलियन जेव्हां कैरोवर चाल करून गेला तेव्हां एक मेमलुक वीर पुरुष तेजस्वी रेशमी पोषाख करून आणि दमास्कसचें सुंदर पोलादी चिलखत घालून फ्रेंच सैन्याच्या अगदीं जवळ घोड्यावरून आला आणि 'कोणीही माझ्याशीं द्वंद्वयुद्ध खेळावयास या' असें त्यानें मारे आव्हान दिलें! त्याला काय माहीत कीं त्याचें स्वागत फ्रेंच सैनिक अगदींच भ्याडाप्रमाणें गोळ्यांचा भडिमार करून करणार होते म्हणून! लौकरच नेपोलियननें पिरामिडची लढाई जिंकली. नेपोलियनला नाटकी आविर्भाव आणि देखावे करण्याची मोठी आवड होती. पिरामिडांच्यासमोर गेल्यावर आपल्या सैन्यासमोर जाऊन तो थांबला आणि त्याला उद्देशून म्हणाला, "सैनिकहो, हीं पाहा मागील काळचीं चाळीस शतकें तुमच्याकडे आदबीनें पाहत आहेत!"

जमिनीवरील युद्धांत नेपोलियन अतिशय निष्णात असल्यामुळें त्याचा एकसारखा जयच होत चालला; परंतु समुद्रावर मात्र त्याची स्थिति अगदींच दुबळेपणाची होती. ही गोष्ट त्याच्या नीटपणें कधीं लक्षांतच आली नाहीं. शिवाय त्याच्या पदरीं

कार्यकुशल, कर्तबगार, दर्यासारंगही नव्हते असें दिसतें. अगदीं याच काळीं इंग्लंडच्या भूमध्य समुद्रावरील आरमाराचें नेतृत्व एका अत्यंत प्रतिभावान् गृहस्थाकडे होतें. हा गृहस्थ म्हणजे होरेशियो नेल्सन हा होय. एके दिवशीं नेल्सन जरा वाजवीपेक्षां अधिकच साहस करून थेट अॅलेक्झांड्रिया बंदरांत गेला आणि नाईल नदींतील लढाई म्हणून प्रसिद्ध असलेल्या लढाईंत त्यानें सर्व फ्रेंच आरमार नष्ट करून टाकलें. यामुळें नेपोलियनचा फ्रान्सशीं पूर्ण संबंध तुटून एका परक्या देशामध्यें तो अडकून राहिला. पुढें तेथून कसें तरी करून तो गुप्तपणें निसटला आणि फ्रान्सला परत आला. परंतु असें करण्यांत त्याला आपल्या पूर्वेकडील स्वारीसाठीं तयार केलेल्या सर्व सैन्याचा बळी द्यावा लागला.

नेपोलियनच्या पूर्वेकडील स्वारींत त्याला जरी बरेचसे जय मिळाले आणि लष्करी दृष्टीनें पुष्कळ कीर्ति मिळाली, तरी एकंदरीनें पाहतां ती अयशस्वीच झाली; पण या बाबतींत आणखी एक गोष्ट मात्र विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. नेपोलियननें आपल्याबरोबर इजिप्तमध्यें पुष्कळच मोठे अनुभवी, बहुश्रुत आणि विद्वान् लोक व प्राध्यापक नेले होते. त्याचप्रमाणें पुष्कळसे ग्रंथ आणि अनेकविध शास्त्रीय प्रयोगांचीं उपकरणें नेलेलीं होतीं. या सर्वांचें मिळून जें एक 'विद्यालय'च तयार होई, त्यामध्यें पुष्कळ तऱ्हतऱ्हेच्या चर्चा चालत असत. त्यांच्यामध्यें इतरांच्या बरोबरीनें, कसलाही मोठेपणाचा भेदभाव न बाळगतां नेपोलियन भाग घेत असे. या ठिकाणीं त्याच्या बरोबरच्या शास्त्रज्ञांनीं पुष्कळ शास्त्रीय गूढ संशोधनाचें कार्य केलें. तेथील विचित्र लिपीचें फार काळपर्यंत न उलगडलेलें कोडें या लोकांनीं तेथें जी एक ग्रॅनाइट दगडाची शिळा शोधून काढली तिच्यावरील लेखावरून उलगडून दाखविलें. हा लेख तीन लिपींमध्यें लिहिलेला होता. एक ग्रीक लिपि व दुसऱ्या दोन इजिप्शियन चित्रलिपीच्या दोन तऱ्हा होत्या. त्यांवरील या ग्रीक मसुद्यावरून बाकीच्या दोन्ही लिप्यांचा अर्थानुवाद लावण्यांत आला. दुसरी एक गोष्ट आणखी लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती अशी, कीं सुएज येथें एक कालवा खोदण्याची गोष्ट नेपोलियनच्या मनामध्यें फारच भरली होती.

इजिप्तमध्यें असतांना नेपोलियननें इराणचा शहा आणि दक्षिण हिंदुस्थानांतील टिपू सुलतान यांच्याशीं वाटाघाटी सुरू केल्या होत्या. परंतु आरमारी बाबतींतील त्याच्या सामर्थ्यहीनतेमुळें या वाटाघाटींतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. शेवटीं नेपोलियनचा पाडाव केला तोही एका आरमारी सामर्थ्य असलेल्याच राज्यानें आणि एकोणिसाव्या शतकांत इंग्लंडला जें एवढें महत्त्व प्राप्त झालें, तें या आरमारी सामर्थ्याच्या जोरावरच.

नेपोलियन इजिप्तमधून परत आला त्या वेळीं फ्रान्सची परिस्थिति बिघडलेली होती. डायरेक्टरीच्या कारभाराची नाचक्की होऊन त्यांच्याबद्दल लोकांत असंतोष पसरला होता. त्यामुळें तो परत येतांच सर्वांचे डोळे त्याच्याकडे लागले. नेपोलियनची

तर काय, सत्ता हातात घेण्याची मनापासून तयारी होतीच. म्हणून परत आल्यानंतर एक महिन्यानें, इ. स. १७९९ च्या नोव्हेंबर महिन्यांत त्यानें आपला भाऊ ल्युसियन याच्या मदतीनें नॅशनल असेंब्लीचें जबरदस्तीनें विसर्जन केलें आणि ज्या घटनेच्या अनुसारानें त्या वेळीं डायरेक्टरीचा कारभार चालू होता त्या घटनेची इतिश्री केली. अशा तऱ्हेच्या राज्यकर्त्यांच्या जबरदस्तीच्या मामल्याला फ्रेंच भाषेंत Coup d'état 'झपाटेबंद उलथापालथ', 'यक्षिणीच्या कांडीचा चमत्कार' असें म्हणतात. या उलथापालथीनें सर्व कांहीं परिस्थिति नेपोलियनच्या पूर्णपणें कह्यांत आली. हें सगळें त्याला घडवतां आलें त्याचें कारण तो लोकप्रिय होता. आणि लोकांची त्याच्या ठिकाणीं निष्ठा होती हें आहे. क्रांतीचें तर दिवाळें वाजून या सुमारास पुष्कळ दिवस झालेले होते आणि आतां तर लोकशाहीचासुद्धां लोप होण्याचा समय आला आणि सारीं सूत्रें एका लोकप्रिय सेनापतीच्या हातामध्यें आलीं. या वेळीं आणखी एक नवी घटना तयार करण्यांत आली. तिच्याप्रमाणें कारभार पाहण्यासाठीं तीन कॉन्सल नेमण्यांत आले (हा शब्द प्राचीन रोमच्या राज्यव्यवस्थेंतून घेतलेला आहे). परंतु त्यांमध्यें प्रमुख स्थान नेपोलियनला देऊन त्याच्याच हातीं पूर्ण सत्ता देण्यांत आली व त्याच्या कारकीर्दीची मुदत दहा वर्षांची ठरविण्यांत आली. ही घटना ठरविल्यानंतर चर्चेच्या प्रसंगीं एकानें असें सुचवलें, कीं राज्यघटनेंत एक अध्यक्ष असावा; पण त्याच्या हातीं सत्ता अशी कांहीं नसावी. मात्र राज्याच्या कागदपत्रांवर त्यानें सह्या कराव्यात आणि राज्याचा तो औपचारिक रीतीनें, कायदेशीर दृष्टीनें प्रतिनिधि समजला जावा. म्हणजे राज्याधिकार नियमित केलेल्या राजासारखा किंवा हल्लींच्या फ्रेंच अध्यक्षासारखा हा अध्यक्ष असावा. नेपोलियनला खरी सत्ता पाहिजे होती. नुसता राजाचा पोषाख नको होता. म्हणून सत्ताविहीन परंतु दरबारी थाटाचा अध्यक्ष असावा अशा या सूचनेला त्यानें मुळींच थारा दिला नाहीं. "फेकून द्या हें लठ्ठ फोफसें डुक्कर" असें ओरडून या सूचनेचा त्यानें धिक्कार केला.

मग जिच्यामध्यें दहा वर्षेपर्यंत नेपोलियनला पहिल्या कॉन्सलचा अधिकार देण्यात आलेला होता ती ही नवी राज्यघटना लोकांच्या मतास घालण्यांत आली आणि तिला तीस लाखांहून जास्त मतें अनुकूल पडून जवळजवळ एकमतानें ती मान्य करण्यांत आली. अशा रीतीनें फ्रान्सच्या लोकांनीं आपल्या स्वतःच्या हातानेंच सगळी सत्ता नेपोलियनच्या हातीं अर्पण केली. हें करतांना त्यांना वेड्यासारखी खोटीच आशा वाटत होती, कीं त्याच्या प्रयत्नांनीं आपणांस स्वातंत्र्य आणि सुख मिळेल.

परंतु आपल्याला नेपोलियनचें सर्व जीवनचरित्र तपशीलवार रीतीनें पाहत जाणें शक्य नाहीं. एकसारखें कार्य करीत राहण्याची अत्यंत जिवंत प्रवृत्ति आणि एकसारखी अधिकाधिक सत्ता मिळविण्याची हांव यांनीं त्याची जीवनयात्रा भरगच्च व्यापलेली आहे. ज्या दिवशीं त्यानें राजसत्तेची उलथापालथ, घालमेल केली, त्याच दिवशींच्या दुसऱ्या रात्रीं, सांगितलेली राज्यघटना पसार होण्याच्या किंवा तयारही होण्याच्या पूर्वी,

त्यानें कायद्याचें संकलन व संशोधन करण्यासाठीं दोन मंडळांची नेमणूकही करून टाकली. सर्वाधिकारी होताक्षणीं पहिलें काम त्यानें हें केलें. या मंडळाच्या बैठकी होऊन पुष्कळ चर्चा झाली. बैठकींमध्यें स्वतः नेपोलियनही भाग घेत असे. बऱ्याच दिवसांनंतर या मंडळांनीं एक कायदेसंग्रह तयार केला. आणि इ. स. १८०४ मध्यें तो पसंत होऊन अमलांत आला. त्याला नेपोलियनचा कायदे-संग्रह असें नांव आहे. क्रांतीच्या काळचे विचार किंवा आजकालचीं कसोटी यांच्या दृष्टीनें पाहिल्यास याच्यांतलि कायदे फारसे सुधारलेले किंवा प्रगतिपर असे वाटणार नाहींत. परंतु त्या काळची जी परिस्थिति होती त्या मानानें पाहतां या कायद्यांमध्यें पुष्कळच पुढचें पाऊल टाकलेलें असून यानंतर सुमारें १०० वर्षेंपर्यंत कांहीं कांहीं बाबतींत सर्व यूरप खंडामध्यें हा कायदेसंग्रह जवळजवळ एक सर्वस्वीं अनुकरणीय नमुनाच होऊन राहिला होता. याशिवाय त्यानें आणखी पुष्कळ रीतींनीं राज्यकारभारामध्यें साधेपणा आणि कार्यक्षमता हे गुण निर्माण केले. प्रत्येक लहानसहान गोष्टींतसुद्धां तो लक्ष देत असे आणि बारीकसारीक तपशीलसुद्धां लक्षांत ठेवण्याची त्याची शक्ति मोठी विलक्षण होती. त्याच्या स्वतःच्या अंगीं अचाट शक्ति आणि चापल्य असल्यामुळें तो आपल्या सहकाऱ्यांना आणि चिटणिसांना कामाखालीं अगदीं दमवीत असे. त्या काळच्या त्याच्या कामासंबंधीं त्याचा एक चिटणीस लिहितो, "राज्याचीं सूत्रें हालवावयाचीं, राज्यकारभाराकडे लक्ष पुरवावयाचें, वाटाघाटी करावयाच्या, या सर्व कामांमध्यें आपल्या अत्यंत सुव्यवस्थित अशा बुद्धीच्या साह्यानें हे दिवसाचे अठरा अठरा तास कामाचा पीट पाडतात. दुसऱ्या कितीक राजांना राज्याचीं सूत्रें चालवितांना जेवढें काम करावयाला शंभर शंभर वर्षें लागलीं असतीं, तेवढें काम त्यांनीं अवघ्या तीन वर्षांमध्यें पुरें केलें आहे." या विधानांत अर्थातच अतिशयोक्ति आहे. परंतु एक गोष्ट स्पष्ट आहे. नेपोलियनच्या ठिकाणीं अकबराच्या प्रमाणें असामान्य स्मरणशक्ति आणि अतिशयच सुव्यवस्थित असें बुद्धिसामर्थ्य होतें. त्यानें स्वतःच या बाबतींत लिहिलें आहे, "एखादी गोष्ट मला माझ्या मनांतून काढून टाकावयाची असली म्हणजे त्या गोष्टीचा कप्पा मी मिटवून टाकतों आणि दुसऱ्या एखाद्या गोष्टीचा कप्पा उघडतों. निरानिराळ्या कप्प्यांतील या गोष्टींची माझ्या मनामध्यें केव्हांही गल्लत होत नाहीं. त्यामुळें मला कधीं चिंता लागत नाहीं किंवा कधीं कंटाळा येत नाहीं. आणि मला झोंप हवी असली तर? तर मग हे सगळे कप्पे मी मिटून टाकतों कीं लागलीच मग झोंप." यांत अतिशयोक्ति कांहीं नाहीं. कारण ऐन रणांगणांत युद्धाच्या धुमश्चक्रींत तेथल्या तेथेंच जमिनीवर पडून तो अर्धाएक तास झोंप घेत असे आणि मग पुन्हां खूप दीर्घ काळपर्यंत कसून काम करावयाला सज्ज होत असे ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

दहा वर्षांच्या मुदतीनें त्याला पहिला कॉन्सल म्हणून नेमण्यांत आलें होतें. त्यानंतर तीन वर्षांनीं या सत्तेच्या शिडीची आणखी एक पायरी तो इ. स. १८०२

मध्यें चढला. त्या वेळीं त्यानें आपली नेमणूक आयुष्य-अखेरपर्यंत करून घेतली आणि आपल्या अधिकारामध्येंही वाढ करून घेतली. प्रजासत्ताक राज्य या सुमारास जवळ-जवळ नष्टच झालेलें होतें. आणि नेपोलियन हा नांवाला जरी नाहीं तरी व्यवहारांत खरोखर स्वतः राजाच झालेला होता. आणि अखेरीस लोकांचेंच मत घेऊन १८०४ मध्यें त्यानें आपल्याला बादशहा म्हणून जाहीरही करून घेतलेंच. असें होणें हें आतां-पर्यंतच्या क्रमाप्रमाणें पाहतां अपरिहार्य होतें. आतां फ्रान्समध्यें सर्व सत्ता त्याच्या एकट्याच्या हातीं आणि अगदीं अनियंत्रित अशी होती; परंतु जुन्या काळच्या अनियंत्रित सत्ता धारण करणाऱ्या राजेलोकांमध्यें आणि त्याच्यामध्यें फार मोठा फरक होता. आपली सत्ता एखाद्या परंपरेच्या किंवा दैवी अधिकाराच्या पायावर टिकविणें त्याला शक्य नव्हतें. आपल्या सत्तेचें खूड टिकविण्यासाठीं त्याला कार्य-क्षमता आणि आपली लोकप्रियता यांचाच आधार घ्यावा लागत होता; त्यांतही शेतकरी-वर्गांतील आपल्या लोकप्रियतेचा. या शेतकरी-वर्गाचा अगदीं प्रथमपासून अखेरपर्यंत अत्यंत निष्ठापूर्वक त्याला पाठिंबा होता. कारण त्यानें आपल्या जमिनी राखल्या अशी त्यांची समजूत होती. नेपोलियन स्वतःच एकदां म्हणाला, 'दिवाण-खान्यांतील मतें किंवा बडबड करणाऱ्या चळवळ्या लोकांचीं मतें यांची मला काय फिकीर आहे? मी फक्त एकच मत ओळखतों, तें म्हणजे शेतकऱ्यांचें." परंतु एक-सारखे कधींही न संपणाऱ्या युद्धासाठीं आपल्या मुलांना पाठविण्याचा या शेतकऱ्यांना अखेरीस कंटाळा आला. हा त्यांचा आधार जेव्हां निघाला तेव्हां नेपोलियननें त्यावर उभारलेली प्रचंड इमारत डळमळूं लागली.

नेपोलियन दहा वर्षेंपर्यंत बादशहा होता. एवढ्या दरम्यान त्यानें साऱ्या यूरप खंडभर धुमाकूळ घातला, कित्येक आश्चर्यकारक लष्करी स्वाऱ्या पार पाडल्या आणि संस्मरणीय अशा लढायांमध्यें विजय मिळविले. त्याचें नांव ऐकून साऱ्या यूरप खंडभर थरकांप उडत असे. साऱ्या यूरप खंडभर त्यानें जसा दरारा गाजवला, तसा दरारा त्याच्या पूर्वी किंवा त्याच्यानंतर केव्हांही कोणींसुद्धां गाजविलेला नाहीं. त्यानें जेथें विजय मिळविले अशा सुप्रसिद्ध जमिनीवरील लढायांत, मॅरेंगो, (ही लढाई इ. स. १८०० मध्यें स्वित्झर्लंडमध्यें झाली. तेथें आपल्या सैन्यासह ग्रेट सेंट बर्नाड खिंड, ऐन हिंवाळ्यांत ती सगळीकडे बर्फानें आच्छादित होऊन गेलेली असतांना नेपोलियननें ओलांडली.) ऊल्म, ऑस्टर्लिट्झ, जेना, आइलौ, फ्रीड्लँड, वाग्राम, इत्यादि ठिकाणच्या लढायांचा समावेश होतो. ऑस्ट्रिया, प्रशिया, आणि रशिया हे सारे देश त्यापुढें पार गडगडले. स्पेन, इटली, नेदर्लंड्स, ऱ्हाइन नदीवरील संयुक्त राज्य या नांवानें प्रसिद्ध असलेल्या जर्मनीचा बराचसा मोठा भाग, आतां वॉरसाची डची या नांवानें असलेला पोलंडचा भाग हे सगळे देश त्याच्या अंकित बनले. जुनें प्राचीन रोमन साम्राज्य आतांपर्यंत निदान नांवाला तरी जीव धरून होतें. त्याचीही आतां इतिश्री झाली.

यूरपमधील मुख्य राज्यसत्तांपैकीं इंग्लंडच तेवढें एकटें या विनाशाच्या झपाट्यांतून वांचलें. समुद्राचें कोडें नेपोलियनला अखेरपर्यंत केव्हांच उलगडलें नाहीं. नेमकें या समुद्रानेंच इंग्लंडचें रक्षण केलें. तसेंच समुद्रामुळें प्राप्त झालेल्या या सुरक्षितपणाच्या बळावर इंग्लंड देश हाच त्याचा सर्वांत मोठा आणि अत्यंत कट्टा असा शत्रु झाला. नेपोलियनच्या जीवनक्रमाच्या अगदीं सुरुवातीलाच नेल्सननें नाईल नदीवरच्या लढाईंत नेपोलियनचें आरमार कसें नष्ट केलें हें मीं तुला सांगितलेंच आहे. १८०५च्या ऑक्टोबर महिन्याच्या २१ तारखेस नेल्सननें फ्रेंच आणि स्पॅनिश आरमाराच्या जोडगोळीविरुद्ध लढून स्पेनच्या दक्षिण किनाऱ्यावरील ट्रॉफल्गार बंदराच्या समोरच्या बाजूला नेपोलियनवर पूर्वीपेक्षां आणखीच मोठा विजय मिळविला. याच आरमारी लढाईची अगदीं सुरुवात होण्याच्या क्षणाला नेल्सननें आपल्या आरमाराला आपला पुढील सुप्रसिद्ध संदेश दिला : "प्रत्येक व्यक्तीनें आपलें कर्तव्य करावें अशी इंग्लंड देशाची अपेक्षा आहे." विजयाच्या ऐन क्षणाला नेल्सन मरण पावला; परंतु ज्या त्याच्या या विजयाची स्मृति इंग्लिश लोक मोठ्या अभिमानानें बाळगतात आणि ज्यासाठीं त्यांनीं लंडन शहरांत ट्राफल्गार चौक आणि नेल्सनस्तंभ यांची उभारणी केलेली आहे, त्या विजयामुळें नेपोलियनचें इंग्लंडवर हल्ला करण्याचें सुखस्वप्न नष्ट केलें.

या पराजयाला उलट उत्तर म्हणून नेपोलियननें यूरप खंडांतील सर्व बंदरें इंग्लंडला बंद करण्याबद्दल हुकूम काढला. इंग्लंडशीं कोणत्याही प्रकारचा संबंध कोणीं ठेवावयाचा नाहीं आणि अशा रीतीनें या "दुकानदारांच्या, बनियांच्या राष्ट्राला" शरण आणावयाचें असा नेपोलियनचा मनसुबा होता. इंग्लंडनें आपल्या बाजूनेंही या सर्व बंदरांची कोंडी केली आणि अमेरिका आणि इतर देश यांचा नेपोलियनच्या साम्राज्याशीं व्यापार होणार नाहीं अशी व्यवस्था केली. त्याशिवाय यूरप खंडांत अनेक प्रकारचीं कारस्थानें रचून आणि त्याच्या शत्रूंना आणि तटस्थ देशांना पैशाची नुसती खैरात करून इंग्लंड देश त्याच्या विरुद्ध लढाई चालवीतच होता. या कामांत इंग्लंडला यूरप खंडांतील मोठमोठ्या सावकारी पेढ्यांची, विशेषतः रॉथचाइल्ड्सच्या घराण्याच्या पेठांची फार मदत झाली.

याशिवाय आणखी एक साधन इंग्लंडनें नेपोलियनच्या विरुद्ध जें उपयोगांत आणलें तें म्हणजे प्रचारकार्याचें. त्या काळीं युद्धकार्यांतील मोहिमेचें हें एक अगदीं नवीन प्रकारचें अंग होतें. पण आतां तें अगदीं सर्वांच्या रोजच्या परिचयाचें झालेलें आहे. फ्रान्सविरुद्ध, विशेषतः नेपोलियनच्या विरुद्ध, एक मोठी वर्तमानपत्राची मोहीम सुरू करण्यांत आली. नाना तऱ्हेचे लेख, चोपडी, बातमीपत्रें, बादशहाची टिंगल करणारीं व्यंगचित्रें, खोट्यानाट्या बनावट आठवणी इत्यादि साधनें लंडनमध्यें छापून तयार करून त्यांचा आडमार्गानें फ्रान्समध्यें चोरटा शिरकाव करून देण्यांत येऊं लागला. आजकाल खोट्या प्रचाराचीं वर्तमानपत्रांची मोहीम हा आधुनिक युद्धतंत्रांतील एक मोठा भाग आहे. १९१४ ते १९१८ च्या लढाईमध्यें युद्धांत पडलेल्या

सर्वच राष्ट्रांनीं अगदीं निर्लज्जपणें वाटेल त्या विलक्षण खोट्यानाट्या गोष्टींचा प्रसार केला आणि या खोट्यानाट्या गोष्टी निर्माण करण्यामध्यें व त्यांचा प्रसार करण्यामध्यें ब्रिटिश सरकार इतर कोणापेक्षांही पुष्कळच प्रमाणांत वरचढ ठरून त्याचा पहिला नंबर लागला! नेपोलियनच्या वेळेपासून शंभर वर्षांच्या दीर्घ मुदतींतील अनुभव आणि शिक्षण त्यांना होतें ना! आपल्या देशासंबंधींच्या खऱ्या गोष्टी दडपून टाकून किती अचाट खोट्या गोष्टी या देशांत आणि इंग्लंडमध्यें प्रसृत करण्यांत येत असतात, हें तर आपणां हिंदुस्थानांतील लोकांना चांगलेंच माहीत आहे.

## १०५

## पुन्हां एकवार नेपोलियन

६ नोव्हेंबर, १९३२

गेल्या पत्रांत नेपोलियनची गोष्ट जेथें आपण सोडली, तेथून ती या पत्रांत आपणांला पुढें चालू केली पाहिजे.

जेथें जेथें नेपोलियन जाई, तेथें तेथें त्याच्या बरोबर फ्रेंच राज्यक्रांतीचें थोडेंफार तरी वातावरण जात असे. त्यामुळें तो जे देश जिंकी, त्यांमधील लोकसमाज त्याच्या आगमनाला सर्वस्वीं प्रतिकूल नसे. त्यांच्या डोक्यावर अवजडपणें पाय रोंवून राहिलेले त्यांचे ते निःसत्त्व आणि अर्धवट जमीनदारी-सरंजामशाही युगांतले राजे या लोकांना आतां अगदीं नकोसे झालेले होते. नेपोलियनच्या आगमनामुळें खास करून जर्मनीमध्यें सरंजामशाहीस पार खो मिळाला. स्पेनमध्यें त्यानें इन्क्विझिशनच्या न्यायासनाची इतिश्री केली; परंतु हें करीत असतांना अजाणतेपणें तो जी एकराष्ट्रीयत्वाची–राष्ट्रवादाची–भावना या देशांमधून निर्माण करीत गेला, तोच राष्ट्रवाद पुढें त्याचा शत्रु म्हणून उभा राहिला आणि त्यानेंच त्याचा पराभव केला. त्या तेथील जुन्या राजेमहाराजांचा तो पाडाव करूं शकला; परंतु सबंधच्या सबंध जनता जेव्हां त्याच्याविरुद्ध उभ्या राहूं लागल्या, तेव्हां त्यांच्यापुढें त्याचें कांहीं चालेना. अशा रीतीनें त्याच्या विरुद्ध उठलेल्या लोकांत स्पॅनिश लोक होते. हे लोक कितीक वेळपर्यंत त्याच्याशीं लढत राहिले आणि त्याची शक्ति व साधनें यांचा त्यांनीं फार नाश केला. जर्मन लोकांनींही बॅरन व्हॉन स्टीन या आपल्या महान् देशभक्ताच्या नेतृत्वाखालीं आपली संघटना केली. हा व्हॉन स्टीन तर नेपोलियनचा अतिशय कट्टा शत्रु होऊन राहिला. जर्मन लोकांनीं तर नेपोलियनशीं स्वातंत्र्यासाठीं युद्धच केलें. अशा रीतीनें त्यानेंच उदयाला आणलेला राष्ट्रवाद आणि एक आरमारी सत्ता यांचा संगम होऊन दोघांनीं

मिळून नेपोलियनचा पराभव केला. अर्थात् कांहीं झालें तरी सबंधच्या सबंध यूरप खंडानें सतत एका सर्वाधिकाऱ्याचा अम्मल सहन करावा हीही गोष्ट कठिणच होती किंवा कदाचित् स्वतः नेपोलियनच पुढें एकदां जें म्हणाला कीं, "माझ्या पाडावाबद्दल इतर कोणाला दोष न देतां तो दोष माझा मलाच दिला पाहिजे. मीच माझा मोठा शत्रु झालों. मीच माझ्या अपेशी, संकटमय भवितव्यतेचें कारण झालों!" तेंही खरें असण्याचा संभव आहे.

हा मनुष्य प्रतिभावान् असूनही त्याच्या ठिकाणीं फारच असामान्य दोष होते. हलक्या कुळामध्यें जन्माला येऊन उपटसुंभाप्रमाणें श्रेष्ठ स्थानीं आलेल्या माणसांच्या प्रवृत्तीची कांहींशी छटा त्याच्या ठिकाणींही होती. जुन्या आणि निःसत्त्व झालेल्या अशा का होईना, पण सगळे राजेमहाराजांनीं आपल्याला बरोबरीच्या नात्यानें वागवावें अशी कांहीं एक चमत्कारिक भावना त्याच्या मनांत एकसारखी दृढ होऊन राहिलेली असे. त्याचीं बहीणभावंडें जरी सर्वतोपरी नादान होतीं, तरी त्यांना वाटेल तशा मोठमोठ्या जागा किंवा अधिकार मिळवून देण्याचा चमत्कारिकपणा त्यानें केला. १७९९ च्या राजसत्ता उलथण्याच्या घालमेलींत ज्यानें त्याला मदत केली तो त्याचा भाऊ ल्यूसियन हा तेवढा शाहणा होता; परंतु पुढें त्याचें नेपोलियनशीं न पटल्यामुळें त्याचें राजकारण सोडून ल्यूसिअन इटलींत जाऊन स्वस्थ राहिला. त्याचे इतर भाऊ मोठे घमेंडखोर आणि मूर्ख होते. त्यांना नेपोलियननें राजे केले किंवा मोठमोठे अधिकारी केले. आपल्या कुटुंबांतल्या लोकांना मोठेपणा मिळवून द्यावा अशी नेपोलियनला मोठीच चमत्कारिक आणि ग्राम्य लोकांना शोभणारी अशी हांव होती; परंतु त्यांच्यापैकीं जवळजवळ प्रत्येकजणानें त्याच्याशीं विश्वासघात केला आणि त्याच्या ऐन अडचणीच्या वेळीं ते सगळेजण त्याला सोडून गेले! त्याचप्रमाणें आपला स्वतःचा राजवंश स्थापन करावा अशीही नेपोलियनला फार तीव्र इच्छा होती. त्याच्या चरित्रक्रमाच्या सुरुवातीलाच, इटलींत मोहीम घेऊन जाऊन त्यानें कीर्ति मिळविली त्याच्या आधींच, त्यानें जोसेफाईन डि बोहार्नाइ नांवाच्या स्त्रीशीं लग्न केलेलें होतें. ही स्त्री सुंदर होती; परंतु जरा चंचल स्वभावाची होती. तिच्यापासून त्याला मूल न झाल्यामुळें नेपोलियनची फारच भयंकर निराशा झाली. कारण त्याचें चित्त तर राजवंश स्थापन करण्यावर लागलें होतें. तेव्हां जोसेफाइनवर जरी त्याचें प्रेम होतें तरी तिच्याशीं घटस्फोट करून दुसरें लग्न करावयाचें, असा त्यानें विचार केला. रशियन राजघराण्यांतल्या एका स्त्रीशीं लग्न करण्याची त्याची इच्छा होती. नेपोलियन हा त्या वेळीं जवळजवळ साऱ्या यूरप खंडाचा मालक होता. तरीपण रशियन बादशहाच्या घरांतील स्त्रीशीं लग्न करण्याची आकांक्षा त्यानें धरावी हा प्रकार झारला मोठा धृष्टपणाचा वाटला! त्यामुळें झारनें त्या गोष्टीला संमति दिली नाहीं. त्यानंतर नेपोलियननें जवळजवळ सक्तीनें ऑस्ट्रियाच्या हॅप्स्बर्ग घराण्यांतल्या बादशहाला स्वतःच्या मुलीचें लग्न आपल्याशीं करण्यास भाग पाडलें. त्या मुलीचें नांव मेरी लुईसी. तिच्यापासून त्याला एक मुलगा

झाला; परंतु मेरी मात्र स्वतः अगदींच मंद आणि बुद्धिहीन होती. नेपोलियन तिला मुळींच आवडत नसे. ही बायको कांहीं त्याला सुखाची झाली नाहीं. त्याच्यावर जेव्हां संकटाचा प्रसंग ओढवला त्या वेळीं तिनें त्याला सोडून दिलें आणि पुढें त्याचें तिनें कधीं नांवसुद्धां घेतलें नाहीं.

आपल्या सबंध पिढीच्या लोकांमध्यें कितीक बाबतींत श्रेष्ठ स्थानीं शोभणारा हा मनुष्य प्राचीन राजविषयक कल्पनांच्या पोकळ लखलखाटाच्या मोहाला एवढा बळी पडावा, ही फारच विलक्षण गोष्ट आहे. असें होतें तरीसुद्धां मधूनमधून ही स्वारी क्रांतीच्याही गप्पा मारीत असे आणि या निःसत्त्व राजेलोकांची टिंगलही करीत असे. एकीकडे क्रांति आणि नव्या पद्धतीची समाजरचना यांच्याकडे त्यानें जाणूनबुजून पाठ फिरविलेली होती; तर दुसरीकडे जुन्या जमान्याच्या लोकांनाही तो नकोसाच होता. या दोन परस्परविरोधी वृत्तींत त्याचा चक्काचूर झाला.

हळूहळू अगदीं अपरिहार्यपणें त्याच्या त्या सगळ्या लष्करी वैभवाचा व यशाचा जो व्हायचा तोच अंत घडून आलेला दिसतो. त्याच्या मंत्र्यांपैकींच कांहींजण त्याच्याशीं बेइमान होऊन त्याच्याविरुद्ध कारस्थानें रचूं लागतात. उदाहरणार्थ, टॅलेरांड हा रशियाच्या झारबरोबर कट करूं लागतो, तर फौशे हा इंग्लंडशीं संधान जुळवूं लागतो. या त्यांच्या विश्वासघातकी चाळ्यांत नेपोलियन त्यांना पकडतोही. पण काय चमत्कार पाहा, तो त्यांची नुसती खरडपट्टी काढतो आणि त्यांना मंत्रिपदांवर मात्र राहूं देतो. त्याचा एक सेनापति बर्नाडॉट हा त्याच्या विरुद्ध उलटून त्याचा कट्टा शत्रु होतो. एक त्याची आई आणि भाऊ ल्यूसियन हीं दोघें सोडलीं, तर त्याच्या कुटुंबांतील सर्वच मंडळी एकसारख्या भलभलत्या गैर गोष्टी करीत राहतात आणि त्याच्या विरुद्ध खटपटी करतात. प्रत्यक्ष फ्रान्स देशांतसुद्धां असंतोषाचें प्रमाण वाढूं लागतें. त्याच्या सर्वाधिकारशाहीचा अम्मल अधिकाधिक कडक आणि निर्दयपणाचा होऊं लागतो. खटला वगैरे न भरतांच कित्येक लोकांना बंदिवास सोसावा लागतो. त्याचा भाग्यसूर्य आतां निश्चितपणें अस्ताचलाकडे झुकूं लागतो आणि पुढच्या नाशाची आगाऊ कल्पना येऊन कितीक उंदीर त्याच्या राज्यसंसाराचें जहाज सोडून पळून जातात. शारीरिक दृष्ट्या आणि मानसिक दृष्टीनेंही, त्याचें वय तसें फारसें मोठें नसूनसुद्धां, तो एक प्रकारें क्षीण होऊं लागतो. लढाईच्या अगदीं ऐन गर्दीत त्यानें असावें आणि अशा वेळीं त्याच्या आंतड्यांत तीव्र वेदना सुरू व्हाव्या असें आतां घडूं लागतें. सत्तेच्या उपभोगामुळेंही त्याच्या शक्तींचा ऱ्हास होत जातो. त्याचें मूळचें कार्यकौशल्य अर्थातच अजून शिल्लक राहिलेलें आहे; पण पूर्वीहून त्याच्या हालचाली आतां कमी वेगानें होऊं लागतात. कित्येकदां तो आतां कचरत असलेला किंवा संशयांत पडलेला दिसूं लागतो. त्याच्या सैन्यामध्येंही अधिकाधिक अवजडपणा येऊं लागतो.

इ. स. १८१२ मध्यें आपलें प्रचंड मोठें सन्य घेऊन (या सैन्याला Grand

Armèe असें म्हटलें जातें ) तो रशियावर चाल करून जातो. पहिल्या धडाक्याला तो रशियन सैन्याचा पराभव करतो आणि मग पुढें त्याची प्रगति विशेषसा विरोध न होतां होत राहते. रशियन सैन्य आपलें एकसारखें माघारच घेत राहतें. लढाईला तें उभेंच राहत नाहीं. या सैन्याला कोठें तरी गांठून, रोखून धरून त्याच्याशीं लढाई देण्यासाठीं ग्रँड आर्मीचा खूप प्रयत्न चालू असतो. पण त्यांत त्यांना यश येत नाहीं. अशा पाठलागामध्यें नेपोलियनचें सैन्य मॉस्कोमध्यें जाऊन पोहोंचतें. आतां शरण जावें असाच झारचा कल होत जातो. परंतु त्यापासून दोन गृहस्थांनीं त्याला परावृत्त केलें असें दिसतें. त्यांपैकीं खुद्द एक फ्रेंच होता. तो म्हणजे नेपोलियनचा मूळचा सहकारी आणि सेनापति बर्नाडॉट आणि दुसरा नेपोलियननें ज्याला फरारी आणि न्याय-बहिष्कृत म्हणून जाहीर केलें होतें तो जर्मन राष्ट्रवादी पुढारी बॅरन व्हॉन स्टीन हा होता. शत्रूला पळवून लावण्याच्या उद्देशानें रशियन लोकांनीं आपल्या हातानें आपल्या प्रिय मॉस्को शहराला आग लावून दिली. मॉस्कोला आग लावल्याची ही बातमी सेंट पीटर्सबर्ग येथें स्टीन याला तो जेवायला बसलेला असतांना कळते; त्यासरशीं दारूचा ग्लास वर उचलून तो ओरडतो, "आतांपर्यंत तीन किंवा चार वेळां माझें सर्वस्व नाहींसें झालेलें आहे. असल्या वस्तू फेंकून देण्याची संवय झालेली असली पाहिजे. केव्हां तरी मरण यावयाचेंच हें जर ठरलेलें आहे, तर मग वीर होऊन तरी मरूं या!"

आतां हिंवाळ्याला सुरुवात झालेली आहे. जळतें मॉस्को शहर सोडून फ्रान्सला जावें असा विचार नेपोलियन करतो. म्हणून मग ग्रँड आर्मी, त्याचें तें प्रचंड लष्कर, हळूहळू मोठ्या कष्टानें माघार घेऊं लागतें. प्रवास सगळा रशियांतील बर्फावरचा आणि त्यांतच दोन्ही बाजूंनीं आणि पाठीमागूनही रशियाच्या कोसाक टोळ्यांचा ससेमिरा. केव्हां त्यांचा छुपा हल्ला यावा, केव्हां त्यांनीं आगी लावाव्या किंवा नुसतीच हूल दाखवावी आणि एकटादुकटा मागें राहिलेला कोणी सांपडला कीं त्याला कापून काढावें, असा नुसता भुंगा या लोकांचा सुरू होतो. एका बाजूला अत्यंत गार बर्फ आणि दुसऱ्या बाजूला हे कोसाक सैनिक यांच्यांत मिळून त्याच्या हजारों लोकांचा बळी घेतला जातो आणि त्या प्रचंड सैन्याची ती यात्रा अगदींच केविलवाणी आणि भुतासारखी होऊन जाते; सगळेजण पायीं चाललेले, अंगावरचे कपडे फाटले-तुटलेले, अनवाणी चालून चालून पायाला फोड आलेले, बर्फानें पायांची चामडीं सोलून निघालेलीं अशा स्थितींत बिचारे कशींतरी पावलें पुढें टाकीत असतात एवढेंच. आपल्या तोफखान्याच्या पथकासंगतीं नेपोलियनही स्वतः पुढें पायींच चालत असतो. या भयंकर हृदयविदारक यात्रेमध्यें त्याचें सैन्य रोजच्या रोज कमी कमी होत जातें आणि शेवटीं जवळजवळ मुळींच शिल्लक राहिलें नाहींसें होऊन जातें. काय थोडेसे मूठभर लोक घरीं जाऊन पोंचतात तेवढेच.

ही रशियन मोहीम म्हणजे नेपोलियनला फारच मोठा फटका होऊन गेला. त्यामुळें फ्रान्सचें मनुष्यबळ सर्वस्वीं संपून गेलें. त्यापेक्षां अधिक म्हणजे नेपोलियनवर

म्हातारपणाची कळा आली. तो चिंताग्रस्त होऊन गेला आणि लढाईच्या धकाधकीचा त्याला कंटाळा येऊन गेला; पण त्याला आतां शांतपणें राहावयाला मिळावयाचें नव्हतें. लगेच त्याच्या शत्रूंनीं चोहोंकडून त्याला घेरलें; अजूनही त्याच्या ठिकाणचें तें पूर्वीचें सेनानायकाचें अद्भुत कौशल्य जरी कायम होतें आणि त्यास जयच मिळत जात होते, तरीही शत्रूचें तें कडें नित्य अधिकाधिक आंवळतच गेलें. टॅलेरॉंडचीं गुप्त कारस्थानें वाढत गेलीं आणि नेपोलियनचे अगदीं पूर्ण विश्वासांतले असे कांहीं सेनापतीच त्याच्यावर उलटले. त्यामुळें थकून जाऊन आणि या सगळ्या विश्वासघातकी वातावरणाचा वीट येऊन १८१४ च्या एप्रिल महिन्यांत त्यानें राज्यत्याग केला.

आता नेपोलियनचा कांटा वाटेंतून दूर झाल्यामुळें यूरप खंडांतील देशाच्या पुनः नवीन सरहद्दी ठरविण्यासाठीं म्हणून यूरपीय राज्यांचीं एक मोठी परिषद् व्हिएन्ना येथें भरविण्यांत आली. नेपोलियनची रवानगी भूमध्य समुद्रावरील एल्बा नांवाच्या बेटावर करून देण्यांत आली. बोर्बोन घराण्यांतीलच आणखी एक लुई, ज्याचा गिलोटीनखालीं वध झाला त्या लुईचा भाऊ, त्याला तो जेथें कोठें एकांतवासांत जाऊन दडून राहिला होता तेथून शोधून काढून फ्रान्समध्यें आणण्यांत आलें आणि अठरावा लुई म्हणून त्याची गादीवर स्थापना करण्यांत आली. अशा तऱ्हेनें पुन्हां एकदां बोर्बोन घराण्याचा अम्मल सुरू झाला आणि त्याबरोबरच पूर्वीची ती जुलूमजबरदस्तीपण सुरू झाली. म्हणजे बॅस्टील पडल्यानंतर पंचवीस वर्षेपर्यंत जी कांहीं शौर्य-धैर्याची कामगिरी करण्यांत आलेली होती, तिचा हा अशा रीतीनें पुरा अंत करण्यांत आला. व्हिएन्ना येथें जमलेले हे राजे लोक आणि त्यांचे मंत्री अधूनमधून आपसांत चर्चा करीत किंवा वर्दळीवर येत आणि दरम्यानच्या बाकीच्या काळांत जिवाची मौज करून घेत. आतां कसें त्यांना अतिशय ओझें उतरून हलकें झाल्यासारखें वाटत होतें. त्यांच्या मानगुटीला बसलेलें केवढें तरी संकट दूर होऊन त्यांना आतां जरा मोकळेपणीं श्वास घ्यायला सवड मिळाली होती. नेपोलियनचा विश्वासघात करणारा देशद्रोही मंत्री टॅलेरॉंड याची या राजांमध्यें आणि प्रधानांमध्यें फारच चहा आणि चलती होती. या परिषदेंत त्यानें पुष्कळच महत्त्वाचें कार्य केलें. या परिषदेंतील आणखी एक प्रसिद्ध मुत्सद्दी ऑस्ट्रियाचा परराष्ट्रमंत्री मेटरनिक् हा होता.

एका वर्षाच्या आंतच नेपोलियन एल्बाला कंटाळला आणि फ्रान्सलाही बोर्बोन घराण्याची कारकीर्द पुरेशी झाली. एका छोट्याशा होडक्यामध्यें बसून नेपोलियन एल्बा बेटांतून निसटला आणि इ. स. १८१५ च्या फेब्रुवारी महिन्याच्या सव्विसाव्या तारखेस रिव्हिएराच्या आसपासच्या कॅने बंदरांत तो उतरला. शेतकरी लोकांनीं त्याचें मोठ्याच उत्साहानें स्वागत केलें. त्याच्याविरुद्ध लढाई देण्यासाठीं म्हणून जें सैन्य पाठविलें होतें, त्यानें आपला जुना सेनानायक असा तो 'छोटा नाईक' पाहतांच त्या सैनिकांनीं 'बादशहा दीर्घयुषी असोत' अशी आरोळी ठोकली आणि ते त्यालाच जाऊन मिळाले. अशा रीतीनें विजयी होऊन मोठ्या दिमाखानें तो

पॅरिसमध्यें येऊन पोहोंचला आणि बोर्बोन घराण्यांतील राजा पळून गेला; परंतु यामुळें यूरप खंडांतील इतर सर्व राजधान्यांमध्यें मात्र जिकडे तिकडे भयंकर भीति आणि घाबरगुंडी उडून गेली. व्हिएन्नामध्यें ती जी परिषद् चालली होती, नाचरंग आणि मेजवान्या यांची जी लयलूट चालू होती ती सर्व एकदम बंद झाली आणि सगळ्या राजांना आणि प्रधानांना एकच एक भीति असल्यामुळें आपलीं खाजगी भांडणें आणि कुरबूर विसरून जाऊन ते सगळेजण पुन्हां एकदां नेपोलियनचा पुरा पाडाव करण्याच्या बाचतीपुरते पूर्ण एकचित्त झाले. अशा रीतीनें सर्व यूरप खंड फ्रान्सवर चालून आलें; परंतु फ्रान्स देश खरोखर आतां लढाईला कंटाळलेला होता. नेपोलियनचें वय जरी या वेळीं फक्त शेहेचाळीस वर्षांचें होतें, तरी तोही आतां म्हातारा आणि थकलाभागलेला असा झाला होता. त्याची बायको मेरी लुईसी हीही त्याचा त्याग करून निघून गेली होती. या नव्या युद्धांत कांहीं लढायांत त्यानें विजय संपादन केले; परंतु अखेरीस ब्रूसेल्स शहराजवळच्या वॉटर्लूच्या मैदानावर वेलिंग्टन आणि ब्लूचर यांच्या आधिपत्याखालील इंग्रज आणि प्राशियन सैन्याकडून तो परत आल्यापासून बरोबर शंभर दिवसांनीं त्याचा पराभव झाला. यासाठीं त्याच्या परत येण्याच्या या काळाला "ते शंभर दिवस" असें इतिहासामध्यें नांव देण्यांत आलें आहे. वॉटर्लू येथील लढाई ही कांहीं खरोखर अगदीं शर्थीची अशी लढाई झालीच नाहीं. शेवटल्या क्षणापर्यंत अमक्याच पक्षाला जय मिळेल अशी कांहींच खात्री नव्हती; परंतु नेपोलियन हा दुर्दैवी ठरला. ही लढाई कदाचित् त्याला जिंकतांही आली असती; परंतु ती जिंकूनसुद्धां कांहीं काळानंतर त्याला यूरप खंडाच्या एकत्र झालेल्या सैन्यापुढें एक वेळ नमावेंच लागलें असतें. आतां त्याचा पराभव झाला असें दिसून येतांच त्याच्या पाठीराख्यांपैकींच पुष्कळसे लोक त्यावर उलटले आणि अशा रीतीनें त्यांनीं आपल्या स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. अशा स्थितींत आणखी झगडा करीत राहून कांहींच उपयोग नव्हता. म्हणून पुन्हां एकदां त्यानें राज्यत्याग केला आणि फ्रेंच बंदरांत नांगरलेल्या एका इंग्रज जहाजावर जाऊन तेथील खलाश्यांच्या तो स्वाधीन झाला. 'माझ्या मनांतून आतां इंग्लंडमध्यें जाऊन शांतपणें काळ कंठावा असें आहे' अशी इच्छा त्यांच्याजवळ त्यानें व्यक्त केली.

आपल्याला इंग्लंडकडून किंवा यूरप खंडाकडूनही उदारपणानें किंवा सभ्यपणानें वागविलें जाईल अशी खरोखरच जर नेपोलियनची समजूत असली, तर त्यांत त्याची फारच मोठी चूक होती. हे सगळे लोक त्याला इतके भयंकर भीत होते कीं त्यामुळें आणि तो नुकताच एल्बांतून निसटून आलेला असल्यामुळें त्याला कोठें तरी दूर नेऊन अगदीं चांगल्या खड्या पाहऱ्यामध्यें ठेवलें पाहिजे, याबद्दल त्यांच्या मनामध्यें तिळमात्र सुद्धां संशय राहिलेला नव्हता. म्हणून त्यानें केलेली कोणतीही तक्रार न ऐकतां त्याला त्यांनीं कैद केल्याचें जाहीर केलें आणि बरोबर थोडेसे लोक बोलण्याचालण्यासाठीं किंवा सेवेसाठीं म्हणून देऊन दक्षिण ॲटलांटिक महासागरांतील सेंट हेलेना या

अत्यंत दूरच्या एका बेटावर त्यांनीं त्याची रवानगी केली. सगळ्या यूरप खंडाचा तो कैदी समजला जात असे. त्यामुळें पुष्कळशीं राज्यें आपापला प्रतिनिधि तेथें त्याच्यावर नजर ठेवण्याकरिता म्हणून पाठवीत असत. तथापि त्याच्यावर पाहरा करून त्याला सांभाळण्याची खरी जबाबदारी इंग्लंडवरच होती. हें बेट जगापासून जरी इतकें दूर होतें, जगाशीं त्याचा कांहींएक संबंध येत नव्हता, तरीसुद्धां नेपोलियनवर देखरेख ठेवण्यासाठीं इंग्रजांनीं भलें मोठें सैन्य तेथें नेऊन ठेवलें होतें. सेंट हेलेनाच्या एकाकी खडकाचें वर्णन त्याच वेळीं तेथें गेलेला रशियाचा प्रतिनिधि काउंट बालमेन यानें पुढीलप्रमाणें केलें आहे : " ही जागा साऱ्या जगामध्यें जास्तींत जास्त निरुत्साह उत्पन्न करणारी, सगळ्यांत अधिक एकांतवासाची; तेथें जाऊन पोंचण्याला सगळ्यांत अधिक कठिण ; संरक्षण करण्याला सर्वांत अधिक सोपी, हल्ला करण्याला सर्वांत अधिक अडचणीची ; माणसाच्या वस्तीला–समाजाला–सर्वांत अधिक प्रतिकूल अशी आहे." इंग्रजांनीं त्या बेटाचा गव्हर्नर जो नेमला होता, तो अगदींच विलक्षण, जगावेगळा माणुसघाण्या आणि रानवट मनुष्य होता. त्यानें नेपोलियनला फारच हलकटपणानें वागविलें. याही बेटावर एका जास्तींत जास्त घाण जागीं एका मोडक्या गचाळ घरांत त्याला ठेवण्यांत आलें होतें आणि त्याच्यावर व त्याच्या सोबत्यांवर नानाविध अपमानकारक निर्बंध घालण्यांत आले होते. कित्येकदां तर त्याला धड पोटभर चांगलें, रुचकर व पथ्यकारक अन्नसुद्धां खायला मिळत नसे. त्याला आपल्या यूरपमधील मित्रमंडळींशीं पत्रव्यवहार करावयाला मोकळीक नव्हती. तो राज्यावर असतांना आपल्या लहान मुलाला त्यानें 'इटालीचा राजा' ही पदवी दिलेली होती. त्या त्याच्या लहान मुलाशींसुद्धा त्याला पत्रव्यवहार करायला येत नसे. एवढेंच नव्हे, तर त्याच्या मुलाची हालचालसुद्धां त्याला कळूं दिली जात नसे.

नेपोलियनला इतक्या वाईट रीतीनें वागविण्यांत आल्याचें पाहून मोठें आश्चर्य वाटतें ! परंतु सेंट हेलेना बेटाचा गव्हर्नर काय, बिचारा आपल्या सरकारचा एक हस्तक मात्र होता. तेव्हां आपल्या या कैद्याला अशा रीतीनें वाईट वागविण्याचें आणि त्याचा अपमान करण्याचें धोरणच इंग्रज सरकारचें जाणूनबुजून ठरलेलें असावें. यूरप खंडांतील इतर राज्यकर्त्यांचीही या गोष्टीला संमति असल्यामुळें त्यांच्यावरही यातली जबाबदारी येते. नेपोलियनची आई इतक्या म्हातारपणींसुद्धा सेंट हेलेनामध्यें जाऊन राहावें असें म्हणत होती ; पण यूरप खंडाच्या मोठ्या देशांनीं तिला परवानगी दिली नाहीं. नेपोलियनचे सारे पंख आतां तोडून टाकण्यांत आले होते आणि एका दूरच्या बेटावर अगदीं सत्ताहीन होऊन तो बसला होता. तरीसुद्धां त्याला इतक्या हलकट रीतीनें वागवण्यांत येत होतें. यावरून साऱ्या यूरप खंडभर त्याची भीति किती मोठ्या प्रमाणांत बसलेली होती याचा अंदाज येण्यासारखा आहे.

सेंट हेलेना बेटावर अशा रीतीनें हें जीवंत मरण नेपोलियननें साडेपांच वर्षेपर्यंत सहन केलें. इतकी मोठी शक्ति व उत्साह असणारा आणि एवढा मोठा महत्त्वा-

कांक्षी, अशा या मनुष्यावर जेव्हां एका लहानशा खडकाळ बेटावर कोंडून पडण्याचा प्रसंग आला आणि त्यांतही रोजच्या रोज क्षुद्र लोकांनीं केलेले अपमान सहन करावे लागूं लागले, तेव्हां त्याच्या मनाला केवढ्या यातना झाल्या असतील याची कल्पना करणें कांहीं कठिण नाहीं. १८२१ च्या मे महिन्यांत तो मरण पावला; परंतु मृत्युनंतरसुद्धां त्याच्या गव्हर्नरच्या द्वेषानें त्याची पाठ सोडली नाहीं आणि त्याच्या प्रेतावर एक भिकारडें थडगें उभारण्यांत आलें. नेपोलियनला कशा वाईट रीतीनें वागविण्यांत आलें, त्याचा छळ कसा करण्यांत आला याची बातमी हळूहळू जशी यूरपमध्यें येऊन पोंचली (या बातम्या पोंचावयाला त्या काळीं फारच उशीर लागत असे), तसा त्याविरुद्ध इंग्लंडसुद्धां पुष्कळ देशांत फारच आरडाओरडा सुरू झाला. या वाईट वागणुकीची प्रत्यक्ष जबाबदारी मुख्यतः ज्याच्यावर होती तो कॅसलरा हा इंग्लंडचा त्या वेळचा परराष्ट्रमंत्री त्यामुळें लोकांमध्यें फारच अप्रिय झाला; या अप्रियतेला त्याच स्थानिक कठोरतेचें घोरणही कारण होतेंच. लोकांमधील या तिटकाऱ्याचें त्याला इतकें वाईट वाटलें, कीं त्यानें त्यावरून आत्महत्या केली.

श्रेष्ठ आणि अलौकिक मनुष्यांबद्दल बऱ्यावाईटपणाचा निर्णय देणें हें फारच कठिण काम आहे आणि नेपोलियन हा असा श्रेष्ठ आणि अलौकिक पुरुष होता याबद्दल कांहींच संशय असणें शक्य नाहीं. वारा व पाऊस यांच्यासारख्या निसर्गांतील महान् शक्तीप्रमाणें त्याची शक्ति फारच प्रचंड आणि अप्रतिहत होती. त्याच्या ठिकाणीं नवनव्या विचारांचें स्फुरण होत होतें; त्याची कल्पनाशक्ति मोठी समर्थ होती; परंतु उच्च ध्येयांची आणि स्वार्थरहित हेतूंची किंमत ओळखण्याची ताकद त्याच्या ठिकाणीं नव्हती. लोकांना वैभव आणि संपत्ति देऊं करून त्यांच्यावर आपली छाप टाकण्याचा व त्यांना आपणांकडे वळविण्याचा त्याचा नेहमीं प्रयत्न असे. त्यामुळें त्याच्या वैभवाचा आणि सत्तेचा सांठा जसा संपुष्टांत येऊं लागला, तेव्हां ज्या लोकांना त्यानें पुढें आणलें होतें त्यांच्यामध्यें त्याच्याशीं ज्यासाठीं त्यांनीं एकनिष्ठ राहावें असे कोणतेच उच्च ध्येयात्मक हेतू राहिले नाहींत आणि म्हणून पुष्कळांनीं हलकटपणानें त्याला सोडूनही दिलें. धर्माचें बंधन असेल म्हणावें, तर त्याच्या दृष्टीनें धर्म म्हणजे गरीब आणि दलित लोकांना आपल्या प्राप्त अवस्थेबद्दल संतुष्ट राखण्याचें एक साधन किंवा मार्ग मात्र होता. ख्रिश्चन धर्माबद्दल एकदां तो म्हणाला, "ज्या धर्माप्रमाणें प्लेटो किंवा सॉक्रेटीस हे नरकांत जाण्यास पात्र असे पापी ठरतात, तो धर्म मी कसा स्वीकारूं?" इजिप्तमध्यें असतांना त्यानें इस्लाम धर्माविषयीं आपल्या मनाचा थोडा अनुकूल ग्रह व्यक्त केला, तो तरी असें केल्यानें तेथील लोकांचें प्रेम आपल्याबद्दल निर्माण करतां येईल अशी त्याची कल्पना होती म्हणून, यांत कांहींच संशय नाहीं. तो स्वतः सर्वस्वीं अधार्मिक होता. तरीपण धर्माला त्याचा नेहमीं पाठिंबा असे. कारण धर्म हा प्रचलित समाजव्यवस्थेचा मोठाच आधारस्तंभ आहे अशा प्रकारची त्याची भावना होती. तो म्हणे, "धर्मानें समतेच्या कल्पनेचें

अस्तित्व फक्त स्वर्गाच्या ठिकाणीं, परमेश्वराच्या ठिकाणीं कल्पित केलेलें आहे. त्यामुळें गरिबांकडून श्रीमंतांची कत्तल होण्याचें टळतें. रोगप्रतिबंधक लशीचा जो उपयोग तसाच धर्माचा आहे. मनुष्याच्या ठिकाणीं अद्भुततेबद्दल जी एक स्वाभाविक अभिरुचि आहे तिचा संतोष धर्मामुळें साधतो आणि त्या पायीं, कदाचित् आपण जे भोंदू किंवा किमयागारांच्या नादीं लागण्याचा संभव असतो, त्यापासून आपण वांचतों. मालमत्तेच्या बाबतींत विषमता असल्याशिवाय समाज टिकणारच नाहीं. आपल्या शेजारचा मनुष्य पक्कान्नावर ताव मारीत आहे असें दिसत असतां, ज्या माणसावर उपासमारीनें मरण्याची पाळी येईल तो मनुष्य धर्मावर जर त्याची अढळ निष्ठा असेल आणि परलोकामध्यें याहून निराळ्या प्रकारची संपत्तीची वांटणी होऊन आपलें दैन्य संपेल या विचाराचा त्याला आधार असेल, तरच मात्र जगून राहूं शकेल." त्याला आपल्या सामर्थ्याचा इतका अभिमान होता, कीं त्या ताव्यांत तो एकदां म्हणाला होता म्हणतात कीं, "वरचें आभाळ जर आपल्यावर कोसळून पडणारच असेल, तर आम्ही आपल्या भाल्यांच्या टोंकांवर तें वर उचलून धरूं."

श्रेष्ठ पुरुषांच्या ठिकाणीं दुसऱ्याला मोहनी घालण्याचें जें सामर्थ्य असतें, तें त्याच्या ठिकाणीं होतें. त्यामुळें पुष्कळांची अत्यंत भक्तियुक्त मैत्री त्यानें संपादन केली. अकबराप्रमाणें त्याच्याही दृष्टींत जादूसारखी आकर्षकता होती. तो एकदां म्हणाला होता कीं, "मीं माझी तलवार म्यानांतून क्वचितच बाहेर काढली असेल. मी लढाया डोळ्यांनीं जिंकीत असतों, हत्यारांनीं नव्हे!" साऱ्या यूरप खंडाला ज्यानें युद्धाच्या खाईत लोटलें अशा माणसाच्या तोंडीं केवढी ही विचित्र भाषा! पुढच्या काळामध्यें तो हद्दपारीमध्यें असतांना एकदां म्हणाला, "बळ किंवा शक्ति हा कांहीं उपाय नव्हे; तलवारीपेक्षां मनुष्याची अंतःशक्ति, मन, हें अधिक श्रेष्ठ आहे." तो एकदां असेंही म्हणाला, "मला सगळ्यांत अधिक अचंबा कशाचा वाटतो, ठाऊक आहे तुम्हांला? कोणतीही गोष्ट घडवून आणण्याचें सामर्थ्य शक्तीच्या, सक्तीच्या ठिकाणीं असत नाहीं या गोष्टीचा. जगामध्यें दोन गोष्टींच्या ठिकाणीं सत्तेचें अस्तित्व आहे. एक मन आणि दुसरी तरवार! पण अखेरीस नेहमीं मनाचा तरवारीवर विजय व्हावयाचा हें ठरलेलें!" परंतु अशी अखेर साधण्यापर्यंत दीर्घ काळ वाट पाहत राहण्याला नेपोलियनला सवड नव्हती. त्याला सर्व प्रकरण अगदीं झटपट उरकणें जरूर होतें. म्हणून आपल्या चरित्रक्रमाच्या सुरुवातीलाच त्यानें तरवारीचा मार्ग पत्करला होता. तरवारीच्या बळावरच त्याचा विजय झाला आणि तरवारीच्या बळावरच त्याचा पाडाव झाला! पुन्हां एका ठिकाणीं तो म्हणतो, "युद्ध हें एक कालविपर्यासाचें उदाहरण आहे. (या काळाला योग्य नसलेलें असें तें एक साधन आहे.) एक काळ असा खास येईल कीं त्या वेळीं मनुष्याला तोफेच्या गोळ्यावांचून आणि संगिनीवांचून यश-जय मिळवतां येईल." परंतु त्याच्यापुढची सारी परिस्थिति या प्रकारच्या प्रयत्नाला विसंगत, त्याच्या आटोक्याबाहेरची होती. त्याची अवखळ व सदा पुढें पुढें उड्या मारणारी महत्त्वाकांक्षा,

युद्धामध्यें त्याला विनायास मिळत गेलेला विजय, यूरपमधील राज्यकर्त्यांना या उपटसुंभ मनुष्याविषयीं वाटणारा तिटकारा आणि भीति, या कारणांमुळें नेपोलियनला शांततेनें स्थिरस्थावर होण्याला अवसरच मिळाला नाहीं. युद्धांमध्यें सैनिकांच्या प्राणांची आहुती देण्यास तो यत्किंचित् मागें-पुढें पाहत नसे; परंतु कोणाच्याही यातना पाहिल्या म्हणजे त्याच्या अंतःकरणाची फारच तळमळ होत असे असें म्हणतात.

आपल्या वैयक्तिक जीवनांत त्याची राहणी अतिशय साधी होती. कोणत्याही गोष्टीचा त्यानें अतिरेक केला नाहीं; एक कामाचा तेवढा त्यानें अतिरेक केला तो सोडून. त्याचें असें म्हणणें असे कीं, "मनुष्यानें कितीही कमी खायचें म्हटलें तरीही त्याच्या पोटांत जरुरीपेक्षां जास्त अन्न जातेंच. फाजिल खाण्यामुळें मनुष्य आजारी पडूं शकेल; परंतु कमी खाण्यामुळें माणूस केव्हांही आजारी पडूं शकणार नाहीं." त्याच्या या साध्या राहणीमुळें त्याची प्रकृति फारच उत्कृष्ट राहिली आणि प्रचंड सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं उत्पन्न झालें. मनांत आलें कीं त्याला झोंप लागूं शकत असे आणि कितीही थोडी झोंप घ्यायची म्हटली तरी तेवढी घेऊन तो उठत असे. सकाळीं आणि संध्याकाळीं मिळून शंभर मैल घोड्यावरून फेरफटका करणें ही कांहीं त्याच्या बाबतींत विशेष अलौकिक अशी गोष्ट नव्हती.

महत्त्वाकांक्षेच्या भरीं भरून नेपोलियननें सारें यूरपखंड पायांखालीं तुडविलें होतें. त्यामुळें त्याच्या मनापुढें साऱ्या यूरपखंडाचें एकच राज्य असावें अशी कल्पना निर्माण झाली होती. "राज्य एक, त्यांतील कायदे सर्व ठिकाणीं सारखे, राज्य-व्यवस्थाही एकाच प्रकारची," असा त्याचा विचार होता. "या सगळ्या राष्ट्रांना मी एका राष्ट्रामध्यें विलीन करीन" असें तो म्हणे. पुढें सेंट हेलेनामध्यें हद्दपारींत असताना त्याच्या ठिकाणीं विचारीपणा जेव्हां अधिक वाढला, तेव्हां हा वरचा विचार त्याच्या मनांत पुन्हां एकदां जागृत झाला. परंतु या वेळीं त्यांत त्याच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा संपर्क नव्हता. तो या वेळीं म्हणतो, "केव्हां ना केव्हां तरी परिस्थितीच्या जोरामुळेंच असें हें ऐक्य (यूरपीय राष्ट्रांचें) घडून येईलच येईल! या बाबतींतील पहिली प्रेरणा मीं दिली आहे आणि मीं जी पद्धत घालून दिलेली आहे ती नाहींशी झाल्यानंतर, मला तर असें वाटतें, कीं यूरपमध्यें शांतता आणि स्वास्थ्य प्रस्थापित होण्याचा एकच फक्त मार्ग शिल्लक राहील. तो म्हणजे सर्वांचा मिळून एक राष्ट्रसंघ स्थापण्याचा!" या गोष्टीला १०० वर्षें होऊन गेलीं, तरीपण यूरप खंड अजून राष्ट्र-संघाचा प्रयोग करीत अंधारांतच चांचपडत आहे.

त्यानें अखेरचें जें एक मृत्युपत्र लिहून ठेवलें आहे, त्यामध्यें त्यानें आपल्या अल्प-वयी मुलाला एक संदेश लिहून ठेवला आहे. त्याच मुलाला त्यानें रोमचा बादशहा म्हणून जाहीर केलें होतें आणि त्याच्याचबद्दल कसलीही बातमी नेपोलियनला न कळूं देण्याचा दुष्ट निर्दयपणा केला जात होता. त्याला अशी आशा होती, कीं आपला मुलगा केव्हां तरी राजा होईल. म्हणून त्यानें शांततेनें राज्यकारभार करावा, सक्तीचा

किंवा जुलुमाचा त्यानें अवलंब करूं नये असा त्याचा उपदेश होता. त्यानें लिहिलें आहे "यूरप खंडामध्यें माझा दरारा बसण्यासाठीं मला शस्त्रांचा उपयोग करावा लागला; परंतु सध्यांच्या काळचा मार्ग बुद्धिवादानें लोकांचीं मनें वळविणें हा आहे." परंतु या मुलाच्या नशिबांत राज्यपद भोगण्याचें नव्हतें. बापानंतर अकरा वर्षांनींच आपल्या अगदीं ऐन तारुण्यांत व्हिएन्ना येथें तो मरण पावला.

पण हे सगळे विचार हृद्पारीमध्यें असतांना आणि त्याची वृत्ति पुष्कळशी विचारी आणि मृदु झाली असतांना नेपोलियनच्या मनामध्यें आले. त्याचप्रमाणें आपल्या पुढच्या पिढ्यांची आपल्याविषयीं अनुकूल मतें व्हावीं या बुद्धीनेंही हें सारें त्यानें लिहिलें असेल. त्याच्या श्रेष्ठपणाच्या काळांत त्याचा सारा वेळ कामाच्या धकाधकींत इतका जात होता कीं तत्त्वज्ञांप्रमाणें विचार करायाला त्याला फुरसतही नव्हती. त्या वेळीं त्याची सारी पूजाअर्चा सत्तादेवीच्या पायांशीं चाललेली होती. त्याचें खरें आणि एकच प्रेम कशावर असलेंच तर तें सत्तेवर होतें. मात्र त्याचें हें प्रेम कलावंताच्या हृदयांतलें होतें. एखाद्या रानगटासारखें तें नव्हतें. तो म्हणतो, "माझें सत्तेवर प्रेम आहे; होय, आहे माझें प्रेम सत्तेवर; पण कलावंताचें आपल्या कलेच्या ठिकाणीं ज्या प्रकारचें प्रेम असतें त्या प्रकारचें तें आहे. फिडल वाजविणाराचें आपल्या फिडलवर कशासाठीं प्रेम असतें? तर आपल्या जादूच्या स्पर्शानें त्याच्या तारांमधून स्वर, लकेरी आणि मधुर संगीताची लय उत्पन्न करण्यासाठीं! तसेंच माझ्याही सत्ताप्रेमाचें आहे." हें सगळें जरी खरें असलें, तरी वारंवार सत्तेच्या पाठीमागें लागणें ही गोष्ट धोक्याचीच असते. आज ना उद्यां अशा सत्तेच्या मागें लागणाऱ्या व्यक्तींचा काय किंवा राष्ट्रांचा काय, ऱ्हास आणि नाश हा व्हावयाचाच! अशाच न्यायानें नेपोलियनचा पाडाव झाला आणि तो झाला हेंही बरेंच झालें.

त्याच्या मागून इकडे फ्रान्समध्यें पुन्हां बोर्बोन घराण्याची कारकीर्द सुरू झाली; परंतु कोणीं तरी म्हटलें आहे, कीं या बोर्बोन घराण्यांतील लोकांना नवीन कांहीं शिकण्याची किंवा पूर्वीचें शिकलेलें विसरून जाण्याची अक्कलच नव्हती. नेपोलियनच्या मृत्यूनंतर नऊ वर्षांच्या आंतच फ्रान्स देश या राजांना कंटाळला आणि तेथील लोकांनीं त्यांना उलथून टाकलें. त्यानंतर दुसरें एक राजघराणें स्थापन झालें आणि नेपोलियनबद्दल देशामध्यें आतां पुन्हां एकदां सद्भाव जागृत झाला होता, याचें निदर्शक म्हणून वेंडोम या श्रेष्ठतम फ्रेंच सेनापतीच्या नांवानें उभारलेल्या विजयी सेनापतीच्या स्तंभाच्या शिखरावरून त्याचा पुतळा काढून टाकण्यांत आला होता, तो पुन्हां तेथें बसविण्यांत आला.

या सुमारास त्याची आई वृद्धपणामुळें आधळी झालेली होती; तरीपण त्या दुःखी-कष्टी मातेनें या वेळीं उद्गार काढले, "बादशहा आज पुन्हां पॅरिसमध्यें आला!"

## १०६

# एकवार सर्व जगाची संकलित पाहणी

१९ नोव्हेंबर, १९३२

जगाच्या रंगभूमीवर इतका काळ दणका गाजविल्यानंतर अशा रीतीनें अखेरीस नेपोलियन तेथून निघून गेला. तेव्हांपासून आतां शंभरांहून अधिक वर्षें होऊन गेलीं आहेत आणि त्याच्यासंबंधीं मतामतांचें उठलेलें वादळ आतां बहुतेक शमलेलें आहे. तरीपण मीं मागें म्हटल्याप्रमाणें अद्यापिही निरनिराळ्या लोकांचीं त्याच्याविषयीं निरनिराळीं मतें आहेत. संभव असा वाटतो, कीं नेपोलियन जर दुसऱ्या एखाद्या जास्त शांततेच्या काळीं जन्माला आला असता, तर तो एक अत्यंत कर्तबगार आणि बुद्धिवान् सेनापति म्हणून चमकला असता; याहून कांहीं विशेष नाहीं आणि मग त्याची लोकांमध्यें एवढी चहा आणि स्मृति पण राहिली नसती; परंतु क्रांति आणि बदलतें कालमान यांमुळें त्याला पुढें सरकण्याची संधि मिळाली आणि ती त्यानें चांगली साधली. त्याचा पाडाव होऊन यूरपीय राजकारणांतून तो नाहींसा झाला यामुळें यूरप खंडांतील लोकांना फार हायसें वाटलें असेल. कारण ते सगळेजण आतां युद्धाला कंटाळलेले होते. एका संबंध पिढीला शांततेचा काळ असा माहीतच नव्हता आणि शांततेसाठीं लोकांचीं मनें अगदीं आसावलेलीं होतीं. नेपोलियन गेल्यानें यूरप खंडांतील राजे आणि महाराजे लोकांना जितकें हायसें वाटलें, तितकें तर दुसऱ्या कोणालाही वाटलें नसेल. कारण आज किती वर्षें नेपोलियनच्या नुसत्या नांवानें त्यांच्या हृदयांत धडकी भरून राहत आली होती.

आतांपर्यंत फ्रान्समध्यें आणि यूरपमध्यें आपण फारच वेळ घालविला आहे. शिवाय आतां आपण एकोणिसाव्या शतकांतही बराचसा शिरकाव केलेला आहे. तेव्हां येथें जरा थांबून एकदां सगळ्या जगाचें आपण निरीक्षण करूं या आणि नेपोलियनच्या पाडावाच्या वेळीं जगाची अवस्था कशी काय होती हें पाहूं या.

यूरपमध्यें सगळे जुने राजे आणि त्यांचे मंत्री यांची एक परिषद् व्हिएन्ना येथें भरलेली होती, हें तुला आठवत असेल. त्यांच्या पुढचा बागुलबुवा आतां नाहींसा झालेला होता. तेव्हां आतां आपला तो पूर्वीचा खेळ करायला आणि आपल्या लहरीप्रमाणें आणि मर्जीप्रमाणें कोट्यवधि लोकांचें भवितव्य ठरवून टाकायला त्यांना आतां कशाचीच हरकत नव्हती. लोकांच्या इच्छा काय होत्या, हा त्यांच्यापुढें विचार नव्हता किंवा देशांच्या निसर्गसिद्ध आणि भाषावार सरहद्दी कशा काय होत्या याचीही त्यांना फिकीर करावयाची नव्हती. तेथें जमलेल्यांमध्यें रशियाचा झार, इंग्लंड (कॅसलरा हा इंग्लंडचा प्रतिनिधि होता), ऑस्ट्रिया (प्रतिनिधि मेटरनिक्) आणि प्रशिया अशीं चार प्रमुख राष्ट्रें होतीं. पांचवा अर्थात् टॅलेरँड हा होताच. हा हुषार,

चतुर, बुद्धिमान् आणि लोकप्रिय माणूस प्रथम नेपोलियनचा मंत्री होता आणि आतां फ्रान्सच्या बोर्बोन घराण्यांतील राजांचा मंत्री झालेला होता. नाच-गाणीं आणि मेजवान्या यांच्या दरम्यान जो कांहीं वेळ मिळेल त्यांत या लोकांनीं यूरपचा नकाशा नेपोलियननें जो अगदींच इतका मोठा बदलून टाकला होता, तो पुन्हां एकदां ठाकठीक केला.

फ्रान्सच्या डोक्यावर बोर्बोन घराण्यांतील अठराव्या लुईला लादण्यांत आलें. स्पेनमध्यें इन्क्विझिशनच्या न्यायासनाचीसुद्धां पुन्हां स्थापना करण्यांत आली. या परिषदेस जमलेल्या राजेलोकांना प्रजासत्ताक राज्यपद्धति मुळींच रुचणारी नव्हती. त्यामुळें त्यांनीं हॉलंडमध्यें पहिलें जें प्रजासत्ताक राज्य होतें त्याऐवजीं हॉलंड आणि बेल्जम् यांची नेदर्लंड म्हणून एका ठिकाणीं गठडी करून तेथें एका राजाचें राज्य प्रस्थापित केलें. या लोकांनीं पुन्हां एकदां स्वतंत्र देश म्हणून पोलंडचा कोणताच भाग शिल्लक ठेवला नाहीं. हा देश ऑस्ट्रिया, प्रशिया व विशेषतः रशिया यांनीं गिळंकृत करून टाकला. व्हेनिस आणि उत्तर-इटली हा प्रांत फ्रान्सकडे देण्यांत आला. थोडासा इटलीचा तुकडा आणि स्वित्झर्लंड व रिन्हिएरा यांच्या दरम्यानचा फ्रान्सचा एक तुकडा असे दोन तुकडे मिळून सार्डिनिया नांवाचें नवीनच एक राज्य प्रस्थापित करण्यांत आलें. मध्य यूरपमध्यें जर्मन संघराज्य ( confederation ) आहे अशा प्रकारची कांहींशी चमत्कारिक आणि अंधुक कल्पना ठरविण्यांत आली ; परंतु त्यामध्यें खरीं प्रमुख अशीं दोनच राज्यें होतीं. एक प्रशियाचें आणि दुसरें ऑस्ट्रियाचें. आणखी-ही पुष्कळच फेरबदल परिषदेकडून करण्यांत आले. अशा रीतीनें व्हिएन्ना येथें जमा झालेल्या या बुद्धु शाहण्या लोकांनीं आपल्या मनाप्रमाणें आपल्या जगाची व्यवस्था लावतांना, लोकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध या राज्यांतून त्या राज्यांत घातलें, आपली मूळची मायभाषा जी नव्हे अशी भाषा शिकण्याची सक्तीनें त्यांच्यावर पाळी आणली आणि भविष्यकाळाच्या कटकटी आणि युद्धें यांची तयारीच सामान्यपणें करून ठेवली !

१८१४-१५ या सालांमध्यें भरलेल्या व्हिएन्ना येथील परिषदेपुढें मुख्य काळजीचा विषय कोणता असेल, तर राजेलोकांचें बूड कायमचें स्थिर कसें करावयाचें हा. फ्रेंच राज्यक्रांतीमुळें भयभीत होऊन त्यांच्या जिवांत जीव म्हणून राहिलेला नव्हता आणि वेडयासारखी त्यांची अशी कल्पना होती, कीं क्रांतीच्या कल्पनांचा प्रसार होण्याला आपण प्रतिबंध करूं शकूं. रशियाचा झार, ऑस्ट्रियाचा बादशहा आणि प्रशियाचा राजा या तिघांनीं तर आपलें आणि इतर राजांचें संरक्षण करण्याच्या उद्देशानें Holy Alliance पवित्र मित्रसंघ म्हणून एक संघही स्थापन केला होता. कांहीं काळ आतां आपण पुन्हां चौदाव्या आणि पंधराव्या लुईच्या काळामध्यें आल्यासारखी त्यांची अवस्था होऊन गेली. यूरप खंडांत सगळीकडे, इंग्लडमध्येंसुद्धां सर्व प्रकारच्या उदारमतवादित्वाची गळचेपी करण्यांत आली. फ्रेंच राज्यक्रांतीच्या जन्मानिमित्त

जनतेनें सोसलेल्या सर्व वेदना आणि यातना अशा रीतीनें सर्वथा व्यर्थ झालेल्या पाहून यूरपमधील प्रगतिशील लोकांचें अंतःकरण निराशेनें किती करपून गेलें असेल!

इकडे यूरपच्या पूर्वेला तुर्कस्थान देश फारच क्षीण झालेला होता. हळूहळू त्याची ऱ्हास होण्याची क्रिया सुरू झालेली होती. इजिप्त देश हा तुर्कस्थानच्याच साम्राज्याचा भाग, अशी आपली नुसती समजूत मात्र होती. वास्तविक तो एक अर्धवट स्वतंत्रच देश झालेला होता. १८२१ मध्यें ग्रीसनें तुर्कस्थानच्या अधिराज्याविरुद्ध बंड केलें आणि आठ वर्षें युद्ध करून इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया यांच्या साहाय्यानें त्यानें आपलें स्वातंत्र्य परत मिळविलें. याच युद्धामध्यें प्रसिद्ध इंग्रज कवि बायरन हा ग्रीसच्या वतीनें स्वयंसेवक म्हणून लढत असतां मरण पावला. त्यानें ग्रीसबद्दल अत्यंत सुंदर अशी छोटीशी कविता लिहिलेली आहे. तुझ्या वाचनांत ती आलेली असेलच.

यूरपमध्यें १८३० सालीं आणखी जे दोन राजकारणी फेरबदल झाले, त्यांचीही माहिती याच ठिकाणीं तुला सांगून टाकलेली बरी. बोर्बोन घराण्याच्या जुलुमाला आणि दडपशाहीला फ्रान्स देश कंटाळून गेला आणि पुन्हां एकदां तेथील लोकांनीं या घराण्याची हकालपट्टी केली; परंतु त्यांनीं प्रजासत्ताक राज्य स्थापन न करतां पुन्हां एकदां एका नवीनच राजाची स्थापना केली. या नव्या राजाचें नांव लुई फिलिप असें होतें. हा मागच्या राजाहून जरा चांगला वागला. सामान्यतः राज्यघटनेप्रमाणें मर्यादित हक्क असलेल्या राजाप्रमाणें त्यानें कारभार केला. कसेबसें १८४८ पर्यंत त्यानें राज्य चालविलें; पण या वेळीं मात्र फ्रान्समध्यें आणखी एक आणि पहिल्यापेक्षां पुष्कळ मोठा असा स्फोट झाला. इकडे बेल्जम्मध्यें १८३० मध्येंच एक बंड झालें. त्याचा परिणाम म्हणजे बेल्जम् व हॉलंड हे देश वेगळे झाले. यूरपमध्यें जीं मोठीं राज्यें होतीं त्यांना अर्थातच प्रजासत्ताक राज्याचें अतिशयच वावडें होतें. तेव्हां त्यांनीं एक जर्मन संस्थानिक बेल्जम्ला बहाल करून त्याला तेथें राजा केलें. अशाच दुसऱ्या एका जर्मन संस्थानिकाला ग्रीसचा राजा करण्यांत आलें. जर्मनींत जीं अनेक राज्यें होतीं, त्यांमध्यें अशा संस्थानिकांचा मोठा सुकाळ होता असें दिसतें. कुठलीही गादी रिकामी पडला कीं त्यांच्यापैकीं कोणाला तरी एकाला उचलावें आणि तेथें नेऊन बसवावें. असें वतच असेल तुला, कीं आजच्या क्षणाला इंग्लंडमध्यें जें राजघराणें चालू आहे त्याचें तसें मूळ जर्मनींतील हॅनोव्हर या छोट्या संस्थानांतलेंच आहे.

१८३० साल यूरपमध्यें आणखीही इतर ठिकाणीं झालेल्या बंडांसाठीं प्रसिद्ध आहे. हीं बंडें जर्मनींत, इटलींत आणि विशेषतः पोलंडमध्यें झालीं. तेथल्या राजांनीं हीं बंडें पार मोडून काढलीं. रशियन राज्यकर्त्यांनीं पोलंडमध्यें फारच मोठ्या प्रमाणांत दडपशाही केली. पोलिश भाषेमध्यें व्यवहार करायलादेखील तेथें त्यांनीं बंदी केली. पुढें १८४८ साल यूरपमध्यें क्रांतीचें साल म्हणून गाजणार आहे हें आपल्याला दिसेलच. त्या १८४८ ची नांदीच जणुं हें १८३० साल होतें म्हणावयाचें.

ही झाली यूरप खंडाची हकिकत. तिकडे ॲटलांटिक महासागराच्या पलीकडे

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांची वाढ पश्चिमेच्या बाजूस हळूहळू चालूच होती. यूरप खंडांतील आपसांतील स्पर्धा आणि लढाया यांपासून ही संस्थानें फारच दूर आणि मुक्त होतीं. त्याचप्रमाणें त्यांच्या हाताशीं अमाप जमीन होती. त्यामुळें त्यांची प्रगति फार झपाट्यानें होत जाऊन तीं संस्थानें यूरपला येऊन गांठण्याच्या बेतांत होतीं. दक्षिण अमेरिकेंत मात्र दरम्यान फारच मोठ्या घडामोडी घडून येत होत्या. या सर्व घडामोडींस नेपोलियन हाच अप्रत्यक्षतः कारण होता. नेपोलियननें स्पेन देश जिंकून जेव्हां तेथील गादीवर आपल्या एका भाच्याची स्थापना केली, तेव्हां स्पेनच्या दक्षिण अमेरिकेंतील वसाहतींनीं बंड केलें. अशा रीतीनें या वसाहतवाल्यांची स्पेनच्या जुन्या घराण्याबद्दल जी निष्ठा होती तिच्यामुळेंच उलट त्यांना स्वातंत्र्य प्राप्त होण्याची विलक्षण घटना घडली. अर्थात् हें आपलें एक आयत्या वेळचें आणि थोडेंसें आगंतुक कारण होतें एवढेंच. आज ना उद्यां या वसाहती मायदेशापासून फुटून निघाल्याच असत्या. कारण साऱ्या दक्षिण अमेरिकाभर स्वातंत्र्याची भावना प्रज्वलित झालेली होती. दक्षिण अमेरिकेंतील स्वातंत्र्याच्या प्रवृत्तीचा महान् नेता सायमन् बोलिव्हार ह्या नांवाचा गृहस्थ होता. त्याला त्याच्या भाषेंत El Libertador स्वातंत्र्यदाता असें म्हणतात. दक्षिण अमेरिकेंतील बोलिव्हियाच्या प्रजासत्ताक राज्याचें नांव त्याच्याच नांवावरून ठेवलेलें आहे. अशा प्रकारें नेपोलियनचा जेव्हां पाडाव झाला, त्या वेळीं स्पेनच्या अमेरिकेंतील वसाहती स्पेनपासून फुटून निघालेल्या असून त्यांनीं स्वातंत्र्यासाठीं युद्ध चालविलें होतें. नेपोलियन गादीवरून दूर झाला म्हणून त्यांच्या लढ्याच्या बाबतींत कांहींच फरक झाला नाहीं; स्पेनच्या नव्या राजाविरुद्धही तें बंड तसेंच आणखी पुष्कळ वर्षेपर्यंत चालू राहिलें. यूरपमधील कांहीं राजांच्या मनातून आपल्या स्पेनमधील राजबंधूला अमेरिकेंतील या क्रांतिकारक वसाहतींना चिरडून टाकण्यासाठीं साहाय्य करावें असें होतें; परंतु अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्या अध्यक्षानें या ढवळाढवळीला कायमचा पायबंद घातला. मनरो हा त्या वेळीं या संयुक्त संस्थानांचा अध्यक्ष होता. त्यानें यरप खंडांतील या सत्ताधिशांना असें बजाविलें, कीं त्यांच्यापैकीं कोणी जर अमेरिकेंत, ग ती उत्तर अमेरिका असो वा दक्षिण अमेरिका असो, कोठेंही ढवळाढवळ केली, तर त्यांना अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांशीं लढावें लागेल. या धमकीनें यूरपमधील सत्ताधीश घाबरून गेले आणि तेव्हांपासून बहुतेक त्यांच्यापैकीं कोणीही दक्षिण अमेरिकेंत ढवळाढवळ केली नाहीं. अध्यक्ष मनरो याची ही धमकी इतिहासांत "मनरो डॉक्ट्रिन्" मनरोचें तत्त्व, या नांवानें प्रसिद्ध आहे. यूरपच्या लोभीपणापासून या धमकीनें दक्षिण अमेरिकेचें पुष्कळ काळपर्यंत संरक्षण केलें आणि अशा रीतीनें तिकडील देशांची वाढ होण्यास चांगली संधि सांपडली. यूरपपासून त्यांचें संरक्षण झालें खरें; परंतु त्यांच्या संरक्षकापासून–संयुक्त संस्थानांपासून–त्यांचें रक्षण करण्याला दुसरें कोणीच नव्हतें! आज संयुक्त संस्थानांचेंच वर्चस्व त्यांच्यावर आहे आणि तिकडील छोटीं छोटीं संस्थानें तर सर्वस्वीं संयुक्त संस्थानांच्याच पूर्ण कब्ज्यांत आहेत.

दक्षिण अमेरिकेंतील ब्राझील या विशाल देशामध्यें पोर्तुगालची वसाहत होती. अमेरिकेंतील स्पेनच्या वसाहती स्वतंत्र झाल्या त्याच सुमारास ही वसाहत पण स्वतंत्र झाली. अशा तऱ्हेनें १८३० पर्यंत सर्वच दक्षिण अमेरिका खंड यूरपीय राज्यांच्या अमलापासून वेगळें झाल्याचें आढळतें. उत्तर अमेरिकेंत तेवढी इंग्लंडची कॅनडा ही वसाहत मात्र होती.

त्यानंतर आतां आपण आशियाकडे येऊं. हिंदुस्थानांत आतां इंग्रज लोकांचें प्रभुत्व निश्चितपणें प्रस्थापित झालेलें होतें. तिकडे यूरपमध्यें नेपोलियनचीं युद्धें चालू होतीं, त्या वेळीं इंग्लंडनें आपली परिस्थिति सगळीकडेच मजबूत करून ठेवली होती. याच काळांत इंग्लंडनें जावाचाही ताबा मिळविला होता. त्याचप्रमाणें म्हैसूरच्या टिपू सुलतानाचा पराभव त्यांनीं करून नंतर १८१९ मध्यें मराठ्यांचाही अखेरचा पाडाव केला होता. पंजाबांत मात्र अजून शिखांचें राज्य रणजितसिंहाच्या अमलाखालीं चालू होतें. बाकी सर्व हिंदुस्थानभर इंग्रजांनीं आपले हातपाय न कळत अगदीं झपाट्यानें पसरीत चालवले होते. पूर्वेकडे त्यांनीं आसाम प्रांत खालसा केला. त्यानंतर आराकानचा प्रांत व ब्रह्मदेश यांचा फक्त एक घांस करून टाकायचा तेवढा शिल्लक राहिलेला होता.

अशा रीतीनें इकडे ब्रिटनचें राज्य हिंदुस्थानांत वाढत होतें, तर तिकडे रशिया मध्य आशियांत हातपाय पसरीत होता. पूर्वेस त्यानें याच्या पूर्वी केव्हांच पॅसिफिकचा किनारा आणि चीनची सरहद्द गांठलेली होती. त्यानंतर आतां इकडे खालीं त्याचा रूळ मध्य आशियांतील छोटीं छोटीं राज्यें दडपून अफगाणिस्तानच्या सरहद्दीशीं येऊन भिडला होता. आपल्या सरहद्दीपासून जवळजवळ येणाऱ्या या राक्षसाचें इंग्रजांच्या मनांत फारच भय उत्पन्न झालें आणि भीतीच्या पायींच त्यांनीं आपण होऊन अफगाणिस्तानशीं युद्ध उकरून काढलें; पण त्यांत त्यांचा हात चांगलाच भाजून निघाला.

चीनमध्यें अजून मांचू घराण्याचीच राजवट चालू होती. त्या ठिकाणीं व्यापाराच्या किंवा धर्माच्या नांवावर जाणाऱ्या लोकांबद्दल या सुमारास बराचसा संशय सकारणच उत्पन्न झालेला होता आणि त्यामुळें अशा लोकांना आपल्या देशापासून बाहेर ठेवण्याची खटपट तेथें चालू होती; परंतु हे परदेशचे लोक चीनच्या दाराशीं धक्के देतच होते, आरडाओरड करीतच होते आणि केव्हां केव्हां दंगलही माजवीत होते. विशेषतः त्या देशांत अफूचा व्यापार वाढविण्याचे मोठे प्रयत्न या लोकांचे सुरू होते. ब्रिटिश लोकांचा चीनमधील व्यापाराचा सगळा मक्ता ईस्ट इंडिया कंपनीकडे होता. चीनच्या बादशहानें अफू चीनमध्यें आणण्यास कायद्यानें प्रतिबंध ठेवला होता; परंतु चोरूनमारून अफू चीनमध्यें जातच होती. अशा रीतीनें या परकीयांनीं त्या ठिकाणीं अफूचा व्यापार बेकायदेशीरपणें चालविला होता. यामधून स्वाभाविकच चीनचें इंग्लंडशीं युद्ध उद्भवलें. या युद्धाला 'अफूचें युद्ध' असें अगदीं

यथार्थ नांव देण्यात आलेलें आहे. या युद्धांत ब्रिटननें चीनला सक्तीनें आपल्या देशांत अफू येऊं देण्याला भाग पाडलें.

जपाननें तर आपली स्वतःची कोंडी इ. स. १६३४ मध्यें करून घेतली हें पुष्कळ पूर्वी मीं तुला सांगितलेंच आहे. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत जपानचे दरवाजे अगदीं असेच सर्व परकीयांना बंद होते; परंतु अशा रीतीनें सरहद्दी कोंडून घेतल्यामुळें परकीयांचा शिरकाव जरी बंद झालेला होता, तरी आंतमध्यें शोगुन-शाहीची सत्ता हळूहळू दुर्बल होत चाललेली होती. अशी नवीन परिस्थिति उत्पन्न होत होती, कीं तिच्यामुळें जपानच्या आजपर्यंतच्या साऱ्या जुन्या परंपरेला एकदम अजिबात खो बसणार होता. जपानच्या खालच्या बाजूला आशियाच्या आग्नेय भागांत यूरपीय राष्ट्रें आपल्या कबजांत अधिकाधिक मुलूख आणीत होतीं. फिलिपाइन बेटें स्पॅनिश लोकांच्याच अजून ताब्यांत होतीं. पोर्तुगीजांना इंग्रजानीं व डच लोकानीं हांकलून दिलें होतें. व्हिएन्ना येथील परिषदेनंतर डच लोकांना जावा आणि त्याच्या आसपासचीं इतर बेटें हीं पुन्हां परत मिळालीं. इकडे इंग्रज सिंगापूर बंदरापर्यंत आणि मॅले द्वीपकल्पामध्यें हातपाय पसरीत होते. सयाम आणि ब्रह्मदेश हे देश अद्यापि स्वतंत्रच होते. अर्थात् मधून मधून चीनच्या बादशहाला हे देश खंडणी देत असत हें वेगळें.

वॉटर्लूच्या लढाईपासून १८३० पर्यंत साऱ्या जगाची अगदीं स्थूल दृष्टीनें पाहतां ही अशा प्रकारची राजकीय अवस्था होती. हळूहळू यूरप खंडाचें स्वामित्व साऱ्या जगावर प्रस्थापित होण्याचा अगदीं निश्चित रंग दिसूं लागलेला होता आणि खुद्द यूरप-मध्यें प्रतिगामी प्रवृत्तीचा पूर्ण विजय झालेला होता. तेथील महाराजांना आणि राजांना, एवढेंच नव्हे, इंग्लंडमधील प्रतिगामी पार्लमेंटलासुद्धा असें वाटत होतें, कीं स्वातंत्र्य वगैरे राजकीय उदार वृत्तीच्या कल्पना आपण अगदीं पार कायमच्या गाडून टाकल्या. बाटलींत या कल्पना बूच लावून बंद करून ठेवण्याचा त्यांचा विचार होता. अर्थातच या बाबतींत त्यांचा प्रयत्न अजिबात फसला आणि जिकडे तिकडे या पुढच्या काळांत एकसारखीं बंडें एकामागून एक उद्भवत राहिलीं.

अशा रीतीनें या राजकीय घडामोडींनीं व फेरबदलांनींच विश्वेतिहासाची रंगभूमि सगळी अडवून टाकल्यासारखी दिसते; परंतु इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या पाठोपाठ उत्पादनाच्या पद्धतीमध्यें जी क्रांति झाली, पदार्थांच्या विनिमयाच्या बाबतींत आणि प्रवासाच्या साधनांमध्येंही जी क्रांति झाली, ती क्रांति या सर्व राजकीय फेरबदला-पेक्षां किती तरी अधिक महत्त्वाची होती. ही क्रांति कसलाही गाजावाजा न करतां परंतु अगदीं अनिर्बंधपणें सगळ्या यूरप खंडाला आणि उत्तर अमेरिकेला व्यापीत चालली होती. तिच्यामुळें कोट्यवधि लोकांची प्रवृत्ति आणि संवयी बदलून जात होत्या. समाजामधील निरनिराळ्या वर्गांमधील संबंध बदलून जात होते. यंत्राच्या या

खणखणाटांतून नवीन कल्पना निर्माण होत होत्या आणि जगाला एक नवीनच स्वरूप प्राप्त होत होतें. यूरप खंड अधिकाधिक कार्यक्षम होत चाललें होतें. तसेंच तें अधिकाधिक लोभी, अधिकाधिक साम्राज्यवादी आणि न्यायान्यायाविषयीं अधिकाधिक बेपर्वा होत चाललें होतें. नेपोलियनचा स्वभाव आणि प्रवृत्तीच साऱ्या यूरप खंडाला जणुं व्यापून टाकीत होती. परंतु याच वेळीं यूरप खंडांत अशाही कांहीं कल्पना जन्मास येत होत्या, कीं ज्या पुढें साम्राज्यवादाला खास गाडून टाकणार होत्या.

या काळचें साहित्य, काव्य, संगीत हेंही मोठें चित्तवेधक आहे; परंतु अशा रीतीनें लेखणी धांवूं देतां उपयोगी नाहीं. आज तिचें झालें तेवढें काम पुरें आहे.

## १०७

## महायुद्धापूर्वीचीं जगाचीं शंभर वर्षें

२२ नोव्हेंबर, १९३२

नेपोलियनचा पाडाव इ. स. १८१४ मध्यें झाला. त्याच्या पुढच्या वर्षीं तो एल्बाहून परत आला आणि त्या वेळीं त्याचा पुन्हां एकदां पराभव झाला हें खरें; परंतु त्याची सगळी संघटना १८१४ सालींच खरोखर कोसळून पडली होती. त्यानंतर बरोबर शंभर वर्षांनीं १९१४ मध्यें महायुद्ध सुरू झालें. हें महायुद्ध चार वर्षेपर्यंत चालून जवळजवळ साऱ्या जगभर पसरलें आणि त्यापासून भयंकर नाश झाला आणि लोकांना फार यातना सोसाव्या लागल्या. या शंभर वर्षांच्या काळाचा विचार आपल्याला जरा जास्त तपशीलवार करणें जरूर होणार आहे. हा काळ सुरू झाला त्या सुमारास जगाची रचना सामान्यतः कशा प्रकारची होती, याची थोडीशी स्थूल अशी कल्पना मीं तुला गेल्या पत्रांत करून दिलीच आहे. आतां या शतकाचा निरनिराळा देशवार विचार करण्यापूर्वी एकदां सबंध शतकाचा साकल्यानें एका ठिकाणीं थोडासा आढावा घेतला तर पुष्कळसें सोयीचें होईल. त्यामुळें या शंभर वर्षांतील एकंदर निरनिराळ्या प्रवाहांचें स्वरूप काय होतें, याची आपल्याला जास्त चांगली कल्पना येईल आणि सबंध अरण्य आणि त्यांतील वेगळीं वेगळीं झाडें यांचें सम्यक् दर्शन आपल्याला करून घेतां येईल.

१८१४ ते १९१४ हीं वर्षें पुष्कळशा प्रमाणांत एकोणिसाव्या शतकांत पडतात हें तुझें तुलासुद्धां दिसून येईल. म्हणून या सगळ्याच शंभर वर्षांना एकोणिसावें शतक म्हणून संबोधणें हें कांटेकोरपणानें बरोबर नसलें, तरी सोयीसाठीं आपण तसें म्हणूं या.

एकोणिसाव्या शतकाचा काळ हा मोठा मनोवेधक काळ आहे; परंतु त्याचा अभ्यास करणें ही गोष्ट मात्र आपल्याला सोपी नाहीं. मुळांतच हा काळ म्हणजे अनेक चित्रांचें मिळून झालेलें एक प्रचंड चित्र आहे. महान् विश्वदर्शनच आहे जणुं. शिवाय

हा काळ आपल्या अगदीं जवळचा असल्यामुळें त्याच्या आधींच्या शतकापेक्षां तो आपल्याला अधिक मोठा वाटतो. हें त्याचें प्रचंडपण आणि त्याच्यांतील विविधता यांमुळें ज्या हजारों तंतूंचा मिळून हा कालचित्रपट विणला गेलेला आहे, ते सर्व धागे उलगडून पाहत असतांना केव्हां केव्हां आपण दडपून जाण्याचा संभव आहे.

अचाट यांत्रिक प्रगतीचें हें शतक आहे. औद्योगिक क्रांतीच्या पाठोपाठ स्वाभाविकपणेंच यांत्रिक क्रांति घडून आली आणि मनुष्याच्या जीवनांत यंत्रांना अधिकाधिक महत्त्व चढत चाललें. पूर्वी जीं कामें माणसाला करावीं लागत, त्यांपैकीं बहुतेक आतां यंत्रांकरवीं होऊं लागलीं. त्यामुळें माणसाचे कष्ट कमी झाले. सृष्टीतील शक्तींवर त्याला पूर्वीइतकें अवलंबून रहाणें जरूर पडत नाहींसें झालें; आणि यंत्रापासून त्याच्याजवळ संपत्ति निर्माण होऊं लागली. शास्त्रीय संशोधनाचा या कामीं त्याला फार मोठा उपयोग झाला. प्रवास आणि मालवाहतूक रोजच्या रोज अधिकाधिक जलद होऊं लागली. आगगाडी निर्माण होऊन तिनें घोड्याच्या गाड्या बंद केल्या. आगबोटींनीं वाऱ्यावर चालणाऱ्या जहाजांची जागा घेतली आणि त्यानंतर महासागरांतून डौलानें या खंडांतून त्या खंडापर्यंत अतिशय जलद गतीनें आणि नियमितपणें जाणाऱ्या प्रचंड, मोठ्या आणि बळकट अशाही आगबोटी निघाल्या. या शतकाच्या अखेरीला तेलावर चालणाऱ्या छोट्या इंजिनांच्या मोटारगाड्याही जगभर धांवूं लागल्या. शेवटीं विमान आलें. हें सगळें होत असतांना माणसाचा ताबा एका अजब शक्तीवर सुरू होऊन तिचा–विजेचा–तो आपल्या कामीं उपयोग करून घेऊं लागला. यापासून तारायंत्र आणि टेलिफोन यांची सुरुवात झाली. या सर्व गोष्टींमुळें जगाच्या स्वरूपांत फारच प्रचंड फरक घडून आला. दळणवळणाचीं साधनें वाढून लोकांचा प्रवास जास्त जास्त जलद होऊं लागला, तसतसा जगाचा आकार जणुं कमी होत जाऊन तें लहान लहान भासूं लागलें. आज आपल्याला या साऱ्या गोष्टी अगदीं नित्याच्या परिचयाच्या झाल्या असून त्यांचा विशेषसा विचारसुद्धां आपल्या मनामध्यें येत नाहीं; परंतु हे सर्व फेरबदल जगामधील अगदीं ताजे पाहुणे आहेत. गेल्या शंभरएक वर्षांतच त्यांनीं जगामध्यें पाऊल ठेवलेलें आहे.

त्याचप्रमाणें हें शतक म्हणजे एका अर्थीं यूरप खंडाचें शतक आहे अथवा खरें म्हटलें म्हणजे पश्चिम यूरप खंडाचें आणि त्यांतही विशेषतः इंग्लंडचें हें शतक आहे असें म्हणा. औद्योगिक आणि यांत्रिक अशा या दोन्ही क्रांत्या सुरू झाल्या इंग्लंडमध्येंच आणि त्यांची वाढही झाली तेथेंच. त्यांच्यापासून पश्चिम यूरप खंडाचा लाभही फार मोठा झाला. कांहीं काळ इंग्लंड समुद्रावर आणि औद्योगिक क्षेत्रांत फारच प्रमुख असें राष्ट्र होतें; परंतु हळूहळू पश्चिम यूरप खंडामधल्या, इतरही राष्ट्रांनीं त्याच्या जवळजवळ पल्ला गांठला. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांनींही या नवीन यांत्रिक शोधांच्या साहाय्यानें जोरानें दौड मारण्यास सुरुवात केली. आगगाडीच्या रुळाचे रस्ते बांधून हीं संस्थानें पाश्चिमेस थेट पॅसिफिकपर्यंत जाऊन भिडलीं आणि त्या विशाल प्रदेशाचें

त्यांनीं एक राष्ट्र बनविलें. ही प्रदेशवाद आणि त्यांचे स्थानिक प्रश्न यांमध्यें हीं संस्थानें इतकीं गुंगून गेलेलीं होतीं, कीं यूरपमध्यें किंवा इतर जगांत कांहीं भानगडी करावयाला त्यांना फुरसद नव्हती. परंतु यूरप खंडांतील कोणीं जर त्यांच्या क्षेत्रांत कांहीं ढवळाढवळ केली तर तिजबद्दल निषेध करून ती ढवळाढवळ थांबविण्याची शक्ति मात्र आतां त्यांच्या ठिकाणीं निर्माण झालेली होती. गेल्या पत्रांत मनरोचें तत्त्व म्हणून मीं तुला सांगितलेंच आहे. त्यामुळेंच दक्षिण अमेरिकेची यूरप खंडाच्या लोभी नजरेपासून सुटका झाली. दक्षिण अमेरिकेंतील या प्रजासत्ताक राज्यांना लॅटिन प्रजासत्ताक राज्यें असें म्हणण्याची वहिवाट आहे. कारण तेथील वसाहती स्पेन व पोर्तुगाल या देशांनीं स्थापन केलेल्या होत्या. स्पेन व पोर्तुगाल त्याचप्रमाणें इटली व फ्रान्स या देशांना लॅटिन देश असें मुळापासून नांव आहे. यूरपमधील त्यांच्या उत्तरेकडील देशांना मात्र टयूटन वंशीयांचे देश म्हटलें जातें. इंग्लंड देश हाही टयूटन वंशापैकीं अँग्लो सॅक्सन गटाचा देश आहे. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतील लोक मूळचे या अँग्लो सॅक्सन गटांतून गेलेले; अर्थात् त्यांच्या मागून तेथें नाना देशांचें आणि वंशांचे लोक गेलेले आहेत हें तर खरेंच.

याशिवाय बाकीचें जग मात्र औद्योगिक क्षेत्रांत आणि यंत्रांच्या क्षेत्रांत मागासलेलें होतें. त्यामुळें पश्चिमेकडील या यांत्रिक सुधारणेला तोंड देणें त्याला शक्य झालें नाहीं. यूरप खंडांतील नवीन यंत्रावर चालणाऱ्या कारखान्यांमध्यें मालाचें उत्पादन पूर्वीच्या घरगुती धंद्याच्या मानानें फारच जलद आणि अतिशय मोठ्या प्रमाणावर होऊं लागलें; पण एवढा हा माल तयार करावयाचा म्हणजे त्याला कच्चा माल पाहिजे. असा पुष्कळसा कच्चा माल पाश्चिम यूरपमध्यें मिळण्यासारखा नव्हता. बरें, एवढा माल तयार झाला म्हणजे तो विकला पाहिजे; म्हणजे त्याच्यासाठीं बाजारपेठा हव्यात; म्हणून ज्या देशांत असा कच्चा माल मिळेल आणि जेथें आपला पक्का माल विकत घेतला जाईल असे देश शोधून काढण्याची खटपट पाश्चिम यूरपनें सुरू केली. आशिया आणि आफ्रिका हीं दोन्ही खंडें त्या वेळीं दुबळीं होतीं. म्हणून शिकाऱ्याप्रमाणें या औद्योगिक राष्ट्रांनीं त्याच्यावर झडप घातली. या साम्राज्यवर्धनाच्या शर्यतींत इंग्लंड सहजच सगळ्यांच्यापेक्षां फारच मोठ्या प्रमाणांत यशस्वी झालें. कारण इंग्लंडजवळ दर्यावर्दी सामर्थ्य होतें. औद्योगिक क्षेत्रांतही त्यानें इतरांपेक्षां अधिक आघाडी आधींपासून मारलेली होती.

यूरपीयन लोक हे प्रथम हिंदुस्थानमध्यें आणि पूर्वेकडे आले ते त्यांच्या तिकडे यूरप खंडात मागणी असलेल्या मसाल्याच्या पदार्थांची खरेदी करण्याच्या हेतूनें आले. अशा तऱ्हेनें पूर्वेचा माल पाश्चिमेकडे जाऊं लागला. त्यामध्यें पूर्वेकडील हातमागावर तयार झालेला कापडमालही असे. परंतु आतां यंत्रांची वाढ होतांच हें गाडें उलटें झालें. पाश्चिम यूरपांत तयार झालेला स्वस्त माल आतां पूर्वेकडे जाऊं लागला आणि इंग्लंडचा माल खपण्यास मदत करण्यासाठीं म्हणून ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थानमधील घरगुती धंदे जाणूनबुजून बुडवून टाकले.

अशा रीतीनें आशियारूपी राक्षसाच्या अंगावर यूरप खंड स्वार झालें. उत्तरेकडे रशियाचें साम्राज्य या खंडाच्या पश्चिम टोंकापासून पूर्व टोंकापर्यंत पसरलें. दक्षिणेकडे इंग्लंडनें या खंडांतील सर्वांत अधिक किंमतवान् असा गठ्ठा—हिंदुस्थान देश—आपल्या मुठींत घट्ट पकडून ठेवलेला होता. पश्चिमेकडे तुर्कस्तानच्या साम्राज्याचे तुकडे तुकडे होऊं लागून तुर्कस्तानला लोक आतां "यूरप खंडातील दुखणाईत म्हातारा" असें म्हणूं लागले होते. इराण देश नांवाला अजून स्वतंत्र होता; परंतु त्याच्यावर इंग्लंड आणि रशिया यांचें वर्चस्व होतें. साराच्या सारा दक्षिण आशिया खंडाचा प्रदेश म्हणजे ब्रह्मदेश, इंडोचायना, मॅले, जावा, सुमात्रा, बोर्नियो, फिलिपाइन्स वगैरे वगैरे हे सारे देश, एक सयामचा तेवढा लहानसा तुकडा सोडून, यूरप खंडानें व्यापलेले होते. अतिपूर्वेकडे चीन देशाला यूरपीय राज्यांनीं हळूहळू कुरतडावयाला सुरुवात केलेली होती आणि चीनकडून हा देश जबरदस्तीनें रोज नव्या सवलती मिळवीत होता. एक जपान देश मात्र अजून मान वर ताठ करून यूरप खंडाच्या बरोबरीनें म्हणून उभा होता. आपल्या एकातवासांतून हा देश आतां बाहेर आला होता आणि जगातील बदललेली परिस्थिति त्यानें अलौकिक जलद रीतीनें आत्मसात् करून घेतली होती.

एक ईजिप्त देश सोडला तर आफ्रिका खंड या सुमारास फारच मागासलेलें होतें. यूरपशीं म्हणण्यासारखा सामना देण्याची त्याची मुळींच ताकद नव्हती. त्यामुळें यूरप खंडातील देशांनीं आपल्या साम्राज्यवर्धनाच्या माथेफिरू शर्यतीमध्यें आफ्रिका खंडावरही धाड घातली आणि तें प्रचंड खंड आपल्यामध्यें वांटून घेतलें. त्यात इंग्लंडनें ईजिप्त देश आपल्या वाट्याला घेतला. कारण हा देश हिंदुस्थानच्या अगदीं वाटेवर होता आणि इंग्लंडचें यापुढील सर्व धोरण हिंदुस्थान देश कायमचा आपल्या हातांत ठेवावयाचा या उद्देशानें आंखलें जात होतें. इ. स. १८६९ मध्यें सुवेजचा कालवा खोदण्यांत आला. यामुळें यूरप खंडाहून हिंदुस्थानचा प्रवास पूर्वीपेक्षां पुष्कळच कमी दिवसांचा झाला. त्यामुळेंही इंग्लंडला ईजिप्त देश फारच मोलाचा झाला. कारण ईजिप्तचा हात या कालव्यावर चालण्यासारखा असल्यामुळें एक प्रकारें त्यामुळें हिंदुस्थानकडे जाण्याचा मार्ग इंग्लंडला आपल्या कबजांत ठेवतां येत होता.

तेव्हां यांत्रिक क्रांतीचा परिणाम म्हणजे भांडवलशाही सुधारणा साऱ्या जगभर पसरली आणि जिकडे तिकडे यूरप खंडाचें प्रभुत्व प्रस्थापित झालें. या भांडवलशाहींतूनच साम्राज्यशाहीचा उद्भव झाला. तेव्हां या एकोणिसाव्या शतकाला साम्राज्यशाहीचें शतक असेंही नांव आपणांला देतां येईल. पूर्वीच्या काळींही रोम, चीन, हिंदुस्थान, आरब लोक, मंगोलियन लोक वगैरेंच्या. साम्राज्यशाहीचीं युगें होऊन गेलेलीं होतीं; पण त्यापेक्षां हें नवें साम्राज्यशाहीचें युग फारच वेगळ्या प्रकारचें होतें. आतां निर्माण झालेलें साम्राज्य हें अगदीं निराळ्याच स्वरूपाचें होतें. त्याच्या पोटांत कच्चा माल आणि बाजारपेठा यांच्या भुकेची आग पेटलेली होती. हा नवा साम्राज्य-

वाद नव्या औद्योगिक युगामधून स्वाभाविकच उत्पन्न झाला. "आधीं निशाण, मागोमाग व्यापार" अशी एक म्हण आहे; परंतु पुष्कळदां "आधीं बायबल आणि मग त्याच्या पाठोपाठ निशाण" असाच क्रम झालेला आढळून येतो. धर्म, शास्त्रीय संशोधन, स्वतःच्या देशाविषयींचें प्रेम या सर्व गोष्टी एकच उद्देश साधण्यासाठीं राबविण्यांत येत होत्या. तो उद्देश म्हणजे यंत्रांचे मोठे मोठे मालक—सरदारच म्हणा—उद्योगधंद्यांचे जणुं राजे यांना अधिकाधिक श्रीमान् व्हावयास सांपडावें यासाठीं जगामधील दुर्बल आणि मागासलेल्या लोकांची पिळवणूक करावयाची हा. ख्रिस्ती मिशनरी जायचे सत्य आणि प्रेम यांची जपमाळ घेऊन; पण बहुतेक प्रसंगीं ते असावयाचे साम्राज्याचे टेहळे शिपाई आणि त्यांना कोठून कांहीं त्रास झाला, कीं त्यांच्या देशांनीं ती सबब करून नवीन प्रदेश काबीज करावयाचा आणि नवीन सवलती मिळवून घ्यावयाच्या.

उद्योगधंदे आणि समाजरचना यांची उभारणी मांडवलशाहीपद्धतीवरच झाल्यामुळें त्यांतून साम्राज्यशाहीचा उद्भव होणें हें अगदीं अपरिहार्यच होतें. याखेरीज मांडवलशाहीमुळें कट्टर राष्ट्रवादाची वाढ होण्यासही मदत झाली. हा राष्ट्रवाद म्हणजे नुसत्या स्वतःच्या देशावर प्रेम करून थांबणारा नव्हता, तर त्यामध्यें बाकीच्या सर्वांचा द्वेष करण्याची भर पडलेली होती. अशा रीतीनें जगांतील आपल्या लहानशा तुकड्याला अगदीं देव बनवायचें आणि बाकीच्या सगळ्यांची अवहेलना आणि निंदा करावयाची या प्रकाराच्या नव्या राष्ट्रवादांतून निरनिराळ्या देशांत कटकटी आणि झगडे निर्माण होणार हें निश्चित होतें. त्यांतच औद्योगिक आणि साम्राज्यशाहीच्या क्षेत्रांतील यूरप खंडामधील निरनिराळ्या राष्ट्रांच्या स्पर्धेची भर पडून प्रकरण अधिकच चिघळत गेलें. व्हिएन्ना येथील यूरपीय राष्ट्रांच्या परिषदेनें यूरपचा जो नकाशा आंखला होता, त्यामुळेंही असंतोष निर्माण होण्याचें एक साधन आणखी निर्माण झालेलें होतें. या वांटणीमुळें कित्येक राष्ट्रीय जमातींना दडपून टाकून सक्तीनें दुसऱ्या लोकांच्या राज्याखालीं ढकलण्यांत आलें होतें. पोलंड देश तर एक राष्ट्र म्हणून अस्तित्वांतच राहिलेला नव्हता. ऑस्ट्रिया-हंगेरीचें साम्राज्य म्हणजे एकमेकांचा तिरस्कार करणाऱ्या अनेक जमातींची नुसती खिचडी होऊन गेलेली होती. यूरपच्या आग्नेयीला तुर्कस्तानच्या साम्राज्यामध्यें बाल्कन देशांतील तुर्की नसलेले किती तरी लोक समाविष्ट झालेले होते. इटलीचे पुष्कळ तुकडे करून स्वतंत्र राज्यें निर्माण करण्यांत आलीं होतीं आणि त्याचा कांहीं भाग ऑस्ट्रियाच्या अमलाखालीं देण्यांत आलेला होता. असा हा जो यूरप खंडाचा नकाशा आंखण्यांत आलेला होता, तो बदलून घेण्यासाठीं वारंवार युद्धें आणि क्रांत्या यांच्या मार्गानें प्रयत्न होत होते. व्हिएन्ना येथील वांटणी झाल्यानंतर लगेच जीं कांहीं अशीं बंडें झालीं, त्यांचा उल्लेख मीं मागच्या पत्रांत केलाच आहे. एकोणिसाव्या शतकाच्या इटलीच्या उत्तरेकडील ऑस्ट्रियाचें आणि मध्यभागांतील पोपचें जोखड उखडून टाकण्यांत यश आलें आणि नंतर सगळ्या इटलीचें असें एक राष्ट्र निर्माण झालें. त्याच्या पाठोपाठ

प्राशियाच्या नेतृत्वाखालीं जर्मन राष्ट्राचेंही एकीकरण झालें. या जर्मनीनें फ्रान्सचा पराभव करून त्याला नमविलें आणि आल्सेस आणि लोरेन हे फ्रान्सचे दोन सरहद्दीवरचे प्रांत त्यांनीं फ्रान्सकडून हिरावून घेतले. तेव्हांपासून फ्रान्सच्या मनांत सूडाची भावना जागृत होऊन राहिली आणि पन्नास वर्षांच्या आंतच रक्ताचे पाट वाहवून भयंकर असा सूड फ्रान्सनें घेतला.

इंग्लंड देश हा पहिल्यापासून औद्योगीकरण व यंत्रीकरण यांमध्यें सगळ्याच्या पुढें असल्यानें सर्व यूरपीय राष्ट्रांत अधिक भाग्यवान् असा हा देश ठरला. जगांतील फायदेशीर अशा सर्व गोष्टी इंग्लंडच्या वांट्याला आल्या आणि एकंदरींत मिळालेल्या परिस्थितीवर इंग्लंड देश मोठा खुष होऊन गेला. नवीन पद्धतीच्या साम्राज्यशाहीचा हिंदुस्थान हा एक नमुनाच होता; या सुसंपन्न अशा देशाच्या पिळवणुकींतून इंग्लंडमध्यें सोन्याचा मोठा प्रवाह अखंडपणें वाहूं लागला. बाकीचे जे इतर साम्राज्यशाही प्रस्थापित करूं पाहणारे देश होते, त्यांना हिंदुस्थान देश इंग्लंडच्या ताब्यांत असावा, या गोष्टीचा मोठा हेवा वाटे. म्हणून त्यांनीं हिंदुस्थानच्या धर्तीवर जगाच्या इतर भागांत आपलीं साम्राज्यें स्थापण्याचा उद्योग सुरू केला. फ्रेंचांना या बाबतींत थोड्या प्रमाणांत यशही आलें. जर्मन लोकांनीं या क्षेत्रांत जरा उशीरां प्रवेश केला. त्यामुळें त्यांना या कामासाठीं फारसा प्रदेशच शिल्लक राहिलेला नव्हता. त्यामुळें जरा उशीरांच यूरपांतील या सर्व मोठ्या राज्यांचे राजकीय संबंध अगदीं नित्य अणीवर येऊन ठेपल्यासारखे होऊन गेले. त्यांपैकीं प्रत्येकजण आपापल्या परीनें अधिकाधिक प्रदेशाचा कबजा करण्यासाठीं धडपडत होता आणि त्या कामीं त्यांच्यामध्यें तंटे उपस्थित होत होते. इंग्लंड आणि रशिया यांच्यामध्यें तर विशेषच तंटा सदैव चालू राहिला. कारण मध्य आशियांतून खालीं येऊन रशिया इंग्लंडच्या हिंदुस्थानांतील मिराशीवर धाड घालूं पाहत होता. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला रशियानें तुर्कस्तानचा पराभव केला आणि कॉन्स्टांटिनोपलबद्दल रशियाच्या तोंडाला पाणी सुटलें. त्या वेळीं इंग्लंड देश तुर्कांच्या बाजूला धांवून आला आणि त्यानें रशियाला मागें हटविलें. इंग्लंडनें हें काम कांहीं तुर्कस्तानच्या प्रेमामुळें केलें नाहीं, तर रशियाच्या भीतीमुळें व हिंदुस्थान हातचा जाईल अशी धास्ती वाटल्यामुळें केवळ ही मदत तुर्कांना इंग्लंडनें केली.

इंग्लंडनें औद्योगिक क्षेत्रांत इतरांच्या पुढें मारलेली मजल आतां कमी कमी अंतराची होऊन, जर्मनी आणि फ्रान्स आणि अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें हे देश आतां मागून इंग्लंडच्या बरोबरीला येऊं लागले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला ही शर्यत बरीच हातघाईवर आली. एवढेंसें हें जग यूरपीय राष्ट्रांच्या या प्रचंड महत्त्वाकांक्षेला पुरें कसें पडावें? यामुळें ज्याला त्याला दुसऱ्याची भीति, द्वेष आणि मत्सर वाटूं लागला. त्या भीतीमुळें व मत्सरामुळें ज्यांनीं त्यांनीं आपापलीं सैन्यें आणि आरमारें वाढविण्यास सुरुवात केली. या लोकक्षयकारक यंत्रांच्या व साधनांच्या

वाढीमध्यें स्पर्धेची धामधूम व काहिली माजली. निरनिराळ्या देशांमध्यें इतरांशीं लढण्यासाठीं म्हणून मैत्रीचे करार व तह होऊं लागले आणि अखेरीस यूरप खंडामध्यें असे दोन मित्रसंघ एकमेकांवर तुटून पडण्यासाठीं सिद्ध होऊन राहिले. त्यांपैकीं एका संघाचें प्रमुखपण फ्रान्सकडे होतें. गुप्तपणें इंग्लंड देशही याच संघांत सामील होता आणि दुसरा संघ जर्मनीच्या नेतृत्वाखालीं होता. यूरप खंड म्हणजे एक मोठा लष्करी तळच होऊन राहिला आणि रोजच्या रोज उद्योगधंदे, व्यापार आणि शस्त्रास्त्रें यांमधील स्पर्धा अधिकाधिकच भयंकर वाढत चालली. पाश्चिमेतील प्रत्येक देशांत संकुचित राष्ट्रवादाची प्रवृत्ति मुद्दाम जोरकस करण्यांत आली. हेतु असा, कीं सामान्य जनतेची दिशाभूल होऊन तिनें इतर देशांतील आपल्या शेजाऱ्यांचा द्वेष करूं लागावें आणि लढाईसाठीं सदैव सिद्ध होऊन राहावें.

अशा रीतीनें एक प्रकारचा आंधळा राष्ट्रवाद साऱ्या यूरप खंडभर प्रभावी होऊन राहिला. एकीकडे वाहतुकीचीं साधनें अधिक जलद होत गेल्यानें निरनिराळे देश एकमेकांना अधिकाधिक जवळ येत होते आणि एकमेकांच्या देशांत पूर्वीहून किती तरी अधिक लोक प्रवास करीत होते. असें असूनही अशा प्रकारच्या राष्ट्रवादाची निर्मिति व्हावी ही मोठीच विलक्षण गोष्ट आहे. कोणाचीही अशी समजूत होण्यासारखी होती, कीं प्रवासामुळें व इतरही कारणांमुळें परस्पर शेजारी लोकांची एकमेकांना अधिक माहिती होईल, त्यामुळें एकमेकांबद्दलचे दूषित पूर्वग्रह दूर होतील आणि मनाचा संकुचितपणा जाऊन त्या ठिकाणीं जास्त उदारवृत्ति निर्माण होईल. थोड्याफार अंशीं असा परिणाम झालाही आहे; परंतु नवीन औद्योगिक भांडवलशाहीखालची समाजरचना अशा तऱ्हेची निपजली, कीं तिच्यामध्यें राष्ट्र विरुद्ध राष्ट्र, वर्ग विरुद्ध वर्ग आणि व्यक्ति विरुद्ध व्यक्ति असे झगडेच अधिक निर्माण झाले.

पूर्वेकडेही राष्ट्रवादाची वाढ झाली. त्या ठिकाणीं राष्ट्रवादाला आपल्या देशावर प्रभुत्व गाजविणाऱ्या आणि आपल्या देशाची पिळवणूक करणाऱ्या परकीयांशीं झगडा करावयाचा हें स्वरूप आलें. अगदीं सुरुवातीला या परकीय वर्चस्वाला विरोध राहिल्यासाहिल्या जमीनदारवर्गानें केला. कारण त्यांना आपल्या अगदीं प्राणावरच बेतल्यासारखें होऊन गेलें होतें; परंतु त्यांचा पराभव झाला आणि तसा तो होणें हेंच अपरिहार्य होतें. त्यानंतर कांहींशी धार्मिक प्रवृत्तीची छटा असलेला नवीनच एक प्रकारचा राष्ट्रवाद जागृत झाला. हळूहळू त्यामधील धार्मिक दृष्टीची छटा मावळत गेली आणि नवीन पाश्चात्य पद्धतीच्या राष्ट्रवादानें वर डोकें काढलें. जपानमध्येंही परकीय वर्चस्व टाळण्यांत आलें आणि अर्धवट सरंजामदारी प्रवृत्तीचा अत्यंत कट्टर राष्ट्रवाद त्या ठिकाणीं दृढ करण्यांत आला.

यूरपियन राष्ट्रांच्या आक्रमणाला विरोध करण्याला आशिया खंडानें अगदीं प्रथमपासूनच सुरुवात केलेली होती; परंतु यूरपीय राष्ट्रांच्याजवळ असणाऱ्या नव्या शस्त्रास्त्रांचें सामर्थ्य आणि प्रभाव यांची जसजशी जास्त जास्त जाणीव होत चालली, तसतसा

विरोधांतील दम ओसरूं लागला. यूरपमधील शास्त्रीय संशोधनाची वाढ आणि यांत्रिक प्रगति यांमुळें त्या काळच्या पूर्वेकडील कोणत्याही देशापेक्षा यूरपीय राज्यांचीं सैन्यें किती तरी अधिक बलवान् झालेलीं होतीं. पूर्वेकडील देश त्यामुळें या देशांपुढें अगदींच हतबल होऊन गेले, त्यांच्यापुढें त्यांचें कांहींच चालेनासें झालें आणि अखेरीस त्या परकीयांपुढें मान वांकविण्यावांचून त्यांना मार्गच राहिला नाहीं. कांहीं लोक म्हणतात, कीं पूर्वेकडील लोकांची प्रवृत्ति आध्यात्मिक आहे तर पश्चिमेकडील लोकांची भौतिक आहे. हीं अशा तऱ्हेचीं विधानें मोठीं फसगत करणारीं असतात. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांत यूरप खंडाचें जेव्हां आशियामध्यें आक्रमण सुरू झालें त्या वेळीं आशिया आणि यूरप यांच्यामध्यें खरा फरक असला तर एवढाच होता, कीं पूर्वेकडे अद्यापि मध्ययुगीन लोकस्थिति कायम होती, तर पश्चिमेकडे औद्योगिक आणि यांत्रिक प्रगति झालेली होती. हिंदुस्थानचे आणि इतर पूर्वेकडील देशांचे डोळे पश्चिमेकडील देशांच्या लष्करी कार्यक्षमतेमुळें तर दिपलेच होते; परंतु त्यांच्या शास्त्रीय आणि यांत्रिक प्रगतीमुळेंही ते तितकेच दिपले होते. या सगळ्याचा परिणाम असा झाला, कीं पाश्चिमात्यांपेक्षां लष्करी आणि यांत्रिक बाबतींत आपण कांहीं तरी कमी दर्जाचे लोक आहोंत, अशी भावना इकडच्या लोकांमध्यें निर्माण झाली. असें जरी होतें तरी राष्ट्रवाद मात्र वाढतच गेला आणि परकीय आक्रमण करणारांशीं झगडा करून त्यांना आपल्या देशांतून हांकलून लावावें हीही इच्छा वाढत गेली. विसाव्या शतकाच्या प्रारंभीं असा एक प्रसंग घडला, कीं त्यामुळें आशिया खंडांतील लोकांच्या मनावर फारच मोठा परिणाम झाला. हा प्रसंग म्हणजे जपाननें झारच्या रशियाचा केलेला पराभव. एवढ्याशा जपाननें यूरपमधील सर्वांत मोठ्या आणि सर्वांत बलिष्ठ अशा सत्तेचा पराभव करावा ही गोष्ट सर्वांनाच मोठी आश्चर्यकारक वाटली आणि आशियांत या आश्चर्यकारक घटनेमुळें विशेषच आनंद निर्माण झाला.

जपान म्हणजे पाश्चिमात्यांच्या पूर्वेवरील आक्रमणाविरुद्ध लढणारा आशिया खंडाचा प्रतिनिधीच अशी इकडच्या लोकांची जपानबद्दल भावना झाली आणि त्यामुळें त्या काळीं तरी निदान पूर्वेकडे सगळीकडे जपान मोठा लोकप्रिय देश होऊन राहिला. अर्थात् जपान देश अशा रीतीनें आशिया खंडाचा प्रतिनिधि वगैरे बिलकुल नव्हता आणि त्यानें लढाई केली, ती यूरप खंडांतल्या इतर कोणाही राष्ट्रानें जशी केली असती तशी, केवळ आपल्या स्वतःच्या डावासाठींच केलेली होती; परंतु जपानच्या विजयाच्या बातम्या येत असत त्या वेळीं मला सुद्धां केवढें उत्साहाचें वारें भरत असे हें मला चांगलें आठवतें. त्या वेळीं मी जवळजवळ तुझ्याएवढाच होतों.

तात्पर्य, पश्चिमेकडील साम्राज्यशाही जसजशी अधिकाधिक आक्रमक होऊं लागली, तसतशी तिला तोंड देऊन तिच्याशीं लढण्यासाठीं म्हणून पूर्वेकडेही राष्ट्रवादाची वाढ होऊं लागली. आशिया खंडांत सगळीकडे, पश्चिमेकडील आरबी राष्ट्रापासून तों अतिपूर्वेकडील मंगोलियन राष्ट्रापर्यंत जिकडे तिकडे राष्ट्रीय चळवळींना आकार येऊं

लागला. प्रथम प्रथम या चळवळी मोठ्या सावधपणानें आणि नेमस्तपणानें चालल्या आणि मग हळूहळू त्यांच्या मागण्या जास्त जास्त तीव्र किंवा जहाल होऊं लागल्या. याच शतकांत हिंदुस्थानात हिंदी राष्ट्रीय सभेचा जन्म होऊन तिचें प्रारंभींचें कांहीं वर्षांचें कार्यही तेथें झालें. अशा रीतीनें आशिया खंडांतील बंडाची सुरुवात या शतकामध्यें झाली. इतकें झालें तरी आपली एकोणिसाव्या शतकाची पाहणी अजून पुष्कळच बाकी आहे; परंतु हें पत्र आतांच पुष्कळ लांब झाल्यामुळें तें आतां संपविलेंच पाहिजे.

## १०८

# एकोणिसावें शतक पुढें चालू

२४ नोव्हेंबर, १९३२

गेल्या पत्रामध्यें मीं तुला एकोणिसाव्या शतकाचे कांहीं विशेष सांगितले. त्याचप्रमाणें मोठीं यंत्रें उपयोगांत येऊं लागल्यानंतर पश्चिम यूरप खंडामध्यें जी औद्योगिक भांडवलशाही निर्माण झाली व तिचे जे अनेक परिणाम झाले तेही मीं तुला सांगितले. पश्चिम यूरप खंडाचेंच पाऊल या कामीं इतरांपेक्षां आधीं पडलें आणि त्यानें मजलही इतरांपेक्षां अधिक मारली. याचें एक कारण त्या देशांत लोखंडाची आणि कोळशाची उत्पत्ति होण्याजोगी नैसर्गिक साधनसंपत्ति होती हें होय. मोठीं यंत्रें तयार करण्याला आणि चालू ठेवण्यालाही कोळसा आणि लोखंड यांची फारच आवश्यकता होती. त्यावांचून हें काम होणेंच शक्य नव्हतें.

या भांडवलशाहींतून साम्राज्यशाही आणि राष्ट्रवाद यांचा उदय झाला हेंही आपण पाहिलें. राष्ट्रवाद हा कांहीं कुठला नवीन प्रकार नव्हता. पूर्वीपासून तो अस्तित्वांत होताच; पण आतां तो अधिक तीव्र झाला आणि संकुचित स्वरूपाचा झाला. या राष्ट्रवादामुळें एकाच वेळीं ऐक्य आणि भेदभाव यांची वाढ झाली. एका राष्ट्रीय गटांतले लोक पूर्वीपेक्षां एकमेकांच्या अधिक जवळ आले आणि दुसऱ्या राष्ट्रीय गटांतील लोकांपासून मात्र ते अधिकाधिक बाजूस पडत चालले. प्रत्येक देशामध्यें राष्ट्रभक्तीची वाढ होऊं लागली; पण तिच्याच जोडीला परकीयांबद्दलचा तिटकारा आणि अविश्वास यांचीही वाढ होत गेली. यूरपमध्यें तर औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले देश एकमेकांकडे जणुं कांहीं हिंस्र पशूंप्रमाणें आपले डोळे लाल करून टवकारून पाहूं लागले. जगांतल्या लुटीचा पुष्कळसा हिस्सा इंग्लंडच्या वांटणीला आलेला होता आणि तो आपल्याच हातीं राहावा अशी इंग्लंडची स्वाभाविकच इच्छा होती; पण इतर देशांना, विशेषतः जर्मनीला, अशी चीड येई, कीं जेथें जावें तेथें आपलें इंग्लंड आहेच. यामुळें

कटकटी वाढत गेल्या आणि शेवटीं त्यांतून उघड लढाया सुरू झाल्या. औद्योगिक भांडवलशाहीची सगळी रचना आणि तिच्यांतून निघालेलें हें साम्राज्यशाहीचें शेपटें यांमधून या घासाघाशी आणि झगडे निर्माण होतात. या दोन्हींमध्यें परस्पर-विरोधी अशा कांहीं गोष्टी आढळतात, कीं ज्यांचा समन्वय करणेंच अशक्य आहे; कारण भांडवलशाही आणि साम्राज्यशाही या दोहोंचाही पायाच मुळीं झगडा, स्पर्धा आणि पिळवणूक यांच्यावर आहे. त्यामुळें पूर्वेकडे या साम्राज्यशाहींतून जो राष्ट्रवाद निर्माण झाला, तोच या साम्राज्यशाहीचा अगदीं कट्टा शत्रु बनून राहिला आहे.

भांडवलशाही सुधारणेमध्यें असे जरी पुष्कळ अंतर्विरोध असले, तरी या सुधारणेपासून जगाला नवीन उपयुक्त गोष्टीही शिकावयास मिळाल्या. पहिली गोष्ट म्हणजे यापासून संघटनेचा मोठा धडा मिळाला; कारण मोठालीं यंत्रें चालवावयाचीं आणि प्रचंड प्रमाणावरील औद्योगिक उत्पादनाचा कारभार चालवावयाचा म्हणजे त्यासाठीं फार मोठ्या संघटनेची गरज लागते. त्याचप्रमाणें यामुळें मोठमोठ्या व्यवहारांत आणि कार्यांत सहकार्य कसें करावें ही गोष्ट लोक शिकले. कार्यकौशल्य आणि नियमितपणा यांचीही शिकवण यांतूनच मिळाली. हे गुण अस्तित्वांत असल्याखेरीज मोठमोठे कारखाने आणि आगगाडीचीं जाळीं चालणेंच शक्य नाहीं. केव्हां केव्हां असें म्हटलें जातें, कीं हे सारे गुण पाश्चिमात्य लोकांचे खास स्वभावविशेष असून पौर्वात्यांच्या ठिकाणीं या गुणाचा लेशही नाहीं. या बाबतींत आणि इतरही पुष्कळ बाबतींत खरा प्रश्न पूर्व आणि पश्चिम असा नाहीं. हे गुण औद्योगीकरणामुळें उत्पन्न होऊन वाढलेले आहेत. पश्चिमेकडे औद्योगीकरण झालें म्हणून तिकडील लोकांच्या अंगीं ते गुण आले. पूर्वेकडील लोक अजून शेतकीप्रधान आहेत, धंदेप्रधान नाहींत. यामुळें त्यांच्या ठिकाणीं हे गुण नाहींत.

औद्योगिक भांडवलशाहीनें जगावर आणखी एक उपकार केला. यांत्रिक शक्तीच्या उत्पादनापासून म्हणजे मोठीं यंत्रें, कोळसा आणि वाफ यांच्या साहाय्यानें संपत्ति कशी निर्माण करावी हें तिनें जगाला शिकविलें. जुन्या काळीं अशी एक भीति वाटत असे कीं जगांतील सर्व लोकांचें समाधान करतां येईल इतकी साधन-संपत्ति निसर्गांतच नाहीं. त्यामुळें जगांत पुष्कळशा लोकांना गरिबींत राहणें प्राप्त आहे. परंतु ही भीति आतां निराधार ठरली. शास्त्रें आणि यंत्रें यांच्या साहाय्यानें आतां जगांतल्या सर्व लोकांच्यासाठीं पुरेसें अन्न, वस्त्र आणि इतरही जरुरीच्या वस्तू निर्माण करणें आतां शक्य झालें. अशा रीतीनें निदान तत्त्वतः तरी उत्पादनाच्या अडचणींचा प्रश्न मिटून गेला. पण गाडी येथपर्यंत येऊनच थांबली. संपत्ति निर्माण होऊं लागली अगदीं भरपूर; परंतु गरीब हे गरीबच राहिले अथवा खरें म्हटलें तर अधिकच गरीब झाले. पूर्वेकडील देशांत आणि आफ्रिका खंडांत यूरपीय लोकांच्या अमलाखालीं अगदीं हवी तशी लूट आणि पिळवणूक सर्वस्वीं निर्लज्जपणानें आणि बेछूटपणानें सुरू झाली. त्या ठिकाणच्या बिचाऱ्या दीनदुबळ्या लोकांच्या सुखाची काळजी

घ्यायला कोणी उभें नव्हतें; पण इकडे पाश्चिम यूरप खंडामध्येंसुद्धां दारिद्र्य कांहीं कमी झालें नाहीं. तें शिल्लक तर राहिलेंच; पण उलट अधिकाधिक स्पष्टपणें दिसून मात्र येऊं लागलें. कांहीं काळपर्यंत बाकीच्या जगाच्या पिळवणुकींतून पश्चिम यूरपांत संपत्तीचा ओघ येत राहिला. यापैकीं बहुतेक सारी संपत्ति वरवरच्या मूठभर लोकांच्याच हातीं राहावयाची. अर्थात् त्यांतली थोडीशी झिरपून खालच्या गरिबांपर्यंत पोंचत होती आणि त्यामुळें त्यांच्या राहणीचें मानही थोडें वाढत जात होतें. याचाच परिणाम म्हणजे लोकसंख्याही फारच वेगानें वाढत होती.

पण ही बहुतेक सारी संपत्ति आणि राहणीचें वाढतें मान या गोष्टी आशिया, आफ्रिका आणि इतर औद्योगीकरण न झालेले देश यांच्यामधील लोकांच्या पिळवणुकीच्या जिवावर चालू होत्या. या पिळणुकीमुळें संपत्तीचा जो ओघ वाहत होता, त्यामुळें कांहीं काळ भांडवलशाहीमधील अंतर्विरोध दडून राहिले; ते लोकांना दिसून आले नाहींत. तरी पण श्रीमंत आणि गरीब यांच्यामधील अंतर मात्र वाढतच गेलें. दोहोंमध्यें फार मोठा फरक दिसून येऊं लागला. दोन वेगळे वेगळे वर्ग, दोन वेगळीं वेगळीं राष्ट्रेंच जणुं अस्तित्वांत आलीं. एकोणिसाव्या शतकांतील एक मोठा इंग्रज मुत्सद्दी बेंजामिन् डिझरायली यानें या दोन भिन्न राष्ट्रांचें पुढीलप्रमाणें वर्णन केलेलें आहे:—

"दोन राष्ट्रें; त्यांच्यामध्यें परस्परांशीं कांहीं व्यवहार किंवा संबंध नाहीं; परस्परांबद्दल जिव्हाळाही नाहीं; एकमेकांच्या राहणीबद्दल, संवयींबद्दल, विचारांबद्दल, भावनांबद्दल एकमेकांना इतकें अज्ञान आहे कीं जणुं कांहीं हे लोक जगाच्या कुठल्या दूरदूरच्या विभागांत, नाहीं तर वेगवेगळ्या ग्रहांवर राहणारे असावेत! या दोन्ही राष्ट्रांना मिळणारें शिक्षण आणि संवर्धन वेगळें आहे. त्यांचें खाण्याचें अन्न भिन्न आहे. त्यांना कोणतीही गोष्ट करण्यासाठीं हुकूम देण्याच्या पद्धती निराळ्या आहेत. या दोन राष्ट्रांचे कायदेसुद्धां एक नाहींत; अशीं हीं श्रीमंत आणि गरीब यांचीं दोन राष्ट्रें आहेत."

औद्योगीकरणाच्या या नव्या परिस्थितीमुळें मोठमोठ्या कारखान्यामध्यें काम करणाऱ्यांची संख्या फारच मोठी वाढली आणि अशा रीतीनें त्यांच्यापासून समाजामध्यें एक नवाच वर्ग—गिरणीकामगारांचा वर्ग—निर्माण झाला. हे लोक शेतकऱ्यांपेक्षां किंवा शेतकाम करणाऱ्या मजुरांपेक्षां पुष्कळच बाबतींत निराळे होते. शेतकऱ्याला ऋतुमान आणि पाऊस यांच्यावरच पुष्कळसें अवलंबून राहावें लागतें. या दोहोंवर त्याचा कांहींच ताबा चालत नाहीं. यामुळें आपल्या हालअपेष्टा आणि दारिद्र्य याचें मूळ कांहीं तरी अमानुष आहे असें त्याला वाटूं लागतें. त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं अंधश्रद्धा उत्पन्न होते. आर्थिक कार्यकारणभावाकडे तो पाहत नाहींसा होतो. निरुत्साहानें आणि निराशेनें कसा तरी तो संसार करीत राहतो. आपल्या दुर्दैवाचा फेरा आपल्याला तर कांहीं बदलतां येत नाहीं. तेव्हां येईल त्या परिस्थितीचा बोजा सहन केलाच पाहिजे असें म्हणून कसलीही धडपड न करतां कसे तरी तो दिवस काढतो. उलट,

गिरणी-कामगाराला रोज काम पडतें यंत्राशीं, म्हणजे मनुष्यानेंच तयार केलेल्या वस्तूशीं. आपल्या मालाचें उत्पादन करीत असतांना त्याला ऋतुमान किंवा पाऊस याची कांहींच फिकीर करावी लागत नाहीं. तो स्वतःच्या हातानें संपत्ति निर्माण करतो; पण ती त्याच्या हातीं न राहतां दुसऱ्याच्या हातीं जाते आणि आपण स्वतः पहिल्यासारखेच कफल्लक राहिलों असें त्याला आढळून येतें; म्हणजे थोड्या प्रमाणांत त्याला आर्थिक नियमांचें कार्य कसें चालू असतें हें पाहावयास मिळतें. त्यामुळें अतिमानुष कार्यकारण-भावाचा विचार त्याच्या मनांत येत नाहीं किंवा शेतकऱ्याइतका तो अंधश्रद्ध बनत नाहीं. आपल्या दारिद्र्याचें खापर तो परमेश्वराच्या किंवा देवदेवतांच्या माथ्यांवर फोडीत नाहीं. त्याबद्दल तो समाजाला किंवा समाजपद्धतीला दोष देतो. विशेषतः आपल्या कारखान्याचा मालक जो भांडवलदार त्याला तो अधिक दोष देतो; कारण आपल्या श्रमाचा फार मोठा फायदा हा कारखानदार घेत असतो हें त्याला दिसत असतें. यामुळें त्याच्या ठिकाणीं वर्गभावना जागृत होते आणि जगांत वेगवेगळे वर्ग असून वरिष्ठ वर्ग आपल्या वर्गावर चरत असतात हें त्याच्या ध्यानांत येऊं लागतें. अर्थातच त्याच्या मनांतील असंतोषाची ही पहिली खुसखुस अगदींच अंधुक आणि मंद अशी असते. पहिल्या-पहिल्यांदां कामगारांची उठावणी होते ती अविचारीपणाची असते; असंघटित असते. तिच्यांत दमदारपणा नसल्यानें राज्यकर्ते ती सहज मोडून काढूं शकतात. कारण आतां त्या काळच्या राज्यसत्ता, सर्वस्वीं हे नवीन मोठमोठे कारखाने आणि तदनुषंगिक उद्योग यांचें चालकत्व ज्यांच्या हातीं असतें अशा मध्यमवर्गाच्या हितसंबंधाच्याच रक्षणकर्त्या बनून गेलेल्या आहेत; परंतु उपासमारीचें दुःख असें पुष्कळ काळपर्यंत दडपून टाकलें जाणें शक्य नाहीं. लवकरच गिरणी-कामगाराला असें समजून येतें, कीं आपली खरी शक्ति आपल्याच कामगार-बांधवांच्या ऐक्यांत आणि संघटनेंत आहे. त्यामुळें कामगारांच्या हिताचें संरक्षण करण्यासाठीं आणि त्यांच्या हक्कांकरितां झगडण्यासाठीं मग कामगार-संघ, ट्रेड यूनियन्स निघतात. सुरुवातीला या सर्व संस्था गुप्तपणें काम करीत होत्या. कारण मजुरांना स्वतःची संघटना करूं देण्यालासुद्धां राज्यकर्त्यांची तयारी नव्हती. हळूहळू हें स्पष्ट होत जातें, कीं राज्यसत्ता या एका विशिष्ट वर्गाच्याच असून आपल्या वर्गाच्या हिताचें संरक्षण करण्यासाठीं केवळ त्या चंग बांधून तयार आहेत. कायदे पाहिले तरी ते सुद्धां विशिष्ट वर्गाच्या बाजूचेच. तथापि हळूहळू कामगारांचें सामर्थ्य वाढत जातें. त्यांच्या ट्रेड यूनियन्स या मोठ्या बलिष्ठ संस्था होऊन जातात. निरनिराळ्या धंद्यांतील कामगारांना हें समजून येतें, कीं हातीं सत्ता असणारा, आपली पिळणूक करणारा वर्ग हा आपल्या सगळ्यांचा एकच समान शत्रु असून त्याच्या विरुद्ध आपले सगळ्यांचे हितसंबंध अगदीं एकाच स्वरूपाचे आहेत. त्यामुळें निरनिराळ्या धंद्यांमधील कामगारसंघ एकमेकांशीं सहकार्य करूं लागतात आणि अशा रीतीनें एका देशांतील सगळ्या कारखानदारी मजुरांचा एक संघटित गट तयार होतो. याच्या पुढची पायरी म्हणजे निरनिराळ्या देशांतील

अशा गटांनीं एकत्रित होण्याची; कारण त्या सर्वांनाच आढळून येतें, कीं आपल्या सर्वांचेच हितसंबंध एक असून सर्वांचा शत्रूही एक आहे. त्यामुळें मग "जगांतील सर्व कामगार लोकहो, एक व्हा" ही घोषणा निर्माण होते आणि कामगारांच्या जागतिक संघटना होऊं लागतात. दरम्यान भांडवलशाही कारखानदारीचीही वाढ होतां होतां तिलाही आंतरराष्ट्रीय स्वरूप येऊं लागतें आणि अशा रीतीनें जेथें जेथें ही औद्योगिक भांडवलशाही वाढते, तेथें तेथें तिचा मजुरांशीं सामना सुरू होतो.

परंतु ही मी पुढच्या काळांत फार मोठी धांव घेतों आहें. म्हणून आतां परत मागें गेलें पाहिजे. या एकोणिसाव्या शतकांत निरनिराळ्या परस्पर-विरोधी अशा कितीएक प्रवृत्तींची अशी कांहीं खिचडी होऊन राहिलेली आहे कीं त्या सर्व प्रवृत्ती एकाच वेळीं योग्य प्रमाणांत नजरेसमोर ठेवणें मोठें कठिण काम आहे. हा जो मी भांडवलशाही आणि साम्राज्यशाही, राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रीयवाद, संपत्ति आणि दारिद्र्य यांचा विलक्षण गोंधळ तुझ्यापुढें उभा केला आहे, त्यांतून तुला काय बोध होणार आहे कोण जाणे! पण मी तरी काय करणार? जीवन म्हणजे ही अशा भिन्न प्रवृत्तींची विलक्षण गुंतागुंत आहे! जीवन जसें आहे तसेंच आपण घेतलें पाहिजे, तें समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि त्याच्यांत सुधारणा करण्यासाठीं झटलें पाहिजे.

परस्परांशीं न जुळणाऱ्या या भिन्न भिन्न प्रवृत्तींच्या खिचडीमुळें यूरप खंडांत आणि अमेरिकेंत पुष्कळ लोकांच्या विचाराला चालना मिळाली. या शतकाच्या प्रारंभीं नेपोलियनचा पाडाव झाल्यानंतर कोणत्याही यूरपीय राष्ट्रामध्यें स्वातंत्र्य कांहीं फारसें शिल्लक राहिलें नव्हतें. कांहीं देशांत राजांची अनियंत्रित सत्ता चालू होती; तर इंग्लंड-सारख्या कांहीं देशांमध्यें मूठभर वरिष्ठवर्गीय आणि धनिकांच्या वर्गाची सत्ता चालू होती. मागच्या पत्रांत मीं तुला सांगितल्याप्रमाणें सर्व ठिकाणीं स्वातंत्र्याच्या किंवा उदारमतवादित्वाच्या कल्पनांचे पुरस्कर्ते दडपून टाकण्यांत आले होते. असें असूनही अमेरिकन राज्यक्रांति व फ्रेंच राज्यक्रांति यांमुळें लोकशाही व राजकीय स्वातंत्र्य या कल्पना विचारवंतांना परिचित होऊं लागल्या होत्या आणि प्रियही होऊं लागल्या होत्या. राज्याच्या आणि समाजाच्या सर्व अडचणी आणि कटकटी व दुःखें दूर करण्या-साठीं लोकशाही हा फार परिणामकारक उपाय आहे अशीच उलट पुष्कळांची कल्पना होत चालली. लोकशाहीचें ध्येय काय होतें? तर कोणासही कसलेही खास अधिकार असतां कामा नयेत. राज्याच्या कारभारांत प्रत्येक व्यक्तीला राजकीय आणि सामाजिक दृष्टीनें पूर्ण समान दर्जानें वागविण्यांत आलें पाहिजे. हें कबूल, कीं व्यक्तीव्यक्तीमध्यें पुष्कळच प्रकारची भिन्नता असते. कोणी शक्तीनें जास्त असतात, कोणी बुद्धीनें मोठे असतात, कोणाच्या ठिकाणीं स्वार्थबुद्धि कमी असते; परंतु लोकशाहीवर श्रद्धा ठेवणारे लोक म्हणत, कीं हे असे फरक असले तरीसुद्धां लोकांचा राजकीय दर्जा समान असला पाहिजे. आणि हा समान दर्जा प्रस्थापित करण्याचा मार्ग त्यांनीं काढला; तो म्हणजे प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा अधिकार द्यावयाचा.

प्रगतिशील, विचारवंत आणि उदार मनाच्या लोकांची लोकशाहीच्या चांगुलपणाविषयीं अतिशय अंतःकरणपूर्वक निष्ठा व भक्ति होती. म्हणूनच लोकशाहीची प्रस्थापना करण्यासाठीं त्यांनीं प्रयत्न केले. पुराणमतवादी आणि प्रतिगामी लोकांनीं त्यांना विरोध केला. त्यामुळें जिकडे तिकडे मोठे झगडे निर्माण झाले. कांहीं देशांत क्रांत्या झाल्या. इंग्लंडमध्यें तर मतदानाचा हक्क विस्तृत होण्यापूर्वी, म्हणजे पूर्वीपेक्षां थोड्या अधिक लोकांना पार्लमेंटचे सभासद निवडून देण्याचा हक्क मिळण्यापूर्वी, जवळजवळ यादवीच्या युद्धाची पाळी आली होती. तथापि हळूहळू बहुतेक सर्व ठिकाणीं लोकशाहीचा विजय झाला आणि या शतकाच्या अखेरीस पूर्व यूरपमध्यें आणि अमेरिकेंत, निदान पुरुषांपैकीं तरी बहुतेक सर्वांना मताधिकार मिळाला. लोकशाही हें एकोणिसाव्या शतकांतलें एक मोठेंच ध्येय होतें. इतकें कीं या शतकाला लोकशाहीचें शतक असें सुद्धां नांव देण्याला हरकत नाहीं. अखेरीस लोकशाहीचा असा विजय झाला; परंतु हा अखेरचा विजय जों मिळतो आहे, तोंच लोकांची लोकशाहीवरील श्रद्धा कमी होऊं लागली. लोकांना असें आढळून आलें, कीं लोकशाहीमुळें दारिद्र्य व हालअपेष्टा यांचा किंवा भांडवलशाही समाजपद्धतींतील अंतर्विरोधाचा कांहीं निरास झाला नाहीं. उपासमारीनें मरत असलेल्या मनुष्याला तुमच्या या मताधिकारांचा काय उपयोग? आणि एका वेळच्या जेवणाच्या किंमतीला जर त्याचें हें मत किंवा त्याचे श्रम विकत घेतां येणें शक्य असेल, तर त्याला मिळालेल्या स्वातंत्र्याची तरी एवढी मोठी मातब्बरी ती काय? त्यामुळें लोकशाहीबद्दल वाद उत्पन्न झाला किंवा जास्त बिनचूक बोलावयाचें तर राजकीय लोकशाहीबद्दलची अनुकूलता नाहींशी होत चालली; परंतु हा विषय एकोणिसाव्या शतकाच्या बाहेरचा आहे.

लोकशाहीचा संबंध फक्त स्वातंत्र्याच्या राजकीय बाजूशींच तेवढा आला. एकतंत्री कारभार किंवा अनियंत्रित राजसत्ता यांच्याविरुद्ध जें लोकमत झालें, त्यांतून लोकशाहीचा जन्म झालेला होता. औद्योगिक क्षेत्रांत जे नवीन प्रश्न उपस्थित होऊं लागले होते त्यांवर किंवा दारिद्र्यावर किंवा वर्गविग्रहावर खास उपाय शोधून काढण्याचें या लोकशाहीपुढें ध्येयच नव्हतें. या लोकशाहीनें प्रत्येक व्यक्तीला आपल्या स्वाभाविक प्रवृत्तीप्रमाणें काम करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे या तत्त्वावर तेवढा भर दिला; कल्पना अशा, कीं अशा रीतीनें प्रत्येक व्यक्ति स्वार्थसाधनासाठीं स्वतःची हरएक मार्गानें उन्नति करण्याचा प्रयत्न करील, आणि व्यक्तीची अशी उन्नति झाली, कीं सर्व समाजाची आपोआपच प्रगति होईल. यालाच Laissez faire चें, व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्त्व म्हणतात. मागें एका पत्रांत मला वाटतें, याबद्दल मीं तुला सांगितलें आहे. परंतु व्यक्तिस्वातंत्र्याचा हा सिद्धांत निरुपयोगी ठरला; कारण ज्याला रोजमजुरीवर काम करण्यावांचून गत्यंतर नाहीं, त्या मनुष्याला स्वतंत्र म्हणतांच येत नाहीं.

औद्योगिक भांडवलशाहीच्या समाजपद्धतींत सर्वांत मोठा अडचणीचा प्रश्न

उपस्थित झाला तो असा : जे खरोखर काम करून समाजाची सेवा करीत, त्यांना वेतन किंवा मोबदला अगदींच बेताचा मिळावयाचा आणि धंद्यांतील सगळें खरें लोणी जे कोणी काम करीत नाहींत त्यांच्या पदरांत पडावयाचें हा तो प्रश्न होता. यामुळें श्रम आणि नफा यांची सांगड राहिली नाहीं ; त्यांचा घटस्फोट झाला. त्याचा परिणाम एका बाजूला जे श्रम करणारे ते दरिद्री आणि हीन होण्यात झाला, तर दुसऱ्या बाजूला असा एक वर्ग उत्पन्न झाला कीं जो स्वतः कांहीं काम न करतां अथवा उद्योगधंद्याच्या साधन-संपत्तींत स्वतःच्या श्रमानीं कांहींही भर न घालतां उद्योगधंद्यावर आपली उपजीविका करूं लागला. अथवा खरें म्हणजे उद्योगधंद्यांचें जळूसारखें शोषण करूं लागला. म्हणजे शेतकऱ्यानेंच शेतांत काम करावयाचें आणि जमीनदारानें जमिनींत कांहीं श्रम न करतां शेतकऱ्याच्या श्रमावर गबर व्हावयाचें हा जसा शेतींत प्रकार, तसाच कांहींसा प्रकार औद्योगिक क्षेत्रांतही झाला. श्रमाच्या फळाची ही वांटणी उघड उघड अन्यायाची होती ; पण यांत फरक मात्र असा होता, कीं कामगार आतां कांहीं दीर्घ काळ दुःखच सोशीत राहणाऱ्या शेतकऱ्यासारखा राहिलेला नव्हता. हा अन्याय होतो आहे याची त्याला जाणीव झालेली होती आणि त्या अन्यायावर तो चिडून गेलेला होता. त्याची ही चीड जसजसा काळ जात चालला, तसतशी अधिकच वाढत गेली. पश्चिमेकडील औद्योगीकरण झालेल्या सर्व देशांत हे भेद अधिकाधिक डोळ्यांवर येऊं लागले. आणि या गुंतागुंतींतून कांहीं तरी मार्ग काढला पाहिजे, म्हणून विचारवंत आणि कळकळीच्या लोकांनीं खटपटही सुरू केली. अशा रीतीनें जिला आज समाजवाद म्हणून म्हणतात, ती विचारपरंपरा उत्पन्न झाली. ही निघाली भाडवलशाहीमधूनच. पण भाडवलशाहीचा हा शत्रु असून बहुधा तिला उखडून काढण्यासाठीं तो जन्माला आलेला आहे असें दिसतें. इंग्लंडमध्यें समाजवादाचें स्वरूप थोडेसें सौम्य झालें ; फ्रान्स आणि जर्मनी-मध्यें त्याचें स्वरूप जास्त क्रांतिकारक झालें. तिकडे अमेरिकेंतील संयुक्त संस्थानामध्यें देश फारच प्रचंड आणि लोकसंख्या त्या मानानें थोडी ; त्यामुळें तेथें साधनसंपत्तीच्या वाढीला क्षेत्र फार मोठें असल्यामुळें पश्चिम यूरप खंडामध्यें भांडवलशाहीमुळें जे अन्याय आणि ज्या हालअपेष्टा उद्भवल्या, त्या पुष्कळ काळपर्यंत तितक्या मोठ्या प्रमाणांत संयुक्त संस्थानात दिसून आल्या नाहींत.

जो पुढच्या काळांत समाजवादाचा प्रवर्तक ऋषि होणार होता आणि आज कम्युनिझम् म्हणून जें समाजवादाचें रूप प्रसिद्ध आहे, त्याचा जनक असा एक गृहस्थ जर्मनींत या एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला उदयास आला. हा गृहस्थ म्हणजे कार्ल मार्क्स्. हा कांहीं निव्वळ तात्त्विक सिद्धांताची बौद्धिक चर्चा करणारा कोणी नुसता गूढवादी तत्त्वज्ञ किंवा पंडित-प्राध्यापक नव्हता. तो तत्त्वज्ञ तर होताच. पण तो व्यवहारकुशल कार्यकर्ताही होता. त्याची विशेष पद्धति म्हणजे शास्त्रीय संशोधनाचें तंत्र राजकीय, आर्थिक प्रश्नांचा विचार करतांनाही उपयोगांत आणावयाचें आणि जगांतील दुःखावर त्या रीतीनें उपाय शोधून काढावयाचे. तो म्हणतो, "आज-

पर्यंत तत्त्वज्ञानानें फक्त जग हें कशा प्रकारचें आहे एवढें सागण्याचा खटाटोप कलला आहे. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानानें तें बदलण्याचें कार्य हातीं घेतलें पाहिजे." तो आणि दुसरा एक एंगल्स नांवाचा गृहस्थ अशा दोघांनीं मिळून "कम्युनिस्ट मॅनिफेस्टो" 'कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा' प्रसिद्ध केला. त्यामध्यें कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाची रूपरेखा दिलेली आहे. त्यानंतर पुढें त्यानें जर्मन भाषेंत Das Capital किंवा इंग्रजींत कॅपिटल (भांडवल) म्हणून प्रसिद्ध असलेला प्रचंड ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. या ग्रंथांत त्यानें सगळ्या जगाच्या इतिहासाचें शास्त्रीय संशोधनाच्या नियमानुसार निरीक्षण केलें आणि समाज कोणत्या दिशेनें वाढत आला आहे व त्याची ही वाढ कशी याहूनही जलद करतां येईल हें दाखवून दिलें. मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा खुलासा करण्याचा प्रयत्न मला या ठिकाणीं करावयाचा नाहीं; परंतु मार्क्सच्या या महान् ग्रंथाचा समाजवादाच्या वाढीला फार मोठा उपयोग झाला असून कम्युनिस्ट राशियांत या ग्रंथाला आज बायबलचें स्थान प्राप्त झालेलें आहे, एवढें मात्र तूं या प्रसंगीं ध्यानांत ठेवावेंस अशी माझी इच्छा आहे.

इंग्लंडमध्यें एकोणिसाव्या शतकाच्या मध्यालाच प्रसिद्ध झालेला आणखी एक सुप्रसिद्ध ग्रंथ म्हणजे डार्विनचा Origin of Species हा होय. यानें त्या काळीं मोठीच धामधूम माजवून सोडली. डार्विन हा निसर्गशास्त्रज्ञ होता. म्हणजे तो निसर्गाचा, त्यांतही वृक्ष आणि पशू यांचा अभ्यासक होता. वृक्ष आणि पशू यांची निसर्गामध्यें वाढ कससशी होत गेलेली आहे हें त्यानें प्रत्यक्ष नमुने घेऊन त्यावरून दाखविलें. एक प्रकारच्या नैसर्गिक निवडीच्या नियमानुसार एक जात बदलून तिच्या ठिकाणीं दुसरी जात (कोटी) कशी निर्माण होते, मुळांत साधें असलेलें शरीर पुढें जास्त जास्त संकुल किंवा गुंतागुंतीचें कसें होत जातें, हें त्यानें दिग्दर्शित केलें. अशा प्रकारचा हा शास्त्रीय बुद्धिवाद, हा तर्कावर आधारलेला सिद्धांत, हा सृष्टीच्या आणि मनुष्य व पशु यांच्या उत्पत्तीसंबंधीं ख्रिस्ती धर्माची जी शिकवण होती, तिच्या अगदीं थेट विरुद्ध होता. त्यामुळें यानंतर हे शास्त्रज्ञ आणि धर्माच्या शिकवणीवर श्रद्धा असणारे लोक यांच्यामध्यें एक फार मोठा वाद झाला. प्रत्यक्ष वस्तुस्थिति काय आहे यासंबंधीं फारसा वाद नव्हता; तर जीवनविषयक दृष्टि काय असावी याबद्दलचा हा वाद होता. धर्माची जीवनविषयक दृष्टि अगदींच संकुचित असून भीति, अतिमानुष चमत्कार आणि अंधश्रद्धा यांनीं ती व्यापलेली होती. बुद्धिवाद किंवा तर्कशास्त्र यांना अवसर द्यायला धर्म तयार नव्हता. लोकांनीं जें काय सांगितलें जाईल त्यावर श्रद्धा ठेवावी, काय, कसें असलें प्रश्न विचारूं नयेत अशी धर्माची प्रवृत्ति होती. कित्येक विषयांच्यावर धर्मानें पावित्र्य आणि दैवीपण, शुद्धता वगैरेंचें असें कांहीं एक प्रगूढ आवरण घातलेलें होतें, कीं तें कधीं कोणीं काढावयाचा प्रयत्न करावयाचा नाहीं कीं त्याला कोणीं हात लावावयाचा नाहीं. शास्त्राची प्रवृत्ति आणि मार्ग यांहून अगदींच वेगळ्या प्रकारचे

होते. कारण मुख्य म्हणजे शास्त्रांत प्रत्येक गोष्टीचें सत्य स्वरूप समजून घेण्याचा उद्योग करावयाचा होता. 'बाबावाक्यं प्रमाणं' म्हणून शास्त्र कोणतीही गोष्ट गृहीत धरावयाला तयार नव्हतें. किंवा एखाद्या विषयाच्या ठिकाणीं कांहीं विशेष पावित्र्य आहे अशा कल्पनेनें भिऊन त्या विषयाच्या संशोधनापासून शास्त्र कधीं माघार घेणारें नव्हतें. प्रत्येक गोष्टींत शास्त्र अगदीं खोलवर जाऊन संशोधन करणार; अंधश्रद्धेला थारा देणार नाहीं. ज्या ज्या गोष्टी प्रत्यक्ष प्रयोगानें किंवा तर्कशुद्ध अनुमानानें सिद्ध होतील तेवढ्याच शास्त्र खऱ्या मानणार.

शास्त्रीय प्रवृत्तीचा हा जुन्यापुराण्या वठलेल्या धार्मिक दृष्टीशीं झगडा झाला त्यांत शास्त्रीय दृष्टीचा जय झाला. या सर्व विषयासंबंधीं जे कोणी विचार करणारे होते ते तर याच्या पूर्वीच किती तरी काळ, अठराव्या शतकापासूनच बुद्धिवादी बनलेले होते. फ्रान्समध्यें क्रांतीच्या पूर्वी तात्त्विक विचारांची एक लाट उसळली होती, असें मीं मागें सांगितलें तें आठवत असेल तुला. पण आतां या विचारांचा फेरबदल समाजांत फार खोलवर जाऊन पोंचला. सर्वसामान्य शिकलेल्या माणसाच्या प्रवृत्तीवरही आतां शास्त्रीय प्रगतीचा परिणाम झालेला दिसूं लागला. प्रत्येक सामान्य मनुष्य या सर्व बाबतींत म्हणजे स्वतः अगदीं खोल विचार करीत होता, किंवा त्याला म्हणजे शास्त्राचें बरेंच मोठें ज्ञान होतें असा कांहीं अर्थ नव्हे. परंतु निरनिराळे शोध आणि शास्त्रीय संशोधन यांचा त्याच्या दृष्टीसमोर जो विशाल आविष्कार घडून येत होता त्याच्या दर्शनामुळें त्याचें मन आदरानें भरून जावें हें अगदींच स्वाभाविक होतें. आगगाडी, वीज, तारायंत्र, टेलिफोन, फोनोग्राफ या आणि अशा किती तरी गोष्टी एकामागून एक माणसापुढें आल्या; या सर्व गोष्टी शास्त्रीय संशोधनाच्या मार्गांतूनच उत्पन्न झालेल्या होत्या. हा पाहा शास्त्राचा निसर्गावरील विजय, असा त्यांचा जयजयकार होत होता. शास्त्रामुळें माणसाचें नुसतें ज्ञानच वाढून थांबत नाहीं, तर त्यामुळें माणसाचा निसर्गावर ताबा वाढत जातो असें लोकाना दिसून येऊं लागलें. तेव्हां धर्माविरुद्ध शास्त्राचा जय झाला आणि लोक शास्त्राला एक प्रकारें सर्वशक्तिमान् असा देव समजून त्याच्या पुढें मस्तक नम्र करूं लागले यांत कांहीं आश्चर्य नाहीं. विशेष म्हणजे एकोणिसाव्या शतकांतील शास्त्रज्ञसुद्धां मोठे कृतकृत्य झाल्यासारखे झाले; आपली चूक म्हणून कधीं होणारच नाहीं अशी त्यांची भावना झाली आणि त्यांचीं मतें अत्यंत निश्चित अशीं होऊन गेलीं. अर्ध्या शतकाच्या पूर्वीच्या या काळापेक्षां सध्यां शास्त्राची फारच प्रचंड प्रगति झालेली आहे; परंतु आजच्या शास्त्रज्ञांची प्रवृत्ति त्या काळच्या या धन्यतेच्या किंवा बिनचूकपणाबद्दलच्या खात्रीपेक्षां अगदींच भिन्न आहे. आजच्या खऱ्या शास्त्रज्ञाला अशी जाणीव असते, कीं ज्ञानसमुद्र अपार, अनंत आणि फारच विशाल आहे आणि या समुद्राचा प्रवास करायला निघालेला असला तरी आजचा शास्त्रज्ञ पूर्वकालीन शास्त्रज्ञापेक्षां पुष्कळच नम्र भावनेनें आणि थोडासा कचरतच मार्ग आक्रमीत आहे.

एकोणिसाव्या शतकाचा आणखी एक विशेष म्हणजे सामान्य जनतेमधील शिक्षणाची पश्चिमेंत झालेली फार मोठी प्रगति. सत्ताधारी वर्गांपैकीं पुष्कळ गृहस्थांनीं शिक्षणाच्या या वाढीला फार मोठ्या जोरानें विरोध केला होता. त्यांचें म्हणणें असें होतें, कीं अशा शिक्षणानें सामान्य मनुष्य हा असंतुष्ट, राजद्रोही, उद्धट आणि अधार्मिक (ख्रिस्ती धर्मविरोधी) होईल. या प्रतिपादनाचा अर्थ असा होतो, कीं ख्रिस्ती धर्म म्हणजे अज्ञान आणि श्रीमान् व सत्ताधारी यांच्या आज्ञांचें बिनतक्रार पालन यांनींच भरलेला आहे. असा हा विरोध होऊनही प्राथमिक शिक्षणाच्या शाळा उघडल्या गेल्या आणि सामान्य जनतेचें शिक्षण वाढत गेलें. एकोणिसाव्या शतकांतील दुसऱ्या कित्येक विशेषांमध्यें हा विशेषही औद्योगीकरणाचाच परिणाम होता. कारण मोठीं यंत्रें आणि मोठे कारखाने यांच्यामध्यें कारागिरांच्या ठिकाणीं कार्यक्षमता, कुशलता व कार्यतत्परता असणें आवश्यक होतें. आणि अशी कार्यक्षमता फक्त शिक्षणानेंच उत्पन्न होण्याजोगी होती. त्या काळच्या समाजात हरएक प्रकारच्या शिकलेल्या निष्णात कामगारांची गरज होती. ही गरज सामान्य समाजांत शिक्षणाची वाढ झाल्यामुळें भागली.

अशा रीतीनें शिक्षणाचें क्षेत्र फार विस्तृत झाल्यामुळें साक्षर लोकांचा वर्ग फार मोठा वाढला. या लोकांना सुशिक्षित म्हणण्याची कांहीं सोय नाहीं; पण त्यांना लिहितां-वाचतां येत असल्यामुळें वर्तमानपत्र वाचण्याची त्यांची संवय वाढत चालली. त्यामुळें स्वस्त वर्तमानपत्रें निघूं लागून त्यांचा प्रचंड खप होऊं लागला. या वर्तमानपत्रांच्या लिहिण्याचा लोकांच्या मनावर मोठा विलक्षण परिणाम होऊं लागला. हें खरें कीं हीं वर्तमानपत्रें पुष्कळदां लोकांची दिशाभूल करून शेजाऱ्या देशांविषयीं लोकांचीं मनें भडकावीत आणि त्यापासून युद्धें निर्माण होत. तें कांहीं म्हटलें, तरी यापुढें प्रेस म्हणजे वर्तमानपत्रें हीं समाजांत जिच्याविषयीं विचार करून वागलें पाहिजे अशा प्रकारची शक्तीच झाली.

या पत्रांत मीं जें कांहीं लिहिलें आहे, तें बहुतेक सगळें यूरप खंडाला व त्यांतही विशेष म्हणजे पश्चिम यूरप खंडाला लागू आहे. उत्तर अमेरिकेलाही तें कांहीं प्रमाणांत लागू पडतें. बाकीच्या सर्व जगामध्यें म्हणजे जपान वगळून आशिया खंडामध्यें आणि आफ्रिका खंडामध्यें स्वतःचें कर्तृत्व कांहींच दिसून येत नव्हतें; यूरपमध्यें जें काय घडत होतें त्याचे परिणाम तेवढे या देशांतील लोकांना सोसावे लागत होते. म्हणूनच मागें मीं म्हटलें कीं एकोणिसावें शतक म्हणजे यूरप खंडाचें शतक. जगाच्या चित्रांत सगळीच जागा यूरपनें अडविल्यासारखी झाली; जगाच्या रंगभूमीवर सगळेंच काम एकट्या यूरप खंडाचें होत राहिलें. भूतकाळीं असे कित्येक कालखंड होऊन गेले, कीं ज्या वेळीं आशिया खंडाचें यूरप खंडावर वर्चस्व होतें. असेही पुष्कळ काळ होऊन गेले, कीं ज्या वेळीं सुधारणा, संस्कृति, प्रगति यांचें माहेरघर ईजिप्त, इराक, हिंदुस्थान, चीन, ग्रीस, रोम किंवा अरबस्तान यांपैकींच कोणत्या ना कोणत्या तरी देशांत नांदत होतें. पण या देशांतील सुधारणा म्हाताऱ्या झाल्या आणि क्षीण होऊन गेल्या; वठल्या,

दगडासारख्या निश्चल आणि निष्क्रिय झाल्या; त्यांच्यावर गंज चढला. त्यांच्यामधील परिस्थितीप्रमाणें बदलण्याची व प्रगति करण्याची जिवंतपणाची शक्ति नाहींशी झाली आणि ती इतर देशांच्या ठिकाणीं जाऊन भराला आली. या बाबतींत आतां यूरप खंडाची पाळी आली. याच वेळीं दळणवळणाचीं साधनें वाढून जगांतील या भागाचें दुसऱ्या भागांशीं दळणवळण अतिशय सुलभतेनें व जलदीनें ठेवण्याची सोय झालेली होती. यामुळें यूरप खंडाचें तर पूर्वीच्या कोणत्याही संस्कृतिसंपन्न देशापेक्षां किती तरी आधिक वर्चस्व वाढलें.

एकोणिसावें शतक हें यूरपीय संस्कृतीच्या वृक्षाच्या बहराचें शतक होऊन गेलें. या संस्कृतीला बुर्ज्ञुआ म्हणजे धनिक मध्यमवर्गीय संस्कृति असें नांव आहे. कारण औद्योगिक भांडवलशाहीमधून निर्माण झालेले जे धनिक वर्ग त्यांचा या संस्कृतीवर पगडा आहे. या संस्कृतीमधील पुष्कळसे अंतर्विरोध आणि दोषस्थळें मीं सांगितलींच तुला. आपणां हिंदी लोकांच्या, आपणां पूर्वेकडील लोकांच्या नजरेस हे दोष विशेष रीतीनें पडले आणि याच लोकांना या दोषांचा परिणामही भोगावा लागला; परंतु अंगीं महत्त्वाला चढण्याजोगें खरोखर कांहीं तरी असल्याशिवाय कोणताही देश किंवा कोणताही समाज मोठेपणाला चढूं शकत नाहीं. पाश्चिम यूरपच्या ठिकाणीं असें कांहीं तरी खास होतें आणि यूरपची प्रतिष्ठा ही खरोखर यूरपच्या लष्करी शक्तीवर आधारलेली नसून ज्या विशिष्ट गुणांमुळें यूरपला मोठेंपण प्राप्त झालें त्या गुणांवर ती प्रतिष्ठा आधारलेली आहे, हेंच खोल विचार करूं गेल्यास शेवटीं स्पष्ट होतें. या काळीं यूरप खंडांत जिकडे तिकडे विशेष जिवंतपणा, विशेष जोमदारपणा आणि नवनिर्मितीची शक्ति भरपूर प्रमाणांत आढळून आली. महान् कवी आणि ग्रंथकार, तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञ, कलावंत आणि यंत्रशास्त्रज्ञ आणि मोठे कर्तबगार लोक या काळांत यूरप खंडांत होऊन गेले. शिवाय पश्चिम यूरपमधील सामान्य माणसाची परिस्थितिसुद्धां तशी पाहिली तर पूर्वीपेक्षां किती तरी जास्त चांगली झालेली होती. तिकडचीं मोठमोठीं राजधानीचीं शहरें–लंडन, पॅरिस, बर्लिन, न्यूयॉर्क हीं शहरें–एकसारखीं मोठमोठीं होत गेलीं. त्यांच्यांतील इमारती उंच उंच होत जणुं आकाशाला भिडूं लागल्या; तेथील विलासभोग वाढत गेले आणि शास्त्रीय संशोधनांमधून मानवी श्रम, हमालींचे कष्ट, दगदग कमी करण्याचे आणि जीवनांतील सुखसोयी वाढविण्याचे मार्ग निघत गेले. सुखवस्तु लोकांचें जीवन अत्यंत परिपक्व, मधुर आणि सुसंस्कृत झालें. त्यांच्या ठिकाणीं एक प्रकारची कृतकृत्यता, स्वयंतृप्तता, किंचित् सुस्तता उत्पन्न झाली. त्यांचें तें जीवन म्हणजे संस्कृतीच्या दिवसाच्या तिसऱ्या प्रहरच्या अथवा संध्याकाळच्या अवस्थेप्रमाणें मधुर अथवा कालिदासानें म्हटल्याप्रमाणें परम रमणीय होऊन गेलें.

अशा रीतीनें एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत यूरपचें स्वरूप एकंदरींत मोठें मधुर आणि ऐश्वर्यसंपन्न असें झालें आणि वर वर पाहतांना तरी असें वाटूं लागलें, कीं ही परिपक्व सुधारणा आणि संस्कृति अशीच कायम राहून तिला पुढच्या काळांत यशा-

मागून यश मिळत जाऊन तिची सारखी प्रगतीच होत जाणार; परंतु वरचें हें आवरण दूर करून जरा आंत डोकावून पाहशील, तर खालीं तुला किती तरी विलक्षण खळबळ आणि पुष्कळसे उद्वेगकारक देखावे आढळून येतील. कारण हें सारें ऐश्वर्य, सुधारणा आणि संस्कृति या गोष्टी यूरप खंडाच्या वरिष्ठवर्गांयांपुरत्याच निर्माण झालेल्या होत्या आणि त्यांचा सगळा आधार बरेचसे देश आणि बरेच लोकसमाज यांच्या पिळणुकीवर होता. आंतल्या बाजूला मीं मागें उल्लेख केलेले अंतर्विरोध तुला आढळतील. राष्ट्रीय देशभावना आणि साम्राज्यशाहीचा उग्र आणि क्रूर चेहरा यांचें तेथें तुला दर्शन होईल. मग कांहीं या एकोणिसाव्या शतकाच्या सौंदर्याबद्दल किंवा चिरंतनपणाबद्दल तुला इतकीशी खात्री वाटणार नाहीं. या संस्कृतीचें बाह्य शरीर चांगलें साफ किंवा सुरेख होतें. पण आंत तिच्या हृदयात कीड लागलेली होती. निरोगीपणा आणि प्रगति यांबद्दल तिची एकीकडे वाहवा होत असतांना दुसरीकडे या धनिकशाही संस्कृतीच्या प्राणस्थानीं ऱ्हासाची सुरुवात झालेली होती.

शेवटीं तिचा अखेरचा चक्काचूर होण्याजोगा धक्का १९१४ मध्यें बसला. साडेचार वर्षांच्या युद्धानंतरही यूरप खंड धडपणीं या धक्क्यांतून बाहेर पडलें खरें; परंतु त्या वेळीं त्याला ज्या भयंकर जखमा झाल्या त्या अजूनही बऱ्या झालेल्या नाहींत; परंतु त्यासंबंधीं आतां पुन्हां केव्हां तरी सांगितलें पाहिजे तुला.

## १०९

## हिंदुस्थानांतील युद्धें आणि बंडें

२७ नोव्हेंबर, १९३२

एकोणिसाव्या शतकाचें आपलें हें निरीक्षण चांगलेंच लांबलचक झालें. आतां जगांतल्या कांहीं कांहीं भागांची जरा जवळून आणि सूक्ष्म पाहणी आपण करूं या. हिंदुस्थानापासून आपण सुरुवात करूं.

कांहीं दिवसांपूर्वी मीं तुला ब्रिटिशांना हिंदुस्थानमध्यें आपल्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध जय कसा मिळाला हें सांगितलें. नेपोलियनच्या विरुद्ध झालेल्या लढायांच्या काळांत फ्रेंच लोक हिंदुस्थानांतून पारच नाहींसे झाल्यासारखे होते. मराठे लोक, म्हैसूरमध्यें टिपू सुलतान आणि उत्तरेकडे शीख लोक यांनीं कांहीं काळपर्यंत इंग्रजांना रोखून धरलेलें होतें; परंतु त्यांनाही इंग्रजांचा प्रतिकार फार काळपर्यंत करतां आला नाहीं. या सर्व राज्यांमध्यें ब्रिटिश सत्ता ही अधिक सामर्थ्यवान् आणि साधनसामुग्रीनें अधिक सज्ज होती. त्यांच्याजवळ शस्त्रें चांगलीं होतीं, त्यांचा संघटितपणा चांगला होता आणि

सगळ्याहून विशेष म्हणजे कसल्याही अडचणीच्या प्रसंगीं जिचा आश्रय व मदत घ्यावी अशी आरमारी सत्ता त्यांच्यापाशीं होती. त्यांचा कांहीं पराभव झालाच नाहीं असें नव्हे; पुष्कळदां झाला; परंतु पराभव झाला तरी त्यांचा नायनाट झाला नाहीं. कारण समुद्रावरील मार्गांवर त्यांचें वर्चस्व असल्यामुळें येथली त्यांची साधनसामुग्री नष्ट झाली तरी ती दुसरीकडून त्यांना पैदा करतां येत असे. याच्या उलट, स्थानिक राज्यांना पराभव म्हटला कीं जवळजवळ सत्यानाशच होण्याची पाळी; त्याच्यावर मग कांहीं उपाय जणुं राह्यचा नाहीं. ब्रिटिश लोकांजवळ लढाईची साधनसामुग्री अधिक चांगली होती आणि त्यांची संघटनकुशलता अधिक होती, एवढ्यावरच संपलें नाहीं. आपल्या एतद्देशीय प्रतिस्पर्ध्यांपेक्षां ते फारच अधिक चतुर होते. त्यामुळें ते तेथील राज्यांच्या आपसांतील वैरांचा अतिशय चांगला फायदा करून घेत. अशा रीतीनें ब्रिटिश सत्ता अनिवार्यपणें पसरत चाललली. आपल्या प्रतिस्पर्ध्यांना एकामागून एक ब्रिटिशांनीं जमिनीवर लोळविलें. त्यातही एकाला लोळविण्याकरितां आज दुसऱ्याची मदत घ्यावयाची आणि उद्यां त्या दुसऱ्यावर तीच पाळी यावयाची, असा क्रम त्यांनीं आचरिला. त्या काळचे हे सरंजामशाहीपद्धतीचे राजे आणि सरदार इतके अदूरदृष्टि कसे होते याचें मोठें आश्चर्य वाटतें. या परकीय शत्रूंविरुद्ध सर्वांनीं मिळून एक होण्याचा विचार त्यांनीं कधींही मनांत आणला नाहीं. प्रत्येकजण आपला एकेकटा लढला आणि पडला. पडणें हेंच केव्हांही अशा स्थितींत न्यायाचें व स्वाभाविक होतें.

ब्रिटिश सत्तेचें सामर्थ्य जसजसें वाढत गेलें, तसतशी तिच्या ठिकाणीं अधिक आक्रमणाची प्रवृत्ति उत्पन्न झाली. ते लोक अधिकाधिक आक्रमणशील, चढाईखोर आणि निर्दयही बनले. कांहीं कारण असो वा नसो, त्यांनीं लोकांशीं युद्धें करायला सुरुवात केली. अशीं युद्धें किती तरी झालीं. त्या सगळ्यांच्याच हकिकती देऊन मी तुला कंटाळवूं इच्छीत नाहीं. युद्धें हा कांहीं लिहायला मोठासा आनंददायक विषय नाहीं. इतिहासामध्यें त्यांना उगीचच फार फाजील महत्त्व दिलें जात असतें. तरी पण या युद्धांसंबंधीं थोडी थोडी हकिकत तुला सांगावयालाच हवी; नाहीं तर एकंदर चित्र थोडेंसें अपुरें भासेल.

म्हैसूरचा हैदरअल्ली आणि ब्रिटिश लोक यांच्यामधील दोन युद्धांबद्दल यापूर्वी मीं तुला सांगितलेंच आहे. या दोन लढायांत हैदरअल्लीचाच मोठ्या प्रमाणांत जय झाला होता. त्याचा मुलगा टिपू सुलतान हा ब्रिटिशांचा अगदीं कट्टा वैरी होता. त्याला नामोहरम करण्यासाठीं ब्रिटिशांना त्याच्यार्शी १७९० ते १७९२ मध्यें एक व १७९९ मध्यें एक अशीं दोन युद्धें करावीं लागलीं. टिपू सुलतान लढतां लढतां मेला. म्हैसूर शहराजवळच अजूनही त्याची राजधानी जें श्रीरंगपट्टण शहर त्याचे अवशेष तुला पाहायला मिळतील. तेथें त्याची कबर आहे.

त्यानंतर आतां ब्रिटिशांच्या वर्चस्वाला विरोध करायला मराठे तेवढे उरले होते. पश्चिम हिंदुस्थानांत पेशवे होते आणि त्याच्या वरच्या बाजूला ग्वाल्हेरचे शिंदे, इंदूरचे

होळकर आणि इतर कांहीं सरदार होते ; परंतु मराठ्याचे दोन मोठे मुत्सद्दी, ग्वाल्हेरचा महादजी शिंदे आणि पेशव्यांचा मंत्री नाना फडणीस हे अनुक्रमें १७९४ आणि १८०० या सालांत मरण पावल्यानंतर मराठ्यांच्या सत्तेचा डोलाराही कोसळून पडला. तरीही मराठ्यांना पुरेसें जमीनदोस्त करायला इंग्रजांना आणखी बराच काळ लागला. अखेरीस त्यांचा १८१९ मध्यें पूर्ण पाडाव झाला खरा; परंतु त्यापूर्वी आपल्या पडत्या काळांतही त्यांनीं ब्रिटिशाचा कांहीं कांहीं ठिकाणीं पराभव केला होता. ब्रिटिशानीं या मराठे राजांना एकएकटे लढवून पराभूत केलें. एकाशीं ब्रिटिश लोक लढत असतां, बाकीच्यांनीं मदत न करतां नुसतें पाहत राहायचें असा प्रकार त्यांच्यामध्यें झाला. शिंदे आणि होळकर यांनीं ब्रिटिशांचें अधिराज्य मान्य केलें आणि ते स्वतंत्र राजे बनले. बडोद्याच्या गायकवाडांनीं तर त्यांच्या पूर्वीच या परकी सत्तेशीं तह करून टाकला होता.

मराठ्यांची रजा घेण्यापूर्वी मला मध्य हिंदुस्थानांत अत्यंत प्रसिद्धीस आलेल्या अशा एका नांवाचा उल्लेख करावयाचा आहे. तें नांव म्हणजे अहल्याबाईचें. ही स्त्री १७६५ पासून १७९५ पर्यंत ३० वर्षें इंदूर संस्थानच्या गादीवर होती. ती गादीवर आली तेव्हां अवघी ३० वर्षांची अल्पवयी आणि विधवा होती. आपल्या राज्याचा कारभार तिनें विशेषच चांगल्या रीतीनें केला. अर्थातच ही स्त्री पडदा पाळीत नव्हती. मराठे लोकांत पडद्याची ही चाल तशी केव्हांच नव्हती. राज्याच्या सगळ्या कारभारांत ती स्वतः आपलें लक्ष घालीत असे. उघड दरबारांत ती बसत असे. इंदूर हें मुळांत लहानसें खेडें होतें. त्याचें तिनें सुसंपन्न असें शहर बनविलें. तिनें कोणत्याही युद्धांत पडण्याचें टाळलें आणि आपल्या संस्थानामध्यें शांतता राखून आपलें संस्थान चांगलें भरभराटीला आणलें. आणि याच काळांत बहुतेक सगळ्या हिंदुस्थानांत दुसरीकडे नुसता धुमाकूळ माजलेला होता. त्यामुळें मध्य हिंदुस्थानांत तिला अजून संत समजतात आणि लोक तिच्याविषयीं भक्ति बाळगतात यांत कांहींच आश्चर्य नाहीं.

मराठ्यांशीं ब्रिटिशांचें अखेरचें युद्ध झालें, त्याच्या थोडें आधीं १८१४ ते १८१६ पर्यंत ब्रिटिशांचें नेपाळशीं युद्ध झालें. या डोंगराळ लढाईंत ब्रिटिशांना फार हाल सोसावे लागले; परंतु अखेरीस त्यांचा जय झाला आणि ज्या या जिल्ह्याच्या तुरुंगांत बसून हें पत्र मी लिहितों आहें, तो डेहराडून जिल्हा आणि कुमाऊन व नैनीताल हीं ठिकाणें ब्रिटिशांच्या अमलाखालीं आलीं. मागें चीनसंबंधींच्या एका पत्रांत मीं सांगितलेलें आठवत असेल तुला, कीं एकदां एका चिनी सैन्यानें अचाट साहसी पराक्रम करून तिबेटचा प्रदेश ओलांडला ; हिमालयही ओलांडला आणि गुरख्यांचा पराभव थेट त्यांच्या घरीं नेपाळमध्यें येऊन केला. ब्रिटिशांचें नेपाळशीं जें हें वर सांगितलेलें युद्ध झालें त्याच्या पूर्वी बावीसच वर्षांचा हा प्रसंग. तेव्हांपासून नांवाला का होईना पण नेपाळचें राज्य चीनचें अधिराज्य मानीत असे ; परंतु मला वाटतें हल्लीं कांहीं तें तसें मानीत नाहीं. हा एक मोठा विचित्र देश आहे. अतिशयच मागासलेला,

सगळ्या जगापासून अगदींच तुटून राहिलेला असा आहे. तरीपण त्याचें एकंदर वर्णन पाहतां, त्याची नैसर्गिक रचना मोठीच सुंदर आणि मनोहर आहे आणि तेथें नैसर्गिक संपत्तीही विपुल आहे. काश्मीर किंवा हैद्राबाद यांच्यासारखें हें परतंत्र संस्थान नाहीं. या राज्याला स्वतंत्र म्हणून समजतात मात्र; परंतु कांहीं एका मर्यादेच्या बाहेर त्याचें हें स्वातंत्र्य हातपाय पसरणार नाहीं, याबद्दल ब्रिटिश लोक नेहमीं दक्ष असतात आणि या नेपाळच्या शूर आणि लढाऊ लोकांना, गुरख्यांना, हिंदुस्थानांतील ब्रिटिशांच्या सैन्यांत दाखल करून घेण्यांत येऊन त्यांचा उपयोग हिंदी लोकांना दडपून टाकण्यास्तव केला जातो.

हिंदुस्थानच्या पूर्व दिशेला ब्रह्मदेशाचें राज्य थेट आसामपर्यंत पसरलेलें आहे. त्यामुळें नित्य सगळीकडे आपले हातपाय पसरीत चाललेल्या ब्रिटिश लोकांचा ब्रह्मी लोकांशीं झगडा होणें अपरिहार्य होतें. त्यांचीं ब्रह्मदेशाशीं तीन युद्धें झालीं. या प्रत्येक युद्धात ब्रिटिशांनीं नवीन मुलूख आपल्या राज्यांत सामील केला. पहिली लढाई १८२४ ते २६ पर्यंत झाली; तिच्यात आसाम प्रांत ब्रिटिशांच्या कबजांत आला. दुसरें युद्ध १८५२ मध्यें झालें. त्यांत दक्षिण ब्रह्मदेश ताब्यांत आल्यामुळें उत्तर ब्रह्मदेश आणि त्याची मंडालेजवळील आवा येथील राजधानी यांचा समुद्राशीं अजिबात संबंध तुटला आणि कसलाच कोठें आधार किंवा संबंध न राहून त्यांना ब्रिटिशांच्या तोंडाकडे पाहण्याची वेळ आली. अखेरीस १८८५ मध्यें तिसरें युद्ध होऊन हा सगळा ग्रंथ आटोपला आणि सगळा ब्रह्मदेश काबीज करून ब्रिटिशानीं तो आपल्या साम्राज्यांत सामील करून टाकला. तत्त्वतः ब्रह्मदेश हा चीनच्या अधिराज्याखालचा देश होता; एवढेंच नव्हे, तर येथून चीनला नियमित खंडणीसुद्धां पाठविण्यांत येत असे. हा एक चमत्कार लक्षांत ठेवण्यासारखा आहे, कीं ब्रह्मदेश आपल्या राज्यांत सामील करून घेतांना ही खंडणी चीनला देण्याविषयीं ब्रिटिशांनीं मान्यता दिली. चीनचा हात आपल्या स्वतःच्याच इतर भानगडींत फार गुंतलेला असल्यामुळें आपला मांडलिक असा जो ब्रह्मदेश त्याच्यावर स्वारी झाली त्या वेळीं त्याच्या मदतीला कांहीं चीनला येतां आलें नाहीं असें यावरून दिसतें. १८८५ नंतर ब्रिटिशांनीं एक वेळ ही खंडणी दिली, पण पुढें ती देण्याचें बंद करून टाकलें. यावरून हें स्पष्ट आहे, कीं थेट १८८५ सालीसुद्धां ब्रिटिशांना चीनच्या सामर्थ्याचा दबदबा वाटत होता.

या ब्रह्मदेशच्या लढायांतून आपण १८८५ पर्यंत आलों. कारण या तिन्ही लढायांचा एकदम विचार मला करावयाचा होता; पण आतां पुन्हां एकदां आपल्याला उत्तर हिंदुस्थान आणि या शतकाच्या थोड्या प्रारंभींच्या काळांत गेलें पाहिजे. पंजाबमध्यें या काळीं शिखांचें एक मोठें राज्य स्थापन झालेलें असून रणजितसिंग हा तेथील राजा होता. या शतकाच्या अगदीं सुरुवातीलाच रणजितसिंगानें अमृतसर शहराचा ताबा मिळविला होता. इ. स. १८२० पर्यंत तो जवळजवळ संबंध पंजाब प्रांत व काश्मीरचा प्रदेश यांचा मालक झालेला होता. तो १८३९

मध्यें मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर शिखांचें राज्य दुर्बल होत गेलें. त्यांच्यांत फाटाफूट झाली. संकटकाळांत मनुष्य वर चढत जातो आणि यश मिळाल्यानंतर मनुष्य खालीं खालीं येतो, अशा अर्थाची जी एक जुनी म्हण आहे, तिचें शिखांचें हें राज्य म्हणजे एक उत्तम उदाहरण आहे. शिखांची संख्या जेव्हां अगदींच मोजकी होती आणि मोंगलांची सत्ता त्यांच्या हात धुऊन पाठीस लागलेली होती, त्या वेळीं-सुद्धां पुढच्या पुढच्या मोंगल राज्यकर्त्यांना शिखांची सत्ता दडपून टाकतां आली नाहीं; परंतु राजकीय दृष्ट्या शिखांना यश प्राप्त झाल्यानंतर मात्र ज्या पायावर हें यश उभारलेलें होतें त्या पायाचीच दृढता कमी होत चालली. ब्रिटिशांचीं आणि शिखांचीं दोन युद्धें झालीं. पहिलें १८४५-४६ मध्यें आणि दुसरें १८४८-४९ मध्यें. दुसऱ्या युद्धांत ब्रिटिशांचा चिलियनवाला येथें फार भयंकर पराभव झाला. तरी पण अखेरीस ब्रिटिशांचाच संपूर्ण विजय झाला आणि पंजाब प्रांत खालसा करण्यांत आला. तूं स्वतः काश्मिरी आहेस. त्यामुळें या ब्रिटिश लोकांनीं जम्मूच्या कोणा एका राजा गुलाबसिंग नांवाच्या गृहस्थाला काश्मीर प्रांत पंचाहत्तर लक्ष रुपयांस विकून टाकला, हें ऐकून तुला मोठीच मौज वाटेल. गुलाबसिंगाला केवढा लग्गा मिळाला म्हणायचा हा! या खरेदी-विक्रीच्या व्यवहारांत काश्मीरच्या गरीब बिचाऱ्या प्रजेला उभयपक्षीं कोणीच कांहीं विचारलें नाहीं. हें काश्मीरचें संस्थान आतां ब्रिटिशांच्या अधिराज्याखालचें एक संस्थान असून तेथील हल्लींचा महाराजा हा या गुलाबसिंगाच्याच वंशांतला आहे.

पंजाबच्या पलीकडे आणखी उत्तरेला, किंवा खरोखर वायव्येला म्हणा, अफगाणस्तान देश आहे आणि पलीकडच्या बाजूला अफगाणिस्तानपासून जवळच रशियन लोकांचें राज्य होतें. मध्य आशियांत रशियाचें साम्राज्य वाढत चाललेलें पाहून ब्रिटिश लोकांच्या अंतःकरणांत धडकी भरलेली होती. रशिया कदाचित् हिंदुस्थानवरही हल्ला करील अशी त्यांना भीति वाटत होती. जवळ जवळ साऱ्या एकोणिसाव्या शतकभर या "रशियन संकटा"ची भाषा बोलली जात होती. त्यामुळें १८३९ मध्येंच हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याच्या लोकांनीं अफगाणिस्तानाकडून कांहींही कारण घडलेलें नसतांना अफगाणिस्तानावर हल्ला केला. त्या वेळीं अफगाणिस्तानची सरहद्द ब्रिटिशांच्या राज्यापासून फार दूर होती आणि या दोन राज्यांमध्यें पंजाब प्रांतांतील शिखांचें राज्य होतें; तरीपण शिखांशीं मैत्रीचा करार करून ब्रिटिश लोक काबूलवर चालून गेले; परंतु अफगाण लोकांनीं ब्रिटिशांना चांगलाच इंगा दाखविला. अफगाण लोक हे इतर पुष्कळ बाबतींत कितीही मागासलेले असले तरी त्यांना स्वातंत्र्यप्रेम आहे आणि त्यासाठीं ते लढायला तयार असतात. त्यामुळें ज्या कोणा परकी सैन्यानें अफगाणिस्तानावर हल्ला केला, त्यांना नेहमींच गांधीलमाशीच्या जाळ्यांत सांपडल्यासारखें होत आलेलें आहे. ब्रिटिशांनीं मारे काबूलचा आणि अफगाणिस्तानच्या पुष्कळशा प्रदेशाचा कबजा केलेला होता; परंतु एकाएकीं जिकडे-

तिकडे बंडें उसळलीं, ब्रिटिश लोकांना मागें रेटण्यांत आलें आणि ब्रिटिशाच्या एका सबंध सैन्याचा पूर्ण निःपात झाला. या नुकसानीचा सूड घेण्यासाठीं पुढें पुन्हां एक स्वारी ब्रिटिशांनीं अफगाणिस्तानवर केली. याही वेळीं ब्रिटिशांनीं काबूल शहर काबीज केलें आणि तेथील आच्छादित असा बाजार त्यांनीं जाळून टाकला. ब्रिटिश शिपायांनीं शहरांत पुष्कळ लूटमार केली आणि पुष्कळ भागांत आगी पेटविल्या. परंतु सतत लढत राहिल्याशिवाय सहजासहजीं अफगाणिस्तान देश स्वतःच्या कबजांत ठेवणें शक्य नाहीं हें ब्रिटिशांना लवकरच कळून चुकलें; त्यामुळें ते तेथून निघून आले.

यानंतर सुमारें चाळीस वर्षांनीं १८७८ मध्यें अफगाणिस्तानच्या अमीरानें रशियाची मैत्री संपादन केल्यामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिशांच्या अंतःकरणांत पुन्हां एकदां धडकी भरली. पुन्हां पुष्कळशा प्रमाणावर मागच्याच इतिहासाची पुनरावृत्ति घडून आली. पुन्हां एक युद्ध झालें. ब्रिटिशांनीं अफगाणिस्तानावर स्वारी केली; तिच्यांत यश आल्यासारखेंही झालें. अशा स्थितींत शेवटीं तेथील ब्रिटिश प्रतिनिधि आणि त्यांचा परिवार यांची अफगाण लोकांनीं कत्तल केली आणि ब्रिटिश सैन्याचा पराभव केला. त्याबद्दलच ब्रिटिशांनीं त्यांना शासन व्हावें म्हणून कांहीं अत्याचार केले आणि पुन्हां एकदां ते या 'गांधीलमाशांच्या मोहळांतून' माघार घेऊन परत आले. यानंतर पुष्कळ वर्षेंपर्यंत अफगाणिस्तानची परिस्थिति मोठीच विचित्र होती. ब्रिटिश लोक अफगाणिस्तानच्या अमीराला इतर कोणाही परकीय देशाशीं मैत्री ठेवूं देत नसत आणि त्याच वेळीं स्वतः मात्र अमीराला दरसाल भली मोठी रक्कम (खंडणी म्हणून) देत असत. तेरा वर्षांपूर्वी १९१९ मध्यें तिसरें अफगाणयुद्ध झालें. त्यामध्यें अफगाणिस्तान देश संपूर्ण स्वतंत्र झाला; परंतु आपण ज्या काळचा सध्यां विचार करतों आहों, त्याच्या बाहेरची ही गोष्ट आहे.

याशिवाय आणखीही पुष्कळ लहान लहान युद्धें झालीं. त्यांपैकीं सिंधमध्यें जें युद्ध १८४३ मध्यें उकरून काढण्यांत आलें, त्यांत तर निर्लज्जपणाची कमालच झाली. तेथें जो ब्रिटिशांचा हस्तक होता त्यानें सिंधी लोकांना धाकदपटशा दाखवून लढाईमध्यें जवळजवळ पराणी लावून खेंचलें आणि मग स्वतःच त्यांच्यावर हल्ला करून त्यानें त्याना उधळून लावून सिंध प्रांत आपल्या राज्यांत सामील केला आणि हा एक त्यांच्या रोजच्या नोकरीबाहेरचा जोडधंदाच झाला असें समजून या सत्कार्याबद्दल ब्रिटिश अमलदारांना बक्षिसाच्या रकमा वांटण्यांत आल्या. त्यांत ब्रिटिशांचा हस्तक—एजंट—सर चार्लस नेपिअर याच्या वांटणीस सात लाख रुपये आले! तेव्हां ब्रिटिशांच्यामधील नीतीची चाड नसणारे,धाडसी आणि लुटारू लोक या आमच्या हिंदुस्थानकडे आकर्षित होत राहिले यांत आश्चर्य तें काय आहे?

अयोध्या प्रांतही १८५६ मध्यें ब्रिटिश राज्यांत सामील करण्यांत आला. या प्रांतांत त्या वेळीं राज्यकारभारामध्यें अत्यंत भयंकर अंदाधुंदी माजलेली होती. तेथील राजे

अलीकडे कांहीं काळ ज्यांना नबाबवझीर म्हणत असत ते होत. मुळांत दिल्लीच्या बादशहाकडून या नबाबवझीराची नेमणूक अयोध्या प्रांताचा कारभारी, गव्हर्नर म्हणून होत असे; परंतु मोंगल राज्याचा ऱ्हास झाल्यावर अयोध्या प्रांत स्वतंत्र झाला; पण त्याचें हें स्वातंत्र्य थोडाच काळ टिकलें; पुढचे पुढचे नबाबवझीर हे सर्वथा नालायक आणि दुर्बुद्धीचे व दुराचारी निघाले आणि आपल्या प्रांताचें कांहीं कल्याण करावें अशी जरी त्यांची मोठी इच्छा असली, तरीही ईस्ट इंडिया कंपनीनें त्याच्या राज्यांत ढवळाढवळ सुरू केल्यानें तसें करणें त्यांना अशक्यच होतें. त्यांच्या स्वतःच्या हातांत खरी सत्ता अशी कांहींच नव्हती आणि ब्रिटिशांना अयोध्या प्रांताच्या अंतर्गत कारभाराशीं कांहींही कर्तव्य नव्हतें. त्यामुळें अयोध्या प्रांताचें राज्य गडगडलें आणि मग तें ब्रिटिश राज्यांत सामील होण्यावांचून गत्यंतरच राहिलें नाहीं.

या लढायांबद्दल आणि त्यांतून खालसा झालेल्या मुलखाबद्दल आतांपर्यंत मी हें जें तुला सांगत आलों तें मला वाटतें पुरेसें आहे; नव्हे, हवें त्याहून तें अधिकच आहे. परंतु हिंदुस्थानांत जी एक नवीन घडण घडून आली होती आणि जिची पुढें पुढें प्रगति होणें अनिवार्य होतें त्या घडणीचें एक बाह्य चिन्ह म्हणजे हीं सगळीं युद्धें वगैरे प्रकार होत. इंग्लिश लोक हिंदुस्थानमध्यें आले त्या वेळेपासूनच हिंदुस्थानांतील जुनी आर्थिक व्यवस्था मोडकळीस आलेली होती. सरंजामशाहीची इमारत दुभंगूं लागली होती. त्या सुमारास हिंदुस्थानांत जे परदेशचे लोक आले ते जरी आले नसते तरीसुद्धां ही सरंजामशाही फार काळ टिकून राहिली नसती. यूरपांतल्याप्रमाणें येथेंही ती जाऊन तिच्या जागीं नवीन उत्पादन करणाऱ्या वर्गांना जिच्यांत अधिक सत्ता आहे अशी व्यवस्था येथेंही अमलांत आली असती; परंतु असा हा खांदेपालट होण्यापूर्वीच, सरंजामशाहीच्या तटाची मोडतोड होण्याला नुकतीच कोठें सुरुवात होते न होते तोंच, त्यामध्यें पडलेल्या भगदाडांत ब्रिटिश लोक येऊन उभे राहिले. हिंदुस्थानांतील ज्या राज्यकर्त्यांशीं त्यांनीं युद्धें केलीं आणि ज्यांना त्यांनीं पराभूत केलें, ते सगळे जुन्या अस्तास चाललेल्या काळांतील लोक होते. भविष्यकाळची त्यांना आतां खरोखर कांहीं आशा राहिलेली नव्हती. अशा स्थितींत ब्रिटिशांना यश येणार हें अगदीं उघड होतें. त्यांनीं केलें काय, तर हिंदुस्थानांतील सरंजामशाहीचा अंत अधिक लवकर घडवून आणला. परंतु चमत्कार मात्र असा कीं याच इंग्रज लोकांनीं पुढच्या काळांत बाह्यतः का होईना, पण याच सरंजामशाहीला उभी राखण्याचा यत्न केला आणि अशा रीतीनें हिंदुस्थानच्या नवीन जागतिक रचनेच्या मार्गावरील प्रवासांत अडथळा उत्पन्न केला. पुढें आपल्याला दिसून येईलच हें.

अशा रीतीनें ज्या घडणीमुळें हिंदुस्थानांतील सरंजामशाही जाऊन तिच्या जागीं एक प्रकारची औद्योगिक भांडवलशाहीप्रधान राज्यव्यवस्था हिंदुस्थानांत स्थापन व्हावयाची होती, त्या ऐतिहासिक घडणीचे मदतनीसच जणुं ब्रिटिश लोक झाले. त्यांची त्यांनासुद्धां आपण हा बदल घडवून आणणारे हस्तक आहों याची जाणीव

नव्हती आणि त्याच्याशीं लढणारे जे अनेक हिंदी राजेरजवाडे होते, त्यांना तर या गोष्टीची एवढीसुद्धां कल्पना नव्हती. मरूं घातलेल्या संस्थेला किंवा परंपरेला काळाचा ओघ सहसा उमगत नाहीं. आपलें कार्य आणि उद्देश आतां पूर्ण झालेले असून सर्वशक्तिमान् अशा काळाच्या ओघानें येऊन आपल्याला जबरदस्तीनें व अपमानास्पद रीतीनें हांकलून लावण्याऐवजीं, गचांडी देण्याऐवजीं, आतां आपण मोठेपणानें बाजूस सरलें पाहिजे ही गोष्ट सहसा त्यांच्या ध्यानीं येत नाहीं. इतिहासापासून ते केव्हांच शहाणपणा शिकत नाहींत आणि जग एकसारखें पुढें पुढें जात चाललें असून कोणींसें म्हटल्याप्रमाणें काळ आपल्याला पाठीमागें " इतिहासाच्या केराच्या टोपलींत " टाकून जाणार आहे हें त्यांना केव्हांच पटत नाहीं. याच न्यायाला अनुसरून हिंदुस्थानांतील सरंजामशाहीलाही यांपैकीं कशाची कल्पना आली नाहीं आणि त्यानें ब्रिटिशांशीं जो लढा केला तो सर्वस्वीं निरर्थक ठरला. अगदीं याच न्यायाप्रमाणें आज हिंदुस्थानांतील आणि पूर्वेकडील इतर प्रदेशांमधील ब्रिटिश लोकांना आतां आपले दिवस संपले, साम्राज्याची सद्दी संपली हें, आणि जग निर्दयपणें ब्रिटिश साम्राज्याला ' इतिहासाच्या केराच्या टोपलींत ' टाकून पुढें मार्ग आक्रमण करणार आहे, ही गोष्टही लक्षांत येत नाहीं.

परंतु ब्रिटिश लोक हिंदुस्थानात हातपाय पसरूं लागले त्या वेळीं या देशांत जी सरंजामशाही प्रचलित होती, तिनें आणखी एक अखेरचा प्रयत्न, सत्ता आपल्या हातीं मिळविण्यासाठीं आणि परकी सत्तेला देशांतून हांकलून लावण्यासाठीं केला. हा प्रयत्न म्हणजे १८५७ सालचें प्रचंड बंड. या सुमारास सर्वच देशभर ब्रिटिशांच्या विरुद्ध फार मोठ्या प्रमाणांत असमाधान आणि असंतोष पसरलेला होता. ईस्ट इंडिया कंपनीचें धोरण एकच एक होतें. तें म्हणजे पैसा कमवायचा; दुसरेंतिसरें कांहीं नाहीं. आधीं हें धोरण आणि त्याच्या जोडीला कंपनीच्या अमलदारांचें या देशाविषयीं अज्ञान आणि लुटारूपणा यांमुळें सर्व देशभर लोकांच्या हालअपेष्टा फार वाढल्या होत्या. त्याचा परिणाम ब्रिटिशांच्या प्रत्यक्ष हिंदी सैन्यावरसुद्धां झाला होता आणि त्याच्यामध्यें छोटीं छोटीं बंडें होऊं लागलीं होतीं. राजे आणि रजवाडे व सरंजामदार जे लोक होते, त्यांतले पुष्कळसे स्वतः व अशांचे वंशज स्वाभाविकच या नवीन अधिराज्यावर अत्यंत जळतच होते. त्यामुळें गुप्तपणें बंडाची तयारी होऊं लागली. ही बंडाची संघटना विशेषेंकरून संयुक्त प्रांताच्या आसपास आणि मध्य हिंदुस्थानांत पसरली होती. परंतु हिंदुस्थानांतील लोक काय करतात आणि त्यांच्या मनांत कोणते विचार चालत असतात यांकडे ब्रिटिशांचें पाहिल्यापासूनच इतकें दुर्लक्ष होत आलेलें आहे, कीं बंडाच्या या एवढ्या तयारीची ब्रिटिशांना काडीचीसुद्धां कल्पना नव्हती. सगळीकडे बंड एकाच वेळीं सुरू व्हावें म्हणून बंडाच्या सुरुवातीचा दिवस सुद्धां नक्की केलेला होता असें दिसतें. परंतु मीरत येथील कांहीं हिंदी सैनिकांच्या तुकड्यांनीं जरा जास्त घाई केली आणि १० मे १८५७ या दिवशींच त्यांनीं बंड पुकारलें. ठरलेल्या वेळेच्या




आधींच अवेळीं झालेल्या या स्फोटामुळें पुढारी लोकांचा सर्वच कार्यक्रम विसकटला. कारण यामुळें ब्रिटिश राज्यकर्ते आतां सावध झाले. तथापि हें बंड सारा संयुक्त प्रांत, दिल्ली, मध्य हिंदुस्थानचा कांहीं भाग आणि बिहार या सर्व प्रदेशांमध्यें पेटलें. हें केवळ लष्करी सैनिकांचेंच तेवढें बंड नव्हतें; तर त्या त्या प्रदेशांतील सामान्य लोकांचेंही हें ब्रिटिशांविरुद्ध बंड होतें. बहादुरशहा नांवाचा एक दुबळा म्हातारा कवि मोंगलांच्या वंशांतला अखेरचा पुरुष म्हणून शिल्लक होता. त्यालाच कांहीं लोकांनीं बादशहा म्हणून जाहीर केलें. हें बंड वाढून त्याला, लोकांच्या मनांत ज्यांच्याविरुद्ध तीव्र द्वेषभावना निर्माण झाली होती अशा परकीयांविरुद्ध स्वातंत्र्याकरितां युद्ध असें स्वरूप प्राप्त झालें. परंतु हें स्वातंत्र्य म्हणजे पूर्वीच्या सरंजामशाहीच्या समाजपद्धतीचें. त्यांत वर अनियंत्रित सत्ताधीश अशा बादशहांचें लोढणें राहावयाचेंच होतें. सामान्य जनतेच्या स्वातंत्र्याला त्यांत कांहींएक वाव नव्हता. तरीही सामान्य जनतेमधील पुष्कळसे लोक या बंडामध्यें सामील झालेले होते. कारण एक तर आपली ही

सगळी दैन्यावस्था ब्रिटिश लोक येथें आल्यामुळें झाली, असें त्यांना वाटत होतें आणि दुसरें, कित्येक ठिकाणीं मोठ्या जमीनदारांचें त्यांच्यावर दडपण होतें. धार्मिक द्वेषामुळेंही कित्येकजण लढण्यास प्रवृत्त झालेले होते. हिंदु आणि मुसलमान या दोन्ही जमातींनीं या युद्धांत भरपूर भाग घेतला होता.

कितीक महिनेपर्यंत उत्तर हिंदुस्थान आणि मध्य हिंदुस्थान यांमध्यें ब्रिटिश राजसत्तेचा अगदीं शेवटचा तंतु तुटायचा प्रसंग आलेला होता; परंतु या बंडाचेंही भवितव्य हिंदी लोकांनींच आपल्या हातांनीं निश्चित केलें. शिखांनीं व गुरख्यांनीं ब्रिटिश लोकांना मदत केली. दाक्षिणेंत निजाम व उत्तरेंत शिंदे यांनीं आणि इतरही पुष्कळ हिंदी संस्थानिकांनीं इंग्रजांचा पक्ष धरला. अशा रीतीनें झालेली ही फाटाफूट जमेस न धरतां सुद्धा बंडाच्या अंतर्गत व्यवस्थेतच अपेशाचीं बीजें होतीं. एक तर ज्या कार्याला यापुढें यश येणें अशक्य अशा कार्यासाठीं म्हणजे सरंजामशाही चिरस्थायी करण्यासाठीं हें बंड होतें. दुसरें, या बंडाला चांगले पुढारी लाभले नव्हते. त्यांची संघटनाही व्यवस्थितपणें झालेली नव्हती आणि बंडखोरांत आपापसांत पहिल्यापासून शेवटपर्यंत मतभेद आणि भांडणें सुरू होतीं. बंडखोरांपैकीं काहीं लोकांनीं तर उगीचच क्रूरपणें ब्रिटिशांचीं कत्तल करून आपल्या कार्याला काळिमा आणला. या असल्या रानटी वागणुकीमुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिश लोकांची प्रवृत्ति ताठर मात्र झाली आणि त्यांनीं या कत्तलीचा सूड अगदीं त्याच रूपांत परंतु शेंकडों-हजारों पट अधिक प्रमाणांत घेतला. पेशव्यांचा वंशज नानासाहेब यानें कानपूरमधील इंग्रज लोकांना सुरक्षिततेची हमी दिली होती असें म्हणतात. त्यानंतरही विश्वासघात करून तेथील इंग्रज स्त्रीपुरुष आणि मुलेंबाळें यांची कत्तल करण्यांत आली. त्यामुळें इंग्रज लोक विशेषच चिडून गेले. या भयंकर अत्याचाराचें स्मारक म्हणून कानपूरमध्यें एक विहीर खडी आहे.

आडबाजूच्या कित्येक ठिकाणीं इंग्रज लोक जमावामध्यें वेढले गेले. कांहीं ठिकाणीं त्याना चांगल्या रीतीनें वागविण्यांत आलें, तर बऱ्याच ठिकाणीं वाईट रीतीनें. परिस्थिति अत्यंत बिकट असतांना आणि विरोधी पक्ष फार प्रबल असतांही इंग्रज लोक मोठ्या शौर्यानें लढले. लखनौचा वेढा हा इंग्रजांच्या धैर्याचें आणि सहनशक्तीचें मोठें उठावदार उदाहरण आहे. या वेढ्याशींच औटरॅम आणि हॅवलॉक या दोन शूर इंग्रज वीरांचीं नांवें सलग्न झालेलीं आहेत. सप्टेंबरमध्यें दिल्ली शहराला वेढा पडून त्याचा पाडाव झाला आणि तेव्हांपासूनच बंडाच्या यशाचें पारडें फिरलें. या दिवसापासून आणि पुढें कित्येक महिनेपर्यंत ब्रिटिश लोक बंडखोरांचा बीमोड करीत राहिले. तसें करतांना त्यांनीं जिकडे तिकडे हत्याकांड करून लोकांच्या मनांत भीतीनें नुसता थरकांप उडवून दिला. कित्येक लोकांना गोळ्या घालून जागच्या जागीं निर्घृणपणें ठार करण्यांत आलें. पुष्कळशा लोकांना तोफेच्या गोळ्यांनीं एकदम मारून टाकण्यांत आलें. हजारों लोकांना रस्त्याच्या बाजूच्या झाडांना टांगून मारण्यांत आलें. नील नांवाचा एक इंग्रज सेनापति अलाहाबादेहून कानपूरपर्यंत कूच करीत गेला, तेव्हां वाटेंत सारा रस्ताभर

त्यानें इतकीं माणसें टांगून मारलीं, कीं रस्त्याच्या दोन्ही कडांना एकही झाड असें शिल्लक राहिलें नाहीं म्हणतात, कीं ज्यावर कोणी ना कोणी मनुष्य टांगलेला नाहीं. पुष्कळ भरभराटलेलीं खेडींच्या खेडीं त्यानें मोडून तोडून उध्वस्त करून टाकलीं. ही सगळीच कथा अतिशयच हृदयद्रावक आणि अंगावर शहारे आणणारी असून तिच्यांतील प्रत्येक कठोर आणि विदारक सत्य तुझ्यासारख्या मुलीला सांगायला माझें मन धजत नाहीं. नानासाहेब पेशव्यानें विश्वासघात आणि रानटीपणा केला असें जरी मानलें, तरी कितीएक इंग्रज अधिकाऱ्यांनीं त्यापेक्षां शतपट रानटीपणा केला. दोन्ही पक्षांच्या बऱ्यावाईटपणाची चर्चा करण्याचा माझा उद्देश नाहीं. दोन्ही पक्षांकडून या कामांत पुष्कळच वाईट प्रकार घडलेले आहेत; परंतु होतें काय कीं कितीएक दुर्बुद्धीचे इतिहासकार आपल्याला फक्त हिंदी पक्षानें विश्वासघात आणि क्रूरपणा कसा केला यांचेंच तेवढें भलें मोठें पुराण सांगतात आणि दुसऱ्या पक्षाच्या असल्याच कृत्यांचा दुरूनसुद्धां उल्लेख करीत नाहींत. असंघटित अशा गर्दीच्या जमावाकडून होणारीं क्रूर कृत्यें हीं, संघटित असें राज्ययंत्रच जेव्हां अशा गर्दीतील जमावाप्रमाणें वागूं लागतें तेव्हां त्याच्याकडून घडणाऱ्या क्रूर कृत्यांच्या मानानें दर्यामें खससस इतकीं कमी असतात, हेंही यांत लक्षांत ठेवलें पाहिजे. अगदीं आजच्या घटकेला जरी तूं आपल्या प्रांतांतील खेड्यांमध्यें जाशील तर तुला आढळून येईल, कीं बंड मोडून काढतांना जे अत्याचार त्यांच्यावर करण्यांत आले व ज्या भयंकर हालअपेष्टा त्यांना सोसाव्या लागल्या, त्याचें मूर्तिमंत आणि राक्षसी चित्र अद्यापि लोकांच्या डोळ्यांपुढचें हाललेलें नाहीं.

या बंडामध्यें आणि तें दडपतांना, दोन्ही वेळीं जे अनन्वित प्रकार घडून आले त्यांच्या काळ्याकुट्ट पार्श्वभूमीवर एक नांव, एक तेजस्वी बिंदु फारच उठून दिसतो. तें नांव म्हणजे झांशीच्या राणी लक्ष्मीबाईचें. अवघ्या वीस वर्षांची ही तरुण विधवा पुरुषाचा वेष धारण करून आपल्या लोकांना घेऊन ब्रिटिशांच्या विरुद्ध चालून आली. तिच्या तेजस्वीपणाबद्दल, कर्तबगारपणाबद्दल आणि अमेद्य धैर्याबद्दल अनेक कथा प्रचलित आहेत. तिच्या विरुद्ध लढलेल्या इंग्रज सेनापतीनें सुद्धां बंडखोरांच्या पुढाऱ्यांपैकीं 'सर्वांत श्रेष्ठ आणि सर्वांत शूर' असें तिचें वर्णन केलें आहे. लढतां लढतां रणांगणावरच तिनें प्राण सोडला.

१८५७-५८ सालचें हें बंड म्हणजे हिंदुस्थानांतील सरंजामशाहीच्या ज्योतीची ही शेवटची लुकलुक होती. या बंडानें पुष्कळ गोष्टींची इतिश्री केली. त्यानें मोंगलांच्या वंशाची अखेर केली. कारण बंडामध्यें बहादुरशहाचे दोन मुलगे आणि एक नातू यांना त्यांनीं स्वतः कांहींही अपराध केलेला नसतांना किंवा कोणाला कांहीं चिडविलें नसतांनाही एका इंग्रज सेनापतीनें–हडसन, यानें–दिल्लीहून घेऊन जात असतांना वाटेतच गोळ्या घालून निर्दयपणें ठार केलें. अशा रीतीनें तैमूरलंग, बाबर आणि अकबर यांच्यासारख्यांच्या वंशाची अतिशय अपमानास्पद अशी अखेर झाली!

बंडानें हिंदुस्थानांतील ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्याचीही इतिश्री केली. या

राज्याचीं सूत्रें आतां प्रत्यक्ष ब्रिटिश राज्यसत्तेनें आपल्या हातीं घेतलीं आणि आतांपर्यंत ब्रिटिशांचा गव्हर्नर जनरल म्हणून जो होता त्याचेंच रूपांतर व्हाइसरॉय, राजप्रतिनिधि असें करण्यांत आलें. त्यानंतर एकोणीस वर्षांनीं म्हणजे १८७७ मध्यें इंग्रजांच्या व्हिक्टोरिया राणीनें कैसर-इ-हिंद ही पदवी धारण केली. हा किताब मूळचा रोमच्या सीझर लोकांचा आणि बायझांटियन साम्राज्यांतील बादशहांचा होता. त्याचेंच हें हिंदुस्थानला जुळेलसें रूपांतर करण्यांत आलें. आतां मोंगल राजवंश नाहींसा झाला; पण त्या बादशाहीमधील प्रवृत्ति, तिच्या अनियंत्रितपणाच्या खाणाखुणा या मात्र अजून शिल्लकच राहिल्या आणि दुसराच एक महान् मोंगल बादशहा, मुगल-ए-आझम, हिंदुस्थानवर आतां इंग्लंडमध्यें बसून राज्य करूं लागला.

## ११०

## हिंदी कारागिरांची गळचेपी

*१ डिसेंबर, १९३२*

हिंदुस्थानांतील एकोणिसाव्या शतकातील लढायांची हकिकत अशा रीतीनें सांगून झाली. सुटलों एकदांचा मी, असें त्यामुळें मला वाटलें. आतां आपणांला या शतकामध्येंच हिंदुस्थानमध्यें दुसऱ्या कांहीं याहून महत्त्वाच्या घटना घडल्या, त्याचा विचार करायला हरकत नाहीं. तरी पण, एक गोष्ट आणखी लक्षांत ठेवायला हवी तुला, कीं या ज्या सगळ्या लढाया इंग्लंडच्या हितासाठीं झाल्या त्यांचा खर्च मात्र सर्व हिंदुस्थानच्या पैशांतून करण्यांत आला. इंग्रज लोकांकडून आपल्याला जिंकून घेण्यासाठीं होणारा सगळा खर्च स्वतःच हिंदी लोकांनीं पुरवावा, ही पद्धति इंग्रज लोकांनीं येथें फारच यशस्वीपणानें अमलांत आणली! याशिवाय ज्या लोकांशीं हिंदी लोकांचें स्वतःचें कधीं भांडणतंडण नव्हतें, अशा आपल्या शेजाऱ्यांना, ब्रह्मी आणि अफगाण लोकांनाही जिंकून घेण्यासाठीं इंग्रज लोकांना हिंदी लोकांनीं आपलें रक्त आणि खजिना उपयोगात आणूं दिला. युद्ध म्हटलें कीं संपत्तीचा नाश व्हावयाचा हें ठरलेलेंच. त्यामुळें या युद्धांनीं हिंदुस्थानही कांहीं प्रमाणांत दरिद्री झाला. युद्ध म्हणजे जेत्यांना बक्षिसांच्या रकमांची पर्वणी हेंही ठरलेलें. याचें उदाहरण सिंधच्या बाबतींत आपण पाहिलेंच आहे. या आणि इतरही कारणांनीं हिंदुस्थानचें दारिद्र्य वाढत चाललेलें होतें. तरीसुद्धां ईस्ट इंडिया कंपनीकडे येथून सोन्याचांदीचा एवढा मोठा प्रवाह अजून चालूच होता, कीं कंपनी आपल्या भागीदारांना भला लठ्ठ नफा वांटीतच होती.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजसत्तेचे प्रारंभींचे दिवस म्हणजे व्यापारी लुटारूंचे दिवस होते हें मीं मागें तुला सांगितलेंच आहे. व्यापाराच्या जोरावर आणि मिषावर त्यांनीं हवी तशी नुसती लूटच चालविली होती. अशा रीतीनें ईस्ट इंडिया कंपनीनें आणि तिच्या येथील प्रतिनिधींनीं हिंदुस्थानांतील संचित संपत्तीपैकीं प्रचंड भाग धुऊन नेला. अर्थात् या बाबतींत मोबदला म्हणून हिंदुस्थानला जवळजवळ कांहींसुद्धां मिळालें नाहीं. सर्वसामान्य व्यापार पाहिला तर त्यांत कांहीं तरी देवघेव असावी लागते ; परंतु अठराव्या शतकाच्या उत्तरार्धामध्यें प्लासीच्या लढाईनंतर द्रव्याचा ओघ सगळा एकाच बाजूला वाहत गेला ; हिंदुस्थानांतून इंग्लंडमध्यें. अशा रीतीनें हिंदुस्थानची फार प्रचंड प्राचीन संपत्ति हिरावून नेण्यांत आली आणि तिकडे एका मोठ्याच चैतन्योत्पादक फेरबदलाच्या वेळीं, औद्योगिक वाढीसाठीं, इंग्लंडला या संपत्तीचा फार मोठा उपयोग झाला. व्यापार आणि अगदीं नागवी लूटमार यांच्यावर आधारलेल्या ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील राजसत्तेचा हा पहिला खंड अठराव्या शतकाच्या अखेरीस संपला.

त्यानंतरचा दुसरा खंड सबंध एकोणिसाव्या शतकभर चालला. या काळांत हिंदुस्थानचा मुख्य उपयोग म्हणजे इंग्लंडच्या कारखान्याकरितां पाठवाव्या लागणाऱ्या कच्च्या मालाची खाण आणि ब्रिटिशांच्या पक्क्या मालाची बाजारपेठ अशा रीतीनें करण्यांत आला. अर्थात् असें करतांना हिंदुस्थानची प्रगति आणि आर्थिक वाढ यांची गळचेपीच करण्यांत आली. या शतकाच्या पूर्वार्धांत तर हिंदुस्थानांत राज्यच ईस्ट इंडिया कंपनीचें म्हणजे मुळांतच व्यापार करून पैसा मिळविण्यासाठीं स्थापन झालेल्या मंडळीचें होतें ; परंतु याही काळांत ब्रिटिश पार्लमेंट येथील कारभारांत थोडें थोडें जास्त जास्त लक्ष घालूं लागलेंच होतें. पुढें १८५७-५८ सालीं बंड झाल्यानंतर ब्रिटिश सरकारनें प्रत्यक्ष सगळा राज्यकारभारच आपल्या हातीं घेतला, हें आपण मागच्या पत्रांत पाहिलेंच आहे. परंतु यामुळें राज्यकारभाराच्या मूलभूत धोरणामध्यें कांहीं मूलभूत महत्त्वाचा फरक घडला नाहीं. कारण ब्रिटिशांचें सरकार झालें, तरी ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार ज्यांच्या हातांत होता त्या वर्गाच्याच हातचें तें बाहुलें होतें.

इंग्लंडचे आर्थिक हितसंबंध आणि हिंदुस्थानचे आर्थिक हितसंबंध यांमध्यें उघडच विरोध होता ; परंतु या विरोधांत कोणतीही गोष्ट ठरावयाची ती अखेरीस इंग्लंडच्या हिताच्या दृष्टीनें ; कारण सत्ता पडली सगळीच इंग्लंडच्या हातांत ! इंग्लंडमध्यें औद्योगीकरण होण्याच्या पूर्वीच एका प्रसिद्ध इंग्रज ग्रंथकारानें हिंदुस्थानांतील ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्याचा परिणाम किती घातक होईल हें दाखवून दिलेलें होतें. हा ग्रंथकार म्हणजे ॲडाम स्मिथ. त्याला अर्थशास्त्राचा जनक म्हणून मानीत असतात. The Wealth of Nations 'राष्ट्रांची संपत्ति' या १७७६ च्या प्रारंभीं

प्रसिद्ध झालेल्या आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथामध्यें ईस्ट इंडिया कंपनीला उद्देशून त्यानें लिहिलें आहे :

" कोणताही देश जरी घेतला तरी त्यामध्यें सुद्धां निव्वळ व्यापाऱ्यांच्या एका कंपनीच्या राज्याइतकें दुसरें कोणतेंही राज्य वाईट असूं शकणार नाहीं. राज्यकर्ते या दृष्टीनें पाहिलें तर ईस्ट इंडिया कंपनीचें हित आणि कर्तव्य कशांत आहे ? तर यूरपमधून जो माल त्यांच्या हिंदी राज्यांत नेला जातो, तो त्यांच्या राज्यांत शक्य तितक्या कमी किंमतीला विकला जावा आणि हिंदुस्थानांतील जो माल इकडे बाहेरदेशांत पाठविला जातो त्या मालाला त्या बाहेरदेशांत अधिकांत अधिक किंमत परकीयांकडून मिळावी ; परंतु व्यापारी दृष्टीनें पाहिलें म्हणजे मात्र ईस्ट इंडिया कंपनीचें हित याच्या अगदीं विरुद्ध प्रकारामध्यें आहे. राज्यकर्ते या दृष्टीनें पाहिलें म्हणजे ज्या देशावर त्यांचें राज्य आहे त्या देशाचें जें हित तेंच त्यांचेंहि हित ; उलट, व्यापारी दृष्टीनें त्यांचें हित म्हणजे या देशाच्या हिताशीं अगदीं विरुद्ध असणार ! "

ब्रिटिश लोक हिंदुस्थानमध्यें आले त्या सुमारास सरंजामशाही समाजव्यवस्था मोडकळीस आलेली होती, हें मीं तुला सांगितलें आहे. मोंगल साम्राज्याचा ऱ्हास झाल्यामुळें हिंदुस्थानांतील बहुतेक प्रांतांमध्यें राजकीय अंदाधुंदी आणि बंडाळी माजलेली होती. असें असूनही रमेशचंद्र दत्त या हिंदी अर्थशास्त्रज्ञानें म्हटल्याप्रमाणें अठराव्या शतकांत हिंदुस्थान देश हा फार मोठा उद्योगधंदेवाला आणि फार मोठा शेतकीवाला देशही होता. माझ्या या पत्रांमध्यें हिंदुस्थानचें परदेशच्या बाजारपेठांवर कसें वर्चस्व होतें, हें पुष्कळदां मीं तुला दाखवून दिलेलें आहे. ईजिप्तच्या त्या चार हजार वर्षांपूर्वीच्या प्राचीन ममींच्यावर आच्छादनार्थ घातलेलें कापड सुद्धां हिंदुस्थानांतील तलम रेशमी मझलिनचें-मलमलीचें होतें. हिंदी कारागिरांचें कौशल्य पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे फार नांवाजलेलें होतें. राजकीय दृष्ट्या हलाखीचे जरी दिवस आले, तरी हिंदी कारागीर कांहीं अजून आपल्या हातांतील कसबाला पारखे झालेले नव्हते. इंग्रज किंवा इतर जे परदेशचे व्यापारी या देशांत प्रथम व्यापारधंदा शोधण्यासाठीं म्हणून आले ते कांहीं आपल्याजवळचा कोठला माल या ठिकाणीं विकण्यासाठीं आलेले नव्हते. तर येथें तयार होणाऱ्या सुंदर आणि नाजुक वस्तू खरेदी करून त्या यूरपमध्यें नेऊन पुष्कळ नफा घेऊन विकणें हाच त्यांचा येथें येण्याचा उद्देश होता. तेव्हां या यूरपीय व्यापाऱ्यांची दृष्टि प्रथम जी इकडे वळली ती येथील कच्च्या मालाच्या मोहानें मुळींच नव्हे ; तर हिंदुस्थानांतील पक्क्या मालाचें त्यांना आकर्षण वाटलें म्हणून. ईस्ट इंडिया कंपनी ही, हिंदुस्थानांत तिचें राज्य स्थापन होण्यापूर्वी, हिंदुस्थानांत तयार झालेलें सुती, लोंकरीचें किंवा रेशमी कापड आणि जरीचा माल विकूनच मोठा फायदेशीर धंदा चालवीत होती. विशेष म्हणजे हिंदुस्थानमध्यें सूत, लोंकर आणि रेशीम यांचें कापड विणण्याच्या कलेंत आणि उद्योगांत फारच मोठा कसबीपणा साध्य करण्यांत आलेला होता. रमेशचंद्र दत्तांनीं म्हटलें आहे, " कापड विणणें हा या

देशांतील लोकांचा राष्ट्रीय उद्योग होता आणि सूत काढण्याचा उद्योग या देशांतील कोट्यवधि स्त्रिया करीत होत्या." हिंदी कापडमाल इंग्लंड आणि यूरपमधील देश, चीन, जपान, ब्रह्मदेश, अरबस्तान, इराण आणि आफ्रिकेतील कांहीं भाग या सर्व ठिकाणीं जात असे.

स्वतः क्लाइव्हनें १७५७ सालीं बंगालमधील मुर्शिदाबाद या शहराचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे. "हें शहर विस्तार, लोकसंख्या आणि संपन्नता या बाबतींत लंडनच्या तोडीचें आहे. मात्र यांत फरक असा आहे, कीं या शहरांतील एकेका व्यक्तीजवळ लंडनमधील एकेका व्यक्तीपेक्षां किती तरी प्रचंड प्रमाणावर अधिक संपत्ति आहे." याच वर्षी प्लासीची लढाई जिंकून ब्रिटिश लोकांनीं बंगालमध्यें आपले पाय कायमचे रोंवले. प्रत्यक्ष याही राजकीय पाडावाच्या वेळेला, बंगाल देश हरएक प्रकारच्या उद्योगधंद्यांनीं समृद्ध होता, व आपल्या प्रांतांतील सुंदर तलम कापडमाल जगांत निरनिराळ्या ठिकाणीं पाठवीत होता. डाक्क्याची तर तलम कापडासाठीं विशेषच प्रख्याति होती आणि तेथें या प्रकारच्या कापडाचा फारच प्रचंड निर्यात व्यापार चालू होता.

तात्पर्य, या काळच्या सुमारास हिंदुस्थान देश निव्वळ सर्वस्वीं शेतकीप्रधान आणि ग्रामीण जीवनप्रधान देश राहिलेला नसून त्यापुढें त्याची पुष्कळच प्रगति झालेली होती. अर्थात् हिंदुस्थान त्या वेळींही फार मोठ्या प्रमाणात आणि प्रामुख्यानें शेतकीप्रधान देश होता. आजही तो तसा आहे आणि यापुढेंही पुष्कळ काळपर्यंत तसाच राहणार आहे; परंतु शेतीप्रधान ग्रामीण जीवनाबरोबरच येथें शहरी अथवा नागरी जीवनाची वाढ या काळीं जरूर झालेली होती. या शहरांमध्यें फार दीर्घ काळपर्यंत कलावंत आणि कारागीर जमा झालेले असत आणि एक प्रकारें सांघिक उत्पादन या ठिकाणीं होत असे. म्हणजे काय, तर या शहरांतून ज्यामध्यें शंभर किंवा अधिकही कलावंत-कारागीर काम करीत अशा प्रकारचे कारखाने असत. अर्थात् यानंतरचें जें यंत्रयुग आलें त्या यंत्रयुगाच्या काळच्या प्रचंड कारखान्यांशीं कांहीं हिंदुस्थानांतल्या या कारखान्यांची तुलना करतां येणार नाहीं. परंतु औद्योगीकरणापूर्वी मात्र पश्चिम यूरपमध्यें, विशेषतः नेदरलंडमध्यें, अशा तऱ्हेचे पुष्कळसे कारखाने असत.

या सुमारास हिंदुस्थान एका अवस्थेंतून दुसऱ्या अवस्थेंत प्रवेश करण्याच्या अगदीं सीमेवर होतें. हिंदुस्थान हा कारखानदारीचा देश झालेलाच होता आणि येथील शहरांत धनिक मध्यमवर्ग, भांडवलदारवर्गही निर्माण होऊं लागला होता. या कारखान्यांचे हे मालक भांडवलदार असून ते या कारागिरांना कच्चा माल पुरवीत असत. कालांतरानें हाच भांडवलदारवर्ग वाढून यूरपमधल्याप्रमाणेंच सरंजामदारशाहीला दडपून टाकून त्यांच्या सत्तेचें स्थान बळकाविण्याइतका समर्थ झाला असता; पण नेमक्या याच क्षणाला ब्रिटिशांचा हात येथें शिरकला आणि या गोष्टीचा हिंदी उद्योगधंद्यावर अगदींच घातक परिणाम झाला.

सुरुवातीला ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदी उद्योगधंद्यांना उत्तेजन दिलें. कारण त्या-

पासून कंपनीचा फायदा होत होता. हिंदी माल परकी देशांत विकून या देशामध्यें कंपनीजवळ सोनें आणि चांदी जमा होत होती. इंग्लंडमधले जे कारखानदार होते त्यांना हिंदी मालाची ही स्पर्धा नको होती. म्हणून अठराव्या शतकाच्या प्रारंभींच आपल्या सरकारावर वजन आणून त्याच्याकडून इंग्लंडमध्यें हिंदुस्थानांतून येणारा जो माल त्यावर त्यांनीं कर बसविला. कांहीं कांहीं हिंदी मालाला तर इंग्लंडमध्यें जाऊं देण्यालाच बंदी करण्यांत आली आणि कांहीं कांहीं हिंदी वस्तू घराच्या बाहेर वापरणें हा गुन्हा ठरविण्यांत आला होता, अशी माझी समजूत आहे. या लोकांना आपला हा बहिष्कार कायद्याच्या साह्यानें अमलांत आणतां येत होता. आणि येथें हिंदुस्थानांत बहिष्काराचा नुसता शब्द काढला तरी माणसाची तुरुंगांत रवानगी होते. इंग्लंडनें जें हें हिंदी मालावर बहिष्कार घालण्याचें धोरण सुरू केलें तेवढ्यानें कांहीं मोठेंसें नुकसान झालें नसतें. कारण एक इंग्लंड नाहीं तरी दुसऱ्या पुष्कळ बाजारपेठा हिंदी मालाला मोकळ्या होत्या ; परंतु ईस्ट इंडिया कंपनीच्या मार्फत इंग्लंडचा या वेळीं हिंदुस्थानच्या बऱ्याच मोठ्या प्रदेशावर अंमल चालू होता आणि इंग्लंडनें तर हिंदी उद्योगधंद्यांचा बळी देऊन इंग्लंडच्या उद्योगधंद्यांना पुढें लोटावयाचें असें धोरण जाणूनबुजून सुरू केलें होतें. इंग्लंडचा माल हिंदुस्थानामध्यें येई. त्यावर कांहींसुद्धां कर द्यावा लागत नसे. तसेंच हिंदुस्थानांतील कलावंतांचा व कारागिरांचा छळ करून त्यांना ईस्ट इंडिया कंपनीच्याच कारखान्यांत काम करावयास भाग पाडलें जाई. देशांतला अंतर्गत व्यापारसुद्धां, वाहतुकीवर कांहीं प्रकारचे कर बसवून, मोडकळीस आणला गेला. म्हणजे काय, तर देशांतल्या देशांत माल इकडून तिकडे न्यायचा झाला तरी त्यावर कांहीं कर द्यावा लागावयाचा.

तरी पण हिंदी कापड विणण्याचा धंदा इतका कसबी आणि कार्यक्षम झालेला होता, कीं नवीनच उदयास येणाऱ्या यांत्रिक कारखानदारीलासुद्धां या धंद्याला तोंड देणें शक्य होईना. यामुळें हिंदी कापडमालावर ८० टक्के कर लादून या यांत्रिक कारखान्यांना संरक्षण देणें भाग पडलें. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला हिंदुस्थानांतील कांहीं कांहीं प्रकारचें रेशमी आणि सुती कापड इंग्लंडमध्यें तशा प्रकारच्या स्थानिक तयार होणाऱ्या कापडापेक्षां पुष्कळच कमी किंमतीला विकतां येत असे. पण हिंदुस्थानमध्यें सत्ताधीश झाल्यानंतर हिंदी उद्योगधंदे बुडवून टाकण्याचेंच धोरण जेव्हां इंग्लंडनें स्वीकारलें, तेव्हां ही वरच्यासारखीच परिस्थिति फार दिवस टिकून राहणें शक्य नव्हतें. शिवाय कांहीं झालें तरी यांत्रिक उद्योगधंद्यांची जसजशी सुधारणा व वाढ होत गेली, तसतशी त्यांच्याशीं स्पर्धा करणें हें हिंदुस्थानांतील घरगुती धंद्यांना फार काळपर्यंत कांहीं शक्य होणारच नव्हतें. कारण यांत्रिक उत्पादन हें मोठ्या प्रमाणावर माल निर्माण करण्याचें मोठें उत्कृष्ट साधन असून असा माल घरगुती धंद्यांपेक्षां पुष्कळच स्वस्त किंमतीतही तयार होतो. तरी पण हें जें कालांतरानें घडलेंच असतें, तें इंग्लंडनें जबरदस्तीनें लौकरच घडवून आणलें आणि कदाचित् बदलत्या परिस्थितीशीं अधिक

समरस होण्याचा जो हळूहळू प्रयत्न करतां आला असता, तो प्रयत्न करणें इंग्लंडनें हिंदुस्थानला अशक्य केलें.

अशा रीतीनें जो हिंदुस्थान देश शेंकडों वर्षेपर्यंत पूर्वेकडील लँकेशायर म्हणून संबोधिला जावा अशा अवस्थेंत होता, अठराव्या शतकांत जो हिंदुस्थान कापडमाल फार मोठ्या प्रमाणांत यूरप खंडामध्यें पाठवीत होता, तोच हिंदुस्थान आतां कारखानदार देश म्हणून शिल्लक न राहतां ब्रिटिशांच्या पक्क्या मालाचें गिऱ्हाईक मात्र बनून गेला! इतिहासाचा क्रम सरळपणें चालत राहिला असता तर या देशांतही यंत्राचा उपक्रम झाला असता. तो अशा रीतीनें झाला नाहीं. उलट यंत्रावर तयार झालेला माल मात्र बाहेरून हिंदुस्थानांत येऊं लागला. पूर्वीचा प्रवाह असा होता कीं हिंदुस्थानांतील माल इंग्लंड वगैरे परकीय देशांत जावयाचा आणि तेथून सोनें-चांदी हिंदुस्थानांत यावयाची; हा प्रवाह आतां अगदीं उलट्या क्रमानें वाहूं लागला. यापुढें आतां परकीय देशांतून पक्का माल हिंदुस्थानांत येऊं लागला आणि सोनें, चांदी येथून बाहेर देशांत जाऊं लागली.

या हल्ल्यामुळें हिंदुस्थानांतील कापड विणण्याचा धंदा सर्वांत आधीं कोलमडून पडला. इंग्लंडमध्यें यांत्रिक उद्योगधंदे जसजसे वाढत गेले, तसतशी हिंदुस्थानांतील इतर धंद्यांनींही कापडधंद्याचीच वाट धरली. सामान्यतः कोणत्याही देशाच्या सरकारचें कर्तव्य त्या देशाच्या उद्योगधंद्यांचें संरक्षण करणें आणि त्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देणें हें आहे. पण या देशांतील धंद्यांना उत्तेजन किंवा संरक्षण देणें तर दूरच; पण उलट ब्रिटिश उद्योगधंद्याना अडचण उत्पन्न करील असा येथील प्रत्येक उद्योगधंदा पार उखडून टाकण्याचाच क्रम ईस्ट इंडिया कंपनीनें अमलांत आणला. यामुळें हिंदुस्थानांतील जहाजें बांधण्याचा धंदा बुडाला; धातूंच्या कारागिरांना काम चालविणें अशक्य झालें आणि कांच व कागद तयार करणाऱ्या कारखानदारांचा धंदाही हळूहळू विलयाला गेला.

पहिल्यापहिल्यांदां परकीय मालाचा प्रसार बंदरें आणि त्यांच्या आसपासचा प्रदेश एवढ्यांतच होत असे. पुढें रस्ते बांधण्यांत आले. आगगाडीचे रूळ टाकण्यांत आले. त्यामुळें परकीय मालाचा प्रसार अधिकाधिक लांबवर व अंतरावर होत चालला आणि हिंदी कारागिरांची खेडेगांवांतूनसुद्धां उचलबांगडी झाली. पुढें सुवेजचा कालवा खोदण्यांत आला आणि इंग्लंड-हिंदुस्थानमधील अंतर कमी झालें. त्यामुळें हिंदुस्थानांत इंग्लंडमधून माल आणण्यास पूर्वीपेक्षां कमी खर्च पडूं लागला. त्यामुळें यंत्रांवर तयार झालेला आणखीआणखीच पक्का माल येऊं लागून तो अगदीं आंतआंतल्या खेडेगांवांपर्यंतसुद्धां जाऊन पोहोंचूं लागला. सबंध एकोणिसाव्या शतकभर हा प्रकार चालू होता आणि आजसुद्धां कांहीं प्रमाणांत तो चालूच आहे. गेल्या कांहीं वर्षांमध्यें मात्र त्याला कोठें कोठें अटकाव होऊं लागला आहे; पण त्याबद्दल आपण पुढें बोलूं.

ब्रिटिश मालाच्या, विशेषतः कापडाच्या, या हळूहळू नकळत वाढत्या प्रसारामुळें हिंदुस्थानांतील हस्तव्यवसायांचें मरण ओढवलें. पण या गोष्टीची आणखी एक

याहूनही भयंकर बाजू होती. ती म्हणजे लाखों बेकार झालेल्या कारागिरांनीं आतां पुढें काय करावयाचें? किती तरी विणकर आणि इतर कामगार यांना आतां काम उरलें नाहीं. त्यांचें पुढें काय होणार? इंग्लंडमध्येंसुद्धां मोठाले कारखाने जेव्हां सुरू झाले, तेव्हां हस्तव्यवसायी कारागीर असेच बेकार पडले होते. त्यांचेही पुष्कळच हाल झाले; परंतु या नव्या नव्या कारखान्यांतून त्यांना काम मिळत गेलें आणि कालांतरानें या बदललेल्या परिस्थितीशीं ते समरस होऊन गेले. हिंदुस्थानांत असा कांहीं उपाय होण्याला सवडच नव्हती. येथें असे मोठे कारखानेच नव्हते, कीं ज्यांमध्यें या बेकार कारागिरांनीं (कामकऱ्यांनीं) जावें. ब्रिटिश लोकांची इच्छाच नव्हती, कीं हिंदुस्थाननें एक आधुनिक पद्धतीचें औद्योगिक राष्ट्र व्हावें. म्हणून येथें कारखाने उत्पन्न होण्याला त्यानीं उत्तेजन दिलें नाहीं. त्यामुळें घर नाहीं, काम नाहीं, उपासमार होते, अशा या गरीब-बिचाऱ्या कारागिरांना एक शेत-जमिनीवांचून दुसरा आसराच राहिला नाहीं; पण जमीन झाली तरी त्यांना कशी आणि कोठून आसरा देणार? आधींच जमिनीवर किती तरी जास्त लोक जगत होते आणि नवीन मंडळींना कसायला मिळावी अशी मोकळी जमीनच नव्हती. धंदा मोडून पडलेल्या कांहीं थोड्या कामगारांना अशी जमीन मिळून शेतमालक होण्याचें साधलें; पण बहुतेक सगळ्यांना जमीन वगैरे कांहीं नसलेले, नुसतें मजूर होऊन कोठें काम मिळतें का म्हणून पाहात हिंडावें लागलें. किती तरी लोकांना तर उपासमारीनें मरावेंच लागलें असलें पाहिजे. १८३४ मध्यें हिंदुस्थानांतील गव्हर्नर जनरलनें कंपनी-कडे अहवाल पाठवितांना कळविलें होतें म्हणतात, कीं उद्योगधंदा व व्यापार यांच्या इतिहासांत या लोकांच्या दैन्यावस्थेला, दुर्दशेला कोठेंच तोड सांपडणें दुरापास्त आहे. विणकर लोक इतके नाश पावले आहेत कीं, "हिंदुस्थानची काळीकुळकुळीत भूमि आजकाल विणकरांच्या हाडांमुळें पांढरीसफेत दिसूं लागली आहे."

हे सारे विणकर आणि इतर कारागीर बहुतेक मोठ्या गांवांतून किंवा शहरांमध्यें राहत असत. आतां त्यांचा धंदा गेला तेव्हां ते पुन्हां शेतीकडे आणि खेडेगांवांकडे परतले. त्यामुळें शहरांमधील लोकसंख्या रोडावली आणि खेडेगांवची लोकसंख्या वाढत गेली. याचाच अर्थ हिंदुस्थानच्या जीवनांतील नागरभाग कमी होऊन त्या-मधील ग्रामीणता वाढली. साऱ्या एकोणिसाव्या शतकभर ही ग्रामीणता वाढतच गेली आणि अजूनही तिची वाढ संपली आहे असें नव्हे. हिंदुस्थानच्या परिस्थितींतला हा या काळचा प्रकार म्हणजे खरोखरच एक चमत्कार आहे. सगळ्या जगामध्यें यांत्रिक उद्योगधंदे आणि औद्योगीकरण यांचा परिणाम म्हणजे खेडेगांवांतून लोक निघून शहरांत जमा होऊं लागले. हिंदुस्थानांत मात्र अगदीं याच्या उलट प्रवृत्ति उद्भवली. शहरें आणि मोठमोठीं नगरें लहान झालीं आणि मृत्युपंथाला लागलीं आणि रोज जास्त जास्त लोक शेतीवर अवलंबून राहिल्यामुळें अन्नालाही ते मोताद होत चालले.

मोठमोठे धंदे जसे बसले तसे त्यांच्यावर अवलंबून असणारे किंवा त्यांना पोषक

असे जे दुसरे पुष्कळसे दुय्यम धंदे तेही नाहींसे होत चालले. कापूस पिंजणें, रंगकाम, खडी काढणें हे धंदे कमी कमी होत गेले. हातसुताचा धंदा तर अजिबात बसला आणि लाखों घरांतून चरखा नाहींसा झाला. याचा अर्थ असा, कीं शेतकऱ्याच्या भरीला थोडें उत्पन्न मिळण्याचें जें शेतकऱ्याला साधन असे तें त्याचें नाहींसें झालें. कारण घरांतील मंडळी सूत काढून शेतकऱ्याच्या शेतीच्या उत्पन्नात बरीच भर टाकूं शकत असत. यंत्रांचा उदय झाला तेव्हां हा सगळा प्रकार पश्चिम यूरपमध्येंही अगदीं असाच घडला होता; परंतु तेथें हा जो समाजपरंपरेंत फरक झाला तो स्वाभाविक क्रमानें घडून आलेला होता आणि एकीकडे एक आर्थिक रचना मरून पडली, तर तिची जागा घेण्यासाठीं दुसरी रचना तेथें तयार होती. हिंदुस्थानांत हा फेरबदल जबरदस्तीनें घडवून आणला गेला. जुनी घरगुती कारखानदारीची पद्धति मारून टाकण्यांत आली, पण तिच्या जागीं दुसरी पद्धति जन्माला आली नाहीं; नव्हे, ब्रिटिश उद्योगधंद्यांच्या हितासाठीं ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं अशा पद्धतीचा जन्मच येथें होऊं दिला नाहीं.

ब्रिटिशांच्या हातीं या देशांतील राज्यसत्ता आली, त्या वेळीं हिंदुस्थान हा एक भरभराटीस आलेला कारखानदार देश होता, हें आपण पाहिलेंच आहे. सरळ क्रमाप्रमाणें पाहतां याच्या पुढची पायरी म्हणजे या देशाचें औद्योगीकरण करावयाचें आणि तेथें मोठ्या यंत्रांचा उपयोग सुरू करावयाचा; परंतु ब्रिटिशांच्या धोरणामुळें हिंदुस्थानला अशा रीतीनें पुढें जाण्याऐवजीं मागेंच यावें लागलें. पूर्वी हा देश थोडाफार कारखानदारी स्वरूपाचा होता, तें त्याचें स्वरूपसुद्धां नाहींसें झालें आणि पूर्वीपेक्षांही पुष्कळ अधिक प्रमाणांत हा देश शेतीप्रधान होऊन गेला.

या रीतीनें गरीब बिचाऱ्या शेतीवर या इतक्या थोरल्या कारागिराच्या आणि इतराच्या बेकार समूहांना पोसण्याचा प्रसंग आला. त्यामुळें जमिनीवरील भार फार वाढला आणि एकसारखा तो वाढताच राहिला. हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्या प्रश्नाच्या मुळाशीं आणि पायाशीं ही मुख्य गोष्ट आहे. ब्रिटिशांच्या या धोरणापासून आमचीं सगळीं दुःखें निर्माण झालेलीं आहेत आणि हा मूलभूत प्रश्न जोंपर्यंत सोडविलेला नाहीं, तोंपर्यंत हिंदी शेतकरी आणि खेड्यांतील जनता यांचें दारिद्र्य आणि हालअपेष्टा यांचा निरास होणें शक्य नाहीं.

शेतीशिवाय ज्यांना उद्योगच उरला नाहीं अशांची संख्या वाजवीपेक्षां अधिक झाली आणि मग हे लोक जमिनीचे वांटणीच्या रूपानें अगदीं लहान लहान तुकडे करून त्यांना चिकटून कसाबसा जीव धरून राहण्याचा प्रयत्न करूं लागले. आणखी नवीन जमीन तर कांहीं कोठून मिळण्याची सोयच नव्हती; परंतु प्रत्येक कुटुंबाच्या वांटणीला जी थोडीशी जमीन यावयाची तिच्यांत तर शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा धड निर्वाह होणेंही अशक्य असावयाचें. अगदीं उत्तम पीक आलें असलें तरीही उपासमार किंवा अर्धवट उपासमार त्यांच्यापुढें नेहमीं उभी असायचीच आणि पुष्कळदां असें उत्तम पीक येण्याऐवजीं मध्यम पिकाचा किंवा नापिकाचाच काळ असावयाचा. कारण

शेत पिकणें न पिकणें हें निव्वळ ऋतुमान, निसर्गाची लहर आणि पाऊसकाळ यांवर अवलंबून असावयाचें. याचा परिणाम म्हणजे मोठमोठे दुष्काळ पडूं लागले. भयंकर सांथीचे रोग पसरले आणि त्यांत लक्षावधि लोक मरण पावले. शेतकऱ्यानें गांवचा सावकार जो वाणी त्याच्याकडे जावें, उपजीविकेसाठीं कर्ज काढावें आणि तें कर्ज वाढत वाढत इतकें मोठें व्हावें, कीं तें परत करण्याची सगळी शक्यता आणि आशाही नष्ट व्हावी आणि शेतकऱ्याला जीवसुद्धां नकोसा व्हावा, अशी स्थिति निर्माण झाली. ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील एकोणिसाव्या शतकांतील शंभर वर्षांच्या राज्यानंतर हिंदुस्थानांतील रहिवाशांपैकीं फारच मोठ्या संख्येची ही अशी दशा होऊन गेली.

## १११

# हिंदुस्थानांतील खेडीं, शेतकरी आणि जमीनदार

*२ डिसेंबर, १९३२*

गेल्या पत्रांत मीं तुला ब्रिटिशांच्या धोरणामुळें हिंदुस्थानांतले घरगुती उद्योगधंदे कसे मरण पावले आणि कारागीर लोकांवर शेती आणि खेडेगाव यांचा आश्रय घेण्याची पाळी कशी आली हें सांगितलें. त्यांना दुसरा कांहीं धंदा न उरल्यामुळें शेतजमिनीवर वाजवीहून अधिक संख्येचें ओझें निर्माण झालेलें आहे व हिंदुस्थानचा आजचा खरा मोठा प्रश्न हा आहे हेंही मीं दाखवून दिलें. या गोष्टीमुळेंच मुख्यतः हिंदुस्थान देश दरिद्री झालेला आहे. या अधिक लोकांना जर जमिनीवरून काढून घेतां आलें आणि त्यांना जर इतर द्रव्योत्पादनाचे धंदे देतां आले, तर त्यामुळें हे लोक एक तर देशाच्या संपत्तींत भर घालतील आणि शिवाय त्यामुळें शेतजमिनीवरील गैरवाजवी ओझें कमी होऊन शेतीची भरभराट होईल.

पुष्कळदां असें सांगितलें जातें, कीं शेतीवर जें हें अधिक संख्येचें ओझें वाढलेलें आहे त्याचें कारण हिंदुस्थानची वाढती लोकसंख्या हें असून ब्रिटिशांचें धोरण हें कांहीं तसें विशेष याचें कारण नाहीं; परंतु हा मुद्दा बरोबर नाहीं. गेल्या शंभर वर्षांत हिंदुस्थानची लोकसंख्या वाढली आहे हें खरें आहे; पण इतर देशांमध्येंही अशाच लोकसंख्या वाढल्या आहेत. खरें पाहिलें तर लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण यूरप खंडात, विशेषतः इंग्लंड, बेल्जम, हॉलंड आणि जर्मनी या देशांमध्यें, किती तरी पटीनें अधिक आहे. कोणताही एखादा देश किंवा सारें जग यांमधील लोकसंख्येची होणारी वाढ व या वाढीच्या गरजा भागवावयाच्या कशा, जरूर पडल्यास या लोकसंख्येची वाढ कमी करावयाची कशी हा एकंदर प्रश्न फारच महत्त्वाचा आहे. तरीसुद्धां मला ही गोष्ट स्पष्ट करून सांगावयाची आहे, कीं हिंदुस्थानांत जमिनीवर जें अधिक लोकांचें

ओझें पडलें आहे, त्याचें कारण या लोकांना दुसरे उद्योगधंदे नाहींत हें आहे, वाढलेली लोकसंख्या हें नाहीं. हिंदुस्थानची लोकसंख्या सध्यां जी आहे ती हिंदुस्थानच्या मानानें अधिक मुळींच नाहीं आणि शेतीशिवाय इतर धंदे आणि कारखाने या ठिकाणीं काढतां आले, तर एवढी संख्या या देशांत सहज राहून चांगले दिवस उपभोगूं शकेल. मग पुष्कळ कालानंतर कदाचित् आम्हांला या लोकसंख्येच्या वाढीचाही प्रश्न हातांत घ्यावा लागेल.

आतां आपण ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील धोरणाचा आणखी कांहीं अंगांनीं विचार करूं. प्रथम आपण खेडेगावांत जाऊन पाहूं या.

हिंदुस्थानांतील ग्रामपंचायतींसंबंधीं आणि बाहेरचे हल्ले झाले, स्वाऱ्या झाल्या, राजसत्ता पालटल्या तरीही पंचायतीची पद्धति कशी टिकून राहिली, यासंबंधीं मी तुला वारंवार सांगत आलों आहें. अगदीं अलीकडे, १८३० मध्यें हिंदुस्थानांतील एक ब्रिटिश गव्हर्नर सर चार्ल्स मेटकाफ यानें या ग्रामसंघांचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे :

" या ग्रामपंचायती किंवा गांवगंगा म्हणजे छोटीं छोटीं प्रजासत्ताक राज्यें आहेत. त्यांना हव्या असणाऱ्या सर्व वस्तू जवळजवळ त्यांना आपल्याच पंचायतीच्या हद्दींत मिळूं शकतात. बाहेरच्या जगाशीं जवळजवळ त्यांना कांहीं संबंध ठेवावा लागत नाहीं. इतर आणखी कशाचाही नाश झाला, तरी यांचा मात्र कधींच नाश होत नाहीं असें दिसतें. अशा रीतीनें ग्रामीण जमातींचें हें एकीकरण, प्रत्येक गांवाचें मिळून होणारें एक प्रकारचें हें छोटेंसें प्रजासत्ताक राज्य हें त्यांना फारच मोठें सुखावह होतें. त्यामुळें त्यांना स्वराज्य आणि स्वतंत्रता यांचा फार मोठ्या प्रमाणांत लाभ होतो."

हें वर्णन आपल्या जुन्या काळच्या ग्रामपद्धतीची फारच स्तुति करणारें आहे. त्यामध्यें एक प्रकारच्या मोठ्याच स्वर्गीय लोकस्थितीचें चित्र रेखाटलें आहे. या खेडेगांवांमध्यें या लोकांना जें पुष्कळसें स्थानिक स्वराज्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगावयाला मिळत होतें, तें निःसंशय त्यांना सुखकारकच होतें. याशिवाय या पद्धतींत आणखीही कांहीं हितावह गोष्टी होत्या. तथापि या पद्धतींत कांहीं दोष, अहितकारक गोष्टीही होत्या. त्यांच्याकडे आपण डोळेझांक करून चालणार नाहीं. साऱ्या जगापासून पार संबंध तोडून टाकून एकेका खेडेगांवानें आपापल्यापुरतें स्वयंपूर्ण असें जीवन आंखून राहावयाचें, अशी ही पद्धति कोणत्याच बाबतींत प्रगतीला अनकूल नव्हती. वाढ आणि प्रगति यांचें मूळ नेहमीं अधिकाधिक मोठ्या अशा मनुष्यसमाजाचें परस्पर सहकार्य होत जाण्यांत असतें. जों जों कोणी एक व्यक्ति किंवा एक गट अगर समाज आपापल्यापुरताच पाहून राहूं लागतो, तों तों तो आत्मनिष्ठ, स्वार्थी आणि संकुचित बुद्धीचा होत जाण्याचा अधिकाधिक धोका असतो. खेडेगांवचीं माणसें हीं शहरांतील माणसांशीं तुलना करतां बहुशः अधिक संकुचित बुद्धीचीं आणि अंधश्रद्धाळू आढळून येतात. त्यामुळें आमच्या या ग्रामीण जनसंघामध्यें

चांगल्या गोष्टी पुष्कळच होत्या हें जरी खरें आहे, तरीपण त्यांच्या ठिकाणीं प्रगतीचें मूळ रुजूं शकण्यासारखें नव्हतें. हीं खेडीं व त्यांतील समाज त्या मानानें फारच प्राथमिक अवस्थेंत आणि मागासलेल्या स्थितींत होता. हस्तव्यवसाय आणि कारखाने हे सुद्धां त्यांच्या ऐवजीं मुख्यतः शहरांतच भरभराटीस आले होते. एक गोष्ट मात्र खरी, कीं विणकरांची फार मोठी संख्या तेवढी खेड्यापाड्यांतून विखुरलेली होती.

हे ग्रामीण जनसंघ एकमेकांशीं फारसा संबंध न येतां आपापल्यापुरतेंच स्वयंपूर्ण जीवन चालवीत असत. याचें खरें कारण म्हणजे दळणवळणाच्या साधनांचा अभाव होता हें होय. खेडेगांवांना जोडणारे असे चांगले रस्ते देशांत फारच थोडे होते. खरें म्हटलें म्हणजे असे हे चांगले रस्ते फारच थोडे होते याचमुळें मध्यवर्ती राज्यसत्तेला खेडेगांवांच्या कारभारामध्यें पुष्कळसा हात घालतां येणें कठिण पडे. जीं शहरें आणि खेडीं मोठमोठ्या नद्यांच्या कांठीं किंवा आसपास असत, त्यांचें मात्र होड्यांच्या किंवा जहाजांच्या साहाय्यानें एकमेकांशीं दळणवळण चालू शके ; परंतु अशा प्रकारचा ज्यांचा उपयोग होईल अशा नद्याही फारशा नव्हत्या. ही जी वाहतुकीच्या सुलभतेची अडचण तिच्यामुळें अंतर्गत व्यापारालासुद्धां अटकाव होत असे.

ईस्ट इंडिया कंपनीचा किती वर्षेंपर्यंत एकच एक उद्देश या देशामध्यें होता. मिळेल तेवढा खूप पैसा मिळवावयाचा आणि आपल्या भागीदारांना नफा वांटावयाचा. त्यांनीं रस्ते बांधण्याकडे फारच थोडा खर्च केला आणि सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य, शिक्षण किंवा रुग्णालयें या किंवा अशा कार्यांवर तर मुळींच खर्च केला नाहीं; परंतु पुढें ब्रिटिशांचें धोरण बदलून ते या देशांतून कच्चा माल खरेदी करण्यावर आणि आपला पक्का माल या देशांत विकण्यावर जेव्हां आपलें सगळें लक्ष पुरवूं लागले, तेव्हां मात्र त्यांनीं दळणवळणाच्या साधनांच्या बाबतींत निराळें धोरण अमलांत आणलें. या परदेशीय व्यापाराच्या व्यवस्थेसाठीं हिंदुस्थानच्या समुद्रकिनाऱ्यावर आतां मोठीं शहरें उभीं राहिलीं. मुंबई, कलकत्ता, मद्रास आणि नंतर पुढच्या काळांत कराचीं यांसारखीं हीं मोठीं शहरें कापूस वगैरे कच्चा माल सगळा आपल्या तेथें जमा करीत आणि तेथून परदेशीं पाठवीत; परदेशांतून–विशेषतः इंग्लंडमधून–यंत्रांवर तयार झालेला मालही याच शहरांमध्यें येई आणि तेथून हिंदुस्थानांत सगळीकडे तो विक्रीसाठीं जाई. याच सुमारास पश्चिमेकडे लिव्हरपूल, मँचेस्टर, बर्मिंगहॅम्, शेफील्ड यांसारखीं जीं शहरें मोठ्या प्रमाणांत वाढत होतीं, त्या शहरांत आणि हिंदुस्थानामधील या शहरांत फारच फरक होता. यूरपांतील शहरें कारखानदारी उत्पादनाचीं केंद्रें होतीं. तेथें यंत्रावर तयार होणाऱ्या मालाच्या मोठमोठ्या गिरण्याही होत्या आणि माल परदेशीं पाठविण्याचें कामही हीं शहरें करीत. हिंदुस्थानांतील या नव्या शहरांत मालाचें उत्पादन कांहींच होत नसे. हीं शहरें म्हणजे परदेशी मालाच्या नुसत्या वखारी होत्या. परदेशी सत्तेचे हे जणुं खुणेचे दगडच होते.

मीं तुला याच्या आधीं काय सांगितलें, कीं ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील धोरणा-

मुळें हिंदुस्थानांतील ग्रामीण जीवन जास्त वाढत गेलें आणि जास्त जास्त लोक शहरें सोडून खेडेगांवांत जाऊन शेतीचा आश्रय करूं लागले. असें असून सुद्धां आणि हा जो प्रवाह सुरू झाला होता त्यामध्यें कांहीं खंडही न पडतांच, समुद्रकांठीं हिंदुस्थानामध्यें हीं नवीं शहरें उदयास आलीं. या शहरांमुळें धक्का कोणास बसला असेल तर तो जीं छोटींमोठीं शहरें आणि नगरें हिंदुस्थानांत होतीं त्यांना. खेडेगांवांना मुळींच नव्हे. खेडेगांवांची वाढ होण्याची सर्वसामान्य क्रिया जी सुरू झाली होती, ती तशीच चालू राहिली.

कच्चा माल या शहरांत जमा करावयाचा आणि पक्का माल येथून आंतमध्यें पाठवावयाचा या कामासाठीं या शहरांचें देशांच्या आंतल्या भागांशीं दळणवळण सुरू करणें ही गोष्ट आतां जरुरीची झाली. याशिवाय आणखीही कांहीं शहरें प्रांतोप्रांतींच्या राजधान्या म्हणून किंवा राज्यकारभाराच्या सोयीसाठीं म्हणून निर्माण झालेलीं होतीं. त्यामुळें दळणवळणाच्या चांगल्या साधनांची गरज व निकड वाढत्याच प्रमाणावर होती. त्यामुळें साधे रस्ते आणि आगगाडीचे रस्ते बांधण्यास सुरुवात झाली. पहिला आगगाडीचा रस्ता मुंबई प्रांतांत १८५३ मध्यें बांधण्यांत आला.

हिंदी उद्योगधंद्यांचा नाश झाल्यामुळें परिस्थितींत जो फेरबदल होत होता, त्याच्याशीं आपली घडी जुळवून घेणें ही गोष्ट या जुन्या ग्रामव्यवस्थेला फारच कठिण गेली; परंतु जास्त जास्त चांगले रस्ते आणि आगगाडीचे मार्ग यांचा उदय होऊन ते जेव्हां साऱ्या देशभर पसरले, तेव्हां तर इतका काळपर्यंत जीव धरून बसलेल्या या ग्रामव्यवस्थेला जगून राहणेंही अशक्य झालें. शेवटीं ती मोडून पडली आणि नष्टच झाली. जगच जेव्हां दाराशीं येऊन ठोठावूं लागलें तेव्हां या छोटेखानी प्रजासत्ताक राज्यांना जगापासून स्वतःला कोंडून घेऊन राहणें हें अशक्यच झालें. आतां एका खेडेगांवांतील पदार्थांच्या किंमतीचा दुसऱ्या खेडेगांवांतील पदार्थांच्या किंमतीवर ताबडतोब परिणाम होऊं लागला. कारण एका खेडेगांवांतून पदार्थ दुसऱ्या खेडेगांवाला सहज पाठवितां येणें सुलभ झालें. हें कशाला? जगामधलीं दळणवळणाचीं साधनें जशीं वाढत गेलीं, तसतसा आंतां कॅनडांतील अथवा अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांमधील गव्हाच्या किंमतीचा सुद्धां हिंदुस्थानांतील गव्हाच्या किंमतीवर परिणाम होऊं लागला आहे. अशा रीतीनें परिस्थितीच्या दडपणामुळें आमची हिंदी ग्रामव्यवस्था जागतिक किंमतीच्या चक्रामध्यें ओढली गेली. त्यामुळें खेडेगांवांतील ती जुनी आर्थिक रचना पार कोलमडून पडली आणि बिचाऱ्या शेतकऱ्याला आपल्यावर एक नवीनच प्रकारची आर्थिक व्यवस्था लादली गेलेली पाहून आश्चर्यानें गोंधळून गेल्यासारखें झालें. आजपर्यंत तो खाद्यपदार्थ आणि इतर वस्तू निर्माण करीत असे, त्या केवळ आपल्या खेडेगांवच्या बाजारापुरत्या. त्याऐवजीं तो आतां जगाच्या बाजारासाठीं वस्तू निर्माण करूं लागला. जागतिक उत्पादन आणि जागतिक किंमती यांच्या दादळ्याच्या सोसाट्यांत सांपडून बिचारा हिंदी शेतकरी जास्त जास्तच खालीं

जात चालला. याच्या पूर्वी सुद्धां पीक बुडालें म्हणजे हिंदुस्थानांतही दुष्काळ पडत असत. लोकांजवळ अशा वेळीं उपयोगी पडेल असा सांठा नसे आणि देशाच्या इतर भागांतून खाद्यपदार्थ मागविण्यासारखीं सोयीचीं साधनें नसत. अशा रीतीनें अन्नाचे दुष्काळ यापूर्वी या देशांत पडत असत; पण आतां एक प्रकार घडून आला तो मात्र मोठा विलक्षण! पिकाचा सुकाळ असतांना, खाद्यपदार्थ मिळण्याची सोय असतांना, लोकांची आतां या देशांत उपासमार होऊं लागली! केव्हां केव्हां एखाद्या ठिकाणीं धान्य कमी पडलें तरी दुसरीकडून तें आगगाडीनें किंवा अशाच जलद वाहनांच्या साहाय्यानें आणणें आतां शक्य झालेलें होतें. अशा स्थितींत आतां अन्नाचा तुटवडा नव्हता, तर तें विकत घेण्याला पैशाचा तुटवडा पडूं लागला होता. तेव्हां आतां देशामध्यें अन्नाचे नव्हेत, तर पैशाचे दुष्काळ पडूं लागले आणि याहूनही विशेष आश्चर्याची गोष्ट ही, कीं पीक अतिशय बहारीचें येऊनही शेतकरीवर्गाच्या वांट्याला उलट त्याच्यामुळें हालअपेष्टाच आल्या; हा प्रकार कसा झाला हें आपण गेल्या तीन वर्षांच्या मंदीमध्यें पाहत आलोंच आहों.

तात्पर्य, जुनी ग्रामव्यवस्था मोडून पडली आणि पंचायतीची पद्धत नाहींशी झाली त्याबद्दल आपल्याला कांहीं फारसें वाईट वाटून घेण्याचें कारण नाहीं. कारण, नाहीं तरी ही पद्धत आतां जुनाट झालेली असून आधुनिक काळच्या स्थितीशीं ती मुळींच जुळण्यासारखी नव्हती; परंतु ह्याही ठिकाणीं पुन्हां असाच प्रकार घडला, कीं जुनी ग्रामव्यवस्था मोडून पडली; परंतु त्या ठिकाणीं आधुनिक परिस्थितीशीं जुळती अशी नवीन ग्रामव्यवस्था कांहीं जन्माला आली नाहीं. अशी नवीन ग्रामव्यवस्था निर्माण करून तिची जोपासना करण्याचें काम आतां आपल्याला करावयाचें आहे.

आतांपर्यंत ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील धोरणाचे शेतजमिनीवर आणि शेतकऱ्यावर अप्रत्यक्षपणें काय काय परिणाम झाले याचा आपण विचार केला. आतां ईस्ट इंडिया कंपनीचें प्रत्यक्ष धोरण काय होतें, म्हणजे शेतकरी आणि शेतजमिनीशीं संबंध येणारे सर्व लोक यांच्या बाबतींत कंपनी प्रत्यक्ष काय काय गोष्टी करीत होती, हें आपण पाहूं या. हें प्रकरण फारच गुंतागुंतीचें आहे आणि कदाचित् मला वाटतें तें कंटाळवाणेंही होईल; परंतु आपल्या देशांत या शेतकाम करणारांचींच बहुतेक सगळी वसति आहे. तेव्हां त्यांचीं दुःखें कोणतीं आहेत, त्यांची सेवा आपल्याला कशा प्रकारें करतां येईल आणि त्यांची परिस्थिति कशी सुधारतां येईल, या गोष्टी समजून घेण्याचा थोडाफार प्रयत्न आपण केला पाहिजे.

जमीनदार आणि तालुकदार व त्यांचीं कुळें हे शब्द आपल्या नेहमीं कानांवर येतात. या कुळांमध्येंही पुष्कळ प्रकार आहेत. कांहीं कांहीं लोक पोटकुळें म्हणजे कुळांचीं कुळें असतात. या सगळ्या तपशिलाच्या गोंधळांत मी तुला नेणार नाहीं. सामान्य दृष्टीनें, स्थूल मानानें पाहिल्यास आजचे हे जमीनदार म्हणजे मध्यस्थ किंवा दलाल आहेत; म्हणजे काय तर प्रत्यक्ष जमीन कसणारा आणि सरकार यांच्यामधला ते एक दुवा

आहेत. शेत जो कसतो तो या जमीनदारांचें कूळ म्हटला जातो. तो जी जमीन कसतो ती जमीनदाराच्या मालकीची समजली जाते; त्या जमिनीचा उपयोग केल्याबद्दल कर किंवा भाडें म्हणून तो जमीनदाराला खंड देतो. या खंडामधून जमीनदार कांहीं भाग आपल्या जमिनीवरील कर म्हणून सरकारला देतो. अशा रीतीनें शेतांत होणाऱ्या उत्पन्नाचे तीन विभाग पडतात. एक भाग जमीनदाराला जातो, एक भाग सरकारला जातो आणि राहिलेला तिसरा जमीन कसणाऱ्या कुळाला मिळतो. पण हे विभाग सारख्या किंमतीचे असतात असें मात्र समजूं नकोस हो. शेतामध्यें काम करीत असतो शेतकरी. त्याच्या श्रमामुळें नांगरट, पेरणी आणि दहावीस आणखी प्रकार तो करीत राहतो. त्यामुळें जमिनींत जें काय पिकायचें तें पिकतें. आपल्या या श्रमांचें फळ शेतकऱ्याला मिळावें हेंच खरोखर रास्त आहे. सरकारला सर्व समाजाचा प्रतिनिधि या नात्यानें सर्व प्रजेच्या हितार्थ पुष्कळच महत्त्वाचीं कामें करावयाचीं असतात; उदाहरणार्थ, देशांतील सर्व मुलांना शिक्षण देणें, चांगले रस्ते बांधणें आणि इतरही वाहतुकीचीं चांगलीं साधनें निर्माण करणें, रुग्णालयें आणि आरोग्यवर्धक संस्था चालविणें, पदार्थसंग्रहालयें, विश्रांतिस्थानें यांची व्यवस्था करणें, या आणि इतर आणखी कितीतरी गोष्टी करणें, हें सरकारचें कर्तव्य असतें. यासाठीं सरकारला पैशांची आवश्यकता असते. तेव्हां जमिनींतील उत्पन्नापैकीं कांहीं हिस्सा सरकारला द्यावा हेंही रास्त आहे. आतां हा भाग किती असावा हा अगदीं निराळा प्रश्न आहे. शेतकरी सरकारला जें कांहीं देतो तें रस्ते, शिक्षण, आरोग्यसंपादन वगैरे निरनिराळ्या कार्यांच्या स्वरूपांत त्याला परत मिळत असतें, किंवा मिळालेंच पाहिजे असें म्हणा. सध्यांच्या काळीं हिंदुस्थानांत अस्तित्वांत असलेलें सरकार हें परकीय लोकांच्या हातांतील सरकार आहे. तेव्हां त्याच्याबद्दल आपल्याला तिटकारा वाटतो हें ठीक आहे; परंतु स्वतंत्र आणि चांगल्या रीतीनें संघटित अशा देशांत लोक आणि सरकार हीं कांहीं कोणी निरनिराळीं नसतात; तेथें लोकांचाच राज्यकारभार असतो.

अशा रीतीनें शेतजमिनींतील उत्पन्नापैकीं दोन भागांची ही व्यवस्था आपण लाविली. एक भाग शेतकऱ्याला आणि एक भाग सरकारला; पण आणखी एक तिसरा हिस्सा यांत पडतो आणि तो जमीनदाराच्या किंवा मध्यस्थ दलालाच्या वांट्याला जातो हें आपण पाहिलेंच आहे. त्याला तो मिळावा किंवा तो मिळण्याला त्याची पात्रता आहे असें आपण मानावें, यासाठीं हा जमीनदार काय करीत असतो? कांहीं नाहीं; जवळजवळ कांहीं सुद्धां नाहीं. शेतांतील उत्पन्न काढण्याच्या कामामध्यें कांहींसुद्धां श्रम न करतां हा गृहस्थ आपला उगीचच्या उगीच उत्पन्नापैकीं भला मोठा हिस्सा खंड म्हणून घेत असतो. म्हणजे अशा रीतीनें गाडीला एक पांचवें चाक असावें ना, तशी त्याची अवस्था होते. खरोखर उपयोग असा कांहीं नाहींच; पण उलट अडगळ मात्र जास्त. जमिनीवर एक निष्कारण बोजा. अर्थात् या अनावश्यक बोजापासून कोणाला सगळ्यांत अधिक नुकसान सोसावें लागत असेल तर तें

शेतकऱ्यालाच ! कारण त्याला आपल्या मिळकतींतला हिस्सा काढून या जमीनदाराला द्यावा लागत असतो. यामुळेंच पुष्कळ लोकांचें असें मत आहे, कीं हा जमीनदार किंवा तालुकदार मध्यस्थ, दलाल या दृष्टीनें आम्हांला मुळींच नको ; ही जमीनदारी पद्धतीच वाईट आहे आणि ती बदलून हा मध्यस्थ-दलाल-नाहींसा होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. सध्यां हिंदुस्थानामध्यें ही जमीनदारी मुख्यतः बंगाल, बिहार आणि संयुक्त-प्रांत या तीन प्रांतांत आहे.

बाकीच्या प्रांतांत सामान्यतः शेतमालकच आपली जमीन कसतात आणि सरकारलाच थेट स्वतः शेतावरील कर भरतात ; त्या ठिकाणीं असा मध्यस्थ, दलाल नाहीं. कोठें कोठें या लोकांना शेतमालक, किसान असें म्हणतात ; तर कोठें कोठें, उदाहरणार्थ, पंजाबमध्यें, त्यांना जमीनदार म्हणतात ; पण हे जमीनदार बंगाल, बिहार आणि संयुक्त प्रांत यांमधील जमीनदारांपेक्षां फार निराळे.

एवढा हा भला लांबलचक खुलासा केल्यानंतर आतां मी तुला सांगणार आहें, कीं आज जी ही जमीनदारी पद्धति बंगाल, बिहार आणि संयुक्त प्रांत यांमध्यें जोरांत चालू आहे आणि जिच्याबद्दल नेहमीं पुष्कळ वाद चाललेले आपण पाहतों, ती पद्धति हिंदुस्थानला अगदींच नवी आहे. ही ब्रिटिशांनीं उत्पन्न केलेली पद्धति आहे. ते लोक इकडे येण्यापूर्वी आपल्या देशांत ही पद्धति अस्तित्वांत नव्हती.

जुन्या काळीं-प्राचीन काळीं-असे हे जमीनदार किंवा जमीनमालक अथवा मध्यस्थ दलाल मुळींच नव्हते. शेत कसणारे लोक जमिनीच्या उत्पन्नापैकीं कांहीं भाग थेट सरकारलाच देत असत. कधीं कधीं ग्रामपंचायत शेतकऱ्याच्या तर्फे अथवा गांवच्या तर्फे हें काम करीत असे. अकबराच्या वेळीं त्याचा सुप्रसिद्ध अर्थसचिव राजा तोडरमल्ल यानें सगळ्या शेतजमिनीची मोठ्या काळजीपूर्वक पाहणी करविली. राज्यकर्त्यांना म्हणजेच सरकारला शेतीच्या उत्पन्नापैकीं तिसरा हिस्सा शेत कसणाराकडून मिळे. ज्याला इच्छा असेल त्याला प्रत्यक्ष माल देण्याऐवजीं त्याची किंमतही सरकारांत देतां येत असे. करांचें एकंदर प्रमाण अवजड नव्हतें. त्यांच्यांत वाढ जी व्हावयाची तीही अतिशयच सावकाश करण्यांत येई. असा हा प्रकार चालू असतांनाच मोंगल साम्राज्याचा डोलारा कोसळला. मध्यवर्ती सत्ता दुबळी झाली आणि तिला कर नीटपणें वसूल करणें अशक्य झालें. अशा वेळीं कर वसूल करण्याची नवीनच एक पद्धति निर्माण झाली. आतां जे कर वसूल करणारे नेमण्यांत आले त्यांना पगार देण्याचें बंद करून त्यांना गुमास्ते बनविण्यांत आलें. त्यांनीं कर वसूल करून द्यावा आणि त्या कामासाठीं त्यांनीं वसूल झालेल्या कराच्या रकमांतून एकदशांश हिस्सा वटाव म्हणून कापून घ्यावा अशी पद्धति सुरू झाली. त्यांना शेती-वरील कराचे लिलांवदार ( खोत ) म्हणूं लागले ; केव्हां केव्हां त्यांना जमीनदार किंवा तालुकदारसुद्धां म्हणत ; पण त्या शब्दांना आजच्याप्रमाणें त्या वेळीं अर्थ नव्हता हें मात्र ध्यानांत ठेव.

मध्यवर्ती सत्ता जसजशी अधिकाधिक दुर्बळ होत गेली तसतशी ही पद्धति अधिकाधिक वाईट होत गेली. शेवटीं एवढ्यावर पाळी आली, कीं एकेका विभागाच्या करवसुलीचे लिलांव होऊं लागले आणि जो सगळ्यांत जास्त लिलांव बोले त्याला त्या विभागाचें करवसुलीचें काम मिळूं लागलें. याचा अर्थ असा, कीं ज्याला हें काम मिळे त्याला मग आपल्या विभागांत बिचाऱ्या शेतकऱ्यांकडून जेवढा पैसा उकळतां येईल तेवढा उकळण्याला मोकळीक, आणि या गोष्टींचा फायदा घेण्याला हे लोक बिलकुल मागेंपुढें पाहत नसत. हळूहळू हे करवसूलदार वंशपरंपराच होऊन गेले. कारण दुर्बल मध्यवर्ती राजसत्तेला हे लोक काढून टाकणें अशक्य होऊन गेलें.

खरी वस्तुस्थिति तर अशी आहे, कीं ईस्ट इंडिया कंपनीलासुद्धां बंगालमध्यें जो कांहीं तथाकथित कायदेशीर म्हणून पाय रोंवावयाला हक्क मिळाला, तो केवळ मोंगल बादशहाच्या वतीनें शेतसारा वसूल करण्याचा. हा हक्क म्हणजेच १७६५ मध्यें कंपनीला मिळालेली **दिवाणीची सनद!** म्हणजे अशा रीतीनें कंपनीला दिल्लीच्या मोंगल बादशहाचे दिवाण करण्यात आलें. अर्थात् हें एक नुसतें नाटक मात्र होतें. १७५७ मधील प्लासीच्या लढाईनंतर बंगालमध्यें ब्रिटिश लोकांचीच खरोखर मालकी असून गरीब बिचाऱ्या मोंगल बादशहाला तेथें कोठेंही कसली सत्ता नव्हती.

ईस्ट इंडिया कंपनी आणि तिचे अंमलदार हे अतिशयच भयंकर लोभी लोक होते. मागें मीं सांगितलेंच आहे तुला, कीं त्यांनीं सारा बंगालचा खजिना रिता केला आणि जिथें मिळेल तिथें हात टाकून जबरदस्तीनें पैसा उकळला. बंगाल आणि बिहार प्रांत अगदीं पिळून काढून जितका जास्ती कर वसूल करतां येईल तितका वसूल करण्याचा क्रम त्यांनीं चालविला. आपल्या पोटांत त्यांनीं लहान लहान कर वसूल करणारे निर्माण केले आणि मग त्यांच्याकडून कंपनीनें असह्य अशी जबरदस्त कराची वसुली करण्यास सुरुवात केली. थोडक्याच वेळांत शेतीवरील कराची रक्कम मूळच्याहून दुप्पट करण्यांत आली आणि अगदीं निर्दयपणें ती वसूलही करण्यांत येऊं लागली. जो कोणी वेळेवर कर देणार नाहीं त्याला करवसुलीच्या कामावरून हुसकावून लावून देण्यांत येऊं लागलें. हे जे कर वसूल करणारे होते तेही कांहीं कमी नव्हते. आपल्या परीनें तेही शेत कसणारांशीं अगदीं निर्दयपणें, लुटारूसारखे वागत. त्यांचा जवळजवळ सगळा माल कर वा खंड म्हणून वसूल करीत; नाहीं तर त्यांना जमिनीवरून हांकलून लावीत. प्लासीच्या लढाईपासून बारा वर्षांच्या आंत, दिवाणीची सनद मिळाल्यापासून चार वर्षांच्या आंत, ईस्ट इंडिया कंपनीचें हें धोरण आणि त्याच्या जोडीला अवर्षण यांमुळें बंगाल आणि बिहार या प्रांतांत भयंकर दुष्काळ पडून एकंदर लोकसंख्येपैकीं एकतृतीयांश लोक मरण पावले. मागच्या एका पत्रांत १७६९–७० मधील या दुष्काळाचा उल्लेख मीं केलेला आहे आणि तरीसुद्धां ईस्ट इंडिया कंपनीनें आपली कराची सर्वच्या सर्व रक्कम वसूल केल्याचेंही तुला सांगितलें आहे. या बाबतींत कंपनीच्या अंमलदारांनीं जी खास कार्यक्षमता दाखविली तिचा

मुद्दाम उल्लेख केला पाहिजे! कोट्यवधि स्त्री, पुरुष, मुलें मृत्युमुखीं पडलीं; परंतु हे अंमलदार प्रेतापासूनसुद्धां कर वसूल करूं शकत होते आणि त्यापासून इंग्लंडमधील श्रीमान् लोकांना नफा वांटीत होते!

असा हा प्रकार आणखी वीसएक वर्षें चालू राहिला आणि दुष्काळ वगैरेंची बिलकुल पर्वा न करतां कर वसूल करण्याचा प्रयत्न कंपनीनें चालू ठेवला. अशा रीतीनें सुंदर अशा बंगाल प्रांताचा सगळा नाश करून टाकण्यांत आला. मोठमोठे जे कर वसूल करणारे होते ते सुद्धां भिकेला लागले. यावरून गरीब बिचाऱ्या शेत कसणाऱ्याच्या हालअपेष्टा व दुरवस्था कशा प्रकारची असेल याची कोणालाही सहज कल्पना करतां येईल. शेवटीं ही परिस्थिति इतकी भयंकर वाईट झाली, कीं अखेरीस ईस्ट इंडिया कंपनीचे सुद्धां डोळे उघडले आणि या बाबतींत थोडी सुधारणा करण्याचा कंपनीनें प्रयत्न केला. त्या वेळचा गव्हर्नर जनरल लॉर्ड कॉर्नवॉलीस हा इंग्लंडमधील एक मोठा जमीनदार होता आणि ब्रिटिश पद्धतीचे जमीनदार हिंदुस्थानांत निर्माण करावे अशी त्याची कल्पना होती. अलीकडे कांहीं वर्षें हे कर वसूल करणारे लोक स्वतःच जमीनदाराप्रमाणें वागावयाला लागले होते. म्हणून कॉर्नवॉलिसनें त्यांच्याशीं एक प्रकारचा करार केला आणि या लोकांना जमीनदारांप्रमाणें वागविण्यास सुरुवात केली. याचा परिणाम असा झाला, कीं हिंदुस्थानमध्यें अगदीं पहिल्याप्रथम हा मध्यस्थ–दलाल–अस्तित्वांत आला आणि शेत कसणारे जे होते, त्या बिचाऱ्यांना कुळाचा हीन दर्जा प्राप्त झाला. ब्रिटिश राज्यकर्ते हे या जमीन धारण करणारांशीं म्हणजेच जमीनदारांशीं तेवढा प्रत्यक्ष संबंध राखीत आणि त्यांना आपल्या कूळ-वर्गाशीं वाटेल तसें वागायला मुभा देत. गरीब बिचाऱ्या कुळाला आपल्या जमीन-मालकाच्या लोभीपणापासून संरक्षण मिळावयाला मात्र कांहींच साधन नव्हतें.

कॉर्नवॉलिसनें १७९३ मध्यें बंगाल व बिहार या प्रांतांतील जमीनदारांशीं हा जो करार केला, त्याला कायमधारा-आकारणीची पद्धति हें नांव आहे. आकारणी करणें म्हणजे कोणत्या जमीनदारानें किती धारा द्यावयाचा हें ठरविणें. बंगाल आणि बिहारमध्यें ही आकारणी एकदांच एक कायमची करून टाकण्यांत आली. त्यांत पुढें पुन्हां बदल करावयाचा नाहीं असें ठरलें. पुढें ब्रिटिशांचा अंमल, विस्तार वाढून, आग्रा आणि अयोध्या या प्रांतांमध्यें जेव्हां आला तेव्हां हें धोरण पालटलें. या प्रांतांतील जमीनदारांची आकारणी ही बंगालप्रमाणें कायमची झाली नाहीं; तर तात्पुरती झाली. विशिष्ट मुदतीनंतर, सामान्यतः तीस वर्षांनीं या आकारणीची फेरपाहणी होऊन त्या पुढें किती कर द्यावयाचा तें पुन्हां ठरविलें जावयाचें, हें त्या तात्पुरत्या आकारणीचें मुख्य स्वरूप. या फेरपाहणींत दर तीस वर्षांनीं बहुतेक नेहमीं ही आकारणी वाढतच आलेली आहे.

दक्षिणेंत, मद्रास इलाख्यांत आणि आजुबाजूच्या भागांत ही जमीनदारीची पद्धति अस्तित्वांत नव्हती. त्या ठिकाणीं शेत कसणारे शेतकरी हेच जमिनीचे

मालक होते. त्यामुळें मध्यस्थाच्या भानगडींत न पडतां प्रत्यक्ष वेगवेगळ्या शेतकऱ्यांच्याच शेतसाऱ्याची आकारणी ईस्ट इंडिया कंपनीनें केली; परंतु तेथेंच नव्हे, तर सगळीकडेच कंपनीच्या अंमलदारांचा लोभ इतका कळसास पोंचला होता, कीं त्यांनीं हा शेतसाऱ्याचा आंकडा फारच अवजड ठरविला आणि सगळा सारा ते अगदीं क्रूरपणानें वसूल करूं लागले. कर दिला नाहीं कीं ताबडतोब जमिनींतून हकालपट्टी व्हावयाची असा कायदा झाला; पण जमीन सोडून बिचाऱ्या शेतकऱ्यानें जावें तरी कोठें? जमिनीवर अवलंबून राहणारी संख्या भलतीच वाढल्यामुळें जमिनीला मागणी फारच होती. त्यामुळें उपासमारीमुळें वाटेल त्या अटीवर जमीन पत्करणारे लोक पुष्कळच मिळण्यासारखे होते; तरी पण दीर्घ काळपर्यंत हालअपेष्टा सहन करीत राहिलेल्या या शेतकऱ्यालासुद्धां दुःख सोसणें अगदींच अशक्य झालें, म्हणजे त्याच्याकडूनसुद्धां बंडें आणि उठावण्या होत असत. क्वचित् एखाद्या-दुसऱ्या वेळीं नव्हे, तर तर मधूनमधून वारंवार.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला बंगालमध्यें आणखी एक जुलूम सुरू झाला. कांहीं इंग्रज लोक निळीचा व्यापार करण्यासाठीं म्हणून स्वतःच जमीनदारी मिळवून राहूं लागले. निळीचें पीक लावण्यासाठीं म्हणून त्यांनीं कुळांकडे ज्या जमिनी दिल्या त्याबाबत त्यांनीं कुळांवर फारच कठिण आणि अवजड अटी घातल्या. कुळांनीं आपल्या वहिवाटीस असलेल्या जमिनीपैकीं कांहीं क्षेत्रांत सक्तीनें निळीचें पीक केलेंच पाहिजे आणि नंतर तें पीक ठराविक दरानें या जमीनदारांना म्हणजे मळेवाल्यांना ठराविक दरानें विकलें पाहिजे, असे करार त्यांनीं त्यांच्यावर लादले. या पद्धतीला मळेवाल्यांची लागणीची पद्धति असें म्हणतात. या कुळांवर लादलेल्या अटी इतक्या अवघड होत्या, कीं त्या पुऱ्या करणें त्या बिचाऱ्यांना फारच कठिण होतें. या अटी जेव्हां पुऱ्या होईनात तेव्हां ब्रिटिश सरकार मळेवाल्यांच्या मदतीला धांवलें आणि याच अटीवर नीळ लावणें कुळांना भाग पडावें यासाठीं त्यांनीं कायदे केले. हे कायदे आणि त्यांत निर्माण केलेल्या शिक्षा या पाहिल्या, म्हणजे या मळ्यांमधील हीं कुळें कांहीं अंशीं या मळेवाल्यांचे भूदास आणि गुलाम बनून गेले असें म्हणावें लागतें. या निळीच्या मळ्यांवर जे कारभारी नेमलेले असत, ते या कुळांच्यावर हवा तो जुलूम किंवा अत्याचार करीत असत. कारण या देशी किंवा विदेशी वहिवाटदारांना आपल्याला सरकारी संरक्षण आहे याबद्दल पूर्ण खात्री होती. कित्येकदां निळीची किंमत इतकी कमी येऊं लागे, कीं तिच्याऐवजीं इतर कांहींही, भात वगैरे पीक काढणें कुळाला अधिक फायदेशीर असे; परंतु तसें करायला त्याला मुभा नसे. अशा रीतीनें बिचाऱ्या शेतकऱ्याची कुचंबणा होऊन त्याच्या हालअपेष्टा इतक्या भयंकर वाढत गेल्या, कीं त्या असह्य होऊन चिडून जाऊन तो दुर्बल जीवसुद्धां उलटला. शेतकऱ्यांनीं मळेवाल्यांविरुद्ध बंड केलें आणि एक निळीचा कारखाना त्यांनीं लुटला; परंतु त्यांना दडपून टाकून पुन्हां पूर्वस्थितीवर नेण्यांत आलें.

या पत्रामध्यें एकोणिसाव्या शतकामधील हिंदुस्थानांतल्या शेतकऱ्यांचें चित्र तुझ्यापुढें रेखाटण्याचा जरा प्रयत्न मीं केला आहे. मला वाटतें, हें वर्णन पुष्कळच लांबल्यासारखें झालेलें आहे. हळूहळू हिंदी शेतकऱ्यांची अवस्था अधिकाधिक वाईट कशी होत गेली, त्यांच्याशीं ज्याचा ज्याचा संबंध आला—मग तो कर वसूल करणारा असो, जमीनदार असो, वाणी, सावकार असो, मळेवाला असो, त्याचा वहिवाटदार असो किंवा हिंदुस्थानामधील सर्वांत मोठा वाणी-सावकार, म्हणजे स्वतः ब्रिटिश सरकार, ईस्ट इंडिया कंपनीमार्फत राज्य करतांना किंवा स्वतः राज्य करतांना असो, सर्वांनींच त्यांची पिळणूक कशी केली हें मीं तुला सांगितलें. ही सर्व पिळणूक होण्याचें कारण म्हणजे तिच्या बुडाशीं असलेलें हिंदुस्थानांतील ब्रिटिशांनीं जाणूनबुजून चालविलेलें धोरण हें होतें. कोणतें हें धोरण? तर येथील घरगुती धंदे पार नष्ट करून टाकावयाचे; परंतु त्यांच्या जागीं दुसरे कसलेही उद्योगधंदे येऊं द्यावयाचे नाहींत. त्यामुळें बेकार कारागिरांनीं खेडेगांवांत जावयाचें आणि त्यामुळें जमिनीवर अवलंबून राहणारांची संख्या वाजवीहून फाजिल व्हावयाची. याच्या जोडीला नवीन निर्माण करण्यांत आलेली जमीनदारी पद्धति; त्यानंतरची मळेवाल्यांची लागणीची पद्धति. जमिनीवर लादलेला भयंकर अवजड शेतसारा; त्यामुळें वाढलेलें खंडाचें प्रचंड प्रमाण, तें वसूल करण्यासाठीं जुलूम-जबरदस्ती; शेतकऱ्यांनीं निरुपाय होऊन वाणी-सावकारांकडे कर्ज काढण्यासाठीं जाणें आणि त्यांच्या कचाट्यांत कायमचें सांपडणें; खंड किंवा शेतसारा वेळेवर देण्यास असमर्थ झाल्यामुळें जमिनींतून अगणित लोकांची हकालपट्टी होणें आणि या सगळ्यापेक्षांही अधिक भयंकर म्हणजे पोलीस व कर वसूल करणाऱ्या जमीनदारांचे आणि निळीच्या मळेवाल्यांचे वहिवाटदार, हे करीत असलेला रोजचा भयंकर जुलूम, कीं ज्यामुळें बिचाऱ्या शेतकऱ्याच्या ठिकाणची असेल नसेल ती माणुसकी, तेजस्विता आणि ताकद नाहींशी व्हावी. हा एकंदर ब्रिटिशांनीं पत्करलेल्या धोरणामुळें घडून आलेल्या परिस्थितीचा आढावा. या सगळ्याचा परिणाम म्हणजे अतिशय भयंकर आणि खेदकारक अवस्था आणि मरणप्राय महासंकट यांहून दुसरा काय होणार?

दुष्काळ एवढे भयंकर पडले, कीं त्यांत लाखों लोक मरण पावले. तरीपण चमत्कार असा, कीं अन्नाचा पुरवठा कमी पडल्यामुळें लोक इकडे उपासमारीमुळें मरत होते अशा वेळींच इकडून गहूं आणि इतर धान्यें, श्रीमान् व्यापाऱ्यांना नफा व्हावा यासाठीं, परदेशांत पाठविण्यांत येत होतीं! परंतु खाद्यपदार्थ कमी होते हें मुळीं खरें संकट नव्हतेंच. कारण आगगाडींतून देशाच्या इतर भागांतून खाद्यपदार्थ आणण्यासारखे होते; पण हे खाद्यपदार्थ खरेदी करायला लोकांजवळ पैसा नव्हता हें खरें संकट होतें. इ. स. १८६१ मध्यें उत्तर हिंदुस्थानांत, विशेषतः आपल्याच प्रांतांत फार मोठा दुष्काळ पडला होता. त्या वेळीं दुष्काळी भागांत एकूण साडेआठ टक्क्यांहून अधिक लोक मरण पावले असें लिहिलें आहे. त्यानंतर पंधरा वर्षांनीं १८७६ च्या सुमारास

उत्तर हिंदुस्थानांत, मध्य हिंदुस्थानांत आणि दक्षिण हिंदुस्थानांतही दोन वर्षेपर्यंत पुन्हां एकदां फारच मोठा दुष्काळ पडला. यामध्येंही आपला संयुक्तप्रांत, मध्यप्रांत आणि पंजाबचा कांहीं भाग यांनाच सर्वांत अधिक ताण सहन करावा लागला. त्यामध्यें सुमारें एक कोटी लोक या दुष्काळामुळें मेले. पुन्हां वीस वर्षांनीं म्हणजे १८९६ मध्यें जवळजवळ याच प्रदेशांत आणखी तिसरा दुष्काळ पडला. हा हिंदुस्थानच्या एकंदर इतिहासामध्यें सर्वांत जास्त भयंकर दुष्काळ होय. या भयंकर निसर्गकोपामुळें उत्तर हिंदुस्थान आणि मध्य हिंदुस्थान जणुं पार धुळीस मिळून निःसत्त्व झाला. यानंतर १९०० सालीं पुन्हां आणखी एक दुष्काळ पडला.

चाळीस वर्षांच्या अवधींत चार जे मोठमोठे दुष्काळ या देशांत पडले, त्याची एका छोट्या परिच्छेदांत मीं तुला ओळख करून दिली. या दुष्काळांच्या हृदय-विदारक अशा हकिकतींचें भयाण स्वरूप आणि त्यांतील यातना यांचें वर्णन मी करूं शकत नाहीं आणि या गोष्टींची या वयांत नीटशी जाणीव तुला होऊंही नये असेंच माझ्या मनांत आहे. कारण तशी ती जाणीव झाली, कीं तुझ्या मनाचा संताप होईल आणि तुझ्या ठिकाणीं फार प्रचंड कडवटपणा निर्माण होईल. एवढ्या या लहान वयांत तुझ्या ठिकाणीं असा कडवटपणा उत्पन्न व्हावा असें मला वाटत नाहीं.

लढाईमध्यें जखमी होणारांची व्यवस्थित शुश्रूषा व्हावी यासाठीं जिनें प्रथम संघटना केली त्या शूर इंग्रज स्त्रीचें, फ्लॉरेन्स नाइटिंगेलचें नांव तूं ऐकलेलें असशील. फार पूर्वी १८७८ सालींच तिनें लिहिलेलें आहे, "साऱ्या पूर्व प्रदेशांत, नव्हे साऱ्या जगांत, कोणती एखादी गोष्ट पाहून मनाला जास्तींत जास्त दुःख होत असेल तर ती म्हणजे आमच्या पूर्वेकडील साम्राज्यामधील शेतकरी!" "आमच्या कायद्याचा परिणाम" काय झाला हें सांगतांना तिनें लिहिलें आहे, "त्यामुळें जगांतील सर्वांत अधिक पिकाऊ अशा देशांत, ज्या ठिकाणीं आपण दुष्काळ म्हणून म्हणतों तसा दुष्काळ नसूनही लोकांच्या कपाळीं नित्याची भाजून, पिचून काढणारी अर्धवट उपासमार आलेली आहे!"

खरें आहे. आमचा शेतकरी, त्याचे ते खोल गेलेले डोळे आणि त्यांमधील बावरलेली, भेदरलेली, निराश नजर या दृश्याइतकें दुःखद दृश्य पृथ्वीवर क्वचितच कोठें असेल! आज किती तरी वर्षेपर्यंत आमचा शेतकरी केवढें हें भयंकर ओझें सहन करीत आला आहे! आणखी आपण हें विसरतां कामा नये, कीं आम्ही जे थोडेसे लोक त्यांतल्या त्यांत बऱ्या स्थितीला आलों आहों, त्यांचीही भरती शेतकऱ्यांच्या डोक्यांवरील या ओझ्यांत आहेच. आम्ही सगळेजण, हिंदी आणि परके लोक, गरीब बिचाऱ्या दीर्घकाल खचलेल्या शेतकऱ्याच्या पाठीवर स्वार होऊन त्याला आमच्या-साठीं घाम गाळायला लावतों आहों!

परंतु इतक्या दिवसांनंतर कां होईना, अखेरीस आशेचा अंधुक किरण, भावी काळाच्या चांगल्या दिवसाची आणि ओझें हलकें होण्याची थोडीशी गुजगुज यांचा सुखद

अनुभव त्याला आतां येऊं लागला आहे. थोड्याच दिवसांपूर्वी एक लहानसा मनुष्य येऊन त्यानें येट त्याच्या डोळ्यांशीं डोळा लावून आंत खोलवर त्याच्या दडपून गेलेल्या हृदयामध्यें नजर टाकली आणि त्याच्या दीर्घकालीन दुःखाचा चांगलाच ठाव घेतला. त्याच्या त्या नजरेंत एक प्रकारची जादू त्या शेतकऱ्याला आढळली. त्याच्या त्या स्पर्शांत एक प्रकारचा आगीसारखा उत्साह त्याच्या प्रत्ययाला आला आणि त्याच्या बोलण्यांत त्याला आपल्या दुःखाची खरीखुरी जाणीव, आपल्याविषयींचा अत्यंत खोल कळवळा, विपुल प्रेम आणि प्राण गेला तरी तुमची पाठ मी सोडणार नाहीं असा विश्वास, यांचा अनुभव त्याला आला. आणि या शेतकऱ्यांनीं, कामगारांनीं आणि इतरांनींही त्याचें बोलणें ऐकलें तेव्हां त्यांच्या अंतःकरणांत नवीनच जिवंतपणा निर्माण होऊन तीं थरारूं लागलीं. त्यांच्या अंतरंगांत कांहीं विलक्षण आशेचा उदय झाला आणि आनंदानें त्यांनीं गजर केला, "महात्मा गांधी की जय!" आणि आपल्या दुःखाच्या खोल दरींतून बाहेर पडण्यासाठीं त्यांनीं कमरा बांधल्या. परंतु तें जें जुनें यंत्र इतके दिवस त्यांना दडपून ठेवीत आलें होतें, तें काय त्यांना असें सहजासहजीं निसटून जाऊं देणार? त्यांना दडपून टाकण्यासाठीं आणि नवीन शृंखला त्यांना बांधून ठेवण्यासाठीं निघाल्या आणि पुढें? पण तो माझ्या गोष्टीचा किंवा इतिहासाचा विषय नव्हे. तो अजून उद्यांचा विषय आहे. उद्यांची जेव्हां आज घडून येईल, तेव्हां त्याच्या पुढें काय हें कळेलच आपल्याला; पण काय होणार आहे याचा संशय आहे कोणाला?

## ११२

## ब्रिटननें हिंदुस्थानचा कारभार कसा केला?

५ डिसेंबर, १९३२

आतांपर्यंत मीं तुला एकोणिसाव्या शतकांतील हिंदुस्थानबद्दल तीन भलीं लांब पत्रें लिहिलीं. हा इतिहास खरोखरच मोठा आहे आणि त्या काळांतील आमच्या देशांतील दुःखाची कहाणीही चांगली लांचलचक आहे. म्हणून ती वाजवीपेक्षां थोडक्यांत सांगायला गेलों तर मला वाटतें, आहे यापेक्षांही तुला ती कळायला कठिण पडेल. इतर देशांपेक्षां किंवा जगांतील इतर निरनिराळ्या कालखंडांपेक्षां हिंदुस्थानच्या या कालखंडाकडे कदाचित् मी अधिक लक्ष पुरवितों आहें असें होत असेल. मी स्वतः हिंदी असल्यानें मला हा विषय अधिक आपलासा वाटतो आणि त्याच्याबद्दल मला अधिक माहिती असल्यानें लिहावयालाही सांपडतें पुष्कळ तपशीलवार. शिवाय, या कालखंडाकडे निव्वळ एक ऐतिहासिक काळ म्हणून नव्हे, तर दुसऱ्याही कांहीं विशेष कारणाकारणांनीं त्याच्याकडे आपलें लक्ष वेधतें. आजचा जो कांहीं मोडका-

तोडका आधुनिक बनलेला हिंदुस्थान आपल्या डोळ्यांपुढें उभा आहे, त्याचा जन्म एकोणिसाव्या शतकाच्या या वेदनांतूनच होऊन तो रंगरूपास चढला आहे. आजचा हिंदुस्थान कसा आहे याचें यथार्थ स्वरूप आपल्याला पहावयाचें असेल, तर ज्या कारणांमुळें त्याचें स्वरूप बनलें किंवा बिघडलें त्या कारणांची आपण थोडीफार माहिती करून घेतली पाहिजे. असें केलें तरच आपल्याला आपल्या देशाची सेवा शहाणपणानें करतां येईल. त्यासाठीं आपण काय करावें, कोणता मार्ग पत्करावा, हें ठरवितां येईल.

अजून कांहीं या कालखंडाबद्दलचें माझें लिहिण्याचें संपलेलें नाहीं. अजून पुष्कळच सांगावयाचें आहे मला. या पत्रांत मी काय करीत असतों, तर एका पत्रांत एक विशिष्ट गोष्ट किंवा बाजू स्वतंत्रपणें घेतों आणि तेवढ्याबद्दलच चर्चा करितों. तुला कळायला सोपें पडावें या हेतूनें या निरनिराळ्या बाजूंचा किंवा निरनिराळ्या अंगांचा असा मी स्वतंत्रपणें विचार करतों; पण आतांपर्यंत ज्या सगळ्या घडामोडींबद्दल आणि फेरबदलांबद्दल मी तुला सांगत आलों आणि ज्याबद्दल यापुढें मी तुला सांगणार आहें त्या सगळ्या घडामोडी सामान्यतः एकाच वेळीं घडून आल्या. त्यांपैकीं परस्परांचा परस्परांवर परिणाम होत आला आणि त्या सर्वांचा परिणाम होऊन एकोणिसाव्या शतकांतला हा हिंदुस्थान जो तयार झाला तो झाला, हें तुलाच पुढें-मागें समजून येईल.

आतांपर्यंत हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचें योग्यायोग्य वर्तन जें मीं तुला सांगितलें, तें वाचून केव्हां केव्हां ब्रिटिशांचें हें धोरण आणि त्यामुळें या देशामध्यें चोहोंकडे पसरलेलें हें दैन्य यांबद्दल तुला ब्रिटिशांचा फार राग आला असेल; पण अशा रीतीनें आपल्या देशावर जर या हालअपेष्टा कोसळल्या असतील तर त्यांचा दोष कोणाकडे जातो? हें सगळें जें झालें तें आम्ही दुर्बल आणि अडाणी होतों म्हणूनच नाहीं का झालें? दुर्बलपणा आणि मूर्खपणा अंगीं असणें म्हणजे दुसऱ्याला आपल्यावर जुलूम गाजवायला बोलावणेंच करण्यासारखें आहे! आमच्यामधील परस्पर भांडणांमुळें ब्रिटिशांचा फायदा होत असेल, तर आम्हीं आपसामध्यें भांडतों याचा तो दोष आहे. ते आमच्यामध्यें भेद उत्पन्न करतात आणि त्यामुळें आमची शक्ति कमजोर ठरते. आमच्यामधील निरनिराळ्या गटांचा ते वेळोवेळीं एकमेकांच्या विरुद्ध उपयोग करतात. पण आम्ही त्यांना हें सारें करूं देतों, याचाच अर्थ ब्रिटिश लोक हे आमच्यापेक्षां अधिक शहाणे आणि श्रेष्ठ आहेत असा होतो. तेव्हां तुला रागवावयाचें असेल, तर आमचा दुर्बलपणा, अज्ञान आणि आपसांतील भांडणें यांच्यावर तूं राग कर. कारण आमच्या सर्व दुःखांचें मूळ केवळ या गोष्टी आहेत.

आपण शब्द काय वापरतों? तर ब्रिटिशांचा जुलूम; परंतु खरें पाहिलें तर हा जुलूम कोण करीत असतें! सगळ्याच्या सगळा ब्रिटिश समाज खास नव्हे. कारण त्यांच्यापैकींच लाखों लोक स्वतः आमच्याप्रमाणें जुलुमाखालीं भरडले जात आहेत

आणि हालअपेष्टा भोगीत आहेत. त्याचप्रमाणें ब्रिटिशांनीं जी ही हिंदुस्थानची पिळणूक चालविलेली आहे तिच्यामुळें ज्यांचा थोडाबहुत फायदा झालेला आहे असे कांहीं हिंदी लोकांचे लहान गट किंवा वर्ग आपल्या देशांतच आहेत. तेव्हां अमुक लोक जुलूम करणारे आणि अमुक लोकांवर जुलूम होतो अशी ही विभागणीची रेषा कशी काय काढायची? खरी गोष्ट अशी आहे, कीं यांत कांहीं व्यक्तींचा अथवा लोकांचा प्रश्न नसून यांत एका विशिष्ट समाजपद्धतीचा प्रश्न आहे. आपल्याला असें म्हटलें पाहिजे, कीं आपल्या डोक्यावर एक भलें मोठें यंत्र उभें करण्यांत आलेलें असून त्या यंत्राखालीं लाखों हिंदी लोकांची पिळणूक होऊन ते भरडले जात आहेत. हें यंत्र म्हणजे औद्योगिक भाडवलशाहीमधून जन्माला आलेलें नवीन प्रकारचें साम्राज्यशाहीचें यंत्र आहे. या यंत्रामुळें जी पिळणूक होते, तिचा सगळा फायदा इंग्लंडमध्यें जातो खरा; पण तेथेंही हा फायदा केवळ विशिष्ट वर्गाच्याच खिशांमध्यें जातो. या पिळणुकीच्या फायद्यापैकीं कांहीं भाग हिंदुस्थानांतही राहतो आणि कांहीं वर्गांना त्यापासून लाभ होतो हें खरें आहे. म्हणून कांहीं ब्रिटिश व्यक्तींवर अथवा सर्वच ब्रिटिश समाजावर-सुद्धां आपण राग करणें हें मूर्खपणाचें आहे. जर एखादी समाजपद्धति चुकीची असेल आणि तिच्यापासून आपल्याला नुकसान पोंहचत असेल, तर ती पद्धति बदलून टाकली पाहिजे. ही पद्धति चालविणाऱ्या व्यक्तींवर तिचा बरा-वाईट परिणाम कांहीं-सुद्धां अवलंबून नाहीं. समाजपद्धति वाईट असेल तर चांगलीं माणसेंसुद्धां तिच्यामध्यें कोणाचें कांहीं कल्याण करूं शकत नाहींत. तुमची अगदीं कितीही मोठी इच्छा असली तरीसुद्धां दगडमाती कितीही शिजव-शिजव शिजवून त्यांमधून तुम्हांला कांहीं खाण्याजोगा पदार्थ का बनवितां येणार आहे? अगदीं हाच न्याय या साम्राज्यशाही आणि भांडवलशाही यांना लागू आहे. यांच्यामध्यें कसलीही सुधारणा करतां येणें शक्य नाहीं. त्यांची खरी सुधारणा करण्याचा फक्त एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे त्यांना संपूर्ण उखडून टाकणें हा. अर्थात् असें हें माझें मत आहे. कांहीं लोकांचें मत याहून वेगळें असेल. तेव्हां कोणी कांहीं सांगतो म्हणून कांहीं तूं तें खरें मानूं नकोस. योग्य वेळीं तुझा तूंच काय तो निर्णय ठरव. एका गोष्टीबद्दल बहुतेक एकूणएक सगळ्या लोकांचें एकमत आहे, ती म्हणजे दोष आहे तो पद्धतीचा आहे. व्यक्तीबद्दल मनांत रोष धरण्यामध्यें कांहीं हंशील नाहीं. आपल्याला कांहीं फेरबदल घडवून आणावयाचे असतील तर आपण या पद्धतीवर हल्ला करून ती बदलून टाकली पाहिजे. या पद्धतीचे कांहीं कांहीं दुष्परिणाम जे हिंदुस्थानामध्यें झालेले आहेत, ते आपण पाहिलेच आहेत. पुढें चीन, ईजिप्त या किंवा इतर कांहीं देशांचा इतिहास जेव्हां आपण पाहूं त्या वेळीं त्या त्या ठिकाणच्या लोकांनाही ही पद्धति, हेंच भांडवलशाहीचें साम्राज्यवादाचें यंत्र, पिळीत असलेलें, भरडीत असलेलें आपल्याला आढळेल.

आतां पुन्हां आपल्या चालू हकिकतीकडे वळूं या. मीं तुला सांगितलें कीं ब्रिटिश लोक हिंदुस्थानांत आले, त्या वेळीं हिंदी घरगुती धंद्यांची पुष्कळच चांगली

प्रगति झालेली होती. उत्पादनाच्या पद्धतींत प्रगति जर स्वाभाविकपणें होत राहिली असती, बाहेरून कोणीं येऊन जर कांहीं ढवळाढवळ केली नसती, तर केव्हां ना केव्हां तरी यांत्रिक उद्योगधंदे हिंदुस्थानांत सुरू झाले असते असा संभव होता पुष्कळसा. आपल्या देशांतही लोखंड होतें आणि कोळसा होता. इंग्लंडमध्यें आपण पाहिलेंच, कीं या पदार्थांच्या अस्तित्वामुळें औद्योगीकरण होण्याला फार मोठें साहाय्य झालें. किंबहुना, कांहीं अंशीं त्यामुळेंच औद्योगीकरण घडून आलें असें म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानांतही अखेरीस हीच गोष्ट केव्हां तरी घडून आली असती. आपल्या देशांत राजकीय अंदाधुंदी बरीच माजलेली असल्यामुळें कदाचित् हें घडून येण्याला बराच अधिक काळ लागला असता एवढेंच ; परंतु मध्येंच इंग्रज लोकांनीं येथें आपला हात शिरकविला. या इंग्रज लोकांचा देश आणि समाज यांनीं यापूर्वीच नवीन पद्धतीच्या प्रचंड यांत्रिक उत्पादनाच्या क्षेत्रांत प्रवेश केलेला होता. तेव्हां कुणाला असें वाटण्याचा संभव होता, कीं या देशाच्या उत्पादनांतही ते असेंच यंत्रीकरण घडवून आणतील आणि तें घडवून आणण्याच्या कामीं ज्या वर्गाचा त्यांना जास्तींत जास्त उपयोग होण्याजोगा होता, त्याच वर्गाला ते हातीं धरतील. त्यांनीं असें तर कांहीं केलेंच नाहीं ; नव्हे, जें कांहीं केलें तें नेमकें याच्या उलट केलें. हिंदुस्थान हा पुढेंमागें आपला प्रतिस्पर्धी होण्याची त्यांना भीति वाटून त्या दृष्टीनें येथें त्यांनीं वर्तन केलें. येथील होते ते धंदे त्यांनीं पार मोडून काढले आणि यांत्रिक उद्योगधंदे येथें निर्माण होण्याला प्रत्यक्ष विरोध केला.

त्यामुळें हिंदुस्थानमध्यें आपल्याला एक मोठीच चमत्कारिक अवस्था निर्माण झाल्याचें आढळून येतें. आपण असें पाहतों, कीं त्या काळीं साऱ्या यूरप खंडांत जास्तींत जास्त सुधारलेल्या अशा या ब्रिटिश लोकांनीं या देशांत सख्य कोणाशीं केलें ? तर येथील सर्वांत अधिक मागासलेल्या आणि प्रतिगामी, पुराणप्रिय अशा वर्गाशीं. मरायला टेकलेल्या सरंजामदारवर्गाला त्यांनीं आपला टेकू देऊन उभें केलें ; त्यांनीं नवीन जमीनदार निर्माण केले आणि येथें जे शेंकडों मांडलिक संस्थानिक होते त्यांचीं अर्धवट सरंजामशाही राज्यें टिकवून धरून त्यांना त्यांनीं पाठिंबा दिला. म्हणजे सरंजामशाहीचें बूड हिंदुस्थानांत त्यांनीं उलट प्रत्यक्ष जड केलें आणि असें करणारे हे ब्रिटिश लोक स्वतः कोण होते, तर मध्यमवर्गाच्या किंवा धनिकशाहीच्या क्रांतीचे हे मूळ प्रवर्तक होते. त्याचप्रमाणें ज्या औद्योगिक क्रांतीमधून साऱ्या जगांत औद्योगिक भांडवलशाहीचा प्रवेश झाला, त्या औद्योगिक क्रांतीचेही जनक हेच लोक होते. या बाबतींत त्यांनीं आघाडी मारली होती, म्हणून तर या लोकांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या पुढें फार मोठा पल्ला गांठला आणि प्रचंड मोठें साम्राज्य निर्माण केलें.

ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थानांत हें असें कां केलें हें समजणें कांहीं कठिण नाहीं. भांडवलशाहीचा सगळा पायाच मुळीं जीवघेणी स्पर्धा आणि पिळणूक यांच्यावर असून साम्राज्यशाही म्हणजे याच प्रकाराचें आणखी पुढचें पाऊल आहे. त्यामुळें ब्रिटिशांनीं

हातांत सत्ता असल्यामुळें जे कोणी प्रत्यक्ष प्रतिस्पर्धी होते त्यांना मारून टाकलें आणि दुसरे कोणी प्रतिस्पर्धी उत्पन्न होऊं नयेत असा बंदोबस्त केला. या बाबतींत येथील सामान्य जनतेची दोस्ती संपादन करून त्यांना कांहीं उपयोग नव्हता. कारण हिंदुस्थानांत त्यांना जें राहावयाचें होतें तेंच मुळीं या सामान्य जनतेची पिळणूक करण्याच्या एकमेव हेतूनें. पिळणूक करणारा आणि ज्याची पिळणूक व्हावयाची ते, यांचे हित-संबंध एकच असणें केव्हांही शक्य नाहीं. यासाठीं या ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थानांत त्या वेळीं जे कांहीं सरंजामशाहीचे अवशेष शिल्लक होते त्यांच्या हातांत हात घातला. ब्रिटिश लोक हिंदुस्थानांत आले तेव्हां या अवशेषांमध्यें स्वतःच्या आंगचा असा कांहीं दम शिल्लक राहिलेला नव्हता; परंतु ब्रिटिशांनीं त्यांना आपला टेकू दिला आणि या देशाच्या पिळणुकींतून होणाऱ्या फायद्यांत त्यांना थोडासा हिस्सा दिला; परंतु जो वर्ग आतां जुनाट झालेला होता, ज्याचा आतां समाजाला कांहीं उपयोग राहिलेला नव्हता. त्या वर्गाला असा टेकू दिल्यानें इंग्रजांना फारतर तात्पुरता आधार मिळालेला होता, हा टेकू काढून घेतला तर हा वर्ग कोणाकडून तरी पडणार किंवा नव्या परिस्थितीशीं त्याला जमवून घ्यावें लागणार हें निश्चित होतें. ब्रिटिशांच्या मर्जीवर अवलंबून असलेलीं लहान-मोठीं सातशें संस्थानें हिंदुस्थानमध्यें होतीं. यांपैकीं कांहीं मोठ्या संस्थानांचीं नांवें तुला माहीत आहेत. उदाहरणार्थ, हैदराबाद, काश्मीर, म्हैसूर बडोदा, ग्वाल्हेर वगैरे. पण चमत्कार असा, कीं या हिंदी संस्थानिकांपैकीं बहुतेक कोणीही हिंदुस्थानांतील प्राचीन सरंजामदारांच्या राजघराण्यांतील नाहींत. मागें सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानांतल्या जमीनदारांच्या मागें जशी कांहीं मोठीशी प्राचीन परंपरा नाहीं, तशीच यांच्या मागें फारशी प्राचीन परंपरा नाहीं. एक उदेपूरचा महाराणा मात्र असा आहे, कीं जो सूर्यवंशी रजपूत असून त्याच्या वंशाचा धागा अगदीं इतिहासपूर्व काळापर्यंत जाऊन पोंचतो. या बाबतींत त्याच्याशीं स्पर्धा करूं शकेल अशी जगांत फक्त एकच व्यक्ति अस्तित्वांत आहे असें म्हणतां येईल. ती व्यक्ति म्हणजे जपानचा मिकॅडो.

ब्रिटिशांनीं सरंजामशाही टिकविली त्याचप्रमाणें ब्रिटिशांच्या राज्यामुळें धार्मिक पुराणमतवाद–प्रतिगामीपणा–यालाही फार साहाय्य झालें. ब्रिटिश लोक हे स्वतः ख्रिस्ती धर्माचे असूनही त्यांच्या येण्यामुळें हिंदुधर्म आणि इस्लामधर्म यांची प्रथा अधिकच कडक झाली. हें पाहून मोठें विचित्र वाटतें नव्हे? कांहीं अंशीं हा जो परिणाम झाला तो स्वाभाविकच होता; कारण परकीय हल्ला झाला म्हणजे स्थानिक धर्म व संस्कृति यांचीं बंधनें अधिक कडक करून त्यांचें रक्षण करण्याकडे हल्ला झालेल्या देशाचें वळण जात असतें. मुसलमानांच्या स्वाऱ्या येऊं लागल्यानंतर हिंदुधर्माचीं बंधनें याचमुळें कडक झालीं होतीं आणि जातिनिर्बंधांचा फैलाव झाला होता. आतां नेमका हाच परिणाम हिंदुधर्म आणि मुसलमानधर्म या दोहोंवरही झाला. हा झाला स्वाभाविक परिणाम; परंतु त्याशिवाय हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यानें जाणूनबुजून आणि अजाणतां अशा दोन्ही रीतींनीं या दोन्ही धर्मांमधील पुराणमतवादी, प्रतिगामी

वर्गांना प्रत्यक्ष मदत केली. ब्रिटिश लोकांचें धर्माकडे, धर्मपरिवर्तनाकडे, बाटविण्याकडे विशेषतें लक्ष नव्हतें. ते येथें आले होते ते पैसा मिळविण्यासाठीं. तेव्हां लोकांच्या धार्मिक बाबतींत कोणत्याही प्रकारचा हात घालण्याला ते धजत नव्हते. कारण त्यांना वाटे कीं त्यामुळें लोक संतप्त होऊन कदाचित् बंड करावयाचे. त्यामुळें आपण धर्माच्या बाबतींत ढवळाढवळ करतों असा दुरूनसुद्धां संशय कोणाच्या मनांत येऊं नये, या उद्देशानें या लोकांनीं येथील धर्माला किंवा धर्माच्या बाह्य अवडंबराला मदत करण्याइतकी मजल गांठली; पण याचा परिणाम पुष्कळदां असा झाला कीं धर्माचें बाह्य स्वरूप तेवढें कायम राहिलें. आंत पाहावें तों मात्र कांहींच नाहीं.

जुन्या मताचे लोक चिडतील या भीतीमुळें समाज-सुधारणेच्या बाबतींतही सरकार या जुन्या लोकांच्याच बाजूला राहिलें. त्यामुळें समाजसुधारणेच्या कार्याला अडथळा उत्पन्न झाला. परकीय सरकार म्हटलें कीं सामाजिक सुधारणेची कोणतीही गोष्ट करणें अशक्यच म्हटलें पाहिजे. कारण त्यानें कांहीं बदल करावयाचा म्हटला कीं लोक त्याबद्दल नाखूषच असणार. हिंदुधर्म आणि हिंदु-कायदा यांच्यामध्यें पुष्कळ बाबतींत फेरबदल आणि प्रगति नेहमींच होत आलेली होती; मात्र हें खरें कीं ही प्रगति अलीकडच्या कांहीं शतकांत फारच मंदपणें होत होती. हिंदु-कायदा हा बहुतेक सारा रूढीवर आधारलेला आहे आणि रूढी तर बदलून नव्या नव्या प्रस्थापित होत असतात. हिंदु-कायद्याच्या ठिकाणीं हा जो लवचिकपणा होता, तो ब्रिटिशांच्या अमलांत अजिबात नाहींसा झाला आणि त्या ठिकाणीं आतां अगदीं अतिशय जुनाट मतांच्या लोकांच्या सल्ल्यावरून निश्चित केलेले असे सहजासहजीं न बदलणारे असे कायदेकानू प्रस्थापित झाले. यामुळें हिंदुसमाजाची जी काय मंद कां होईना पण प्रगति होत होती, तीही आतां बंद झाली. मुसलमान लोकांना तर या नवीन परिस्थितीचा याहून अधिक तिटकारा वाटून त्यांनीं आपल्याला आपल्या धर्माच्या चौकटींत अधिकच कोंडून घेतलें.

सतीची चाल—मृत पतीबरोबर स्वतःला जिवंत जाळून घेण्याची प्रथा—आपण बंद केली याबद्दल ब्रिटिश लोक मोठी बढाई मारीत असतात. या बाबतींत कांहीं थोडेंसें श्रेय त्यांना देणें योग्य आहे हें खरें; परंतु खरी गोष्ट अशी आहे कीं या बाबतींतसुद्धां राजा राममोहनराय यांच्यासारख्या सुधारकांनीं पुष्कळ वर्षें चळवळ आणि प्रचार केल्यानंतर मग ब्रिटिश सरकारनें या बाबतींत कायदा केला. त्यांच्या पूर्वी इतरही राजकर्त्यांनीं—विशेषतः मराठ्यांनीं—या चालीला प्रतिबंध केलेला होता. पोर्तुगीजांचा गव्हर्नर अल्बुकर्क यानें गोव्यामध्यें ही चाल बंद केलेली होती, ती हिंदी लोकांच्या आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रयत्नांमुळें. मला आठवतें त्याप्रमाणें पाहतां म्हणण्यासारखी एखादी समाजसुधारणा ब्रिटिश सरकारनें या देशांत घडवून आणली असेल, तर तीही एवढीच.

तात्पर्य, ब्रिटिशानीं हिंदुस्थानांतील सर्व मागासलेल्या आणि पुराणप्रिय वर्गांची

बाजू उचलून धरलां आणि हिंदुस्थान हा केवळ शेती करणारा देश होऊन त्यानें आपल्या कारखान्यासाठीं लागणारा कच्चा माल निर्माण करावा अशासाठीं सर्व प्रयत्न केले. हिंदुस्थानमध्यें यांत्रिक कारखाने होऊं नयेत या हेतूनें त्यांनीं हिंदुस्थानांत बाहेरून येणाऱ्या यंत्रसामग्रीवर जकात बसविली. इतर देश आपल्या देशांत नवीन उद्योगधंद्यांना उत्तेजन देत होते. जपाननें तर देशाचें औद्योगीकरण करण्याच्या बाबतींत नुसती घोडदौड चालविली होती हें लौकरच आपणांला दिसून येईल; पण हिंदुस्थानांत मात्र ब्रिटिश सरकारनें उद्योगधंदे पायांखालीं तुडवून टाकले. यंत्रसामग्रीवरील ही जकात इ. स. १८६० पर्यंत कायम होती. या जकातीमुळें हिंदुस्थानांत कारखाने उभारावयाला इंग्लंडांतल्यापेक्षा चौपट खर्च येई आणि तरीसुद्धां हिंदुस्थानांत मजुरीचे दर किती तरी स्वस्त होते. पण अशा या अडवणुकीच्या धोरणानें, जें व्हावयाचें होतें त्याला फक्त उशीर लागला एवढेंच; त्या धोरणामुळें काळाचा अपरिहार्य ओघ थोडाच थांबणार होता? एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास यांत्रिक कारखाने हिंदुस्थानमध्यें उत्पन्न होऊन वाढण्यास सुरुवात झालीच. बंगालमध्यें प्रथम ब्रिटिशांच्याच भांडवलावर जूटचे कारखाने सुरू झाले; पुढें आगगाडीचे रस्ते झाल्यामुळें असे उद्योगधंदे वाढण्यास मदत झाली आणि १८८० नंतर बहुतांशीं हिंदी लोकांच्या भांडवलावर अहमदाबाद व मुंबई येथें सुती कापडाच्या गिरण्या निघाल्या. त्यानंतर खाणींचा उद्योग सुरू झाला. एक कापडाच्या गिरण्या सोडल्या, तर अत्यंत मंद गतीनें हें औद्योगीकरणसुद्धां बहुतेक सर्व ब्रिटिश भांडवलाच्या बळावर होत होतें आणि जें होत होतें तें सर्व, सरकारची मदत तर दूरच, परंतु सरकारच्या विरोधच सहन करून होत होतें. सरकारचें म्हणणें आम्हीं Laissez Faire चें—व्यक्तिस्वातंत्र्याचें धोरण अंगीकारलेलें आहे. आम्ही होऊन कशांत हस्तक्षेप करणार नाहीं; या सगळ्या गोष्टी स्वाभाविकपणें जशा घडतील तशा घडूं द्याव्या, कोणाही व्यक्तीच्या प्रयत्नांत ढवळाढवळ करूं नये असें आमचें धोरण आहे. पण अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांमध्यें हिंदुस्थानच्या व्यापाराची स्पर्धा ज्या वेळीं इंग्लंडला जाणवत होती, तेव्हां हिंदी मालाच्या इंग्लंडमधील व्यापारावर निरनिराळे प्रतिबंध किंवा कर लादून त्या व्यापाराच्या कामीं ढवळाढवळ करायला मात्र ब्रिटिश सरकारनें कमी केलें नव्हतें. आतां त्यांचें सगळें कांहीं साधलें होतें; त्यांना स्पर्धेचें भय उरलें नव्हतें; तेव्हां आतां व्यक्तिस्वातंत्र्याचे गोडवे गायला त्यांना कांहींच हरकत नव्हती; परंतु तोंडानें असें बोलत असूनसुद्धां त्यांची कृति मात्र सर्वस्वीं निःपक्षपातीपणाची किंवा त्रयस्थपणाची नव्हती; तर उलट, हें सरकार हिंदी धंद्यांच्या वाढीला, विशेषतः मुंबई, अहमदाबादच्या कापडगिरण्यांच्या उद्योगाला प्रतिबंध होईल अशाच गोष्टी करीत आलें. या गिरण्यांत तयार होणाऱ्या मालावर या सरकारनें एक कर बसविला आणि त्याला कापडावरील एक्साइजचा कर असें नांव दिलें. या कराचा हेतु लँकेशायरमध्यें तयार होणारा

ब्रिटिशांचा कापडमाल हिंदी कापडाच्या मानानें महाग पडूं नये एवढाच होता. इतर बहुतेक सर्व देशांत काय पद्धति आहे ? तर आपल्या देशांमधील उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठीं किंवा उत्पन्न वाढविण्यासाठीं म्हणून परदेशाच्या मालावर आयात-कर बसवितात; पण इंग्रजांनीं या देशांत एक मोठाच अपूर्व चमत्कार करून दाखविला. त्यांनीं हिंदुस्थानांत तयार होऊन हिंदुस्थानांत खपणाऱ्या मालावरच कर लादला ! हिंदी लोकांनीं या कापडावरील अंतर्गत कराबद्दल पुष्कळ चळवळ केली, तरीपण तिला न जुमानतां अगदीं अलीकडेपर्यंत हा कर चालूच होता.

अशा रीतीनें सरकारी विरोध सहन करूनही हिंदुस्थानांत आधुनिक उद्योगधंदे हळूहळू वाढत होते. हिंदुस्थानच्या धनिकवर्गाची एकसारखी ओरड सुरू होती-कीं हिंदुस्थानची औद्योगिक वाढ झाली पाहिजे. परंतु अगदीं अलीकडे, मला वाटतें १९०५ मध्यें काय तें एकदांचें सरकारनें व्यापार आणि उद्योगधंदे यांच्यासाठीं आपल्या कारभारांत एक खातें उघडलें ; परंतु तरीही पहिलें महायुद्ध सुरू होईपर्यंत या खात्यानें कांहींसुद्धां काम केलें नाहीं. उद्योगधंदे जसे वाढूं लागले, तशी शहरांतील कारखान्यांतून काम करणाऱ्या गिरणीमजुरांची संख्या वाढत चालली. जमिनीवर अवलंबून राहणारांची संख्या फारच वाढलेली होती हें मीं तुला सांगितलेंच आहे. त्यामुळें आणि खेडेगांवांमध्यें नित्यच सोसाव्या लागणाऱ्या अर्धवट उपासमारीमुळें खेडेगांवचे पुष्कळसे लोक या गिरण्यांतून किंवा बंगाल आणि आसाममध्यें वाढत चाललेल्या मोठमोठ्या मळ्यांतून कामावर दाखल झाले. शेतीवरील या दडपणामुळें पुष्कळसे लोक आपला देश सोडून मजुरीसाठीं परदेशींसुद्धां गेले ; कारण तेथें गेल्यावर पुष्कळ मोठी मजुरी मिळेल असें आमिष या लोकांना दाखविण्यांत आलेलें होतें. हे मजूर विशेषतः दक्षिण आफ्रिका, फिजी, मॉरिशस आणि सिलोन या प्रांतांमध्यें गेले. यांपैकीं कित्येक देशांमध्यें या हिंदी मजुरांना जवळजवळ गुलामांप्रमाणें वागविण्यांत येत असे. इकडे आसामच्या चहाच्या मळ्यांतही त्यांची तीच अवस्था होती. त्यामुळें निराश आणि निरुत्साह होऊन मळे सोडून कांहीं दिवसांनीं हे लोक आपल्या मूळ गांवीं परत जाण्याचा प्रयत्न करूं लागले. पण तेथें तरी त्यांना आसरा कोठला मिळणार ? खेडेगांवीं राहिलेल्या लोकांना पुरून यांना आणखी देण्याजोगी जमीन खेडेगांवांमधून होतीच कोठें ?

बरें, इकडे गिरण्यांतून जे मजूर गेले त्यांनाही लौकरच आढळून आलें, कीं घरच्यापेक्षां येथें जरी थोडीफार अधिक मजुरी मिळाली तरी तेवढ्यानें कांहीं आपलें भागत नाहीं. कारण लंकेंत सोन्याच्या विटा ! शहरांत काय सर्वच गोष्टी महाग. खेडेगांवच्या मानानें तेथील सर्व राहणी एकंदरीनें अधिक खर्चाची. बरें, त्यांना राहण्याच्या जागा मिळायच्या त्या म्हणजे घाणेरड्या, दमट, अंधेऱ्या, रोगट अशा गचाळ लहान-लहान खोल्या. कारखान्यांतही कामाची व्यवस्था आणि पद्धति वाईटच. खेडेगांवांत या लोकांना रोज बहुतेक अर्धपोटीं राहावें लागत होतें हें खरें ; पण तेथें त्यांना

पोटभर सूर्यप्रकाश आणि ताजी हवा या गोष्टी तरी मिळत होत्या. येथें या गिरणी-कामगाराला ताजी हवा तर मुळींच नाहीं आणि सूर्यप्रकाश असून नसल्यासारखाच. शिवाय अधिक खर्चाची राहणी. पुरेशी मजुरी पण त्यांला मिळायची नाहीं, त्यामुळें त्याच्या घरच्या बायकांना आणि मुलांनासुद्धां रोज पुष्कळसे तास राबणें भाग पडत होतें. मग तान्ह्या मुलांना अफू देणें हें क्रमप्राप्तच झालें. नाहीं तर त्यांना जागें ठेवून रोजचें कारखान्यांतलें काम कसें होणार? अशा तऱ्हेच्या हालअपेष्टा सहन करीत गिरणी-मजुरांना कारखान्यांतून राबण्याचा प्रसंग आला. स्वाभाविकच यामुळें दुःखभार वाढत जाऊन त्यांच्यामध्यें असंतोष निर्माण झाला. त्यामुळें मधूनमधून निव्वळ निराशेला बळी पडून ते संप करूं लागले, म्हणजे काम करण्याचेंच बंद करूं लागले. परंतु हे मजूर दुबळे, असंघटित असल्यामुळें त्यांचे धनिक मालक त्यांचे संप तेव्हांच मोडून काढीत. बरें, या कामीं नेहमीं सरकारची मदत या मालकांनाच असावयाची. पुष्कळ काळानंतर आणि अत्यंत कटु अनुभवानें शाहणे झाल्यावर एकट्या-दुकट्यानें हें काम न करतां असे प्रयत्न सर्वांनीं मिळून संघटितपणें करणें अवश्य आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली. मग त्यांनीं आपले संघ स्थापण्यास सुरुवात केली.

तुला वाटेल कदाचित्, कीं हें वर्णन सगळें कुठलें पूर्वीच्या काळचें आहे. अलीकडे हिंदुस्थानांतील मजुरांच्या परिस्थितींत थोडीशी सुधारणा झालेली आहे हें खरें; कांहीं कायदे करून गरीब बिचाऱ्या कामगाराला थोडेंसें संरक्षण देण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला आहे. परंतु अजूनसुद्धां तूं जर कानपूरला किंवा मुंबईला किंवा गिरण्या अगर कारखाने असणारीं दुसरीं जीं कित्येक शहरें आहेत त्यांपैकीं एखाद्या ठिकाणीं गेलीस आणि तिथलीं मजुरांचीं घरें पाहिलींस, तर तुला किळस येऊन तुझ्या अंगावर शहारे उभे राहतील.

या आणि दुसऱ्याही पत्रांत मी हिंदुस्थानांतील ब्रिटिश लोक किंवा हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकार असा शब्दप्रयोग करीत आलों आहें; पण या सरकारचें स्वरूप तरी कसें काय होतें? त्याचा कारभार कोणाकरवीं आणि कोणत्या पद्धतीनें चालू होता? अगदीं सुरुवातीलाच येथें कारभार ईस्ट इंडिया कंपनीच्या हातीं होता. परंतु कंपनीच्या मागें ब्रिटिश पार्लमेंट होतेंच. त्या प्रचंड बंडानंतर १८५८ मध्यें सर्व कारभार ब्रिटिश पार्लमेंटनें खास स्वतःच्या हातीं घेतला. पुढें इंग्रज राजांनीं (अथवा राणीनें म्हणा; कारण त्या वेळीं इंग्लंडमध्यें राणीचें राज्य होतें.) कैसर-ई-हिंद हा किताब धारण केला. हिंदुस्थानांत सर्वांत वरिष्ठ राज्याधिकार गव्हर्नर जनरलकडे असतो. यालाच आतां व्हाइसरॉय, राजप्रतिनिधि ही पदवी मिळाली. त्याच्या हाताखालीं पुष्कळसे इतर अधिकारी असावयाचे. त्या वेळीं हिंदुस्थानचे कांहीं मोठे मोठे प्रांत पडलेले होते आणि कांहीं संस्थानांमध्यें बाकीचा मुलूख होता. ही विभागणी आजही जवळजवळ जशीच्या तशी कायम आहे. संस्थानें जीं होतीं, त्यांत राज्यकारभार हिंदी राजांच्या हातीं

होता. या संस्थानांना म्हणायचें मात्र स्वतंत्र; परंतु हीं सगळीं संस्थानें ब्रिटिशांवरच अवलंबून होतीं. ब्रिटिशांचीच त्यांच्यावर सत्ता होती. या प्रत्येक संस्थानावर ब्रिटिशांचा एक रेसिडेंट म्हणून अधिकारी असावयाचा आणि त्याचाच ताबा बहुतेक साऱ्या राज्यकारभारावर तेथें चालावयाचा. अंतर्गत सामाजिक सुधारणेशीं या अधिकाऱ्याला कांहींएक कर्तव्य नव्हतें. संस्थानचें राज्य कितीही वाईट असलें किंवा जुनाट पद्धतीचें असलें, तरी त्याला त्याची कांहीं पर्वा नव्हती. त्याचें काम फक्त एक होतें. तें म्हणजे संस्थानामध्यें ब्रिटिशांच्या सत्तेची पकड अधिकाधिक दृढ करावयाची.

हिंदुस्थानचा जवळजवळ तिसरा हिस्सा या संस्थानांमध्यें सामावलेला होता. उरलेला दोनतृतीयांश प्रदेश खास ब्रिटिशांच्या अमलाखालीं होता. म्हणून या दोनतृतीयांश प्रदेशाला ब्रिटिश हिंदुस्थान असें म्हणूं लागले. ब्रिटिश हिंदुस्थानांतील एकूण एक अधिकारी ब्रिटिशच असत. अलीकडे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीअखेरीला थोड्याशा हिंदी लोकांचा त्यांच्या राखीव रानांत प्रवेश झाला. तरीपण सगळी सत्ता, सगळा अधिकार ब्रिटिशांच्या हातांमध्यें होता आणि आजही तो तसाच त्यांच्या हातीं आहे. हे सर्व वरिष्ठ अधिकारी, अर्थात् लष्करी अधिकारी सोडून, हिंदी सिव्हिल सर्व्हिसचे सभासद असावयाचे. अशा रीतीनें हिंदुस्थानचा सारा राज्यकारभार या हिंदी सिव्हिल सर्व्हिसच्या, आय्. सी. एस्.च्या ताब्यांत आहे. या अधिकाऱ्यांची नेमणूक करावयाची ती त्याची त्यांनींच आपापसांत आणि त्यांच्या कारभाराबद्दल ते जबाबदारही स्वतःचे स्वतःला. लोकांच्या बाबतींत वाटेल तें त्यांनीं केलें तरी ते लोकांना त्याबद्दल जबाबदार नाहींत. अशा सर्वस्वीं अधिकाऱ्यांच्या हातीं असलेल्या या राज्यव्यवस्थेला ब्यूरॉक्रसी हें इंग्रजी नांव पडलेलें आहे. कारण ब्यूरो म्हणजे कचेरी. हिंदी भाषेंत त्याचें रूपांतर आपण नोकरशाही असें करतों.

हिंदुस्थानांत या आय्. सी. एस्. लोकांबद्दल जिथें तिथें आपल्याला मोठ्या शिफारशी ऐकायला मिळत असतात. हे लोक म्हणजे कुठल्या तरी मोठ्या अलौकिक जातीचे लोक दिसतात. बऱ्याच दृष्टींनीं हे लोक मोठे कार्यक्षम असतात हें निश्चित. या लोकांनीं या देशातील राज्यकारभार सुरळीत केला; ब्रिटिश राज्याचा पाया येथें दृढ केला आणि यांतून स्वतःचाही खूप लाभ करून घेतला. ब्रिटिशांच्या राज्याच्या पाया वाढवणारीं आणि कर वसूल करणारीं एकूणएक खातीं या लोकांनीं अत्यंत सुव्यवस्थितपणें चालविलीं. बाकीच्या खात्यांकडे त्यांनीं दुर्लक्षच केलें. या बाकीच्या खात्यांचा संबंध बहुतांशीं लोकांच्या हिताशीं असे; परंतु आय्. सी. एस्. मधल्या या लोकांची नेमणूक लोकांनीं केलेली नव्हती किंवा लोकांना ते जबाबदारही नव्हते. तेव्हां अशा त्या खात्यांकडे आय्. सी. एस्. लोकांनीं कां म्हणून लक्ष द्यावें ? अशा स्थितींत स्वाभाविकपणेंच हे लोक सामान्य प्रजेशीं उद्धटपणानें, अहंमन्यतेनें आणि अवहेलनेनें वागूं लागले. त्यांच्या मतांची त्यांना काडीचीही किंमत वाटेनाशी झाली. स्वतःचें ज्ञान आणि दृष्टिकोन अगदीं संकुचित आणि मर्यादित असूनही हे लोक स्वतःला जगांतील

सर्वांत शहाणे समजूं लागले. हिंदुस्थानचें हित म्हणजे मुख्यतः त्यांच्या सिव्हिल सर्व्हिसचें, नोकरशाहीचें हित असें ते मानूं लागले. त्यांचा सगळ्यांचा मिळून एक परस्पर प्रशंसक संघच निर्माण होऊन एकमेकांचे गोडवे गाण्याचा धंदा त्यांनीं चालू केला. अनियंत्रित सत्ता आणि अधिकार यांचा हा असा परिणाम स्वाभाविकपणेंच झाला आणि हिंदी सिव्हिल सर्व्हिस हीच खरोखर सगळ्या हिंदी लोकांची व देशाची मालक झाल्यासारखी झाली. ब्रिटिश पार्लमेंट पडलें येथून इतकें दूर कीं या नोकरशाहीच्या कारभारांत ढवळाढवळ करणें त्याला अशक्यच झालें. आणखी शिवाय ही नोकरशाही पार्लमेंटचें आणि ब्रिटिश उद्योगधंद्याचें हितरक्षण होईल अशाच पद्धतीनें वागत असल्यामुळें तिच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याचा पार्लमेंटला प्रसंगच पडण्याचें कारण नव्हतें. हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें मात्र या नोकरशाहीवर कांहीं विशेष दडपण आणण्याची कसलीच सोय नव्हती. हे लोक इतके चढून गेलेले होते, कीं त्यांच्या कामाबद्दल एवढीशी नेमस्त टीका केलेलीसुद्धां त्यांना खपत नव्हती.

असें असलें तरी व्यक्तिशः पाहिलें तर या हिंदी सिव्हिल सर्व्हिसमध्यें पुष्कळ सज्जन, प्रामाणिक आणि कार्यक्षम, कर्तबगार मागसें होतीं; परंतु ज्या धोरणाच्या प्रवाहांत सांपडून हिंदुस्थान देश असहायपणें वाहत चालला होता, तो प्रवाह वळविण्याचें किंवा त्या धोरणांत कांहीं फरक करण्याचें सामर्थ्य अशा व्यक्तींच्या अंगीं नव्हतें. कारण कांहीं म्हटलें तरी आय्. सी. एस्. चे हे सगळे लोक म्हणजे इंग्लंडमधील औद्योगिक धनिकवर्गाचे नुसते गुमास्ते होते. या वर्गाचा हिंदुस्थानची पिळणूक करावयाची हाच मुख्यतः उद्देश होता.

स्वतःच्या हिताच्या किंवा ब्रिटिश उद्योगधंदेवाल्यांच्या हिताचा प्रश्न असला, म्हणजे हें नोकरशाही सरकार अगदीं डोळ्यांत तेल घालून काम करायला तयार असावयाचें; परंतु शिक्षण, आरोग्य, रुग्णालयें हीं आणि अशीं जीं देशाचें सुख, स्वास्थ्य आणि सुधारणा वाढवणारीं इतर कार्यें, त्यांच्याकडे या नोकरशाहीचें लक्ष नसे. किती तरी वर्षेंपर्यंत हीं कार्यें करण्याचा विचारसुद्धां कधीं या नोकरशाहीच्या मनांत आला नाहीं. इकडे जुन्या ज्या गांवठी शाळा होत्या त्या मरून गेल्या. त्यानंतर मग अतिशय सावकाश आणि मोठ्या नाखुषीनें थोडीशी शिक्षणाची सुरुवात करण्यांत आली. ही शिक्षणाची सुरुवात सुद्धां नोकरशाहीनें स्वतःच्याच गरजेकरितां म्हणून केली. सगळ्या मोठमोठ्या अधिकारांच्या जागांवर ब्रिटिश लोक भरलेले होते; परंतु लहान अधिकारांच्या जागांवर आणि कारकुनीच्या जागांवर नेमायला ब्रिटिश माणसें आणणें तर शक्य नव्हतें आणि कारकुनांची तर जरुरीच होती. तेव्हां असे हे कारकून तयार करण्यासाठीं ब्रिटिशांनीं प्रथम शाळा आणि कॉलेजें हिंदुस्थानांत सुरू केलीं. तेव्हांपासून आतांपर्यंत हिंदुस्थानांतील शिक्षणाचा हाच मोठा उद्देश राखण्यात आलेला आहे. या शिक्षणांतून तयार होणारा बहुतेक सारा माल फक्त कारकून होण्याच्या लायकीचा तयार होत असतो. परंतु थोड्याच वेळांत सरकारी किंवा इतर

कचेऱ्यांत जरूर होती तीपेक्षा या कारकुनांचें उत्पादन जास्त होऊं लागलें आणि त्यांतून देशांत सुशिक्षित बेकारांचा एक नवाच वर्ग निर्माण झाला.

या नवीन इंग्रजी शिक्षणाच्या बाबतींत बंगाल प्रांतानें पहिलें पाऊल टाकलें. त्यामुळें पहिल्या-पहिल्या काळांत कारकुनांच्या पुरवठ्यांत बंगाली लोकांचा भरणा अधिक असे. १८५७ मध्यें तीन युनिव्हर्सिट्या स्थापन करण्यांत आल्या. कलकत्ता, मुंबई आणि मद्रास. येथें एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं मुसलमान लोकांनीं कांहीं या नवीन शिक्षणाचा विशेषसा स्वीकार केला नाहीं. त्यांचें कांहीं या शिक्षणपद्धतीशीं सूत जमलें नाहीं. त्यामुळें या कारकुनी पेशाच्या आणि सरकारी नोकरीच्या शर्यतींत मुसलमान लोक मागें पडले. पुढच्या काळांत त्यांची ही एक मोठी तक्रार होऊन राहिली.

आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. सरकारनें जरी या शिक्षणाच्या कार्याला सुरुवात केली, तरी मुलींच्या शिक्षणाकडे त्यानें पूर्ण दुर्लक्ष केलें. यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं. शिक्षण जें दिलें जात होतें तें कारकून तयार होण्यासाठीं, आणि कारकुनीच्या कामासाठीं हवे होते पुरुष. शिवाय सामाजिक चालीरीती त्या काळीं फारच मागासलेल्या असल्यानें कारकुनीच्या कामासाठीं पुरुषच काय ते मिळण्यासारखे होते. त्यामुळें मुलींच्या शिक्षणाचा कोणीं विचारच मनांत आणला नाहीं. पुढें या बाबतींत थोडीफार सुरुवात होऊं लागण्यापूर्वी मध्यंतरीं केवढा मोठा काळ जावा लागला.

## ११३

# हिंदुस्थानची पुनर्जागृति

७ डिसेंबर, १९३२

ब्रिटिशांचें राज्य हिंदुस्थानमध्यें दृढ पायावर संघटित कसें होऊन गेलें आणि ब्रिटिशांच्या धोरणामुळें आमच्या लोकांना दारिद्र्य आणि दैन्य सोसण्याची पाळी कशी आली हें मीं तुला सांगितलें. या राजवटीमुळें देशांत शांतता प्रस्थापित झाली यांत मुळींच वाद नाहीं. त्याचप्रमाणें सुरळीत राज्यव्यवस्थाही या देशांत स्थापन झाली. मोंगलांचें राज्य विस्काळित झाल्यावेळेपासून या देशांत जी अंदाधुंदी माजली होती तिच्यानंतर ही नवीन शांतता आणि सुव्यवस्था थोडीशी हवीशीच वाटण्याजोगी होती. लुटारू आणि दरोडेखोर यांच्या चांगल्या चांगल्या सुसंघटित टोळ्या देशांत जो धुमाकूळ घालीत असत तोही आतां बंद झाला; परंतु शेतांत किंवा कारखान्यांत काम करणारा जो मजूर या नव्या सत्तेच्या जड जात्याखालीं भरडून आणि चिरडून निघत

होता, त्याला या शांततेची आणि सुव्यवस्थेची काय मोठीशी किंमत होती? तरी पण पुन्हां एकदां मला सांगावयाचें आहे तुला, कीं याबद्दल कोणत्याही एका देशावर किंवा समाजावर, ब्रिटनवर किंवा ब्रिटिश लोकांवर रागावणें हें मूर्खपणाचें आहे. आपल्याप्रमाणें तेही प्राप्त परिस्थितीच्या तडाख्यांत सांपडून वागत होते. आपण आतांपर्यंत हा जो इतिहासाचा अभ्यास केला त्यावरून आपल्याला दिसून आलें आहे, कीं जीवन म्हणजे कांहीं पुष्पशय्या नाहीं. जीवन, संसार, हा पुष्कळशा प्रसंगीं मोठा क्रूर आणि निर्घृण अशाच स्वरूपाचा आढळतो. त्याबद्दल डोकें भडकावून घेणें किंवा कोणाला तरी नुसत्या शिव्या देणें हें मूर्खपणाचें असून त्याचा उपयोग कांहीं नाहीं. त्यापेक्षां हें दारिद्र्य, दैन्य आणि पिळणूक यांचीं कारणें समजून घेणें आणि तीं दूर करण्याचा प्रयत्न करणें हेंच अधिक सभंजसपणाचें आहे. ही गोष्ट आपण जर केली नाहीं आणि काळाच्या पुढच्या दौडींत आपण जर मागें पडलों, तर आपल्याला हालअपेष्टा सोसाव्या लागणें अनिवार्य आहे. हिंदुस्थान देश अशा रीतीनें काळाच्या ओघांत मागें पडला. तो कांहींसा निर्जीव हाडांच्या सांपळ्यासारखा झाला होता. येथील समाज आपल्या प्राचीन परंपरांच्या चौकटींत अगदीं कायमचा दगडासारखा कठिण बनून गेल्यासारखा झाला होता. त्याच्यांतिल जोम आणि शक्ति पार नाहीशी होऊन तो कुजून जाऊं लागला होता. अशा स्थितींत त्याच्या कपाळीं हालअपेष्टा आल्या तर त्यांत आश्चर्य कांहींच नाहीं. या हालअपेष्टा आम्हांला भोगावयाला लावण्याचें कार्य ब्रिटिशांच्या हातून घडलें; पण ते तेथें आले नसते तर आणखी कोणी तरी येऊन आम्हांला असेंच वागविलें असतें बहुधा.

परंतु ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थानवर एक मोठा उपकार केला. त्यांच्यांतील नव्या आणि जोमदार जीवनाचा हा जो हिंदुस्थानवर तडाखाच जणुं बसला, त्यानें हिंदुस्थान खळबळून निघाला आणि त्याच्यामध्यें एक प्रकारची राजकीय ऐक्याची आणि राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. हा जो धक्का बसला त्यानें देशाचे हाल फारच झाले खरे; तरी पण असा एक धक्का आपला प्राचीन देश आणि समाज पुन्हां एकदां जोमदार व्हावा या दृष्टीनें हवाच होता. इंग्रजी शिक्षण सुरू झालें कारकून तयार करण्यासाठीं; पण त्यामुळें हिंदी लोकांचा पाश्चात्यांच्या विचारप्रवाहाशीं परिचय होत गेला. इंग्रजी शिकलेल्यांचा एक नवीनच वर्ग देशांत निर्माण झाला. हा वर्ग फारच लहान होता आणि सामान्य जनतेपासून त्याचे संबंध तुटलेले असत. तथापि याच वर्गाच्या हातून नव्या राष्ट्रीय चळवळींचा पुढाकार घेतला जावयाचा होता. पहिल्या-पहिल्यांदां हा वर्ग इंग्लंडवर आणि इंग्रजांच्या स्वातंत्र्याच्या कल्पनांवर अगदीं मोहित होऊन गेला होता. अगदीं याच सुमारास इंग्लंडमध्यें स्वातंत्र्य आणि लोकशाही यांच्या चर्चेला मोठा भर आलेला होता. अर्थात् हे सर्व विचार अगदींच अस्पष्ट, अंधुक अशा स्वरूपाचे होते आणि हिंदुस्थानात तर इंग्लंड केवळ आपल्या स्वतःच्या फायद्यासाठीं अगदींच अनियंत्रित कारभार करीत होतें; परंतु योग्य वेळ

येतांच इंग्लंड हिंदुस्थानला स्वातंत्र्य बहाल करील, अशी थोडी आशाळभूतपणाची या वर्गाची कल्पना होती.

पाश्चिमात्य विचारांचा हा जो जोरदार धक्का हिंदुस्थानला बसला त्याचा परिणाम कांहीं प्रमाणांत हिंदु धर्मावरही झाला. या विचारांचा परिणाम सामान्य जनतेवर कांहींच झाला नाहीं आणि सनातनी—पुराणप्रिय—लोकांना तर त्यांच्या जुनाटपणांत ब्रिटिश सरकारनें मदतच केली हें मीं तुला सांगितलेंच आहे; परंतु सरकारी नोकरांचा आणि वकील, डॉक्टर, शिक्षक या किंवा अशाच इतर बुद्धिजीवी लोकांचा जो एक नवाच मध्यम वर्ग निर्माण होत होता, त्याच्यावर या पाश्चात्य विचारांचा परिणाम झाला. एकोणिसाव्या शतकाच्या अगदीं सुरुवातीलाच हिंदु धर्मामध्यें पाश्चात्य धर्तीवर सुधारणा करण्याचा एक प्रयत्न बंगालमध्यें झाला. अर्थात् यापूर्वीही हिंदु धर्मामध्यें किती तरी धर्मसुधारक होऊन गेलेले होते. माझ्या पत्रात वेळोवेळीं मीं तुला त्यांचीं नांवें सांगत आलोंच आहें. पण हा जो नवा प्रयत्न झाला त्याची प्रेरणा बाहेरून ख्रिस्ती धर्मामधून आणि पाश्चात्य विचारांमधून निश्चितपणें मिळालेली होती. हा प्रयत्न करणारे गृहस्थ म्हणजे राजा राममोहन रॉय. यांचें नांव मागें सतीची चाल बंद करण्याच्या संबंधांत आपल्यापुढें आलेलें आहे. हे एक मोठे विद्वान् आणि श्रेष्ठ पुरुष होते. संस्कृत, अरबी या आणि इतर पुष्कळ भाषा त्यांना फार चांगल्या प्रकारें येत असत आणि निरनिराळ्या धर्मांचा त्यांनीं खोल अभ्यास केलेला होता. धार्मिक कर्मकांड, पूजाअर्चा यांना त्यांचा विरोध होता. समाजसुधारणा आणि स्त्री-शिक्षण यांबद्दल त्यांचा मोठा आग्रह होता. त्यांनीं जी एक संस्था स्थापन केली तिचेंच नांव ब्रह्मोसमाज. संख्येच्या दृष्टीनें हा समाज फारच लहान होता आणि आजलाही तो लहानच राहिला आहे. बंगालमधील इंग्रजी शिकलेल्या लोकांमध्येंच काय तो थोडाबहुत त्याचा प्रसार आहे; परंतु बंगालमधील सामाजिक जीवनावर मात्र या समाजाचा फार मोठा परिणाम झाला. टागोरांचें सर्वच घराणें या समाजामध्यें सामील झालें आणि रवींद्रनाथ टागोरांचे वडील हे पुष्कळ काळपर्यंत ब्रह्मोसमाजाचे मोठेच आधारस्तंभ होते. या समाजांतील आणखी एक प्रमुख गृहस्थ म्हणजे केशवचंद्र सेन.

याच शतकाच्या उत्तरार्धांत पुढें आणखी एक धर्मसुधारणेची चळवळ घडून आली. ही निर्माण झाली पंजाबमध्यें. स्वामी दयानंद सरस्वती हे या चळवळीचे प्रवर्तक. यांनीं एक आर्यसमाज म्हणून नवाच समाज स्थापन केला. अलीकडील काळांत हिंदु धर्मांत ज्या पुष्कळ कर्मकांडाच्या वगैरे नवीन गोष्टी निर्माण झालेल्या होत्या, त्या या समाजानें अमान्य केल्या आणि जातिभेदालाही विरोध सुरू केला. "वेदांकडे परत चला" हें त्यांचें सूत्रवाक्य. मुसलमानी धर्म आणि ख्रिस्ती धर्म यांच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम होऊन सुरू करण्यांत आलेली ही एक नवीन धर्म व समाज-सुधारणेची चळवळ होती हें खरें; तथापि स्वभावतःच ही एक खरोखर लढाऊ

वृत्तीची, आक्रमक स्वरूपाची चळवळ होती. असें जरी होतें तरी चमत्कार असा झाला, कीं हिंदु धर्मामधील अनेक पंथांपैकीं आर्यसमाजपंथ इस्लाम धर्माच्या तत्त्वज्ञानाला सर्वांत अधिक जवळचा असूनही इस्लामधर्माचा तो प्रतिस्पर्धी आणि विरोधक झाला. या समाजाचा उद्देश हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करणें हा होता. या चळवळीला बळ चढण्याचें एक मुख्य कारण म्हणजे तिला एक प्रकारचा राष्ट्रीयत्वाचा रंग होता. या रूपानें हिंदु राष्ट्रीयत्वच डोकें वर काढीत होतें अशी वस्तुस्थिति आहे. परंतु ही चळवळ केवळ हिंदु राष्ट्रीयत्वाची असल्यामुळें तिला हिंदी राष्ट्रीयत्वाचें स्वरूप प्राप्त होऊं शकलें नाहीं.

ब्रह्मोसमाजापेक्षां आर्यसमाजाचा प्रसार फारच मोठ्या प्रमाणावर झाला. विशेषतः पंजाब प्रांतामध्यें; परंतु हा प्रसारही मुख्यतः मध्यमवर्गापुरताच मर्यादित होता. आर्यसमाजानें शिक्षणाचें मोठें कार्य केलेलें आहे. मुलांमुलींसाठीं या समाजानें पुष्कळच शाळा आणि कॉलेजें चालविलेलीं आहेत.

याच शतकांतील आणखी एक लक्षांत ठेवण्याजोगे मोठे धार्मिक गृहस्थ म्हणजे रामकृष्ण परमहंस. आतांपर्यंत या पत्रांत ज्या धर्मसुधारकांचीं नांवें मीं सांगितलीं त्यांच्याहून हे फारच निराळ्या प्रकारचे गृहस्थ होते. धर्मसुधारणेसाठीं चढाऊ धोरणाची कसलीही संस्था त्यांनीं स्थापन केली नाहीं. त्यांचा सगळा भर मनुष्यजातीच्या सेवेवर होता आणि आज देशामध्यें ठिकठिकाणीं "रामकृष्ण सेवाश्रम" स्थापन झालेले असून ते दरिद्री आणि दीनदुबळ्यांची, रंजल्या-गांजलेल्यांची सेवा करण्याची रामकृष्णांची परंपरा चालवीत आहेत. रामकृष्णांचे एक सुप्रसिद्ध शिष्य म्हणजे स्वामी विवेकानंद. यांनीं मोठ्या जोरदारपणें आणि वक्तृत्वपूर्ण वाणीनें राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार केला. त्यांच्या उपदेशांत मुसलमानविरोध नव्हता; या उपदेशांत कोणाबद्दलच विरोधभावना नव्हती. आर्यसमाजाच्या कांहीं अंशीं संकुचित अशा राष्ट्रवादासारखा विवेकानंदांचा राष्ट्रवाद संकुचित नव्हता. तरीही त्यांचा हा राष्ट्रवाद हिंदु राष्ट्रवादच असून त्याचीं पाळेंमुळें हिंदु धर्म आणि संस्कृति यांच्यामध्येंच होतीं.

तेव्हां ही एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे, कीं हिंदुस्थानांत अगदीं प्रारंभीं ज्या राष्ट्रीयत्वाच्या लाटा उपस्थित झाल्या त्या धार्मिक स्वरूपाच्या आणि हिंदु धर्मांतर्गत होत्या. या हिंदु राष्ट्रवादामध्यें मुसलमान लोकांनीं भाग घेणें हें यामुळें अर्थातच शक्य नव्हतें. त्यामुळें ते त्यापासून दूर राहिले. शिवाय इंग्रजी शिक्षणापासूनही ते अलग राहिले. तेव्हां या नवविचारांचा त्यांच्यावर फारच थोडा परिणाम झाला आणि त्यांच्यामध्यें विचारांची खळबळही कमी झाली. पांचपन्नास वर्षांनंतर ते आपल्याभोंवतींचें कवच फोडून बाहेर पडले आणि त्या वेळीं हिंदूंच्याप्रमाणें त्यांच्याही राष्ट्रवादाला मुसलमानी राष्ट्रवादाचें स्वरूप प्राप्त झालें. त्यांचीही दृष्टि प्राचीन इस्लामी संस्कृति आणि परंपरा यांच्याकडे वळली आणि हिंदु लोक हे बहुसंख्य असल्यामुळें

या आपल्या संस्कृतीवर व परंपरेवर गदा येईल अशी भीति त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली; परंतु ही मुसलमानाची चळवळ फार पुढच्या काळांत, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरी-अखेरीला पुढें येऊं लागली. हिंदु धर्म आणि मुसलमान धर्म या दोन्हीमध्यें या ज्या सुधारणेच्या प्रगतिकारक चळवळी झाल्या, त्यांच्याविषयीं आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. या दोन्ही चळवळींमध्यें आपल्या जुन्या धार्मिक कल्पना आणि आचार या गोष्टींशीं पश्चिमेकडून आलेल्या शास्त्रीय आणि राजकीय कल्पना शक्य तितक्या जुळत्या करून घेण्याचा प्रयत्न करण्यांत येत होता. या आपल्या जुन्या कल्पना व जुने आचार यांची निर्भयपणें तपासणी करण्याचें आणि जरूर तर त्या अमान्य करण्याचें धैर्य ही चळवळ करणाऱ्यांच्या अंगीं नव्हतें. तरी पण त्यांच्यापुढें शास्त्रांनीं उभें केलेलें जगाचें नवें स्वरूप आणि त्याच्या आजूबाजूस सर्वत्र वावरणाऱ्या राजकीय आणि सामाजिक कल्पना यांच्याकडेही त्यांना डोळेझांक करतां येत नव्हती. म्हणून या सर्व आधुनिक कल्पना व ही सर्व आधुनिक प्रगति यांचें मूळ आमच्या प्राचीन धर्मग्रंथांतच आहे असें दाखवून त्या जुन्या-नव्यांचा समन्वय करण्याचा, त्यांतील विरोध नष्ट करण्याचा खटाटोप या लोकांनीं सुरू केला. अर्थात् या प्रयत्नांत या लोकाना अपयश येणार हें ठरलेलेंच होतें. याचा परिणाम लोकांना सरळ विचार करण्यापासून परावृत्त करण्याकडे मात्र झाला. जगाचें सगळें रूप पालटून टाकणाऱ्या या नव्या शक्ती आणि कल्पना यांचें स्वरूप समजावून घेऊन निर्भयपणें स्वतंत्र विचार करण्याऐवजीं, लोक प्राचीन आचार आणि परंपरा यांच्या दडपणाखालीं यामुळें जखडून, दडपून राहिले. पुढें पाहून प्रगतिपथावर कूच करण्याऐवजीं सगळ्यांची नजर चोरटेपणानें मागच्या दिशेला खिळून राहिली. माणसाचें डोकें एकसारखें मागेंच वळून राहत असलें आणि दृष्टि मागेंच पाहत राहणार असली, तर अशा माणसाचें पाऊल पुढें पडणें कठिण आहे.

इंग्रजी शिकणाऱ्यांचा वर्ग शहरांमधून वाढत गेला आणि त्याबरोबरच बुद्धिजीवी लोकांचा म्हणजे वकील, डॉक्टर या व अशा लोकांचा आणि व्यापाऱ्यांचा व धंदेवाइकांचा एक नवीनच मध्यमवर्गही वाढत चालला. पूर्वीसुद्धां हिंदुस्थानांत एक मध्यमवर्ग होताच; पण ब्रिटिशाच्या प्रारंभींच्या धोरणामुळें तो पार भरडून निघालेला होता. आतां जो नवीन मध्यमवर्ग निर्माण झाला तो खास ब्रिटिश अमलामधून निर्माण झालेला होता. एक प्रकारें या मध्यमवर्गीयांचें सगळें जीवन या ब्रिटिशांच्या अमलावर अवलंबून होतें. ब्रिटिशांचाच हा सगळा जणुं परिवार होता. ब्रिटिश लोकांनीं सामान्य जनतेची पिळणूक चालविलेली होती, तिच्यांतील कांहीं थोडासा फायदा या लोकांच्या वांट्याला येत होता. ब्रिटिश राजकर्त्या लोकांच्या पंचपक्वान्नांनीं भरलेल्या ताटाभोंवतीं जीं काय चार शितें शिल्लक राहतील, तीं हे लोक जमा करीत होते. त्यांच्यामध्यें कांहीं लोक ब्रिटिशांचा या देशांतील कारभार चालविण्याला हातभार लावणारे छोटे सरकारी नोकर होते; पुष्कळसे वकील होते. हे लोक कायदे-कोर्टाच्या कामात

मदत करीत आणि लोकांमधील भांडखोरीवर श्रीमंत होत. तसेंच कांहींजण व्यापारी होते; त्यांचें काम ब्रिटिश व्यापार आणि उद्योगधंदे यांचें कुंटणपण करावयाचें. कमिशन आणि नफा घेऊन हे लोक ब्रिटिश माल या देशांत विकीत.

या नवीन धनिक मध्यमवर्गांपैकीं फार मोठी संख्या हिंदु लोकांची होती. त्याला कारण एक तर मुसलमानांच्या मानानें हिंदूंची आर्थिक परिस्थिति अधिक चांगली होती हें आणि हिंदु लोकांनीं इंग्रजी शिक्षणाचा फायदा घेतला हें दुसरें. इंग्रजी शिक्षणानेंच सरकारी नोकरी आणि वकिली, डॉक्टरी वगैरे धंदे यांमध्यें प्रवेश मिळण्याचें महाद्वार खोललें जात होतें. मुसलमान लोक हे सामान्यतः हिंदूंहून पुष्कळच गरीब होते. ब्रिटिशांनीं हिंदी उद्योगधंदे बुडविल्यामुळें ज्याना जगांत कोठें तोंड काढावयाला, पाय ठेवायला जागा राहिली नव्हती असे जे विणकर होते ते बहुतेक सर्वच मुसलमान होते. हिंदुस्थानांतील सगळ्या प्रांतांमध्यें मुसलमानांची लोकसंख्या बंगाल प्रांतामध्यें अधिक; पण या प्रांतामध्यें हे लोक बिचारे गरीब, छोटे शेतमालक किंवा शेतीचीं कुळें होते. या कुळांचा जमीनमालक बहुधा हिंदु असावयाचा. त्याचप्रमाणें गांवचा वाणी हाही हिंदूच असावयाचा. त्याच्याचकडून लोकांना कर्जवाम मिळावयाचें आणि गांवच्या सगळ्या गरजा भागविणाऱ्या दुकानाचा बहुधा तोच मालक असावयाचा. अशा रीतीनें जमीनदार आणि हा वाणी यांच्या हातीं कुळांवर जुलूम करण्याची आणि त्यांची पिळणूक करण्याची शक्ति असे आणि या परिस्थितीचा हे लोक भरपूर फायदाही घेत, ही गोष्ट मुद्दाम चांगली ध्यानांत ठेवली पाहिजे. कारण या गोष्टीमध्येंच हिंदु आणि मुसलमान जमातींमधील तेढीचें मूळ आहे.

याच प्रकारें उच्च वर्णीय हिंदू, विशेषतः दक्षिण हिंदुस्थानमध्यें, अस्पृश्य म्हटल्या जाणाऱ्या समाजाची पिळणूक, गांजणूक करीत असत. यांच्यांपैकीं पुष्कळसे लोक शेतीवर मजुरी करणारेच असत. हा अस्पृश्यांचा प्रश्न अलीकडे आपल्यापुढें बराच आलेला आहे. बापूंच्या उपासापासून तर विशेषच. या अस्पृश्यतेवर आज देशांत चोहोंकडून हल्ला होत आहे. शेंकडों मंदिरें आणि इतर स्थानें त्यांच्यासाठी खुलीं करण्यांत आलीं आहेत; पण खरोखर याही प्रश्नाच्या अगदीं मुळाशीं ही आर्थिक पिळणूक आहे. जोंपर्यंत ती चालू आहे तोंपर्यंत अस्पृश्य समाज हा आजच्यासारखाच दलित राहणार. हे अस्पृश्य लोक म्हणजे आपल्याकडील एक प्रकारचे भूदासच आहेत यांना पूर्वी स्वतःच्या मालकीची जमीन करण्याला अधिकार नसे. याशिवायही कांहीं सामाजिक बंधनें आणि उणेपणाचे प्रकार त्यांच्या बाबतींत असत.

सामान्य दृष्टीनें पाहतां सबंध हिंदुस्थान देश आणि त्यामधील सामान्य जनता ही जरी दिवसेंदिवस अधिकाधिक दरिद्री होत जात होती, तरी हे जे मूठभर धनिक मध्यमवर्गीय होते त्यांची मात्र चांगली चलती चालू होती. कारण देशाची जी पिळणूक चाललेली होती तिच्यांतून त्यांच्या खिशांत थोडी थोडी भरती होत होती. त्यामुळें वकील आणि इतर बुद्धिजीवी लोक व व्यापारी यांच्याजवळ थोडाफार पैसा जमूं

लागला. या पैशावर चांगलें व्याज पडावें म्हणून त्याना कोठें तरी तो गुंतवायला हवा होता; म्हणून त्यांच्यापैकीं पुष्कळांनीं दरिद्रावस्थेला पोंचलेल्या जमीनदारांकडून शेत-जमिनी विकत घेतल्या आणि त्यांच्या जागीं ते आपण स्वतःच जमीनदार होऊन बसले. दुसऱ्या कांहीं लोकांचे डोळे उद्योगधंद्यांमधील इंग्रजांची प्रचंड भरभराट पाहून दिपलेले होते. तेव्हां त्यांनीं हिंदुस्थानमध्यें कारखाने उभारण्याकडे पैसा घालण्याचा विचार केला. अशा रीतीनें हिंदी भांडवल या मोठ्या यांत्रिक कारखान्यांच्या कामीं उपयोगांत आलें आणि हिंदी औद्योगिक भांडवलदारवर्ग निर्माण झाला. या गोष्टीची सुरुवात सुमारें पन्नास वर्षांपूर्वी १८८० सालानंतर झाली.

ही धनिकशाही जशी वाढत गेली तसतसा तिचा लोभही वाढत चालला. खूप व्याप वाढवावा, जास्त जास्त संपत्ति मिळवावी, सरकारी नोकऱ्यांमध्यें अधिकाधिक प्रवेश व्हावा, कारखाने सुरू करण्यासाठीं अधिकाधिक सवलती मिळाव्या अशी त्यांची खटपट चालू होती; पण या बाबतींत प्रत्येक पावलागणिक ब्रिटिश लोक आड येतात असें त्यांना आढळून आलें. सरकारी नोकरींतील सर्वच जागा ब्रिटिश लोकांनीं बळकावलेल्या होत्या. उद्योगधंदे, कारखाने जे कांहीं होते, ते सर्व ब्रिटिश लोकांच्या फायद्यासाठीं चाललेले होते. त्यामुळें या प्रकाराविरुद्ध या धनिक मध्यमवर्गानें चळवळ करण्यास सुरुवात केली. आपल्या देशांतील नवीन राष्ट्रीय चळवळीचें मूळ हें असें आहे. १८५७ च्या बंडाचा अत्यंत क्रूरपणें बीमोड करण्यांत आला, तेव्हां लोकांचा धीर इतका खचून गेला होता, कीं मग कसलाही प्रचार किंवा चढाऊ चळवळ करण्याची ताकद त्यांच्या ठिकाणीं उरलेली नव्हती. अशा प्रकारच्या चळवळीची थोडीशी धुगधुगी त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होण्यालासुद्धां मध्यें बराचसा काळ जावा लागला.

या राष्ट्रीय कल्पनांचा लौकरच प्रसार होऊं लागला. या बाबतींत पुढारीपण बंगालनें स्वीकारलें. बंगाली भाषेंत नवीन ग्रंथरचना होऊं लागली. या ग्रंथांचा जसा बंगाली भाषेवर पुष्कळ मोठा परिणाम झाला, त्याचप्रमाणें बंगालमधील राष्ट्रीयत्वाच्या वाढीलाही त्यांचा फार उपयोग झाला. या ग्रंथांपैकींच एकामध्यें, बंकिमचंद्रांच्या आनंदमठ या कादंबरीमध्यें आपलें सुप्रसिद्ध **वन्दे मातरम्** हें गीत आहे. 'नीलदर्पण' अथवा 'निळीचा आरसा' या बंगाली काव्यानें तर बंगालमध्यें मोठी खळबळ उडवून दिली. मळेवाल्यांच्या जमीन-लागणीच्या पद्धतींत बंगाली शेतकरीवर्गाला ज्या हाल-अपेष्टा सोसाव्या लागत होत्या म्हणून नुकतेंच एका पत्रांत मीं तुला सांगितलें, त्या-संबंधींची मोठी हृदयद्रावक हकिकत या काव्यांत वर्णन केलेली आहे.

दरम्यान इकडे हिंदी भांडवलशाहीची शक्तीही वाढत्या प्रमाणांत होती. तिलाही थोडी हातपाय पसरायला आजूबाजूला जागा हवी होती. म्हणून अखेरीस १८८५ मध्यें नवीन मध्यमवर्गामधील या सगळ्या निरनिराळ्या घटकांनीं आपल्या उद्दिष्टाची मागणी व प्रचार करण्यासाठीं एक संस्था काढण्याचें ठरविलें

आणि अशा रीतीनें १८८५ सालीं हिंदी राष्ट्रीय सभेची प्रस्थापना झाली. ही संस्था आतां अलीकडच्या काळांत, गेल्या कांहीं वर्षांत फार मोठी आणि सामर्थ्यवान् झाली असून हिंदुस्थानांतल्या तुझ्यासारख्या प्रत्येक लहान मुलांमुलींनाही ती माहीत झालेली आहे. या कॉंग्रेसनें जनतेची बाजू उचलून धरली आणि कांहीं अंशीं या जनतेची ती लढाऊ, पुढारी, नायक बनली. ब्रिटिशांच्या या देशांतील सत्तेचा मूळ पायाच उखडण्यासाठीं ही संस्था छाती ठोकून उभी राहिली आणि या सत्तेविरुद्ध मोठमोठ्या चळवळी तिनें चालविल्या. तिनें स्वातंत्र्याचें निशाण उभारलें आणि त्यासाठीं मोठ्या शौर्यानें तिनें लढा केला. आजही तो लढा तिनें चालविलेलाच आहे; पण हा सगळा पुढचा इतिहास आहे. ही राष्ट्रीय सभा प्रथम जेव्हां स्थापन झाली, तेव्हां ती एक अतिशय मवाळ आणि भित्री अशी संस्था होती. ब्रिटिशांशीं राजनिष्ठा व्यक्त करून त्यांच्यापाशीं मोठ्या नम्रपणानें कांहीं छोट्याछोट्या सुधारणांची याचना ही संस्था करीत असे. धनिक मध्यमवर्गाची प्रतिनिधि अशी ही संस्था होती. मध्यम वर्गांतील गरीब लोकांचासुद्धां तिच्यामध्यें समावेश नव्हता. सामान्य जनतेचा, शेतकऱ्यांचा आणि कामगारांचा तर तिच्याशीं दुरूनसुद्धां कांहीं संबंध नव्हता. मुख्यतः इंग्रजी शिकलेल्या लोकांचें तें एक चळवळीचें साधन होतें आणि या सावत्र मायभाषेंतच–इंग्रजींतच–या संस्थेचें सगळें काम चाले. जमीनदार लोक, भांडवलदार लोक आणि नोकऱ्या मिळविण्यासाठीं धडपडणारे सुशिक्षित लोक यांच्या ज्या मागण्या होत्या, त्याच ह्या राष्ट्रीय सभेच्या मागण्या असावयाच्या. गरीब लोकांना भरडून काढणारें दारिद्र्य किंवा त्यांच्या गरजा यांकडे क्वचितच या संस्थेचें लक्ष असावयाचें. या वेळची त्यांची एक मागणी म्हणजे नोकऱ्यांचें हिंदीकरण अशी असे. हिचा अर्थ काय, तर इंग्रज माणसांच्याऐवजीं सरकारी नोकरींत अधिकाधिक हिंदी लोकांचा भरणा व्हावा. हिंदुस्थानचें खरें दुखणें कोणतें असेल, तर या ठिकाणीं नवीन प्रस्थापित झालेलें राज्ययंत्र होय. तें यंत्र चालविण्याचें काम हिंदी किंवा परकीय अशा कोणीही केलें, तरी त्याचा त्या वेळीं होत होता तोच परिणाम पुढें होत राहणार ही गोष्ट कांहीं या संस्थेच्या त्या वेळीं लक्षांत आलेली नव्हती. कॉंग्रेसची आणखी एक तक्रार अशी होती, कीं लष्करांतील आणि इतरही नोकऱ्यांमधील इंग्रज अधिकाऱ्यांवर खर्च फारच प्रचंड होतो; त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतून सोनें व चांदी यांचा ओघ–गळती–सारखा इंग्लंडमध्यें वाहतो आहे अशीही आणखी एक तक्रार कॉंग्रेसची होती.

सुरुवातीच्या काळीं कॉंग्रेस ही मवाळवृत्तीची कशी होती हें जें वर्णन मी करतों आहें, त्यांत कॉंग्रेसवर टीका करण्याचा किंवा तिचा कमीपणा दाखविण्याचा माझा हेतु आहे, अशी समजूत करून घेऊं नकोस. तसा माझा हेतु नाहीं. कारण त्या काळच्या कॉंग्रेसनें आणि तिच्या पुढाऱ्यांनीं मोठें काम केलें अशीच माझी श्रद्धा आहे. पुढें पुढें हिंदी राजकारणांतील कठोर वस्तुस्थितीमुळेंच जवळजवळ नाइलाजानें क्रमाक्रमानें अधिकाधिक तीव्र आणि जहाल अशी भूमिका कॉंग्रेसला पत्करीत जावें लागलें;

परंतु प्रारंभींच्या काळांत तिचें जें स्वरूप होतें त्याहून निराळें स्वरूप तिला येणेंच शक्य नव्हतें. त्या काळांत काँग्रेसच्या प्रवर्तकांनीं जें पाऊल पुढें टाकलें, तेवढेंच टाकावयालासुद्धां केवढ्या मोठ्या धैर्याची आवश्यकता होती! सारा लोकसमाज आपल्या पाठीशीं उभा राहून आपली वाहवा करायला तयार असतांना मोठ्या धीटपणानें स्वातंत्र्याच्या गप्पा मारण्याचें काम सोपें आहे; परंतु कोणत्याही मोठ्या कार्याची मुहूर्तमेढ रोवून त्याची प्रारंभींच्या काळांत जोपासना करणें, पहिला प्रवर्तक होणें हें फार कठिण काम आहे.

राष्ट्रीय सभेचें पहिलें अधिवेशन १८८५ मध्यें मुंबई येथें भरलें. उमेशचंद्र बानर्जी हे बंगाली गृहस्थ तिचे पहिले अध्यक्ष. त्या काळचे इतर प्रमुख गृहस्थ म्हणजे सुरेंद्रनाथ बानर्जी, बद्रुद्दीन तय्यबजी, फेरोजशहा मेथा हे होत. पण या सर्वांत मेरुमणी म्हणून चमकणारें नांव म्हणजे दादाभाई नौरोजींचें. यांना हिंदुस्थानचे 'ग्रँड ओल्ड मॅन' म्हणजे आजोबा, पितामह म्हणतात. यानींच प्रथम हिंदुस्थानचें ध्येय म्हणून "स्वराज्य" हा शब्द उच्चारला. आणखी एक नांव सांगणार आहें मी तुला. त्या काळच्या काँग्रेसच्या पाइकांपैकीं आज हे गृहस्थ एकटेच हयात आहेत. तुझी त्यांची चांगलीच ओळख आहे. ते म्हणजे पंडित मदन मोहन मालवीय. पन्नासांहून अधिक वर्षें देशकार्यासाठीं ते परिश्रम करीत आलेले आहेत आणि आतां उतारवयामुळें आणि काळजीमुळें शरीर विव्हल झालेलें असतांही, तरुणपणीं त्यांनीं हिंदुस्थानच्या भवितव्याचें जें गोड स्वप्न अनुभवलें, तें स्वप्न सत्यसृष्टींत यावें म्हणून आजही त्यांची धडपड चालू आहे.

काँग्रेसचीं हीं अधिवेशनें अशींच दरसाल होत गेलीं आणि तिची शक्ति वाढत चालली. तिच्या पूर्वीच्या हिंदू राष्ट्रवादाप्रमाणें हिंदी राष्ट्रसभेला कोणत्याही एका विशिष्ट गटाची उठावणी करण्याचें संकुचित कार्य करावयाचें नव्हतें. तरी पण ही संस्था मुख्यतः हिंदु लोकांचीच होती. कांहीं प्रमुख मुसलमान तिला मिळालेले होते; कांहीं कांहीं जण तर तिचे अध्यक्षही झाले; परंतु सामान्यतः मुसलमान समाज पाहिला, तर तो तिच्यापासून अलिप्तच राहिला. त्या काळचे एक श्रेष्ठ मुसलमान पुढारी म्हणजे सर सुलतान अहमद हे होत. शिक्षणाच्या अभावामुळें, विशेषतः आधुनिक शिक्षणाच्या अभावामुळें मुसलमान समाजाचें फार मोठें अहित झालें, त्यामुळेंच हा समाज मागें पडलेला आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली होती. त्यामुळेंच मुसलमान समाजानें राजकारणांत लुडबूड करण्यापूर्वी त्यांनीं प्रथम या शिक्षणाचा स्वीकार केला पाहिजे आणि त्यावरच सगळा भर दिला पाहिजे, अशी मुसलमान समाजाची भूमिका बनविणें आपलें कर्तव्य आहे असें त्यांच्या मनानें घेतलें. म्हणून मुसलमानाना त्यांनीं काँग्रेसपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आणि सरकारशीं सहकार्य करून त्यांनीं अलिगढ येथें एक छानदार कॉलेज प्रस्थापित केलें. आज या कॉलेजांतूनच तेथें एक युनिव्हर्सिटी स्थापन झालेली आहे. मुसलमान समाजांतील फार मोठ्या बहुसंख्य लोकांनीं सर सुलतान

अहमद यांचा उपदेश ऐकला आणि ते काँग्रेसला मिळाले नाहींत. तरी पण मुसलमानांतील एक लहानसा अल्पसंख्य गट राष्ट्रसभेमध्यें प्रथमपासून राहत आलेला आहे. मात्र एक गोष्ट लक्षांत ठेव. मी जेव्हां हे बहुसंख्य आणि अल्पसंख्य असे शब्द वापरतों, तेव्हां त्याचा अर्थ मुसलमानांतील काय किंवा हिंदूंमधील काय, वरिष्ठ मध्यमवर्गांतील इंग्रजी शिकलेल्या लोकांमधील बहुसंख्य आणि अल्पसंख्य लोक असाच फक्त आहे. त्या दिवसांत सामान्य जनतेचा, मग ती हिंदु असो किंवा मुसलमान असो, काँग्रेसशीं कांहीं संबंध नव्हता. त्यांनीं तिचें नांवसुद्धां ऐकलेलें नव्हतें. फार कशाला? कनिष्ठ मध्यमवर्गावरसुद्धा काँग्रेसचा त्या काळीं तसा कांहीं परिणाम झालेला नव्हता.

काँग्रेसची वाढ तर होतच होती; परंतु तिच्यापेक्षांही राष्ट्रीयत्वाच्या कल्पना आणि स्वातंत्र्याची इच्छा यांची वाढ फारच जास्त वेगानें होत गेली. काँग्रेसच्या प्रचाराचा परिणाम होत होता तो अगदींच मर्यादित अशा क्षेत्रांत. ही गोष्ट अनिवार्यच होती. कारण काँग्रेसचा प्रचार फक्त इंग्रजी जाणणारांपुरताच होता. अर्थात् कांहीं अंशीं या प्रचारामुळें निरनिराळे प्रांत एकमेकांच्या अगदीं जवळ आले आणि त्या सगळ्यांची मिळून एक सामान्य भूमिकाही वृद्धिंगत झाली. परंतु या सगळ्या प्रचाराचा प्रवेश खोलवर सामान्य जनतेंत झालेला नसल्यामुळें त्यांच्यामध्यें किंवा काँग्रेसमध्यें अजून तसा म्हणण्यासारखा जोरदारपणा उत्पन्न होत नव्हता. मागच्या पत्रांत मीं तुला ज्या एका घटनेनें साऱ्या आशिया खंडांत खळबळ माजून गेली, त्या घटनेबद्दल सांगितलें आहे. ती घटना म्हणजे जपाननें १९०४–०५ मध्यें रशियासारख्या राक्षसी धुडाविरुद्ध मिळविलेला विजय. आशियांतील इतर देशांप्रमाणेंच हिंदुस्थानवरही या घटनेचा फार मोठा परिणाम झाला. हिंदुस्थानवर परिणाम झाला म्हणजे काय? तर तेथील सुशिक्षित मध्यमवर्गाच्या मनावर त्याचा विशेष परिणाम होऊन त्याचा आत्मविश्वास वाढला. यूरपांतल्या एका मोठ्या सामर्थ्यवान् राष्ट्रावर जर जपानसुद्धां कडी करूं शकतो, तर मग हिंदुस्थानलाच ती तशी कां करतां येणार नाहीं, असा विचार त्यांना सहजच स्फुरूं लागला. आतांपर्यंत हिंदी लोक ब्रिटिशांच्यापुढें आपण कांहींसे कमी आहोंत अशा भावनेनें वांकून वागत होते. ब्रिटिशांचें या देशावरील दीर्घकालीन प्रभुत्व आणि १८५७ सालचें बंड मोडून काढतांना इंग्रजांनीं केलेला निर्दयपणा यांमुळें हिंदी लोक अगदींच भेदरून गेले होते, निर्मांल्यवत् झालेले होते. हत्याराचा कायदा करून या लोकांना हत्यारेंही वापरण्याची बंदी करण्यांत आलेली होती. हिंदुस्थानांत घडणाऱ्या एकूण एक गोष्टींमध्यें हिंदी लोक हे जित लोक आहेत, सामाजिक दृष्ट्या कमी दर्जाचे लोक आहेत, असाच धक्का त्यांना नित्य बसत होता. त्यांना जें शिक्षण देण्यांत येत होतें त्यामधूनसुद्धां त्यांच्या मनांवर स्वतःच्या हीनपणाची ही भावना बिंबविली जात होती. त्यांना जो इतिहास शिकविला जाई, तो सगळा खोटा आणि विपरीत अशा स्वरूपाच्या असे. त्यातून त्यांना शिकवण्यांत येई, कीं हिंदुस्थानदेशांत

नेहमींच अराजकता माजून राहिलेली होती. हिंदू आणि मुसलमान हे नित्य एकमेकांचे गळे कापीत होते. शेवटीं ब्रिटिश लोक आले तेव्हां त्यांनीं या देशाची या दीन दशेमधून सुटका केली आणि या देशाला शांतता आणि उत्कर्ष यांची जोड करून दिली. एवढेंच नव्हे, तर वस्तुस्थिति किंवा इतिहास यांची कांहींच फिकीर न बाळगतां हे यूरपीय लोक मानीत आणि जगाला जाहीरही करीत, कीं सगळेंच आशिया खंड म्हणजे अगदींच मागासलेलें आणि म्हणून तें यूरपीय लोकांच्या वर्चस्वाखालींच राहिलें पाहिजे.

यामुळें जपानचा हा विजय म्हणजे साऱ्या आशिया खंडांत एक प्रकारच्या उत्साहजनक पेयासारखा झाला. आमच्याकडील बहुतेक साऱ्या लोकांच्या अंतःकरणांत स्वतःच्या कर्मीपणाबद्दलची भावना जी ठार्णे देऊन राहिलेली होती, ती यामुळें कमी झाली. साऱ्याच हिंदुस्थानांत, विशेषतः बंगाल आणि महाराष्ट्र या प्रांतांत, राष्ट्रीय कल्पनांचा प्रसार यानंतर फारच झपाट्यानें झाला. याच सुमारास हिंदुस्थानांत अशी एक घटना घडून आली, कीं तिच्यामुळें सारा बंगाल प्रांत खालपासून वरपर्यंत उसळून उठला आणि हिंदुस्थानांतही सर्वत्र खळबळ माजली. ब्रिटिश सरकारनें त्या वेळचा मोठाथोरला बंगाल ( त्या वेळीं बिहार प्रांत बंगालमध्यें होता ) विभागून त्याचे दोन प्रांत केले आणि त्यांपैकीं एकाला पूर्व बंगाल हें नाव दिलें. बंगालमध्यें या वेळीं धनिकवर्गामध्यें जो राष्ट्रवाद निर्माण झालेला होता त्याच्या दृष्टीनें त्यांना ही विभागणी बिलकुल मान्य नव्हती. त्यांचा तिला तीव्र विरोध निर्माण झाला. अशा रीतीनें आपल्या प्रांताचे दोन भाग करून आपली शक्ति कमी करण्याचा ब्रिटिश सरकारचा डाव आहे असा त्यांना संशय वाटला. पूर्व बंगालमध्यें बहुसंख्य लोक मुसलमान होते. तेव्हां या विभागणीमुळें हिंदु-मुसलमानांचा प्रश्नही उपस्थित झाला. यांतून ब्रिटिशविरोधी अशी एक चळवळ बंगालमध्यें उभी राहिली. या चळवळींत बहुतेक सारे जमीनदार सामील झाले. त्याचप्रमाणें हिंदी भांडवलदारही तींत मिळाले. स्वदेशीची घोषणा प्रथम या चळवळींत करण्यात आली. त्याचप्रमाणें ब्रिटिश मालावरच्या बहिष्काराचीही घोषणा करण्यांत आली. या गोष्टीचा हिंदी उद्योगधंदे आणि भांडवलदार यांना अर्थातच उपयोग झाला. ही चळवळ कांहीं अंशीं सामान्य जनतेपर्यंत जाऊन पोंचली; काहीं अंशीं हिंदु धर्माच्या संघटनेंतूनही या चळवळीला स्फूर्ति मिळाली. या चळवळीच्या जोडीनेंच बंगालमध्यें अत्याचारी चळवळीचा एक प्रवाह सुरू झाला आणि हिंदी राजकारणांत बाँबनें प्रथम प्रवेश केला. बंगालच्या फाळणीविरुद्ध झालेल्या चळवळींत अरविंद घोष हे एक तेजस्वी नेते होते. परंतु आज पुष्कळ वर्षे पांडेचरी येथें ते एकांतवासांत काळ घालवीत आहेत. पांडेचरी हें हिंदुस्थानांतलें फ्रेंचांचें ठिकाण आहे.

पश्चिम हिंदुस्थानमध्यें महाराष्ट्र प्रांतांतही या वेळीं पुष्कळच खळबळ माजली होती आणि चढाऊ राष्ट्रवादाचें पुनरुज्जीवन झालें होतें. अर्थात् त्यातही हिंदुत्वा-

भिमानाची छटा थोडीशी होतीच. त्या ठिकाणीं एक महान् पुढारी उदयास आले. ते म्हणजे बाळ गंगाधर टिळक. सारें हिंदुस्थान त्यांना 'लोकमान्य' या नांवानें ओळखतें. टिळक हे फार विद्वान् गृहस्थ होते. ते पूर्वेकडील प्राचीन ज्ञान आणि पश्चिमेकडील आधुनिक ज्ञान या दोहोंतही पारंगत असे गृहस्थ होते. टिळक हे महान् राजकारणी पुरुषही होते; पण त्याहूनही विशेष म्हणजे ते एक श्रेष्ठ दर्जाचे जनतेचे नेते होते. आतांपर्यंतचे हिंदी राष्ट्रीय सभेचे पुढारी प्रचार करीत तो फक्त इंग्रजी शिकलेल्या हिंदी लोकांमध्यें; सामान्य जनतेला त्यांची जवळजवळ ओळख-सुद्धां नव्हती. आधुनिक भारतांतील टिळक हेच पहिले पुढारी असे, कीं जे जनतेंत जाऊन पोहोंचले आणि त्या जनतेंतूनच त्यांनीं आपल्या ठिकाणीं शक्तीचा झरा निर्माण केला. त्याच्या ठिकाणच्या दुर्दम्य आणि चढाऊखोर अशा वीरवृत्तीमुळें हिंदी राजकारणामध्यें एक प्रकारची नवीनच शक्ति आणि दुर्दम्य धैर्य हीं निर्माण झालीं आणि त्यांतच बंगालमधील नवीन राष्ट्रीय आणि त्यागाच्या वृत्तीची भर पडून हिंदी राजकारणाचें सारें स्वरूपच पालटून गेलें.

या १९०६ आणि १९०७-०८ सालच्या खळबळीच्या काळांत हिंदी राष्ट्रीय सभा काय बरें करीत होती? राष्ट्रीय भावनेच्या जागृतीच्या या काळांत कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनीं राष्ट्राचें नेतृत्व केलें नाहीं. त्याऐवजीं ते बाजूला नुसते बघतच राहिले. त्यांनीं पाय मागें घेतला. त्यांना संवय होती याहून थंड अशा राजकारणाची; त्यांच्या राजकारणामध्यें सामान्य जनतेची लुडबूड नव्हती. बंगालमधील हा प्रज्वलित उत्साहाचा भर त्यांना रुचण्यासारखा नव्हता आणि टिळकांच्या रूपानें मूर्तिमंत पुढें उभें राहिलेलें महाराष्ट्राचें हें दुर्दम्य तेजही त्यांच्या प्रवृत्तीला मानवण्यासारखें नव्हतें. स्वदेशीची हे लोक स्तुति करीत; परंतु ब्रिटिश मालाच्या बहिष्काराला मान्यता देण्याला कांकूं करीत. तेव्हांपासून कॉंग्रेसमध्यें दोन पक्ष निर्माण झाले. एक टिळक आणि बंगालमधील कांहीं पुढारी यांचा आणि एक कॉंग्रेसमधील जुन्या पुढाऱ्यांचा. तथापि जुन्या कॉंग्रेसवाल्याच्या मवाळपक्षाचे पुढारी जे गृहस्थ होते, ते मात्र एक अगदींच तरुण गृहस्थ होते. ते म्हणजे गोपाल कृष्ण गोखले. हे एक मोठे कर्तबगार गृहस्थ असून त्यांनीं आपलें सर्व आयुष्य देशसेवेसाठीं वाहिलेलें होतें. गोखले हेही महाराष्ट्रीयच होते. आपापल्या पक्षांतर्फे टिळक आणि गोखले एक-मेकांचे प्रतिस्पर्धी म्हणून नांदूं लागले. शेवटीं याचा जो अपरिहार्य तोच परिणाम झाला आणि १९०७ मध्यें कॉंग्रेस दुभंगली. कॉंग्रेसचा ताबा मवाळांच्या हातांमध्येंच राहिला; जहाल लोक तिच्यांतून हांकलले गेले. कॉंग्रेसमध्यें मवाळांचा जय झाला खरा; परंतु त्यासाठीं त्यांना लोकांमधील प्रेमाला मात्र मुकावें लागलें. कारण लोकांना टिळकांचाच पक्ष अधिक प्रिय वाटत होता. यामुळें कॉंग्रेसचा जोर कमी झाला आणि पुढें कांहीं वर्षें तिला विशेष असें कांहींच महत्त्व राहिलें नाहीं.

आणि या सगळ्या काळात सरकार काय करीत होतें? हिंदी राष्ट्रवादाच्या

उदयाचा सरकारावर काय परिणाम झाला? आपल्याला नको असलेला मुद्दा किंवा मागणी यांच्यावर राज्यकर्त्यांपाशीं फक्त एकच उत्तर असतें; तें म्हणजे दंडा. त्यामुळें येथील सरकारनें भरपूर जुलूम-जबरदस्तीचा खेळ सुरू केला. लोकांना तुरुंगांत डांबलें, कायदे करून वर्तमानपत्रांची मुस्कटदाची केली आणि आपल्याला आवडत नाहीं अशा माणसांच्या हालचालीवर पाळत ठेवण्यासाठीं गुप्तपोलिसांचे आणि हेरांचे तांडेच्या तांडे उभे केले. या काळापासून सी. आय्. डी. मधील माणसें म्हणजे प्रमुख हिंदी नेत्यांचीं कायमचीं सोबती बनलेलीं आहेत. बंगालच्या पुष्कळशा पुढाऱ्यांना कैदेची शिक्षा झाली. या वेळच्या खटल्यांतील सर्वांत महत्त्वाचा आणि गाजलेला खटला म्हणजे लोकमान्य टिळकांचा! त्यांत त्यांना सहा वर्षांची कैदेची शिक्षा झाली. या आपल्या कारागृहवासांत त्यांनीं गीता-रहस्य हा एक सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला. याच वेळीं लाला लजपतराय यांनाही ब्रह्मदेशांत हद्दपार करण्यांत आलें.

पण दडपशाहीनें बंगाल प्रांताला नामोहरम करतां आलें नाहीं. तेव्हां देशांतील कांहीं थोड्या लोकांना तरी खूष करावें, या बुद्धीनें घाईघाईनें राजकीय सुधारणांचा एक कायदा पास करण्यात आला. तेव्हांपासून आतांपर्यंत एकच एक धोरण अनुसरलें जात आहे. तें म्हणजे राष्ट्राभिमानी लोकांत फूट पाडावयाची. मवाळ लोकांना आपल्या बाजूला वळवावयाचें आणि जहालांना दडपून किंवा चिरडून टाकावयाचें. म्हणून १९०८ सालीं मोर्ले-मिंटो सुधारणा म्हणून प्रसिद्ध असलेल्या राजकीय सुधारणा जाहीर करण्यांत आल्या. त्यामुळें मवाळ लोक खूष झाले आणि त्यांना आपल्याकडे वळविण्यांत सरकारला यश आलें. जहालांचे पुढारी तुरुंगांत होते; त्यामुळें त्या पक्षाची दाणादाण आणि पांगापांग झालेली होती आणि राष्ट्रीय चळवळ कमजोर झालेली होती. बंगालमध्यें मात्र फाळणीविरुद्ध चळवळ चालूच राहिली आणि शेवटीं ती यशस्वी ठरली. १९११ सालीं ब्रिटिश सरकारनें बंगालची फाळणी रद्द केली. या यशामुळें बंगाली लोकांमध्यें आणखीच उत्साह उत्पन्न झाला; परंतु १९०७ च्या चळवळींतला जोम आतां नाहींसा झालेला होता आणि हिंदुस्थानमध्यें आतां एक प्रकारची राजकीय अनास्था नांदूं लागली होती.

१९११ सालामध्येंच दिल्ली ही हिंदुस्थानची राजधानी म्हणून जाहीर करण्यांत आली. याच दिल्लीशहरांत किती तरी साम्राज्यांचीं सिंहासनें नांदत आलीं आणि कित्येकांचें दहन वा दफन याच दिल्ली शहरांत झालेलें आहे.

१९१४ सालीं यूरपांत महायुद्ध पेटलें आणि हें शंभर वर्षांचें एक युग संपलें. त्या वेळीं हिंदुस्थानची अवस्था ही अशी होती. या महायुद्धाचाही हिंदुस्थानवर फारच प्रचंड परिणाम झाला; पण त्यासंबंधीं पुढें केव्हां तरी बोलायला हवें मला.

अशा रीतीनें इतक्या पत्रांनंतर कां होईना, एकोणिसाव्या शतकांतील हिंदुस्थानच्या हकिकतीच्या अखेरीला मी येऊन पोंचलों आहें. तेव्हां आतां थोडा वेळ हिंदुस्थानला सोडून आपण पुढच्या पत्रांत चीनमध्यें गेलें पाहिजे आणि साम्राज्यशाही पिळणुकीचा आणखी एक नमुना पाहिला पाहिजे.

## ११४

# ब्रिटन चीनच्या गळ्यांत अफू बांधतें

*१४ डिसेंबर, १९३२*

औद्योगिक क्रांति आणि यांत्रिक क्रांति यांचे हिंदुस्थानवर कोणकोणते परिणाम झाले आणि त्यांमुळें हिंदुस्थानांत साम्राज्यशाहीचें कार्य कशा रीतीनें घडत गेलें, यासंबंधीं आतांपर्यंत पुष्कळच विस्तारानें मीं तुला सांगितलें. मी हिंदी असल्यानें हिंदी पक्षाचा मी अभिमानी आहें आणि म्हणून थोडीशी पक्षपाती अशी माझी भूमिका झाली असणें अनिवार्य आहे, असें मला वाटतें. तथापि या सर्व प्रश्नांचा विचार, शास्त्रज्ञ आपल्यापुढील गोष्टींचा जसा अगदीं निःपक्षपातीपणें विचार करतो, त्याप्रमाणेंच आपण करावा, केवळ आपलीच बाजू खरी आहे असें समर्थन करणाऱ्या राष्ट्रवादी माणसाप्रमाणें करूं नये, असा प्रयत्न मात्र मी करीत आलों आहें आणि तूंही असाच प्रयत्न करावास असें मला वाटतें. कांहीं विशिष्ट प्रसंगीं राष्ट्रवादाचाही अर्थात् फार उपयोग आहे; परंतु नेहमींचा सोबती म्हणून तो पत्करल्यास फसगत होण्याचा संभव आहे; आणि इतिहासकाराची भूमिका राष्ट्रवादाला देणें तर धोक्याचेंच आहे. राष्ट्रवादामुळें पुष्कळशा गोष्टी आपल्याला दिसेनाशाच होतात; सत्याचा अपलाप होतो; प्रश्न जेव्हां आपल्या स्वतःचा किंवा आपल्या स्वतःच्या देशाचा असेल तेव्हां तर असें विशेषच होतें. म्हणून हिंदुस्थानच्या अलीकडच्या इतिहासाचा विचार करतांना आपण सावध राहिलें पाहिजे. नाहीं तर आपल्या सगळ्या दुर्दशेचें खापर आपण ब्रिटिशांच्या माथ्यावर फोडून मोकळें होण्याची भीति आहे.

ब्रिटनमधील भांडवलदारांनीं आणि कारखानदारांनीं एकोणिसाव्या शतकांत हिंदुस्थानची पिळणूक कशी केली हें आतांपर्यंत आपण पाहिलें. आतां आपण आशिया खंडांतील दुसऱ्या एका मोठ्या देशांत जाऊं या. हा देश म्हणजे हिंदुस्थानचा प्राचीन काळापासून मित्र आणि सगळ्या जगाचा जणुं दादा, असा चीन देश. या देशांत पश्चिमेकडील साम्राज्यशाही पिळणुकीची एक निराळीच तऱ्हा आढळून येईल. हिंदुस्थानाप्रमाणें चीनमध्यें कोणाही यूरपियन राष्ट्राची वसाहत किंवा राजकीय वर्चस्व प्रस्थापित झालें नाहीं. या देशांत एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत सगळ्या देशाला एकत्र ठेवून सांभाळण्याला पुरेसें समर्थ असें एक मध्यवर्ती राज्ययंत्र होतें. त्यामुळें वरच्यासारख्या संकटांतून चीन देश निभावला होता. हिंदुस्थानांत याच्यापूर्वीच शंभर वर्षें मोंगलांच्या साम्राज्याचा ऱ्हास झाला होता आणि त्यामुळें साऱ्या देशात फाटाफूट आणि अव्यवस्था माजून राहिलेली होती. एकोणिसाव्या शतकांत चीनचेंही सामर्थ्य कमी होत गेलें; परंतु तरीही अखेरपर्यंत चीननें कसाबसा टिकाव धरला. त्यांतच परकी

राज्यांच्या आपसांतील चुरशीमुळें त्यांच्यापैकीं कोणालाही एकाला चीनच्या दुर्बलतेचा फायदा घेतां आला नाहीं.

चीनसंबंधींच्या माझ्या यापूर्वीच्या पत्रांत (९४ वें पत्र) मीं तुला ब्रिटिश लोकांनीं चीनमध्यें आपला व्यापार वाढविण्याचा प्रयत्न कसा केला हें सांगितलें. इंग्लंडचा राजा तिसरा जॉर्ज यानें लिहिलेल्या पत्राला उत्तर म्हणून मांचू घराण्यांतील चीनचा बादशहा चीन लुंग यानें जें मोठें बडेजावीचें आणि चार उपदेशाच्या गोष्टी सांगण्याचा आव असलेलें असें पत्र लिहिलें, त्यांतील एक मोठा उताराही मीं तुला दिला. ही हकिकत इ. स. १७९२ सालची. हें साल पाहतांच त्या वेळीं यूरपमध्यें चाललेल्या भयंकर धामधुमीच्या तुफानी काळाची तुला आठवण होईल. कारण हा फ्रेंच राज्यक्रांतीचा काळ होता. त्यानंतर नेपोलियन आला आणि त्याच्या त्या लढाया झाल्या. या सर्व काळामध्यें इंग्लंडचे हात सर्वस्वीं त्या बाजूला गुंतले होते. इंग्लंड त्या काळांत नेपोलियनशीं मोठ्या हिरीरीनें लढण्यांत गुंतलेलें होतें. त्यामुळें नेपोलियनचा पाडाव होऊन इंग्लंडला जरा शांतपणें श्वास घ्यायला फुरसत मिळेपर्यंत चीनमधील व्यापार वाढविण्याच्या कामाकडे इंग्लंडचें लक्ष जाणेंच शक्य नव्हतें. त्यानंतर मात्र लगेच १८१६ मध्यें आणखी एक ब्रिटिश वकीलमंडळ चीनमध्यें पाठविण्यांत आलें. परंतु चीनमध्यें गेल्यानंतर या वकीलमंडळानें जे कांहीं शिष्टाचार पाळणें चीन देशाच्या रिवाजाप्रमाणें आवश्यक होते, ते शिष्टाचार पाळण्याच्या बाबतींत कांहीं तरी मानगड होऊन चीनच्या बादशहानें ब्रिटिशांचा वकील लॉर्ड ॲम्हर्स्ट याची भेट घेण्याचें नाकारलें आणि त्याला परत जाण्याचा हुकूम केला. या शिष्टाचाराला तिकडे कोटो म्हणतात. जमिनीवर साष्टांग नमस्कार घालण्यासारखा कांहींसा हा प्रकार आहे. त्यावरून तयार झालेला इंग्रजींतला कोटोइंग म्हणजे कोटो करणें हा शब्द तुझ्या कानांवर कदाचित् आलेला असेल.

त्यामुळें त्या वेळींही कांहींच पुढें पाऊल पडलें नाहीं. दरम्यान चीनमध्यें एक नवीन व्यापार फार झपाट्यानें वाढत होता. हा व्यापार म्हणजे अफूचा व्यापार. या व्यापाराला नवीन व्यापार म्हणणें हें कांहीं तितकेंसें बरोबर नाहीं म्हणा; कारण हिंदुस्थानांतून चीनमध्यें अफूची आयात यापूर्वी किती तरी आधींपासून म्हणजे पंधराव्या शतकापासून सुरू झालेली होती. अफूशीच काय, दुसरे पुष्कळ चांगले पदार्थही हिंदुस्थानांतून चीनमध्यें पूर्वीपासून जात असत. अफू हा मात्र हिंदुस्थानांतील चीनमध्यें पाठविला जाणारा खरोखरीचा वाईट जिन्नस होता. परंतु हा जुना अफूचा व्यापार अगदींच मर्यादित स्वरूपाचा होता. एकोणिसाव्या शतकांत मात्र यूरपीय लोकांच्यामुळें, विशेषतः ईस्ट इंडिया कंपनीच्यामुळें, हा व्यापार वाढला. असें म्हणतात, कीं पूर्वेकडे राहणारे डच लोक हिंवतापाला प्रतिबंधक म्हणून ही अफू तंबाखूंत मिसळून मग ती तंबाखू ओढीत असत. त्यांच्यामार्फत अफू ओढण्याची पद्धति चीनमध्यें गेली; पण तेथें ही पद्धति आणखीच वाईट थराला गेली. कारण

चिनी लोक नुसती अफू ओढूं लागले. या संवयीचा लोकांवर फार वाईट परिणाम होत होता म्हणून आणि या अफूच्या व्यापारामुळें देशातून पैसा बाहेर जाई यासाठीं ही संवय बंद करावी असा चिनी सरकारचा विचार होता.

इ. स. १८०० सालीं चिनी सरकारनें एक आज्ञापत्र म्हणजे हुकूम काढून कोणत्याही कारणास्तव चीनमध्यें अफूची आयात करावयाची नाहीं असा निर्बंध घातला; परंतु परकी लोकांना तर या व्यापारापासून फारच मोठा फायदा होत होता. म्हणून चोरून चीनमध्यें अफू आणावयाची आणि तिकडे कानाडोळा करण्यासाठीं चिनी अधिकाऱ्यांना लांच द्यावयाची हा क्रम या व्यापाऱ्यांनीं चालू ठेवला. त्यावर चिनी सरकारनें नियम केला, कीं आपल्या अधिकाऱ्यांनीं कोणाही परदेशी व्यापाऱ्याची भेट घ्यावयाची नाहीं. त्याचप्रमाणें कोणाही परदेशी व्यापाऱ्याला चिनी किंवा मांचू भाषा शिकविणें या मोठा गुन्हा समजून त्याला फार कडक शिक्षा ठरविण्यांत आली. पण या सगळ्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अफूचा व्यापार चालूच राहिला आणि पूर्वीपेक्षांही अधिक प्रमाणावर प्रचंड लांचलुचपतीचे प्रकार चालू झाले. पुढें १८३४ सालीं ब्रिटिश सरकारनें ईस्ट इंडिया कंपनीची चीनच्या व्यापारासंबंधीं मक्तेदारी नष्ट केली आणि सर्वांना हें व्यापाराचें क्षेत्र खुलें केलें. त्यानंतर तर ही परिस्थिति अधिकच बिघडली.

यानंतर एकदम अफूचा चोरटा व्यापार पुष्कळच वाढला. तेव्हां हा चोरटा व्यापार बंद करून टाकण्यासाठीं कडक उपाययोजना करण्याचें चीनच्या सरकारनें ठरविलें. या कामावर त्यांनीं एका श्रेष्ठ मनुष्याची योजना केली. त्याचें नांव लिन-चे शी. चोरटा व्यापार दडपून टाकण्यासाठीं अधिकारी म्हणून याची नेमणूक करण्यांत आली. त्यानें मोठ्या उत्साहानें आणि झटपट उपाययोजना करण्यास सुरुवात केली. या सगळ्या बेकायदेशीर व्यापाराचें केंद्र चीनच्या दक्षिण किनाऱ्या-वरील कँटन हें बंदर होतें. त्या बंदरात तो गेला आणि तेथील परदेशी व्यापाऱ्यांना त्यानें त्यांच्या जवळचा असेल तो सगळा अफूचा सांठा सरकारच्या हवालीं करण्याचा हुकूम दिला. सुरुवातीला व्यापाऱ्यांनीं हा हुकूम मानण्याचें नाकारलें. त्यावर लीननें सक्तीनें त्यांना तो हुकूम पाळण्यास लावलें. त्यानें या व्यापाऱ्यांना त्यांच्या त्यांच्या वखारींत कोंडून ठेवून बाहेरच्या जगाशीं त्यांचा संबंध तोडून टाकला; त्यांचे जे चिनी कामगार आणि नौकर होते त्यांना तेथून पळवून लावलें आणि बाहेरून वखारींत अन्न मुळींच जाणार नाहीं अशी व्यवस्था केली. अशा रीतीनें लीनचा हा जोरदारपणा आणि तिळभर कोठें मोकळें न सोडण्याची त्याची वृत्ति पाहून हे सर्व व्यापारी लीनला शरण आले आणि त्यांनीं आपल्याजवळील अफूचीं २०,००० खोकीं त्याच्या हवालीं केलीं. ही एवढी प्रचंड अफू चीनमध्यें चोरून विकली जावयाची होती ही गोष्ट उघडच आहे. लीननें ती सगळीच्या सगळी अफू नष्ट करून टाकली आणि कोणत्याही जहाजाच्या कप्तानानें आपण बंदरांतून अफू आणणार नाहीं अशी हमी दिली तरच




त्याच्या जहाजाला कँटन बंदरांत प्रवेश करूं दिला जाईल, नाहीं तर नाहीं; कप्तानानें ही हमी जर मोडली तर चिनी सरकार असें जहाज त्यावरील सर्व मालासह जप्त करील, असेंही लीननें त्या परदेशी व्यापाऱ्यांना बजाविलें. अफू-अंमलदार लीन हा आपल्या कामांत एवढेंसें सुद्धां न्यून ठेवणारा मनुष्य नव्हता. आपल्यावर सोंपविलेलें काम त्यानें अगदीं चोखपणें पार पाडलें; परंतु त्याच गोष्टीचा मोठा कठिण परिणाम चीनला सोसावा लागणार होता हें त्या बिचाऱ्याला ठाऊक नव्हतें.

तो परिणाम म्हणजे हा : यांतून ब्रिटनशीं युद्ध उद्भवलें; त्यांत चीनचा पराभव झाला; चीनला ब्रिटनशीं अपमानास्पद तह करावा लागला आणि जी अफू आपल्या देशांत येऊं नये म्हणून चिनी सरकारची ही सगळी खटपट होती, ती अफू त्यांच्या घशांत कोंबण्यांत आली. चिनी लोकांमध्यें अफूचें व्यसन असणें घातक आहे कीं हिताचें आहे या गोष्टीला यामध्यें काडीचें महत्त्व देण्यांत आलें नाहीं. या बाबतींत

चीनच्या सरकारचा काय करण्याचा उद्देश होता याचीही फारशी फिकीर करण्यांत आली नाहीं. महत्त्व जें कांहीं होतें तें फक्त एका गोष्टीला; ती म्हणजे चीनमध्यें चोरून अफू आणून विकण्यापासून ब्रिटिश व्यापाऱ्यांचे खिसे चांगलेच गरम होत होते ही होय, आणि या आपल्या लोकांच्या उत्पन्नाचें नुकसान व्हावें ही गोष्ट सहन करावयाला ब्रिटन तयार नव्हतें. अफू-अंमलदार लीन यानें नष्ट केलेली बहुतेक सगळी अफू ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या मालकीची होती. म्हणून राष्ट्रीय इज्जतीच्या नांवावर ब्रिटननें १८४० सालीं चीनशीं युद्ध सुरू केलें. या युद्धाला इतिहासात 'अफूचें युद्ध' हें नांव दिलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. कारण हें युद्ध लढून, जिंकून ब्रिटननें मिळवलें काय, तर चीनच्या घशांत त्याच्या इच्छेविरुद्ध अफू कोंबण्याचा हक्क!

ब्रिटिशांच्या आरमारी काफिल्यांनीं या युद्धांत कँटन बंदराची आणि इतरही ठिकाणांची कोंडी केली. तिचा चीनला कांहींच प्रतिकार करतां आला नाहीं. दोन वर्षें लढल्यानंतर चीनला नमावें लागून १८४२ सालीं नॉनकिंग येथें ब्रिटनशीं तह करावा लागला. या तहाप्रमाणें परदेशीय व्यापारासाठीं चीनचीं पांच बंदरें खुलीं करण्यांत आलीं, परदेशीय व्यापार म्हणजे खरोखर मुख्यतः अफूचा व्यापार होता; हीं पांच बंदरें म्हणजे. कँटन, शांघाय, अमॉय, निंगपो आणि फूंचौ हीं होत. या बंदरांना पुढें ट्रीटी पोर्ट्स— तहांतील बंदरें–असें नाव पडलें. कँटनजवळच हांगकाँग हें एक छोटेंसें बेट आहे. त्याचाही ब्रिटननें या तहाप्रमाणें कबजा केला आणि नष्ट केलेल्या अफूबद्दल व चीनवर ब्रिटननेंच ही जी लढाई लादली तिच्या खर्चाबद्दल म्हणून चीनकडून भली मोठी रक्कमही या तहाप्रमाणें ब्रिटननें उकळली.

अशा रीतीनें ब्रिटननें अफूच्या बाबतींत विजय मिळविला. त्या वेळीं व्हिक्टोरिया राणीचें इंग्लंडमध्यें राज्य होतें. व्यक्तिशः तिच्याकडे एक खास खलिता लिहून चीनच्या बादशहानें अतिशय सौजन्यपूर्ण रीतीनें दाखविण्याचा यत्न केला, कीं हा जो अफूचा व्यापार चीनवर अशा रीतीनें लादण्यांत येतो आहे त्याचा चीनवर फारच भयंकर परिणाम होत आलेला आहे; परंतु व्हिक्टोरिया राणीनें या खलित्याला कांहींच उत्तर दिलें नाहीं. या बादशहाच्या मागचाच बादशहा चीन लुंग यानें अवघ्या पन्नास वर्षांपूर्वीच किती निराळ्या पद्धतीचें पत्र इंग्लंडच्या राजाला लिहिलें होतें!

अशा रीतीनें पश्चिमेकडील साम्राज्यशाही राष्ट्रांशीं कटकटी होण्याला सुरुवात झाली. आतांपर्यंत चीन देश जगाच्या या संघर्षापासून अलिप्त राहिला होता, तो काळ आतां संपला. आपल्या इच्छेविरुद्ध चीनला आता परदेशी व्यापाराचा स्वीकार करावा लागला; आणखी त्याच्या जोडीला ख्रिस्ती मिशनऱ्यांनाही आतां देशांत वाव द्यावा लागला. साम्राज्यशाहीच्या बिनीचें पथक या नात्यानें या मिशनरी लोकांनीं फारच महत्त्वाची कागगिरी बजावली. चीनला पुढल्या काळांत जे संकटाचे प्रसंग आले, त्या सर्वांच्या मुळाशीं या मिशनरी लोकांचें कांहीं ना कांहीं राजकारण होतेंच.

पुष्कळदां यांचें वर्तन अतिशय उर्मटपणाचें आणि चीड आणण्यासारखें, डोकें फिरवून टाकण्यासारखें असे. परंतु परदेशीयांवर चिनी न्यायकोर्टांत खटले करतां येत नव्हते; कारण नव्या तहांतील शर्तींप्रमाणें चिनी कायदा किंवा चिनी न्यायासन यांची त्यांच्यावर हुकमत चालत नव्हती. त्यांचे खटले फक्त त्यांच्या स्वतःच्याच कोर्टांत चालावयाचे. याच हक्काला आणि पद्धतीला प्रादेशिकातीतत्व (Extra Territoriality) असें म्हटलें जातें. आजही परदेशीयांचा हा हक्क त्या ठिकाणीं चालू असून चिनी लोकांना या गोष्टीबद्दल फारच संताप वाटत असतो. विशेष म्हणजे हे मिशनरी लोक ज्यांना बाटवीत, ते नवे ख्रिस्ती लोकही या प्रादेशिकातीतत्वाच्या हक्काबद्दल आपला अधिकार सांगूं लागले. खरें पाहिलें असतां अशा प्रकारचा अधिकार न्यायानें त्यांना कोणत्याही प्रकारें नव्हता; पण अशा न्यायान्यायाची त्यांना थोडीच फिकीर होती? कारण एका मोठ्या साम्राज्यशाहीचा प्रतिनिधि असा मिशनरी या लोकांच्या पाठीशीं उभा होता. हे लोक खेड्यांचे आपापसांत तंटे लावीत आणि या गोष्टी कळून आल्या असतां संतापानें डोकीं फिरलीं म्हणजे हे खेडेगांवचे लोक किंवा इतरही लोक मिशनरी लोकांवर हल्ला करीत आणि केव्हां केव्हां त्यांना ठारही करीत. असें झालें कीं या मिशनऱ्यांसाठीं त्यांच्या मागची साम्राज्यशाही सत्ता या लोकांवर झडप घालावयाची आणि तिनें या कृत्याबद्दल लोकांचा सूड घ्यावयाचा. चीनमधल्या या मिशनऱ्यांच्या खुनाइतकी फायद्याची गोष्ट या यूरपीय साम्राज्यशाही राष्ट्रांना दुसरी कोणती क्वचितच झाली असेल! कारण असा प्रत्येक खून म्हणजे या लोकांना अधिकाधिक खास अधिकार मागण्याची आणि उकळण्याची महापर्वणीच!

चीनमध्यें या सुमारास एक अत्यंत भयंकर आणि अत्याचारमय असें बंड झालें; तेंही बाटून ख्रिस्ती झालेल्या एका इसमानेंच सुरू केलें. हें बंड म्हणजे तैपिंग बंड म्हणून इतिहासांत ज्याला म्हणतात तें. हुंग शी चुआन नांवाच्या अर्धवट वेडया अशा गृहस्थानें हें बंड १८५० सालीं सुरू केलें. धर्मापायीं डोकें फिरलेल्या या गृहस्थाला या कामांत यश मिळालें आणि "मूर्तिपूजकांना ठार करा!" ही त्याची घोषणा जिकडे तिकडे घुमूं लागली. या सत्रांत फारच लोक मारले गेले. या बंडानें जवळजवळ अर्धा चीन वैराण करून टाकला. सुमारें बाराएक वर्षांत या बंडांत कमींत कमी दोन कोटी लोक मारले गेले असा अंदाज आहे. या बंडाच्या उठावणीच्या बाबतींत किंवा त्यामध्यें झालेल्या या कत्तलीबद्दल ख्रिस्ती मिशनरी किंवा परकी राजसत्ता यांना जबाबदार धरणें हें मात्र मुळींच रास्त नाहीं. सुरुवातीसुरुवातीला या बंडाला मिशनऱ्यांचा पाठिंबा होता असें दिसतें. परंतु पुढें त्यांनीं हुंगचा व आपला कांहीं संबंध नाहीं हें जाहीर केलें. तथापि चीनच्या सरकारची अशी कायमची समजूत होऊन गेली, कीं या बंडाला जबाबदार हे ख्रिस्ती मिशनरी होत; ही जी त्यांची श्रद्धा, तिच्यावरून त्या काळीं आणि नंतरही मिशनऱ्यांच्या कामाचा चिनी लोकांना किती

तिटकारा वाटत असला पाहिजे याची आपल्याला कल्पना येईल. ख्रिस्ती मिशनरी म्हणजे धर्माचा आणि सद्भावनेचा संदेश आणणारा मनुष्य, असें त्यांना कधींच वाटलें नाहीं. ख्रिस्ती मिशनरी म्हणजे त्यांच्या दृष्टीनें साम्राज्यशाहीचा हस्तक. एका इंग्रज ग्रंथकारानें याबद्दल म्हटलें आहे, कीं "प्रथम मिशनरी, त्याच्या मागून वर तोफा असलेलें जहाज आणि त्याच्या मागून जमिनींची लूट-चिनी लोकांच्या मनांत ही इतिहास-परंपरा कायम ठसून गेलेली आहे." ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे. कारण चीनच्या भानगडींत या मिशनऱ्यांचा संबंध वारंवार आलेला आढळून येतो.

एका माथेफिरू, धर्मवेड्या माणसाच्या नेतृत्वाखालीं चाललेलें हें बंड पुरें मोडलें जाण्यापूर्वी त्याला इतका धुमाकूळ घालायला सांपडावा ही खरोखर अलौकिक गोष्ट आहे. हें असें होऊं शकलें याचें खरें कारण म्हणजे चीनमधील जुनी समाजपद्धति आतां अगदीं मोडकळीस आलेली होती हें आहे. मला वाटतें, माझ्या चीनवरच्या मागच्याच पत्रांत मीं तुला चीनमधील करांचें अवजड ओझें, बदलती आर्थिक परिस्थिति आणि लोकांमधील वाढता असंतोष यांविषयीं लिहिलेलें आहे. मांचु घराण्याच्या राज्या-विरुद्ध जागोजाग गुप्त मंडळ्या स्थापन होऊं लागल्या होत्या आणि वातावरणांत बंडाचें वारें उठूं लागलें होतें. परदेशी मालाचा व्यापार म्हणजे अफू वगैरे मालांचा व्यापार सुरू होऊन त्यामुळें ही परिस्थिति अधिकच बिघडली. चीनमध्यें यापूर्वीच्या काळांतही परदेशी मालाचा व्यापार होतच होता; नाहीं असें नाहीं. परंतु आतांची त्यासंबंधींची परिस्थिति बदललेली होती. पश्चिमेकडील देशांत मोठ्या यंत्रावर चालणाऱ्या कारखान्यांत माल फारच जलद निर्माण होत होता आणि हा सगळाच माल घरच्या घरीं खपविणें अशक्य होतें. त्यामुळें या लोकांना बाहेर बाजारपेठा मिळविणें हें आवश्यक होऊन बसलें होतें. हिंदुस्थानांत आणि त्याचप्रमाणें चीनमध्येंही आपल्या मालाला पेठ मिळावी म्हणून जी खटपट झाली तिच्या पाठीमागची खरी प्रेरणा ही या प्रकारची होती; पण या मालाच्या व्यापारामुळें, विशेषतः अफूच्या व्यापारामुळें, जुन्या ज्या परंपरा होत्या त्या सर्व गड-गडल्या आणि त्यामुळें आर्थिक गोंधळ अधिकच माजला. हिंदुस्थानांतल्याप्रमाणेंच चीनमध्येंही आतां वस्तूंच्या किंमतींवर जागतिक किंमतींचा परिणाम होऊं लागला. या सर्व प्रकारामुळें लोकांच्या असंतोषांत आणि दुर्दशेंत भरच पडली आणि त्यामुळें तैपिंग बंडाला जोर चढला.

पाश्चात्य राष्ट्रांचा उर्मटपणा चीनमध्यें वाढतच चालला होता आणि तेथील राजकारणांत त्यांचा हात अधिकाधिक घुसूं लागला होता; अशा त्या काळांत चीनची अवस्था ही अशा प्रकारची होती. त्यामुळें या पाश्चात्य राष्ट्रांच्या मागण्यांना विरोध दर्शविण्यासाठीं किंवा अटकाव करण्यासाठीं चीनला विशेष कांहीं करतां आलें नाहीं, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. चीनमधील अंतर्गत गोंधळ आणि अडीअडचणी यांचा फायदा घेऊन या यूरपीय राज्यांनीं आणि पुढच्या काळांत जपाननेंही चीनपासून कित्येक खास हक्क आणि प्रदेशही सक्तीनें कसे मिळविले तें आतां यापुढें आपल्याला दिसेलच. परकी

सत्तांमध्यें आपसांत चुरस नसती, एकमेकांबद्दल त्यांच्यात हेवादावा नसता, तर चीनची दशाही हिंदुस्थानसारखीच व्हायची होती. तो देशही जपान आणि पाश्चात्य राजसत्तांपैकीं एक-दोन राजसत्ता यांचा गुलाम देश घेऊन राहता.

एकोणिसाव्या शतकांतील चीनमधील घडामोडींच्या मागची ही सामान्य भूमिका, आर्थिक बजबजपुरी, तैपिंग बंड, मिशनरी लोक आणि परकयानीं केलेलें आक्रमण यांविषयीं सांगतां सागतां माझ्या गोष्टीचें मुख्य सूत्र सोडून मी जरा दूर भटकल्या-सारखा झालों आहें; परंतु हें सगळें थोडें थोडें माहीत असल्याशिवाय काय काय प्रसंग घडले याची नुसतीच हकिकत नीटपणें मनांत ठसणार नाहीं. इतिहासांतील निरनिराळ्या घटनांची संगति चांगली ध्यानांत येण्यासाठींसुद्धां या गोष्टी थोड्या थोड्या माहीत असणें आवश्यक आहे. कारण इतिहासांतील घटना म्हणजे कांहीं उगीच काहीं तरी अलौकिक चमत्कार नसतात. त्या घडून येण्यासाठीं आधीं किती तरी कारणपरंपरा लागून राहिलेली असते. आतां हें खरें, कीं पुष्कळदा हीं कारणें अगदींच पाहतांक्षणीं ध्यानांत येत नाहींत. वर वर ज्या गोष्टी आपणांला दिसतात, त्यांच्याखालीं खोल हीं कारणें दडलेलीं असतात कितीकदां. चीनचें मांचू घराण्यांतील राज्यकर्त्यांचें उदाहरणच पहा. परवांपरवांपर्यंत आपण एवढे सामर्थ्यवान् आणि श्रेष्ठ दर्जाचे होतों आणि एकाएकीं आपलें भाग्यचक्र हें असें फिरलें तरी कसें, याचा त्यांना केवढा तरी अचंबा वाटला असेल! या घटनेचा अर्थच त्यांना समजला नाहीं. परंतु या घटनेचीं बीजें आणि मुळवा आपल्याच पूर्व इतिहासांत आहेत ही गोष्ट बहुधा त्यांच्या ध्यानांत आली नसावी. पाश्चिमात्य देशांतील औद्योगिक प्रगति आणि तिच्या परिणामामुळें चीनच्या आर्थिक व्यवस्थेची उडालेली दाणादाण ही कार्यकारणसंगति त्यांना उमगलीच नाहीं. म्हणून या रानटी परकीय लोकांची ही आगंतुक ढवळाढवळ त्यांना संतापजनक वाटली. या ढवळाढवळीला उद्देशून त्या काळच्या चीनच्या बादशहानें एका गोड जुन्या चिनी म्हणीचा उपयोग केला. तो म्हणाला, " माझ्या अंथरुणाशेजारीं मी कोणाला घोरूं देणार नाहीं!" चिनी लोकांच्या प्राचीन पवित्र ग्रंथांतील दूरदृष्टि, चातुर्य आणि विनोदबुद्धि यांमुळें चिनी लोकांच्या ठिकाणीं एक प्रकारचा गंभीर आत्मविश्वास आणि कसल्याही संकटाच्या प्रसंगीं टिकून राहणारें विशाल धैर्य, हीं पुष्कळ निर्माण झालीं होतीं खरीं; पण या गोष्टी परकी लोकांना पिटाळून लावण्याला पुरेशा नव्हत्या.

नानकिंगच्या तहानें ब्रिटनला चीनचा दरवाजा खुला झाला; परंतु हा लोण्याचा गोळा कांहीं एकट्या ब्रिटनच्या वांट्याला येणार नव्हता. फ्रान्स आणि अमेरिका यांनींही येथें प्रवेश करून चीनशीं व्यापारी तहनामे केले. चीनला नाइलाजानें हे तहनामे करणें भागच होतें. त्याचा निरुपायच होता. पण अशा रीतीनें स्वतःवर जबरदस्ती करणाऱ्या परकी लोकांबद्दल चीनला आदर किंवा आपलेपणा वाटणें अशक्य होतें. आपल्या देशाला या रानटी लोकांचा पाय लागावा ही गोष्टच मुळीं चिनी लोकांना संतापजनक होती. इकडे या परकी लोकांचें मात्र झालें एवढ्यावर मुळींच समाधान नव्हतें.

चीनची पिळवणूक करण्याचा त्यांचा लोभ वाढत्याच प्रमाणावर होता. या बाबतींतही पहिलें पाऊल पुन्हां ब्रिटननेंच टाकलें.

चीन देश तैपिंग बंड मोडून काढण्यांत गुंतलेला; त्यामुळें परकी लोकांना आपले हातपाय पसरायला हा मोठा अनकूल काल होता. कारण चीनजवळ त्यांना प्रतिकार करण्याची ताकद नव्हती. तेव्हां युद्धासाठीं कांहीं निमित्त शोधून काढायला ब्रिटिश लोकांनीं सुरुवात केली. १८५६ मध्यें कँटनमधील चिनी राजप्रतिनिधीनें एका जहाजावरील चिनी खलाश्यांना चांचेगिरीच्या गुन्ह्याबाबत अटक केली. हें जहाज चिनी लोकांच्याच मालकीचें होतें. त्यांत कोणाही परदेशी लोकाचा संबंध नव्हता; परंतु हाँगकाँग येथें ब्रिटिशांचें जें राज्य होतें, त्या राज्याचा या जहाजाला आपल्या बंदरांत व्यापारासाठीं जाण्याचा परवाना होता. त्या परवान्याचें निदर्शक म्हणून ब्रिटिशांचेंही एक निशाण या जहाजावर होतें. खरी गोष्ट तर अशी होती, कीं या अटकेच्या वेळीं परवान्याची मुदतही संपून गेलेली होती. तरी पण "तूं नाहीं तर तुझ्या बापानें" असें त्या कोंकराला म्हणालेल्या लांडग्याची गोष्ट आहे ना? त्या लांडग्याप्रमाणें ब्रिटिश सरकारनें युद्धाला हें निमित्त केलें.

इंग्लंडमधून चीनकडे सैन्य पाठविण्यांत आलें. याच वेळीं १८५७ चें हिंदी लोकांचें बंड उद्भवलें. त्यामुळें हें सगळें सैन्य चीनऐवजीं हिंदुस्थानांत आणावें लागलें. बंड मोडून टाकीपर्यंत चीनचें युद्ध तहकूब करावें लागलें. म्हणून चीनशीं दुसरें युद्ध १८५८ मध्यें सुरू झालें. या युद्धांत भाग घेण्यासाठीं फ्रान्सलाही या वेळपर्यंत एक निमित्त सांपडलें होतें. कारण म्हणे चीनमध्यें कोठें तरी एका फ्रेंच मिशनऱ्याचा खून झाला होता. तेव्हां इंग्रज आणि फ्रेंच, दोघांनीं मिळून चिनी लोकांवर झडप घातली. चिनी लोक बिचारे तैपिंग बंड मोडून काढण्यांत सर्वस्वीं गुंतून गेलेले होते. ब्रिटिश आणि फ्रेंच सरकारांनीं या युद्धांत येऊन मिळण्याबद्दल अमेरिका आणि रशिया यांनाही वळविण्याची खटपट केली; पण हे देश या गोष्टीला कबूल झाले नाहींत. तथापि युद्धांत आणि नंतर जी लूट मिळेल तिच्यांत मात्र भागीदारी करायला या राष्ट्रांची पूर्ण तयारी होती. या युद्धांत प्रत्यक्ष हातघाईची लढाई अशी झालीच नाहीं आणि या चारही राष्ट्रांशीं चीनला नवीन तहनामे करावे लागून त्यांत या राष्ट्रांनीं चीनपासून आणखी कांहीं खास हक्क लुबाडून घेतले. परदेशाच्या व्यापारासाठीं चीनचीं आणखी कांहीं बंदरें खुलीं करण्यांत आलीं.

पण चीनच्या दुसऱ्या युद्धाची गोष्ट एवढ्यानें संपली नाहीं. या नाटकाचा अजून एक अंक व्हायचा होता आणि त्याचा परिणाम अधिकच भयंकर दुःखद झाला. दोन पक्षांत वाटाघाटीमध्यें ठरून तहनाम्यावर परस्परांचे प्रतिनिधी जेव्हां सह्या करतात तेव्हां अशीच समजूत असते, कीं त्या त्या देशांच्या सरकारांकडून तहनाम्याला मान्यता ही मिळायचीच. तेव्हां या नव्या तहनाम्याच्या अखेरच्या शिक्कामोर्तबाचें हें काम एका वर्षाच्या आंत पेकिंग येथेंच व्हावें असें ठरलें. या प्रसंगाची वेळ जशी

आली, तसा रशियाचा वकील जमीनमार्गानेंच पेकिंग येथें येऊन दाखल झाला. बाकीच्या तीन राष्ट्रांचे प्रतिनिधी जलमार्गानें आले आणि आपलींच जहाजें पै नदींतून थेट पेकिंगपर्यंत आणावीं असा त्यांचा विचार होता. पेकिंग शहरावर याच वेळीं तैपिंग बंडवाल्या लोकांकडून हल्ला होण्याची भीति उत्पन्न झालेली होती आणि म्हणून पै नदीवर मोर्चे वगैरे बांधून कडेकोट बंदोबस्त करण्यात आलेला होता. म्हणून चिनी सरकारनें या ब्रिटिश, अमेरिकन आणि फ्रेंच वकिलांना नदीमार्गानें न येतां, नदीच्या उत्तर अंगच्या जमीनमार्गानेंच येण्याची विनंति केली.

ही विनंति कोणत्याही प्रकारें अयोग्य नव्हती. अमेरिकन वकिलानें ती विनंति मान्यही केली. परंतु ब्रिटिश आणि फ्रेंच वकिलांना मात्र ही साधी सरळ गोष्ट पटली नाहीं. नदीवरील मोर्चेबंदीची पर्वा न करतां या वकिलांनीं जबरदस्तीनें नदींतून प्रवास करण्याचा प्रयत्न केला. चिनी लोकांनीं त्यांच्यावर गोळीबार केला आणि त्यांचें फार मोठें नुकसान करून त्यांना मागें परतविलें.

पण उद्धटपणानें आणि फाजील अहंभावानें पिसाटलेलीं हीं राष्ट्रें ज्या ठिकाणीं केवळ प्रवासाचा मार्ग बदलण्याची साधीशी चिनी सरकारची विनंति मान्य करावयास तयार नव्हतीं, तीं काय हा प्रकार सहन करणार ? त्यांनीं त्याचा सूड घेण्यासाठीं आणखी सैन्य पाठविलें. १८६० सालीं हीं सैन्यें प्राचीन पेकिंग शहरावर चालून गेलीं आणि या शहरांतील एका साऱ्या जगामधील अत्यंत अलौकिक अशा इमारतीचा नाश करून जाळून, लुटून त्यांनीं आपल्या सूडाची भावना शांत केली. ही इमारत म्हणजे बादशहा चीन लुंग याच्या कारकीर्दींत बांधलेला युआन-मिंग-युआन या नांवाचा बादशहाच्या ग्रीष्म ऋतूंतील निवासस्थानाचा प्रासाद होय. चीन देशांतील अत्युत्कृष्ट आणि अत्यंत दुर्मीळ अशा वाङ्मयरत्नांचा आणि कलाकौशल्याचा खजिनाच जणुं या प्रासादामध्यें सांठविलेला होता. तांब्यांचीं अत्यंत सुंदर अशीं प्राचीन काळचीं भांडीं त्या ठिकाणीं होतीं. मन थक्क करून टाकण्यासारखीं मोहक चिनी मातीचीं भांडीं, अत्यंत दुर्मीळ असे हस्तलिखित ग्रंथ, चित्रें, आणि आज हजार वर्षें चीन देश ज्याकरितां प्रसिद्ध आहे अशा अनेक प्रकारच्या चमत्कारिक खेळांच्या वस्तू आणि कौशल्याचे पदार्थ त्या वास्त्यामध्यें ठेवलेले होते. इंग्रज आणि फ्रेंच सैनिक हे तर पडले नुसते अडाणी, रानटी फोड-तोड करणारे लोक! त्यांनीं हा कलाकौशल्याचा खजिना लुटला, आणि त्यातील वस्तू मोडूनतोडून त्यांच्या प्रचंड होळ्या कितीक दिवसपर्यंत पेटत्या ठेवल्या! अशा स्थितींत हजारों वर्षें उच्च संस्कृतीमध्यें मुरलेल्या चिनी लोकांना ही सगळी फोडाफोड आणि रानदांडगेपणा पाहून अंतःकरणांत अत्यंत तीव्र दुःख झालें आणि हे अडाणी मोडतोड करणारे लोक निव्वळ मोडतोड करण्याचीच अक्कल अंगलेले रानटी लोक आहेत असें त्यांना वाटलें, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. या लोकांना पाहून प्राचीन काळच्या मोडतोड करणाऱ्या हूण आणि मंगोलियन आणि इतर रानटी लोकांची, आठवण त्यांना झाली असल्यास नवल कसलें!

परंतु चिनी लोकांना आपल्याबद्दल काय वाटेल याबद्दल या रानटी लोकांना काडीचीसुद्धां पर्वा नव्हती. आपल्या बोटींवर असलेल्या तोफा आणि आपलीं आधुनिक शस्त्रास्त्रें यांच्या जोरावर त्यांना कोणाच्या रागालोभाची भीति वाटत नव्हती. तेव्हां शेंकडों वर्षेपर्यंत जमा केलेली अशी दुर्मीळ कलाकौशल्याची मौल्यवान् संपत्ति पार नष्ट झाली तरी त्यांना त्याचें काय होतें? चिनी लोकांच्या कलेची आणि संस्कृतीची त्यांना काय किंमत? ते म्हणत :—

कशाचीही अम्हां नाहीं पर्वा जों जवळी असे
बंदूक मॅक्झिमाची ही, जी त्यांच्याजवळी नसे!

## ११५

## अडचणींत सांपडलेला चीन देश

२४ डिसेंबर, १९३२

मागच्या पत्रामध्यें मीं तुला ब्रिटिश आणि फ्रेंच लोकांनीं १८६० मध्यें पेकिंग येथील चिनी बादशहाचा अपूर्व सुंदर असा ग्रीष्मऋतूंत राहण्यासाठीं बांधलेला राजवाडा कसा नष्ट करून टाकला हें सांगितलें. हा नाश कशासाठीं केला, तर म्हणे चिनी लोकांनीं युद्धतहकुबीच्या निशाणाचा तहकुबी मोडून अपमान केला म्हणून. असें धरून चालूं या, कीं कांहीं चिनी लोकांनीं अशा रीतीनें युद्ध-तहकुबीचा भंग करण्याचा अपराध केला; परंतु तेवढ्यासाठीं ब्रिटिश आणि फ्रेंच लोकांनीं एवढें प्रचंड नासधुसीचें काम अगदीं जाणूनबुजून करावें ही खरोखर माणसाच्या कल्पनेला आकलन न होणारी अशी गोष्ट आहे. बरें, हा प्रकार कांहीं कोणा अडाणी शिपायांच्या हातून अवचित घडला असेंही नव्हे. तर अगदीं अधिकारी लोकांकडून हें काम करण्यांत आलें. अशा या गोष्टी कां बरें घडत असाव्यात? इंग्रज आणि फ्रेंच लोक तर चांगले सुधारलेले आणि सुसंस्कृत असे आहेत. आधुनिक मानवी सुधारणेचे तर ते पुढारी आहेत. आणि तरीसुद्धां खाजगी जीवनांत मोठे सदाचरणी आणि सुबुद्धीनें वागणारे हे लोक सार्वजनिक व्यवहारांत किंवा इतरांशीं होणाऱ्या झगड्यांत मात्र आपली सर्व सुधारणा आणि सदाचरणप्रवृत्ति पार विसरून जातांना दिसतात. व्यक्तीव्यक्तींतील परस्परांची खाजगी वागणूक आणि राष्ट्रांराष्ट्रांतील परस्पर-व्यवहार यांमध्यें जो फरक दिसून येतो, तो खरोखरच मोठा चमत्कारिक आहे. लहान मुलांमुलींना रोज शिकवलें काय जातें, तर फाजील स्वार्थी होऊं नका; दुसऱ्याच्या हिताची नेहमीं जाणीव ठेवा; कोणाशींही सरळ वर्तन करा. साऱ्या आपल्या शिक्षणाचें धोरण आपल्या मनावर हा घडा बिंबविण्याचें आहे. आणि थोड्याशा प्रमाणांत आपल्या आंगवळणीं हा घडा पडतोही;

परंतु एकदां युद्ध सुरू होऊं द्या, कीं मग हा लहानपणापासून शिकलेला धडा आम्ही पार विसरून जातों, आणि आमच्या ठिकाणची पशुवृत्ति डोकें वर काढते. तात्पर्य, या स्थितींत चांगले सदाचरणी असणारे लोकसुद्धां पशूंसारखें वागूं लागतात.

बरें, हा प्रकार परस्परांशीं संबंध नसलेल्या परकी देशांशींच युद्धें चालू असतांना होतो असें कांहीं नव्हे. फ्रेंच आणि जर्मन राष्ट्रें हीं तर मूळचीं एकाच वंशाच्या लोकांचीं; परस्परांच्या लाग्याबांध्याचीं; परंतु त्यांच्यामध्येंही लढाईच्या वेळीं हीच पाशवी वृत्ति आढळून येते. अर्थात्, भिन्न भिन्न वंशांत लढाईचा प्रसंग असतो तेव्हां तर या वृत्तीचा फारच कटु अनुभव येतो. उदाहरणार्थ, यूरपीयन लोकांचा आशिया आणि आफ्रिका खंडांतील मानववंशांशीं सामन्याचा जेव्हा जेव्हां प्रसंग येतो तेव्हां. एक तर या भिन्न भिन्न वंशांच्या लोकांना एकमेकांची नीटशी ओळख नसते; कारण दोघांचेही व्यवहार एकमेकांना कधीं पहायला मिळालेले नसतात. आणि जेथें परस्परांबद्दल अज्ञान आहे त्या ठिकाणीं परस्परांबद्दल बंधुभावना निर्माण होणें अशक्य आहे. अशा स्थितींत वांशिक द्वेषभावना आणि कटुता हीं उलट वाढतच जातात आणि अशा दोन वंशांत जेव्हां झगडा उत्पन्न होतो, त्या वेळीं हें युद्ध नुसत्या राजकीय स्वरूपाचें राहत नाहीं, तर त्यांत वांशिक विरोधाचें मोठें भूत उत्पन्न होतें. हें लक्षांत घेतलें म्हणजे १८५७ सालच्या हिंदी बंडातील भयंकर अत्याचार आणि यूरपमधील बलिष्ठ राज्यांनीं आशिया आणि आफ्रिका खंडांत केलेली वृथा नासधूस आणि क्रूर कृत्यें यांचें कारण थोडेफार समजूं शकतें.

हा सगळा प्रकार किती खेदकारक आणि मूर्खपणाचा वाटतो! पण एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्रावर, एका समाजाची दुसऱ्या समाजावर, एका वर्गाची दुसऱ्या वर्गावर सत्ता चालू असली म्हणजे असंतोष, घासाघीस आणि बंडें निर्माण होणें आणि ज्यांची पिळणूक होते अशा राष्ट्रांनीं, समाजांनीं अथवा वर्गांनीं पिळणूक करणाराला उखडून लावण्याचा प्रयत्न करणें ही अपरिहार्य गोष्ट आहे. परंतु एकानें दुसऱ्याची पिळणूक करायची हा तर आजच्या आमच्या समाजाचा प्रत्यक्ष पायाच आहे. यालाच भांडवलशाही हें नांव असून तिच्यांतूनच साम्राज्यशाहीचा उदय झालेला आहे.

एकोणिसाव्या शतकामध्यें मोठीं यंत्रें आणि औद्योगिक प्रगति यांमुळें पश्चिम यूरप खंडांतील राष्ट्रें आणि अमेरिका हे देश सधन आणि सामर्थ्यवान् झालेले होते. त्यामुळें त्यांना वाटूं लागलें, कीं आपण म्हणजे साऱ्या पृथ्वीचे मालक असून जगांतील बाकी सगळे वंश आपल्याहून कमी दर्जाचे आहेत; आणि म्हणून त्यांनीं आपल्यासाठीं जग मोकळें करून दिलें पाहिजे. निसर्गातील कांहीं कांहीं शक्तींवर त्यांनीं ताबा मिळविल्यामुळें हे लोक इतरांशीं उद्दामपणानें आणि अपमानकारक रीतीनें वागूं लागले होते. सुधारलेल्या माणसानें निसर्गशक्तीवर ताबा मिळविला म्हणजे त्याचें काम संपत नाहीं. त्यानें आपल्या स्वतःच्या प्रवृत्तीवरही असाच ताबा मिळविणें आवश्यक आहे, ही गोष्ट हे लोक विसरून गेले, आणि याचमुळें एकोणिसाव्या शतकामध्यें आपण पाहतों कीं

चांगले पुढारलेले मानववंश, पुष्कळच बाबतींत इतरांपेक्षां किती तरी पुढचा पल्ला गांठलेले लोक, पुष्कळदां मागासलेल्या वन्य जातींना लाज वाटावी अशा रीतीनें वागले. तेव्हां यूरपमधील लोक, आशिया आणि आफ्रिका खंडांतील लोकांशीं गेल्या शतकांतच केवळ नव्हे, तर आजच्या घटकेलाही असे कां वागतात, हें एवढ्यावरून आतां कदाचित् थोडेंसें तुझ्या लक्षांत आलें असेल.

मात्र, यूरपीयन लोकांची आपल्या लोकांशीं किंवा इतर कोणा लोकांशीं तुलना करून त्यांच्यापेक्षां आम्ही लोक कोणी मोठे अधिक चांगले लोक आहोंत, असें दाखविण्यासाठीं मी हें लिहितों आहें असें मात्र समजूं नकोस. माझा तसा तिळमात्र उद्देश नाहीं. जगांतील सर्व लोकांच्या ठिकाणीं असे मान खालीं घालायला लावण्याजोगे प्रकार असतात. आमच्या ठिकाणचे हे प्रकार तर विशेषच वाईट आहेत; तसें नसतें तर आज ज्या हीन दशेला आम्ही जाऊन पोहोंचलों आहोंत, इतक्या हीन दशेला आम्ही आलोंच नसतों.

आतां पुन्हां चीनकडे आपण जाऊं या. चीनच्या बादशहाचा ग्रीष्मप्रासाद नष्ट करून इंग्रज आणि फ्रेंच लोकांनीं आपल्या सामर्थ्याची चुणूक चीनला दाखविलीच होती. आतां या गोष्टीचा फायदा घेऊन चीनला यापूर्वी झालेले सर्व तहनामे मान्य करावयाला तर त्यांनीं भाग पाडलेंच; पण आणखीही कांहीं खास सवलती चीनकडून त्यांनीं सक्तीनें उकळल्या. आतां त्या तहाप्रमाणें शांघाय बंदरांतील चिनी जकातखात्याचा सगळा कारभार चिनी सरकारला परकीय अधिकाऱ्यांच्या हातांत द्यावा लागला; या खात्याला Imperial Maritime Customs बादशाही जलमार्ग-जकातखातें असें नांव देण्यांत आलें.

दरम्यान ज्या तैपिंग बंडामुळें चीनचें सामर्थ्य खचीं झालें होतें आणि ज्यानें परकी लोकांना चीनमध्यें हातपाय पसरायला संधि मिळवून दिली होती, तें तैपिंग बंड अद्यापि रखडत रखडत पण चालूच होतें. अखेरीस १८६४ मध्यें लि हुंग चँग नांवाच्या एका प्रांताधिकाऱ्यानें हें बंड कायमचें निकालांत काढलें. हा पुढें चीनचा एक प्रमुख मुत्सद्दी म्हणून उदयास आला.

अशा रीतीनें फ्रान्स आणि इंग्लंड देश चीनकडून अत्याचारी मार्गानें असे खास हक्क आणि सवलती उकळीत होते, अशा वेळीं उत्तरेकडे रशियानें शांततेच्या मार्गानें मोठा नांव घेण्यासारखा लग्गा साधला. थोड्याच वर्षांपूर्वी कॉन्स्टान्टिनोपलचा कबजा मिळविण्याच्या लोभानें रशियानें यूरप खंडांतच तुर्कस्तानवर स्वारी केली होती. रशियाच्या वाढत्या सामर्थ्याची भीति वाटून इंग्लंड आणि फ्रान्स देश हे त्या वेळीं तुर्कस्तानला मिळाले होते आणि त्यांनीं मिळून क्रीमियन युद्ध या नांवानें प्रसिद्ध असलेल्या इ. स. १८५४ ते ५६ मधील युद्धांत रशियाचा पराभव केला होता. पश्चिमेच्या बाजूला असा पराभव झाल्यामुळें रशियानें आपली नजर पूर्वेच्या बाजूला वळविली आणि या बाजूस रशियाला चांगलेंच यश मिळालें. रशियानें शांततेच्या

मार्गानेंच चीनचें मन वळवून ईशान्येकडील कोपऱ्यांतील समुद्रालगतचा एक प्रांत चीनकडून आपल्या स्वाधीन करून घेतला. याच प्रांतांत व्लाडिवोस्टोक हें शहर आणि बंदर होतें. रशियाला हा जो मोठाच फायदेशीर लगा साधला त्याचें श्रेय मुरावीफ नांवाच्या एका तरुण रशियन अंमलदाराकडे होतें. अशा रीतीनें तीन वर्षेपर्यंत युद्ध करून आणि नासधूस करून इंग्लंड आणि फ्रान्स यांनीं जें कांहीं मिळविलें, त्यापेक्षां किती तरी अधिक रशियानें निव्वळ सलोख्याच्या मार्गानें मिळविलें.

१८६० मध्यें अशी ही परिस्थिति होती. ज्या मांचू घराण्याच्या बादशहाचें वर्चस्व अठराव्या शतकाच्या अखेरीस जवळजवळ अर्ध्या आशिया खंडभर पसरून गाजत होतें, त्याला आतां अवनत आणि हीन दशा प्राप्त झाली. एकीकडे बाहेरून लांबहून आलेल्या पश्चिमेकडील यूरपीय राजसत्तांनीं या साम्राज्याचा पराभव करून त्याला आपल्यापुढें वांकाविलें; तर इकडे आंतल्या बाजूनें बंडामुळें हें सगळें साम्राज्यच उलथून पडण्याच्या बेताला आलें होतें. यामुळें साऱ्या चीन देशभर खालपासून वरपर्यंत फार मोठी खळबळ माजली. होतो आहे हा प्रकार कांहीं एकंदरीनें ठीक नव्हे हें सर्वांनाच कळून चुकलें आणि बदलती परिस्थिति व परकीय आक्रमणाचें संकट या दोन्ही दृष्टींनीं देशाची नवी घडी बसविण्याच्या हेतूनें थोडाफार प्रयत्न सुरू झाला. तेव्हां हें १८६० साल म्हणजे चीनमधील एका नवीन युगाच्या प्रारंभींचें साल म्हटलें पाहिजे. कारण एव्हांपासून परकीय आक्रमणाला विरोध करून अटकाव करण्याची तयारी चीननें सुरू केली. चीनचा शेजारी जपान देश हाही याच सुमारास नेमका याच कामांत गुंतलेला होता. त्याचेंही उदाहरण चीनपुढें कित्ता गिरविण्यासाठीं म्हणून होतेंच. जपान देश चीनपेक्षां फारच मोठ्या प्रमाणांत या कामांत यशस्वी झाला; परंतु चीननेंही कांहीं काळपर्यंत या परकीय सत्तांना थोपवून धरलें.

प्रथम चीननें बार्लिंगेम नांवाच्या एका अमेरिकन गृहस्थाच्या नेतृत्वाखालीं एक वकीलमंडळ या तहनाम्यांतील प्रतिस्पर्धी राष्ट्रांकडे पाठविलें. हा बार्लिंगेम चीनचा मोठा कळकळीचा मित्र होता. त्यानें या परकी राष्ट्रांकडून तहनाम्यांतील अटी थोड्याशा सौम्य करून घेतल्या. १८६८ मध्यें चीन आणि अमेरिका यांच्यामध्यें एका नवीन तहनाम्यावर सह्या झाल्या. या तहामधील एक मोठी लक्षांत राहण्यासारखी गोष्ट म्हणजे चिनी सरकारनें अमेरिकन सरकारवर मेहेरबानी म्हणून चिनी मजुरांना परदेशीं अमेरिकेंत जाण्याला परवानगी देण्याची सवलत कबूल केली. अमेरिकेचें या वेळीं आपलीं पॅसिफिक समुद्राच्या किनाऱ्यावरील पश्चिमेकडील संस्थानें वाढवून समृद्ध करण्याचें कार्य चालू होतें. हें काम विशेषतः कॅलिफोर्नियामध्यें या सुमारास चालू झालें होतें. अमेरिकेंत या कामासाठीं मजुरांचा तुटवडा होता, म्हणून अमेरिकेनें चिनी मजुरांची आयात सुरू केली. परंतु यामधून नवीनच एक भानगड उपस्थित झाली. इतकी स्वस्त मजुरी पत्करून अमेरिकेंत काम करावयास येणारे चिनी कामगार तिकडे

आणण्याला अमेरिकन लोकच विरोध करूं लागले आणि त्यामुळें चिनी आणि अमेरिकन सरकारांत तक्रार उत्पन्न झाली.

पुढें तर अमेरिकन सरकारनें चिनी लोकांना अमेरिकेंत यावयाला बंदीच केली. चिनी लोकांना या अपमानास्पद वागणुकीचा राग येऊन त्यांनीं अमेरिकन मालावर बहिष्कार घालण्यास सुरुवात केली. पण ही सगळी हकिकत बरीच लांबलचक असून तिच्यांतून आपल्याला विसाव्या शतकांत प्रवेश करावा लागतो. म्हणून ती तशीच इथें सोडून देऊं या.

तैपिंग बंडाचा मोड होतो न होतो तोंच, माचू घराण्याच्या राजाविरुद्ध एक बंड उद्भवलें. हें बंड प्रत्यक्ष चीनमध्यें नव्हतें; तर दूर तिकडे पश्चिमेस, आशियाच्या मध्यभागीं तुर्कस्तानांत झालेलें होतें. या भागांत वस्ती बहुतेक सर्व मुसलमानांची होती. या मुसलमान टोळ्यांनीं याकूब बेग नांवाच्या आपल्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं १८६३ सालीं बंड केलें व चिनी अधिकाऱ्यांना तेथून हांकलून लावलें. या केवळ एका स्थानिक बंडाचें महत्त्व आपल्या गोष्टींत दोन प्रकारांनीं आहे. एक तर या बंडाचा फायदा घेऊन रशियानें चीनचा कांहीं प्रदेश हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. चीन देश अडचणींत सांपडलेला दिसला रे दिसला, कीं अशी कांहीं तरी धाड घालावयाची हा तर आतां यूरपियन राष्ट्रांचा नेहमींचा शिरस्ताच होऊन गेलेला होता. परंतु या वेळीं असा प्रदेश देण्याचें चीननें नाकारलें; एवढेंच नव्हे, तर थोडाफार जो मुलूख रशियानें बळकावला होता तोही चीननें रशियाला परत ओकावयाला लावला. यामुळें मात्र जगांत सगळ्यांनाच मोठें आश्चर्य वाटलें! हें सगळें चिनी सेनापति चो चुंग तंग यानें याकूब बेगविरुद्ध जी विचित्र पद्धतीची मोहीम केली तिच्यामुळें घडून आलें. या सेनापतीनें आपल्या मोहिमेचा कारभार सगळाच मोठा थंडपणानें चालविला. बंडखोरांपर्यंत जाऊन पोंचायला त्यानें कितीक वर्षें घालविलीं. दोनदां तर त्यानें आपल्या सैन्याचे भले लांब मुक्कामच टाकून शेतीची मेहनत-मशागत करून पेरणी केली आणि आपल्या सैन्याला रसद म्हणून धान्यसुद्धां पिकविलें! सैन्याच्या खाद्यपेयांची तजवीज करणें ही गोष्ट केव्हांही झाली तरी एक अतिशय जिकिरीची बाब असते. चो चुंग तंगच्या सैन्याला तर सगळें गोबीचें वैराण मैदान ओलांडून जावयाचें होतें. त्यामुळें त्याच्यापुढें तर हा रसदीचा प्रश्न फारच मोठा बिकट होता. हा प्रश्न या सेनापतीनें वरच्याप्रमाणें मोठ्या नवलाईनें सोडविला. त्यानंतर जाऊन मग त्यानें याकूब बेगचा पराभव केला आणि बंडाचा बीमोड करून टाकला. काशगर, तुरफान, यारकंद वगैरे भागांतील त्याची ही मोहीम लष्करी दृष्टीनें पाहतां फारच अलौकिक प्रकारची झाली असें मानलें जातें.

इकडे मध्य आशियांत रशियाचा असा बंदोबस्त झाला. तोंच लांबलांबच्या प्रांतांत पसरलेल्या पण आतां मोडकळीस येऊं लागलेल्या चीनच्या साम्राज्याच्या आणखी एका भागांत चिनी सरकारवर आणखी एक संकट उभें राहिलें. ही भानगड

चीनचें मांडलिकत्व असें जें अनामचें राज्य होतें (वैतनाम) तेथें उपस्थित झाली. या राज्यावर फ्रान्सचा डोळा होता. त्यामुळें तेथें चीन आणि फ्रान्स यांमध्यें युद्ध झालें. येथेंही पुन्हां चीननें आपला प्रभाव चांगला दाखविला आणि फ्रान्स कांहीं चीनला दबवू शकला नाहीं; हें पाहून सगळ्यांनाच मोठें आश्चर्य वाटलें. या दोन राष्ट्रांत १८८५ मध्यें उभयपक्षीं समाधानकारक असा तह झाला.

चीनच्या सामर्थ्याचीं हीं नवीन चिन्हें पाहून साम्राज्यशाही राष्ट्रें चांगलींच दचलीं. १८६० मध्यें किंवा त्यापूर्वी चीनला आलेला दुबळेपणा आतां नाहींसा झाल्यासारखा दिसला. देशांत सुधारणा करण्याबद्दलचीं भाषाही बोलली जाऊं लागली आणि पुष्कळांना असें वाटलें, कीं चीनचे हालाचे दिवस संपले, चीन देश आतां मार्गाला लागला. त्यामुळेंच तर १८८६ सालीं ब्रह्मदेश खालसा करतांना ब्रिटननें वाहिवाटीप्रमाणें दर दहा वर्षांनीं चीनला खंडणी पाठविण्याचें कबूल केलें.

परंतु चीनच्या कपाळींचे हाल अजून संपलेले नव्हते. चीनच्या वांट्याला अजून पुष्कळच अपमान, हालअपेष्टा आणि कापाकापी यायची होती. चीनजवळचें लष्कर आणि आरमार दुर्बल होतें एवढ्यावरच कांहीं चीनचा कमीपणा संपत नव्हता. त्याचें मूळ याहूनही पुष्कळच खोल होतें. चीनची सगळी सामाजिक आणि आर्थिक घडीच मोडकळीस आलेली होती. एकोणिसाव्या शतकापासून ही घडी विघडूं लागली होती. आणि मांचू घराण्याच्या अमलाविरुद्ध पुष्कळच गुप्त मंडळ्या स्थापन होऊं लागल्या होत्या, हें मीं तुला यापूर्वीच सांगितलें आहे. परदेशीयांचा व्यापार आणि औद्योगीकरण झालेल्या राष्ट्रांशीं आलेला चीनचा संबंध यांमुळें ही परिस्थिति अधिकच चिघळली. इ. स. १८६० सालानंतर चीनची शक्ति पुन्हां एकदां परत आल्यासारखी भासली. परंतु तिच्यांत खरा दम नव्हता. खरी समाजसुधारणा त्यांत नव्हती. कोठें कोठें स्थानिक अंमलदारांच्या उत्साहामुळें कांहीं कांहीं स्थानिक स्वरूपाच्या सुधारणा घडून आल्या; विशेषतः लि ह्युंग चांग यानें या सुधारणा बऱ्याचशा घडवून आणल्या; पण हे सगळे प्रयत्न या प्रश्नाच्या मुळापर्यंत जाऊन पोंचूं शकले नाहींत किंवा चीनच्या शक्तीचा ऱ्हास ज्या विकारामुळें होत होता, तो विकारही यामुळें बरा होऊं शकला नाहीं.

१८६० सालापासून पुढच्या या कांहीं वर्षांत बाह्यतः चीननें जी शक्ति दाखविली तिचें प्रमुख कारण या काळांत चीनच्या राज्यकारभाराचें प्रमुखत्व फारच समर्थ अशा एका नमुनेदार स्त्रीकडे होतें. ही स्त्री म्हणजे चिनी सम्राटाची माता छु शी ही होय. तिचें वय अवघें सव्वीस वर्षांचें होतें. तिचा लहान मुलगा हा नांवालाच बादशहा म्हणून होता. या राजमातेनें चीनचा कारभार मोठ्या जोमदारपणें सत्तेचाळीस वर्षेपर्यंत केला. तिनें आपल्या हाताखालीं कार्यक्षम अशा अंमलदारांचीं निवड केली आणि त्यांच्या ठिकाणीं आपल्या ठिकाणच्या उत्साहाचें थोडें थोडें वारें उत्पन्न केलें. यापूर्वीच्या पुष्कळशा काळामध्यें चीननें दाखविलें नव्हतें

इतकें शौर्य जें या काळांत चीननें दाखविलें, त्याचें बहुतेक सर्व श्रेय या राजमातेकडे आणि तिनें चांगल्या अंमलदारांची जी निवड केली त्याकडे आहे.

याच काळांत दरम्यान इकडे जपाननें मोठ्या आश्चर्यकारक घडामोडी चालविल्या होत्या आणि ओळखूंसुद्धां येणार नाहीं इतकें त्याचें स्वरूप पालटत आलें होतें; म्हणून आतां आपल्याला जपानात गेलें पाहिजे.

## ११६

# जपानची घोडदौड

२७ डिसेंबर, १९३२

जपानबद्दल मागचें पत्र मीं तुला लिहिलें त्याला आज पुष्कळ दिवस झाले. पांच महिन्यांपूर्वी एक्यायशीव्या पत्रांत जपाननें सतराव्या शतकांत सगळ्या जगापासून स्वतःला कोंडून घेण्याचा चमत्कारिकपणा कसा केला हें मीं तुला सांगितलें. अशा रीतीनें १६४१ पासून दोनशें वर्षेपर्यंत जपानच्या लोकांचा जगाशीं काडीमात्र संबंध नव्हता. या दोनशें वर्षांत यूरप खंडांत, आशियांत, अमेरिकेंत, नव्हे आफ्रिकेंतसुद्धां केवढाले मोठे फेरबदल घडून आलेले होते. या काळांत घडून आलेल्या खळबळ उडविणाऱ्या घटनांपैकीं कांहींचें वर्णन मीं तुझ्यासाठीं केलेलें आहे. पण या सर्व घडामोडींपैकीं कशाचीही यातमी या कोंडून घेतलेल्या देशांत एवढीसुद्धां पोंचत नव्हती. जपानच्या प्राचीन सरंजामशाही वातावरणांत बाहेरच्या वाऱ्याची एवढीशीसुद्धां झुळूक येऊन जरा सुद्धां हालचाल उठवीत नव्हती. इकडे काळाचा ओघ मात्र मोठ्या झपाट्यानें फोफावून पुढें चालला होता; पण जपानमधील चित्र जसेंच्या तसें कायम होतें. जपान देश अजून सरंजामशाही पद्धतीचाच राहिला होता. जमीनदार वर्गाच्या हातांतच सत्ता तेथें अद्यापि होती. बादशहा नांवाला होता, पण त्याच्या हातांत सत्ता नव्हती. खरी सत्ता शोगुनांच्या हातीं होती. शोगुनाचें घराणें हें जपानमधील एका मोठ्या वर्गाचें, समाजाचें पुढारी होतें. हिंदुस्थानांतील क्षत्रियांप्रमाणें जपानमध्यें सामुराई म्हणून एक वर्ग होता. जमीनदार, वतनदार आणि, सामुराई वर्ग यांच्या हातांत खरी सत्ता होती. या निरनिराळ्या जमीनदार-सरदारांमध्यें आणि इतर वर्गांमध्यें वारंवार तंटे उद्भवत असत; परंतु शेतकऱ्यांना आणि इतरांना पिळून काढण्यामध्यें मात्र या सर्वांची एकजूट असे.

असें जरी होतें तरी एक खरें, कीं जपानमध्यें शांतता नांदत होती. पूर्वी फार दीर्घ कालपर्यंत जपानमध्यें यादवी माजली होती. तिच्यामध्यें जपानचा जणुं सारा दमच उखडल्यासारखा झाला होता. त्यामुळें त्यानंतरचा हा शांततेचा काळ जपानला फार उपयुक्त आणि सुखकारक झाला. या काळांत दाइम्योंसारखे कांहीं कांहीं लढाया

उपस्थित करणारे सरदार दडपून टाकण्यांत आले. आपसांतील यादवीमुळें झालेलें नुकसान हळूहळू जपाननें भरून काढायला सुरुवात केली. लोकांची प्रवृत्ति उद्योगधंदे, कला, वाङ्मय, आणि धर्म यांच्याकडे अधिक वळत गेली. ख्रिस्ती धर्म दडपून टाकण्यांत आलेला होता. बुद्ध धर्माचें पुनरुज्जीवन झालेलें होतें. त्याचप्रमाणें शिंटो धर्मालाही पुढें पुनः उजळा चढला. पूर्वजपूजेवर आधारलेला हा एक जपानचा खास नमुन्याचा धर्मपंथ आहे. सामाजिक आचार आणि व्यवहार व नीतिमत्ता या बाबतींत लोक चीनचा ऋषि कॉन्फ्यूशिअस याला अतिशय मान देऊं लागून त्याच्या उपदेशाचा कित्ता आपल्यापुढें ठेवूं लागले. राजदरबाराच्या मंडळांत आणि सरदारमंडळांत कलाकौशल्याला बराच बहर आला. मध्ययुगांत यूरप खंडाचें स्वरूप जशा प्रकारचें होतें, तशा प्रकारचें कांहींसें स्वरूप या शांततेच्या काळांत जपानचें झालें.

परंतु नवीन फेरबदल केव्हांच एवढेसुद्धां घडूं द्यावयाचे नाहींत, हा प्रयत्न खरोखर तितकासा सोपा नाहीं. जपाननें बाहेरचे संबंध जरी सर्वच्या सर्व बंद करून टाकलेले होते, तरी जपानमध्यें आंतल्या आंतच फेरबदल झाल्याशिवाय राहिले नाहींत. अर्थात् याहून वेगळ्या परिस्थितींत हे फेरबदल जितक्या वेगानें झाले असते, त्यापेक्षां ते जपानमध्यें या काळांत फारच मंद गतीनें घडून येत होते, हें खरें. इतर देशांतल्याप्रमाणें येथेंही सरंजामशाही पद्धतींतून आर्थिक अनवस्था, घसरगुंडी उत्पन्न होण्याच्या मार्गाला लागलीच होती. असमाधान वाढत होतें आणि सगळ्या कारभाराचें प्रमुखत्व शोगूनच्या हातीं असल्यामुळें लोकांच्या असंतोषाचा रोख सहजच सगळा शोगूनच्या विरुद्ध वळत चालला होता. शिंटो पंथाच्या पूर्वज-पूजेच्या परंपरेतून लोकांच्या मनांत बादशहाच्याबद्दल अधिकाधिक आपलेपणा आणि आशा उत्पन्न होऊं लागली होती. कारण सर्वांच्याच मतानें बादशहा म्हणजे प्रत्यक्ष सूर्याचा वंशज. या वाढत्या असंतोषांतून यामुळें एक प्रकारची राष्ट्रीय भावना निर्माण झाली आणि ही राष्ट्रीय भावना तरी आर्थिक असंतोषावरच आधारलेली असल्यामुळें यांतून प्रचलित समाजव्यवस्था बदलणें व जपानचीं दारें जगाला खुलीं करणें या गोष्टी घडून येणें अपरिहार्यच होतें.

जपानचीं दारें उघडण्याचे प्रयत्न परकीय राज्यसत्तांनीं पुष्कळ केले होते या काळांत. पण ते सर्व फसले होते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला जपानची कोंडी फोडण्याच्या या प्रश्नाकडे अमेरिकेनें विशेषच लक्ष घातलें. नुकतीच त्यांची पश्चिम अमेरिकेंतील वाढ कॅलिफोर्नियापर्यंत येऊन पोंचली होती आणि सॅन्फ्रॅन्सिस्को बंदराला पुष्कळच महत्त्व चढूं लागलें होतें. चीनशीं जी नुकतीच व्यापाराची संधि मिळाली होती ती तर फारच लाभकारक आणि म्हणून लोभ उत्पन्न करणारी होती. परंतु तेथपर्यंत पॅसिफिक महासागरांतील प्रवास हा फारच लांब होता. त्यामुळें जपानच्या एखाद्या बंदराला लागून या प्रवासांत मध्यें एक मुक्काम करावा आणि पाणी, कोळसा, अन्न वगैरे सामग्री पुन्हां जहाजावर घ्यायला मिळावी अशी अमेरिकन लोकांची इच्छा होती. जपानची कोंडी फोडण्याचे अमेरिकेनें जे वारंवार प्रयत्न केले त्याचें हें कारण होतें.

१८५३ मध्यें अमेरिकन जहाजाचा एक काफिला अमेरिकेच्या अध्यक्षाचें पत्र घेऊन जपानला आला. जपानच्या लोकांनीं या वेळीं प्रथम हीं वाफेवर चालणारीं जहाजें पाहिलीं. यानंतर एक वर्षानेंच शोगुननें दोन बंदरें खुलीं करण्याचें कबूल केलें. ब्रिटिश, रशियन आणि डच या लोकांना जेव्हां ही वार्ता समजली, तेव्हां हेही लोक ताबडतोब इकडे आले आणि अशाच तऱ्हेचे तहनामे त्यांनीं शोगुनापाशीं केले. अशा रीतीनें २१३ वर्षांनंतर जपानचा जगाशीं पुन्हां एकदा संबंध चालू झाला.

परंतु यांतूनच पुढें गोंधळ उत्पन्न होणार होता. या सर्व परकी राज्यसत्तांना शोगुननें आपणच बादशहा आहोंत असें भासविलें होतें. परंतु या सुमारास शोगुन-बद्दल लोकांमध्यें मुळींच प्रेम उरलेलें नव्हतें. त्यामुळें त्याच्याविरुद्ध आणि त्यानें परकी लोकांशीं केलेल्या या तहांविरुद्ध एक मोठी चळवळ उत्पन्न झाली. या चळवळीमध्यें कांहीं परके लोक मारलेही गेले. तेव्हां या निमित्तानें या परकी राज्यसत्तांनीं जपानावर आरमारी हल्ला केला. शोगुनची परिस्थिति दिवसेंदिवस अधिकच चिकट होत गेली. शेवटीं लोकांच्या दडपणामुळें १८६७ सालीं शोगुननें अधिकारत्याग करावयाला संमति दिली. इ. स. १६०३ मध्यें इयेयासूपासून सुरू झालेली ही टाकूगावा शोगुनशाही (आतां ही गोष्ट तुला आठवत असेल किंवा नसेलही) अशा रीतीनें नष्ट झाली. नुसती शोगुनशाही नष्ट होऊन थांबली नाहीं. तर शोगुनशाहीबरोबर निर्माण झालेली व आज सातशें वर्षेपर्यंत चालत आलेली सगळी समाजपरंपराही तिच्याबरोबरच विलयाला गेली.

यानंतर जो नवा बादशहा झाला त्याच्या हातीं खरी सत्ता प्राप्त झाली. हा बादशहा म्हणजे बादशहा मुत्सुहितो हा होय. हा या सुमारास नुकताच गादीवर आलेला असून या वेळीं त्याचें वय अवघें चौदा वर्षांचें होतें. १८६७ पासून १९१२ पर्यंत सत्तेचाळीस वर्षें या बादशहानें राज्य केलें. त्याच्या या अमलाला मैजी युग म्हणजे प्रबुद्ध-राज्य-युग म्हणतात. याच्या अमलांत जपाननें प्रगतिपथावर खूप आघाडी मारली आणि पाश्चात्य राष्ट्रांचा कित्ता गिरवून कितीएक बाबतींत त्यांची बरोबरी गांठली. एका पिढींत जपाननें जो हा प्रचंड फेरबदल घडवून आणला तो खरोखरच मोठा, कोणाच्याही डोळ्यांत भरण्यासारखा असून साऱ्या जगाच्या इतिहासांत त्याला तोड नाहीं. या काळांत जपान देश मोठा उद्योगप्रधान देश झाला आणि पाश्चात्य राष्ट्रांच्या नमुन्याबरहुकूम तो साम्राज्यवादी आणि लोकांच्या प्रदेशावर आणि आर्थिक व्यवहारावर घाड घालणारा देशही झाला. प्रगतीचीं जेवढीं म्हणून बाह्य चिन्हें म्हणावीं तेवढीं सगळीं जपानमध्यें दिसून येऊं लागलीं. उद्योगधंद्यांच्या बाबतींत तर जपाननें आपल्या गुरूवर ताण केली. जपानची लोकसंख्याही झपाट्यानें वाढली. जपानचीं जहाजें साऱ्या पृथ्वीवरील समुद्रांत संचार करूं लागलीं. जपानची राजकीय सत्ताही वाढली आणि जगांतील प्रमुख राज्यसत्तांमध्यें जपानला स्थान मिळूं लागून आंतरराष्ट्रीय व्यवहारांत जपानच्या म्हणण्याला जास्त मान मिळूं लागला. परंतु बाहेरचा हा जो सगळा

फेरबदल झाला, तो तसा कांहीं जपानी लोकांच्या अंतःकरणापर्यंत खोल जाऊन भिडला नाहीं. हे सगळे फेरबदल अगदींच वरवरचे होते असें म्हणणें बरोबर होणार नाहीं; त्याहून त्यांचा परिणाम पुष्कळच खोल गेलेला होता. तरी पण तेथील राज्यकर्त्यांची भूमिका अद्यापि सरंजामशाही पद्धतीची राहिली होती आणि समाजव्यवस्थेतील मूलग्राही फेरबदलाशीं या प्राचीन पद्धतीच्या आवरणाची सांगड घालण्यासाठीं त्यांची धडपड चालू होती. या बाबतींत त्यांना पुष्कळच मोठ्या प्रमाणावर यशही आलें असें दिसूं लागलें.

जपानमध्यें हे सगळे मोठे फेरबदल घडवून आणण्याचें श्रेय सरदार-वर्गांतील एका दूरदर्शी गटाला होतें. त्यांना वडील मुत्सद्दी असें तेथें नांव मिळालेलें आहे. जपानमध्यें परकीयांविरुद्ध दंगे झाले आणि त्या निमित्तानें परकीयांच्या लढाऊ जहाजांनीं जपानवर तोफा डागल्या. त्या वेळीं आपण किती दुर्बल आहोंत हें जपानला दिसून आलें आणि या अपमानाचें शल्य जपानी लोकांच्या हृदयांत फार खोल घुसून गेलें. परंतु दैवाला दोष लावून, स्वतःचेच केंस ओढीत कपाळावर हात मारून ते स्वस्थ बसले नाहींत; आपल्या पराभवांतून आणि अपमानांतून, हीन दर्शेतूनच नवीन घडा शिकून गिरविण्याचा त्यांनीं तात्काळ निश्चय केला. हे जे वडील मुत्सद्दी होते त्यांनीं त्याबद्दलचा कार्यक्रम आंखला आणि तो जागरूकपणें पारही पाडला.

या कार्यक्रमाप्रमाणें जुना जो दाइम्योंचा सरदारवर्ग होता तो अजीबात रद्द करून टाकण्यांत आला. बादशहाची राजधानी क्योटो येथून काढून येडो येथें नेण्यांत आली; या शहराला आतां टोकिओ असें नांव देण्यांत आलें. नवीन राज्यघटना जाहीर करण्यांत आली. या राज्यघटनेप्रमाणें दोन कायदेमंडळें स्थापन करण्यांत आलीं; त्यांपैकीं कनिष्ठ कायदेमंडळ लोकनियुक्त प्रतिनिधींचें असून वरिष्ठ कायदेमंडळांत सगळे सरकारनियुक्त सभासद असावयाचे अशी योजना होती. शिक्षणांत, कायद्यांत, उद्योगधंद्यांत, सगळीकडे पुष्कळच फेरबदल करण्यांत आले. कारखाने उभारण्यांत आले; आधुनिक पद्धतीचें लष्कर आणि आरमार तयार करण्यांत आलें; निरनिराळ्या कामासाठीं परदेशांहून तज्ज्ञ मंडळी आणविण्यांत आली आणि जपानी विद्यार्थ्यांना यूरप आणि अमेरिकेंत पाठविण्यांत आलें. हिंदी लोक आतांपर्यंत करीत आले त्याप्रमाणें हे विद्यार्थी बॅरिस्टर वगैरे होण्यासाठीं तिकडे पाठविले जात नव्हते, तर शास्त्रज्ञ आणि यंत्रकलानिपुण होण्यासाठीं.

वडील मुत्सद्यांनीं हें सगळें बादशहाच्या नांवानें केलें. कारण कायदेमंडळें वगैरे सगळें नाटक जरी केलेलें होतें, तरी कायद्याप्रमाणें जपानी साम्राज्यामध्यें बादशहालाच सर्वस्वीं अनियंत्रित सत्ता शिल्लक होती. शिवाय, एकीकडे या सगळ्या सुधारणा एकामागून एक धडाक्यानें घडवून आणीत असतांनाच या वडील मुत्सद्द्यांनीं बादशहाबद्दलचा निष्ठेचा एक पंथच प्रसृत करण्याचें कार्य चालविलें होतें. ही खरोखरच मोठी विचित्र सांगड होती. एका बाजूला कारखाने, आधुनिक उद्योगधंदे

आणि लोकप्रतिनिधिसभांच्या राज्यकारभाराचें सोंग, तर दुसऱ्या बाजूला मध्ययुगाला साजेसें बादशहाचें देवासारखें पूजन! या दोन प्रकारांचें एकमेकांशीं क्षणभर तरी कसें पटून चालावें हाच मोठा प्रश्न होता; परंतु प्रत्यक्षांत या दोन्ही गोष्टींची सांगड ठीक चालू राहिली आणि आजच्या घटकेला ही सांगड तुटलेली नाहीं हें मात्र खरें. लोकांच्या ठिकाणीं बादशहाबद्दलची ही मोठीच पूज्यभावना होती; तिचा या वडील मुत्सद्द्यांनीं दोन प्रकारांनीं उपयोग करून घेतला; एक तर जुन्या प्रतिगामी आणि सरंजामशाही वर्गांवर त्यांनीं सगळ्या सुधारणा जबरदस्तीनें लादल्या. हे वर्ग बादशहाच्या नांवाला देशांत जें वजन होतें, त्यामुळें दबून गेले होते. नाहीं तर सुधारणांना त्यांनीं खास विरोध केला असता. दुसऱ्या बाजूला याच बादशहांच्या विषयींच्या पूज्य भावनेच्या बळावरच या वडील मुत्सद्द्यांनीं, जे पुरोगामी लोक जलद प्रगति करून सरंजामशाहीच्या सगळ्या डोलाऱ्याचाच पुरा नाश करायला उद्युक्त झालेले होते, त्यांनाही रोखून धरलें.

या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांमधील चीन आणि जपान यांच्यांतील फरक मोठा लक्षांत घेण्यासारखा आहे. जपाननें झपाट्यानें पाश्चात्य सुधारणा आत्मसात् करून टाकली; परंतु आपण पाहिलें आहे आणि यापुढेंही आणखी आपल्याला दिसून येणार आहे, कीं चीन देश अत्यंत लोकविलक्षण अडचणींत गुरफटला गेला; हें असें कां झालें असावें? चीनचा अत्यंत विशाल विस्तार, चीनची प्रचंड लोकसंख्या आणि क्षेत्र यांमुळेंच उलट चीनमध्यें नवीन फेरबदल होणें कठिण होऊन गेलें. पुष्कळ लोकसंख्या आणि मोठा प्रदेश या गोष्टी वर वर पाहतां सामर्थ्याच्या जनक अशा वाटतात; परंतु हिंदुस्थानलाही सामर्थ्याच्या जनक वाटणाऱ्या या गोष्टींमुळेंच यातना सोसाव्या लागत आलेल्या आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे चीनमध्यें प्रबल असें एकच एक मध्यवर्ती राज्य नव्हतें; म्हणजे काय तर चीनच्या निरनिराळ्या प्रांतांना पुष्कळशी स्थानिक स्वतंत्रता होती. त्यामुळें जपानमध्यें करतां आले त्याप्रमाणें चीनमध्यें मध्यवर्ती सरकारला सर्व सूत्रें हालवून मोठमोठे सामाजिक आणि आर्थिक फेरबदल घडवून आणणें शक्य नव्हतें. याशिवाय चीनची श्रेष्ठ संस्कृति चीनमध्यें आज हजारों वर्षांपासून नांदत आणि वाढत आलेली असून ती चीनच्या साम्राज्याच्या अंगीं इतकी मुरून गेलेली होती, कीं एकाएकीं ती दूर फेकून देणें हें सोपें काम नव्हतें; या बाबतींतही चीनचें हिंदुस्थानशीं साम्य आहे. उलटपक्षीं जपानची संस्कृति ही चीनपासून उसनी घेतलेली होती. त्यामुळें जपानला ती टाकून देऊन तिच्या जागीं दुसरीची स्थापना चीनपेक्षां सुलभतेनें करतां आली; चीनच्या अडचणींचें आणखी एक कारण म्हणजे चीनमध्यें यूरपीय राज्यांनीं चालविलेली एकसारखी ढवळाढवळ. बरें, चीन काय लहान देश होता? जवळजवळ एका मोठ्या खंडाएवढा देश! तो काय जपानच्या छोट्या बेटाप्रमाणें दारें-खिडक्या बंद करून कोंडून तरी टाकतां येणार होता? उत्तरेकडे आणि वायव्येकडे चीनच्या प्रदेशाला रशियाचें राज्य भिडलेलें होतें. नैर्ऋत्येला ब्रिटिशांचें साम्राज्य भिडलेलें होतें. दक्षिण दिशेकडून फ्रान्सचे हात थोडे

लांब केले कीं चीनला येऊन पोंचत होते. या यूरपीय राज्यांनीं नाना कारस्थानें करून चीनकडून महत्त्वाचे हक्क चीनमध्यें मिळविले होते. आणि तेथें त्यांचे फार मोठे व्यापारी हितसंबंध निर्माण झालेले होते. या हितसंबंधांमुळें चीनमध्यें ढवळाढवळ करावयाला त्यांना निमित्तांना कांहीं तोटाच नव्हता.

त्यामुळें जपान देश धूमधडाक्यानें पुढें जात चालला; तर इकडे चीन अजून आंधळ्यासारखा चांचपडत नवीन परिस्थितीशीं समरस होण्यासाठीं धडपड करीत होता. पण या धडपडींत त्याला यश कांहीं येत नव्हतें. तथापि यांत आणखी एक मोठीच चमत्कारिक गोष्ट पाहण्यासारखी आहे. जपाननें पाश्चात्यांची यंत्रसामग्री आणि उद्योगधंदे आपलेसे केले, आधुनिक पद्धतीचें लष्कर व आरमार उभारलें आणि अशा रीतीनें सुधारलेल्या औद्योगिक राज्यसत्तेचा वेष धारण केला. परंतु जपानला यूरपमधील तत्त्वज्ञान आणि नव्या कल्पना या कांहीं तितक्या सहज रीतीनें आपल्याशा करतां आल्या नाहींत. वैयक्तिक आणि सामाजिक स्वातंत्र्य, समाज आणि जीवन यांबद्दलचा शास्त्रीय दृष्टिकोण, या गोष्टी यूरपप्रमाणें जपानमध्यें उत्पन्न झाल्या नाहींत. मनांतून जपान देश अद्यापि सरंजामशाही प्रवृत्तीचा आणि एकतंत्री, जोहुकमी राज्यपद्धतीचा अभिमानी असाच राहिला आणि जगानें कधींच फेकून दिलेल्या राजनिष्ठेच्या भावनेला जपान देश कांहीं विचित्रपणें चिकटून राहिला. जपानमध्यें जी तळमळीची आणि स्वार्थत्यागपूर्ण अशी देशप्रेमाची भावना जागृत झाली, ती या बादशहाच्या निष्ठेचीच एक निराळी प्रतिकृति होती एवढेंच. राष्ट्रभक्ति–राष्ट्रवाद आणि बादशहाची भक्ति या दोन्ही भावना जपानमध्यें हातांत हात घालून जोडीजोडीनेंच वावरत होत्या. उलटपक्षीं, चीनमध्यें मोठी यंत्रसामग्री आणि उद्योगधंदे याचा उदय चटकन् झाला नाहीं. परंतु चिनी लोकांनीं, निदान आधुनिक पिढीच्या चिनी लोकांनीं, पाश्चिमात्य कल्पना, तत्त्वज्ञान आणि शास्त्रीय दृष्टिकोण यांचा मात्र स्वीकार केला. या गोष्टी एकंदर त्यांच्या आजपर्यंतच्या प्रवृत्तीपासून फारशा निराळ्या नव्हत्याच. तात्पर्य, आपल्याला असें आढळून येतें, कीं चीननें पाश्चात्य संस्कृतीचा खरा गाभा ओळखून त्याचा अंगीकार केला, तर उलट जपाननें पाश्चात्य संस्कृतीच्या अंतरंग गुणांकडे दुर्लक्ष करून त्या संस्कृतीचें निव्वळ बाह्य चिलखत आणि शस्त्रास्त्रें मात्र चढविलीं आणि त्यांच्या जोरावर जपाननें चीनच्या पुढें आघाडी मारली. तसेंच जपाननें चढविलेलें हें चिलखत आणि शस्त्रास्त्रें चांगलींच मजबूत असल्यामुळें यूरपीय देश जपानची प्रशंसा करूं लागले आणि त्याला त्यांनीं आपल्या पंक्तींत सामील करून घेतलें. पण चीन राहिला दुर्बलच! त्याच्याजवळ मॅक्झिम् तोफा (बंदुका) किंवा इतर शस्त्रास्त्रें सज्ज झालीं नाहींत. आणि म्हणून हे देश चीनचा अपमान करूं लागले, चीनला मोठमोठा सदुपदेश करूं लागले, शहाणपण शिकवूं लागले, त्याची लूट करूं लागले. आणि असें करतांना चीनजवळही कांहीं तत्त्वविचार आणि जीवनविषयक कल्पना असतील ही गोष्टसुद्धां त्यांनीं कधीं मनांत आणली नाहीं.




जपान देश यूरपीय राष्ट्राच्या औद्योगिक उत्पादनाच्या पद्धतीचेंच अनुकरण करून थाबला नाहीं. त्यांच्या साम्राज्यशाही आक्रमक धोरणाचेंही त्यानें अनुकरण केलें. यूरपियन राष्ट्रांचा हा शिष्य गुरूपेक्षांही जास्त कर्तबगार निघाला. त्यानें कित्येकदां गुरूवरही ताण करायला सुरुवात केली. जपानची खरी अडचण एकच होती; ती म्हणजे हें नवीन औद्योगीकरण आणि जुनी सरंजामशाही यांमधलि मूलभूत असा विरोध. हे दोन्ही प्रकार देशांत प्रचलित ठेवण्याच्या प्रयत्नांत जपानला आपल्या समाजव्यवस्थेंत आर्थिक समतोलपणा साधतां आला नाहीं. करांचें ओझें अतिशयच अवजड लादावें लागल्यामुळें लोक तक्रार करूं लागले. देशांतल्या देशांत

लोकांनीं गडबड करूं नये म्हणून जपाननेंही युद्ध सुरू करावयाचें, बाहेरच्या देशात साम्राज्यशाही मोहीम सुरू करावयाची आणि अशा रीतीनें लोकांचें लक्ष अंतर्गत प्रश्नांवरून उडून तिकडे लागेल असें करावयाचें, हा नेहमींचा तोडगा उपयोगांत आणला. त्याचप्रमाणें जपानमध्यें जे नवीन उद्योगधंदे सुरू झाले होते, त्यांच्याकरितां कच्चा माल आणि बाजारपेठा शोधण्यासाठींही जपानला इतर देशांकडे नजर टाकावी लागत होती. यापूर्वी औद्योगिक क्रांतीमुळें इंग्लंडला आणि नंतरच्या काळांत पश्चिम यूरपमधील इतर राष्ट्रांना असेच बाहेरच्या देशांत जाऊन प्रदेश जिंकावे लागले होते. जपानमध्येंही उत्पादन वाढलें आणि लोकसंख्येंत झपाट्यानें वाढ होत गेली; त्यामुळें अधिकाधिक अन्न आणि कच्चा माल यांची गरज उत्पन्न होत गेली. आतां या गोष्टी मिळवावयाच्या कोठून असा प्रश्न उभा राहिला. जपानच्या अगदीं शेजारचे देश म्हणजे चीन आणि कोरिया. चीनमध्यें व्यापाराला क्षेत्र चांगलें होतें; पण या देशांत आधींच लोकवस्ती दाट होती. परंतु चिनी साम्राज्याच्या वायव्य दिशेकडील एक मोठा भाग असा जो मांचुरिया प्रांत त्याच्यामध्यें आपली लोकसंख्या नेऊन वसाहत करायला आणि साधनसंपत्तीची वाढ करायला अजून थोडाफार अवकाश होता. म्हणून मांचुरिया आणि कोरिया यांच्यावर जपानची लोभी दृष्टि वळली.

त्याचप्रमाणें यूरपीय राष्ट्रें चीनकडून हक्कामागून हक्क मिळवीत चाललीं होतीं आणि चीनचा कांहीं कांहीं प्रदेशही आपल्या घशाखालीं घालीत होतीं. हाही एक जपानच्या काळजीचा विषय होता. त्यांचें हें आक्रमण जपानला मुळींच रुचण्यासारखें नव्हतें. आपल्यासमोरच्या एका मोठ्या देशाच्या भूमीवर जर या परकी राष्ट्रांनीं पक्के पाय रोवले, तर आपल्या स्वतःच्या सुरक्षितपणालाच मोठा धोका उत्पन्न होण्याचा संभव आहे, निदान आशिया खंडांतील आपल्या वाढीला तर त्यामुळें पायबंद खासच बसेल, हें जपानला दिसत होतें.

तेव्हां आपल्या देशाची कोंडी मोडून बाहेरच्या जगाशीं संबंध सुरू केल्यानंतर वीस वर्षांच्या आंतच जपाननें चीनवर आक्रमण करायला सुरुवात केली. थोडेसे मच्छीमारी लोक जहाज बुडाल्यामुळें चीनच्या किनाऱ्याला कोठेंसे लागले, वा त्यांचा कायसा खून झाला; एवढ्याबद्दलच्या क्षुद्र भांडणांतून जपानला चीनकडून नुकसानभरपाई मागण्याची सवड सांपडली. प्रथम अर्थातच चीननें अशी नुकसानभरपाई देण्याचें नाकारलें; परंतु जपाननें युद्धाची धमकी दिली. त्या वेळीं चीनचे हात अनाम प्रांतांत (वैतनाम) फ्रेंचांशीं लढण्यांत गुंतलेले होते. त्यामुळें चीनला जपानपुढें नमतें घ्यावें लागलें. ही १८७४ मधली हकिकत. या विजयानें धुंद होऊन आणखी कोठें प्रदेश मिळवितां येतात का, हें पाहण्याच्या खटपटीला जपान देश लागला. समोर कोरियाचें राज्य पाहून तोंडाला पाणी सुटल्यासारखेंच होतें; म्हणून कांहीं तरी एक क्षुल्लक निमित्त काढून जपाननें कोरियावर स्वारी करून कांहीं खंडणी वसूल केली आणि जपानी व्यापारासाठीं कांहीं बंदरें खुलीं करण्यास त्याला जपाननें भाग पाडलें.

फार दिवसांपासून कोरियाचें राज्य चीन देशाचें मांडलिक होतें. म्हणून चीनकडून मदत मिळते का यासाठीं कोरियानें खटपट करून पाहिली; परंतु त्याला मदत देण्याची चीनला शक्ति नव्हती. लढाई वगैरे केल्यास कोरियांत जपानचें प्रस्थ कदाचित् फारच माजेल या भीतीनें चिनी सरकारनें कोरियाला जपानपुढें तूर्त नमतें घेण्याचा सल्ला दिला आणि जपानला शह पोंचविण्यासाठीं पाश्चात्य राष्ट्रांशीं तह करण्यास सुचविलें. अशा रीतीनें १८८२मध्यें कोरियाचें रान जगाला खुलें झालें. पण झालें एवढ्यावरच जपानचें समाधान होण्यासारखें नव्हतें. तेव्हां चीनच्या अडचणीचा फायदा घेऊन जपाननें कोरियाचा प्रश्न पुन्हां एकदां उपस्थित केला आणि कोरियावर चीन व जपान अशा दोघांचें मिळून अधिराज्य सुरू करण्याला संमति देण्यास चीनला भाग पाडलें. म्हणजे गरीब बिचारा कोरिया देश आतां या दोन राष्ट्रांचा मांडलिक झाला. सगळ्याच दृष्टीनें पाहतां ही परिस्थिति उघडच अत्यंत असमाधानकारक होती, यांतून तंटा उत्पन्न होणें अनिवार्य होतें. जपानला तर असा तंटा हवाच होता. म्हणून १८९४ मध्यें जपाननें चीनवर युद्ध लादलेंच.

१८९४-९५ चें हें चिनी-जपानी युद्ध म्हणजे जपानला जणुं एक पोरखेळच झाला. जपानचें आरमार आणि लष्कर हीं दोन्ही अगदीं अद्ययावत् सुसज्ज होतीं. चीनचें लष्कर आणि आरमार दोन्ही जुन्या पद्धतीचीं आणि गैरवाकबगार होतीं. त्यामुळें जिकडे तिकडे जपानचा विजय झाला आणि चीनला जपानशीं तह करणें भाग पडलें. आतांपर्यंत पाश्चात्य राष्ट्रांना चीनमध्यें जें स्थान होतें तें स्थान या तहाप्रमाणें आतां जपानला प्राप्त झालें. कोरिया देश या तहाप्रमाणें स्वतंत्र करण्यांत आला. परंतु हें नुसतें बाहेरचें सोंग होतें. कोरियावर खरा ताबा एकटया जपानचाच राहिला. याशिवाय या तहाप्रमाणें चीनला नाइलाजानें मांचुरियांतील लियौतुंग द्वीपकल्प आणि त्यामधील पोर्ट आर्थर हें बंदर आणि फोर्मोसा व इतर कांहीं बेटें एवढा प्रदेशही जपानच्या स्वाधीन करावा लागला.

चिमुकल्या जपाननें प्रचंड चीनचा हा एवढा भयंकर पराभव केलेला पाहून जगांत सगळ्यांनाच आश्चर्य वाटलें. अति पूर्वेकडे असा एक समर्थ देश पुढें येतो हें पाहून पाश्चात्य राष्ट्राना समाधान थोडेंच होणार होतें? याच्या आधींच, चिनी-जपानी युद्ध सुरू असतांनाच जपानला विजय मिळण्याचा संभव दिसतांच या राष्ट्रांनीं जपानला असें बजावलें होतें, कीं जपाननें चीनच्या मुख्य प्रदेशांतील एखादा भाग घेतल्यास तें आम्हांला पसंत पडणार नाहीं. हें बजावणें न जुमानतांच जपाननें लियौतुंग द्वीपकल्प व त्यामधील पोर्ट आर्थरसारखें महत्त्वाचें बंदर हें स्वतःकडे घेण्याचें सोडलें नाहीं. परंतु हा प्रदेश जपानला पचूं दिला गेला नाहीं. रशिया, जर्मनी आणि फ्रान्स या तीन मोठ्या राष्ट्रांनीं जपाननें हा प्रदेश सोडून दिलाच पाहिजे असा आग्रह धरला आणि पुष्कळ चिडून आणि रागावून कांहीं उपयोग न होतां जपानला तो सोडावाच लागला. या तिन्ही राष्ट्रांना मिळून तोंड देण्याची जपानची ताकद नव्हती.

परंतु आपला हा अपमान जपान कधीं विसरला नाहीं. हें अपमानाचें शल्य

सारखें टोंचत राहिल्यामुळें याहूनही अधिक मोठा लढा करण्यासाठीं जपाननें तयारी चालविली आणि नऊ वर्षांनंतर असा मोठा लढा जपानचा रशियाशीं झालाही.

दरम्यान चीनवरील या विजयामुळें अतिपूर्वेकडील सर्वांत अधिक सामर्थ्यवान् राजसत्ता म्हणून जपानचें स्थान कायम झालें. चीन देश सर्वच बाजूंनीं किती दुबळा आहे हें साऱ्या जगापुढें आतां उघडें झालें आणि त्याची जी भीति पाश्चात्य राज्यसत्तांना वाटत होती ती आतां नाहींशी झाली. प्रेतावर किंवा मरूं घातलेल्या जीवाच्या शरीरावर गिधाडें जशी झडप घालतात, त्याप्रमाणें त्या सर्वांनीं एकदम चीनवर झडप घातली आणि जो तो आपल्या हातीं जें कांहीं लागेल तें लुबाडण्याचीं धडपड करूं लागला. फ्रान्स, जर्मनी, रशिया आणि इंग्लंड या सर्वांनींच चीनच्या किनाऱ्यावर बंदरें मिळविण्यासाठीं आणि खास हक्कांसाठीं मोठी,गर्दी उसळविली. सवलती मिळविण्यासाठीं या राष्ट्रांनीं चीनशीं अगदींच अन्याय्य, पापी आणि हलकटपणाचीं भांडणें सुरू केलीं. एवढेंसें कांहीं झालें तरी तेंच या राष्ट्रांना अधिकाधिक हक्क आणि सवलती मागायला निमित्त म्हणून पुरेसें होऊं लागलें. एकदां दोन मिशनऱ्यांचा कोठें तरी वध झाला. तेवढ्यावरून जर्मनीनें पूर्वेकडील शांटुंग द्वीपकल्पामधील किओचू हें बंदर चीनकडून हिसकावून घेतलें. जर्मनीनें हें बंदर घेतलें तेव्हां आम्हांलाही आमच्या हिश्शाची कांहीं लूट मिळाली पाहिजे असा इतर पाश्चात्य राष्ट्रांनीं हट्ट धरला. रशियानें पोर्ट आर्थर बंदर घेतलें. हेंच बंदर एका वर्षापूर्वी रशियानें जपानला सोडून द्यावयाला लावलें होतें. रशियानें पोर्ट आर्थर घेतलें तेव्हां त्याच्या तोडीस तोड म्हणून इंग्लंडनें वै-है-वै हें बंदर घेतलें. फ्रान्सनें अनामच्या राज्यांतलि कांहीं मुलूख आणि एक बंदर घेतलें. याशिवाय रशियानें मांचुरियाच्या उत्तर भागांतून एक रेल्वे-रस्ता बांधण्याची परवानगी मिळविली. इकडून रशियाला ट्रॅन्स सायबेरियन रेल्वेचा फांटा पुढें वाढवावयाचा होता.

ही सगळी निर्लज्ज लुटालूट आणि गर्दी म्हणजे खरोखरच एक अत्यंत लोकविलक्षण प्रकार होता. अर्थात् हे सगळे प्रदेश सोडतांना आणि या सवलती देतांना चीनला काय सुख थोडेंच होत होतें? प्रत्येक वेळीं आरमारी सामर्थ्याचें प्रदर्शन करून आणि तोफांच्या माऱ्याची धमकी दाखवून चीनवर या गोष्टींना संमति देण्यासाठीं जबरदस्ती करण्यांत आली होती. नाइलाजानें चीनला असें करावें लागलें होतें. या अत्यंत निंद्य वर्तनाला काय नांव देतां येईल बरें? भर रस्त्यावरील दरोडेखोरी? पेंढारीपणा? कांहीं नाहीं! साम्राज्यशाहीच्या व्यवहाराची ही रीतच आहे. कधीं कधीं साम्राज्यशाहीचा व्यवहार गुप्तपणानें चालू असतो. कधीं कधीं दुसऱ्याचें हित करण्यासाठीं लबाडीचें सोंग आणि मोठ्या पवित्र धर्मभावना यांच्या पांघरुणाखालीं साम्राज्यशाहीचा व्यवहार चालत असतो. परंतु चीनमध्यें १८९८ मधील साम्राज्यशाहीच्या या व्यवहारावर कसलेंही पांघरूण नव्हतें. कसलेंही आवरण नव्हतें. येथें साम्राज्यशाहीचा हा अत्यंत किळसवाणा व्यवहार साऱ्या जगापुढें अगदीं नागडा-उघडा उभा होता.

## ११७

# जपान रशियाचा पराभव करतो

२९ डिसेंबर, १९३२

अलीकडे मी तुला अतिपूर्वेकडील प्रदेशासंबंधीं लिहितों आहें आणि आजही तीच हकिकत मी पुढें चालू करणार आहें. भूतकालचीं हीं मांडणें आणि युद्धें यांच्या अडगळीचें ओझें मी उगीचच तुझ्या मनावर कां लादतों, याचें तुला कोडें पडण्याचा संभव आहे. कारण एक तर त्या विषयांत माधुर्य असें कांहीं नाहीं आणि शिवाय, या सगळ्या आता झाल्या-गेल्या गोष्टी. मलाही या गोष्टींवर तसा विशेष भर देण्याची इच्छा नाहीं; परंतु अतिपूर्वेकडे आजकाल ज्या घटना घडत आहेत त्यांपैकीं बहुतेक सर्व घटनांचें मूळ खास याच भानगडींमध्यें आहे. म्हणून आधुनिक प्रश्नांचें नीट स्वरूप समजून येण्यासाठीं या भानगडींची थोडीफार माहिती असणें आवश्यक आहे. हिंदुस्थानाप्रमाणेंच चीन देश हाही आज एक मोठा जागतिक प्रश्न होऊन बसला आहे आणि येथें बसून मी हें लिहितों आहें त्याच क्षणाला, जपानच्या मांचुरिया जिंकून घेण्याच्या प्रयत्नाबाबत आज त्या बाजूला मोठा तीव्र झगडा सुरू आहे.

गेल्या पत्रामध्यें मीं तुला १८९८ सालीं पाश्चात्य राष्ट्रांची आरमारी जहाजांच्या पाठिंब्याच्या जोरावर चीनमध्यें सवलती उकळण्यासाठीं जी एक मोठी गर्दी माजली, तिजबद्दल लिहिलें. या वेळीं या राष्ट्रांनीं सगळीं चांगलीं बंदरें आपल्या ताब्यांत घेतलीं आणि या बंदरांच्या आंतल्या भागांत खाणी खोदणें, आगगाडीचे रस्ते बांधणें वगैरे-सारखे अनेक प्रकारचे हक्क त्यांनीं संपादन केले. आणि तरीसुद्धां आणखी सवलतींसाठीं चीनच्या पाठीमागची त्यांची मागणी सुरूच राहिली. हीं परकीं राज्यें आतां चीनमध्यें आपल्या वर्चस्वाचे प्रदेश असावे याबद्दलचें बोलणें काढूं लागलीं. एखाद्या देशाची आपल्यामध्यें वांटणी करण्याचा आधुनिक साम्राज्य-सरकारांचा हा एक नाजुक मार्ग आहे. कबजा आणि ताबा यांचे जगांत कांहीं कांहीं कमीअधिक प्रमाणांचे प्रकार आहेत. खालसा करणें म्हणजे अर्थातच अगदीं संपूर्ण कबजा घेणें होय; संरक्षणासाठीं घेणें म्हणजे तरी कबजाच, परंतु थोडा कमी प्रमाणांत. वर्चस्वाचा प्रदेश करणें म्हणजे याहूनही थोडा कमी प्रमाणांत, परंतु अखेरीस कबजाच. प्रमाणाचा हा फरक असला, तरी या सगळ्या प्रकाराचें उद्दिष्ट एकच. यांतलें एक पाऊल पडलें कीं दुसरें त्यांतून आपोआप पडायचेंच. एवढेंच नव्हे, तर पुढें आपण यासंबंधीं अधिक चर्चा करूं तेव्हां आपल्याला दिसून येईल, कीं मुलूख खालसा करण्यानें उगीच राष्ट्रीय झगड्याच्या कटकटी पाठीमागें लागतात. म्हणून हा मार्ग आजकाल अगदींच जुनाट आणि जवळजवळ त्याज्य असा मानला जाऊं लागला आहे. त्यापेक्षां कोणत्याही देशावर

आर्थिक प्रभुत्व संपादन करावें आणि बाकीच्या भानगडींत पडूंच नये, हा मार्ग आजकाल सगळ्यांत किती तरी जास्त सोपा असा वाटूं लागला आहे.

तात्पर्य, या वर्चस्वाच्या प्रदेशांच्या तत्त्वाखालीं चीनची वांटणी होणार असा अगदीं रंग दिसूं लागला आणि त्यामुळें जपानच्या पोटांत भीतीचें काहूर माजलें. चीनवर विजय मिळविला खरोखर जपाननें. पण सगळें फळ पाश्चात्य राष्ट्रांना मिळाल्यासारखें झालें. चीनचे हे तुकडे होत असताना जिवाचा कितीही संताप झाला तरी कांहीं करतां न येऊन नुसते दांतओंठ चावीत पहात राहण्याचा हा प्रसंग जपानवर आला. जपानचा राग सगळ्यांत अधिक रशियावर होता. कारण राशियानेंच प्रथम जपानला पोर्ट आर्थरचा कबजा घेऊं दिला नाहीं व पुढें स्वतःच तें बंदर बळकावलें.

तथापि अद्यापि एक मोठें राष्ट्र असें शिल्लक होतें, कीं ज्यानें चीनमधल्या या सवलती उकळण्याच्या गर्दीत किंवा चीनची वांटणी करण्याच्या योजनेंत भाग घेतलेला नव्हता; तें राष्ट्र म्हणजे अमेरिका. इतर राष्ट्रांपेक्षां हें राष्ट्र मोठें पुण्यवान् किंवा सदाचरणी होतें, म्हणून तें आजपर्यंत या भानगडींत पडलें नव्हतें, असें कांहीं नव्हे; तर त्याचे हात आपल्या स्वतःच्या विशाल देशाची व्यवस्थित वाढ करण्याच्या कामांत गुंतलेले होते. तें आपलें राज्य पाश्चिमेकडे वाढवीत चाललेलें होतें; त्या भागांतील केवढे तरी मोठ-मोठे प्रदेश त्याला वसाहतीला लायक असे करावयाचे होते; त्याच कामांत त्याला आपली सर्व शक्ति आणि संपत्ति ओतावी लागत होती. एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष यूरपमधील सुद्धां किती तरी मोठें भांडवल अमेरिकेंत या कामांत गुंतलेलें होतें. तरीपण एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला अमेरिकन लोकही आपला पैसा गुंतवायला बाहेरच्या देशांत कोठें जागा मिळते का, असा विचार करूं लागले होते. त्यामुळें त्यांची नजर चीनकडे वळली. तेथें यूरपमधील राष्ट्रें "वर्चस्वाचे प्रदेश" पाडून चीनची वांटणी करण्याच्या नादांत होतीं आणि यांतून अखेरीस हे प्रदेश खालसाच व्हावयाचे होते. हा प्रकार जेव्हां अमेरिकन लोकांच्या नजरेस आला तेव्हां स्वाभाविकच त्यांना तो आवडला नाहीं. कारण या वांटणींत अमेरिकेला कांहींच हिस्सा मिळत नव्हता! त्यामुळें अमेरिकेनें मुक्त व्यवहाराचें, "उघड्या दाराचें" धोरण म्हणून जें धोरण प्रसिद्ध आहे तें चीनमध्यें सर्वांनीं स्वीकारावें असा आग्रह धरला. या धोरणाचा अर्थ असा, कीं व्यापार आणि उद्योगधंदा यांसाठीं चीनमध्यें सर्वांना सारख्या सवलती असाव्या, या अमेरिकेच्या आग्रहाला बाकीच्या राष्ट्रांनीं संमति दिली.

एकसारखें सुरू असलेलें हें आक्रमण पाहून चिनी सरकारला सर्वतोपरि भीति उत्पन्न झाली आणि आपल्यामध्यें सुधारणा केली पाहिजे आणि पुनर्घटना केली पाहिजे अशी चिनी सरकारची खात्री पटली. त्यानें तसें करण्याचा प्रयत्नही केला; परंतु त्यांत यश मिळण्याला त्याला सवडच मिळाली नाहीं. कारण परकीय राष्ट्रांच्या आणखी आणखी नव्या सवलतींच्या मागण्यांचें सत्र चालूच होतें. अलीकडे कांहीं वर्षें राजमाता महाराज्ञी झू शी ही कारभार सोडून एकांतांत काळ काढीत होती.

तिच्याकडून कदाचित् आपल्या देशाचें रक्षण होईल अशा बुद्धीनें चिनी लोकांची आशा आतां तिच्यावर खिळून राहिली. या बाबतींत कांहीं तरी कारस्थानाचा संशय येऊन, त्या वेळीं गादीवर असलेल्या बादशहानें तिला कैदेंत टाकावें असा विचार केला; परंतु या बाईनें त्याच्यावर कडी करून त्यालाच गादीवरून दूर केलें आणि सगळा कारभार आपल्या हातीं घेतला. जपाननें औद्योगिक वगैरे क्षेत्रांत जशा मूलभूत सुधारणा केल्या, तशा करण्याची मानगड या बाईनें केली नाहीं; तर चीनचें एक चांगलें प्रबळ लष्कर बनविण्याकडे तिनें आपली सगळी शक्ति खर्च केली. स्वातंत्र्य-रक्षणार्थ स्थानिक लष्करी संघ स्थापन करण्याला तिनें प्रोत्साहन दिलें. हे जे स्थानिक लष्करी संघ झाले त्यांनीं आपल्याला "ई हो तुआन"–"पवित्र ऐक्याचे संघ" असेंही नांव घेतलें होतें. कधीं कधीं त्यांना "पवित्र ऐक्याची मूठ"–"ई हो चुआन" असें म्हणत. हें नांव बंदरालगतच्या शहरांमधील यूरपीयन लोकांच्या कानांवर गेल्यानंतर त्यांनीं या नांवाचें भाषांतर बॉक्सर्स म्हणजे मुष्टियुद्ध खेळणारे असें केलें. चिनी भाषेतील एका सुंदर वाक्संप्रदायाचें हें बेंगरूळ भाषांतर आहे.

परकीय आक्रमण आणि परकीयांनीं चीन आणि चिनी लोक यांचे केलेले असंख्य अपमान यांविरुद्ध चीनमध्यें जी राष्ट्रीयत्ववर्धक अशी प्रतिक्रिया झाली, ती म्हणजे ही बॉक्सर संघांची संघटना. परकी लोकांबद्दल बॉक्सर लोकांच्या मनांत मुळींच आपलेपणा नव्हता. हे परकी लोक म्हणजे त्यांना सगळ्या जगांतील पापाच्या मूर्तीच वाटत यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं. मिशनरी लोकांचा तर त्यांना विशेष तिटकारा असे. कारण मिशनरी लोकांनीं प्रतापच तशा प्रकारचे गाजविले होते आणि जे चिनी लोक धर्मांतर करून ख्रिस्ती झालेले होते, त्यांना तर हे बॉक्सर लोक देशद्रोही मानीत. जगांत प्रस्थापित होऊं घातलेल्या नव्या घडीपासून आपलें संरक्षण करूं पहाणाऱ्या जुनाट चिनी समाजाचेच हे बॉक्सर लोक प्रतिनिधी होते. त्यामुळें त्याचा प्रयत्न नव्या जगांत कोणत्याही रीतीनें यशस्वी होण्यासारखा नव्हता.

एका बाजूला हे राष्ट्रप्रेमी, परकीयविरोधी, मिशनरीविरोधी, पुराणप्रिय असे लोक, आणि दुसऱ्या बाजूला पाश्चात्य लोक, यांच्यामध्यें विरोध उत्पन्न होणें अपरिहार्यच होतें. विरोधांतून झगडे निर्माण झाले. त्यांत एका इंग्रज मिशनऱ्याचा खून झाला. दुसरे कित्येक यूरपीय लोक आणि पुष्कळच धर्मांतरित चिनी ख्रिस्ती यांचे खून झाले. परकीय सरकारांनीं ही राष्ट्रभक्तिप्रेरित चळवळ दडपून टाकण्याबद्दल चिनी सरकारकडे मागणी केली. प्रत्यक्ष मनुष्यवधाचा दोष ज्यांच्या हातून घडला होता, त्यांना चिनी सरकारनें शिक्षा केल्या. परंतु त्यांनीं स्वतःच ज्या या संघाला जन्म दिला होता, त्यालाच अजिबात नेस्तनाबूत करण्याचें काम हें सरकार कसें करणार? दरम्यान बॉक्सर लोकांची चळवळ झपाट्यानें वाढत चालली. परकी सरकारांचे जे प्रतिनिधी चीनमध्यें होते त्यांना या चळवळीची भीति वाटून, आपापल्या जहाजांवरील सैन्य त्यांनीं जमिनीवर बोलावून घेतलें आणि पुन्हां एकदां परकी स्वारी सुरू झाली,

असें चिनी लोकांना भय वाटूं लागलें. लौकरच हातघाईला सुरुवातही झाली. जर्मन सरकारच्या प्रतिनिधीचा त्यांत वध झाला आणि पेकिंग येथें ज्या परकी राष्ट्रांच्या वकिलाती होत्या त्यांना वेढा घालण्यात आला.

चीन देशाचा बराचसा भाग, बॉक्सर लोकांच्या राष्ट्रीय चळवळीशीं सहानुभूति असल्यामुळें, लढाईला उभा राहिला; परंतु कांहीं कांहीं प्रांतांचे मुख्याधिकारी, राजप्रतिनिधी तटस्थ राहिले आणि अशा रीतीनें त्यांनीं या परकी राज्यांना मदतच केली. राजमाता सम्राज्ञी झु शी हिची सहानुभूति बॉक्सर लोकांविषयीं निःसंशय होती; परंतु उघडपणें तिनें त्यांच्याशीं कधीं संबंध ठेवला नाहीं. परकी लोकांची एकंदर असें सिद्ध करण्याची इच्छा होती, कीं हे बॉक्सर लोक म्हणजे निव्वळ लुटारू पेंढारी लोक होत. परंतु बॉक्सर लोकांचें हें १९०० सालचें बंड म्हणजे चीनला परकी देशांच्या ढवळाढवळीपासून मुक्त करण्यासाठीं केलेला खरोखर एक प्रयत्नच होता. सर रॉबर्ट हार्ट या नांवाचा एक वरिष्ठ दर्जाचा इंग्रज अधिकारी त्या वेळीं तेथील जकातखात्याच इन्स्पेक्टर जनरल–सर्वांत मुख्य अधिकारी होता. परदेशी वकिलातीवर जो वेढा पडला होता, त्यांत हा अधिकारी सांपडलेला होता. त्यानें लिहिलें आहे कीं "चिनी लोकांच्या भावना ज्या इतक्या खवळल्या होत्या त्याचा दोष परकी लोकांकडेच, विशेषतः मिशनरी लोकांकडे होता; आणि हें बंड मुळांत राष्ट्रीय स्वरूपाचेंच होतें. त्याचे बहुतेक हेतू अत्यंत न्याय्य होते यांत काडीचा संशय घेण्यासारखा नाहीं. किंबहुना हे हेतू असे होते याबद्दल लोकाना जितकें सांगावें तितकें थोडेंच होईल."

आपल्या पायांखालीं चिरडलेल्या एखाद्या आळीनें आपल्यावर एकाएकीं अशा रीतीनें उलटावें हें पाहून पाश्चात्य राज्यसत्तांचा तिळपापड झाला. पेकिंग-वेढ्यांत सांपडलेल्या आपल्या लोकांना वांचविण्यासाठीं व त्यांच्या संरक्षणासाठीं या राष्ट्रांनीं ताबडतोब तिकडे आपलीं सैन्यें मोठ्या झपाट्यानें पाठविलीं. या कामासाठीं त्यांनीं सैन्य पाठविणें रास्तही होतें. एका जर्मन सेनापतीच्या आधिपत्याखालीं, एक आंतरराष्ट्रीय (अनेक राष्ट्रीय) सैन्य वकिलातीवरील संकट निवारण्याकरितां म्हणून पेकिंगवर कूच करून गेलें. जर्मनीच्या कैसरनें चीनमधील आपल्या सैन्याला हुकूम दिला कीं प्राचीन काळच्या हूण लोकांप्रमाणें तुम्ही चीनमध्यें वागा. बहुधा या हुकुमावरूनच गेल्या महायुद्धांत इंग्रज लोक जर्मनांना हूण म्हणून संबोधूं लागले असावे.

कैसरचा हा सल्ला केवळ त्याच्याच सैन्यानें नव्हे, तर बाकीच्याही सर्व परकीय सैन्यांनीं अमलांत आणला. पेकिंगकडे कूच करीत असतांना या लोकांनीं वाटेंत इतकें अत्याचारी वर्तन केलें, कीं त्यांच्या हातीं पडण्यापेक्षां आत्महत्या करणें बरें असें लोकांना होऊन गेलें. त्या काळीं चिनी स्त्रियांमध्यें आपलीं पावलें आंखूड करण्याची पद्धति होती. त्यामुळें त्यांना सहज पळूनही जातां येत नव्हतें. म्हणून त्यांपैकीं पुष्कळांनीं आत्महत्या केल्या. अशा रीतीनें आपल्या पाठीमागें आत्महत्या, मृत्यु आणि

जळतीं खेडेगांवें यांची काळीकुट्ट छाया ठेवीत हें सैन्य पुढें कूच करीत चाललें होतें. या दोस्त राष्ट्रांच्या सैन्याबरोबर असणारा एक लष्करी बातमीदार लिहितो,

" यांत कांहीं अशा गोष्टी आहेत, कीं त्या मला लिहूं दिल्या जाणार नाहींत, लिहिल्या तरी इंग्लंडमध्यें कोणी छापणार नाहींत किंवा छापूं दिल्या जाणार नाहींत. या गोष्टींवरून असें दिसतें, कीं आमची पाश्चात्य सुधारणा म्हणजे आमच्या आंगच्या रानटीपणावरचा, असंस्कृतपणावरचा निव्वळ मुलामा मात्र आहे. जगांतल्या कोणत्याच लढाईसंबंधीं जें जें घडलें तें तें जसेंच्या तसें, वस्तुसत्य, आजपर्यंत केव्हांच लिहिण्यांत आलेलें नाहीं. ही लढाई कांहीं या परंपरेला अपवाद नाहीं. "

हीं सैन्यें पेकिंगला पोंचून त्यांनीं तेथील वकिलातीवरील संकटाचें निवारण केलें आणि त्यानंतर मग पेकिंग शहराची लूट करण्यांत आली. पिझारोच्या कालापासून इतिहासांत एवढी मोठी लूट दुसरी कोणतीच झाली नाहीं. कलाकौशल्यात्मक वस्तूंचे पेकिंगमधले संग्रह अगदींच अडाणी व असंस्कृत अशा लोकांच्या हातांमध्यें पडले. त्यांना या वस्तूंचें महत्त्व किंवा किंमतसुद्धां समजण्याची अक्कल नव्हती. अत्यंत खेद करण्यासारखी गोष्ट म्हणजे धर्माचें कुंकूं लावणाऱ्या मिशनऱ्यांनींसुद्धां या लुटालुटींत भाग घेतला. थोड्या थोड्या लोकांचे गट घरोघर जात आणि घरांवर एक पत्रक लावून जाहीर करीत, कीं हें घर आमच्या मालकीचें आहे. मग ते त्या घरांतील सर्व किंमती वस्तूंची विक्री करीत, आणि नंतर त्यापुढच्या मोठ्या घरांत हे लोक प्रवेश करीत ; अशी ही पद्धतशीर लूट होती.

याच वेळीं चीनची वांटणी होऊन जावयाची ; परंतु या पाश्चात्य राष्ट्रांमधील आपसांतील चुरस आणि कांहीं अंशीं अमेरिकन सरकारचें धोरण यांमुळें चीनवरील हें संकट टळलें ; परंतु अपमानाचा फार मोठा घोट गिळणें चीनला भाग पडलें. चीनवर इतक्या म्हणून अन्यायाच्या अटी लादण्यांत आल्या, कीं त्यांना जणुं अंतच नाहीं. उदाहरणार्थ, पेकिंगमध्यें एक आणि आगगाडीच्या रस्त्यांचें संरक्षण करण्यासाठीं म्हणून एक, परकी लोकांचें लष्कर चीनमध्यें कायमचें रहावयाचें; चीनमधील पुष्कळसे किल्ले नष्ट करून टाकावयाचे; परकीयविरोधी अशा कोणत्याही संस्थेचा सभासद होण्याबद्दल फांशीची शिक्षा, पूर्वीच्यापेक्षां किती तरी अधिक व्यापारी सवलती आणि नुकसानभरपाईदाखल भली मोठी रक्कम ; परंतु या सर्वांहूनही अत्यंत भयंकर तडाखा म्हणजे बॉक्सर चळवळींतील राष्ट्रभक्त पुढाऱ्यांना ' बंडखोर ' म्हणून ठार करण्याला चिनी सरकारला भाग पाडण्यांत आलें. इतिहासांत ' पेकिंगच्या तहाचा मसुदा ' म्हणून प्रसिद्ध असलेला मसुदा हा अशा स्वरूपाचा असून त्याच्यावर १९०१ सालीं सह्या झाल्या.

खास चीनमध्यें आणि विशेषतः पेकिंगच्या आसपास हा सगळा प्रकार चालू असतां या सगळ्या अंदाधुंदीच्या परिस्थितीचा फायदा घेऊन रशियन सरकारनें पुष्कळ मोठें सैन्य सैबेरियांतून मांचुरियामध्यें पाठविलें. चीनला तर याविरुद्ध कांहींच करण्याची ताकद नव्हती. जास्तींत जास्त म्हणजे निषेध व्यक्त करावयाचा एवढेंच चीनच्या

हातीं होतें. परंतु झालें काय, कीं रशियन सरकारनें चीनचा एवढा मोठा तुकडा आपल्या कबजांत घ्यावा ही गोष्ट बाकीच्या पाश्चात्य राष्ट्रांना अतिशयच नापसंत होती. या घटनेमुळें जपानी सरकारला तर फारच चिंता उत्पन्न झाली. त्याला ही गोष्ट धोक्याची वाटली. तेव्हां या सर्व राष्ट्रांनीं मिळून असा आग्रह धरला, कीं रशियानें मांचुरियांतून माघार घेतली पाहिजे. त्यावर लोकांनीं आपल्या सद्धेतूबद्दल असा संशय घ्यावा याबद्दल आपल्याला फार आश्चर्य वाटतें आणि आपल्या पवित्र मनाला त्यामुळें फार मोठें दुःख झालें, असा आविर्भाव रशियन सरकारनें आणून बाकीच्या राष्ट्रांना त्यानें आश्वासन देण्याचा यत्न केला, कीं चीनच्या सार्वभौमत्वाला किंवा राज्याधिकाराला यत्किंचित् धक्का लावण्याचा आपला हेतु नाहीं आणि मांचुरियांतील रशियन रेल्वेवर जी गडबड माजली आहे ती शांत होतांच आपण आपलें सैन्य माघारें काढून घेणार आहोंत. झालें, एवढ्यावर सगळ्यांची समजी झाली आणि आपण किती स्वार्थरहित आणि पुण्यशील लोक आहोंत म्हणून या राष्ट्रांनीं परस्परांच्या पाठीही थोपटून घेतल्या असल्या पाहिजेत, हें निःसंशय. परंतु इतकें होऊनही रशियन सैन्य मांचुरियांत तर राहिलेंच ; पण आणखी पुढें त्यानें कोरियाच्या सरहद्दीपर्यंतचा मुलूख व्यापला.

मांचुरियापासून कोरियापर्यंत रशियाचें हें पाऊल पुढें पडलेलें पाहून जपानच्या अंगाचा फार तिळपापड झाला; म्हणून जपाननें कोणाला कळूं न देतां अतिशयच कडेकोट लढाईची तयारी केली. १८९५ सालची आठवण तें राष्ट्र विसरलें नव्हतें. चीनच्या लढाईनंतर जपानच्या ताब्यांत आलेलें पोर्ट आर्थर बंदर तीन मोठ्या राष्ट्रांनीं एकत्र होऊन जपानला सोडून द्यावयाला लाविलें होतें. असा प्रकार पुन्हां होऊं नये अशी त्याची खटपट होती. जपानी लोकांनीं पाहिलें, कीं इंग्लंड हें एक असें राष्ट्र आहे, कीं त्याला रशियाच्या चाललेल्या वाढीची भीति वाटत होती आणि त्या वाढीला पायबंद घालावा असा त्याचा उद्देश होता. १९०२ सालीं जपान आणि इंग्लंड यांचा एक तहनामा झाला. अतिपूर्वेकडे या दोघांपैकीं कोणावरही दडपण आणण्यासाठीं इतर कोणीं राष्ट्रांनीं एकत्र होणें अशक्य व्हावें हा या तहाचा हेतु होता. जपानला आतां निर्धास्तपणा वाटून त्यानें रशियाशीं चढाईखोर धोरण अवलंबिण्यास सुरुवात केली. रशियानें मांचुरियांतून आपलें सैन्य मागें घेतलें पाहिजे असें जपानचें मागणें रशियाकडे गेलें ; परंतु त्या काळच्या रशियन झारशाहीला मूर्खासारखें असें वाटत होतें, कीं जपान म्हणजे एक कःपदार्थ देश; तो म्हणजे आपल्याविरुद्ध लढाईस उभा राहील अशी त्यांची केव्हांच कल्पना झाली नाहीं.

१९०४ च्या सुरुवातीला या दोन देशांत युद्ध सुरू झालें. जपानची युद्धाची पुरी तयारीच होती आणि जपानी लोक त्यांच्या सरकारच्या प्रचारामुळें आणि त्यांच्यामधील राजपूजेच्या भावनेमुळें राष्ट्रप्रेमाच्या भरानें भडकून गेलेले होते. उलटपक्षीं रशियाची लढाईची तयारी मुळींच नव्हती आणि तेथील अनियंत्रित राजसत्तेला

आपला कारभार चालू ठेवण्यासाठीं लोकांवर एकसारखा जुलूम करीत रहावें लागत होतें. हें युद्ध दीड वर्षपर्यंत चालू राहिलें आणि सर्व आशिया खंड, यूरप खंड आणि अमेरिका यांच्या डोळ्यांसमोर जपाननें जामिनीवर आणि समुद्रावर विजयामागून विजय मिळाविले. जपान्यांनीं अचंबा करण्यासारखीं त्यागाचीं कृत्यें करून आणि भयंकर कत्तली करून पोर्ट आर्थर बंदर सर केलें. रशियानें लढाऊ जहाजांचा एक मोठा काफिला समुद्रमार्गें इतक्या लांब अतिपूर्वेकडे पाठविला. अर्ध्या जगाचा दीर्घ प्रवास करून हजारों मैलांच्या प्रवासांत टक्केटोणपे खाऊन, भिजून, चिखल खाऊन हें आरमार जपानच्या समुद्रांत एकदांचें दाखल झालें आणि तेथें जपान आणि कोरिया याच्यामधील अरुंद सामुद्रधुनीमध्यें जपान्यांनीं तें बुडाविलें आणि त्या काफिल्याच्या ॲडमिरललाही समुद्रतळाशीं पोंचविलें.

रशियाला, म्हणजे झारशाहीखालच्या रशियाला, एकामागून एक पराभवाचे तडाखे खावे लागले. खरें पाहतां रशियाजवळ शक्तीचा भरपूर सांठा होता. याच रशियानें शंभर वर्षांपूर्वी महान् नेपोलियनला खडे चारले नव्हते काय? पण त्या वेळीं खऱ्या रशियाला, रशियाच्या सामान्य जनतेच्या शब्दाला, मोल होतें.

या माझ्या पत्रांमध्यें मी सारखा रशिया, इंग्लंड, फ्रान्स, चीन, जपान अशा देशांचा, जणुं कांहीं यांपैकीं प्रत्येक देश एकेक स्वतंत्र व्यक्ति आहे असें भासावें, अशा प्रकारचा उल्लेख करीत आलों आहें. ही एक मला भलतीच वाईट खोड लागली आहे, पुस्तकें वाचून आणि वर्तमानपत्रें वाचून. खरोखर मला म्हणावयाचें असतें, त्या त्या काळचें रशियन सरकार, इंग्लिश सरकार वगैरे. यांपैकीं एखादें सरकार केवळ एखाद्या अगदींच लहान गटाच्या प्रतिनिधींचें असेल अथवा एखादें एखाद्या मोठ्या वर्गाचें प्रतिनिधि असेल; परंतु असें कोणतेंही सरकार खरोखर त्या त्या देशाच्या सर्व लोकांचें प्रतिनिधि असेल असें म्हणणें हें बरोबर नाहीं. एकोणिसाव्या शतकांतील इंग्लंडचें सरकार कोणाचें प्रतिनिधि होतें असें म्हणतां येईल? तर ज्यांचा पार्लमेंटवर ताबा चालत होता अशा जमीन-मालक आणि वरिष्ठ मध्यमवर्गीय सुखवस्तु लोकांच्या लहानशा एका गटाचें. देशांतील फार मोठ्या बहुसंख्य लोकांना राज्यकारभाराच्या बाबतींत शब्दही काढावयाचा अधिकार नव्हता. आज हिंदुस्थानांतसुद्धां आम्ही नाहीं का म्हटलेलें ऐकत, कीं अमुक गृहस्थांना म्हणे हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून राष्ट्रसंघांत, नाहीं तर गोलमेज-परिषदेला, अथवा अशा अन्य ठिकाणीं पाठविलेलें आहे म्हणून? पण ही सगळी निरर्थक बडबड आहे. जे प्रतिनिधी म्हणून जात असतात, त्यांची निवड जोंपर्यंत हिंदुस्थानांतील लोकांकडून होत नाहीं, तोंपर्यंत हे लोक हिंदुस्थानचे प्रतिनिधी होऊं शकत नाहींत. आज ते लोक हिंदुस्थान सरकारनें नेमलेले लोकच आहेत. आणि हें हिंदुस्थान सरकारसुद्धां, नांव कांहींही असलें तरी ब्रिटिश राज्यसत्तेचें–सरकारचें–एक निव्वळ खातें मात्र आहे. रूसो-जपानी युद्धाच्या वेळीं रशियामध्यें अनियंत्रित राजसत्ता नांदत होती. रशियामध्यें समाविष्ट होणाऱ्या

एकूण एक प्रदेशावरील झार हा एक एकतंत्र राजा होता, बादशहा होता. आणि त्यात भर म्हणजे तो एक महामूर्ख सत्ताधीश होता. रशियांतील शेतकऱ्यांना आणि कामकऱ्यांना लष्कराच्या जोरावर दडपून टाकण्यांत आलेलें होतें. प्रत्यक्ष मध्यम वर्गांतील लोकांनाही राज्यकारभारामध्यें कांहीं बोलायला अधिकार नव्हता. या जुलुमाविरुद्ध डोकें वर करून हातपाय हालविण्याचा प्रयत्न पुष्कळ तरुण लोक करीत आले होते आणि आपल्या स्वातंत्र्यासाठीं त्यांनीं प्राणही अर्पण केले होते. यामध्यें अर्थात् तरुण मुलीही होत्या. तेव्हा मी जेव्हां रशियानें अमुक केलें, तमुक केलें, जपानशीं लढाई केली म्हणतों, तेव्हां माझ्या म्हणण्याचा अर्थ इतकाच, कीं झारशाहीनें हें असें केलें; दुसरा कांहीं नाहीं.

या जपानच्या लढाईंत भयंकरच मार खावा लागल्यामुळें रशियांतील सामान्य जनतेच्या हालअपेष्टा आणखीच वाढल्या. सरकारवर दडपण आणण्यासाठीं म्हणून कारखान्यांतील मजूर वारंवार संप करूं लागले. २२ जानेवारी १९०५ सालीं कित्येक हजार शेतकऱ्यांची आणि कामगारांची एक अत्यंत शांततायुक्त मिरवणूक एका पाद्याच्या नेतृत्वाखालीं झारच्या विंटर पॅलेसकडे 'हालअपेष्टांतून आम्हांला सोडवा' म्हणून झारला विनंति करण्यासाठीं निघाली. झारनें या लोकांना जें काय बोलावयाचें होतें तें ऐकून न घेतां त्यांच्यावर गोळीबार केला. त्या भयंकर कत्तलीमध्यें २०० लोक मरण पावले आणि पीटर्सबर्ग शहरांतील थंडीच्या दिवसांतील तें बर्फ रक्तानें लाल होऊन गेलें! त्या दिवशीं रविवार होता. म्हणून तेव्हांपासून या दिवसाला "रक्ताळलेला रविवार" असें नांव पडलेलें आहे. या प्रसंगामुळें साऱ्या देशांत मोठीच खोलपर्यंत खळबळ माजली. कामगारांनीं संप केले आणि त्यांतूनच राज्यक्रांति करण्याचा एक नवा प्रयत्न निघाला. झारच्या सरकारनें हा क्रांतीचा प्रयत्न अत्यंत क्रूरपणें दडपून टाकला. या क्रांतीची हकिकत आपण आपल्या दृष्टीनें पुष्कळ कारणांसाठीं पाहाण्यासारखी आहे. पुढें बारा वर्षांनीं १९१७ मध्यें रशियाचें सारेंच स्वरूप पार पालटून टाकणारी जी महान् क्रांति झाली, तिची ही १९०५ ची क्राति म्हणजे एक प्रकारची पूर्वतयारीच होती. या अयशस्वी क्रांतीच्या काळात क्रांतिकारक कार्यकर्त्यांनीं पुढच्या काळांत अतिशय प्रसिद्धीस आलेलीं जीं सोव्हिएट्स म्हणजे संघ त्यांची प्रस्थापना केली.

चीन-जपान आणि रूसो-जपानी युद्ध यांच्याविषयीं बोलतां बोलतां माझ्या नेहमींच्या खोडीप्रमाणें मी वाहत वाहत रशियांतील १९०५ च्या राज्यक्रांतींत येऊन दाखल झालों आहें; परंतु मांचुरियांतील या लढाईची पार्श्वभूमि तुला समजून सांगण्यासाठीं मला ही मानगड या ठिकाणीं थोडीशी सांगावी लागली. हा जो क्रांतीचा प्रयत्न झाला आणि त्यांत रशियांतील लोकाच्या असंतोषाचा जो पारा चढलेला दिसला, त्यामुळेंच मुख्यतः झारनें नमतें घेऊन जपानशीं तह केला.

सप्टेंबर १९०५ मध्यें पोर्टस्माउथ येथें तहावर सह्या होऊन हें रूसो-जपानी

युद्ध संपलें. हें पोर्टस्माउथ बंदर अमेरिकेंत आहे. या ठिकाणीं अमेरिकेच्या अध्यक्षांनीं दोन्ही पक्षांना बोलावून घेतलें होतें आणि तेथेंच तहाचें काम पुरें झालें. चीन-जपानच्या युद्धांत लिऔतुंगच्या द्वीपकल्पाचा प्रांत आणि पोर्ट आर्थर बंदर जपानला सोडून द्यावें लागलें होतें हें तुला आठवत असेल. आतां या तहामुळें हा प्रांत आणि हें बंदर अखेरीस जपानला मिळालें. रशियन लोकांनीं मांचुरियांत जो आगगाडीचा रस्ता बांधला होता त्याचाही बराचसा भाग आणखी वर जपानला मिळाला आणि जपानच्या उत्तरेकडील सखालीन बेटांतील अर्धा भाग जपानला मिळाला. त्याशिवाय रशियानें कोरियावर हक्क न सांगण्याचें कबूल केलें.

अशा रीतीनें जपानचा विजय झाला आणि आतां जगांतील श्रेष्ठ राजसत्तांच्या जादूनें भारलेल्या परिसरांत जपानचा प्रवेश झाला. जपान पडला आशिया खंडांतला देश. तेव्हां त्याच्या विजयामुळें आशिया खंडांतील सर्व देशांमध्यें फारच दूरगामी परिणाम झाले. मी लहान असतांना या विजयामुळें माझें डोकें कसें उत्साहानें भरून जात असे हें मीं तुला मागें सांगितलेंच आहे. आशिया खंडांतील किती तरी समजूं लागलेल्या मुलांमुलींच्या अंतःकरणांत असें हें उत्साहाचें वारें माझ्याप्रमाणेंच खेळूं लागलें होतें. या युद्धांत एका मोठ्या यूरपीय राष्ट्राचा पराभव झाला होता. तेव्हां प्राचीन काळीं ज्याप्रमाणें आशिया खंडानें यूरपचा पुष्कळदां पराभव केला होता, तसाच आशियाला तो अजूनही करतां येईल हें वाटणें त्या उत्साहाचें कारण आणि स्वरूप होतें. या युद्धानंतर पूर्वेकडील देशांत राष्ट्रवादाचें वारें झपाट्यानें वाढत गेलें आणि 'आशियांतील लोकांसाठीं आशिया खंड' अशा घोषणा होऊं लागल्या; परंतु हा जो नवा राष्ट्रवाद होता तो कांहीं केवळ भूतकाळाकडे परत जाणारा, जुन्या आचार-विचारांना चिकटून बसणारा नव्हता. जपाननें जय मिळविला याचें कारण जपाननें पाश्चिमात्यांची नवीन औद्योगिक उत्पादनपरंपरा उचलली, हें लोकांनीं ओखळलें होतें आणि या पाश्चिमात्यांच्या कल्पना आणि उत्पादनपरंपरा साऱ्या पौर्वात्य देशांत दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होत चालल्या होत्या.

## ११८

## चीनमध्यें प्रजासत्ताक राज्य स्थापन होतें

३० डिसेंबर, १९३२

जपानच्या रशियावरील विजयामुळें आशियांतील राष्ट्रांना आनंद होऊन मूठभर मांसच चढल्यासारखें कसें झालें हें आपण पाहिलें. त्याचा ताबडतोबीचा परिणाम मात्र एवढाच झाला, कीं जगांत जीं मूठभर चढाऊ धोरणाचीं साम्राज्यशाही राष्ट्रें होतीं

त्यांच्यामध्यें आणखी एकाची भर पडली. या भरीचा पहिला तडाखा कोरियाला सहन करावा लागला. जपानचा उदय म्हणजेच कोरियाचें मरण ठरलें. जपाननें आपलीं द्वारें खुलीं करून जगाशीं संबंध जोडल्या दिवसापासून सबंध कोरिया आणि मांचुरियाचा कांहीं भाग आपला म्हणून खास हेरून ठेवलेला होता. अर्थातच चीनचें अखंडत्व आणि कोरियाचें स्वातंत्र्य यांना धक्का लावण्याचा आपला हेतु नाहीं हें मात्र जपान देश वारंवार जाहीर करीतच होता. एखाद्याच्यावर दरवडा घालीत असतांनासुद्धां आपण हें तुझ्याविषयींच्या सद्भावनेनें आणि तुझ्या हितासाठींच करीत आहोंत अशी, किंवा एखाद्याचा प्रत्यक्ष प्राण घेत असतांही मनुष्यजीवनाचें पावित्र्य आपण केवढें मोठें मानतों अशाविषयींची, तोंडभर आश्वासनें देत राहण्याची साम्राज्यशाही राष्ट्रांची नेहमींची पद्धति असते. म्हणून जपाननें इकडे आपण कोरियामध्यें कांहीं ढवळाढवळ करणार नाहीं असें मोठें गंभीरपणानें आणि ऐटींत जाहीर केलें आणि त्याच वेळीं कोरियाचा कबजा मिळविण्याचें आपलें जुनें राजकारण पुढें चालूच ठेवलें. जपानचीं चीन व रशिया यांच्याशीं जीं युद्धें झालीं, त्यांचें तरी मूळ कारण आणि उद्दिष्ट कोरिया आणि मांचुरिया हेच प्रांत होते. एकेक पाऊल जपानचें आपल्या उद्दिष्ट मार्गानें पुढेंच पडत चाललें होतें आणि आतां चीन आणि रशिया यांचा पराभव झाल्यानंतर तर जपानचा मार्ग मोकळाच झाला होता.

आपलें साम्राज्यशाही धोरण चालविण्याच्या बाबतींत अमुक एक गोष्ट वाईट, ती कशी करावी, अशी शंका म्हणून कधीं जपानला शिवली नाहीं. जें हातीं लागलें तें उघड उघड गिळंकृत करण्याचा क्रम जपाननें चालू केला; आपल्या हेतूंवर किंवा कारस्थानांवर कांहीं पांघरूण घालावें असा मुळींसुद्धां विचार त्यानें केला नाहीं. पुष्कळ पूर्वी, १८९४ सालींच चीन-जपान युद्ध सुरू होण्यापूर्वींच, जपानी लोक कोरियाची राजधानी सेऊल येथील राजवाड्यांत जबरदस्तीनें घुसले होते आणि तेथील राणी त्यांचे हुकूम मानीना म्हणून त्यांनीं तिला राजवाड्यांतून उचलून, गादीवरून दूर करून, कैदेंत टाकलें होतें. आणि १९०५ चीं रूसो-जपानी लढाई संपल्यानंतर तर जपानी सरकारनें कोरियाच्या राजाला आपल्या देशाचें स्वातंत्र्य नष्ट करून जपानचें अधिराज्य मान्य करण्याच्या करारावर सही करावयाला भाग पाडलें होतें. यानंतर पांच वर्षांच्या आंत या दुर्दैवी राजाला गादीवरून अजिबात काढून टाकण्यांत आलें आणि कोरिया देश खालसा करून जपानी साम्राज्यांत दाखल करण्यांत आला. १९१० सालची ही हकिकत. सुमारें तीन हजारांहून जास्त वर्षांच्या स्वातंत्र्याच्या दीर्घ कालानंतर अशा रीतीनें कोरियाचें स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्व नाहींसें झालें.

या वेळीं ज्या राजाला गादीवरून काढण्यांत आलें तो पांचशें वर्षांपूर्वी ज्या घराण्यानें कोरियांतून मंगोलियन लोकांना हांकलून दिलें त्यांचा वंशज होता. पुढें आपली वडील भगिनी जी चीनची संस्कृति तिच्याप्रमाणेंच कोरियाची संस्कृति पण

लांकडासारखी निर्जीव, निचरा नसलेल्या तलावांतील पाण्याप्रमाणें सडलेली अशी झाली आणि याबद्दलचें प्रायश्चित्त कोरियाला घ्यावें लागलें.

कोरियाला पुन्हां आतां त्याचें पहिलें चोसेन "उषःकालीन शांततेची भूमि" हें नांव देण्यांत आलें. जपान्यांनीं आपल्याबरोबर कांहीं काहीं आधुनिक सुधारणा आणल्या खऱ्या; परंतु कोरियामधील लोकांचें तेज आणि रंग हीं मात्र त्यांनीं अगदीं निर्दयपणें नष्ट करून टाकलीं. तेव्हांपासून पुष्कळ वर्षें कोरियन लोकांचा स्वातंत्र्याचा लढा चालूच राहिला; मधूनमधून बंडेंही झालीं. त्यांपैकीं १९१९ चें बंड हें सर्वांत महत्त्वाचें झालें. कोरियांतील लोक, विशेषतः तरुण स्त्रीपुरुष, मोठ्या शौर्यानें लढा करीत होते; परंतु शत्रु त्यांना फारच भारी होता. त्यांचा पक्ष अगदींच दुबळा होता. एका प्रसंगीं कोरियन लोकांच्या एका संस्थेनें आमचा देश स्वतंत्र झाला असा ठराव करून जपानची सत्ता झुगारून देण्याचें ठरविलें. असें सांगतात, कीं लगेच त्यांनीं पोलिसांना टेलिफोन करून, आपण काय काय केलें याची वर्दी त्यांना दिली. अशा रीतीनें स्वातंत्र्याच्या ध्येयासाठीं जाणूनबुजून त्यांनीं आपले बळी दिले. कोरियन लोकांची स्वातंत्र्याची चळवळ जपाननें जी दडपून टाकली त्या घटनेची हकिकत म्हणजे इतिहासांतील एक अगदीं काळेंकुट्ट आणि दुःखकारक प्रकरण आहे. नुकत्याच कॉलेजमधून बाहेर पडलेल्या तरुण मुलींनीं या स्वातंत्र्याच्या लढ्यांत मोठा महत्त्वाचा भाग घेतला होता, हें वाचून तुला खास फार बरें वाटेल.

आतां आपण चीनकडे परत जाऊं या. बॉक्सर चळवळ दडपून टाकण्यांत आली आणि पेकिंगच्या मसुद्यावर सह्या झाल्या येथपर्यंत आपण आलों होतों आणि तेथेंच चीनला एकाएकीं सोडून आपण दुसरीकडे भटकलों. चीनची आता अगदींच दीन अवस्था होऊन गेली होती. त्याच्यामध्यें कांहींच त्राण उरलें नव्हतें. तेव्हां पुन्हां एकदां कांहीं तरी सुधारणा करावी असा प्रयत्न सुरू झाला. राजमाता सम्राज्ञी होती. तिला सुद्धां आतां कांहीं तरी असें करणें जरूर आहे असें पटूं लागलें. रूसो-जपानी युद्धांत सगळी लढाई खुद्द चीनच्या राज्यांत, मांचुरियामध्यें चालली होती. परंतु चीन देश त्या लढाईंत अगदीं तटस्थ प्रेक्षक म्हणूनच राहिला. या लढाईंत जपानला जय मिळाल्यामुळें चीनमधील सुधारणावादी पक्षाला अधिक बळ चढलें. आतां चीनमध्यें शिक्षणाची आधुनिक पद्धति सुरू करण्यांत आली आणि पुष्कळसे विद्यार्थी यूरप, अमेरिका, जपान यांमध्यें शास्त्रांचें शिक्षण घेण्यासाठीं पाठविण्यांत येऊं लागले. पूर्वीची जी सरकारी नोकरींत प्रवेश करण्यासाठीं म्हणून साहित्याच्या परीक्षेची पद्धति होती ती आतां रद्द करण्यांत आली. खास चीनच्या ठेवणींतील ही मोठींच विलक्षण पद्धति चीनमध्यें सुरू होऊन राहिल्याला २००० वर्षें आतां होऊन गेलीं होतीं. हॅन वंशाच्या कारकीर्दीपासून ती जी अखंड चालू होती ती या वेळपर्यंत. खरें म्हणजे अलीकडे किती तरी काळपर्यंत ही पद्धति अगदीं निरुपयोगी झालेली होती. तिच्यामुळें चीन देश मागासलेला राहत होता. तेव्हां ती नष्ट करण्यांत

आली हें चांगलेंच झालें. तरी पण पुष्कळ काळपर्यंत याच पद्धतीचा मोठा विलक्षण उपकार चीनवर झाला यांत शंका नाहीं. ही पद्धति चीनच्या जीवन-विषयक भूमिकेची बरोबर निदर्शक होती. आशियांतील बहुतेक इतर देशांत ही जीवनविषयक भूमिका एक तर सरंजामशाहीच्या किंवा भिक्षुकशाहीच्या धोरणाची असे. चीनची भूमिका सरंजामशाहीच्या धोरणाची नव्हती किंवा भिक्षुकशाहीच्याही धोरणाची नव्हती. चीनची भूमिका किंवा प्रवृत्ति बुद्धिप्रधान होती. साऱ्या जगांत चीनमध्यें धर्माची पकड लोकांच्या मनावर अतिशयच कमी; तरीपण नैतिक बंधनाची आणि आपसांतील सुरळीत व्यवहाराची त्यांची जी पद्धति आहे ती धार्मिक म्हणून गाजणाऱ्या कोणाही लोकांपेक्षां चिनी लोक अधिक कसोशीनें पाळीत आलेले आहेत. श्रद्धेपेक्षां बुद्धीच्या पायावर आधारलेली समाजरचना असावी असा चिनी लोकांचा प्रयत्न होता. परंतु आपल्या बुद्धिवादाला सुद्धां त्यांनीं आपल्या प्राचीन पवित्र ग्रंथांतील शब्दांची मर्यादा घातल्यामुळें जीवनांत प्रगति होणें किंवा जरूरीप्रमाणें फेरबदल होणें या गोष्टींना प्रतिबंध झाला. अर्थातच त्यामुळें समाजांत सडकेपणा आणि निर्जीवपणा उत्पन्न झाला. चिनी लोकांच्या या बुद्धिप्रधानतेपासून आपणां हिंदुस्थानांतील लोकांना पुष्कळच शिकण्यासारखें आहे. कारण आपल्या मनावरचीं जातिबंधनें, शब्दप्रामाण्यावर आधारलेला अपरिवर्तनीय धर्म (आंधळी धर्मश्रद्धा), भिक्षुकशाही कर्मकांड आणि सरंजामशाही समाजपद्धतीच्या कल्पना यांची पकड ढिली झालेली नाहीं. चीनचा महान् ऋषि कान्फ्युशियस यानें आपल्या लोकांना जो एक इषारा दिला आहे तो आपण लक्षांत ठेवण्यासारखा आहे. जे लोक आपला अतिमानुष अशा कांहीं शक्तीशीं संबंध किंवा व्यवहार आहे म्हणून ढोंग करतात, अशा लोकांच्या वाऱ्यालासुद्धां कधीं उभे राहूं नका. तुम्ही आपल्या देशांत या अतिमानुषत्व किंवा अतींद्रियत्व यांच्यावरील श्रद्धेला जर का पाय रोवूं दिलांत, तर त्याचा परिणाम म्हणजे तुमच्या देशावर भयंकर संकट ओढवेल. दुर्दैवानें आमच्या देशांत आजही किती तरी लोक कोणी कोणी डोक्यावर नारदासारखी शेंडी ठेवून, कोणी कपाळावर चित्रविचित्र पट्टे ओढून, तर कोणी केशरी झगा परिधान करून, आपण त्या अतींद्रिय किंवा अमानुष शक्तीचे पृथ्वीवरील प्रतिनिधी आहों म्हणून आव आणीत असतात आणि सामान्य जनतेला लुबाडीत असतात.

परंतु चीनमध्यें प्राचीन काळापासून चालत आलेली अशी ही बुद्धिप्रधान आणि उच्च प्रकारची संस्कृति जरी होती, तरी वर्तमानकालीन काळाच्या ओघावर चीनला पकड मिळवितां आली नव्हती. आणि ऐन संकटाच्या प्रसंगीं चीनला आपल्या प्राचीन सामाजिक संस्था उपयोगाला येऊं शकल्या नाहींत. परंतु बदलत्या काळा-बरोबर चीनच्या पुष्कळच तरुण मुलांमुलींत नवचैतन्याचें वारें खेळूं लागलेलें होतें आणि या जुन्या संस्था व परंपरांऐवजीं अन्य मार्गानें सुखाचा शोध लावण्याचा अविरत

परिश्रम या मंडळींनीं सुरू केला होता. त्यांनीं आपल्या प्रयत्नांनीं त्या म्हाताऱ्या राजमातेलासुद्धां खडबडून जागें केलें. तिलासुद्धां थोडी नवी दृष्टि आणून दिली. ही बाईसुद्धां मग आतां देशाला नवी राज्यघटना आणि स्वराज्य दिलें पाहिजे असें म्हणूं लागली आणि त्यासाठीं परदेशच्या राज्यसंघटनांचा अभ्यास करावा म्हणून तिनें एक प्रतिनिधिमंडळही पाठविलें.

अशा रीतीनें वृद्ध राजमातेच्या चिनी सरकारनें एकदांची हालचाल करायला सुरुवात केली; परंतु लोकांची हालचाल यापेक्षांही जलद सुरू झालेली होती. याच्या आधींच किती तरी वर्षें, १८९४ मध्येंच डॉ. सन्‌यत्‌सेन यांनीं 'चिनी पुनरुज्जीवन संघ' स्थापन केला होता आणि परकी राष्ट्रांनीं चीनवर हे जे अन्याय आणि एकतर्फी बोजांचे तह (त्या तहांना चिनी लोक असमान तह असें म्हणतात) जबरदस्तीनें लादले होते, त्या तहांचा निषेध म्हणून पुष्कळसे लोक सन्‌यत्‌सेन यांच्या संघाला जाऊन मिळालेले होते. या संघाची चांगली वाढ होत गेली. देशांतील तरुण लोकांचें मन त्याच्याकडे वेधत चाललें. १९११ मध्यें या संघानें आपलें नांव बदलून नवीन 'कुओ मिन् टांग' म्हणजे "जनतेचा राष्ट्रीय पक्ष" असें नवें नांव घेतलें. एव्हांपासून हा चिनी पक्ष चिनी राज्यक्रांतीच्या प्रयत्नांचें केंद्रस्थान होऊन बसला. या चळवळीची प्रेरणा करणारे डॉ. सन्‌यत्‌सेन यांनीं राज्यघटनेसाठीं अमेरिकेचा नमुना आपल्यापुढें बाळगलेला होता. इंग्लंडमधल्याप्रमाणें मर्यादित राजसत्ता त्यांना नको होती. जपानच्याप्रमाणें बादशहाच्या पूजेचें, भक्तीचें स्तोम तर त्यांना मुळींच नको होतें; तर त्यांना प्रजासत्ताक राज्य प्रस्थापित करावयाचें होतें. एक तर चिनी लोकांनीं आजपर्यंत आपल्या बादशहाचें स्तोम असें केव्हांच माजविलें नव्हतें; आणखी सध्यांचें जें राजघराणें होतें तें मुळांत चीनचें होतेंच कोठें? हें घराणें होतें मांचूवंशाचें आणि चीनमध्यें तर सध्यां पुष्कळच मांचूवंशाचा द्वेष फैलावलेला होता. लोकांमध्यें ही जी अशी पुष्कळ खळबळ माजून राहिली होती तिचा परिणाम होऊन वृद्ध राजमाता कांहीं हालचाल करूं पाहत होती; परंतु चीनला नवीन राज्यघटना देणार म्हणून जाहीर केल्यावर ही वृद्ध राणी लौकरच मरण पावली. यांत आश्चर्याची गोष्ट अशी, कीं ही वृद्ध राणी आणि ज्या आपल्या पुतण्याला तिनें राजपदावरून दूर केलें होतें तो तिचा पुतण्या, माजी बादशहा, अशीं हीं दोन्ही माणसें १९०८ च्या नवंबर महिन्यांत एकमेकांपासून चोवीस तासांच्या आंत मरण पावलीं. आतां बादशहाच्या गादीवर एक पाळण्यांतलें पोर आलें.

या वेळीं लोकप्रतिनिधींचें कायदेमंडळ स्थापन करण्याबद्दल मोठ्या जोराजोरानें मागणी करण्यांत येऊं लागली आणि मांचू-विरोधी आणि राजपद-विरोधी अशा भावनांची तीव्रता वाढत गेली. क्रांतिकारकांच्या पक्षाला जोर चढूं लागला. त्यांना तोंड देण्याचें सामर्थ्य त्या वेळीं चीनमध्यें फक्त एकाच मनुष्याच्या ठिकाणीं होतें. तो म्हणजे युआन शी काई नांवाचा एक प्रांताधिपपदावर असलेला गृहस्थ. हा म्हातारा

मोठा कपटी कोल्हा होता; परंतु चीनमध्यें या वेळीं जें एकटें एकच आधुनिक पद्धतीचें आणि कर्तृत्ववान् असें "नमुनेदार सैन्य" या नांवानें प्रसिद्ध असलेलें लष्कर होतें, तें या वेळीं त्याच्या ताब्यांत होतें. मांचू राज्यकर्त्यांनीं एक अत्यंत मूर्खपणा केला; त्यांनीं युआनचा अपमान करून त्याला अधिकारावरून काढून टाकलें आणि त्या वेळीं, थोडा वेळ का होईना, पण त्यांना ज्यानें हात दिला असा जो एकटाच एक मनुष्य होता, त्याच्या मदतीचा संभव त्यांनीं अशा रीतीनें नाहींसा केला. १९११ च्या ऑक्टोबरमध्यें यांगत्सी नदीच्या खोऱ्यांत युद्धाला सुरुवात झाली आणि लौकरच मध्य आणि दक्षिण चीनचा बहुतेक सर्व भाग बंडांत सामील झाला. १९१२ च्या वर्षारंभाच्या दिवशीं बंडामध्यें सामील झालेल्या या प्रांतांनीं एक प्रजासत्ताक राज्य स्थापन केल्याची घोषणा केली आणि नानकिंग येथें या राज्याची राजधानी केली. डॉ. सन्यत्सेन यांना या प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्ष निवडण्यांत आलें.

दरम्यान युआन शी काइ बाजूला राहून हें नाटक पाहत होता आणि आपल्याला सोयीचें आणि फायदेशीर होईल अशा रीतीनें त्यांत हात घालण्याचा क्षण केव्हां येतो याची वाट पाहत टपून बसला होता. त्या वेळच्या बालराजाचा जो पालक होता त्यानें प्रथम या युआनला अधिकारावरून काढून टाकलें आणि त्याला पुढें परत बोलाविलें. यासंबंधींची हकिकत मोठी मनोरंजक आहे. चीनच्या जुन्या जमान्यांत कोणतीही गोष्ट करावयाची असली तरी ती मोठ्या शिष्टाचारपूर्वक आणि अतिशय नम्रपणानें करण्याची पद्धति आहे. युआनला अधिकारावरून दूर करण्याचें ठरलें तेव्हां असें जाहीर करण्यांत आलें, कीं युआनला पायाचा कांहीं विशेष विकार झालेला आहे. अर्थात् लोकांना हें समजत होतें कीं युआनच्या पायाला कांहींही झालेलें नसून त्याला कामावरून काढून टाकण्याची ही आपली एक परंपरागत पद्धति आहे; परंतु युआनला या गोष्टीचा सूड घेण्याला चांगली संधि सांपडली. १९११ मध्यें जेव्हां सरकाराविरुद्ध दंगे आणि बंडें सुरू झालीं, तेव्हां राजपालकानें या संकटाच्या भीतीनें गांगरून जाऊन युआनला परत कामावर बोलाविलें; परंतु आपल्या एकूण एक अटी मान्य करून घेतल्याशिवाय कामावर जाण्याची युआनची मुळींच तयारी नव्हती. म्हणून त्यानें राजपालकाला उत्तर दिलें, कीं या वेळीं घरांतून बाहेर पडण्याची मला शक्यता नाहीं याबद्दल मला फार दुःख होतें; कारण माझा पाय अजून प्रवासाला जाण्याइतका बरा झालेला नाहीं. परंतु पुढें एक महिन्यानें त्याच्या सर्व अटी मान्य झाल्या, तेव्हां त्याचा पाय किती थोड्या वेळात बरा झाला म्हणतां!

परंतु आतां क्रांतीला प्रतिबंध करण्याची संधि केव्हांच हातची निघून गेली होती. हा सगळा बैल गेला नि झोपा केला अशांतला प्रकार होता आतां. हें कळण्याइतका आणि कोणत्याही एका पक्षाला मिळून आपलें पुढचें नुकसान न करून घेण्याइतका युआन हा चतुर होता. शेवटीं त्यानें मांचू घराण्यानें राज्यत्याग करावा असाच सल्ला दिला. समोरच्या बाजूला प्रजासत्ताक राज्याला तोंड देण्याचा प्रसंग आणि अशाच वेळीं

त्यांच्या सेनापतीनें त्यांचा पक्ष सोडलेला ; अशा स्थितींत मांचू राज्यकर्त्यांना राज्यत्याग करण्याशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं. १२ फेब्रुआरी १९१२ रोजीं राज्यत्यागाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला. अडीच शतकें संस्मरणीय अशी कारकीर्द चीनमध्यें गाजवून मांचू राजघराणें या दिवशीं अशा रीतीनें चीनच्या रंगभूमीवरून नाहींसें झालें. चीनमधल्या एका म्हणींतल्याप्रमाणें, "तें आलें वाघासारख्या डुरकाळ्या फोडीत व नाहींसें झालें सापाच्या शेपटीसारखें."

नानकिंग शहर हें ज्याप्रमाणें या नव्या प्रजासत्ताक राजधानीचें शहर म्हणून त्याचप्रमाणें मिंग घराण्यांतील पहिल्या बादशहाच्या कबरस्थानाचें ठिकाण म्हणूनही महत्त्वाचें आहे. या नानकिंग शहरामध्यें राज्यत्यागाचा जाहीरनामा ज्या दिवशीं प्रसिद्ध झाला त्याच १२ फेब्रुआरी या दिवशीं एक मोठा विलक्षण समारंभ घडून आला. या समारंभामध्यें जुन्या आणि नव्या संस्कृतीचें अगदीं भिन्न भिन्न स्वरूप एकाच ठिकाणीं लोकांच्या प्रत्ययाला आलें. प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्ष सन्‌यत्‌सेन हे या दिवशीं आपल्या मंत्रिमंडळासह या कबरस्थानीं गेले आणि तेथें नैवेद्य वगैरे अर्पण करण्याचें जें कांहीं कार्य तें सर्व त्यांनीं अगदीं जुन्या पद्धतीप्रमाणें केलें. आणि नंतर लोकांच्या पुढें भाषण करतांना ते म्हणाले, "पूर्व आशियाला आपण प्रजासत्ताक राज्याचा आज धडा घालून देत आहोंत. प्रयत्न करणाराला यश मिळण्याला कमीअधिक वेळ लागतो ; पण चांगलें काम करणाराला अखेरीस जय येणार, त्याच्या कामाचें फळ मिळणार, हें निश्चित असतें. अशा स्थितींत आपल्याला विजय मिळावयाला इतका दीर्घ काळ लागला याबद्दल आपण वाईट वाटून घेण्याचें काय कारण आहे?"

आपल्या मायदेशांत राहून अथवा हद्दपारीमध्यें राहून डॉ. सेन यांनीं चीनच्या स्वातंत्र्याकरितां फार परिश्रम केले होते. या सर्व परिश्रमाचें फळ हें आतां हातीं आलें असें दिसूं लागलें. परंतु स्वतंत्रता ही मोठीच चंचल मैत्रीण असून तिची प्राप्ति करून घेण्याला किंमतही भरपूर मोजावी लागते. यश मिळालें मिळालें अशी खोटी आशा लागून त्या कामीं पुष्कळदां आपली फसगत होते आणि खरोखरीची ती आपली होण्यापूर्वीच नाना तऱ्हेचीं संकटें आपल्यावर आणून ती आपली कसोटी पाहत असते. त्यामुळें येथपर्यंत येऊन पोंचल्यानें चीनचा किंवा डॉ. सेन यांचा स्वातंत्र्यसंपादनाचा शेवटचा टप्पा गांठून झाला होता असें नव्हे. त्यापासून अजून ते किती तरी दूर होते. किती तरी वर्षें या नूतन प्रजासत्ताक राज्याला जगण्यासाठीं झगडत रहावें लागलें आहे. आणि आज एकवीस वर्षांनंतर सुद्धां, वयांत येण्याच्या वेळेलाही, चीनचें भवितव्य अजून अनिश्चततेचे हेलकावेच खात आहे.

मांचू घराण्यानें राजत्याग केला खरा ; पण युआनची अडचण अजून प्रजासत्ताक राज्याच्या मार्गांत उभीच होती. तो काय करणार याची कोणालाच कांहीं नीटशी कल्पना नव्हती. त्याच्या हातांत चीनचा उत्तर भाग होता. दक्षिण भाग प्रजासत्ताक राज्याच्या हातीं होता. देशांत शांतता राहावी, आपसांतील यादवीचा प्रसंग येऊं नये

यासाठीं डॉ. सन्यत्सेन यांनीं आपण होऊन स्वतः संपूर्ण अधिकारत्याग केला. अध्यक्षपदाच्या निवडणुकीला ते उभे राहिले नाहींत; आणि युआन शी काइ याला त्यांनीं अध्यक्ष म्हणून निवडून आणलें. पण युआन हा कांहीं प्रजासत्तावादी नव्हता. स्वतःला उच्च पद प्राप्त व्हावें यासाठीं सत्ता मिळविण्याची खटपट करणारा तो मनुष्य होता. ज्या प्रजासत्ताक राज्यानें अध्यक्ष करून त्याला एवढें गौरविलें, तेंच प्रजासत्ताक राज्य मोडून काढण्यासाठीं त्यानें परकी राष्ट्राकडून कर्जे काढलें, लोकप्रतिनिधींचें कायदे-मंडळ मोडलें, कुओ मिन् टांगच्या पक्षाचें विसर्जन केलें. त्यामुळें चीनमध्यें फूट होऊन दक्षिण चीनमध्यें डॉ. सेन यांच्या प्रमुखत्वाखालीं एक प्रतिस्पर्धी सरकार स्थापन करण्यांत आलें. काय वाटेल तें करून जी फूट टाळण्याचा डॉ. सेन यांनीं प्रयत्न केला होता ती फूट अखेर झालीच. त्यामुळें चीनमध्यें दोन राज्यें अस्तित्वांत आलीं. युआननें बादशहा होण्याचा यत्न केला; परंतु त्यांत त्याला यश न येतां तो लौकरच मरण पावला.

## ११९

# बृहद् भारत आणि ईस्ट इंडीज ( पूर्वेकडील हिंदी बेटें )

*३१ डिसेंबर, १९३२*

आतां कांहीं वेळ आपलें अतिपूर्वेचें काम संपलें आहे असें म्हणायला हरकत नाहीं. त्याचप्रमाणें एकोणिसाव्या शतकांतील हिंदुस्थानचीही कांहीं कांहीं हकिकत आपली पाहून झाली आहे. तेव्हां आतां आपण पश्चिमेकडे कूच करून यूरप, अमेरिका, आफ्रिका यांच्याकडे जावें हें बरें. परंतु एवढा हा मोठा प्रवास करण्यापूर्वी मला वाटतें, तूं एकदां आशिया खंडाच्या आग्नेय कोपऱ्याचें थोडेंसें ओझरतें दर्शन घ्यावेंस आणि तेथील हकिकत अगदीं आधुनिक काळापर्यंत आणून पोंचवावीस. या पूर्वीच्या माझ्या पत्रांत या भागाला मी कितीक निरनिराळीं–मॅलेशिया, इंडोनेशिया, ईस्ट इंडीज किंवा बृहद् भारत अशीं नांवें देत आलों आहें. हीं नांवें अगदींच भोंगळ आहेत व तीं तितकीशीं बरोबरही नाहींत. त्यांपैकीं कोणत्याही एका नावानें या सर्व प्रदेशाचा निर्देश करतां येतो असें मला वाटत नाहीं. परंतु जोंपर्यंत आपण कशाबद्दल बोलतों आहोंत याविषयीं आपल्या दोघांची बरोबर समजूत आहे, तोंपर्यंत नांवांत काय आहे?

एखादा नकाशा चटकन् मिळण्यासारखा असेल तर तो घेऊन पाहा. त्यामध्यें आशिया खंडाच्या आग्नेयीला तुला एक द्वीपकल्प आढळेल. या द्वीपकल्पांत ब्रह्मदेश, सयाम आणि ज्याला इंडोचायना म्हणतात तो असे देश आहेत. ब्रह्मदेश आणि

सयाम यांच्यामधून एक चिंचोळा फाटा आंत समुद्रांत दूरवर गेलेला आहे; टोंकाकडे मात्र तो थोडासा रुंद आणि सपाट झालेला आहे. हा फाटा म्हणजे मॅले द्वीपकल्प आणि त्याच्या अगदीं टोंकाला सिंगापूर शहर आहे. मॅलेपासून ऑस्ट्रेलियापर्यंत मध्यंतरीं अनेक लहान-मोठीं बेटें आहेत. त्यांचे आकारही मोठे चित्र-विचित्र आहेत. पूर्वी एखादा राक्षसी पूल आशिया आणि ऑस्ट्रेलिया यांना जोडणारा असावा आणि तो मोडून त्याचे हे अवशेष मध्ये मध्ये तसेच वर राहिले असावेत, असें हीं बेटें पाहिलीं म्हणजे वाटूं लागतें. या बेटांना ईस्ट इंडीज किंवा पूर्वेकडील हिंदी बेटें असें म्हणतात. त्यांच्या उत्तरेस फिलिपाइन बेटें आहेत. कोणताही एखादा नवीन नकाशा घेऊन तूं पाहा म्हणजे तुला आढळेल, कीं ब्रह्मदेश आणि मॅले द्वीपकल्प हे देश ब्रिटिशांच्या ताब्यांतले आहेत. इंडोचायना फ्रेंचांच्या ताब्यांत आहे आणि यांच्यामधला सयाम देश हा स्वतंत्र आहे. ईस्ट इंडीज म्हणजे मुख्यतः सुमात्रा, जावा, बोर्निओचा बराचसा भाग, सेलेबिस, मलाक्का आणि ज्यासाठीं समुद्रावरील हजारों मैलांचा संकटमय धोक्याचा प्रवास पत्करून सुद्धां इकडे आल्याशिवाय यूरपचे दर्यावर्दी लोक राहूं शकत नसत तीं मसाल्याचीं बेटें, अशीं हीं बेटें डच लोकांच्या ताब्यांत आहेत. फिलिपाइन बेटांवर अमेरिकेचें अधिराज्य आहे.

पूर्व समुद्रामधील या देशांची आजची अवस्था ही अशी आहे. परंतु मागें मीं सांगितलेलें आठवत असेल तुला, कीं आपल्याच या हिंदभूमीच्या लेंकरांनीं दोन हजार वर्षांपूर्वी इकडे जाऊन या देशांची वसाहत केली होती. मोठीं मोठीं साम्राज्यें या भागांत दीर्घ कालपर्यंत नांदलेलीं होतीं; या देशांमध्यें मोठीं मोठीं सुंदर शहरें असून त्यांतील इमारतीही असामान्य अशा प्रकारच्या असत; तेथें व्यापारधंदाही फारच चांगल्या प्रकारचा चाले आणि त्या ठिकाणीं हिंदी आणि चिनी संस्कृति व सुधारणा यांचें एक प्रकारें मिश्रण झालेलें होतें.

या देशांसंबंधीं याच्या आधींच माझ्या पत्रांत (पत्र ७९) मीं तुला सांगितलेलें आहे, कीं या प्रदेशांत स्थापन झालेल्या पोर्तुगीज साम्राज्याचा नाश होऊन पूर्वेकडील या व इतर प्रदेशांत ब्रिटिश आणि डच लोकांचें वर्चस्व निर्माण झालें व फिलिपाइन बेटांमध्यें स्पॅनिश लोकांचा ताबा शिल्लक राहिला.

ब्रिटिश आणि डच लोकांनीं मिळून एक होऊन पोर्तुगीज लोकांना हांकलून लाविलें होतें. दोघांना मिळून हें यश मिळालें होतें. परंतु या विजयी राष्ट्रांत एकमेकांत सख्य थोडेंच होतें? त्यामुळें त्यांच्यामध्येंही वारंवार तंटे होतच होते. एका प्रसंगीं, १६२३ मध्यें, मलाक्का बेटांतील अँबोइना येथील डच गव्हर्नरानें ईस्ट इंडिया कंपनीच्या सर्वेच्या सर्व नोकरवर्गाला डच सरकारविरुद्ध कट केल्याच्या आरोपावरून पकडलें आणि त्यांचा वध केला. या सरसकट फांशीच्या कृत्याला अँबोइनांतील कत्तल असें इतिहासांत म्हटलें जातें.

एक गोष्ट तूं नीट ध्यानांत ठेवली पाहिजेस असें मला वाटतें. या पूर्वीच्या

पत्रात ती मीं तुला सांगितलेली आहे. या काळांत म्हणजे सतराव्या शतकांत, यूरप खंडांत अजून औद्योगीकरण झालेलें नव्हतें. बाहेरच्या प्रदेशांत पाठविण्यासाठीं मोठ्या प्रमाणावर मालाचें उत्पादन अजून तेथें होऊं लागलेलें नव्हतें. मोठी यंत्रसामग्री आणि औद्योगिक क्रांति यांचा काळ यावयाला अजून फार अवधि होता. यूरपपेक्षां आशिया खंडांतच या काळीं अधिक कारखानदारी उत्पादन होत होतें आणि यूरपपेक्षां आशिया खंडांतूनच बाहेर देशांत अधिक माल निर्यात होत होता. हा आशियांतील माल जेव्हां म्हणून यूरपमध्यें जाई तेव्हां त्याची किंमत दोन रीतींनीं पुरी करण्यांत येई; एक यूरपमधील माल मोबदला देऊन आणि भरीला स्पॅनिश अमेरिकेंतून आणलेली संपत्ति देऊन. आशिया आणि यूरप यांच्यामधील हा व्यापार म्हणजे एक फायदेशीर धंदा होता. पुष्कळ काळपर्यंत हा धंदा पोर्तुगीज लोकांच्या हातांत असून त्यावर ते चांगले श्रीमंत झालेले होते. या व्यापारांतला हिस्सा आपल्यालाही मिळावा या हेतूनेंच तर डच ईस्ट इंडिया कंपनी आणि ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी या स्थापन झालेल्या होत्या. परंतु हें व्यापाराचें क्षेत्र म्हणजे आपलें खास राखीव कुरण आहे, अशी पोर्तुगीजांची कल्पना झालेली होती. त्यामुळें त्यांमध्यें इतर कोणाचा हात शिरकवूं देण्याची त्यांची इच्छा नव्हती. स्पॅनिश लोकांचें राज्य जरी फिलिपाइन बेटांत होतें, तरी पण स्पॅनिश लोकांचें लक्ष व्यापारापेक्षां धर्माकडे अधिक असल्यामुळें त्यांचा आणि पोर्तुगीज लोकांचा कधींच तंटा उद्भवला नव्हता. परंतु या दोन नव्या व्यापारी कंपन्यांच्या मार्फत हे जे ब्रिटिश आणि डच पेंढारी, साहसी उलाढाली करणारे लोक आतां इकडे आले होते, त्यांना धर्माचिर्माशीं कांहींएक कर्तव्य नव्हतें. त्यामुळें या नवीन राष्ट्रांमध्यें इकडे लौकरच तंटा उत्पन्न झाला.

पूर्वेकडे पोर्तुगीजांचें राज्य सुमारें सव्वाशें वर्षें चालू होतें. ज्यांच्यावर ते राज्य करीत होते त्या लोकांत पोर्तुगीजांविषयीं प्रेम तर मुळींच नव्हतें, उलट असंतोषच होता. इंग्लंड आणि हॉलंड यांच्या या दोन व्यापारी कंपन्यांनीं या असंतोषाचा फायदा घेतला आणि पोर्तुगीजांचें राज्य उखडून काढण्यासाठीं त्यांनीं तद्देशीय लोकांना मदत केली; परंतु पोर्तुगीजांचें राज्य संपतांक्षणींच, त्यांनीं मोकळ्या केलेल्या राज्याचा ताबा ताबडतोब या कंपन्यांनीं मिळविला. हिंदुस्थानचे आणि ईस्ट इंडीज बेटांचे राज्यकर्ते या नात्यानें या कंपन्यांनीं पुष्कळसे अवजड कर वसूल करण्याचा किंवा अन्य मार्गानें पुष्कळच खंडणीसारखी रक्कम जमा करण्याचा क्रम सुरू केला. त्यामुळें यूरपवर विशेष भार न घालतां हा या भागांतील परदेशाशीं होणारा व्यापार ताब्यांत घेऊन चालविण्यास त्यांना फार उपयोग झाला. पूर्वेकडील माल आणविला तर त्याचा मोबदला कोठून द्यावयाचा ही जी मोठी अडचण यापूर्वी यूरप खंडामध्यें पडत असे ती यामुळें कमी झाली. असें असूनसुद्धां कायदेशीर प्रतिबंध घालून आणि भक्कम जकाती बसवून इंग्लंडनें हिंदी मालाचा आपल्या देशांत येणारा ओघ बंद करण्याचा प्रयत्न केला हें आपण पाहिलेंच आहे. औद्योगिक क्रांति होईपर्यंत अशी ही परिस्थिति चालू होती.


पूर्व भारत आणि पूर्वेकडील हिंदी बेटें
डच
अंग्रेज
फ्रेंच
यू. एस. ए.
पोर्तुगीज
चीन
कँटन
हांगकांग (ब्रि.)
फिलिपाईन बेटें
मनिला
आनाम
कांबोज
सयाम
ब्रह्मदेश
मलाया द्वीपकल्प
सिंगापूर
सुमात्रा
जावा
बोर्निओ
सेलेबीस
मालुकु
न्यू गिनी
ऑस्ट्रेलिया
आरफुरा
टिमार

डच आणि ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपन्यांमधील हा तंटा ईस्ट इंडीजमध्यें कांहीं फार काळपर्यंत चालला नाहीं; कारण ब्रिटिशांनींच तेथून काढता पाय घेतला. हिंदुस्थानांत त्यांनीं बऱ्याचशा भानगडी उपस्थित केल्या होत्या; त्यांमध्येंच त्यांचे हात सर्वस्वीं गुंतून गेलेले होते. त्यामुळें हीं पूर्वेकडील हिंदी बेटें त्यांनीं सर्वस्वीं डच ईस्ट इंडिया कंपनीच्या हातीं राहूं दिलीं. अर्थात् याला अपवाद फिलिपाइन बेटांचा; तीं बेटें अजून स्पॅनिश लोकांच्याच ताब्यांत होतीं. स्पॅनिश लोकांना व्यापारउदीमाचीं कांहींच फिकीर नव्हती. त्यामुळें त्यांचा कांहीं आणखी प्रदेश जिंकण्याच्या भानगडींत पडण्याचा विचार नव्हता. तेव्हां या प्रदेशांत डच लोकांना प्रतिस्पर्धी असा कोणी राहिला नाहीं.

हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीनें केलें, त्याप्रमाणें या डच ईस्ट इंडिया कंपनीनेंही जितका म्हणून पैसा मिळावितां येईल तितका मिळविण्याचा सपाटा सुरू केला. सुमारें दीडशें वर्षें या कंपनीचा या बेटांवर अंमल चालू होता. परंतु तेथील लोकांच्या सुखसोयींकडे डच लोकांनीं काडीचेंसुद्धां लक्ष दिलें नाहीं. त्या लोकांवर जुलूम करून जितकी उकळता येईल तितकी रक्कम त्यांच्याकडून डच लोक उकळीत राहिले. अशा रीतीनें नजराणा, खंडणी किंवा कर म्हणून पैसा उकळणें सोपें पडूं लागलें, तेव्हां व्यापार ही दुय्यम बाब ठरून तिकडे डच लोकांचें दुर्लक्ष होऊं लागलें. म्हणून व्यापार मंदावत गेला. कंपनीचा कारभार सर्वस्वीं नालायक लोकांच्या हातांमध्यें होता आणि या बाहेरच्या देशांत कंपनीची नोकरी करायला आलेले जे डच लोक होते, ते हिंदुस्थानांतील ब्रिटिश कंपनीचे वखारवाले किंवा गुमास्ते जसे होते, तसेच अगदीं पाजी, लुटारू, उलाढाल्या करणारे लोक होते. बऱ्या असो किंवा वाईट असो, कोणत्याही मार्गानें पैसा उकळणें हा त्यांचा मुख्य विचार होता. हिंदुस्थानमध्यें साधनसंपत्तीचा-द्रव्याचा झराच इतका प्रचंड होता, कीं राज्यकारभार आणि व्यापार-व्यवहार कितीही गैरशिस्तपणें केला, तरी मोठीशी उघडीक होण्यासारखी नव्हती. खेरीज हिंदुस्थानांत ब्रिटिशांचे गव्हर्नर म्हणून जे लोक आले, त्यांपैकीं पुष्कळसे कर्तबगार निघाले. त्यांनीं वरवरचा कारभार तरी चांगला पद्धतशीर ठेवला होता. तरी पण खालीं तळाशीं लोक जुलमाखालीं भरडले जातच होते. पुढें १८५७ सालच्या बंडानें ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचें हिंदुस्थानांतील राज्य संपुष्टांत आलें, हें तुला आठवत असेलच.

डच ईस्ट इंडिया कंपनीचें गाडें एकसारखें खालीं खालींच खचत गेलें आणि अखेरीस १७९८ मध्येंच नेदरलंडच्या सरकारनें या पूर्वेकडील बेटांचा कारभार प्रत्यक्ष आपल्या हातामध्यें घेतला. त्यानंतर लौकरच यूरपमध्यें नेपोलियनचीं युद्धें होऊन हॉलंड देशच नेपोलियनच्या साम्राज्यांत सामील झाला. त्या वेळीं ब्रिटिश सरकारनें हीं बेटें आपल्या कबजांत घेतलीं. पांच वर्षेंपर्यंत त्यांना हिंदुस्थान देशाचा एक भाग असें समजलें जात होतें. या काळांत तेथें पुष्कळशा सुधारणा करण्यांत आल्या. पुढें

नेपोलियनचा पाडाव झाल्यानंतर हीं ईस्ट इंडीज बेटें पुन्हां हॉलंडकडे परत देण्यांत आलीं. या पांच वर्षांत जावाचा संबंध जेव्हां हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारकडे होता, तेव्हां जावाचा लेफ्टनंट गव्हर्नर म्हणून टॉमस स्टॅम्फर्ड रॅफल्स् नांवाचा एक कर्तबगार इंग्रज गृहस्थ काम करीत होता. रॅफल्सनें सादर केलेल्या अहवालांत म्हटलें आहे, कीं डचांच्या या वसाहतींच्या कारभाराचा इतिहास विश्वासघात, लांचलुचपत, कत्तली आणि पाजीपणा यांबद्दल अत्यंत लोकविलक्षण हकिकतींनीं भरलेला आहे. डच लोकांच्या येथील दुष्ट कृत्यांमध्यें एक प्रकार असा होता, कीं सेलिबिस बेटांतून लोक पळवून नेऊन जावा बेटांत गुलाम म्हणून काम करण्यासाठीं त्यांची भरती करावयाची. डच अधिकाऱ्यांनीं माणसें पळविण्याचा हा एक धंदाच व्यवस्थितपणानें बनविलेला होता. या माणसें पळविण्याच्या जोडीला मालमत्तेची नासधूस आणि मनुष्यवध या गोष्टी स्वाभाविकच घडून यावयाच्या.

पुढें खुद्द नेदर्लंडच्या सरकारचा अंमल सुरू झाला; परंतु तो म्हणजे कंपनीच्या अमलापेक्षां चांगला होता असें मुळींच नव्हतें. बंगालमधील निळीच्या मळ्यांच्या लावणीची पद्धति आणि तिच्यामुळें झालेली शेतकऱ्यांची भयंकर दैन्यावस्था याबद्दलची मागें जी हकिकत मीं तुला सांगितली, ती बहुतेक तुझ्या ध्यानांत असेल. अशीच, परंतु याहूनही वाईट अशी पद्धति जावामध्यें आणि इतरत्र सुरू करण्यांत आली. कंपनीच्या दिवसांत लोकांकडून सक्तीनें प्रत्यक्ष मालच घेण्यांत येत असे. आतां नवीन एक कल्चर सिस्टिम (शेतलागणीची पद्धति) म्हणून सुरू करण्यांत आली. या पद्धतीप्रमाणें येथील लोकांना वर्षांतून कांहीं काळ सरकारसाठीं काम करण्याची सक्ती करण्यांत आली. साधारणपणें शेतकऱ्याच्या एकूण कामाच्या वेळापैकीं तिसरा किंवा चौथा हिस्सा वेळ त्याच्याकडून असें काम घ्यावयाचें अशी कल्पना होती; परंतु प्रत्यक्ष मात्र शेतकऱ्याचा बहुतेक वेळ या कामांत सक्तीनें घेतला जाई. डच सरकार आपलीं सर्व कामें कंत्राटदाराकडून घेत असे. या कंत्राटदारांना सरकार या कामासाठीं कर्जाऊ रक्कम बिनव्याजीं देत असे. मग या वर सांगितलेल्या सक्तीच्या मजुरीच्या साहाय्यानें हे कंत्राटदार जमिनीची लागवड करीत असत. जमिनींत जें उत्पन्न व्हावयाचें त्याची कांहीं एका प्रमाणांत डच सरकार, कंत्राटदार, आणि प्रत्यक्ष जमीन कसणारा शेतकरी यांच्यामध्यें वांटणी व्हावयाची अशी कल्पना होती. त्यांत गरीब बिचाऱ्या शेतकऱ्याचा हिस्सा बहुतेक सर्वांत कमीच असणार; परंतु त्याला नक्की किती हिस्सा मिळत होता या योजनेमध्यें, हें मला कांहीं माहीत नाहीं. सरकारनें असाही एक नियम केला होता, कीं वाहतुकीला आणलेल्या क्षेत्रापैकीं कांहीं विशिष्ट भागामध्यें–यूरपमध्यें ज्या मालाची गरज असे असा माल उत्पन्न केलाच पाहिजे. या मालामध्यें नीळ, चहा, कॉफी, साखर इत्यादि पदार्थ असत. बंगालमधील निळीच्या लागवडीप्रमाणेंच हा माल उत्पन्न करून इतर मालापेक्षां जरी कमी फायदा झाला तरी तो उत्पन्न केलाच पाहिजे अशी सक्ती होती.

या पद्धतीनें डच सरकारनें प्रचंड नफा मिळविण्याला सुरुवात केली. कंत्राटदारांचीही मोठीच भरभराट झाली. शेतकरी मात्र उपासमारींत आणि हालअपेष्टांत पिचत राहिले. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला या भागांत फारच भयंकर दुष्काळ पडला आणि पुष्कळच लोक त्यांत मेले. तेव्हां मग बिचाऱ्या हालांत पिचणाऱ्या शेतकऱ्यांसाठीं कांहीं तरी करणें जरूर आहे असें सरकारला वाटूं लागलें. हळूहळू शेतकऱ्यांची परिस्थिति सुधारण्यांत आली; तरीपण अगदीं अलीकडे म्हणजे १९१६ पर्यंत, इकडे सक्तीच्या मजुरीची ही पद्धति अस्तित्वांत होतीच.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत डच लोकांनीं इकडे शिक्षणांत आणि इतर बाबतींतही पुष्कळच सुधारणा अमलांत आणल्या. आतां तेथेंही एक नवीन मध्यमवर्ग निर्माण झालेला असून स्वातंत्र्याची मागणी करणारी राष्ट्रीय चळवळही तेथें सुरू झालेली आहे. हिंदुस्थानांतल्याप्रमाणें या बाबतींत तेथेंही कचरत कचरत थोडेंसें पुढें पाऊल टाकण्यांत आलेलें आहे आणि लोकप्रतिनिधींची, विशेषशी खरी सत्ता हातीं नसलेलीं, दुचळीं कायदेमंडळेंही तेथें स्थापन करण्यांत आलेलीं आहेत. सुमारें पांच वर्षांपूर्वी डच ईस्ट इंडीजमध्यें एक क्रांतीचा प्रयत्न झाला; परंतु तो अत्यंत क्रूरपणें दडपण्यांत आला. तथापि जावामध्यें आणि इतर बेटांमध्यें जी ही स्वातंत्र्याची भावना निर्माण झालेली आहे, ती कितीही क्रूरपणा केला किंवा जुलूम केला, तरी कांहीं मारली जाणार नाहीं.

डच ईस्ट इंडीज बेटांना आतां नेदरलंडचें हिंदुस्थान असें नांव देण्यांत आलें. दर पंधरवड्याला हॉलंडमधून विमानांची फेरी हॉलंडपासून भला मोठा प्रवास करून यूरप आणि आशिया खंड ओलांडून जावामधील बटेव्हिया शहरापर्यंत येत असते.

पूर्वेकडील हिंदी बेटांच्या हकिकतीची जेवढी रूपरेखा मला सांगावयाची होती ती सांगून झालेली असल्यामुळें आतां माझ्या मनांतून समुद्र सोडून इकडे वर आशिया खंडाच्या भूप्रदेशाकडे यावें असें आहे. त्या बाजूला ब्रह्मदेशाबद्दल अधिक कांहीं सांगण्यासारखें नाहीं. या देशाचे दक्षिण आणि उत्तर ब्रह्मदेश असे बहुतेक नेहमीं तट पडलेले असत आणि त्यांमध्यें बहुतेक नेहमीं झटापटी चालू असत. जेव्हां एखादा राजा विशेष प्रबळ असे, तेव्हां तो हीं दोन्ही राज्यें एकत्र करून शेजारच्या सयामवर स्वारी करण्याची खटपट करीत असे. असें होतां होतां एकोणिसाव्या शतकांत ब्रह्मी लोकांच्यावर ब्रिटिशांशीं लढण्याचा प्रसंग आला. ब्रह्मी राजाला आपल्या सामर्थ्याबद्दल फाजील विश्वास होता; म्हणून त्यानें आसामवर स्वारी करून तो मुलूख आपल्या राज्यांत सामील करून टाकला. त्यानंतर हिंदुस्थानांतील ब्रिटिश लोकांनीं पहिलें ब्रह्मी युद्ध केलें आणि त्यामध्यें आसाम ब्रिटिशांकडे आला. या युद्धांत ब्रिटिशांना कळून चुकलें, कीं ब्रह्मी सरकार आणि ब्रह्मी लष्कर या दोहोंतही कांहीं विशेष दम नाहीं; त्यामुळें हा सगळा देश जिंकून खालसा करून टाकावा अशी त्यांच्या मनांत इच्छा उत्पन्न झाली. कांहीं तरी क्षुद्र, पोंचट सबबी

काढून दुसरें आणि तिसरें अशीं आणखी दोन युद्धें करण्यांत आलीं. आणि १८८५ मध्यें सगळें ब्रह्मी राज्य खालसा करून ब्रिटिशांच्या हिंदी साम्राज्याला तें जोडून टाकण्यांत आलें. तेव्हांपासून ब्रह्मदेशचें भवितव्य हिंदुस्थानच्या भवितव्याशीं गांठवलेलें आहे.

ब्रह्मदेशच्या दक्षिणेला ब्रिटिशांनीं मॅले द्वीपकल्पामध्येंही हातपाय पसरले होते. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच त्यांनीं सिंगापूरचा ताबा घेतला. सिंगापूरची जागा चांगली माऱ्याची आणि सोयीस्कर असल्यामुळें लौकरच त्या ठिकाणीं एक मोठें व्यापारी शहर उदयास आलें आणि सिंगापूरच्या बंदरांत अतिपूर्वेकडे जाणारीं सर्व जहाजें मुक्कामासाठीं लागूं लागलीं. या द्वीपकल्पामधील पलीकडे वरच्या बाजूचें जें प्राचीन मलाक्का बंदर त्याचें महत्त्व आतां कमी होऊं लागलें. सिंगापूरपासून ब्रिटिशांनीं उत्तरेकडे आक्रमण करण्याला सुरुवात केली.

मॅलेच्या द्वीपकल्पांत पुष्कळच छोटीं छोटीं मांडलिक संस्थानें असून तीं सर्व सयामच्या अधिराज्याखालीं होतीं. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत हीं सर्व राज्यें ब्रिटिशांच्या संरक्षणाखालीं आलीं. त्या सर्वांचा मिळून एक संघ करण्यांत आला आणि त्याला मॅलेचीं संयुक्त राज्यें असें नांव देण्यांत आलें. यांपैकीं कांहीं राज्यांत सयामला जे हक्क होते, ते सर्व इंग्लंडला देऊन टाकणें सयामला भाग पडलें.

अशा रीतीनें सयामला चारी बाजूंनीं यूरपीय राष्ट्रांचा वेढा पडूं लागला होता. पश्चिमेला आणि दक्षिणेला ब्रह्मदेशांत आणि मॅले द्वीपकल्पांत ब्रिटिशांचा पूर्ण अंमल होता. पूर्वेकडे फ्रान्सचें आक्रमण चालू असून अनामचें (वैतनामचें) राज्य गिळंकृत करण्याचा क्रम फ्रान्सनें सुरू केलेला होता. अनामचें राज्य होतें चीनचें मांडलिक. परंतु चीन स्वतःच अडचणींत सांपडल्यामुळें चीनच्या अधिराज्याचा अनामला कांहींच उपयोग नव्हता. फ्रेंचांनीं अनामवर स्वारी केल्यामुळें चीन आणि फ्रान्समध्यें युद्ध सुरू झालें. याचा उल्लेख अलीकडेच एका पत्रामध्यें मीं केलेला आठवत असेल तुला. परंतु त्यामुळें फ्रान्सला अगदींच अप्रतिबंधपणें पुढें सरकतां आलें नाहीं. थोडा वेळ, पण अगदींच थोडा वेळ, त्याला अटकाव झाला इतकेंच. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत फ्रान्सनें अनाम आणि कँबोडिया या दोन देशांची मिळून एक मोठी वसाहत स्वतःची म्हणून तयार केली. आणि तिलाच फ्रेंच इंडोचायना हें नांव मिळालें. या कँबोडियामध्यें एका वेळीं विशाल अंकोरचें साम्राज्य नांदलेलें होतें. तो कँबोडिया देश या वेळीं सयामचा मांडलिक होता. फ्रान्सनें सयामला युद्धाची धमकी देऊन कँबोडियावर आपला ताबा बसविला. या देशांतील फ्रेंचांचीं पहिलीं सगळीं कारस्थानें फ्रेंच मिशनरी लोकांनीं केलेलीं होतीं हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या मिशनऱ्यांपैकीं एकाला कांहीं तरी गुन्ह्यावरून देहांताची शिक्षा या देशांत देण्यांत आली होती. त्याबद्दल नुकसानभरपाई करून घेण्यासाठीं म्हणून पहिलें फ्रेंच लष्कर १८५० मध्यें या भागांतील मोहिमेवर पाठविण्यांत आलें. या लष्करानें प्रथम दक्षिणेकडील

सायगांव बंदर काबीज केलें आणि तेथून मग फ्रेंचांचा ताबा उत्तरेकडे वाढत गेला.

आशिया खंडांतील साम्राज्यशाहीच्या विस्ताराच्या या किळसवाण्या हकिकतीमध्यें पुष्कळशी त्याच त्या गोष्टींची पुनरावृत्ति होत असावीसें वाटतें मला. कारण सर्व ठिकाणीं या विस्ताराकरितां जे मार्ग अनुसरण्यांत आले ते एकाच प्रकारचे होते आणि बहुतेक सर्व ठिकाणीं याच मार्गांना यश आलें. देशामागून देशाची हकिकत मी तुला सांगत आलों आणि कोणत्याही हकिकतीचा निदान तात्पुरता तरी शेवट व्हायचा म्हणजे तो देश कोणा तरी यूरपीय राष्ट्राच्या ताब्यांत गेला असें सांगून. आग्नेय आशिया खंडांतील फक्त एकच राष्ट्र कालचक्राच्या या फेऱ्यांतून बचावून राहिलें. तें म्हणजे सयाम.

एका बाजूला ब्रह्मदेशांत ब्रिटिश लोक आणि इंडोचायनांत दुसऱ्या बाजूला फ्रेंच लोक यांच्या कचाट्यामध्यें सांपडूनसुद्धां सयाम अशा रीतीनें वांचलें, हें केवळ त्याचें सुदैव म्हटलें पाहिजे. कदाचित् असें असेल, कीं सयामच्या दोन्ही बाजूंना हीं दोन प्रतिस्पर्धी राष्ट्रें होतीं म्हणूनच तें वांचलें असेल. सयामच्या या सुदैवाचें आणखीही एक कारण होतें. तें म्हणजे सयामची राज्यव्यवस्था त्या मानानें पुष्कळच चांगल्या प्रकारची होती आणि इतर पुष्कळ देशांतल्याप्रमाणें सयाममध्यें अंतर्गत असंतोष आणि गडबड नव्हती. बाकी, कोठेंही कितीही राज्य चांगलें असलें म्हणजे परकी राष्ट्रें त्या ठिकाणीं आक्रमण करायला जाऊं शकत नव्हतीं, अशी कांहीं खात्री नव्हती ; पण झालें होतें काय, कीं इंग्लंडचे हात हिंदुस्थान आणि चीन यांमध्यें गुंतलेले होते आणि फ्रान्सचे इंडोचायनामध्यें गुंतलेले होते. शिवाय हीं दोन्ही राष्ट्रें सयामच्या सरहद्दीशीं जवळजवळ एकोणिसावें शतक संपतां संपतां पोंचलीं. त्या वेळीं देश खालसा करण्याचें युग जवळजवळ संपत आलेलें होतें. पूर्वेकडे आक्रमणाला विरोध करण्याची प्रवृत्ति वाढूं लागली होती आणि वसाहतींमध्यें व परतंत्र राष्ट्रांमध्यें राष्ट्रीय चळवळी सुरू होऊं लागल्या होत्या. मध्यें एकदां कँबोडियाच्या बाबतींत सयाम आणि फ्रान्स यांच्यामध्यें युद्ध उत्पन्न होण्याची भीति वाटत होती ; परंतु सयामनें नमतें घेतलें आणि फ्रान्सशीं झगडा होण्याचा प्रसंग टाळला. इकडे पाश्चिमेकडे सयामच्या सरहद्दीवर एक मजबूत पर्वताची संरक्षक भिंत उभी असल्यामुळें ब्रह्मदेशांतील ब्रिटिशांचें संकट सयामला मोंवूं शकलें नाहीं.

मी तुला सांगितलेंच आहे, कीं यापूर्वीच्या काळांत ब्रह्मदेशच्या राजांनीं निदान दोनदां तरी सयामवर हल्ला करून तो देश खालसा केला होता. त्यांतील शेवटची स्वारी १७६७ मध्यें झाली. त्या वेळीं सयामची राजधानी आयुथ्या ऊर्फ आयुध्या, (या ठिकाणीं हिंदी नांवें कशीं वारंवार येतात पहा) हिचा नाश करण्यांत आला. परंतु त्यानंतर लौकरच लोकांचें बंड होऊन ब्रह्मी लोकांना हांकलून देण्यांत आलें आणि एका नवीन राजघराण्याचा अंमल तेथें १७८२ पासून सुरू झाला. या घराण्यांतील

पहिल्या राजाचें नांव 'पहिला राम' असें होतें. दीडशें वर्षांनंतर अगदीं आजच्या घटकेला सुद्धां तेथें याच घराण्याचें राज्य चालू असून त्यामधील प्रत्येक राजाचें नांव राम हेंच असतें असें दिसतें. या घराण्याच्या कारकीर्दीत सयामची राज्यव्यवस्था चांगल्या प्रकारें चालत आलेली आहे. लोकांना त्यांत हात घालायला मात्र जागा कमी असून वडिलांनीं प्रेमानें लहान मुलाची काळजी घ्यावी असा थोडासा परावलंबनाचा दोष मात्र तींत आहे. तथापि या राज्यकर्त्यांनीं एक गोष्ट शहाणपणाची केली, कीं परकी सत्ताधीश राष्ट्रांशीं संबंध सख्यत्वाचे ठेवले. परकी व्यापारासाठीं बंदरें खुलीं ठेवलीं. कांहीं कांहीं परकी राष्ट्रांशीं व्यापाराबाबत तहनामे केले आणि राज्य-कारभारांत कांहीं सुधारणाही केल्या. नवीन राजधानी बँकॉक या शहरीं ठेवण्यांत आली. तरी पण एवढ्यानें साम्राज्यवादी लांडग्यांचे हात दूर थोडेच राहणार होते? इंग्लंडनें मॅले द्वीपकल्पांत हातपाय पसरून तेथील सयामचा मुलूख घशाखालीं घातलाच. फ्रान्सनें कँबोडिया आणि सयामचा पूर्वेकडील कांहीं प्रदेश घेतला. १८९६ मध्यें तर सयामच्या प्रश्नावर इंग्लंड आणि फ्रान्समध्यें प्रकरण अगदीं हातघाईवर आलें होतें. परंतु मग साम्राज्यशाही नीतीच्या नेहमींच्या परंपरेला अनुसरून या दोन्ही राष्ट्रांनीं सयामच्या अखंडत्वाला आणि स्वातंत्र्याला धक्का लावावयाचा नाहीं, अशी परस्परांना हमी दिली. आणि त्याच वेळीं सयामच्या प्रदेशाचे त्यांनीं तीन "वर्चस्वाचे विभाग" करून टाकले. पूर्वेकडील भाग फ्रेंचांच्या वर्चस्वाचा, पश्चिमेकडील भाग ब्रिटिशांच्या वर्चस्वाचा, आणि मध्यें जो कांहीं तटस्थ भाग राहिला त्यांत या दोघांनींही आपापल्या मनाप्रमाणें जें मिळेल तें घशांत घालायला कांहीं हरकत नाहीं. अशा रीतीनें सयामच्या अखंडत्वाची व स्वतंत्रतेची हमी घेतल्यानंतर, कांहीं वर्षांनीं फ्रान्सनें सयामचा पूर्वेकडील आणखी कांहीं भाग आपल्या ताब्यांत घेतला. मग इंग्लंड तरी बिचारें काय करणार? या प्रदेशाला तोडीला तोड म्हणून सयामचा दक्षिणेकडील भाग मग आपल्या ताब्यांत घेतल्यावांचून इंग्लंडला गत्यंतरच राहिलें नाहीं!

तथापि इतकें सगळें होत जाऊनही यूरपीय साम्राज्याच्या कचाट्यांतून सुटून राहिलेला असा अजूनही सयामचा कांहीं प्रदेश आहे; आशिया खंडांत या भागांत असा सुटलेला हा एवढा एकच प्रदेश आहे. यूरपीय लोकांच्या आक्रमणाच्या ओघाला आतां बांध बसलेला असून, आतां आशियातील यूरपीय लोकांना आणखी प्रदेश मिळण्याचा संभव मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे, तर आतां असा काळ अगदीं जवळ येऊं पाहात आहे कीं जेव्हां या यूरपीय राष्ट्रांना आशियांतील आपलें चंबूगवाळें आटोपून आपल्या घरचा रस्ता सुधारावा लागेल.

सयाममध्यें अगदीं अलीकडेपर्यंत राजाचा एकतंत्री राज्यकारभार चालू होता. आणि राज्यकारभारांत जरी कांहीं थोड्या थोड्या सुधारणा केलेल्या असल्या, तरी तेथील समाजपद्धति व राज्यव्यवस्था एकंदरींत सर्वतोपरि सरंजामशाही पद्धतीची होती. गेल्या कांहीं महिन्यांपूर्वी सयाममध्यें एक राज्यक्रांति-शांततापूर्वक अशी

राज्यक्रांति झाली. आणि तिच्यामध्ये वरिष्ठ मध्यमवर्गाचे लोक पुढें आले. एक प्रकारच लोकनियुक्त कायदेमंडळही तेथें प्रस्थापित करण्यांत आलें आहे. पहिल्या रामाच्य घराण्यांतील हल्लींच्या राजानें या फेरबदलाला मान्यता दिलेली आहे. त्यामुळें राजवराणें मात्र अस्तित्वांत राहिलेलें आहे. तेव्हां सयाममध्यें सध्यां मर्यादित राजसत्ता आहे.

आशियांतील आग्नेयीकडील आणखी एका देशाचा आपल्याला विचार करावयाचा आहे. तो म्हणजे फिलिपाइन बेटांचा. त्यांच्याबद्दलही याच पत्रांत लिहावें असा माझा हेतु होता. परंतु आता उशीर झाला असून मी दमलेलाही आहें. शिवाय हें पत्रही बरेंच लांबलेलें आहे. या वर्षी-१९३२ सालीं-मी तुला लिहीत असलेलें हें अखेरचें पत्र आहे. कारण हें वर्ष आतां अगदीं शेवटच्या घटकेला पोंचलेलें असून, त्याचा शेवटचा श्वास अगदीं जायच्या बेतांत आलेला आहे. आणखी तीनच तासांत त्याची यात्रा संपून जाईल आणि तें भूतकाळच्या आठवणींत जमा होऊन राहील.

## १२०

## आणखी एक वर्षारंभदिन

*वर्षारंभदिन, १९३३*

आज नव्या वर्षाचा पहिला दिवस आहे. पृथ्वीनें सूर्याभोंवतीचें आपलें आणखी एक भ्रमण पुरें केलें आहे. पृथ्वीच्या या भ्रमणांत पृथ्वीला कसलेही खास उत्सवाचे दिवस किंवा सण वगैरे कांहींसुद्धां टाऊक नसतात, आणि आपल्या पृष्ठभागावर वावरणाऱ्या असंख्य जीवजंतूंत नरनारींची एक मनुष्यजात म्हणून आहे, या जातीच्या प्राण्यांची आपसांमध्यें भांडणें चालू असतात. त्यांना मूर्खासारखा असा अहंकार वाटत असतो, कीं आपण आहों म्हणून ही पृथ्वी चाललेली आहे, पृथ्वीच्या रथाचा आपण जणुं कणाच आहों, आपण नसलों तर पृथ्वीचें सगळें जीवन नीरस आणि आळणी होऊन जाईल, या गोष्टीची किंवा या असंख्य क्षुद्र जीवांच्या हालचालींची पृथ्वीला आपल्या भ्रमणामध्यें काडीचीसुद्धां किंमत नसते. परंतु पृथ्वीला जरी आपल्या अपत्यांची काळजी नसली, तरी आपण स्वतः आपल्याबद्दल काळजी न करून चालणार नाहीं. म्हणून आपल्यापैकीं पुष्कळांची अशी पद्धति पडून गेलेली आहे, कीं नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशीं आपल्या जीवनाच्या प्रवासांत थोडासा मुक्काम करून विश्रांति घ्यावयाची; मागें टाकलेल्या मार्गावर जरा थोडी नजर टाकावयाची; गतगोष्टींची थोडीशी आठवण करावयाची आणि मग पुढच्या आक्रमण करावयाच्या असलेल्या मार्गावर नजर टाकून पुढें पाऊल टाकायला मनाला धीर द्यावयाचा. तेव्हां मलाही आज मागच्या आठवणी करीत बसावें असें वाटतें आहे. तुरुंगांतला माझा हा एका पाठोपाठचा

तिसरा नव्या वर्षाचा आरंभदिन ; अर्थात् हीं सगळींच तीन वर्षें मीं तुरुंगांत घालविलेलीं नाहींत. तर अधून मधून कांहीं महिने बाहेरच्या विशाल जगांत काढायला सांपडलें मला. यांतून मी मागें जाऊन पाहूं लागलों तेव्हां मला दिसून आलें, कीं गेल्या अकरा वर्षांत मीं पांच वर्षारंभदिन तुरुंगांत काढले आहेत आणि असे हे किती वर्षारंभदिन आणि असेच दुसरे सणाचे दिवस आणखी कितीदां मला अशा रीतीनें तुरुंगांत काढावे लागणार आहेत कोण जाणे !

परंतु तुरुंगाच्या भाषेंत मी आतां हॅबिच्युअल म्हणजे 'काळा टोपी' झालों आहें. एकदां नव्हे, तर किती तरी खेपांचा काळा टोपी ! त्यामुळें तुरुंगाचें जीवन आतां माझ्या आंगवळणीं पडलें आहे. बाहेरच्या माझ्या जीवनांत किती काम, किती चळवळ, केवढाल्या मोठ्या सभा, किती सार्वजनिक भाषणें, या ठिकाणाहून त्या ठिकाणीं किती धांवपळ, अशी नुसती धांदल असते. या बाहेरच्या जीवनाच्या मानानें माझें येथील जीवन किती विरुद्ध टोंकाचें आहे ! येथें प्रत्येक गोष्ट बाहेरच्याहून वेगळी आहे. येथें सगळें कसें शांत आहे. हालचाल, चळवळ अशी मुळीं नाहीं. किती तरी वेळ मी नुसता बसून असतों आणि तासन् तास मी तोंडांतून शब्दही काढीत नाहीं. दिवस, आठवडे, महिने एकामागून एक निघून जात असतात. त्यांत हा दिवस कोणता, हा महिना कोणता, असा कांहीं फरक सुद्धां दिसत नाहींसा होतो. सगळे दिवस सारखे आणि सगळेच महिने सारखे. बरें, येथें घालवलेल्या दिवसांतील घडामोडींचें चित्र डोळ्यांपुढें आणावें म्हटलें, तर त्या चित्रांत कांहीं स्पष्टपणें दिसत नाहीं. कांहीं तरी नुसती बरबटलेली अंधुकशी आकृति डोळ्यांपुढें उभी राहिल्यासारखी तेवढी होते. कालचा दिवस म्हणून मनांत विचार आणला, कीं ज्या दिवशीं आपल्याला पकडलें तो दिवस डोळ्यांपुढें उभा राहतो. कारण मधला सगळा काळ म्हणजे कोरा करकरीत काळ असून मनावर त्याचा ठसा जणुं कांहींच उमटलेला नसतो. या काळांतलें माणसाचें जीवन म्हणजे एकाच ठिकाणीं मूळ धरून वाढत राहिलेल्या वनस्पतीसारखें ; कसली कुरबुर नाहीं, सांगणेंसवरणें नाहीं, वादविवाद नाहींत. मुकाट्यानें, इकडे तिकडे कसली हालचाल न करतां, एका जागीं दिवस कंठावयाचे ! कांहीं वेळां तर तुरुंगामध्यें माणसाला बाहेरच्या जगांतील सगळा व्यवहार-सुद्धां अगदींच चमत्कारिक, अनोळखी असा भासूं लागतो. त्याचा त्याला नीटसा उमगच पडेनासा होतो. बाहेरच्याही सगळ्या गोष्टी त्याला आपल्यापासून किती तरी दूर भासूं लागतात ; त्यांत कांहीं तथ्यच नाहीं असें वाटूं लागतें. त्या आहेत कीं नाहींत असाच संशय उत्पन्न होतो. तो एखादा नजरबंदीचा खेळच असावा, अशी भावना होते. अशा रीतीनें येथें माणसाच्या ठिकाणीं एक प्रकारें दुहेरी वृत्ति निर्माण होते ; एक सक्रिय आणि एक निष्क्रिय. मनुष्याचें वागणेंसुद्धां दोन प्रकारचें होऊं लागतें. एकाच शरीरांत दोन माणसें जणुं वास करूं लागतात ! रॉबर्ट लुई स्टीव्हन्सनच्या डॉ. जेकिल आणि मि. हाईड यांच्याप्रमाणें ! वाचली आहेस का तूं ती गोष्ट ?

काळानें सर्व कांहीं माणसाच्या आंगवळणीं पडतें. तुरुंगांतील रेखीव नित्यक्रम आणि तोच तोपणासुद्धां. मग येथील विश्रांति शरीराच्या दृष्टीनें चांगली ठरते; येथील शांतताही मनाला, बुद्धीला हितकारक ठरते; कारण त्यामुळें माणसाला विचार करायला सवड मिळते. ही माझी अवस्था तूं लक्षांत आणलीस म्हणजे मग कदाचित् तुला हीं जीं पत्रें मी लिहितों त्यांचें माझ्या येथील जीवनांत केवढें मोठें महत्त्व आहे, हें समजेल. तुला तीं वाचतांना अगदींच नीरस वाटतील कदाचित्. तीं कंटाळवाणीं वाटतात, उगीच त्यांत नुसती लांबण लावलेली आहे, असें सुद्धां तूं म्हणशील; परंतु माझें तुरुंगांतील जीवन सुनें सुनें न वाटायला या पत्रांची केवढी मदत झालेली आहे! त्यामुळें मला येथें एक केवढें मोठें काम मिळालें आहे आणि या कामामुळें मला केवढा मोठा आनंदाचा ठेवा प्राप्त झालेला आहे! नैनी तुरुंगांत हीं पत्रें लिहावयाला मी सुरुवात केली, त्याला आज दोन वर्षें झालीं. त्या दिवशींही वर्षारंभदिन होता. बाहेरून पुन्हां तुरुंगांत आल्यावर पुन्हां हीं पत्रें अशींच मी लिहीत आलों आहें. कधीं कधीं आठवडेच्या आठवडे मीं कांहीं लिहिलें नाहीं; तर कधीं कधीं, रोज अगदीं मुळींच खंड न पाडतां मी लिहीत आलों. एकदां लिहिण्याच्या स्फूर्तीनें मी भारला गेलों आणि दऊत-टांक घेऊन लिहावयाला बसलों, कीं मग मी निराळ्याच जगांत वावरायला लागत होतों. त्या जगांत तूं माझ्या शेजारीं गोड सोबतीला असावयाचीस आणि तुरुंग आणि त्यातली ती सारी भानगड पार विसरून जावयाची. अशा रीतीनें हीं पत्रें तुरुंगाच्या वातावरणांतून निसटून जाण्याचें मला एक मोठेंच साधन झालें आहे.

आज जें मी हें पत्र लिहितों आहें तें १२० वें आहे. हे क्रमांक घालण्याची सुरुवात नुकती नऊ महिन्यांपूर्वी बरेलीच्या तुरुंगांत मीं केली. एवढ्यांत एवढें थोरलें मीं लिहिलें, हें पाहून माझा मलाच अचंबा वाटतो आणि या पत्रांच्या राशींचा डोंगरच्या डोंगर जेव्हां एकदम तुझ्या डोक्यावर पडेल तेव्हा तूं काय म्हणशील कोण जाणे, असा विचार माझ्या मनांत येतो. पण तुरुंगाच्या वातावरणांतून निसटून बाहेरच्या जगांत प्रवास करण्याची ही जी संधि त्यामुळें मला मिळते, ती मला मिळूं नये असें तुला कसें बरें वाटेल? आज सात महिने झाले तुझी-माझी भेट झाली नाहीं; केवढा मोठा काळ आहे बरं हा!

माझ्या पत्रामधील ही गोष्ट तशी कांहीं म्हणण्यासारखी गोड नाहीं. इतिहास असा गोड नाहींच मुळांत. मनुष्यानें पुष्कळ मोठी प्रगति केल्याबद्दल कितीही नगारे वाजविले, तरी मनुष्यप्राणी हा अजून अतिशयच दुःखदायक आणि स्वार्थी असाच राहिलेला आहे. परंतु मनुष्याचा स्वार्थीपणा, भांडखोरपणा आणि अमानुषपणा यांच्या या दीर्घकालीन व मन खट्टू करणाऱ्या इतिहासाच्या काळ्याकुट्ट वातावरणांत पहिल्यापासून येट आतापर्यंत प्रगतीच्या किरणांची एक तरी रेषा सारखी धांवत आलेली आपणांस आढळून येते. मी जात्या थोडा आशावादी मनुष्य आहें आणि एकंदर

जीविनाकडे मी मोठ्या कौतुकानें आणि सदिच्छेनेंच पाहत असतों; परंतु या आशावादित्वामुळें आपल्या भोंवतीं व आपल्यामध्यें जे कांहीं खोल काळे खड्डे किंवा घोकयाच्या जागा आहेत त्यांकडे आपण दुर्लक्ष करतां कामा नये किंवा अविवेकी आशावादीपणानें भलत्याच ठिकाणाहून चांगलें होण्याची अपेक्षा करण्याची चूक करून नुकसानींत सांपडण्यापासूनही आपण सावध राहिलें पाहिजे. कारण जगाची आतांपर्यंत जी अवस्था होत आली आणि जी होत आहे, तिच्यांत आशावादित्वाला खरोखरच फार थोडीच जागा आहे. ध्येयवादी मनुष्य किंवा कोणतीही गोष्ट निव्वळ श्रद्धेच्या जोरावर गृहीत न समजणारा मनुष्य यांच्यापुढें हें जग म्हणजे एक कठिण कोडें आहे. अशा माणसाच्या मनांत नाना तऱ्हेचे प्रश्न उद्भवतात; परंतु जगांत त्याचें त्याला सांधें सरळ उत्तर सांपडत नाहीं. नाना तऱ्हेचे संशय निर्माण होतात आणि ते मग सहजासहजीं नाहींसे होत नाहींत. जगामध्यें इतका अविवेकीपणा आणि इतकें दुःख कां असावें, हा त्यांतला एक प्रश्न आहे. हा प्रश्न प्राचीन काळापासूनचा असून, आपल्या देशांत २५०० वर्षांपूर्वी राजकुमार सिद्धार्थ यालाही हाच प्रश्न पडला होता. अशी कथा आहे, कीं त्याला ज्ञानदर्शन होईपर्यंत किंवा जगाचा बोध होईपर्यंत एकसारखा तो याच प्रश्नाचा जप करीत राहिला आणि ज्ञानदर्शन झाल्यावर तो बुद्ध झाला. तो स्वतःलाच असा प्रश्न करी म्हणतात कीं:

"ब्रह्म स्वतःच हें जग निर्माण करतें आणि त्यालाच तें दुःखांत ठेवतें, असें कसें घडेल? कारण ब्रह्म जर सर्वशक्तिमान् असेल आणि तरीही जगाला तें दुःखांत ठेवीत असेल, तर मग तें चांगलें नसलें पाहिजे, आणि तें सर्वशक्तिमान् नसेल, तर मग तें परमेश्वर नसलें पाहिजे."

आजचीं आपल्या देशाची अवस्था पाहा ना. इकडे स्वातंत्र्याचा झगडा सुरू आहे, तर आमच्या देशबांधवांपैकीं पुष्कळसे लोक तिकडे कांहींच लक्ष देत नाहींत. आपापसांत वाद घालीत आणि तंटे करीत बसतात आणि आपल्या धर्माचीच फक्त काळजी करीत बसून सर्वसामान्य अशा देशहिताचा प्रश्नच अजिबात विसरून जातात आणि कांहीं कांहींनीं तर स्वातंत्र्याकडे कानाडोळा करून,

"जुलुमी लोकांशीं संगनमत केलेलें आहे आणि सर्कशीच्या पाळीव जनावरांप्रमाणें ते वागूं लागले आहेत; आपले टाकून दिलेले जुने मुकुट घालायला त्यांनीं सुरुवात केलेली आहे आणि सांदीकोपऱ्यांत पडलेल्या धर्ममतांचा आश्रय करायचा त्यांनीं आव आणलेला आहे. आपले जुने धर्मग्रंथ (!), पोथ्या, आपले जुने फाटके पुन्हां रंगवून स्वच्छ केलेले झगेही वापरायला त्यांनीं सुरुवात केली आहे."

कायदा आणि सुव्यवस्था यांच्या नांवाखालीं देशांत जुलुमाचा धुमाकूळ चालला आहे आणि जुलुमापुढें मान न वांकविणारांना पार दडपून टाकलें जात आहे. जो कायदा किंवा जो राज्यकारभार दुर्बलांचें आणि दलितांचें आश्रयस्थान व्हावा, तोच असा जुलूम करणारांच्या हातचें एक शस्त्र होऊन राहावा, ही किती विचित्र घटना

आहे! या पत्रात आतांपर्यंत मीं पुष्कळ उतारे दिलेले आहेत. तरी पण आणखी एक उतारा मी देणारच. मला तो फारच आवडतो आणि आपल्या देशाच्या आजच्या स्थितीशीं तो अत्यंत जुळताही आहे. अठराव्या शतकांतील एक फ्रेंच तत्त्वज्ञ माँटेस्क्यू याच्या ग्रंथामधील हा उतारा आहे. मागच्या एका पत्रांत मीं त्याबद्दलचा उल्लेख केलेला आहे. तो म्हणतो :

"दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडून अगदीं बुडून मरण्याच्या बेतात असलेल्या माणसाला भर समुद्रांत एखादी फळी सांपडावी व तिच्या आश्रयानें त्यानें आपला जीव कसा तरी वांचविलेला असावा. अशा प्रसंगांत त्याचें तें जीव वांचविण्याचें साधनच बुडबून टाकणें किंवा त्यालाच बुडवून टाकणें याच्याहून अधिक निर्दय अत्याचार असूंच शकणार नाहीं; मग त्याच्यावर भले कायद्याची किंवा न्यायमंदिराच्या निकालाची वाटेल तितकी रंगसफेती देण्याचा प्रयत्न करा."

वर्षारंभाच्या आनंदकारक दिवसाच्या दृष्टीनें माझें हें पत्र जरासें निरुत्साहकारक झालें आहे. आजच्या दिवसाच्या दृष्टीनें माझें हें करणें अगदीं अप्रशस्त आहे; परंतु खरोखर मी निरुत्साह झालेलों नाहीं आणि निरुत्साही होण्याचें आपल्याला कारण तरी काय आहे? एका मोठ्या कार्यासाठीं आपण काम करतों आहों आणि झगडतों आहों हा आनंद आम्हांला आहे. आमचा पुढारी श्रेष्ठ आहे; आमचा तो प्रिय मित्र आणि मार्गदर्शक आहे. त्याच्या दर्शनानें आमच्या ठिकाणीं शक्ति निर्माण होते आणि स्पर्शानें आमचा उत्साह जागृत होतो आणि आमची पक्की खात्री आहे, कीं यश हें आम्हांला मिळावयाचें आहे. आज ना उद्यां आम्ही तें मिळविणारच. अशा स्थितींत वाटेंत ज्या अडचणी आम्हांला ओलांडावयाच्या आहेत आणि ज्या लढाया लढून जय मिळवायचे आहेत, त्या अडचणी आणि त्या लढाया जर आमच्या जीवनामध्यें असणार नाहींत, तर त्याविना तें जीवन अगदींच नीरस आणि कंटाळवाणें होईल.

आणि बाळे, तूं तर आतां कोठें जीवनाच्या उंबरठ्याशीं उभी आहेस. तुला जीवनांतील काळ्या आणि भीतिदायक, निरुत्साहकारक अशा भागाकडे पाहण्याचें एव्हांच कांहीं कारण नाहीं. पुढें वेळ येईल तेव्हां तूं तुझ्या जीवनाचा आणि त्यांत जें काय घडेल त्याचा आनंदी आणि निर्विकार चेहऱ्यानें स्वीकार करशील आणि खुशाल ज्या काहीं अडचणी यायच्या असतील त्या तरूनच पुढें जाण्यांत आनंद आहे, अशा घडाडीनें तूं वागशील, यांत मला मुळींच संशय नाहीं आणि तसें लौकरच घडून येवो!

तेव्हां लाडके, आतां आपली पुन्हां गाठ होईपर्यंत नमस्ते!—लौकरच येऊं दे तो भेटीचा दिवस!

# १२१

# फिलिपाइन्स आणि अमेरिका

३ जानेवारी, १९३३

नूतन वर्षारंभाच्या दिवशीं आपण थोडें विषयातर केलें. आतां पुन्हां आपली गोष्ट चालू करूं या. आज आपण फिलिपाइन बेटांचा विचार करूं. म्हणजे आशिया खंडांतील पूर्व भागाचें चित्रण पुरें होऊन जाईल. या बेटांकडे इतकें खास लक्ष आपण द्यावें असें त्यांमध्यें काय आहे एवढें ? आशिया खंडांत आणि इतरत्रही आणखी दुसरीं किती तरी बेटें अशीं आहेत, कीं त्यांचा या पत्रांमध्यें मीं नुसता नांवानेंसुद्धां उल्लेख केलेला नाहीं. आशिया खंडांत साम्राज्यशाहीची वाढ कशी झाली आणि या वाढीचे प्राचीन सुधारणांच्यावर कोणते परिणाम झाले, हें पाहण्याचा आपण प्रयत्न करतों आहों. या आपल्या अभ्यासाप्रीत्यर्थ हिंदुस्थानांतील साम्राज्य हें एक अत्यंत नमुनेदार उदाहरण आहे. चीनमध्यें औद्योगिक साम्राज्यशाहीच्या विस्ताराचा आणखी एक निराळाच नमुना दृष्टीस पडतो ; तोही अतिशयच महत्त्वाचा आहे. ईस्ट इंडीज बेटें, इंडोचायना वगैरे बेटांपासूनही या बाबतींत आपल्याला थोडें थोडें ज्ञान मिळण्यासारखें आहे. फिलिपाइन बेटांचा वृत्तांतही आपल्याला याच दृष्टीनें पाहण्यासारखा आहे. त्यांतल्या त्यांत या देशांत आणखी एका नवीन राष्ट्राचा कारभार आपणांस पाहावयास सांपडतो. यामुळें त्याचा विचार जास्तच बोधप्रद होण्याचा संभव आहे. हें नवीन राष्ट्र म्हणजे अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचें. त्याचा आपण नुसता अमेरिका असा सुटसुटीत निर्देश यापुढें करीत जाऊं.

आपण पाहिलेंच आहे, कीं चीनमध्यें कांहीं अमेरिकेचें धोरण बाकीच्या राष्ट्रांइतकें चढाऊपणाचें किंवा आक्रमक नव्हतें. उलटपक्षीं, बाकीच्या साम्राज्यशाही राष्ट्रांना अमेरिकेनें कांहीं प्रसंगीं थोडें खेंचून धरल्यामुळें चीनचा थोडाबहुत फायदाच झाला. अमेरिकन लोकांना साम्राज्यवादाची आवड नव्हती, किंवा चीनबद्दल त्यांना विशेष आपलेपणा होता, म्हणून अमेरिकन लोकांनीं असें केलें असें मुळींच नव्हे, तर असें होण्याचें कारण अमेरिका देशांतील कांहीं अंतर्गत परिस्थिति ही होती. तिच्यामुळें बाकीच्या राष्ट्रांच्या आणि अमेरिकेच्या धोरणांत फरक पडत होता. युरोपियन राष्ट्रें हीं जीं होतीं, तीं एक तर एका लहानशा यूरप खंडांत खच्चून दाबून भरल्यासारखीं झालेलीं होतीं. तिकडे त्यांची लोकसंख्या इतकी दाट झालेली होती, कीं कोणालाही इकडेतिकडे थोडेंसें हलायला सवड राहिलेली नव्हती. त्यामुळें यूरपमध्यें नेहमीं घासाघीस आणि झगडे चालू असत. पुढें औद्योगीकरण सुरू झालें; त्याबरोबर तर या देशांची लोकसंख्या आणखीच झपाट्यानें वाढत चालली. तसेंच त्यांच्यामध्यें जास्त मालाचें उत्पादन होऊन तो माल त्या देशांत खपणें अशक्य

झालें. वाढत्या लोकसंख्येसाठीं खाद्य पदार्थांची गरज होती. तयार मालासाठीं बाजारपेठ हवी होती आणि कारखान्यांना कच्चा माल हवा होता. सर्व उणीवा पुऱ्या करण्याची ही जी आर्थिक स्वरूपाची आवश्यकता होती, तिच्यासाठीं या राष्ट्रांतील लोकांना दूरदूरचे देश धुंडावे लागले आणि साम्राज्यासाठीं एकमेकांमध्यें युद्धें करावीं लागलीं.

अमेरिकेला यांपैकीं कोणताच प्रश्न उपस्थित होणारा नव्हता. त्यांचा देशच मुळांत जवळ जवळ यूरप खंडाएवढा मोठा होता आणि त्याची लोकसंख्या अगदींच थोडी होती. येथील लोकांना या ठिकाणीं राहायला वाटेल तेवढी जागा होती. या देशांतील वाहतुकीस न आलेले विशाल प्रदेशही वाहतुकीला आणून त्यांच्यातील साधनसंपत्तीची वाढ करण्याच्या कामांत आपली असेल नसेल ती सारी शक्ति खर्च करण्याला तेथील लोकांना सवड होती. त्यांचे आगगाडीचे रस्ते जसजसे बांधून होत गेले, तसतसा त्यांचा विस्तार पाश्चिम दिशेला होत गेला आणि पुष्कळ काळानंतर अखेरीस त्यांनीं पॅसिफिक महासागर गांठला. आपल्या स्वतःच्या देशामधल्याच या सगळ्या कामांत अमेरिकन लोक सर्वस्वीं गुंतून गेलेले असल्यामुळें वसाहती मिळविण्यासाठीं धडपडी करण्याला त्यांना वेळही नव्हता आणि तिकडे त्यांची प्रवृत्तीही वळली नाहीं. एवढेंच नव्हे, तर मागें मीं सांगितलेलें आठवत असेल तुला, कीं अमेरिकेंत कामगार कमी पडल्यामुळें उत्तर अमेरिकेलाच चीनमधून कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावरील प्रदेशांत काम करण्यासाठीं कामगार आणावे लागले होते. अमेरिकेच्या विनंतीप्रमाणें चीननें कामगार पुरविण्याची व्यवस्थाही केली आणि यांतूनच पुढें या दोन देशांमध्यें एक प्रकारची कटुता निर्माण झाली. तेव्हां अशा प्रकारें अमेरिकन लोकांचें सर्व लक्ष स्वतःच्या देशामध्येंच गुंतलेलें असल्यामुळें हे लोक यूरप खंडांतील राज्यकर्त्यांनीं जी साम्राज्यवर्धनाची चुरशीची धामधूम चालविली होती, तिच्यापासून अलिप्त राहिले. चीनमध्येंसुद्धां आपण आपला हात शिरकवलाच पाहिजे, तसें केलें नाहीं तर हीं बाकीचीं राष्ट्रें चीनची आपआपल्यामध्यें वांटणी करून मोकळीं होतील, असें जेव्हां दिसून आलें तेव्हांच अमेरिकेनें चीनच्या राजकारणांत लक्ष घातलें.

फिलिपाइन बेटांत मात्र प्रत्यक्ष अमेरिकेचें राज्यच सुरू झालें. या बेटांवरून आपल्याला अमेरिकेच्या साम्राज्यवादाची चांगली कल्पना येते. म्हणून त्या बेटांचा इतिहास आपल्याला पाहण्यासारखा आहे; परंतु अमेरिकेचें साम्राज्य फिलिपाइन बेटांपुरतेंच मर्यादित आहे, अशी मात्र समजूत करून घेऊं नको. बाहेरून पाहिलें तर आज त्यांचें साम्राज्य असें या फिलिपाइन बेटांतच आहे असें दिसतें खरें; परंतु बाकीच्या साम्राज्यशाही राष्ट्रांना जे अनुभव आले आणि ज्या अडचणी सोसाव्या लागल्या त्यांवरून योग्य तो धडा घेऊन अमेरिकेनें साम्राज्यस्थापनेच्या जुन्या पद्धतींत थोडी सुधारणा केलेली आहे. इंग्लंडनें पूर्वी हिंदुस्थान देशच सर्वंष ताब्यांत घेतला, तसा आतां कोणताही देश ताब्यांत घेण्याच्या मानगडींत अमेरिकन लोक पडत नाहींत. त्यांचा सगळा उद्देश काय, तर पैसा मिळविण्याचा. तेव्हां कोणत्याही देशाच्या संपत्तीवर

ताबा मिळविण्याचें धोरण त्यानीं धरलेलें आहे. या चतुर युक्तीला आर्थिक साम्राज्यवाद असें म्हणतात. नकाशांत पाहूं गेलीस तर तुला तो कोठेंच आढळणार नाहीं. भूगोलाचें पुस्तक पाहतां किंवा नकाशावरून असें आढळेल कीं अमुक देश ना, अगदीं स्वतंत्र आहे; परंतु वरचा पडदा दूर करून जर आंतल्या बाजूला पाह्यला गेलीस, तर तुला आढळेल कीं हा देश दुसऱ्या एका देशाच्या पकडींत सांपडलेला आहे. दुसऱ्या देशाच्या म्हणण्यापेक्षां अशा दुसऱ्या देशांतील पेढीवाल्यांच्या आणि मोठमोठ्या उद्योग-धंद्यांच्या मालकांच्या तावडींत, असें म्हटलें असतां अधिक बरें होईल. तेव्हां अमेरिकेच्या ताब्यांत असें हें अदृश्य साम्राज्य आहे आणि हिंदुस्थान काय किंवा इतर कोठें काय, ब्रिटन जेव्हां बाह्यतः त्या त्या देशांतील राजकीय यंत्राचा ताबा त्या त्या देशाच्या लोकांच्या हातीं देऊं करतें त्या त्या वेळीं तेथें हें अदृश्य साम्राज्य; परंतु पहिल्या दृश्य साम्राज्याइतकेंच लाभदायक असें आपलें साम्राज्य, कायम टिकविण्यासाठीं तर ब्रिटनची धडपड चालू असते. ही एक अत्यंत धोक्याची गोष्ट आहे आणि तिच्याबद्दल आपण सावध असलें पाहिजे.

परंतु या अदृश्य आर्थिक साम्राज्याचा याहून अधिक खोल विचार करण्याचें आतांच आपल्याला कारण नाहीं. कारण फिलिपाइन बेटें हीं दृश्य साम्राज्याचाच एक भाग आहेत.

फिलिपाइन बेटांच्या इतिहासाकडे आपलें लक्ष जाण्याला आणखी एक भावनात्मक कारण आहे. आज या बेटांवर सगळी स्पेन आणि अमेरिकेच्या संस्कृतीची छाया पडलेली दिसत असली, तरी त्यांच्या सर्व संस्कृतीची पार्श्वभूमि किंवा मूळ म्हणा हिंदुस्थानांतूनच तिकडे गेलेलें आहे. हिंदी संस्कृतीचा प्रवेश, फिलिपाइन-मध्यें सुमात्रा आणि जावा यांच्यामधून झाला आणि तिचा परिणाम तेथील सामाजिक, धार्मिक, राजकीय, एकूण एक सर्व जीवनावर झाला. आमच्या प्राचीन हिंदी पुराण-कथा आणि आमचें कांहीं वाङ्मय यांचाही तेथें प्रवेश झाला होता. तेथील भाषांमध्यें किती तरी संस्कृत शब्द आढळतात. त्यांच्या कलेवरही हिंदी कलेचा परिणाम झालेला आहे, तसाच त्यांच्या कायदेकानूंवर आणि हस्तव्यवसायांवरही. कपडे आणि दाग-दागिने यांच्यावरसुद्धां हिंदुस्थानची छाप या देशांत पडलेली आढळून येते. अर्थात् स्पॅनिश लोकांनीं आपल्या तीनशें वर्षांच्या अमदानींत प्राचीन हिंदी संस्कृतीच्या या सर्व खुणा नाहींशा करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें आज त्यांपैकीं फार थोड्यांचें अवशेष येथें दृष्टीस पडतात.

स्पॅनिश लोकांनीं फिलिपाइन बेटें व्यापण्याला सुरुवात फारच पूर्वी म्हणजे १५६५ पासून केली. अशा रीतीनें यूरपीय लोकांचा आशिया खंडामध्यें अगदीं प्रथम पाय जो रोंवला गेला तो या फिलिपाइन बेटांमध्यें. पोर्तुगीज, ब्रिटिश किंवा डच लोकांच्या वसा-हतींतल्यापेक्षां येथील कारभार स्पॅनिश लोकांनीं निराळ्या पद्धतीनें चालविलेला दिसतो. या ठिकाणीं व्यापारवाढ करण्याकडे मुळीच लक्ष देण्यांत आलें नाहीं. राज्य-

कारभाराची सर्व भूमिका धार्मिक स्वरूपाची होती. बहुतेक सगळे अधिकारी लोक हे मिशनरी किंवा पाद्री लोकांपैकी असत. म्हणून इतिहासांत या साम्राज्याला "मिशनऱ्यांचें साम्राज्य" असें नांव मिळालेलें आहे. स्थानिक लोकाची परिस्थिति सुधारण्याचा एवढासुद्धां प्रयत्न करण्यांत आला नाहीं. राज्यकारभार अगदींच अंदाधुंदीचा असे. जुलूम पुष्कळ होत असे. करांचें ओझें खूप जबरदस्त लादलेलें होतें आणि जबरदस्तीनें लोकांना बाटवून ख्रिस्ती करण्यांत येई. या परिस्थितीनें पुष्कळदां बंडें झालीं. पुष्कळसे चिनी लोक या बेटांवर व्यापाराकरितां म्हणून या वेळीं आले; परंतु त्यांनीं ख्रिस्ती होण्याचें नाकारलें म्हणून त्यांच्या पद्धतशीरपणें कत्तली करण्यांत आल्या. इंग्रज आणि डच व्यापाऱ्यांना या बेटांवर येऊंच दिलें जात नव्हतें. याचें एक कारण या देशांत आणि स्पेनमध्यें पुष्कळदां युद्धेंच चालू असत आणि दुसरें कारण म्हणजे त्या देशांतील ख्रिस्ती लोक हे प्रॉटेस्टंट पंथाचे असत. रोमन कॅथॉलिक पंथाच्या स्पॅनिश लोकांच्या दृष्टीनें हे लोक म्हणजे धर्मभ्रष्ट, पाखंडी असे होते.

या अमलाखालीं बेटांची अवस्था खालावत चालली; परंतु या गोष्टीचा एक चांगला परिणाम झाला. या बेटांमधील निरनिराळ्या विभागांमध्यें आणि गटांमध्यें ऐक्य प्रस्थापित होऊन एकोणिसाव्या शतकामध्यें त्यांच्यांत एक प्रकारची राष्ट्रीय जागृतीही झाली. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला हीं बेटें इतर देशांनाही व्यापारासाठीं खुलीं करण्यांत आलीं. त्यामुळें शिक्षणांत आणि इतरही जीवनांगांत कांहीं सुधारणा अमलात आल्या आणि व्यापारउदीम वाढला. फिलिपिनोंचा एक मध्यम वर्गही येथें निर्माण झाला. फिलिपिनो लोक आणि स्पॅनिश लोक यांच्यामध्यें परस्परांत लग्नें होत असत. त्यामुळें पुष्कळ फिलिपिनोंच्या शरीरांत स्पॅनिश रक्ताचा अंतर्भाव असे. स्पेन म्हणजे आपला जणुं मायदेश अशीही थोडीशी भावना जागृत झालेली होती आणि स्पॅनिश विचारांचाही प्रसार झालेला होता. तरीपण एक प्रकारची राष्ट्रीय प्रवृत्ति वाढतच होती आणि राज्यकर्त्यांकडून ही प्रवृत्ति दडपून टाकण्याचे प्रयत्न झाल्यामुळें तिला स्वाभाविकच क्रांतिकारक वळण लागलें. प्रथम कांहीं स्पेनपासून फुटून निघण्याची कल्पना फिलोपिनोंच्या मनांत नव्हती. स्थानिक स्वतंत्र राज्य, स्वायत्तता आणि स्पेनच्या दुचळ्या आणि कर्तृत्वशून्य अशा पार्लमेंटमध्यें (त्यालाच कोर्टेझ असें नांव आहे) प्रतिनिधी पाठविण्याचा एक प्रकारचा हक्क एवढ्याच त्यांच्या सुरुवातीला मागण्या होत्या. सर्वच ठिकाणीं राष्ट्रीय चळवळी सुरुवातीला अगदीं नेमस्त स्वरूपाच्या कशा असतात, मग हळूहळू त्या तीव्र होत जातात आणि शेवटीं त्यांचें ध्येय साम्राज्यशाहीपासून अजिबात फुटून जाऊन पूर्ण स्वातंत्र्य असें कसें होतें, ही गोष्ट या उदाहरणावरून थोडोशी पाहण्यासारखी आहे. स्वातंत्र्यासाठीं केलेली मागणी प्रथम जर दडपून टाकली, तर पुढेमागें ती चक्रवाढव्याजासहित पुरी करावी लागते. तेव्हां फिलिपाइन बेटांतही ही मागणी अशीच वाढत गेली. ती पुरी करून घेण्यासाठीं म्हणून राष्ट्रीय संस्था

प्रस्थापित झाल्या. त्यांतच गुप्त संस्थाही सर्वत्र पसरल्या. " तरुण फिलोपिनोंचा पक्ष " म्हणून जो एक डॉ. जोस रिझाल यांच्या नेतृत्वाखालीं पक्ष होता, त्यानें या राष्ट्रीय आंदोलनांत चांगली महत्त्वाची कामगिरी बजाविली. ही सगळी चळवळ दडपून टाकायला स्पॅनिश सरकारलाही इतर सर्वच सरकारांप्रमाणें एकच हत्यार तेवढें माहीत होतें. तें म्हणजे भयंकर दडपशाही आणि जुलूम अथवा हत्याकांड. यामध्यें रिझाल आणि इतरही पुष्कळ पुढाऱ्यांना १८९६ सालीं फांशीं देण्यांत आलें.

हा स्पॅनिश सरकारच्या पापाच्या घड्यांतील शेवटचा बिंदु ठरला. यानंतर फिलोपिनो लोकांनीं स्पॅनिश सरकाराविरुद्ध उघड उघड बंड पुकारलें व आपला " स्वातंत्र्याचा जाहीरनामा " प्रसिद्ध केला. सबंध वर्षभर हा झगडा चालला ; परंतु स्पॅनिश लोकांना कांहीं हें बंड मोडून काढतां आलें नाहीं. मग त्यांनीं भरपूर राजकीय सुधारणा करण्याचें वचन दिलें. तेव्हां बंड तात्पुरतें बंद करण्यांत आलें ; परंतु वचन दिल्याप्रमाणें स्पेननें कांहींसुद्धां केलें नाहीं. त्यामुळें १८९८ मध्यें बंड पुन्हां पेटलें.

या दरम्यान अमेरिकन सरकारचा स्पेनशीं दुसऱ्या कांहीं एका बाबीवरून तंटा होऊन या दोन देशांमध्यें युद्ध जाहीर झालें होतें. म्हणून अमेरिकेच्या एका लष्करी काफिल्यानें १८९८ मध्यें एप्रिल महिन्यांत फिलिपाइन बेटांवर हल्ला केला. बंडखोर फिलोपिनोंना मोठी आशा वाटली, कीं एवढें मोठें हें अमेरिकेचें प्रजासत्ताक राज्य, तें आपल्या स्वातंत्र्याला पाठिंबा देईल. म्हणून या लोकांनीं त्या युद्धांत अमेरिकेला मदत केली. पुन्हां एकदां आपलें स्वातंत्र्य जाहीर करून फिलिपिनो लोकांनीं एक प्रकारच्या प्रजासत्ताक राज्याची आंखणी केली. १८९८ च्या सप्टेंबर महिन्यात फिलिपिनो काँग्रेसची बैठक सुरू होऊन नवंबरच्या अखेरीला नवीन घटना मंजूरही करण्यांत आली ; परंतु इकडे ही काँग्रेस नव्या घटनेची चर्चा करीत होती, तेव्हां दुसरीकडे स्पेनचा पराभव करण्याचें अमेरिकेचें काम चाललें होतें. स्पेन अगदींच दुर्बल देश ; वर्षअखेरीच्या आंतच त्यानें पराभव झाल्याचें कबूल केलें आणि हें युद्ध संपलें. तहाच्या शर्तीप्रमाणें स्पेननें फिलिपाइन बेटें अमेरिकेच्या हवालीं केलीं. स्पेननें अमेरिकेला हा जो प्रचंड नजराणा दिला, त्यांत स्पेनचें कांहींच नुकसान झालें नाहीं. कारण फिलिपिनो बंडवाल्यांनीं फिलिपाइनमधील स्पॅनिश सत्तेला कधींच खो दिलेला होता.

त्यानंतर आतां अमेरिकेनेंच फिलिपाइन बेटांचा ताबा आपणांकडे घेण्याचा उपक्रम सुरू केला. या गोष्टीचा फिलिपिनो लोकांनीं निषेध केला. त्यांनीं असेंही दाखवून दिलें, कीं स्पेनला हीं बेटें दुसऱ्या कोणाला देण्याचा हक्क राहिलेला नव्हता. कारण त्या वेळीं स्पेनची देण्याजोगी सत्ताच फिलिपाइनवर शिल्लक नव्हती. परंतु त्यांचा सगळा निषेध फुकट गेला आणि ज्या क्षणाला ते लोक आपण नवीनच जिंकून घेतलेल्या स्वातंत्र्याबद्दल आनंदोत्सव करण्याच्या हुरूपामध्यें होते, त्याच क्षणाला त्यांना पुन्हां आणखी एक झगडा करण्याची पाळी आली ! आणि आतां हा

झगडा स्पेनपेक्षां किती तरी प्रचंड समर्थ अशा राज्यसत्तेशीं द्यावयाचा होता. तरीपण त्या शूर लोकांनीं हा झगडा तेजस्वीपणानें साडेतीन वर्षेपर्यंत चालविला. कांहीं दिवस त्यांचा हा लढा त्या देशाचें सुसंघटित सरकार या नात्यानें होता. पुढें मात्र त्याना लपून छपून गनिमी काव्याचा लढा करणें प्राप्त झालें.

अखेरीस हें बंड पूर्ण दडपून टाकण्यांत आलें आणि अमेरिकेचें राज्य फिलिपाइन बेटांवर प्रस्थापित करण्यांत आलें. त्यानंतर तेथें पुष्कळच मोठ्या सुधारणा करण्यांत आल्या. शिक्षणामध्यें तर विशेषच. तरीपण फिलिपिनोंची स्वातंत्र्याची मागणी चालूच होती. १९१६ सालीं अमेरिकेनें "जोन्सचें बिल" या नांवानें प्रसिद्ध असलेला एक कायदा पास करून राज्यकारभाराचे कांहीं हक्क लोकनियुक्त कायदेमंडळाच्या हवालीं केले. परंतु या कारभारांत हस्तक्षेप करण्याचा अधिकार अमेरिकेच्या गव्हर्नर जनरलला आहे आणि त्यानें तो वारंवार बजावलेलाही आहे.

अमेरिकेच्या फिलिपाइन बेटांवरील अधिकाऱ्यांविरुद्ध आतांपर्यंत बंडें मुळींच झालेलीं नाहींत; परंतु फिलिपिनो लोक आहे ती राज्यव्यवस्था मान्य करून स्वस्थ मात्र बसलेले नाहींत. त्यांची स्वातंत्र्याची मागणी चालूच आहे. साम्राज्यशाही लोकांना अगदीं पूर्ण शोभेल अशा रीतीनें अमेरिकन लोक फिलिपिनो लोकांना वारंवार आश्वासनें देत आलेले आहेत, कीं आम्ही जे तुमच्या बेटांमध्यें आलों आहोंत ते केवळ तुम्हां लोकांचें कल्याण व्हावें याच बुद्धीनें आणि तुमचे तुम्ही राज्यकाभार करायला समर्थ झालांत रे झालांत कीं लगेच आम्ही हें बेट सोडून जाऊं. १९१६ च्या जोन्सच्या बिलातसुद्धां नमूद केलें आहे कीं, "फिलिपाइन बेटांमध्यें स्थिर अशा स्वरूपाची राज्यव्यवस्था स्थापन करण्याजोगी परिस्थिति उत्पन्न होतांच या बेटांचें स्वातंत्र्य मान्य करावें आणि आपला अधिकार काढून घ्यावा असाच हेतु अमेरिकन लोकांचा फार पूर्वीपासून आहे." असें असूनही फिलिपाइन बेटांच्या स्वातंत्र्याचे कट्टे विरोधक असे लोक आज अमेरिकेंत किती तरी आहेत.

हें मी लिहीत असतांना अशी बातमी आली आहे, कीं अमेरिकन सरकारनें एक ठराव करून, जाहीरनामा काढून फिलिपाइन बेटांना आणखी दहा वर्षांच्या आंत पूर्ण स्वातंत्र्य दिलें जाईल असें आश्वासन दिलें आहे.

अमेरिकेचे फिलिपाइनमध्यें कांहीं आर्थिक हितसंबंध असून, त्यांचें रक्षण करण्यासाठीं अमेरिकन सरकार विशेष आतुर आहे. या बेटातील रबराच्या लागवडीवर त्यांचें विशेष लक्ष आहे. कारण त्यांच्या देशांत त्यांना उपलब्ध नसलेली अशी ही एक अत्यावश्यक वस्तु आहे. तरीपण हीं बेटें आपल्या हातांत ठेवण्याचें त्यांचें मुख्य कारण त्यांना जपानची भीति वाटते हें आहे, असें मला वाटतें. जपान फिलिपाइन बेटांपासून फार नजीक आहे. आणि जपानची वाढती लोकसंख्या आता जपानमध्यें मावेनाशी होऊन बाहेर ओसंडूं लागली आहे. तेव्हां जपानी सरकारची लोभी नजर या बेटांवर असणें संभवनीय आहे. अमेरिकन सरकार आणि जपानी सरकार यांचें

परस्परांशीं विशेषसें सूत नाहीं. त्यामुळें पॅसिफिक महासागरांतील या दोन मोठ्या राज्यसत्ता आणि त्यांच्यामधील परस्परसंबंध या फार मोठ्या प्रश्नाशीं फिलिपाइनच्या प्रश्नाची, सांगड पडल्यासारखी झाली आहे.

## १२२

## तीन खंडांच्या संगमाच्या ठिकाणीं

१६ जानेवारी, १९३३

पंधरा दिवसांपूर्वी, नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशीं लिहिलेल्या पत्रांत मीं जी इच्छा प्रदर्शित केली होती, ती इतक्या लौकर पुरी होईल अशी त्या वेळीं कांहीं माझी कल्पना नव्हती. कित्येक दिवस वाट पाहतां पाहतां अगदीं एकाएकीं अखेरीस तुझी माझी भेट झाली आणि तुझें दर्शन एकदांचें मला झालें! तुला आणि बाकीच्यांना भेटायला मिळाल्यामुळें आनंदाची जी खळबळ माझ्या अंतःकरणांत माजली, तिच्यांत आज कित्येक दिवस मी रंगून गेलों आहें. त्यामुळें माझा रोजचा कार्यक्रम बिघडून गेलेला असून माझ्या कामाकडेही माझें दुर्लक्ष होत आहे. सुटीच्या दिवसांत असावी ना, तशी माझ्या मनाची अवस्था झालेली आहे. चार दिवस झाले आपली भेट झाली; परंतु किती तरी दिवस होऊन गेले असावेत असें मला वाटतें आहे. एवढ्यांतच याच्या पुढच्या भेटीकडे माझे डोळे लागलेले आहेत आणि ती केव्हां होईल, कोठें होईल यांचीं स्वप्नें अनुभवण्यांत माझें मन दंग आहे.

पण भेटीला तुरुंगाच्या नियमांचें बंधन असलें, तरी माझ्या या तुझ्याशीं पत्ररूपी संवादाच्या सोंगाला तर कोठले तुरुंगाचे नियम आड येऊं शकत नाहींत! म्हणून पुन्हां हीं पत्रें चालू करण्याचें मीं ठरविलें आहे.

गेले कांहीं दिवस मी तुला एकोणिसाव्या शतकाबद्दल लिहीत आलों आहें. या शतकाची म्हणजे नेपोलियनच्या पाडावानंतरच्या सामान्यतः शंभर वर्षांच्या या काळाची सामान्य रूपरेखा तुला सांगण्याचा प्रयत्न मीं केला. नंतर मग आपण कांहीं कांहीं देशांचा थोडा तपशीलवार अभ्यास करूं लागलों. हिंदुस्थानचें आपण चांगलें यथास्थित वर्णन केलें. नंतर मग चीनचें आणि जपानचें आणि शेवटीं आपण बृहद् भारत आणि पूर्वेकडील हिंदी बेटें इकडे नजर टाकली. आतांपर्यंतच्या या काळातील तपशीलवार अशा आपल्या या पाहणीमध्यें आपण फक्त आशिया खंडाच्या कांहीं भागांचा तेवढा विचार केला आहे. बाकीचें जग अजून तसेंच बाकी आहे. ही सगळी हकिकत फारच मोठी आहे आणि तिचा धागा सरळ, स्पष्ट व एकसूत्री असा नाहीं. खंडामागून खंड असें वेगळेगळें घेऊन मला त्याच्याबद्दल

बोलावें लागतें. एका देशाचा वृत्तांत या शतकाच्या अखेरीस आणून पोंचवावा, तों पुन्हां मला परत फिरावें लागतें आणि दुसऱ्या एका देशाचा याच काळाचा वृत्तांत सांगावा लागतो. वारंवार असें हें करावें लागतें आहे. त्यामुळें ऐकणाराचा थोडासा गोंधळ होणें साहजिक आहे. तरीपण एकोणिसाव्या शतकांतले निरनिराळ्या देशांतले निरनिराळे हे जे प्रसंग मी सांगतों आहें, ते सगळे या सर्व देशांत मिळून एकाच वेळीं घडत होते, ही कल्पना तूं डोळ्यांपुढें ठेवण्याचा नित्य प्रयत्न करायला हवा. नुसतें एकाच वेळीं घडत होते असें नव्हे, तर त्यांचे एकमेकांवर परिणामही घडत होते. असें असल्यामुळेंच कोणत्याही एकाच देशाच्या इतिहासाचा अभ्यास करणें हें भ्रमोत्पादक होत असतें. निरनिराळे प्रसंग आणि दडपणें यांच्यामुळें भूतकाळांतील परिस्थितीचा बनाव कसा कसा बनत गेला आणि त्यांतून आजची वर्तमानकालीन परिस्थिति कशी निर्माण होत गली हें व त्या त्या प्रसंगाचें महत्त्व ध्यानांत येण्यासाठीं अखिल जगाच्या इतिहासाचा अभ्यास करणें हेंच आवश्यक आहे. या पत्रांतून असा जागतिक इतिहास मी तुला सांगतों आहें असा आव मला मुळींच आणावयाचा नाहीं. तें काम माझ्या आवांक्याबाहेरचें आहे आणि त्यासंबंधीं तुला काय हवीं तितकीं पुस्तकें वाचायला मिळूं शकतील. या पत्रांमध्यें मीं जें काय करण्याचा प्रयत्न केला आहे, तें म्हणजे जागतिक इतिहासाबद्दलची जिज्ञासा तुझ्या मनांत जागृत करावयाची; त्या इतिहासाचीं कांहीं विशेष अंगें तुझ्या नजरेसमोर आणावयाचीं आणि मानवी व्यवहाराचीं कांहीं सूत्रें अगदीं प्राचीन काळापासून आजपर्यंत कशीं चालत आलीं आहेत, हें तुझ्या ध्यानांत आणून द्यावयाचें. हा माझा प्रयत्न साधणार आहे कितपत हें कांहीं मला सांगतां येत नाहीं. कदाचित् माझ्या या सगळ्या परिश्रमांतून तुझ्यापुढें एक कांहीं तरी खिचडी उभी राहून त्यामुळें जगाविषयींची नीटशी चांगली खरी कल्पना येण्याऐवजीं तुझा सगळा गोंधळ उडून जाण्याचा संभव आहे, असें मला पुन्हां पुन्हां वाटतें.

एकोणिसाव्या शतकांतील कालौघाला पुढें रेटण्याचें सगळें कार्य यूरप खंडानें चालविलेलें होतें. यूरप खंडांत या वेळीं राष्ट्रवादाचा पूर्ण अम्मल होता; तसाच या खंडात औद्योगीकरणाचा विस्तार होत होता; त्याची छाया किंवा परिणाम म्हणा, जगाच्या दूरदूरच्या कोपऱ्यांपर्यंत जाऊन पोंचत होता आणि पुष्कळदां यामधून साम्राज्यशाहीचाही उदय होत होता. एकोणिसाव्या शतकाची अगदीं प्रथम जी आपण संक्षिप्त रूपरेखा पाहिली, त्या वेळीं आपण ही गोष्ट बघितली आहे आणि या साम्राज्यशाहीचे परिणाम काय झाले याचें थोडेंसें तपशीलवार वर्णन आपण हिंदुस्थानामध्यें आणि पूर्वेकडील हिंदी प्रदेशांमध्यें जाऊन केलें आहे. आतां आपल्याला यूरप खंडामध्यें जाऊन तेथलें जरा जवळून जास्त खोल निरीक्षण करावयाचें आहे; पण त्यापूर्वी आपण एकदां जरा थोडा वेळ पाश्चिम आशियामध्यें जाऊन येऊं या. पुष्कळ काळपर्यंत या भागाच्या इतिहासाकडे मीं दुर्लक्षच केलें आहे. याचें खरें कारण म्हणजे या भागाच्या पुढच्या काळच्या इतिहासाची मला नीटशी माहिती नाहीं.

या पश्चिम आशियाची गोष्ट हिंदुस्थान आणि त्याच्या पूर्वेकडील प्रदेश यांच्याहून फारच निराळी आहे. हें खरें, कीं फार फार पूर्वीच्या काळीं मध्य आशियांतील आणि पूर्व आशियांतील कित्येक टोळयांनीं जाऊन हा प्रदेश व्यापलेला होता. तुर्क लोक तरी त्या ठिकाणीं असे इकडूनच गेले होते. ख्रिस्ती शक सुरू होण्यापूर्वी बुद्ध धर्माचा सुद्धां येट आशियामायनरपर्यंत प्रसार झाला होता; परंतु त्याचें मूळ तेथें धरलेलें दिसत नाहीं. एकंदरींत पश्चिम आशियाचा संबंध अगदीं प्राचीन काळापासून आशियापेक्षां किंवा पूर्वेपेक्षां यूरप खंडाशीं अधिक जुळत आलेला दिसतो. किंवा एकपक्षीं यूरप खंडांतील वारे आंत घेण्याची आशिया खंडाची ही एक जणुं खिडकीच आहे म्हणावयाची. इकडे आशिया खंडाच्या कितीक भागांत पुढें इस्लाम धर्माचा प्रसार वाढला; परंतु त्याचा सुद्धां या भागांतील पाश्चात्य वाऱ्यावर, भूमिकेवर, तिकडे वळलेल्या तोंडावर कांहीं परिणाम झालेला नाहीं म्हणण्यासारखा.

हिंदुस्थान, चीन आणि त्याच्या आसपासचे प्रदेश यांचा यूरप खंडाशीं अशा प्रकारचा संबंध कधींच नव्हता. ते प्रदेश सर्वथा आशिया खंडाशींच समरस झालेले होते. आशिया खंडाच्या बाहेर त्यांची नजरच नव्हती. अर्थात् चीन आणि हिंदुस्थान या दोन देशांच्यामध्यें फारच मोठा फरक आहे. त्याच्यामधील मनुष्यवंश, जीवन-विषयक भूमिका आणि संस्कृति यांमध्यें कांहीं सुद्धां साम्य नाहीं. चीन देश कोणत्याही काळीं धर्माचा गुलाम बनून गेलेला नाहीं; तसेंच तेथें भिक्षुकशाहीचा अधिकार कधीं प्रस्थापित झालेला नाहीं; तर हिंदुस्थानला पहिल्यापासून मोठा अभिमान आपल्या धर्माचा आहे आणि हिंदुस्थानच्या समाजावर भिक्षुकशाहीचा फारच मोठा वरबसेपणा चालत आलेला आहे. लोकांच्या मानगुटीवर बसलेल्या या बागुलबोवाला हुसकावून लावण्याचा बुद्धानें केवढा मोठा प्रयत्न केला; पण त्याचा कांहीं उपयोग न होतां, अजूनही तो या देशाची पकड सोडीत नाहीं. चीन आणि हिंदुस्थान यांमध्यें अजूनही आणखी किती तरी फरक आहे आणि असें असूनही हिंदुस्थान आणि पूर्व आशिया आणि पूर्व आशियाचा आग्नेयीकडील भाग यांच्यामध्यें एक प्रकारची ऐक्यभावना नांदत आलेली आहे. बुद्धाच्या कथेच्या सूत्रानें हे सगळे लोक एका ठिकाणीं गोवल्या-सारखे झालेले आहेत आणि या सूत्रामुळें या लोकांच्या वाङ्मयांत, कलेंत, संगीतांत आणि लोकगीतांतही एका समान ध्येयाची गुंफण केलेली आहे. यामुळें ही आश्चर्य-कारक ऐक्यभावना या देशांमध्यें उत्पन्न झालेली आहे.

पश्चिम आशियांतील संस्कृतीचा थोडासा धागा इस्लाम धर्मानें हिंदुस्थानमध्यें आणला. ही संस्कृति हिंदी संस्कृतीहून अगदींच निराळी होती. जीवनाबद्दल हा दृष्टिकोनही अगदींच वेगळा होता. परंतु पश्चिम आशियाचा हा दृष्टिकोन हिंदुस्थानांत परस्पर किंवा जसाच्या तसा येऊन पोंचला नव्हता. आरब लोकांनीं हिंदुस्थान देश जिंकला असता, तर हा दृष्टिकोन असा पूर्ण स्वाभाविक स्वरूपांत येथें आला असता. तो हिंदुस्थानांत आला, तो किती तरी पुढच्या काळामध्यें आला आणि ज्या मध्य

आशियांतील मानववंशांनीं तो इकडे आणला, ते तो इकडे आणण्याच्या खऱ्या पात्रतेचे लोक नव्हते ! तथापि इस्लामधर्मीयांच्यामुळें हिंदुस्थानचा पश्चिम आशियाशीं संबंध जुळून आला आणि अशा रीतीनें हिंदुस्थान ही या दोन महान् संस्कृतींची एक संयोगभूमि झाली. इस्लामधर्माचा प्रवेश चीनमध्येंही झाला. त्या ठिकाणीं त्या धर्माचा स्वीकारही पुष्कळ लोकांनीं केला; पण त्याला तेथें चीनच्या प्राचीन संस्कृतीला केव्हांच धक्का लावतां आला नाहीं. हिंदुस्थानांत मात्र येथील संस्कृतीला असा धक्का देण्याचा प्रयत्न या संस्कृतीनें चांगलाच केला. कारण फार काळपर्यंत येथील राज्यकर्त्यांचा धर्म इस्लाम होता. त्यामुळें हिंदुस्थान देशांत या दोन संस्कृतींचा एकमेकांशीं सामना झाला. त्याबद्दल आणि या अवघड घटनेचा परिहार करण्यासाठीं म्हणून या दोन्ही संस्कृतींचा समन्वय करण्याचेही जे कित्येक प्रयत्न झाले, त्याच्याबद्दल मीं पूर्वी तुला लिहिलें आहे. या प्रयत्नांत यश येण्याचाही संभव दिसूं लागला होता. इतक्यांत ब्रिटिशांनीं हा देश जिंकला. हें विघ्न या प्रयत्नाच्या मार्गांत उभें राहून तो प्रयत्न पुढें चालू राहणें अशक्य होऊन बसलें. प्राचीन काळीं या दोन्ही संस्कृतींना जो कांहीं अर्थ होता, तोही आज आतां शिल्लक उरलेला नाहीं. राष्ट्रवाद आणि औद्योगीकरण यांच्या योगानें जगाचें सगळें रूपच पालटून गेलेलें आहे आणि या प्राचीन संस्कृतींचा जेवढ्या प्रमाणांत जगाच्या बदललेल्या आर्थिक परिस्थितीशीं मेळ बसण्यासारखा असेल, तेवढ्याच प्रमाणांत त्या संस्कृती यापुढें जगूं शकतील. आज त्यांचें बाहेरचें पोकळ आवरण तेवढें शिल्लक राहिलेलें आहे. त्यांच्यांतील खरें सत्त्व, खरा अर्थ आज नाहींसा झालेला आहे. पश्चिम आशियामध्यें, इस्लाम धर्माच्या प्रत्यक्ष मायदेशांत केवढाले प्रचंड फेरबदल आज होऊन राहिलेले आहेत. चीनमध्यें आणि अतिपूर्वेमध्यें एकसारखी अखंड खळबळ माजून राहिलेली आहे ! हिंदुस्थानांत काय घडलें आहे, हें तर आपण प्रत्यक्षच पाहतों आहों.

अलीकडे या पश्चिम आशियासंबंधीं लिहिण्याचें सोडून दिल्याला मला इतके दिवस होऊन गेले आहेत, कीं चटकन् मला तो गोष्टीचा धागा नीटसा पकडतां येईनासा झाला आहे. अरबांचें तें बगदाद येथील साम्राज्य अखेरीस तुर्कांच्या—उस्मानी तुर्कांच्या नव्हे, तर सेल्जुक तुर्कांच्या माऱ्यापुढें घाईला कसें आलें आणि अखेरीस चेंगीजखानाच्या मंगोलियन लोकांनीं तें पार नष्ट कसें केलें, हें मीं सांगितल्याचें तुला आठवत असेल. याच मंगोलियन लोकांनीं इराणसह मध्य आशियामध्यें पसरलेलें ख्वाराजम अथवा खिवाचें, ख्वारिज पंथीयांचें साम्राज्यही नाहींसें करून टाकलें. त्यानंतर तैमूरलंगाचा कांहीं काळपर्यंत लष्करी विजय झाला. त्यानें पुष्कळशा कत्तली केल्या आणि एवढ्यावर त्याचा कारभार आटोपला. परंतु पश्चिम आशियांत त्याच्या आधीं जें एक साम्राज्य स्थापन झालेलें होतें तें मात्र, तैमूरलंगानें एकदां जरी त्याचा पराभव केला तरीही, वाढतच गेलें. हें उस्मानी तुर्कांचें साम्राज्य. या तुर्कांनीं इराणच्या पूर्वेकडील आशिया खंडाचा सर्व प्रदेश, ईजिप्त आणि यूरपच्या आग्नेय कोपऱ्यांतील पुष्कळसा भाग,

१६ व्या व १७ व्या
शतकांतील
उस्मानी साम्राज्य
इराण
बगदाद
मेसापोटेमिया
युफ्रेटिस
अर्मेनिया
काळा समुद्र
क्रिमिया
बेसारेबिया
मोल्डाव्हिया
वालाशिया
बल्गेरिया
रुमानिया
सर्व्हिया
बुडापेस्ट
हंगेरी
डान्यूब
अल्बेनिया
ग्रीस
क्रीट
अनातोलिया
स्मर्ना
मारमोरा
सायप्रस
कायरो
ईजिप्त

एवढ्या भागांवर आपला अंमल बसविला होता. कित्येक पिढ्यांपर्यंत साऱ्या यूरपला या तुर्कांचा फार मोठा दरारा वाटत होता आणि मध्ययुगाच्या श्रद्धेच्या वातावरणांतून नुकत्याच बाहेर पडलेल्या धर्मभोळ्या आणि श्रद्धाळू यूरपियन लोकांना पापी लोकांचें पारिपत्य करण्यासाठीं परमेश्वरानेंच आपला हा कोरडा आपल्यावर उगारला आहे, असें वाटूं लागलें होतें.

उस्मानी तुर्कांच्या अमलाखालीं आल्यानंतर पाश्चिम आशिया खंड इतिहासांतून जणुं उठल्यासारखें होतें; जगाच्या जीवनाच्या ओघापासून तुटून बाजूला पडलेलें एक सांचलेल्या पाण्याचें ठिकाण अशी त्याची अवस्था होऊन गेली! कित्येक शतकें, नव्हे, कित्येक हजारों वर्षेंपर्यंत हा प्रदेश म्हणजे यूरप आणि आशिया यांना सांधणारा मोठा राजमार्ग होता. असंख्य उंटांचे तांडे या प्रदेशातील शहरांवरून आणि निर्जन मैदानांतून माल घेऊन या खंडांतून त्या खंडांत जात असत; परंतु हे तुर्क लोक व्यापाराला फारसे उत्तेजन देणारे लोक नव्हते आणि त्यांनीं असें उत्तेजन दिलें असतें, तरी जगांत या सुमारास जी एक नवीनच गोष्ट घडून आली होती तिच्यापुढें त्यांचा कांहीं उपाय चालण्यासारखा नव्हता. ही गोष्ट म्हणजे यूरप आणि आशिया यांच्यामधील जलमार्गाची वाढ. आतां समुद्रावरूनच राजरस्ता प्रस्थापित झाला. आणि निर्जन मैदानांतील उंटाची जागा समुदावरील जहाजानें पटकावली. या वाहतुकीच्या साधनांतील फरकामुळें जगापासून हा प्रदेश तुटून आतां वेगळा झाला. पुढें एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला सुएजचा कालवा उघडण्यांत आला. तेव्हांपासून तर जलमार्गाचें महत्त्व फारच वाढलें. पूर्व आणि पाश्चिम यांना जोडणारा अत्यंत मोठा असा राजमार्गच हा कालवा बनून गेला आणि त्याच्यामुळें पूर्व आणि पाश्चिम यांच्यामधील अंतर फारच कमी झालें.

त्यानंतर विसाव्या शतकांत आणखी एक फेरबदल खास आपल्या डोळ्यांसमोर घडून येत आहे आणि प्राचीन काळापासून चालत आलेल्या जमीन आणि पाणी यांच्यामधील चुरशीमध्यें पृथ्वीवरील वाहतुकीचा राजमार्ग, हमरस्ता, या नात्यानें जमिनीचा विजय होत असून-पाणी-समुद्र मागें पडत आहे. मोटारगाडीनें हा मोठा फेरबदल घडवून आणला असून त्यांत विमानानें आणखी भर टाकलेली आहे. प्राचीन काळचे वाहतुकीचे जे मार्ग आतांपर्यंत सांदीकोपऱ्यांत पडल्यासारखे झाले होते-निर्मनुष्य झाले होते, त्यांवर आतां रहदारीची गर्दी सुरू होत आहे; परंतु पूर्वीप्रमाणें मुक्काम दरमुक्काम करीत जाणाऱ्या उंटांची ही रहदारी नसून, आतां तेथें मोटारगाड्या खालीं जमिनीवर वेगानें धांवत आहेत आणि वरून आभाळांतून विमानें घरघर करीत उड्डाण करीत आहेत.

उस्मानी तुर्कांच्या साम्राज्यांत तीन खंडांचा संगम झालेला होता; आशिया, आफ्रिका आणि यूरप यांचा. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वीच किती तरी काळ हें साम्राज्य दुर्बळ होत आलेलें होतें आणि एकोणिसाव्या शतकामध्यें तें पारच मोडूनतोडून

गेलें. पूर्वी त्याला परमेश्वराचा कोरडा (शाप) म्हणत, तर आतां त्यालाच "यूरपचा दुखणाईत माणूस" असें म्हणूं लागले. १९१४ ते १८ च्या महायुद्धांत हें साम्राज्य अजीबातच नाहींसें झालें; परंतु त्याच्या राखेंतून एक नवीनच स्वावलंबी, समर्थ, पुरोगामी असा तुर्कस्तान देश निर्माण झाला. आणि दुसरींही कांहीं नवीन राष्ट्रें अस्तित्वांत आलीं.

मीं मागें म्हटलें, कीं हा पश्चिम आशियाचा भाग आशिया खंडाची यूरपच्या बाजूची खिडकी आहे. आशिया, यूरप आणि आफ्रिका या तीन खंडांना वेगळें करणारा, आणि त्यांना जोडणाराही पण, असा जो भूमध्य समुद्र तोच या प्रांताची सरहद्द आहे. तीन खंडांना जोडणारा हा भूमध्य समुद्राचा दुवा एका काळीं फारच प्रबल असा होता आणि त्याच्या कांठावर असणाऱ्या राष्ट्रांमध्यें पुष्कळच सारखेपणा होता. यूरपीय संस्कृतीचा प्रारंभ भूमध्य समुद्राच्या आसपासच्या प्रदेशांतच झाला. या तिन्ही खंडांना लागून असणाऱ्या या समुद्राच्या कांठावर सगळीकडे प्राचीन ग्रीसच्या म्हणजेच हेलासच्या वसाहती जिकडे तिकडे ठिपक्यासारख्या विखुरलेल्या होत्या; रोमचें साम्राज्यही या समुद्राच्याच सभोंवतीं होतें. ख्रिस्ती धर्माला त्याच्या प्राथमिक अवस्थेंत आश्रयस्थान या समुद्राच्या आसपासच्या प्रदेशांतच मिळालें होतें. आरबी लोकांनीं आपली संस्कृति या समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरून सिसिली बेटांत नेली आणि सगळा आफ्रिकेचा किनारा ओलांडून त्यांनीं ती पश्चिमेस थेट स्पेनमध्यें नेली आणि त्या ठिकाणीं तिचा अंमल ७०० वर्षेंपर्यंत चालू राहिला.

तेव्हां भूमध्य समुद्राला लागून असलेल्या आशिया खंडांतील देशांचा दक्षिण यूरप खंड आणि उत्तर आफ्रिका यांच्याशीं किती निकट संबंध आहे, हें यावरून आपल्याला दिसून येतें. अशा रीतीनें पूर्वीच्या काळीं आशिया खंड आणि हीं दोन खंडें यांच्यामधील दुवा हा स्वाभाविकपणेंच पूर्व आशियाचा भाग होता हें आपल्या ध्यानांत येतें; परंतु आपण पाहूंच गेलों तर असे हे निरनिराळे भाग जोडणारे, एकत्र आणणारे दुवे आपणांस जगभर सगळीकडे दिसून येतील. आपल्या ठिकाणच्या कोत्या राष्ट्रीय प्रवृत्तीमुळें जगांतले देश आपल्याला वेगवेगळे असे भासतात आणि जग खरोखर एक आहे, या जगामधल्या वेगवेगळ्या देशांचे सर्वसामान्य असेच खरेखुरे हितसंबंध आहेत, याकडे आपली डोळेझांक होते.

# १२३

# सिंहावलोकन

*१९ जानेवारी, १९३३*

अलीकडे दोन पुस्तकें मीं वाचलीं. तीं मला फारच आवडलीं. हीं पुस्तकें तुझ्याबरोबर बसून वाचायला मिळतीं तर किती मजा आली असती. हीं दोन्ही पुस्तकें रेनी ग्रूझे नांवाच्या एका फ्रेंच गृहस्थानें लिहिलेलीं असून तो पॅरिस येथील म्यूझे गाइमे या संग्रहालयाचा संचालक किंवा संरक्षक आहे. हिंदी आणि विशेषतः बुद्धधर्मीय कलाकौशल्याच्या वस्तूंच्या या संग्रहालयांत तूं जाऊन आलेली आहेस का कधीं? मला कांहीं तुला तेथें घेऊन गेल्याचें आठवत नाहीं. ग्रूझे यांनीं चार ग्रंथांत मिळून पौर्वात्य, म्हणजेच आशिया खंडांतील संस्कृतींची एक प्रकारची पाहणी केलेली आहे. या एकेका ग्रंथांत हिंदुस्थान, मध्यपूर्व (म्हणजेच पश्चिम आशिया आणि इराण), चीन आणि जपान अशा चार प्रदेशांचा स्वतंत्रपणें विचार केलेला आहे. त्यांचा आवडीचा विषय कला हा असल्यानें, त्यांनीं आपल्या विषयाचें विवेचन त्या त्या देशांत भिन्न भिन्न कलाविषयक कार्यप्रवृत्ति कशा कशा प्रकारची बनत चालली हें लक्षांत घेऊन केलेलें आहे आणि आपल्या ग्रंथामध्यें पुष्कळशीं सुंदर चित्रें त्यांनीं दिलेलीं आहेत. युद्धें, लढाया, राजे लोकांचीं कारस्थानें यांच्यामधून इतिहासाचें अवलोकन करण्यापेक्षां या तऱ्हेनें इतिहासाचा अभ्यास करणें ही मोठी मनोरंजक गोष्ट वाटते.

आतांपर्यंत ग्रूझे यांचे दोनच ग्रंथ माझ्या वाचण्यांत आले आहेत. ते म्हणजे हिंदुस्थान आणि मध्य आशिया यांच्याबद्दलचे. ते दोन्ही ग्रंथ वाचून मला फार फार आनंद वाटला. सुंदर इमारती, भव्य पुतळे, अलौकिक कोरकाम आणि चित्रकला यांचीं या ग्रंथांत दिलेलीं चित्रें पाहून, मी डेहराडूनच्या तुरुंगांत नसून तिकडे त्या दूरच्या प्रदेशांत आणि प्राचीन काळांतच वावरतों आहें, अशी माझी वृत्ति होऊन गेली.

वायव्य हिंदुस्थानांतील सिंधु नदीच्या खोऱ्यांतील मोहेंजोदारो व हरप्पा येथें सांपडलेल्या या देशांत पांच हजार वर्षांपूर्वी भरभराटींत असलेल्या प्राचीन संस्कृतीच्या अवशेषांबद्दल पुष्कळ दिवसांपूर्वी मीं तुला लिहिलें आहे. या अत्यंत प्राचीन काळीं, मोहेंजोदारोमध्यें जेव्हां या जुन्या संस्कृतींतील माणसें प्रत्यक्ष नांदत होतीं, आपले नित्यक्रम आचरीत होतीं, कामधाम करीत होतीं, खेळ आणि क्रीडा यांत रममाण होत होतीं त्या वेळीं, मोहेंजोदारोप्रमाणेंच आणखीही पुष्कळ ठिकाणीं सुधारणा व संस्कृति यांचीं केंद्रें होतीं. आज त्यासंबंधींची आपली माहिती अगदींच कोती आहे. आशिया खंडांत आणि ईजिप्तमध्यें निरनिराळ्या ठिकाणीं जे कांहीं जुने मोडतोड झालेले अवशेष सांपडले आहेत, तेवढ्यापुरतीच प्रत्यक्ष अशी कांहीं माहिती आज आपल्याला

आहे. असेंच आणखी खूप उत्खनन जर केलें आणि तेंही एखाद्या दुसऱ्या ठिकाणीं नव्हे, तर जागोजाग केलें, तर आपल्याला असे आणखी किती तरी अवशेष सांपडण्याचा संभव आहे. परंतु जेवढे अवशेष सांपडले आहेत तेवढ्यांवरूनसुद्धां, प्राचीन काळीं पुढील ठिकाणीं फार उच्च दर्जाला पोंचलेली सुधारणा नांदत होती असें आपल्याला आढळून येतें. ईजिप्तमध्यें नाईल नदीच्या खोऱ्यांत, खाल्डियामध्यें म्हणजे हल्लीं ज्याला मेसॉपोटेमिया म्हणतात तेथें (या ठिकाणीं इस्लामचें राज्य असून मुसा येथें त्याची राजधानी होती), पूर्व इराणमध्यें पॅर्सिपॉलिस येथें, मध्य आशिया खंडांत तुर्कस्तानमध्यें आणि चीनमध्यें होआंगहो म्हणजे पीत नदीच्या आसपास.

हा काळ म्हणजे घडीव दगडांचे पदार्थ टाकून देऊन मनुष्य तांब्याच्या वस्तु वापरूं लागला होता, तो काळ होय. ईजिप्तपासून चीनपर्यंत पसरलेला या सगळ्या विशाल प्रदेशांत सुधारणेची वाढ सामान्यतः एकाच पातळींत झालेली आढळून येते. किंबहुना, आशिया खंडांत या टोकापासून त्या टोकापर्यंत अगदीं एकच सुधारणा नांदत असावी अशाबद्दलचे सुद्धां कांहीं पुरावे सांपडतात हें पाहून मोठें नवल वाटतें. त्यावरून एवढें खास कीं हीं निरनिराळीं केंद्रें एकमेकांपासून विलग नव्हतीं; तर त्यांचे एकमेकांशीं संबंध होते. या ठिकाणीं शेतीचा उदय झालेला होता. पाळीव जनावरें ठेवण्याची पद्धति होती आणि थोडाफार व्यापारधंदाही होता. लिहिण्याची कलाही सुरू झालेली होती; पण त्या वेळची ही चित्रलिपि अजून कोणाला वाचतां आलेली नाहीं. एकमेकांपासून किती तरी दूर दूर असलेल्या प्रदेशांमध्यें हत्यारें-अवजारें अगदीं एकाच प्रकारचीं असलेलीं आढळतात आणि त्या त्या ठिकाणच्या कलाकौशल्याच्या वस्तूंमध्येंही विशेष लक्षांत भरण्यासारखें साम्य आढळतें. मातीकाम, हरत-हेचें सुंदर नक्षीकाम आणि चित्रें, रंगविलेलीं सुंदर सुंदर भांडीं, या सर्व गोष्टी त्या सर्व ठिकाणीं विशेष नजरेंत भरतात. हें मातीकाम या काळच्या या अवशेषांत इतकें विपुल आढळतें कीं या काळाला 'रंगीत नक्षीदार मातीकामाच्या सुधारणेचा काळ' असें नांव देण्यांत आलें आहे. सोन्या-चांदीचे दागदागिनेही त्या काळीं होते असें दिसतें. त्याचप्रमाणें ॲलाबॅस्टर म्हणजे एका जातीच्या चुनखडी-सारख्या पाढऱ्या दगडाची आणि संगमरवरी दगडाचीं भांडींही त्या वेळीं आढळतात. विशेष म्हणजे सुताचें विणलेलें कापडही या काळीं आढळून येतें. ईजिप्तपासून तों सिंधु नदीपर्यंत आणि थेट चीनपर्यंत ठिकठिकाणीं नांदणाऱ्या या प्रत्येक सुधारणेमध्यें स्वतःचें इतरांपासून निराळेपणा दाखविणारें कांहीं तरी वैशिष्ट्य होतेंच; त्यांत स्वतंत्रपणें त्या त्या ठिकाणचें कसब प्रत्ययाला येई; तथापि त्या सर्वांच्यामध्यें एका सर्वसामान्य आणि सर्वांशीं संबद्ध अशा सुधारणेचेंही एक सूत्र गुंफलेलें आढळून येतें.

हा काळ सामान्यतः पांच हजार वर्षांपूर्वीचा; परंतु हें उघडच आहे, कीं या सर्व सुधारणा कांहीं त्या त्या ठिकाणीं कोठून आभाळांतून पडल्या नाहींत आयत्या तयार होऊन. इतर आजुबाजूची परिस्थिति हळूहळू जसजशी बदलत गेली, तसतसा

हळूहळू क्रमानेंच त्यांचाही विकास झाला असला पाहिजे आणि या अवशेषांत त्यांचें जें स्वरूप आढळतें, तितक्या अवस्थेला पोंचायला त्यांना आधीं कितीक हजार वर्षें जावीं लागलीं असतील. नाईल नदीच्या खोऱ्यांतील आणि खाल्डियांतील सुधारणेचा धागा, आहेत त्या अवशेषांवरून आणखी निदान दोन हजार वर्षें तरी मागें नेतां येतो; आणि बहुधा बाकीच्या केंद्रांतील सुधारणाही इतक्या प्राचीन असल्या पाहिजेत.

प्राचीन ताम्रयुगाच्या सुरुवातीला, ख्रिस्ती शकाच्या पूर्वी सुमारें ३००० वर्षांच्या वेळीं मोहेंजोदारो येथें सुधारणा चांगली नांदत होती. त्या काळीं जी एक अशा प्रकारची, मोठ्या विशाल प्रदेशांवर पसरलेली, सर्वसामान्य अशी एक सुधारणा होती, तिच्यांतूनच पौर्वात्य सुधारणेचे चार मोठमोठे ओघ वेगळे वेगळे निघाले आणि पुढें ते दूर दूर वाहत जाऊन स्वतंत्रपणें मोठे झाले. हे चार ओघ म्हणजे ईजिप्त, मेसापोटेमिया, हिंदुस्थान आणि चीन यांमधील चार वेगवेगळ्या सुधारणांचे ओघ होत. याच काळांत ईजिप्तमध्यें ते महान् पिरॅमिड बांधले गेले. आणि गिझे येथील महान् स्फिन्क्सचा पुतळा उभारण्यांत आला. यानंतर बऱ्याच काळानें ईजिप्तमध्यें थीचीज किंवा थीब्ज येथील राजघराण्याचा काळ (ईजिप्तमधील अकरावें राजघराणें) उदित झाला. हा काळ म्हणजे सुमारें ख्रिस्तपूर्व दोन हजार वर्षांचा काळ होता. त्याही वेळीं मोठे अलौकिक पुतळे आणि नक्षीकाम ईजिप्तमध्यें होऊन गेलें. कलेच्या पुनरुज्जीवनाचा मोठाच उत्कर्षाचा काळ होता हा ईजिप्तमध्यें. लुक्सोर येथील तें प्रचंड देवालयही याच सुमारास बांधलें गेलें. आजकाल तुतानखामेनचें नाव मात्र ज्याच्या त्याच्या तोंडीं झालेलें आहे; पण त्याच्याबद्दल खरोखर माहिती असेल क्वचितच कोणाला. असा हा तुतानखामेन थीबन लोकांच्या साम्राज्यांतील एक फॅरोहा म्हणजे बादशहा होता.

खाल्डियामध्यें दोन ठिकाणीं बलिष्ठ आणि सुसंघटित अशीं राज्यें उदयाला आलीं होतीं; एक सुमेर येथें आणि दुसरें अक्कड येथें. खाल्डियन लोकांच्या ऊर या सुप्रसिद्ध शहरांत मोहेंजोदारो येथील संस्कृतीच्या नांदत्या काळाइतक्या प्राचीन काळींसुद्धां कलाकौशल्याचे अत्युत्कृष्ट नमुने बाहेर पडूं लागले होते. ऊर शहराचें महत्त्व खाल्डियामध्यें सुमारें ७०० वर्षेंपर्यंत गाजलें. त्यानंतर त्याचा पाडाव झाला. या सुमारास सेमेटिक वंशाचे (म्हणजे ज्यू किंवा आरबांच्या जातीचे) बॅबिलोनियन लोक हे सीरियांतून खाल्डियांत आले, आणि त्यांनीं आपलें राज्य तेथें स्थापन केलें. त्यांचें बॅबिलॉन हें शहर आतां त्यांच्या नव्या साम्राज्याचें केंद्रस्थान बनलें. बायबलमध्यें या शहराचा वारंवार उल्लेख येतो. या काळामध्यें वाङ्मयाला मोठी भरती आली आणि महाकाव्यें लिहिण्यांत येऊं लागलीं आणि त्यांचें जागोजाग गायन होऊं लागलें. जगाची सुरुवात कशी झाली आणि एक प्रचंड जलप्रलय कसा झाला, वगैरे संबंधींचीं वर्णनें करणाऱ्या ज्या कथा या महाकाव्यामध्यें गायिल्या जात होत्या, त्याभोंवतींच बायबलमधल्या पहिल्या पहिल्या प्रकरणांची गुंफण करण्यांत आलेली आहे.

पुढें बॅबिलॉनचाही पाडाव झाला. त्यापुढें शेकडों वर्षांनंतर ख्रिस्ती शकापूर्वी

सुमारें एक हजार वर्षें आणि त्यानंतरचा काळ असीरियन लोक रंगभूमीवर अवतीर्ण झालेले आढळतात. त्यांनींही एक साम्राज्य स्थापलें आणि निनेव्हे येथें आपली राजधानी केली. हे मोठे लोकविलक्षण लोक होते. ते कमालीचे पशुवृत्तीचे आणि क्रूर होते. त्यांची सगळी राज्यपद्धति हिंसेवर आणि मारझोडीवर आधारलेली होती. कत्तली आणि नासधूस यांच्या जोरावर त्यांनीं सगळ्या मध्य पूर्वेंत आपलें साम्राज्य स्थापन केलें. हे त्या काळचे साम्राज्यवादी लोक होत. तरी पण कांहीं काहीं बाबतींत हे लोक मोठे विशेष सुधारलेले होते. निनेव्हे येथें त्यांनीं एक प्रचंड ग्रंथसंग्रहालय निर्माण केलें होतें. त्यांत तत्कालीन प्रचलित अशा सर्व ज्ञानाचा संग्रह करण्यांत आला होता. त्या वेळचें हें ग्रंथसंग्रहालय आजच्यासारखें कागदी नव्हतें हें कांहीं मीं तुला सांगायला नको. आतां. आजच्यासारखीं पुस्तकेंही त्या वेळीं नव्हतीं. त्या काळचे ग्रंथ दगडांवर, शिलांवर कोरून लिहिलेले होते. निनेव्हेच्या त्या प्रचंड ग्रंथालयांतील अशा हजारों शिला आज लंडनमध्यें ब्रिटिश म्यूझियममध्यें आहेत. त्यांपैकीं कांहींवरील मजकूर वाचून अंगावर शहारे येतात. आपल्या शत्रूंना आपण कसें क्रूरपणें वागविलें, याचें राजानें त्यांत तपशीलवार वर्णन केलेलें असून त्यामुळें आपल्याला फार सुख होत आहे, असें त्यानें म्हटलें आहे.

आर्य लोक हिंदुस्थानांत मोहेंजोदारोच्या सुधारणेच्या काळानंतर आले. त्यांच्या प्रारंभींच्या काळचे कसलेही अवशेष किंवा पुतळे वगैरे अजूनपर्यंत आढळलेले नाहींत; परंतु या लोकांचें अत्युत्कृष्ट स्मारक म्हणजे त्यांचे वेद आणि इतर प्राचीन ग्रंथ होत. हिंदुस्थानच्या मैदानांत उतरलेल्या या आनंदी आणि सुखी वीरांच्या अंतरंगाची या ग्रंथांवरून आपल्याला चागलीच ओळख पटते. या ग्रंथांमध्यें मोठें प्रभावी निसर्गकाव्य ओतप्रोत भरलेलें आहे. त्यांचे सगळे देव जे वर्णिलेले आहेत, ते म्हणजे निसर्गांतील वेगवेगळ्या शक्तीच आहेत. कलेचा जसजसा माणसाच्या ठिकाणीं विकास होऊं लागला, तसतसा त्याच्या कलाविलासांत या निसर्गप्रेमाच्या पुष्कळसा प्रभाव पडावा हें स्वाभाविकच आहे. आर्यांचे अगदीं जुने असे जे कांहीं अवशेष आतांपर्यंत सांपडले आहेत, त्यांत सांची शहराच्या वेशींचा समावेश होतो. बुद्ध धर्माच्या प्रारंभींच्या काळापासूनच्या या वेशी आहेत. त्यांच्यावर जीं फुलें, पानें आणि निरनिराळ्या प्राण्यांच्या आकृती सुंदर रीतीनें कोरलेल्या आहेत, त्यावरून हीं चित्रें काढणारांच्या ठिकाणीं निसर्गप्रीति कोणत्या प्रकारची होती आणि निसर्गाच्या अंतर्बाह्य स्वरूपाचें ज्ञान त्यांना किती चांगलें झालेलें होतें, याचा प्रत्यय येतो.

यानंतर इकडच्या संस्कृतीवर वायव्येकडून ग्रीक लोकांची छाप येऊन पडली. कारण अलेक्झांडरच्या स्वारीनंतर हेलेनिकांचीं म्हणजे ग्रीकांचीं साम्राज्यें थेट हिंदुस्थानच्या सरहद्दीला येऊन भिडलीं होतीं. आणि त्यानंतर हिंदुस्थानच्या सरहद्दीवर जें कुशानांचें साम्राज्य स्थापन झालें त्याच्यावरही हेलेनिक सुधारणेची छाप होती, या गोष्टी तुझ्या लक्षांत असतीलच. यापूर्वीच हिंदुस्थानांत बुद्धानें आपलें कार्य सुरू केलें होतें. बुद्ध हा

मूर्तिपूजेचा विरोधक होता. तो आपल्याला स्वतःला परमेश्वर म्हणवीत नसे किंवा आपली पूजाही कोणाकडून करवीत नसे. भिक्षुकशाहीमुळें ज्या दुष्ट रूढी निर्माण झालेल्या होत्या, समाजांत जी घाण सांचली होती, ती सर्व नाहींशी करण्यासाठीं त्याची धडपड चालू होती. दलितांचा आणि दुःखी लोकांचा उद्धार करण्यासाठीं झटणारा तो एक समाजसुधारक होता. बनारस जवळच इसिपट्टन ऊर्फ सारनाथ येथें त्यानें जें अगदीं पहिलें प्रवचन केलें त्यांत तो म्हणाला, " जे अज्ञानी आहेत त्यांना ज्ञान देऊन त्यांचें समाधान करण्यासाठीं मी आलों आहें. पूर्णावस्थेला गेलेला माणूस जर आपलें जीवन प्राणिमात्राच्या उपयोगार्थ खर्च करणार नाहीं, आणि समाजांतून जे पतित झालेले आहेत त्यांना जर तो समाधान प्राप्त करून देणार नाहीं, तर त्याची पूर्णावस्था असून-नसून सारखीच. माझें तत्त्व, माझा उपदेश हा दयेचा, करुणेचा उपदेश आहे. म्हणूनच जे सुखी आहेत त्यांना माझा उपदेश कठिण वाटतो. मोक्षाचा मार्ग हा सर्वांनाच खुला आहे. जो ब्राह्मण चांडाळाला मुक्तीच्या मार्गावर प्रतिबंध करतो, त्याला मुक्तीचा मार्ग मोकळा नाहीं असें ठरवितो, तो ब्राह्मण तरी स्त्रीच्या योनींतूनच जन्माला आलेला आहे ना? हत्ती ज्याप्रमाणें बांबूंची झोपडी पार उधळून लावतो, त्याप्रमाणें तुम्ही आपले विकार अजिबात मारून टाका...पापाच्या दुःखाच्या विरुद्ध मार्ग फक्त एकच आहे. तो म्हणजे बुद्धिपूर्वक सत्याचा आश्रय करणें हा." बुद्धानें अशा रीतीनें सदाचरणाचा आणि जीवनमार्गाचा उपदेश केला, आपल्या शिष्यवर्गाला ही शिकवण दिली; परंतु गुरूच्या उपदेशाचें खरें रहस्य न समजलेल्या मूर्ख शिष्यांच्या सनातन पद्धतीप्रमाणें बुद्धाचे पुष्कळसे शिष्य त्यानें घालून दिलेले बाह्य आचाराचे नियम मात्र पाळीत राहिले. परंतु त्यांच्या पाठीमागील खरें तत्त्व त्यांना केव्हांच समजलें नाहीं. त्याचा तत्त्वोपदेश आचरणांत आणण्याऐवजीं ते बुद्धाचें नुसतें भजनपूजनच करूं लागले. तरी पण एवढें बरें कीं बुद्धाचे पुतळे त्यांनीं उभारले नाहींत किंवा त्याच्या मूर्ती कोठें स्थापन केल्या नाहींत.

त्यानंतर मग ग्रीस आणि इतरही हेलनिक सुधारणेची छाप असणारे देश यांच्यांतील विचारपरंपरांचा प्रवेश या देशांत झाला. ग्रीस वगैरे देशांमध्यें देवतांच्या सुंदर मूर्ती–पुतळे–घडविण्याची आणि त्यांचें भजनपूजन करण्याची पद्धति अस्तित्वांत होती. हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर, गांधार देशांत या हेलनिक संस्कृतीची छाप सगळ्यांत अधिक होती. त्या ठिकाणीं बुद्धाचा बाल्यावस्थेतील पुतळा–मूर्ति–प्रथम घडविण्यांत आला. हेलनिक लोकांचा स्वतःचा देव जो मदन तोही असाच ते बालस्वरूपांत दाखवीत असत. पुढच्या काळांत ख्रिस्ताची प्रतिमाही " सँक्रो बँबिनो " " बालदेव " म्हणून ज्याला इटालियन लोक म्हणत असत, अशा पवित्र बालकाचींच करण्यांत आली. त्याचप्रमाणें बालबुद्धाची प्रतिमा इकडे सुरू झाली. अशा रीतीनें बुद्धधर्मांमध्यें मूर्तिपूजेचा, प्रतिमापूजनाचा प्रवेश झाला आणि तो पुढें इतका वाढला, कीं बुद्धाचे पुतळे मग प्रत्येक बुद्धमंदिरामध्यें आढळून येऊं लागले.

हिंदी कलाकौशल्यावर इराणी संस्कृतीचीही छाया पडलेली आहे. बुद्धाच्या कथा

आणि हिंदूंचीं भलीं मोठीं पुराणें यांच्यामध्यें हिंदी कलावंतांना विषयांना कांहींच तुटवडा पडण्यासारखा नव्हता. आंध्र देशांत, अमरावती येथें, मुंबईजवळ घारापुरीच्या लेण्यांमध्यें, अजंठा येथें आणि वेरूळ येथें आणि इतरही पुष्कळ ठिकाणीं या पुराण-कथा आणि प्राचीन दंतकथा, तुला दगड आणि रंग यांच्या साहाय्यानें चित्रित केलेल्या आढळतील. हीं सर्व ठिकाणें खरोखरच अलौकिक प्रेक्षणीय आहेत आणि शाळेंत जाणाऱ्या प्रत्येक मुलामुलीला यांतलीं कांहीं ना कांहीं स्थळें पाह्यला मिळतील, तर किती सुंदर होईल असें मला नेहमीं वाटतें.

या हिंदी दंतकथा किंवा लोककथा समुद्र ओलांडून पलीकडे बृहद् भारतांतही जाऊन पोंहोचल्या होत्या. जावा बेटांत बोरो बुदोर येथें अलौकिक अशा दगडी कोर-कामांत बुद्धाची सर्वच्या सर्व कथा चित्रित करण्यांत आली आहे. अंकोरवाट येथें जे अवशेष आहेत तेथें अद्यापिही कांहीं सुंदर मूर्ती आहेत. त्यावरून पूर्व आशियामध्यें शानदार ( वैभवशाली ) अंकोर म्हणून प्रसिद्ध असलेल्या अंकोरचें ८०० वर्षांपूर्वीचें स्वरूप आपल्या दृष्टीसमोर उभें राहतें. या मूर्तींचे चेहरे मोठे सौजन्ययुक्त आणि तेजस्वी चैतन्यानें मुसमुसणारे आहेत. त्यांच्या ओठांवर असें एक विलक्षण मोहक आणि तरल स्मित विलसतें आहे, कीं त्या स्मिताला खास " अंकोरचें स्मित " असें नांव कलाक्षेत्रांत प्राप्त झालेलें आहे. या मूर्तीमध्यें भिन्न भिन्न मानववंशांचे चेहरे आढळतात. तरी त्या सर्वांच्या ठिकाणीं हें स्मित आढळून येतें आणि तरीही प्रत्येक ठिकाणीं त्याच्यांमध्यें कांहीं नवें सौंदर्य प्रत्ययाला येऊन तें स्मित कंटाळवाणें केव्हांच होत नाहीं.

कोणत्याही काळच्या सुधारणेचें किंवा जीवनाचें खरेंखुरें, बिनफसवें प्रतिबिंब कोठें पाह्यला मिळत असेल तर तें कलेमध्यें. कला ही त्यांच्यापुढें धरलेला जणुं आरसाच आहे. भारतीय संस्कृति जेव्हां आपल्या भरामध्यें होती तेव्हां त्या संस्कृतीमध्यें किती एक सुंदर सुंदर गोष्टी निर्माण झाल्या आणि कलेची एवढी भरभराट झाली, कीं तिचें स्तुतिस्तोत्र दूरदूरच्या देशांपर्यंत जाऊन थडकलें. परंतु तुला आतां माहीत झालें आहे, कीं कालांतरानें या संस्कृतीमध्यें ऱ्हास होण्याला सुरुवात झाली. ओघ बंद होऊन पाणी गढूळ होण्याला सुरुवात झाली आणि पुढें सगळ्या देशाचाच डोलारा जेव्हां ढांसळला, तेव्हां त्याच्याच बरोबर कलांची इमारतही खालीं आली. कलांमधील जिवंतपणा आणि जोमदारपणा, नवीन कांहीं तरी निर्माण अगर व्यक्त करण्याचें सामर्थ्य नष्ट झालें. मग त्यांत नुसताच कांतीवकोरीवपणा वाढत चालला आणि कांहीं वेळीं तर या कांतीवकोरीवपणाचा, नक्षीचा किंवा अलंकाराचा अतिरेक होऊन सौंदर्यापेक्षां बोजडपणा मात्र त्यांत दिसून येऊं लागला. यानंतर मुसलमान आले तेव्हां हिंदी कलापरंपरेला आणखी एक धक्का बसला. तिच्यावर आणखी कांहीं नवीनच परंपरांची छाप पडली आणि हिंदी कलाप्रांतांत नुसतेंच अलंकारिकतेचें आणि कांतीव-कोरीवपणाचें जें खूळ माजलेलें होतें आणि ज्यामुळें हिंदी कलेला एक प्रकारचा हीन-पणा आलेला होता, तें खूळ हिंदी कलाक्षेत्रांतून त्यामुळें नाहींसें झालें. प्राचीन हिंदी

आदर्शांची भूमिका कांहीं सुटली नाहीं; ती कायमचं राहिली. परंतु तेंच प्राचीन आदर्शमय सौंदर्य आतां अरबस्तानांतून आणि इराणमधून आलेल्या साध्या आणि मोहक पेहरावांत व्यक्त होऊं लागलें. पूर्वीच्या काळीं हजारों हिंदी कारागीर, शिल्पकार वगैरे हिंदुस्थानांतून मध्य आशियांत जात असत. आतां कारागीर आणि चित्रकार पश्चिम आशियामधून हिंदुस्थानांत येऊं लागले. या काळच्या सुमारास मध्य आशिया आणि इराण या प्रदेशांत कलांचें पुनरुज्जीवन होऊन त्यांना मोठा बहर आलेला होता. कॉन्स्टान्टिनोपलमध्यें याच कालांत महान् शिल्पी व कारागीर भव्य प्रासाद उभे करीत होते. इटलीमध्येंही याच सुमारास ज्ञान व कला यांच्या पुनरुज्जीवनाला प्रारंभ झालेला होता आणि श्रेष्ठ कलावंतांचा एक समुदायच्या समुदाय त्या ठिकाणीं सुंदर मूर्ती घडवीत होता आणि चित्रें रंगवीत होता.

तुर्कस्थानांत त्या काळीं सिनान हा प्रख्यात शिल्पी व कारागीर होऊन गेला. बाबरनें त्याचा मुलगा युसूफ याला आपल्याकडे बोलावून घेतलें होतें. इराणमध्यें बिहजाद नांवाचा एक महान् चित्रकार होऊन गेला. अकबरानें याचे कित्येक शिष्य आपल्याकडे बोलावून घेऊन त्यांना दरबारचे चित्रकार म्हणून आपल्या पदरीं ठेवलें होतें. अशा रीतीनें इमारतींचें बांधकाम आणि चित्रकला, दोन्हीमध्यें इराणची छाप चांगलीच बसून गेली. मोगलांच्या अमदानींत हिंदुस्थानांत या संयुक्त हिंदु-मुसलमानी कलाकौशल्यानें युक्त अशा ज्या कांहीं मोठ्या इमारतींचें बांधकाम झालें, त्याबद्दल मागच्या पत्रांत मीं तुला एकदां लिहिलेलें आहे. त्यांपैकीं पुष्कळशा इमारती तूं पाहिलेल्याही आहेस. हिंदी-इराणी कलाकौशल्यांच्या संगमाचें या देशांमधील सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे ताजमहाल होय. हा ताजमहाल तयार करण्यासाठीं किती तरी श्रेष्ठ कलावंतांचे श्रम खर्ची पडलेले आहेत. असें म्हणतात, कीं या बांधकामाच्या वेळचा प्रमुख शिल्पी उस्ताद ईसा या नांवाचा कोणी एक तुर्की किंवा इराणी गृहस्थ होता* आणि त्याला कित्येक हिंदी शिल्पी मदतनीस म्हणून होते. आंतील नक्षीकामावर कांहीं यूरपमधील कलावंत, विशेषतः एक इटालियन कलावंत होता असें म्हणतात. असे निरनिराळ्या देशांचे, निरनिराळ्या परंपरांचे कारागीर, कलावंत, शिल्पी या ठिकाणीं काम करीत असून त्यांच्या सौंदर्यसाधनांत कसलाही विसंवादीपणा किंवा परस्परविरोधी भाव आढळून येत नाहीं. या एकूण एक कलाप्रवृत्तींचा या इमारतींत कांहीं अपूर्व तऱ्हेनें संगम होऊन त्यांची अनिर्वचनीय अशी एकजीवता साधलेली आहे. ताजमहाल घडविण्यांत पुष्कळांचा जरी हात असला, तरी त्यामध्यें प्रामुख्यानें ज्या दोन कलाप्रवृत्तींचा आविष्कार झालेला आहे, त्या म्हणजे इराणी आणि हिंदी कलाप्रवृत्ती होत. त्याला उद्देशून ग्रूझे यांनीं म्हटलें आहे कीं, "येथें हिंदी शरीरामध्यें इराणचा आत्माच मूर्तिमंत अवतीर्ण झालेला आहे."

* परंतु इलस्ट्रेटेड वीकलीचे मार्च १९४३ मधील ता. २० व २७ चे अंक पहा. त्यांमध्यें याबद्दलच्या हकिकतीचें उर्दू हस्तलिखितांतील वर्णन आहे.

## १२४

# इराणची प्राचीन चिवट संस्कृति

*२० जानेवारी, १९३३*

ज्या इराण देशाचा आत्मा हिंदुस्थानांत आला आणि येथें वस्ती करून राहिला व ताजमहालासारखें सुंदर शरीर त्याला उपलब्ध झालें, असें म्हटलें जातें, त्या इराण देशांत आतां आपण जाऊं या. इराणी कलेची परंपरा विशेष नजरेंत भरण्यासारखी आहे. ही परंपरा चिवटपणानें दोन हजार वर्षें टिकून राहिलेली आहे; म्हणजे असीरियन लोकांच्या काळापासून. या दरम्यानच्या काळांत इराणमध्यें राज्यव्यवस्थेंत आणि राजघराण्यांत बदल झाले; धर्मांतही बदल झाले. देशांत कधीं स्वदेशी राज्यकर्त्यांचें राज्य, तर कधीं परक्यांचें राज्य असेही प्रकार झाले. इस्लाम धर्मानें तेथें प्रवेश करून तेथील जीवनांत पुष्कळच क्रांति करून टाकली आहे. इतकें सगळें होऊनही इराणी कलेची ही परंपरा टिकून राहिलेली आहे. या एवढ्या बदलत्या युगामध्यें तिच्यामध्यें पुष्कळ बदल झालेला आहे आणि विकासही पुष्कळ झालेला आहे, हें अर्थातच खरें आहे. हा जो टिकाऊपणा या कलेच्या परंपरेंत आलेला आहे याचें कारण इराणची भूमि आणि निसर्गशोभा यांच्याशीं इराणी कलेचा जो घनिष्ठ संबंध आहे, त्यांत आहे असें म्हणतात.

मागच्या पत्रांत मीं तुला निनेव्हे येथील असीरियन लोकांच्या साम्राज्याबद्दल सांगितलें. इराणचा अंतर्भाव या साम्राज्यांत होत होता. हे इराणी लोक आर्य वंशाचे होते. ख्रिस्तापूर्वी सहाशें-सातशें वर्षें त्यांनीं निनेव्हे शहर काबीज केलें आणि असीरियन साम्राज्याचा नाश केला. नंतर या इराणी आर्यांनीं थेट सिंधु नदीच्या तीरापासून तों ईजिप्तपर्यंत पसरलेलें असें स्वतःचेंच एक साम्राज्य स्थापन केलें. प्राचीन काळच्या जगांत त्यांनीं आपला दरारा सगळीकडे प्रस्थापित केलेला होता. ग्रीक लोकांनीं लिहिलेल्या त्या काळच्या वृत्तांतामध्यें त्यांच्या राजाचा उल्लेख राजाधिराज, राजश्रेष्ठ, असा केलेला आढळतो. या महान् राजांमध्यें सायरस दारियस, क्सार्क्सिस यांचीं नांवें प्रसिद्ध आहेत. या दारियस आणि क्सार्क्सिस राजांनीं ग्रीस जिंकावयाचा प्रयत्न केला आणि त्यांत त्यांना मार खावा लागला, हें तुझ्या ध्यानांत असेलच. या राजांच्या वंशाला अकिमेनी किंवा हखामनी वंश असें नांव आहे. त्यांनीं २२० वर्षेंपर्यंत एका प्रचंड साम्राज्यावर आपला अम्मल चालविला. अखेरीस मॅसिडानच्या अलेक्झांडर दि ग्रेटनें येऊन त्यांचें साम्राज्य नष्ट केलें.

असीरियन आणि बॅबिलोनियन लोकांच्या पाठीमागून आलेला हा इराणी लोकांचा अंमल लोकांना किती तरी सुखाचा वाटला असेल. हेंही साम्राज्य जनतेचें मालक म्हणूनच अम्मल गाजवीत होतें खरें. पण तें चालविणारे लोक सुधारलेले होते

आणि धर्मवेडे नव्हते. निरनिराळ्या धर्मांना आणि संस्कृतींना नांदूं देण्याला त्यांची तयारी होती. त्यांच्या सगळ्या प्रचंड साम्राज्याची व्यवस्था त्यांनीं फारच उत्तम ठेवली होती आणि निरनिराळ्या प्रदेशांचा परस्परांशीं चांगला संबंध राहावा अशा तऱ्हेचे चांगले रस्ते त्यांच्या साम्राज्यांत होते. हिंदुस्थानांत आलेल्या हिंदी अथवा भारतीय आर्यांशीं या इराणी लोकांचे फारच घनिष्ठ संबंध होते. त्यांचा जो झोरोआस्टरचा म्हणजेच झरतुष्ट्राचा धर्म त्याचा प्राचीन वैदिक धर्माशीं पुष्कळच संबंध आहे. आर्यांचें मूळ वसतिस्थान कोठें असेल तें असो, पण त्या ठिकाणीं प्रथम केव्हां ना केव्हां तरी हे दोन्ही लोक एकत्र राहत असले पाहिजेत हें अगदीं स्पष्ट दिसतें.

अकिमेनी घराण्यांतील या राजांना इमारती बांधण्याचा मोठा शोक होता. आपल्या पॅर्सिपॉलीस राजधानींत त्यांनीं प्रचंड राजवाडे बांधले. यांनीं देवालयें बांधलीं नाहींत हें ध्यानांत घेण्यासारखें आहे. या राजवाड्यांत मोठमोठाले दिवाणखाने असून त्यांत अगणित खांब असत. या प्रचंड बांधकामाची कल्पना आजही जे कांहीं मोडके अवशेष पाहावयाला मिळतात त्यांवरून करतां येते. या अकिमेनी राजांच्या काळच्या इराणी कलेचा मौर्यांच्या काळांतील ( म्हणजे अशोक वगैरेंच्या ) हिंदी कलेशीं संबंध कायम होता आणि या हिंदी कलेवर तिची छापही होती.

अलेक्झांडरनें महान् राजा ( राजश्रेष्ठ ) दारियस याचा पराभव करून अकिमेनी घराणें नष्ट करून टाकलें. त्यानंतर इराणांत कांहीं थोडा काळ अलेक्झांडरचा सेनापति सेल्युकस याचा व त्याच्या वंशजांचा अम्मल चालला आणि त्यानंतर अर्धवट परकी अशा राजांच्या अमलाखालीं ही हेलनिक म्हणजे ग्रीक संस्कृतीची छाप इराणवर पुष्कळ काळपर्यंत चालू राहिली. हिंदुस्थानच्या सरहद्दीवर ठाणें मांडून बसलेले कुशान लोक, ज्यांचें राज्य दक्षिणेस बनारसपर्यंत आणि उत्तरेस मध्य आशियापर्यंत पसरलेलें होतें, ते या इराणमधील अर्धवट परकी राजांशीं समकालीन असून यांच्यावरही हेलनिक संस्कृतीची छाप होतीच. अशा रीतीनें हिंदुस्थानच्या पश्चिमेकडील आशिया खंडाचा सर्वच मोठा भाग अलेक्झांडरनंतर पांचशें वर्षेपर्यंत, म्हणजे ख्रिस्तानंतर येत तिसऱ्या शतकापर्यंत, ग्रीक संस्कृतीच्या छायेखालीं होता. अर्थात् ही सगळी छाप मुख्यतः कलेच्या क्षेत्रामध्यें होती. तिचा इराणच्या धर्मावर कांहीं परिणाम झाला नाहीं; झरतुष्ट्राचा धर्मच तेथें जसाच्या तसा या काळांत चालू राहिला.

तिसऱ्या शतकांत इराणमध्यें एक प्रकारचें राष्ट्रीय पुनरुज्जीवन झालें आणि एका नवीनच राजवंशाचा अम्मल तेथें सुरू झाला. हाच तो सासानी राजवंश. हे लोक आपल्याला प्राचीन अकिमेनी घराण्याचे वारसदार म्हणवीत आणि त्यांचें धोरण चढाऊ राष्ट्रीय वृत्तीचें होतें. चढाऊ राष्ट्रीय धोरण म्हटलें, कीं तें संकुचित, कडवें आणि असहिष्णु असावयाचें हें ठरलेलेंच आहे. त्या नियमाला कांहीं या सासानी राजांचें धोरण अपवाद नव्हतें. शिवाय, पश्चिमेकडे रोमचें साम्राज्य आणि कॉन्स्टान्टिनोपल येथील बायझांटियन साम्राज्य आणि पूर्वेस पुढें पुढें सरकत असलेल्या

तुर्कांच्या टोळ्या यांच्या कचाट्यांत त्यांचें राज्य सांपडलेलें असल्यामुळें त्याचें धोरण असें होणें हें स्वाभाविकही होतें. या दोन्ही बाजूंकडच्या कचाट्यांत सांपडलेलें असूनही त्यांनीं आपलें राज्य ४०० वर्षेपर्यंत, इस्लाम धर्मीय लोक तिकडे येईपर्यंत, टिकवून धरलें. सासानी राजांच्या कारकीर्दीत झरतुष्ट्राच्या धर्माच्या भिक्षुकशाहीचें सर्वांत अधिक प्रस्थ माजून राहिलेलें होतें. त्यांच्या धर्मपीठाचेंच राज्यकारभारावरही वर्चस्व चालत होतें आणि कोणाचा एवढाही विरोध सहन करण्याला तें धर्मपीठ तयार नव्हतें. याच काळांत त्यांचा पवित्र धर्मग्रंथ जो 'अवेस्ता' त्याची अखेरची आवृत्ति तयार झाली असें म्हणतात.

हिंदुस्थानांत या काळामध्यें गुप्तांचें साम्राज्य नांदत होतें. बुद्धाचा काळ आणि कुशानांच्या साम्राज्याचा उदय यांच्या मागून हिंदुस्थानांतही जें एक राष्ट्रीय पुनरुज्जीवन झालें त्याचें निदर्शक असेंच हें गुप्तांचें राज्य होतें. या काळीं हिंदुस्थानांत कला आणि वाङ्मय यांना मोठा बहर आला होता. कालिदासासारखे श्रेष्ठ संस्कृत ग्रंथकार याच काळांत उदयास आले. सासानी राजांच्या काळांतील इराणचा, गुप्तांच्या काळांतील हिंदुस्थानशीं कलेच्या क्षेत्रांत पुष्कळ संबंध होता, असें दाखविणाऱ्या पुष्कळ गोष्टी आढळून येतात. सासानींच्या काळचीं अगदींच थोडीं चित्रें आणि मूर्तींचीं कामें आजच्या आपल्या काळांत शिल्लक राहिलेलीं आहेत; परंतु जीं कांहीं आहेत त्यांत कलावंतांनीं जिवंतपणा आणि चलनवलनाची शक्ति निर्माण केलेली आहे असें दिसून येतें. त्यामध्यें प्राण्यांचे जे नमुने आहेत ते अजंठा येथील भिंतींवरील चित्रांतल्या प्राण्यांसारखेच आहेत. सासानीकालीन कलावंतांची छाप थेट चीनपर्यंत आणि गोबीच्या मैदानापर्यंत पसरलेली होती असें दिसतें.

आपल्या दीर्घकालीन कारकीर्दीच्या अखेरीअखेरीस सासानी राजे दुर्बळ होत गेले आणि इराणमधील परिस्थिति बिघडत गेली असें दिसतें. त्यांचें आणि बायझांटियन साम्राज्याचें पुष्कळ काळपर्यंत युद्ध चालू राहून त्यांत दोन्ही पक्ष पार थकून गेले होते. आरबांचीं जीं सैन्यें इराण काबीज करायला आलेलीं होतीं, तीं आपल्या नव्या धर्मावरील निष्ठेनें भारलेलीं होतीं. त्यामुळें त्यांना इराण काबीज करणें मुळींच कठिण पडलें नाहीं. सातव्या शतकाच्या मध्याला, महंमद पैगंबराच्या मृत्यूनंतर दहा वर्षांच्या आंत, इराण देश खलिफाच्या अमलाखालीं आला. आरबांचीं सैन्यें मध्य आशिया आणि उत्तर आफ्रिका यांमधील प्रदेशामागून प्रदेश व्यापीत गेलीं. तेव्हां त्यांनीं आपल्या बरोबर आपला नवा धर्म तर नेलाच; परंतु त्यांच्याबरोबर त्यांची ताज्या दमाची आणि विकासाच्या भरांत असलेली संस्कृतीही त्यांनीं नेली. सीरिया, मेसापोटेमिया, ईजिप्त हे देश आरबी संस्कृतीनें संपूर्ण व्यापून टाकिले. त्या प्रांतांची भाषासुद्धां त्यांच्यामुळें आरबी हीच झाली. आणि वांशिक दृष्ट्यासुद्धां आरबी लोकांशीं या प्रदेशांतील लोक सरमिसळ होऊन गेले. बगदाद, दमास्कस, कैरो हीं शहरें आतां आरबी संस्कृतीचीं माहेरघरें बनलीं आणि या नवीन सुधारणेच्या भरांत या प्रदेशांत नव्या पुष्कळ इमारतींचें

बांधकाम झालें. आजच्या घटकेलासुद्धां हे सर्व देश आरबी संस्कृतीचेच देश असून एकमेकांपासून ते जरी विलग पडलेले असले, तरी आपण सगळे एकच आहोंत व होऊंही ही भावना त्यांच्यामध्यें अजूनही जागृत आहे.

या देशांप्रमाणेंच आरबांनीं इराण देशही जिंकला. परंतु सीरिया किंवा ईजिप्त-मधल्याप्रमाणें येथील लोक आरबाना आपल्यांत एकजीव किंवा संमिश्रित करून घेतां आले नाहींत. इराणांतील मानववंश हा मूळचा आर्यांच्या वंशांतील असल्यामुळें त्यांच्यांत आणि या सेमेटिक वंशाच्या आरबी लोकांमध्यें फारच अंतर होतें. इराणी लोकांची भाषा हीसुद्धां आर्य भाषाच होती. तात्पर्य, इराणी लोकांचा वंश आरबांनीं त्यांना जिंकल्यानंतरही आरबांपासून वेगळा राहिला आणि त्यांची भाषाही पहिल्या-प्रमाणेंच त्याच्या देशांत नांदती राहिली. धर्माच्या क्षेत्रांत मात्र इस्लामधर्माचा प्रसार फारच झपाट्यानें झाला आणि त्यानें झरतुष्ट्राच्या धर्माला तेथून हुसकून लावलें; अखेरीस या धर्माला हिंदुस्थानांत आसरा पाहावा लागला; परंतु इस्लामी धर्माच्या बाबतींतसुद्धां या इराणी लोकांनीं आपला एक निराळाच स्वतंत्र मार्ग काढला. इस्लाम धर्मीयांत फूट होऊन दोन पक्ष झाले व त्यांतून इस्लामधर्माचे शिया आणि सुनी असे दोन पंथ निर्माण झाले. इराणनें शिया पंथाचा स्वीकार केला. आजही तेथें मुख्यतः शिया पंथाचेंच वर्चस्व आहे आणि बाकीच्या जगांत सर्वत्र बहुतेक सुनी पंथच चालू आहे.

अशा रीतीनें आरबी संस्कृतीला इराणी संस्कृति आपल्याशीं एकजीव करून घेतां आली नाहीं. तरी तिचा इराणी संस्कृतीवर परिणाम अर्थातच फार प्रबळ झाला आणि हिंदुस्थानांतल्याप्रमाणेंच येथेंही इस्लामधर्माच्या आगमनानें कलाकौशल्यांत एक नवचैतन्य निर्माण झालें. आरबी कला आणि संस्कृति यांच्यावरही इराणी कला व संस्कृति यांच्यामधील उच्च नमुन्यांचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. निर्जन मैदानांत जन्मून वाढलेल्या त्या साध्याभोळ्या लोकांच्या घरीं इराणी विलासोपभोगांचा शिरकाव झाला आणि आरबांच्या खलिफांच्या दरबारांतील डामडौल आणि ऐश्वर्य हें आजपर्यंत होऊन गेलेल्या कोणत्याही सम्राटाच्या दरबारांतील ऐश्वर्याशीं तोडीस तोड अशा प्रकारचें झालें. साम्राज्याची राजधानी बगदाद शहर हें त्या काळच्या जगांतील सर्वश्रेष्ठ शहर होऊन गेलें. बगदादच्या उत्तरेला तैग्रीस नदीच्या कांठीं समारा येथें खलिफांनीं आपल्यासाठीं एक अत्यंत मोठी मशीद बांधली आणि राजवाडा उभारला. त्यांचे कांहीं मोडकेतोडके अवशेष आजही अस्तित्वांत आहेत. या मशिदींत फारच विशाल अशीं दालनें होतीं आणि तिच्या आसपासच्या प्रांगणांतून कारंजीं होतीं. राजवाडा लंबचौकोनी असून त्याची एक बाजू सुमारें $\frac{3}{4}$ मैलाहून अधिक लांब होती.

या बगदादच्या साम्राज्याचा नवव्या शतकात ऱ्हास होऊन त्याच्यांतून पुष्कळ वेगळीं वेगळीं स्वतंत्र राज्यें निर्माण झालीं. इराण देश स्वतंत्र झाला. पूर्वेकडील तुर्कीच्या टोळ्यांनींही आपलीं स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं. पुढें या तुर्कीनीं इराणही जिंकून

घेतला आणि बगदाद येथें नुसत्या नांवापुरता जो खलिफा उरलेला होता, त्याच्यावर त्यांनीं वर्चस्व गाजविण्याला सुरुवात केली. त्यापुढें अकराव्या शतकाच्या सुरुवातीला गझनीचा महमूद उदयास आला. त्यानें हिंदुस्थानवर स्वाऱ्या करून लूटमार केली. खलिफावरही गंडांतर आणलें आणि स्वतःचें एक साम्राज्य अल्प काळपर्यंत स्थापन केलें. पुढें तें एका तुर्कांच्याच टोळीनें म्हणजे सेल्जुक तुर्कांनीं नष्ट केलें. क्रूसेडवाल्या ख्रिस्ती लोकांशीं या सेल्जुक तुर्कांनीं पुष्कळ काळपर्यंत सामना केला आणि त्या दीर्घकालीन युद्धांत त्यांनीं यशही मिळविलें. यांचें साम्राज्य १५० वर्षें टिकलें. बाराव्या शतकाच्या अखेरीस तुर्कांच्याच आणखी एका टोळीनें येऊन इराणमधून सेल्जुक तुर्कांना हांकून लावलें आणि तेथें ख्वारीजमचें किंवा खिवाचें राज्य म्हणून प्रसिद्ध असलेलें राज्य स्थापन केलें. पण हें फारच थोडा काळपर्यंत टिकलें. कारण ख्वारीजमच्या शहानें आपल्या वकिलाचा केलेला अपमान सहन न होऊन चेंगीजखानानें आपल्या मोंगल सैन्यानिशीं इराणवर स्वारी केली आणि इराणच्या भूमीचा आणि लोकांचा धुव्वा उडविला.

एवढ्याशा लहानशा परिच्छेदांत मी तुला किती तरी घडामोडींची आणि साम्राज्यांची ही माहिती सांगतों आहें. त्यामुळें तुझा खूप गोंधळ उडून गेला असला पाहिजे. हे निरनिराळे राजवंश आणि मानववंश यांचे हे उदयास्त जे मी तुला सांगतों आहें, ते तुझ्या स्मरणशक्तीवर त्यांचें उगीच कांहीं तरी जड ओझें घालावें या बुद्धीनें नव्हे, तर मला मुद्दाम एक गोष्ट ठसठशीतपणें तुझ्या नजरेस आणावयाची आहे, कीं इतक्या सगळ्या मोठमोठ्या घडामोडी होत असतांनाही त्यामुळें इराणची कलांची परंपरा आणि जीवनप्रवृत्ति यांच्यामध्यें कांहींसुद्धां फरक पडला नाहीं. पूर्वेकडून तुर्कांच्या टोळ्यांमागून टोळ्या आल्या. परंतु त्या सर्वच्या सर्व बुखारापासून इराणपर्यंत प्रभुत्व गाजवीत असलेल्या आरबी-इराणी मिश्र संस्कृतीच्या आहारीं गेल्या. इराणपासून दूर अशा आशियामायनर देशांत जे तुर्क गेले त्यांनीं मात्र आपलेच आचारविचार कायम ठेवले. आरबी संस्कृतीला त्यांनीं कांहीं दाद दिली नाहीं. आशियामायनरचें स्वरूप त्यांनीं आपला मायदेश जो तुर्कस्तान, त्याच्यासारखें जवळजवळ करून टाकलें. परंतु इराणमध्यें आणि त्याच्या आसपासच्या प्रदेशांत मात्र प्राचीन इराणी संस्कृतीचें बळ इतकें मोठें होतें कीं तुर्कांनाच ती मान्य करावी लागली आणि आपले आचारविचार तिच्याशीं जुळते करून घ्यावे लागले. इराणमध्यें पुष्कळ निरनिराळ्या तुर्की टोळ्यांचा अम्मल होत आला. पण त्या सर्व अमलाखालीं इराणी कला आणि वाङ्मय यांचा चांगला उत्कर्ष होत राहिला. गझनीच्या सुलतान महमुदाच्या कालींच इराणचा कवि फिर्दोसी हा होऊन गेला, हें मला वाटतें मागें मीं तुला सांगितलें आहे. महमुदाच्या विनंतीवरून त्यानें 'शहानामा' नांवाचें एक इराणचें राष्ट्रीय महाकाव्य लिहिलें. त्यांत वर्णन केलेले प्रसंग इस्लाम धर्माच्या उदयाच्या पूर्वीच्या काळामधील असून त्यांतील नायकाचें नांव रुस्तुम असें आहे. त्यावरून इराणी वाङ्मय आणि कला हीं इराणच्या

प्राचीन राष्ट्रीय आणि पारंपारिक (ऐतिहासिक) प्रवृत्तींशीं किती निगडित होती, हें दिसून येतें. इराणमधील मोठमोठ्या चित्रांचे आणि छोट्या सुंदर मूर्तींचे सगळे विषय या शहानाम्यामधून घेतलेले आहेत.

ख्रिस्ती कालगणनेंतील पहिल्या हजार वर्षांच्या युगाची अखेर होऊन दुसरें हजार वर्षांचें युग सुरू होण्याच्या सुमारास, तसेंच एक शतक संपून दुसऱ्या शतकाची सुरुवात होणाच्या सुमारास फिर्दोसी कवि हा उदयास आला. त्याचा काल इ. सन ९३२ पासून १०२१ पर्यंत आहे. त्याच्यानंतर लौकरच आणखी एक कवि झाला. त्याचें नांव पर्शियन भाषेंतल्याप्रमाणें इंग्रजी भाषेंतही फारच विख्यात आहे. तो म्हणजे इराणमधील निशापूर येथील उमर खय्याम हा खगोलशास्त्रज्ञ आणि कवि होय. उमरच्या मागून शिराज येथील शेख सादी हा कवि झाला. हा इराणचा एक सर्वश्रेष्ठ कवि होय. त्याचीं गुलिस्तान आणि बुस्तान हीं काव्यें कित्येक पिढ्या हिंदुस्थानांतील मक्तबांमध्यें (पाठशाळांमध्यें) शिकणाऱ्या मुलांमुलींना तोंडपाठ करावीं लागत.

पूर्वीच्या काळच्या श्रेष्ठ श्रेष्ठ अशा कांहीं थोड्या लोकांचींच नांवें मी तुला सांगतों आहें. उगीच नांवांची लांबच लांब यादी देण्यामध्यें कांहीं मुद्दा नाहीं; पण मला एक गोष्ट तुझ्या ध्यानांत आणून द्यावयाची आहे ती हीं, कीं इराणी कलाकौशल्य आणि वाङ्मय यांचा हा दीप इराणपासून तो मध्य आशियांतील ट्रॅन्सोक्झियानापर्यंत शतकानुशतकें एकसारखा तेवत होता. इराणांतल्या शहरांशीं कलात्मक आणि वाङ्मयात्मक अशा सौंदर्यांच्या बाबतींत तोडीस तोड अशीं बुखारा व बलख यांसारखीं महान् शहरें ट्रॅन्सोक्झियामधील होतीं. आरबांतील सर्वांत अधिक सुविख्यात असा तत्त्वज्ञ जो इब्न सिना ऊर्फ अविसेना हा दहाव्या शतकाच्या अखेरीस बुखारा येथेंच जन्माला आला होता. त्यानंतर २०० वर्षांनीं जलालुद्दिन रूमी नांवाचा आणखी एक श्रेष्ठ इराणी फारसी कवि हाही बलख येथेंच जन्माला आला होता. त्याला मोठा सिद्ध पुरुष समजतात. त्यानेंच नाचणाऱ्या दरवेशांचा पंथ स्थापन केला.

तात्पर्य, तंटेबखेडे, युद्धें आणि राज्यव्यवस्थेतील घडामोडी या सर्व गोष्टी चालू असूनही आरबी-इराणी मिश्र कला आणि संस्कृति यांची परंपरा एकसारखी जागती चालू राहिली आणि वाङ्मय, चित्रकला आणि शिल्पकला आणि स्थापत्य यांचे अत्युत्कृष्ट नमुने या प्रदेशांत उत्पन्न होत राहिले. त्यानंतर मात्र या संस्कृतीचें जणुं मरणच ओढवलें. तेराव्या शतकांत (१२२० च्या सुमारास) चेंगीजखानानें तुफानी स्वारी करून ख्वारीजम आणि इराण यांच्या राज्यांचा नाश केला; त्यानंतर हुलगूनें कांहीं वर्षांनीं बगदाद शहराचा नाश केला आणि या दोन स्वाऱ्यांतील नासधुशीमध्यें या देशांमधील आज शेंकडों वर्षेपर्यंत नांदत आलेल्या उच्च संस्कृतींतील सर्व कांहीं उत्तमोत्तम संचय आणि संपत्ति ही पार धुऊन गेली. मंगोलियन लोकांनीं मध्य आशियाचें नुसतें वैराण रान कसें बनविलें आणि तेथील मोठमोठीं नगरें ओसाड होऊन तेथें औषधालासुद्धां माणसाचें दर्शन कसें मिळेनासें झालें, ही हकिकत मागें

एका पत्राभध्यें मीं तुला सांगितलेली आहे. या संकटाच्या तडाख्यांतून मध्य आशियानें संपूर्णपणें केव्हांच डोकें वर काढलें नाहीं. पण ज्या प्रमाणांत मध्य आशियानें आपली परिस्थिति सांवरली तें प्रमाणसुद्धां पुष्कळच आश्चर्यकारक आहे. चेंगीजखानाच्या मृत्यूनंतर त्याच्या साम्राज्याच्या वांटण्या झाल्या ही गोष्ट तुला आठवत असेल. या साम्राज्याचा इराणचा व त्याच्या आसपासचा मुलूख हुलगूच्या ताब्यांत गेला होता. पहिल्यापहिल्यानें पोटभर नासधूस केल्यानंतर आता तो मोठा शांततावादी, सहनशील, उदारबुद्धीचा असा राज्यकर्ता निवटला होता. त्यानें आपला इल्खानांचा म्हणून राजवंश चालू केला. हे इल्खान लोक कांहीं काळपर्यंत मंगोलियन लोकांचा जुना आकाशपूजेचा धर्मच पाळीत होते. नंतर धर्मांतर करून ते मुसलमान धर्मांत घेतले गेले. धर्मांतराच्या आधीं आणि त्यानंतरही इतर धर्मांशीं त्यांनीं केव्हांच वांकडेपणा धरला नाहीं. ते त्यांच्याशीं सर्वथा सहिष्णु वृत्तीनें वागत असत. त्याच्या चुलत घराण्यांतील लोक, चीनमधील बडा खान आणि त्याचे कुटुंबीय लोक, हे बुद्धधर्मानुयायी होते. त्यांच्याशीं इल्खानांचे अतिशयच गोड संबंध होते. पुष्कळदां ते लोक इतक्या दूर चीनमधून आपल्यासाठीं वधू सुद्धां आणवून घेत असत.

इराण व चीन या दोन ठिकाणच्या मंगोलियन लोकांच्या दोन शाखांचे एकमेकांशीं हे जे निगडित संबंध होते, त्यांचा त्याच्या कलेवर फार मोठा परिणाम झाला. चिनी संस्कृतीची छाप नकळत इराणमध्यें पडली आणि तेथील चित्रकलेंत आरबी, इराणी आणि चिनी परंपरांचा कांहीं एक विलक्षण संगम दिसून येऊं लागला. तरी पण इतक्या सगळ्या धामधुमींतून आणि संकटांतून जाऊन सुद्धां मूळच्या इराणी कलापरंपरेनें पुन्हां डोकें वर काढलें आणि ती विजयी झाली. चौदाव्या शतकामध्यें इराणमध्यें हाफीज नांवाचा आणखी एक श्रेष्ठ कवि उदयाला आला. आजही हिंदुस्थानमध्येंसुद्धां हा कवि लोकप्रिय आहे.

या मंगोलियन इल्खानाचें राज्य कांहीं फार काळ टिकलें नाहीं. ट्रॅन्सोक्झियानामधील समरकंद येथील तैमुरलंगानें त्यांचे राहिलेसाहिले जे कोणी लोक होते, त्या सर्वांचा नाश करून टाकला. या अत्यंत भयंकर आणि अत्यंत क्रूर अशा रानटी माणसाविषयीं मागें तुला सांगितलेंच आहे. तरीपण हा माणूस कलांचा मोठाच आश्रयदाता होता. आणि त्याच्या काळचा तो मोठा विद्याविभूषित मनुष्य समजला जात असे. त्याच्या कलेच्या प्रेमाची मुख्य रीत ही दिसते, कीं दिल्ली, शिराज, बगदाद, दमास्कस यांसारखीं मोठमोठीं शहरें लुटून त्यांच्यामधील लूट आपलें राजधानीचें शहर जें समरकंद तें सजविण्यासाठीं आणावयाची. तथापि, समरकंद येथील अत्यंत अलौकिक आणि भव्य असें बांधकाम म्हटलें म्हणजे गुरअमीर या नांवाचें स्वतः तैमुरलंगाचें कबरस्तान होय. त्याची ही कबर त्याला खरोखरच शोभण्यासारखी आहे. कारण त्याची दुसऱ्यावर छाप टाकणारी भव्य शरीरयष्टी, त्याचें सामर्थ्य आणि त्याच्या आंगचें भयंकर तेज या सर्व गोष्टींचा प्रत्यय या बांधकामाच्या उदात्त उभारणीमध्यें कांहीं अंशीं येतो.

तैमुरलंगानें केवढा तरी प्रचंड मुलूख काबीज केला होता. पण तो मेल्यावर यापैकीं पुष्कळसा मुलूख त्याच्या वंशजांच्या हातून निसटून गेला. त्यापैकीं ट्रॅन्सोक्शियांना व इराण वगैरेंचें मिळून एक छोटेंसें राज्य तेवढें त्यांच्या ताब्यांत राहिलें. पुरीं शंभर वर्षेपर्यंत, सगळ्या पंधराव्या शतकभर, या तिमुरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या लोकांनीं इराण, बुखारा आणि हिरात या प्रदेशावर अंमल चालविला. आश्चर्याची गोष्ट ही, कीं तैमूरसारख्या निर्दय विजेत्याचे हे वंशज औदार्य, दयाबुद्धी यासाठीं आणि कलांना त्यांनीं दिलेल्या उत्तेजनासाठीं प्रसिद्धीस आले. त्यामध्यें तैमूरचा प्रत्यक्ष मुलगा शहा रूख हा सर्वश्रेष्ठ. आपली राजधानी हिरात येथें त्यानें एक प्रचंड ग्रंथसंग्रहालय उभारलें; त्या ठिकाणीं वाङ्मयप्रेमी लोकांची नुसती गर्दी उसळलेली असे.

तिमुरी लोकांची ही शंभर वर्षांची कारकीर्द कलात्मक आणि वाङ्मयीन कर्तृत्वासाठीं इतकी प्रसिद्ध आहे, कीं त्या काळाला 'तिमुरी ज्ञानयुग' असें नांव मिळालेलें आहे. या काळांत पर्शियन वाङ्मय चांगलेंच सुसमृद्ध झालें आणि पुष्कळच सुंदर चित्रें रंगविलीं गेलीं. बिझाद नांवाचा एक श्रेष्ठ चित्रकार या काळीं होऊन गेला; त्याच्या चित्रकलेचीं एक विशिष्ट परंपराच निर्माण झाली. एक गोष्ट पाहून मौज वाटते, कीं या तिमुरी काळांतील वाङ्मयसेवकांमध्यें फारशी वाङ्मयाच्या जोडीनेंच तुर्की वाङ्मयाची वाढ झाली. याच काळांत इटलींतही ज्ञानयुगाचा उदय झालेला होता, ही गोष्टही तुला पुन्हां एकदां सांगावीशी वाटते.

हे तिमुरी लोक मूळचे तुर्क होते. पण ते बहुतांशीं इराणी संस्कृतीच्या आहारी गेलेले होते. तुर्की आणि मंगोलियन लोकांनीं इराणचें राज्य जिंकलें. परंतु या विजेत्यांवर इराणनें आपली संस्कृति लादली. अर्थात् हें करीत असतां आपलें राजकीय स्वातंत्र्य परत मिळाविण्याचाही इराणचा प्रयत्न चालूच होता. हळूहळू त्यांनीं तिमुरी लोकांना पूर्वेकडे लोटीत नेलें आणि अखेरीस तिमुरी लोकांचें एक छोटेंसें राज्य फक्त ट्रॅन्सोक्शियानाच्या सर्मोवार तेवढें शिल्लक राहिलें. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला इराणमधील राष्ट्रीय प्रवृत्तीचा विजय झाला आणि तिमुरी लोकांना इराणमधून कायमचें हांकलून देण्यांत आलें. त्यानंतर सुफी अथवा सफावी नांवाचें स्वतः इराणमधीलच एक राष्ट्रीय प्रवृत्तीचें राजघराणें तेथें राज्य करूं लागलें. या घराण्यांतील दुसरा राजा तम्हास्प यानेंच शेरखानाच्या वेळीं हुमायून पळून गेला तेव्हां त्याला आसरा दिला.

या सफावी घराण्याची कारकीर्द १५०२ पासून १७२२ पर्यंत २२० वर्षें चालली. या काळाला इराणी कलेचें सुवर्णयुग समजतात. या राज्याची राजधानी जें इस्पहान शहर तेथें सुंदर सुंदर भव्य इमारतींना मोठाच भर आला, आणि तें एक कलांचें, विशेषतः चित्रकलेचें विख्यात माहेरघर बनलें. शहा अब्बास हा या घराण्यांतील सर्वांत नामांकित राजा; एवढेंच नव्हे, तर इराणच्या सर्वच राज्यकर्त्यांत तो जास्त श्रेष्ठ प्रतीचा राजा होऊन गेला असें मानतात. इतका चांगला

श्रेष्ठ राज्यकर्ता दुसरा कोणीच झालेला नाहीं असें समजतात. एका बाजूनें उझबेक लोकांनीं आणि दुसऱ्या बाजूनें उस्मानी तुर्क लोकांनीं त्याला चेपून टाकण्याचा प्रयत्न चालविलेला होता. त्यानें या दोन्ही लोकांना पिटाळून लावून एक चांगलें बलिष्ठ राज्य निर्माण केलें; पश्चिमेकडील आणि इतर ठिकाणच्याही राज्यकर्त्यांशीं संबंध जोडले आणि आपल्या राजधानीचें सौंदर्य वाढविण्यासाठीं त्यानें फारच तळमळीनें खटपट केली. शहा अब्बास यानें इस्पहानमध्यें आपल्या नगराची जी रचना केली, तिच्यामध्यें विशुद्ध अभिजातत्व आणि श्रेष्ठ अभिरुचि यांचा अत्युत्कृष्ट नमुना दिसून येतो, असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. येथील इमारती तर स्वतः चांगल्याच सुंदर आणि शृंगारलेल्या, उत्तम सजावटीच्या होत्या यांत शंकाच नाहीं. परंतु त्यांच्या आजुबाजूला जी सुंदर रचना केलेली असे तिच्यामुळें त्यांचा उठावदारपणा अधिकच वाढत असे. या काळांत इराणमध्यें जाऊन यूरपीय प्रवाशांनीं यासंबंधींचीं मोठी बहारीचीं रसाळ वर्णनें लिहून ठेवलेलीं आहेत.

शिल्पकला, वाङ्मय, भिंतीवरील मोठीं मोठीं कोरीव किंवा रंगीत चित्रें आणि छोटीं छोटीं हातांत बाळगण्याजोगीं चित्रें या दोन्ही प्रकारची चित्रकला, सुंदर गालिच्यांचें विणकाम, मातीचीं भांडीं आणि इतर पदार्थ बनविण्याची कला, दगडां-विटांचें नक्षीकाम या सर्वांना इराणी कलेच्या या सुवर्णयुगांत पुष्कळच बहर आला होता. या काळचीं भिंतींवरील कांहीं चित्रें आणि कांहीं छोट्या मूर्ती यांचे नमुने खरोखरच अलौकिक सुंदर आहेत. कला ही राष्ट्रीय बंधनें पाळीत नसते आणि तिनें तीं पाळूं नयेतही. त्यामुळें सोळाव्या व सतराव्या शतकांतील इराणच्या या कलेवर दुसरीकडील कितीएक कलांची छाप पडून ती अधिक समृद्ध आणि सुसंपन्न झाली असेल असा संभव आहे. तिच्यामध्यें इटालियन कलेची छाप उघड आहे असें म्हणतात. या सर्वांच्या पाठीमागें आज २००० वर्षें टिकून राहिलेली जी प्राचीन इराणी कलेची परंपरा ती सतत खडी आहे. दुसरी गोष्ट म्हणजे या इराणी संस्कृतीचें क्षेत्र केवळ इराणपुरेंतच मर्यादित राहिलें नाहीं. पश्चिमेला तुर्कस्तान आणि पूर्वेला हिंदुस्थान येथपर्यंतच्या सर्व विशाल प्रदेशावर ही संस्कृति पसरलेली होती. हिंदुस्थानांतील मोंगलांच्या दरबारांतसुद्धां संस्कृतिसंपन्न, सुसंकृत, लोकांची भाषा फारशी ही होती. त्याचप्रमाणें सामान्यतः पश्चिम आशियांतही सगळीकडे असाच प्रकार होता. यूरपमध्यें फ्रेंच भाषेला जें स्थान होतें, तें इकडे फारशी भाषेला प्राप्त झालेलें होतें. प्राचीन इराणी कलेंतील सगळ्या सुंदर प्रवृत्तींचें अमर प्रतीक आज आग्रा येथील ताजमहालमध्यें खडें आहे आपल्या समोर. अगदीं अशाच रीतीनें या कलेचा परिणाम पश्चिमेस दूर कॉन्स्टान्टिनोपलमध्येंही उस्मानी तुर्कांच्या कलेवर झाला आणि त्याही ठिकाणीं इराणी कलेची छाप असलेल्या पुष्कळ विख्यात इमारती उभारल्या गेल्या.

इराणमधील हें सफावी राजघराणें हिंदुस्थानांतील महान् मोंगल बादशहांशीं

जवळजवळ समकालीन होतें. हिंदुस्थानांतील मोंगलांच्या राजघराण्यांतील पहिला बादशहा बाबर हा समरकंद येथील तिमुरी राजघराण्यापैकीं होता. इराणी लोकांचें बळ जसें वाढत गेलें तसें त्यांनीं तिमुरी लोकांना इराणमधून घालवून दिलें होतें आणि ट्रॅन्सोक्झियानाचे कांहीं प्रदेश आणि अफगाणिस्तान एवढाच भाग तिमुरी वंशाच्या निरनिराळ्या छोट्या राजांच्या अमलाखालीं शिल्लक राहिलेला होता. बाबर याला बाराव्या वर्षापासून या छोट्या राजांपाशींच लढावें लागलें. या लढायांत त्याला यश येऊन तो काबूलचा राजा झाला आणि नंतर तो हिंदुस्थानांत आला. तिमुरी लोकांची संस्कृति किती उच्च दर्जाची होती याचें प्रत्यंतर आपल्याला बाबरवरून मिळतें. त्याच्या आत्मचरित्रामधून–रोजनिशीमधून कांहीं उतारे मागच्या एका पत्रांत मीं तुला दिले आहेत. सफावी राजघराण्यांतील सर्वश्रेष्ठ राजा जो शहा अब्बास, तो अकबर आणि जहांगीर यांचा समकालीन होता. या दोन देशामध्यें त्या काळीं पुष्कळच काळपर्यंत फारच निकट संबंध असला पाहिजे. कारण अफगाणिस्तान हा देश त्या काळीं मोंगलांच्या हिंदी साम्राज्याचाच एक भाग असल्यामुळें या दोन्ही राज्यांची सरहद्द एकमेकांना भिडलेलीच होती.

## १२५

## इराणमधील साम्राज्यशाही आणि राष्ट्रवाद

*२१ जानेवारी, १९३३*

माझ्याविरुद्ध तक्रार करायला तुला जागा आहे. इतिहासाच्या निरनिराळ्या अरुंद रस्त्यांवरून एकदां मागें, एकदां पुढें, अशी चाललेली माझी धांवपळ पाहून तुला खरोखरच खूप खूप चिडचिडल्यासारखें झालें असेल. निरनिराळ्या रस्त्यांनीं प्रवास करीत करीत मी चांगला एकोणिसाव्या शतकापर्यंत येऊन ठेपलों होतों, तोंच एकाएकीं मी तुला पांच-सहा हजार वर्षें मागें घेऊन गेलों आणि ईजिप्तपासून हिंदुस्थान, चीन आणि इराणपर्यंत इकडेतिकडे उड्या मारावयाला सुरुवात केली. काय हा गोंधळ आणि धांगडधिंगा असें तुला होऊन गेलें असेल ! त्याबद्दलची तुझी तक्रार जणुं प्रत्यक्ष तूंच येऊन माझ्या कानांवर घालते आहेस, असें भासतें आहे मला; पण त्या तक्रारीला चांगलेंसें उत्तर माझ्याजवळ मुळींच नाहीं. रेनी ग्रूझेचे ते ग्रंथ अलीकडे मीं वाचले ना, त्याच्यामुळें माझ्या डोक्यांत विचारांचे प्रवाह वाहूं लागले आणि मग तुला त्यांच्यामधलें थोडें थोडें कांहीं सांगितल्याशिवाय माझ्याच्यानें राहवेना. शिवाय, माझ्या या पत्रांत इराणकडे माझें थोडेंसें दुर्लक्ष झालेलें आहे, असें मला वाटतच होतें.

म्हणून या निमित्तानें ती उणीव भरून काढावी असाही एक विचार मी केला. आता आपण इराणबद्दल बोलणें चालविलेंच आहे, तर इराणचाच इतिहास आधुनिक काळापर्यंत आपण आणून पोंचवूं या झालें.

इराणी संस्कृतीच्या प्राचीन परंपरा आणि त्या संस्कृतीनें केलेलें उच्च व महान् कार्य यांच्याबद्दल, इराणी कलेच्या सुवर्णयुगाबद्दल, या आणि अशाच कांहीं कांहीं गोष्टींबद्दल आतांपर्यंत मी तुला सांगत आलों. त्यासंबंधींचीं माझीं विधानें मीं पुन्हां जेव्हां वाचून पाहिलीं, तेव्हां त्यांतील भाषा जरा फाजिल अलंकारिक झालेली असून त्यामुळें कदाचित् थोडासा गैरसमज होण्यासारखा आहे असें मला आढळून आलें. त्यावरून वाचणाराची अशी गैरसमजूत होण्याचा संभव आहे, कीं इराणच्या सर्वच जनतेच्या वांट्याला खरोखर असें हें सुवर्णयुग आलें होतें आणि आपण देशोदेशींच्या अद्भुत लोककथांच्या शेवटीं पाहतों त्याप्रमाणें खरोखरच या लोकांच्या हालअपेष्टा संपल्या होत्या आणि ते सुखानें राहूं लागले होते. अर्थातच अशी गोष्ट मुळींच घडून आलेली नव्हती. संस्कृति आणि कला या गोष्टींचा त्या काळीं आणि पुष्कळशा प्रमाणांत आजच्या काळींसुद्धां, सर्व मक्ता कांहीं थोड्या लोकांकडेच फक्त होता. जनतेचा, सर्वसामान्य माणसाचा त्यांच्याशीं कांहीं सुद्धां संबंध नव्हता. खरें पाहिलें तर अगदीं प्राचीन इतिहासकाळापासून सामान्य जनतेचें सगळें आयुष्य अन्नासाठीं आणि संसारोपयोगी वस्तूंसाठीं झगडण्यांत खर्च होत आलेलें आहे. पशूंच्या जीवनांत आणि या लोकांच्या जीवनांत विशेषसा फरक केव्हांच पडलेला नाहीं. दुसऱ्या कशासाठीं त्यांना वेळ किंवा रिकामपण केव्हाच नव्हतें. सारा दिवसभर या अन्नपाण्याची कटकट एकसारखी त्यांच्या राशीस पुजलेली होती; नव्हे, त्यासाठीं दिवसभराचे श्रमसुद्धां अपुरेच पडत होते. अशा स्थितींत कला आणि संस्कृति यांचा लोक विचार तरी केव्हां करणार आणि त्याचा आस्वाद तरी कसा घेणार? इराण, हिंदुस्थान, चीन, इटली या किंवा इतर देशांत कलेची जी भरभराट झाली, ती राजदरबाराच्या आणि श्रीमंत, सुखवस्तु आणि रिकामटेकड्या लोकांच्या करमणुकीचें एक साधन या नात्यानें. धर्माच्या क्षेत्रांत कलेचा जो काय संबंध येत असे, त्याचें लोण तेवढें मात्र कांहीं अंशीं सामान्य जनतेपर्यंत जाऊन पोंचत असे.

परंतु राजदरबारांत कला मोठी बहरलेली असली, म्हणजे तेथील राज्यकारभार सुव्यवस्थित किंवा हितकारक असतो असें कांहीं नव्हे. कला आणि साहित्य याचे मोठे आश्रयदाते म्हणून अभिमान बाळगणारे राज्यकर्ते हे पुष्कळदां राज्यकारभाराच्या दृष्टीनें अगदींच कुचकामाचे आणि दुष्ट असत. त्या काळची इराणची समाजरचना, त्या वेळच्या इतर बहुतेक सर्व देशांतल्याप्रमाणेंच थोड्याफार फरकानें सरंजामदारी पद्धतीचीच होती. एखादा राजा बलिष्ठ असला म्हणजे तो, हे सरंजामदार लोक कायदेशीर कराखेरीज आणखी ज्या कांहीं कित्येक छोट्या छोट्या बाबी कुळांकडून उकळीत असत, त्यांना प्रतिबंध करीत असे. असा राजा लोकप्रिय होत असे. असे

हे त्या मानानें चांगल्या राज्यव्यवस्थेचे काळ अधूनमधून जसे येत, त्याचप्रमाणें कांहीं कांहीं काळीं राज्यव्यवस्था अतिशय हीन अवस्थेला जाऊन पोंचे.

इकडे हिंदुस्थानांत मोंगलांच्या साम्राज्याची अगदीं शेवटची घटका भरत आली होती, त्याच सुमारास १७२५ मध्यें सफावी घराण्याची राजवट इराणमध्यें संपुष्टांत आली. इतिहासाच्या नित्य क्रमाला अनुसरून या घराण्याचें इतिहासाच्या रंगभूमीवरील काम आतां संपलें होतें. देशांतील सरंजामशाही हळूहळू मोडकळीला येत चालली होती आणि देशांत जे नवीन आर्थिक फेरबदल घडून येत होते, त्यांमुळें जुनी समाजरचना उखडली जात होती. त्यांतच अवजड करांच्या ओझ्याची भर पडली आणि लोकांमध्यें असंतोष वाढत गेला. अफगाण लोक हे त्या काळीं सफाई घराण्याच्या अमलाखालीं होते. ते बंड करून उठले. त्यांनीं आपल्या स्वतःच्या देशांत तर जय संपादन केलाच, परंतु त्यांनीं इस्पहान राजधानीही काबीज केली; आणि इराणच्या शहाला पदच्युत केलें. पुढें लौकरच इराणमधील एक सरदार नादीरशहा यानें इराणमधून या अफगाण लोकांना हांकलून लावलें. आणि नंतर त्यानें स्वतःच इराणचा राजमुकुट धारण केला. याच नादीरशहानें मोंगल साम्राज्याच्या अखेरच्या काळांतील दुर्बळ बादशहांच्या काळांत हिंदुस्थानावर धाड घातली, दिल्लीतील लोकांची कत्तल केली आणि इकडून प्रचंड संपत्ति त्यानें आपल्याबरोबर नेली; त्यातच शहाजहान बादशहाचें मयूरसिंहासनही त्यानें नेलें. यापुढील अठराव्या शतकांतील इराणचा इतिहास म्हणजे आपसांतील यादवी आणि आज जरा बरी राज्यव्यवस्था असावी तर उद्यां अगदींच गैरव्यवस्था माजावी, अशा घालमेलीचा निरुत्साहकारक वृत्तांत आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या बरोबर नवीनच आणखी संकटें आलीं. आतां इराणचा यूरप खंडाच्या वाढत्या आणि चढाऊ साम्राज्यवादाशीं संबंध येऊं लागला. उत्तरेकडून रशियाचें एकसारखें दडपण चालू झालें आणि ब्रिटिशांनीं इराणच्या आखाताकडून पुढें सरकण्यास सुरुवात केली. हिंदुस्थानपासून इराण कांहीं फारसा दूर नव्हता. त्यांच्या सरहद्दी एकमेकांना हळूहळू भिडावयाला येऊं लागल्या होत्या आणि आजच्या घटकेला या दोन्ही देशांची सरहद्द एक झाली सुद्धां आहे. यूरपमधून हिंदुस्थानकडे जो सरळ मार्ग होता, त्या मार्गाच्या बाजूला इराण देश असून त्या मार्गावर इराणचा थोडासा वरचष्मा चालूं शकत असे. ब्रिटिशांचें या भागामधील सर्व धोरण हिंदी साम्राज्य आणि त्याकडे जाणारे मार्ग यांचें संरक्षण करावयाचें या गोष्टीवर आधारलेलें होतें. तेव्हां रशियानें इराण व्यापून या आपल्या मार्गावर पसरून राहावें आणि तेथून आपली लोभी नजर हिंदुस्थानावर टाकावी, ही गोष्ट इंग्लंडला केव्हांही सहन होण्यासारखी नव्हती. यामुळें इंग्लंड आणि रशिया या दोन्ही राष्ट्रांचें लक्ष इराणकडे विशेष लागून राहिलें आणि दोघांनीं मिळून त्या बिचाऱ्या लहानशा देशाचा छळच आरंभला. या काळचे इराणचे शहाही अगदींच नालायक आणि मूर्ख होते. ते भलत्याच वेळीं या दोन देशांपैकीं कोणाशीं तरी लढाई उपस्थित करीत, नाहीं तर

रशिया व इराण
एकोणिसाव्या शतकांतील
रशियाचें मध्य आशियांत
पुढें पाऊल
काश्मीर
चिनी
तुर्कस्तान
रशिया
फेरू बाल्काश
तश्कंद
समरकंद
बुखारा
आक्सस
पामीर
अफगाणिस्तान
बलुचिस्तान
कास्पियन
समुद्र
काकेशस
इराक
तेहरान
इराण
इस्पहान

आपल्याच प्रजेविरुद्ध तरी हत्यार उपशीत आणि त्यामुळें ते या देशाच्या कचाट्यांत सांपडत. रशिया आणि इंग्लंड या दोन मोठ्या राज्यसत्तांमध्यें आपसांतील चुरस नसती, तर ईजिप्तप्रमाणें इराणही यापूर्वी केव्हांच रशिया किंवा इंग्लंड यांपैकीं कोणीं तरी आपल्या साम्राज्यांत सामील करून घेतला असता.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला आणखी एका कारणासाठीं इराणचा लोभ या राष्ट्रांना सुटला. इराणमध्यें तेलाचा म्हणजे पेट्रोलचा शोध लागला. आणि पेट्रोल तर फारच किंमतीची वस्तु होती. त्या वेळच्या म्हाताऱ्या शहाचें मन वळवून डार्सी नांवाच्या एका ब्रिटिश नागरिकानें इराणमधील तेलाच्या खाणींतील तेल काढून विकण्याचा मक्ता मोठ्याच सवलतीच्या अटीवर १९०१ सालीं मिळविला. या कराराची मुदत भली मोठी म्हणजे साठ वर्षांची होती. तीनंतर या खाणींचा उद्योग करण्याकरितां म्हणून अँग्लो-पर्शियन ऑइल कंपनी या नांवाची एक ब्रिटिश कंपनी स्थापन झाली. तेव्हांपासून या कंपनीचा तेलाचा उद्योगधंदा इराणमध्यें चालत आला असून त्यापासून या कंपनीला प्रचंड फायदा होत आलेला आहे. या फायद्यापैकीं कांहीं थोडा भाग इराणी सरकारच्या वांट्याला येतो; परंतु बाकीचा सर्व प्रचंड हिस्सा देशाबाहेर कंपनीच्या भागीदारांच्या वांट्याला जातो. या भागीदारांमध्यें ब्रिटिश सरकार हें सर्वांत मोठा भागीदार आहे. हल्लींचें इराण सरकार हें मोठें कट्टें राष्ट्रवादी असून परकी लोकांनीं आपल्या देशाची अशी लूट करावी, या गोष्टीला त्या सरकारचा कट्टर विरोध आहे. १९०१ सालीं साठ वर्षांचा जो करार डार्सी याच्यापाशीं झाला, त्याच्याच आधारावर या अँग्लो-पर्शियन कंपनीचें काम चालू होतें. हा करारच इराण सरकारनें रद्द केला हें पाहून ब्रिटिश सरकारचा तर तीळपापडच झाला आणि त्यानें इराणी सरकारला धमकी देण्याचा आणि दमदाटी करण्याचा प्रयत्न करून पाहिला.* ब्रिटिश सरकारला आठवण नाहीं राहिली, कीं आतां काळ बदलला असून आशियांतील लोकांना अशी दमदाटी देऊन आपलें काम करून घेण्याचा काळ आतां उरलेला नाहीं.

पण या साऱ्या पुढच्या काळांतल्या गोष्टी मी तुला आधींच सांगून टाकूं लागलों. साम्राज्यशाहीची काळी छाया इराणवर जशी अधिकाधिक पडूं लागली आणि इराणचा शहा साम्राज्यवाद्यांच्या हातचें जसें बाहुलें बनत चालला, तसतसा इराणमध्यें राष्ट्रीय भावनेचा विकास होत गेला. तेथें एक राष्ट्रीय पक्ष स्थापन झाला. या पक्षाला परकी हस्तक्षेपाचाही तिटकारा होता आणि शहाच्या अनियंत्रित राज्यसत्तेलाही त्याचा तितकाच तीव्र विरोध होता. त्यांनीं लोकशाहीप्रधान राज्यघटना आणि आधुनिक पद्धतीच्या सुधारणा यांची मागणी सुरू केली. या वेळीं इराणची राज्यव्यवस्था अयोग्य प्रकारची होती आणि करांचें ओझें अवजड झालेलें होतें; त्यांतच ब्रिटिश आणि रशियन लोकांची देशांत नित्य कांहीं तरी ढवळाढवळ चालूच होती. प्रतिगामी

* अगदीं अलीकडे इराण सरकारच्या दृष्टीनें कांहींसा फायद्याचा असा एक नवा करार आतां अखेरीस ब्रिटिश सरकार आणि तेल-कंपनी यांच्यामध्यें करण्यांत आला आहे.

वृत्तीच्या शहाचें या परकी सरकाराशीं अधिक चांगलें सूत जमे; तसें तें थोडेंसें स्वातंत्र्य मागणाऱ्या आपल्या प्रजेशीं जमत नसे. पुढें १८०४ मध्यें झारच्या राशियाविरुद्ध जपाननें जय मिळविला; त्या जयानें इराणच्या राष्ट्रवादी लोकांना अतिशयच स्फुरण चढलें. कारण एक तर हा एका पौर्वात्य राष्ट्राचा पाश्चात्य राष्ट्रावर विजय होता आणि झारचा राशिया हा इराणावर रोज आक्रमण करूं पाहणारा मोठाच त्रासदायक असा इराणचा शेजारी होता. पुढें १९०५ मध्यें रशियांत राज्यक्रांतीचा प्रयत्न झाला. तो फसला आणि अत्यंत निर्दयपणें त्यांत क्रांतिकारकांना झोडपून काढण्यांत आलें. तरी पण त्यामुळेंही इराणच्या राष्ट्रवादी लोकांच्या उत्साहांत आणि कांहीं तरी प्रत्यक्ष प्रयत्न करण्याच्या विचारांत भरच पडली. त्यांनीं शहावर एवढें मोठें दडपण आणलें, कीं शेवटीं शहानें मोठ्या नाखुशीनें लोकशाहीप्रधान राज्यघटनेला १९०६ मध्यें मान्यता दिली. मजलिस या नांवाचें त्यांचें राष्ट्रीय कायदेमंडळ प्रस्थापित झालें, आणि इराणी राज्यक्रांतीच्या प्रयत्नाला यश आलेंसें वाटूं लागलें.

परंतु एवढ्यावर इराणचें नष्टचर्य संपलेलें नव्हतें. शहाच्या मनांतून आपली सत्ता नाहींशी व्हावी असें मुळींच नव्हतें. आणि रशियन किंवा ब्रिटिश लोकांनाही इराण हें एक लोकशाही राष्ट्र व्हावें ही गोष्ट आवडण्यासारखी नव्हती. कारण त्यामुळें इराणचें सामर्थ्य वाढून त्याची या दोन राष्ट्रांच्या धोरणांत एक अडचण निर्माण होण्याची भीति होती. शहा आणि मजलीस यांच्यामध्यें यामुळें एक झगडा उत्पन्न झाला. त्या वेळीं शहानें स्वतःच्याच लोकप्रतिनिधिसभेवर गोळीबार केला. परंतु लोकसमाज आणि लष्कर हें मजलीस आणि राष्ट्रीय पक्ष यांच्या बाजूला राहिलें आणि शहाची गादी वांचवायला मदत फक्त रशियन सैन्याचीच झाली. कोणत्या ना कोणत्या सबबीवर–सामान्यतः आपल्या नागरिकांचें संरक्षण करणें ही एक नेहमींची कायमचीच सबब असे–रशिया आणि ब्रिटन यांनीं आपलें सैन्य इराणमध्यें आणून ठेवलेलेंच असे नेहमीं. रशियन लोकांचे सगळ्यांच्या हृदयांत धडकी भरविणारे कोसॅक बहादर इराणमध्यें होते आणि इराणी लोकांशीं वस्तुतः हिंदी लोकांचा कांहींही हेवादावा नसतांना ब्रिटिश लोक हिंदी सैन्य ठेवून त्याच्या जोरावर इराणी लोकांशीं दमदाटी करीत असत.

या संकटांत इराणची अवस्था फारच कठिण झाली. इराणच्या राज्याजवळ पैसा मुळींच नव्हता आणि लोकांची परिस्थिति अतिशयच केंविलवाणी झालेली होती. इराणी मजालिसनें ही परिस्थिति सुधारण्याची आपली शिकस्त केली; परंतु रशियन लोकांच्या, किंवा ब्रिटिशांच्या विरोधामुळें, अथवा कधीं कधीं या दोघांच्याही मिळून एकत्र विरोधामुळें त्यांचे बहुतेक सारे प्रयत्न व्यर्थ गेले. अखेरीस अमेरिकेकडून कांहीं मदत मिळावी अशी त्यांनीं खटपट केली आणि एका कर्तबगार अमेरिकन गृहस्थानें, (त्याचें नांव मॉर्गन शूस्टर) या कामांत प्रयत्नांची शिकस्त केली. पण प्रत्येक वेळीं त्याला रशियन किंवा ब्रिटिश विरोधाच्या प्रबळ भिंतीवर टक्कर खाण्याचा मात्र प्रसंग आला. या प्रकाराची किळस येऊन, निराश आणि निरुत्साह होऊन त्यानें इराण

सोडून आपल्या मायदेशाची वाट धरली. त्यानंतर शूस्टरनें एक पुस्तक लिहिलें आणि त्यांत ब्रिटिश आणि रशियन साम्राज्यशाही इराणचें रक्तशोषण करून इराण देशाला धुळीला कसे मिळवीत आहेत याची हकिकत वर्णन केली. त्याच्या पुस्तकाचें नांवसुद्धां किती यथार्थ आहे. '**इराणची धडपड**' हें त्याच्या पुस्तकाचें नांव. त्यांत इराणचा त्या वेळचा सर्व इतिहास सांगितलेला आहे.

आतां इराण स्वतंत्र देश म्हणून टिकून राहणें शक्य नाहीं, हें जणुं निश्चितच झालें. इंग्लंड आणि रशिया यांनीं आपसांत या देशाची विभागणी करून तेथें आपलें वर्चस्वाचे भाग ह्या दिवशीं ठरवून घेतले, त्या दिवशींच स्वतंत्र इराणच्या गळ्याशीं मृत्यूचे पाश आवळण्यास सुरुवात झाली. त्या वेळेपासून, महत्त्वाचीं नाक्याचीं ठिकाणें या दोन परकीय देशांच्या शिपायांनीं व्यापलीं ; तेलाच्या सगळ्या खाणींचा उद्योग केवळ ब्रिटिश कंपनीच्या पूर्णपणें कबजांत आला. त्यामुळें इराणची चमत्कारिक केविलवाणी अवस्था झाली. या परकी राष्ट्रांपैकीं कोणीं तरी इराणची सर्वच राज्यव्यवस्था आपल्या हातीं घेऊन तो देश त्यानें आपल्या साम्राज्यांतच प्रत्यक्ष सामील करून टाकला असता तरी त्याहून बरें झालें असतें. कारण त्यामुळें मग या साम्राज्यावर कांहीं तरी जबाबदारी या देशांतील लोकांच्या सुस्थितीबद्दल राहिली असती. अशी इराणची अवस्था असतांना १९१४ च्या महायुद्धाचा भडका उडाला.

इराणनें आपण या युद्धांत तटस्थ आहोंत असें जाहीर केलें. परंतु दुर्बलांच्या अशा जाहीरनाम्यांना प्रचळ लोक भीक घालीत नसतात. युद्धांत पडलेल्या सर्वच राष्ट्रांनीं इराणच्या तटस्थपणाची कसलीच पर्वा केली नाहीं ; आणि इराणच्या सरकारचें मत काय आहे आणि काय नाहीं याची कांहीं विचारपूस न करतां परकी सैन्यें येऊन इराणमध्यें एकमेकांशीं लढत राहिलीं. इराणच्या सभोंवार युद्धयमान राष्ट्रांचें कडेंच झालें होतें. इंग्लंड आणि रशिया हे दोस्त होऊन एका बाजूला होते. तुर्कस्तान हा त्या वेळीं जर्मनीचा दोस्त असून इराक आणि अरबस्तान यांमध्यें त्या वेळीं तुर्कस्तानचें राज्य होतें. महायुद्धामध्यें अखेरीस १९१८ सालीं इंग्लंड, फ्रान्स आणि त्यांचे दोस्त याचा जय झाला ; त्या वेळीं इराण देश सर्वस्वीं ब्रिटिश सैन्यानें व्यापलेला होता. इराणला आपल्या संरक्षणाखालचें राज्य म्हणून जाहीर करण्याच्या अगदीं बेतात इंग्लंड होतें ; मुलूख साम्राज्यांत सामील करून घेण्याचीच ही जरा एक नाजूक पद्धति होती. मध्य आशियांत भूमध्य समुद्रापासून तों बलुचिस्तान आणि हिंदुस्थान यांच्या सरहद्दीपर्यंत एक मोठें ब्रिटिश साम्राज्य स्थापन करण्याचीं स्वप्नेंही कांहींजणांच्या मनांत घोळूं लागलीं होतीं ; पण हीं स्वप्नें खरीं ठरलीं नाहींत. ब्रिटनच्या दुर्दैवानें या सुमाराला रशियांतील झारशाही नष्ट झालेली होती आणि तिच्या ठिकाणीं आतां सोव्हिएट रशियाचें राज्य उभें होतें. त्याचप्रमाणें ब्रिटनची तुर्कस्तानांतीलही सगळीं कारस्थानें फसलीं होतीं आणि या वेळीं तेथेंही कमालपाशानें, आपला देश दोस्तांच्या जवळजवळ घशाखालीं गेला होता, तो ओढून बाहेर काढला होता.

या सर्व घटनेचा इराणच्या राष्ट्रीय पक्षाला फायदा झाला. इराण देश नांवाला का होईना, पण स्वतंत्र राहिला. पुढें १९२१ सालीं एका लष्करी उलथापालथीच्या प्रसंगानें रिझाखान नांवाचा एक शिपाई महत्त्वाला चढला. त्यानें लष्करावर आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें आणि नंतर तो मुख्य प्रधान झाला. १९२५ मध्यें जुन्या शहाला पदच्युत करून एका घटनासमितीनें रिझाखानाला इराणचा नवा शहा म्हणून निवडलें. त्यानें रिझा शहा पहलवी असें नांव धारण केलें.

अशा रीतीनें रिझा शहानें शांततेच्या मार्गानें आणि बाह्यतः तरी लोकशाहीच्या तंत्राप्रमाणें वागून गादी प्राप्त करून घेतली. इराणची मजलिस त्याच्या कारकीर्दीत चालू असून हा नवा शहा आपल्या हातीं सगळी अनियंत्रित सत्ता आहे किंवा असावी अशा भानगडींत कधीं पडत नाहीं. तरी पण तो एक समर्थ माणूस असून इराणच्या राज्यकारभाराचें सुकाणूं त्याच्याच हातांमध्यें आहे ही गोष्ट अगदीं उघड आहे. गेल्या कांहीं वर्षांत इराणच्या स्वरूपांत फारच फेरबदल घडून आलेला आहे आणि आपल्या देशाला पूर्ण आधुनिक बनविण्याच्या दृष्टीनें इराणमध्यें पुष्कळ सुधारणा घडवून आणण्याचा रिझा शहानें निश्चय केला आहे. देशांत मोठीच राष्ट्रीय जागृतीची लाट उसळली आहे आणि इराणमध्यें परदेशी लोकांचे जे हितसंबंध आहेत, त्या सर्वांच्या बाबतींत चढाईचें धोरण स्वीकारावें अशा तऱ्हेची राष्ट्रवादाची भूमिका होत आहे.

यामध्यें एक गोष्ट विशेष लक्षांत येण्यासारखी अशी आहे, कीं ही राष्ट्रीय जागृति इराणमध्यें आज २००० वर्षें जी संस्कृतीची परंपरा आहे तिच्याशीं सर्वस्वीं निगडित अशी आहे. मधला इस्लामचा काळ सोडून त्या पूर्वीच्या इराणच्या श्रेष्ठत्वाच्या काळाशीं या राष्ट्रीय जागृतीनें आपलें नातें प्रस्थापित केलेलें असून, त्या जुन्या काळच्या इतिहासांतून लोकांच्या ठिकाणीं स्फूर्ति निर्माण करण्याचा या जागृतींत प्रयत्न आहे. रिझा शहानें पहलवी–'पल्हवी'–हें जें आपल्या घराण्याचें म्हणून नवीन नांव धारण केलेलें आहे, त्यानेंसुद्धां डोळ्यांपुढें प्राचीन काळच उभा राहतो. इराणमधील लोकसमाजाचा धर्म इस्लाम–शियापंथी–आहे ही गोष्ट स्पष्टच आहे. परंतु त्यांच्या देशाच्या दृष्टीनें–राजकीय दृष्टीनें–पाहतां धर्मापेक्षां राष्ट्रीय प्रवृत्तीचाच येथें अधिक प्रभाव आहे. सर्व आशिया खंडभर हाच प्रकार घडून येतो आहे. यूरप खंडांत ही गोष्ट यापूर्वीच शंभर वर्षांपूर्वी एकोणिसाव्या शतकांत घडून आली; परंतु तिकडे आज पुष्कळ लोक राष्ट्रवादाचें तत्त्व हें निरुपयोगी झालेलें आहे असें मानूं लागलेले असून प्रचलित परिस्थितीला जास्त जुळण्यासारखीं अशीं कांहीं नवीन तत्त्वें आणि ध्येयें शोधून काढण्याच्या मार्गाला लोक लागलेले आहेत.

इराण हें नांव आतां रीतसरपणें या देशाच्या सर्व कारभारांत मंजूर झालेलें आहे. रिझा शहानें असा हुकूम काढलेला आहे, कीं पर्शिया हें नांव यापुढें वापरतां कामा नये.